اِنَّ هٰذَا الْقُرْاٰنَ يَهْدِىْ لِلَّتِىْ هِىَ اَقْوَمُ ـ (القرآن)

'' नि:संशय हे क़ुरआन त्या मार्गाचा निर्देश करीत आहे, जो अगदी सरळ आहे''

Dawatul Quran Vol. III
in Marathi Language

# दअ्वतुल क़ुर्आन

## पवित्र क़ुरआनाचा मराठी अनुवाद व भाष्य

## खंड ३

**सूरह रूम ते सूरह नास**

**(पारा २१ ते पारा ३०)**

❑❑❑❑

भाष्य :

**शम्स पीरज़ादा (रह.)**

❍❍❍❍

मराठी अनुवाद :

**मुहम्मद यूसुफ़ अत्तार**

**मुहम्मद शफ़ी अन्सारी**

प्रकाशक :

**इदारा दअ्वतुल क़ुरआन**

५९, मुहम्मद अली रोड, मुम्बई ४०० ००३

**Idara Dawatul Quran**

**59, Muhammad Ali Road Mumbai 400003**

**Phone: 23465005**

...........2nd Edition (Vol.III) February. 2015 — किंमत रू.१२०/-

........... 1,000 — Price Rs. /-

بِسۡمِ اللّٰهِ الرَّحۡمٰنِ الرَّحِيۡمِ

# प्रस्तावना

प्रशंसेस पात्र केवळ अल्लाह आहे; ज्याच्या विशेष कृपेने दअतुल कुरआन पूर्णत्वास पोहचले. आता आम्ही याचा तृतीय व अंतिम खंड वाचकांच्या सेवेत सादर करण्याचे सद्भाग्य प्राप्त करीत आहोत.भाष्य - लेखनाचा आरंभ हि. स. १३९६ अर्थात १९७६ साली झाला आणि इतिश्री रमजान हि.स १४१४ अर्थात १९९४ मध्ये झाली. अर्थात कुरआन-आकलनाच्या मार्गात सतत अठरा वर्षांच्या श्रम आणि विचार चिंतनाचा हा परिपाक होय. पवित्र कुरआनातील प्रत्येक आयत, त्याचा प्रत्येक शब्द किंबहुना त्याची अक्षरे ही या गोष्टीची निकड बाळगून होते की त्यांच्यावर ओझरता दृष्टीक्षेप टाकला जाऊ नये, तर विचार चिंतनाचा हक्क अदा करण्याचा प्रयत्न केला जावा आणि कुरआनास तरतील सह (थांबून थाबून) वाचण्याच्या आदेशाचे पालन भाष्य-संदर्भात ही केले जावे, या साठी की आयतीचे यथायोग्य स्पष्टीकरण व्हावे; त्यातील सुप्त पैलू दृगोचर व्हावेत आणि बुध्दिकौशल्याच्या मौक्तिकांनी आम्ही आपली झोळी भरुन ध्यावी. भाष्याची कदर करणाऱ्यांना निश्चितच दिर्घ काळ पावेतो वाट बघावी लागली परंतु कार्यव्याप्तीचे स्वरुप लक्षात घेता, जो दीर्घ अवधि लागला तो टाळता येण्या सारखाया नव्हता.

ज्या प्रसंगी भाष्य - लेखनास आरंभ झाला आणि त्याचे काही भाग प्रकाशित केले गेले, त्या वेळी सर्व बाजूंनी हा प्रश्न उठत होता की इतरा भाषेत आधीच अनेक भाष्ये उपलब्ध असतांना आणखी एक भाष्य लिहीण्याची गरज का भासली ? त्या वेळी लोकांना समजाविणे आम्हाला मोठे अवघड होते, तरी ही भाष्याच्या प्रस्तावनेत आम्ही याची थोडीशी कारण मिमांसा केली होती; आणि जसे जसे भाष्याचे भाग प्रकाशित होत गेले, अल्लाहच्या महत्कृपेने लाभप्रद पैलू स्पष्ट होत गेला आणि आता जेव्हा हे काम पूर्णत्वा प्रत जाऊन पोहचले आहे तेव्हा वाचक स्वत:च ठरवू शकतात की हे कार्य एखाद्या आवश्यकतेनुसार पार पाडले गेले आहे किंवा उगीचच. आता या बाबत आणखी काही सांगण्याची आम्हाला गरज भासत नाही.

या भाष्यात आम्ही खालील गोष्टींना विशेषत्वाने दृष्टी-पथात राखले आहे.

एक ही की जी गोष्ट देखील लिहीली जावी संशोधनाच्या कसोटीवर नीट पडताळून लिहिली जावी. ना एखाद्या पंथ संप्रदायाचे बंधन बाळगले जावे आणि ना याला एखाद्या विचार-प्रवाहाचे प्रातिनिधिक साधन बनविले जावे.

दुसरी ही की कुरआनाच्या स्पष्टीकरण व आशयात प्रेषित आचरण शैलीचे जे स्थान आहे त्याला आवर्जून विचाराधीन राखले जावे. यास्तव ठिकठिकाणी सनदशीर हदीस वचनांचा उल्लेख केला गेला आहे; मात्र जी कथने कुरआनाच्या निवेदनाशी विसंगति राखतात किंवा ज्यांच्या मुळे प्रेषित गणाच्या प्रतिष्ठेला गालबोट लागते त्यांना भाष्यात समाविष्ट न करण्याची काळजी घेतली गेली आहे. आणि जिथे आवश्यक वाटले, अशा कथनांवर टीका ही केलेली आहे. मग प्रमाण दृष्टया त्या कथनांचा समावेश  अहादीस सहीह' मध्ये का असेना ? कारण पैगंबरांचे कोणतेही वचन कुरआनाच्या विपरीत असूच शकत नाही. अरबी भाष्या मध्ये ज्या उपट सुंभ कथनाचा उल्लेख आहे ती कुरआन आकलनाच्या मार्गात जबरदस्त अडथळयास कारणीभूत ठरली आहेत.

तिसरी गोष्ट ही की कुरआनाच्या मूळ आवाहनास,आजच्या भौतिकवादीय व मिथ्या वैचारीकतेवर प्रहार करीत, प्रकट केले गेले जावे, या साठी की मुसलमानांवर अल्लाहचे प्रमाण स्पष्टत: कळून यावे आणि मुस्लिमेतरांवर ते प्रस्थापित व्हावे.

चौथी ही की आवाहनाचा रोख (Approach) थेट कुरआन व प्रेषितांच्या शैलीचा असावा म्हणजे साधा सरळ व स्वाभाविक असण्या खेरीज अल्लाह आणि आखिरत शी गाफील असलेल्या माणसांना जागृत करणारा व आखिरतच्या भयंकर अजाव (शिक्षा) विषयी खबरदार करणारा असावा. कुरआनात त्याच्या अवतरणाचे सर्वप्रथम उद्दिष्ट खबरदार करणे हाच सांगितला आहे.

पाचवी ही की कुरआनाचा अभ्यास करणाऱ्याचे लक्ष सर्वात प्रथम आपल्या स्वत:वर केंद्रित व्हावे आणि त्याने कुरआनाच्या दर्पणात आपले आचरण व चारित्र्य बघून घ्यावे. आत्म-शुध्दी व आपले वैचारीक व ज्ञानविषयक प्रशिक्षण ही सर्व प्रथम जबाबदारी होय, जी कुरआन आपल्या संबोधितावर लागू करतो; आणि या गोष्टीस प्रवृत्त करतो की त्याने सर्वात प्रथम आपल्या आखिरत संबंधीच्या मुक्तिची काळजी घ्यावी. या कसोटीच्या

मैदानात माणसाला अशा साठी उभे केले गेले आहे की त्याने आपल्या अंगी अशा गुणांना वृध्दिंगत करावे जे त्याला जन्नत-पात्र बनवतील. यास्तव आपल्या व्यक्तिगत सुधारणे बाबत बेपर्वा वृत्ती दाखवून सामुदायिक सुधारणेच्या गोष्टी बोलणे. कुरआनाच्या मूल हेतुस दृष्टीआड करणे होय.

सहावी ही की मुसलमानांच्या वैचारीक व कर्म विषयक मार्गभ्रष्टते बद्दल, मग ती बिदअती व वाह्यात गोष्टी आणि कबर पूजेच्या स्वरुपाची असो किंवा भौतिक वादी स्वरुपाची असो, सक्तपणे कानउघाडणी केली जावी, अशा साठी की एकेश्वर वादाची कल्पना अधिक स्पष्ट दिसून यावी व त्यांना आपल्या आचरणात सुधारणा करण्याची सुबुध्दि लाभावी.

सातवी गोष्ट ही की मुस्लिमेतरांना कुरआनाची महत्ता, आणि तो दिव्य ग्रंथ असल्याचा पैलू स्पष्टतः कळून यावा. कारण कुरआनाने आपण चमत्कार असल्याच्या पैलूस फार मोठे प्रमाण ठरविले आहे. परंतु अरबी न जाणणाऱ्या लोकांना याची कल्पना, त्याने प्रस्तुत केलेली सत्ये, त्याच्या शिकवणी, त्याची भाकिते, त्याच्या अस्तित्वास अपील करणाऱ्या गोष्टी व बुद्धिला सचेत करणाऱ्या हिकमती द्वारेच येऊ शकते. यास्तव या गोष्टींना स्पष्टीकरणासह प्रभावी शैलीत प्रस्तुत करणे आवश्यक आहे.

आठवी ही की कुरआन वैयक्तिक व सामूहीक जीवना करीता जे मार्गदर्शन करतो आणि ज्या स्तरावर इस्लामी समाजाची उभारणी करण्या साठी जीवन व्यवस्था कायम करु इच्छितो, ते अशा रीतीने दृगोचर व्हावे की इस्लामची उचित व सर्वकष कल्पना मन:पटलावर अंकित व्हावी. आणि कुरआनाच्या संकेतां पासून प्रकाश लाभ घेत, आजच्या काळातील समस्या सोडविण्याची उपाय योजना व्हावी.

नववी ही की बौद्धिक समाधाना पेक्षा जास्त मानसिक समाधानाची उपाय योजना केली जावी. केवळ ज्ञान-वृद्धि मग ती विज्ञान विषयक असो वा ऐतिहासिक, ना कुरआनाचे उद्दिष्ट आहे आणि ना याने हृदय कंपित होते जे उपदेश ग्रहण करण्यास कारक ठरते. यास्तव वैज्ञानिक शोधांना कुरआनाच्या निवेदनाच्या समर्थनार्थ अवश्य प्रस्तुत केले जावे, परंतु विज्ञानाला (Science) कुरआनाचा विषय ठरवू नये.

आणि दहावी गोष्ट ही की कुरआनाच्या तथ्या (Spirit) ला पूणतः विचाराधीन राखावे आणि भाष्य विषयक विवादात त्याचे विस्मरण घडू न द्यावे. या उद्दिष्टां मध्ये आम्हाला कोठवर यश लाभले, याचे अनुमान तर वाचकच लावू शकतात परंतु जेथपावेतो देखील यश लाभले आहे, ते अल्लाहच्या विशेष कृपेचेच फळ होय अन्यथा भाष्यकाराला आपल्या असमर्थतेची पूर्णतःजाणीव आहे. वस्तुस्थिती ही की पवित्र कुरआनाच्या भाष्य-अनुवादाचे कार्य अतिशय कठीण व फार मोठया जबाबदारीची बाब होय, परंतु जेव्हा माझ्या सच्या सहकाऱ्यांनी, जे इदारा दअवतुल कुरआनचे सदस्य सभासद आहेत, माझ्यावर ही जवाबदारी टाकली तेव्हा अल्लाहने आपल्या विशेष कृपेने उपकृत केले आणि

كُلٌّ مُيَسَّرٌ لِمَا خُلِقَ لَهُ

''प्रत्येक माणसा करीता ते कार्य सोपे केले जाते, ज्या साठी त्याला निर्माण केले गेले आहे'' या हदीस वचनानुसार याची सुबुद्धि लाभली. अल्लाह प्रणित देणगी म्हणून हे सांगू इच्छितो की अध्यायन काळात, जेव्हा मी मुंबईच्या अंजुमन इस्लाम हायस्कूल मध्ये शिकत होतो, तेव्हा ही माझा खास विषय ''कुरआन'' हाच होता नंतर वर्षानुवर्षे कुरआनाचा पाठ (दर्स) देण्याचे आणि त्याचा सखोल अभ्यास करण्याचे अवसर लाभात राहीले. अरबी भाषा देखील मी केवळ कुरआन-आकलनाच्या हेतुने शिकले आणि ती ही कुरआनाच्या माध्यमातून. अर्थात हा अल्लाहचा फार मोठा अनुग्रह, त्याची फार मोठी कृपा आहे, ज्या द्वारे त्याने मला उपकृत केले.

اَلرَّحْمٰنُ عَلَّمَ الْقُرْاٰنَ

''रहमान ने कुरआन शिकविले''

भाष्य दअवतुल कुरआनचे सर्वप्रथम उद्दिष्ट हेच की कुरआनाचे आवाहन कुरआनाच्या माध्यमातूनच अल्लाहच्या समस्त दासां प्रत पोहचविले जावे. मुस्लिमेतरां मध्ये सत्य स्विकृतिची भावना आणि मुसलमानां मध्ये कुरआन आकलानाची आवड निर्माण व्हावी, जेणेकरुन त्यांनी आपल्या नैतिक सुधारणे कडे लक्ष द्यावे. परंतु एखादे भाष्य त्याच स्थितीत परिणाम कारक ठरु शकते जेव्हा सत्य स्विकृति करीता मनाची कवाडे खुली असावीत. या संदर्भात एका उर्दू शायरने म्हटले आहे-

**''तेरे जमीर पे जबतक न हो नुजूले किताब**
**गिरह कशा है न राजी न साहेबे कश्शाफ''**

शेवटी दुआ करतो की अल्लाह काही उणीव असल्यास माफ करो आणि कुरआनाच्या या सेवेला स्विकारुन उपकृत करो आणि वाचणाऱ्या प्रत्येक माणसाला आत्म-सुधाराची व मार्गदर्शनाची सुबुद्धि प्रदान करो (आमीन)

**इदारा दअवतुल कुरआन**

५९, मोहम्मद अली रोड मुंबई- ४००००३ (महाराष्ट्र)

**शम्स पीरजादा**

दि. २७ जीकअदा हि. स. १४१९, मे १९९४

(नोट: ही प्रस्तावना भाष्यकारानी उर्दु भाष्य प्रसिद्ध करताना लिहिली होती त्याचा मराठी अनुवाद दिला गेला आहे.)

# सूची


| सूरह क्रमांक | सूरह चे नाव | पृष्ट क्रमांक |
|---|---|---|
| ३०. | रूम | १ |
| ३१. | लुकमान | ३० |
| ३२. | सजदा | ४९ |
| ३३. | अहजाब | ५८ |
| ३४. | सबा | ११९ |
| ३५. | फातिर | १४८ |
| ३६. | यासीन | १७० |
| ३७. | साफ्फात | २०४ |
| ३८. | सॉद | २४२ |
| ३९. | जुमर | २७० |
| ४०. | मोमिन | ३१० |
| ४१. | हा मीम सजदा | ३४६ |
| ४२. | शूरा | ३७५ |
| ४३. | जुखरुफ | ४०५ |
| ४४. | दुखान | ४३५ |
| ४५. | जासिया | ४५० |
| ४६. | अहकाफ | ४६६ |
| ४७. | मुहम्मद | ४८६ |
| ४८. | फतह | ५०४ |
| ४९. | हुजुरात | ५२६ |
| ५०. | कॉफ | ५४२ |
| ५१. | जारियात | ५५७ |
| ५२. | तूर | ५७७ |
| ५३. | नज्म | ५८८ |
| ५४. | कमर | ६१४ |
| ५५. | रहमान | ६३२ |
| ५६. | वाकेआ | ६५२ |
| ५७. | हदीद | ६७० |
| ५८. | मुजादला | ६९० |
| ५९. | हश्र | ७०४ |
| ६०. | मुम्तहिना | ७२४ |
| ६१. | सफ्फ | ७३९ |
| ६२. | जुमुआ | ७५१ |
| ६३. | मुनाफिकून | ७५८ |
| ६४. | तगाबून | ७६५ |
| ६५. | तलाक | ७७५ |

| | | |
|---|---|---|
| ६६. | तहरीम | ७८९ |
| ६७. | मुल्क | ७९८ |
| ६८. | कलम | ८१० |
| ६९. | हाक्का | ८२६ |
| ७०. | मआरिज | ८३८ |
| ७१. | नूह | ८४८ |
| ७२. | जिन्न | ८५७ |
| ७३. | मुज्जम्मिल | ८६८ |
| ७४. | मुद्दस्सिर | ८७९ |
| ७५. | कियामह | ८९४ |
| ७६. | इन्सान (दहर) | ९०८ |
| ७७. | मुरसलात | ९२० |
| ७८. | नबा | ९३२ |
| ७९. | नाजिआत | ९४६ |
| ८०. | अबस | ९५८ |
| ८१. | तक्वीर | ९६८ |
| ८२. | इन्फितार | ९८० |
| ८३. | मुतफ्फिकीन | ९८९ |
| ८४. | इन्शिकाक | ९९९ |
| ८५. | बुरूज | १००६ |
| ८६. | तारिक़ | १०१६ |
| ८७. | आला | १०२४ |
| ८८. | गाशिया | १०३३ |
| ८९. | फज्र | १०३९ |
| ९०. | बलद | १०५० |
| ९१. | शम्स | १०५९ |
| ९२. | लैल | १०६६ |
| ९३. | दुहा | १०७४ |
| ९४. | अलम नश्रह | १०८० |
| ९५. | तीन | १०८५ |
| ९६. | अलक | १०९० |
| ९७. | कद्र | १०९९ |
| ९८. | बय्यीनह | ११०५ |
| ९९. | जिलजाल | ११११ |
| १००. | आदियात | १११५ |
| १०१. | कारिआ | १११७ |
| १०२. | तकासुर | ११२१ |
| १०३. | अस्र | ११२५ |
| १०४. | हुमजा | ११२९ |
| १०५. | फील | ११३३ |
| १०६. | कुरैश | ११३९ |

| | | |
|---|---|---|
| १०७. | माऊन | ११४३ |
| १०८. | कौसर | ११४८ |
| १०९. | काफिरून | ११५४ |
| ११०. | नस्र | ११५९ |
| १११. | लहब | ११६३ |
| ११२. | इखलास | ११६८ |
| ११३. | फलक | ११७४ |
| ११४. | नास | ११८२ |


# चित्रे आणि नकाशे


| अ. न. | शिर्षक | पृ.क्रमांक |
|---|---|---|
| १. | रोम व फारस | ६७ |
| २. | खंदक युद्धाचा नकाशा | १३४ |
| ३. | सबा सद्दे मआरीब धरणाचे अवशेष | १३५ |
| ४. | सद्देमारिब चे अवशेष | ५०७ |
| ५. | मदीना व हुदैबिया मधील मार्ग | ५१९ |
| ६. | हूद् व समूद जन समुहाचे वस्थि स्थान | १०३८ |
| ८. | गारे हिरा (हिरा-गुफा) | ११०४ |
| ९. | उस्मानी प्रत | १११० |
| १०. | काबागृहावर अब्राहाचा फौजी हल्ला | ११३८ |
| ११. | बैतुल्लाह (अल्लाहचे घर) | ११४२ |
| १२. | कुरैश आणि पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचा वंश क्रम | |
| १३. | अनुक्रमणिका | |

# ३०. अर-रूम

**नावः** सूरह ची सुरवातच रोमन (ग्रीक) लोकां विषयीच्या एका भविष्य वाणीने झाली आहे. तद्नुषंगे या सूरह चे नाव ‘अर-रूम’असे आहे.

**अवतरण काळ :** मक्की आहे आणि रोमन लोक निकटच्या इलाक्यात वर्चस्व शाली झाल्यानंतर अवतरली. अर्थात प्रेषित्वाच्या सातव्या वर्षी इ. स. ६१६ मध्ये.

**मध्यवर्ति कल्पनाः** आखिरत विषयी विश्वास निर्माण करणे हा विश्वास या जगाच्या खऱ्या हकीगतीस जाणल्याने निर्माण होतो. तसेच या गोष्टीने ही की अल्लाहचा प्रत्येक वायदा पूर्ण झाल्याखेरीज राहात नाही.

**आयत रचना :** आयत क्र. १ ते ७ मध्ये रोमन लोकांच्या पराभूतते नंतर त्यांच्या वर्चस्वशाली होण्याचे भाकित केले गेले आहे आणि या अनुषंगाने खऱ्या कार्यसाधकाकडे व आखिरतकडे बुद्धिला वळविले गेले आहे.

आयत क्र. ८ ते २७ मध्ये अल्लाहच्या त्या निशाण्यांवर विचार चिंतन करण्याचे आवाहन केले गेले आहे, ज्या जमीन व आकाशा मध्ये पसरलेल्या आहेत व ज्या आखिरत विषयी विश्वास निर्माण करतात.

आयत क्र. २८ ते ५४ मध्ये एकेश्वरवाद सत्य असण्याबद्दल व अनेकश्वरवाद असत्य असण्याबद्दल युक्तिवाद केला गेला आहे आणि हे स्पष्ट केले गेले आहे की एकेश्वरवादी धर्म हाच स्वभाविक धर्म आहे. तसेच या धर्मावर ईमान बाळगणाऱ्यांना अल्लाहच्या आज्ञा पालनाच्या कामांमध्ये मग्न राहण्याची व त्याने गुन्हा ठरविलेल्या कामां पासून अलिप्त राहण्याची ताकीद केली गेली आहे आणि जे लोक अशा प्रकारे जीवन व्यतीत करतील त्यांना उत्कृष्ट परिणतीची खुशखबर ऐकविली गेली आहे.

आयत क्र. ५५ ते ६० समोरोपाच्या आयती होत ज्यात संबोधनाची दिशा पुन्हा कियामत व आखिरत कडे वळली आहे.

# ३० सूरतुर-रूम

سُوْرَةُ الرُّوْمِ

(आयती ६०)

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ

१. अलीफ लाम मीम [१]

الٓمّٓ ﴿١﴾

२. रोमन पराभूत झोलेत [२]

غُلِبَتِ الرُّوْمُ ﴿٢﴾

३. जवळच्या प्रदेशात आणि ते आपल्या पराभूतते नंतर वर्चस्व शाली होतील [३]

فِيْٓ اَدْنَى الْاَرْضِ وَهُمْ مِّنْۢ بَعْدِ غَلَبِهِمْ سَيَغْلِبُوْنَ ﴿٣﴾

४. काही वर्षाच्या आत. [४] अल्लाहचाच अधिकार आहे पूर्वी देखील व नंतर हि [५] आणि त्या दिवशी ईमान बाळगणारे आनंद विभोर होतील.[६]

فِيْ بِضْعِ سِنِيْنَ ۬ؕ لِلّٰهِ الْاَمْرُ مِنْ قَبْلُ وَمِنْۢ بَعْدُ ؕ
وَيَوْمَىِٕذٍ يَّفْرَحُ الْمُؤْمِنُوْنَ ﴿٤﴾

५. अल्लाहच्या मदती ने,[७] तो ज्याला इच्छितो मदत प्रदान करतो. तो वर्चस्व शाली आहे दयावंत.[८]

بِنَصْرِ اللّٰهِ ؕ يَنْصُرُ مَنْ يَّشَآءُ ؕ وَهُوَ الْعَزِيْزُ الرَّحِيْمُ ﴿٥﴾

६. हा अल्लाहचा वायदा आहे. [९] अल्लाह वायद्या विरुद्ध जात नाही परंतु अधिकांश लोक हे जाणत नाही.[१०]

وَعْدَ اللّٰهِ ؕ لَا يُخْلِفُ اللّٰهُ وَعْدَهٗ وَلٰكِنَّ اَكْثَرَ النَّاسِ لَا
يَعْلَمُوْنَ ﴿٦﴾

७. ते ऐहीक जीवनाच्या केवळ बाह्य स्वरुपास जाणतात आणि आखिरत पासून ते गाफील आहेत.[११]

يَعْلَمُوْنَ ظَاهِرًا مِّنَ الْحَيٰوةِ الدُّنْيَا ۚۖ وَهُمْ عَنِ
الْاٰخِرَةِ هُمْ غٰفِلُوْنَ ﴿٧﴾

८. काय यांनी स्वत: विषयी विचार केला नाही? [१२] अल्लाहने आकाशांना व जमीनीला आणि यांच्या दरम्यान च्या समस्त अस्तित्वांना सत्य (उद्दिष्टा) सह [१३]आणि एका निर्धारीत मुदती करीता निर्माण केले आहे.[१४]परंतु अधिकांश लोक आपल्या पालन कर्त्याच्या भेटीचा इन्कार करणारे आहेत.

اَوَلَمْ يَتَفَكَّرُوْا فِيْٓ اَنْفُسِهِمْ ۫ مَا خَلَقَ اللّٰهُ السَّمٰوٰتِ وَالْاَرْضَ
وَمَا بَيْنَهُمَآ اِلَّا بِالْحَقِّ وَاَجَلٍ مُّسَمًّى ؕ
وَاِنَّ كَثِيْرًا مِّنَ النَّاسِ بِلِقَآئِ رَبِّهِمْ لَكٰفِرُوْنَ ﴿٨﴾

## स्पष्टीकरण

१. सांकेतिक अक्षरांच्या स्पष्टीकरणासाठी पहा सूरह बकरा टीप क्र. १ सूरह युनूस टीप क्र. १ आणि सूरह अन्कबूत टीप क्र. १. या सूरह मध्ये अलीफ 'ا' चा संकेत आयती (निशाण्या) कडे आहे ज्या कडे वारंवार लक्ष वेधविले गेले आहे. उदाहरणार्थ आयत क्र. १०, २०, २१, २२, २४, ३५, ४६ वगैरे. 'ل' लाम चा संकेत ''लिक़ाइ-रब्बिहिम'' لِقَاءِرَبِّهِمْ ''आपल्या पालन कर्त्याच्या भेटीशी'' (आयत क्र. ८) व ''लिक़ाइल्आख़िर: لِقَاءِالْاٰخِرَةِ ''आखिरतच्या भेटीशी'' - (आयत क्र. १६) आहे.

आणि मीम 'م' चा संकेत मोमीन (ईमान बाळगणाऱ्या) लोकांकडे आहे. ज्यांच्या मदतीचा वायदा आयत क्र. ४, ५, व ३५ मध्ये केला गेला आहे. तात्पर्य ही सूरह एकेश्वरवादीय प्रमाण आखिरत विषयी विश्वास आणि ईमान बाळगणाऱ्यांची मदत या तीन महत्वपूर्ण गोष्टींवर आधारीत आहे.

२. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या आगमन काळात दोन विशाल साम्राज्ये होती एक फारस (Persian Empire)ज्यात इराण व इराक सम्मिलीत होते व दुसरे रोमन साम्राज्य (Roman Empire)ज्यात पॅलेस्टीन, सिरीया, तुर्कस्तान वगैरे समाविष्ट होते, ज्याची राजधानी कुस्तुंतुनीया होती. रोमन लोक ग्रंथधारक व हजरत ईसा यांना मानणारे होते. परंतु अंगर्तत बंडखोरी मुळे त्यांचे साम्राज्य बरेच कमजोर झाले होते. फारसी लोक मजूसी म्हणजे अग्नी पूजक होते. त्यांना रोमन लोकांच्या कमजोरी पासून लाभ घेण्याची संधी मिळाली व त्यांनी सतत हल्ले चढवून सिरीया पॅलेस्टीन च्या प्रदेशावर कब्जा केला. येथ पावेतो की प्रेषित्वाच्या सातव्या वर्षी म्हणजे इ. स. ६१६ मध्ये ते अरब देशाच्या उत्तर सीमे पर्यंत पोहचले. ज्या ठिकाणी रोमन लोकांचा कब्जा होता. रोमन लोकांच्या प्रभावाने मक्केचे अनेकेश्वरवादी फार आनंदित झाले व त्यांना मुसलमानांना टोचून बोलण्याची संधी लाभली की पहा, तुमच्या सारखेचे हे हि ईश-ग्रंथास मानणारे आहेत जर हे सत्या वर असते तर त्यांना प्रभावाचे तोंड पहावे लागले नसते. त्यांची अनुकंपा फारसी लोकांशी होती कारणा या दोघांचाही धर्म अनेकेश्वरवादी होता.

३. जवळच्या प्रदेशाशी अभिप्रेत सिरीया व अरब देशाच्या दरम्यान सीमा होय जिला अजरआत असे म्हटले जाई. हा तबूकच्या वरचा प्रदेश होय. हा प्रदेश रोमन लोकांच्या अधिपत्याखाली होता आणि या प्रदेशात लढाईचा अर्थ हा होता की युद्ध अरब देशाच्या दाराशी पोहचले आहे.उघड आहे की ही मोठी चिंताजनक परिस्थिती होती मग जेव्हा फारसी लोकांचे वर्चस्व रोमन लोकांवर झाले तेव्हा मक्केच्या अनेकेश्वरवाद्यांच्या आनंदाला उधाण आले व त्यांच्या पराभूततेत मुसलमानांची पराभूतता व फारसी लोकांच्या विजयात आपल्या विजयाचे स्वप्न पाहू लागले. परंतु या आयतींनी भविष्यात घडणाऱ्या घटनेचे वृत्त ऐकवून लोकांना आश्चर्य चकित केले. या आयतीत ही स्पष्ट भविष्य वाणी केली गेली आहे की रोमन आज पराभूत झाले असले तरी ते वर्चस्वशाली होतील.

४. मूळ ग्रंथात "بِضْعِ" **''बिजअ''** (काही) हा शब्द प्रयोग केला गेला आहे जो अरबी भाषेत तीन ते नऊ पर्यंत वापरला जातो. तात्पर्य या शब्दा द्वारे मुदत ही निश्चित केली गेली आहे की रोमन लोक नऊ वर्षाच्या आत वर्चस्व शाली होतील.

स्पष्ट असावे की तो पावेतो पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचे आवाहन रोमन लोकांपर्यंत पोहचले नव्हते आणि ते तौरात व इंजील (बायबल) वर ईमान बाळगणाऱ्याचा दावा करीत होते. यास्तव त्यांची पात्रता एक मुस्लिम समूहाचीच होती. यामुळे कुरआन ने यांच्या समर्थनासाठी भविष्यवाणी केली आणि यामुळेच मक्केचे ईमान धारक त्यांचे समर्थक होते. यावरुन हे तात्विक मार्गदर्शन लाभते की जर एका देशाच्या मुसलमानांवर दुसऱ्या देशाचे मुस्लिमेतर आक्रमण करीत असतील तर जगातील मुसलमानांनी त्या विपदाग्रस्त मुसलमानांचे समर्थन केले पाहीजे ज्यांच्या विरूद्ध मुस्लिमेतरांनी, काफीर लोकांनी किंवा मूर्तिपूजकांनी आक्रमणाचे पाऊल उचलले आहे. कारण मुसलमान,मग तो बिघाड झालेला जन समूह का असेना, त्याचे काफीर लोकांच्या हातून पराभूत होणे अगदी अप्रिय बाब होय. तसेच अशाने इस्लाम धर्माचीही अवहेलना होते. याद्वारे अधिक मार्गदर्शन हे ही लाभते की मुसलमानांच्या कोणत्याही देशावर अनेकेश्वरवाद्यांचे व काफीरांचे अधिपत्य सत्यविरोधी आहे कारण यामुळे शिर्क व कुफ्र ला आपला प्रभाव पाडण्याची संधी लाभते व समाजात बिघाड होण्यासाठी मार्ग निघतात. यास्तव याचे समर्थन कदापि केले जाऊ शकत नाही.

५. म्हणजे पहिल्यांदा रोमन लोक जे पराभूत झालेत ते अल्लाहच्याच आदेशाने झालेत व नंतर जेव्हा ते वर्चस्व शाली होतील तर अल्लाहच्याच हुकुमाने होतील अर्थात वर्चस्व व अधिकार अल्लाहच्याच हाती आहे तो ज्याला इच्छितो प्रदान करतो व ज्याला इच्छितो वंचित राखतो, त्याच्या तर्फे विजय व पराजयाचे जे फैसले सादर होतात, ते न्याय व बुद्धीकौशल्यावर आधारित असतात.

रोमन लोकांनी आपल्या धर्मात (इस्लाम मध्ये) नव-नवीन गोष्टी निर्माण केल्या होत्या आणि अंतर्गत कलहात पडले होते

म्हणूनच त्यांच्यावर त्यांच्या शत्रूंचे वर्चस्व राखले गेले. यासाठी की त्यांनी शुद्धीवर यावे व आपला सुधार करावा. त्याच प्रमाणे नंतर फारसी लोकांना जो पराभव पत्करावा लागला तो अशासाठी की अत्याचारी लोकांचे प्राबल्य नाहीसे व्हावे.

६. ईमान बाळगणाऱ्यांना हा शुभ समाचार ऐकविला गेला की ते लवकरच रोमन लोकांच्या वर्चस्वशाली होण्याबद्दल आनंद विभोर होतील. परंतु यात याहून अधिक आणखी एक आनंदाकडे ही इशारा होता आणि तो म्हणजे ईमान धारकांचे मक्केच्या अनेकेश्वर वाद्यांवर वर्चस्वशाली होण्याचा आनंद यास्तव हिजरी सन २ नुसार ई. स. ६२४ मध्ये बद्र ची लढाई उद्‌भावली ज्यात ईमान बाळगणाऱ्यांचा विजय झाला व मक्केच्या अनेकेश्वर वाद्यांना वाईटरित्या पराभवाचे तोंड पहावे लागले. इकडे रोमन लोक हि फारसी लोकांवर वर्चस्व शाली झाले, आणि हे अशा स्थितीत की रोमन सम्राट हर्क्युलीस (Herculius)ने जो कुस्तुन्तुनीया मध्ये अडकून राहीला होता, आपल्या सैन्याची पुन्हा नव्याने तयारी केली आणि ई. स. ६२३ मध्ये एका योजने नुसार आजरबायजान च्या मार्गाने फारस वर हल्ला केला आणि आत शिरुन अग्निपूजकांचे सर्वात मोठे अग्निमंदीर भुईसपाट केले. त्यावेळी खुसरो (Khosrow II) हा फारस देशाच्या बादशहा होता. तो आपल्या पराभवाला विजयात परिवर्तित करु शकला नाही. रोमन लोकांना फारसी लोकांवर हे वर्चस्व ६२३ किंवा ६२४ मध्ये प्राप्त झाले. आणि त्यानंतर त्यांनी काही वर्षाच्या आत पॅलेस्टीन व आपले सर्व इलाके फारस वाल्यांकडून परत घेतले. (ऐतिहासिक तपशीला साठी पहा इन्साक्लोपिडीया ब्रिटानिका खंड ८ पृष्ठ ७८१ व खंड-१० पृष्ठ ४५४)

थोडक्यात म्हणजे हि. स. २ किंवा इ. स. ६२४ हे असे वर्ष होय ज्यात एकीकडे रोमन लोकांना फारसी लोकांवर वर्चस्व प्राप्त झाले आणि दुसरीकडे पैगंबर (सल्लल्लाहु अलैही वसल्लम) यांच्या सहवासातील ईमान बाळगणाऱ्या लोकांना मक्केच्या काफीरांवर विजय प्राप्त झाला. अशा प्रकारे कुरआनाचे भाकित शब्द न शब्द खरे ठरले आणि ईमान बाळगणाऱ्यांना दुहेरी आनंदाचा लाभ घडला.

कुरआनाच्या या भविष्य वाणीचे नऊ वर्षाच्या आत खरे ठरणे त्याच्या व पैगंबर (सल्लल्लाहु अलैही वसल्लम)यांच्या सत्यतेचे फार मोठे प्रमाण होय. हदीस वचनातील उल्लेखानुसार भविष्य कथन पूर्ण झाल्याबद्दल अनेक लोकांनी ईमान बाळगले.

७. म्हणजे ईमान बाळगणाऱ्यांना हा आनंद अल्लाहच्या सहाय्यामुळे झाला. रोमन लोकांनी आपले युद्ध कौशल्य दाखवून विजय प्राप्त केला म्हणून नव्हे. कारण ईमान बाळगणारे अल्लाहच्या कार्य-कुशलतेवर विश्वास ठेवतात व त्याच्या मदतीची अपेक्षा बाळगणारे बनतात. रोमन लोकांना फारसी लोकांवर जो विजय प्राप्त झाला त्याच्या व्यतिरिक्त ईमान बाळगणाऱ्यांनी बद्र च्या लढाईत अल्लाहच्या मदतीचे जे अवलोकन केले ती मोठा आत्मबल वाढविणारी होती.

८. अल्लाह वर्चस्व शाली आहे म्हणून तो ज्याची मदत करू इच्छित त्याला कोणी ही प्रतिबंध घालू शकत नाही आणि तो रहीम (दयाळू) आहे यास्तव तो ईमान बाळगणाऱ्यांवर खचितच दया करील व त्यांना आपल्या सहाय्याने उपकृत करील.

९. म्हणजे रोमन लोकांचा वर्चस्वशाली होण्याचा व ईमान बाळगणाऱ्यांचे अल्लाहच्या मदती बद्दल आनंद विभोर होण्याचा जो वायदा सर्वश्रेष्ठ अल्लाहने केला आहे तो अपरिहार्य पणे पूर्ण होईलच. आणि इतिहास साक्षी आहे की हा वायदा पूर्ण झाला आणि कुरआनाचे अल्लाह तर्फे अवतरीत असणे एक सत्य-वस्तुस्थितीय खरी हकीगत या नात्याने समोर आले.

१०. रोमन लोकांच्या वर्चस्वशाली होण्याची जी भविष्यवाणी कुरआनात केली गेली आहे ते एक उदाहरण होय अल्लाहचा वायदा पूर्ण होण्याचे. अशासाठी की लोकांनी चांगल्या प्रकारे जाणून घ्यावे की सर्वश्रेष्ठ अल्लाहने आपल्या ग्रंथात ज्या ज्या गोष्टींचा वायदा केला आहे त्या सर्व घडून आल्याशिवाय राहणार नाहीत. परंतु अधिकांश लोकांची ही दशा आहे की ते या वायद्यांना खात्रीत घेत नाही.

११. या आयतीत मोठी गहन गोष्ट सांगितली गेली आहे.ऐहीक जीवनाबाबत लोकांचे ज्ञान अगदीच वरवरचे आहे. कारण त्यांची दृष्टि जीवनाच्या केवळ बाहय स्वरूपावरच खिळली आहे व त्याचा आंतरीक पैलू त्यांच्या नजरेपासून लूप्त आहे. जर यांची दृष्टी सुदूर असती तर त्यांनी आखिरतला प्राप्त केले असते. परंतु सुंदर टरफले पाहून ते आपले मनोरंजन करीत आहे व आतल्या गरा पासून बेपर्वा आहेत. म्हणून त्यांच्या हिश्श्यात जगातली टरफलेच येतात. जगात जनसमूहांच्या उत्थान व पतनाच्या व जय-पराजयांच्या ज्या घटना उद्‌भवतात त्यांच्या पाठीमागे जी हकीगत असते त्यांना पाहण्यास ते असमर्थ असतात. आणि वरवरचे मत प्रस्थापित करून बसतात.

आजच्या विज्ञानाने हे उघड केले आहे की एक अणु केवळ एक अणु मात्र नाही, किंबहुना त्याच्या अंगी इलेक्ट्रॉन, प्रुट्रोन व नायट्रोन युक्त एक पूर्ण व्यवस्था असते व त्यात जबरदस्त सामर्थ्य दडलेले असते. यास्तव अणुशक्ति (Atomic Energy)याच संशोधनाचा निष्कर्ष होय.

आश्चर्याची बाब अशी की या सर्व प्रयोग व अवलोकना नंतर ही माणसाचे डोळे उघडत नाही आणि तो ऐहीक जीवनाच्या बाहय चकाकी वर इतका लुब्ध होतो की त्यात डोकावून

पाहण्यास तयार होत नाही. जर त्याने ऐहीक जीवनाच्या आंतरिक सत्यांचा थांग लावण्याचा प्रयत्न केला असता तर त्याला. आखिरतचे रहस्य निश्चितपणे उलगडले असते आणि मग अल्लाहच्या आदेशाच्या प्रकाशात त्याने जगाच्या आंतरीक स्वरुपास अशा प्रकारे पाहिले असते. ज्या प्रकारे तो विशिष्ट प्रकारच्या किरणा (क्ष किरण (x Ray) द्वारे शरीराच्या आतील भागांना पाहतो. किंबहुना याहून ही अधिक चांगल्या प्रकारे.

१२. म्हणजे आखिरतचा इन्कार करणारे आपल्या अंतर्यामी डोकावून का पाहत नाही की त्यांचे अस्तित्व त्यांना काय सांगत आहे. अर्थात हे की ना यांच्या निर्मितीचे काही उद्दिष्ट आहे आणि ना या सृष्टीच्या निर्मितीचे व माणूस चांगले कृत्य करो किंवा वाईट परिणाम शून्य आहे अथवा हे की मनुष्य स्वभावत: एक जबाबदार निर्मिती आहे म्हणून त्याच्या निर्मिती चा ही एक विशेष हेतु आहे आणि आणि ज्या अर्थी ही सृष्टी अतिशय बुद्धि कौशल्य युक्त पद्धतीने चालत आहे म्हणून तिच्या निर्मितीचे ही एक उद्दिष्ट आहे आणि माणसाच्या सत्कृत्याचा परिणाम ही चांगला निघाला पाहिजे व वाईट कामाचा वाईट. जर माणसाने आपल्या अस्तित्वा वर विचार केल्यास त्याला आपले अस्तित्वा वर उल्लेखिलेल्या दुसऱ्या गोष्टीचेच समर्थन करताना आढळून येईल. अर्थात शिक्षा व मोबदल्याच्या समर्थनार्थ मनुष्य अस्तित्वाची ही साक्ष होय.

१३. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह अनआम टीप क्र. १२४ व सूरह युनूस टीप क्र. १५.

१४. म्हणजे ही सृष्टी ज्या प्रकारे अनादिअनंत नाही त्याच प्रमाणे शाश्वत ही नाही तिचा आरंभ ही आहे व अंत देखील. हा कारखाना एका निर्धारीत वेळे पावेतोच चालत राहील ज्याची मुदत सर्वश्रेष्ट अल्लाहने ठरविली आहे व त्यालाच हे ठाऊक आहे की याचा शेवट केव्हा व्हायचा आहे.

या सृष्टीच्या बाहय स्वरुपास पाहून लोक हा विचार करीत राहीलेत की ही सृष्टी सदैव याच स्वरुपात राहील. यास्तव याच विचारानुसार त्यांनी आपल्या धार्मिक कल्पना ही कायम केल्या. परंतु आजच्या विज्ञानाने या कल्पनांना निराधार व चुकीच्या ठरविले. कारण एका अणूचा स्फोट होणे व त्यातून जबरदस्त शक्ति बाहेर पडणे जर शक्य आहे तर हे का म्हणून शक्य नव्हे की ही संपूर्ण सृष्टी एका विस्फोटाने क्षतविक्षत व्हावी व एक नवीन सृष्टी अस्तित्वात यावी.

# रोमन आणि पर्शियन


आजर बायजान
तुर्की
दजला नदी
फुरात नदी
रोमन साम्राज्य
सीरिया
दमास्कस
इराक
ईराण
जे रूसलेम
पर्शियन साम्राज्य
इजिप्त
तबूक
अरब
मक्का

**तेव्हा त्या लोकांची परिणति, ज्यांनी दुष्कर्मे केली होती, वाईट झाली. अशासाठी की त्यांनी अल्लाहच्या आयतीना खोटे ठरविले होते. व त्यांची थट्टा उडवित राहीले.*(अल-कुर्आन)***

أَوَلَمْ يَسِيرُوا فِي الْأَرْضِ فَيَنظُرُوا كَيْفَ كَانَ عَاقِبَةُ الَّذِينَ
مِن قَبْلِهِمْ ۚ كَانُوا أَشَدَّ مِنْهُمْ قُوَّةً وَأَثَارُوا الْأَرْضَ
وَعَمَرُوهَا أَكْثَرَ مِمَّا عَمَرُوهَا وَجَاءَتْهُمْ رُسُلُهُم بِالْبَيِّنَاتِ ۖ
فَمَا كَانَ اللَّهُ لِيَظْلِمَهُمْ وَلَٰكِن كَانُوا أَنفُسَهُمْ يَظْلِمُونَ ﴿٩﴾

**९. काय हे लोक जमीनीवर हिंडले फिरले नाहीत की त्यांनी बघून घेतले असते त्या लोकांची परिणति काय झाली, जे यांच्या पूर्वी होऊन गेले आहेत.[१५] ते यांच्याहून अधिक शक्तिशाली होते. त्यांनी जमीनीला अधिक पेरले-नांगरले होते व यांच्याहून अधिक तिला आबाद केले होते.[१६] त्यांच्या जवळ त्यांचे पैगंबर स्पष्ट निशाण्या घेऊन आले होते. तेव्हा अल्लाह याच्यावर जुलूम करणारा नव्हता, किंबहुना ते स्वत:च आपल्यावर अत्याचार करीत होते.**

ثُمَّ كَانَ عَاقِبَةَ الَّذِينَ أَسَاءُوا السُّوأَىٰ أَن كَذَّبُوا
بِآيَاتِ اللَّهِ وَكَانُوا بِهَا يَسْتَهْزِئُونَ ﴿١٠﴾

**१०. तेव्हा त्या लोकांची परिणति, ज्यांनी दुष्कर्मे केली होती, वाईट झाली. अशासाठी की त्यांनी अल्लाहच्या आयतीना खोटे ठरविले होते. व त्यांची थट्टा उडवित राहीले.**

اللَّهُ يَبْدَأُ الْخَلْقَ ثُمَّ يُعِيدُهُ ثُمَّ إِلَيْهِ تُرْجَعُونَ ﴿١١﴾

**११. अल्लाहच निर्मितीचा आरंभ करतो मग तो याची पुनरावृत्तिही करील.[१७] मग तुम्ही त्याच्याकडे परतविले जाल.**

وَيَوْمَ تَقُومُ السَّاعَةُ يُبْلِسُ الْمُجْرِمُونَ ﴿١٢﴾

**१२. आणि ज्या दिवशी कियामत प्रस्थापित होईल. अपराधी निराश होऊन आश्चर्यचकित होतील.[१८]**

وَلَمْ يَكُن لَّهُم مِّن شُرَكَائِهِمْ شُفَعَاءُ وَكَانُوا
بِشُرَكَائِهِمْ كَافِرِينَ ﴿١٣﴾

**१३. त्यांनी ठरविलेल्या सहभागी पैकी कोणीही त्यांचा शिफारस करणारा नसेल आणि ते आपल्या सहभागींचा इन्कार करतील.[१९]**

وَيَوْمَ تَقُومُ السَّاعَةُ يَوْمَئِذٍ يَتَفَرَّقُونَ ﴿١٤﴾

**१४. ज्या दिवशी ती घडी कायम होईल त्या दिवशी लोक वेगवेगळे होतील.[२०]**

فَأَمَّا الَّذِينَ آمَنُوا وَعَمِلُوا الصَّالِحَاتِ فَهُمْ فِي رَوْضَةٍ
يُحْبَرُونَ ﴿١٥﴾

**१५. तेव्हा ज्या लोकांनी ईमान बाळगले असेल व ज्यांनी सत्कृत्ये केली असतील त्यांना एका बागेत [२१] आनंदात ठेवले जाईल.**

१५. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह अनआम टीप क्र. २ व सूरह हज्ज टीप क्र. ८२

१६. म्हणजे पूर्वी होऊन गेलेल्या जन समूहांनी या अरब लोकांहून अधिक नगरी प्रगती साध्य केली होती. परंतु पैगंबरांना खोटे ठरविल्यांचा परिणाम म्हणून त्यांच्यावर ईश शिक्षा अवतरली व त्यांची संपूर्ण नगरी प्रगती मातीत मिळाली.

१७. स्टीकरणासाठी पहा सूरह अन्कबूत टीप क्र. ३६.

१८. म्हणजे जे लोक शिर्क (अनेकेश्वरवाद) सारखा अक्षम्य अपराध करून आले असतील ते अल्लाहच्या कृपे पासून निराश असतील व कियामतीचा अहवाल पाहून त्यांची मती कुंठीत होईल.

१९. म्हणजे जगात ज्यांना यांनी आपला शिफारस-कर्ता समजून अल्लाहच्या अधिकार व हक्कामध्ये सहभागी ठरविले होते, त्यांच्या बद्दलची त्यांची सर्व श्रद्धा नाहीशी होईल व त्या वेळी ते मान्य करतील की हे आमचे ईश्वर नव्हेत.

२०. म्हणजे कियामतीच्या दिवशी ईमान व कुफ्र च्या आधारावर लोकांना वेगवेगळया समूहांमध्ये विभागले जाईल. वर्ण, वंश व देश संप्रदायाचे समस्त भेद निरर्थक ठरतील. श्रद्धा व आचरणांचा भेद हाच खरा भेद ठरेल व याच आधारावर माणसांचे वर्गीकरण केले जाईल.

२१. मूळ ग्रंथात रोजाह हा शब्द प्रयोग बाग या अर्थाने केला गेला आहे. अरबी भाषेत हा शब्द अशा बागेसाठी वापरला जातो जी नयनरम्य ही असावी व जिच्यात विपुल पाणी ही असावे या ठिकाणी जन्नतच्या हिराव्यागार टवटवीत व प्रसन्नचित्त करणाऱ्या बागा संबंधीची कल्पना अभिप्रेत आहे.

وَأَمَّا الَّذِينَ كَفَرُوا وَكَذَّبُوا بِآيَاتِنَا وَلِقَاءِ الْآخِرَةِ
فَأُولَٰئِكَ فِي الْعَذَابِ مُحْضَرُونَ ﴿١٦﴾

१६. आणि ज्यांनी कुफ्र केले असेल आणि आमच्या आयतींना व आखिरत च्या भेटीस खोटे ठरविले असेल [२२] त्यांना अजाब (अल्लाहच्या शिक्षेच्या) स्थितीत हजर केले जाईल.

فَسُبْحَانَ اللَّهِ حِينَ تُمْسُونَ وَحِينَ تُصْبِحُونَ ﴿١٧﴾

१७. तेव्हा अल्लाहची तस्बीह (गुण गान) करा संध्याकाळी ही व प्रात: काळी ही [२३]

وَلَهُ الْحَمْدُ فِي السَّمَاوَاتِ وَالْأَرْضِ وَعَشِيًّا وَحِينَ
تُظْهِرُونَ ﴿١٨﴾

१८. आणि त्याच्याच करीता स्तुति आहे आकाशांमध्ये व जमीनीवर.[२४] आणि (त्याची तस्बीह करा) दिवसाच्या शेवटच्या भागात ही [२५] व त्यावेळी देखील जेव्हा दिवस उगवेल.[२६]

يُخْرِجُ الْحَيَّ مِنَ الْمَيِّتِ وَيُخْرِجُ الْمَيِّتَ مِنَ الْحَيِّ
وَيُحْيِي الْأَرْضَ بَعْدَ مَوْتِهَا ۚ وَكَذَٰلِكَ تُخْرَجُونَ ﴿١٩﴾

१९. तो जिवितास मृतातून काढतो व मेलेल्यास जिवितांमधून [२७] आणि जमीनीला ती मृत झाल्यानंतर जिवंत करतो.[२८] अशा प्रकारे तुम्हाला ही काढले जाईल.[२९]

وَمِنْ آيَاتِهِ أَنْ خَلَقَكُمْ مِنْ تُرَابٍ ثُمَّ إِذَا أَنْتُمْ بَشَرٌ
تَنْتَشِرُونَ ﴿٢٠﴾

२०. त्याच्या निशाण्यापैकी ही आहे की त्याने तुम्हास मातीतून निर्माण केले आहे.[३०] मग अकस्मात तुम्ही मनुष्य बनून इतस्तत: होऊ लागले.[३१]

وَمِنْ آيَاتِهِ أَنْ خَلَقَ لَكُمْ مِنْ أَنْفُسِكُمْ أَزْوَاجًا لِتَسْكُنُوا
إِلَيْهَا وَجَعَلَ بَيْنَكُمْ مَوَدَّةً وَرَحْمَةً ۚ إِنَّ فِي ذَٰلِكَ
لَآيَاتٍ لِقَوْمٍ يَتَفَكَّرُونَ ﴿٢١﴾

२१. आणि त्याच्या निशाण्यापैकी ही आहे की त्याने तुमच्या साठी तुमच्या मधूनच पत्न्या निर्माण केल्यात [३२] या साठी की तुम्ही त्यांच्या पासून शांती प्राप्त करावी [३३] आणि तुमच्या दरम्यान प्रेम व करूणा निर्माण केली. [३४] नि: संशय यात त्या लोकांकरीता निशाण्या आहेत जे विचार चिंतन करतात.

وَمِنْ آيَاتِهِ خَلْقُ السَّمَاوَاتِ وَالْأَرْضِ وَاخْتِلَافُ أَلْسِنَتِكُمْ
وَأَلْوَانِكُمْ ۚ إِنَّ فِي ذَٰلِكَ لَآيَاتٍ لِلْعَالِمِينَ ﴿٢٢﴾

२२. आणि त्याच्या निशाण्यापैकी आकाशांची व जमीनीची निर्मिती [३५]आणि तुमच्या भाषा व तुमच्या वर्णा मधील विभिन्नता होय.[३६] नि:संशय यात त्या लोकां करीता निशाण्या आहेत जे ज्ञान बाळगतात.[३७]

२२. कुफ्र केवळ हे नव्हे की अल्लाहच्या अस्तित्वाचा इन्कार केला जावा, किंबहुना त्याच्या अस्तित्वास मान्य करुन त्याच्या आयतींचा इन्कार करणे हे देखील कुफ्र होय ज्यात त्या समस्त निशाण्या सामील आहेत ज्या अल्लाहच्या एकमेवतेस प्रमाणित करतात, तसेच त्या आयती सुद्धा ज्या पैगंबरावर अवतरीत झाल्या, तद्वतच कियामती च्या दिवशी अल्लाह समोर हजर होण्यास खोटे ठरविणे देखील नितांत कुफ्र होय.

२३. म्हणजे जेव्हा अल्लाहच्या सामर्थ्याचे हे चमत्कार आहेत ज्यांचे अहोरात्र तुम्ही अवलोकन करीत असता तेव्हा तुम्ही त्याचे पावित्र्य वर्णन केले पाहीजे, त्याचे गुणगान केले पाहीजे, वे त्याचे नाम:स्मरण, प्रामुख्याने दिवस व रात्रीच्या प्रत्येक वळणावर जेव्हा आकाशात ईश सामर्थ्याची चिन्हे दृगोचर होतात व वातावरणात परिवर्तन होऊ लागते. ईश्वराकडे बुद्धीला वळण देणाऱ्या या लक्षणांना पाहून तुम्ही त्याची तस्बीह व स्तुतीप्रशांसा केली पाहिजे व त्याच्या उपासनेत गर्क झाले पाहिजे.

तस्बीहचा हा आदेश आपल्या अंगी सर्वसामान्यता घेऊन आहे. परंतु ही व हिच्या नंतरच्या आयतीत पाच वेळच्या नमाजकडे इशारा आहे जे तसबीह व ईश-स्तुतीचे सर्वोत्कृष्ट स्वरुप होय. सायंकाळची वेळ मगरीब व इशा च्या नमाजची वेळ आहे व प्रात:काळ ची वेळ फज्र च्या नमाजची वेळ.

२४. म्हणजे आकाशात व जमीनीवर केवळ अल्लाहच प्रशंसेस पात्र आहे आणि संपूर्ण सृष्टी त्याचे गुणगान,स्तुति प्रशंसा करण्यात अगदी मग्न आहे. यास्तव तुम्ही देखील यास अनुकूल व्हा. या मैफलीत अन्य एखद्याचा राग आळविण्याचा व अन्य एखाद्याच्या नावाची माळ जपण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

२५. दिवसाच्या शेवटच्या भागांशी अभिप्रेत अस्र नमाजची वेळ होय ही वेळ अस्र नमाज अदा करण्याची आहे.

२६. जुहर म्हणजे सूर्य माध्यान्ही आल्याची वेळ. यावेळी जुहर नमाज अदा करावयाची असते.

२७. याचे स्पष्टीकरण सूरह आले ईमरान टीप क्र. ४० व सूरह अनआम टीप क्र. १७७ मध्ये केले गेले आहे.

२८. याचे स्पष्टीकरण सूरह बकरा टीप क्र. १९७ मध्ये केले गेले आहे.

२९. म्हणजे मृत्युनंतर कियामतीच्या दिवशी तुम्हाला पुन्हा दुसऱ्यांदा निर्माण केले जाईल.

३०. अल्लाह माणसाचा निर्माता आहे आणि जेव्हा निर्मात्याने स्वत:च सांगितले आहे की त्याने माणसाला मातीतून निर्माण केले आहे तर याहून अधिक विश्वासार्ह गोष्टी आणखी काय असेल? या गोष्टीचे समर्थन याने ही होते की माणूस आपले खाद्य मातीतून प्राप्त करतो व मेल्यानंतर मातीतच मिळतो.

विज्ञानानुसार जमीनीवर जीवनाचा उदय नंतरच झाला आहे. परंतु डार्विनचा हा सिद्धांत की मनुष्य माकडा पासून निर्माण झाला आहे केवळ कयासा वर आधारित कथन आहे. ज्याचा कसलाही ज्ञान विषयक पुरावा नाही व हे. कुरआनाच्या निवेदनाच्या अगदी विपरीत आहे. अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह हज्ज टीप क्र. ७.

३१. माणसाला मातीद्वारे निर्माण केले गेले होते. त्यानंतर त्याचा वंश असा चालला की संपूर्ण जग माणसांनी आबाद झाले आणि अब्जावधी माणसे जगात पसरत चालले आहेत .हा कोणाच्या सामर्थ्याचा चमत्कार आहे?

पूर्वकालीन मनुष्य देखील मनुष्य निर्मिती बद्दल या पैलू ने विचार न केल्याचा परिणाम म्हणून शिर्क (अनेकेश्वरवाद) मध्ये गुरफटला गेला व आजच्या काळातील मनुष्य सुद्धा या पैलू ने विचार न केल्याचा परिणामी कुफ्र व नास्तिकतेत गुरफटला गेला आहे.

३२. याचे स्पष्टीकरण सूरह नहल टीप क्र. १०७ मध्ये केले गेले आहे.

३३. पत्नींना निर्माण करण्याचा एक महत्वपूर्ण उद्देश असा की पुरुषांना त्यांच्या पासून आराम प्राप्त व्हावा परंतु याचा अर्थ असा नव्हे की स्त्रीया पुरुषांच्या हाती केवळ खेळणी आहेत किंबहुना ज्या प्रकारे एका उच्च उद्दिष्टासाठी पुरुषांची निर्मिती झाली त्याच प्रकारे उच्च हेतुसाठी स्त्रीयांची ही निर्मिती झाली आहे. यास्तव एक जबाबदार निर्मिती या नात्याने दोघेही समान आहेत.

३४. प्रेम हे की एकमेकांशी गाढ भावनिक ओढ निर्माण होते व करुणाही की पती-पत्नी एकमेकांशी सहानुभूत व दु:ख निवारक बनतात. अशा प्रकारे दोघे ही एक जीव दोन ह्रदये बनून राहतात.

३५. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह बकरा टीप क्र. १९६

३६. मनुष्य जर स्वयंचलीत यंत्रा (Automatic Machine) मध्ये घडून बाहेर पडला असता तर सर्वांची भाषा व वर्ण समान राहीले असते. परंतु आम्ही पाहतो की वेगवेगळया जनसमूहांच्या वेगवेगळया भाषा आहेत व वर्णही वेगवेगळे. कोणी काळा आहे तर कोणी गौरवर्णीय, कोणी गव्हाळ वर्णा चा आहे तर कोणी लालसर वर्णाचा,भाषा व वर्णा मधील ही विभिन्नता काय या गोष्टीचे मार्गदर्शन करीत नाही की मानव निर्मिती मागे एक इरादा, एक बुद्धिकौशल्य व एक योजना कार्यान्वित आहे. जी एका जबरदस्त सामर्थ्याच्या अस्तित्वास प्रमाणित करते.

३७. म्हणजे जे अज्ञानाच्या अंध:कारात राहात नाही, किंबहुना ज्ञानाच्या प्रकाशात आपली विचारसरणी घडवितात व जीवनमार्ग निश्चित करतात.

२३. आणि त्याच्या निशाण्यांपैकी रात्र व दिवसात तुमचे झोपणे [३८] आणि त्याच्या कृपेस शोधणे होय.[३९] नि:संशय यात त्या लोकांकरीता निशाण्या आहे जे ऐकतात.[४०]

وَمِنْ ءَايَـٰتِهِۦ مَنَامُكُم بِٱلَّيْلِ وَٱلنَّهَارِ وَٱبْتِغَآؤُكُم مِّن
فَضْلِهِۦٓ ۚ إِنَّ فِى ذَٰلِكَ لَـَٔايَـٰتٍ لِّقَوْمٍ يَسْمَعُونَ ٢٣

२४. आणि त्याच्या निशाण्यांपैकी हे ही आहे की तो तुम्हाला वीजेची चमक दाखवितो जी भिती ही उत्पन्न करते व आशा ही [४१] आणि आकाशातून पाण्याचा वर्षाव करतो आणि जमीनीला ती मृत झाल्यानंतर जीवन प्रदान करतो. नि:संशय यात त्या लोकांकरीता निशाण्या आहेत जे बुद्धीचा वापर करतात.

وَمِنْ ءَايَـٰتِهِۦ يُرِيكُمُ ٱلْبَرْقَ خَوْفًا وَطَمَعًا وَيُنَزِّلُ مِنَ
ٱلسَّمَآءِ مَآءً فَيُحْىِۦ بِهِ ٱلْأَرْضَ بَعْدَ مَوْتِهَآ ۚ إِنَّ فِى ذَٰلِكَ
لَـَٔايَـٰتٍ لِّقَوْمٍ يَعْقِلُونَ ٢٤

२५. आणि त्याच्या निशाण्यांपैकी हे ही एक आहे की आकाश व जमीन त्याच्या आदेशाने कायम आहेत [४२] मग जेव्हा तो तुम्हाला जमीनीतून पुकारील तुम्ही अकस्मात बाहेर निघाल.[४३]

وَمِنْ ءَايَـٰتِهِۦٓ أَن تَقُومَ ٱلسَّمَآءُ وَٱلْأَرْضُ بِأَمْرِهِۦ ۚ ثُمَّ إِذَا دَعَاكُمْ
دَعْوَةً مِّنَ ٱلْأَرْضِ إِذَآ أَنتُمْ تَخْرُجُونَ ٢٥

२६. आकाशांमध्ये व जमीनीवर जे काही आहे सर्व त्याचीच मिळकत आहे.[४४] सर्व त्याच्या आदेशाच्या अधीन आहेत.[४५]

وَلَهُۥ مَن فِى ٱلسَّمَـٰوَٰتِ وَٱلْأَرْضِ ۖ كُلٌّ لَّهُۥ قَـٰنِتُونَ ٢٦

२७. तोच निर्मितीचा आरंभ करतो व तोच याची पुनरावृत्ति करील (परतवील) आणि हे त्याच्या करीता अधिक सोपे आहे.[४६] आकाशांमध्ये व जमीनीवर त्याची शान उच्चतम आहे.[४७] आणि तो वर्चस्वशाली व बुद्धि कौशल्य बाळगणारा आहे .[४८]

وَهُوَ ٱلَّذِى يَبْدَؤُا۟ ٱلْخَلْقَ ثُمَّ يُعِيدُهُۥ وَهُوَ أَهْوَنُ عَلَيْهِ ۚ
وَلَهُ ٱلْمَثَلُ ٱلْأَعْلَىٰ فِى ٱلسَّمَـٰوَٰتِ وَٱلْأَرْضِ ۚ وَهُوَ ٱلْعَزِيزُ
ٱلْحَكِيمُ ٢٧

२८. तो तुमच्यासाठी तुमच्या स्वत:संबंधी उदाहरण निवेदन करतो. काय तुमच्या मालकीच्या (गुलामां) पैकी असे ही आहेत जे आम्ही दिलेल्या धनसंपदेत तुमचे सहभागी असावेत की तुम्ही व ते यात बरोबरीचे ठरावेत आणि तुम्ही त्यांचे अशा प्रकारे भय बाळगत असावेत ज्या प्रकारे आप्त स्वकीयांचे भय बाळगत असाल [४९] अशा प्रकारे आम्ही आपल्या आयती उघडपणे निवेदन करतो त्या लोकांकरीता जे बुद्धीचा वापर करतात.

ضَرَبَ لَكُم مَّثَلًا مِّنْ أَنفُسِكُمْ ۖ هَل لَّكُم مِّن مَّا مَلَكَتْ
أَيْمَـٰنُكُم مِّن شُرَكَآءَ فِى مَا رَزَقْنَـٰكُمْ فَأَنتُمْ فِيهِ سَوَآءٌ
تَخَافُونَهُمْ كَخِيفَتِكُمْ أَنفُسَكُمْ ۚ كَذَٰلِكَ نُفَصِّلُ ٱلْـَٔايَـٰتِ
لِقَوْمٍ يَعْقِلُونَ ٢٨

३८. निद्रावस्था किती विचित्र असते की या अवस्थेत माणसाला ना भूक जाणवते ना तहान. तसेच निद्रा थकवा दूर करून नवा दम, ताजेपणा निर्माण करते व निद्रावस्थेत शरीरात सुधारणा कार्य मोठया गती ने पार पडते. काय हे सर्व काही आपोआप घडत आहे ?

३९. अर्थोपार्जनास्तव केल्या जाणाऱ्या धावपळीस अल्लाह ची कृपा शोधण्याच्या अर्थाने घेतले गेले आहे. कारण जीवनावश्यक सामुग्री ही अल्लाहची जाणवणारी कृपा होय.

४०. म्हणजे जे लोक उपदेश पूर्ण गोष्टी ऐकण्याकरीता आपले कान उघडे ठेवतात तेच पैगंबरांच्या उपदेशानेच प्रभावित होतात आणि त्या लक्षणांपासून ज्यांच्याकडे कुरआन ने संकेत केला आहे. योग्य मार्गदर्शन प्राप्त करतात.

४१. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह रअद टीप क्र. २८

४२. आकाशाचे ग्रह - नक्षत्रांसमवेत अशा प्रकारे कायम राहणे व जमीनीचे अशा प्रकारे स्थीर राहणे की दीर्घ काळ लोटल्यानंतरही ना यांच्यात एखादा बिघाड निर्माण झाला आणि ना यांच्या व्यवस्थेत कसलाही व्यत्यय आला, हे या गोष्टीचे स्पष्ट प्रमाण होय की हे अल्लाहचेच सामर्थ्य होय ज्याच्या आदेशाने हे कायम व स्थीर आहेत आणि जेव्हा त्याच्या आदेशाने कायम आहेत तर तो आपल्या आदेशाने यांना उध्वस्त देखील करु शकतो. यास्तव कियामत घडून येणे कदापि अशक्य नाही.

४३. म्हणजे तुम्हाला दुसऱ्यांदा निर्माण करण्याकरीता अल्लाहचे तुम्हास एक वेळ पुकारणे पुरेसे ठरेल. ज्या क्षणी तो तुम्हाला हाक मारील तुम्ही जमीनीतून जिवंत बाहेर पडाल अर्थात हे बाहेर पडणे शरीरा समेत असेल आणि अल्लाहचे बोलावणे जमीनीच्या आतून ऐकू येईल.

४४. म्हणजे त्याचे दास होत. यांच्यापैकी कोणीही मालक नाही, किंबहुना या सर्वांचा मालक अल्लाह आहे. मनुष्य देखील जन्मत: अल्लाहचा दास व गुलाम आहे.

४५. म्हणजे सर्व त्याच्या पुढे अगतिक आहेत आणि सर्वांना त्याचे आदेश लागू पडतात.

४६. म्हणजे अल्लाह करीता दुसऱ्यांदा निर्माण करणे काहीच कठीण नाही. जेव्हा तुम्ही हे मान्य करता की पहिल्यांदा त्याने निर्माण केले आहे. तर मग दुसऱ्यांदा निर्माण करणे त्याच्यासाठी आणखी सोपे असले पाहीजे. परंतु आश्चर्य म्हणजे तुम्ही दुसऱ्यांदाच्या निर्मितीस अशक्य समजता.

४७. म्हणजे अल्लाहचा मनुष्य किंवा अन्य एखाद्या निर्मिती वरुन कयास करु नका. ते असे उच्चतम अस्तित्व आहे ज्याचे संपूर्ण सृष्टीत दुसरे उदाहरण नाही. तो आपल्या स्वत्वात व गुण वैशिष्टयात एकटा आहे व त्याची गुण वैशिष्टये अतिशय उच्च अशी आहेत.

ही वस्तुस्थिती लक्षात घेता सर्वश्रेष्ठ अल्लाह विषयी एखादे असे वक्तव्य करणे जे त्याच्या महत्तेहून कमी पातळीचे असावे किंवा ज्याने त्याच्या शान प्रतिष्ठेस गालबोट लागत असावे तर हे पूरेपूर अज्ञान व मार्ग भ्रष्टता होय.

४८. अल्लाहची दोन गुण वैशिष्टये येथे निवेदिली गेली आहेत. अजीज म्हणजे वर्चस्व शाली व हकीम म्हणजे बुद्धिकौशल्य बाळगणारा. तो वर्चस्व शाली आहे म्हणून त्याचा हा वायदा की तो माणासाला दुसऱ्यांदा निर्माण करील, पूर्ण झाल्याखेरीज राहणार नाही आणि त्याचा हा फैसला की कियामत घडून येईल व न्यायालय प्रस्थापित होईल, अतिशय बुद्धि कौशल्य युक्त फैसला आहे जो निश्चित पणे लागू होईल.

४९. हे उदाहरण शिर्क (अनेकेश्वर वादा) च्या अयोग्यतेस स्पष्ट करण्या करीता सादर केले गेले आहे. जेव्हा तुम्ही आपल्या गुलामांना आपल्या धनसंम्पत्तित बरोबरीचे हिस्सेदार समजत नाही व ते हिस्सेदार नाहीत यामुळे तुम्ही त्यांच्या विषयी कसलीही भिती व आशंका बाळगत नाही जी आप्त स्वकीयांबद्दल बाळगता अर्थात हे की कोणी नातेवाईकाने तुमचा हक्क गिळंकृत न करावा किंवा त्यात अनुचित बदल न करावा. तर जेव्हा तुम्ही अल्लाह ने दिलेल्या धनसंपदेत आपल्या गुलामांना सहभागी ठरवित नाही व त्यांना बरोबरीचे हक्कदार समजत नाही तेव्हा अल्लाहने निर्माण केलेल्या निर्मितीत त्याचे सहभागी कशा प्रकारे ठरविता व त्यांचे अधिकार अल्लाहच्या अधिकारां समान कशा प्रकारे ठरवितात? जी गोष्ट तुम्ही आपल्या स्वत:साठी पसंत करीत नाही ती अल्लाह करीता कशा प्रकारे पसंत करता, जेव्हा त्याची शान अतिशय उच्च आहे.

२९. परंतु हे अत्याचारी [५०] समजून उमजून न घेता आपल्या इच्छा-अकांक्षा मागे चालत आहेत.[५१] तेव्हा ज्यांना अल्लाहने मार्गभ्रष्ट केले असावे त्यांना कोण मार्ग दाखवू शकतो ? [५२] अशा लोकांचा कोणी ही सहाय्यक नसेल.

بَلِ اتَّبَعَ الَّذِينَ ظَلَمُوا أَهْوَاءَهُمْ بِغَيْرِ عِلْمٍ ۖ فَمَنْ يَهْدِي مَنْ أَضَلَّ اللَّهُ ۖ وَمَا لَهُمْ مِنْ نَاصِرِينَ ﴿٢٩﴾

३०. तेव्हा तुम्ही आपला रोख त्या धर्माकडे एकाग्र चित्र होऊन करा.[५३] तो स्वाभाविक धर्म ज्यावर अल्लाहने माणसांना निर्माण केले.[५४] अल्लाहने बनविलेल्या रचनेत कसले ही परिवर्तन नाही. [५५] हाच खरा धर्म आहे, परंतु अधिकांश लोक जाणत नाही.[५६]

فَأَقِمْ وَجْهَكَ لِلدِّينِ حَنِيفًا ۚ فِطْرَتَ اللَّهِ الَّتِي فَطَرَ النَّاسَ عَلَيْهَا ۚ لَا تَبْدِيلَ لِخَلْقِ اللَّهِ ۚ ذَٰلِكَ الدِّينُ الْقَيِّمُ وَلَٰكِنَّ أَكْثَرَ النَّاسِ لَا يَعْلَمُونَ ﴿٣٠﴾

३१. (आपले तोंड त्या धर्माकडे करा) त्याच्याकडे रुजू करीत [५७] व त्याचे भय बाळगा.[५८] आणि नमाज कायम करा आणि अनेकेश्वर वाद्यां पैकी होऊ नका.[५९]

مُنِيبِينَ إِلَيْهِ وَاتَّقُوهُ وَأَقِيمُوا الصَّلَاةَ وَلَا تَكُونُوا مِنَ الْمُشْرِكِينَ ﴿٣١﴾

३२. ज्यांनी आपल्या धर्मात भेदभाव निर्माण केला आणि समूहा समूहा मध्ये विभागले गेले.[६०] प्रत्येक समूहाजवळ जे काही आहे तो त्यातच मग्न आहे.[६१]

مِنَ الَّذِينَ فَرَّقُوا دِينَهُمْ وَكَانُوا شِيَعًا ۖ كُلُّ حِزْبٍ بِمَا لَدَيْهِمْ فَرِحُونَ ﴿٣٢﴾

३३. जेव्हा लोकांना त्रास यातना पोहचते तेव्हा आपल्या पालन कर्त्यास पुकारतात त्याच्या कडे रुजू होऊन, मग जेव्हा तो आपल्या कृपेची गोडी चाखवितो तेव्हा यांच्या पैकी एक समूह आपल्या पालन कर्त्याचा सहभागी ठरवू लागतो.[६२]

وَإِذَا مَسَّ النَّاسَ ضُرٌّ دَعَوْا رَبَّهُمْ مُنِيبِينَ إِلَيْهِ ثُمَّ إِذَا أَذَاقَهُمْ مِنْهُ رَحْمَةً إِذَا فَرِيقٌ مِنْهُمْ بِرَبِّهِمْ يُشْرِكُونَ ﴿٣٣﴾

३४. अशासाठी की जे काही आम्ही त्यांना प्रदान केले आहे त्याच्याशी कृतघ्नता करावी. तेव्हा मौज करुन घ्या, लवकरच तुम्हाला कळून येईल.[६३]

لِيَكْفُرُوا بِمَا آتَيْنَاهُمْ ۚ فَتَمَتَّعُوا فَسَوْفَ تَعْلَمُونَ ﴿٣٤﴾

३५. काय आम्ही एखादी सनद यांच्यावर अवतरीत केली आहे. जी यांच्या ठरविलेल्या सहभागी बद्दल बोलत आहे.

أَمْ أَنْزَلْنَا عَلَيْهِمْ سُلْطَانًا فَهُوَ يَتَكَلَّمُ بِمَا كَانُوا بِهِ يُشْرِكُونَ ﴿٣٥﴾

५०. अभिप्रेत अनेकेश्वरवादी व मूर्तिपूजक होत.

५१. स्पष्ट झाले की शिर्क (अनेकेश्वरवाद) व मूर्तिपूजेचा ज्ञान व योग्यतेशी कसला ही संबंध नाही ती केवळ इच्छा-भक्ति होय.

५२. म्हणजे जो अल्लाहने निर्धारीत केलेल्या अपमानित करणाऱ्या नियमानुसार मार्गभ्रष्ट झाला त्याला सन्मार्गावरआणणे कोणाच्याही अवाक्यातले नाही.

५३. म्हणजे जेव्हा तौहीद (एकेश्वरवाद) (वस्तुस्थिती आहे आणि सर्वात मोठी हकीगत- तेव्हा या एकेश्वरवादी धर्मा करीता आपल्या मन-मस्तिष्कास एकाग्र करुन त्यावर दृढ झाले पाहीजे. तुमची दृष्टी इतरत्र भटकायला नको, किंबहुना इस्लाम धर्मावरच अढळ रहावी.

निखालस एकेश्वर वादाचे स्वरुप असलेल्या इस्लाम धर्मा खेरीज इतर कोणत्याही धर्माकडे किंचित मात्र लक्ष देणे ही ईमानास कंपित करते आणि समस्त धर्मांच्या सत्य असण्या विषयीची कल्पना तर नितांत मार्गभ्रष्टता होय.

५४. अभिप्रेत इस्लाम होय आणि इस्लामला स्वाभाविक धर्म यासाठीच म्हटले गेले आहे की :-

१) प्रत्येक माणसाच्या स्वभावामध्ये एक ईश्वराची कल्पना असते ज्यास तो आपला निर्माता व आपला पालन कर्ता या नात्याने ओळखतो अन्य ईश्वरांच्या कल्पने पासून त्याचा स्वभाव अगदी अनभिज्ञ असतो.

एकमेव ईश्वराच्या ईश्वरत्वाचे वचन स्वभाविक वचन होय जे समस्त मानवांकडून त्यांना जगात पाठविण्या पूर्वीच घेतले गेले आहे. पहा सूरह अअराफ टीप क्र. १७२, २६४, २६५.

२) माणसाचा स्वभाव मूळभूतपणे भलाई व नेकीच्या कामांना पसंत करतो आणि दुष्कर्म व उपद्रवाचा तिटकारा करतो अर्थात इस्लाम या स्वाभाविक गुण वैशिष्टयांना वृद्धिगंत करतो.

३) माणसाचा आपला विवेक व त्याचे संपूर्ण अस्तित्व त्याला आपल्या पालन कर्त्या समोर उत्तरदायी ठरविते. इस्लाम या कल्पनेचे केवळ समर्थनच करीत नाही, तर त्यास मनात उतरवितो.

४) माणसाचा स्वभावधर्म सत्य - असत्यात तारतम्य करतो आणि जेव्हा इस्लाम एक सत्य धर्म या नात्याने त्याच्या समोर येतो तेव्हा तो त्याकडे अशा प्रकारे धाव घेतो ज्या प्रकारे सूई लोह-चूंबका कडे. या तर इच्छा आकांक्षा, पक्षपात व सैतानी कुविचार होत जे मार्गात अडसर बनतात.

५) पाण्याचा स्वभावधर्म उताराकडे वाहणे हा होय. अशा प्रकारे मनुष्य-स्वभाव सन्मार्गावर चालतो. जर मार्गभ्रष्टतेची साधने नसतील तर इस्लामच्या राजमार्गाचे स्पष्ट आकलन होताच तो त्यावर चालू लागतो.

तात्पर्य इस्लाम स्वभावधर्माच्या सुप्त गुणांचे व संकेतांचे स्पष्टीकरण होय म्हणून हा प्रत्येक व्यक्तिचा आपला धर्म आहे आणि हा इस्लामच होय जो पूर्ण दाव्यानिशी हे सांगतो की हा धर्म स्वाभाविक धर्म आहे जेव्हा दुसरा कोणताही धर्म हा दावा करण्याचे साहस करु शकत नाही.

इस्लाम हा स्वाभाविक धर्म असण्या संदर्भात पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी अशा प्रकारे स्पष्ट फर्माविले आहे.

مَامِنْ مَوْلُوْدٍاِلَّا يُولَدُعَلَى الْفِطْرَةِ۔فَاَبَوَاهُ يُهَوِّدَانِهِ وَيُنَصِّرَانِهِ
وَيُشَرِّكَانِهِ۔(مسلم کتاب القدر)

''हजरत अबु हुरैरा फर्मावितात की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी फर्माविले असे कोणतेही बाळ नाही जे स्वभाव धर्मावर जन्माला येत नसावे. मग त्याचे आई-बाप त्याला यहुदी, ख्रिश्चन किंवा अनेकेश्वरवादी बनवितात.'' (मुस्लिम किताबुलकद्र)

म्हणजे जन्मलेल्या बाळास त्याच्या स्वाभाविक धर्मापासून परावृत्त करून अन्य एखाद्या धर्माशी संबंधित करणारी गोष्ट हे एक बाह्य आचरण होय. हे कृत्य आई-वडील किंवा परिसराचे वातावरण पार पाडते. मग ते यहुदी धर्माच्या स्वरुपात असो किंवा ख्रिश्चन मताच्या स्वरुपात, बौद्ध धर्माच्या स्वरुपात असो किंवा हिंदु धर्माच्या स्वरुपात असो, मूर्तिपूजेच्या स्वरुपात असो किंवा नास्तिकतेच्या स्वरुपात.

तात्पर्य ज्या व्यक्तिने देखील आपल्या स्वभाव धर्मास विकृत केले नसेल तो इस्लामला आपल्या हृदयाचीच हाक समजेल.

५५. म्हणजे अल्लाहने ज्या स्वभावधर्मावर निर्माण केले आहे व ज्या साच्यात (Model) घडविले आहे त्यात कोणताही बदल केला जाऊ नये. ही गोष्ट श्रध्देच्या संदर्भात सांगितली गेली असली तरी शब्दांची सर्व सामान्याता अर्थाच्या व्यपकतेने युक्त आहे ज्यात बाहय रचनेस न बदलणे ही सामील आहे. यास्तव त्या काळात काही धारणा अशाही होत्या की ज्यामुळे अल्लाहच्या रचनेत परिवर्तन घडत असे. यासतव हदीस वचनात यांची केवळ मनाई केली गेली नाही, तर अशा फॅशन वेडयांना निर्भत्सनेस पात्र ठरविले गेले. उदाहरणार्थ भुवयांना बारीक करणे, दातांच्या दरम्यान फटी बनविणे, हातांवर गोंदणे इत्यादि.

यास्तव हदीस वचनातील उल्लेखानुसार -

عن عبدالله رضى الله عنه قال لَعَنَ اللهُ الواشِماتِ وَالْمُستَوْشِماتِ
وَالْمُتَنَمِّصَاتِ وَالْمُتَفَلِّجَاتِ لِلْحُسْنِ الْمُغَيِّرَاتِ خَلْقَ اللهِ مَالِى لَا
اَلْعَنُ مَنْ لَعَنَ رَسُولُ اللهِ صلى الله عليه وآله وسلم وَهُوَ فِى كِتابِ اللهِ۔

(صحیح البخاری۔کتاب اللباس)

''हजरत अब्दुल्लाह बिन मसऊद (रजि.) द्वारे उल्लिखित आहे ते फर्मावितात की अल्लाहने निर्भत्सना केली आहे गोंदणाऱ्यांची गोंदणारीची, भुवयाचे केस खुरचून काढणाऱ्यांची व दातांच्या दरम्यान फटी निर्माण करणारीची जे सौंदर्या करीता अल्लाहच्या रचनेत परिवर्तन करतात. मी त्यांची निर्भत्सना का करु नये ज्यांची पैगंबर सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांनी निर्भत्सना केली आहे आणि ही गोष्ट अल्लाहच्या ग्रंथात आहे. (अर्थात पैगंबरांच्या आज्ञा पालनाचा आदेश)'' (सहीहुल बुखारी - किताबुल बास)

अशा प्रकारे आजच्या काळात दाढी मुंडविण्याची फॅशन, जेव्हा की दाढी स्वभाविकपणे पुरुषत्वाचे प्रतिक आहे. केवळ सौंदर्य वाढविण्या करीता पलास्टीक सर्जरी द्वारे आपल्या चेहऱ्यास बदलणे किंवा आपल्या पोटरींना नाजून बनविणे, एखाद्या खरोखरीच्या अगतिकते शिवाय नसबंदी करून घेणे इत्यादी.

५६. आणि आज देखील अधिकांश लोकांची दशा हीच आहे की ते जाणत नाही की इस्लाम हाच स्वाभाविक व सच्चा धर्म आहे. ते एकतर असे समजतात की ज्या धर्मात जे जन्माला आले आहेत तोच खरा धर्म आहे किंवा असे समजतात की जगातले सर्वच धर्म खरे आहेत ज्यात इस्लामचा ही समावेश आहे.

५७. म्हणजे इस्लाम धर्माकडे आपला रोख या नात्याने करा की हृदयात अल्लाह करीता रुजू व प्रवृत्त असावी.

५८. म्हणजे त्याच्या महानतेच्या कल्पनेने भय बाळगा व त्याच्या अवज्ञेपासून अलीप्त रहा.

५९. 'नमाज कायम करा व अनेकेश्वरवाद्यांपैकी होऊ नका' हे वाक्य या गोष्टीकडे संकेत करते की मुसलमानास अनेकेश्वरवादी व्यक्ति पासून वेगळे, विशेष करणारी गोष्ट म्हणजे नमाज होय. नमाज कायम करुन मनुष्य तौहीद (एकेश्वरवादा) ला मानणारा बनतो. व यास सोडून स्वत:ला शिर्क व कुफ्र च्या मार्गाला लावतो. ही वस्तुस्थिती आहे की नमाज सुरवाती पासून शेवट पर्यंत तौहीद वर आधारीत आहे. ती दास व अल्लाह यांच्या दरम्यान विनंती व प्रार्थना आहे ज्यात ना कोणी माध्यम आहे ना एखादा वशाला. ना एखाद्याच्या प्रतिष्ठेचा हवाला दिला जातो ना एखाद्याच्या सदका म्हणून काही मागितले जाते, किंबहुना जे काही मागितले जाते आपल्या पालन कर्त्याकडून सरळ सरळ मागितले जाते त्याची स्तुती, प्रशंसा करीत. नमाज मध्ये जे काही पढले जाते त्यावर जर मुसलमानाने विचार चिंतन केले तर निश्चितच आपल्या वरील शिर्क व बिदआत (धर्मात नव्या गोष्टी निर्माण करणे) ची धूळ झटकून टाकील.

६०. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह अनआम टीप क्र. २९५.

६१. म्हणजे प्रत्येक धर्मावलंबी आपापल्या धर्मावर खूश व त्याची श्रद्धा बाळगणारा आहे. तो कधी हा विचार करण्यास तयार होत नाही की ज्या धर्मावर तो श्रद्धा ठेवतो तो खरोखर अल्लाहने अवतरीत केलेला धर्म आहे किंवा माणसांनी स्वत: रचलेला.

६२. कष्ट-यातनेत ईश्वराचे स्मरण होणे ही वस्तुत: स्वभाव धर्माची हाक आहे. यास्तव लोक एकेश्वरवादास मानणारे असावयास पाहीजे होते. परंतु जेव्हा सर्वश्रेष्ठ अल्लाह आपल्या कृपेने कष्ट-यातना दूर करतो तेव्हा अधिकांश माणसे अशी आहेत की जे या कृपेस अन्य एखाद्याची मेहरबानी समजून त्यास अल्लाहच्या अधिकारात सहभागी ठरवू लागतात.

**तर नातेवाईकास त्याचा हक्क द्या आणि गरीब व प्रवाशास त्याचा हक्क हे अधिक चांगले आहे त्या लोकांकरीता जे अल्लाहची प्रसन्नता इच्छितात. आणि ते यश प्राप्त करणारे आहेत. *(अल-क़ुर्आन)***

३६. जेव्हा आम्ही लोकांना ईश-कृपेची गोडी चाखवितो तेव्हा वात्रायला लागतात आणि जेव्हा त्यांच्या दुष्कर्मांपायी त्यांच्यावर एखादे संकट येते [६४] तेव्हा ते त्वरीत निराश होतात.[६५]

وَإِذَآ أَذَقْنَا النَّاسَ رَحْمَةً فَرِحُوا بِهَا ۖ وَإِن تُصِبْهُمْ سَيِّئَةٌۢ
بِمَا قَدَّمَتْ أَيْدِيهِمْ إِذَا هُمْ يَقْنَطُونَ ﴿٣٦﴾

३७. काय हे पाहत नाही की अल्लाह, ज्याच्या करीता इच्छितो उपजिविका वाढवितो व ज्याच्या करीता इच्छितो मोजून मापून देतो. निःसंशय यात त्या लोकांकरीता निशाण्या आहेत जे ईमान बाळगतात.[६६]

أَوَلَمْ يَرَوْا أَنَّ اللَّهَ يَبْسُطُ الرِّزْقَ لِمَن يَشَآءُ وَيَقْدِرُ ۚ إِنَّ فِي
ذَٰلِكَ لَآيَٰتٍ لِّقَوْمٍ يُؤْمِنُونَ ﴿٣٧﴾

३८. तर नातेवाईकास त्याचा हक्क द्या आणि गरीब व प्रवाशास त्याचा हक्क. [६७] हे अधिक चांगले आहे त्या लोकांकरीता जे अल्लाहची प्रसन्नता इच्छितात.[६८] आणि ते यश प्राप्त करणारे आहेत.[६९]

فَـَٔاتِ ذَا الْقُرْبَىٰ حَقَّهُۥ وَالْمِسْكِينَ وَابْنَ السَّبِيلِ ۚ ذَٰلِكَ
خَيْرٌ لِّلَّذِينَ يُرِيدُونَ وَجْهَ اللَّهِ ۖ وَأُولَٰٓئِكَ هُمُ الْمُفْلِحُونَ ﴿٣٨﴾

३९. आणि जे व्याज तुम्ही देतात, यासाठी की लोकांच्या धनात वाढ व्हावी तर ते अल्लाहच्या जवळ वाढत नाही [७०] आणि जे जकात (कर्तव्य दान) तुम्ही अल्लाहची मर्जी संपादण्या करीता देता तर हेच लोक होत. (आपल्या धनाला) वाढविणारे.[७१]

وَمَآ ءَاتَيْتُم مِّن رِّبًا لِّيَرْبُوَا۟ فِيٓ أَمْوَٰلِ النَّاسِ فَلَا يَرْبُوا۟
عِندَ اللَّهِ ۖ وَمَآ ءَاتَيْتُم مِّن زَكَوٰةٍ تُرِيدُونَ وَجْهَ اللَّهِ
فَأُولَٰٓئِكَ هُمُ الْمُضْعِفُونَ ﴿٣٩﴾

४०. अल्लाहच होय ज्याने तुम्हाला निर्माण केले मग तुम्हाला उपजिविका प्रदान केली, मग तुम्हाला मरण देतो नंतर तुम्हाला जिवंत करील. काय तुम्ही ठरविलेल्या सहभाग्यांपैकी असा कोणी आहे जो या पैकी एखादे काम ही करीत असावा? [७२] पवित्र व श्रेष्ठतम आहे तो त्या शिर्क (अनेकेश्वरवादा) पासून जे हे लोक करीत आहेत.

اللَّهُ الَّذِي خَلَقَكُمْ ثُمَّ رَزَقَكُمْ ثُمَّ يُمِيتُكُمْ ثُمَّ يُحْيِيكُمْ ۖ
هَلْ مِن شُرَكَآئِكُم مَّن يَفْعَلُ مِن ذَٰلِكُم مِّن شَيْءٍ ۚ سُبْحَٰنَهُۥ
وَتَعَٰلَىٰ عَمَّا يُشْرِكُونَ ﴿٤٠﴾

४१. खुष्की व पाण्यात उत्पात निर्माण झाला आहे लोकांच्या आपल्या दुष्कर्मांपायी अशासाठी की अल्लाहने त्यांना त्यांच्या काही कर्मांची गोडी चाखवावी ज्या योगे त्यांनी रूजू करावे.[७३]

ظَهَرَ الْفَسَادُ فِي الْبَرِّ وَالْبَحْرِ بِمَا كَسَبَتْ أَيْدِي النَّاسِ
لِيُذِيقَهُم بَعْضَ الَّذِي عَمِلُوا لَعَلَّهُمْ يَرْجِعُونَ ﴿٤١﴾

४२. सांगा जमीनीवर हिंडून फिरुन पहा की त्या लोकांचा काय शेवट झाला जे पूर्वी होऊन गेलेत.[७४] त्यांच्या पैकी बहुतेक जण अनेकेश्वरवादी होते.[७५]

قُلْ سِيرُوا فِي الْأَرْضِ فَانظُرُوا كَيْفَ كَانَ عَٰقِبَةُ
الَّذِينَ مِن قَبْلُ ۚ كَانَ أَكْثَرُهُم مُّشْرِكِينَ ﴿٤٢﴾

६३. म्हणजे काय या लोकांजवळ अल्लाहने अवतरीत केलेले एखादे प्रमाण आहे जे या गोष्टींची साक्ष देत असावे की अल्लाहने आपल्या अधिकारात अमुक अमुक व्यक्तिंना सहभागी केले आहे म्हणून तुम्ही त्यास गरजपूर्ति करीता आर्जव करु शकतात व ते तुमचे गाऱ्हाणे ही ऐकू शकतात व तुमची विनंती ही. परंतु जर असे एखादे प्रमाण तुमच्या जवळ नाही तर तुमचा हा दावा किती चुकीचा व निराधार आहे.

तात्पर्य विविध धर्मांचे जे ग्रंथ पवित्र समजले जातात त्यांच्यात जर देवी-देवतांची कल्पना आहे किंवा ईश्वराची गुण-वैशिष्टये व त्याचे अधिकार व हक्क यात एखाद्यास सहभागी ठरविले गेले आहे तर ते ईश्वरीय सनदीचे स्वरुप मुळीच बाळगत नाही. कारण अल्लाहने या प्रकारची कोणतीही गोष्ट कोणत्याही पैगंबरावर अवतरीत केली नाही आणि ना आपल्या एखाद्या ग्रंथात निवेदन केली आहे. किंबहुना या धर्मानुयायींनी भ्रम पूजा व अटकळीच्या गोष्टी आधारे ईश्वराचे सहभागी ठरविले व त्यांना आपल्या धर्म ग्रंथांमध्ये सामील केले.

हा तर अनेकेश्वरवाद्यांचा मामला आहे. परंतु मुसलमानांमध्ये ही त्यांच्यातल्या बिदआत प्रिय समूहाने काही कमी जुलूम केला नाही.तो कुतुब, अबदाल व अवलीया यांना या जगात परिवर्तन करणारे मानतात व याचे स्पष्टीकरण असे करतात की आम्ही त्यांना ईश्वर नाही मानत, किंबहुना असे मानतो की ईश्वराने त्यांना परिवर्तन करण्याचा अधिकार प्रदान केला आहे, यास्तव ते याचकाला तो जे मागतो ते देतात. गाऱ्हणे ऐकतात व दु:ख यातनेचे निवारण करतात. गरीबाला उपकृत करतात व पुकारणाऱ्याची मदत करतात. प्रश्न हा आहे की सर्वश्रेष्ठ अल्लाहने ही सनद कोठे अवतरीत केली आहे की अमुक एका व्यक्तिस त्याने परिवर्तनाचे अधिकार बहाल केले आहेत.यास्तव गरजपूर्ति करीता त्यांना आर्जव करा, ते तुमची मदत करतील ? काय कुरआनात अशी एखादी आयत दाखविली जाऊ शकते? मुळीच नाही, किंबहुना कुरआन तर स्पष्ट शब्दात निवेदन करते की समस्त अधिकार अल्लाहच्या हाती आहेत व त्या अधिकारांमध्ये कोणीही त्याचा सहभागी नाही. जर त्याने एखाद्यास आपल्या ईश्वरत्वाचे अधिकार देऊन ठेवले असते तर कुरआनात या गोष्टीचा उल्लेख निश्चितच केला गेला असता. मग हा ही विचार करा की एखाद्या वली किंवा पीर ला दस्तगीर किंवा गौस (गाऱ्हाणे ऐकणारा) मानण्याचा अर्थ असा की ते लक्षावधी व कोटयावधी माणसांच्या पुकारण्यास अपरोक्षात राहून ही ऐकतात व यांच्यापैकी प्रत्येक माणसाच्या दशेस जाणतो की कोण ईमान बाळगणारा आहे व कोण दांभिक कोण सदाचारी आहे व कोण दुराचारी, कोणी त्याचा नवस मानला आहे व त्याच्या नावाने नजराणा व नियाज केली आहे. या तपशील वार माहीती नंतरच तो वली एखाद्याचे गाऱ्हाणे ऐकू शकतो अथवा एखाद्याची मदत करू शकतो. एखाद्या वली संबंधी ही श्रद्धा त्याला अपरोक्ष ज्ञाता मानण्या समान नव्हे काय? तेव्हा हे शिर्क नव्हे तर आणखी काय आहे?

६४. माणसावर जी संकेटे येतात, ती कसोटी म्हणून येत असली तरी काही वेळा त्याच्या दुष्कर्मांपायीही अर्थात ही गोष्ट सर्व सामान्यपणे अवलोकनात येते.

६५. माणसाचे हे वर्तन चुकीचे आहे. ईश्वराने प्रदान केलेल्या एखाद्या देणगी बद्दल ना शेखी मिरवणे योग्य आहे व ना एखाद्या दु:ख यातने ने निराश होणे योग्य आहे. त्याने पहिल्या स्थितीत कृतज्ञता व्यक्त केली पाहीजे व दुसऱ्या स्थितीत संयम पाळला पाहीजे.

६६. एक निशाणी ही की उपजिविका प्रदान करणारा अल्लाहच आहे. दुसरी ही आहे की उपजिविका ईश्वरीय योजने नुसार माणसाला मिळते. तिसरी ही की अल्लाह ज्याला उपजिविका कमी प्रमाणात देऊ इच्छितो त्याच्यासाठी साधने असेच बनतात. आणि माणसाच्या अवाक्यात हे नाही की त्याने आपल्या प्रयत्नाने वाटेल तेवढी उपजिविका प्राप्त करावी. यास्तव किती तरी लोक आपल्या अंगी पात्रता व अतोनात प्रयत्न असूनही अधिक उपजिविका प्राप्त करण्यात अयशस्वी होतात. ही असफलता या गोष्टीचे प्रमाण होय की प्रयत्नच सर्व काही नाही किंबहुना अल्लाहची मर्जी ही मूळ गोष्ट होय आणि चौथी निशाणी ही की उपजिविकेची तंगी व समृद्धीचा अर्थ असा नव्हे की ज्याला मोजून मापून उपजिविका मिळत आहे तो अल्लाहच्या नजरेत प्रिय नाही व ज्याला अतोनात व अमर्याद उपजिविका मिळत आहे तो अल्लाहच्या नजरेत प्रिय आहे. किंबहुना दोन्ही अवस्थेत माणसाची परीक्षा आहे पहिल्या अवस्थेत त्याच्या सहनशीलतेची व दुसऱ्या अवस्थेत त्याच्या कृतज्ञतेची.

६७. म्हणजे अल्लाहने जी उपजिविका तुम्हाला प्रदान केली आहे त्यात कसोटीचा एक महत्वपूर्ण पैलू असा की तुम्ही या हक्कांना अदा करता किंवा नाही जे त्याने दिलेल्या उपजिविकेत तुमच्यावर आपल्यानातेवाईक व इतर गरजवंतांच्या संबंधाने नैतिकदृष्टया व शरीअत दृष्टया लागू पडतात.

प्रवाशासी अभिप्रेत तो प्रवासी होय जो देशांतरामुळे मदतीस पात्र झाला असेल पैगंबरांच्या मक्का येथील वास्तव्य काळात नातेवाईक, गोर-गरीब व प्रवाशांचे हक्क अदा करण्याची ताकीद त्यांच्या नैतिक व शरीअतविषयक महत्तेस स्पष्ट करते.

६८. म्हणजे या हक्कांची अदायगी निव्वळ अल्लाहची मर्जी संपादण्याकरीता व्हावयास हवी. यात नाव लौकीक प्राप्त करण्याची किंचितही अपेक्षा नसावी.

६९. म्हणजे विजय प्राप्त करणारे लोक तेच होत जे अल्लाहची प्रसन्नता प्राप्त करण्या करीता काम करतील व त्या

जबाबदाऱ्या पार पाडतील. ज्या त्याने आपल्या दासांवर सोपविल्या आहेत.

७०. ही पहिली आयत होय ज्यात व्याजाची असमृद्धता स्पष्ट केली गेली. हा संकेत व्याज शरीअतदृष्टया अप्रिय असण्याकडे होता. त्या काळी दारुल कुफ्र (इस्लामेतर शासन) असलेल्या मक्केत व्याजाची निकृष्टता जाहीर करणाऱ्या आयतीचे अवतरण जणू शरीअतच्या आरंभातच बुद्धीला व्याजाच्या विरोधी बनविण्याच्या अर्थासमान होते. नंतर याच्या स्पष्ट निषिद्धतेचा आदेश मदीनेत अवतरला (पहा सूरह बकरा आयत क्र. २७५, २७९ व टीप क्र. ४५५ ते ५६४ तसेच सूरह आले इमारान आयत क्र. १३० टीप क्र. १६०) आयतीचा अर्थ असा की व्याज देऊन तुम्ही असे समजता की ज्याला व्याज दिले त्याचे धन वाढले. परंतु त्याचे वाढणे मांगल्याशून्य व असे असमृद्ध असते की अशाने धनात खरे पाहता कसलीच वाढ होत नाही. अल्लाहच्या नजरेत व्याजाचे देणे घेणे असा अप्रिय व्यवहार आहे की त्याच्या दृष्टीत व्याजाच्या धनाची कवडी इतकी ही किंमत नाही आणि ना व्याजाने दिलेल्या कर्जावर त्याच्या येथे एखादा मोबदला मिळतो. (किंबहुना मोठे अपराधाचे काम आहे. जसे सूरह बकरा आयत क्र. २७५ मध्ये निवेदिले गेले आहे.)

आयतीत व्याज देण्याचा उल्लेख केला गेला आहे.ज्याचा संबंध जकात देण्याच्या तुलनेने, ज्याचा उल्लेख पुढील वाक्यात केला गेला आहे. अगदी स्पष्ट आहे. अर्थात हे की व्याज देणे कल्याण कारक नाही मात्र, जकात देणे कल्याण कारक आहे. अशा प्रकारे व्याज घेणाऱ्यास लाजविले गेले आहे की कर्ज देऊन जो व्याज घेतो अशाने वरवर पाहता त्याच्या पैशात वाढ होते परंतु असे धन घेणाऱ्यासाठी खऱ्या अर्थाने समृद्धी दायक ठरत नाही. कारण व्याज अत्याचार आहे व अत्याचाराची परिणती वाईटच होय.

आयतीवर विचार चिंतन केल्याने असे दिसून येते की तत्कालीन परिस्थितीत ईमान बाळगणाऱ्या करीता व्याज देण्याची विवशता राहीली असेल म्हणून व्याजाची निर्भत्सना करीत लक्ष्य त्या लोकांना बनविले गेले आहे जे कर्ज देऊन आपले धन वाढविण्या करीता व्याज घेतात.

भाष्यकारांच्या एका समूहाने या आयतीत रबा शी अभिप्रेत दान असा घेतला आहे व स्पष्टीकरण असे केले की एखाद्यास दान अशा इराद्याने द्यावे की याहून अधिक त्याच्याकडून परत मिळेल. हा गुन्हा नसला तरी शरीअत दृष्टया प्रियही नाही. परंतु रबाचा हा अर्थ घेण्याकरीता कसलेही प्रमाण उपलब्ध नाही. रबा कुरआनाची परिभाषा आहे ज्यावरुन व्याज म्हणजे तो अतिरेकच अभिप्रेत आहे. जे कर्ज किंवा आवश्यक देवाण मध्ये विलंबापायी वसूल केले जाते. मग प्रसंगोत्कि ही प्रमाण आहे की या ठिकाणी व्याजच अभिप्रेत आहे कारण उपरोक्त आयतीत गरजवंतांचे हक्क अदा करण्याचा आदेश दिला गेला आहे. आणि या ठिकाणी हक्क डावलण्याची ही स्थिती जी व्याजाच्या स्वरुपात असते निवेदिली गेली. तसेच नंतरच्या वाक्यात व्याजाच्या विरोधात जकात समृद्धीदायक असण्याच्या पैलूस प्रकट केले गेले आहे.

७१. म्हणजे जकात दिल्याने बाहयत: माल घटत असलेला दिसून येतो परंतु अशा धनाची खऱ्या अर्थाने समृद्धी,वृद्धी होते. तो मांगल्य व समृद्धीस कारक ठरतो तसेच जकात दिल्याने अल्लाहतर्फे मोठा मोबदला ही मिळतो.

हदीस वचनात दानाचा मोबदला अशा प्रकारे निवेदिला गेला आहे.

”مَنْ تَصَدَّقَ بِعَدْلِ ثَمْرَةٍ مِنْ كَسْبٍ طَيِّبٍ وَّلَا يَقْبَلُ اللهُ اِلَّا الطَّيِّبَ فَاِنَّ اللهَ يَتَقَبَّلُهَا بِيَمِيْنِهٖ ثُمَّ يُرَبِّيْهَا لِصَاحِبِهٖ كَمَا يُرَبِّیْ اَحَدُكُمْ فُلُوَّهٗ حَتّٰى تَكُوْنَ مِثْلَ الْجَبَلِ“۔ (صحیح البخاری کتاب الزکوٰۃ)

‘‘जो मनुष्य आपल्या स्वच्छ शुद्ध कमाई मधून का खजूरा इतके दान देतो-आणि अल्लाह केवळ स्वच्छ शुद्ध दानच कबूल करतो-तर अल्लाह यास आपल्या उजव्या हाताने कबूल करतो मग यास दान देणाऱ्या करीता अशा प्रकारे वृद्धिगत करतो, ज्या प्रकारे तुमच्या पैकी एखादा मनुष्य आपल्या वासरूचे पालन पोषण करतो येथ पावेतो की ते दान पहाडा समान होते.’’ (सहीहुलबुखारी किताबुज्जकात)

७२. म्हणजे ज्या अर्थी तुम्ही ठरविलेली ईश्वराचे सहभागी यापैकी कोणतेही काम करू शकत नाही तर ते उपास्य किंवा देव कसे?

७३. या ठिकाणी उत्पाताशी अभिप्रेत अशांतता/अराजकता होय जी जळी स्थळी निर्माण झाली होती. यास्तव अरब प्रदेशात ही हत्त्या-वधाचे वातावरण होते आणि फारस व रोम या जवळच्या देशांमध्ये तर युद्धच उद्‌भवले होते. या युद्ध व विध्वसांच्या परिणामी खुष्कीचे व सागरी प्रवास ही सुरक्षित नव्हते. या परिस्थितीस खुष्की व पाण्यात उत्पात निर्माण होण्याच्या अर्थाने घेतले गेले आहे, आणि यास लोकांच्या दुष्कर्मांचा परिणाम ठरविले गेले आहे. आर्थात लोकांनी जेव्हा अल्लाह च्या अवज्ञेचा मार्ग अंगिकारला तेव्हा त्यांच्यात मतभेद व नैतिक विघाड निर्माण झाला आणि जेव्हा बिघाड निर्माण झाला तेव्हा लोक हत्त्या-वध व युद्धास प्रवृत्त झाले ज्यामुळे सगळीकडे अराजकता पसरली. स्पष्ट झाले की लोकांच्या चुकीच्या आचरणाचा परिणाम म्हणून मनुष्य-समाज सुख-शांती ला पारखा होतो आणि सर्वश्रेष्ठ अल्लाह जगात ही शिक्षा त्यांना

त्यांच्याच हस्ते अशासाठी देववीत राहील की ठोकर खाल्ल्यानंतर त्यांनी तोल सांभाळावा व आपल्या पालन कर्त्याकडे रुजू करावे.

आजच्या काळात तर अराजकता अगदी सर्वसामान्य बाब झाली आहे. रक्तपात, लूटमार, उत्पात उपद्र व युद्धांनी या जगाला जहन्नम चा नमुना बनविले आहे. युद्धात तर समुद्र ही सुरक्षित राहात नाही व मोठे मोठे जहाज बुडविले जातात आणि ही लढाई केवळ खुष्की व समुद्रातच होत नाही, तर अवकाशातही रॉकेट सोडले जातात. विमान पळवून नेण्याच्या घटना तर दिवेसे दिवस घडतात आणि बॉम्बचा वापर तर अगदी सामान्य बाब झाली आहे. तात्पर्य मानवाने प्रगती केली तर अशी की अवकाशास ही संकटमय बनविले. अशा प्रकारे मानव जाती करीता शांती सुबत्तेचे ठिकाण ना खुष्कीत राहीले व ना पाण्यात आणि ना अवकाशात. प्रत्येक ठिकाणी लोक आपल्या कृत कर्माची फळे चाखत आहेत.

७४. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह अनआम टीप क्र. २०

७५. अभिप्रेत ते जन समूह होत ज्यांच्यावर अल्लाहची शिक्षा अवतरली या जन समूहांमध्ये बहुसंख्य अनेकेश्वरवादी होते. एकेश्वरवादावर ईमान बाळगणारे, संख्येने फार कमी होते व त्यांनाच सुरक्षित राखले गेले.

४३. तेव्हा तुम्ही आपला रोख या सरळ धर्माकडे राखा या आधी की अल्लाह तर्फे तो दिवस यावा जो टळू शकत नाही. त्या दिवशी ते वेगवेगळे होतील.[७६]

فَأَقِمْ وَجْهَكَ لِلدِّينِ الْقَيِّمِ مِن قَبْلِ أَن يَأْتِيَ يَوْمٌ لَّا مَرَدَّ
لَهُ مِنَ اللَّهِ يَوْمَئِذٍ يَصَّدَّعُونَ ﴿٤٣﴾

४४. ज्याने कुफ्र (सत्याचा इन्कार) केला. त्याचे कुफ्र त्याच्यावरच ओढवेल ज्यांनी सत्कर्म केले ते स्वत:करीताच (यशाचा) मार्ग काढीत आहेत.[७७]

مَن كَفَرَ فَعَلَيْهِ كُفْرُهُ ۖ وَمَنْ عَمِلَ صَالِحًا
فَلِأَنفُسِهِمْ يَمْهَدُونَ ﴿٤٤﴾

४५. यासाठी की त्याने (अल्लाह ने) आपल्या कृपेने त्या लोकांना मोबदला द्यावा ज्यांनी ईमान बाळगले व ज्यांनी सत्कर्म केले. नि: संशय तो काफिरांना पसंत करीत नाही.[७८]

لِيَجْزِيَ الَّذِينَ آمَنُوا وَعَمِلُوا الصَّالِحَاتِ مِن فَضْلِهِ ۚ إِنَّهُ
لَا يُحِبُّ الْكَافِرِينَ ﴿٤٥﴾

४६. त्याच्या निशाण्यांपैकी हे आहे की तो वाऱ्यांना पाठवितो, जे शुभ समाचार (खुशखबर) देतात.यासाठी की त्याने तुम्हाला आपल्या कृपेची गोडी चाखवावी [७९] व यासाठी की नौका त्याच्या आदेशाने चालाव्यात आणि यासाठी तुम्ही त्याच्या कृपेचा शोध घ्यावा व यासाठी की त्याच्याशी कृतज्ञ व्हावे.

وَمِنْ آيَاتِهِ أَن يُرْسِلَ الرِّيَاحَ مُبَشِّرَاتٍ وَلِيُذِيقَكُم مِّن
رَّحْمَتِهِ وَلِتَجْرِيَ الْفُلْكُ بِأَمْرِهِ وَلِتَبْتَغُوا مِن فَضْلِهِ
وَلَعَلَّكُمْ تَشْكُرُونَ ﴿٤٦﴾

४७. आम्ही तुमच्या पूर्वी ही रसूल (पैगंबर) त्यांच्या जनसमूहांकडे पाठविले होते आणि ते त्यांच्याजवळ स्पष्ट प्रमाण घेऊन आले होते. मग आम्ही त्या लोकांना शिक्षा दिली ज्यांनी अपराध केला आणि ईमान बाळगणाऱ्यांना सहाय्य करणे आम्हास आवश्यक होते.[८०]

وَلَقَدْ أَرْسَلْنَا مِن قَبْلِكَ رُسُلًا إِلَىٰ قَوْمِهِمْ فَجَاءُوهُم
بِالْبَيِّنَاتِ فَانتَقَمْنَا مِنَ الَّذِينَ أَجْرَمُوا ۖ وَكَانَ حَقًّا
عَلَيْنَا نَصْرُ الْمُؤْمِنِينَ ﴿٤٧﴾

४८. अल्लाहच होय, जो वाऱ्यांना पाठवितो आणि जे ढग उंचलवितात तो ज्या प्रकारे इच्छितो त्यांना आकाशात (इतस्तत:) पसरवितो आणि त्यांचे तुकडे करतो. मग तुम्हाला त्यांच्यातून पाऊस पडतांना दिसून येतो. मग जेव्हा तो आपल्या दासांपैकी ज्यांच्यावर इच्छितो पावसाचा वर्षाव करतो. तेव्हा ते अकस्मात आनंदीत होतात.

اللَّهُ الَّذِي يُرْسِلُ الرِّيَاحَ فَتُثِيرُ سَحَابًا فَيَبْسُطُهُ
فِي السَّمَاءِ كَيْفَ يَشَاءُ وَيَجْعَلُهُ كِسَفًا
فَتَرَى الْوَدْقَ يَخْرُجُ مِنْ خِلَالِهِ ۖ فَإِذَا أَصَابَ بِهِ
مَن يَشَاءُ مِنْ عِبَادِهِ إِذَا هُمْ يَسْتَبْشِرُونَ ﴿٤٨﴾

७६. म्हणजे लोक आपल्या श्रद्धा व आचरणापायी वेगवेगळया समूहांमध्ये विभागले गेले.

७७. अशा प्रकारे कुरआन पत्येक मनुष्यास त्याच्या स्वत:च्या जबाबदारीची जाणीव करवितो आणि हे कुरआनी आवाहनाचे व पैगंबरीय आवाहनाचे महत्वपूर्ण वैशिष्टय होय. आजच्या काळात इस्लामी आवाहन प्रस्तुत करण्याची एक अशी पद्धत रुढ झाली आहे जी व्यक्तिला त्याच्या स्वत:च्या जबाबदारी पेक्षा, समाजाला त्याच्या सामूहीक जबाबदारी कडे लक्ष देण्यास प्रेरित करते आणि आखिरतच्या मुक्ति पेक्षा, ऐहीक मुक्तिची काळजी घेणारा बनविते.

७८. म्हणजे कियामतीचा सर्वात महत्वपूर्ण.........पैलू हाच की अल्लाहने आपल्या एकनिष्ठ दासांना आपल्या कृपेने उपकृत करावे. राहीलेत काफीर आणि बंडखोर लोक तर अल्लाह त्यांना मुळीच पसंत करीत नाही आणि जेव्हा तो पसंत करीत नाही तर त्यांना तो का म्हणून आपल्या कृपेने उपकृत करील ? अर्थात त्यांना करावे तसे भरावेच लागेल.

७९. म्हणजे कृपेचा वर्षाव

८०. म्हणजे जर लोक वारे व तत्सम इतर निशाण्यांद्वारे ही आपल्या रब्ब (पालनकर्त्या) ची उचित ओळख करून घेत नाही तर अल्लाह ने त्यांच्यावर प्रमाण प्रस्थापित करण्यासाठी रसूल पाठविले, मग सत्य संपूर्णत: स्पष्ट झाल्यानंतर ही ज्यांनी कुफ्र नितीचा अवलंब करुन अपराधी वर्तन अंगिकारले त्यांना शेवटी शिक्षा दिली गेली आणि जेव्हा त्यांना शिक्षा देण्याची व नष्ट करण्याची वेळ आली तेव्हा सर्वश्रेष्ठ अल्लाहने ईमान बाळगणाऱ्यांना सुरक्षित राखले. हे त्याचे सहाय्य होते जे शेवटी ईमान बाळगणाऱ्यांच्या हक्कात प्रकट झाले आणि अल्लाहचा हा आधीपासूनच निर्धारीत निर्णय होता की तो या शिक्षेपासून जी पैगंबराना खोटे ठरविण्याच्या स्थितीत त्याच्या जन समूहावर अवतरेल, ईमान बाळगणाऱ्यास तो वाचवील आणि सुयशाचे वाटेकरी तेच होतील.

४९. वास्तविक पाहता, या पूर्वी [८१] ते पावसाचा वर्षाव केला जाण्यापासून आधीच निराश होते.[८२]

وَإِن كَانُوا مِن قَبْلِ أَن يُنَزَّلَ عَلَيْهِم مِّن قَبْلِهِ لَمُبْلِسِينَ ﴿٤٩﴾

५०. तर पहा अल्लाहच्या कृपा-चिन्हांना की कशा प्रकारे तो जमीनीस ती मृत झाल्यानंतर जिवंत करतो. निःसंशय तो मृतांना जिवंत करणारा आहे [८३] आणि तो प्रत्येक गोष्टीस समर्थ आहे.

فَانظُرْ إِلَىٰ آثَارِ رَحْمَتِ اللَّهِ كَيْفَ يُحْيِي الْأَرْضَ بَعْدَ مَوْتِهَا ۚ إِنَّ ذَٰلِكَ لَمُحْيِي الْمَوْتَىٰ ۖ وَهُوَ عَلَىٰ كُلِّ شَيْءٍ قَدِيرٌ ﴿٥٠﴾

५१. आणि जर आम्ही (असा प्रतिकूल) वारा पाठवू आणि ते यास (आपल्या शेतीस) पिवळी जर्द झालेली पाहतील तर त्यानंतर ते कुफ्र (इन्कार करीत राहतील.[८४]

وَلَئِنْ أَرْسَلْنَا رِيحًا فَرَأَوْهُ مُصْفَرًّا لَّظَلُّوا مِن بَعْدِهِ يَكْفُرُونَ ﴿٥١﴾

५२. तेव्हा तुम्ही मृतांना ऐकवू शकत नाही आणि ना बहीऱ्यांना आपली पुकार ऐकवू शकता, जेव्हा की ते पाठ वळवित निघून जात असतील.[८५]

فَإِنَّكَ لَا تُسْمِعُ الْمَوْتَىٰ وَلَا تُسْمِعُ الصُّمَّ الدُّعَاءَ إِذَا وَلَّوْا مُدْبِرِينَ ﴿٥٢﴾

५३. आणि ना तुम्ही आंधळयांना, त्यांच्या मार्गभ्रष्टतेतून काढून सन्मार्गावर आणू शकतात. तुम्ही तर त्यांनाच ऐकवू शकता जे आमच्या आयतींवर ईमान बाळगतात आणि आज्ञापालन कबूल करतात.[८६]

وَمَا أَنتَ بِهَادِ الْعُمْيِ عَن ضَلَالَتِهِمْ ۖ إِن تُسْمِعُ إِلَّا مَن يُؤْمِنُ بِآيَاتِنَا فَهُم مُّسْلِمُونَ ﴿٥٣﴾

५४. अल्लाहच होय ज्याने तुम्हाला दुर्बल स्थितीत निर्माण केले. मग या दुर्बलतेनंतर तुम्हाला सामर्थ्य प्रदान केले मग या सामर्थ्यानंतर तुमच्यावर दुर्बलता व म्हातारपण आणले. तो जे इच्छितो निर्माण करतो.[८७] आणि तो सर्व काही ऐकणारा व मोठे जबरदस्त सामर्थ्य बाळगणारा आहे.

اللَّهُ الَّذِي خَلَقَكُم مِّن ضَعْفٍ ثُمَّ جَعَلَ مِن بَعْدِ ضَعْفٍ قُوَّةً ثُمَّ جَعَلَ مِن بَعْدِ قُوَّةٍ ضَعْفًا وَشَيْبَةً ۚ يَخْلُقُ مَا يَشَاءُ ۖ وَهُوَ الْعَلِيمُ الْقَدِيرُ ﴿٥٤﴾

५५. आणि ज्या दिवशी कियामत प्रस्थापित होईल, अपराधी शपथ पूर्वक म्हणतील की ते एक घटिका हून अधिक वेळ राहीले नाही. अशा प्रकारे ते धोका खात राहीलेत?[८८]

وَيَوْمَ تَقُومُ السَّاعَةُ يُقْسِمُ الْمُجْرِمُونَ مَا لَبِثُوا غَيْرَ سَاعَةٍ ۚ كَذَٰلِكَ كَانُوا يُؤْفَكُونَ ﴿٥٥﴾

८१. म्हणजे या वाऱ्यांना पाठविले जाण्यापूर्वी व त्यांच्याद्वारे ढगांना उंचाविले जाण्यापूर्वी.

८२. पर्जन्य-व्यवस्था माणसाला वैचारीक आवाहन करते व लोकांच्या नैराश्यास आशेत परिवर्तित ही करते. परंतु लोकांची दशा अशी आहे की ना ते या गोष्टीवर विचार चिंतन करतात की पावसाची ही आश्चर्य जनक व्यवस्था कोणाच्या सामर्थ्याचा चमत्कार आहे आणि ना या आनंदाबद्दल जो त्यांना निराशे नंतर लाभला आहे. आपल्या पालन कर्त्याशी कृतज्ञता व्यक्त करतात.

८३. म्हणजे मृत जमीनीचे पाऊस पडताच जिवंत होणे अल्लहच्या कृपेची अभिव्यक्ति होय. तद्वतच मृत माणसांचे जिवंत होणे हे ही अल्लाहच्याच कृपेने घडून येईल. हा संकेत या वस्तुस्थिती कडे आहे की दुसऱ्यांदा लाभणाऱ्या जीवनाचा अध्यारुत पैलू अल्लाहच्या कृपेचा उदय होय. म्हणून नेक (सदाचारी) लोकांच्या हक्कात ज्या लोकांनी आपण अस्सल सोने असल्याचे ऐहीक जीवनात सिद्ध करुन दाखविले त्यांना आखिरतच्या जीवनात अर्थात मरणोत्तर जीवनात उच्च-स्थान प्रदान केले जाईल व त्यांना अल्लाहच्या कृपेने धनाढय केले जाईल. राहीले खोटे व अप्रमाणिक तर ते आगीतच जाळण्याच्या लायकीचे आहे.

८४. वर ईश-कृपा आणणाऱ्या वाऱ्यांचा उल्लेख होता, इथे संकट आणणाऱ्या वाऱ्याचा उल्लेख आहे की जर आम्ही असा वारा वाहविला जो, शेती-पिकांना ते हिरवेगार व टवटवीत झाल्यानंतर विध्वंसित करुन टाकील व त्यांचा (पिकांचा) हिरवा रंग, पिवळया रंगात परिवर्तित होईल तर हे आपल्या पालन कर्त्या संबंधी संशयी बनून कुफ्र (नास्तिकता - सत्याचा इन्कार) करु लागतील. त्यांची वागणूक आपल्या पालन कर्त्याशी मोठी विचित्र आहे. त्याच्या उपकृततेबद्दल ते त्याच्याशी कृतज्ञता व्यक्त करीत नाही आणि संकट कोसळल्यावर ते सत्याचा इन्कार (कुफ्र) करु लागतात.

८५. याचे स्पष्टीकरण सूरह नमल टीप क्र. ११८ मध्ये केले गेले आहे.

स्पष्ट असावे की मृतांच्या ऐकण्या संदर्भात पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचे जे हदीस वचन सादर केले जाते की त्यांनी बद्रच्या युद्धात काफीरांच्या मृत शरीरांशी बोलताना फर्माविले होते.

هَلْ وَجَدْ تُمْ مَاوَعَدَ رَبُّكُمْ حَقًّاثُمَّ قَالَ اِنَّهُمُ الْاٰنَ يَسْمَعُوْنَ مَااَقُوْلُ۔ (بخاری کتاب المغازی)

''काय तुम्ही आपल्या पालन कर्त्याच्या वायद्यास सत्य असल्याचे पाहीले ? मग फर्माविले या वेळी ते ऐकत आहेत जे मी बोलत आहे.'' (बुखारी : किताबुल मगाजी)

तर या हदीसचा तो अर्थ नव्हे जो सामान्यत: समजला जातो यास्तव बुखारीचे कथन आहे की हजरत आयशा (रजि.) यांनी यांचे खंडन करतांना फर्माविले,

اِنَّمَا قَالَ النَّبِیُّ صَلَّی اللّٰہُ عَلَیْہِ وَسَلَّمَ اِنَّھُمُ الْاٰنَ لَیَعْلَمُوْنَ اَنَّ الَّذِی کُنْتُ اَقُوْلُ لَھُمْ ھُوَ الْحَقُّ ثُمَّ قَرَأَتْ اِنَّکَ لَاتُسْمِعُ الْمَوْتیٰ حَتّٰی قَرَأَتِ الْاٰیَۃِ۔

''पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी तर असे फर्माविले की त्यांना आता माहीत झाले आहे की मी जे काही त्यांना सांगत होतो ते सत्य आहे, मग हजरत आयशा यांनी या आयतीचे शेवट पर्यंत पठण केले.'' ''तुम्ही मेलेल्यांना ऐकवू शकत नाही.''

आणि जेव्हा पवित्र कुरआन स्पष्टरित्या हे सांगत आहे की तुम्ही मृतांना एकवू शकत नाही तेव्हा कोणत्याही संबंधित हदीसचा अपरिहार्यत: तोच अर्थ घ्यावा लागेल जो कुरआनाच्या या निवेदनाशी सुसंगतता राखत असेल.

८६. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह नमल टीप क्र. ११९.

८७. मनुष्य जेव्हा जन्माला येतो तेव्हा त्या क्षणी सर्वाधिक दुर्बल अवस्थेत तो असतो. मग हळू हळू सामर्थ्य प्राप्त करुन तारुण्यावस्थेप्रत पोहचतो तेव्हा मजबूत व शक्तिशाली बनतो. नंतर हे सामर्थ्य कालांतराने त्याच्याकडून हिरावून घेतले जाते. यास्तव म्हातारपणी तो पुन्हा दुर्बल बनतो. हा एका अवस्थेतून दुसऱ्या अवस्थेतला बदल व माणसाची स्वत: आपल्या बाबतीत ही विवशता या गोष्टीचे स्पष्ट प्रमाण होय की त्याचा पालन कर्ताच होय जो जसे इच्छितो तसे निर्माण करतो व ज्या अवस्थांमधून इच्छितो त्यातून त्यास पार पाडतो तेव्हा माणसाला हे कशा प्रकारे शोभून दिसते की सामर्थ्य प्राप्त केल्यानंतर घमेंड करु लागावे व आपल्या पालन कर्त्यास विसरुन जावे.

८८. म्हणजे जो अवधि त्यांनी मेल्यानंतर घालविला त्या विषयी अशा कल्पना करतील की तो अवधि एक घटिका पेक्षा अधिक नव्हता वस्तुत: त्यांनी एक दीर्घकाळ घालविला असेल. ते ज्या प्रकारे मृत्यु व कियामतीच्या दरम्यानच्या अवधि संबंधी चुकीचा अंदाज लावतील, तद्वतच ते जगात देखील आपल्या स्वत: संबंधी चुकीचा अंदाज लावीत राहीलेत आणि आपल्या ऐहीक जीवनास जे अतिशय संक्षिप्त होते, दीर्घ समजत राहीलेत जर त्या वेळेस त्यांनी आपल्या ऐहीक जीवनाची मरणोत्तर जीवनाशी तुलना करुन पाहीली असती तर त्यांनी आपले ऐहीक

जीवन फार संक्षिप्त जाणवले असते आणि आखिरत (मरणोत्तर जीवना) ला खरे जीवन समजून त्यासाठी त्यांनी तयारी केली असती. परंतु धोक्यात राहून त्यांनी ही संधी दवडली.

या ठिकाणी हा प्रश्न उद्‌भवतो की कब्र (आलमे बर्जख) मध्ये तर काफीरांनी दीर्घ काळा पावेतो ईश-शिक्षा भोगलेली असेल मग ते यास एक घटीकेची गोष्ट कसे समजतील ? तर खरे पाहता, बर्जख (मरणोत्तर जीवनाच्या प्रथम अवस्थे) मध्ये ते ज्या अवस्थेत राहतील ती अगदी निद्रे समान होय. सूरह यासीन मधील उल्लेखानुसार जेव्हा ते कियामतीच्या दिवशी उठतील तेव्हा म्हणतील,

مَنۢ بَعَثَنَا مِن مَّرۡقَدِنَا

''आमच्या शय्येवरुन कोणी आम्हास जागे केले?''

अर्थात ही वस्तुस्थिती आहे की निद्रावस्थेत माणसावर जे काही घडते ते सर्व, प्रथम तर त्याला स्मरणात राहात नाही, मग झोपेतून उठल्यानंतर त्याला असे जाणवते की आता एवढयात झोपलो व आताच उठलो. यास्तव जर काफीर त्या घटनांना विसरले असतील ज्या त्यांच्या आत्म्यावर कियामती पावेतो घडत राहील्या व त्यांना अशी जाणीव व्हावी की आम्ही घटका भर झोपूनु उठलो तर यात नवल करण्या सारखे काहीही नाही. बर्जख (मरणोत्तर अवस्थे) च्या या स्थिती-स्वरुपास समोर न राखल्याने लोक बर्जख च्या अजाबचा इन्कार करु लागतात. वास्तविक पाहता काफीरा करीता बर्जखचा अजाब (ईश-शिक्षा) कुरआनाने सिद्ध आहे. आणि हदीस वचनात याला 'कब्रचा अजाब' या अर्थाने घेतले गेले आहे. आणि याचा संबंध आत्म्याशी आहे. कारण शरीर नासून कुजून मातीत मिळते आणि कित्येक काफीरांच्या मृत शरीरांच्या कबरी बनतच नाहीत कारण त्यांना जाळले जाते. असे असले तरी कियामतीच्या दिवशी माणसाला सशरीर उठविले जाईल. अशा स्थितीत काफीर लोकांना अजाबची दु:खयातना पूर्णपूणे जाणवेल.

**अशा प्रकारे अल्लाह मोहर लावतो त्या लोकांच्या हृदयावर जे ज्ञाना पासून वंचित राहतात. तर सहनशीलता पाळा. नि:संशय अल्लाहचा वायदा सच्चा आहे आणि जे विश्वास बाळगत नाहीत अशा लोकांनी तुम्हास कदापि भारहीन जाणू नये. (अल-क़ुर्आन)**

५६. आणि ज्यांना ज्ञान व ईमान प्रदान केले गेले होते, ते म्हणतील की अल्लाहच्या लेखा (रेकॉर्ड) मध्ये तुम्ही उठविल्या जाणाऱ्या दिवसा (मोबदल्याच्या दिवसा) पावेतो राहीलात.[८९] तर हा उठविले जाण्याचा दिवस आहे. परंतु तुम्ही जाणत नव्हता.

وَقَالَ الَّذِينَ أُوتُوا الْعِلْمَ وَالْإِيمَانَ لَقَدْ لَبِثْتُمْ
فِي كِتَابِ اللَّهِ إِلَىٰ يَوْمِ الْبَعْثِ ۖ فَهَٰذَا يَوْمُ الْبَعْثِ
وَلَٰكِنَّكُمْ كُنتُمْ لَا تَعْلَمُونَ ﴿٥٦﴾

५७. त्या दिवशी अत्याचारी करीता त्यांची माफी निरर्थक ठरेल, आणि त्यांच्याकडून तौबा (क्षमा याचने) ची मागणी केली जाणार नाही.[९०]

فَيَوْمَئِذٍ لَّا يَنفَعُ الَّذِينَ ظَلَمُوا مَعْذِرَتُهُمْ وَلَا هُمْ
يُسْتَعْتَبُونَ ﴿٥٧﴾

५८. आम्ही या कुरआनात लोकां (च्या आकलना) करीता प्रत्येक प्रकारचे मजकूर निवेदिले आहेत आणि (हे पैगंबर !) मग तुम्ही एखादी निशाणी घेऊन याल, (तरी ही ) ज्यांनी सत्य विरोधाचे वर्तन अंगिकारले आहे, ते हेच म्हणतील की तुम्ही अगदी खोटारडे आहात.[९१]

وَلَقَدْ ضَرَبْنَا لِلنَّاسِ فِي هَٰذَا الْقُرْآنِ مِن كُلِّ مَثَلٍ ۚ وَلَئِن
جِئْتَهُم بِآيَةٍ لَّيَقُولَنَّ الَّذِينَ كَفَرُوا إِنْ أَنتُمْ
إِلَّا مُبْطِلُونَ ﴿٥٨﴾

५९. अशा प्रकारे अल्लाह मोहर लावतो त्या लोकांच्या हृदयावर जे ज्ञाना पासून वंचित राहतात.[९२]

كَذَٰلِكَ يَطْبَعُ اللَّهُ عَلَىٰ قُلُوبِ الَّذِينَ لَا يَعْلَمُونَ ﴿٥٩﴾

६०. तर सहनशीलता पाळा. नि:संशय अल्लाहचा वायदा सच्चा आहे आणि जे विश्वास बाळगत नाहीत अशा लोकांनी तुम्हास कदापि भारहीन जाणू नये.[९३]

فَاصْبِرْ إِنَّ وَعْدَ اللَّهِ حَقٌّ ۖ وَلَا يَسْتَخِفَّنَّكَ الَّذِينَ
لَا يُوقِنُونَ ﴿٦٠﴾

८९. म्हणजे तुम्ही मृत व कियामतीच्या दरम्यानची दीर्घ अवधि मरणोत्तर विश्वात घालविला आहे. हा काळ केवढा होता हे फक्त अल्लाहला माहीत आहे आणि अल्लाहच्या रेकॉर्ड मध्ये यासंबंधीची नोंद आहे.

९०. म्हणजे परीक्षेची वेळ निघून गेली असेल आणि तो मोबदला व शिक्षा प्राप्तीचा दिवस असेल. म्हणून ज्या लोकांनी आपल्या स्वत:वर अत्याचार करुन स्वत:ला शिर्क व कुफ्र च्या मार्गाला लावले होते त्यांची ना माफी स्विकारण्या योग्य असेल आणि ना त्यांना या गोष्टीची संधी लाभेल की त्यांनी तौबा (क्षमा याचना) करुन अल्लाह जवळ माफी मागावी. ही संधी जगातच होती जी त्यांनी दवडली.

९१. म्हणजे ज्यांना समजून घेण्याची इच्छा आहे त्यांच्यासाठी कुरआन पुरेसे आहे, परंतु जे आपल्या कुफ्र (सत्य-विरोधा) ला सोडू इच्छित नाही, त्यांनी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या करवी मोठयात मोठा अनुभत ईश-चमत्कार जरी पाहीला तरीही ते पैगंबराना खोटे ठरविण्यात कसलीही कसरबाकी ठेवणार नाहीत.

९२. म्हणजे जे लोक मार्गदर्शनाच्या ज्ञानाविषयी गोडी / अभिरुची बाळगत नाही व त्यापासून अधिकाधिक दूर राहू इच्छितात. ते हळू हळू सत्य- स्विकृतिचा गुण सोडू लागतात. आणि मग उपदेशाची कोणतीही गोष्ट यांच्या मनात शिरत नाही. या मानस शास्त्रीय कैफियतीस हृदयावर मोहर लावण्याच्या अर्थाने घेतले गेले आहे.

९३. हा पैगंबरांना व त्यांच्या माध्यमान्वये ईमान बाळगणाऱ्यांना उपदेश आहे की तुम्ही परिस्थिती प्रतिकूल आहे म्हणून त्रस्त होऊ नका, किंबहुना सहनशीलता पूर्वक सत्यावर अटळ रहा आणि पूर्ण हिंमतीने व दृढपणे आपल्या जबाबदाऱ्या पार पाडत रहा. यासाठी की आखिरतवर विश्वास न ठेवणाऱ्यांनी तुम्हाला. हलके फुलके समजून हे मत कायम करु नये की या लोकांची सहजगत्या मुस्कटदाबी केली जाऊ शकते. किंबहुना तुमची ही पात्रता त्या लोकांना स्पष्टत: कळून आली पाहीजे की हे मेणाहून मऊ नव्हेत तर वज्राहून कठोर आहेत.

# सूरह लुकमान

# ३१. सूरह लुकमान

**नाव :** आयत क्र. १२ मध्ये हजरत लुकमान यांना हिकमत (बुद्धि कौशल्य) प्रदान केला जाण्याचा उल्लेख आहे. तद्नुषंगे या सूरहचे नावं 'लुकमान' आहे.

**अवतरण काळ :** मक्की आहे आणि मजकूरांवरुन असे दिसून येते की सूरह अनकबूतच्या थोडा काळ आधी अवतरली असेल जेव्हा अनेकेश्वरवादी आपल्या संततीस अनेकेश्वरवादी धर्मावर कायम राहण्याकरीता विवश करीत होते.

**मध्यवर्ति कल्पना :** धर्म-संदर्भात माणसाने आपल्या वाड-वडीलांचे अनुसरण करण्याऐवजी आपल्या बुद्धि व अंतर्दृष्टिने काम घ्यावे; आणि त्या निशाण्यांपासून मार्गदर्शन प्राप्त करावे ज्या, अल्लाह एकमेव उपास्य असल्याचे प्रमाणित करतात अज्ञानाच्या भयाण अंध:कारात भटकण्याऐवजी ईश-संदेशाचा प्रकाश आत्मसात करावा जो त्याच्या जीवनास सुशोभित करणारा व त्याला यशाच्या शिखरा प्रत पोहचविणारा आहे.

**आयत रचना:** आयत क्र. १ ते ५ प्रास्ताविक स्वरुपाचा मजकूर आहे. ज्यात कुरआनाच्या या वैशिष्टयास प्रकट केले गेले आहे की हा बुद्धि कौशल्य युक्त ग्रंथ आहे, ज्याचा प्रभाव मान्य करणाऱ्यांचे जीवन सुशोभित होते आणि ते एकमेव अल्लाह चे सच्चे उपासक व आखिरत वर अटळ विश्वास ठेवणारे बनतात.

आयत क्र. ६ ते ११ मध्ये त्या लोकांना दुष्परिणती बाबत खबरदार केले गेले आहे. जे अल्लाह व त्याच्या धर्म-संदर्भात ज्ञानाशिवाय गोष्टी करतात आणि स्वत : ही मार्गभ्रष्ट होतात व इतरांनाहि मार्गभ्रष्ट करतात. या सोबतच ईमान बाळगणाऱ्यांना व आपले वर्तन उचित राखणाऱ्यांना चांगल्या परिणती विषयी शुभ समाचार दिला गेला आहे.

आयत क्र. १२ ते १९ मध्ये लुकमानच्या बुद्धिकौशल्य युक्त उपदेशाच्या व विद्वत्ता पूर्ण गोष्टींना सादर केले गेले आहे, ज्या, अल्लाह ने प्रदान केलेल्या बुद्धिकौशल्याच्या परिणामी त्यांच्या मुखातून निघाल्या. अर्थात ही तीच शिकवण होय जी कुरआन सादर करीत आहे.

आयत क्र. २० ते ३२ मध्ये त्या निशाण्यांकडे मार्गदर्शन केले गेले आहे ज्या द्वारे एकेश्वरवाद व आखिरतचे मार्ग उज्वल होतात.

आयत क्र. ३३. व ३४ समारोपाच्या आयती होत; ज्यात अल्लाह समोर हजर होण्याच्या दिवसा बाबत भय दाखविले गेले आहे आणि अल्लाह ज्ञानी व सर्वज्ञ असण्याच्या गुणविशेषास स्पष्ट केले गेले आहे. अशासाठी की आखिरत घडून येण्या संबंधी जी खबर तो देत आहे तिच्याविषयी विश्वास निर्माण व्हावा.

# ३१. सूरह लुकमान

سُورَةُ لُقْمَانَ

आयती - ३४

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بِسْمِ اللهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ

१. अलीफ. लाम. मीम.[१]

الٓمّٓ ﴿١﴾

२. या बुद्धिकौशल्य युक्त ग्रंथाच्या आयती आहेत.[२]

تِلْكَ اٰيٰتُ الْكِتٰبِ الْحَكِيْمِ ﴿٢﴾

३. मार्गदर्शन व ईश-कृपा सदाचारी लोकांकरीता.[३]

هُدًى وَّرَحْمَةً لِّلْمُحْسِنِيْنَ ﴿٣﴾

४. जे नमाज कायम करतात, जकात देतात आणि आखिरतवर विश्वास ठेवतात.[४]

الَّذِيْنَ يُقِيْمُوْنَ الصَّلٰوةَ وَيُؤْتُوْنَ الزَّكٰوةَ وَهُمْ بِالْاٰخِرَةِ هُمْ
يُوْقِنُوْنَ ﴿٤﴾

५. हेच लोक आपल्या पालन कर्त्या तर्फे मार्गदर्शनावर आहेत आणि हेच आहेत सफल होणारे.[५]

اُولٰٓئِكَ عَلٰى هُدًى مِّنْ رَّبِّهِمْ وَاُولٰٓئِكَ هُمُ الْمُفْلِحُوْنَ ﴿٥﴾

६. लोकांपैकी काही असे ही आहेत जे गाफील करणारी वाणी विकत घेतात.[६] या साठी की ज्ञाना शिवाय [७] अल्लाहच्या मार्गापासून (लोकांना) मार्गभ्रष्ट करावे व यांची (आयतींची) थट्टा उडवावी अशा लोकांकरीता अपमान जनक ईश-शिक्षा (अजाब) आहे.

وَمِنَ النَّاسِ مَنْ يَّشْتَرِيْ لَهْوَ الْحَدِيْثِ لِيُضِلَّ عَنْ سَبِيْلِ
اللهِ بِغَيْرِ عِلْمٍ وَّيَتَّخِذَهَا هُزُوًا اُولٰٓئِكَ لَهُمْ عَذَابٌ مُّهِيْنٌ ﴿٦﴾

७. अशा माणसाला जेव्हा आमच्या आयती ऐकविल्या जातात, तेव्हा तो गर्वासह अशा प्रकारे तोंड फिरवितो की जणू त्याने यांना ऐकलेच नाही. जणू त्याच्या कानांत बधिरता आहे. [८] तर त्याला दु:खादायक अजाब (शिक्षे) ची खुशखबर द्या.

وَاِذَا تُتْلٰى عَلَيْهِ اٰيٰتُنَا وَلّٰى مُسْتَكْبِرًا كَاَنْ لَّمْ يَسْمَعْهَا كَاَنَّ
فِيْٓ اُذُنَيْهِ وَقْرًا فَبَشِّرْهُ بِعَذَابٍ اَلِيْمٍ ﴿٧﴾

१. सांकेतिक अक्षरांच्या स्पष्टीकरणा करीता पहा सूरह बकरा टीप क्र. १ व सूरह यूनुस टीप क्र. १

या सूरह मध्ये **''अलीफ''** चा संकेत आयतीकडे आहे, ज्यांचा उल्लेख आयत क्र. २, ७, ३१ व ३२ मध्ये केला गेला आहे.

**''लाम''** चा संकेत लुकमान कडे आहे ज्याचा उल्लेख आयत ११ व १३ मध्ये केला गेला आहे

आणि **''मीम''** चा इशारा 'सत्कर्मी' लोकांकडे आहे ज्याचा उल्लेख आयत क्र. ३ मध्ये केला गेलो आहे.

२. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह यूनुस टीप क्र. २.

३. सदाचारी लोकांशी अभिप्रेत ते लोक होत जे अल्लाहच्या आदेशांवर ईमान राखतात व त्या आदेशांचे पालन ही करतात. किंबहुना गुण विशेषा सह आपल्या जबाबदारींना पार पाडतात व आपल्या आचरणात चांगुलपणा आणतात.

४. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह बकरा. टीप क्र. १०

५. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह बकरा टीप क्र. ११ व १२.

६.**''लह्‌वल हदीस''** (गाफील करणाऱ्या वाणीशी अभिप्रेत) जसे शब्द शैली वरुन स्पष्ट आहे. ईश्वर व आखिरत पासून गाफील करणारा आणि त्याच्या निशाण्या व त्याने अवतरीत केलेल्या आयतींपासून लक्ष हटविणारी वाणी होय व तिला विकत घेण्याचा अर्थ ती कबूल करणे व तिचा अंगिकार करणे,यास्तव सूरह बकरा मध्ये फर्माविले गेले की-

أُولٰئِكَ الَّذِيْنَ اشْتَرَوُا الضَّلٰلَةَ بِالْهُدٰى فَمَا رَبِحَتْ

تِجَارَتُهُمْ وَمَا كَانُوْا مُهْتَدِيْنَ۔ (سورۃ بقرہ:١٦)

'हेच लोक होत ज्यांनी मार्गदर्शनाच्या मोबदल्यात मार्गभ्रष्टता विकत घेतली तर ना त्यांचा सौदा फायदेशीर झाला व ना ते मार्गदर्शन प्राप्त करु शकले.' (सूरह बकरा : १६)

म्हणजे मार्गदर्शनाचा त्यांनी त्याग केला व त्याच्या ऐवजी मार्गभ्रष्टता पत्करली कुरआनाच्या तुलनेत त्यांनी ज्या गोष्टीला आपला उद्योग व लोकांच्या मार्गभ्रष्टतेची सामुग्री बनविले होते, ती म्हणजे ऐहीक भोग विलासावर प्रवृत्त करणारी व इष्क-प्रेमाची आग भडकविणारी शायरी (काव्य) اَلشُّعَرَاءُ يَتَّبِعُهُمُ الْغَاوٗنَ ''आणि कवींच अनुसरण तर मार्गभ्रष्ट लोक करतात.''(सूरह अश्शोअरा - २२४) निरर्भक कथा कथन سٰمِرًا تَهْجُرُوْنَ ''कथा-कथनासाठी मनोरंजन बनवून वायाफळ बडबड करीत.'' (सूरह मोमिनून ६७) आणि गाणे जे धंदेवाईक दासी गात असत गाफील करणाऱ्या वाणीत या **''लह्‌वल हदीस''**तिन्ही गोष्टींचा समावेश होतो. कारण या सर्व ईश्वर व आखिरत पासून गाफील करणाऱ्या गोष्टी आहेत. आणि कुरआन व गाणे तर अगदी एकामेका विरुद्ध असणाऱ्या गोष्टी आहेत. यास्तव ज्या लोकांना गाण्याचे वेड असते त्यांना कुरआन ऐकण्या विषयी स्वारस्य नसते. वस्तुत: कुरआनात एवढा गोडवा आहे की त्याचे कोणतेही उदाहरण दिले जाऊ शकत नाही; व त्याच्या श्रवणाने अशी कैफीयत निर्माण होते की आत्मा उंचीकडे धाव घेऊ लागतो मात्र या लज्जती ची गोडी त्यांनाच कळते जे कुरआनाशी तन्मयता बाळगतात.

सर्वसामान्य भाष्यकारांनी गाफील करणाऱ्या गोष्टींशी **''लह्‌वल हदीस''**अभिप्रेत गाणेच घेतले आहे. आणि हजरत अबदुल्लाह इब्ने मसऊद रज़ियल्लाहु अन्हु तर शपथ पूर्वक सांगतात की यास **ग़िना** अभिप्रेत गाणेच आहे. आणि हजरत इब्ने अब्बास फर्मावितात الغناء واشباهه (तफसीर तबरी खंड-२१ पृष्ठ ३९-४०) **''लह्‌वल हदीस''** गाफील करणाऱ्या गोष्टी म्हणजे गाणे व तत्सम गोष्टी होत. या खेरीज प्रेषित सहवासातील अनुयायी व त्यांच्या सहवासातील अनुयायींनी ही हेच स्पष्टीकरण उल्लेखिले आहे.

आजच्या काळात तर नाच-गाण्यांनी साथीच्या रोगाचे स्वरुप धारण केले आहे कोठे लज्जा संकोचा बाबत इस्लामची ही शिकवण की स्त्रीयांनी लटके पणाने पुरुषांशी बोलू नये (فَلَا تَخْضَعْنَ بِالْقَوْلِ) ''अणि पुरषों असाल तर कोमल स्वराने बोलत जाऊ नका.'' सूरह : अहजाब : ३२) आणि ना अशा प्रकारे चालाचे की त्यांच्या दागिन्यांची झंकार लोकांना ऐकू यावी (وَلَا يَضْرِبْنَ بِاَرْجُلِهِنَّ لِيُعْلَمَ مَا يُخْفِيْنَ مِنْ زِيْنَتِهِنَّ) ''आणि आपल्या पायांना (जमीनीवर) आपटत चालू नये, की आपल जो शृगांर त्यांनी लपवन ठेवला आहे तो कळून यावा.''सूरह नूर : ३१) आणि कोठे स्त्रीयांचे संपूर्ण सौंदर्या निशी पुरुषां समोर येऊन नाच गाणे करणे आणि पुरुषांचे नाचरंगा सह अश्लिल व बिभित्स गीत गाणे ! मग आधुनिक प्रसार-साधनांनी, सिनेमा, रेडीओ, टेलीव्हिजन, व्हिडीओ इत्यादींनी तर लोकांना वाईटरित्या पछाडले आहे आणि असे वातावरण बनले गेले आहे की प्रत्येक घर सिनेमा घर आहे, परिणामी अगदी लहान लहान मुलांच्या तोंडी सिनेमाची गाणी आहेत या सर्व गोष्टींचा परिणाम असा झाला की लाज संकोच लयाला गेली आणि कसलीही लज्जा बाकी न राहील्यामुळे व्यभिचाराची लागण सर्वत्र पसरली व शील सुरक्षित राहीले नाही. याचे दुसरे नुकसान असे की गांभीर्य व प्रतिष्ठा माणसातून लोप पावली व तो बिभित्स व हिडीस कृत्ये करु लागला. या गोष्टीचे तिसरे नुकसान असे की जबाबदारीची जाणीव वाईटरित्या प्रभावित झाली व तिची जागा बेपर्वा वर्तनाने घेतली आणि सर्वात मोठे नुकसान म्हणजे माणूस आपल्या जीवन-उद्दिष्टा पासूनच गाफील झाला. आता तो ना ईश-वाणी ऐकण्यास व समजण्यास तयार आहे आणि ना बोध उपदेशाची

एखादी गोष्ट. तो वाईटरित्या ऐहीक भक्तित मग्न झाला आहे. वस्तुस्थिती अशी की गाण्याचा कैफ नशेच्या कैफाहून अधिक आहे. लोकांनी कुरआनास मन:पूर्वक ऐकले असते तर भानावर आले असते.

७. जी वाणी ईश्वर व आखिरत पासून गाफील करणारी असावी तिचा सत्य-ज्ञानाशी कोणताही संबंध असू शकत नाही ती तर अज्ञान व असभ्यतेचीच उपज असू शकते.

८. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह अनआम टीप क्र. ४४.

**त्याने आकाशांना खांबाशिवाय निर्माण केले जसे की तुम्ही पाहता त्याने जमीनीत पहाड रोवले, या साठी की तिने तुम्हासह कलंडून न जावे व तिच्यावर प्रत्येक प्रकारची जनावरे पसरविलीत आणि आकाशातून पाणी वर्षाविले आणि जमीनीत प्रत्येक प्रकारची उत्कृष्ट वस्तू उगवली.*(अल-क़ुर्आन)***

८. परंतु ज्या लोकांनी ईमान बाळगले व ज्यांनी सत्कर्मे केली, त्यांच्या करीता देणग्यांनी युक्त अशा बागा असतील.[१]

إِنَّ الَّذِينَ آمَنُوا وَعَمِلُوا الصَّالِحَاتِ لَهُمْ جَنَّاتُ النَّعِيمِ ﴿٨﴾

९. ज्यात ते सदैव राहतील. हा अल्लाहचा पक्का वायदा आहे आणि तो वर्चस्वशाली आहे, बुद्धिकौशल्य बाळगणारा.

خَالِدِينَ فِيهَا وَعْدَ اللَّهِ حَقًّا وَهُوَ الْعَزِيزُ الْحَكِيمُ ﴿٩﴾

१०. त्याने आकाशांना खांबाशिवाय निर्माण केले जसे की तुम्ही पाहता[१०] त्याने जमीनीत पहाड रोवले, या साठी की तिने तुम्हासह कलंडून न जावे[११] व तिच्यावर प्रत्येक प्रकारची जनावरे पसरविलीत आणि आकाशातून पाणी वर्षाविले आणि जमीनीत प्रत्येक प्रकारची उत्कृष्ट वस्तू उगवली.

خَلَقَ السَّمَاوَاتِ بِغَيْرِ عَمَدٍ تَرَوْنَهَا وَأَلْقَىٰ فِي الْأَرْضِ رَوَاسِيَ أَنْ تَمِيدَ بِكُمْ وَبَثَّ فِيهَا مِنْ كُلِّ دَابَّةٍ وَأَنْزَلْنَا مِنَ السَّمَاءِ مَاءً فَأَنْبَتْنَا فِيهَا مِنْ كُلِّ زَوْجٍ كَرِيمٍ ﴿١٠﴾

११. ही आहे अल्लाहची निर्मिती. आता मला दाखवा की यांनी काय निर्माण केले आहे जे त्याच्या खेरीज (उपास्य बनविले गेले) आहे? वास्तविक पाहता हे अत्याचारी उघड मार्गभ्रष्टतेत पडले आहेत.

هَٰذَا خَلْقُ اللَّهِ فَأَرُونِي مَاذَا خَلَقَ الَّذِينَ مِنْ دُونِهِ بَلِ الظَّالِمُونَ فِي ضَلَالٍ مُبِينٍ ﴿١١﴾

१२. आम्ही लुकमानला बुद्धि कौशल्य प्रदान केले होते[१२] की अल्लाहशी कृतज्ञता राखा[१३] आणि जो कृतज्ञता दर्शवितो, त्याची कृतज्ञता त्याच्या स्वत:करीताच लाभदायक आहे आणि जो कृतघ्नता दर्शवितो तर अल्लाह नि:स्पृह आहे, गुणविशेष बाळगणारा.[१४]

وَلَقَدْ آتَيْنَا لُقْمَانَ الْحِكْمَةَ أَنِ اشْكُرْ لِلَّهِ وَمَنْ يَشْكُرْ فَإِنَّمَا يَشْكُرُ لِنَفْسِهِ وَمَنْ كَفَرَ فَإِنَّ اللَّهَ غَنِيٌّ حَمِيدٌ ﴿١٢﴾

१३. जेव्हा लुकमान ने आपल्या मुलास उपदेश करतांना म्हटले, हे माझ्या पुत्रा ! अल्लाहचा सहभागी ठरवू नकोस.नि:संशय शिर्क (अनेकश्वर भक्ति) फार मोठा अत्याचार आहे.[१५]

وَإِذْ قَالَ لُقْمَانُ لِابْنِهِ وَهُوَ يَعِظُهُ يَا بُنَيَّ لَا تُشْرِكْ بِاللَّهِ إِنَّ الشِّرْكَ لَظُلْمٌ عَظِيمٌ ﴿١٣﴾

९. संकेत या गोष्टीकडे आहे की ज्यांनी आपली वेळ नाच-गाणे ढोल वाजे ऐकण्यात व कुरापतीत वाया घालविण्या ऐवजी ईमानाची दौलत एकत्र करण्यात व स्वत:ला सत्कर्मानी सुशोभित करण्यात घालविली त्यांना आखिरत मध्ये अशा बागा प्रदान केल्या जातील की जिभे ईश-देणग्यांनी ते संपन्न होतील.

१०. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह रअद टीप क्र. ५

११. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह नहल टीप क्र. २६

१२. लुकमान अरब देशाचे थोर व्यक्तिमत्व होय जे हकीम व विद्वान म्हणून प्रसिद्ध होते. यांचा उल्लेख अरबदेशीय कवीच्या काव्यात आढळून येतो परंतु ज्या अर्थी अरब लोकांमध्ये इतिहास लेखनाची प्रथा नव्हती म्हणून लुकमान चा वृत्तांत अंकित होऊ शकला नाही. राहीलीत कथने, तर यात परस्परविरोधी गोष्टी निवेदिल्या गेल्या आहेत. म्हणून आम्ही कुरआनाच्या निवेदनावरच समाधान बाळगले पाहीजे. कुरआनाच्या निवेदनावरुन स्पष्ट दिसते की-

१) लुकमान अल्लाहचे कृतज्ञशील दास होते.

२) अल्लाहने त्यांना बुद्धि कौशल्य व विद्वत्ता प्रदान केली होती.

३) त्यांच्या नजरेत शिर्क (अनेकेश्वरवाद) सर्वात मोठा अत्याचार होता.

४) त्यांना अल्लाहच्या कमालीच्या ज्ञानावर व जबरदस्त सामर्थ्यावर विश्वास होता. तसेच आचरणाच्या मोबदल्यावरही त्यांचा विश्वास होता.

५) त्यांनी अपल्या मुलाला जो उपदेश केला होता तो अतिशय मौल्यवान उपदेश होता आणि खरे पाहता ही अरब लोकांकरीता मोठी किमती सामुग्री होती आणि आता कुरआनने या प्रिय सामुग्रीचा लाभ सर्वांसाठी खुला केला आहे.

६) लुकमानच्या उपदेशांमध्ये नमाज कायम करण्याची ताकीद ही सामील आहे, जे या गोष्टीचे स्पष्ट प्रमाण होय की लुकमान चा हा उपदेश पैगंबरांच्या शिकवणीचाच अंश होता. बुद्धिचा परिणाम म्हणून नव्हे. त्यांना सर्वश्रेष्ठ अल्लाहने बुद्धिकौशल्य प्रदान केले होते म्हणून त्यांनी पैगंबरीय शिकवणीस आत्मसात केले व प्रभावकारक शैलीत निवेदन ही केले.

मूळ शब्द 'हिकमत' यास अभिप्रेत ते आकलन होय जे श्रद्धा व आचरणा करीता सत्य व न्यायास आधार बनविते हजरत लुकमान यांना हे आकलन प्रदान केले गेले होते म्हणून त्यांच्या मुखातून या विद्वत्तापूर्ण गोष्टी निघाल्या. या द्वारे त्या अरब लोकांना ज्यांना कुरआन ने सर्वप्रथम संबोधिले, हे समाजाविण्याचा हेतु होता की तुमच्या पूर्वजा मध्ये लुकमान सारखी विद्वान व्यक्ति होती. ज्यास तुम्ही स्वत:मान्य करता. त्यांनी ही तिच शिकवण दिली जी आज कुरआन देत आहे. मग तुम्ही आपल्या या सदाचारी पूर्वजाचे अनुसरण का म्हणून करीत नाही व आपल्या मार्गभ्रष्ट वाड-वडीलांचे अनुसरण करण्याबद्दल का हट्ट बाळगतात?

१३. म्हणजे सर्वात मोठी 'हिकमत' (बुद्धिमत्ता) हीच की माणसाने अल्लाहशी कृतज्ञशील व्हावे कृतज्ञता ही की माणसाने अल्लाहच्या देणग्यांना व त्याच्या उपकारंना मनापासून मानावे,मुखाने त्याची कबुली द्यावी व आपले वर्तन त्यानुसार बनवावे. तसेच ज्ञान, आकलन व बुद्धिमत्ता फार मोठे मांगल्य आहे. आणि ज्याला हे प्राप्त झाले त्याने याची पूरेपूर कदर केली पाहीजे.

१४. म्हणजे एखाद्याच्या कृतज्ञशील बनल्याने अल्लाहला कसलाही लाभ होत नाही आणि ना त्याच्याशी कृतघ्नता केल्याने त्याचे काही नुकसान होते. कारण तो ना एखाद्या गोष्टीचा गरजवंत आहे आणि ना त्याचे प्रशंसनीय असणे तुमच्या प्रशंसा करण्यावर अवलंबून आहे,किंबहुना तो स्वयंस्तुत्य आहे गुणविशेषांनी युक्त आहे यास्तव प्रशंसनीय आहे, मग कोणी त्याची प्रशंसा करो किंवा ना करो मात्र जो मनुष्य त्यच्याशी कृतज्ञता दर्शवितो व त्याची प्रशंसा करतो तो आपले कर्तव्यच पार पाडतो आणि याआधारे तो आपल्याच यशाची उपाययोजना करतो आणि जो कृतघ्नता दर्शवितो तो आपण कर्तव्य शून्य असल्याचे प्रमाण देतो व स्वत:ला विनाश मार्गाला लावतो.

१५. शिर्क फार मोठा अत्याचार आहे कारण हा त्या न्यायाच्या विरुद्ध आहे ज्यावर जमीन व आकाश प्रस्थापित आहेत. तसेच ही अल्लाहच्या संदर्भात त्याचा हक्क हिरावून घेणारी सर्वात मोठी गोष्ट होय. कारण इबादत (उपासना) अल्लाहचाच हक्क आहे. उलट शिर्क करणारा अल्लाह खेरीजच्या उपास्यांनाही यास पात्र ठरवितो.या खेरीज शिर्क करणारा मनुष्य घोर अपराध करुन आपल्या स्वत:वर जबरदस्त अत्याचार करतो. अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह अनआम टीप क्र. १४७.

लुकमान यांनी आपल्या मुलास शिर्क पासून सुरक्षित राहण्याची जी ताकीद केली त्यावरुन ही कल्पना करणे योग्य नव्हे की त्यांचा मुलगा मुश्रिक (अनेकेश्वरवादी) होता. कारण पुढे जो उपदेश निवेदिला गेला आहे ज्यात नमाज कायम करण्याची ताकीद ही सामील आहे, ती या गोष्टीस प्रमाणित करते की तो मुस्लिम होता आणि हजरत लुकमान यांनी त्याच्या अंगी उचित धार्मिक सुज्ञता निर्माण करण्यासाठी व त्याच्या श्रद्धेला परिपक्व करण्यासाठी शिर्क पासून सुरक्षित राहण्याची ताकीद केली. यावरुन हा धडा मिळतो की एखाद्या पित्याने आपल्या मुलास सर्वप्रथम अशी शिकवण द्यावी जी त्याला अनेकेश्वरवादापासून दूर ठेवणारी आणि एकेश्वरवादी श्रद्धेस त्याच्या बुद्धिवर अंकीत करणारी असावी.

१४. आणि आम्ही [१६] माणसाला त्याच्या माता पित्या संदर्भात ताकीद केली. त्याच्या आई ने यातनांवर यातना सहन करुन त्याला आपल्या उदरात ठेवले आणि दोन वर्षे त्याचे दूध सोडविण्यात लागले. म्हणून माझे उपकार जाण व आपल्या वाडवडीलांचे [१७] शेवटी माझ्याच कडे परतावयाचे आहे.

وَوَصَّيْنَا الْإِنْسَانَ بِوَالِدَيْهِ ۚ حَمَلَتْهُ أُمُّهُ وَهْنًا عَلَىٰ وَهْنٍ
وَفِصَالُهُ فِي عَامَيْنِ أَنِ اشْكُرْ لِي وَلِوَالِدَيْكَ إِلَيَّ الْمَصِيرُ ﴿١٤﴾

१५. परंतु जर ते तुझ्यावर जोर टाकतील की तू एखाद्यास माझा सहभागी ठरव, ज्याचे तुला काहीच ज्ञान नाही [१८] तर यांचे म्हणणे मानू नकोस [१९] आणि जगात यांच्याशी चांगला व्यवहार कर. [२०] मग माझ्याच कडे तुम्हाला परतायचे आहे. त्यावेळी मी तुम्हास दाखवीन की तुम्ही काय करीत राहीलात.

وَإِنْ جَاهَدَاكَ عَلَىٰ أَنْ تُشْرِكَ بِي مَا لَيْسَ لَكَ بِهِ عِلْمٌ فَلَا
تُطِعْهُمَا وَصَاحِبْهُمَا فِي الدُّنْيَا مَعْرُوفًا ۖ وَاتَّبِعْ سَبِيلَ مَنْ
أَنَابَ إِلَيَّ ۚ ثُمَّ إِلَيَّ مَرْجِعُكُمْ فَأُنَبِّئُكُمْ بِمَا كُنْتُمْ تَعْمَلُونَ ﴿١٥﴾

१६. (आणि लुकमान म्हणाला) हे माझ्या पुत्रा ! एखादी वस्तू राई च्या दाण्या इतकी ही असेल आणि जर ती एखाद्या खडकात किंवा आकाशात अथवा जमीनीत कोठे लपलेली असेल तर अल्लाह तिला काढून आणील. तो अतिशय सूक्ष्मदर्शी व जाणकार आहे.[२२]

يَا بُنَيَّ إِنَّهَا إِنْ تَكُ مِثْقَالَ حَبَّةٍ مِنْ خَرْدَلٍ فَتَكُنْ
فِي صَخْرَةٍ أَوْ فِي السَّمَاوَاتِ أَوْ فِي الْأَرْضِ يَأْتِ بِهَا
اللَّهُ ۚ إِنَّ اللَّهَ لَطِيفٌ خَبِيرٌ ﴿١٦﴾

१७. हे माझ्या पुत्रा! नमाज कायम कर;[२३] भलेपणाचा आदेश दे, दुष्कर्मा पासून रोख [२४] आणि जे संकट येईल त्यावर सहनशीलता पाळ. [२५] ही धैर्याची कामे होत.[२६]

يَا بُنَيَّ أَقِمِ الصَّلَاةَ وَأْمُرْ بِالْمَعْرُوفِ وَانْهَ عَنِ الْمُنْكَرِ
وَاصْبِرْ عَلَىٰ مَا أَصَابَكَ ۖ إِنَّ ذَٰلِكَ مِنْ عَزْمِ الْأُمُورِ ﴿١٧﴾

१८. आणि लोकांची उपेक्षा करु नकोस [२७] आणि ना जमीनीवर अकडून चालत जा [२८] अल्लाह कोणत्याही खुद पसंद (आत्म प्रेमी)[२९] अहंकार करणाऱ्यास [३०] पसंत करीत नाही.

وَلَا تُصَعِّرْ خَدَّكَ لِلنَّاسِ وَلَا تَمْشِ فِي الْأَرْضِ مَرَحًا ۖ إِنَّ
اللَّهَ لَا يُحِبُّ كُلَّ مُخْتَالٍ فَخُورٍ ﴿١٨﴾

१९. आपल्या चालण्यात समतोल अंगिकार [३१] आणि आपला स्वर थोडा खालचा राख [३२] सर्वाधिक वाईट स्वर गाढवाचा स्वर होय.[३३]

وَاقْصِدْ فِي مَشْيِكَ وَاغْضُضْ مِنْ صَوْتِكَ ۚ إِنَّ أَنْكَرَ الْأَصْوَاتِ
لَصَوْتُ الْحَمِيرِ ﴿١٩﴾

१६. या आणि यानंतरच्या आयतीचा मजकूर अल्लाहचे स्वत:चे कथन आहे व लुकमान यांच्या निवेदनात वृद्धी म्हणून आहे. आपल्या मुलाला उपदेश करतांना त्यांना हे योग्य वाटले नसेल की पित्याने स्वत: आपल्या पुत्रास आपल्याशी चांगला व्यवहार करण्याचा उपदेश करावा, परंतु ज्या अर्थी एक महत्वपूर्ण गोष्ट त्यांच्या उपदेशात समाविष्ट व्हायची राहीली म्हणून सर्वश्रेष्ठ अल्लाहने स्वत: निवेदन करुन ही जाणीव पूर्ण केली.

१७. आई ज्या अर्थी यातना वर यातना झेलते म्हणून सद्व्यवहारास ती सर्वात जास्त पात्र आहे. हदीस वचनातील उल्लेखानुसार-

جاءَ رجلٌ الی رسولِ اللّٰہِ صلی اللہ علیہ وآلہٖ وسلم فقال: یَا رَسُولَ اللّٰہِ مَنْ اَحَقُّ بِحُسنِ صَحَابَتِی ؟ قَالَ اُمُّکَ ، قَالَ ثُمَّ مَنْ؟ قَالَ اُمُّک قَالَ ثم من؟ قَالَ اُمُّکَ قَالَ ثُمَّ مَنْ؟ قَالَ ثُمَّ اَبُوکَ۔ (صحیح البخاری کتاب الادب)

"एक मनुष्य पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या सेवेत हजर झाला व त्याने विनविले, हे अल्लाहचे पैगंबर ! माझ्या सदव्यवहारास सर्वाधिक पात्र कोण आहे' फर्माविले, तुमची आई-त्याने विचारले नंतर कोण?फर्माविले तुमची आई-त्याने विचारले नंतर कोण? फर्माविले तुमची आई-त्याने विचारले नंतर कोण? फर्माविले, तुमचा पिता."
(सहीहुल बुखारी किताबुल अदब)

आयतीत माता पित्याशी कृतज्ञता राखण्याची ताकीद केली गेली आहे. जेव्हा इतर ठिकाणी सद्व्यवहाराची ताकीद केली गेली आहे. यावरुन हे स्पष्ट झाले की माता पित्याशी सदव्यवहार या प्रकारे अपेक्षित आहे की त्यांच्याशी भावनात्मक संबंध ही असावा व मुखाने त्यांच्या करीता मांगल्यपूर्ण वचनेच निघावीत. परंतु अल्लाहशी राखली जाणारी कृतज्ञता मातापित्यांशी राखल्या जाणाऱ्या कृतज्ञतेपेक्षा श्रेष्ठतम आहे. जसे आयती वरून स्पष्ट आहे.

१८. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह अन्कबूत टीप क्र. १०.

१९. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह अन्कबूत टीप क्र. ११

२०. या ठिकाणी 'जगात' शी अभिप्रेत उचित बाबींचे ते वर्तुळ होय ज्यात शरीअत ने व्यवहार करण्याचे स्वातंत्र्य दिले आहे. जर आई वडील मुस्लिमेतर वा काफीर असतील तर त्यांच्याशी ही असा व्यवहार पार पाडला जाऊ शकतो. मात्र या अटीवर की असे करतांना शरीअतच्या एखाद्या आदेशाचे उल्लंघन करणे भाग न पडावे.

२१. म्हणजे धर्म संदर्भात अनुसरण आई-वडीलांचे करावयाचे नाही की त्यांचा जो काही धर्म असेल मुलाने त्याच धर्माचे अनुसरण करावे. किंबहुना धर्माची वास्तविकता अल्लाहकडे रुजू करणे होय. यास्तव अशाच लोकांच्या मार्गाचे अनुसरण केले पाहिजे. ज्यांनी अल्लाहकडे रुजू केले होते अर्थात तो मार्ग आहे पैगंबरांचा मार्ग,

२२. अर्थात अल्लाह एवढा सुक्ष्मदर्शी व जाणकार आहे की जर मोहरी (राई) च्या दाण्या एवढीही एखादी वस्तू एखाद्या खडकाखाली किंवा आकाश व जमीनीत कोठे लपलेली असेल तरी ती अल्लाहच्या नजरेत आहे तो जेव्हा इच्छिल तिला बाहेर काढील आणि जेव्हा त्याच्या ज्ञान व सामर्थ्य पासून कोणतीही वस्तू बाहेर नाही तर माणसाचे अगदी लहानात लहान कर्म देखील त्याच्यापासून लपून राहू शकत नाही आणि कियामतीच्या दिवशी तो निश्चितच ते कर्म आणून हजर करील. सूरह जिलजाल मध्ये फमाविले गेले आहे की-

فَمَنْ يَّعْمَلْ مِثْقَالَ ذَرَّةٍ خَيْرًا يَّرَهٗ وَمَنْ يَّعْمَلْ مِثْقَالَ ذَرَّةٍ شَرًّا يَّرَهٗ۔ (زلزال:۷۔۸)

"ज्याने कणा इतकी भलाई (सत्कर्म) केली असेल तिला तो पाहील व ज्याने कणा इतकी बुराई (दुष्कर्म) केली असेल. तो तिला ही पाहील."
(जिलजाल: ७-८)

२३. आम्ही वर लिहिल्याप्रमाणे नमाज कायम करणे पैगंबरीय शिकवणी पैकी आहे. हजरत लुकमान यांच्या बुद्धिकौशल्य युक्त गोष्टी पैगंबरीय शिकवणीचाच अंश होता म्हणून नमाज कायम करण्याची ताकीद ही त्यात सामील होती.

२४. तात्पर्य भलेपणाचा आदेश देणे व वाईट गोष्टी पासून रोखणे ही प्रत्येक व्यक्तिची जबाबदारी आहे. केवळ धर्म-पंडीतांचीच नव्हे. राहीला या कर्तव्य पूर्तीचा मार्ग तर याचा संबंध माणसाच्या आपल्या क्षमतेशी, गुणवत्तेशी व परिस्थितीशी आहे.

२५. जो मनुष्य सत्कमांना पसरविण्यास व वाईट गोष्टींना मिटविण्या करीता उठून उभा राहील. त्याला विरोधाला तोंड निश्चित द्यावे लागेल कारण लोकांची ही प्रवृत्ती असते की सर्व सामान्यत: ते सुधारणा स्विकारण्यास सहजपणे तयार होत नाही व सुधारणेचा प्रयत्न करणाऱ्यास दु:ख यातना पोहचवितात. म्हणूनच या मार्गावर पदोपदी संयम व सहनशीलतेची गरज असते.

२६. अर्थात हे काम कोठे कठीण आहे, म्हणून हे पार पाडण्यासाठी धैर्याची गरज आहे. जर माणसाच्या अंगी धैर्य असेल तर तो नमरुदच्या आगीत ही निर्धास्तपणे उडी घेतो

आणि जर धैर्य नसेल तर मामुली आशंके पायी सत्य-वचन बोलण्याची हिम्मत करत नाही. माणसाचा दृढ संकल्प लोह-शृंखलानाही तोडून टाकतो आणि त्याचे खचलेले धैर्य त्याला लोह-श्रंखला मध्ये जखडून टाकते.

२७. लोकांशी उपेक्षा पूर्ण वर्तन हे गर्विष्ठपणाचे लक्षण होय. माणसाच्या अंगी जेव्हा आपण फार मोठे असल्याची जाणीव निर्माण होते तेव्हा तो इतरांना कस्पटा समान लेखतो आणि हे फार मोठे दुर्वतन आहे.

२८. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह बनी इस्राईल टीप क्र. ५०.

२९. मूळ शब्द 'मुखताल' याचा अर्थ गर्विष्ठ व खुदपसंदी धनसम्पत्ति, सत्ता, नेतृत्व, ज्ञान व नैपुण्य इत्यादीमुळे निर्माण होते. मग मनुष्य गर्विष्ठपणे वागू लागतो, येथपावेतो की त्याच्या चालण्या बोलणत्यातही गर्विष्ठपणा दिसू लागतो. यास्तव हदीस वचनात गर्विष्ठ पणे कपडे रेंगाळत चालण्याबद्दल सक्त तंबी दिली गेली आहे-

مَنْ جَرَّ ثَوْبَهٗ مَخيلةً لَمْ يَنْظُرِاللّٰهِ اِلَيْهِ يَوْمَ الْقِيٰمَةِ۔ (صحیح البخاری کتاب اللباس)

'जो गर्विष्ठ पणाने आपले कपडे जमीनीवर रेंगाळत चालेल, अल्लाह कियामतीच्या दिवशी त्याच्याकडे पाहणार सुद्धा नाही' (सहीहुल बुखारी, किताबुल लिबास)

ही राजे महाराजे व घमेण्ड करणाऱ्यांची पद्धत आहे की गाऊन वगैरे जमीनीवर रेंगळत चालावे. जर पायजमा, पँट वगैरे टखन्याच्या खाली असेल तर ते ही माणसाच्या अंगी 'घमेंड' निर्माण करते. म्हणून शरीअत ने ही मर्यादा निर्धारीत केली आहे. कपडे पायाच्या हाडा पर्यंतच असावेत त्याच्या खाली नसावेत. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी फर्माविले-

مَااَسْفَلَ مِنَ الْكَعْبَيْنِ مِنَ الْاِزَارِ فَفِى النَّارِ۔
(مشکوٰۃ کتاب اللباس بروایۃ البخاری)

'तहबंद (लुंगी) चा जो हिस्सा पायाच्या हाडाखाली असेल तर तो आगीत राहील' (मिश्कात किताबुल लिबास बरिवायतुल बुखारी)

यावरून हे मार्गदर्शन लाभते की माणसाने असा पोषाख घालू नये ज्यावरुन घमेंड दिसावी.

३०. ''फ़ख़ूर'' अहंकार करणारा तो, जो आपले, मोठेपणा दुसऱ्यांवर जाहीर करतो. जे लोक हलक्या प्रतीचे असतात तेच आपले कारनामे इतरांसमोर गात बसतात यासाठी की दाद मिळवावी ही एक घाणेरडी सवय आहे जी अल्लाहला मुळीच पसंत नाही.

३१. चालण्यात समतोलता अंगिकारण्याचा अर्थ असा की चालणे प्रतिष्ठापूर्ण असावे. माणसाने ना धीमे चालण्याची प्रदर्शन-शैली अंगिकारावी आणि ना अशी द्रुत गती की ज्यामुळे असभ्यपणा दिसून यावा. हदीस वचनात ही नमाज करीता धावत जाण्यास मनाई केली गेली आहे. जेणेकरुन असभ्यपणा जाहीर न व्हावा.

اِذَاسَمِعْتُمُ الْاَقَامَةَ فَا مْشُوْا اِلَى الصَّلٰوةِ وَعَلَيْكُمُ السَّكِيْنَةَ وَالْوَقَارَ وَلَاتُسْرِعُوافَمَا اَدْرَكْتُمْ فَصَلُّوا وَمَا فَاتَكُمْ فَاَتِمُّوا۔ (صحیح البخاری کتاب الاذان)

'जेव्हा तुम्ही इकामत (नमाज साठी उभे राहण्याचे ऐलान) ऐकाल तेव्हा नमाज करीता शांतीपूर्वक व सभ्यपणे चालत जा, धावू नका. मग ज्या प्रकारे नमाज मिळेल पढा व जी सुटली असेल ती पूर्ण करा' (सहीहुल बुखारी किताबुल अजान)

ही गोष्ट नैतिक दृष्टया आहे. म्हणजे चालण्यात समतोलता राखणे ही माणसाची सवय असावी अन्यथा आवश्यकतेनुसार मनुष्य धावू ही शकतो. उदाहरणार्थ आग विझविण्याकरीता किंवा एखाद्याचा जीव वाचविण्याकरीता किंवा अपराध्याला पकडण्याकरीता इत्यादि. अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह फुर्कान टीप क्र. २१ यावरुन ही गोष्ट आपोआप स्पष्ट होते की रक्स (नाच) एक वाईट हरकत आहे, कारण हे समतोल चालण्याच्या अगदी विपरीत आहे व असभ्यतेची उघड अभिव्यक्ति आहे मग हे नृत्य स्त्री चे असो वा पुरुषाचे, आणि ते अश्लिल गीतांसोबत असो किंवा कव्वाली सह असो अथवा धुंदीत असो.

३२. म्हणजे संभाषणात आपला स्वर आहे त्याहून कमी राखा. मोठया स्वरात बोलणे ही काही चांगली गोष्ट नव्हे, किंबहुना नादानपणाचे लक्षण होय आणि ओरडून बोलण्याने तर भांडखोरपणा व गर्विष्ठपणा दिसून येतो. स्वरात शक्य तेवढी निम्रता व नम्रता राखणे एक चांगली सवय आहे जी एक वेगळाच प्रभाव बाळगते. बोलण्यात खालचा स्वर राखणे हे एक सवय म्हणून अपक्षित आहे अन्यथा आवश्यकतेनुसार स्वर उंचावण्यात कसलीत हरकत नाही. उदाहरणार्थ भाषण, ऐलान, अजान इत्यादी करीता.

३३. बेसूर व कर्कश स्वराला गाढवाच्या स्वराची उपमा देऊन त्याबद्दल तिरस्कार दर्शविला गेला आहे. गाढवाचे ओरडणे तर कोणालाही पसंत नसते मग मनुष्य जो आपले

एक नैतिक अस्तित्व बाळगतो, त्याने गाढवासारखे का म्हणून ओरडावे?

स्पष्ट असावे की इस्लाम मध्ये बाहय व आंतरिक दोघांनाही महत्व आहे व दोन्ही एकमेकावर प्रभाव पाडतात. चांगल्या सवयी ज्या माणसाच्या बाहय बाबींशी संबंधित असतात. उदाहरणार्थ खालचा स्वर, नजर खाली ठेवणे, समतोल चालणे इत्यादी गोष्टी त्याच्या अंतर्यामी (हृदया मध्ये) चांगल्या भावनांची जोपासना व चांगली कैफियत निर्माण करण्यास कारक ठरतात. आणि वाईट सवयी वाईट भावनांना परिपक्व करण्यास व वाईट कैफीयत निर्माण करण्यास कारणीभूत ठरतात. अशा प्रकारे ते गुणविशेष जे हृदयाशी संबंधित असतात. उदाहरर्णाथ सचोटी, प्रमाणिकता, प्रेम व सहानुभूती इत्यादी गोष्टी सवयींना सुशोभित करतात. आणि वाईट गुण उदाहरणार्थ मत्सर, कपट, इत्यादि वाईट चारित्र्य घडवितात.

२०. तुम्ही पाहत नाही [३४] की अल्लाहने त्या समस्त वस्तूंना ज्या आकाशांमध्ये आहेत व जमीनीवर आहेत, तुमच्या अधीन करुन ठेवले आहे.[३५] आणि आपल्या उघड व अध्यारुत देणग्या तुम्हावर पूर्ण केल्या आहेत.[३६] तरी ही माणसांपैकी काही लोक असे आहेत जे अल्लाह विषयी कसल्याहि ज्ञान, कसल्याहि मार्गदर्शन व कोणत्याही दिव्य ग्रंथा शिवाय वाद घालतात.[३७]

أَلَمْ تَرَوْا أَنَّ اللَّهَ سَخَّرَ لَكُم مَّا فِي السَّمَاوَاتِ وَمَا فِي الْأَرْضِ وَأَسْبَغَ
عَلَيْكُمْ نِعَمَهُ ظَاهِرَةً وَبَاطِنَةً ۗ وَمِنَ النَّاسِ مَن يُجَادِلُ فِي اللَّهِ
بِغَيْرِ عِلْمٍ وَلَا هُدًى وَلَا كِتَابٍ مُّنِيرٍ ﴿٢٠﴾

२१. आणि जेव्हा त्यांना म्हटले जाते की या गोष्टीचे अनुसरण करा जी अल्लाहने अवतरीत केली आहे तेव्हा म्हणतात आम्ही तर त्या मार्गाचे अनुसरण करु ज्यावर आम्ही आमच्या वाड-वडीलांना पाहिले आहे.[३८] काय अशा स्थितीत ही (हे त्यांचे अनुसरण करतील)जेव्हा सैतान यांना धगधगणाऱ्या आगी कडे बोलावित असावा?[३९]

وَإِذَا قِيلَ لَهُمُ اتَّبِعُوا مَا أَنزَلَ اللَّهُ قَالُوا بَلْ نَتَّبِعُ
مَا وَجَدْنَا عَلَيْهِ آبَاءَنَا ۚ أَوَلَوْ كَانَ الشَّيْطَانُ يَدْعُوهُمْ
إِلَىٰ عَذَابِ السَّعِيرِ ﴿٢١﴾

२२. आणि जो मनुष्य स्वत:ला अल्लाहच्या हवाली करील व तो सदाचारी ही असेल [४०] तर त्याने निश्चितच मजबूत आधार घेतला.[४१] आणि समस्त व्यवहारांची परिपूर्ति अल्लाह कडेच आहे.

وَمَن يُسْلِمْ وَجْهَهُ إِلَى اللَّهِ وَهُوَ مُحْسِنٌ فَقَدِ اسْتَمْسَكَ
بِالْعُرْوَةِ الْوُثْقَىٰ ۗ وَإِلَى اللَّهِ عَاقِبَةُ الْأُمُورِ ﴿٢٢﴾

२३. ज्याने कुफ्र (सत्याचा इन्कार) केला त्याचे कुफ्र तुमच्या करीता दु:ख कारक ठरू नये .[४२] यांना फिरून आमच्याच कडे यायचे आहे. मग आम्ही यांना दाखवू की यांनी काय काय केले होते. नि:संशय अल्लाह छातीच्या (हृदयस्थ) भेदांनाही जाणतो.

وَمَن كَفَرَ فَلَا يَحْزُنكَ كُفْرُهُ ۚ إِلَيْنَا مَرْجِعُهُمْ فَنُنَبِّئُهُم بِمَا
عَمِلُوا ۚ إِنَّ اللَّهَ عَلِيمٌ بِذَاتِ الصُّدُورِ ﴿٢٣﴾

२४. आम्ही थोडे दिवस यांना जीवन-सामुग्री देऊ [४३] मग त्यांना एका सक्त अजाब (ईश-शिक्षे) कडे खेचून नेऊ.

نُمَتِّعُهُمْ قَلِيلًا ثُمَّ نَضْطَرُّهُمْ إِلَىٰ عَذَابٍ غَلِيظٍ ﴿٢٤﴾

२५. जर तुम्ही यांना विचाराल की आकाशांना व जमीनीला कोणी निर्माण केले आहे तर निश्चित म्हणतील, अल्लाह ने.[४४] सांगा स्तुति अल्लाह करीताच आहे परंतु यांच्या पैकी अधिकांश लोक जाणत नाहीत.[४५]

وَلَئِن سَأَلْتَهُم مَّنْ خَلَقَ السَّمَاوَاتِ وَالْأَرْضَ لَيَقُولُنَّ اللَّهُ ۚ قُلِ
الْحَمْدُ لِلَّهِ ۚ بَلْ أَكْثَرُهُمْ لَا يَعْلَمُونَ ﴿٢٥﴾

३४. लुकमानचा उपदेश वर संपला आता पुन्हा संभाषणाचा रोख तौहीद (एकेश्वरवाद) कडे वळतो.

३५. मूळ शब्द 'तस्खीर' याचा अर्थ ताब्यात देणे असा ही आहे व सेवेस लावणे असा देखील. सर्वश्रेष्ठ अल्लाहने कितीतरी वस्तू माणसाच्या ताबेदारीत दिल्यात आहेत की त्याने वाटेल तशी सेवा यांच्याकडून घ्यावी. उदाहरणार्थ गुरे ढोरे ज्यांच्याकडून तो आपल्या मर्जीनुसार सेवा घेतो व त्यांना जबह देखील करु शकतो. अशा प्रकारे वनस्पती व जड पदार्थ ज्यांना मनुष्य विविध रित्या वापरात आणतो. परंतु बहुतेक वस्तू विशेषत: ग्रह नक्षत्रे ज्या माणसाच्या अवाक्यात नाही माणसाला कोणत्या न कोणत्या प्रकारे लाभ पोहचविण्याची सामुग्री करीत आहे. उदाहरणार्थ सूर्य, जो अहोरात्र माणसाला उष्णता व प्रकाश पोहचविण्याच्या कामी लागलेला आहे आणि विस्तिर्ण वातावरणात सृष्टी किरणा (Cosmice Rays) चे अस्तित्व जे अलीकडचेच संशोधन आहे आणि आम्हाला याचे ज्ञान नाही की सात आकाश आमच्यासाठी कोणकोणती सेवा पार पाडीत आहेत परंतु अवलोकन हे दर्शविते की ग्रह-नक्षत्रे मनुष्याच्या लाभा करीता वेगवेगळी उपाययोजना करीत आहेत.

३६. उघड देणग्यांशी अभिप्रेत अनुभूत व ज्ञात असलेल्या ईश देणग्या होत आणि अध्यारूत देणग्यांशी अभिप्रेत अशा ईशा देणग्या होत, ज्यांचा लाभ तर त्याला पोहचत आहे, परंतु हा लाभ कळून येत नाही, आजच्या काळात वैद्यक शास्त्रा (Medical Science) ने अशा किती तरी गोष्टींचे रहस्योद्‌घाटन केले आहे ज्या मानव शरीरात लाभदायक सेवा पार पाडतात रोगांचा प्रतिकार करतात आणि विकासासाठी सहाय्यकारक ठरतात या आणि अशा कितीतरी गोष्टी पूर्वी अध्यारुत होत्या आणि आता विज्ञानाच्या प्रगती मुळे माणसाला ज्ञात झाल्या आणि अगणित ईश-देणग्या अशा आहेत ज्यांची माणसाला माहीती नाही.

३७. म्हणजे या ईश-देणग्या प्राप्त झाल्या बद्दल ज्यांचा उल्लेख वर केला गेला आहे, माणसाने अल्लाहचा कृतज्ञशील दास बनावयास हवे होते. परंतु किती तरी लोक असे आहेत जे अल्लाहशी कृतघ्न बनतात व तो खरा उपकार कर्ता व एकमेव उपास्य असण्याबाबत विवाद उभा करतात. हा विवाद ना ज्ञानाच्या आधारावर असतो ना मार्गदर्शनाच्या आधारावर आणि ना एखाद्या दिव्य-ग्रंथाच्या आधारांवर, किंबहुना केवळ अज्ञान व भ्रम पूजेच्या आधारावरच असतो. ज्ञानाच्या स्पष्टीकरणासाठी पहा सूरह हज्ज टीप क्र. ५.

मार्गदर्शनाशी अभिप्रेत या ठिकाणी एकेश्वरवादाच्या त्या निशाण्या होत ज्या माणसाच्या आपल्या अस्तित्वात तसेच बाहय विश्वात विखुरलेल्या आहेत आणि विशेषत: पैगंबराद्वारे प्राप्त होणारे मार्गदर्शन ही.

आणि दिव्य-ग्रंथाशी अभिप्रेत ईश-संदेशाच्या माध्यमाने अवतरलेला ग्रंथ होय. मुनीर (उज्जवल) चे विशेषण हे जाहीर करते की तो ग्रंथ मूळ स्वरुपात अस्तित्वात असावा, अन्यथा फेरबदल झालेला ग्रंथ मार्गदर्शनाचा मार्ग पूर्णपणे दाखवू शकत नाही यास्तव आजच्या तौरात व इंजीलला जे बायबल मध्ये समाविष्ट आहेत, 'दिव्य' हे विशेषण लागू पडत नाही आणि जेथे पावेतो वेद व गीता चा संबंध आहे. या ग्रंथांमध्ये या गोष्टीचा कसलाही पुरावा नाही की हे ग्रंथ अल्लाहतर्फे अवतरीत केले गेले आहेत आणि वेदांबाबत तर हे ही माहीत नाही की यास सादर करणारा किंवा संकलन करणारा कोण होता. तसेच या ग्रंथातील मजकूर ही हे ईश-वाणी असल्याची साक्ष देत नाहीत. यास्तव ते प्रमाण मानण्या योग्य नव्हेत.

३८. दुसऱ्या शब्दात सांगायचे म्हणजे आम्ही आपल्या पूर्वजांच्या धर्मावर व जनसामूहीक धार्मिक संस्कृती वर अटळ राहू.

३९. म्हणजे ईश्वर व धर्म-संदर्भात ईश-संदेशास सोडून मार्गभ्रष्ट वाढ-वडील किंवा अनेकेश्वरवादी सामाजिक संस्कृतीचे अनुसरण करणे सैतानाचे निमंत्रण स्विकारणे होय कारण सैतान जहन्नम कडे बोलावितो आणि हा मार्ग जहन्नमचाच मार्ग होय.

४०. स्पष्ट झाले की इस्लामची वास्तविकता ही आहे की माणसाने सुज्ञता पूर्वक स्वत:ला अल्लाहच्या सुपूर्द करावे आणि आपल्या आचरणात चांगलेपणा व गुणविशेषता निर्माण करावी.

४१. بِالْعُرْوَةِ الْوُثْقٰى ''बिल ऊरवतुल-वुसक़ा'' (मजबूत आश्रयाशी) अभिप्रेत अल्लाहचा धर्म होय जो अल्लाहशी असलेला संबंध मजबूत करतो.

४२. म्हणजे जेव्हा तुम्ही यांचे पूरेपूर हितचिंतन केले व यांना समजाविण्यास कसलीच कसर शिल्लक ठेवली नाही. तरी ही जर ते आपल्या कुफ्र नितीवर अटळ आहेत तर तुम्ही त्यांचे दु:ख का म्हणून करावे. ते आपल्या कृतकर्मांची फळे चाखल्या शिवाय राहणार नाहीत.

४३. अर्थात जी सवड यांना ऐहीक लाभ घेण्याची मिळत आहे ती फार थोडी आहे. लवकरच यांना हे सर्व काही सोडून येथून निघून जावे लागेल.

४४. अरब देशीय अनेकेश्वरवादी अल्लाहलाच सृष्टी निर्माता मानत असत.

४५. म्हणजे जेव्हा सृष्टी-निर्माता अल्लाहच आहे तेव्हा कृतज्ञता व प्रशंसेस पात्र देखील अल्लाहच आहे. परंतु एवढी ढोबळ गोष्ट देखील बहुतेक लोक जाणत नाहीत. म्हणूनच आयुष्यभर अनेकेश्वरवादाच्या दलदलीत ते खितपत पडलेले असतात.

२६. आकाशांत व जमीनीवर जे काही आहे अल्लाहचेच आहे. नि:संशय अल्लाह नि:स्पृह आहे, प्रशंसेस पात्र.

لِلّٰهِ مَا فِى السَّمٰوٰتِ وَالْاَرْضِ ؕ اِنَّ اللّٰهَ هُوَ الْغَنِىُّ الْحَمِيْدُ ﴿۲۶﴾

२७. जर जमीनीवरील सर्व झाडे लेखण्या बनतील आणि समुद्र शाई होतील ज्यास अधिक सात समुद्र शाई पुरविली जावी, तरी ही अल्लाहच्या गोष्टी संपणार नाहीत. नि:संशय अल्लाह वर्चस्वशाली व बुद्धिकौशल्य बाळगणारा आहे.[४६]

وَلَوْ اَنَّمَا فِى الْاَرْضِ مِنْ شَجَرَةٍ اَقْلَامٌ وَّالْبَحْرُ يَمُدُّهٗ
مِنْۢ بَعْدِهٖ سَبْعَةُ اَبْحُرٍ مَّا نَفِدَتْ كَلِمٰتُ اللّٰهِ ؕ اِنَّ اللّٰهَ
عَزِيْزٌ حَكِيْمٌ ﴿۲۷﴾

२८. तुम्हा सर्वांना निर्माण करणे आणि पुन्हा जिवंत उठविणे असेच आहे जसे एक व्यक्तिला निर्माण करणे व पुन्हा जिवंत उठविणे.[४७] नि:संशय अल्लाह सर्व काही ऐकणारा व पाहणारा आहे.[४८]

مَا خَلْقُكُمْ وَلَا بَعْثُكُمْ اِلَّا كَنَفْسٍ وَّاحِدَةٍ ؕ اِنَّ اللّٰهَ سَمِيْعٌۢ بَصِيْرٌ ﴿۲۸﴾

२९. काय तुम्ही पाहत नाही की अल्लाह रात्रीला दिवसात दाखल करतो व दिवसाला रात्रीत.[४९] आणि सूर्य व चंद्रास सेवेस लावले गेले आहे. प्रत्येक निर्धारीत वेळे पावेतो चालत जात आहे.[५०] तुम्ही जे काही करता त्याविषयी अल्लाह जाणकार आहे.

اَلَمْ تَرَ اَنَّ اللّٰهَ يُوْلِجُ الَّيْلَ فِى النَّهَارِ وَيُوْلِجُ النَّهَارَ فِى الَّيْلِ
وَسَخَّرَ الشَّمْسَ وَالْقَمَرَ ؗ كُلٌّ يَّجْرِىْۤ اِلٰۤى اَجَلٍ مُّسَمًّى وَّاَنَّ اللّٰهَ
بِمَا تَعْمَلُوْنَ خَبِيْرٌ ﴿۲۹﴾

३०. हे या कारणास्तव की अल्लाहच सत्य आहे आणि त्याला सोडून न ज्या दुसऱ्या गोष्टींना हे पुकारतात त्या असत्य होत.[५१] आणि हे की अल्लाह उच्चतम व महान आहे.[५२]

ذٰلِكَ بِاَنَّ اللّٰهَ هُوَ الْحَقُّ وَاَنَّ مَا يَدْعُوْنَ مِنْ دُوْنِهِ الْبَاطِلُ ۙ
وَاَنَّ اللّٰهَ هُوَ الْعَلِىُّ الْكَبِيْرُ ﴿۳۰﴾

३१. काय तुम्ही पाहत नाही की नौका समुद्रात अल्लाहच्या कृपेने चालते यासाठी की त्याने तुम्हाला आपल्या काही निशाण्या दाखवाव्या नि:संशय यात त्या प्रत्येक माणसाकरीता निशाण्या आहेत जो सहनशील व कृतज्ञशील असावा.[५३]

اَلَمْ تَرَ اَنَّ الْفُلْكَ تَجْرِىْ فِى الْبَحْرِ بِنِعْمَتِ اللّٰهِ لِيُرِيَكُمْ مِّنْ
اٰيٰتِهٖ ؕ اِنَّ فِىْ ذٰلِكَ لَاٰيٰتٍ لِّكُلِّ صَبَّارٍ شَكُوْرٍ ﴿۳۱﴾

४६. म्हणजे जमीनीवर जेवढे वृक्ष आहेत त्या सर्वांच्या जर लेखण्या बनविल्या जाव्यात व सागराला शाई बनविले जावे आणि आणखी सात समुद्रांची यात वाढ केली जावी तरी ही अल्लाहचे सामर्थ्य व त्याच्या बुद्धि कौशल्याच्या गोष्टी लिहीण्याकरीता ही सामुग्री अपुरी पडले. उघड आहे, एकेक कणाने सृष्टीच्या आरंभा पासून जे कार्य पार पाडले आहे ते सर्व कलमबंद करण्याकरीता शाईचा हा साठा मुळीच पुरणार नाही. परंतु अल्लाहचे ज्ञान एवढे व्यापक आहे की कोणतीही गोष्ट वा वस्तू त्याच्या ज्ञान-कक्षे बाहेर नाही जर मनुष्य त्याच्या महानतेविषयी खरी उचित कल्पना कायम करील तर त्या गोष्टी स्विकारण्यात त्याला काहीच संकोच वाटणार नाही, ज्यांना कुरआन सादर करीत आहे. अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह कहफ टीप क्र. १३३.

४७. म्हणजे अल्लाह करीता असंख्य माणसांना निर्माण करणे तितकेच सोपे आहे जेवढे एका माणसाला निर्माण करणे तद्‌वतच समस्त माणसांना दुसऱ्यांदा जिवंत करणे इतकेच सोपे आहे जेवढे एका माणसाला दुसऱ्यांदा जिवंत करणे. त्याच्या 'कुन' (घडून ये) या आदेशाने संपूर्ण मानव जाति अस्तित्वात आली मग त्याच्या याच 'कुन' आदेशाने मृत पुन्हा का नाही जिवित होणार?

४८. संकेत या गोष्टीकडे आहे की जेव्हा तो सर्व काही ऐकतो व पाहतो तेव्हा तो तुम्हाला चांगल्या कामाचा मोबदला व वाईट कर्माची शिक्षा का देणार नाही?

४९. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह आले ईमरान टीप क्र.३९

५०. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह रअद टीप क्र. ८.

५१. म्हणजे सूर्य व चंद्र अशासाठी सेवारत आहेत की अल्लाहने त्यांना सेवा करण्यास लावले आहे. जर हे ईश्वर असते तर अधीन होऊ शकले नसते आणि जर अनेक ईश्वर असते तर ही सृष्टी व्यवस्था इतक्या व्यवस्थित पणे चालू शकली नसती, म्हणून हा स्पष्ट पुरावा आहे या गोष्टीचा की अल्लाहच एकमेव ईश्वर आहे व त्याच्या शिवाय अन्य कोणत्याही ईश्वराचे तिळमात्र अस्तित्व नाही यास्तव हे अनेकेश्वरवादी ज्या एखाद्या गोष्टीला उपास्य समजून पुकारतात, आर्जव करतात ते वास्तवतेच्या अगदी विरुद्ध आहे.

५२. म्हणजे अल्लाहचे वैभव अत्युच्च आहे व मोठेफक्त त्याच्यासाठी आहे अधिक स्पष्टीकरणाकरीता पहा सूरह रअद टीप क्र. २५.

५३. मनुष्य जेव्हा नावेत चढतो तेव्हा तो संकटांनी घेरलेला असतो आणि जर नाव वादळाच्या तावडीत सापडते तेव्हा अत्याधिक संकट त्याला जाणवू लागते. हे या गोष्टीचे प्रमाण होय की जीवन संकटांनी घेरलेले आहे आणि तो केवळ अल्लाह आहे जो संकटांमधून माणसाला सही सलामत बाहेर काढतो. परंतु हे मार्गदर्शन केवळ तेच लोक प्राप्त करतात जे संकटांमध्ये व आपत्तित सहनशीलता बाळगून असतात. म्हणजे जे सत्याला प्राप्त करुन घेण्याचा व त्यावर कायम राहण्याचा धीर बाळगतात.

दुसऱ्या पैलूने पाहीले असता नौका सर्वश्रेष्ठ अल्लाहची फार मोठी देणगी आहे. कारण मनुष्य नौका व जहाजाद्वारे निरनिराळे लाभ प्राप्त करतो. अशा प्रकारे नौका जेव्हा वादळातून सही सलामत बाहेर पडते तर हा अल्लाहचा केवढा मोठा अनुग्रह आहे, परंतु याकडे तेच लोक लक्ष देतात जे उपकार जाणतात व आपल्या रब्ब (पालन कर्त्या) शी कृतज्ञशील राहू इच्छितात.

وَإِذَا غَشِيَهُم مَّوْجٌ كَالظُّلَلِ دَعَوُا اللَّهَ مُخْلِصِينَ لَهُ الدِّينَ فَلَمَّا نَجَّاهُمْ إِلَى الْبَرِّ فَمِنْهُم مُّقْتَصِدٌ ۚ وَمَا يَجْحَدُ بِآيَاتِنَا إِلَّا كُلُّ خَتَّارٍ كَفُورٍ ﴿٣٢﴾

३२. आणि जेव्हा लाटा छायां प्रमाणे यांच्यावर आच्छादित होतात तेव्हा ते अल्लाहला पुकारतात, दीन (नम्रता व दास्यत्वा) सत्याच्या करीता निर्भेळ करीत [५४] मग जेव्हा तो यांना सुरक्षितपणे खुष्की कडे आणतो, तेव्हा यांच्यापैकी थोडेच लोक मध्यम मार्गावर राहतात.[५५] आणि आमच्या आयतींचा इन्कार केवळ तेच लोक करतात जे विश्वास घातकी व कृतघ्न आहेत.[५६]

يَا أَيُّهَا النَّاسُ اتَّقُوا رَبَّكُمْ وَاخْشَوْا يَوْمًا لَّا يَجْزِي وَالِدٌ عَن وَلَدِهِ وَلَا مَوْلُودٌ هُوَ جَازٍ عَن وَالِدِهِ شَيْئًا ۚ إِنَّ وَعْدَ اللَّهِ حَقٌّ ۖ فَلَا تَغُرَّنَّكُمُ الْحَيَاةُ الدُّنْيَا وَلَا يَغُرَّنَّكُم بِاللَّهِ الْغَرُورُ ﴿٣٣﴾

३३. लोक हो ! स्वतःला वाचवा आपल्या पालन कर्त्याच्या अवज्ञेपासून आणि भय बाळगा त्या दिवसाचे [५७] जेव्हा ना एखादा पिता आपल्या संततीस उपयोगी पडेल आणि ना एखादी संतती आपल्या पित्यास उपयोग पडेल. [५८] निःसंशय अल्लाहचा वायदा सच्चा आहे, तेव्हा ऐहीक जीवनाने तुम्हाला भ्रमात पाडू नये आणि ना फसविणाऱ्याने, [५९] अल्लाहच्या संदर्भात तुम्हाला भ्रमात ठेवावे.

إِنَّ اللَّهَ عِندَهُ عِلْمُ السَّاعَةِ وَيُنَزِّلُ الْغَيْثَ وَيَعْلَمُ مَا فِي الْأَرْحَامِ ۖ وَمَا تَدْرِي نَفْسٌ مَّاذَا تَكْسِبُ غَدًا ۖ وَمَا تَدْرِي نَفْسٌ بِأَيِّ أَرْضٍ تَمُوتُ ۚ إِنَّ اللَّهَ عَلِيمٌ خَبِيرٌ ﴿٣٤﴾

३५. कियामतीच्या वेळेचे ज्ञान अल्लाह जवळच आहे, [६०] तोच पाऊस वर्षावितो [६१] तोच जाणतो की पोटां (मातेच्या उदरां) मध्ये काय आहे [६२] कोणताही मनुष्य हे जाणत नाही की उद्या तो कसली कमाई करील ?[६३] आणि ना एखादा मनुष्य हे जाणतो की तो कोणत्या भूप्रदेशात मरेल.[६४] केवळ अल्लाह सर्व काही जाणणारा व माहीतगार आहे.

५४. स्पष्टीकरणा करीता पहा सूरह युनूस टीप क्र. ४२.

५५. म्हणजे फार थोडेच लोक या गोष्टीवर कायम राहतात की नम्रता व दास्यत्वाची भावना अल्लाहसाठीच मनात राखून त्यास पुकारावे अन्यथा अधिकांश लोक आपल्या वचनाकडे पाठफिरवितात.

५६."ख़त्तार" خَتَّار (विश्वास घातकीशी) अभिप्रेत वचनभंग करणारा, अल्लाहशी केलेले दास्यत्वाचे वचन तोडणारा. आयतीचा संकेत या गोष्टीकडे आहे की नौका वादळात सापडल्यानंतर तर ईश्वराचे स्मरण झाले होते आणि त्यास नम्रतापूर्वक दुआ करु त्याच्याशी दासाचे नाते जोडणे मान्य केले होते परंतु जेव्हा त्याने या लोकांना वादळाच्या तडाख्या पासून वाचवून खुष्की (कोरडया जमीनी) वर सही सलामत आणले तेव्हा ते आपल्या या स्विकृतीस विसरले व त्याच्या आयतींचा इन्कार करु लागले.

५७. अर्थात कियामतीच्या दिवशी हजेरी द्वारे जेव्हा प्रत्येक माणसाला अल्लाह समोर आपल्या चांगल्या वाईट आचरणाचा जाब द्यावा लागेल.

५८. आणि जेव्हा ना पिता, मुलाच्या कामी येईल आणि ना मुलगा आपल्या पित्याच्या कामी येईल तेव्हा प्रत्येक माणसाने आपल्या मुक्तिची काळजी घेतली पाहीजे. त्याने हा विचार केला पाहीजे की कोणत्या धर्म-श्रद्धेचा अंगिकार करुन मी आखिरतच्या महाभयंकर शिक्षापासून स्वत:ला वाचवू शकतो, व निरंतर राहणारे यश प्राप्त करु शकतो. परंतु परिस्थिती मोठी विचित्र आहे. मुळे त्याच धर्मावर कायम राहतात, जो त्यांच्या आई-वडीलांचा धर्म असतो. वस्तुत: तो धर्म असत्य असल्यामुळे आई-वडीलांना ही जहन्नम मध्ये नेणारा असतो व संततीला ही.

५९. अभिप्रेत सैतान होय. जो अल्लाहच्या बाबतीत माणसाला सर्वात मोठा धोका देणारा होय.

६०. म्हणजे कियामतीची वेळ केव्हा येईल हे कोणाला ही माहीत नाही याचे ज्ञान केवळ अल्लाहला आहे त्याच्या बुद्धिकौशल्यास या गोष्टीची निकड भासली की त्याने कियामतीची वेळ कोणावरही जाहीर करु नये. यास्तव या बाबत पैगंबरांना विचारणे किंवा या विषयी विवादात पडणे व्यर्थ होय. असल्या निरर्थक वादात पडण्याऐवजी माणसाने यासाठी तयारी केली पाहीजे कारण कियामत कोणत्याही परिस्थितीत आपल्या निर्धारीत वेळेवर आल्याशिवाय राहणार नाही.

६१. म्हणजे अल्लाह आपल्या योजनेनुसार पाऊस पाडतो म्हणून कोणत्या वेळी कोणत्या ठिकाणी किती पाऊस पडेल याचे ज्ञान फक्त अल्लाहला आहे. मनुष्य आपल्या अनुभवांच्या आधारावर जे ठोकताळे निश्चित करतो ते खरे ही ठरतात व चुकीचे देखील. आजच्या काळात हवामान खात्याची भाकिते ही अपरिहार्यत:खरी नसतात, तसेच याचे क्षेत्र देखील मर्यादीत असते. आणि ते हे सांगू शकत नाही या वर्षी पूर येईल कि कोरडा दुष्काळ पडेल. अर्थात या सर्व गोष्टी केवळ अल्लाह जाणतो.

६२. म्हणजे मातेच्या उदरात जो गर्भ (Feotus) विकसित होत असतो त्याचे संपूर्ण ज्ञान अल्लाहला असते. तोच जाणतो की गर्भपात होऊन तो वाया जाईल कि सही सलामत मूल जन्माला येईल व त्याची कार्य क्षमता कशी असेल. गर्भा संबंधी या व अशा इतर अनेक गोष्टी अल्लाहच जाणतो व कोणाला कळत ही नाही की अमुक एका मातेच्या उदरात प्लेटो सारखे व्यक्तिमत्व विकसित होत आहे किंवा इकबाल सारख्या व्यक्तिमत्वाने जन्म घेतला आहे. आणि ना तो हे जाणतो की हे मूल भविष्यात चांगले व लाभदायक कार्य पार पाडील कि वाईट व विध्वंसक कार्य. अल्लाह जो याची निर्मिती करतो, त्याच्यासाठी एक योजना (भाग्य) सुद्धा बनवितो व तोच या गोष्टीचे पूरेपूर ज्ञान बाळगतो की मातेच्या उदरात कोणत्या स्वरुपाची गोष्ट अस्तित्वात आली आहे व ती पुढे काय होणार आहे. आजच्या काळात विज्ञानाच्या प्रगतीमुळे माणसाला हे जाणून घेणे शक्य झाले आहे की मातेच्या उदरात जो गर्भ वाढत आहे त्याचे लिंग कोणते आहे म्हणजे तो मुलगा आहे कि मुलगी, परंतु या त्रोटक ज्ञानाने या गोष्टीस नकार होत नाही जी आयतीच्या या वाक्यात फर्माविली गेली आहे व जिचे स्पष्टीकरण आम्ही वर केले आहे या वाक्याच्या आशयास गर्भाचे फक्त लिंग (sex) जाणण्यापर्यंत मर्यादित समजण्याचे काही एक कारण नाही. जेव्हा लिंगा (sex) चे ज्ञान ही माणसाला गर्भधारणेच्या प्राथमिक अवस्थेत होत नसते, किंबहुना चार पाच महीने झाल्यानंतर प्लोइड टेस्ट(Anniocentesis Test)किंवा सोनोग्राफी (Sonography) द्वारे कळते.

६३. कमाईशी अभिप्रेत केवळ अर्थोपार्जन नव्हे, किंबहुना चांगले वाईट आचरण ही होय. कोणालाही माहीत नाही की उद्या कोणती परिस्थीती उद्‌भवणार आहे. त्याची परीक्षा कोणत्या बाबीत घेतली जाईल आणि तो मांगल्य प्राप्त करील कि अमांगल्य. तात्पर्य उपजिविकेची प्राप्ती असो किंवा मांगल्य व अमांगल्याची, माणसाच्या अजाणतेची ही दशा आहे की त्याला हे सुद्धा माहित नसते की येणाऱ्या दिवशी त्याच्यावर कोणता प्रसंग गुदरणार आहे परंतु अल्लाहला याचे पूरेपूर ज्ञान आहे.

६४. जरुरी नव्हे की माणूस जिथे वास्तव्य करतो तिथेच त्याने मेले पाहीजे किंबहुना अशा कितीतरी घटना घडून येतात की मनुष्य एखाद्या कामानिमित्त लांबवरच्या प्रदेशात

किंवा देशात चालला जातो व तिथेच त्याला मृत्यू येतो आणि प्रथम ही गोष्ट त्याच्या ध्यानी मनी ही नव्हती की त्याला अमुक एक कारणास्तव अमक्या भूप्रदेशाचा प्रवास करावा लागेल व तिथे त्याला मरण येईल. तो अल्लाहच होय जो प्रत्येक मनुष्याच्या मरणाच्या वेळेसही जाणतो व या गोष्टीस ही की त्याला कोणत्या भूप्रदेशात मरावयाचे आहे.

आयतीचा हेतु हे स्पष्ट करणे होय की अशा कितीतरी निकटतम गोष्टी आहेत ज्यांचा माणसाशी संबंध येतो. परंतु तो जाणत नाही की केव्हा कोणती गोष्ट घडून येणार आहे. आणि त्याच्या न जाणण्याचा अर्थ असा नव्हे की ती गोष्ट घडून येणार नाही. किंबहुना त्याला माहीत नसतांना सुद्धा या सर्व गोष्टी आपल्या वेळेवर घडून येतात मग जर कियामतीच्या घडून येण्याची वेळ माणसाला सांगितली गेली नाही तर यावरुन कियामतीच्या घडून येण्याची असंभवता कशी? ती ठरलेल्या वेळेवर अशाप्रकारे घडून येईल ज्या प्रकारे इतर गोष्टी माणसाला माहीती नसतांना घडून येतात.

हदीस-वचनात या पाच गोष्टींना ज्यांचा उल्लेख या आयतीत केला गेला आहे ‘अपरोक्ष्याच्या किल्ल्या’ म्हटले गेले आहे (बुखारी किताबुत तफसीर) म्हणजे अपरोक्ष. ज्ञानाची ही कवाडे होत ज्यांच्या किल्ल्या अल्लाहजवळच आहेत.

# ३२. सूरह अस्सजदा

**नाव :** आयत क्र. १९ मध्ये ईमान बागणाऱ्यांचा हा गुणधर्म निवेदिला गेला आहे की जेव्हा त्यांना अल्लाहच्या आयती द्वारे स्मरण दिले जाते तेव्हा ते सजद्यात जाऊ लागतात. तदनुषंगे या सूरह चे नाव अस्सजदा असे आहे.

**अवतरण काळ :** मक्की आहे आणि मजकूरां वरून असे दिसून येते की मक्केच्या मध्यकाळात अवतरली असावी.

**मध्यवति कल्पना :** तौहीद (एकेश्वरवाद) आखिरत (मरणोत्तर जीवना) चा विषय अशा शैलीत निवेदिला गेला आहे, जो शंका कुशंकाना दूर करून मनात विश्वास निर्माण करतो, सूरह लुकमान मध्ये बुद्धि व ज्ञाना शी अपील होते तर या सूरह मध्ये तन्मयता व अंत:करणा शी अपील आहे.

**आयत रचना :** आयत क्र. १ ते ३ प्रस्तावना स्वरुप आयती होत. ज्यात हे स्पष्ट केले गेले आहे की हा ग्रंथ पैगंबरांवर अशा साठी अवतरीत केला गेला आहे की त्यानी लोकांना सावध करावे.

आयत क्र. ४ ते ९ मध्ये एकेश्वरवादा चे निवेदन करतांना मानवाच्या निमितीचा उल्लेख केला आहे.

आयत क्र. १० ते १४ मध्ये आखिरत विषयी चा मजकूर आहे.

आयत क्र. १५ ते १९ मध्ये ईमान बाळगणाऱ्यांच्या काही महत्वपूर्ण वैशिष्टयांचा उल्लेख करीत त्यांच्या उत्कृष्ट परिणतिस निवेदिले गेले आहे.

आयत क्र. २० ते २२ मध्ये अवज्ञा करणाऱ्या व खोटे-ठरविणाऱ्यांच्या दुष्परिणतिस सादर केले गेले आहे.

आयत क्र. २३ ते २५ मध्ये हे स्पष्ट केले गेले आहे की लोकांच्या मार्गदर्शना करीता अल्लाहच्या ग्रंथाचे अवतरण ही काही-अद्‌भूत बाब नव्हे. यापूर्वी हजरत मूसा यांच्या वर अल्लाहचा ग्रंथ अवतरला होता आणि सर्वश्रेष्ठ अल्लाह बनी इस्राईल वंशा मधून असे नेते उदयास आणत राहीला जे यानुसार लोकांना मार्गदर्शन करीत राहीले.

आयत क्र. २६ व २७ मध्ये उध्वस्त जन समूहांच्या इतिहासा पासून बोध ग्रहण करण्याचे तसेच अल्लाहच्या ईशत्वास प्रमाण भूत ठरणाऱ्या दृश्यांवर विचार चिंतन करण्याचे आवाहन केले गेले आहे.

आयत क्र. २८ ते ३० सूरहच्या समारोपाच्या आयती होत, ज्यात इन्कार करणाऱ्यां च्या आक्षेपांना उत्तर देताना त्यांना सावध केले गेले आहे :

كان النبى ﷺ يقرأُ فِى الْفَجْرِ يَوْمَ الْجُمُعَةِ الٓمٓ
تنزيُل وهل اتى على الانسان۔ (بخاری کتاب الجمعہ)

**हदीस :** “हदीस वचनात उल्लेखित आहे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) जुमआ (शुक्रवार) च्या दिवशी फज्र (प्रात:कालीन) नमाज मध्ये सूरह सजदा आणि सूरह ‘हलअता अल्ल इन्सान (सूरह दहर) चे पठण करीत.” (बुखारी किताबुल जुमुआ)

# ३२.सूरह अस्सज़दा

سُورَةُ السَّجْدَة

(आयती- ३०)

परम दयाळू परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ

१. अलिफ. लाम. मीम.[१]

الٓمّٓ ①

२. नि:संशय हा ग्रंथ सर्व विश्वांच्या स्वामी तर्फे अवतरीत झाला आहे ?[२]

تَنْزِيْلُ الْكِتٰبِ لَا رَيْبَ فِيْهِ مِنْ رَّبِّ الْعٰلَمِيْنَ ②

३. काय हे असे म्हणतात की यास या व्यक्तिने [३] स्वत : रचले आहे. नव्हे, किबंहुना हे सत्य आहे तुमच्या पालन कर्त्या तर्फे या साठी की तुम्ही एका अशा जन-समूहास खबरदार करावे ज्यास- खबरदार करणारा तुमच्या पूर्वी आला नाही,[४] अशासाठी की त्यांना मार्गदर्शन प्राप्त वहावे.

اَمْ يَقُوْلُوْنَ افْتَرٰىهُ ۚ بَلْ هُوَ الْحَقُّ مِنْ رَّبِّكَ لِتُنْذِرَ قَوْمًا مَّآ
اَتٰىهُمْ مِّنْ نَّذِيْرٍ مِّنْ قَبْلِكَ لَعَلَّهُمْ يَهْتَدُوْنَ ③

४. तो अल्लाह च होय, ज्यांने आकाशांना व जमीनीला व यांच्या दरम्यान असलेल्या वस्तूं ना सहा दिवसात निर्माण केले [५] मग तो सिहासना वर उच्च (स्थानी) आरुढ झाला [६] त्याच्या शिवाय ना तुमचा कोणी कार्य-साधक आहे आणि ना (त्याच्या समोर) एखादा शिफारस करणारा मग काय तुम्हा लोकांना हे समजत नाही?[७]

اَللّٰهُ الَّذِيْ خَلَقَ السَّمٰوٰتِ وَالْاَرْضَ وَمَا بَيْنَهُمَا فِيْ سِتَّةِ اَيَّامٍ
ثُمَّ اسْتَوٰى عَلَى الْعَرْشِ ۭ مَا لَكُمْ مِّنْ دُوْنِهٖ مِنْ وَّلِيٍّ وَّلَا شَفِيْعٍ ۭ
اَفَلَا تَتَذَكَّرُوْنَ ④

५. तो आकाशा पासून जमीनी पावेतो कार्य-योजना करतो, मग ही योजना वर जाते (परतते) त्याच्या समोर एका अशा दिवसात ज्याची संख्या तुमच्या गणने ने एक हजार वर्ष आहे.

يُدَبِّرُ الْاَمْرَ مِنَ السَّمَاۗءِ اِلَى الْاَرْضِ ثُمَّ يَعْرُجُ اِلَيْهِ فِيْ يَوْمٍ
كَانَ مِقْدَارُهٗٓ اَلْفَ سَنَةٍ مِّمَّا تَعُدُّوْنَ ⑤

६. तो अपरोक्ष आणि विद्यमान जाणणारा आणि वर्चस्वशाली व कृपाशील आहे.[९]

ذٰلِكَ عٰلِمُ الْغَيْبِ وَالشَّهَادَةِ الْعَزِيْزُ الرَّحِيْمُ ⑥

७. त्याने जी वस्तू देखील बनविली उत्कृष्ठ [१०] बनविली आणि मानवाच्या निर्मितीचा आरंभ मातीने केला.[११]

الَّذِيْٓ اَحْسَنَ كُلَّ شَيْءٍ خَلَقَهٗ وَبَدَاَ خَلْقَ الْاِنْسَانِ مِنْ
طِيْنٍ ⑦

१. सांकेतिक अक्षरांच्या स्पष्टीकरणा साठी पहा सूरह बकरा टीप क्र. १ आणि सूरह यूनुस टीप क्र. १. ही वस्तुस्थिती आहे की कुरआन दृष्टया हा ईश-चमत्कार आहे म्हणून ही अक्षरे जेव्हा वेगवेगळी अदा केली जातात तेव्हा स्वर - कंपन निर्माण करुन ऐकणाऱ्याचे लक्ष आपल्या करडे वेधतात या सूरह मध्ये अलिफ चा संकेत आयतीं कडे आहे, ज्याचा उल्लेख आयत क्र. १५, २२, २४ व २६ मध्ये केला गेला आहे.

'लाम' चा संकेत لِقَاءِ رَبِّهِمْ (आपल्या पालनकर्त्याशी भेट आयत १०) لِقَاءَ يَوْمِكُمْ هٰذَا (त्या दिवसाची हजेरी आयत १४) आणि لِقَائِهِ (त्याच्याशी भेट आयत २३) कडे आहे. आणि 'मीम' चा संकेत مُنْتَقِمُوْنَ आम्ही शिक्षा देणार आहोत आयत -२२) कडे आहे.

२. म्हणजे या ग्रंथाचे सर्व विश्वांच्या पालन कर्त्या अल्लाह तर्फे अवतरण संशयविरहीत आहे. कुरआन अल्लाहचा ग्रंथ असण्या संबंधी ची प्रमाणे अनेक ठिकाणी निवेदिली गेली आहेत, असे असले तरी अनेक ठिकाणी या दाव्यास पूर्ण भरवशा सह सादर करण्यात समाधान मानले गेले आहे. कारण सूर्याचे आगमन तो सूर्य असल्याचे प्रमाण असते कुरआनाची प्रत्येक आयत ती अल्लाहची वाणी असण्याचे प्रमाण होय आणि जो मनुष्य देखील सद्भावनेने याचा अभ्यास करील त्यास याची ओळख करुन घेण्यात कसलीच अडचण उद्भवणार नाही. सूरह बकराच्या आरंभी देखील हा मजकूर उल्लेखिला गेला की हा अल्लाहचा ग्रंथ असण्याबद्दल कोणत्याही संश्यास जागा नाही. पहा सूरह बकरा टीप क्र. २

३. अभिप्रेत पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) होत

४. स्पष्टीकरणा साठी पहा सूरह कसस टीप क्र. ९१

५. याचे स्पष्टीकरण सूरह अअराफ टीप क्र. ८२ मध्ये केले गेले आहे.

६. याचे स्पष्टीकरण सूरह अअराफ टीप क्र. ८३ मध्ये केले गेले आहे.

७. म्हणजे एवढी स्पष्ट गोष्ट देखील तुमच्या लक्षात येत नाही काय की ज्या अल्लाहने या सृष्टीस अतिशय योजना बद्ध रित्या निर्माण केले आहे व त्यानंतर त्यावर आपला सत्ताधिकार चालवित आहे, त्याला सोडून दुसरा कोण आहे जो तुमचा कार्य साधक होऊ शकतो आणि असा कोण आहे जो त्याच्या समोर तुमच्यासाठी शिफारस करणारा बनून उभा होईल व तुम्हाला मुक्तिचा परवाना दिल्याखेरीज राहणार नाही. संपूर्ण सृष्टीत अशी कोणतीही हस्ती अस्तित्वात नाही जी अल्लाहच्या विरोधात ही शक्ति व सामर्थ्य बाळगत असावी.

८. अर्थात सर्वश्रेष्ठ अल्लाह या सृष्टीची योजनाबध्द रित्या त्या व्यवस्ता चालवीत आहे. जमीनी करीता त्याची प्रत्येक योजना व प्रत्येक स्कीम इहलोकीय दिवसाच्या हिशोबाने हजार वर्षाची असते. खरे तर त्याच्या दृष्टीने हा अवधि केवळ एक दिवसाचाच असतो. ज्यात ही योजना लागू होऊन पूर्णतेस पोहचते मग हा मामला त्याच्या कडे परततो म्हणजे शेवटी प्रत्येक गोष्ट त्याच्या कडेच परतते व त्याच्या समोरच हजर होते ही आयात संदिग्ध सुक्ति पैकी आहे म्हणून कोणत्याही विवादात न पडता आम्ही या संक्षिप्त ज्ञाना वर समाधान बाळगले पाहीजे आणि जेथपावेतो हजार वर्षाच्या दिवसाचा संबंध आहे तर ही काही अशी गोष्ट नव्हे जी बुद्धि पासून दूर असावी तर्कशास्त्रीय दृष्टया तर मनुष्य हे समजु शकतो की ज्याची आम्ही २४ तासांचा दिवस अशी गणना करतो तो एक दिवस व एक रात्र या अवधिचा असतो आणि सूर्याच्या उदय व अस्ताच्या परिणामी अस्तित्वात येतो परंतु सूर्याच्या पातळी वर जेथे रात्री चे अस्तित्व च नाही 'दिवसा'ची गणना करण्या करीता हे परिमाण निरर्थक ठरेल आणि येथपावेतो आजच्या विज्ञानाचा संबंध आहे, अंतरीक्ष विज्ञानाने वेळो वेळी आमच्या ज्ञानात फार मोठी भर घातली आहे. उदाहरणार्थ हे की जर पृथ्वीवर सौर्य वर्ष ३६५ दिवसांचे असते तर मंगळा (भु)वर या हिशोबाने ६८७ दिवसांचे गुरु (Jupiter) ग्रहा वर सुमारे १२ वर्षाचे, शनी ग्रहावर २९ वर्षाचे, आणि प्लेटो ग्रहा वर २४८ वर्षाचे कारण हे ग्रहण या दीर्ध काळात सूर्याभोवती आपली प्रदक्षिणा पूर्ण करतात दिवस आणि वर्षाची ही तफावत कुरआनाच्या या निवेदनाचे समर्थन करते की अल्लाहच्या जवळ दिवसाचे परिमाण वेगळे आहे व त्यानुसार त्याचा एक दिवस आमच्या हजार वर्षा इतका असतो. अधिक स्पष्टीकरणा साठी पहा सूरह हज्ज टीप क्र. ८४

९. संकेत या गोष्टी कडे आहे की तो अर्थात अल्लाह आपल्या संपूर्ण ज्ञान, कमालीचे सामर्थ्य व आपल्या व्यापक कृपे निशी या सृष्टीची व्यवस्था चालवित आहे.

१०. म्हणजे ज्याच्या कडून जे काम घ्यावयाचे होते त्यास अनुरुप असे आस्तित्व त्याला प्रदान केले.त्याने निर्माण केलेल्या प्रत्येक गोष्टीत वस्तुतः संतुलन ही आहे,व योग्यता ही आणि हे या गोष्टी चे लक्षण होय की या समस्त वस्तूना निर्माण करणारा कमालीचे सामर्थ्य बाळगणारा ही आहे व अत्याधिक सुंदर देखील.

११. म्हणजे आदमला माती पासून निर्माण केले गेले.

८. मग त्याचे वंश तुच्छ पाण्याच्या सारा द्वारे चालविला.[१२]

ثُمَّ جَعَلَ نَسْلَهُ مِنْ سُلٰلَةٍ مِّنْ مَّآءٍ مَّهِيْنٍ ﴿٨﴾

९. मग त्यास दुरुस्त केले [१३] व त्यात आपला आत्मा फूंकला [१४] आणि तुमच्या साठी कान, डोळे व हृदय बनविले [१५] तुम्ही लोक कमीच कृतज्ञता व्यक्त करतात.[१६]

ثُمَّ سَوّٰىهُ وَنَفَخَ فِيْهِ مِنْ رُّوْحِهٖ وَجَعَلَ لَكُمُ السَّمْعَ وَالْاَبْصَارَ
وَالْاَفْـِٕدَةَ ۭ قَلِيْلًا مَّا تَشْكُرُوْنَ ﴿٩﴾

१०. हे लोक म्हणतात, जेव्हा आम्ही जमीनीत मिसळून नष्ट होऊन जाऊ तर काय आम्हाला पुन्हा नव्याने निर्माण केले जाईल? खरे पाहता, हे लोक आपल्या पालन कर्त्याच्या भेटीचा च इन्कार-करणारे आहेत.[१७]

وَقَالُوْٓا ءَاِذَا ضَلَلْنَا فِي الْاَرْضِ ءَاِنَّا لَفِيْ خَلْقٍ جَدِيْدٍ ۬ ۭ
بَلْ هُمْ بِلِقَاۗءِ رَبِّهِمْ كٰفِرُوْنَ ﴿١٠﴾

११. सांगा तुम्हाला मरण देतो मृत्युचा तो फिरीश्ता (दूत) जो तुमच्यावर नेमलेला आहे. मग तुम्ही आपल्या पालन कर्त्याकडे परतविले जाल.[१८]

قُلْ يَتَوَفّٰىكُمْ مَّلَكُ الْمَوْتِ الَّذِيْ وُكِّلَ بِكُمْ ثُمَّ اِلٰى رَبِّكُمْ
تُرْجَعُوْنَ ﴿١١﴾

१२. आणि जर तुम्ही यांना (त्या वेळच्या स्थितीत) पाहीले असते जेव्हा हे अपराधी आपल्या पालन कर्त्या समोर नतमस्तक असतील. हे आमच्या पालन कर्त्या आम्ही पाहीले व ऐकले. आम्हाला परत पाठव, आम्ही सत्कृत्ये करु. आम्ही विश्वास बाळगणारे आहोत.[१९]

وَلَوْ تَرٰٓى اِذِ الْمُجْرِمُوْنَ نَاكِسُوْا رُءُوْسِهِمْ عِنْدَ رَبِّهِمْ ۭ رَبَّنَآ اَبْصَرْنَا
وَسَمِعْنَا فَارْجِعْنَا نَعْمَلْ صَالِحًا اِنَّا مُوْقِنُوْنَ ﴿١٢﴾

१३. आम्ही इच्छिले असते तर प्रत्येक मनुष्याला याचे मार्गदर्शन केले असते [२०] परंतु माझी ती गोष्ट पूर्ण होईल की मी जहन्नम ला जिन्न व माणसे या सर्वांनी भरुन टाकीन.[२१]

وَلَوْ شِئْنَا لَاٰتَيْنَا كُلَّ نَفْسٍ هُدٰىهَا وَلٰكِنْ حَقَّ الْقَوْلُ مِنِّيْ
لَاَمْلَئَنَّ جَهَنَّمَ مِنَ الْجِنَّةِ وَالنَّاسِ اَجْمَعِيْنَ ﴿١٣﴾

१४. तेव्हा आता चाखा गोडी या गोष्टी ची की तुम्ही या दिवसा ची हजेरी विसरले होते. आम्ही देखील तुम्हाला विसरलो आहोत [२२] आता तुम्ही आपल्या दुष्कृत्यांच्या मोबदल्यात सदैव कालीन शिक्षेची गोडी चाखा.

فَذُوْقُوْا بِمَا نَسِيْتُمْ لِقَاۗءَ يَوْمِكُمْ هٰذَا ۚ اِنَّا نَسِيْنٰكُمْ
وَذُوْقُوْا عَذَابَ الْخُلْدِ بِمَا كُنْتُمْ تَعْمَلُوْنَ ﴿١٤﴾

१२. अर्थात मानव वंशाचा क्रम विर्या सारख्या तुच्छ पाण्या च्या तत्वा (Essence)ने चालविला यालाच आजच्या गर्भशास्त्रीय परिभाषेत शुक्रजन्तु (Spermetozoa) हे नाव आहे.

१३. म्हणजे गर्भाला उत्पन्न केल्या नंतर त्याचे अवयव दुरुस्त केले आणि त्याला यथा योग्य मनुष्य-स्वरुप दिले.

१४. अर्थात त्यात आत्मा सोडून जिवंत मनुष्य बनविला आत्म्याच्या अधिक स्पष्टीकरणा साठी पहा सूरह हिज्र टीप. क्र. २७.

भौतिक वाद्यांच्या दृष्टीने आत्म्याची काहीच हकीगत नाही. त्याच्या मते मनुष्य केवल शारीरिक अस्तित्व बाळगतो आणि जीवण म्हणजे सचेतावस्था. चेतना नाहीशी झाली तर त्यालाच मृत्यु म्हणावे प्रश्न हा उद्भवतो की जर आत्म्या चे कसलेही अस्तित्व नाही तर अशी ती कोणती गोष्ट आहे जी नाहीशी झाल्यानंतर ह्रदयाचे स्पंदन बंद पडते व माणूस मरण पावतो? हे मान्य करावे लागेल की ती एक सूक्ष्म व न दिसून येणारी वस्तू आहे, जी निघून गेल्यामुळे माणसाचे शरीर एक मृत प्रेत बनून राहते व यालाच अत्मा म्हणतात जो खरे तर अंतर्भूत मनुष्य होय. जर कणा कणात अणुशक्ति लपलेली असते तर माणसाच्या अंगी आत्म-शक्ति अस्तित्वात आहे या गोष्टीचा इन्कार करण्याचे काहीच कारण नाही. मग, शरीरात तर वेळो वेळी परिवर्तन होत असते नव्या पेशी जुन्या पेशींची जागा घेतात येथपावेतो की काही वर्षात एक नवीन शरीर जुन्या शरीराची जागा घेते मात्र अंतर्भूत मनुष्य जसाच्या तसाच बाकी राहतो. ज्याला 'स्वत:' किंवा 'मी' या अर्थाने घेतले जाते, आणि हेच 'स्वत्वइ' त्याचा अंगी निश्चितता निर्माण करते व त्याला इतराहून वेगळे बनविते म्हणूनच आत्म्याचा इन्कार म्हणजे वास्तविकतेचा इन्कार होय.

१५. म्हणजे ऐकण्याची, पाहण्याची व समजण्याची उत्कृष्ट पात्रता प्रदान करावी.

१६. म्हणजे तुम्हाला जे उत्कृष्ट अस्तित्व प्रदान केले गेले आहे त्याची जाणीव फार अल्प प्रमाणात तुमच्यात दिसून येते यास्तव मोठयाच प्रमाणात असे घडते की तुम्ही या बदूल आपल्या पालन कर्त्याशी कृतज्ञता व्यक्त करावी.

१७. म्हणजे मूलत: त्याना अल्लाह समोर हजर होण्या विषयीच इन्कार आहे. ते इच्छित नाही की उत्तरदायित्वा ची कल्पना स्विकारून स्वत:ला अल्लाहच्या आदेशांचे पालन करणारे बनवावे. म्हणूनच ते अल्लाह समोर हजर होण्याचा इन्कार या आक्षेपा आड करतात की माणसाचे शरीर तर मेल्यानंतर जमीनीत मिसळून नष्ट होते मग तो कियामतीच्या दिवशी उठून उभा कसा राहील?

१८. अर्थात मेल्यावर माणसाचे अस्तित्व संपुष्टात येत नाही, किंबहुना त्याचे केवल शरीर नष्ट होते. खरे पाहता मृत्यु, आत्म्याचा जो आंतरीक मनुष्य आहे, शरीरापासून वेगळे होणे होय आणि हे कार्य नियमित पणे पार पडते. अल्लाहने प्रत्येक माणसाचा प्राण हरण करण्या करीता मृत्युचा फरिश्ता नियुक्त केला आहे.तो निर्धारीत वेळे वर प्राण शरीरापासुन वेगळे करुन पूर्णत: आपल्या ताब्यात घेतो मग अल्लाहचा जसा आदेश होतो त्यानुसार तो त्या आत्म्याशी व्यवहार करतो. येथपावेतो की कियामतीच्या दिवशी या आत्म्या करीता त्याचे शरीर दुसऱ्यांदा निर्माण केले जाईल व तो सशरीर आपल्या कर्त्या समोर जाब देण्यासाठी उभा राहील.

१९. म्हणजे कुरआन ज्या हकीगताना स्विकारण्याचे आवाहन करीत आहे त्याचा आज तर हे लोक इन्कार करीत आहे परंतु कियामतीच्या दिवशी जेव्हा ते याचे अवलोकन करतील तर आपल्या मागील वर्तना वर पश्चाताप करतील व आपल्या पालन कर्त्यास विनवतिल की आम्हाला जगात पुनश्च परत पाठविले जावे, यासाठी की सदाचारी बनावे. आज ते ज्या गोष्टीचा इन्कार करीत आहे उद्या तिच्यावर विश्वास जाहीर करतील कियामतीच्या दिवशी अपराध्यांची जी अवस्था असेल तिची ही एक झलक होय जी या आयतीत सादर केली गेली आहे. यासाठी की लोकांनी तोल सावरुन चालावे व आखिरतचा इन्कार करुन स्वत:ला अपराध्यां मध्ये सामील करु नये.

२०. म्हणजे वस्तुस्थितीचे अवलोकन केल्या नंतर कसोटीची कोणती ही संधी बाकी राहात नाही म्हणून आता जगात तुम्हाला पुन्हा परत पाठविण्यात काय हंशील? जर ईमान अशा रितीने अपेक्षित असते ज्यात तुमच्या बुध्दीची परीक्षा नसती तर अल्लाह ने प्रत्येक माणसाला अशा प्रकारे मार्गदर्शन केले असते की मग या पासून तोंड फिरविणे त्याला शक्य झाले नसते.

२१. अभिप्रेत सैतानामागे चालणारे मनुष्य व जिन्न होत यास्तव सूरह सॉद मध्ये ही गोष्ट स्पष्टीकरणासह निवेदिली आहे:

لَاَمْلَئَنَّ جَهَنَّمَ مِنْكَ وَمِمَّنْ تَبِعَكَ مِنْهُمْ اَجْمَعِيْنَ (ص:٨٥)

'मी तुझ्याने व जे यांच्या पैकी तुझे अनुसरण करतील, त्या सर्वांनी जहन्नम भरून टाकीन'. (सॉद: ८५)

२२. अल्लाह तर्फे विसरले जाण्याचा अर्थ असा की सर्वश्रेष्ठ अल्लाह यांच्यावर कृपादृष्टी करणार नाही व यांना या दुरावस्थेतच-खितपत पडू देईल.

१५. आमच्या आयतींवर केवळ तेच लोक ईमान बाळगतात, ज्यांना यांच्या द्वारे जेव्हा स्मरण दिले जाते तेव्हा सजद्यात जातात आणि आपल्या पालन कर्त्या चे प्रशांसे सह गुणगान करतात व गर्व keâj eße veen ec [२३]

إِنَّمَا يُؤْمِنُ بِآيَاتِنَا الَّذِينَ إِذَا ذُكِّرُوا بِهَا خَرُّوا سُجَّدًا وَسَبَّحُوا
بِحَمْدِ رَبِّهِمْ وَهُمْ لَا يَسْتَكْبِرُونَ ۩ ﴿١٥﴾

१६. त्यांची कूस बिछान्या पासून वेगळी राहते.आपल्या पालन-कर्त्यास भय व आशे सह पुकारतात आणि जे काही आम्ही त्यांना प्रदान केले आहे त्यातून खर्च करतात.[२४]

تَتَجَافَىٰ جُنُوبُهُمْ عَنِ الْمَضَاجِعِ يَدْعُونَ رَبَّهُمْ خَوْفًا وَطَمَعًا
وَمِمَّا رَزَقْنَاهُمْ يُنْفِقُونَ ﴿١٦﴾

१७. आणि कोणता ही मनुष्य जाणत नाही की त्यांच्या आचरणाचा मोबदला म्हणून त्यांच्या डोळयांच्या शीतलते ची कोणती सामुग्री त्यांच्या पासून गुप्त ठेवली गेली आहे.[२५]

فَلَا تَعْلَمُ نَفْسٌ مَا أُخْفِيَ لَهُمْ مِنْ قُرَّةِ
أَعْيُنٍ جَزَاءً بِمَا كَانُوا يَعْمَلُونَ ﴿١٧﴾

१८. मग काय तो मनुष्य, जो ईमान बाळगणारा आहे,त्या माणसा सारखा होईल जो दुराचारी आहे.[२६] दोन्ही कदापि समान होऊ शकत नाही.[२७]

أَفَمَنْ كَانَ مُؤْمِنًا كَمَنْ كَانَ فَاسِقًا ۚ لَا يَسْتَوُونَ ﴿١٨﴾

१९. ज्या लोकांनी ईमान बाळगले व ज्यांनी सत्कृत्ये केलीत तर त्यांच्या साठी निवास बागा आहेत.[२८] त्यांच्या आचरणाच्या मोबदत्यात आतिथ्य [२९] म्हणून.

أَمَّا الَّذِينَ آمَنُوا وَعَمِلُوا الصَّالِحَاتِ فَلَهُمْ
جَنَّاتُ الْمَأْوَىٰ نُزُلًا بِمَا كَانُوا يَعْمَلُونَ ﴿١٩﴾

२०. आणि ज्यांनी अवज्ञा केली [३०] त्यांचे ठिकाण (जहन्नमची) आग आहे. जेव्हा जेव्हा ते यातून बाहेर पडू इच्छितील, त्यात-ढकलून दिले जातील आणि त्यांना सांगितले जाईल चाखा आता या आगी च्या शिक्षेची गोडी जिला तुम्ही खोटे ठरवित राहीलात.

وَأَمَّا الَّذِينَ فَسَقُوا فَمَأْوَاهُمُ النَّارُ ۖ كُلَّمَا أَرَادُوا أَنْ يَخْرُجُوا
مِنْهَا أُعِيدُوا فِيهَا وَقِيلَ لَهُمْ ذُوقُوا عَذَابَ النَّارِ الَّذِي
كُنْتُمْ بِهِ تُكَذِّبُونَ ﴿٢٠﴾

२१. आणि आम्ही यांना या मोठया शिक्षे आधी ऐहिक शिक्षा-यातनांची गोडी चाखवू ,अशासाठी की यानी रुजू करावे.[३१]

وَلَنُذِيقَنَّهُمْ مِنَ الْعَذَابِ الْأَدْنَىٰ دُونَ الْعَذَابِ
الْأَكْبَرِ لَعَلَّهُمْ يَرْجِعُونَ ﴿٢١﴾

२२. आणि त्याहून मोठा अत्याचारी कोण असेल ज्याला त्याच्या पालन कर्त्याच्या आयती द्वारे स्मरण दिले जावे व त्याने या पासून तोंड फिरवावे अशा अपराध्यांना आम्ही निश्चित शिक्षा देऊ. पारा२१

وَمَنْ أَظْلَمُ مِمَّنْ ذُكِّرَ بِآيَاتِ رَبِّهِ ثُمَّ أَعْرَضَ عَنْهَا ۚ
إِنَّا مِنَ الْمُجْرِمِينَ مُنْتَقِمُونَ ﴿٢٢﴾

२३. इन्कार करणाऱ्यांच्या विरोधात ही त्या लोकांची दशा निवेदिली गेली आहे जे ईश्वर संदर्भात गर्वोनमत्त नाहीत. आणि ना त्यांनी आपल्या दास असण्याच्या स्वाभाविक जाणीवेस मिटविले आहे. अशा लोकांना जेव्हा अल्लाहच्या आयती ऐकवून स्मरण घडविले जाते तर त्यांच्या प्रभावित होण्याची दशा असी असते की ते अल्लाह समोर माथा टेकून सजदारत होतात. आणि त्यांच्या जीभेवर स्तुती प्रशंसेची वचने जारी होतात. असेच लोक पुढाकार घेऊन पैगंबरांच्या आवाहनास स्विकारतात व अल्लाहच्या आयतींवर ईमान बाळगतात. ही सजद्यांची आयत होय म्हणून हिच्या पठणानंतर सजदा केला पाहीजे.

२४. हा ईमान बाळगणात्यांच्या त्या गुणविशेषांचा उल्लेख आहे जे ईमान मुळे त्यांच्या अंगी निर्माण झाले आहेत. ना त्यांच्या रात्री अल्लाहच्या स्मरणा विरहीत असतात आणि ना दिवस, येथपावेतो की रात्री ते आपले बिछाने सोडून अल्लाहच्या उपासनेत मगन होतात. व त्याच्या जवळ प्रार्थना करु लागतात. त्यांची हीच दुआ भय व आशा या दोन्ही भावना सह असते. म्हणजे ते अल्लाहच्या शिक्षेचे भय बाळगतात व त्यांच्या दया-कृपेची आशा ही बाळगतात अशा प्रकारे त्यांची दिनचर्या केवळ अर्थोपार्जना साठी नसते, किबहुना या सोबतच ते आखिरतचे यश प्राप्त करण्या ची ही उपाय योजना करतात. यास्तव ते अल्लाहने प्रदान केलेल्या धन संपदेतून त्याच्या मार्गात खर्च करतात.

२५. या आयतीत उल्लिखित गुणविशेष बाळगणाऱ्यांना जी खुशखबर ऐकविली गेली आहे तिची कल्पनाच मनाची शांती व नेत्रांची शीतलता (नेत्र सुख) कारक होय. कुरआनात जन्नतचा जो परिचय प्रस्तुत केला गेला आहे तो जणू एक झळक होय जी शब्द शैलीत दाखविली गेली आहे. अन्यथा जन्नतच्या देणग्यांचा या जगात कसलीच कल्पना केली जाऊ शकत नाही. या आयतीचे उतकृष्ट स्पष्टीकरण ते होय जे हदीस वचनात निवेदिले गेले आहे.

قَالَ اللّٰهُ تَبَارَکَ وَتَعَالیٰ :اَعْدَدْتُ لِعِبَادِیَ الصَّالِحِیْنَ مَالَاعَیْنٌ رَأَتْ وَلَا اُذُنٌ سَمِعَتْ وَلَا خَطَرَ عَلیٰ قَلْبِ بَشَرٍ۔ (بخاری کتاب التفسیر)

‘सर्वश्रेष्ठ अल्लाह फर्मावितो, मी आपल्या नेक (सदाचारी) दासां करीता अशा देणग्या करून ठेवल्या आहेत ज्यांना ना एखाद्या डोळयाने पाहीले, ना एखाद्या काना ने ऐकले आणि ना एखाद्या माणसाच्या मनात या विषयी कल्पना आली.

(बुखारी किताबुत्तफसीर)

२६. दूराचारी शी अभिप्रेत अल्लाह ची अवज्ञा करणारा हा शब्द या ठिकाणी मोमीन (ईमान बाळगणारा) या शब्दाच्या विरुद्धार्थी वापरला गेला आहे म्हणून याचा अर्थ काफीर होय जो पूर्णपणे अल्लाहची अवज्ञा करणारा असतो.

२७. म्हणजे जेव्हा दोघांचे आचरण समान नाही तेव्हा दोघांचा शेवट समान कसा असू शकता?

२८. म्हणजे अशी उद्याने जिथे ते वास्तव्य करतील.

२९. म्हणजे या बागा अशा मान-सन्माना सह प्रदान केल्या जातील की जणू ही अल्लाहच्या अतिर्थी करीता आतिथ्य सामुग्री होय.

३०. अभिप्रेत काफीर होत जे अल्लाह चे अवज्ञा कारी बनत राहीलेत.

३१. अभिप्रेत ऐहीक संकटे होत ज्यात काफिरांना अशासाठी ग्रस्त केले जाते की यांच्या दुष्कृत्यांच्या शिक्षेची एक किस्त यांना जगातच मिळावी व या साठी की त्यांनी सचेत व्हावे आणि अल्लाहकडे रुजू करावे.

आजच्या काळात संकटे देखील नवनवीत स्वरुपात येत आहेत. रेल्वे, बस, व विमान-आपघात फारच दु:खदायक असतात तसेच बॉम्ब स्फोट व आगीच्या घटना मोठया प्रमाणात होतात अर्थात माणसाला माणसाच्या हातून आपल्या दुष्कृत्यांची गोडी चाखावी लागत आहे. परंतु लोकांच्या कठोर हृदया ची ही दशा आहे की एवढे मनस्ताप व दु:ख देणारे प्रसंग आपल्या डोळयांनी पाहून ही ते अल्लाहला शरण जात नाही.

२३. आम्ही मूसा ला ग्रंथ प्रदान केला होता, यास्तव तुम्ही याच्या प्राप्ती संबंधी संशय ग्रस्त होऊ नका [३२] आणि आम्ही त्या (ग्रंथा) संबंधी ईस्त्राईल करीता मार्गदर्शन बनविले होते.

وَلَقَدْ اٰتَيْنَا مُوْسَى الْكِتٰبَ فَلَا تَكُنْ فِىْ مِرْيَةٍ
مِّنْ لِّقَآئِهٖ وَجَعَلْنٰهُ هُدًى لِّبَنِىْٓ اِسْرَآءِيْلَ ﴿٢٣﴾

२४. आणि आम्ही त्यांच्यात नेते निर्माण केले जे आमच्या आदेशाने मार्गदर्शन करीत होते खरे पाहता त्यांनी सहनशीलता पाळली आणि आमच्या आयतींवर विश्वास ठेवत होते.[३३]

وَجَعَلْنَا مِنْهُمْ اَئِمَّةً يَّهْدُوْنَ بِاَمْرِنَا لَمَّا صَبَرُوْا ؕ
وَكَانُوْا بِاٰيٰتِنَا يُوْقِنُوْنَ ﴿٢٤﴾

२५. नि:संशय तुमचा पालन कर्ताच कियामतीच्या दिवशी त्या गोष्टींचा फैसला करील ज्यात हे मतभेद करीत राहीलेत.[३४]

اِنَّ رَبَّكَ هُوَ يَفْصِلُ بَيْنَهُمْ يَوْمَ الْقِيٰمَةِ فِيْمَا كَانُوْا
فِيْهِ يَخْتَلِفُوْنَ ﴿٢٥﴾

२६. काय यांच्या करीता ही गोष्ट मार्गदर्शन कारक ठरली नाही की यांच्या पूर्वी आम्ही किती तरी जन समूहांना नष्ट करून टाकले आहे ज्यांच्या वस्त्यां मध्ये हे हिंडत फिरत असतात.[३५] नि:संशय यात मोठया निशाण्या आहेत मग काय हे लोक ऐकत नाही?[३६]

اَوَلَمْ يَهْدِ لَهُمْ كَمْ اَهْلَكْنَا مِنْ قَبْلِهِمْ مِّنَ الْقُرُوْنِ
يَمْشُوْنَ فِىْ مَسٰكِنِهِمْ ؕ اِنَّ فِىْ ذٰلِكَ لَاٰيٰتٍ ؕ اَفَلَا يَسْمَعُوْنَ ﴿٢٦﴾

२७. काय हे पाहत नाही की आम्ही पाण्या स पडित जमीन कडे नेतो मग त्या पासून शेती उगवितो ज्यापासून यांची गुरे ही खाद्य खातात व हे स्वत: देखील [३७] मग काय यांचे डोळे उघडत नाही ?[३८]

اَوَلَمْ يَرَوْا اَنَّا نَسُوْقُ الْمَآءَ اِلَى الْاَرْضِ الْجُرُزِ فَنُخْرِجُ بِهٖ
زَرْعًا تَاْكُلُ مِنْهُ اَنْعَامُهُمْ وَاَنْفُسُهُمْ ؕ اَفَلَا يُبْصِرُوْنَ ﴿٢٧﴾

२८. हे लोक म्हणतात हा फैसला केव्हा होईल जर तुम्ही सच्चे आहात?

وَيَقُوْلُوْنَ مَتٰى هٰذَا الْفَتْحُ اِنْ كُنْتُمْ صٰدِقِيْنَ ﴿٢٨﴾

२९. सांगा फैसल्याच्या दिवशी ईमान बाळगणे त्या लोकाँ साठी किंचित ही लाभदायक ठरणार नाही ज्यांनी कुफ्र केले आहे आणि ना त्यांना सवड दिली जाईल.[३९]

قُلْ يَوْمَ الْفَتْحِ لَا يَنْفَعُ الَّذِيْنَ كَفَرُوْٓا اِيْمَانُهُمْ وَلَا هُمْ
يُنْظَرُوْنَ ﴿٢٩﴾

३०. तर यांची उपेक्षा करा आणि प्रतिक्षा करा हे देखील वाट पाहत आहेत. [४०]

فَاَعْرِضْ عَنْهُمْ وَانْتَظِرْ اِنَّهُمْ مُّنْتَظِرُوْنَ ﴿٣٠﴾

३२. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या माध्यमान्वये समस्त संबोधितांना उद्देशून हे फर्माविले गेले आहे आणि हे स्पष्ट करण्याचा हेतु आहे की इतिहासात ही काही पहीलीच घटना नाही की तुम्हाला अल्लाह तर्फे ग्रंथ लाभला, किबहुना या पुर्वी ही सर्वश्रेष्ठ अल्लाह पैगंबरांवर ग्रंथ अवतरीत करीत राहीला आणि हे सर्वांना माहित आहे की या पूर्वी हजरत मूसा यांना ग्रंथ प्रदान केला गेला होता तेव्हा कुरआन प्रदान केले जाण्याबद्दल लोकांनी संशयात पडण्याचे काही कारण नाही. अधिक स्पष्टीकरणा साठी पहा सूरह युनुस आयात ९४ टीप क्र. १४५ आणि सूरह हूद आयत क्र. १७

३३. म्हणजे मूसा यांना जो ग्रंथ प्रदान केला गेला होता तो बनी इस्राईल वंशा करीता मार्गदर्शन कारक होता आणि या मार्गदर्शना मुळेच यांच्यात असे नेते निर्माण झाले जे अल्लाहच्या आज्ञेनुसार लोकांचे उचित मार्गदर्शन ठरले, अल्लाहने त्यांना सदाचारी नेतृत्वाचे स्थान अशासाठी प्रदान केले होते की त्यांनी सत्या वर अटळ रहावे आणि अल्लाहच्या आयती वर त्यांना पूर्ण विश्वास होता म्हणजे त्यांची श्रद्धा केवळ पांरपारीक स्वरुपाची नव्हती, तर दृढ विश्वासा सह होती आणि या नेतृत्वा ने बनी इस्राईल वंशास उपकृत केले गेले जेव्हा त्यांनी धैर्य व सहनशीलता आणि ईमान व विश्वास या पुरावा दिला. या ऐतिहासिक वस्तुस्थितीस निवेदन करण्याचा हेतु या गोष्टी कडे इशारा करणे होय की जर तुम्ही लोक कुरआन धारक होऊन उभे राहाल तर सर्वश्रेष्ठ अल्लाह तुम्हाला देखील उच्चता प्रदान करील व तुमच्या अंगी सदाचारी नेतृत्वास वृध्दिगत करील.

आज मुसलमान या गोष्टी ची तक्रार करतात की त्यांना सदाचारी नेतृत्व उपलब्ध नाही. परंतु समाजाची स्थिती अशी आहे की लोकांना भावनांशी खेळणारे व उत्तेजक भाषणे करणारे नेते पसंत आहेत. ते ना कुरआनाच्या मार्गदर्शनानुसार चालण्यास तयार आहेत आणि ना ते सदाचारी लोकांचे म्हणणे ऐकतात अशा स्थितीत सदाचारी नेतृत्व कशा प्रकारे पुढे येईल?

३४. वरील आयतीत बनी इस्राईल च्या उत्कर्षाचा उल्लेख होता व या आयतीत त्यांच्या ऱ्हासाची स्थिती निवेदिली गेली आहे. त्यांच्या ऱ्हासाचे मूळ कारण धर्माच्या स्पष्ट व आधारभूत गोष्टी संदर्भात त्यांचे मतभेदात पडणे व विवादग्रस्त होणे. या मतभेदांचा अंतिम निर्णय अल्लाहच्याच न्यायालयात होईल ज्या करिता कियामती चा दिवस निर्धारीत आहे.

३५. हे अरब देशीय अनेकेश्वरवाद्यांना उद्देशून आहे, ज्याचे, आद समूह, शोअब जनसमूह व लूत जनसमूह इत्यादिच्या ऊध्वस्त वस्तींवरुन जाणे झाले होते.

३६. म्हणजे या घटनांमध्ये बोध प्रद अशा ज्या गोष्टी आहेत, त्यांना कुरआन स्पष्टत: उकलून निवेदन करीत आहे, परंतु हे लोक काहीच ऐकत व समजत नाही.

३७. म्हणजे काय यात अल्लाहच्या ईशत्वाच्या व त्याच्या सामर्थ्याच्या निशाण्या यांना दिसून येत नाही आणि काय हे अवलोकन यांच्यात या गोष्टीचा विश्वास निर्माण करीत नाही की अल्लाह मृतांत जिवंत करण्यास समर्थ आहे.

३८. म्हणजे ईमान बाळगणारे व काफीर यांच्या दरम्यान ज्या फैसल्याची तुम्ही खबर देत आहात व असे म्हणत आहात की या फैसल्यात केवळ ईमान बाळगणारेच यशस्वी होतील व काफीर जहन्नम मध्ये फेकून दिले जातील तर ही गोष्ट केव्हा घडून येईल?

३९. म्हणजे तुम्ही या विवादात पडण्या ऐवजी की ती निर्णायक घडी केव्हा येईल, या गोष्टीची काळजी करावयास पाहीजे की त्या दिवशी तुम्ही आपला बचाव कशा प्रकारे करु शकाल, कारण ती वेळ तर अपरिहार्यत: येईलच त्या वेळी जर तुम्ही इच्छिले तर ज्या अर्थी परीक्षेची वेळ निघून गेलेली असेल म्हणून त्या वेळी तुमचे ईमान बाळगणे अगदीच व्यर्थ ठरेल आणि जी सवड तुम्हाला आज लाभत आहे ती दुसऱ्यांदा लाभणार नाही.

४०. म्हणजे जर हे या मजबूत प्रमाण व विश्वास निर्माण करणाऱ्या या आयती नंतर ही ईमान बाळगण्यास तयार नाहीत तर त्यांना त्यांच्या दशेवर सोडून द्या व त्या क्षणाची प्रतिक्षा करा जेव्हा सर्वश्रेष्ठ अल्लाह आपल्या निर्णयास लागू करील. त्या लोकांना ही याच गोष्टीची प्रतिक्षा आहे.

# ३३. सूरह अल अहजाब

**नाव :** आयात क्र. २० मध्ये अहजाब म्हणजे अशा समूहांचा उल्लेख केला गेला ज्यांनी ईमान बाळगणाऱ्यां विरुद्ध संगठीत होऊन मदीना वर आक्रमण केले होते. तद्नुषंगाने या सूरह चे नाव अहजाब आहे.

**अवतरण काळ :** मदनी आहे आणि अहजाब युध्दानंतर अवतरली जे शव्वाल हिजरी सन ५ मध्ये उद्‌भवले होते.

**मध्यवर्ती कल्पना :** प्रेषित पद, त्याच्या निकडी आणि पैगंबरांशी ईमान बाळगणाऱ्यांचे वर्तन इ. गोष्टी घटनांच्या माध्यमात.

**आयत रचना :** आयत क्र. १ ते ३ प्रस्तावना स्वरुप आयती होत. ज्यात पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना काफीर व दांभिक लोकांच्या कथनाला बळी न पडण्यांची व अल्लाह वर भरवसा ठेवून ईश. अदेशाचे अनुसरण करण्याची ताकीद केली गेली आहे.

आयत क्र. ४ ते ८ मध्ये मानस-पुत्राच्या विधीच्या सुधारणे वर जोर देत पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्याशी ईमान बाळगणाऱ्यांच्या संबंधास तसेच त्यांच्या पत्न्यांच्या स्थानास स्पष्ट केले गेले आहे. त्या सोबतच या वचना चेही स्मरण घडविले गेले आहे जे प्रत्येक पैगंबरा कडून अल्लाहच्या धर्माचे प्रमाणिक अनुसरण करण्या संदर्भात घेतले गेले आहे.

आयत क्र. ९ ते २७ मध्ये अहजाब युद्ध व बनी कुरैजा युद्धा वर टिपणी करीत या गोष्टीस उघड केले गेले आहे की अशा नाजुक परिस्थितीत कशा प्रकारे अल्लाहची मदत प्रकट झाली. आणि हे या गोष्टीचे प्रमाण होय की ईमान बाळगणऱ्यां ंच्या कार्य सिद्धी करिता अल्लाह पुरेसा आहे. यास्तव त्यांनी कोणाची ही पर्वा न करता अल्लाहच्याच भरवशावर आपल्या धार्मिक जबाबदाच्या पार पाडाव्या.

आयत क्र. २८ ते ३४ मध्ये पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या पत्नींना संबोधून त्यांना आपले स्थान व त्या अनुशंघाने त्यांच्या जबाबदाच्या विशद केल्या गेल्या आहेत.

आयत क्र. ३५ ते ४० मध्ये मानस-पुत्रा च्या पत्नी शी विवाह न करण्याची प्रथा संपुष्टात आल्याची घोषणा केली गेली आहे. आणि या आदेशाच्या सुधारणे बाबत हजरत जैनब यांच्या शी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या निकाह ची घटना प्रस्तुत केली गेली आहे.

आयत क्र. ४१ ते ४४ मध्ये ईमान बाळगणाऱ्यांना अल्लाहचे नाम : स्मरण करण्याची ताकीद करीत ईश-कृपा व मोबदल्याची खुशखबरी दिली गेली आहे.

आयत क्र. ४५ ते ४८ मध्ये पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना संबोधित करून त्यांच्या प्रेषित्वाची शान स्पष्ट केली गेली आहे.

आयत क्र. ४९ ते ५२ मध्ये प्रथम तलाक चा एक प्रश्न निवेदिला गेला आहे. त्यानंतर पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना आपल्या पत्नींशी संबंधा विषयी खास आदेश दिले गेले आहेत.

आयत क्र. ५३ ते ६२ मध्ये पडदा (गोषा) चे आदेश दिले गेले आहेत. आयत क्र. ६३ ते ६८ मध्ये कयामत व आखिरत चा उल्लेख केला गेला आहे.

आयत क्र. ६९ ते ७२ मध्ये ईमान बाळगणाऱ्यांना आपल्या जबाबदारींची जाणीव देत दांभिक मुसलमानांना तंबी दिली गेली आहे. कुरआन बाबत संशय निर्माण करणारी कथने: रिवायती (कथनां) मध्ये काही रिवायती अशा हि आहेत ज्या हे दर्शवितात की सूरह-अहजाब मध्ये दोनशे आयती होत्या, परंतु जेव्हा हजरत उस्मान यांनी ग्रंथाला लिखित स्वरुप दिले तेव्हा ते केवळ एवढयाच आयती लिहू शकले जेवढया आज कुरआनात अस्तित्वात आहेत. या कथनाचा उल्लेख करुन अल्लामा आलुसी यांनी लिहीले आहे की यावरुन असे दिसून येते की कुरआनाचा काही भाग नाहीसा झाला परंतु अशा प्रकारची कथने मौजूअ (स्वरचित) च असू शकतात. वस्तुत: असे ते प्रत्येक कथन ज्यावरुन हे जाहीर होत असावे की कुरआनाचा काही भाग वाया गेला आहे, ते एकतर मनगढत आहे किंवा त्याचा अर्थ काही वेगळाच आहे (तफसीर रुहूल मआनी खंड-७ पृष्ठ-१४२)

वस्तुस्थिती अशी की मुसलमानां मध्ये जेव्हा विविध पंथ अस्तित्वात आले तेव्हा त्यांनी आपली श्रध्दा व आपल्या संप्रदायांच्या समर्थनार्थ अनेक कथन रचून घेतली व त्यांना अशा प्रकारे मिश्र केले की योग्य व अयोग्य यात फरक करणे कठीण झाले. विशेषत: हजरत अली यांच्या प्रशंसेत अतिशयोक्ति करणाऱ्यांनी व इमामत ची श्रद्धा निर्माण करणाऱ्यांनी तर एवढया मोठया प्रमाणत कथने रचली की धर्माचा पाया हादरुन गेला व कुरआना बाबत हा प्रभाव निर्माण करण्याचा प्रयत्न केला गेला की याच्या काही आयती गायब केल्या गेल्या आहेत

किंवा यात काही शब्द गायब केले गेले आहेत उदाहरणार्थ सूरह अहजाब ची आयत क्र. ७१

وَمَنْ يُطِعِ اللّٰهَ وَرَسُوْلَهٗ فَقَدْ فَازَ فَوْزًا عَظِيْمًا۔

''आणि जो अल्लाह व त्याच्या रसूल (पैगंबरा) चे आज्ञापालन करील तो मोठे यश प्राप्त करील.''

या आयती विषयी शिया संप्रदायाचे महत्वपूर्ण पुस्तक ''उसुलुलकाफी'' मध्ये अबु बसीर चे कथन आहे की हजरत जाफर सादीक यांनी फर्माविले ही आयत अशा प्रकारे अवतरली होती.

وَمَنْ يُطِعِ اللّٰهِ وَ رَسُولَهٗ (فِى وِلَايَةِ عَلِيٍّ وَوِلَا يَةِ الْاَئِمَّةِ مِنْ بَعْدِهٖ) فَقَدْ فَازَ فَوْزًا عَظِيْمًا۔

'जो कोणी अली व त्यांच्या नंतरच्या लोकां बाबत अल्लाह व पैगंबराचे आज्ञापालन करील मोठे यश प्राप्त करील (उसुलुल काफी खंड. १, पृष्ठ. ३४२ अल मकत्बा अल इस्लामिया तेहरान)

याचा प्रकारे 'उसूलुल काफी' या पुस्तकात हजरत जाफर सादीक द्वारे उल्लिखित आहे की हजरत जिब्रिल अलैहिस्सलाम, हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्यावर ही आयत घेऊन अवतरले होते,

يَاۤاَيُّهَا الَّذِيْنَ اُوْتُوا الْكِتَابَ اٰمِنُوْا بِمَا نَزَّلْنَا (فِى عَلِيٍّ) نُوْرًا مُّبِيْنًا

''हे ग्रंथ बाळगणाच्यांनो ईमान बाळगा त्या वर जे आम्ही अली विषयी अवतरीत केले आहे जो नूरे मुबीन (स्पष्ट तेज) आहे. (उसुलुल काफी, खंड १, पृष्ठ ३४५) परंतु ही आयत कुरआनात कोठे ही नाही. काही कथने अशी ही आहेत ज्यात पठण मतभेदाच्या नावाने काही आयतीत काही शब्द वाढविले गेले आहेत. उदाहरणार्थ हे की सूरह अहजाब ची आयत क्र. ६ मध्ये, وَاَزْوَاجُهٗ اُمَّهَاتُهُمْ (पैगंबराच्या पत्निया मुसलमानांच्या माता आहेत')-وَهُوَ اَبٌ لَّهُمْ (नंतर 'आणि पैगंबर मुसलमानांच्या बाप होत') हे शब्द वाढविले गेले आहेत आणि हा दावा सुद्धा केला गेला आहे की कुरआनात व्यभिचारी च्या शिक्षे करीता आयते रज्म (الشيخ والشيخة الخ) (दगडांचा मारा करण्यासंबंधी च्या आयती) होत्या, परंतु नंतर त्यांचे पठण रद्द केले गेले (पहा तफसीर इब्ने कसीर खंड,३ पृष्ठ ४६५) किंवा हे की हजरत अब्दुल्लाह बिन मसऊद यांच्या हस्त लिखिता मध्ये शेवटच्या दोन आयती म्हणजे मोअज्जतैन (शरण याचनेच्याप्रार्थना स्वरुप आयती) नव्हत्याच. अशा प्रकारच्या आयती रचून फार मोठया उपद्रवाची सामुग्री केली गेली आहे आणिखेदाची बाब अशी की भाष्यां मध्ये या स्वरुपाच्या कथनांनी स्थान प्राप्त केले. वस्तुत: ही कथने आपल्या मजकूराच्या दृष्टीनेच रद्द बातील ठरण्या जोग्या होती कारण कुरआनाने आपल्या रक्षणाची हमी स्वत:च दिली आहे.

اِنَّا نَحْنُ نَزَّلْنَا الذِّكْرَ وَاِنَّا لَهٗ لَحَافِظُوْنَ۔ (حجر۔۹)

'नि:संशय हे स्मरणिका घडविणारे कुरआन आम्हीच अवतरीत केले आहे व आम्हीच याचे संरक्षक आहोत. (हिज्र-९)

आणि ही गोष्ट सातत्याने व क्रमबध्दतेने सिध्द आहे व यावर समस्त मुस्लिम जनसमूहाचे एकमत आहे की जो ग्रंथ (कुरआन) आज आमच्या जवळ अस्तित्वात आहे ते परिपूर्ण कुरआन होय व त्यात तीळ मात्र फरक झालेला नाही. राहीला पठणा तील फरक तर त्याचा वाव याच मर्यादेप्रत असू शकतो ज्या मर्यादेप्रत अर्थाचा फरक घडून येत नसावा. उदाहरणार्थ सूरह गाशीया मध्ये (Text) **मुसैतर** हा शब्द प्रयुक्त झाला आहे हा शब्द **सॉद** चे उच्चार ने ही दुरूस्त अणि **सीन** ने ही परंतु जी कथने पढणाच्या अशा फरकाचे निवेदन करतात ज्याने अर्थाचा फरक जाहीर होतो, तर ती कदापि मान्य करण्या जोगी ठरु शकत नाही.याच संदर्भात इमाम राजी लिहीतात :

'एकाकी पठण सातत्यशील पठणास खोटे ठरवू शकत नाही, यास्तव आपल्या संप्रदायाच्या साठी सातत्याशील कुरआन पठणा वर विश्वास ठेवतो व यासाठी ही की जे पठण एकाकी असावे ते आमच्या दृष्टीने प्रमाण नव्हे कारण आमच्या दृष्टीने त्याचे स्वरुप कुरआनाचे कदापि नाही जर ते कुरआन पठण असते तर निश्चितच सातत्याशील असते आणि जर आम्ही या गोष्टीचा वाव काढला की कुरआनाचा एक भाग क्रमबध्देतेने स्थानांतरीत झाला नाही तर आम्ही राफजी लोकाकरीता व नास्तिकां करीता कुरआनात फेरबदल करण्याचा मार्ग उघडा करु व असे म्हटले जाऊ शकेल की कुरआनात अमुक अशा आयती होत्या ज्या हजरत अली यांच्या इमाम असण्या संबंधी धर्मशास्त्र संमत पुरावा होत्या परंतु आमच्या पर्यंत पोहचल्या नाहीत. व असे ही म्हटले जाईल की यात अनेक शरीयत विषयक आदेशांना रद्द ठरविणाच्या आयती होत्या, परंतु त्या सुद्धा आमच्या पर्यंत पोहचल्या नाहीत. परंतु हे सर्व या आधारावर खोटे आहे की जर हा भाग कुरआनाचा अंश असता तर निश्चितच सातत्य शील राहीला असता परंतु जेव्हा हा सातत्याने आमच्या पर्यंत आलेला नाही तर अपरिहार्यपणे तो कुरआनाचा अंश नव्हे. तेव्हा हे सिध्द झाले कि एकाकी पठण प्रमाण मुळीचह नव्हे.

(अत्तफसीरुल कबीर खंड ११ पृ. २२७)

# ३३.सूरतुल अहजाब

سُورَةُ الْأَحْزَابِ

(आयती. ७३)

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ

१. हे पैगंबर ![१] अल्लाहचे भय बाळगा आणि काफिरांचे व दांभिकांचे म्हणणे मानू नका [२] नि:संशय अल्लाह ज्ञान बाळगणारा व बुध्दि कौशल्य बाळगणारा आहे.[३]

يٰٓاَيُّهَا النَّبِيُّ اتَّقِ اللّٰهَ وَلَا تُطِعِ الْكٰفِرِيْنَ وَالْمُنٰفِقِيْنَ ۭ اِنَّ
اللّٰهَ كَانَ عَلِيْمًا حَكِيْمًا ①

२. अनुसरण करा त्या 'वही' (ईश-आदेशा) चे जी तुमच्या पालन कर्त्या तर्फे तुमच्यावर (अवतरीत) केली जात आहे [४] तुम्ही लोक जे काही करता त्या विषयी अल्लाह जाणकार आहे.

وَّاتَّبِعْ مَا يُوْحٰٓى اِلَيْكَ مِنْ رَّبِّكَ ۭ
اِنَّ اللّٰهَ كَانَ بِمَا تَعْمَلُوْنَ خَبِيْرًا ②

३. आणि अल्लाह वर भरवसा राखा [५] तो कार्य सिध्दी करीता पुरेसा आहे.

وَّتَوَكَّلْ عَلَى اللّٰهِ ۭ وَكَفٰى بِاللّٰهِ وَكِيْلًا ③

४. अल्लाहने कोणत्याही माणसाच्या छातीत दोन हृदये ठेवले नाहीत [६]आणि ना तुमच्या या पत्न्यांना, ज्यांना तुम्ही म्हणता की त्या तुमच्या करीता आईची पाठ आहे, तुमच्या माता बनविल्यात [७] आणि ना त्याने तुमच्या मानस (दत्तक) पुत्रांना तुमचे पुत्र बनविले आहे. [८] या तुमच्या तोंडा च्या गोष्टी होत. [९] परंतु अल्लाह सत्य गोष्ट सांगतो आणि तोच योग्य मार्गा कडे मार्गदर्शन करतो.[१०]

مَا جَعَلَ اللّٰهُ لِرَجُلٍ مِّنْ قَلْبَيْنِ فِيْ جَوْفِهٖ ۚ وَمَا جَعَلَ
اَزْوَاجَكُمُ الّٰٓـِٔيْ تُظٰهِرُوْنَ مِنْهُنَّ اُمَّهٰتِكُمْ ۚ وَمَا جَعَلَ اَدْعِيَاۗءَكُمْ
اَبْنَاۗءَكُمْ ۭ ذٰلِكُمْ قَوْلُكُمْ بِاَفْوَاهِكُمْ ۭ وَاللّٰهُ يَقُوْلُ الْحَقَّ وَهُوَ
يَهْدِي السَّبِيْلَ ④

५. त्यांना त्यांच्या पित्याच्या संबंधाने हाक मारा [११] ही अल्लाह च्या दृष्टीने न्यायपूर्ण गोष्ट होय [१२] आणि जर तुम्हाला ठाऊक नसेल की यांचे पिता कोण आहेत तर ते तुमचे धर्म-बंधू व मित्र होत. [१३] या बाबत जी चूक तुमच्यावर घडली, त्या साठी तुमच्यावर कसलाही ठपका नाही, मात्र त्या गोष्ट बद्दल निश्चितच पकड होईल जिचा निर्धार तुम्ही मन:पूर्व केला [१४] अल्लाह माफ करणारा, दया करणारा आहे.

اُدْعُوْهُمْ لِاٰبَاۗىِٕهِمْ هُوَ اَقْسَطُ عِنْدَ اللّٰهِ ۚ فَاِنْ لَّمْ تَعْلَمُوْٓا
اٰبَاۗءَهُمْ فَاِخْوَانُكُمْ فِي الدِّيْنِ وَمَوَالِيْكُمْ ۭ وَلَيْسَ عَلَيْكُمْ
جُنَاحٌ فِيْمَآ اَخْطَاْتُمْ بِهٖ ۙ وَلٰكِنْ مَّا تَعَمَّدَتْ قُلُوْبُكُمْ ۭ وَكَانَ
اللّٰهُ غَفُوْرًا رَّحِيْمًا ⑤

१. मूळ शब्द नबीयाचा अर्थ अल्लाह विषयी खबर देणारा (लिसानुल अरब. खंड-१ पृष्ट १६२) आणि कुरआनाच्या परिभाषेत यास अभिप्रेत असा मनुष्य होय ज्यावर अल्लाह तर्फे 'वह्य' (ईश आदेशाचे) अवतरण होत असावे. आणि तो या खास ज्ञान-माध्यमाच्या आधारे लोकांना अल्लाह विषयी खबरी देत असावा व त्याचे आदेश ऐकवित असावा.

या ठिकाणी संबोधन कुरआनाचे पैगंबर हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या शी आहे. कुरआनात पैगंबरांना कोठेही त्यांच्या नावाने संबोधले गेले नाही, किंबहुना प्रेषित पदा सह संबोधिले गेले आहे अर्थात या मुहम्मद (हे मुहम्मद) असे फर्माविले गेले आहे, ''या अय्युहन्नबिय्यु'' ياايهاالنبى (हे पैगंबरा) असे फर्माविले गेळे ज्याने पैगंबराची उच्च शान ही व्यक्त होते व त्यांच्या संबंधाने एक विशेष आदर शिष्टाचार बाळगण्याची ताकीद ही मिळते कारण ते तत्कालीन पैगंबर होते.

२. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना हा ताकीद पूर्ण आदेश अशा प्रसंगी दिला गेला जेव्हा कौटुंबिक जीवना (Family Life) संबंधी एका समस्येबाबत सुधारणेचे पाऊल उचलणे आवश्यक होते आणि हे या गोष्टीचे प्रमाण होय की शरीअत त्यांनी स्वत: रचलेली बाब नव्हे, तर अल्लाहच्या आदेशांवर आधारीत आहे जिचे पालन करणे पैगंबरानाही बंधनकारक होते. आयतीचा अर्थ असा की कोणत्याही शरीअत विषयक आदेशाचे पालन करण्यात, मग तो प्रचलीत रीती रिवाजांच्या विरुध्द का असेना, कसलाही संकोच करता कामा नये आणि ना काफिर व दांभिकांचे टोमणे व त्यांच्या तर्फे केल्या जाणाऱ्या अपप्रचारा ची पर्वा केली पाहीजे. किंबहुना अल्लाहचे असे भय अंगिकारले पाहीजे की ज्यामुळे या समस्त गोष्टी कसपटा समान ठराव्यात.

३. अल्लाह ज्ञान व बुध्दिकौशल्य बाळगणारा आहे म्हणून त्याने आवतरीत केलेले शरीअत विषयक आदेश पूर्णत:ज्ञान व बुध्दिकौशल्यावर आधारीत आहेत.

४. 'वही' (ईश-आदेशा) च्या अनुसरणाची ताकीद पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना ही केली आहे व त्यांच्या माध्यमाने इतर समस्त लोकांना ही. त्यांच्यावर अवतरलेल्या या ईश-आदेशाने मनुष्य जीवनाच्या समस्त क्षेत्रांना आपल्या कक्षेत घेतले आहे यास्तव अनुसरणाचा अर्थ केवळ विशीष्ट धार्मिक कार्यातच अनुसरण करणे नव्हे,तर समस्त व्यवहारात अनुसरण करणे होय. हे तात्विक मार्गदर्शन लक्षात घेता जीवनाचे लौकीक व पारलौकीक असे वर्गीकरण करण्यास काहीच वाव राहात नाही.

५. अर्थात अल्लाहच्या आदेशांचे पालन केल्याने ज्या विरोधांना तुम्हाला तोंड द्यावे लागले त्यांच्या मुळे प्रभावित न होता अल्लाहवर दृढविश्वास राखा की तो तुमची कार्ये पूर्ततेस नेईल व तुम्हाला यशस्वी करील. अल्लाहवरील भरवसा सदाचारी श्रध्देचे फळ आहे. हा भरवसा ह्रदयात दृढ विश्वास निर्माण करतो व सत्यावर अटळ राखतो.

६. म्हणजे सर्वश्रेष्ठ अल्लाहने माणसाला ज्या स्वरुपात निर्माण केले आहे. त्यादृष्टीने त्याच्या अंगी एकच व्यक्तिमत्व कार्यरत आहे. यास्तव एक स्त्री आपल्या अपत्यांची तर माता आहे परंतु तिच्या पतीने तिला आई म्हटल्याने ती त्याची आई ठरत नाही. अशा प्रकारे एखाद्या माणसाची संतती ती होय जी त्यांच्या पोटी जन्माला आली परंतु एखाद्यास केवळ 'बेटा' म्हटल्याने ना तो त्याचा बाप बनतो आणि ना मानस-पुत्र खरोखरीचा पुत्र बनतो. या खेरीज या वाक्यात हा अर्थ ही सामावलेला आहे की प्रत्येक माणसाच्या अंगी त्याच्या आपल्या रचनेच्या दृष्टीने निश्‍चित व संकल्प बाळगणारे एकच व्यक्तिमत्व कार्यरत आहे. यास्तव जर एखदा मनुष्य स्वत:ला मोमीन (ईमान बाळगणारा) जाहीर करतो व मनात कुफ्र (सत्य-विरोधा) ला दडवून ठेवतो तर तो खऱ्या अर्थाने काफीर आहे व परस्पर विरोधी गोष्टी आपल्या अंगी एकत्रित केल्या मुळे तो मुनाफिक (दामिक मुसलमान) म्हटले जाण्यास पात्र आहे.

७. अज्ञान-काळात जेव्हा एखादा मनुष्य आपल्या पत्निस म्हणत असे की तू मला आईच्या पाठी सारखी आहेस तर ती त्याच्या करीता हराम (निषेध) होत असे. मग तो ना तिच्याशी वैवाहीक संबंध ठेवू शके आणि ना यास तलाक ठरवू शकत असे. कुरआनाने अज्ञानाच्या या पध्दतीची सुधारणा फर्माविली जिच्याकडे या आयतीत संकेत केला गेला आहे व या विषयी विवरणात्मक आदेश सूरह मुजादला मध्ये निवेदिला गेला आहे.

या ठिकाणी हे स्पष्ट करण्याचा हेतु आहे की एखाद्या माणसाने आपल्या पत्निस आई म्हटल्याने ती त्याची आई बनत नाही. कारण ही गोष्ट वास्तवतेच्या विपरीत आहे म्हणून अशी गोष्ट बोलण्या पासून सावधगिरी बाळगली पाहीजे.

८. अज्ञान काळात मानलेल्या पुत्रांना (दत्तक पुत्राना) खरेखुरया (स्वत:च्या पोटी जन्मलेल्या) पुत्रांचा दर्जा दिला गेला होता. कोणीही मनुष्य आपल्या दत्तक पुत्राच्या पत्निशी तिला तलाक दिल्यानंतर निकाह करू शकत नव्हता आणि दत्तक पुत्र त्याचा वारस बनत असे. परंतु ज्या अर्थी एखाद्याला तोंडाने पुत्र म्हटल्याने तो खरोखरीच खऱ्या अर्थाने पुत्र बनत नाही, म्हणून स्वत:च्या पुत्रा संबंधाने जे शरीअतचे आदेश आहेत ते याला लागू पडत नाही. हया आयती या रिवाजाची सुधारणा करण्या संदर्भात अवतरल्या आणि प्रेषित (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) ते आचरण विषयक नमुना ही प्रस्तुत केला ज्याचा तपशील पुढे येत आहे.

स्पष्ट असावे की इस्लाम या गोष्टी पासून रोखत नाही की

एखाद्या मुसलमानाने आपल्या घरात एखाद्या अनाथ,लावारीस किंवा नादार मुलाचे संगोपन करावे किंबहुना इस्लाम यास फार मोठी नेकी, पुण्यकर्म ठरवितो. मात्र या गोष्टीची अनुमती देत नाही की त्यास आपला स्वत:चा पुत्र ठरविले जावे. या संदर्भात त्याने काही बंधने घातली:-

१. मुलाला त्याच्या बापाच्या संबंधाने पुकारले जावे म्हणजे पिता संबंधा त्याच्या खऱ्या बापाशीच जोडला जावा.

२. दत्तक मुलाची पत्नी पालन पोषण करणाऱ्याची सून ठरत नाही की मुलाने तलाक दिल्यास किवा तो मेल्यावर तेच्याशी विवाह होऊ शकत नसावा.

३. दत्तक पुत्र आपले संगोपन करणाऱ्या चा वारसदार होऊ शकत नाही मात्र पालक जर त्याच्या हक्कात मृत्युपत्र करु इच्छित असेल तर मृत्युपत्राच्या इस्लामी कायद्यानुसार १/३ हिश्यापर्यत मृत्युपत्र करु शकतो.

४. तो घरातील स्त्रीयां करीता 'नामहरम' (विवाह संबंधास योग्य) ठरेल आणि तो वयात आल्यानंतर स्त्रीयांना त्याच्या बाबतीत ही 'परदाच्या त्याच बंधनाचे पालन करावे लागेल जी विवाह संबंधास योग्य असणाऱ्या पुरुषां बाबत त्यांना शरीअत ने लागू केली आहेत.

आजच्या काळात सेक्यूलर शासने असे कायदे रचतात की ज्यामुळे दत्तक मुला (Adopted Son)ला स्वत:च्या मुलाचा दर्जा प्राप्त व्हावा आणि या गोष्टी ला नादार, असहाय मुलांशी सहानुभूति व त्यांच्या संगोपनाच्या समस्येचे निराकरण म्हणून सादर केले जाते. परंतु अशाने कौटुंबिक जीवनात जो असमतोल निर्माण होतो व रक्ताचे नाते असलेल्या नातेवाईकांचा जो हक्क मारला जातो त्यास अगदी दृष्टी आड केले जाते. खरे तर नादार व असहाय मुला बरोबर सहानुभूति व त्यांच्या पालन पोषणाच्या समस्येचे निराकरण करण्याच्या इतर योग्य मार्गाचा अवलंब केला जाऊ शकतो आणि हे तेच मार्ग असू शकतात जे शरीअत च्या मर्यादाचे उल्लंघन करणारे नसावेत.

९. म्हणजे अशा गोष्टींना शरीअत चा दर्जा प्राप्त होऊ शकत नाही.

१०. अर्थात अल्लाहचेच मार्गदर्शन सत्य आहे व त्याच्या विरोधात कोणत्याही रिती रिवाज व विधिनियमांचे मार्गदर्शन खोटे आहे.

११. म्हणजे दत्तक पुत्रास त्याचा पिता म्हणून अशा माणसाच्या संबंधाने हाक मारु नका ज्याने त्याचे पालन पोषण केले आहे किंबहुना पित्याच्या जागी त्याच्या जन्मदात्या बापाचे नाव घ्या ज्यामुळे खरा संबंध ही सिद्ध होतो व प्रत्येक पैलूने ही न्यायपूर्ण गोष्ट आहे. हजरत जैद यांचे संगोपन पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी एखाद्या 'मुला' सारखे केले होते म्हणून लोक त्यांना जैद बिन मुहम्मद (मुहम्मदांचा पुत्र जैद) या नावाने हाक मारीत परंतु ही आयत अवतरल्या नंतर ते त्यांना जैद बिन हारसा या खऱ्या नावाने हाक मारु लागले.

या आयती वरुन ओघाओधाने हे ही कळाले की माणसाने आपला वंश पित्याच्या संबंधान्वये जाहीर केला पाहीजे. म्हणजे अमुक वल्द अमुक किंवा अमुक बिन्ते (कन्या) अमुक; आणि हदीस वचनातील उल्लेखानुसार कियामतीच्या दिवशी अमुक इसम अमुक इसमाचा मुलगा या प्रकारे बोलाविले जाईल. या संदर्भात एक अपवाद हजरत ईसा यांचा आहे, त्यांना मरीयम पुत्र ईसा अशासाठी म्हटले गेले आहे की ते बापाविना जन्मास आले होते.

भारतातील स्त्रीया लग्नानंतर स्वत:चा संबंध पति कडे दर्शवून आपले नाव सौ. अमुक भ्र अमुक असे लिहीतात. वास्तविक हे पती, पत्नीचे नाते कायम स्वरुपी राहीलच असे नाही, मात्र बापा शी असलेले नाते कायम स्वरुपी राहते.

यास्तव इस्लामी रीत अशी की स्त्रीयांनी आपली नावे पित्याच्या नावाचा स्पष्ट उल्लेख करुन लिहावीत. अर्थात क्ष पिता क्ष. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या पत्नींचे नाव देखील पित्याच्या संबंधानेच घेतले जातात. उदाहरणर्थ आयशा बिन्त अबुबकर आणि हफ्सा बिन्त उमर असे म्हटले जाते,त्याच प्रमाणे पैगंबरांच्या कन्येचे नाव फातमा बिन्त मुहम्मद.

१२. म्हणजे हे वास्तवतेला धरुन ही आहे व अशाने त्यांच्या खऱ्या बापांचा हक्क ही मारला जात नाही.

१३. म्हणजे एखाद्याचा बाप कोण हे माहीत नसेल तर त्याला अन्य एखाद्याचा पुत्र म्हणून हाक मारु नका, किंबहुना त्यांच्या संदर्भात धर्म-बंधुत्व मैत्री व्यक्त करा.

इस्लाम खोटे कूळ वा वंश निवेदन करण्या बद्दल कडक तंबी देतो. हदीस वचनातील उल्लेखानुसार.

مَنْ اِدّعیٰ اِلیٰ غَیْرِ اَبِیْہِ وَھُوَ یَعْلَمُ اِنّہٗ غَیْرُ اَبِیْہِ
فَالْجَنّۃُ عَلَیْہِ حَرَامٌ ۔(مسلم کتاب الایمان)

'ज्याने स्वत:चा आपल्या पित्या ऐवजी अन्य एखाद्याशी संबंध दर्शविला, वस्तुत: तो हे जाणतो की हा त्याचा बाप नव्हे, तर त्याच्यावर जन्नत हराम (निषिध्द) आहे. (मुस्लिम किताबुल ईमान)

पण या सोबतच अज्ञात पित्यांच्या संतती ची घृणा अपेक्षा करण्या पासून रोखतो; व त्यांना आपला धर्म-बंधू व मित्र संबोधण्यास प्रोत्साहन देतो.

१४. म्हणजे अजाणतेपायी किंवा निश्चयाशिवाय तुमच्या कडून ज्या चूका घडल्या त्याबद्दल जाब विचारला जाणार नाही परंतु जर तुम्ही जाणून बूजून चूकीचे निवेदन केले तर या बद्दल खचितच पकड होईल.

**आणि (स्मरण करा) जेव्हा आम्ही पैगंबरांकडून वचन घेतले होते. (हे पैगंबर !) तुमच्या कडून ही आणि नूह, इब्राहीम, मूसा व मरीयम पुत्र ईसा (येशू) कडून ही, सर्वांकडून आम्ही पक्के वचन घेतले होते.(अल-कुर्आन)**

६. पैगंबर, मुसलमानां वर त्यांच्या स्वतःच्या प्राणापेक्षा ही अधिक हक्क राखतो [१५] आणि पैगंबराच्या पत्न्या त्यांच्या (ईमान बाळगणाऱ्यांच्या) माता होत. [१६] आणि अल्लाहच्या विधि नियमात रक्ताचे नातेदार, सर्व सामान्य ईमानधारक व स्वदेश त्याग केलेल्यांच्या तुलनेने एकमेकांवर अधिक हक्क राखतात. ही गोष्ट वेगळी की तुम्ही आपल्या मित्रांशी काही भलेपणा करावा [१७] हा आदेश ईश ग्रंथात लिहीलेला आहे.

اَلنَّبِیُّ اَوْلٰی بِالْمُؤْمِنِیْنَ مِنْ اَنْفُسِهِمْ وَاَزْوَاجُهٗۤ اُمَّهٰتُهُمْ ؕ
وَاُولُوا الْاَرْحَامِ بَعْضُهُمْ اَوْلٰی بِبَعْضٍ فِیْ كِتٰبِ اللّٰهِ مِنَ
الْمُؤْمِنِیْنَ وَالْمُهٰجِرِیْنَ اِلَّاۤ اَنْ تَفْعَلُوْۤا اِلٰۤی اَوْلِیٰٓئِكُمْ مَّعْرُوْفًا ؕ
كَانَ ذٰلِكَ فِی الْكِتٰبِ مَسْطُوْرًا ﴿۶﴾

७. आणि (स्मरण करा) जेव्हा आम्ही पैगंबरांकडून वचन घेतले होते. (हे पैगंबर !) तुमच्या कडून ही आणि नूह, इब्राहीम, मूसा व मरीयम पुत्र ईसा (येशू) कडून ही, सर्वांकडून आम्ही पक्के वचन घेतले होते.[१८]

وَاِذْ اَخَذْنَا مِنَ النَّبِیّٖنَ مِیْثَاقَهُمْ وَمِنْكَ وَمِنْ نُّوْحٍ وَّاِبْرٰهِیْمَ
وَمُوْسٰی وَعِیْسَی ابْنِ مَرْیَمَ ۪ وَاَخَذْنَا مِنْهُمْ مِّیْثَاقًا غَلِیْظًا ۙ﴿۷﴾

८. अशासाठी की त्यांनी सच्च्या लोकंना त्यांच्या सच्चे पणा विषयी विचारणा करावी [२०] आणि काफिरां करीता तर त्याने दुःख दायक अजाब (शिक्षा-यातना) तयार करून ठेवला आहे.[२१]

لِّیَسْـَٔلَ الصّٰدِقِیْنَ عَنْ صِدْقِهِمْ ۚ وَاَعَدَّ لِلْكٰفِرِیْنَ عَذَابًا اَلِیْمًا ﴿۸﴾

९. हे ईमान बाळगणाऱ्यांनो ! अल्लाहच्या त्या उपकाराचे स्मरण करा जो त्याने तुमच्यावर केला आहे, जेव्हा सैन्ये तुमच्या वर चालून आलीत तेव्हा आम्ही त्यांच्यावर वादळ, पाठविले आणि अशा फौजा ज्या तुम्हाला दिसून येत नव्हत्या [२२] आणि तुम्ही जे काही करीत होता त्यास अल्लाह पाहत होता.

یٰۤاَیُّهَا الَّذِیْنَ اٰمَنُوا اذْكُرُوْا نِعْمَةَ اللّٰهِ عَلَیْكُمْ اِذْ جَآءَتْكُمْ جُنُوْدٌ
فَاَرْسَلْنَا عَلَیْهِمْ رِیْحًا وَّجُنُوْدًا لَّمْ تَرَوْهَا ؕ وَكَانَ اللّٰهُ بِمَا تَعْمَلُوْنَ
بَصِیْرًا ۚ﴿۹﴾

१०. जेव्हा ते तुमच्या वरच्या बाजू ने चालून आले व तुमच्या खालच्या बाजूने ही. [२३] जेव्हा नजरा पालटल्या आणि काळीज तोंडशी आले[२४] आणि तुम्ही लोक अल्लाह विषयी निरनिराळया कल्पना करु लागले.

اِذْ جَآءُوْكُمْ مِّنْ فَوْقِكُمْ وَمِنْ اَسْفَلَ مِنْكُمْ وَاِذْ زَاغَتِ
الْاَبْصَارُ وَبَلَغَتِ الْقُلُوْبُ الْحَنَاجِرَ وَتَظُنُّوْنَ بِاللّٰهِ
الظُّنُوْنَا ؕ﴿۱۰﴾

११. त्या वेळी ईमान बाळगणाऱ्यांची कसोटी घेतली गेली आणि फार सक्तीने हलविले गेले. [२५]

هُنَالِكَ ابْتُلِیَ الْمُؤْمِنُوْنَ وَزُلْزِلُوْا زِلْزَالًا شَدِیْدًا ﴿۱۱﴾

१५. अर्थात पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचा संबंध ईमान बाळगणाऱ्याशी सर्वाधिक जास्त प्राधान्य बाळगणारा आहे, या कारणास्तव देखील ही ईमान ची निकड आहे व या कारणास्तव ही पैगंबर आपल्या स्वत: पेक्षा अधिक जास्त यांचे हितचिंतक आहेत, यास्तव ईमान बाळगणाऱ्यांनी पैगंबराना अधिक श्रेष्ठत्व द्यावे, त्यांच्या विषयी अत्याधिक प्रेम बाळगावे, आपल्या स्वत: पेक्षा त्यांना अधिक प्रिय जाणावे, आपले प्राण पणाला लावून त्यांचे रक्षण करावे व त्यांच्या निर्णयाला हूं की चू न करता मान्य करावे हदीस वचनातील उल्लेखानुसार.

لَا يُؤْمِنُ اَحَدُكُمْ حَتّٰى اَكُوْنَ اَحَبَّ اِلَيْهِ مِنْ وَّالِدِهٖ وَوَلَدِهٖ وَالنَّاسِ اَجْمَعِيْنَ۔ (بخاری کتاب الایمان)

''तुमच्या पैकी कोणताही मनुष्य तो पर्यंत मोमीन (ईमान बाळगणारा) होऊ शकत नाही, जो पर्यंत मी त्याला त्याच्या पिता, त्याची संतती व समस्त लोकां पेक्षा अधिक प्रिय न व्हावे,'' (बुखारी-किताबुल ईमान)

१६. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या शी ईमान बाळगणाऱ्यांच्या संबंधाचे जे विशिष्ट स्वरुप आहे त्याची हीच निकट होती की पैगंबरांच्या पत्न्या ईमान बाळगणाऱ्यां साठी आई स्वरुप असाव्यात व त्यांच्या नंतर त्यांच्या शी निकाह करणे हराम (निषिध्द) व्हावे. पुढे आयत क्र. ५३ मध्ये स्पष्ट पणे यांस हराम ठरविले गेले आहे.

पैगंबरांच्या पत्न्यांना मोमीनांच्या माता हा दर्जा देऊन मुस्लिम जन समूहात त्यांच्या विशिष्ट स्थानाचा व त्यांचे शील व आदरास अत्याधिक पणे विचाराधीन राखण्याची ताकीद केली गेली आहे. अशासाठी की मुसलमानाची कोणतीही गोष्ट पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या करीता दु:ख कारक न व्हावी (وَمَا كَانَ لَكُمْ اَنْ تُؤْذُوْا رَسُوْلَ اللّٰهِ۔ آیت ۵۳) (आयत क्र.५३) परंतु खेदाची बाब अशी की ही स्पष्ट ताकीद असतानाही मुसलमानां च्या एक संप्रदायाने हजरत अली यांच्या श्रेष्ठत्वाचा गौरव करण्यात अतिशयोक्ति करुन हजरत आयशा यांना निदा नालस्ती चे निशाण लक्ष्य बनविले हे लोक आपल्या संप्रदायाच्या श्रध्देस योग्य मानून आपल्या बौद्धिक संरक्षणासह जेव्हा कुरआनाचा अभ्यास करतात तेव्हा जीथे त्यांना आपल्या श्रध्दे विरुध्द एखादी गोष्ट जाणवते त्याचे उलट सुलट स्पष्टीकरण करु लागतात. अशा प्रकारे कुरआन-अध्ययन करुन ही ते वाट चुकलेल्या इसमा सारखे भटकतच राहतात.

१७. म्हणजे येथपावेतो वारसा चा संबंध आहे, अल्लाहच्या कायद्यानुसार रक्ताचे नाते असलेले नातेवईकच वारसदार ठरतील, हा संकेत आहे या गोष्टी कडे की पैगंबरांच्या पत्न्यांना मोमिनाच्या माता हा जो दर्जा दिला गेला आहे तर याचा संबंध मोमीनांच्या (ईमान बाळगणाऱ्यांच्या) वारशा शी नाही, तसेच हा संकेत या गोष्टी कडे ही आहे की मुहाजीरीन (देशत्याग केलेले) व अन्सार यांच्या दरम्यान बंधुत्वाचे जे नाते कायम केले गेले होते व ज्या आधारे अन्सार लोकांनी आपल्या मालमत्तेत मुहाजरीन ना बरोबरीने सहभागी केले होते ते तात्पुरते होते. या नात्यामुळे ते वारसाधिकारात एकमेकांचे सहभागी होऊ शकत नाही. कारण इस्लाम चा कायम स्वरुपी वारसा नियम उदर व रक्ताच्या नात्यास वारसा करीता आधारभूत ठरवितो. माग आपल्या मित्रांशी भलेपणाचे इतर उचित मार्ग पत्कारले जाऊ शकतात उदाहरणार्थ आपल्या हयातीतच त्यांना काही दिले जावे किंवा त्यांच्या हक्कात मागे सोडलेल्या संपत्तीच्या १/३ हिश्या पर्यत मृत्युपत्र करणे.

१८. संकेत त्या वारसा-कायद्याकडे आहे जो सूरह निसा मध्ये निवेदिला गेला आहे. तसेच सूरह अनफाल आयत क्र. ७५ मध्ये ही रक्ताचे नाते असलेल्या नातेवाईकंच्या सामाजिक हक्क अधिकारांना प्राधान्य दिले गेले आहे.

१९. वचनाशी अभिप्रेत, जसे आयतीच्या संदर्भा (Con Text) वरुन स्पष्ट आहे, प्रेषित पदा वर नियुक्त झाल्यामुळे अपरिहार्य ठरते. या कर्तव्यात लोकांची तमा न बाळगता केवळ अल्लाहचे भय बाळगून त्याच्या अवतरीत आदेशाचे अनुसरण करणे हे ही सामील आहे. तसेच लोकापर्यंत काही ही उणे अधिक न करता अल्लाहचा संदेश पोहचविणे व त्याच्या धर्मास स्पष्टत: निवेदणे हे ही अंतर्भूत आहे या सूरहच्या आयत क्र. २ मध्ये पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना ईश आदेशाचे स्वत: अनुसरण करण्याचा आदेश दिला गेला आहे व पुढे आयत क्र. ३९ मध्ये हे स्पष्टीकरण दिले गेले आहे की पैगंबर अल्लाहच्या संदेशांना लोकांपर्यंत पोहचवितात व त्याचे भय बाळगतात अल्लाह खेरीज ते कोणाचे ही भय बाळगत नाही. आयतीत पैगंबरा कडून घेतल्या गेलेल्या वचनाचा सर्वसामान्य पणे उल्लेख करीत प्रतिष्ठीत पैगंबरांचा विशेषत्वाने उल्लेख केला गेला आहे.

२०. म्हणजे कियामतीच्या दिवशी पैगंबरांना सवाल केला जाईल की त्यांनी सत्यता पूर्वक ईश-संदेशानुसार आचरण केले किंवा नाही, आणि लोकांना त्याचे संदेश यथायोग्य पोहचविले किंवा नाही. सूरह अअराफ मध्ये फर्माविले गेले.

فَلَنَسْـَٔلَنَّ الَّذِيْنَ اُرْسِلَ اِلَيْهِمْ وَلَنَسْـَٔلَنَّ الْمُرْسَلِيْنَ۔ (اعراف : ۶)

''आम्ही त्या लोकांना निश्चितच जाब विचारु ज्यांच्या कडे पैगंबर पाठविले गेले आणि नि:संशय आम्ही पैगंबरांना विचारु'' (अअराफ:६)

२१. म्हणजे जेव्हा पैगंबराद्वारे अल्लाहचे प्रमाण लोकांवर प्रस्थापित होईल तेव्हा जे लोक कुफ्र (सत्याचा इन्कार) करतील त्यांना मोठी दु:खदायक शिक्षा भोगावी लागेल.

२२. हा संकेत खंदक युध्दाकडे आहे ज्यात अल्लाहची मदत ईमान बाळगणाऱ्यां करीता अवतरली; व अतिशय अल्पसंख्येत असतांना ही शत्रू सैन्ये त्याना पराभूत करु शकली नाहीत किंबहुना मुकाबला न करता त्यांना परत फिरावे लागले.

हे युद्ध ज्याला अहजाब युध्द असे ही महटले जाते शव्वाल हि. स. ५. व इ. स. ६२७ मध्ये घडून आले. यहूदी कबीला बनी नजीर ने मदीना तून आपल्या हद्दपारी नंतर काफीरांना मुसलमाना विरुध्द युध्दासाठी भडकाविले यास्तव------हुयैय बिन अख्तब जो बनी नजीर कबील्याचा सरदार होता एका शिष्ट मंडळा सोबत मक्का येथे पोहचला व त्यांने कुरेश कबील्यास या गोष्टी करीता प्रवृत्त केले की त्यांनी एकत्रित आधाडी बनवून मदीना वर हल्ला चढवावा मग नज्दच्या दिशेने कबीला गत्फानलाही युध्दासाठी तयार केले जेव्हा पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना ही वार्ता कळली तेव्हा त्यांनी हजरत सलमान यांच्या सल्ल्यानुसार मदीना शहराच्या उत्तरेस व पश्चिमेस, जिकडून शत्रू मदीना शहरात प्रवेश करु शकत होते. सुमारे दोन किलो मीटर लांब दीर्घ खंदक खोदवून घेतला (गज्वतुल अहजाब- मुहम्मद अहमद पृ. १६२) आणि या कार्यात ज्यास पैगंबराच्या सहवासातील अनुयायी अगदी प्राण पणाला लावून पार पाडत होते. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) स्वत: जातीने सहभागी झाले. खंदकाच्या या बाजूला सलअ पहाडीस वेढा घालून मुसलमान रंगबध्द झाले. त्यांची संख्या सुमारे तीन हजार एवढी होती. खंदकाच्या पलीकडे कुरेश कनाना सोबत पोहचले आणि नज्हून अज्फान, हवाजन व इतर कबीले. अशा प्रकारे दहा हजाराचे सैन्य जमले जे प्रत्येक प्रकारे शस्त्र सज्ज होते. मुसलमानांच्या मुकाबल्या करीता एकत्रित झाले. इकडे यहुदींचा एक कबीला बनी कुरैजा जो मदीनाच्या पश्चिम दिशेस वसत होता व ज्यांचा मुसलमानाशी करार झाला होता. अगदी ऐन वेळी करार भंग करून काफीरांच्या समर्थनार्थ उभा राहीला. काफीरांचा हा घेराव सुमारे एक महीना पावेतो राहीला. परंतु अल्लाहने फिरीश्त्यांची सैन्ये अवतरीत करुन शत्रू पक्षा वर अशी छाप पाडली की मुसलमानां विरुध्द ते कोणतेही पाऊल उचलू शकले नाहीत. आणि असे सोसाटयाचे व थंड वारे पाठविले की काफीरांचे केवळ तंबूच उखडले नाहीत तर पाय सुध्दा उखडले. वावटळीने आग विझवली व असा अंधार पडला की त्यांना काही उमजेनासे झाले. ही परिस्थिती लक्षात घेता कुरेश कबील्याने परत जाण्याचा निर्णय घेतला शेवटी सर्व फौजा अपयशा सह परत गेल्या. शत्रू-पक्ष परत फिरल्यावर मुसलमान शांतीपूर्वक आपल्या घरी परत गेले. सर्वश्रेष्ठ अल्लाहची मदत त्याचा पैगंबर व ईमान बाळगणाऱ्यांच्या हक्कात अशा रीतीने प्रकट झाली की रक्तपाताची वेळच आली नाही व काफीरांची संपूर्ण योजना मातीस मिळाली. अल्लाहचा हाच तो उपकार होय ज्याचा उल्लेख या आयतीत केला गेला आहे व हा एवढा मोठा उपकार होता की त्यानंतर पुन्हा कधी ही काफीर मदीनेवर हल्ला करु शकले नाहीत. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी काफीरांच्या असफल अवस्थेत परत जाण्या बद्दल फर्माविले होते,

لَنْ تغزُو قُريشُ بَعْدَعَامِكُمْ وَلكنّكُمْ تَغْزُونَهُم

'की कुरेश आता पुन्हा कधीही तुमच्यावर हल्ला करु शकणार नाहीत, आता तुम्ही त्यांच्यावर हल्ला कराल' आणि ही गोष्ट शब्दश: खरी ठरली. काफीर पुन्हा कधीही मदीने कडे रोख वळवू शकले नाहीत. मात्र मुसलमान या स्थितीत आले की त्यांनी मक्केचा रोख धरुन त्यास जिंकले.

स्पष्ट झाले की ईमान बाळगणारे जेव्हा आपला जीव धोक्यात टाकून अल्लाहचा कलमा (वचन) बुलंद करण्या करीता उठून उभे राहतात तेव्हा अल्लाह असामान्य रित्या त्यांना सहाय्य करतो.

२३. वरच्या बाजूने म्हणजे मदीना च्या पश्चिमे कडून आणि खालच्या बाजूने म्हणजे मदीनाच्या पूर्वे कडून मदीना शहराचा वरचा भाग पश्चिम दिशेस आहे व खालचा भाग पूर्व दिशेस आहे. पश्चिमे कडून अज्फान व हवाजन इत्यादीच्या फौजा आल्या होत्या व पूर्वेकडून कुरेश व बनी किनाना वगैरे.

२४. ही निवेदन शैली त्या कैफियतीस जाहीर करते जी अत्याधिक भयापोटी निर्माण झाली होती. अलंकारीक भाषेची निकड म्हणून समस्त मुसलमानांना संबोधून ही गोष्ट सांगितली आहे परंतु यास अभिप्रेत ते लोक होत जे आपल्या ईमानात कमजोर होते सच्चे व प्रामाणिक ईमान धारकांची स्थिती याहून वेगळी होती, जसे आयत क्र. २२ व २३ मध्ये निवेदिले गेले आहे.

२५. म्हणजे खंदक युध्दाच्या प्रसंगी ज्या असह्य परिस्थितीला मुसलमानांना तोंड द्यावे लागले यात फार मोठा होतु कार्यरत होते आणि तो असा की ईमान बाळगणाऱ्यांची सक्त कसोटी घेऊन हे पाहीले जावे की कोण आपल्या ईमानाबाबत सच्चा व प्रामाणिक आहे आणि कोण दंभ व संशयाच्या जाळयात अडकला आहे.

# खंदक-युद्धाचा नकाशा


उत्तर
ग़तफ़ान सैन्य
कुरैश-सैन्य
बिअर रोमा
उहुद पहाड
ख़ंदक़
इस्लामी सैन्य
सलअ पहाड
मदीना
हर्रा वाक़िम
हर्रतुलवैरा
लाव्हा खडक
मस्जिदे नबवी
लाव्हा-खडक
अक़ीक़ खिंड
बनी कुरैज़ा चे स्थान
ज़ुल हुलैफा स्थळ
अीर पहाड
बनी नज़ीर वंशाचे स्थळ
कअब बिन अशरफ़ चा किल्ला

१२. जेव्हा दांभिक आणि ते लोक ज्यांच्या मनात रोग आहे.[२६] म्हणत होते की अल्लाह व त्याच्या पैगंबराने जो वायदा आमच्याशी केला होता तो केवळ धोका होता.[२७]

وَإِذْ يَقُولُ الْمُنَافِقُونَ وَالَّذِينَ فِي قُلُوبِهِم مَّرَضٌ مَّا وَعَدَنَا
اللَّهُ وَرَسُولُهُ إِلَّا غُرُورًا ﴿١٢﴾

१३. जेव्हा यांच्यापैकी एक समूह म्हणाला, हे मदीना च्या लोकांनो [२८] तुमच्या करीता थांबण्याची कसली ही संधी नाही, तेव्हा परत जा [२९] आणि यांच्या पैकी एक समूह असे म्हणून पैगंबरां जवळ अनुमति मागत होता की आमची घरे असुरक्षित आहेत, वस्तुतः ती असुरक्षित नव्हती, किंबहुना हे पळ काढू इच्छित होते.[३०]

وَإِذْ قَالَت طَّائِفَةٌ مِّنْهُمْ يَا أَهْلَ يَثْرِبَ لَا مُقَامَ لَكُمْ
فَارْجِعُوا ۚ وَيَسْتَأْذِنُ فَرِيقٌ مِّنْهُمُ النَّبِيَّ يَقُولُونَ إِنَّ
بُيُوتَنَا عَوْرَةٌ ۛ وَمَا هِيَ بِعَوْرَةٍ ۛ إِن يُرِيدُونَ إِلَّا فِرَارًا ﴿١٣﴾

१४. जर शहाराच्या आसपास च्या भागातून यांच्यावर हल्ला झाला असता आणि त्यावेळी यांना उपद्रव-ग्रस्त होण्यास सांगितले गेले असते तर ते यात (उपद्रवात) पडले असते आणि यांना मुशकीलीनेच काही संकोच वाटला असता.[३१]

وَلَوْ دُخِلَتْ عَلَيْهِم مِّنْ أَقْطَارِهَا ثُمَّ سُئِلُوا الْفِتْنَةَ
لَآتَوْهَا وَمَا تَلَبَّثُوا بِهَا إِلَّا يَسِيرًا ﴿١٤﴾

१५. खरे पाहता या लोकांनी या पूर्वी अल्लाहला वचन दिले होते की पाठ फिरवणार नाहीत [३२] आणि अल्लाहला दिल्या गेलेल्या वचना बद्दल निश्चितच जाब विचारला जाईल.

وَلَقَدْ كَانُوا عَاهَدُوا اللَّهَ مِن قَبْلُ لَا يُوَلُّونَ الْأَدْبَارَ ۚ وَكَانَ
عَهْدُ اللَّهِ مَسْئُولًا ﴿١٥﴾

१६. सांगा जर तुम्ही मृत्यु किंवा हत्ये पासून पळ काढाल, तर हे पळ काढणे तुमच्या करीता काहीच लाभदायक ठरणार नाही आणि त्या नंतर तुम्ही जीवन-सामग्री पासून थोडासाच लाभ घेऊ शकाल. [३३]

قُل لَّن يَنفَعَكُمُ الْفِرَارُ إِن فَرَرْتُم مِّنَ الْمَوْتِ أَوِ الْقَتْلِ وَإِذًا
لَّا تُمَتَّعُونَ إِلَّا قَلِيلًا ﴿١٦﴾

१७. सांगा, असा कोण आहे जो तुम्हाला अल्लाह पासून वाचवू शकेल जर तो तुम्हाला काही नुकसान पोहचवू इच्छिल किंवा कोण आहे जो त्याच्या कृपेला अडवू शकेल जर तो तुमच्या वर कृपा करु इच्छिल. अल्लाहच्या विरोधात आपल्या करीता त्यांना ना कोणी कार्य साधक आढळून येईल आणि ना कोणी सहाय्यक.

قُلْ مَن ذَا الَّذِي يَعْصِمُكُم مِّنَ اللَّهِ إِنْ أَرَادَ بِكُمْ سُوءًا أَوْ أَرَادَ
بِكُمْ رَحْمَةً ۚ وَلَا يَجِدُونَ لَهُم مِّن دُونِ
اللَّهِ وَلِيًّا وَلَا نَصِيرًا ﴿١٧﴾

२६. रोगाशी अभिप्रेत संशय रोग. कुरआन व पैगंबराबाबत संशय करणारे हेच मुनाफीक (दामिक) होत.

२७. म्हणजे अल्लाहची मदत आणि वर्चस्व व यशाचे वायदे.

२८. 'यसरब' हे मदीना शहराचे जुने नाव होते.

२९. म्हणजे तुम्ही या स्थितीत नाही की जे सैन्य तुमच्यावर चालून येत आहे. त्याचा मुकाबला करु शकाल. यास्तव आपल्या घरी परत जाणे च तुमच्यासाठी अधिक चांगले आहे, यासाठी की युध्दा ची अनिष्ट वेळ न यावी.

३०. मदीना शहरात स्त्रीया व मुलांना सुरक्षित गडां मध्ये हलविले गेले होते. म्हणून दांमिक मुसलमानांची ही सबब योग्य नव्हती की आमची घरे दारे उघडी पडली आहेत तेव्हा आम्हाला जायची परवानगी दिली जावी. खरे पाहता शत्रूशी दोन हात करण्याची त्यांच्यात हिम्मत नव्हती म्हणूनच मोर्चा सोडून ते पळ काढू इच्छित होते आणि ही सबब रचली की आमचे घरे असुरक्षित आहे.

३१. म्हणजे जर मदीना शहरात शत्रूने प्रवेश केला असता आणि यांना उपद्रव निर्माण करणारी एखादी बाब सांगितली असती उदा. त्यानी ही मागणी केली असती की पैगंबराच्या सहकाऱ्यांना ठार करण्यात आम्हाला साथ द्या. किंवा ही मागणी की इस्लाम कडे पाठ फिरवा तर यांना या मागण्या पूर्ण करण्यात अगदी मुश्किलपणे संगोपन वाटला असता कारण ते आपल्या ईमाना बाबत प्रामाणिक नाहीत.

३२. संकेत या गोष्टी कडे आहे की या लोकांनी उहद युध्दाच्या प्रसंगी जे वैगुण्य दाखविले होते त्यानंतर ते आपला पश्चाताप दूर करण्या करीता म्हणत राहीले की जर अल्लाहने आता एखादी संधी दिली तर ते निश्चल पणे लढतील व मुळीच पाठ फिरवणार नाहीत परंतु जेव्हा खंदक युध्दात शत्रूच्या विरोधात अढळपणे लढण्याचा प्रसंग आला तेव्हा पळून जाण्या करीता सबब शोधू लागले.

३३. म्हणजे मृत्यु किंवा हत्या होण्याच्या भितीने युध्दापासून पळ काढणे जेव्हा की ते एक धर्म-कर्तव्य आहे, अगदीच निरर्थक बाब होय कारण अशा स्थितीत जर जगण्याची संधी लाभली असली तरी ती फार थोडी असेल आणि शेवटी परतणे अल्लाहच्याच कडे आहे अर्थात या वर्तनाचा परिणाम वंचितता व अपयशाच्याच रूपाने समोर येईल.

हजरत येशू (ईसा) यांनी अल्लाहच्या मार्गात जीवाचा धोका पत्करण्यास प्रोत्साहन देताना मोठी वास्तव पूर्ण गोष्ट सांगितली. 'कारण जो कोणी आपला जीव वाचवू पाहतो तो आपल्या जिवाला मुकेल आणि जो कोणी माझ्या करिता आपल्या जीवाला मुकेल त्याला तो मिळेल. मनुष्याने सर्व जग मिळविले आणि आपला जीव गमावला तर त्याला काय लाभ?'

(मत्तय : १६:२५)

१८. अल्लाह तुमच्या पैकी त्या लोकांना जाणतो जे (युध्द कार्यात) अडथळे आणत होते आणि आपल्या बांधवांना असे म्हणत होते की आमच्या जवळ या [३४] आणि ते युद्धात फार कमी सहभाग घेत राहीलेत.

قد يعلم الله المعوقين منكم والقائلين لإخوانهم هلم إلينا
ولا يأتون البأس إلا قليلا ﴿١٨﴾

१९. ते तुमची साथ देण्यात संकोचित मनाचे आहेत [३५] जेव्हा धोका उद्भवतो तेव्हा तुम्ही पाहता की ते तुमच्या कडे अशा प्रकारे डोळे गरगरा फिरवित पाहतात जणू एखाद्या व्यक्तिवर मृत्युची मुर्छा आलेली असावी [३६] नंतर जेव्हा संकट टळते, तेव्हा धनाचे लोभी बनून तीक्ष्ण भाषेत तुमच्याशी बोलू लागतात. [३७] या लोकांनी ईमान बाळगले नाही म्हणून अल्लाह ने यांचे आचरण वाया घालविले [३८] आणि हे अल्लाह करीता फार सोपे आहे. [३९]

أشحة عليكم فإذا جاء الخوف رأيتهم ينظرون إليك
تدور أعينهم كالذي يغشى عليه من الموت فإذا ذهب
الخوف سلقوكم بألسنة حداد أشحة على الخير أولئك
لم يؤمنوا فأحبط الله أعمالهم وكان ذلك على الله يسيرا ﴿١٩﴾

२०. हे लोक असे समजतात की आक्रमक समूह अद्याप गेले नाहीत [४०] आणि जर आक्रमक पुन्हा परत आले तर हे अशी इच्छा बाळगतील की त्यांनी खेडयात ग्रामीणां मध्ये असावे व तिथून तुमची माहीती जाणून घेत राहावे [४१] आणि जर हे तुमच्या दरम्यान राहीले ही, तरी युध्दात फार थोडाच भाग घेतील. [४२]

يحسبون الأحزاب لم يذهبوا وإن يأت الأحزاب يودوا
لو أنهم بادون في الأعراب يسألون عن أنبائكم
ولو كانوا فيكم ما قاتلوا إلا قليلا ﴿٢٠﴾

२१. तुमच्या करीता अल्लाहच्या पैगंबर ठायी उत्कृष्ट नमुना आहे, [४३] अशा लोकां करीता जे अल्लाह आणि आखिरत (मरणोत्तर जीवना) ची आशा बाळगणारे आहेत आणि अल्लाहचे अत्याधिक स्मरण करणारे असावेत.[४४]

لقد كان لكم في رسول الله أسوة حسنة لمن كان يرجوا
الله واليوم الآخر وذكر الله كثيرا ﴿٢١﴾

२२. जेव्हा ईमान बाळगणाऱ्यांनी आक्रमक समूहांना पाहीले तेव्हा ते उद्गारले, हे तर तेच होय ज्याचा अल्लाह व त्याच्या पैगंबराने आमच्यांशी वायदा केला होता अल्लाह आणि त्याच्या पैगंबराने अगदी खरे फर्माविले आहे. आणि या गोष्टी ने त्यांच्या ईमान व आज्ञापालनात अधिक वाढ केली. [४५]

ولما رأ المؤمنون الأحزاب قالوا هذا ما وعدنا الله
ورسوله وصدق الله ورسوله وما زادهم إلا إيمانا
وتسليما ﴿٢٢﴾

३४. अभिप्रेत मुनाफिक (दांभिक) लोक होत; जे मुसलमानांच्या संरक्षण विषयक बाबीं मध्ये अडयळे निर्माण करीत होते आणि इतरांना आघाडी पासून हटवून आपल्या सोबत घेऊ इच्छित होते. अर्थात हा त्यांची उघड पणे विश्वासघात होता.

३५. म्हणजे ते तुमच्या संरक्षणा करीता कसलाही धोका पत्करू इच्छित नाही. त्यांना ना तुमच्या बद्दल (सच्चा मुसलमाना बद्दल) सहानुभूति आहे आणि ना ते तुमच्या करीता एखादे बलीदान देऊ शकतात.

३६. हे दांभिक लोकांच्या भ्याडपणाचे व त्यांच्या घाबरलेल्या स्थितीचे चित्र होय. युध्द-प्रसंगी जेव्हा एखादी भयंकर स्थिती उद्‌भवत असे तेव्हा त्यांच्या हतबध्दतेची ही दशा होती की जणू त्यांच्यावर मृत्यु चा कैफ चढला जर ते आपल्या ईमान बाबत प्रामाणिक असते तर त्यांनी अल्लाहच्या मार्गात प्राणपणाने जेहाद (धर्म युध्द) केले असते व काफिरांशी वीरपुरूषां प्रमाणे मुकाबला केला असता.

३७. म्हणजे युध्द संपल्या नंतर जेव्हा हाती आलेल्या सम्पत्ती च्या विभागणीची वेळ येत असे तर धनाचे लोभी बनून समोर आले आणि मोठया ऐटीने माले गनीमत (युध्दात हाती लागलेल्या सम्पत्ती) मध्ये आपण हिस्सेदार असल्याचा दावा करू लागले आणि मुसलमानांविरूध्द तकरार करीत असत.

३८. म्हणजे आपण मुसलमान असल्याचा हे दावा तर करतात, परंतु खरे पाहता यांनी ईमान बाळगलेले नाही. जर यांनी मनापासून ईमान बाळगले असते तर जेहाद मध्ये याचे वर्तन अल्लाह व त्याच्या प्रषिताशी एकनिष्ठतेचे असते. आणि जेव्हा यांची मने ईमान शून्य आहेत तर यांची सर्व जाहीर सत्कृत्ये वाया गेलीत. त्यांचा कसलाही मोबदला यांना लाभणार नाही.

या वरून ही महत्वपूर्ण हकीगत स्पष्ट झाली की जे लोक स्वत:ला मुसलमान दर्शवितात परंतु मनाचे ईमान बाळगत नाहीत ते जर सत्कार्ये करतात मग ती नमाज असो किंवा जेहाद तर ते अल्लाह च्या जवळ स्विकृत नाही कारण सर्वश्रेष्ठ अल्लाह अशाच कर्मांना कबूल करतो जी ईमान बाळगून केवळ अल्लाहची मर्जी संपादण्या करीता केली गेली असावीत.

मुसलमानांच्या सद्यकालीन समाजात अशा लोकांची कमतरता नाही जे मुनाफिक लोकांच्या पाऊलावर पाऊल ठेवून चालत आहेत. विशेषत:आधुनिक सुशिक्षित वर्गात, त्यांचे वर्तन ईमानाच्या निकडी विरूध्द असते. परंतु ज्या अर्थी अंत: करणाची दशा केवळ अल्लाहलाच माहीत असते म्हणून त्यांच्या दाव्याच्या आधारावर त्यांना जगात मुसलमानच समजले जाईल परंतु याचा अर्थ असा नव्हे की अल्लाहच्या दृष्टीत ही ते मुसलमान च ठरतील. जर त्यांची हृदये ईमान विरहीत असतील तर सर्वश्रेष्ठ अल्लाह त्यांच्या इस्लाम विषयक दाव्यास अवास्तव ठरवील आणि त्यांची सत्कर्मे त्यांच्या तोंडावर फेकून मारली जातील. मग ती नमाज, हज्ज व जेहाद सारखी मोठ मोठी सत्र्मे का असेनात. शरीरात आत्मा नसेल तर ते शरीर व्यर्थ होय. तद्‌त्‍च ती सत्कर्मे निरर्थक होत, ज्यांच्या ठायी ईमाना चा आत्मा नसेल.

३९. म्हणजे कोणी अशी कल्पना करू नये की सर्वश्रेष्ठ अल्लाह त्यांची सत्कर्मे कशा प्रकारे वाया घालवील. असे करण्यात अल्लाहला कोणतीच अडचण असणार नाही आणि ना असे करणे न्यायाच्या विपरीत असेल.

४०. म्हणजे हे मुनाफिकीन (दांभिक मुसलमान) काफिरांच्या सैन्या ने इतके प्रभावित व भयग्रस्त झाले आहेत की आक्रमक समूह असफल पणे परत गेले असले तरी यांना मात्र असे वाटत आहे की ते जवळपास कोठेतरी आहेत व ते पुन्हा हल्ला करतील अशी भिती आहे.

४१. म्हणजे आता यांच्या आकांक्षा अशा आहेत जर काफीर, सैन्याने दुसऱ्यांदा हल्ला केला तर त्या प्रसंगी ते शहरात राहणार नाहीत किंबहुना खेडया पाडयात जाऊन ग्रामीण लोकांमध्ये राहतील, यासाठी की मुकाबला करण्याचा प्रसंग येऊ नये आणि तिथे राहूनच मुसलमानांच्या स्थिती विषयी माहीती घेत रहावे की त्यांचा काफिरांच्या हातून पराभव झाला किंवा नाही.

४२. कारण यांना ना जेहाद विषयी गोडी आहे आणि ना ते एखादे बलिदान देण्यास तत्पर आहेत. त्यांचे युध्दात सहभागी होणे केवळ दिखावा व परिस्थितीच्या दडपणामुळेत होय.

स्पष्ट असावे की त्या काळात मदीना येथे कबीला पध्दति होती. आणि ओस व खजरज हे दोन मोठे कबीले होते. जेव्हा या कबिल्यांनी इस्लाम कबूल केला तेव्हा जे इस्लाम कबूल करू ईच्छित नव्हते त्यांच्यासमोर मोठा प्रश्न उभा राहीला तो असा की अशा परिस्थितीत कबील्याच्या धर्मापासून वेगळे राहील्याने त्यांचे त्या कबील्यात काहीच स्थान राहणार नाही आणि सामाजिक समस्या ही उद्‌भवतील. म्हणून त्यांनी यातच आपले भले जाणले की मनाच्या विरूध्द का असेना, स्वत:ला मुस्लिम समुदायात सामील करावे. त्यानंतर याच ते त्या जबाबदाऱ्या पार पाडू शकले नाहीत, ज्या मुसलमान या नात्याने त्यांच्यावर होत्या आणि त्यांची दांभिकता अधिकाधिक उघड होत गेली.

४३. म्हणजे अल्लाहच्या पैगंबरानी या प्रसंगी जे कष्ट सोसले जे धोके पत्करले, युध्द आघाडीवर ज्या प्रकारे निश्चल राहीले व जे शौर्य दाखविले या सर्व गोष्टीत पैगंबराच्या अनुयायी साठी उत्कृष्ट नमुना होता. यास्तव या प्रसंगी तुम्ही तेच कार्य करावयास हवे होते जे पैगंबरांनी केले.

आयतीचा संकेत या विशेष घटनेकडे असला तरी सामान्यत:शब्द एक अतिशय महत्वपूर्ण व तात्विक बाबीस प्रमाणित करतात आणि ती अशी की पैगंबरांचे आचरण ईमान बाळगणाऱ्यां करीता पूर्णत: नमुना (आदर्श) होय. यास्तव त्यांनी पैगंबराच्या जीवनास आपल्या डोळया समोर ठेवावे व त्या आदर्श आचरणाचे अनुसरण करावे. यावरून ही गोष्टी ही स्पष्ट झाली की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचा आदर्श ओलांडून जर एखाद्याने जर काही वर्तन अंगिकारले आहे तर ते मुसलमानां करीता अनुकरणीय नाही मग ते वर्तन विरक्त व कर्मठ उपासकांचे असो किवा सूफी लोकांचे.

४४. म्हणजे पैगंबरांच्या आदर्श आचरणाचे अनुसरण करणारे वस्तुत: तेच लोक असू शकतात जे अल्लाहच्या भेटीची आशा बाळगून असावेत अंतिम दिनी म्हणजे निवाडयाच्या दिवशी मोबदल्याची अपेक्षा बाळगून असावेत आणि ज्यांच्या मनात अल्लाहचे स्मरण रूजले असावे, व जीभा निरंतर स्मरण करीत असाव्यात, ज्यांच्या अंगी हा गुणधर्म नाही, त्यांच्यात एवढे साहस असू शकत नाही की संकट पूर्ण परिस्थितीत पैगंबरांना साथ द्यावी व त्यांच्या आदर्श आचरणास दृष्टिपथात ठेवून आपले आचरण घडवावे.

आज मुसलमानां मध्ये अशा लोकांची कमतरता नाही जे पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या आदर्श गुणांची प्रशंसा तर खूप करतील. परंतु त्यांना स्वत: साठी मार्गदर्शक बनाविणार नाहीत. किंबहुना जे मार्गभ्रष्ट लोक आपल्या जीवनाचा अतिशय निकृष्ट नमुना सादर करीत आहे. त्यास मात्र कबूल करतात अशासाठी की ऐहीक प्रगती ही व्हावी व जगातच्या लोकांनी त्यांच्या शी खूश देखील रहावे.

४५. अहजाब युध्दाच्या प्रसंगी प्रामाणिक व एकनिष्ठ ईमान बाळगणाऱ्यांचे जे आचरण राहीले ते या ठिकाणी उघडपणे दाखविले गेले आहे. ज्यावरून त्यांची अल्लाह व त्यांच्या पैगंबराशी असल्ली एकनिष्ठता, वचनपालन, धैर्यशीलता आणि बलीदानास्तव तत्परता दिसून येते. मुनाफीक तर आयत क्र. ११ व १२. मधील निवेदनानुसार काफीरांच्या सैन्यास पाहून अल्लाह विषयीच दुराग्रह करून बसले आणि म्हणू लागले की अल्लाह व त्याच्या पैगंबराचा वायदा केवळ एक धोका होता, परंतु खऱ्या ईमान बाळगाऱ्यांच्या मुखातून हे, ईमान वर्धक शब्द बाहेर पडले हे तर तेच होय ज्याचा अल्लाह व त्याच्या पैगंबराने आमच्याशी वायदा केला होता, हा संकेत होता या गोष्टी कडे की यशाचा मार्ग अग्निदिव्यातून जात असतो. हीच गोष्ट सूरह बकरा मध्ये फर्माविली गेली आहे.

اَمْ حَسِبْتُمْ اَنْ تَدْخُلُوا الْجَنَّةَ وَلَمَّا يَاْتِكُمْ مَّثَلُ
الَّذِيْنَ خَلَوامِنْ قَبْلِكُمْ۔ (بقرہ:۲۱۴)

''काय तुम्ही अशी समजूत करून घेतली आहे की तुम्हाला जन्नत मध्ये प्रवेश मिळेल? यद्यपि तुमच्यापूर्वी होऊन गेलेल्या लोकांना ज्या परिस्थितीला तोंड द्यावे लागले त्या सारख्या परिस्थितीशी तुमचा अजून संबंध आलेली नाही.'' (सूरह बकरा-२१४)

तसेच सूरह अन्कबूत मध्ये फर्माविले,

اَحَسِبَ النَّاسُ اَنْ يُّتْرَكُوْٓا اَنْ يَّقُوْلُوْٓا اٰمَنَّا وَهُمْ لَا يُفْتَنُوْنَ۔ وَلَقَدْ
فَتَنَّا الَّذِيْنَ مِنْ قَبْلِهِمْ فَلَيَعْلَمَنَّ اللّٰهُ الَّذِيْنَ صَدَقُوْا وَلَيَعْلَمَنَّ
الْكٰذِبِيْنَ۔ (سورہ عنکبوت:۲،۳)

''काय लोकांनी असे समजून घेतले आहे की त्यांना असे म्हणण्यावर सोडून दिले जाईल की आम्ही ईमान बाळगले आणि त्यांची कसोटी घेतली जाणार नाही? वस्तुत: जे लोक यांच्यापूर्वी होऊन गेले, त्यांची आम्ही कसोटी घेतली आहे. तेव्हा अल्लाह त्या लोकांना निश्चित जाणून राहील जे सच्चे आहेत व त्या लोकांना ही जे खोटारडे आहेत.''(सूरह अन्कबूत-३१)

आणि जेव्हा त्यांनी या ईमान दर्शक भावना व्यक्त केल्या, तेव्हा त्यांच्या ईमान स्थितीत व त्यांच्या आज्ञापालनात अधिक भर पडली.

**ईमान बाळगणाऱ्यां मध्ये असे ही लोक आहेत ज्यांनी अल्लाहशी केलेल्या वचनास खरे करून दाखविले यांच्या पैकी काहींनी तर आपले नवस पूर्ण केले आणि काही वाट पहात आहेत त्यांनी (यात) कसलाच बदल केला नाही.*(अल-क़ुर्आन)***

२३. ईमान बाळगणाऱ्यां मध्ये असे ही लोक आहेत ज्यांनी अल्लाहशी केलेल्या वचनास खरे करून दाखविले [४६] यांच्या पैकी काहींनी तर आपले नवस पूर्ण केले [४७] आणि काही वाट पहात आहेत. [४८] त्यांनी (यात) कसलाच बदल केला नाही.

مِنَ الْمُؤْمِنِينَ رِجَالٌ صَدَقُوا مَا عَاهَدُوا اللَّهَ عَلَيْهِ ۖ فَمِنْهُم
مَّن قَضَىٰ نَحْبَهُ وَمِنْهُم مَّن يَنتَظِرُ ۖ وَمَا بَدَّلُوا تَبْدِيلًا ﴿٢٣﴾

२४. (ही कसोटी अशासाठी उद्‌भवली) जेणेकरून अल्लाहने सच्चया लोकांना त्यांच्या खरेपणाचा मोबदला द्यावा आणि मुनाफिक (दांभिक) लोकांना वाटल्यास शिक्षा द्यावी किंवा त्यांची तौबा (क्षमायाचना व पुन्हा गुन्हा न करण्याचा अटळ निश्चय) कबूल करावी, [४९] नि:संशय अल्लाह माफ करणारा व कृपावंत आहे.

لِّيَجْزِيَ اللَّهُ الصَّادِقِينَ بِصِدْقِهِمْ وَيُعَذِّبَ الْمُنَافِقِينَ
إِن شَاءَ أَوْ يَتُوبَ عَلَيْهِمْ ۚ إِنَّ اللَّهَ كَانَ غَفُورًا رَّحِيمًا ﴿٢٤﴾

२५. आणि अल्लाह ने काफिरांना अशा स्थितीत परतविले की ते क्रोधाने भारावलेले होते आणि कसलाही लाभ प्राप्त करू शकले नाहीत. [५०] आणि ईमान बाळगणाऱ्यां तर्फे लढण्या करीता अल्लाह पुरेसा झाला. [५१] अल्लाह मोठा शक्तिशाली व वर्चस्वशाली आहे. [५२]

وَرَدَّ اللَّهُ الَّذِينَ كَفَرُوا بِغَيْظِهِمْ لَمْ يَنَالُوا خَيْرًا ۚ وَكَفَى اللَّهُ
الْمُؤْمِنِينَ الْقِتَالَ ۚ وَكَانَ اللَّهُ قَوِيًّا عَزِيزًا ﴿٢٥﴾

२६. आणि ग्रंथ बाळगणाऱ्यां पैकी ज्या लोकांनी यांची (आक्रमक समूहांची) मदत केली होती अल्लाहने त्यांच्या गडां मधून त्यांना खाली उतरविले आणि त्यांच्या मनात असा धाक बसवला की एका समूहास तुम्ही ठार करीत राहीले व दुसऱ्या समूहास तुम्ही कैद केले. [५३]

وَأَنزَلَ الَّذِينَ ظَاهَرُوهُم مِّنْ أَهْلِ الْكِتَابِ مِن صَيَاصِيهِمْ
وَقَذَفَ فِي قُلُوبِهِمُ الرُّعْبَ فَرِيقًا تَقْتُلُونَ
وَتَأْسِرُونَ فَرِيقًا ﴿٢٦﴾

२७. आणि तुम्हाला त्यांची जमीन, त्यांची घरे व त्यांच्या धनसम्पत्तीचा वारसदार बनविले. [५४] आणि अशा जमीनीचाही जिच्यावर अद्याप तुम्ही पाऊल ठेवले नाहीत. [५५] अल्लाह प्रत्येक गोष्ट करण्यास समर्थ आहे.

وَأَوْرَثَكُمْ أَرْضَهُمْ وَدِيَارَهُمْ وَأَمْوَالَهُمْ وَأَرْضًا لَّمْ تَطَئُوهَا ۚ
وَكَانَ اللَّهُ عَلَىٰ كُلِّ شَيْءٍ قَدِيرًا ﴿٢٧﴾

४६. म्हणजे ही प्रतिज्ञा की ते अल्लाहच्या मार्गात प्राण पणाला लावतील.

४७. म्हणजे प्राण पणाला लावून त्यांनी आत्माहुति दिली.

४८. म्हणजे या गोष्टीची वाट पहात आहेत की केव्हा त्यांना अल्लाहच्या मार्गात तळहातावर शिर घेऊन पराक्रम दाखविण्याची संधी लाभते.

४९. म्हणजे त्यांनी ठोकर खाल्लयानंतर स्वत:चा तोल सावरावा आणि आपल्या चुकीच्या वर्तना बद्दल अल्लाह समोर क्षमा याचना करावी. यास अभिप्रेत दांभिकांना हे स्पष्टत: सांगणे होय की तुमच्या करीता आता देखील तौबा (क्षमा-याचने) ची संधी आहे. असे असतांना ही स्वत:ला का म्हणून अल्लाहच्या शिक्षेस पात्र ठरविता?

५०. म्हणजे अल्लाहची उपाय योजना अशी झाली की काफीर लोक रागाच्या भरात असफलता पूर्वक परतले. मदीना च्या मुसलमानांच्या केसाला ही धक्का ते लावू शकले नाहीत आणि नाया युध्दामुळे त्यांना काही लाभ घडू शकला.

५१. म्हणजे ते मुसलमानां विरूध्द एकसंघ होऊन आक्रमक बनले असले तरी सर्वश्रेष्ठ अल्लाह ने अशी परिस्थिती निर्माण केली की मुसलमानांना लढण्याची गरजच भासली नाही, त्यांच्या तर्फे लढण्या साठी अल्लाह पुरेसा ठरला. हज्ज च्या प्रसंगी सफा आणि मरवा या ठिकाणी जी वचने मुखाने काढली जातात त्यांचा अर्थ असा.

لَاإِلٰهَ إِلَّا اللهُ وَحْدَهُ أَنْجَزَ وَعْدَهُ وَنَصَرَ عَبْدَهُ وَهَزَمَ
الْأَحْزَابَ وَحْدَهُ۔ (مسلم کتاب الحج)

''एक अल्लाह खेरीज कोणी ही ईश्वर नाही त्याने आपला वायदा पूर्ण केला आणि आपल्या दासांची मदत केली आणि आक्रमक सैन्यांना एकटयाने पराभून केले.'' (मुस्लिम किताबुल हज्ज)

ही वचने त्या घटने चे स्मरण घडवितात आणि अल्लाह च्या मदतीचे ही स्मरण घडवितात.

५२. अल्लाह सामर्थ्य बाळगणारा आहे म्हणून एका सैन्या च्या पराभवाची साधने निर्माण करणे त्यांच्या करीता काहीच कठीण नाही आणि तो वर्चस्व शाली आहे म्हणून त्याची प्रत्येक योजना कार्यान्वित झाल्याखेरीज राहात नाही.

५३. अभिप्रेत बनी कुरेजा होय. या जनसमुदायाचे लोक मदीने च्या पूर्वेकडील भागात वसत होते व धर्माने यहुदी होते. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी हिजरत (देशत्यागा) नंतर यांच्याशी करार केला होता, परंतु ते आपल्या वचनाशी एक निष्ठ राहू शकले नाहीत आणि अहजाब युध्दाच्या प्रसंगी त्यांनी वचनभंग करून आक्रमक काफीरांना साथ दिली. जेव्हा पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) खंदक युध्द आटोपल्यानंतर घरी परतले तेव्हा हजरत जिब्रील, अल्लाहचा हा आदेश घेऊन अवतरले की क्षणाची ही उसंत न घेता बनी कुरेजाच्या दिशेने मोर्चा वळवला जावा आणि त्यांच्या विरूध्द लष्करी कारवाई केली जावी. म्हणून त्याच क्षणी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) आपल्या सहवासातील अनुयायींना घेऊन बनी कुरेजा कडे निघाले तिथे पोहचल्यावर त्यांना वेढा घातला. हा वेढा पंचवीस दिवस राहीला. शेवटी बनी कुरेजा या अटी वर आपल्या किल्लया मधून उतरले की ओस कबिल्याचे सरदार हजरत सअद बिन मुआज यांना, जे बनी कुरेजा वंशा चे मित्र होते, शासक बनविले जावे यास्तव हजरत सअद बिन मुआज यांनी निर्णय दिला की 'यांच्यातले जे पुरूष लढण्या योग्य आहेत त्या सर्वांची हत्या केली जावी. त्यांच्या बायका मुलांना कैद केले जावे आणि त्यांची मालमत्ता विभागली जावी.'यावर पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी फर्मावले, तुम्ही अल्लाहच्या आदेशानुसार फैसला केला. (बुखारी-किताबुल मगाजी)

हजरत सअद बिन मुआज यांचा हा निर्णय तौरात नुसार होता. यात हा युद्धविषयक नियम निवेदिला गेला आहे.

''युध्द करावयाला तू एखाद्या नगरावर स्वारी करशील---- ते तह न करिता तुमच्याशी लढू लागले तर त्या नगराला वेढा घालावा तुझा देव परमेश्वर ते नगर तुझ्या हाती देईल तेव्हा त्यांतल्या प्रत्येक पुरुषाला तरवारीने मारुन टाकावे पण त्या नगरातील स्त्रिया, मुले, जनावरे इत्यादि लूट आपल्या साठी घ्यावी '' (अनुवाद:२०:१०ते१४)

अशा प्रकारे यहुदी धर्माच्या बनी कुरेजा वंशाचा मदीनेतून नायनाट झाला. त्यांच्याशी ही कठोर कृती अशा साठी केली गेली की यापूर्वी यहूदी कबीला बनी नजीर चा वचन भंग आणि कट कारस्थानात्मक कारवाया असतांना ही त्यांना ही सुट दिली गेली होती की त्यांनी आपली मुलेबाळे व थोडयाशा सामाना सह मदीना सोडून चालते व्हावे. यास्तव ते खैबर मध्ये वसले परंतु तिथून त्यांनी मुसलमानां विरूध्द पुन्हा कारस्थान रचण्यास सुरवात देली. नंतर बनी कुरेजा ने एका अशा नाजुक प्रसंगी वचनभंग केला, जेव्हा काफीर लोक फार मोठया सैन्या सह मदीना वर आक्रमण करणार होते; आणि यांनी त्यांची मदत करून मुसलमानांच्या पाठीत सुरा खुपसला होता आणि म्हणूनच अशा गद्दार लोकांना कठोर शिक्षा मिळणे क्रमप्राप्त होते.

स्पष्ट असावे की हत्या झालेल्यांची संख्या आठशे हून अधिक नव्हती आणि स्त्रिया व मुलांची संख्या ज्यांना कैद केले गेले होते, सुमारे एक हजार होती (गजवा बनी कुरेजा मुहम्मद अहमद बाश्मील-पृष्ठ-१९७)

५४. धनसम्पत्ति बरोबरच मोठया प्रमाणात शस्त्रास्त्रे ही मुसलमानांच्या हाती लागले. कथना मधील उल्लेखानुसार पंधराशे तरवारी दोन हजार भाले, तीनशे चिलखते आणि पाचशे ढाली युध्द जिंकल्यानंतर माले गनीमत मध्ये मिळाल्या (गजवाह बनी कुरेजा. पृष्ठ-२२९)

५५. ही या गोष्टीची खुशखबर होती की लवकरच असे इलाके ही तुम्ही जिंकाल जिथे अजून तुमची पाऊले पोहचली नाहीत. या नंतर सर्वप्रथम खैबर जिंकले आणि त्यानंतर इतर इलाके. अशा प्रकारे कुरआनाचे भाकित ही खरे ठरले.

**हे पैगंबर ! आपल्या पत्नींना सांगा जर तुम्ही ऐहीक जीवन आणि त्याच्या शोभा सजावटी ची इच्छा बाळगत असाल तर या, मी तुम्हाला काही देऊन सवरून अगदी चांगल्या रितीने निरोप मोळीक देऊन टाकावा.** ***(अल-कुर्आन)***

२८. हे पैगंबर ! आपल्या पत्नींना सांगा [५६] जर तुम्ही ऐहीक जीवन आणि त्याच्या शोभा सजावटी ची इच्छा बाळगत असाल तर या, मी तुम्हाला काही देऊन सवरून अगदी चांगल्या रितीने निरोप मोकळीक देऊन टाकावा.[५७]

يَا أَيُّهَا النَّبِيُّ قُلْ لِأَزْوَاجِكَ إِنْ كُنْتُنَّ تُرِدْنَ الْحَيٰوةَ الدُّنْيَا
وَزِينَتَهَا فَتَعَالَيْنَ أُمَتِّعْكُنَّ وَأُسَرِّحْكُنَّ سَرَاحًا جَمِيلًا ﴿٢٨﴾

२९. आणि जर तुम्ही अल्लाह व त्याचा पैगंबर आणि आखिरत च्या स्थानाची अभिलाषा बाळगत असाल तर (विश्वास राखा) तुमच्या पैकी जे सदाचारा चे वर्तन पत्करतील, त्यांच्या करीता अल्लाह ने फार मोठा मोबदला. तयार करून राखला आहे.[५८]

وَإِنْ كُنْتُنَّ تُرِدْنَ اللّٰهَ وَرَسُولَهُ وَالدَّارَ الْآخِرَةَ فَإِنَّ
اللّٰهَ أَعَدَّ لِلْمُحْسِنٰتِ مِنْكُنَّ أَجْرًا عَظِيمًا ﴿٢٩﴾

३०. हे पैंगबराच्या पत्नींनो ! तुमच्या पैकी जी उघडरित्या निर्लज्जतेचे कृत्य करील तिला दुहेरी-शिक्षा दिली जाईल.[५९] अल्लाह करीता ही गोष्ट सोपी आहे.[६०]

يٰنِسَاءَ النَّبِيِّ مَنْ يَأْتِ مِنْكُنَّ بِفَاحِشَةٍ مُبَيِّنَةٍ
يُضٰعَفْ لَهَا الْعَذَابُ ضِعْفَيْنِ وَكَانَ ذٰلِكَ
عَلَى اللّٰهِ يَسِيرًا ﴿٣٠﴾

३१. आणि तुमच्या पैकी जी अल्लाह व त्याच्या पैगंबराची आज्ञाधारक बनून राहील आणि सदाचरण करील तर आम्ही तिला दुहेरी मोबदला प्रदान करू [६१] आणि आम्ही तिच्या साठी प्रतिष्ठा पूर्ण उपजिविका तयार करून ठेवली आहे.

وَمَنْ يَقْنُتْ مِنْكُنَّ لِلّٰهِ وَرَسُولِهِ وَتَعْمَلْ صَالِحًا
نُؤْتِهَا أَجْرَهَا مَرَّتَيْنِ وَأَعْتَدْنَا لَهَا رِزْقًا كَرِيمًا ﴿٣١﴾

३२. हे पैगंबराच्या पत्नींनो ! तुम्ही इतर स्त्रीयां-समान नाहीत [६२] जर तुम्ही ईश भय बाळगणाऱ्या असाल तर कोमल स्वराने बोलत जाऊ नका की (अशाने) ज्याच्या मनात विकार आहे त्याने लालसा बाळगू लागावे. [६३] आणि भलेपणाची गोष्ट बोलावी. [६४]

يٰنِسَاءَ النَّبِيِّ لَسْتُنَّ كَأَحَدٍ مِنَ النِّسَاءِ
إِنِ اتَّقَيْتُنَّ فَلَا تَخْضَعْنَ بِالْقَوْلِ فَيَطْمَعَ
الَّذِي فِي قَلْبِهِ مَرَضٌ وَقُلْنَ قَوْلًا مَعْرُوفًا ﴿٣٢﴾

३३. आपल्या घरांमध्ये थांबून रहा आणि पूर्वीच्या अज्ञान पणा सम श्रृंगार-प्रदर्शन करू नका. [६५] नमाज कायम करा,जकात द्या [६६] आणि अल्लाह व त्याच्या पैगंबराचे आज्ञापालन करा. अल्लाह तर इच्छितो की तुम्हा अहले बैत (पैगंबर-कुटुंबिया) पासून अमांगल्यास दूर करावे आणि तुम्हाला अगदी स्वच्छ शुध्द करावे.[६७]

وَقَرْنَ فِي بُيُوتِكُنَّ وَلَا تَبَرَّجْنَ تَبَرُّجَ الْجَاهِلِيَّةِ الْأُولٰى
وَأَقِمْنَ الصَّلٰوةَ وَآتِينَ الزَّكٰوةَ وَأَطِعْنَ اللّٰهَ وَرَسُولَهُ
إِنَّمَا يُرِيدُ اللّٰهُ لِيُذْهِبَ عَنْكُمُ الرِّجْسَ أَهْلَ الْبَيْتِ
وَيُطَهِّرَكُمْ تَطْهِيرًا ﴿٣٣﴾

५६. इथून एक दूसरा मजकूर सुरू होतो; जो पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या पत्नींशी संबंधित आहे. या आयतींच्या अवतरणा पावेतो म्हणजे हिजरी सन ५ मध्ये पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या निकाह (विवाह-बंधना) मध्ये चार पत्न्या होत्या. हजरत सोदा, हजरत आयशा, हजरत हफ्सा आणि हजरत उम्मे सल्मा इत्यादि

५७. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या पत्नींना जेव्हा ईमान बाळगणाऱ्यांच्या माता असा दर्जा दिला गेला तेव्हा त्यांच्या जबाबदाऱ्याही वाढल्या. आता त्यांना ईश भय, अल्प संतुष्टता आणि मरणोत्तर जीवनाची अभिलाषा या गोष्टींमध्ये अपेक्षित स्तराप्रत पोहचायचे होते आणि ज्याअर्थी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचे जीवन आर्थिक दृष्टया अगदी गरीबीचे जीवन होते, आणि त्यांच्या जवळ ऐष आराम व ऐहिक शोभा सजावटीची कसलीच सामुग्री नव्हती म्हणून सर्वश्रेष्ठ अल्लाह ने पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना अशी ताकीद केली की त्यांनी आपल्या पत्नींची मर्जी त्यांच्या कडून जाणून घ्यावी. जर ते स्वखुशीने अशा प्रकारे जीवन व्यतीत करण्यास तयार नाहीत व ऐहीक शोभा सजावटीचीच इच्छा बाळगतात तर त्यांना काही देऊन सवरून अधिक चांगल्या रीती ने निरोप दिला जावा. यास्तव हदीस वचनात उल्लिखित आहे की पैगंबरांनी सर्वप्रथम हजरत आयशा यांना विचारले आणि फर्माविले की तुम्ही आपल्या माता पित्यांशी विचार विमर्श करून उत्तर द्या, परंतु हजरत आयशा यांनी तत्क्षणी उत्तर दिले की या संदर्भात मी आपल्या माता पित्यांचा काय सल्ला घेणार, जेव्हा मी अल्लाह, त्याचा प्रेषित आणि आखिरत स्थळाचीच अभिलाषा बाळगते. नंतर इतर पत्नींनी ही अशाच प्रकारे उत्तर दिले. (बुखारी किताबुत्तफसीर अलअहजाब) अशा प्रकारे त्यांची स्वतंत्र अशी मर्जी जाणून घेण्याचा एक लाभ हा झाला की त्यांना आत्म प्रतिष्ठेचे स्थान प्राप्त झाले. दुसरे असे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या करीता त्यांचे उत्तर समाधान व आनंद प्राप्तीस कारक ठरले. आणि तिसरा लाभ असा की दांभिक वृत्तीच्या मुसलमानांना हा प्रचार करण्याची संधी लाभू शकली नाही की पैगंबर आपल्या पत्नीचे हक्क पूर्णत: अदा करीत नाही आणि त्या आपल्या मर्जी विरुध्द जीवन जगण्यास अगतिक झाल्या आहेत. आयतीचा उचित अर्थ स्पष्ट झाल्या नंतर या विचाराच्या खंडनाची गरज भासत नाही की पैगंबरांच्या पत्न्या त्यांच्याकडून अधिक खर्चाची मागणी करीत होत्या व ज्यामुळे ते त्रस्त झाले होते. ज्या कथना मध्ये अशा प्रकारची गोष्ट निवेदिली गेली आहे. ती मुळीच योग्य नव्हे कारण त्यात परस्पर विरोधी गोष्टी ही निवेदिल्या गेल्या आहेत आणि अशा गोष्टी देखील ज्या कुरआना विरूध्द आहेत. या कथनांवर चर्चा अल्लाहने इच्छिल्यास सूरह तहरीम च्या अनुरोधाने केली जाईल.

स्पष्ट असावे की फुकहा (धर्म शास्त्रवेत्त्या) नी या अधिकारास तलाक लागू झाल्याच्या अर्थाने घेतले आहे. म्हणजे अशा परिस्थितीत स्त्रीला हा अधिकार प्राप्त होतो की तिने स्वत: वर तलाक लागू करावा परंतु या आयतीत यासाठी कोणतेही प्रमाण नाही. आयतीत तर पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना असे फर्माविले गेले आहे की आपण आपल्या पत्नी कडून हे जाणून घ्यावे की त्या ऐहिक सुख शोभा इच्छितात की अल्लाह व त्याच्या पैगंबरास इच्छितात. जर ऐहीक शोभा सजावट इच्छितात तर अधिक उत्तम रितीने त्यांना निरोप द्यावा म्हणजे त्यांची अशी मर्जी कळल्यानंतर आपण त्यांना तलाक देऊन टाकावे. यावरून हे अनिवार्य कसे की जर पैगंबरांच्या पत्नींनी ऐहिक शोभा, सजावटीची इच्छा बाळगली असती तर आपोआप तलाक झाला असता. खरे तर आयतीत तलाक चा एक ही शब्द वापरला गेला नाही आणि त्यातले हे शब्द;

وَ اُسَرِّحْكُنَّ سَرَاحًا جَمِيْلًا

''मी तुम्हाला अधिक उत्तम रित्या निरोप द्यावा''

स्पष्ट दर्शवितात की त्यांनी मोकळीक (तलाक) दिल्या नंतर च त्या विभक्त होतात. म्हणून या अधिकारास तलाक लागू झाला असे समजणे योग्य नव्हे. आणि धर्मशास्त्र वेत्त्यांनी तलाक लागू होण्या संबंधी चा जो नियम स्पष्ट केला आहे. त्यावरून आजच्या काळातील असे मुसलमान जे इस्लामच्या कौटुंबिक कायद्यांवर संतुष्ट नाहीत व त्यात फेरबदल करण्यास टपून बसले आहेत. हा प्रस्ताव मांडतात की निकाह प्रसंगी आपसात करार नामा तयार केला जावा ज्यात पुरूषाने पत्नीस हा पूर्वाधिकार द्यावा की अमुक अशा परिस्थितीत पत्नी स्वत: वर तलाक लागू करू शकते. तलाक लागू करण्याचे हे निमित्त अंगिकारून ते स्त्री-पुरूषात समानते चा नियम कायम करू इच्छितात. परंतु शरीअत ने कोणत्या न कोणत्या हेतुस्तव ज्यात स्त्री जाती चा लाभ ही आहे, तलाक चा अधिकार पुरूषाला दिला आहे, स्त्री जातीला नव्हे. यास्तव या आधिकारास स्त्रीयां च्या हाती देण्याचा प्रयत्न शरीअतच्या उद्दिष्टाच्या अगदी विपरीत आहे.

اُمَتِّعْكُنَّ ''तुम्हाला काही देऊन सवरून'' च्या अनुरोधाने ही बाब देखील स्पष्ट झाली की तलाक च्या परिस्थितीत पत्नीस काही धनद्रव्य दिले गेले पाहीजे. याने या दृष्टिकोनाचे समर्थन होते की सूरह बकरा च्या आयत क्र. २४१ मध्ये तलाक दिल्या गेळेल्या स्त्रीयांना अधिक चांगल्या रितीने धन संपदा देण्याचा जो ताकीद पूर्ण आदेश दिला गेला आहे, तो समस्त

मुतल्लका (घटस्फोटीन स्त्रीयां) करीता आहे. केवळ अशा घटस्फोटीतां संबंधी नाही ज्यांना एकांता पूर्वीच तलाक दिला गेला असावा (पहा सूरह बकरा टीप क्र. ३७६, ३७७)

५८. म्हणजे जर तुम्ही ऐहिक आभिलाषे ऐवजी आखिरत (मरणोत्तर लाभणारे निरंतर जीवन) च्या अभिलाषेस ध्येय आणि अल्लाह व त्याच्या पैगंबरास प्रिय मानले आणि सदाचारांचे वर्तन पत्करले तर तुमचे स्थान फार उच्च ठरेल आणि सर्वश्रेष्ठ अल्लाह तुम्हाला फार मोठया मोबदल्याने उपकृत करील.

५९. याचा ही अर्थ असा नव्हे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या पत्नींकडून एखाद्या अशोभनीय कृत्य घडण्याचे भय होते. किंबहुना सत्शीलता व सदाचाराची अत्याधिक जाणीव करून देणे अभिप्रेत होते. अशासाठी की त्यांनी अधिक काळजी घ्यावी आणि दांभिक मुसलमानांना त्यांच्या विरूध्द शंका संशय घेण्यास संधी मिळू नये.

यावरून ही गोष्ट स्पष्ट झाली की अल्लाह चा नियम निरंकुश आहे. एकाद्या पैगंबराची पत्नी ही जर अपराध कृत्य करते तर ती अल्लाह च्या दृष्टिने शिक्षेस पात्र ठरते किंबहुना दुहेरी शिक्षेस. कारण हा अपराध या कारणास्तव अतिशय गंभीर स्वरूपाचा ठरेल की अशाने एका पैगंबराच्या घराण्याची बदनामी होईल आणि लोकांसमोर मोठे वाईट उदाहरण प्रस्थापित होईल.

६०. म्हणजे अपराध करण्याच्या स्थितीत एखाद्या पैगंबरांच्या पत्नीस शिक्षा देणे अल्लाहला कठीण जाणार नाही, कारण अल्लाहचा न्याय-विधि निरंकूश आहे.

६१. जेव्हा पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या पत्नी स्थान 'उम्मेहातुल मोमीनीन' अर्थात ईमान बाळगणाऱ्यांच्या माता असे ठरले, तेव्हा या उच्चतम स्थानास अनुसरुन त्यांच्यावर मोठया जबाबदाऱ्या ही आल्या. त्या जबाबदारींचे निवेदन करतांना त्यांना ही खुशखबरी ही दिली गेली आहे की जर त्या अल्लाह व त्याच्या प्रेषिताशी एकनिष्ठ राहून सत्कर्म करतील तर त्यांना हा मान-सन्मान प्रदान केला जाईल की त्यांना दुहेरी मोबदला प्राप्त होईल.

६२. म्हणजे इतर स्त्रीयांच्या तुलनेने तुम्हाला हे वैशिष्टय लाभले आहे की तुम्ही पैगंबराच्या पत्न्या आहात यास्तव तुम्हाला आपल्या जीवन-आचरणात अधिक सतर्क असले पाहीजे.

६३. या ठिकाणी विकारा शी अभिप्रेत कामवासने चा रोग. स्त्रीयांचा स्वर सामान्यात: सुरेल असतो. आणि जेव्हा त्या कोमल पणे बोलू लागतात तेव्हा ज्यांच्या स्वभावात कामुक प्रवृत्ती असते त्या वाईट इच्छा अभिलाषा बाळगू लागतात. म्हणून ईश-भयाची निकड अशी की स्त्रीयांनी पुरूषांशी बोलतांना आपल्या स्वरात अधिक कोमलता आणू नये आणि ज्याअर्थी ही ईश-भयाची निकड आहे तेव्हा याचे पालन प्रत्येक स्त्रीने केले पाहीजे. या ठिकाणी पैगंबरांच्या पत्नींना संबोधून ही व या सारख्या ज्या इतर ताकीद दिल्या गेल्या आहेत याचा हा अर्थ नव्हे की ही ताकीद फक्त त्यांच्या करीता आहे व इतर स्त्रीयां साठी नाही किंबहुना याचा अर्थ असा की पैगंबरांच्या पत्नींनी याचे अधिकाधिक पालन केले पाहीजे आणि याबाबतीत अत्याधिक सावधगिरी पाळली पाहीजे.

या अनुरोधाने ही तात्विक बाब ही स्पष्ट होते की इस्लाम जेव्हा स्त्रीयांना पुरुषांशी लडीवाळ पणे बोलण्यास मनाई करतो तेव्हा तो त्यांच्या गाण्यास कशा प्रकारे उचित ठरवू शकतो? धार्मिक दृष्टा या विषयीची वर्ज्यता अगदी स्पष्ट आहे परंतु आजच्या काळात स्त्रीयांचे गाणे ते ही अगदी अशलील शैलीत इतके सर्वसामान्य झाले आहे की त्याचा इन्कार करण्याची कल्पनाच शिल्लक राहीली नाही. क्वचितच असे लोक आढळतील जे या विषयीची वर्ज्यता लक्षात घेता असली गाणी ऐकण्याचे टाळत असावेत.

६४. म्हणजे तुमच्या मुखातुन जी काही गोष्ट निघेल ती भलाईचीच असावी. कोणती ही अनुचित गोष्ट बोलण्या पासून तुम्ही अतिश्य दूर राहीले पाहीजे.

६५. मूळ ग्रंथात तर्बरुज हा शब्द वापरला गेला आहे. याचा अर्थ अभिव्यक्ति व प्रदर्शन असा आहे आणि यास अभिप्रेत अनोळखी पुरुषां समोर श्रृंगार-प्रदर्शन करीत हिंडणे. जसे की सूरह नूर आयत क्र. ६०

غَيْرَ مُتَبَرِّجَاتٍ بِزِيْنَةٍ

''आपल्या सजावटीचे प्रदर्शन करणाऱ्या नसाव्यात'' वरून स्पष्ट आहे. आणि الجاهلية الاولى **अल–जाहिलियतिलउला** शी अभिप्रेत गैर इस्लामी रीती रिवाज होत. जे इस्लाम पूर्वी प्रचलीत होते. अर्थात तुमचे खरे कार्यक्षेत्र घर आहे ज्यात राहून तुम्हाला आपल्या जबाबदाऱ्या पार पाडायच्या आहेत. आणि केवळ आपल्या सौंदर्याचे प्रदर्शन करीत फिरण्या साठी घराबाहेर पडणे मुळीच योग्य नव्हे.

याचा अर्थ असा मुळीच नाही की पैगंबरांच्या पत्नींना घराबाहेर पडण्याची बिलकूल मनाई होती. पुढे आयत क्र. ५९ मध्ये पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) याच्या पत्नींना, मुलींना आणि सर्वसामान्य मुस्लिम स्त्रियांना हा आदेश दिला.गेला आहे की, त्यांनी घराबाहेर पडतांना आपल्या अंगावर चादर ओढून घ्यावी. यावरुन घराबाहेर पडण्याची शास्त्रविहीतता सिध्द होते. तसेच हदीस वचनात असा उल्लेख आहे की

قَدْ اُذِنَ لَكُنَّ اَنْ تَخْرُجْنَ لِحَاجَتِكُنَّ ۔ (بخاری کتاب التفسیر)

''तुम्हाला आपल्या गरजे पोटी घराबाहेर पडण्याची अनुमति दिली गेली आहे.'' (बुखारी किताबुत्तफसीर)

पैगंबरांच्या पत्नींना साजेल अशी बाब हीच होती की त्यांनी आपल्या घरात वास्तव्य करावे आणि घराबाहेर पडतांना अधिक दक्षता पाळावी. राहील्या सर्वसामान्य मुस्लिम स्त्रीयां, तर या आयतीच्या अनुरोधाने त्यांचे ही खरे कार्यक्षेत्र 'घर' च होय, परंतु च्या अर्थी त्यांना घराबहेर पडण्याची आवश्यकता पैगंबरांच्या पत्नींच्या तुलनेने अधिक असू शकते म्हणून या आयतीचा उद्देश्य हा नव्हे की त्यांनी स्वत:ला चार भिंतीच्या आत अगदी बंदिस्त करून घ्यावे. आज च्या काळात स्त्रीयांच्या गरजा खरोखर फार वाढल्या आहेत. उदाहरणार्थ, अध्ययन अध्यापन, स्त्रीयांसाठी समाज सेवा आपल्या आर्थिक गरजा भागविणे, धार्मिक मेळाव्यात सहभागी होणे इत्यादि. या प्रकारच्या अत्यावश्यक गरजांकरीता स्त्रीयांना घराबाहेर पडण्यास मज्जाव नाही, मात्र या अटीवर की त्यांनी घराबाहेर पडण्याचे जे शरीअतचे शिष्टाचार आहेत त्यांना दृष्टिपथात राखावे. विशेषत: त्यांनी आपल्या सौंदर्याचे व शृंगाराचे प्रदर्शन करीत फिरू नये.

६६. नमाज व जकात चा आदेश सर्वसामान्य आहे, परंतु विशेषत्वाने पैगंबर पत्नीना संबोधून हा आदेश देण्याचा उद्देश हा की त्यांनी सक्ती पूर्वक या आदेशाचे पालन करावे.

या आयती वरून हे ही स्पष्ट झाले की स्त्री च्या धन सम्पत्ती ची जकात स्त्रीच्याच जबाबदारी वर आहे. तिच्या पतीची जबाबदारी नव्हे. यास्तव तिने आपल्या धनसम्पत्ति मधून जकात अदा केली पाहीजे. दुसरी गोष्ट यावरून ही देखील कळते की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या पत्न्या अगदीच गरीब नव्हत्या, जसे सर्वसामान्यात: समजले जाते; किंबहुना जकात अदा करू शकत होत्या. आणि म्हणूनच त्यांना जकात देण्याचा आदेश दिला गेला आहे. आणि याला पुष्टि या गोष्टीने हि मिळते की पैगंबरांच्या पत्नींचा मेहर (स्त्री-धन) चारशे ऐशी दिरहम राहत असे. जेव्हा दोनशे दिरहम वर जकात लागू होते.

६७. संदर्भ शैली या गोष्टी चे स्पष्ट प्रमाण होय की या ठिकाणी 'अहले बैत' शी अभिप्रेत पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या पत्न्या होत. परंतु मुसलमानांचा एक पंथ, ज्याने हजरत अली यांचे गुणगान करण्यात मर्यादा सोडून 'इमाम' ची श्रध्दा धर्मात दाखल केली आहे. ते या आयतीत ही 'अहले बैत' शी अभिप्रेत हजरत अली, हजरत फातमा, हजरत हसन, व हजरत हुसैन यांनाच घेतात. जेथपावेतो या शब्दाच्या अर्थाशी संबंध आहे यात गौणत: पत्नींचा समावेश आहे. त्यांच्या खेरीज ती संतती ही. म्हणून हा शब्द पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या पत्नी खेरीज त्यांच्या संततीस ही लागू पडतो. परंतु या आयतीत त्यांच्या पत्नींना 'अहले बैत' म्हणून संबोधिले गेले आहे आणि ताकीद देखील प्रत्यक्षत: त्यांनाच दिली गेली आहे म्हणून या प्रसंगी त्यांच्या पत्न्याच अभिप्रेत असू शकतात. परंतु कुरआनाच्या स्पष्ट अर्था कडे पाठ फिरविणाऱ्यांनी 'अहले बैत' मधून त्यांच्या पत्नींना तर बाहेर काढले आहे आणि हजरत अली, हजरत फातमा, हजरत हसन आणि हुसेन यांना च ही उपाधि बहाल केली आणि त्यांच्या पवित्र्याने ते मासूम (निरागस) असण्याचा व मग इमामांच्या निरागस असण्याचा दावा करू लागले. हे लोक या आयतीचे जे स्पष्टीकरण करतात त्यातील चूक स्पष्ट करण्या साठी आम्ही येथे संक्षिप्तपणे काही गोष्टींचे निवेदन करू इच्छितो.

(१) कुरआनात 'अहले बैत' हा शब्द अन्य दोन ठिकाणी वापरला गेला आहे एकदा त्या प्रसंगी जेव्हा फरिश्त्यांनी हजरत इब्राहीम यांची पत्नी सारा यांना इसहाकच्या जन्माची शुभवार्ता दिली आणि जेव्हा सारांनी यावर आश्चर्य व्यक्त केले तेव्हा फरिश्ते म्हणाले,

اَتَعْجِبِيْنَ مِنْ اَمْرِ اللّٰهِ رَحْمَةُ اللّٰهِ وَبَرَكَاتُهٗ عَلَيْكُمْ اَهْلَ الْبَيْتِ۔ (هود:٧٣)

''काय तुम्ही अल्लाहच्या आदेशावर आश्चर्य व्यक्त करता? हे पैगंबरी घराण्याच्या लोकांनो ! अल्लाहची कृपा व त्याची समृध्दि असो तुमच्यावर.''(सूरह हूद – ७३)

या आयतीत 'अहले बैत' हे संबोधन हजरत इब्राहीम यांच्या पत्नीला उद्देशून आहे. आणि दुसऱ्या एका ठिकाणी हजरत मूसा यांच्या पालन पोषण संदर्भात जेव्हा त्यांच्या बहिणी ने फिरऔन च्या लोकांना म्हटले,

هَلْ اَدُلُّكُمْ عَلٰى اَهْلِ بَيْتٍ يَّكْفُلُوْنَهٗ لَكُمْ۔ (قصص:١٢)

''काय मी तुम्हाला अशा घरवाल्यांचा (कुटंबियांचा) पत्ता सांगू जे तुमच्यासाठी याचे पालन पोषण करतील.'' (कसस. १२)

या आयतीत देखील अहले बैत शी अभिप्रेत हजरत मूसा याची माता होय.

स्पष्ट झाले की अहले बैत मध्ये गौणत: पत्नींचा ही समावेश आहे.

हदीस वचनातील उल्लेखानुसार हजरत जैनब यांच्या वलीमा (जेवण वेळ) प्रसंगी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचे हजरत आयशा यांच्या हुजऱ्यात शुभागमन झाले तेव्हा त्यांनी फर्माविले,

اَلسَّلَامُ عَلَيْكُمْ اَهْلَ الْبَيْتِ وَرَحْمَةُ اللّٰهِ

''सलाम आणि अल्लाहची कृपा होवो तुम्हावर हे 'अहले बैत.'' (बुखारी किताबुत्तफसीर)

म्हणजे पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी स्वत: अहले बैत या नावाने आपल्या पत्नींना संबोधिले. या उपरान्त

त्यांच्या पत्नीचे अहले बैत पैकी होण्यासाठी आणखी कोणत्या पुराव्याची गरज बाकी राहते?

(२) ही गोष्ट की आयतीत अहले बैत च्या संबंधाने सर्वनामात पुल्लिंग वापरले गेले आहे म्हणून पत्न्या अभिप्रेत असू शकत नाही हे म्हणणे उचित नाही कारण अरबी भाषेत 'अहल' शब्दाच्या सवलती पासून पुल्लिंगी सर्व नाम वापरले जाते म्हणून वर ज्या दोन आयतींचा संदर्भ दिला गेला आहे जेव्हा पहिल्या आयतीत हजरत इब्राहीम यांच्या पत्नींना संबोधून आहे आणि दूसऱ्या आयतीत अहले बैत शी अभिप्रेत हजरत मूसा यांची माता होय.

(३) स्पष्टीकरण करणारे अशा कथनांचा आधार घेतात ज्यात निवेदिले गेले आहे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी हजरत फातमा, हसन हुसेन आणि अली यांना बोलाविले व एका चादरी खाली झाकले आणि फर्माविले, हे अल्लाह हे माझे अहले बैत (घरची माणसे) आहेत यांच्या पासून घाण दूर कर व यांना खूप स्वच्छ शुध्द कर. हे हदीसवचन तिर्मिजी ने निवेदिले आहे आणि या आशयाची अनेक कथने तबरी ने आपल्या भाष्यात ही निवेदिली आहेत. परंतु ही कथने प्रमाण दृष्टया कमकुवत आहेत. म्हणून तिर्मिजी ने हे जईफ (प्रमाण दृष्या कम कुवत) असण्याचे स्पष्ट केले आहे. आणि तबरीच्या कथनांमध्ये बहुतेक कथनकर्ते शिया पंथी आहेत. उदाहरणार्थ एक कथन कर्ता अब्दुल्लाह बिन अब्दुल कुद्दुस हे आहेत. हे शिया पंथी आहेत. इब्ने मअीन यांनी यांना राफ्जी म्हटले आहे आणि अबु दाऊद नसाई, आणि दार कतनी यांनी या कथनास जईफ म्हटले आहे. (या कथनांच्या संशोधना करीता पहा डॉ. अली अहमद अस सालुसी यांचे पुस्तक

آیۃ التطھیر بین امھات المؤمنین و اھل الکساء۔

आयतुत ततहीर प्रकाशक मक्तबा इब्ने तयमिय्याह पो. बॉ. १४०६४ कुवेत.) इथे हा प्रश्न ही उपास्थित होतो की या आयतींच्या अवतरण प्रसंगी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या आणखी दोन कन्या हजरत उम्मे कुलसुम आणि हजरत जैनब जिवंत होत्या. मग यांना सोडून फक्त हजरत फातमा यांना अहले बैत मध्ये सामील करण्याचा काय अर्थ? उम्मे कुलसुम तर हजरत उस्मान यांच्या निकाह (विवाह-बंधना) मध्ये होत्या आणि हजरत जैनब, अबुल आस यांच्या निकाह मध्ये. परंतु ज्या अर्थी शिया पंथीय लोक हजरत अली यांच्या इमामत चे दावेदार आहेत, म्हणून ते अहले बैत मध्ये हजरत फातमा आणि हसन व हुसैन यांना तर सामील करतात परंतु उम्मे कुलसुम, व जैनब यांना मात्र दृष्टीआड करतात, तेव्हा नवल नव्हे की उल्लिखित कथने शिया पंथीयांनी स्वत:च मनाने रचलेली असावी.

(४) स्पष्टीकरण करणारे या आयतीद्वारे हजरत अली आणि इमामांच्या निष्पाप-निरागस असण्या बद्दल युक्तिवाद करतात. परंतु या आयतीत असे काही सांगितले गेले नाही. प्रथम तर आयत पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या पत्नी विषयी आहे, अधिक हे की यात असे फर्माविले गेले नाही की हे पैगंबरांच्या घराण्यातील लोकांनो तुम्हाला अल्लाह ने स्वच्छ शुध्द केले, किंबहुना असे फर्माविले की अल्लाह तुम्हाला स्वच्छ शुध्द इच्छितो आणि हे त्याच प्रकारचे निवेदन होय जसे सूरह मायदा मध्ये आहे. ईमान बाळगणाऱ्यांना वुजू (शुचिर्भूतते) चा आदेश दिल्यानंतर फर्माविले,

وَلٰكِنْ يُرِيْدُ لِيُطَهِّرَكُمْ

''किंबहुना तो इच्छितो की तुम्हाला स्वच्छ शुद्ध करावे'' (मायदा-६) उघड आहे या ठिकाणी याचा हा अर्थ नव्हे की समस्त ईमान बाळगणारे ज्यांना वुजू चा आदेश दिला जात आहे ते स्वच्छ शुध्द व निष्पाप निरागस आहेत, किंबहुना याचा अर्थ असा की वुजू च्या आदेशाचे पालन केल्याने त्याना स्वच्छ-शुध्दता लाभेल. यात ज्या प्रकारे ईमान बाळगणाऱ्यांच्या निरागसतेचे कोणते ही प्रमाण नाही, तद्वतच उपरोक्त आयतीत ही अहले बैत च्या निरागसतेचे कोणतेही प्रमाण नाही.

दिर्घ विवरणा सह हे स्पष्टीकरण अशासाठी केले गेले की ज्यामुळे कल्पना यावी की जे लोक आपल्या विशिष्ट श्रध्देला कुरआनाद्वारे सिध्द करु इच्छितात, ते कुरआनाचा स्पष्ट आश्य सोडून कशा प्रकारे चुकीच्या स्पष्टीकरणा मागे धावतात आणि प्रमाण दृष्टया कमकुवत कथनांचा आधार घेऊन कुरआनास कथनांनुसार बनवू इच्छितात, मग त्या साठी त्यांना केवढाही त्रास घ्यावा का लागेना आणि वस्तुस्थिती अशी की शिया मत प्रणाली अंगिकारणाऱ्यांनी आपली श्रध्दा व पंथा च्या समर्थनार्थ एवढया मोठया प्रमाणात कथने मनाने रचली आहेत की सुन्नी देखील याने प्रभावित झाल्याशिवाय राहीले नाहीत.

**लक्षात ठेवा आल्लाहच्या आयती आणि बुध्दिकौशल्याच्या गोष्टींना ज्या तुमच्या घरात ऐकविल्या जातात. निःसंशय अल्लाह अतिशय सूक्ष्मदर्शी. आणि माहितगार आहे. (अल-क़ुर्आन)**

وَاذْكُرْنَ مَا يُتْلَىٰ فِي بُيُوتِكُنَّ مِنْ آيَاتِ اللَّهِ
وَالْحِكْمَةِ ۚ إِنَّ اللَّهَ كَانَ لَطِيفًا خَبِيرًا ﴿٣٤﴾

३४. लक्षात ठेवा आल्लाहच्या आयती आणि बुध्दिकौशल्याच्या गोष्टींना ज्या तुमच्या घरात ऐकविल्या जातात.[६८] नि:संशय अल्लाह अतिशय सूक्ष्मदर्शी [६९]. आणि माहितगार आहे.

إِنَّ الْمُسْلِمِينَ وَالْمُسْلِمَاتِ وَالْمُؤْمِنِينَ وَالْمُؤْمِنَاتِ
وَالْقَانِتِينَ وَالْقَانِتَاتِ وَالصَّادِقِينَ وَالصَّادِقَاتِ وَالصَّابِرِينَ
وَالصَّابِرَاتِ وَالْخَاشِعِينَ وَالْخَاشِعَاتِ وَالْمُتَصَدِّقِينَ
وَالْمُتَصَدِّقَاتِ وَالصَّائِمِينَ وَالصَّائِمَاتِ وَالْحَافِظِينَ
فُرُوجَهُمْ وَالْحَافِظَاتِ وَالذَّاكِرِينَ اللَّهَ كَثِيرًا
وَالذَّاكِرَاتِ أَعَدَّ اللَّهُ لَهُمْ مَغْفِرَةً وَأَجْرًا عَظِيمًا ﴿٣٥﴾

३५. निसंशय मुस्लिम पुरुष व मुस्लिम स्त्रिया, ईमान बाळगणारे पुरुष व ईमान बाळगणाऱ्या स्त्रिया, [७०] आज्ञाधारक पुरुष आणि आज्ञाधारक स्त्रिया, [७१] सदाचारी पुरुष आणि सदाचारी स्त्रिया.[७२] सहनशीलता पाळणारे पुरुष आणि सहनशीलता पाळणाऱ्या स्त्रिया.[७३] (अल्लाह समोर) गयावया करणारे पुरुष आणि गयावया करणाऱ्या स्त्रिया. [७४] दान करणारे पुरुष आणि दान करणाऱ्या स्त्रिया.[७५] रोजा पाळणारे पुरुष व रोजा पाळणारे स्त्रिया, आपल्या लज्जा स्थानाचे संरक्षण करणारे पुरुष आणि संरक्षण करणाऱ्या स्त्रिया.[७६] आणि अल्लाह चे अत्याधिक स्मरण करणारे पुरुष आणि अत्याधिक स्मरण करणाऱ्या स्त्रिया.[७७] अल्लाह ने यांच्यासाठी क्षमा आणि महान मोबदला तयार करून ठेवला आहे.[७८]

وَمَا كَانَ لِمُؤْمِنٍ وَلَا مُؤْمِنَةٍ إِذَا قَضَى اللَّهُ وَرَسُولُهُ أَمْرًا أَنْ
يَكُونَ لَهُمُ الْخِيَرَةُ مِنْ أَمْرِهِمْ ۗ وَمَنْ يَعْصِ اللَّهَ وَرَسُولَهُ فَقَدْ
ضَلَّ ضَلَالًا مُبِينًا ﴿٣٦﴾

३६. कोणत्या ही ईमान बाळगणाऱ्या पुरुषाला आणि कोणत्याही ईमान बाळगणाऱ्या स्त्री ला हा अधिकार नाही की जेव्हा अल्लाह व त्याच्या रसूल (पैगंबर) ने एखाद्या मामल्या चा फैसला करावा, तेव्हा त्यांच्या करीता आपल्या बाबतीत काही अधिकार बाकी रहावा.[७९] आणि जो कोणी अल्लाह व त्याच्या पैगंबराची अवज्ञा करील तर तो उघड मार्गभ्रष्टतेत पडला.

६८. अल्लाहच्या आयतींशी अभिप्रेत कुरआनाच्या आयती होत, आणि हिकमत शी अभिप्रेत पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांची शिकवण व त्यांची वचने होत. ते लक्षात ठेवण्याचा आदेश विशेषत्वाने पैगंबारांच्या पत्नींना दिला गेला, या साठी की सर्वात प्रथम त्यांनी या प्रकाशात आपले जीवन उज्जवल करावे आणि याचा बरोबर हा लाभ सर्व सामान्य करण्याच्या कामी लागावे.

या आदेशाच्या पालनात पैगंबरांच्या पत्नींनी हदीस (पैगंबर वचनांच्या संकलना) ची जी सेवा पार पाडली त्या करीता २ समस्त मुस्लिम जनसमूह त्यांचा आभारी आहे. अल्लाह त्यांच्याशी राजी राहो.

६९ अल्लाह लतीफ म्हणजे सूक्ष्म दर्शी आहे म्हणून त्याच्या पासून कोणतीही गोष्ट लपून राहू शकत नाही.

७०. वर पैगंबरांच्या पत्नींन करीता विशेष कृपा होती आता मुसलमान पुरुष व स्त्रीयां करीता विशेष कृपा होय. या ठिकाणी ते गुणविशेष निवेदिले गेले आहेत जे अपेक्षित स्तराचे स्वरूप बाळगतात आणि प्रत्येक मुसलमानाने मग तो पुरुष असो किंवा स्त्री, आपल्या अंगी हे गुणविशेष निर्माण केले पाहीजेत. आणि या गुणवेशेषांच्या आधारेच तो सर्वश्रेष्ठ अल्लाह तर्फे क्षमा व महान मोबदल्यास पात्र ठरेल.

मुस्लिम व मोमीन किंवा इस्लाम व ईमान हे दोन्ही शब्द जेव्हा एकाच वेळी वापरले जातात तेव्हा इस्लाम शी अभिप्रेत तौहीद (एकेश्वरवादी)श्रध्देस कबूल करून इस्लामाचा धर्म या नात्याने स्विकार करणे आणि ईमान शी अभिप्रेत मन:पूर्वक स्विकार अर्थात एखाद्या इसमाचे केवळ स्वत:ला मुसलमान म्हणवून घेणे आणि इस्लामी श्रध्दा तत्वांना मानण्याचे घोषित करणे तो प्रामणिक मोमिन (ईमान बाळगणारा) असण्यास पुरेसे नाही, किंबहुना प्रामाणिक मोमीन असण्यासाठी हे आवश्यक आहे की तो मन:पूर्वक या श्रध्दा तत्वांना मानत असावा आणि इस्लाम हा सत्यधर्म असण्याबद्दल त्याची पूर्ण खात्री असावी. अर्थात एखाद्या माणसाचा इस्लाम, सर्वश्रेष्ठ अल्लाह जवळ अशाच स्थितीत विश्वसनीय ठरु शकेल जेव्हा त्याचे अंतर्मन त्यास अनुकूल असेल. अन्यथा केवळ नावा रूपाच्या मुसलमानाचे सर्वश्रेष्ठ अल्लाह जवळ किंचितही मोल नाही.

७१. आज्ञाधारक असण्याचा गुणविशेष एकनिष्ठ आचरण जाहीर करतो म्हणजे इस्लाम व ईमान नंतर आचरणाने त्यांनी अल्लाहशी एकनिष्ठतेचे वर्तन अंगिकारले.

७२. खरे बोलणे व सदाचारी होणे हे फार मोठे गुणवैशिष्टय आहे. परंतु हे गुणवैशिष्टय केवळ तेच लोक अंगी आणतात जे उच्चते कडे जाण्याची हिम्मत बाळगतात. सवडप्रिय माणसाला खोटे बोलण्यात काहीच संकोच वाटत नाही आणि आजच्या काळात, जेव्हा जगाचा कारभार केवळ खोटेपणावरच चालत आहे, सत्याला चिकटून राहणे मोठे कठीण काम आहे. परंतु सत्य-प्रियता माणसाचे रत्न होय आणि अल्लाह च्या नजरेत अतिप्रिय आहे. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी फर्माविले,

عَلَيْكُمْ بِالصِّدْقِ فَإِنَّ الصِّدْقَ يَهْدِىٓ اِلَى الْبِرِّ وَاِنَّ الْبِرَّ يَهْدِىٓ
اِلَى الْجَنَّةِ وَمَايَزَالُ الرَّجُلُ يَصْدُقُ وَيَتَحَرَّى الصِّدْقَ حَتّٰى
يُكْتَبَ عِنْدَ اللّٰهِ صِدِّيْقًا ـ (مسلم کتاب البر)

''सत्याचा अंगिकार करा कारण सत्य, सदाचार कडे नेते आणि सदाचार जन्नत कडे. मनुष्य खरे बोलत असतो व सत्याचाच अंगिकार करतो. येथपावेतो की सर्वश्रेष्ठ अल्लाह जवळ सिद्दीक (मोठा सत्यवान) लिहीला जातो.'' (मुस्लिम किताबुल बिर)

७३. सब्र (सहनशीलता) च्या स्पष्टीकरणा साठी पहा सूरह मोमीनून टीप क्र.५१

७४. नम्रता च्या स्पष्टीकरणा साठी पहा सूरह मोमीनून टीप क्र.२या ठिकाणी संकेत नमाज कडे आहे.

७५. सदका (दान) मध्ये जकात ही सामील आहे आणि अल्लाह च्या मार्गात सर्व प्रकारे खर्च करणे ही. अधिक स्पष्टीकरणा साठी पहा सूरह तौबा टीप क्र. १८९

७६. लज्जा स्थानांच्या रक्षणात आपल्या शील अब्रुचे ही रक्षण सामील आहे आणि लपविण्या योग्य अवयवांचे झाकणे देखील. पहा सूरह मोमीनून टीप क्र. ५

७७. अल्लाहच्या नाम: स्मरणाच्या स्पष्टीकरणा साठी सूरह अअराफ टीप क्र. ३१० सूरह ताहा टीप क्र. १६ व १६१ तसेच सूरह अन्कबूत टीप क्र. ८५.

७८. मग़फिरत (क्षमा) जणू जन्नत चा परवाना आहे आणि महान मोबदला निरंतर ची ती ईश-देणगी होय जी सत्कृत्यांचा मोबदला म्हणून लाभेल.

या ठिकाणी आखिरत च्या यशाची हमी फक्त अशाच लोकांना दिली गेली आहे जे आपल्या अंगी उल्लिखित गुणविशेष निर्माण करतील मग ते पुरुष असोत किंवा स्त्रीया. राहीले नावापुरते मुसलमान, ज्यांचे जीवन या गुणविशेषां पासून खाली आहे तर त्यांच्या साठी ही हमी नव्हे.

७९. या आयतीत अतिशय महत्वाची तात्विक बाब निवेदिली गेली आहे. अल्लाह व त्याच्या पैगंबराचा मनुष्य जीवनाच्या मामला व समस्यांशी संबंधित कोणताही फैसला असा नाही की ज्यानंतर एखाद्या मुसलमानास का कूं करण्याचा किंवा आपल्या अधिकाराचा वापर करण्याचा हक्क बाकी

राहावा. फैसल्याचा संबंध मतभेदा च्या समस्यांशी असो किंवा वादविवादाच्या मामल्याशी किंवा याचे स्वरुप पैगंबरांच्या न्यायालयीन फैसल्याचे असो, मुसलमानाने यास तिळमात्र आक्षेप न घेता मान्य केले पाहीजे आणि अपरिहार्य पणे तो पाळला देखील पाहिजे. जीवनाला धार्मिक व निधर्मी अशा दोन वर्गात विभागून अल्लाह व त्याच्या प्रेषिताच्या कित्येक फैसल्यांना जे कौटुंबिक आर्थिक व राजकिय जीवनाशी संबंधित आहेत. रद्द बातील ठरविणे आणि सेक्युलर जीवन पध्दतिचा अवलंब करणे म्हणजे इस्लाम शी उघड प्रतारणा करणे होय.

जेथपावेतो अल्लाहच्या फैसल्यांचा संबंध आहे, ते कुरआनात आहेत आणि ठोस प्रमाण होत. राहीलेत पैगंबरांचे फैसले तर जे क्रमबध्दतेने सिध्द आहेत त्यांच्या प्रमाण असण्याबद्दल वाद नाही आणि जे विश्वसनीय कथनकर्त्याद्वारे उल्लिखित आहेत ते ही निश्चितच प्रमाण होत, मात्र हे की एखाद्या कथनाचा मजकूर कुरआनाच्या एखाद्या निवेदनाच्या विपरीत असेल किंवा इतर विश्वसनीय कथनकर्त्याच्या निवेदनाशी सुसंगत नसेल अथवा त्या निवेदनात एखादी अशी गोष्ट निवेदिली गेली असेल जी विवेकबुध्दि व अंतर्दृष्टि च्या विरुध्द असेल किंवा जे कथन गोंधळात टाकणारे असेल किंवा ज्याचे प्रमाण योग्य नसेल तर अशा कथनां बाबत जेव्हा निश्चित पणे हे म्हटले जाऊ शकत नाही की ती पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांची वचने होत तर ती प्रमाण ठरु शकत नाही यास्तव हजरत उमर (रजि.) यांनी फातमा बिन्ते कैसच्या या हदीस वचनास ज्यात असे निवेदिले गेले आहे की तीन वेळा तलाक दिल्या गेलेल्या स्त्री करीता तिच्या भूतपूर्व पती वर पालन पोषणाची जबाबदारी नाही, असे म्हणून रद्द ठरविले होते की

لَانَتْرُکُ کِتَابَ اللّٰہِ وَ سُنَّۃَ نَبِیِّنَا صَلَّی اللّٰہُ عَلَیْہِ وَسَلَّمَ لِقَوْلِ
اِمْرَاۃٍ لَانَدْرِیْ لَعَلَّھَا حَفِظَتْ اَوْ نَسِیَتْ۔ (مسلم کتاب الطلاق)

“आम्ही अल्लाहचा ग्रंथ आणि आपल्या पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या आचरणास केवळ एका स्त्रीच्या सांगण्यावरून सोडून देणार नाही. आम्हाला नाही माहित की तिने (पैगंबरांच्या वचनास) सुरक्षित ठेवले कि विसरली.” (मुस्लिम किताबुत्तलाक).

**मुहम्मद तुमच्यातल्या पुरुषां पैकी कोणाचे ही बाप नाहीत किंबहुना ते अल्लाह चे रसूल (पैगंबर) आणि अखेरचे नबी होत आणि अल्लाह प्रत्येक गोष्टीचे ज्ञान बाळगणारा आहे.हे ईमान बाळगणाऱ्यां नो ! अल्लाहचे अत्याधिक स्मरण करा.(अल-क़ुर्आन)**

३७. (हे पैगंबर !) जेव्हा तुम्ही त्या माणसाला समजावित होते ज्यावर अल्लाहने अनुग्रह केला आणि तुम्ही देखील.[८०] की आपल्या पत्नी ला आपल्या जवळ ठेव (म्हणजे तलाक देऊ नकोस) आणि अल्लाहचे भय बाळग.[८१] आणि आपल्या मनात ती गोष्ट लपवून राखत होता, जी अल्लाह उघड करणार होता.[८२] तुम्ही लोकांचे भय बाळगत होता, वस्तुतः अल्लाह या गोष्टीस अधिक हक्कदार आहे की त्याचे भय बाळगले जावे.[८३] मग जेव्हा जैद ने तिच्या पासून आपलीगरज भागवून घेतली (तिला सोडून दिले) तेव्हा आम्ही तिला तुमच्या पत्नीत्वात [८४] दिले; अशासाठी की ईमान बाळगणाऱ्या लोकांना, त्यांच्या मानस पुत्रांच्या पत्नींबाबत, जेव्हा त्यानी त्यांच्या पासून आपली गरज भागवून घेतली असेल, काहीच संकोच राहू नये. [८५] आणि अल्लाहच्या आदेशास कार्यान्वित व्हायचेच होते.[८६]

وَإِذْ تَقُولُ لِلَّذِيٓ أَنْعَمَ ٱللَّهُ عَلَيْهِ وَأَنْعَمْتَ عَلَيْهِ أَمْسِكْ عَلَيْكَ
زَوْجَكَ وَٱتَّقِ ٱللَّهَ وَتُخْفِي فِي نَفْسِكَ مَا ٱللَّهُ مُبْدِيهِ وَتَخْشَى
ٱلنَّاسَ وَٱللَّهُ أَحَقُّ أَن تَخْشَىٰهُ فَلَمَّا قَضَىٰ زَيْدٌ مِّنْهَا وَطَرًا
زَوَّجْنَٰكَهَا لِكَيْ لَا يَكُونَ عَلَى ٱلْمُؤْمِنِينَ حَرَجٌ فِيٓ أَزْوَٰجِ
أَدْعِيَآئِهِمْ إِذَا قَضَوْا۟ مِنْهُنَّ وَطَرًا وَكَانَ أَمْرُ ٱللَّهِ مَفْعُولًا ﴿٣٧﴾

३८. पैगंबरा साठी अशा कामात कोणती ही अडचण नाही जे त्याच्या करीता अल्लाह ने निर्धारीत केलेले असावे.[८७] अल्लाह ची हीच पध्दति त्या (पैगंबरां) बाबत राहीली आहे जे पूर्वी होऊन गेले [८८] आणि अल्लाहचा आदेश एक निर्णायक फैसला असतो. [८९]

مَّا كَانَ عَلَى ٱلنَّبِيِّ مِنْ حَرَجٍ فِيمَا فَرَضَ ٱللَّهُ لَهُۥ سُنَّةَ ٱللَّهِ فِي
ٱلَّذِينَ خَلَوْا۟ مِن قَبْلُ وَكَانَ أَمْرُ ٱللَّهِ قَدَرًا مَّقْدُورًا ﴿٣٨﴾

३९. ते अल्लाहच्या संदेशाना पोहचवितात आणि त्याचेच भय बाळगतात, आणि अल्लाह खेरीज कोणाचे ही भय बाळगत नाहीत [९०] आणि हिशेब घेण्यास अल्लाह पुरेसा आहे. [९१]

ٱلَّذِينَ يُبَلِّغُونَ رِسَٰلَٰتِ ٱللَّهِ وَيَخْشَوْنَهُۥ وَلَا يَخْشَوْنَ أَحَدًا إِلَّا
ٱللَّهَ وَكَفَىٰ بِٱللَّهِ حَسِيبًا ﴿٣٩﴾

४०. मुहम्मद तुमच्यातल्या पुरुषां पैकी कोणाचे ही बाप नाहीत [९२] किंबहुना ते अल्लाह चे रसूल (पैगंबर) आणि अखेरचे नबी होत [९३]आणि अल्लाह प्रत्येक गोष्टीचे ज्ञान बाळगणारा आहे.[९४]

مَّا كَانَ مُحَمَّدٌ أَبَآ أَحَدٍ مِّن رِّجَالِكُمْ وَلَٰكِن رَّسُولَ ٱللَّهِ
وَخَاتَمَ ٱلنَّبِيِّـۧنَ وَكَانَ ٱللَّهُ بِكُلِّ شَيْءٍ عَلِيمًا ﴿٤٠﴾

४१. हे ईमान बाळगणाऱ्यां नो ! अल्लाहचे अत्याधिक स्मरण करा.[९५]

يَٰٓأَيُّهَا ٱلَّذِينَ ءَامَنُوا۟ ٱذْكُرُوا۟ ٱللَّهَ ذِكْرًا كَثِيرًا ﴿٤١﴾

८०. अभिप्रेत जैद बिन हारिसा होय. हे आधी गुलाम होते आणि पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी प्रेषित्व प्राप्ती पूर्वी यांना मुक्त करून आपल्या मुलासारखा त्याचा सांभाळ केला होता. म्हणून ते पैगंबरांचे दत्तक-पुत्र (Adopted Son) म्हटले जात. सर्वश्रेष्ठ अल्लाह ने जैदवर हा उपकार केला की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या सोबतीत राहील्यामुळे त्यांना ईमान बाळगण्याची सुबुध्दि प्रदान केली. यास्तव मक्के मध्ये सर्वात प्रथम ईमान बाळगणाऱ्यां मध्ये हजरत जैद यांचा समावेश होतो. आणि पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी जैदवर हा उपकार केला की त्याना गुलामीच्या बंधनातून मुक्त करुन त्यांचे पालन पोषण केले, त्यांना प्रशिक्षण दिले. अल्लाहचा हा अनुग्रह व पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या या उपकारा च्या परिणामी हजरत जैद एक महत्वपूर्ण व्यक्तिमत्व म्हणून पुढे आले व त्यांनी अतिशय महत्वाची कार्ये पार पाडली. हे एक स्पष्ट उदाहरण आहे या गोष्टीचे की इस्लाम ने एका गुलाम व्यक्तिस केवढया उच्च स्थानाप्रत पोहचविले.

८१. हजरत जैद यांनी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या आतेबहीणीशी अर्थात जैनब बिन्त हबश यांच्याशी निकाह केला होता. एका मुक्त केलेल्या गुलामाचा निकाह एका कुरेश स्त्री शी होणे सामाजिक समानता कायम करण्याचे उच्च उदाहरण होय. परंतु ज्याअर्थी स्वभाव जुळत नव्हता एक-दीड वर्षाच्या कालावधीतच तलाक घेण्याची पाळी आली. या प्रसंगी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी जैद यांना तलाक देण्यापासून रोखू इच्छिले व त्यांना ताकीद केली की त्यानी या बाबतीत अल्लाहचे भय बाळगावे. परंतु जेव्हा जैद यांनी असे पाहीले की निभाव होणे दुरापास्त आहे तेव्हा त्यांनी आपल्या पत्नीस निकाह बंधनातून मुक्त करण्याचा निर्णय घेतला.

यावरुन एक तात्विक गोष्ट तर ही स्पष्ट झाली की इस्लामने पुरुषाला तलाक देण्याचा अधिकार दिला असला तरी या अधिकाराचा वापर करतांना त्याने अल्लाहचे भय बाळगले पाहीजे अर्थात या अधिकाराचा अनाठायी वापर केल्याने स्त्री ला भयंकर त्रास पोहोचू शकतो आणि ही गोष्ट अल्लाहच्या दृष्टीने अप्रिय ठरेल व याबद्दल तलाक देणारा अल्लाहच्या शिक्षेच्या तावडीत सापडू शकतो.

दुसरे निष्पन्न असे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) असे इच्छित नव्हते की जैद ने आपल्या पत्नीस तलाक द्यावा, यास्तव ज्या कथनां मध्ये या घटनेस कथेचे रूप देऊन हा अर्थ लावण्याचा प्रयत्न केला गेला आहे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) जैद च्या पत्नीस आपल्या निकाह बंधनात घेऊ इच्छित होते, हे कुरआनाच्या निवेदना विरुद्ध आहे आणि एक अशी गोष्ट आहे जी पैगंबराच्या स्वच्छ शुध्द चारित्र्या शी किंचितही सुसंगत नाही. आणि म्हणूनच ही कथने रद्दबातील ठरण्यायोग्य आहेत.

त्याच प्रमाणे हे कथन ही डोळयासमोर आहे की हजरत जैनब, हजरत जैद शी निकाह करण्यास तयार नव्हत्या. परंतु पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या आग्रहा खातीर त्यांनी हा विवाह केला जो शेवटी तलाकद्वारे संपला. प्रथम तर ही गोष्ट एखाद्या सहीह हदीस द्वारे सिध्द नाही. आणि पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या संबंधाने एखाद्या गोष्टीचा निर्देश करण्या करीता हदीस चे सहीह (निर्दोष) असणे आवश्यक आहे. केवळ पैगंबर चरीत्र लिहीणाऱ्यांनी लिहून ठेवणे, किंवा इब्ने अबी हातिम सारख्या हदीसच्या तिसऱ्या दर्जा च्या पुस्तकात एखाद्या कथनाचे निवेदिले जाणे, पैगंबर-वचन असल्या चा पर्याप्त पुरावा नव्हे विशेष म्हणजे असे एकही उदाहरण आढळत नाही की पैगंबरांनी एखाद्या स्त्रीला तिच्या आवडी विरुध्द एखाद्या पुरुषाशी निकाह करण्यास भाग पाडले असावे. येथपावेतो की बुरैरहला तिचा भूतपूर्व पती पुन्हा आपल्या निकाह बंधनात घेण्या करीत अगदी त्रस्त व बेचैन होता आणि स्वत: पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) देखील त्याच्या त्रस्त अवस्थेस पाहून असे इच्छित होते की बुरैरहने आपल्या पूर्व पतीकडे परतून जावे परंतु त्यांनी तिला तसे करण्यास भाग पाडले नाही आणि ना ती आपल्या पूर्वीच्या पतीकडे परत आली तेव्हा पैगंबर आपल्या आतेबहीणीस एका अशा इसमा शी निकाह करण्याकरीता विवश का म्हणून केले असते जो पूर्वी गुलाम होता.

८२. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना जसे की आयती चे शेवटचे शब्द 'आणि अल्लाहचा आदेश तर कार्यान्वित व्हायचाच होता' वरुन उघड आहे हा आदेश दिला गेला होता की जैद ने तलाक देण्याच्या स्थितीत आपणास त्यांच्या घटस्फोटीत स्त्री शी निकाह करावा लागेल या साठी की अज्ञातकाळातीळ ही प्रथा की मानसपुत्राने तलाक दिलेल्या स्त्री शी विवाह केला जाऊ शकत नाही, मोडली जावी परंतु पैगंबराना हे भय जाणवत होते की अशा स्थितीत मुनाफिक (दांभिक मुसलमान) व काफिर लोकांना त्यांच्या विरूध्द एक उपद्रव माजविण्याचा अवसर लाभेल. म्हणून ते असे इच्छित होते की ना जैद ने तलाक द्यावा आणि ना त्यांच्यावर जैद च्या घटस्फोटितेशी निकाह करण्याची पाळी यावी. परंतु अल्लाह, त्यांच्या या भयास जे त्यांना मनातल्या मनात जाणवत होते, उघड करणार होता,यास्तव अल्लाहने या आयती द्वारे केवळ हे भय दूर केले नाही तर, किंबहुना याबद्दल सावध ही केले की अल्लाहच्या आदेशा बाबत कोणतेही भय कुशंका बाळगणे योग्य नव्हे.

याचा हा अर्थ नव्हे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी अल्लाहचा आदेश पाळण्यात दिरंगाई केली होती; कारण अद्याप या आदेशाच्या पालनाची वेळच आली नव्हती, किंबहुना याचा अर्थ असा की या आदेशाची अमलबजावणी की अजून वेळ आलेली नसली तरी जेव्हा एक संकेत सर्वश्रेष्ठ अल्लाह तर्फे मिळाला होता तेव्हा लोकांतर्फे घेतल्या जाणाऱ्या आक्षेपांना खात्रीत घेणे एका पैगंबरास साजेल असे नाही.

आयतीच्या शब्दशैली वरुन हाच आशय स्पष्ट निघतो, परंतु काही कथनां मध्ये याचा अगदी उलट अर्थ निवेदिला गेला आहे आणि ही कथने काही भाष्यां मध्येही उल्लेखिली गेली आहेत; ज्याचे स्पष्टीकरण असे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) बाहयत: जैद यांना तलाक देण्यापासून रोखत होते, परंतु मनातून हे इच्छित होते की जैद यांनी आपल्या पत्नीस तलाक द्यावा, यासाठी की नंतर आपण तिच्याशी निकाह करावा हीच गोष्ट होती जी त्यांनी आपल्या मनात लपवून ठेवली होती. परंतु या कथनांच्या खंडना करीता आयतीचे हे शब्दच पुरेसे आहेत.

مَا اللّٰهُ مُبۡدِيۡهِ ''ज्यास अल्लाह जाहीर करणार होता'' आता प्रश्न असा उदभवतो की सर्वश्रेष्ठ अल्लाहने या घटने च्या संदर्भात कोणती गोष्ट जाहीर केली? काय हे की आपण असे इच्छित होते की जैद ने आपल्या पत्नीस तलाक द्यावा जेणेकरून आपण तिच्याशी निकाह करुन घ्यावा किंवा हे की, आपण जैद ला तलाक देण्यापासून मनाई करीत होते आणि असे इच्छित नव्हते की त्यांच्या घटस्फोटीत पत्नीशी निकाह करण्याची पाळी यावी. यातली पहिली गोष्ट तर सर्वश्रेष्ठ अल्लाहने कोठे ही जाहीर केलेली नाही मग कथनकर्त्यांना हे कसे कळले की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी आपल्या मनात हजरत जैनबशी निकाह करण्याचा विचार लपवून ठेवला होता? मात्र दुसरी गोष्ट की पैगंबर हे इच्छित नव्हते की जैद ने आपल्या पत्नीस तलाक द्यावा, नंतर तिच्याशी निकाह करण्याचा प्रसंग यावा आणि लोकांना आक्षेप घेण्याची संधी मिळावी, आयतीच्या मजकूरा वरुन अगदी स्पष्ट आहे.

८३. हा संकेत पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना आहे की अल्लाहच्या आदेश पाळण्यात लोकां संबंधीच्या कोणत्याही भयास मनात बाळगणे योग्य नव्हे. कुरआन द्वारे पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) वरही पकड, कुरआन अल्लाहचा ग्रंथ असण्या विषयी चे स्पष्ट प्रमाण आहे आणि पैगंबरांच्या सत्येते चा उघड पुरावा आहे. जर कुरआन खरोखर पैगंबरांनी रचलेला ग्रंथ असता तर त्यात असल्या गोष्टी राहील्या नसत्या; ज्यात त्यांच्या अगदी किरकोळ गफलती बद्दल इतकी सक्त तंबी दिली गेली नसती.

८४. म्हणजे जेव्हा जैद यांनी आपली पत्नी जैनब बिन्त जहश हिला तलाक दिला व तिची इद्दत पूर्ण झाली तेव्हा पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना अल्लाहने आदेश दिला की आपण तिच्याशी निकाह करावा यास्तव पैगंबरांनी अल्लाहच्या आदेशाचे पालन केले आणि हजरत जैनब त्यांच्या निकाह-बंधनात आल्या. इब्ने हिशाम चे निवेदन असे की :

'पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी जैनब बिन्त जहश बिन रसाइब अल असदीय्या शी निकाह केला. त्यांचे बंधू अबू अहमद बिन जहश यांनी पैगंबरांशी त्यांचा निकाह करविला आणि पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी त्यांचा मेहर (स्त्री-धन) चारशे दिरहम दिला. यापूर्वी त्या पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचे (मुक्त केलेले गुलाम जैद बिन हारिसा यांच्या निकाह मध्ये होत्या. त्यांच्याच संदर्भात सर्वश्रेष्ठ अल्लाहने ही आयत अवतीर्ण केली,

فَلَمَّا قَضٰى زَيۡدٌ مِّنۡهَا وَطَرًا زَوَّجۡنٰكَهَا

'जेव्हा जैद ने आपली गरज भागवून घेतली, तेव्हा आम्ही तिचा निकाह तुमच्याशी करविला.'

(सिरत इब्ने हिशाम-खंड ४ पृ. ३२२)

हे कथन जर खरे आहे तर याचा अर्थ असा झाला की निकाह शरीअत नियमा प्रमाणे पार पडला होता. मात्र ज्याअर्थी हा अल्लाहच्या आदेशानुसार झाला होता म्हणून यास अधिक वैशिष्टय प्राप्त होते. म्हणूनच हजरत जैनब आपल्या निकाह ला अभिमान कारक समजत होती. बुखारी या हदीस संग्रहातील उल्लेखानुसार :

'जैनब बिन्त जहश, पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या अन्य पत्नींना अभिमानाने सांगत की तुम्हा लोकांचा निकाह तुमच्या घरच्या लोकांनी करुन दिला, परंतु माझा निकाह सर्वश्रेष्ठ अल्लाहने सातव्या आकाशावरुन करुन दिला.'(तफ्सीर इब्ने कसीर खंड ३ पृ. ४९१)

काही ही असो, मात्र ही गोष्ट कुरआन व हदीस द्वारे सिध्द आहे की हजरत जैबन बिन्त जहश यांच्याशी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचा निकाह अल्लाहच्या आदेशाने झाला होता म्हणून या निकाह संबंधाने ज्या कथनांमध्ये निरर्थक किस्से निवेदिले गेले आहेत त्यांचे आपोआप खंडन होते इब्ने जरीर तबरी यांना अल्लाह क्षमा करो त्यांनी सावधगिरी पाळली नाही आणि एका अशा कथना चा उल्लेख केला ज्यात या निकाह संबंधी एक अतिशय वाहयात किस्सा निवेदिला गेला आहे आणि जो पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या प्रतिष्ठेस गालबोट लावण्यास कारक आहे. अर्थात अशा कथनांपासून इस्लामच्या शत्रूंना पैगंबरांच्या आदर्श व्यक्तिमत्वा वर शितोडे

उडविण्याची संधी मिळते. आम्ही त्या वाहयात किश्श्याचा या ठिकाणी उल्लेख करणे ही योग्य समजत नाही आणि अल्लामा (विद्वान) इब्ने कसीरच्या या स्पष्टीकरणासच पुरेसे समजतो.

''या प्रसंगी इब्ने अबि हातिम आणि इब्ने जरीर यांनी पैगंबर, सहवासातील काही अनुयायींची कथने उल्लेखिले आहेत परंतु ती निर्कोप नसल्याने आम्ही ती कथने निवेदणार नाही'' (तफसीर इब्ने कसीर खं. ३पृ. ४९१)

८५. हा तो उद्देश्य होय की ज्यामुळे सर्वश्रेष्ठ अल्लाहने आपल्या पैगंबरास जैद च्या तलाक दिलेल्या स्त्रीशी निकाह करण्याचा विशेषत्वाने आदेश दिला होता. या निकाह ने तो अडथळा दूर केला जो मानस पुत्राच्या घटस्फोटीतेशी विवाह करण्या संदर्भात अज्ञान काळापासून चालत आला होता आणि इस्लाम च्या उच्च कायद्याचा एक महत्वपूर्ण कलम उज्वल होऊन समोर आला.

हजरत जैनब यांच्याशी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या निकाह अशा वेळी झाला जेव्हा त्यांच्या चार पत्न्या हयात होत्या. चार हून अधिक स्त्रीयांशी निकाह करण्याची जी अनुज्ञा त्यांना विशेषत्वने दिली गेली होती ती अनेकविध अशाच उद्दिष्टां पोटी होती परंतु आक्षेप घेणारे या उद्दिष्टां कडे लक्ष न देता डोळे बंद करतात आणि पैगंबर प्रतिष्ठेस गाल बोट लावून स्वत: ही मार्गभ्रष्ट होतात आणि इतरांना ही मार्गभ्रष्ट करण्या ची उपाय योजना करतात. आजच्या काळात तर आक्षेपकांनी यास खास विषय बनवून घेतला आहे. कदाचित त्यांना हे नाही ठाऊक की चंद्रावर थूंकण्याचा काय परिणाम होतो.

८६. म्हणजे अल्लाहने जेव्हा आपल्या पैगंबरास या निकाह चा आदेश दिला होता तेव्हा तो अपरिहार्यत: अमलात यावयास पाहीजे होता.

८७. म्हणजे पैगंबराने समाधान बाळगले पाहीजे की जे काम देखील अल्लाह ने त्याच्या करीता योजिले आहे मग ते निकाह बाबत का असेना ते करण्यात त्याला काहीच हरकत नाही आणि ना त्याने आक्षेपांची पर्वा केली पाहीजे, तसेच ना या विचाराने उद्विग्न झाले पाहीजे की या गोष्टीस इस्लाम विषयी शंका-कुशंका निर्माण करण्याचे साधन बनविले जाईल कारण अल्लाह आपल्या दीन (धर्मा) च्या उदिष्टांना अधिक चांगले जाणतो.

८८. म्हणजे या पूर्वी सर्वश्रेष्ठ अल्लाह पैगंबरांना या स्वरूपाचे आदेश देत राहीला जे त्यांच्या साठी या पैलू ने कसोटी कारक ठरलेत की त्यांचे विरोधक या गोष्टींना चारित्र्य हननाचे साधन बनवतील परंतु त्यांनी याची तिळमात्र पर्वा केली नाही व अल्लाहच्या आदेशाचे पालन केले आणि हेच पैगंबराचे आचरण राहीले.

पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी ही हजरत जैनब यांच्याशी निकाह करुन अल्लाहच्या आज्ञेचे पालन केले आणि तेच वर्तन अंगिकारले जे पूर्वीच्या पैगंबरांचे होते या गोष्टी ची तमा न बाळगता की विरोधक काय म्हणतात. सुरवातीला जेव्हा पैगंबरांना सर्वश्रेष्ठ अल्लाह तर्फे फक्त इशारा मिळाला होता, तेव्हा हा विचार त्यांना नक्कीच बोचत होता की विरोधक या माध्यमान्वचे त्याच्या स्वच्छ शुध्द चारित्र्यावर शितोडे उडविण्याचा प्रयत्न करतील परंतु जेव्हा अल्लाहचा स्पष्ट आदेश आला तेव्हा त्यांनी अविलंब अल्लाहच्या आदेशाचे पालन केले.

आजच्या काळात पाश्चिमात्य संस्कृतीचे भक्तगण जेव्हा पैगंबराच्या पवित्र जीवनात एखाद्या दोषा कडे अंगुली निर्देश करण्या बाबत असमर्थ ठरतात तेव्हा त्यांच्या पत्नींच्या संख्येतस चर्चा-विषय बनवून त्यांच्या प्रतिष्ठस गालबोट लावण्याचा प्रयत्न करु लागतात. जेव्हा ही गोष्ट अगदी स्पष्ट आहे की त्यांनी हे विवाह हौस म्हणून केले नव्हते किंबहुना धर्माच्या महान उदिष्टांना लक्षात घेता केले होते आणि हजरत जैनब यांच्याशी केलेला निकाह तर त्यांनी अल्लाहच्या प्रत्यक्षत: आदेशान्वये केला होता अन्यथा या गोष्टीस ते इच्छुक नव्हते. आणि जेव्हा वस्तुस्थिती ही आहे, तेव्हा आक्षेप घेणाऱ्यांना उत्तर देण्यासाठी क्षमायाचक शैली अंगिकारण्या ची गरजच काय?

८९. म्हणजे अल्लाह जेव्हा आपल्या पैगंबरास एखादे काम करण्याचा आदेश देतो तेव्हा त्याचे स्वरुप एका निर्धारीत फैसल्याचे असते. जो अपरीहार्यपणे घडून यावयास पाहीजे त्याला कोणत्याही प्रकारे टाळले जाऊ शकत नाही.

९०. म्हणजे पैगंबरांची हीच रीति पद्धत राहीली आहे की ते अल्लाहचा संदेश पोहचविण्याची जबाबदारी पार पाडत राहीले आणि या बाबतीत त्यांनी कोणाच्याही आक्षेप किंवा निर्भत्सनेची तिळमात्र पर्वा केली नाही, केवळ अल्लाह चे च भय बाळगत राहीले तेव्हा हे पैगंबर त्यांच्याच मार्गाचे तुम्हास अनुसरण करावयाचे आहे.

९१. म्हणजे जेव्हा (कृतकर्माचा) हिशेब अल्लाहला द्यावयाचा आहे तर त्याची काळजी मनाला लागली पाहीजे.

९२. अर्थात मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) ज्याअर्थी तुमच्या पुरुषां पैकी कोणाचेही बाप नाहीत तेव्हा ना जैद त्यांचे पुत्र ठरतात आणि ना जैनब त्यांची सून ठरते म्हणून जैनब धरस्फोटीत झाल्यानंतर तिच्याशी पैगंबरानी निकाह करण्यात हरकत कसली?

स्पष्ट असावे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना पुत्र प्राप्ती निश्चित झाली होती परंतु त्यांचा बालपणीच मृत्यु झाला होता, आणि या आयतीच्या अवतरण प्रसंगी

कोणताही ही पुत्र, जिवित नव्हता. नंतर मारीया किब्तीया पासून एक मुलगा झाला, ज्याचे नाव पैगंबरांनी इब्राहीम असे ठेवले. परंतु तो देखील बालवयातच मरण पावला.

९३. मूळ शब्द (खातम) याचा अर्थ अंतिम, शेवटचे असा आहे. अरबी भाषेचा प्रसिद्ध व सप्रमाण शब्दकोष लिसानुल अरबी, च्या सदंर्भानुसार :

خاتَمُهم: آخِرُهم

'जनसमूहाचा अंतिम म्हणजे त्यांचा शेवटचा मनुष्य (लिसानुल अरब खंड १२ पृष्ठ १६४)

तद्नुषंगे 'खातम्मन्नबीयीन' म्हणजे अंतिम प्रेषित अर्थात शेवटचे पैगंबर होय. या प्रसंगी नबी आणि रसूल मधील हा फरकही लक्षात ठेवला पाहीजे तो असा की प्रत्येक रसूल हा नबी असतो, परंतु प्रत्येक नबी पदाच्या दृष्टीने रसूल ठरत नाही. यास्तव जेव्हा या आयती द्वारे हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या अंतिम नबी असण्या संबंधी स्पष्टीकरण दिले गेले आहे तेव्हा त्यांचे अंतिम रसुल होणे आपोआप स्पष्ट झाले. आयतीचा अर्थ असा की हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या नंतर कोणताही रसूल किंवा नबी अर्थात पैगंबर येणार नाही. म्हणून धर्माची परिपूर्णता आपल्या च हस्ते पार पडणार आहे आणि याची निकड अशी की मानस पुत्राच्या परित्यक्ता स्त्री शी विवाह वर्ज्य असण्याची जी प्रथा अज्ञान काळा पासून चालत आली आहे ती पैगंबरांद्वारे मिटली आणि लोकांना हे स्पष्ट कळून आले की अल्लाहच्या शरीयत मध्ये हा निकाह अगदी योग्य आहे.

जर पैगंबराच्या हस्ते या अज्ञान काळातील प्रथेची सुधारणा झाली नसती तर मग त्यांच्या नंतर कोणी ही पैगंबर येणारा नाही; ज्याने ही उणीव भरून काढावी.

आयतीत प्रेषित्व संपण्याची (खत्म नबुवत ची) जी गोष्ट निवेदिली गेली आहे, ती इस्लामी श्रध्देचा एक महत्वपूर्ण अंश होय. कुरआन केवल भविष्यात येणाच्या कोणात्याही नबी अथवा पैगंबराचे भकित सादर करीत नाही, वस्तुत: यापूर्वीच्या ईश ग्रंथामध्ये भविष्य काळात येणाच्या पैगंबरां संबंधी भाकित उपलब्ध आहेत, किंबहुना कुरआन हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना अंतिम नबी ठरवित धर्माच्या परिपूर्णते ची घोषणा ही करतो

اَلْيَوْمَ اَكْمَلْتُ لَكُمْ دِيْنَكُمْ۔ (سورۂ مائدہ:۳)

'Text' म्हणजे जेव्हा इस्लाम पूर्ण सूर्य बनून आकाशात प्रकट झाला आहे. तेव्हा आता अधिक एखाद्या प्रकाशाची गरज राहीली नाही. तसेच ही हमी देखील दिली गेली की जे मार्गदर्शन या पैगंबरा वर अवतरीत केले गेले आहे ते सुरक्षित राहणारे आहे. यासाठी की त्याच्या संरक्षणाची जबाबदारी स्वत:अल्लाहने घेतली आहे.

(اِنَّانَحْنُ نَزَّلْنَاالذِّكْرَوَاِنَّالَهٗ لِحَافِظُوْنَ۔ سورۂ حجر:۹)

यास्तव त्यात एखादी चुक असण्याची तिळमात्र देखील शक्यता नाही की जेणेकरुन दुसऱ्या पैगंबरास त्या चुकीच्या दुरुस्ती साठी पाठविले जावे.

खत्म नबुवत च्या पुराव्या दाखल कुरआना खेरीज कित्येक हदीस वचने सादर केली जाऊ शकतात,उदाहरणार्थ या ठिकाणी काही सहीह हदीस वचने सादर केली जात आहेत.

مَثَلِىْ وَمَثَلُ الْاَنْبِيَاءِ مِنْ قَبْلِىْ كَمَثَلِ رَجُلٍ بَنٰى بَيْتًا فَاَحْسَنَهٗ
وَاَجْمَلَهٗ اِلَّا مَوْضِعَ لَبِنَةٍ مِنْ زَاوِيَةٍ فَجَعَلَ النَّاسُ يَطُوْفُوْنَ بِهٖ
وَيَعْجَبُوْنَ لَهٗ وَيَقُوْلُوْنَ هَلَّا وُضِعَتْ هٰذِهِ اللَّبِنَةُ قَالَ
فَاَنَا اللَّبِنَةُ وَاَنَا خَاتَمُ النَّبِيِّيْنَ۔ (بخاری کتاب احادیث الانبیاء)

'हजरत अबू हुरैरा द्वारे उल्लिखित आहे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी फर्माविले, माझे आणि पूर्वीच्या पैगंबरांचे उदाहरण त्या माणसा सारखे आहे ज्याने एक भव्य घर बनविले परंतु त्याच्या एका कोपऱ्यात एका वीटे ची जागा खाली सोडली. लोक त्याच्या भोवती फिरत आणि त्याच्या सुंदरते वर आश्चर्य करीत. मात्र (खाली जागा पाहून) म्हणत, हे काय येथे वीट नाही ठेवली गेली पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी फर्माविले, ती वीट मीच होय, आणि मी अंतिम प्रेषित (पैगंबर) आहे. (बुखारी किताब अहादीसूल अंबिया)

كَانَتْ بَنُوْ اِسْرَائِيْل تَسُوْسُهُم الانبياءُ كُلَّمَا هَلَكَ نَبِىٌّ خَلَفَهٗ
نَبِىٌّ وَاَنَّهٗ لَا نَبِىَّ بَعْدِىْ وَسَيَكُوْنُ خُلَفَاءُ۔ (بخاری کتاب المناقب)

.........''बनी इस्त्राईल वंशाचे नेतृत्व पैगंबर करीत जेव्हा एक नबी (पैगंबर) मरण पावत असे तेव्हा दुसरा नबी त्याचा वारसदार बनत असे परंतु माझ्या नंतर कोणी ही नाही, किंबहुना खलीफा असतील.'' (बुखारी किताबुल मनाकीब)

وَاُرْسِلْتُ اِلَى الْخَلْقِ كَافَّةً وَخُتِمَ بِىَ النَّبِيُّوْنَ۔ (مسلم کتاب المساجد)

''मला समस्त ईश निर्मिती कडे रसूल (पैगंबर) बनवून पाठविले गेले आहे आणि पैगंबर-क्रम माझ्या वर संपविला गेला आहे.'' (मुस्लिम किताबुल मसाजिद)

وَاَنَا خَاتَمُ النَّبِيِّيْنَ لَا نَبِىَّ بَعْدِىْ۔ (ترمذی ابواب الفتن)

..........'मी अंतिम पैगंबर आहे. माझ्या नंतर कोणी ही

पैगंबर नाही' (तिर्मिजी अबवाबुल फितन)

हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या अंतिम पैगंबर असण्या संबंधी त्यांच्या सहवासातील अनुयांयीचे एकमत आहे आणि समस्त मुस्लिम जन समूहाचे ही या बाबत मतैक्य आहे. या संदर्भात अल्लामा आलुसी लिहितात-

'पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) हे शेवटचे पैगंबर असण्या बद्दल अल्लाहचा ग्रंथ (कुरआन) अटळ आहे, पैगंबर आचरणाने ही यास उघडपणे निवेदिले आहे आणि समस्त मुस्लिम जन समूहाचे या बाबत एकमत आहे. यास्तव जो मनुष्य या विरूध्द एखादा दावा करील त्याला काफीर ठरविले जाईल आणि जर त्याने याबाबत आग्रह धरला तर त्याला ठार केले जाईल.'' (रुहुल मआनी खंड २२, 'पृष्ठ' ४१)

अल्लामा इब्ने कसीर फर्मावितात-

''सर्वश्रेष्ठ अल्लाहने आपल्या ग्रंथात आणि त्याचे पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी आपल्या आचरणात, जे क्रमबद्धतेने सिध्द आहे, खबर दिली की त्यांच्या नंतर कोणी ही पैगंबर नाही, या साठी की लोकांना हे कळून यावे की त्यांच्या नंतर अर्थात पैगंबरा नंतर जो मनुष्य देखील पैगंबर-पदाचा दावा करील तो खोटारडा, वहीमी आणि लबाड आहे. जो स्वत: देखील मार्गभ्रष्ट आहे व इतरांना ही मार्ग भ्रष्ट करणारा आहे (तफसीर इब्ने कसीर खंड ३ पृ. ४९४)

अंतिम प्रेषिता बाबतच्या या स्पष्ट श्रध्देनंतर ही त्याविषयी कुरआन व सुन्नाह (प्रेषित- आचरण) अटळ आहेत व ज्या बाबत समस्त मुस्लिम जन-समूहाचे एकमत आहे, आजच्या काळात काही लोकांनी याचे चुकीचे व मार्गभ्रष्ट करणारे स्पष्टीकरण देऊन एका नवीन प्रेषितत्वाचा उपद्रव उभारला आहे. कादियानी संप्रदायाची ईमारत याच खोटया श्रध्देवर उभी आहे आणि बहाई संप्रदाय ही नव्या प्रेषितत्वायाचे-दावेदार आहे. खरे पाहता प्रेषितत्वाचा खोटा दावा करणे ही सर्वात खालच्या दर्जाची मार्गभ्रष्टता व एक भयंकर मोठा अपराध होय. याबाबत कुरआन फर्माविते-

وَمَنْ اَظْلَمُ مِمَّنِ افْتَرٰی عَلَی اللّٰهِ كَذِبًا اَوْ قَالَ اُوْحِیَ
اِلَیَّ وَلَمْ يُوْحَ اِلَيْهِ شَیْءٌ۔ (انعام۔۹۳)

.........''आणि त्याहून मोठा अत्याचारी कोण असेल जो अल्लाहच्या संदर्भाने खोटे रचील किंवा दावा करील की माझ्यावर वही अवतरीत केली गेली आहे, वास्ताविक त्याच्या वर कोणतीही वही (ईश-संदेश) अवतरीत केला गेला नसेल.''(अनआम-२)

आणि जे लोक प्रेषितत्वाच्या खोटया दाव्यां वर ईमान बाळगतात ते खरे पाहता सैताना वर ईमान बाळगतात जेव्हा की त्या द्वारे कुफ्र (सत्याचा इन्कार) करण्याचा आदेश दिला गेला आहे.

९४. हा संकेत या गोष्टी कडे आहे की अल्लाहने 'खत्म नबुवत' चा फैसला आपल्या ज्ञानाच्या आधारावर केला आहे. अल्लाह ला पुडील परिस्थिती चे ही ज्ञान आहे म्हणून त्याच्या निर्णयात एखादी चूक असण्याची शक्यता नाही. आता हा तेजस्वी सूर्य कियामती पावेतो प्रकाश देत राहील.

९५. अल्लाहचे नामस्मरण एक अशी उपासना आहे,ज्या करीता कोणती ही मर्यादा आखली गेली नाही. ही जेवढया प्रमाणात केली जावी ती अपेक्षित आहे. आणि नाम: स्मरणाचा अर्थ आम्ही आता पर्यंत स्पष्ट केल्या नुसार मनाच्या एकाग्रतेने अल्लाहचे स्मरण करणे जीभे वर त्याची स्तुति प्रशंसा परवचने अदा करीत राहणे. अल्लाहचे स्मरण जारी ठेवणे आणि समजून उमजून त्याची स्तुति प्रशंसा परवचने अदा करीत राहणे अल्लाहचे अशा प्रकारे स्मरण करण्याचा उद्देश तो होय जो पुढे आयत क्र. ४३. मध्ये निवेदिला गेला आहे. आणि हदीस वचनात याच स्वरुपाच्या नाम: स्मरणाचे महत्व लाभ सांगितले गेले आहेत.

مَثَلُ الَّذِی يَذْكُرُ رَبَّهٗ وَالَّذِیْ لَايَذْكُرُهٗ مَثَلُ
الْحَیِّ وَالْمَيِّتِ۔ (بخاری كتاب الدعوات)

'त्या माणसाचे उदाहरण जो आपल्या पालनकर्त्याचे स्मरण करतो आणि त्याचे जो स्मरण करत नाही जिवंत आणि मृता (मेलेल्या) सारखे होय.' (बुखारी-किताबुद् दअवात)

म्हणजे अल्लाहचे स्मरण केल्याने सुज्ञता निर्माण होते आणि अंतरंगात चैतन्य निर्माण होते परंतु जो मनुष्य अल्लाहचे स्मरण करीत नाही तो गफलतीत पडून राहतो आणि त्याची विवेक बुध्दि मृतवत होते.

اِنَّ رسولُ اللّٰهِ صلی اللّٰه علیه وآله وسلم قَالَ : يَقُوْلُ اللّٰهِ تَعَالٰی : اَنَاعِنْدَظَنِّ
عَبْدِیْ بِی، وَاَنَامَعَهٗ اَذَاذَكَرَنِی، فَاِنْ ذَكَرَنِی، فِی نَفْسِهٖ
ذَكَرْتُهٗ فِیْ نَفْسِی وَاِنْ ذَكَرَنِی فِی مَلَاءٍ ذَكَرْتُهٗ فِی مَلَاءٍ
خَيْرٍ مِنْهُمْ۔ (بخاری كتاب التوحيد)

''पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी असे फर्माविले की मी आपल्या दासाच्या अनुमाना सोबत असतो, जसा तो माझ्याशी बाळगतो. जेव्हा तो माझे नाम: स्मरण करतो तेव्हा मी त्याच्या सोबत असतो, जर तो माझे अंत:करणाने स्मरण करतो तेव्हा मी आपल्या मनात त्याचे स्मरण करतो आणि जर तो माझे स्मरण सभेत करतो तर मी याहून अधिक चांगल्या सभेत त्याचा

उल्लेख करतो.'' (बुखारी-किताबुत्तौहीद)

قَالَ: لَايَزَالُ لِسَانُکَ رَطْبًا مِنْ ذِكْرِ اللّٰهِ۔ (ترمذی ابواب الدعوات)

'तुमची जीभ सदैव अल्लाहच्या स्मरणाने ओलसर रहावी' (तिर्मिजी अबवाबुद् दअवात)

عن عائشه رضی الله عنها قالت: كانَ رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ يَذْكُرُ اللّٰهَ عَلٰى كُلِّ اَحْيَانِهٖ۔ (رياض الصالحين برواية مسلم)

''हजरत आयशा फर्मावितात की पैगंबर सल्लल्लाहु अलैहि वसल्लम आपल्या समस्त वेळात अल्लाहचे स्मरण करीत असत.''

(रियाजुस्सालेहीन-मुस्लिमच्या हवाल्याने)

कुरआन व हदीस वचनांचे हे स्पष्टीकरण लक्षात घेता अल्लाहच्या स्मरणाच्या वचनांची मुखाने उचारण्याचे महत्व घटविणे किंवा त्यांना तुच्छ समजणे मोठी चुकीची गोष्ट आहे आणि धर्म संदर्भात अंतर्दृष्टि अल्प असण्याचे लक्षण आहे.

ज्या दिवशी ते त्याला भेटतील त्यांचे स्वागत सलाम द्वारे होईल. आणि यांच्यासाठी त्याने सन्मानपूर्वक मोबदला तयार करुन ठेवला आहे. हे पैगंबर ! आम्ही तुम्हास शाहीद (साक्ष देणारा) मुबश्शिर (शुभ समाचार देणारा) आणि नजीर (खबरदार करणारा) बनवून पाठविले आहे. (अल-क़ुर्आन)

४२. आणि सकाळ-संध्याकाळ त्याचे गुणगान करा.[९६]

وَّسَبِّحُوْهُ بُكْرَةً وَّاَصِيْلًا ﴿٤٢﴾

४३. तोच होय जो तुमच्या वर कृपा अवतरीत करतो आणि त्याचे फरिश्ते देखील. अशासाठी की त्याने तुम्हाला अंध:कारातून बाहेर काढून उजेडात आणावे.[९७] तो ईमान बाळगणाऱ्यांवर फार कृपाशील आहे.

هُوَ الَّذِيْ يُصَلِّيْ عَلَيْكُمْ وَمَلٰٓئِكَتُهٗ لِيُخْرِجَكُمْ مِّنَ الظُّلُمٰتِ اِلَى
النُّوْرِ ؕ وَكَانَ بِالْمُؤْمِنِيْنَ رَحِيْمًا ﴿٤٣﴾

४४. ज्या दिवशी ते त्याला भेटतील त्यांचे स्वागत सलाम द्वारे होईल.[९८] आणि यांच्यासाठी त्याने सन्मानपूर्वक मोबदला तयार करुन ठेवला आहे.

تَحِيَّتُهُمْ يَوْمَ يَلْقَوْنَهٗ سَلٰمٌ ۖۚ وَّاَعَدَّ لَهُمْ اَجْرًا كَرِيْمًا ﴿٤٤﴾

४५. हे पैगंबर ! आम्ही तुम्हास शाहीद (साक्ष देणारा) मुबश्शिर [१००] (शुभ समाचार देणारा) आणि नजीर [१०१] (खबरदार करणारा) बनवून पाठविले आहे.

يٰٓاَيُّهَا النَّبِيُّ اِنَّآ اَرْسَلْنٰكَ شَاهِدًا وَّمُبَشِّرًا وَّنَذِيْرًا ﴿٤٥﴾ۙ

४६. आणि अल्लाह कडे त्याच्या आदेशाने आवाहन करणारा [१०२] आणि उज्वलदीप बनवून. [१०३]

وَّدَاعِيًا اِلَى اللّٰهِ بِاِذْنِهٖ وَسِرَاجًا مُّنِيْرًا ﴿٤٦﴾

४७. ईमान बाळगणाऱ्यांना खुशखबर द्या की त्यांच्या करीता अल्लाह कडे फार मोठा अनुग्रह आहे.

وَبَشِّرِ الْمُؤْمِنِيْنَ بِاَنَّ لَهُمْ مِّنَ اللّٰهِ فَضْلًا كَبِيْرًا ﴿٤٧﴾

४८. आणि काफिरांना आणि दांभिक मुसलमानां चे म्हणणे ऐकू नका, त्यांच्या छळवणुकीची पर्वा करु नका आणि अल्लाहवर भरवसा ठेवा. अल्लाह या गोष्टीस पुरेसा आहे की त्याच्या वर भरवसा केला जावा.

وَلَا تُطِعِ الْكٰفِرِيْنَ وَالْمُنٰفِقِيْنَ وَدَعْ اَذٰىهُمْ
وَتَوَكَّلْ عَلَى اللّٰهِ ؕ وَكَفٰى بِاللّٰهِ وَكِيْلًا ﴿٤٨﴾

४९. हे [१०४] ईमान बाळगणाऱ्यांनो ! जेव्हा तुम्ही ईमान बाळगणाऱ्या स्त्रीयांशी निकाह कराल आणि मग त्यांना स्पर्श करण्या पूर्वी तलाक द्याल, तेव्हा तुमच्यासाठी त्यांच्यावर कोणतीही इद्दत बंधनकारक नाही, जिची तुम्ही गणना करावी, परंतु त्यांना काही धन द्या आणि उत्तम रित्या निरोप द्या. [१०५]

يٰٓاَيُّهَا الَّذِيْنَ اٰمَنُوْٓا اِذَا نَكَحْتُمُ الْمُؤْمِنٰتِ ثُمَّ طَلَّقْتُمُوْهُنَّ
مِنْ قَبْلِ اَنْ تَمَسُّوْهُنَّ فَمَا لَكُمْ عَلَيْهِنَّ مِنْ عِدَّةٍ
تَعْتَدُّوْنَهَا ۚ فَمَتِّعُوْهُنَّ وَسَرِّحُوْهُنَّ سَرَاحًا جَمِيْلًا ﴿٤٩﴾

९६. मूळ शब्द तस्बीह याचा अर्थ तस्बीह (जपमाळा) चे दाणे जपत राहणे नव्हे, किंबहुना अल्लाहची स्वच्छ-शुध्दता निवेदन करणे होय; या तस्बीह करीता सकाळ संध्याकाळच्या वेळा फार महत्वपूर्ण आहेत म्हणून विशेषत:यांचा उल्लेख केला गेला आहे.

९७. हे फळ आहे अल्लाहच्या स्मरणाचे व त्याची तस्बीह करण्याचे. जेव्हा ही गोष्ट एका ईमान बाळगणाऱ्याच्या जीवनाचे नित्यकर्म बनते तेव्हा अल्लाह त्यावर आपली कृपा अवतरीत करतो आणि फरिश्ते त्याच्या हक्कात कृपाची प्रार्थना करतात त्याची समृध्दि अशा प्रकारे दिसू लागते की अज्ञानाच्या अंध:कारातून बाहेर पडणे आणि ज्ञानव मार्गदर्शनाच्या प्रकाशात येणे सहज सुलभ होते.

९८. हा सन्मान होय, जो अल्लाहला अत्याधिक समरण करणाऱ्या ईमान बाळगणाऱ्यांना कियामतीच्या दिवशी प्रदान केला जाईल. सर्वश्रेष्ठ अल्लाह तर्फे त्यांचे स्वागत 'सलाम' च्या प्रतिष्ठित व शांति दायक वचनांसह केले जाईल.

९९. या ठिकाणी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांची काही महत्वपूर्ण वैशिष्टये निवेदिली गेली आहेत जी प्रेषित पदाशी संबंधित आहेत.

पहिले वैशिष्ट हे की पैगंबर शाहीद आहेत. याचा अर्थ असा

الشَّاهِدُ الْعَالِمُ الَّذِیْ یُبَیِّنُ مَاعَلِمَهٗ۔ (لسان العرب ج ٣ ص ٢٣٩)

''शाहीद म्हणजे जाणणारा, जो निवेदन करील त्या गोष्टिस जी तो जाणतो.'' (लिसानुल अरब खंड ३पृ. २३९)

والشهادة خبر قاطع (ايضاً)

आणि ''शहादत म्हणजे अटळ वार्ता'' (वरील हवला)

पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या 'शहीद असण्याचा अर्थ असा की ते ईश संदेशाच्या अवतरणा मुळे अल्लाहचे स्वत्व व त्याची गुणवैशिष्ठये, त्याचे आदेश आणि त्याच्या प्रिय-अप्रिय बाबींची अटळ खबर देणारे आहेत. दुसऱ्या शब्दात सांगायचे झाल्यास पैगंबर अल्लाहतर्फे सत्य धर्माची साक्ष देणारे आहेत. सूरह मुजाम्मिल मध्ये ही हा शब्द याच अर्थाने वापरला गेला आहे.

اِنَّآ اَرْسَلْنَآ اِلَیْکُمْ رَسُوْلًا شَاهِدًا عَلَیْکُمْ کَمَآ اَرْسَلْنَآ اِلٰی فِرْعَوْنَ رَسُوْلًا۔ (المزمل:١٥)

''आम्ही तुमच्या कडे पैगंबर तुम्हावर साक्षी बनवून अशा प्रकारे पाठविला आहे ज्या प्रकारे फिरऔन कडे रसूल (पैगंबर) पाठविला होता.'' (अल-मुजम्मिल)

काही ऊर्दू अनुवाचकांनी 'शाहीद' चा अनुवाद हाजीर व नाजीर म्हणजे उपस्थित व पाहणारा असा केला आहे. हा अर्थ पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या विषयी त्यांची अतिशयोक्ति पूर्ण व बिदअती (धर्मात नव्या गोष्टी ची भर टाकणे) श्रध्देस प्रकट करतो परंतु प्रसंगोक्ति च्या दृष्टीने हा अर्थ अगदी चुकीचा आहे.

१००. दुसरे वैशिष्टय असे की पैगंबर 'मुबश्शिर' आहेत. म्हणजे ईमान बाळगणाऱ्यांना अल्लाहची कृपा व निरंतर यशाची शुभवार्ता देणारे आहेत. ही खुशखबर कुरआनात ही दिली गेली आहे आणि पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी आपल्या वचनाद्वारे ही दिली आहे. सहीह हदीस वचनात सदाचाराचे जे लाभ वर्णिले गेले आहेत ते खरे पाहता याच शुभ-वार्तेच्या माळेतील भौक्तिक होत. परंतु लक्षात असावे की ही अनमोल संपदा अशाच लोकांच्या वटयाला येईल जे आपल्या ईमाना बाबत प्रमाणिक आणि अल्लाहचे भय बाळगणारे आहेत.

१०१. तिसरे वैशिष्टय हे की पैगंबर 'नजीर' आहेत म्हणजे कुफ्र (सत्य-वेरोध) व विद्रोह वृत्ती अंगिकारणाऱ्यांना अल्लाहच्या अजाब व आखिरतच्या दुष्परिणति पासून खबरदार करणारे आहेत. पवित्र कुरआनात खबरदार करण्याचा हा पैलू इतका स्पष्ट उघड झाला आहे की जो मनुष्य देखील कुरआनाचा अभ्यास करील, त्याला हे जाणवल्या खेरीज राहणार नाही की इन्कार करणाऱ्या व अपराध्या करीता जहन्नम अगदी अनावरित होऊन समोर उभी आहे. त्याच प्रमाणे पैगंबराच्या वचनात ही दुराचाराच्या दुष्परिणती पासून सावध केले गेले आहे.

१०२. चौथे वैशिष्टय असे की पैगंबरना सर्वश्रेष्ठ अल्लाह ने या गोष्टीवर नियुक्त केले आहे की त्यांनी लोकांना अल्लाहकडे बोलवावे. ज्या अर्थी पैगंबर हे आवाहन अल्लाहच्या आदेशान्वये करीत आहे म्हणून त्यांचे आवाहन आगदी सत्य आहे व अत्याधिक स्वरुपात निकोप आहे.

१०३. पाचवे वैशिष्टय असे की पैगंबर 'सिराज मुनीर' आहेत अर्थात प्रज्वलीत दीप यास अभिप्रेत मार्गदर्शनाचा दीप होय. ज्याच्या उज्वल प्रकाशात मनुष्य ध्येय शिखराप्रत पोहोचू शकतो. कुरआन व प्रेषित आचरणात हे पैलू अशा प्रकारे दृगोचर झाले आहेत की जणू आज देखील पैगंबर आमच्या दरम्यान या समस्त गुणविशेषांसह मार्गदर्शन करण्यास्तव हजर आहेत.

१०४. येथून संभाषणाचा ओघ पुन्हा सामाजिक आदेशांकडे वळला आहे. या आयतीत तलाक संबंधी एका प्रश्नाचे उत्तर दिले गेले आहे आणि नंतरच्या काही आयतींमध्ये पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या करीता विवाह संबंधी खास आदेश निवेदिले गेले आहेत.

१०५. या ठिकाणी मूळ शब्द निकाह हा विवाहाच्या अर्थाने वापरला गेला आहे आणि हाच या शब्दाचा खरा मूळ अर्थ होय आणि 'त्यांना स्पर्श करण्या' शी अभिप्रेत शरीर संबंध कायम करणे होय. जर एखाद्या माणसाने निकाह नंतर आपल्या पत्नीशी शरीर संबंध प्रस्थापित करण्या आधीच तलाक दिला तर अशा स्थितीत त्या स्त्रीला इद्दत अवधि घालवावा लागणार नाही, परंतु या स्थितीत पतीने तिला काही रोख रक्कम किंवा वस्त्र दागिने इ. स्वरुपात अवश्य दिले पाहिजे. ज्याप्रमाणे सूरह बकरा आयत क्र. २४१ मध्ये सर्व तलाक दिल्या गेलेल्या स्त्रीयां विषयी ताकीदपूर्ण आदेश दिला गेला आहे (तलाक दिल्यानंतर दिल्या जाणाऱ्या धन-सामग्री च्या स्पष्टीकरणा करीता पहा सूरह बकरा टीप क्र.२७६) हे देणे मेहर च्या रकमे व्यतिरिक्त आहे. जर मेहर निश्चित ठरला तर ज्या प्रमाणे सूरह बकरा आयत क्र. २३७ मध्ये निवेदिले गेले अर्धा मेहर द्यावा लागेल आणि जर मेहरची निश्चित रक्कम ठरली नव्हती तर मताअ (तलाक नंतर काही धन) देतांना याची काळजी घ्यावी.

स्पष्ट असावे की मेहर चा संबंध निकाह शी आहे मात्र 'मताअ'चा संबंध तलाक शी आहे म्हणूनच तलाक दिल्या जाणाऱ्या प्रत्येक स्त्रीला निरोपाचा नजरणा देणे आवश्यक आहे जो भले पणानुसार असावा म्हणजे जो पतीच्या अवाक्या बाहेर नसावा आणि ना इतका क्षुल्लक ही नको की त्याची कशात गणना न व्हावी या संदर्भात अल्लमा इब्ने तैमिया फर्मावितात:

''तिसरे कथन अधिक योग्य आहे आणि ते आहे इमाम अहमद द्वारे उल्लिखित. दुसरे कथन की प्रत्येक तलाक दिल्या गेलेल्या स्त्री करीता मताआ (धन-सामुग्री) देणे होय. जसे सूरह बकरा ची आयत क्र. २४१

وَلِلْمُطَلَّقَاتِ مَتَاعٌ بِالْمَعْرُوف

प्रमाणित करते आणि यासाठी ही की अल्लाहचे फर्मान आहे. सूरह अहजाब आयात क्र. २८

اِذَا نَكَحْتُمُ الْمُؤْمِنَاتِ ـــــ سراحًا جَمِيلًا

या आयतीत अशा स्त्रीयांना ज्याना स्पर्श करण्या पूर्वी तलाक दिला गेला असेल काहीतरी धन-सामुग्री देण्याचा आदेश दिला गेला आहे. आणि हा आदेश त्या घटस्फोटीत स्त्रीयांसाठी खास नव्हे ज्यांचा मेहर निश्चित केला गेला नव्हता, वस्तुत: अधिकांश स्त्रीयांना जो तलाक दिला जातो तो मेहर-रक्कम निश्चित केल्या नंतरच दिला जातो.

(मजमुआ फतावा. इब्ने तैमिया खंड. ३२ पृ. २७) तलाक देण्याच्या स्थितीत स्त्रीला अधिक चांगल्या प्रकारे निरोप देण्याचा आदेश दिला गेला आहे आणि इस्लाम चे उच्चतम नैतिक शिक्षण होय की जेव्हा विभक्त होण्याची पाळी यावी तेव्हा दुराचाराचे प्रदर्शन व्हायला नको. किंबहुना सभ्यता व भलेपणाचा मार्ग पत्करला पाहिजे. अशासाठी की कटुतेचा प्रभाव कमीत कमी व्हावा. परंतु खेदाची बाब अशी की सर्वसामान्यत: मुसलमानांनी या उच्च शिकवणी कडे पाठ फिरविले आहे म्हणून जेव्हा नाती तुटतात, तेव्हा कटुता आणखी जास्त वाढते.

**त्या नंतर तुमच्या करीता इतर स्त्रीया योग्य नव्हेत आणि ना हे योग्य होय की त्यांच्या जागी दुसऱ्या पत्न्या कराव्यात, मग त्यांचे सौंदर्य तुम्हाला किती ही पसंत का असेना त्यांच्या खेरीज, ज्या तुमच्या मिळकतीत असाव्यात. (म्हणजे दासी असाव्यात) आणि अल्लाह प्रत्येक गोष्टीवर देखरेख करणारा आहे. (अल-क़ुर्आन)**

५०. हे पैगंबर ![१०६] आम्ही तुमच्या साठी तुमच्या त्या पत्न्यांना उचित वैध केले ज्यांचे मेहर (स्त्री धन) तुम्ही अदा केले आहेत.[१०७]आणि त्या स्त्रीयांना देखील ज्या अल्लाहच्या प्रदान केलेल्या माले गनीमत (युध्दात जिंकलेल्या धन संपदे) मधून तुमच्या मिळकतीत याव्यात.[१०८]आणि तुमच्या चुलत्यांच्या, तुमच्या आत्यांच्या, तुमच्या मामांच्या आणि तुमच्या मावशींच्या त्या मुली ही ज्यानी तुमच्या सोबत हिजरत (देश-त्याग) केला आहे.[१०९] आणि त्या ईमान बाळगणाऱ्या स्त्रीस देखील जिने स्वत:ला पैगंबरा करीता अर्पण केले असावे, मात्र या अटीवर की पैगंबर तिला आपल्या निकाह (विवाह-बंधना) मध्ये आणू इच्छितील.[११०] हे इतर ईमान बाळगणाऱ्यांना सोडून आहे.[१११] आम्हाला ठाऊक आहे की त्यांच्या पत्न्या आणि त्यांच्या मिळकतीत असणाऱ्या स्त्री (दासी) विषयी त्यांच्यावर काय अनिवार्य केले आहे ?[११२] अशासाठी की तुम्हाला कसली ही अडचण राहू नय [११३]आणि अल्लाह माफ करणारा दया करणारा आहे.[११४]

يَٰٓأَيُّهَا ٱلنَّبِيُّ إِنَّآ أَحْلَلْنَا لَكَ أَزْوَٰجَكَ ٱلَّٰتِيٓ ءَاتَيْتَ
أُجُورَهُنَّ وَمَا مَلَكَتْ يَمِينُكَ
مِمَّآ أَفَآءَ ٱللَّهُ عَلَيْكَ وَبَنَاتِ عَمِّكَ وَبَنَاتِ عَمَّٰتِكَ وَبَنَاتِ
خَالِكَ وَبَنَاتِ خَٰلَٰتِكَ ٱلَّٰتِي هَاجَرْنَ مَعَكَ وَٱمْرَأَةً
مُّؤْمِنَةً إِن وَهَبَتْ نَفْسَهَا لِلنَّبِيِّ إِنْ أَرَادَ ٱلنَّبِيُّ أَن
يَسْتَنكِحَهَا خَالِصَةً لَّكَ مِن دُونِ ٱلْمُؤْمِنِينَ قَدْ عَلِمْنَا
مَا فَرَضْنَا عَلَيْهِمْ فِيٓ أَزْوَٰجِهِمْ وَمَا مَلَكَتْ أَيْمَٰنُهُمْ
لِكَيْلَا يَكُونَ عَلَيْكَ حَرَجٌ وَكَانَ ٱللَّهُ غَفُورًا رَّحِيمًا ٥٠

५१. यांच्या पैकी तुम्ही ज्यांना इच्छित असाल राखा आणि ज्यांना इच्छित असाल आपल्या जवळ ठेवा आणि ज्यांना तुम्ही अलग ठेवले त्यांच्या पैकी एखादीची अपेक्षा बाळगाल तर यात तुम्हाला कसली हरकत नाही याद्वारे या गोष्टीची अधिक आशा बाळगली जाऊ शकते की त्यांच्या नेत्रांना गारवा लाभावा आणि त्या दु:खी न व्हाव्यात आणि जे काही तुम्ही त्याना द्याल, त्यावर ते सर्व राजी राहतील [११५]अल्लाह जाणतो जे काही तुम्हा लोकांच्या मनात आहे.[११६] आणि अल्लाह ज्ञान बाळगणारा, सहनशील आहे.

تُرْجِي مَن تَشَآءُ مِنْهُنَّ وَتُـْٔوِيٓ إِلَيْكَ مَن تَشَآءُ وَمَنِ ٱبْتَغَيْتَ
مِمَّنْ عَزَلْتَ فَلَا جُنَاحَ عَلَيْكَ ذَٰلِكَ أَدْنَىٰٓ أَن تَقَرَّ أَعْيُنُهُنَّ
وَلَا يَحْزَنَّ وَيَرْضَيْنَ بِمَآ ءَاتَيْتَهُنَّ كُلُّهُنَّ وَٱللَّهُ يَعْلَمُ مَا
فِي قُلُوبِكُمْ وَكَانَ ٱللَّهُ عَلِيمًا حَلِيمًا ٥١

५२. त्या नंतर तुमच्या करीता इतर स्त्रीया योग्य नव्हेत आणि ना हे योग्य होय की त्यांच्या जागी दुसऱ्या पत्न्या कराव्यात,मग त्यांचे सौंदर्य तुम्हाला किती ही पसंत का असेना [११७] त्यांच्या खेरीज,ज्या तुमच्या मिळकतीत असाव्यात. [११८] (म्हणजे दासी असाव्यात) आणि अल्लाह प्रत्येक गोष्टीवर देखरेख करणारा आहे.

لَّا يَحِلُّ لَكَ ٱلنِّسَآءُ مِنۢ بَعْدُ وَلَآ أَن تَبَدَّلَ بِهِنَّ
مِنْ أَزْوَٰجٍ وَلَوْ أَعْجَبَكَ حُسْنُهُنَّ إِلَّا مَا مَلَكَتْ
يَمِينُكَ وَكَانَ ٱللَّهُ عَلَىٰ كُلِّ شَيْءٍ رَّقِيبًا ٥٢

१०६. या आयतीत पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या करीता पत्नींच्या संख्येबाबतचा नियम निवेदिला गेला आहे, ज्यावरून स्पष्ट होते की महत्वपूर्ण धार्मिक हेतुंना लक्षात घेता पैगंबरांसाठी विशेष सवलत दिली गेली होती यास्तव यावर आक्षेप घेण्याचा कोणाला काहीमात्र हक्क राहात नाही. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी जे जे निकाह केलेत त्या मर्यादेतच राहून केलेत जी सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्यांच्या करीता निर्धारीत केली होती.

१०७. ज्या स्त्रीयांचे पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी मेहर अदा केले होते त्या सहा होत्या हजरत सौदा हजरत आयशा, हजरत हफ्सा, हजरत उम्मे सलमा, हजरत जैनब बिन्ते हारिस आणि हजरत उम्मे हबीबा (हजरत खदीजा आणि हजरत जैनब बिन्ते खुजैमा यां आधीच मृत्यु पावल्या होत्या) पवित्र-पत्न्यांचा मेहर जसा हदीस वचना मध्ये येतो, पाचशे दिरहम (१४८७ ग्राम चांदी) राहात असे (मुस्लिम किताबुन निकाह) तथापि हबीबा चा मेहर चारशे दिनार (७००ग्राम सोने) एवढा होता जो पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या वर्तीने हब्श (अबिसिनीया) चा बादशहा नजाशी ने अदा केला होता.

हे उदाहरण आहे उदार अत:करणाने मेहर अदा करण्याचे परंतु मुसलमानांच्या एका गटाने 'मेहर' ला केवळ परिवारीक प्रथा बनवून घेतले आहे. एकतर ते पंचवीस-पन्नास रुपये मेहर ठरवितात, जेवढया किमतीत पाच ग्राम चांदी सुध्दा मिळत नाही मात्र लग्नावर हजारो रुपये खर्च करतात, अथवा लोकांना दाखविण्यासाठी एवढा मोठा मेहर निश्चित करतात की तो अदा करण्याची पाळीच येत नाही. या दोन्ही गोष्टीत सुधारणा होण्याची गरज आहे.

१०८. अभिप्रेत त्या स्त्रीया होत ज्या युध्दात पकडल्या जाऊन युध्दात जिंकलेल्या या नात्याने त्यांच्या हिश्शात आल्या असाव्यात, तर अशा स्त्रीयांशी निकाह करण्याची पैगंबरांना अनुमति होती. या अनुमतिनुसार हजरत जवेरिया आणि हजरत सफीया यांच्याशी निकाह केला होता. हजरत जवेरिया बनी मुस्तालीक वंशाशी झालेल्या युध्दात (शाबान हि. स. ६ मध्ये) बंदिस्त होऊन आल्या होत्या. ती त्या कबिल्याच्या सरदाराची मुलगी होती आणि तिने इस्लाम धर्माचा स्विकार केला होता म्हणून पैगंबरानी त्यांचा सामाजीक दर्जा लक्षात घेऊन तिला स्वतंत्र करुन पत्नीत्वाचा दर्जा बहाल केला. अशा प्रकारे हजरत सफीया खैबर युध्दात (हि.स.७ मध्ये) बंदिस्त (युध्दकैदी) म्हणून आल्या होत्या आणि त्या यहुदाच्या प्रसिद्ध सरदारच्या कन्या होत्या जेव्हा त्यांनी इस्लाम धर्म स्विकारला तेव्हा पैगंबरांनी त्यांच्या स्वातंत्र्यास मेहर ठरवून त्यांच्याशी निकाह केला. अशा प्रकारे या दोन्ही गुलाम स्त्रीयांना पैगंबरांच्या पत्नींमध्ये समाविष्ट होण्याचे सद्भाग्य लाभले.

१०९. तुमच्या सोबत हिजरत (देश-त्याग) केली याचा अर्थ असा नव्हे की त्या देश त्याग करतांना पैगंबराच्या सोबत होत्या किंबहुना याचा अर्थ असा की ज्या प्रकारे इस्लाम साठी तुम्ही आपले देश आणि घरदार सोडले त्याच प्रकारे त्यांनी ही हे बलीदान दिले आणि या कर्तव्य पूर्ततेत तुमचे सहभागी झाले. अशा चुलत, आते बहीण, मामे बहीण व मावशीच्या मुलीं शी निकाह करण्याची त्यांना अनुमति दिली गेली. या सवलती द्वारा त्यांनी त्या मर्यादे पर्यंत लाभ घेतला ज्या मर्यादे प्रत धार्मिक हेतुंची निकड होती.

हजरत जैनब आणि हजरत उम्मे हबीबाशी त्यांच्या निकाह चा उल्लेख वर केला गेला. हजरत जैनब त्यांची आते बहीण होती. आणि हजरत उम्मे हबीबा अबु सुफियान ची मुलगी होती जे बनी उमय्या वंशाचे होते म्हणजे अबु सुफियान आजोबांच्या वडीलांच्या माध्यमाने पैगंबरांचे काका लागत.

११०. म्हणजे एखादी ईमान बाळगणारी स्त्री पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्याशी मेहर न घेता निकाह करण्याचा प्रस्ताव मांडील तर आपण तो प्रस्ताव मान्य करीत तिच्याशी निकाह करावा. हजरत मैमूना यांच्याशी ही. स.७ मध्ये झालेला पैगंबरचा निकाह याचा नियमानुसार होता.

१११. अर्थात मेहरविना निकाह चा प्रस्ताव मान्य करणे, पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या करीता विशेषत्वाने आहे. सर्व सामान्य मुसलमानांना याची अनुमति नाही.

११२. संकेत या गोष्टी कडे आहे की सूरह निसा मध्ये मुसलमानांना चार पत्न्या करण्याची अनुमति दिली गेली आहे. आणि गुलाम स्त्रीयांच्या बाबतीत ही यात आदेश निवेदिले गेले आहेत.

११३. म्हणजे त्यांच्या करीता (अर्थात पैगंबरा करीता) निकाह चे क्षेत्र अशासाठी व्यापक केले गेले होते की महत्वपूर्ण धार्मिक हेतु लक्षात घेता या मर्यादेत राहून निकाह करण्यात त्यांनी कसलाही अडथळा जाणू नये व विरोधकांच्या आक्षेपांची काही ही पर्वा करु नये.

स्पष्ट असावे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी अधिकांश निकाह विधवांशी व वयस्क स्त्रीयांशी केले होते ज्यामुळे त्या असहाय स्त्रीयांच्या सांत्वनाचा ही हेतु होता. आणि संबंधित कबिल्या व घराणंयावर इस्लाम चा प्रभाव पाडण्याचा ही हेतु होता. त्याच प्रमाणे त्यांना प्रशिक्षित करुन मुस्लिम जन समूहा च्या शिक्षण व प्रशिक्षणाचे साधन बनविणे हा ही.

११४. संकेत या गोष्टी कडे आहे की जर या महान कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडण्यात नकळत एखादी चूक

घडल्यास सर्वश्रेष्ठ अल्लाह क्षमा करणारा व दया करणारा आहे.

११५. म्हणजे या गोष्टीचा तुम्हाला अधिकार आहे की यांच्या पैकी वाटेल त्यांना दूर ठेवा व वाटेल त्यांना जवळ राखा आणि याबाबत ही त्यांना काही हरकत नाही की ज्यांना त्यांनी अलग ठेवले असेल त्यांच्या पैकी एखादीस आपल्या जवळ बोलवावे. अर्थात पैगंबरांच्या हक्कास त्यांच्या हक्कांवर अग्रक्रम आहे. आणि पैगंबरांनी अनेक विवाह केवळ धार्मिक हेतु लक्षात घेता केले आहेत, म्हणून त्यांच्या पत्न्यांना जो पर्यंत देखील पैगंबरांच्या सहवासात राहण्याची संधी लाभेल, आपल्याकरीता भाग्यकारक जाणून त्यावर समाधान मानले पाहीजे. अशा स्थितीत पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना आपल्या जबाबदाऱ्या पार पाडण्यात ही सवड मिळेल आणि त्यांच्या पत्न्या देखील सुखी व समाधानी राहतील अशा प्रकारे पैगंबरांच्या घराचा वातावरण आनंदी राहील.

उपरोक्त अधिकार सर्वश्रेष्ठ अल्लाहने पैगंबरांना दिला असला तरी ते आपल्या समस्त पत्न्यांच्या दरम्यान पाळी पाळी ने राहात व त्यांच्याशी न्यायाने वागत. ज्या कथनांमध्ये असा उल्लेख आहे की पैगंबरांनी आपल्या काही पत्न्यांना विभक्त ठेवले होते, तो योग्य नाही. अबु बकर जसास लिहितात की:

''पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) द्वारे उल्लिखित आहे की ते आपल्या पत्न्यां मध्ये (निवासा करीता) पाळी ठरवून घेत आणि यात या गोष्टीचा उल्लेख नाही की एखाद्या पत्नीस त्यांनी पाळीला अपवाद ठरवले असावे --- हजरत आयेशा फर्मावितात की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) त्यांच्या न्यायपूर्वक पाळी निश्चित करत आणि फर्मावित, हे अल्लाह, ही विभागणी जेथपावेतो माझ्या अधिकारात आहे मी केली आहे तेव्हा जे तुझ्या अधिकारात आहे व माझ्या शक्ति बाहेर आहे, त्या बाबत मला जबाबदार धरु नकोस.'' (तफसीर जस्सास खंड. ३ पृ. ४५३)

तथापि हजरत सौदा ज्या अर्थी त्यांचे वय अधिक झाले होते आपली पाळी हजरत आयशा यांना देऊन टाकली होती. या मार्गदर्शनाचा प्रभाव होता की पैगंबरांच्या पत्न्यांमध्ये ना वैरभाव निर्माण झाला आणि ना पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लमयांना) त्यांच्या कडून एखाद्या दु:ख यातनेस तोंड द्यावे लागले आणि मुस्लिमांच्या माता या नात्याने त्यांचे चारित्य उच्च व आदर्श राहीले.

११६. संकेत या गोष्टी कडे आहे की अल्लाहने आपल्या पैगंबरास त्यांच्या पत्नीच्या संबंधाने जी सवलत दिली आहे त्याबद्दल कोणाला आक्षेप घेण्याचा काहीच हक्क नाही. परंतु जर तुम्ही संशयाला देखील मनात जागा दिली तर लक्षात ठेवा अल्लाह तुमच्या मन अवस्था चांगल्या प्रकारे जाणतो.

११७. म्हणजे पैगंबर या विशिष्ट मर्यादेत राहूनच निकाह करु शकतात ज्याचा उल्लेख वर केला गेला आहे. या मर्यादे बाहेर निकाह करण्याची पैगंबराना अनुमति नाही. तात्पर्य पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना जिथे खास सवलती दिल्या गेल्या तिथे निकाह बाबत काही अशी बंधनेही त्यांच्यावर लादली गेली जी सर्वसामान्य मुसलमानावर लागू नाहीत. उदाहरणार्थ हे की जर एखाद्या मुसलमानास चार पत्न्या आहेत तर तो यांच्या पैकी एखादीस तलाक देऊन तिच्या जागी दुसरी पत्नी आणू शकतो परंतु पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्यावर अल्लाहने हे बंधन घातले होते की ते त्यांच्या विद्यमान एखादीस तलाक देऊन तिच्याजागी दुसरी पत्नी आणू शकत नाही. अर्थात शरीअत चे पालन त्यांच्या करीता देखील होते. आणि हा या गोष्टीचा पुरावा होय की जे काही अल्लाह तर्फे अवतरीत होत असे त्याचे पैगंबर काटेकोर पालन करीत येथपावेतो की त्यांचे व्यक्तिगत आणि कौटुंबिक जीवन देखील याला अपवाद नव्हते.

अल्लामा (विद्वान) इब्ने कसीर यांनी स्पष्ट केले आहे की या बाबतीत कोणताही मतभेद नाही की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या निधनाच्या वेळी त्यांच्या नऊ पत्न्या हजर होत्या (अल बिदाया वन्निहाया खंड ५ पृ. २९१)

आयतीतले वाक्यांश, 'जरी त्यांचे सौंदर्य तुम्हाले कितीही पसंत पडो' वरुन ओघाओघाने ही गोष्ट देखील स्पष्ट झाली की पुरुषां करीता निकाह संदर्भात स्त्रीयांचे सौंदर्य आकर्षणाचे कारण होय परंतु ईमान बाळगणाऱ्या करीता शरीअतच्या मर्यादेचा विचार अत्यावश्यक आहे.

११८. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या करीता निकाह तर त्याच स्त्रीयांशी योग्य ठरविला गेला ज्याचा उल्लेख वरील आयतीत केला गेला आहे. परंतु आपल्या गुलाम स्त्रीयांशी शरीर संबंध ठेवण्याची अनुमति दिली गेली जी सर्व सामान्य मुसलमानां करीता ही होती या अनुमतिनुसार मारिया किब्तियास त्यांनी स्विकारले होते जिला नजरणा म्हणून इजिप्त च्या नसरानी राजा मकूकसने पैगंबरांच्या सेवेत पाठविले होते आणि हे ही स्पष्ट सांगितले होते की तिला अतिशय सभ्य मानले जाते. तिच्या पासूनच त्यांना पुत्र-लाभ झाला ज्याचे नाव त्यांनी इब्राहीम असे ठेवले व ज्याचा मृत्यु हि. स. ९ मध्ये झाला.

**अल्लाह आणि त्याचे फरिश्ते पैगंबरांवर रहमत (कृपा) पाठवितात. हे ईमान बाळगलेल्या लोकांनो तुम्ही ही त्यांच्यावर रहमत (दरूद) व सलाम पाठवा.(अल-कुर्आन)**

५३. हे ईमान बाळगलेल्या लोकांनो ! पैगंबराच्या घरात प्रवेश करु नका, परंतु अशा वेळी जेव्हा तुम्हाला परवानगी दिली जावी (परवानगी मिळाल्या वर) भोजन तयार होण्याच्या प्रतिक्षेत (बसून) राहू नका [११९] मात्र जेव्हा तुम्हाला (भोजना करीता) बोलावले जाईल तेव्हा आत प्रवेश करा आणि जेव्हा भोजन आटोपला तेव्हा इतस्ततः व्हा [१२०] आणि गोष्टी करण्यात रमू नका. [१२१] या गोष्टी पैगंबरा करीता त्रासदायक आहेत, परंतु ते तुम्हाला काही बोलण्यात संकोच बाळगतात आणि अल्लाह सत्य गोष्ट बोलण्यात संकोच करत नाही. [१२२] आणि जेव्हा तुम्हाला पैगंबराच्या पत्नीकडून एखादी वस्तू मागायची असेल तेव्हा पडद्या आडून मागा ही पध्दत तुमच्या हृदयांकरीता ही अधिक स्वच्छ शुध्द आहे आणि त्यांच्या हृदयां करीता देखील. [१२३] आणि तुमच्या करीता कदापि हे उचित नव्हे की अल्लाहच्या पैगंबरास दुःख त्रास द्यावा आणि ना हे उचित होय की त्यांच्या नंतर कधी तुम्ही त्यांच्या पत्नींशी निकाह करावा.[१२४] अल्लाह जवळ ही मोठी भयंकर बाब होय.

يَاأَيُّهَا الَّذِينَ آمَنُوا لَا تَدْخُلُوا بُيُوتَ النَّبِيِّ
إِلَّا أَنْ يُؤْذَنَ لَكُمْ إِلَىٰ طَعَامٍ غَيْرَ نَاظِرِينَ إِنَاهُ وَلَٰكِنْ إِذَا
دُعِيتُمْ فَادْخُلُوا فَإِذَا طَعِمْتُمْ فَانْتَشِرُوا وَلَا مُسْتَأْنِسِينَ
لِحَدِيثٍ ۚ إِنَّ ذَٰلِكُمْ كَانَ يُؤْذِي النَّبِيَّ فَيَسْتَحْيِي مِنْكُمْ ۖ
وَاللَّهُ لَا يَسْتَحْيِي مِنَ الْحَقِّ ۚ وَإِذَا سَأَلْتُمُوهُنَّ مَتَاعًا
فَاسْأَلُوهُنَّ مِنْ وَرَاءِ حِجَابٍ ۚ ذَٰلِكُمْ أَطْهَرُ لِقُلُوبِكُمْ وَقُلُوبِهِنَّ ۚ
وَمَا كَانَ لَكُمْ أَنْ تُؤْذُوا رَسُولَ اللَّهِ وَلَا أَنْ تَنْكِحُوا أَزْوَاجَهُ
مِنْ بَعْدِهِ أَبَدًا ۚ إِنَّ ذَٰلِكُمْ كَانَ عِنْدَ اللَّهِ عَظِيمًا ﴿٥٣﴾

५४. तुम्ही कोणती ही गोष्ट जाहीर करा किंवा लपवा. अल्लाह ला प्रत्येक गोष्टी चे ज्ञान आहे.

إِنْ تُبْدُوا شَيْئًا أَوْ تُخْفُوهُ فَإِنَّ اللَّهَ كَانَ بِكُلِّ شَيْءٍ عَلِيمًا ﴿٥٤﴾

५५. त्यांच्या वर कसला ही गुन्हा नाही त्यांच्या पित्यांच्या (घरात प्रवेश करण्या) बाबत आणि ना त्यांची मुले, त्यांचे भाऊ, त्यांचे पुतणे, त्यांच्या भाच्या, त्यांच्या आपल्या स्त्रीया आणि त्यांच्या मिळकतीच्या स्त्रीया (दासी) बाबत.[१२५] अल्लाहचे भय बाळगा - निःसंशय अल्लाह प्रत्येक गोष्टी वर साक्षी आहे.[१२६]

لَا جُنَاحَ عَلَيْهِنَّ فِي آبَائِهِنَّ وَلَا أَبْنَائِهِنَّ وَلَا إِخْوَانِهِنَّ
وَلَا أَبْنَاءِ إِخْوَانِهِنَّ وَلَا أَبْنَاءِ أَخَوَاتِهِنَّ وَلَا نِسَائِهِنَّ وَلَا
مَا مَلَكَتْ أَيْمَانُهُنَّ ۗ وَاتَّقِينَ اللَّهَ ۚ إِنَّ اللَّهَ كَانَ عَلَىٰ كُلِّ
شَيْءٍ شَهِيدًا ﴿٥٥﴾

५६. अल्लाह आणि त्याचे फरिश्ते पैगंबरांवर रहमत (कृपा) पाठवितात. हे ईमान बाळगलेल्या लोकांनो तुम्ही ही त्यांच्यावर रहमत (दरूद) व सलाम पाठवा. [१२७]

إِنَّ اللَّهَ وَمَلَائِكَتَهُ يُصَلُّونَ عَلَى النَّبِيِّ ۚ يَاأَيُّهَا
الَّذِينَ آمَنُوا صَلُّوا عَلَيْهِ وَسَلِّمُوا تَسْلِيمًا ﴿٥٦﴾

११९. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) आणि त्यांच्या कुटुंबियांच्या आदरा संबंधाने ईमान बाळगणाऱ्यांना या ठिकाणी काही ताकीदी दिल्या गेल्या आहेत. एक ही की त्यांच्या घरात परवानगी शिवाय प्रवेश करू नये, दुसरी ही की परवानगी मिळाल्यावर प्रवेश केला तर गरजे पुरतेच थांबावे, जेवणाची वाट बघत बसून राहू नये की जेवणाची वेळ व्हावी व जेवण तुमच्या पुढयात यावे. उघड आहे ही गोष्ट नितीमत्तेच्या विपरीत आहे आणि पैगंबराच्या घरात वाईट वर्तनाचे प्रदर्शन तर फारच वाईट कृत्य होय.

१२०. ही तिसरी ताकीद होय की जर पैगंबरांच्या घरी तुम्हाला भोजनासाठी बोलावले जाईल तर जरूर जा, परंतु जेव्हा जेवण उरकून घ्याल तर तिथून काढता पाय घ्या.

आयतीच्या पहिल्या वाक्यात पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या घरात परवानगी घेऊन दाखल होण्याची ताकीद केली गेली होती मग काही आवश्यकते नुसार का जाणे होईना आणि या वाक्यात जेवण्यासाठी बोलावल्या वर आवश्यक सावधगिरी संकोच पाळण्याची ताकीद केली गेली आहे.

१२१. म्हणजे पैगंबरांच्या घरात प्रवेश केल्यानंतर तुम्ही गप्पागोष्टी करावयास लागू नये मग तुम्ही परवानगी ने काही कामानिमित्त का आलेले असेनात किंवा जेवणाकरीता बोलावले गेले असेनात. कोणत्या ही परिस्थितीत पैगंबरांचे घर सर्वसामान्य मुसलमानांच्या घरा प्रमाणे नव्हे यास्तव या ठिकाणी शिष्टाचाराची अत्याधिक कांस बाळगली पाहीजे.

१२२. म्हणजे पैगंबर संकोचवश तुम्हाला काही बोलत नाही आणि आपल्या घरात तुमचे गरजे पेक्षा अधिक वेळ थांबणे किंवा तुमच्या पैकी एखाद्याचे जेवणाच्या वेळे ची प्रतिक्षा करणे, आपल्या दयाशील आचरणामुळे सहन करतात. परंतु अल्लाह साठी संकोच करण्याचा प्रश्न निर्माण होत नाही. तो आपल्या पैगंबरा बाबत शिष्टाचारास विचाराधीन राखण्याची ताकीद फर्मावितो. या साठी की या पैलूने ही तुमचे यथायोग्य प्रशिक्षण व्हावे.

१२३. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या घरात प्रवेश करण्या संबंधाने ही चौथी ताकीद होय की तुमच्या व पैगंबरां च्या पत्नींच्या दरम्यान पडदा असणे आवश्यक आहे. जर एखादी वस्तु मागण्याची गरज भासली तर पडद्या आडून मागा. कसलाही आड पडदा न ठेवता सरळ त्यांच्या समोर जाऊन उभे राहू नका आणि यांचे कारण ही स्पष्ट फर्मावेिले की असे केल्याने तुम्ही ही आपल्या हृदयास अधिक स्वच्छ शुध्द राखू शकाल आणि त्या देखील, म्हणजे कसल्याही आशंकेला वाव राहणार नाही.

पडद्या संदर्भातिल ही पहीली आयत होती आणि पडद्याच्या आदेशाची सुरुवात पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या घरापासून केली गेली. हा पडदा सर्वसामान्य मुसलमानांच्या घरामध्ये जरी अपेक्षित व पसंत ठरलेला असला तरी तो त्यांच्यावर बंधनकारक केला गेला नाही. यास्तव सूरह नूर मध्ये जी सूरह अहजाब नंतर अवतरली, स्त्रीयांना हा आदेश दिला गेला की त्यांनी अशा पुरूषां समोर जे परवानगी घेऊन घरात दाखल झाले असावेत आपल्या सौंदर्य सजावटीस दाखवू नये म्हणजे नटून थटून त्यांच्या पुढे येऊ नये (पहा सूरह नूर आयत क्र. ३१ टीप क्र. ४३) जर घरात पडदा टाकण्याचा आदेश सर्वसामान्य मुसलमानां करीता ही असता तर मग घरात परवानगीने दाखल झालेल्या पुरुषां समोर सजावटीने येण्याचा प्रश्न स्त्रीयांना उद्‌भवला नसता तात्पर्य सर्व सामान्य मुस्लिम स्त्रीयांना घरच्या पडद्या बाबत एवढा सक्त आदेश दिला गेला नाही जेव्हा पैगंबराच्या पत्नींना दिला गेला आणि हे अशामुळे की पैगंबर पत्नींचे स्थान 'समस्त मुस्लिमांच्या माता' असे असल्यामुळे सर्वसामान्य स्त्रीयांहून अतिशय उच्च आहे.

हदीस वचनातील उल्लेखा नुसार ही आयत हजरत जैनब यांच्या वलीमा (जेवणावळ) प्रसंगी अवतरली होती.

'हजरत अनस फर्मावितात की जेव्हा पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी जैनब बिन्त जहश यांच्याशी निकाह केला तेव्हा लोकांना (जेवणावेळी साठी) बोलावले जेव्हा लोकांनी भोजन आटोपले तर बसून गप्पा मारीत राहीले. पैगंबर उभे राहू इच्छित होते परंतु लोक उठले नाहीत. शेवटी पैगंबर उठून उभे राहीले. जेव्हा पैगंबर उभे राहीले तर इतर लोकही उठून उभे राहीले, परंतु तीन माणसे बसून राहीलीत. जेव्हा पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी पुन्हा एकदा आत येण्याची इच्छा केली तेव्हा पाहीले की लोक बसलेलेच आहेत (म्हणून परत गेले) मग जेव्हा ते उठून चालले गेले तेव्हा मी, पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना जाऊन सांगितले, ते गेलेत, पैगंबर आले व त्यांनी आत प्रवेश केला तेव्हा मी देखील आत जाऊ लागलो परंतु त्यांनी माझ्या व आपल्या दरम्यान पडदा टाकला आणि अल्लाहने हीं आयत अवतरीत केली. (बुखारी-किताबुत्तफसीर)

"يَاأَيُّهَا الَّذِيْنَ اٰمَنُوا لَا تَدْخُلُوا بُيُوتَ النَّبِي۔"

''हे ईमान बाळगलेल्या लोकांनो ! पैगंबराच्या घरात प्रवेश करु नका.........

१२४. म्हणजे पैगंबरांच्या निधनानंतर ही त्यांच्या पत्नीशी निकाह करणे हराम (वर्ज्य) होय.

१२५. म्हणजे घरात पडद्याच्या त्या बंधनाला, जो वरील आयतीत निवेदिली गेला आहे, हे लोक अपवाद होत. यात विवाह-संबंधास अपात्र असलेल्या खेरीज मुसलमान स्त्रीयां,

आणि दासी, गुलाम ज्यांचे ते स्वामी असावेत सामील आहेत.

१२६. म्हणजे अल्लाह विद्यमान व निरीक्षण करणारा आहे.

१२७. अरबी भाषेत जेव्हा 'सल्ल' सोबत 'अला' हा उपसर्ग (Preposition) येतो तर त्याचा अर्थ ईश-कृपा पाठविणे आणि ईश-कृपा साठी प्रर्थना करणे असा आहे. म्हणून आयतीचा अर्थ अल्लाह पैगंबरावर आपली कृपा पाठवितो आणि त्याचे फरिश्ते पैगंबरा करीता ईश-कृपा साठी प्रार्थना करतात, हे ईमान बाळगणाऱ्यांनो ! तुम्ही ही पैगंबरा करीता ईश-कृपेची प्रार्थना करा आणि खूप सलाम पाठवा येथे 'सलाम'चा अर्थ सामान्य कृपा नव्हे, किंबहुना विशेष कृपा असा आहे म्हणजे अशी ईश-कृपा जी आदर सन्माना सह असावी उर्दू भाषेत या करीता विशेष शब्द 'दरूद' असा आहे आणि सलाम पाठविणे म्हणजे प्रत्येक प्रकारच्या संकटा पासून सलामत राहण्याची प्रार्थना करणे. दरूद व सलाम चा हा नजराणा पैगंबरांच्या दरबारात सादर करण्याचा हा आदेश प्रत्येक मुसलमानास दिला गेला आहे आणि हदीस वचनातील उल्लेखानुसार याचा मोठया प्रमाणात इतमाम राखणे अपेक्षित ही आहे कारण दरूद व सलाम द्वारे पैगंबरांशी प्रेम आणि श्रध्देचे नाते जुळते.

नमाज पढताना तशहहुद मध्ये सलाम व दरूद ची जी वचने अदा केली जातात ती कुरआनाच्या याच आदेशाचे पालन होय. यात पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्यावर सलाम पाठविण्याची जी रीत शिकवली गेली आहे ती पुढील प्रमाणे

اَلسَّلَامُ عَلَيْکَ اَيُّهَاالنَّبِيُّ وَرَحْمَتُ اللّٰهِ وَبَرَکَاتُهٗ۔

(بخاری ابواب صفۃ الصلوٰۃ)

''सलाम असो आपणावर हे पैगंबर आणि अल्लाहची कृपा व त्याची समृध्दी असो.'' (बुखारी-अबवाब सिफतुस्सलात)

स्पष्ट असावे की हे पैगंबर ! ''अय्युहन्नबिय्यु'' اَيُّهَاالنَّبِيُّ म्हणण्याचा हा अर्थ नव्हे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) उपस्थित व देखरेख करीत आहेत कारण प्रत्येक ठिकाणी उपस्थित व देखरेख करणारा केवळ अल्लाह आहे, किंबहुना हे संबोधन तत्कालीन पैगंबर असल्याच्या नात्याने आहे म्हणजे ही कल्पना देण्या करीता की जणू पैगंबर आमच्या दरम्यान मार्गदर्शना साठी हजर आहेत आणि आम्ही पैगंबरांच्या दरबारात हजर होऊन सलाम सादर करीत आहेत. ही अलंकारीक शैली आहे ज्याचे उदाहरण ती प्रार्थना होय जी कबरींना पाहण्या प्रसंगी केली जाते. या प्रार्थनेत ही मृतां ना संबोधून त्यांना सलाम केला जातो आणि याचा हा अर्थ होत नाही की मृत हजर व पाहणारे आहेत, किंबहुना हेतु ही कल्पना देण्याचा असतो की कबरीचे दर्शन घेणारा जणू मृतांच्या सभेत बैठकीस पोहचला आहे व त्यांना सलाम करीत आहे.

जे लोक अलंकाराच्या या शैलीस समजून घेत नाही ते याचा चुकीचा अर्थ लावून शिर्क व बिदअत चा मार्ग खुला करतात।

परंतु याचे खंडन करण्या करीता हजरत अब्दुल्लाह बिन मसऊद चे हे स्पष्टीकरण पुरेसे आहे की 'अय्युहन्नबी' اَيُّهَاالنَّبِيُّ (हे पैगंबर) हे शब्द आम्ही त्या वेळी उच्चारीत असो जेव्हा ते आमच्या दरम्यान हजर होते. परंतु जेव्हा त्यांचे निधन झाले तेव्हा आम्ही السلام علی النبی **अस्सलामू अलन्नबी** (सलाम असो पैगंबरांवर) असे म्हणू लागलो (बुखारी किताबुल इस्तिजान) म्हणजे संबोधिताच्या (ايها) न्दितीय पुरुषा ऐवजी गैरहजर च्या तृतीय पुरुषात सलाम पाठवू लागलो. मग ही गोष्ट देखील विचार करण्या जोगी आहे की नमाज मध्ये सलाम बसून पाठविला जातो यास्तव पैगंबरांवर कोणत्याही वेळी सलाम पाठविण्या करीता उभे राहण्याचे बंधन नाही परंतु बिदअत वाल्यांनी ''मिलादुन्नबी'' ची सभा आयोजित करण्याची जी रीत प्रचलीत केली आहे, तिच्यात पैगंबरांवर सलाम पाठवितांना उभे राहणे आवश्यक ठरविले जर कोणी उभा नसेल तर त्याला तिरस्कृत केले जाते, येथपावेतो त्याच्या श्रध्देला चुकीची समजले जाते. धर्मात नव्या नव्या आलेल्या अशाच गोष्टींनी मुस्लिम जनसमूहाच्या दरम्यान भेद निर्माण केला आहे.

राहीले दरुद तर याची पद्धत ही हदीस मध्ये निवेदिली गेली आहे. कअब बिन उजरा म्हणतात की आम्ही सांगितले, हे अल्लाहचे पैगंबर, आपणावर सलाम पाठविण्याची पद्धत तर आम्हाला ठाऊक आहे, परंतु आम्ही आपणावर दरुद कसे पाठवावे? पैगंबरांनी फर्माविले, म्हणा:

اَللّٰهُمَّ صَلِّ عَلٰی مُحَمَّدٍ وَّعَلٰی اٰلِ مُحَمَّدٍ کَمَاصَلَّيْتَ عَلٰی اٰلِ
اِبْرَاهِيْمَ اِنَّکَ حَمِيْدٌ مَّجِيْدٌ۔ اَللّٰهُمَّ بَارِکْ عَلٰی مُحَمَّدٍ وَّعَلٰی اٰلِ
مُحَمَّدٍ کَمَابَارَکْتَ عَلٰی اٰلِ اِبْرَاهِيْمَ اِنَّکَ حَمِيْدٌ مَّجِيْدٌ۔

(بخاری کتاب الدعوات)

अर्थात ''हे अल्लाह ! मुहम्मदांवर आणि मुहम्मदांच्या संतती वर कृपा पाठव ज्या प्रकारे तू इब्राहीम च्या संततीवर कृपा पाठविली नि:संशय तू प्रशंसनीय आणि महान आहेस. हे अल्लाह समृध्दि अवतरीत कर मुहम्मदांवर व मुहम्मदांच्या संतती वर ज्या प्रकारे तू इब्राहिमच्या संतती वर समृध्दि अवतरीत केली. नि:संशय, तू प्रशंसनीय आणि महान आहेस.'' (बुखारी किताबुद-दअवात)

दुसऱ्या कथनामध्ये दोन्ही ठिकाणी عَلٰی اِبْرَاهِيْمَ 'अला

इब्राहीम' हा शब्द वाढला आहे)

दुरुद मध्ये अला मुहम्मदांच्या संततीस ही सामील केले गेले आहे आल हा शब्द अरबी भाषेत वंश आणि कुटुंबाच्या अर्थाने ही येतो आणि अनुयायींच्या अर्थाने देखील. यास्तव लिसानुल अरब या शब्दकोशात आल म्हणजे अनुसरण करणारे (लिसानुल अरब खंड ११ पृ. ३८) आणि कुरआनात आले फिरऔन अशा समूहाला म्हटले गेले आहे जो फिरओनचा अनुयायी होता. हजरत इब्राहीम यांच्या अनुयायी मध्ये प्रभावी संख्या अशा लोकांची होती जे त्यांच्या वंशा पैकी होते म्हणून त्यांना आले इब्राहीम म्हटले गेले आहे परंतु हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचे अनुयायी एक विश्वव्यापी जनसमूह आहे म्हणून अर्थाच्या स्वरूपात ते आले मुहम्मद ठरले. या आशयाची पुष्टि आयत क्र. ४३ ने ही होते. ज्यात ईमान बाळगणाऱ्या वर अल्लाह आणि त्याच्या फरिश्त्यांनी 'सलात' म्हणजे रहमत पाठविण्याचा उल्लेख केला गेला आहे.

दरुद ची महत्ता सहीह हदीस मध्ये पुढील प्रमाणे निवेदिली गेली आहे. مَنْ صَلَّى عَلَىَّ صَلَاةً صَلَّى اللهِ عَلَيْهِ بِهَا عَشْرًا۔ (مسلم کتاب الصلوٰۃ)

''जो माझ्यावर एक वेळ दरुद पाठवील अल्लाह त्याच्यावर दहा वेळ रहमत (कृपा) पाठवील.'' (मुस्लिम किताबुस्सलात)

परंतु प्रमाणदृष्टया कमकुवत हदीस वचनांमध्ये योग्य अतिशयोक्तिसह याचे लाभ वर्णिले गेले आहेत.

बुखारीचे भाष्यकार हाफिज इब्ने हजर लिहितात.

'या प्रकरणात (अर्थात दरूद च्या लाभां मध्ये) योग्य प्रमाणात कमकुवत आणि निराधार हदीस वचने आहेत आणि ज्या कथानांना गोष्टी सांगणाऱ्यांनी रचले आहे ती तर अगणित आहेत, परंतु प्रमाण दृष्टया सशक्त हदीस वचने या सर्वांपासून नि:स्पृह करण्या करीता पुरेशी आहेत' (फतहुल बारी खंड. ११ पृ. १४१)

उदाहरणा दाखल कमकुवत प्रमाण असलेल्या कथना मध्ये जुमा (शुक्रवार) च्या दिवशी ऐशी वेळा दरुद पाठविण्याचा लाभ असा सांगितला गेला आहे की ऐशी वर्षांचे गुन्हे माफ केले जातील (अस्सिलसिलतुल अहादीस जईफ़ह अलबानी खं. १पृ. २५१) अशा कथनांचा संशोधन न करणारे विन्दान मोठया नि:संकोच पणे उल्लेख करतात. ज्याचा परिणाम असा झाला की लोक या अमाप लाभांचा तर भरपूर इतमाम करू लागले, परंतु कित्येक अशा धार्मिक जबाबदाऱ्यांकडे पाठ फिरवू लागले. पारंपारिक नात्याने ते धार्मिक वृत्तीचे तर बनले, परंतु धर्माची परिपूर्ण आणि प्रमाणिक अनुसरणाची जाणीव त्यांच्या अंगी वाढू शकली नाही.

हे ही स्पष्ट व्हावे की दरुद एक प्रार्थना आहे आणि याचे धर्मात एक महत्वपूर्ण स्थान (महत्ता) आहे. परंतु विर्द (जप) करण्याबाबत आदेश दिला गेला आहे की फक्त अल्लाहच्या नावाचा करावा आणि प्रशंसा व गुण-गान ही त्याचेच करावे. एक लाख दरुद शरिफ च्या 'खत्म' (समाप्ती) साठी ज्या बैठकी आयोजित केल्या जातात. याचा रिवाज पैगंबरांच्या सहवासातील अनुयायी च्या काळात नव्हता आणि ना ही पद्धत कुरआन व पैगंबर आचरणाद्वारे सिद्ध आहे. दरुदे ताज आणि या प्रकारचे इतर दरुद तसेच त्यांचे अवादव्या लाभ हे सर्व नंतर च्या लोकांनी केलेली वाढ होय. सदाचारी मुसलमाना करीता तर तेच दरुद पुरेसे आहे ज्याची शिकवण पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी दिली आहे.

पैगंबर असाधारण आदरास पात्र आहेत म्हणून त्यांच्या नावा सोबत (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) चा इतमाम आवश्यक आहे. त्यांच्या सहवसतील अनुयायी त्यांच्या कडून हदीस वचने उल्लेखितांना قَالَ رَسُولُ اللهِ صلی اللہ علیہ وآلہ وسلم क़ाला रसूलल्लाही सल्लल्लाहु अलैहि वसल्लम (फर्माविले अल्लाहच्या रसूल ने, दरूद व सलाम असो त्यांच्या वर) असे म्हणत आणि हदीस च्या विद्वानांनी देखील याच पद्धतीचा अवलंब केला. संक्षिप्तपणे (स.) किंवा (सल.) असे लिहीणे योग्य नव्हे कारण हा कंजूसपणा आहे. लिहिणारा याचा उच्चार 'सल्लल्लाहु अलैहि वसल्लम' असा करत नाही आणि ना वाचणारा असे वाचतो दरूद व सलाम चा जेवढा अधिक पुनरोच्चार लिहिण्यात व वाचण्यात होईल तितका जास्त मोबदला मिळेल, तेवहा कंजूसपणे तेने वागण्यात काय अर्थ?

إِنَّ الَّذِينَ يُؤْذُونَ اللَّهَ وَرَسُولَهُ لَعَنَهُمُ اللَّهُ فِي الدُّنْيَا
وَالْآخِرَةِ وَأَعَدَّ لَهُمْ عَذَابًا مُّهِينًا ﴿٥٧﴾

५७. जे लोक अल्लाह व त्याच्या पैगंबरास दुःख त्रास देतात त्यांचा अल्लाह ने या जगात व मरणोत्तर जीवनात धिःकार केला आहे.[१२८] आणि त्यांच्या साठी अपमान जनक अजाब (ईश-शिक्षा) तयार करून ठेवली आहे.

وَالَّذِينَ يُؤْذُونَ الْمُؤْمِنِينَ وَالْمُؤْمِنَاتِ بِغَيْرِ مَا اكْتَسَبُوا فَقَدِ
احْتَمَلُوا بُهْتَانًا وَإِثْمًا مُّبِينًا ﴿٥٨﴾

५८. आणि जे लोक ईमान बाळगणाऱ्या पुरुष व स्त्रीयांना अशा गोष्टींबद्दल दुःख-त्रास देतात ज्या त्यांनी केल्या नाहीत, ते आपल्या शिरावर एक अरोप आणि उघड अपराधाचे ओझे लादतात.

يَا أَيُّهَا النَّبِيُّ قُل لِّأَزْوَاجِكَ وَبَنَاتِكَ وَنِسَاءِ الْمُؤْمِنِينَ
يُدْنِينَ عَلَيْهِنَّ مِن جَلَابِيبِهِنَّ ذَٰلِكَ أَدْنَىٰ أَن يُعْرَفْنَ
فَلَا يُؤْذَيْنَ وَكَانَ اللَّهُ غَفُورًا رَّحِيمًا ﴿٥٩﴾

५९. हे पैगंबर ! आपल्या पत्न्या, आपल्या मुली आणि ईमान बाळगणाऱ्यांच्या स्त्रीयांना सांगा की आपल्या अंगावर चादरी टाकून घेत जा. हे या दृष्टीने अधिक योग्य होय की त्यांची ओळख व्हावी आणि सताविल्या न जाव्यात [१३०] आणि अल्लाह माफ करणारा, दया करणारा आहे.[१३१]

لَّئِن لَّمْ يَنتَهِ الْمُنَافِقُونَ وَالَّذِينَ فِي قُلُوبِهِم مَّرَضٌ
وَالْمُرْجِفُونَ فِي الْمَدِينَةِ لَنُغْرِيَنَّكَ بِهِمْ ثُمَّ
لَا يُجَاوِرُونَكَ فِيهَا إِلَّا قَلِيلًا ﴿٦٠﴾

६०. दांभिक मुसलमान आणि ते लोक ज्यांच्या मनात रोग आहे.[१३२] आणि ते जे मदीनेत खोटया अफवा पसरवितात, जर परावृत्त झाले नाहीत तर आम्ही तुम्हाला त्यांच्या विरुद्ध उभे करु, मग ते या (शहरा) मध्ये तुमच्या सोबत अल्प काळच राहू शकतील.[१३३]

مَّلْعُونِينَ أَيْنَمَا ثُقِفُوا أُخِذُوا وَقُتِّلُوا تَقْتِيلًا ﴿٦١﴾

६१. त्यांची निर्भत्सना होईल.[१३४] आणि जिथे जिथे आढळून येतील, पकडले जातील आणि वाईट रित्या ठार केले जातील.[१३५]

سُنَّةَ اللَّهِ فِي الَّذِينَ خَلَوْا مِن قَبْلُ
وَلَن تَجِدَ لِسُنَّةِ اللَّهِ تَبْدِيلًا ﴿٦٢﴾

६२. हा अल्लाहचा विधि नियम राहीला आहे अशा लोकांबाबत जे पूर्वी होऊन गेले आणि तुम्हाला अल्लाहच्या विधिनियमात काही ही बदल आढळणार नाही.[१३६]

१२८. वरील आयतीत ईमान बाळगणाऱ्यांना पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्यावर अल्लाहची कृपा पाठविण्याचा आदेश दिला गेला होता. या आयतीत त्या लोकांना अपमान जनक परिणती पासून खबरदार केले जात आहे जे पैगंबराना दु:ख यातना देण्यास टपून बसतात. तात्पर्य जे लोक पैगंबरांवर रहमत पाठवितात ते स्वत:देखील अल्लाहच्या कृपेस पात्र ठरतात. याऊलट जे लोक पैगंबरास दु:ख यातना पोहचवितात ते निर्भत्सनेस पात्र ठरतात अर्थात हा संकेत प्रामुख्याने त्या मुनाफिक (दांभिक) लोकांकडे आहे जे पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या विवाह संख्या व त्यांच्या कौटुंबिक जीवना (Family-Life)वर आक्षेप घेतात आणि या अनुषंगाने अल्लाहच्या आदेशांची ही टिंगल उडवितात.

अल्लाहला दु:ख यातना देण्याचा अर्थ असा की त्याच्या विषयी अशा गोष्टी बोलल्या जाव्यात ज्या त्याच्या क्रोधास आमंत्रण देणाऱ्या ठराव्यात. उदाहरणार्थ त्याच्य करीता संतती मोजणे, त्याचे सहभागी ठरविणे, त्याच्या ठायी दोष व्यंग दाखविणे, त्याच्या निर्मिती वरुन त्याचा कयास बांधणे, त्याच्या श्रेष्ठत्वाहून कमी दर्जाच्या संबंध त्याच्याशी जोडणे, त्याच्या पैगंबरांची, त्याच्या ग्रंथांची व त्याच्या आदेशाची थट्टा करणे व त्याच्या प्रतिष्ठेस गाल बोट लागेल अशी वचने उद्‌गारणे इत्यादी.

आणि पैगंबरास दु:ख त्रास देण्याचा अर्थ असा की पैगंबराच्या प्रतिष्ठेस गालबोट लावणे,त्यांची अवहेलना करणे त्यांच्या आचरणाची भट्टा उडविणे, त्यांच्या व्यक्तिगत कौटुंबिक जीवनावर आक्षेप घेणे व त्यांच्या पत्नींचा आदर न करणे, त्यांच्याशी खोटया गोष्टींचा संबंध जोडणे आणि त्यांच्या फैसल्यांना अन्याय कारक समजणे व त्यांच्याशी लढणे इत्यादि.

अल्लाह व त्याच्या पैगंबराची अवहेलना करणाऱ्यांकरीता केवळ आखिरत मध्येच निर्भत्सना नाही तर या जगात ही त्यांच्या वर अल्लाह तर्फे निर्भत्सनेची आग पारवडली जाते ते अल्लाहच्या कृपेपासून अशा प्रकारे दूर फेकले जातात की त्यांच्या वाटयाला फक्त अपमान व अवहेलनाच येते. खरी प्रतिष्ठा, खरा सन्मान त्यांना कधी ही लाभत नाही.

१२९. संकेत आहे दांभिकांच्या त्या खोडसाळ गोष्टी कडे ज्या ते ईमान धारक स्त्री-पुरुषांना बदनाम करण्या करीता करीत असत. अशासाठी की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या प्रशिक्षणाने जो उत्कृष्ट समूह अस्तित्वात आला होता त्यास लोकांच्या नजरेत अवमानित केले जावे व इस्लामच्या प्रसारात अडथळे निर्माण व्हावेत.

आयतीत या गोष्टी बद्दल सक्त ताकीद आहे की ईमान बाळगणाऱ्या कोणत्याही पुरुष अथवा स्त्री चे मन दुखविले जावे व न केलेल्या अपराधाचे खापर त्यांच्या शिरावर फोडले जावे. निरापराधास अपराधी ठवाविणे, त्याच्या वर आळ घेणे होय. आणि हा काही साधारण गुन्हा नव्हे किंबहुना फार मोठा गुन्हा आहे. विशेषत: अशा गोष्टी बोलणे ज्या शील अब्रू वर शितोडे उडविणाऱ्या असाव्यात.

आजच्या मुस्लिम समाजात, असे वाटते की या अपराधाची पुसटशी जाणीव ही शिल्लक राहीलेली नाही. धार्मिक वृत्तीच्या मुसलमानांवर आक्षेप करणे जणू सर्व सामान्य लोकांचा आदर्श व्यवसाय बनला आहे. मुसलमानांचे निरनिराळे समूह एकमेकां विरूद्ध खोटे आरोप प्रत्यारोप लावत असतात आणि पत्रकारीता मने दु:खविण्याची यथेच्छ उपाय योजना करते. असो जो मनुष्य अल्लाह चे भय अंगिकारु इच्छित असेल त्याने फार सावध राहीले पाहीजे आणि आपल्या मुसलमान भावा विरुध्द अशी गोष्ट बोलावयास नको जी त्याने मूळात केलेली नसावी हदीस वचनातील उल्लेखानुसार.

اَلْمُسْلِمُ مَنْ سَلِمَ الْمُسْلِمُوْنَ مِنْ لِسَانِهٖ وَيَدِهٖ۔

(رياض الصالحين ص ۵۹۹ بروايت بخاری و مسلم)

‘‘मुसलमान तो होय ज्याच्या जीभेने व हाताने इतर मुसलमान सुरक्षित रहावेत.’’

(रियाजुस्सालेहीन पृ. ५९९. बुखारी व मुस्लिम च्या कथनांद्वारे)

१३०. या आयतीत सर्व सामान्य मुस्लीम स्त्रीयांना ताकीद दिली गेली आहे की जेव्हा त्या घराबाहेर पडतील, जसे नंतरच्या वाक्या वरुन स्पष्ट आहे, तेव्हा आपल्या अंगावर त्यांनी चादर टाकून घ्यावी आणि या मागील हेतु देखील स्पष्ट फर्माविला गेला आहे की अशाने त्यांची ओळख पटू शकेल म्हणजे हे जाहीर होईल की त्या सुसभ्य, लज्जाशील स्त्रीया होत. अशाने असामाजिक तत्वे त्यांच्याकडून चुकीची अपेक्षा करु शकणार नाहीत आणि ना त्यांना छेडू शकतील. तात्पर्य लज्जेचे हे आवरण त्यांना या दृष्टीने अधिक सुरक्षित ठेवील.

मूळ शब्द ‘‘जिल्बाब’’ याचा अर्थ ثوب واسع वस्तिर्ण वस्त्र असा आहे. (लिसानुल अरब खंड-१ पृ. २७२) आणि हा शब्द अशा चादरी करीता वापरला जातो जो दुपट्टयाहून जास्त मोठी असते. जिला स्त्रीया आपले शरीर व आपला पोषाख झाकून घेण्याकरीता आंगावर घेतात मिन या ठिकाणी अशा प्रकारे वर्णिला गेला आहे ज्या प्रकारे उम्मे अतीच्या

हदीस वचनात वर्णिला गेला आहे.

'उम्मे अतीय्या म्हणतात जेव्हा पैगंबरांनी स्त्रीयांना ईद च्या नमाज मध्ये भाग घेण्यास प्रोत्साहन दिले, तेव्हा मी म्हटले, हे अल्लाहचे पैगंबर ! आमच्या पैकी एखाद्या स्त्री जवळ चादर नसेल, तर तिने काय करावे? पैगंबरानी फर्माविले, لِتُلبِسهَا اُختُهَا مِن جِلبَابِهَا ''तिच्या बहिणीने आपली चादर तिच्या अंगावर टाकावी.'' (फतहुल कदीर खंड-४ पृ.३०४)

या हदीस वचनात ही مِن جِلبَابِهَا ''मिनजिल्बाबिहा'' हा शब्द प्रयोग केला गेला आहे. ज्याचा अर्थ आपल्या चादरीचा एक भाग किंवा पदर घालण्याचा नव्हे तर आपली चादर अंगावर घालणे असा आहे. आणि يُدنِينَ عَلَيهِنَّ युदनीन चा अर्थ आपल्या अंगावर टाकून घेणे असा आहे. कुरआनात दुसऱ्या एका ठिकाणी وَدَانِيَةً عَلَيهِم ظِلَالُهَا ''तिची सावली यांच्यावर असेल असा उल्लेख आहे.'' (अलइन्सान:१४)

अर्थात मुसलमान स्त्रीयांनी जेव्हा घराबाहेर पडावे तेव्हा आपल्या अंगावर असे एखादे वस्त्र टाकून बाहेर पडावे जे दुपटयाहून मोठे असावे व जे त्यांच्या शरीरास व पोषाखास झाकणारे असावे. मग हे वस्त्र चादरी च्या स्वरुपात असो किंवा बुरख्याच्या स्वरुपात. हेतु शरीराच्या उघडया भागास सौंदर्य व पोषाखाचा रेखीवपणे लपविणे हा होय. अशासाठी की स्त्रीने आपल्या आकर्षणा सह अनोळखी पुरुषांसमोर जाऊ नये किंबहुना अशा इतमामाने जावे जो लज्जेच्या निकडी पूर्ण करतो. व ज्यामुळे ती सभ्य स्त्री असल्याचे दिसून यावे पडद्या संदर्भात हा एक संक्षिप्त आदेश आहे जो आयतीत दिला गेला यात हे स्पष्टीकरण दिले गेले नाही की स्त्री ना आपला चेहरा उघडा राखू शकते आणि ना हात. कारण कुरआन जिथे उपद्रवाच्या निवारणा ची उपाय योजना करतो तिथे आक्षेपाचे हि निवारण करतो या साठी की स्त्रीयांना असामान्य अडचणींना तोंड द्यावयाची वेळ येऊ नये. यास्तव सूरह नूर मध्ये, जी या सूरह नंतर अवतरली, स्त्रीयांना जिथे आपले सौंदर्य लपविण्याचा आदेश दिला गेला आहे तिथे اِلَّا مَا ظَهَرَ مِنهَا ''याच्या खेरीज जे जाहीर व्हावे'' चा अपवाद ही दिला गेला आहे (पहा-सूरह नूर आयत- ३१ आणि टीप-४२) यास्तव चादरी च्या आदेशात ही ही सवड विचाराधीन राहील. विशेषत: जेव्हा हा आदेश संक्षिप्त पणे दिला गेला आहे. जर चेहरा आणि हातांना अत्यावश्यक पणे लपवेण्याचा हेतु असता तर आयतीत या विषयी स्पष्टीकरण दिले गेले असते. या स्पष्टीकरणाचा अभावा असतांना चेहरा आणि हातांना लपविण्या आणि चादरीला अशा प्रकारे डोक्या पासून पायापर्यंत लपेटून घेण्या बद्दल चा आग्रह की पोषाखा चा कोणताही हिस्सा किंचित ही प्रखरता निर्माण करण्या खेरीज दुसरे काही नाही. ही प्रखरता जर भूतकाळात निर्माण केली गेली होती, तर तत्कालीन परिस्थितीत कारक ठरली असेल, परंतु आजच्या परिस्थितीत, जेव्हा स्त्रीयांना घराबाहेर पडावे लागते, पडद्या च्या आदेशात तीव्रता निर्माण केल्याने त्यांच्या करीता मोठा प्रश्न, आणि मोठया अडचणी उद्‌भवू शकतात आणि याचा परिणाम हा ही होऊ शकतो की स्त्रीयांनी पडदा (गोषा) अमलात न आणण्या जोगा समजून अगदी सोडून द्यावे. यास्तव समतोल मार्ग विचाराधिन राखणे आवश्यक आहे.

१३१. संकेत या गोष्टीकडे आहे की पडद्याच्या आदेशाचे पालन जर सद्हेतुने योग्यरित्या केले गेले तर या बाबतीत अजाणता जी भूलचूक झाली असेल, अल्लाह ती दृष्टीआड करील, माफ करील आणि कृपा करील.

१३२. अभिप्रेत वासना-विकार अर्थात विषयाक्त.

१३३. यावरुन दिसून येते की या प्रसंगी दांभिक मुस्लिम आणि विघ्न संतोषी तत्वे मदीना शहराच्या वातावरणास कलुषित करण्यात, युद्धाच्या खोटया बातम्या उठवून लोकांमध्ये भय दहशत निर्माण करण्यात आणि मुसलमान सभ्य स्त्रयांना घेडण्यात व त्यांची अपकिर्ती करण्या करीता त्यांच्यावर खोटे आळ रचण्यात आणि खोटया अफवा पसरविण्यात फार निर्ढावले होते. एकी कडे मुस्लिम स्त्रीयाना यांच्या उपद्रयवापासून सुरक्षित राखण्या करीता घरा बाहेरच्या पडद्याचा आदेश दिला गेला आणि दुसरी कडे या दांभिक मुसलमान व विघ्न संतोषीना सावध केले गेले की जर ते असे करण्या पासून थांबले नाहीत तर सर्वश्रेष्ठ अल्लाह आपल्या पैगंबरास आदेश देईल की त्याने याचा पूर्णत: बिमोड करावा आणि इस्लामी समाजास या दुराचाऱ्यां पासून स्वच्छ शुद्ध करावे.

स्पष्ट असावे की पडद्याच्या आदेशाच्या या हेतुचा जो तत्कालीन परिस्थिती लक्षात घेता निवेदिला गेला आहे, याचा हा अर्थ नव्हे कि हा आदेश त्या परिस्थिती करीता खास आहे. कुरआनाचे बहुतेक आदेश विशिष्ट परिस्थितीत च अवतरले आहेत, तथापि ते चिरस्थायी स्वरुप बाळगतात आणि एखाद्या आदेशाचा पूर्ण हेतु तोच असावा किंबहुना त्याचे अन्य इतर हेतु देखील असू शकतात, जेव्हा एका हेतुचे निवेदन करणे पर्याप्त मानले गेले असावे.

१३४. म्हणजे ते अल्लाहच्या कृपेपासून दूर फेकले जातील, आणि ज्यांना अल्लाह आपल्या कृपेपासून वंचित ठेवतो ते अपमानित झाल्या खेरीज राहात नाही.

१३५. यास्तव सूरह तौबा (हि. स. ९) मध्ये दांभिक मुसलमानांशी सक्तीचे वर्तन करण्याचा आदेश दिला गेला

يَا اَيُّهَا النَّبِيُّ جَاهِدِ الكُفَّارَ وَالمُنَافِقِينَ وَاغلُظ عَلَيهِم ـ (توبہ :٧٣)

"हे पैगंबर ! काफीरांशी आणि दांभिकाशी जेहाद करा आणि त्यांच्याशी सक्तीने वागा."

(सूरह तौबा-७३)

आणि पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी त्यांच्या (दांभिकांच्या) मस्जिदलाही जी त्यांनी मुसलमानां मध्ये फूट पाडण्या करीता बनविली होती, जाळायचा आदेश दिला. हे सर्व विवेचन सूरह तौबाच्या भाष्यात दिले गेले आहे.

१३६. म्हणजे या पूर्वी ज्या जन समुहां मध्ये पैगंबर पाठविले गेले होते त्यांत जिथे काफीराचा बिमोड केला गेला, तिथे मुनाफिक व दुराचाऱ्यांपासून ही समाजास स्वच्छ शुध्द केले गेले आणि ईमान धारक सदाचारी लोकांवर आधारीत जो नव-समाज साकार झाला त्याला कायम ठेवले गेले आणि खिलाफतीच्या जबाबदाऱ्या त्याच्यावरच टाकल्या गेल्या. अशा प्रकारे सर्वश्रेष्ठ अल्लाह जमीनीवरुन उत्पात मिटविल्यानंतर मनुष्य समाजाच्या व्यवस्थेस पुन्हा नव्याने प्रस्थापित करीत राहीला आहे. मग नवल नव्हे की अल्लाहचा हा नियम या पैगंबराच्या हक्कात ही पूर्ण व्हावा आणि ही वस्तुस्थिती आहे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या निधना पूर्वी मदीनेचे वातावरण समस्त दुराचारी तत्वां पासून स्वच्छ शुद्ध झाले होते.

६३. लोक तुम्हाला कियामतीच्या वेळे बाबत विचारतात, सांगा, याचे ज्ञान तर अल्लाह जवळच आहे. आणि तुम्हाला काय ठाऊक, कदाचित ती वेळ जवळ येऊन ठेपली असेल.[१३७]

يَسْـَٔلُكَ النَّاسُ عَنِ السَّاعَةِ ۖ قُلْ إِنَّمَا عِلْمُهَا عِندَ اللَّهِ ۚ وَمَا
يُدْرِيكَ لَعَلَّ السَّاعَةَ تَكُونُ قَرِيبًا ﴿٦٣﴾

६४. नि:संशय अल्लाहने काफिरांचा धि:क्कार केला आहे आणि त्यांच्या करीता धगधगणारी आग तयार करून ठेवली आहे.[१३८]

إِنَّ اللَّهَ لَعَنَ الْكَافِرِينَ وَأَعَدَّ لَهُمْ سَعِيرًا ﴿٦٤﴾

६५. ज्यात ते सदैव राहतील. त्यांना ना कोणी मित्र लाभेल आणि ना मदतनीस

خَالِدِينَ فِيهَا أَبَدًا ۖ لَّا يَجِدُونَ وَلِيًّا وَلَا نَصِيرًا ﴿٦٥﴾

६६. ज्या दिवशी त्यांचे चेहरे आगीत उलट पालट केले जातील त्या वेळी ते म्हणतील आम्ही अल्लाहचे आज्ञापालन केले असते आणि पैगंबराचे आज्ञा पालन केले असते तर बरे झाले असते.[१३९]

يَوْمَ تُقَلَّبُ وُجُوهُهُمْ فِي النَّارِ يَقُولُونَ يَا لَيْتَنَا أَطَعْنَا
اللَّهَ وَأَطَعْنَا الرَّسُولَا ﴿٦٦﴾

६७. आणि म्हणतील, हे आमच्या पालन कर्त्या ! आम्ही आपल्या प्रमुखांचे आणि थोरा मोठयांचे आज्ञापालन केले आणि त्यांनी आम्हाला मार्गा पासून मार्गभ्रष्ट केले.[१४०]

وَقَالُوا رَبَّنَا إِنَّا أَطَعْنَا سَادَتَنَا وَكُبَرَاءَنَا فَأَضَلُّونَا السَّبِيلَا ﴿٦٧﴾

६८. हे आमच्या पालन कर्त्या ! त्यांना दुहेरी अजाब (शिक्षायातना) दे आणि त्यांची फार मोठी निर्भत्सना कर. [१४१]

رَبَّنَا آتِهِمْ ضِعْفَيْنِ مِنَ الْعَذَابِ وَالْعَنْهُمْ لَعْنًا كَبِيرًا ﴿٦٨﴾

६९. हे ईमान बाळगणाऱ्या लोकांनो ! त्या लोकां सारखे होऊ नका ज्यांनी मूसा ला क्लेश-यातना दिली. परंतु अल्लाहने त्याला त्यांच्या यातना-दायक गोष्टींपासून मुक्त केले आणि तो अल्लाहच्या जवळ प्रतिष्ठीत होता.[१४२]

يَا أَيُّهَا الَّذِينَ آمَنُوا لَا تَكُونُوا كَالَّذِينَ آذَوْا مُوسَىٰ فَبَرَّأَهُ
اللَّهُ مِمَّا قَالُوا ۚ وَكَانَ عِندَ اللَّهِ وَجِيهًا ﴿٦٩﴾

७०. हे ईमान बाळगणाऱ्या लोकांनो ! अल्लाहचे भय बाळगा आणि योग्य गोष्ट बोला.[१४३]

يَا أَيُّهَا الَّذِينَ آمَنُوا اتَّقُوا اللَّهَ وَقُولُوا قَوْلًا سَدِيدًا ﴿٧٠﴾

१३७. कियामत केव्हा येईल? हा प्रश्न केवळ मक्का येथील लोकच वारंवार विचारत नव्हते, तर मदीनेत ही या प्रश्नाची पुनरावृत्ति होत राहीली. कुरआनने या प्रश्नाचे अनेकदा उत्तर दिले असले तरी लोक पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना वारंवार त्रागा करीत आणि यात त्यांचा हेतु हा होता की कियामत संबंधी संशय निर्माण केला जावा. मक्केत काफीर लोक या संशयास निर्माण करीत होते, तर मदीनेत दांभिक मुसलमान हेच काम करत होते.

जर अल्लाहच्या बुध्दिकौशल्यास ही निकड जाणवली की कियामतीची वेळ कोणावर ही जाहीर केली जाऊ नये तर याचा अर्थ असा नव्हे की कियामत येणारच नाही. मृत्युची वेळ कोणाला ठाऊक नसते, तर काय या आधारावर हे म्हणणे उचित ठरेल की मृत्यु येणारच नाही, जेव्हा मृत्यु चे येणे अगदी निश्चित आहे. मग वेळ माहीत का नसेना तथापि कियामत जवळ येऊन ठेपली आहे आणि वस्तुस्थिती ही हीच होय कारण हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) अंतिम पैगंबर होत! त्यांच्या द्वारे धर्माची परिपूर्णता झाली आणि अल्लाहचे प्रमाण ही लोकांवर प्रस्थापित झाले यास्तव हे जग आता आपल्या अंतिम अवस्थेतूनच जात आहे. हदीस वचनातील उल्लेखानुसार पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी असे फर्माविले की

بُعِثْتُ اَنَا وَ السَّاعَةُ كَهَاتَيْنِ وَيَقْرِنُ بَيْنَ اُصْبُعَيْهِ السَّبَابَةِ وَ الْوُسْطٰى۔ (مشکوٰۃ کتاب الصلوٰۃ براویۃ مسلم)

''मला व कियामत ला अशा प्रकारे सोबतीने पाठविले गेले आहे. त्यानी आपली दोन बोटे म्हणजे अंगठया जवळचे बोट व मधले बोट मिळवून (संकेत) फर्माविला.'' (मिश्कात किताबुस्सलवात)

अधिक स्पष्टीकरणा साठी पहा सूरह अअराफ टीप २८६ ते २८९.

१३८. कियामती साठी घाई करणाऱ्यां करीता हा इशारा आहे की कियामत तर आपल्या निर्धारीत वेळेवर येईलच. राहीलेत इन्कार करणारे, तर त्यांच्या साठी अल्लाहच्या कृपेपासून वंचितता आहे आणि ज्या दिवशी कियामत प्रस्थापित होईल त्यांची दहकलेल्या आगी (जहन्नम) शी गाठ पडेल कारण कियामतीचा इन्कार केल्या नंतर मनुष्य आपल्या अंगी ती गुण वैशिष्टये निर्माण करूच शकत नाही की ज्यामुळे तो आखिरत मध्ये मोबदल्यास पात्र ठरावा, किंबहुना तो अशी दुष्कृत्ये करतो की ज्यामुळे आखिरत मध्ये शिक्षा-यातनालाच पात्र ठरतो.

१३९. कियामतीचा इन्कार करणारे या जगात तर अल्लाहच्या आज्ञापालन पासून तोंड फिरवतात आणि त्याच्या पैगंबराची आज्ञापालन पासून ही, परंतु कियामतीच्या दिवशी जेव्हा जहन्नमशी गाठ पडेल तेव्हा त्यांना आपल्या चुकीची जाणीव होईल मग पश्चातापाने म्हणू लागतील की आम्ही अल्लाहचे व त्याच्या पैगंबराचे आज्ञापालन केले असते तर बरे झाले अतते.

१४०. आपल्या प्रमुखांशी अभिप्रेत नेता आणि सत्ताधिकार बाळगणारे लोक होत. आणि थोरामोठयांशी अभिप्रेत धार्मिक नेतृत्व करणारे लोक होत. इन्कार करणाऱ्यांना जहन्नमच्या धगधगत्या आगीत पोहोचल्यावर ही जाणीव होईल की आम्ही जगात अल्लाह ऐवजी बंडखोर नेत्यां चे, प्रमुखांचे म्हणणे मानले व पैगंबरा ऐवजी मार्गभ्रष्ट करणाऱ्या धर्म-प्रमुखांचे अनुसरण केले.

१४१. म्हणजे आज तर हे इन्कार करणारे आपल्या नेत्यांवर स्तुति-सुमनांचा वर्षाव करीत आहेत आणि आपल्या धर्मप्रमुखांवर श्रध्दा व्यक्त करीत आहेत परंतु जहन्नम मध्ये पोहचल्या नंतर हे त्यांचा धिक्कार करतील आणि आपल्या या नेत्यांच्या व धर्म-प्रमुखांच्या शिक्षा यातनेत व निर्भत्सनेत आणखी वाढ व्हावी अशी इच्छा बाळगतील.

१४२. हा पुन्हा ताकीदी आदेश आहे की आपल्या पैगंबरास अशा प्रकारे यातना देऊ नका, ज्या प्रकारे बनी इस्राईल ने हजरत मूसा यांना दु:ख -यातना दिली होती. हजरत मूसा यांची अवज्ञा करीत बनी इस्राईल त्यांना जी कटू उत्तरे देत राहीले याचा उल्लेख कुरआनात बऱ्याच ठिकाणी केला गेला आहे. उदाहरण म्हणून त्यांचे हे उत्तर की पवित्र भूमीत तुम्ही आणि तुमचा ईश्वर दोघही जा व लढा आम्ही तर येथेच बसून राहू. अशा प्रकारच्या क्लेश दायक गोष्ट कडे सूरह सफची आयत क्रं.५ इशारा करते परंतु इथे ज्या क्लेश-यातनेचा उल्लेख केला गेला आहे ती त्याच्या नितीमत्तेस व चारित्र्यास चिडवणारी होती अर्थात त्याच्यावर दोषा आरोप व आळ. आणि एखाद्या पैगंबरावर जेव्हा एखादा घाणेरडा आरोप ठेवला जातो तेव्हा सर्वश्रेष्ठ अल्लाह त्या पैगंबराच्या जीवनातच त्या आरोपातून त्याची मुक्ता करतो, या साठी की पैगंबराचे व्यक्तिमत्व लोकांच्या नजरेत कलंकित न व्हावे. या संदर्भात हजरत युसूफ यांचे उदाहरण फार स्पष्ट आहे, ज्यांची आरोपातून अल्लाहने अशा प्रकारे सुटका केली की नंतर कोणत्याही शंका-संशयाला जागाच उरली नाही. आयतीत हे ही सांगितले गेले आहे की अल्लाहने हजरत मूसा यांना आरोपातून मूक्त केले होते व ते अल्लाहच्या नजरेत प्रतिष्ठीत होते. या दोन्हीही गोष्टी या बाबीस प्रमाणित करतात की आरोप अशा स्वरुपाचे होते, ज्यामुळे हजरत मूसा यांच्या प्रतिष्ठेला धक्का पोहचत होता कुरआनने या बाबत निश्चित असे काही सांगितले नाही की नेमके काय घडले होते

कारण उल्लेखाच्या पैलूने अशा घटना निवेदन न करणेच लाभदायक ठरते. यास्तव आम्हाला अधिक खोलात जाण्याची गरज नाही.

भाष्यकार सर्व सामान्यत: या आयतीचे भाष्य करतांना एका हदीस वचनाचा उल्लेख करतात ज्याचा खुलासा असा की हजरत अबु हुरैरा, पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) द्वारे उल्लेख करतात की त्यांनी फर्माविले, हजरत मूसा मोठे लज्जाशील व अंग झाकून ठेवणारे होते म्हणून त्यांच्या शरीराचा कोणताही भाग उघड होत नसे परंतु बनी इस्राईल ने या गोष्टीचा असा निष्कर्ष काढला की त्यांना एखादा गुप्तरोग किंवा व्यंग आहे (एका पैगंबरा चा इतमाम लक्षात घेता त्या व्यंगा चा उल्लेख करणे आम्हाला योग्य वाटत नाही, जो कथनात उल्लेखिला गेला आहे) अल्लाने त्यांना या व्यंगापासून मुक्त करु इच्छिले म्हणून असे झाले की एक दिवस जेव्हा मूसा एकटे होते, त्यांनी आपली वस्त्रे उतरवून दगडावर ठेवली आणि स्नान करु लागले. जेव्हा स्नान आटोपले तेव्हा कपडे घेण्याकरीता पुढे गेले परंतु तो दगड त्यांची वस्त्रे घेऊन धावू लागला. हजरत मूसा त्या दगडाचा पाठलाग करीत बनी इस्राईल च्या जमावात जाऊन पोहचले. तिथे त्या लोकांनी यांना नग्नावस्थेत पाहीले आणि त्यांना कळून चुकले की मूसा यांच्या शरीर-रचनेत कसलेही व्यंग नाही. अशा प्रकारे अल्लाहने त्यांना या गोष्टी पासून मुक्त केले, जिचा संबंध लोक त्यांच्याशी जोडत होते, मग दगड धावायचा थांबला आणि मूसा यानी आपली वस्त्रे अंगावर घातली आणि त्या दगडावर आपल्या काठीने प्रहार केले ज्याच्या खुणा त्या दगडावर उमटल्या. आयत 'त्या लोकांसारखे होऊ नका ज्यानी मूसाला दु:ख यातना दिली------ ' चा संकेत याच घटनेकडे आहे. (बुखारी किताब अहादीसल अंबिया)

या हदीस वचनाचा उल्लेख बुखारीनेही केला आहे व मुस्लिमने ही. बुखारी च्या एका कथनात असे देखील आहे की पैगंबरानी फर्माविले, बनी इस्राईल नग्न होऊन स्नान करीत आणि एक मेकांच्या अंगाकडे पाहत असत परंतु हजरत मूसा एकांतात आंघोळ करीत (बुखारी किताबुल गुस्ल) परंतु सदर रिवायत आपले सनद व मजकूर दोन्हींच्या दृष्टीने प्रमाण ठरण्या योग्य नाही. अब्दुल वहाब नज्जार यांनी क़ससुल अंबिया मध्ये जो अरबी भाषेत एक संशोधनात्मकग्रंथ आहे, या कथनावर अंकूश ठेवला आहे, ज्याचा खुलासा असा

(१) हा कसा चमत्कार होय जो एका पैगंबराला निर्वस्त्र करतो जर हजरत मूसा यांच्यात एखादे शारिरीक व्यंग होते तर ते अल्लाह जवळ त्यांच्या प्रतिष्ठीत होण्यात का म्हणून बाधक ठरू शकले असते !

(२) जर हजरत मूसा यांच्यावर शारिरीक व्यंगाचा आरोप ठेवला गेला होता तर याने ते अल्लाहचे पैगंबर असण्याचा नकार कशा प्रकारे झाला होता, जेव्हा सूरह सफ मध्ये हजरत मूसा यांचे हे कथन उल्लिखित आहे 'हे माझ्या जनसमूहाच्या लोकांनो मला का म्हणून त्रास देता, जेव्हा तुम्ही हे जाणता की मला तुमच्या कडे अल्लाहचा पैगंबर या नात्याने पाठविले गेले आहे' यास्तव दु:ख यातना अपरिहार्यत: याहून अन्य एखाद्या मोठया गोष्टीची राहीली असेल आणि कुरआनात यातना हा शब्द एखाद्या मोठया गोष्टी साठी वापरला गेला आहे.

(३) उल्लिखित हदीस वचनाच्या सनदी मध्ये एक कथन कर्ता औफ विषयी 'तहजीबुत्तहज़ीब' या ग्रंथात उल्लेख आहे की तो शिया, राफ्जी आणि सैतान होता.

(४) मी त्या हदीस वचनास मान्य करतो जे प्रमाणिक असावे ज्याच्या कथन कर्त्यांमध्ये कोणताही दोष नसावा आणि ज्यावर माझ्या मनाला समाधान लाभत असावे. राहीले ते हदीस वचन ज्याचा एखादा कथन कर्ता दोषी असावा मग तो अल्पसा का असेना, त्यास माझे मन स्विकार करीत नाही, मग त्या हदीस वचनास कितीही जणांनी विश्वासनी मानलेले असावे कारण मी जिरह ला तअदील वर अग्रक्रम देतो, विशेषत: अशा स्थितीत जेव्हा कथन कर्ता बिदअती (धर्मात नव्या गोष्टी निर्माण करणारा) असावा मग तो आपल्या बिदअत कडे आमंत्रण देत असो किंवा नसो, आणि या स्थितीत तर अधिकच जास्त जेव्हा कथनकर्ता शिया असावा.

(५) हदीस वचनात उल्लेख आहे की हसन (बसरी) अबु हुरैरा यांच्या द्वारे उल्लेखिले की, वस्तुत: हसन (बसरी) यांचे अबु हुरैरा कडून ऐकणे हदीस वचन ठरत नाही आणि ना खिलाए चे अबु हुरैरा कडून ऐकणे सिद्ध ठरते शरह बुखारी मध्ये हे स्पष्टीकरण दिले गेले आहे.

(६) राहीले बुखारी चे ते कथन जे अन्य एका सनद मार्गा ने निवेदिले गेले आहे तर यात एक कथन कर्ता अब्दुर्रज्जाक आहे ज्याच्या विषयी इब्ने मुईन म्हणतात की तो समर्थ नाही आणि त्यांचा संबंध शिया-संप्रदायांशी दाखविला गेला आहे. त्यांनी अहले बैत च्या श्रेष्ठत्वा दाखल अनेक हदीस वचने निवेदिली आहेत जी कोणत्याही सक्का (प्रामाणिक) कथनकर्त्याने निवेदिली नाही!

(७) धर्मशास्त्रवेत्ते म्हणतात की बनी इस्राईल च्या शरीअतीत नग्नावस्थेत स्नान करणे योग्य होते परंतु या दाव्याचा कसलाही पुरावा नाही. लोकांसमोर अंग ऊघडे करण्यास लज्जास्पद मानणे हे तर मानव स्वभावातच भिनलेले आहे.

(८) काय ईश चमत्कार नस्से कतई (स्पष्ट वर्णन शिवाय सिद्ध होतो.

(कससुल अंबिया, अब्दुल वहाब नज्जार.पृ.२८१ ते २९१)

अब्दुल वहाब नज्जार च्या या प्रमाणांमध्ये मोठे वजन आहे म्हणून उल्लिखित हदीस वचनास पैगंबर-वचन ठरविण्यास व हजरत मूसा यांच्या प्रतिष्ठेला गालबोट लावणाऱ्या गोष्टीचा संबंध जोडण्यास काही एक कारण नाही परंतु जे लोक हदीस संदर्भात संशोधन व धार्मिक डोळसपणाने चालण्याचा मार्गखुला राखु इच्छित नाही ते अशा प्रसंगी 'हदीस चा इन्कार' हा टोमणा मारतात परंतु आम्हाला आपल्या बचावाहून अधिक कुरआन आणि पैगंबरांच्या विशुध्द व्यक्तिमत्वाचा बचाव प्रिय असला पाहीजे. तसेच आम्ही हे सांगू इच्छितो की सनदींच्या दृष्टीने हे हदीस वचन असे मुळीच नाही की ज्यामुळे त्यास सहीहचा दर्जा दिला जावा. अब्दुर्रज्जाक विषयी मिजानुल एतेदाल (अस्माउर रिजालचा ग्रंथ जो इमाम जहबी नी लिहिला आहे) मध्ये हदीस ज्ञात्यांची परस्पर विरोधी मते माडली गेली आहेत. इमाम बुखारी म्हणतात की अब्दुर्रज्जाक आपल्या (हदीस च्या) ग्रंथातून जे निवेदन करतील ते अगदी खरे आहे आणि दार कुतनी म्हणतात की तो प्रामणिक आहे परंतु बार्धक्या मुळे हदीस वचनांचे कथन करण्यात चूक करतात.

नसाई म्हणतात की यांच्याद्वारे इन्कार केली जाणारी हदीस वचने उल्लिखित आहेत आणि इब्ने अदी म्हणतात की यांचा शिया मतप्रणाली कडे संबंध दर्शविला गेला आहे. मुहम्मद बिन उस्मान अश्शकफी अलबसरी यांचे निवेदन आहे की जेव्हा अब्बास बिन अब्दुल अजीम सनआ कडून अब्दुर्रज्जाक जवलून परत आले तेव्हा आम्हाला म्हणाले, अल्लाहची शपथ ज्याच्या खेरीज कोणी उपास्वय नाही अब्दुर्रज्जाक फार मोठा खोटारडा आहे. इब्ने अदी म्हणतात अब्दुर्रज्जाक ने पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या पासून हे हदीस वचन ही निवेदिले आहे की जेव्हा तुम्ही मआवियास माझ्या मिम्बर (आसना) वर पहाल तर त्यांची हत्या करा (पहा मिजानुल एतेदाल खंड २, पृ. ४०९ ते ४१४) अशा प्रकारे औफ विषयी हदीस ज्ञात्यांची मते भिन्न भिन्न आहेत (पहा मिजानुल एतेदाल खं. ३ पृ. ३०५) हदीस ज्ञात्यांच्या स्पष्टीकरणा नंतर ही जर इमाम बुखारी अब्दुर्रज्जाक च्या कथनास मान्य करण्या जोगे समजतात तर दुसऱ्यांनी ही त्यांच्याशी सहमत व्हावे हे आवश्यक नाही.

आयतीच्या भाष्य संदर्भात बुखारीच्या खालील हदीस वचनांना सादर केले जाऊ शकते.

'पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी धन संपदे ची वाटणी केली तेव्हा एक मनुष्य म्हणाला, या विभागणीत अल्लाहची मर्जी इच्छिली गेली नाही. अब्दुल्लाह बिन मसऊद म्हणतात मी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या सेवेत उपस्थित झाले व त्यांना या विषयी अवगत केले, पैगंबर क्रोधायमान झालो. मग फर्माविले हे अल्लाह मूसा वर कृपा कर त्यांना याहून ही जास्त दु:ख यातना दिली गेली, परंतु त्यानी सहन केले.' (बुखारी किताब अहादीसुल अंबिया)

पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या वर धन संपदेच्या विभागणीत अन्याय करण्याचा आरोप अशा स्वरुपाचा होता, ज्यामुळे त्यांचे नैतिक स्वरुप कलंकित होत होते, म्हणून अशा प्रसंगी पैगंबरांनी हजरत मूसा यांचा जो संदर्भ दिला तर याने ही हेच जाहीर होते की हजरत मूसा यांना अशी यातना दिली गेली होती जी त्यांच्या निष्कलैक चारित्र्यावर शितोडे उडविणारी होती.

१४३. योग्य गोष्ट बोलण्याच्या आशयात या गोष्टीचा समावेश आहे की एखाद्या विरुद्ध आरोप, तोहमती (Allegation) च्या गोष्टी बोलू नये आणि या गोष्टीचा ही की जी गोष्ट सुद्धा बोलली जावी पूरेपूर सत्यावर आधारीत असावी अर्ध-सत्य आणि उडवा उडवी च्या गोष्टी करणे की ज्यामुळे इतरांना धोका व्हावा, योग्य नव्हे ----------- युध्द प्रसंगी किंवा एखाद्या दुराचारा पासून बचाव व्हावा म्हणून अर्धे सत्य (Half-truth) बोलणे एक अपवादात्मक स्थिती आहे--------- ईमान बाळगणाऱ्याने जे काही बोलायचे ते अल्लाहचे भय बाळगून बोलले पाहीजे व चांगले बोलण्यास आपला स्वभाव आपले आचरण बनवले पाहीजे. जर एखाद्याशी वायदा करावा तर तो पूर्ण करण्याच्या इराद्याने करावा पोकळ वायदे ज्यांना पूर्ण करण्याची काळजी केली जात नाही. योग्य गोष्ट बोलण्याच्या विरूद्ध आहे.

७१. तो तुमचे आचरण दुरुस्त करील [१४४] आणि तुमच्या अपराधांना माफ करील. आणि जो अल्लाह व त्याच्या रसूल (पैगंबरा) चे आज्ञापालन करील, [१४५] त्याने फार मोठे यश प्राप्त केले.

يُّصْلِحْ لَكُمْ اَعْمَالَكُمْ وَيَغْفِرْ لَكُمْ ذُنُوْبَكُمْ ۗ وَمَنْ يُّطِعِ اللّٰهَ وَرَسُوْلَهٗ فَقَدْ فَازَ فَوْزًا عَظِيْمًا ﴿٧١﴾

७२. आम्ही (आपल्या) अमानतीस आकाशांच्या व जमीनीच्या आणि पर्वतांच्या समोर सादर केले, तेव्हा त्यांनी ती उचलण्यास नकार दर्शविला व तिच्या पासून भयभीत झाले, परंतु माणसाने तिला उचलून घेतले. निःसंशय तो मोठा अत्याचारी आणि अज्ञानी घडलेला आहे.[१४६]

اِنَّا عَرَضْنَا الْاَمَانَةَ عَلَى السَّمٰوٰتِ وَالْاَرْضِ وَالْجِبَالِ فَاَبَيْنَ اَنْ يَّحْمِلْنَهَا وَاَشْفَقْنَ مِنْهَا وَحَمَلَهَا الْاِنْسَانُ ۗ اِنَّهٗ كَانَ ظَلُوْمًا جَهُوْلًا ﴿٧٢﴾

७३. अशा साठी की अल्लाहने दांभिक पुरुष व दांभिक स्त्रीयांना आणि अनेकेश्वरवादी पुरुष व अनेकेश्वरवादी स्त्रीयांना शिक्षा द्यावी.[१४७] आणि ईमान बाळगणाऱ्या पुरुषांची व ईमान बाळगणाऱ्या स्त्रीयांची तौबा (क्षमा-याचना) कबूल करावी [१४८] अल्लाह माफ करणारा, दयावंत आहे.

لِّيُعَذِّبَ اللّٰهُ الْمُنٰفِقِيْنَ وَالْمُنٰفِقٰتِ وَالْمُشْرِكِيْنَ وَالْمُشْرِكٰتِ وَيَتُوْبَ اللّٰهُ عَلَى الْمُؤْمِنِيْنَ وَالْمُؤْمِنٰتِ ۗ وَكَانَ اللّٰهُ غَفُوْرًا رَّحِيْمًا ﴿٧٣﴾

१४४. या वरुन असे दिसते की जो मनुष्य आपल्या जीभेला योग्य वळण लावतो व बोलण्यात सच्चा पक्का असतो, त्याला आपले आचरण सुधारण्याची सुबुद्धि लाभते. तात्पर्य चांगले बोल बोलण्याचे फळ कर्मांचे दुरुस्त होणे होय. या उलट जो मनुष्य बेपवाई च्या गोष्टी करतो आणि आपल्या चूका ऐकण्यास तयार नसतो, तो स्वत:ला सुधारण्या पासून वंचित राखतो.

१४५. अल्लाहच्या आज्ञा पालना सोबतच पैगंबरांच्या आज्ञापालनाचाही आदेश दिला गेला आहे आणि पैगंबरांचे आज्ञापालन असे की त्यांच्या माध्यमाने जे ईश-आदेश अवतरले आहेत मग ते उपासने संबंधीचे असोत किंवा व्यवहाराशी संबंधित, व्यक्तिगत जीवनाशी संबंधित असोत किंवा सामूहिक जीवनाशी संबंधित असोत, त्यांचे यथायोग्य पालन केले जावे.

१४६. इथे अमानतीशी अभिप्रेत ते अधिकार होत जे अशासाठी दिले गेले आहेत की अल्लाहच्या आज्ञापालनासाठी वापरले जावे, परंतु ज्याअर्थी हे अधिकार देऊन माणसाला परीक्षा-स्थळी उभे केले गेले आहे म्हणून त्याला हे स्वातंत्र्य प्राप्त आहे की त्याने या अधिकारांचा वाटल्यास अल्लाहच्या आज्ञा पालना साठी वापर करावा.जो मनुष्य त्यांच्या (अल्लाहच्या) आज्ञा पालना साठी वापर करील तो या कसोटीत यशस्वी होईल आणि अमानतदारी चा पुरावा दिल्या बद्दल फार मोठया मोबदल्याचा म्हणजे निरंतर कल्याण व यशास पात्र ठरेल.

अमानतीचे हे ओझे एवढे भारदस्त होते की आकाश व जमीन आणि पर्वता सारखी भव्य ईश-निर्मिती हे उचलण्या पासून भ्याली परंतु मनुष्य स्वाभाविकत: हा भार उचलण्याचे पूर्ण योग्यता बाळगत होता म्हणून त्याने अल्लाहच्या या देणगीस चिरकालीन बक्षीसाच्या रुपात कबूल केले. यास्तव माणसाची पात्रता जगात अमानती अधिकार बाळगणाऱ्या ईश-निर्मिती ची आहे आणि स्वाभाविक रित्या त्याची ही जबाबदारी आहे की त्यांने या अधिकारांचा आपल्या पालन कर्त्याच्या मर्जीनुसार वापर करावा. परंतु माणूस या वस्तुस्थितीस विसरला आहे. यास्तव माणसाची फार मोठी संख्या स्वत:ला खुदमुखत्यार समजते आणि मनाला वाटेल तसा आपल्या अधिकारांचा वापर करुन अल्लाहच्या अमानतीत अपहरण करीत राहीली आहे. असे करुन ती स्वत: आपल्या वर मोठा अत्याचार तर करीतच आहे, पण त्याच बरोबर मोठया अज्ञानाचा पुरावा देखील देत आहे.

كَانَ ظَلُوْمًا جَهُولاً

'काना जलुमन जहूलाइया शब्दास काही भाष्यकारांनी 'तो मोठा जालीम व अज्ञानी होता' या अर्थाने घेतले आहे आणि मग वेगवेगण्या प्रकारचे स्पष्टीकरण दिले आहे. वास्तविक अरबी भाषेत 'कान' होता या अर्थाने येत नाही तर 'आहे' आणि 'घडला' या अर्थानी ही येतो. जसे كَانَ اللّٰهُ غَفُوْرًا رَّحِيْمًا अल्लाह माफ करणारी व रहीम आहे,आणि كَانَ الْاِنْسَانُ عَجُوْلًا मनुष्य घाई करणारा घडलेला आहे' म्हणून या ठिकाणी जो अर्थ चपखळ बसतो तो हाच की मनुष्य अमानतीचे हे ओझे उचलल्या नंतर जालीम (अत्याचारी) व अज्ञानी बनला आहे, अत्याचारी या दृष्टीने की अल्लाहच्या अमानतीत अपहरण (खयानत) करतो आणि अज्ञानी अशा प्रकारे की आपल्या जबाबदाऱ्यांची जाणीव करुन घेत नाही आणि परिणति पासून असावध होऊन स्वत:ला स्वैर आणि खुदमुखत्यार समजू लागतो. जगातल्या अधिकाश लोकांची हीच दशा आहे.

राहीला हा प्रश्न की आकाश व जमीन आणि पर्वत हे जड पदार्थ आहेत त्यांच्या समोर अमानत सादर करण्याचा व त्यांनी नकार दर्शविण्याचा काय अर्थ? तेव्हा आम्ही आपल्या संकुचित व मर्यादित ज्ञान-कक्षेत राहून याचा अर्थ निश्चित करता कामा नये आणि ना यास लाक्षणिक अर्थाने घ्यावे, किंबहुना यास अशा प्रकारे सत्यघटना समजले पाहीजे, ज्या प्रकारे, कुरआनात सादर केले गेले आहे. अल्लाह आपल्या कोणत्याही निर्मिती शी, मग ती निर्जिव जड पदार्थ का असेना, बोलू शकतो व ती त्याचे म्हणणे ऐकू शकते. कुरआन स्पष्टीकरण करतो की आकाश व जमीनीची प्रत्येक वस्तु अल्लाहची प्रशंसा व गुणगान करते परंतु माणसाला हे कळून येत नाही. आयती वरुन ही गोष्ट ही दिसून येते की जर आकाश व जमीन पर्वत या अमानतीस कबूल करण्या करीता तयार झाले असते तर त्यांना त्यांच्या योग्य अधिकार देऊन कसोटी ग्रस्त केले गेले असते परंतु ते याच्या कल्पने नेच भयकंपित झाले. त्याचा नकारही या अर्थाने नव्हता की अल्लाहने त्याना हे ओझे उचलण्याचा आदेश दिला होता व त्यांनी इन्कार केला, परंतु अशा अर्थाने होता की त्यांना आमानत कबूल करण्या ना करण्याचा अधिकार(Choice) दिला गेला, तेव्हा ते कबूल करण्यास तयार झाले नाहीत.

१४७. म्हणजे या अमानतीत अपहरणाचा अपरिहार्य निष्कर्ष हा निघतो की हा अपराध करणाऱ्यांनी ती शिक्षा भोगावी, मुनाफिक (आपल्या कुफ्र ला लपवून स्वत:ला मुसलमान म्हणविणारे) आणि अनेकेश्वरवादी, मग ते पुरुष असो किंवा स्त्री सर्वात मोठे अपहरण कर्ते आहेत म्हणून त्यांना आपल्या अपराधाची शिक्षा भोगावीच लागेल.

१४८. म्हणजे जे अमानतदारीचा सबूत देतील ते अल्लाहच्या कृपेस पात्र ठरतील आणि अमानतदारीचा सबूत देणारे सच्चे मोमीन (ईमान बाळगणारे) होऊ शकतात मग ते पुरुष असोत किंवा स्त्रीया. त्यांनी जेव्हा या अधिकारांना अल्लाहची अमानत समजून वापरले असेल तेव्हा जे काही अपराध नकळत त्यांच्या हातून घडले असतील त्या बाबत अल्लाह त्यांची क्षमा याचना कबूल करील. यात ईमान बाळगणाऱ्यां करीता प्रेरणा आहे या गोष्टीची की त्यांनी आपल्या अपराधावर नजर टाकावी व अल्लाह समोर क्षमा याचना करीत रहावे.

# ३४. सूरतु सबा

**नावः** आयत क्र. १५ मध्ये सबा जनसमूहाचा उल्लेख केला गेला आहे. तद्नुषंगा ने या सूरह चे नाव 'सबा' असे आहे.

**अवतरण काळः** मजकूरां वरुन असे दिसून येते की ही मक्केच्या मध्य काळात अवतरली असेल.

**मध्यवर्ति कल्पनाः** समग्र सृष्टीत केवळ अल्लाह च असा आहे जो गुणवैशिष्टयां नी सम्पन्न आहे यास्तव आभार व प्रशंसेस तोच पात्र आहे. आणि अल्लाहचे आभार व्यक्त करण्याची स्थिती हीच होय की एकेश्वरवाद व आखिरत (मरणोत्तर जीवना) वर ईमान बाळगले जावे.

**आयत रचनाः** आयत क्र. १ ते ९ प्रस्तावना स्वरुप आयती होत. ज्यात शंका-संशयास दूर करतांना अल्लाहचा असा परिचय प्रदान केला गेला आहे की ज्यामुळे एकेश्वरवाद व आखिरत बद्दल विश्वास निर्माण व्हावा.

आयत क्र. १० ते १३ मध्ये हजरत दाऊद आणि हजरत सुलेमान यांच्या वरील अल्लाह च्या मेहरबानींचे व त्यांच्या कृतज्ञ शीलतेचे एक ऐतिहासिक उदाहरण म्हणून प्रस्तुत केले गेले आहे.

आयत क्र. १४ ते २१ मध्ये बोध घडविण्या करीता सबा जनसमूहा ची कृतघ्नता व त्याच्या दुष्परिणतीस प्रस्तुत केले गेले आहे.

आयत २२ ते २७ मध्ये शिर्क (अनेकेश्वरवादा) चे खंडन केले गेले आहे.

आयत क्र. २८ ते ४५ मध्ये विरोधकांच्या आक्षेपांना उत्तर देत आखिरत ची काही सत्ये त्यांच्या समोर मांडली गेली आहेत.

आयत क्र. ४६ ते ५४ सूरह च्या समारोपाच्या आयती होत ज्यांच्या वर विचार चिंतन करण्याचे आवाहन ही केले गेले आहे आणि या गोष्टी विषयी सावध ही केले गेले आहे की जर वेळ निघून गेली तर मग निरंतर पश्चात्ताप करीत राहाल.

# ३४. सूरतु सबा

سُوْرَةُ سَبَا

आयती - ५४

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ

१. प्रशंसा [1]अल्लाह करीताच आहे जो आकाशांच्या व जमीनी च्या समस्त वस्तूंचा स्वामी आहे आणि आखिरत मध्ये ही त्याच्याच करीता प्रशंसा आहे. [2] तो बुद्धिकौशल्य बाळगणारा आणि जाणकार आहे.[3]

اَلْحَمْدُ لِلّٰهِ الَّذِيْ لَهٗ مَا فِي السَّمٰوٰتِ وَمَا فِي الْاَرْضِ وَلَهُ
الْحَمْدُ فِي الْاٰخِرَةِ ۗ وَهُوَ الْحَكِيْمُ الْخَبِيْرُ ①

२. तो जाणतो, जे काही जमीनीत दाखल होते आणि जे तिच्या तून निघते [4] आणि जे काही आकाशातून अवतरते आणि जे त्या कडे चढते. [5] तो कृपा करणारा, क्षमा करणारा आहे.[6]

يَعْلَمُ مَا يَلِجُ فِي الْاَرْضِ وَمَا يَخْرُجُ مِنْهَا وَمَا يَنْزِلُ
مِنَ السَّمَآءِ وَمَا يَعْرُجُ فِيْهَا ۗ وَهُوَ الرَّحِيْمُ الْغَفُوْرُ ②

३. इन्कार करणारे म्हणतात की आमच्या वर कियामत येणार नाही [7] सांगा, कशी नाही येणार? अपरोक्षाचे ज्ञान बाळगणाऱ्या माझ्या पालन कर्त्याची शपथ. ती तुमच्यावर हमखास येईल. [8] त्याच्या पासून कणभर एखादी वस्तू ना आकाशां मध्ये लपलेली आहे आणि ना जमीनीत,ना याहून लहान आणि ना याहून मोठी, परंतु हे की ते एका स्पष्ट ग्रंथात समाविष्ट आहे.[9]

وَقَالَ الَّذِيْنَ كَفَرُوْا لَا تَاْتِيْنَا السَّاعَةُ ۗ قُلْ بَلٰى وَرَبِّيْ
لَتَاْتِيَنَّكُمْ عٰلِمِ الْغَيْبِ ۚ لَا يَعْزُبُ عَنْهُ مِثْقَالُ ذَرَّةٍ فِي
السَّمٰوٰتِ وَلَا فِي الْاَرْضِ وَلَآ اَصْغَرُ مِنْ ذٰلِكَ وَلَآ اَكْبَرُ اِلَّا
فِيْ كِتٰبٍ مُّبِيْنٍ ③

४. (कियामत अशासाठी येईल) की त्याने मोबदला द्यावा अशा लोकांना ज्यांनी ईमान बाळगले आणि सत्कर्म करीत राहीले.त्यांच्या करीता क्षमा आणि सन्मान पूर्वक उपजिविका आहे.[10]

لِيَجْزِيَ الَّذِيْنَ اٰمَنُوْا وَعَمِلُوا الصّٰلِحٰتِ ۗ اُولٰٓئِكَ لَهُمْ
مَّغْفِرَةٌ وَّرِزْقٌ كَرِيْمٌ ④

५. आणि जे लोक आमच्या आयतींना निष्प्रभ करण्या करीता कार्यमग्न आहेत [11] त्यांच्या करीता अत्यंत वाईट प्रकारचा यातना दायक अजाब (ईश-शिक्षा) आहे.

وَالَّذِيْنَ سَعَوْ فِيْٓ اٰيٰتِنَا مُعٰجِزِيْنَ اُولٰٓئِكَ لَهُمْ عَذَابٌ
مِّنْ رِّجْزٍ اَلِيْمٌ ⑤

१. प्रशंसेच्या स्पष्टीकरणा साठी पहा सूरह फातिहा टीप क्र.२.

२. आखिरत मध्ये अल्लाहचे चमत्कार आणि गुण वैशिष्टये याहून अधिक व्यक्त होतील जी जगात आढळून येतात, म्हणून तिथे ही तोच प्रशंसेस पात्र ठरेल. त्याचेच गुण-गान होईल. ईमान बाळगणाऱ्यांना देणग्यांनी उपकृत केल्यावर ते त्याच्याशीच कृतज्ञता व्यक्त करतील आणि जन्नत मध्ये त्याचीच प्रशंसा उंच स्वरात ऐकू येईल.

३. म्हणजे त्याने जग व आखिरत करीता जी काही योजना तयार केली आहे, ती अत्याधिक बुद्धि कौशल्य व ज्ञानावर आधारीत आहे. त्याचे कोणतेही कार्य ज्ञान व बुद्धि कौशल्य विरहीत नसते, यास्तव तो आपल्या समस्त कार्याबद्दल प्रशंसेस पात्र आहे. जर त्याच्या एखाद्या कार्याचे बुद्धिकौशल्य माणसाला समजून येत नाही, तर हा त्याच्या आकलन शक्तिचा दोष होय, किंवा अशामुळे की त्याचे मर्यादित ज्ञान त्याच्या बुद्धिकौशल्याप्रत पोहोचू शकत नाही.

४. जमीनीत जी वस्तू दाखल होते, ती बाह्यत: नाहीशी होते, परंतु अल्लाहला तीचे ज्ञान असते. म्हणून आम्ही असे पाहतो की पाणी जमीनीत शोषले गेल्या नंतर जमीनी तून अंकूर निघू लागतात. हे या गोष्टीचे प्रमाण होय की जे पाणी जमीनीत शिरले होते, ते अल्लाहला माहीत होते आणि त्याने या पाण्याद्वारे जमीनीतून वनस्पती निर्माण केल्या. अशा प्रकारे मनुष्य देखील मेल्या नंतर जमीनीखाली जातो परंतु त्याच्या सर्व अवयवांचे ज्ञान अल्लाहला असते म्हणूनच कियामतीच्या दिवशी त्याचे मृतां ना सशरीर जमीनीतून बाहेर काढणे व त्यांना दुसऱ्यांदा जिवंत करणे काही कठीण नव्हे.

५. आकाशातून पर्जन्य वृष्टी ही होते, किरणे ही जमीनीवर पडतात व वीज ही कोसळते, तद्वतच वाफ समुद्रातून वर जाते आणि वातावरणात पोहोचून थेंबांच्या रुपाने तिचा वर्षाव होतो. हे ही या गोष्टीचे प्रमाण होय की वाफे चे ज्ञान अल्लाहला होते व तिला त्याने पावसाच्या स्वरुपात वर्षविले. फरिश्ते देखील आकाशातून अवतरतात व खालून वर जातात. त्याच प्रमाणे सदाचारी लोकांचे आत्मे (मेल्यानंतर) आकाशाच्या दिशेने भरारी घेतात.

६. या आयती मध्ये अल्लाहची ओळख करुन देतांना त्याच्या 'दयाशील' व 'क्षमाशील' या गुणविशेषांचे निवेदन केले गेले आहे. जणू लोकांना या गोष्टीचे आवाहन होय की त्यांनी अल्लाहच्या कृपा व क्षमाशीलते कडे धाव घ्यावी.

७. आज दिखिल कियामतीचा इन्कार करणाऱ्या लोकांची कमतरता नाही परंतु त्यांच्या जवळ यासंबंधी कोणतेही प्रमाण नाही.

८. जे लोक कियामतीचा इन्कार करीत होते त्यांच्या बाबतीत पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना अशी ताकीद केली गेली की त्यांच्या दाव्यांचे खंडन, अपरोक्षक-ज्ञान बाळगणाऱ्या आपल्या पालन कर्त्याची शपथ घेऊन संपूर्ण विश्वासाने व नेटाने करावे कारण कियामत एक अटळ वस्तुस्थिती आहे आणि त्याचे ज्ञान 'वही' (अल्लाहच्या संदेशा) ने दृढ विश्वासाप्रत दिले.

कुरआनाचे हे निवेदेन लक्षात घेता आजच्या कालातिल इन्कार करणाऱ्यां समोर ही कियामतीच्या खबरी संपूर्ण विश्वासाने प्रबळपणे सादर करणे, इस्लामचे आवाहन करणाऱ्या लोकांची जबाबदारी आहे. अपरोक्ष ज्ञान बाळगणाऱ्या अल्लाहच्या या गुणविशेषासह शपथ घेण्याचा आदेश अशासाठी दिला गेला आहे की हे स्पष्ट व्हावे की कियामतीचा संबंध अपरोक्षा शी आहे आणि केवळ माझा पालनकर्ता (अल्लाह) अपरोक्ष ज्ञान बाळगतो यास्तव त्याने दिलेली खबर नि:संशय खरी आहे. इन्कार करणाऱ्यांनी तर अपरोक्षात डोकावून पाहीले नाही, मग ते कोणत्या आधारावर हा दावा करतात की कियामत कधीच येणार नाही?

९. म्हणजे प्रत्येक गोष्टीचे रेकॉर्ड स्पष्टत: अल्लाह जवळ आहे.

१०. हा कियामती चे समर्थन करणारा पैलू आहे की सदाचारी ईमान बाळगणाऱ्यांना चांगला मोबदला दिला जावा. त्यांचे अपराध माफ केले जावेत व त्यांना अशी चांगली उपजिविका दिली जावी जी त्यांच्या करीता सन्मान कारक असावी.

११. अल्लाहच्या आयतींना (वचनांना) निष्प्रभ करण्या करीता मग्न असण्याचा अर्थ असा की माणसाने अल्लाहच्या फर्मानाच्या विरोधात उभे रहावे, उदाहरणार्थ अल्लाहच्या अस्तित्वास किंवा त्याच्या एकत्वास आणि आखिरत व प्रेषितत्वास चुकीचे ठरविण्या करीता पूर्ण सामर्थ्य लावावे, जेणेकरुन या श्रध्दातत्त्वांना लोकांनी कबूल करु नये.

६. आणि ज्यांना ज्ञान प्रदान केले गेले आहे, ते असे समजतात की जे काही तुमच्या पालन कर्त्या तर्फे अवतरीत केले गेले आहे, ते अगदी सत्य आहे [१२] आणि त्या (हस्ती) चा मार्ग दाखविते, जो वर्चस्वशाली आणि गुणसम्पन्न आहे.

وَيَرَى الَّذِيْنَ اُوْتُوا الْعِلْمَ الَّذِيْٓ اُنْزِلَ اِلَيْكَ مِنْ رَّبِّكَ
هُوَ الْحَقَّ ۙ وَيَهْدِيْٓ اِلٰى صِرَاطِ الْعَزِيْزِ الْحَمِيْدِ ⑥

७. ज्या लोकांनी कुफ्र केले आहे, ते म्हणतात की काय आम्ही तुम्हाला असा मनुष्य दाखवू जो तुम्हाला ही खबर देतो की जेव्हा तुम्ही अगदी चूर चूर होऊन जाल, त्यावेळी तुम्हास नव्या ने निर्माण केले जाईल. [१३]

وَقَالَ الَّذِيْنَ كَفَرُوْا هَلْ نَدُلُّكُمْ عَلٰى رَجُلٍ يُّنَبِّئُكُمْ
اِذَا مُزِّقْتُمْ كُلَّ مُمَزَّقٍ ۙ اِنَّكُمْ لَفِيْ خَلْقٍ جَدِيْدٍ ⑦

८. 'याने अल्लाह च्या नावाने खोटे रचले आहे किंवा याला वेड लागले आहे' [१४] नव्हे. किंबहुना जे लोक आखिरत ला मानत नाहीत, तेच अजाब (ईश-शिक्षा) आणि पराकाष्ठेच्या मार्गभ्रष्टतेत ग्रस्त आहेत. [१५]

اَفْتَرٰى عَلَى اللّٰهِ كَذِبًا اَمْ بِهٖ جِنَّةٌ ۭ بَلِ الَّذِيْنَ لَا يُؤْمِنُوْنَ
بِالْاٰخِرَةِ فِي الْعَذَابِ وَالضَّلٰلِ الْبَعِيْدِ ⑧

९. काय यांनी आपल्या पुढे व मागे आकाश व जमीनीस पाहीले नाही? आम्ही इच्छा बाळगली तर यांना जमीनीत धसवून टाकू किंवा आकाशाचे काही तुकडे यांच्यावर कोसळवू. [१६] निःसंशय, यात फार मोठी निशाणी आहे अशा प्रत्येक दासा करीता जो रुजू करणारा असावा. [१७]

اَفَلَمْ يَرَوْا اِلٰى مَا بَيْنَ اَيْدِيْهِمْ وَمَا خَلْفَهُمْ مِّنَ السَّمَاۗءِ
وَالْاَرْضِ ۭ اِنْ نَّشَاْ نَخْسِفْ بِهِمُ الْاَرْضَ اَوْ نُسْقِطْ عَلَيْهِمْ كِسَفًا
مِّنَ السَّمَاۗءِ ۭ اِنَّ فِيْ ذٰلِكَ لَاٰيَةً لِّكُلِّ عَبْدٍ مُّنِيْبٍ ⑨

१०. आम्ही दाऊद ला आपल्या जवळून कृपा प्रदान केली होती [१८] हे पर्वतांनो, तुम्ही देखील त्याच्या सोबत ईश-स्तवनात प्रतिध्वनि देणारे व्हा आणि हाच आदेश आम्ही पक्ष्यांना ही दिला होता. [१९] आणि आम्ही त्याच्या करीता लोखंडा स नरम केले होते. [२०]

وَلَقَدْ اٰتَيْنَا دَاوٗدَ مِنَّا فَضْلًا ۭ يٰجِبَالُ اَوِّبِيْ مَعَهٗ وَالطَّيْرَ ۚ
وَاَلَنَّا لَهُ الْحَدِيْدَ ⑩

११. (यासाठी) की परिपूर्ण चिलखते बनवा आणि त्यांच्या कडया ठीक ठीक अनुमानाने राखा [२१] आणि तुम्ही सर्व सत्कृत्य करा. [२२] जे काही तुम्ही करता, ते मी पाहत आहे.

اَنِ اعْمَلْ سٰبِغٰتٍ وَّقَدِّرْ فِي السَّرْدِ وَاعْمَلُوْا صَالِحًا ۭ
اِنِّيْ بِمَا تَعْمَلُوْنَ بَصِيْرٌ ⑪

१२. ज्ञाना शी अभिप्रेत ते ज्ञान होय जे अल्लाहचा उचित परिचय घडविते व त्याच्या मार्गास स्पष्ट करते. हे ज्ञान एका मर्यादे प्रत माणसाला आपल्या स्वभाव व विवेक बुध्दिद्वारे प्राप्त होते. यास्तव कुरआन अवतरणा पूर्वी मक्केच्या अनेकेश्वरवाद्यां मध्ये असे लोक होते जे एकमेव ईश्वराचीच उपासना करीत होते, व 'अल्लाहशी एकनिष्ठ राहणे' हाच त्यांचा धर्म होता. परंतु ज्ञानाचा पूरेपूर प्रकाश अल्लाहच्या संदेशा द्वारे लाभतो. जे लोक अज्ञान ग्रस्त नसतात, किंबहुना ज्ञानाच्या प्रकाशात, ईश्वर, धर्म आणि आखिरत या प्रश्नांवर विचार चिंतन करतात त्यांचा कुरआनाच्या सत्यते वर पूर्ण विश्वास बसतो.

१३. अज्ञानाच्या अंध:कारात भटकत फिरणाऱ्यांची ही मूर्खता पूर्ण कृत्ये होत; कारण ते या गोष्टीचा की पैगंबर दुसऱ्यांदा जिवित केले जाण्याची खबर देत आहेत, थट्टा उडवितात.

१४. पैगंबरां विषयी इन्कार करणाऱ्यांचे हे कथन की या माणसाने खोटे नाटे रचले आहे किंवा याला वेड लागले आहे, या गोष्टीचा पुरावा होय की ते केवळ संशय व भ्रमाच्या आधारावर अशा गोष्टी करीत आहेत. जर त्यांना खात्री असती तर यापैकी एकच गोष्ट बोलले असते, दोन वेगवेगळ्या गोष्टी बोलले नसते.

१५. इन्कार करणाऱ्यांच्या ह्या गोष्टी सूर्या पासून डोळे मिटून त्याचा इन्कार करण्या समान होते, म्हणून त्यांच्या ह्या निरर्थक गोष्टींना उत्तर देण्या ऐवजी त्यांच्या मूळ मर्मा वर बोट ठेवले गेले आहे की ते आखिरत ला मान्य करु इच्छित नाही म्हणूनच पैगंबरा विषयी अशा बिनबुडाच्या गोष्टी करीत आहेत. परंतु आखिरतच्या इन्काराचे वर्तन अंगिकारुन ते ईश-शिक्षेच्या तावडीत सापडले आहेत आणि मार्गभ्रष्टतेत फार दूर भटकत गेले आहेत.

१६. म्हणजे आकाश व जमीनीला रात्रंदिवस आपल्या पुढे मागे बघत असतात, परंतु कधी ही या गोष्टीवर विचार चिंतन करायला तयार होत नाही की, त्यांच्या निर्मात्याने मनात आणले तर त्यांना याच जमीनीत धसवू ही शकतो आणि वाटल्यास आकाशाचे तुकडे देखील यांच्यावर कोसळवू शकतो, जर त्यांनी अशा प्रकारे विचार चिंतन केले असते तर त्यांच्या अंगी ईश-भय निर्माण झाले असते आणि मग ना त्यांनी आखिरतचा इन्कार केला असता आणि ना अपराधी बनले असते.

१७. म्हणजे जमीन व आकाशाच्या महानतेत अल्लाहच्या प्रकोपाची फार मोठी निशाणी अस्तित्वात आहे. त्याने इच्छिले तर फार मोठा कहर आणू शकतो. मात्र या निशाणी कडे केवळ तेच बंदे (दास) लक्ष देतात जे त्याच्या कडे पूर्णत: वळणारे असावेत.

"मुनीब" तो जो मन:पूर्वक अल्लाह कडे वळत असावा पश्चात्ताप दग्ध होऊन ईश्वराकडे वळण्याची ही स्थिती मार्गदर्शना चा मार्ग खुला करते.

१८. अर्थात हजरत दाऊद यांना अल्लाह ने आपल्या विशेष कृपेने उपकृत केले होते. या कृपेचे काही विवरण पुढे दिले गेले आहे ज्यावरुन हे स्पष्ट करण्याचा हेतु आहे की प्रशंसा व कृतज्ञतेस अल्लाह च पात्र आहे, जो आपल्या विशिष्ट दासांना (अर्थात पैगंबरांना) असामान्य कृपे चा लाभ घडवित राहीला.

१९. स्पष्टीकरणा साठी पहा सूरह अंबिया टीप क्र. १०६.

२०. हजरत दाऊद यांच्या हाती लोखंडा चे नरम होणे,जसे की आयती चे शब्द व निवेदन शैलीवरुन स्पष्ट आहे, एक चमत्कार म्हणून होते. याचा लोखंडाच्या वापराच्या सर्व सामान्य पद्धती वरुन कयास करणे अगदी चुकीचे आहे ज्यात लोखंडाला तापवले जाते, मग जेव्हा ते तापून लाल होऊन नरम पडते तेव्हा त्यापासून विविध वस्तू घडविल्या जातात जर नित्य नेमा नुसार उदयास येणारे एखादे तंत्र शास्त्र किंवा नागरी प्रगती असती तर कुरआनाने यास एवढया विशेषत्वाने निवेदिले नसते आणि ना ईश-चमत्कारांमध्ये याची गणना केली असती.

२१. चिलखत एक युद्धात आवश्यक असणारी वस्तू होय आणि प्राचीन काळात याला फार मोठे महत्त्व होते. हजरत दाऊद यांच्या पूर्वी चिलखते बनत ही असली तरी सपाट प्रकाराची व जास्त वजनाची असत, परंतु सर्वश्रेष्ठ अल्लाह ने हजरत दाऊद यांच्यावर ही देणगी अवतरीत केली की लोखंड त्यांच्या हातात मेणासारखे मऊ होत असे; अशासाठी की त्यांनी यापासून कडे बनवून त्यांना चिलखताचे स्वरुप द्यावे ही चिलखते वजनाने हलकी असल्या मुळे अगदी सहज गत्या वापरली जाऊ शकत होती. ही हजरत दाऊद यांच्या संरक्षणात्मक शस्त्रां मध्ये एक महत्वपूर्ण आणि वाखाणण्या जोगी वाढ होती आणि ज्याअर्थी या कारागिरी पासून इतर जनसमूह त्या काळी अपरिचित होते म्हणून शत्रू पक्षे हजरत दाऊदच्या सैन्याच्या विरोधात टिकू शकत नव्हते. हा एक जबरदस्त लाभ होता जो बनी इस्त्राईल वंशाला हजरत दाऊद यांच्या या ईश चमत्कारा द्वारे लाभला.

२२. संबोधन दाऊद वाल्यांशी अर्थात बनी इस्त्राईल वंशा शी आहे की या कृपेने उपकृत केल्या नंतर तुम्ही सदाचारी झाले पाहिजे कारण हेच अर्थाने अल्लाहशी कृतज्ञता व्यक्त करणे होय.

१२. आणि वाऱ्याला आम्ही सुलेमान च्या अधीन केले. त्याचे प्रातः कालीन चालणे ही महिना भर (अंतरा) चे असे आणि त्याचे सायंकालीन चालणे ही महिना भर (अंतरा)चे असते.[२३] आणि आम्ही त्याच्या करीता तांब्याचा झरा प्रवाहित केला [२४]आणि असे जिन्न त्याच्या ताब्यात दिले जे आपल्या पालन कर्त्याच्या आदेशाने त्याच्या पुढयात कामे करीत.[२५] यांच्या पैकी जो आमच्या आज्ञेचे उल्लंघन करीत असे, त्याला आम्ही धगधगत्या आगी ची गोडी चाखवत असू.[२६]

وَلِسُلَيْمٰنَ الرِّيْحَ غُدُوُّهَا شَهْرٌ وَّرَوَاحُهَا شَهْرٌ ۚ وَاَسَلْنَا لَهٗ عَيْنَ الْقِطْرِ ۭ وَمِنَ الْجِنِّ مَنْ يَّعْمَلُ بَيْنَ يَدَيْهِ بِاِذْنِ رَبِّهٖ ۭ وَمَنْ يَّزِغْ مِنْهُمْ عَنْ اَمْرِنَا نُذِقْهُ مِنْ عَذَابِ السَّعِيْرِ ⑫

१३. ते त्याच्या करीता बनवित असत, जे काही तो इच्छित असे. इमारती,[२७] चित्रे,[२८] मोठ मोठया हौदा सारख्या पराती आणि आपल्या जागी स्थीर राहणाऱ्या वजनदार डेगी [२९] हे दाऊद च्या वंशजानो कृतज्ञते सह आचरण करा.[३०] आणि माझ्या दासां मध्ये कमीच लोक कृतज्ञशील आहेत. [३१]

يَعْمَلُوْنَ لَهٗ مَا يَشَاۗءُ مِنْ مَّحَارِيْبَ وَتَمَاثِيْلَ وَجِفَانٍ كَالْجَوَابِ وَقُدُوْرٍ رّٰسِيٰتٍ ۭ اِعْمَلُوْٓا اٰلَ دَاوٗدَ شُكْرًا ۭ وَقَلِيْلٌ مِّنْ عِبَادِيَ الشَّكُوْرُ ⑬

१४. मग जेव्हा आम्ही त्याच्या मृत्यु चा आदेश लागू केला तेव्हा त्यांना त्याच्या मृत्यु पासून पूर्वसूचना देणारी गोष्ट फक्त जमीनी चा किडा होता, जो त्याच्या लाठी ला खात होता जेव्हा सुलेमान खाली कोसळला तेव्हा जिन्नां ना ही गोष्ट स्पष्ट कळाली की, जर ते अपरोक्ष जाणत असते तर या अवमान पूर्ण संकटात पडून राहीले नसते.[३२]

فَلَمَّا قَضَيْنَا عَلَيْهِ الْمَوْتَ مَا دَلَّهُمْ عَلٰي مَوْتِهٖٓ اِلَّا دَاۗبَّةُ الْاَرْضِ تَاْكُلُ مِنْسَاَتَهٗ ۚ فَلَمَّا خَرَّ تَبَيَّنَتِ الْجِنُّ اَنْ لَّوْ كَانُوْا يَعْلَمُوْنَ الْغَيْبَ مَا لَبِثُوْا فِي الْعَذَابِ الْمُهِيْنِ ⑭

१५. सबा [३३] करीता त्यांच्या निवास स्थानातच एक मोठी निशाणी आस्तित्वात होती.[३४] दोन बागा उजव्या व डाव्या बाजूला. [३५] खा आपल्या पालन कर्त्याने प्रदान केलेली उपजिविका आणि आभार माना त्याचे. चांगली भूमी आणि क्षमा करणारा स्वामी.[३६]

لَقَدْ كَانَ لِسَبَاٍ فِيْ مَسْكَنِهِمْ اٰيَةٌ ۚ جَنَّتٰنِ عَنْ يَّمِيْنٍ وَّشِمَالٍ ڛ كُلُوْا مِنْ رِّزْقِ رَبِّكُمْ وَاشْكُرُوْا لَهٗ ۭ بَلْدَةٌ طَيِّبَةٌ وَّرَبٌّ غَفُوْرٌ ⑮

१६. परंतु त्यांनी तोंड फिरवले,[३७] तेव्हा आम्ही त्यांच्यावर बांध चा महापूर पाठविला [३८] आणि त्यांच्या बागांना अशा दोन बागांमध्ये परिवर्तित केले की ज्यात बेचव फळे, झाड झुडपे आणि फार थोडीशी बोरी होती. [३९]

فَاَعْرَضُوْا فَاَرْسَلْنَا عَلَيْهِمْ سَيْلَ الْعَرِمِ وَبَدَّلْنٰهُمْ بِجَنَّتَيْهِمْ جَنَّتَيْنِ ذَوَاتَيْ اُكُلٍ خَمْطٍ وَّاَثْلٍ وَّشَيْءٍ مِّنْ سِدْرٍ قَلِيْلٍ ⑯

२३. वाऱ्याला हजरत सुलैमान यांच्या अधीन अशा प्रकारे केले गेले होते की तो त्यांच्या इशाऱ्यावर एवढया वेगाने, परंतु नरमीने वाहत असे की सकाळी काही तासांच्या अवधीत एका महिन्याचे अंतर पार पडावे. तसेच संध्याकाळच्या काही तासात ही एक महिन्याचे अंतर पार पडावे. हजरत सुलैमान यांचे साम्राज्य बायबलच्या निवेदना नुसार पॅलेस्टीन पासून फरात कालव्या पर्यंत पसरलेले होते. तेव्हा नवल नव्हे की ते ईश्वराच्या या चमत्काराच्या आधारे हा प्रदीर्घ प्रवास सकाळी किंवा संध्याकाळी पार पाडीत असावेत.

अधिक स्पष्टीकरणा साठी पहा सूरह अंबिया टीप क्र. १०९.

२४. तांब्याची खाण असते, परंतु हजरत सुलेमान यांच्या साठी अल्लाहने तांब्याचा प्रवाह जारी केला होता. ही एक असाधारण बाब होती, जी अल्लाहच्या विशेष कृपेचा परिणाम म्हणून होती. अशासाठी की खाणीच्या कष्टदायेक अवस्थेतून न जाता सुलैमान यांना एक वैभव सम्पन्न व अद्वितीय इस्लामी शासन प्रस्थापित करणे शक्य व्हावे. यास्तव त्यांनी या पासून, जसे पुढे विवरण येत आहे, मोठ मोठी भांडी बनविली.

२५. स्पष्टीकरणा करीता पहा सूरह अंबिया, टीप क्र. ११० तसेच सूरह नमल टीप क्र. २५

२६. हा विचार योग्य नव्हे की हजरत सुलैमान यांनी जिन्नां ना वशीभूत केले होते, किंबहुना आयतीच्या स्पष्टीकरणा नुसार सर्वश्रेष्ठ अल्लाह ने आपल्या आदेशाने जिन्नांना हजरत सुलेमान यांच्या ताब्यात दिले होते, जेणेकरुन त्यांनी जिन्नांकडून वाटेल ती सेवा करवून घ्यावी आणि जर यांच्या पैकी एखादा जिन्न त्या आज्ञे चे उल्लंघन करीत असे तर अल्लाह त्याच्यावर आगीच्या शिक्षेचा आसूड मारत असे.

२७. हजरत सुलैमान यांनी या जिन्नांकडून भव्य आणि मजबूत इमारतींची उभारणी करुन घेतली. मोठ मोठया दगडांना एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी हलविणे त्या काळात, जेव्हा क्रेन चा शोध लागलेला नव्हता, सोपी गोष्ट नव्हती, परंतु जिन्नांमुळे हे कार्य सहज सुलभ झाले.

२८. आयतीत 'तमासील' हा शब्द प्रयोग केला गेला आहे जो 'तिम्साल' चे अनेकवचन आहे, आणि तिम्साल अरबी भाषेत मूर्तीला ही म्हणतात व चित्रालाही अरबी चा प्रमाणित शब्दकोश 'लिसानुल अरब' मधील उल्लेख असा.

والتِمثال:الصورة-----

तिम्साल म्हणजे चित्र

وظل كل شئى تمثاله-----

प्रत्येक वस्तू ची सावली, ही तिचे तिम्साल (चित्र) होय.

والتمثال اسم للشئ المصنوع متشبهًا بخلق من خلق الله۔ (لسان العرب، ج،١١ ص، ٦١٣)

''आणि तिम्साल त्या बनविलेल्या वस्तूत नाव होय जी अल्लाहच्या एखाद्या निर्मिती सारखी बनविली गेली असावी.'' (लिसानुल अरब खंड. ११ पृ. ६१३)

والتمثال الشیء المصوّر۔ (مفردات راغب،ص ٤٧٨)

''तिम्साल म्हणजे चित्रित वस्तू.''(मुफ्रदात रागिब पृ. १४७८)

हजरत सुलैमान हे पैगंबर होते आणि हजरत मूसा यांच्या शरीअत (धर्म शास्त्र) चे पालन करणारे होते, म्हणून त्यांच्याबद्दल ही धारणा केली जाऊ शकत नाही की त्यांनी सजीवांचे पुतळे किंवा चित्रे बनविली असतील.'तौरात' या धर्मग्रंथात सजीवा चे चित्र बनविण्याची निषेध्दता निवेदिली गेली आहे.

'' आपल्या साठी कोरीव मूर्ति करु नको; वर आकाशांतील, खाली पृथ्वी वरील व पृथ्वीखालच्या जलांतील कशांचीही प्रतिमा करु नको.'' (अनुवाद ५:८)

ज्या भाष्याकारांनी असे म्हटले आहे की मागील शरीअतीत सजीवांची चित्रे बनविणे जायज (योग्य) होते, तर त्यांनी चुकीचे म्हटले आहे. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचे हे हदीस वचन ही या विचाराचे खंडन करते.

عن عائشة اَنَّ اُمّ حَبِيْبَةَ وَامّ سَلمةَ ذَكَرُنا كَنِيْسَةً رَأَيْنهَا بِالْحَبشةِ فِيهاتصاوير لِرَسُولِ اللهِ صلى الله عليه وآله وسلم فَقَالَ رَسُوْلُ اللهِ صلى الله عليه وآله وسلم اَن اُولٰئِكَ اِذَاكَانَ فِيْهِم الرّجُلُ الصّالِحُ فَمَاتَ بَنَوا عَلٰى قَبْرِهٖ مَسْجِدً اوَصَوّرُوا فِيْهِ تِلْكَ الصُّوَرُ اُولٰئِكَ شِرَارُ الْخَلْقِ عِنْدَاللهِ عَزّوَجَلّ يَوْمَ الْقِيَامَةِ۔ (مسلم كتاب المساجد)

''(मोमीनांची माता) हजरत आयशा द्वारे उल्लिखित आहे की उम्मे हबीबा आणि उम्मे सलमा यांनी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या जवळ एका चर्च चा उल्लेख केला जी त्यानी हब्शा (ॲबिसिनिया) येथे पाहिली होती व जिच्यात चित्रे होती. रसूलुल्लाह (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी फर्माविले, त्या लोकांमध्ये जेव्हा एखाद्या सदाचारी माणूस असे व तो मेल्यावर हे लोक त्याच्या कबरीवर उपासना गृह बनवित व त्यात या प्रकारची चित्रे बनवित. कियामतीच्या दिवशी हे लोक श्रेष्ठ व प्रतिष्ठित अल्लाहच्या जवळ सर्वात निकृष्ट अशी निर्मिती असतील.'' (मुस्लिम किताबुल मसाजीद)

हे हदीस वचन या बाबत चे स्पष्टीकरण होय की मागील

शरीअत मध्ये ही चित्रे बनविणे उचित नव्हते.यास्तव हजरत सुलैमान यांनी निर्जिवांचीच चित्रे बनविली असतील ज्यांची शरीअत मध्ये मनाई नाही अर्थात ही चित्रे फूल, पाने, झाडे आणि नैसर्गिक देखाव्यांची असावीत राहीलेत बायबल ची पुस्तके 'राजे' व 'इतिहास' चे हे निवेदन की हजरत सुलैमान यांनी सजीवांची चित्रे बनविली होती, तर हे विश्वासाई नाही कारण ही पुस्तके, जसे बायबलच्या भाष्याकाराचे निवेदन आहे. हजरत सुलैमान यांच्या काही शतकां नंतर लिहीली गेली आहेत ज्यात कर्णोपकर्णी गोष्टींचा व किश्श्यांचा मोठा दखल आहे.(पह the Interpreters One- Volume Commentary on the Bible Page-181)

आणि बायबल मध्ये हजरत सुलैमान यांच्याशी शिर्क (अनेकेश्वर भक्ति) आणि मूर्तिपूजा यांचा ही संबंध दर्शाविला गेला आहे. तेव्हा या प्रश्न विषयी युक्तिवाद योग्य नव्हे. या आयतीचा उचित व उत्कृष्ट आशय तोच असू शकतो जो शरीअत च्या आदेशांशी समानता राखत असावा व ज्याद्वारे पैगंबरांच्या चारित्र्याला गालबोट लागत नसावे. या संदर्भात काही गोष्टी विचाराधीन राखणे अगत्याचे आहे.

एक गोष्ट अशी की, चित्रांनी सुशोभित केलेल्या भव्य इमारती ची उभारणी, जसे आयतीत स्पष्टरित्या निवेदिले गेले आहे. हजरत सुलैमान यांनी जिन्नांद्वारे हे काम घेतले होते. या कामाची ना त्यांना मजूरी द्यावी लागत होती आणि ना शासनाच्या खजिन्यावर याचा भार पडत होता. म्हणून याल अपव्ययचे काम म्हटले जाऊ शकत नाही.

दुसरी गोष्ट अशी की हजरत सुलैमान यांच्या कार्यात ईश्वरी चमत्कारांचा फार मोठा भाग होता. तांब्याचा झरा वाहणे आणि जिन्नां कडून कामे करविणे या सर्व अशा स्वरुपाच्या गोष्टी आहेत. त्यांनी या वास्तु-उभारणीच्या कार्यात व चित्र कामास एक कला, किंवा संस्कृती म्हणून आपल्या जन समूहात प्रचलित केले नव्हते.

तिसरे हे की चित्रांनी सुशोभित भव्य अशा इमारती गर्व व प्रदर्शना करीता उभारल्या गेल्या नाहीत, तर अल्लाहच्या विशेष कृपेस व्यक्त करण्या करीता उभारल्या गेल्या होत्या, जी त्याने आपला पैगंबर हजरत सुलैमान वर केली होती सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्यांना असाधारण साधने उपलब्ध केली होती ती त्यांचे कार्य मानव कौशल्या शिवाय आणि शासनाच्या खजिन्यावर बोझा न टाकता पार पडत होते. यावरून एक तर इस्लामी शासनाचे वर्चस्व अन्य जनसमूहांवर प्रस्थापित झाले होते आणि दुसरे म्हणजे हजरत सुलैमान यांची सत्यता जाहीर होत होती, की ते खरोखर अल्लाहचे पैगंबर आहेत. यास्तव त्यांच्या 'शिश महल' ला (काचेचा महल) पाहून सबा देशाच्या राणी चे हजरत सुलैमान द्वारा प्रभावित होण्याची घटना सूरह नमल मध्ये निवेदिली गेली आहे.

चौथी गोष्ट अशी की सर्वश्रेष्ठ अल्लाहचे उद्दिष्ट हे होते की एका विशेष वैभवाची इस्लामी राज्य सत्ता एका पैगंबराच्या हस्ते बनी इस्राईल मध्ये प्रस्थापित केली जावी,अशासाठी की ही बनी इस्राईल वंशाकरीता एक असाधारण ईश-देणगी ठरावी आणि जगातल्या लोकांना ही हे कळून यावे की एक असे इस्लामी राज्य प्रस्थापित झाले आहे जे आपल्या बाह्य वैभवात अगदी अद्वितीय होते आणि त्याच्या वैभव संपन्नतेस बघून ईश्वराचे स्मरण घडत होते आणि या शासनास अतिशय यशस्वी रित्या आणि पूर्ण न्यायासह एका पैगंबराने चालवून दाखविले.

या गोष्टी समजून घेतल्या नंतर हजरत सुलैमान यांच्या कारनाम्यास मोगल बादशहांची खर्चिक व प्रदर्शनार्थ केली गेलेली वास्तु-उभारणी आणि भव्य शाही महालांच्या धर्मानुकूलते साठी प्रमाण दर्शविले जाऊ शकत नाही. दिल्लीच्या लाल किल्ल्याचा 'दिवाने खास' ज्याच्या भिंती केवळ फूलांच्या चित्रांनी व नक्षीकामाने सुशोभित नाहीत, तर त्यात मोल्यवान हिरे जवाहीर ही जडवले गेले होते. उधळपटीचा हा अतिश्य निकृष्टतम नमुना होय आणि मोगल बादशाहांनी हे भव्य महाल केवळ विलासिते करीता बनविले होते आणि ताज महाल सारखे जे स्मारक त्यांनी कायम केले ते केवळ आपला गर्व आणि वैभव सम्पन्नतेचे प्रदर्शन करण्याच्या हेतुनेच केले होते.

चित्राचा प्रश्न समोर आल्याने फोटो ची शास्त्र विहितात व शास्त्र निषिध्दता व धर्म प्रतिकूलते चाही प्रश्न उद्भवू लागतो. परंतु इथे ही चर्चा दीर्धतेस कारक ठरेल कारण फोटो आजच्या काळातील शोध आहे व या दृष्टीने ही अशा प्रकारची समस्या होय ज्या बाबत कुरआन व हदीस चा स्पष्ट आदेश नसल्यास 'इज्तिहाद' (आपल्या बुध्दि ने विधि निषेधा संबंधी निर्णय) करावा. तात्पर्य आम्ही या चर्चेत अधिक खोल वर जाणे योग्य समजत नाही म्हणून हा एवढयावरच समाधान बाळगतो.

२९. मोठ मोठया डेगी मध्ये अन्न शिजवले जाई आणि मोठ मोठया लगन (भांडया) मध्ये त्याला काढले जाई, अशासाठी की एकाच वेळेस अनेक लोकांच्या जेवणाची सोय व्हावी. हजरत सुलैमान जवळ जे प्रचंड सैन्य होते, असे दिसून येते की त्यांच्या जेवणावळी करीता हा इतमाम केला गेला होता, अर्थात एक लष्करी गरज भागविण्या करीता.

पाषाणाचे मोठ मोठे लंगन (भांडे) व मोठ मोठे डेगी बनविण्याचे काम, जे जागेवरुन हटविला जाऊ शकत नव्हते जिन्नां कडून घेतले गेले. आयतीतल्या स्पष्ट निवेदना नुसार ही सर्व कारागिरी जिन्नांचीच कारागिरी होती.

३०. दाऊद वंशा शी अभिप्रेत हजरत दाऊद यांची संतती ही होय व त्यांचे अनुयायी देखील. आणि कृतज्ञतेसह आचरण करण्याचा अर्थ असा की अल्लाहच्या या उपकारांची कृतज्ञता अशा प्रकारे व्यक्त करा की आचरणा द्वारे ती व्यक्त व्हावी म्हणजे अशा प्रकारचे वर्तन जे कृतज्ञतेशी समानता राखणारे असावे, यावरून असे दिसून येते की कृतज्ञता व्यक्त करण्या साठी केवळ मुखाने कृतज्ञतेचे बोल अदा करणे पुरेसे नाही, किंबहुना आचरणाद्वारे याचा पुरावा देणे आवश्यक आहे.

३१. मौल्यावान वस्तु जगात फार थोड्या आढळून येतात. सोने लोखंडाच्या तुलनेने,हिरे-माणेक कोळसा व दगडांच्या तुलनेने, सुंदर, नयनरम्य व सुगंधित फूले काटयाकुटयांच्या तुलनेने आणि कस्तुरी गवत पाल्याच्या तुलनेने. तद्वतच अल्लाहचे कृतज्ञशील दास कृतघ्नांच्या तुलनेने फार अल्प प्रमाणात आढळून येतात. परंतु तेच समाजाचे सत्व आणि मानवतेचे अमूल्य रत्ने असतात.

३२. हजरत सुलैमान यांचे निधन ही ईश चमत्कारीत रित्या घडले. ते असे की ते आपल्या लाठीच्या टेक्याने उभे होते व जिन्नांच्या कामांवर देखरेख करीत होते की अचानक मरण पावले. परंतु त्यांच्या निर्जीव शरीरास अल्लाहने जमीनीवर कोसळू दिले नाही. किबहुना त्यास लाठीच्या च अधारे उभे ठेवले अशासाठीकी जिन्नांनी असे समाजावे की हजरत सुलैमान जिवंत आहेत, व त्यांनी त्या सेवा कार्यास लागून रहावे जे त्यांच्या सुपूर्द केले गेले होते जेणेकरून वास्तु उभारणीचे कार्य पूर्ण व्हावे ते हे सेवा कार्य पार पाडत राहीले, येथ्पावेतो की जेव्हा अल्लाहनो त्यांच्या मृत्युस उघड करु इच्छिले तेव्हा जमीनीच्या किड्यास म्हणजे वाळवीस संकेत केला की त्याने त्यांची लाठी खाऊन टाकावी, वाळवीने जेव्हा लाठी पोखरुन टाकली, तेव्हा लाठी उभी राहू शकली नाही मग हजरत सुलेमान जमीनीवर कोसळले. तेव्हाच जिन्नांना हे कळून आले की हजरत सुलैमान या पूर्वीच निधन पावले होते व त्यांचे निर्जीव शरीर लाठीच्या आधारे आतापर्यंत उभे होते. त्या वेळी त्यांना ही जाणीव झाली की जर त्यांना अपरोक्ष ज्ञान असते तर हजरत सुलैमान च्या मृत्युची खबर त्यांना आधीच झाली असती, आणि त्यांना या कामापासून जे अपमानासह संकट ग्रस्त होऊन त्यांना करावे लागत होते, केव्हाच मुक्ति मिळाली असती. कारण जिन्न सुलैमान यांच्या समोर त्यांच्याच मार्गदर्शनानुसार सेवा पार पाडण्या करीता नियुक्त केले गेले होते.

या घटनेचा खास पैलू ज्याकडे लोकांना सावध करण्याचा हेतु आहे. असा की जिन्नांबद्दल ही धारणा चुकीची आहे की ते अपरोक्ष ज्ञान बाळगतात. जिन्नांना अपरोक्ष ज्ञानी समजून लोक त्यांच्या मदतीची याचना करतात आणि भूतबाधा अघोरी विघ्नेत ग्रस्त होतात. ही केवळ भ्रम पूजा होय परंतु आज देखील कित्येक लोक श्रध्देच्या या बिघाडा पायी जिन्नां ची करुणा भाकतात आणि जेव्हा एखादा मनुष्य मानसिक व्याधीने पिडीत असतो, तेव्हा त्याला भूतबाधा झाली असे समजून अगदी निर्दय पणे त्याला झोडपून काढतात व असे समजतात की खरे पाहता ते त्या जिन्ना (भूत प्रेता) ला झोडपत आहेत जो त्या माणसावर स्वार झाला आहे आणि मग त्या जिन्नास हजर करुन त्याच्या तोंडून काही वदविण्याचा प्रयत्न ही केला जातो. अशा प्रसंगी सैतान त्यांना धोक्यामागून धोके देत असतो आणि त्यांची वाईट श्रध्दा त्यांना अवनति व अमानाच्या मार्गावर आणून सोडते.

स्पष्ट असावे की कुरआनने या गोष्टीचे स्पष्टीकरण दिलेले नाही की हजरत सुलेमान मृत्यु पावल्यानंतर किती काळ लाठीच्या टेक्याने उभे राहीले. ज्या कथनांमध्ये एक वर्षाचा उल्लेख केला गेला आहे व ज्या कथनांना भाष्यकरांनी उल्लेखिले आहे, ती सर्व कथने अविश्वसनीय होत. उचित पातळी चे एक ही कथन यां संदर्भात नाही. म्हणून एखाद्या दिर्घ मुदतीस ग्राह्य धरणे आवश्यक होऊ शकत नाही ते त्या अवस्थेत काही दिवस राहीले असावेत आणि एवढा काळ देखील जिन्नांना ही जाणीव करुन देण्यासाठी पुरेसा ठरला असावा की त्यांना हजरत सुलेमानच्या मृत्युची ऐनवेळी खबर होऊ शकली नाही.

राहीला हा प्रश्न की जर जिन्नांना हजरत सुलैमान यांच्या निधनाची खबर कळू शकली नाही तर काय माणसांना ही कळू शकत नव्हती आणि जर माणसांना कळाली होती तर मग शवाला यथाविधी स्नान घालून, प्रेत वस्त्रात गुंडाळून शवपेटी तयार करण्या शिवाय, ते शव कशा प्रकारे काही काळ त्याच अवस्थेत राहू दिले गेले? तर या संदर्भात ही गोष्ट विचाराधीन असावी की कुरआनाने केवळ जिन्नांच्या अजाणते चे स्पष्टीकरण दिले आहे. माणसांच्या अजाणतेचे स्पष्टीकरण दिलेले नाही.

مَادَلَّهُمْ عَلٰى مَوْتِهٖٓ اِلَّا دَآبَّةُ الْاَرْضِ ''त्याच्या मृत्युबाबत त्यांना सूचित करणारी गोष्ट जमीनीचा किडा होता'' यात هُمْ (त्यांना) हे सर्वनाम जिन्नांचा निर्देश करते कारण या आयतीत ही जिन्नांचाच उल्लेख केला गेला आहे व यापूर्वी च्या आयतीत ही जिन्नांची कारागिरी निवेदिली गेली आहे. या वाक्य संबंधा (Context) मध्ये अशी कोणतीही गोष्ट नाही जी माणसांना प्रमाणित करणारी असावी. यास्तव आम्ही असे समजतो की हजरत सुलैमान यांनी अल्लाहचा संकेत जाणून आपल्या निधनाच्या वेळीच आपल्या कुटुंबियांना व आपल्या राज्याच्या सहाय्यकांना ताकीद केली असेल की त्यांनी त्यांच्या शवास त्याच स्थितीत राहू द्यावे, जोपर्यंत ते खाली कोसळत नाही, आणि त्यांनी या आदेशाचे पालन ही केले असेल किंवा त्यांनी हे पाहून की

हजरत सुलैमान निधन पावल्या नंतर ही लाठीच्या आधारे उभे आहेत व जमीनीवर त्यांचे शव कोसळत नाही, असे समजले असतील की हा अल्लाहचा परिपूर्ण चमत्कार आहे. म्हणून पुढे एखादी गोष्ट जाहीर होण्या पावेतो शव त्याच स्थितीत राहू दिले पाहिजे, आणि ज्या अर्थी त्यांचे शव ईश्वरीय चमत्कारा मुळे उभे होते म्हणून ते सुरक्षित राहण्या विषयीही आश्वस्ताता राहीली असेल आणि दफन विधी त्याच वेळी अमलात आणला गेला असेल जेव्हा ते जमीनीवर कोसळले, ज्या जिन्नांना सेवा-कार्यास नियुक्त केले गेले होते त्यांच्या व माणसांच्या दरम्यान अल्लाहने अशा प्रकारचे अडथळे उभे केले असतील की जिन्नां ना कोणत्याही प्रकारे हजरत सुलैमान यांच्या मृत्युची चाहूल लागू शकली नाही आमच्या मते या स्पष्टीकरणानंतर कोणतीही शंका उरत नाही आणि वास्तविक स्थिती चे ज्ञान तर केवळ सर्वज्ञ अल्लाह ला आहे.

३३. 'सबा' एका जनसमूहाचे नाव आहे जो यमन च्या प्रदेशात वसत होता. आणि मारब ही त्याची राजधाणी होती. जी सनआ च्या पश्चिमेस १९३ किलो मीटर अंतरावर आहे. सूरह नमल मध्ये सबा देशाच्या राणी चे हजरत सुलेमान जवळ हजर होणे व तिचे इस्लाम धर्म स्विकारणे विषयीचा वृत्तांत निवेदिला गेला. त्या काळात सर्वसाधारण पणे प्रजेचा धर्म तोच असे जो बादशहाचा राहात असे, यास्तव सबा ची राणी इस्लाम स्विकारुन जेव्हा मायदेशी परतली तेव्हा तिच्या प्रजेनेही इस्लाम धर्म स्विकारला असेल. अशा प्रकारे सबा जनसमूहाच्या यमन देशात हजरत सुलैमान यांच्या काळातच इस्लाम धर्म पोहचला होता. सबा जनसमूह शेकडो वर्षे राज्य ही करीत राहीला आणि सुख सम्पन्नतेत ही राहीला ते अरब चे विशाल आणि सुसंस्कृत राज्य होते. परंतु नंतर जेव्हा त्यांनी अल्लाहशी कृतन्घतेचे वर्तन अंगिकारले तेव्हा त्या समस्त ईश-देणग्या त्यांच्या कडून हिरावून घेतल्या गेल्या, ज्या अल्लाहने त्यांना प्रदान केल्या होत्या. कृतन्घता करणाऱ्या जनसमूहाच्या या परिणतीस या ठिकाणी बोध ग्रहणा करीता प्रस्तुत केले गेले आहे.

३४. म्हणजे ज्या इलाक्यात ते वसत होते, तो सुपीक असण्यात व जनसमूहा साठी सम्पन्न असण्यात या गोष्टीचे स्पष्ट लक्षण होते की या ईश-देणग्या त्यांच्या पालन कर्त्या अल्लाहनेच प्रदान केलेल्या आहेत आणि त्याच्या या उपकारा बद्दल कृतज्ञता आवश्यक आहे आणि हे की त्याने इच्छिल्यास तो हया देणग्या यांच्याकडून हिरावूनही घेऊ शकतो म्हणून त्याचे भय बाळगीत जीवन व्यतीत केले पाहीजे.

३५. अर्थात बागांचा एक क्रम उजव्या बाजूस होता आणि दुसरा डाव्या बाजूस ज्यात उत्कृष्ट आणि स्वादिष्ट फळांनी डवरलेली झाडे, हिरवीगार शेते व सुगंधित झाडे एवढया विपुल प्रमाणात होती की पूर्ण इलाका बाग स्वरुप झाला होता.

३६. म्हणजे उपजिविकेची ही विपुलता त्यांच्या पालन कर्त्यानेच प्रदान केलेली होती आणि जणू हे की आपल्या पालन कर्त्याने प्रदान केलेला उपजिविका खा व त्याचे आभार माना आणि निसर्ग देखील मूकपणे हा उद्घोष करीत होता की किती सुपीक व चांगली आहे ही जमीन आणि किती चांगला आहे तो पालन कर्ता जो आपल्या कृतज्ञशील दासांचे अपराध माफ करतो !

३७. म्हणजे त्यांनी अल्लाहचे आभार मानण्या ऐवजी त्याच्याशी असलेला संबंध तोडून विमुखता अंगिकारली आणि जेव्हा ते अल्लाहशी पराड्मुख झाले तेव्हा मात्र त्यांचे शिर्क (अनेकेश्वरवाद) व ऐहिक भक्ति रममाण होणे अपरिहार्य आहे.

३८. 'बांध चा महापूर' शी अभिप्रेत तो महापूर होय जो बांध (Dam)तोडून सबाच्या बागांमध्ये व शेतांमध्ये शिरला आणि त्याने सर्व काही उध्वस्त करुन टाकले. हा बांध 'सद्दे मआरीब' या नावाने प्रसिद्ध आहे, ज्यास सबा जनसमूहाने आपली राजधानी मआरीब मध्ये दोन पर्वतांच्या दरम्यान ज्यांचे नाव अलबल्क असे आहे, बनविले होते. अशासाठी की पावसाचे व झऱ्यांचे पाणी यात साठवले जावे. त्यांनी या पासून कालवे काढून पाटबंधाऱ्या ची शेताला पाणी देण्याची व्यवस्था केली होती. धरण (Dam) बनविण्याची कला आधुनिक काळातील शोध नव्हे, किंबहुना ही कला दोन हजार वर्षांहून ही अधिक प्राचीन आहे. सबा जनसमूहाने या कलेत मोठे प्राविण्य असल्याचा पुरावा दिला होता (धरणाच्या तपशीला करीता पहा अर्जुल कुरआन ले. सय्यद सुलेमान नदवी खं १ पृ २५४) बांध फूटण्याची ही घटना बहुधा इ. सदी सना पूर्वी दुसऱ्या शतकात घडली असावी.

या धरणाचे भग्नावशेष आज देखील मआरीब मध्ये आहेत आणि अवस्थेच्या मुखाने बोध कारक किस्सा ऐकवित आहेत. आम्ही याची चित्रे पुढील पानांवर सादर करीत आहोत (या अवशेषांचे विवरणा करीता पहा डॉ. अब्दुल अलीम अब्दुर्रहमान खिजर यांचे पुस्तक 'मफाहीम जोगराफिया फिल किससिल कुरआनी' प्रकाशक दारुल शरुक जिद्दा. पृ. १९५ ते २०६)

३९. म्हणजे महापूराच्या विनाशकारीनेचा परिणाम असा झाला की फळांनी समृद्ध अशा बागा नष्ट झाल्या व त्यांची जागा कडू बेचव फळांनी व झाडा झुडपांनी घेतली, खाण्याजोगे फळझाळ फक्त बोर राहीले व ते ही फार थोडेसे.

यावरुन असे दिसून येते की महापूराने आपल्या सोबत वाळू व काहीसे असलेच पदार्थ पसरवून दिले की जमीनीवर त्यांचा थर साचल्यामुळे तिची सर्व सुपीकता नाहीशी झाली.

आणि आम्ही यांच्या व त्या वस्तींच्या
दरम्यान, ज्यात आम्ही समृध्दी राखली होती,
मोकळ्या वस्त्या ही आबाद केल्या होत्या
आणि त्यांच्या दरम्यान प्रवासाचे टप्पे देखील
निश्चित केले होते  प्रवास करा यांच्यात
रात्रंदिवस शांतता पूर्वक. (अल-क़ुर्आन)

१७. हा त्यांच्या कृतघ्नतेचा मोबदला होता, जो आम्ही त्यांना दिला. [४०] आणि अशा प्रकारचा मोबदला आम्ही कृतघ्न लोकांनाच देत असतो.

ذٰلِكَ جَزَيْنٰهُمْ بِمَا كَفَرُوْا ۭ وَهَلْ نُجٰزِيْٓ اِلَّا الْكَفُوْرَ ١٧

१८. आणि आम्ही यांच्या व त्या वस्तींच्या दरम्यान, ज्यात आम्ही समृध्दी राखली होती, मोकळ्या वस्त्या ही आबाद केल्या होत्या आणि त्यांच्या दरम्यान प्रवासाचे टप्पे देखील निश्चित केले होते [४१] प्रवास करा यांच्यात रात्रंदिवस शांतता पूर्वक.[४२]

وَجَعَلْنَا بَيْنَهُمْ وَبَيْنَ الْقُرَى الَّتِيْ بٰرَكْنَا فِيْهَا قُرًى ظَاهِرَةً
وَّقَدَّرْنَا فِيْهَا السَّيْرَ ۭ سِيْرُوْا فِيْهَا لَيَالِيَ وَاَيَّامًا اٰمِنِيْنَ ١٨

१९. परंतु ते म्हणाले, हे आमच्या पालन कर्त्या ! [४३] आमच्या प्रवासाच्या अंतरां मध्ये लांब पल्ला निर्माण कर. [४४] आणि त्यांनी स्वत:वर अत्याचार केला [४५] तेव्हा आम्ही त्यांना किस्सा कहाणी बनवून ठेवले [४६] आणि त्यांना अगदी इतस्तत: करुन टाकले. [४७] नि:संशय यात त्या प्रत्येक माणसा करीता निशाण्या आहेत, जो सहनशील, कृतज्ञशील असावा.[४८]

فَقَالُوْا رَبَّنَا بٰعِدْ بَيْنَ اَسْفَارِنَا وَظَلَمُوْٓا اَنْفُسَهُمْ فَجَعَلْنٰهُمْ
اَحَادِيْثَ وَمَزَّقْنٰهُمْ كُلَّ مُمَزَّقٍ ۭ اِنَّ فِيْ ذٰلِكَ لَاٰيٰتٍ لِّكُلِّ
صَبَّارٍ شَكُوْرٍ ١٩

२०. आणि सैतानाने यांच्या विषयी आपली कल्पना खरी करुन दाखविली.[४९] यास्तव त्यांनी याचे अनुसरण केले, शिवाय एका समूहाच्या जो ईमान बाळगणारा होता. [५०]

وَلَقَدْ صَدَّقَ عَلَيْهِمْ اِبْلِيْسُ ظَنَّهٗ فَاتَّبَعُوْهُ
اِلَّا فَرِيْقًا مِّنَ الْمُؤْمِنِيْنَ ٢٠

२१. त्याचा यांच्यावर काहीच जोर नव्हता [५१] परंतु आम्ही हे पाहू इच्छित होतो की कोण आखिरत (मरणोत्तर जीवना) बद्दल ईमान बाळगतो आणि कोण याविषयी संशय ग्रस्त झाला आहे. [५२] आणि तुमचा पालन कर्ता प्रत्येक गोष्टीवर देखरेख ठेवणारा आहे.

وَمَا كَانَ لَهٗ عَلَيْهِمْ مِّنْ سُلْطٰنٍ اِلَّا لِنَعْلَمَ مَنْ يُّؤْمِنُ
بِالْاٰخِرَةِ مِمَّنْ هُوَ مِنْهَا فِيْ شَكٍّ ۭ وَرَبُّكَ عَلٰي كُلِّ
شَيْءٍ حَفِيْظٌ ٢١

२२. सांगा [५३] साद घाला त्यांना, ज्यांना तुम्ही अल्लाह शिवाय उपास्य समजून घेतले आहे. ते ना आकाशामध्ये कण मात्र अधिकार बाळगतात आणि ना जमीनीवर [५४] आणि ना या दोघांमध्ये त्यांचा काही हिस्सा आहे [५५] आणि, ना यांच्या पैकी कोणी त्याचा मदतनीस आहे.

قُلِ ادْعُوا الَّذِيْنَ زَعَمْتُمْ مِّنْ دُوْنِ اللّٰهِ ۚ لَا يَمْلِكُوْنَ مِثْقَالَ
ذَرَّةٍ فِي السَّمٰوٰتِ وَلَا فِي الْاَرْضِ وَمَا لَهُمْ فِيْهِمَا مِنْ شِرْكٍ
وَّمَا لَهٗ مِنْهُمْ مِّنْ ظَهِيْرٍ ٢٢

४०. सबा जनसमूहास कृतघ्नतेची अशी शिक्षा मिळाली की त्याची सर्व विलासिता लयास गेली आणि सुखसमृध्दीचे जीवन दु:ख यातनामय जीवनात परिवर्तित झाले.

अर्थात सर्वश्रेष्ठ अल्लाह जेव्हा एखाद्या कृतघ्न जनसमूहास शिक्षा देऊ इच्छितो तेव्हा त्याच्या कडून आपल्या देणग्या हिरावून घेतो आणि त्याच्या अर्थोपार्जनाचे साधन नष्ट करतो. हे अशाच स्थितीत होते जेव्हा एखादा जनसमूह अल्लाहच्या देणग्यांचा अवहेलना करु लागतो व आपल्या उपकार कर्त्या पालनकर्त्या कडे पाठ फिरवितो. पवित्र कुरआनात अन्य एका ठिकाणी अल्लाहचा हा नियम निवेदिला गेला आहे.

اِنَّ اللہَ لَا یُغَیِّرُ مَا بِقَوْمٍ حَتّٰی یُغَیِّرُوْا مَا بِاَنْفُسِہِمْ۔ (رعد۔۱۱)

“अल्लाह एखाद्या जन समूहाची अवस्था तो पर्यंत बदलत नाही, जो पर्यंत तो आपले वर्तन बदलत नाही.”(रअद - ११)

सबा जनसमूहाच्या या घटनेवरुन हे ही स्पष्ट होते की सुस्थिती असो किंवा वाईट स्थिति सर्व काही अल्लाहच्या हाती आहे. ना देवी देवतां चे अस्तित्व आहे आणि ना उपजिविका देण्यास कोणी समर्थ आहे. सत्य केवळ एकेश्वरवाद आहे व शिर्क (अनेकेश्वर भक्ति) अगदी खोटे.

४१. हा एका दुसऱ्या ईश देणगीचा उल्लेख आहे, जी ‘सबा’ ला प्रदान केली गेली होती. त्यांच्या करीता प्रवासास अगदी सहज सुलभ बनविले गेले होते. ते सिरीया व पॅलेस्टीन कडे व्यापारी सफर काढीत. अल्लाहने या राजमार्गास जो यमन पासून बैतुल मक्दीस व दमिश्क पर्यंत जात होता असा योग्य बनविला होता की गावे जवळ जवळ वसली होती मजल पार पाडणे प्रवाशांना सोपे झाले. हया वस्त्या राजमार्गाला लागून असल्यामुळे उघड दिसून येणाऱ्या वस्त्या होत्या म्हणून शांतता पूर्वक प्रवास करणे शक्य झाले होते.

‘या वस्त्यांच्या दरम्यान ज्यात आम्ही समृध्दी राखली होती’ शी अभिप्रेत ‘बैतुल मक्दीस’ आणि पॅलेस्टीन व सिरीयाचा प्रदेश होय. या भूमी करीता कुरआनाचा हा परिचित अर्थ आहे. अधिक स्पष्टीकरणा करीता पहा सूरह बनी इस्राईल.टीप.क्र.१

४२. हे ही निसर्गाचे मूकपणाने ऐलान होते.

४३. असे दिसून येते की सबा जनसमूह अल्लाह ला आपला रब (पालनकर्ता) मानत होता, तरी ही त्याच्याशी कृतघ्न होता.

४४. सबा ने अल्लाहच्या या देणगी ची ही अवहेलना केली ते म्हणू लागले ज्या प्रवासात कष्टयातना नसतील तर प्रवास कसला? त्यांची ही प्रार्थना की आमच्या प्रवासाच्या मजली मध्ये टप्प्यां मध्ये लांब अंतर निर्माण कर, माणसाच्या विचारसरणीची निंदा करते, जी कुरआनात अन्य एका ठिकाणी निवेदिली गेली आहे.

وَیَدْعُو الْاِنْسَانُ بِالشَّرِّ دُعَاءَہٗ بِالْخَیْرِ۔ (بنی اسرائیل۔۱۱)

“आणि मनुष्य उपद्रवा करीता अशा प्रकारे दुआ (प्रार्थना) करु लागतो ज्या प्रकारे त्याने भलाईकरीता दुआ करावयास पाहिजे.” (बनी इस्राईल टीप - ११)

आणि मक्केच्या अनेकेश्वर वाद्यांनी ही स्वत:करीता ही अशुभ प्रार्थना केली होती.

اَللّٰہُمَّ اِنْ کَانَ ہٰذَا ہُوَ الْحَقَّ مِنْ عِنْدِکَ فَاَمْطِرْ عَلَیْنَا حِجَارَۃً مِنَ السَّمَاءِ اَوِ ائْتِنَا بِعَذَابٍ اَلِیْمٍ۔ (انفال۔۳۲)

“हे अल्लाह! जर हे खरोखर सत्य आहे तुझ्या तर्फे तर आमच्यावर आकाशातून दगडांचा वर्षाव कर किंवा आमच्यावर अन्य एखादा दु:ख दायक अजाब (प्रकोप) अवतरीत कर.” (अन्फाल-३२)

४५. म्हणजे असे करुन त्यांनी स्वत:वरच अत्याचार केला. अल्लाहशी कृतघ्नता केल्याने अल्लाहचे काहीच बिघडत नाही उलट मनुष्य स्वत:ला अल्लाहच्या प्रकोपास पात्र ठरवितो.

४६. म्हणजे कोठे ‘सबा’ चा तो उत्कर्ष व कोठे त्याचा हा ऱ्हास की ते इतिहासांच्या पानांमध्ये जुनाट किस्से बनून राहीले.

४७. बांध तुटल्यामुळे व बागा उध्वस्त झाल्यामुळे सबा चा व्यापार ही वाईट रित्या प्रभावित झाला. जे व्यापारी काफिले, जे सुगंधित मसाले व इतर मौल्यवान वस्तू घेऊन सिरीया कडे जात असत त्यांचा कारभार ही ठप्प झाला परिणामी सबा चे विभिन्न कबीले देश सोडून जाण्यास प्रवृत्त झाले आणि तहामा, सिरीया वगैरे प्रदेशांत निवास पत्करला. अशा प्रकारे सबा जनसमूह इतस्तत: विखुरला गेला व ते भटकले.

काही भाष्यकारांनी लिहीले आहे की सबा जनसमूहा कडे पैगंबर पाठविले गेले होते परंतु ही गोष्ट ना कुरआनात निवेदिली गेली आहे आणि ना एखाद्या सहीह हदीस मध्ये आणि जी शिक्षा सबा जनसमूहास मिळाली त्यावरुन असे दिसून येते की कोणताही पैगंबर प्रत्यक्षत: त्यांच्या कडे पाठविला गेला नव्हता आणि ना पैगंबरास खोटे ठरविण्याचा हा परिणाम होतो की त्या जनसमूहाचा समूळ नाश केला जावा परंतु सबा च्या अर्थोपार्जनाचे साधन नष्ट केले गेले होते. आणि त्यांचे संघटन विस्कळीत केले गेले. ही शिक्षा त्या शिक्षे हून भिन्न होती जी पैगंबरांना खोटे ठरविणाऱ्या जनसमूहास

दिला जात होती. राहीले इस्लामी आवाहनाचे सबा जनसमूहाप्रत पोहचणे व त्यांच्यावर अल्लाहचे प्रमाण प्रस्थापित होणे तर हे कार्य हजरत सुलेमान द्वारे ही पार पडले होते आणि बनी इस्त्राईल वंशाच्या इतर पैगंबरांद्वारे ही पार पडत राहीले असेल कारण त्या काळात पवित्र भूमी स इस्लामी आवाहना चे केंद्र बनविले गेले होते, या साठी की बनी इस्त्राईल द्वारे इतर जनसमूहां पर्यंत आवाहन पोहचावे.

४८. सबा च्या या ऐतिहासिक घटनेत मार्गदर्शनाची बरीच सामुग्री उपलब्ध आहे. उदाहरणार्थ हे की एखाद्या जनसमूहाची सुख समृध्दी अल्लाहच्या उपकाराचा परिणाम म्हणून असते; आणि जेव्हा तो जनसमूह याची अवहेलना करतो व आपल्या पालन कर्त्या कडे पाठ फिरवितो तेव्हा त्या जनसमूहाच्या सुख समृध्दीस अल्लाह कष्ट यातनामय वाईट स्थितीत बदलतो.दुसरे असे की जनसमूहांचा उत्कर्ष व ऱ्हास केवळ बाह्य कारणांमुळे होत नाही, किंबहुना या मागे अल्लाहचे बुद्धि कौशल्य व त्याचा न्याय विधि कार्यरत असतो. तिसरे हे की त्याने सबा ला कृतघ्नतेची शिक्षा देऊन बोध प्राप्ती साठी एक उदाहरण मांडले जे इतिहासाच्या पानांवर अंकित झाले. चौथे असे की हे विश्व केवळ मौज मारण्या साठी नाही किंबहुना जबाबदाऱ्या पार पाडण्यावर अवलंबून आहे.

परंतु अल्लाह व आखिरत कडे मार्गदर्शन करणाऱ्या या निशाण्यां पासून तेच लोक लाभ घेतात जे धैर्य व कृतज्ञते चे गुण आपल्या अंगी बाळगतात.

४९. संकेत या गोष्टीकडे आहे जी इब्लीस (सैताना) ने म्हटली होती.

وَلَاُغْوِ يَنَّهُمْ اَجْمَعِيْنَ اِلَّا عِبَادَکَ مِنْهُمُ الْمُخْلَصِيْنَ۔ (حجر۔۳۹،۴۰)

"आणि मी त्या सर्वांना बहकवीन, तुझ्या त्या दासां शिवाय ज्यांना तू यांच्या पैकी विशेष ठरविले." (सूरह हिज्र- ३९,४०)

وَلَا تَجِدُ اَكْثَرَهُمْ شَاكِرِيْنَ۔ (اعراف۔۱۷)

'आणि तुला यांच्या पैकी बहुतेक कृतज्ञशील आढळणार नाहीत'. (सूरह अअराफ - १७)

आणि सबा जनसमूहाने सैतानाला आपला विचार खरा सिद्ध करुन दाखविण्याचा अवसर दिला.

५०. तात्पर्य, सबा जनसमूहात एक ईमान बाळगणारा समूह देखील होता ज्याने सैतानाचे अनुसरण केले नाही आणि अल्लाहशी कृतघ्नतेचे वर्तन अंगिकारले नाही.

५१. म्हणजे सैतानाने आपल्या अनुसरणा करीता लोकांना विवश केले नव्हते, किंबहुना केवळ प्रोत्साहित केले होते, म्हणून ज्या लोकांनी त्याचे अनुसरण केले ते आपल्या कर्मास स्वत:च जबाबदार आहेत.

५२. म्हणजे सर्वश्रेष्ठ अल्लाहने सबा ला प्रथम सुस्थिती आणि नंतर वाईट स्थिती आणून अशा कसोटीत टाकले की ते आखिरत ला मानतात किंवा नाही. जे आखिरत वर ईमान राखणारे आहेत ते त्या लोकांपासून वेगळे होतील ज्यांना आखिरतचा विश्वास नाही व जे संशयग्रस्त झाले आहेत.

तात्पर्य, अल्लाहशी कृतज्ञता खऱ्या अर्थाने तीच होय जी आखिरतवर ईमान राखून असावी.

५३. इथून संबोधनाचा रोख अनेकेश्वर वाद्यांकडे वळला आहे आणि शिर्क (अनेकेश्वर वादा) चे खंडन करण्यात मन मस्तिष्कास अपील करणाऱ्या गोष्टी फर्माविल्या गेल्या आहेत.

५४. हे अनेकेश्वर वाद्यांच्या त्या श्रद्धेचे खंडन आहे की त्यांची उपास्ये काही ईश्वरीय अधिकार बाळगतात. फर्माविले गेले की, ते तिळमात्र देखील अधिकार बाळगत नाहीत, ना आकांशामध्ये आणि ना जमीनीवर. समस्त अधिकार अल्लाहला आहे, तेव्हा जे अधिकार शून्य आहेत, ते कशा प्रकारे उपासनेस पात्र ठरले आणि त्यांची भक्ति उपासना करुन कोणती गोष्ट साध्य केली जाऊ शकते?

या आयतीत अल्लाह खेरीजच्या उपास्यां करीता अधिकारांचा जो नकार दर्शविला गेला आहे त्याने केवळ मूर्तिपूजकांच्याच श्रद्धेचे खंडन होत नाही,तर कबरांची पूजा करणाऱ्यांच्या श्रद्धेचेही खंडन होते. ते देखील कुतुब, अब्दाल इत्यादींना अधिकार बाळगणारे व त्या अधिकारांचा वापर करणारे मानतात आणि या बाबत असे स्पष्टीकरण करतात की हे अधिकार त्यांना अल्लाहने प्रदान केल्यामुळे प्राप्त झाले आहेत. परंतु प्रथम तर हे अल्लाह संबंधाने असत्य आहे, कारण सर्वश्रेष्ठ अल्लाहने असे कोठेही फर्माविले नाही की त्याने अमक्या तमक्या ला वापराचे अधिकार दिले आहेत. दुसरे असे की ईश्वरीय अधिकार मूळातच दुसऱ्याच्या नावावर चढवून देण्याजोगे (Transferable) बाळगणारे नाहीत,अगदी असेच, जसे (ईश्वराचा कोणताही अंश दुसऱ्याच्या नावे चढवण्याजोगा नाही, अन्यथा अल्लाहच्या गुणवैशिष्ट्यां मध्ये अनेकेश्वरवाद अपरिहार्यपणे येईल. आपल्या निर्मितीस अल्लाह जे अधिकार प्रदान करतो ते रचनात्मक स्वरुपाचे असतात. म्हणजे ईश्वर-निर्मित असतात, ईश्वरच्या स्वत:च्या अधिकाराचा भाग म्हणून नव्हे. आणि गरज पूर्तता, तक्रार निवारण व संकट निवारणाचा संबंध ईश्वरीय अधिकारांशी आहे. कारण या साठी उपस्थित व बघणारा असणे, प्रत्येक माणसाच्या स्थितीस जाणणे, ज्या भाषेत तो आर्जव करील ती समजणे, त्याच्या हृदयस्थ गोष्टीस जाणणे व त्याच्या गरजा भागविण्याचे सामर्थ्य बाळगणे

आवश्यक आहे. म्हणून दासांना अर्थात माणसांना जे अधिकार प्राप्त असतात ते रचनात्मक स्वरुपाचे व अत्यंत मर्यादित असतात. तक्रार निवारण व गरजपूर्ति सारख्या ईश्वरीय अधिकारांशी त्यांच्या किंचितमात्र संबंध नसतो. हा फरक दृष्टीआड करुन कितीतरी मुसलमान शिर्क (अनेकेश्वरवादा) मध्ये गुरफटले गेले आहेत. आणि आता अशी भाष्ये ही लिहीली जात आहेत जी शिर्क बाबत लोकांना गोंधळात टाकात आहेत. एक उध्दरण :-

'माहित झाले की एखाद्या गोष्टीवर स्वामीत्व नसणे मूर्तिकरीता आहे. पैगंबर, अवलीया, रब (पालनकर्त्या) चे प्रदान केल्याने रब च्या प्रत्येक गोष्टीचे स्वामी आहेत' (मुख्तसर तफसीर नईमी पृष्ठ - ६८७)

आयतीचे हे स्पष्टीकरण किती मार्गभ्रष्ट करणारे आहे, जी आयत अल्लाह खेरीजच्या उपास्यांच्या अधिकारांचा नकार दर्शविते, तिला पैगंबर, अवलीयांच्या अधिकार बाळगण्याचा पुरावा म्हणून प्रस्तुत केले जात आहे. म्हणजे जी आयत मार्गदर्शना साठी होती तिच्यापासून मार्गभ्रष्टता ग्रहण केली गेली. सर्वश्रेष्ठ अल्लाह असल्या मार्गभ्रष्टते पासून रक्षण करो.

५५. म्हणजे आकाश व जमीन निर्माण करण्यात अल्लाह खेरीजच्या उपास्थांचा काडीमात्र हिस्सा नाही, मग यांना या सृष्टीत ते अधिकार कोठून प्राप्त झाले जे सृष्टी रचयित्याचे गुणविशेष असू शकतात?



९. सबा द्वारे बनविलेल्या सद्दे मआरीब धरणाचे अवशेष

२. सद्दे मआरीब चे अवशेष



३. सद्दे मआरीब चे अवशेष



२३. त्याच्या समोर कोणती ही शिफारस उपयोगी पडू शकत नाही, मात्र ज्यांच्या करीता त्याने अनुमति द्यावी.[५६] येथपावेतो की जेव्हा त्यांच्या हृदयातून दहशत निघून गेली तेव्हा ते विचारतील, तुमच्या पालन कर्त्याने काय फर्माविले?[५७] ते म्हणतील, अगदी सत्य फर्माविले आहे.[५८] आणि तो उच्चतम व श्रेष्ठतम आहे.[५९]

وَلَا تَنفَعُ الشَّفَاعَةُ عِندَهُ إِلَّا لِمَنْ أَذِنَ لَهُ ۚ حَتَّىٰ إِذَا فُزِّعَ
عَن قُلُوبِهِمْ قَالُوا مَاذَا قَالَ رَبُّكُمْ ۖ قَالُوا الْحَقَّ ۖ وَهُوَ الْعَلِيُّ
الْكَبِيرُ ﴿٢٣﴾

२४. यांना विचारा, आकाशातून व जमीनीतून कोण तुम्हाला उपजिविका देतो ? सांगा अल्लाह आणि आम्हा-तुम्हा दोघांपैकी एक मार्गदर्शना वर आहे तर दुसरा उघड मार्गभ्रष्टतेत.[६०]

قُلْ مَن يَرْزُقُكُم مِّنَ السَّمَاوَاتِ وَالْأَرْضِ ۖ قُلِ اللَّهُ ۖ وَإِنَّا أَوْ إِيَّاكُمْ
لَعَلَىٰ هُدًى أَوْ فِي ضَلَالٍ مُّبِينٍ ﴿٢٤﴾

२५. सांगा, तुम्हास आमच्या अपराधा बाबत विचारले जाणार नाही आणि जे काही तुम्ही करीत आहात, त्या विषयी आम्हाला विचारले जाणार नाही.[६१]

قُل لَّا تُسْأَلُونَ عَمَّا أَجْرَمْنَا وَلَا نُسْأَلُ عَمَّا تَعْمَلُونَ ﴿٢٥﴾

२६. सांगा, आमचा पालन कर्ता आम्हा सर्वांना एकत्र करील[६२] मग आमच्या दरम्यान सत्या सह निर्णय करील.[६३] आणि तोच निर्णय करणारा, ज्ञानी आहे.

قُلْ يَجْمَعُ بَيْنَنَا رَبُّنَا ثُمَّ يَفْتَحُ بَيْنَنَا بِالْحَقِّ وَهُوَ الْفَتَّاحُ الْعَلِيمُ ﴿٢٦﴾

२७. सांगा, जरा मला दाखवा तरी,ते कोण आहेत ज्यांना तुम्ही त्याच्या सोबत सहभागी बनवून ठेवले आहे.[६४] मुळीच नव्हे. प्रभुत्वशाली आणि बुद्धिकौशल्य बाळगणारा तर केवळ अल्लाह आहे.[६५]

قُلْ أَرُونِيَ الَّذِينَ أَلْحَقْتُم بِهِ شُرَكَاءَ ۖ كَلَّا ۚ بَلْ هُوَ اللَّهُ
الْعَزِيزُ الْحَكِيمُ ﴿٢٧﴾

२८. आणि (हे पैगंबर !) आम्ही तुम्हाला समस्त लोकांकरीता शुभ समाचार देणार व खबरदार करणारा बनवून पाठविले आहे. परंतु अधिकांश लोक जाणत नाहीत.[६६]

وَمَا أَرْسَلْنَاكَ إِلَّا كَافَّةً لِّلنَّاسِ بَشِيرًا وَنَذِيرًا وَلَٰكِنَّ أَكْثَرَ النَّاسِ
لَا يَعْلَمُونَ ﴿٢٨﴾

२९. हे लोक तुम्हाला विचारतात की हा वायदा केव्हा पूर्ण होईल, जर तुम्ही सच्चे आहात ?[६७]

وَيَقُولُونَ مَتَىٰ هَٰذَا الْوَعْدُ إِن كُنتُمْ صَادِقِينَ ﴿٢٩﴾

३०. सांगा, तुमच्या साठी एका अशा दिवसाची वेळ निर्धारीत आहे, ज्या पासून तुम्ही ना एक क्षण मागे जाऊ शकता आणि ना पुढे जाऊ शकता.[६८]

قُل لَّكُم مِّيعَادُ يَوْمٍ لَّا تَسْتَأْخِرُونَ عَنْهُ سَاعَةً
وَلَا تَسْتَقْدِمُونَ ﴿٣٠﴾

५६. संकेत फरिश्त्यांकडे आहे ज्यांना अनेकेश्वरवादी अल्लाहच्या मुली समजून पूजीत असत व असे म्हणत की हया अल्लाह समोर आमची शिफारस करणाऱ्या आहेत. म्हणजे जर कियामत प्रस्थापित झालीच तर हे फरिश्ते अल्लाह समोर आमची शिफारस करुन आम्हाला अल्लाहच्या शिक्षेतून मुक्ति देतील. शिफारसीच्या या कल्पनेस खोटे ठरवित स्पष्ट केले गेले आहे की फरिशत्यांची ही मजाल नाही की ते अल्लाह समोर एखाद्याची शिफारस करतील. असे मुळीच नव्हे की ते आपली शिफारस मान्य करवून घेतील. शिफारस अल्लाहच्या क्षमादानाचे एक स्वरुप होय व ती अशाच लोकांच्या बाबतीत होऊ शकेल ज्यांच्या करीता अल्लाहने परवानगी द्यावी अर्थात ही अनुमति अनेकेश्वरवादी व काफिरांच्या बाबतीत तर मुळीच नसेल कारण त्यांच्या करीता क्षमेचे द्वार बंद राहील. शिफारस च्या अधिक स्पष्टीकरणा साठी पहा सूरह मरीयम टीप क्र. १११, सूरह बकरा टीप क्र. ४१२ आणि सूरह अंबिया टीप क्र. ३१.

५७. या वाक्यांशा चा संबंध 'परंतु ज्यांच्या करीता त्याने अनुमति द्यावी' शी आहे म्हणजे ज्या लोकांच्या बाबतीत शिफारसी ची अनुमति दिली जाईल तर तिची संधी ही कियामतीच्या दिवशी एका विशिष्ट अवस्थेतच येईल. ही अवस्था येईपावेतो तर शिफारसी ची इच्छा बाळगणाऱ्यांवर भय दहशतीचे सावट असेल आणि ते भिती ग्रस्त असतील. त्यांची ही भिती त्या वेळी दूर होईल जेव्हा सर्वश्रेष्ठ अल्लाह त्यांच्या हक्कात शिफारस करण्याची अनुमति फरिश्ते, पैगंबर इत्यादिंना देईल. त्या वेळी ते शिफारस करणाऱ्यांना विचारतील की तुमच्या पालनकर्त्याने काय फर्माविले ?

५८. यावर ते उत्तर देतील की सत्य फर्माविले म्हणजे त्याने शिफारसी ची परवानगी दिली आहे आणि ती सत्य व न्यायावर आधारीत आहे. अर्थात त्याने तुमच्या बाबतीत शिफारसीची अनुमति अशासाठी दिली आहे की तुम्ही अनेकेश्वरवादी व काफीर नव्हते.

यावरुन शिफारसी संदर्भात हे लक्षात आणून देण्याचा हेतु आहे की :-

१) फरिश्त्यांच्या शिफारसी ची ती कल्पना जी अनेकेश्वर वाद्यांनी कायम केलेली आहे अगदी चुकीची व मिथ्या आहे.

२) कियामतीच्या दिवशी मुक्तिचा खरा आधार ईमान व सत्कर्म हाच असेल. शिफारस एक अपवादात्मक बाब असेल जी त्याच लोकांबाबत घडेल जे अनेकेश्वरवादी व काफीर नसतील व ज्यांच्या विषयी अल्लाहने शिफारस करण्याची अनुमती द्यावी.

३) ही अनुमति देखील एका विशेष अवस्थेत दिली जाईल. त्या वेळे पर्यंत शिफारसी ची अभिलाषा बाळगणाऱ्यांवर भयाचे वातावरण असेल. म्हणजे जो पर्यंत शिफारस केली जात नाही तोपावेतो कियामतीचा प्रदीर्घ दिवस त्यांच्याकरीता मोठा आणि बाणीचा दिवस असेल. मनुष्य जेव्हा काही काळ संकट सहन करण्यास तयार नसतो तेव्हा शिफारसी वर भरवसा ठेवून कियामतीच्या दिवसा चे दीर्घ संकट सहन करण्यास कसा तयार होतो उचित हेच की माणसाने शिफारसी वर भरवसा ठेवण्याऐवजी ईमान व सदाचाराने परिपूर्ण असे जीवन जगावे.

आजच्या मुसलमानां मध्ये ही शिफारसी ची चुकीची कल्पना रुढ झाली आहे. आणि याच कारणास्तव बहुसंख्य मुसलमान आचरणाशून्य झाले आहेत. त्यांनी जर कुरआनाच्या या आयतींवर नीट विचार केला असता तर या स्तराप्रत पोहचले नसते.

काही भाष्यकारांनी 'त्यांच्या मनातील भिती निघून गेली' शी अभिप्रेत फरिशत्यांची भिती घेतली आहे, परंतु عَنْ قُلُوبِهِمْ 'त्यांच्या मनातून' हे शब्द फरिश्त्यांसाठी योग्य असण्यात शंका आहे. जर फरिश्त्यांची भिती अभिप्रेत असती तर, عَنْ أَنْفُسِهِمْ 'त्यांच्या जीवातून' हा शब्दप्रयोग केला गेला असता. म्हणून आम्ही, शिफारसी ची इच्छा बाळगणाऱ्यांची भिती 'हा अर्थ घेतला आहे आणि आयती चा जो आशय आम्ही निवेदिला आहे, त्यानंतर आमच्या मते कोणतीही शंका बाकी राहात नाही. अल्लाह सर्वज्ञ आहे.

५९. अल्लाह उच्चतम व श्रेष्ठतम आहे जिचा म्हणून कोणाची हिम्मत नाही की जबरदस्तीने त्याच्याकडून शिफारस मात्र करुन घ्यावी.

६०. म्हणजे जेव्हा या वस्तुस्थिती पासून जिचा तुम्हाला ही इन्कार नाही की उपजिविका अल्लाहच दोतो मग अल्लाह खेरीजच्या उपास्यांना, जे उपजिविका देत नाही, उपास्य बनविण्यात कोणती धर्मानुकूलता आहे? आणि जेव्हा आम्ही वास्तविक उपजिविका देणाऱ्यास च उपास्य मानले आणि जे उपजिविका देत नाही त्यांना तुम्ही उपास्य मानले तेव्हा आमचा व तुमचा मार्ग वेगळा झाला अर्थात, अपरिहार्य पणे आम्हा दोघांपैकी एक मार्गदर्शन प्राप्त आहे तर दुसरा मार्गभ्रष्ट. आता तुम्हीच विचार करा की मार्गदर्शन प्राप्त कोण आहे व मार्गभ्रष्ट कोण?

आयतीत ज्या शैलीत गोष्ट सांगितली गेली आहे, ती इन्कार करणाऱ्यांना विचार चिंतनाचे आवाहन करण्यासाठी आहे.

६१. या आयतीत ही इन्कार करणाऱ्यांना विचार चिंतन करण्याचे आवाहन केले गेले आहे की तुम्ही आम्हालाच अपराधी समजता परंतु जर आम्ही खरोखर अपराध केला आहे तर याचे उत्तरदायित्व आमच्यावर आहे, तुमच्यावर नव्हे आणि तुमच्या आचरणाविषयी तुम्हालाच पृच्छा केली जाईल, आम्हाला नव्हे. यास्तव बुद्धि मत्तेची निकड अशी की तुम्ही आम्हाला अपराधी ठरविण्या पूर्वी स्वत: आपल्या श्रद्धा व आचरणास पडताळून पहा

की काय ते दुरुस्त आहे. आणि कियामतीच्या दिवशी जेव्हा तुम्हाला या बाबत विचारले जाईल,तुम्ही काय उत्तर देऊ शकाल?

६२. म्हणजे कियामतीच्या दिवशी.

६३. कियामतीच्या दिवशी सर्वश्रेष्ठ अल्लाह ईमान बाळगणाऱ्यांच्या व काफिरांच्या दरम्यान सत्य व न्याया च्या आधारावर निर्णय करील व आपला फैसला लागू ही करील की कोणता समूह सत्यावर होता व कोणता असत्यावर, कोणी सत्य धर्माचे अनुसरण केले व कोण असत्य धर्माचे अनुसरण करीत राहीले.

६४. हा प्रश्न देखील अनेकेश्वर वाद्यांना विचारचिंतन करण्याचे आवाहन करतो की ज्यांना तुम्ही उपास्य बनवून ठेवले आहे, त्यांच्या अंगी असे कोणते ईश्वरीय गुणवैशिष्ट्य आहे, ज्या आधारे तुम्ही त्यांना अल्लाहचे सहभागी ठरविलेले आहे व त्या आधारे तुम्ही त्यांची भक्ति-आराधना करता, वस्तुत: ज्याची उपासना केली जावी असा केवळ अल्लाह आहे.

६५. म्हणजे अल्लाहशिवाय असा कोणी नाही जो वर्चस्व व अधिकार आणि ज्ञान-बुध्दिकौशल्यादि गुणविशेषांनी सम्पन्न असावा. यास्तव तुम्ही ज्यांना ईश्वर व उपास्य बनवून ठेवले आहे ते कदापि ईश्वर नाहीत आणि ना उपासना करण्या जोगे होत.

६६. हे पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या सार्वभौमिक प्रेषित्वाचे ऐलान होय की त्यांना केवळ अरब जन समुदाया साठी पाठविले गेले नाही, किंबहुना राष्ट्रजनसमूहादि कसलही बंधन न पाळता समस्त मानव जाति कडे पाठविले गेले आणि कियामती पर्यंत जन्मास येणारे समस्त जनसमूह त्यांचेच आवाहन करणारे जनसमूह आहेत. या ठिकाणी इन्कार करणाऱ्यांना हे स्पष्ट करण्याचा हेतु आहे की ज्या व्यक्तिमत्वाचा विरोध करण्यात तुम्ही जिवाचे रान करीत आहात आणि त्याची अवहेलना करीत आहात त्यास सर्वश्रेष्ठ अल्लाहने इतका वैभवशाली पैगंबर बनवून पाठविले आहे की तो संपूर्ण मानवते करीता मार्गदर्शक आहे. एवढी मान प्रतिष्ठा बाळगणाऱ्या व्यक्तिची जर तुम्ही अवहेलना करता तर ही तुमच्या करीता मोठी वंचिततेची बाब होय.

६७. म्हणजे कियामतीचा वायदा केव्हा पूर्ण होईल.

६८. अर्थात कियामतीची वेळ निश्चित आहे तुमच्या इच्छेनुसार ना एक क्षण आधी येऊ शकते आणि ना एक क्षण नंतर आणि जेव्हा कियामतीचा उदय होईल तर योग्य वेळी तुम्हाला हजर केले जाईल. त्या वेळेच्या ना एक क्षण आधि ना एक क्षण नंतर.

आम्ही ज्या वस्तीत ही एखादा खबरदार करणारा पाठविला तर त्यातल्या सुखवस्तु लोकांनी हेच म्हटले की जो संदेश देऊन तुम्हास पाठविले गेले आहे,आम्ही त्याचा इन्कार करणारे आहोत. आणि ते म्हणाले, आम्ही तुमच्याहून अधिक धन संपदा व संतती बाळगतो आणि आम्हाला ईश शिक्षा मुळीच दिली जाणार नाही.(अल-क़ुर्आन)

३१. काफिर म्हणतात आम्ही या कुरआनावर मुळीच ईमान बाळगणार नाही आणि ना या पूर्वीच्या कोणत्याही ग्रंथावर.[६९] आणि जर तुम्ही (यांच्या त्या अवस्थेस) पाहीले असते जेव्हा हे अत्याचारी आपल्या पालन कर्त्या समोर उभे केले जातील.[७०] ते एकमेकांचा धिक्कार करतील जे लोक दुर्बल होते, ते त्या लोकांना,जे मोठे बनून राहीले होते, म्हणतील, तुम्ही नसता तर आम्ही खचितच मोमीन (ईमान बाळगणारे) असतो.[७१]

وَقَالَ الَّذِينَ كَفَرُوا لَن نُّؤْمِنَ بِهَٰذَا الْقُرْآنِ وَلَا بِالَّذِي
بَيْنَ يَدَيْهِ ۗ وَلَوْ تَرَىٰ إِذِ الظَّالِمُونَ مَوْقُوفُونَ عِندَ رَبِّهِمْ يَرْجِعُ
بَعْضُهُمْ إِلَىٰ بَعْضٍ الْقَوْلَ يَقُولُ الَّذِينَ
اسْتُضْعِفُوا لِلَّذِينَ اسْتَكْبَرُوا لَوْلَا أَنتُمْ لَكُنَّا مُؤْمِنِينَ ٣١

३२. मोठे बनून राहणारे या दुर्बल (कमजोर) लोकांना उत्तर देतील की, काय आम्ही तुम्हाला मार्गदर्शना पासून रोखले होते, जेव्हा ते तुमच्या पर्यंत येऊन पोहचले होते? नव्हे, किंबहुना तुम्ही स्वत: गुन्हेगार होते.

قَالَ الَّذِينَ اسْتَكْبَرُوا لِلَّذِينَ اسْتُضْعِفُوا أَنَحْنُ صَدَدْنَاكُمْ عَنِ
الْهُدَىٰ بَعْدَ إِذْ جَاءَكُم ۖ بَلْ كُنتُم مُّجْرِمِينَ ٣٢

३३. दुर्बल लोक मोठे बनून राहणाऱ्यांना म्हणतील, नव्हे, किंबहुना तुमची अहोरात्र लबाडी होती जेव्हा तुम्ही आम्हाला सांगत की अल्लाह ला मानू नये व त्याचे सहभागी ठरवावेत, आणि जेव्हा ते अल्लाह च्या शिक्षेस पाहतील तेव्हा मनात लज्जित होतील आणि आम्ही काफीरांच्या मानांमध्ये जोखड टाकू. त्यांना मोबदला म्हणून तेच मिळेल जे ते करीत राहीलेत.[७२]

وَقَالَ الَّذِينَ اسْتُضْعِفُوا لِلَّذِينَ اسْتَكْبَرُوا بَلْ مَكْرُ اللَّيْلِ
وَالنَّهَارِ إِذْ تَأْمُرُونَنَا أَن نَّكْفُرَ بِاللَّهِ وَنَجْعَلَ لَهُ أَندَادًا ۚ
وَأَسَرُّوا النَّدَامَةَ لَمَّا رَأَوُا الْعَذَابَ وَجَعَلْنَا الْأَغْلَالَ فِي
أَعْنَاقِ الَّذِينَ كَفَرُوا ۚ هَلْ يُجْزَوْنَ إِلَّا مَا كَانُوا يَعْمَلُونَ ٣٣

३४. आम्ही ज्या वस्तीत ही एखादा खबरदार करणारा पाठविला तर त्यातल्या सुखवस्तु लोकांनी हेच म्हटले की जो संदेश देऊन तुम्हास पाठविले गेले आहे,आम्ही त्याचा इन्कार करणारे आहोत.[७३]

وَمَا أَرْسَلْنَا فِي قَرْيَةٍ مِّن نَّذِيرٍ إِلَّا قَالَ مُتْرَفُوهَا إِنَّا بِمَا
أُرْسِلْتُم بِهِ كَافِرُونَ ٣٤

३५. आणि ते म्हणाले, आम्ही तुमच्याहून अधिक धन संपदा व संतती बाळगतो आणि आम्हाला ईश शिक्षा मुळीच दिली जाणार नाही.[७४]

وَقَالُوا نَحْنُ أَكْثَرُ أَمْوَالًا وَأَوْلَادًا وَمَا نَحْنُ بِمُعَذَّبِينَ ٣٥

६९. म्हणजे तौरात, इंजिल (बायबल) इत्यादिंवर.

७०. अर्थात आज तर हे लोक मोठया गर्वाने म्हणतात की आम्ही कुरआन व इतर ईश ग्रंथाना जे आकाशातून अवतरीत झाले मानत नाही, परंतु कियामतीच्या दिवशी जेव्हा जाब देण्यासाठी हे अल्लाह समोर उभे राहतील तेव्हा त्यांना आपल्या या अपराधात्मक चुकीची जाणीव होईल त्या वेळी त्यांचे शिर लज्जेने झुकलेले असेल. कियामतीचे हे दृश्य शब्दात प्रस्तुत केले गेले आहे, अशासाठी की लोकांनी शुद्धीवर यावे.

७१. 'जे लोक दुर्बल होते' शी अभिप्रेत असे लोक होत ज्यांना मोठे बनून राहणाऱ्या म्हणजे नेता व धर्म प्रमुखांनी आपल्या तावडीत घेतले होते व ते त्यांचे अनुयायी बनले होते कियामती च्या दिवशी ते ज्या प्रकारे एकमेकांची निर्भत्सना करतील व एकमेकांचे खंडन करतील, त्याचा एक नमुना येथे दाखविला गेला आहे.

७२. म्हणजे जनता असो किंवा लीडर, अनुयायी असो किंवा नेता अल्लाहला न मानण्यामुळे सर्वच शिक्षेस पात्र ठरतील. लोक आपल्या नेत्या व प्रमुखांवर मार्गभ्रष्ट करण्याचा आरोप ठेवून आपल्या जबाबदारीतून मुक्त होऊ शकत नाही, त्यांनी अल्लाहने दिलेल्या बुध्दिचा वापर का केला नाही आणि डोळे मिटून मोठे बनणाऱ्यांच्या मागे का चालत राहीले? आणि कुरआन व पैगंबरांच्या गोष्टींवर त्यांनी का म्हणून लक्ष दिले नाही?

७३. सुखवस्तु लोक भोगविलासात मग्न असतात म्हणून ते पैगंबरांच्या आवाहना कडे लक्ष देत नाही आणि जेव्हा तो यांना अल्लाहच्या शिक्षेपासून खबरदार करतो तेव्हा ते आपल्या उन्मत्तपणामुळे त्याचा इन्कार करु लागतात आणि अल्लाहचा संदेश रद्द करु लागतात.

७४. म्हणजे सुखवस्तु लोक या भ्रामक कल्पनेत रममाण असतात की धन संपदा व संततीची जी विपुलता प्राप्त आहे, ती या गोष्टीचे लक्षण होय की ते अल्लाहला फार प्रिय आहेत, तेव्हा अल्लाहची शिक्षा भोगण्याचा प्रश्न च कोठे निर्माण होतो?

३६. सांगा, माझा पालन कर्ता ज्याच्या साठी इच्छितो, उपजिविका व्यापक करतो आणि ज्याच्या साठी इच्छितो संकुचित करतो परंतु अधिकांश लोक हे जाणत नाहीत. [७५]

قُلْ اِنَّ رَبِّيْ يَبْسُطُ الرِّزْقَ لِمَنْ يَّشَآءُ وَيَقْدِرُ وَلٰكِنَّ
اَكْثَرَ النَّاسِ لَا يَعْلَمُوْنَ ﴿٣٦﴾

३७. तुमची धनसंपदा आणि तुमची संतती अशी गोष्ट नव्हे, जी तुम्हास आमच्या समीप करणारी बनवीत असावी, [७६] मात्र ज्यांनी ईमान बाळगले व ज्यांनी सत्कर्म केले. [७७] तर त्यांच्या करीता त्यांच्या आचरणाचा दुहेरी मोबदला आहे आणि ते (जन्नत च्या) उंच स्थानी समाधान पूर्वक राहतील.

وَمَآ اَمْوَالُكُمْ وَلَآ اَوْلَادُكُمْ بِالَّتِيْ تُقَرِّبُكُمْ عِنْدَنَا زُلْفٰٓى
اِلَّا مَنْ اٰمَنَ وَعَمِلَ صَالِحًا فَاُولٰٓئِكَ لَهُمْ جَزَآءُ الضِّعْفِ
بِمَا عَمِلُوْا وَهُمْ فِي الْغُرُفٰتِ اٰمِنُوْنَ ﴿٣٧﴾

३८. आणि जे लोक आमच्या आयतींना निष्प्रभ धावपळ करतात,त्यांना ईश शिक्षेच्या तावडीत घेतले जाईल.[७८]

وَالَّذِيْنَ يَسْعَوْنَ فِيْٓ اٰيٰتِنَا مُعٰجِزِيْنَ اُولٰٓئِكَ فِي الْعَذَابِ
مُحْضَرُوْنَ ﴿٣٨﴾

३९. सांगा, माझा पालन कर्ता, आपल्या दासांपैकी ज्याच्या करीता इच्छितो, उपजिविका व्यापक करतो आणि ज्याच्या करीता इच्छितो संकुचित करतो. [७९] आणि जे काही तुम्ही खर्च करता, त्याच्या ऐवजी तो तुम्हाला आणखी देतो आणि तो सर्वोत्कृष्ट उपजिविका देणारा आहे.[८०]

قُلْ اِنَّ رَبِّيْ يَبْسُطُ الرِّزْقَ لِمَنْ يَّشَآءُ مِنْ عِبَادِهٖ
وَيَقْدِرُ لَهٗ ۭ وَمَآ اَنْفَقْتُمْ مِّنْ شَيْءٍ فَهُوَ يُخْلِفُهٗ ۚ
وَهُوَ خَيْرُ الرّٰزِقِيْنَ ﴿٣٩﴾

४०. आणि तो दिवस की जेव्हा या सर्वांना तो एकत्र करील मग फरिशत्यांना विचारील, काय हे लोक तुमची उपासना करीत होते ? [८१]

وَيَوْمَ يَحْشُرُهُمْ جَمِيْعًا ثُمَّ يَقُوْلُ لِلْمَلٰٓئِكَةِ اَهٰٓؤُلَآءِ
اِيَّاكُمْ كَانُوْا يَعْبُدُوْنَ ﴿٤٠﴾

४१. ते म्हणतील, पवित्र आहेस तू. आमचा मित्र तू आहेस, हे लोक नव्हेत.[८२] खरे पाहता हे जिन्नांची उपासना करीत राहीलेत. यांच्या पैकी बहुतेक त्यांच्या वरच श्रध्दा बाळगत होते.[८३]

قَالُوْا سُبْحٰنَكَ اَنْتَ وَلِيُّنَا مِنْ دُوْنِهِمْ ۚ بَلْ كَانُوْا يَعْبُدُوْنَ
الْجِنَّ ۚ اَكْثَرُهُمْ بِهِمْ مُّؤْمِنُوْنَ ﴿٤١﴾

४२. तेव्हा, आजच्या दिवशी तुमच्या पैकी कोणी एकमेकास ना लाभ पोहचवू शकतो आणि ना नुकसान [८४] आणि अत्याचारींना आम्ही सांगू, चाखा आता आगीच्या शिक्षेची गोडी, जिला तुम्ही खोटे ठरवित होता.

فَالْيَوْمَ لَا يَمْلِكُ بَعْضُكُمْ لِبَعْضٍ نَّفْعًا وَّلَا ضَرًّا ۭ وَنَقُوْلُ
لِلَّذِيْنَ ظَلَمُوْا ذُوْقُوْا عَذَابَ النَّارِ الَّتِيْ كُنْتُمْ بِهَا تُكَذِّبُوْنَ ﴿٤٢﴾

७५. हे त्या सुखवस्तु लोकांच्या दाव्यांचे खंडन होय की धन व संतती ची विपुलता अल्लाहचे आवडते असण्याचे लक्षण नव्हे उपजिविकेत विपुलता व तंगी त्यच्या मर्जीवर अवलंबून आहे त्याच्या प्रसन्नते चे लक्षण म्हणून नव्हे. तो आपल्या दासांच्या योग्य गोष्टी लक्षात घेता ज्याला इच्छितो अमर्याद उपजिविका प्रदान करतो. तर ज्याला इच्छितो मोजून मापून देतो अर्थात दोन्ही ही स्थितीत दासांची परिक्षा असते की ते सहनशीलता पाळतात व कृतज्ञशील राहतात किंवा नाही. परंतु या वस्तुस्थितीस बहुसंख्य लोक जाणत नाही, म्हणून चुकीचे स्पष्टीकरण देऊ लागतात.

७६. इन्कार करणाऱ्यांच्या या विचाराचे हे खंडन आहे की ज्याच्या जवळ धन-संतती ची विपुलता आहे, तो अल्लाहचा आवडता व सान्निध्य प्रप्त दास आहे. या गोष्टीतर त्या लोकांनाही प्राप्त होतात जे दुराचारी, व्याभिचारी व उत्पात माजविणारे असतात मग याला ईश्वर सान्निध्याचे लक्षण कशा प्रकारे मानले जाऊ शकते?

७७. म्हणजे ईमान आणि सदाचार याच त्या गोष्टी होत की ज्या द्वारे मनुष्य अल्लाहचे सान्निध्य प्राप्त करतो व हे गुणवैशिष्ट्य बाळगणारे लोकच अल्लाहचे प्रिय दास होत.

७८. अर्थात जे लोक अल्लाहच्या वचनांच्या विरोधात मग्नता दाखवित आहेत. त्यांना शिक्षा भोगावीच लागेल, मग या जगात ते कीती ही धनवान असोत आणि संतती चा कितीही मोठा जथा त्यांच्या जवळ असो त्यांचा हा दिमाख जगातच राहीला आणि आखिरत मध्ये त्यांना ईश शिक्षेच्या हवाली केले जाईल.

७९. वर हा मजकूर उल्लेखिला गेला. या आयतीत 'आपल्या दासां पैकी' ची वाढ आहे. या ठिकाणी अल्लाहचे अन्न-दातृत्व स्पष्ट करण्या चा हेतु आहे.

८०. म्हणजे अल्लाह उपजिविका देणारा आहे या गोष्टीवर विचार चिंतन करा. तो तुम्हाला सतत उपजिविका देत आहे. जे काही तुम्ही खर्च करता, त्यानंतर असे होत नाही की तुमच्या जवळ काहीच उरले नसावे किंबहुना तुम्ही खर्च करता आणि तो तुम्हाला आणखी प्रदान करतो. किती उत्कृष्ट अन्न दाता उपजिविका देणारा आहे तो. तरीही तुम्ही त्याचे कृतज्ञ दास बनत नाही.

८१. या ठिकाणी कियामतीचे आणखीन एक दृश्य सादर केले गेले आहे. अनेकेश्वरवादी जेव्हा हश्र च्या मैदानात (ज्या ठिकाणी कर्मांचा हिशेब घेतला जाईल) जमा होतील, तेव्हा सर्वश्रेष्ठ अल्लाह फरिशत्यांना विचारील की, काय हे लोक तुमची उपासना करीत होते?

८२. फरिश्ते उत्तरादाखल सर्वप्रथम अल्लाहच्या पावित्र्याचे निवेदन करतील की तू या गोष्टीपासून पवित्र आहे की एखादा तुझा सहभागी असावा आणि या मार्गभ्रष्ट झालेल्यांना दोस्त बनविले नव्हते, ज्यामुळे यांच्या भक्तिने प्रसन्न झालो असतो व यांच्याशी आपला संबंध जोडला असता परंतु आमचा मित्र तू च होतास व आता ही आहेस.

८३. फरिश्ते अधिक म्हणतील की हे खरे पाहता जिन्नांची उपासना करीत होते, व त्यांच्या वरच श्रध्दा ठेवणारे होते. अर्थात यांनी आमची उपासना केलेली असली तरी ती आमच्या सांगण्यावरुन नव्हे, तर सैतान जिन्नांच्या इशाऱ्यावरुन ते त्याच्याबाबत इतके श्रद्धाळू होते की त्यांच्या मागे मागे चालत राहीले व मार्गभ्रष्ट होत राहीले. आम्हाला यांच्याशी काही कर्तव्य नव्हते. फरिश्त्यांचे हे निवेदन त्यांच्या भक्तांना ही हकीगत स्पष्ट करेल की फरिशत्यांना माबूद (उपास्य) बनविणे आणि अल्लाहचे सहभागी ठरविणे उचित नव्हते.

८४. फरिशत्यांच्या या निवेदना नंतर अनेकेश्वरवादी, त्यांच्या कडून शिफारसीची अपेक्षा बाळगत होते, निराश होतील की ते यांच्या काहीच उपयोगी पडू शकले नाहीत. हा आहे अल्लाहला सोडून इतरांच्या आश्रयावर जगण्याचा परिणाम!

४३. या लोकांना जेव्हा आमच्या दिव्य आयती ऐकविल्या जातात तेव्हा हे म्हणतात की हर तर केवळ एक मनुष्य आहे [८६] जो असे इच्छितो की तुम्हाला त्या गोष्टी पासून रोखावे ज्यांची भक्ति तुमचे वाड-वडील करीत आले आहेत, आणि म्हणतात की हे (कुरआन) केवळ मनाने रचलेले असत्य आहे. आणि या काफिरां समोर जेव्हा सत्य आले, तेव्हा ते म्हणाले, ही तर उघड जादू आहे.

وَإِذَا تُتْلَىٰ عَلَيْهِمْ آيَاتُنَا بَيِّنَاتٍ قَالُوا مَا هَٰذَا إِلَّا رَجُلٌ
يُرِيدُ أَن يَصُدَّكُمْ عَمَّا كَانَ يَعْبُدُ آبَاؤُكُمْ وَقَالُوا مَا هَٰذَا
إِلَّا إِفْكٌ مُّفْتَرًى ۚ وَقَالَ الَّذِينَ كَفَرُوا لِلْحَقِّ لَمَّا
جَاءَهُمْ إِنْ هَٰذَا إِلَّا سِحْرٌ مُّبِينٌ ﴿٤٣﴾

४४. आम्ही त्यांना ग्रंथ दिले नव्हते ज्यांना ते वाचत असावेत आणि ना तुमच्या पूर्वी यांच्याकडे एखादा खबरदार करणारा पाठविला होता.[८७]

وَمَا آتَيْنَاهُم مِّن كُتُبٍ يَدْرُسُونَهَا ۖ وَمَا أَرْسَلْنَا إِلَيْهِمْ قَبْلَكَ
مِن نَّذِيرٍ ﴿٤٤﴾

४५. यांच्या पूर्वी होऊन गेलेल्या लोकांनी ही खोटे ठरविले होते. जे काही आम्ही यांना दिले होते, त्याच्या दहाव्या हिश्श्या प्रत ही हे पोहचले नाहीत. [८८] त्यांनी माझ्या पैगंबरांना खोटे ठरविले. तर पहा कशी होती माझी शिक्षा ![८९]

وَكَذَّبَ الَّذِينَ مِن قَبْلِهِمْ وَمَا بَلَغُوا مِعْشَارَ
مَا آتَيْنَاهُمْ فَكَذَّبُوا رُسُلِي ۖ فَكَيْفَ كَانَ نَكِيرِ ﴿٤٥﴾

४६. सांगा, मी तुम्हाला एका गोष्टीचा उपदेश करतो ती अशी की अल्लाह प्रित्यर्थ तुम्ही दोन दोन मिळून उभे रहा आणि एक एक करुन ही आणि विचार करा.[९०] तुमच्या सोबत्यास काही वेड लागले नाही.[९१] तो तर एका सक्त ईश शिक्षेच्या (येण्या) पूर्वी तुम्हाला खबरदार करणारा आहे.

قُلْ إِنَّمَا أَعِظُكُم بِوَاحِدَةٍ ۖ أَن تَقُومُوا لِلَّهِ مَثْنَىٰ
وَفُرَادَىٰ ثُمَّ تَتَفَكَّرُوا ۚ مَا بِصَاحِبِكُم مِّن جِنَّةٍ ۚ
إِنْ هُوَ إِلَّا نَذِيرٌ لَّكُم بَيْنَ يَدَيْ عَذَابٍ شَدِيدٍ ﴿٤٦﴾

४७. सांगा, मी जर तुमच्या कडून एखादा मोबदला मागितला आहे तर तो तुमच्याच करता आहे [९२] मला मोबदला देण्याची जबाबदारी तर अल्लाह वर आहे आणि तो प्रत्येक गोष्टीस साक्षी आहे.

قُلْ مَا سَأَلْتُكُم مِّنْ أَجْرٍ فَهُوَ لَكُمْ ۖ إِنْ أَجْرِيَ إِلَّا عَلَى اللَّهِ ۖ
وَهُوَ عَلَىٰ كُلِّ شَيْءٍ شَهِيدٌ ﴿٤٧﴾

४८. सांगा, माझा पालन कर्ता सत्याचा मनात शिरकाव करतो. तो अपरोक्षाच्या समस्त गोष्टी जाणणारा आहे.[९३]

قُلْ إِنَّ رَبِّي يَقْذِفُ بِالْحَقِّ عَلَّامُ الْغُيُوبِ ﴿٤٨﴾

८५. अत्याचारी म्हणजे दुराचारी ज्याची श्रध्दा व आचरण सत्य व न्यायाच्या विपरीत असावे आणि या आधारे तो आपल्या स्वत:वर अत्याचार करीत असावा. या आयतीत, जसे संदर्भावरुन स्पष्ट आहे अत्याचारी शी अभिप्रेत शिर्क (अनेकेश्वर भक्ति) करणारे आणि आखिरतचा इन्कार करणारे होत.

८६. म्हणजे रसूल (पैगंबर) नव्हेत.

८७. म्हणजे इस्माईल वंशात -या अरब लोकांत ईश ग्रंथाचे अवतरण झाले नाही ज्या प्रमाणे बनी इस्राईल वंशात तौरात, इंजील वगैरे ईश-ग्रंथ अवतरले होते. हा एक अशिक्षित जन समूह होता आणि हजरत इस्माईल नंतर कोणताही पैगंबर यांच्यात पाठविला गेला नाही, म्हणून दीर्घ काळानंतर जो पैगंबर अल्लाह तर्फे यांच्याकडे पाठविला गेला आहे, व जो ईश-ग्रंथ यांना प्रदान केला जात आहे त्याबाबत यांनी गुणग्राहक बनले पाहजे की अल्लाहने त्यांच्या मार्गदर्शनासाठी कोणती उपाय योजना केली आहे व तो यांना किती उच्च स्थान देऊ इच्छितो परंतु हे लोक पैगंबर व ईश - ग्रंथाची कदर करण्या ऐवजी त्यांना असत्य व जादू ठरवित आहेत.

८८. अभिप्रेत भूतकालीन ते जनसमूह होत ज्यांना जबरदस्त सामर्थ्य व सत्ताधिकार आणि अर्थोपार्जनाची विपुल साधने उपलब्ध होती उदाहरणार्थ, आद जनसमूह, फिरऔन जनसमूह इत्यादी, यांच्या तुलनेने कुरेश जनसमूहास ना ते सामर्थ्य व अधिकार प्राप्त होता आणि ना तशी सुख समृध्दी. त्यांच्या जवळ ना सैन्यबळ होते आणि ना संस्कृती -संवर्धनाची सामुग्री आणि आर्थिक साधनांची रेलचेल.

८९. म्हणजे जेव्हा ते शाक्तिशाली जनसमूह पैगंबरास खोटे ठरविल्या मुळे ईश-शिक्षे पासून सुरक्षित राहू शकले नाही तर तुम्ही पैगंबरास खोटे ठरवून कशा प्रकारे ईश शिक्षे पासून सुरक्षित राहू शकता? जे सामर्थ्य व धन आणि आर्थिक सामुग्री तुम्हास प्राप्त आहे तिच्या नशेत चूर होऊन पैगंबराच्या विरोधास तयार होणे म्हणजे स्वत:करीता दुष्परिणातिस आमंत्रण देणे होय.

९०. मनुष्य नेहमी आपल्या वातावरण व समाजाच्या मताने प्रभावित असतो आणि हे पाहण्याची तसदी घेत नाही की सत्य काय आहे व असत्य काय. यास्तव या आयतीत ताकीद केली गेली आहे की दोन दोन माणसे मिळून विचार करा की पैगंबरा चे म्हणणे खरोखर वेडयाची बडबड आहे कि बुद्धिमत्तेची व दिव्यदृष्टी ची सामुग्री. त्यांनी आपसात गंभीरपणे यावर चर्चा करुन योग्य निष्कर्षाप्रत पोहचण्याचा प्रयत्न करावा. तसेच एक एक करुन प्रत्येक माणसाने आपल्या परिनेही विचार करावा की या मामल्याचे स्वरुप काय आहे. जर गंभीरपणे विचार करण्याची ही पध्दत अंगिकारली गेली तर योग्य निष्कर्षप्रत पोहचणे कठीण नाही. सर्वश्रेष्ठ अल्लाह निश्चितच यांना याची सुबुद्धि देईल, कारण ज्यांना सत्याचा शोध घ्यायचा असतो त्यांना अल्लाह हमखास सत्याचे स्पष्ट आकलन धडवितो.

९१. पैगंबर (सल्लल्लाहु आलैहि वसल्लम) यांचे पवित्र/स्वच्छ शुध्द चरित्र आणि हे बुद्धिकौशल्य युक्त कुरआन या गोष्टी चा स्पष्ट पुरावा आहे की त्यांना कोणत्याही प्रकार चा बौद्धिक आजार नव्हता, किंबहुना त्यांची बुद्धिमत्ता पराकोटीस पोहचली होती.

९२. अर्थात मी तुमच्या कडून कसलाही मोबदला मागितला नाही जे काही तुमच्या कडून मी अपेक्षिले आहे ते हेच की तुम्ही या मार्ग दर्शनास कबूल करा जे तुमच्या पालन कर्त्याने अवतरीत केले आहे व ज्यास स्विकारण्यात तुमचे स्वत: चेच भले आहे. मी अगदी नि:स्वार्थ होऊन तुमचे हितचिंतन करीत आहे.

९३. म्हणजे माझा पालन कर्ता ज्या गोष्टी वही द्वारे माझ्यावर अवतरीत करीत आहे त्या अगदी सत्य आहेत आणि सत्य का नसाव्यात जेव्हा त्यास अपरोक्ष्याच्या समस्त रहस्य भेदांचे ज्ञान आहे याहून अधिक या गोष्टीचा जाणकार आणखी कोण असू शकतो की उचित काय व अनुचित काय आणि सत्य काय व असत्य काय ?

४९. सांगा,सत्य आले आणि असत्य ना पाहिल्यांदा निर्माण करते आणि ना दुसऱ्यांदा निर्माण करील.[९४]

قُلْ جَآءَ ٱلْحَقُّ وَمَا يُبْدِئُ ٱلْبَٰطِلُ وَمَا يُعِيدُ ﴿٤٩﴾

५०. सांगा, जर मी मार्गभ्रष्ट झालो आहे तर माझ्या मार्ग भ्रष्टतेचे संकट माझ्यावर आहे [९५] आणि जर मी मार्ग दर्शन वर आहे तर ते या वही (ईश-संदेशा) मुळे होय, ज्यास माझा पालनकर्ता माझ्या कडे अवतरीत करतो.[९६] तो सर्व काही ऐकणारा व अतिशय समीप आहे.[९७]

قُلْ إِن ضَلَلْتُ فَإِنَّمَآ أَضِلُّ عَلَىٰ نَفْسِى ۖ وَإِنِ ٱهْتَدَيْتُ
فَبِمَا يُوحِىٓ إِلَىَّ رَبِّىٓ ۚ إِنَّهُۥ سَمِيعٌ قَرِيبٌ ﴿٥٠﴾

५१. आणि जर तुम्ही यांना पाहिले असते जेव्हा हे घाबरलेले असतील आणि पळू शकणार नाहीत आणि जवळूनच पकडले जातील.[९८]

وَلَوْ تَرَىٰٓ إِذْ فَزِعُوا۟ فَلَا فَوْتَ وَأُخِذُوا۟ مِن مَّكَانٍ قَرِيبٍ ﴿٥١﴾

५२. (त्या वेळी) हे म्हणतील की आम्ही यावर ईमान बाळगले. [९९] आणि एवढया लांबून हे याला कोठून प्राप्त करु शकतात ?[१००]

وَقَالُوٓا۟ ءَامَنَّا بِهِۦ وَأَنَّىٰ لَهُمُ ٱلتَّنَاوُشُ مِن مَّكَانٍۭ بَعِيدٍ ﴿٥٢﴾

५३. या पूर्वी यांनी याचा इन्कार केला होता आणि लांबूनच अटकळी चे बाण चालवित राहीले.[१०१]

وَقَدْ كَفَرُوا۟ بِهِۦ مِن قَبْلُ ۖ وَيَقْذِفُونَ بِٱلْغَيْبِ
مِن مَّكَانٍۭ بَعِيدٍ ﴿٥٣﴾

५४. (त्या दिवशी) यांच्या व यांच्या (या) इच्छे च्या दरम्यान अडसर उभा केला जाईल ज्या प्रमाणे यांचे पथ प्रदर्शक सजातीयांशी मामला केला गेला असेल[१०२] ते देखील असेच संशयात पडले होते, ज्याने त्यांना गोंधळात टाकले होत.[१०३]

وَحِيلَ بَيْنَهُمْ وَبَيْنَ مَا يَشْتَهُونَ كَمَا فُعِلَ بِأَشْيَاعِهِم مِّن قَبْلُ ۚ
إِنَّهُمْ كَانُوا۟ فِى شَكٍّ مُّرِيبٍۭ ﴿٥٤﴾

९४. म्हणजे ही गोष्ट स्पष्टत: तुमच्या समोर आली आहे की तौहीद (एकेश्वरवाद) सत्य आहे. राहीले असत्य म्हणजे तुम्ही स्वत: घडविलेली दैवते तर ते ना जीवनाचा आरंभ करतात आणि ना मेल्यानंतर पुनश्च जीवंत करण्यास समर्थ आहेत. मग ते ईश्वर कसे बनलेत आणि उपासना योग्य कसे ठरले?

अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह युनूस टीप. क्र.६१

९५. जेव्हा ताकीदी करीता चर्चा विवादाची पद्धत अंगिकारली जाते तेव्हा काही गोष्टी गृहीत धरुन ही सांगाव्या लागतात, अशासाठी की ज्यांना संबोधले जाते ते पक्षपाता स विसरुन विचार चिंतन करण्यास तयार व्हावेत या ठिकाणी, 'जर मी मार्गभ्रष्ट झालेलो आहे' ही गोष्ट या अनुषंगानेच सांगितली गेली आहे.

९६. म्हणजे माझे मार्गदर्शनावर असणे माझ्या पालनकर्त्याच्या कृपेनेच आहे आणि त्याची कृपा अशी की त्याने मजवर वही (ईश-संदेश) अवतरीत करुन मार्ग दर्शनाचा मार्ग मला खुला केला.

९७. माणसाच्या मार्गभ्रष्टतेचे एक फार मोठे कारण हे की तो अल्लाहला फार दूर समजतो मग इकडे तिकडे आश्रय शोधतो जर त्याने दृढ विश्वास बाळगला की अल्लाह समीप आहे, फार समीप आहे आणि सर्व काही ऐकतो तर तो अल्लाहशीच आपला संबंध जोडील व त्यालाच आपला कार्य -साधक मानील.

९८. या ठिकाणी कियामतीचे आणखी एक दृश्य प्रस्तुत केले जात आहे इन्कार करणारे आज तर मोठया समाधानाने सत्याचा विरोध करीत आहे. परंतु कियामतीच्या दिवशी मोठया धांदलीत असतील व घाबरुन पळू इच्छितील परंतु पळू शकणार नाहीत; कारण फरिश्ते जवळच असतील आणि ते यांना पकडून घेतील. केवढे विचित्र दृश्य असेल ते यांच्या विवशतेचे!

९९. म्हणजे त्या सत्यावर ईमान बाळगले जे अल्लाहने आपल्या पैगंबरावर अवतरीत केले होते.

१००. अर्थात ईमान बाळगण्याची वेळ निघून गेली. जे काम जगात करायचे होते ते आखिरत मध्ये कशा रीतीने केले जाऊ शकते? इहलोक परिक्षा स्थळ होते आणि आखिरत मोबदला प्राप्त करण्याचे ठिकाण. जेव्हा आखिरत मध्ये पोहचले, तेव्हा जगापासून दूर झाले आणि कसोटी च्या स्थाना पासून एवढया दूर पोहचल्या नंतर ईमान प्राप्ती ची कोणतीही स्थिती शक्य राहीली नाही.

१०१. म्हणजे जगात यांना ईमान बाळगण्याचा अवसर लाभला होता. परंतु अटकळीच्या गोष्टी करुन यांनी ही संधी वाया घालवली.

१०२. म्हणजे यांच्या व यांच्या त्या इच्छेच्या दरम्यान की त्यांना जगात पुन्हा परत पाठविले जावे जेणेकरुन त्यांनी ईमान बाळगू शकावे, अडथळा उभा केला जाईल. अर्थात त्यांची ही इच्छा कधीही पूर्ण होणार नाही आणि हीच दशा यांच्या पूर्वीच्या जन समूहांचा ही झालेला असेल.

१०३. ईश्वर आखिरत व रिसालत (प्रेषित्वा) विषयी संशय ग्रस्त होण्याचा परिणाम या खेरीज काहीच नाही की समाधान न लाभावे आणि बुद्धि गोंधळात पडावी.

# सूरह फातिर

# ३५. सूरह फातिर

**नाव:** पहिल्या आयतीत 'फातिर' (निर्माण करणारा) हा शब्द आला आहे. तद्नुषंगानें या सूरह चे नाव 'फातिर' असे आहे.

**अवतरण काळ:** मक्की आहे मजकूरां वरुन असे दिसून येते, की ही मक्का च्या मध्यकाळात अवतरली असावी.

**मध्यवर्ति कल्पना:** या सूरह मध्ये अल्लाहच्या निर्माण कारितेस तो एकमेव उपास्य असण्याचा आधार ठरवित प्रेषित्व आणि आखिरत ला अशा प्रकारे प्रस्तुत केले गेले आहे की ही त्याच्या वैभवशाली निर्माण करिते ची अभिव्यक्ति होय.

**आयात रचना:** आयत क्र. १ ते ८ प्रास्तविक स्वरुपच्या आयती होत, ज्यात अल्लाहच्या निर्माण करिता व ईशत्वास स्पष्ट करीत लोकांना एकेश्वरवाद, प्रेषितत्व, आणि आखिरत वर ईमान बाळगण्याचे आवाहन केले गेले आहे.

आयत क्र. ९ ते १८ मध्ये एकेश्वरवाद व आखिरत चे तपशीलवार निवेदन आहे आणि अनेकेश्वरवादाचे खंडन आहे.

आयत क्र. १९ ते २६ मध्ये प्रेषित्वाचे वर्णन आहे आणि पैगंबरावर ईमान न बाळगणाऱ्यांची दुष्परिणती निवेदिली गेली आहे.

आयत क्र. २७ ते ३८ मध्ये हे स्पष्ट केले गेले आहे की अल्लाहच्या निशाण्यां द्वारे त्याची जी ओळख प्राप्त होते आणि ईश-ग्रंथा द्वारे जे ज्ञान प्राप्त होते ते मार्गदर्शनाचे द्वार उघडते, ज्याने निरंतर यशाचा लाभ घडतो आणि या ज्ञान व परिचया पासून बेपर्वा होण्याचा परिणाम कुफ्र आहे आणि याचा परिणाम निरंतर नाश.

आयत क्र. ३९ ते ४५ मध्ये शिर्क करणाऱ्यांना सक्त ताकीद आहे.

# ३५. सूरह फातिर

سُورَةُ فَاطِرٍ

आयती-४५

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بِسْمِ اللَّهِ الرَّحْمَٰنِ الرَّحِيمِ

१. प्रशंसा अल्लाह करीताच आहे, जो आकाशांचा व जमीनी चा निर्माता [१]आणि फरिश्त्यांना संदेश-वाहक बनविणारा आहे.[२] ज्यांना दोन दोन तीन तीन आणि चार चार पंख आहेत.[३] तो निर्मितीत ज्या प्रकारे इच्छितो वृद्धि करतो.[४] निःसंशय अल्लाह प्रत्येक गोष्ट करण्यास समर्थ आहे.

الْحَمْدُ لِلَّهِ فَاطِرِ السَّمَاوَاتِ وَالْأَرْضِ جَاعِلِ الْمَلَائِكَةِ رُسُلًا
أُولِي أَجْنِحَةٍ مَّثْنَىٰ وَثُلَاثَ وَرُبَاعَ ۚ يَزِيدُ فِي الْخَلْقِ مَا يَشَاءُ ۚ إِنَّ اللَّهَ
عَلَىٰ كُلِّ شَيْءٍ قَدِيرٌ ①

२. अल्लाह लोकां करीता जे कृपा (द्वार) उघडील त्यास कोणी रोखणारा नाही आणि ज्यास रोखील तर त्यानंतर कोणी त्यास उघडणारा नाही [५] तो वर्चस्वशाली व बुद्धिकौशल्य बाळगणारा आहे.

مَّا يَفْتَحِ اللَّهُ لِلنَّاسِ مِن رَّحْمَةٍ فَلَا مُمْسِكَ لَهَا ۖ وَمَا يُمْسِكْ
فَلَا مُرْسِلَ لَهُ مِن بَعْدِهِ ۚ وَهُوَ الْعَزِيزُ الْحَكِيمُ ②

३. लोक हो ! तुम्हावर अल्लाहचे जे उपकार आहेत त्यांचे स्मरण करा. काय अल्लाह खेरीज अन्य एखादा निर्माता आहे जो तुम्हास आकाश व जमीनी पासून उपजिविका देत असावा? त्याच्या खेरीज कोणी ही उपास्य नाही.[६] मग तुम्हास कोणीकडे फिरविले (बहकाविले) जात आहे?[७]

يَا أَيُّهَا النَّاسُ اذْكُرُوا نِعْمَتَ اللَّهِ عَلَيْكُمْ ۚ هَلْ مِنْ خَالِقٍ غَيْرُ اللَّهِ
يَرْزُقُكُم مِّنَ السَّمَاءِ وَالْأَرْضِ ۚ لَا إِلَٰهَ إِلَّا هُوَ ۖ فَأَنَّىٰ تُؤْفَكُونَ ③

४. जर हे लोक (हे पैगंबर !) तुम्हाला खोटे ठरवितात तर तुमच्या पूर्वी ही किती तरी पैगंबर खोटे ठरविले गेले आहेत. आणि सर्व गोष्टी शेवटी अल्लाहच्या समोर सादर होतील.[८]

وَإِن يُكَذِّبُوكَ فَقَدْ كُذِّبَتْ رُسُلٌ مِّن قَبْلِكَ ۚ وَإِلَى اللَّهِ تُرْجَعُ
الْأُمُورُ ④

५. लोक हो ! अल्लाहचा वायदा सच्चा आहे.[९] यास्तव ऐहीक जीवनाने तुम्हास धोक्यात टाकू नये. [१०] आणि ना त्या मोठ्या धोकेबाज ने तुम्हास अल्लाह विषयी धोक्यात, राखावे.

يَا أَيُّهَا النَّاسُ إِنَّ وَعْدَ اللَّهِ حَقٌّ ۖ فَلَا تَغُرَّنَّكُمُ الْحَيَاةُ
الدُّنْيَا ۖ وَلَا يَغُرَّنَّكُم بِاللَّهِ الْغَرُورُ ⑤

१. अल्लाहचे आकाश व जमीनीचे निर्माता असणे एक इन्कार न करण्या जोगी हकीगत आहे आणि ज्या अर्थी तो निर्माता आहे तेव्हा प्रशंसा व कृतज्ञतेस ही तोच पात्र आहे. यास्तव त्याचेच गुणगान केले गेले पाहीजे व त्याचाच कृतज्ञशील दास बनून राहीले पाहीजे. हेच एकेश्वरवादाचे मूळ आहे आणि याने शिर्कचा समूळ नाश होतो.

आयतीच्या आशयात ही गोष्ट ही सामील आहे की सृष्टीस निर्माण केल्याबद्दल अल्लाहची प्रशंसा च केली जाऊ शकते, कारण ही नयनरम्य व सुंदर सृष्टि या गोष्टी ची आभिव्यक्ति होय की तिला निर्माण करणारा मोठा गुणसम्पन्न आहे.

आजच्या युगातील नास्तिक म्हणतात की सृष्टीचा कोणी निर्माता किंवा रचयिता नाही, परंतु त्यांचा हा दावा प्रमाण शून्य व अगदी अनाठायी आहे. जर सृष्टि चे आस्तित्व निर्मात्या विना असते तर तिच्यात ना परिवर्तन असते आणि ना उत्थान आणि ना एखादी निर्मिती वा प्राणी अस्तित्वात आले असते. परंतु आम्ही असे पाहतो की पदार्थात परिवर्तनही होत असते आणि हे ही खात्री करुन देतात की सृष्टीचे सध्याचे उत्थान, विविध अवस्थांमधून गेल्यानंतर घडले आहे आणि आम्हाला हे ही ठाऊक आहे की जमीनीवर माणसाचे अस्तित्व फार कालांतराने झाले. प्रश्न हा उद्भवतो की मनुष्य, जो जमीनीवर सर्वोच्च दर्जाचा प्राणी आहे आणि जो कोरडया भूभागावर व सागार नद्यांवर शासन चालवितो, अकस्मात कसा अस्तित्वास आला? काय ही सृष्टी आपल्या अंगी बुद्धि व ज्ञान आणि संकल्प व नियोजना चे गुणविशेष बाळगते? या प्रश्नाचे उत्तर होकारार्थी मुळीच दिले जाऊ शकत नाही, कारण ना हे आमचे अवलोकन आहे आणि ना याच्या समर्थनार्थ एखादे प्रमाण आहे. म्हणून सृष्टी निर्मात्याच्या आस्तित्वाचा इन्कार म्हणजे सर्वाधिक स्पष्ट हकीगतीचा इन्कार होय.

२. सर्वश्रेष्ठ अल्लाह फरिश्त्यांना संदेश वाहक बनवून पैगंबरां कडे पाठवितो जे त्यांच्यावर ईश-संदेश अवतरीत करतात आणि या खेरीज यांच्याकडून संदेश-वहनाचे कार्य कशाप्रकारे घेतले जाते आणि कोणकोणत्या ईश-निर्मिती कडे यांना दूत बनवून पाठविले जाते याचे ज्ञान केवळ अल्लाहला आहे.

३. पंख उड्डाण-शक्ति चे लक्षण होय. ज्या फरिश्त्यांचे जेवढे अधिक पंख आहेत त्यांची उड्डाण-शक्ति तेवढीच जास्त आहे. हदीस वचनातील उल्लेखानुसार. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी हजरत जिब्रीलला पाहीले की त्यांचे सहाशे पंख होते. कुरआन ने हे निवेदन करुन की फरिश्त्यांचे अनेक पंख असतात, माणसाच्या ज्ञानात एक वाखणण्या जोगी वाढ केली आहे अन्यथा हे जाणून घेण्या साठी त्याच्याजवळ कोणतेही साधन नव्हते.

४. म्हणजे असे नाही की त्याने जे काही निर्माण केले त्यानंतर आता त्याच्या जवळ निर्माण करण्यास काही उरले नाही, किंबहुना तो आपल्या निर्मितीत सतत वाढ करीत असतो. त्याचे एक उदाहरण मानव लोकसंख्येत सतत होणारी वाढ होय आणि याचे मोठ्यात मोठे उदाहरण ते नवे -विश्व असेल जे या जगानंतर उदयास येईल.

५. याच वस्तुस्थितीस पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी प्रार्थनात्मक वचनांमध्ये अशा प्रकारे फर्माविले आहे-

اَللّٰهُمَّ لَا مَانِعَ لِمَااَعْطَيْتَ وَلَامُعطِىَ لِمَامَنَعْتَ
وَلَايَنْفَعُ ذَاالْجَدِّمِنْکَ الْجَدُّ۔ (مسلم کتاب الصلاۃ)

"हे अल्लाह तू जे काही देशील त्यास रोखणारा कोणी नाही आणि ज्या गोष्टीस रोखशील, तिला देणारा कोणी नाही आणि तुझ्या विरोधात एखाद्या धनवानास त्याचे धन लाभ पोहचवू शकत नाही". (मुस्लिम किताबुस्सलात)

६. म्हणजे जो अन्न-दाता आहे तोच उपासनीय देखील आहे. जो उपजिविका प्रदान करणारा नाही, तो कशा प्रकारे उपास्य होऊ शकतो.

७. अर्थात अल्लाह कडून वळवून तुम्हाला कोठे नेले जात आहे? म्हणजे असे की सैतान तुम्हाला बहकवून सत्यापासून दूर करीत आहे तेव्हा बुद्धिचा वापर करा व सैतानाच्या बहकविण्यास बळी पडू नका.

८. यास्तव तुमच्या या भांडणाचा निकाल ही कियामतीच्या दिवशी अल्लाहच्या न्यायालयात होईल आणि त्या वेळी तुम्हाला कळून येईल की तुम्ही अल्लाहच्या पैगंबरास खोटे ठरवून केवढा घोर अपराध केला होता.

९. अभिप्रेत कियामत व अखिरत चा वायदा होय.

१०. इहलोकाचे बाहय आकर्षण असे आहे की ते माणसा चे लक्ष आखिरत पासून हटवून त्याला ऐहीक - भक्त बनविते. हा फार मोठा धोका होय, ज्या पासून सावध राहण्याची ताकीद केली गेली आहे. आज देखील जेव्हा माणसाच्या बुद्धिने प्रगतीची मोठ मोठी शिखरे गाठली आहेत, तो जगाच्या मनमोहकते पासून सत्त धोका खात आहे. म्हणूनच जगातील बहुसंख्य माणसे या जगाखेरीज अन्य एखाद्या जगास खात्रीत घेण्यास तयार नाहीत.

११. 'मोठे धोकेबाज' शी अभिप्रेत सैतान होय जो आपल्या कु विचारांच्या प्रादुर्भावान्वये माणसाला ईश्वरा बाबत फार मोठ्या धोक्यात टाकतो.

६. निः संशय, सैतान तुमचा शत्रू आहे, तेव्हा त्याला शत्रूच समजा.[१२] तो आपल्या समूहास (आपल्या कडे) अशासाठी बोलावितो की त्याने दोजख (जहन्नम) वाल्यां मध्ये सामील वाहावे.[१३]

إِنَّ الشَّيْطَٰنَ لَكُمْ عَدُوٌّ فَاتَّخِذُوهُ عَدُوًّا ۚ إِنَّمَا يَدْعُوا حِزْبَهُۥ لِيَكُونُوا
مِنْ أَصْحَٰبِ السَّعِيرِ ﴿٦﴾

७. ज्यांनी कुफ्र केले त्यांच्या करीता सक्त अजाब (अल्लाह ची शिक्षा) आहे आणि ज्यांनी ईमान बाळगले व सत्कर्म केले, त्यांच्या करीता क्षमा आणि मोठा (चांगला) मोबदला आहे.

الَّذِينَ كَفَرُوا لَهُمْ عَذَابٌ شَدِيدٌ ۖ وَالَّذِينَ ءَامَنُوا وَعَمِلُوا
الصَّٰلِحَٰتِ لَهُم مَّغْفِرَةٌ وَأَجْرٌ كَبِيرٌ ﴿٧﴾

८. काय तो, ज्याचे दुष्कर्म त्याच्या करीता शोभिवंत बनविले गेले असावे आणि तो यास चांगले समजतो (मार्गदर्शन प्राप्त करु शकतो ?)[१४] वस्तुस्थिती अशी की अल्लाह ज्याला इच्छितो, मार्गभ्रष्ट. करतो आणि ज्याला इच्छितो मार्गदर्शन करतो. तेव्हा ( हे पैगंबर!) यांच्या दुःखात तुमचा जीव तळमळू नये.[१५] जे काही हे करीत आहेत ते अल्लाह चांगल्या प्रकारे जाणतो.

أَفَمَن زُيِّنَ لَهُۥ سُوٓءُ عَمَلِهِۦ فَرَءَاهُ حَسَنًا ۖ فَإِنَّ اللَّهَ يُضِلُّ مَن يَشَآءُ
وَيَهْدِى مَن يَشَآءُ ۖ فَلَا تَذْهَبْ نَفْسُكَ عَلَيْهِمْ حَسَرَٰتٍ ۚ إِنَّ
اللَّهَ عَلِيمٌۢ بِمَا يَصْنَعُونَ ﴿٨﴾

९. तो अल्लाहच होय, जो वाऱ्यांना पाठवितो आणि ते ढगांना उंच नेतात, मग आम्ही त्यास मृत प्रदेशा कडे घेऊन जातो आणि या द्वारे जमीनी ला जी मृतवत झाली होती, जिवंत करतो. (कियामतीच्या दिवशी) मेलेल्यां चे जिवित होणे अशाच प्रकारे असेल.[१६]

وَاللَّهُ الَّذِىٓ أَرْسَلَ الرِّيَٰحَ فَتُثِيرُ سَحَابًا فَسُقْنَٰهُ إِلَىٰ بَلَدٍ مَّيِّتٍ
فَأَحْيَيْنَا بِهِ الْأَرْضَ بَعْدَ مَوْتِهَا ۚ كَذَٰلِكَ النُّشُورُ ﴿٩﴾

१०. जो मान प्रतिष्ठा इच्छितो, त्याने हे जाणून घेतले पाहीजे की प्रतिष्ठा सर्वतः अल्लाहच्याच अधिकार कक्षेत आहे.[१७] त्याच्या कडे पवित्र वचन उन्नत होते आणि तो सदाचारा चा दर्जा वाढवितो.[१८] आणि जे लोक वाईट डावपेच लढवित आहेत त्यांच्या करीता सक्त ईश शिक्षा आहे आणि त्यांचे डावपेच नाश पावतीलच. [१९]

مَن كَانَ يُرِيدُ الْعِزَّةَ فَلِلَّهِ الْعِزَّةُ جَمِيعًا ۚ إِلَيْهِ يَصْعَدُ الْكَلِمُ الطَّيِّبُ
وَالْعَمَلُ الصَّٰلِحُ يَرْفَعُهُۥ ۚ وَالَّذِينَ يَمْكُرُونَ السَّيِّـَٔاتِ
لَهُمْ عَذَابٌ شَدِيدٌ ۖ وَمَكْرُ أُولَٰٓئِكَ هُوَ يَبُورُ ﴿١٠﴾

११. अल्लाहने तुम्हाला माती पासून निर्माण केले.[२०] मग वीर्यबिंदू पासून,[२१] मग तुमची जोडपी बनविली आणि कोणतीही स्त्री ना गर्भवती होते आणि ना प्रसवते, मात्र त्याच्या ज्ञानाने. कोणताही आयुष्यवान दीर्घायुष्य प्राप्त करीत नाही [२२] आणि ना त्याच्या वयात घट होते, परंतु हे सर्व एका ग्रंथात सामील आहे. हे अल्लाह करीता फार सोपे आहे.[२३]

وَاللَّهُ خَلَقَكُم مِّن تُرَابٍ ثُمَّ مِن نُّطْفَةٍ ثُمَّ جَعَلَكُمْ أَزْوَٰجًا ۚ
وَمَا تَحْمِلُ مِنْ أُنثَىٰ وَلَا تَضَعُ إِلَّا بِعِلْمِهِۦ ۚ وَمَا يُعَمَّرُ مِن مُّعَمَّرٍ
وَلَا يُنقَصُ مِنْ عُمُرِهِۦٓ إِلَّا فِى كِتَٰبٍ ۚ إِنَّ ذَٰلِكَ عَلَى اللَّهِ يَسِيرٌ ﴿١١﴾

१२. सैताना सारख्या शत्रूला मित्र समजणे फार मोठी मूर्खता आहे. त्यास शत्रू समजून त्याच्या डावपेचां पासून सतर्क राहणे आवश्यक आहे. कुरआनाने माणसाला या गोष्टी पासून सावध केले आहे की त्याच्या विचारांवरबहिष्कृतते पासून परिणाम कारक होणारे उत्पात प्रिय तत्वे अस्तित्वात आहेत. ते त्याला दिसून येत नसेल तरी आपले कार्य पार पाडीत असतात. हे सैतान होत ज्यांच्या उपद्रवा पासून स्वत:चा बचाव करण्या साठी माणसाने क्षणोक्षणी सावध राहीले पाहीजे.

१३. म्हणजे जे लोक सैतानाशी मैत्री करतात ते त्याच्या समूहात सामील होतात आणि सैतान आपल्या समूहास जहन्नम (नरका) चाच मार्ग दाखवितो. माणसाला मार्गभ्रष्ट करणे हेच त्याचे उद्दिष्ट होय, अशासाठी की त्याने जहन्नमी लोकांमध्ये सामील व्हावे.

१४. ही एक मानसशास्त्रीय वस्तुस्थिती आहे की मनुष्य जेव्हा दुष्कर्मास चांगले समजून करु लागतो तर त्याचे परावृत्त होणे अशक्य ठरते जोपर्यत तो वाईटाला वाईट समजत नाही आणि अल्लाहचा अपमानित करणारा नियम असा की ज्या माणसाला आपले वाईट आचरण चांगले वाटू लागते, तर अशा स्थितीत मार्गदर्शनाचे द्वार त्याच्यासाठी बंद केले जाते आणि त्याला इतस्तत: भटकण्या साठी स्वैर सोडले जाते.

१५. म्हणजे जेव्हा त्यांना आपल्या दुराचारा बदल आग्रह आहे आणि ते मार्ग भ्रष्टतेतून बाहेर पडू इच्छित नाही तर तुम्ही यांचे दु:ख कुठवर कराल? त्यांना त्यांच्या दशेवर सोडणे हेच अधिक चांगले ठरेल.

अधिक स्पष्टीकरणा साठी पहा सूरह कहफ टीप क्र.७

१६. म्हणजे ज्या प्रकारे पाऊस येताच जमीनीतून वनस्पती निघू लागतात आणि तिच्या हिरव्या टवटवीस पाहून असे वाटू लागते की मृत जमीन जिवंत झाली. अशाच प्रकारे कियामतीच्या दिवशी जेव्हा दुसरा सूर फुंकला जाईल तेव्हा मेलेली माणसे जिवंत होऊन जमीनीतून बाहेर पडतील.

१७. म्हणजे मान प्रतिष्ठा देणे अल्लाहच्याच हाती आहे.

१८. पवित्र वचना शी अभिप्रेत कलमा ए तय्यबा अर्थात لَآاِلٰهَ اِلَّا اللّٰهُ ''ला इलाहा इल्लल्लाहु'' हे एकेश्वरवादी वचन होय. याचे अल्लाह कडे वर पोहचण्याचा अर्थ असा की ते अल्लाहच्या सान्निध्याचे साधन होय आणि सदाचाराचा दर्जा वाढविण्याचा अर्थ त्यास स्विकृति चा मान प्रदान करणे होय. येथे विशेषत: हे स्पष्ट करण्याचा हेतु आहे की मान प्रतिष्ठा अल्लाह खेरीजच्या उपास्यांजवळ नाही आणि ना ती यांची भक्ति करुन प्राप्त केली जाऊ शकते; किंबहुना प्रतिष्ठा देणे अल्लाहच्या च अधिकार कक्षेतील बाब आहे. आणि ती ईमान व सदाचरणा द्वारे प्राप्त केली जाऊ शकते.

१९. म्हणजे जे लोक सत्याच्या विरोधात आपली सर्व शक्ति पणाला लावीत आहेत व वेगवेगळ्या प्रकारची कट कारस्थाने रचीत आहेत त्यांना शेवटी अपयशाचे च तोंड पहावे लागेल, जेव्हा परिणामांच्या उदयाची वेळ येईल तेव्हा यांच्या सर्व योजना धुळी ला मिळतील.

२०. म्हणजे मानव जाती च्या निर्मिती चा आरंभ माती पासून केला. हजरत आदम यांना माती पासून निर्माण केले गेले होते.

२१. मग आदम वंशाचा क्रम पाण्याच्या तुच्छ थेंबा पासून वीर्य बिंदू ने झाला.

२२. म्हणजे एखाद्याचे आयुष्य वाढविणे किंवा कमी करणे अल्लाहच्या अधिकार कक्षेत आहे आणि या संदर्भात त्याचे निर्णय लिखित स्वरुपात एका ग्रंथात सामील आहेत. अर्थात आयुष्य कमी अधिक होण्यात अल्लाह खेरीजच्या उपास्यांचा काहीच हस्तक्षेप नाही.

२३. म्हणजे अगणित माणसांचा आयुष्यावधि निश्चित करणे व त्यावर नियंत्रण राखणे अल्लाह करीता मुळीच कठीण नाही.

१२. आणि दोन नद्या समान नाहीत एक गोड, तहान भागविणारी आणि प्यायला मनाजोगती आणि दुसरी खारट कडू. आणि तुम्ही दोघां पासून ताजे मांस (काढून) खातात [२४] आणि शोभेच्या वस्तू बाहेर काढतात ज्यांना तुम्ही अंगावर घालतात. [२५] आणि तुम्ही पाहता की नावा याला छेदीत पुढे जातात, अशा साठी की तुम्ही त्याच्या अनुग्रहाचा शोध घ्यावा [२६] आणि या साठी की तुम्ही त्याच्या शी कृतज्ञशील व्हावे.

وَمَا يَسْتَوِي الْبَحْرٰنِ ۖ هٰذَا عَذْبٌ فُرَاتٌ سَآئِغٌ شَرَابُهٗ
وَ هٰذَا مِلْحٌ اُجَاجٌ ؕ وَمِنْ كُلٍّ تَاْكُلُوْنَ لَحْمًا طَرِيًّا وَّتَسْتَخْرِجُوْنَ
حِلْيَةً تَلْبَسُوْنَهَا ۚ وَتَرَى الْفُلْكَ فِيْهِ مَوَاخِرَ لِتَبْتَغُوْا مِنْ
فَضْلِهٖ وَلَعَلَّكُمْ تَشْكُرُوْنَ ﴿۱۲﴾

१३. तो दिवसाचा रात्रीत शिरकाव करतो आणि रात्रीचा दिवसामध्ये.[२७] त्याने सूर्य व चंद्रास अधीन करुन ठेवले आहे. प्रत्येक एका निर्धारीत वेळे पावेतो चालत आहे.[२८] तोच अल्लाह तुमचा रब (स्वामी) होय. त्याचीच अधिसत्ता आहे [२९] त्याला सोडून तुम्ही ज्यांना पुकारता, ते कणभार देखील अधिकार बाळगत नाहीत.[३०]

يُوْلِجُ الَّيْلَ فِي النَّهَارِ وَيُوْلِجُ النَّهَارَ فِي الَّيْلِ ۙ وَسَخَّرَ الشَّمْسَ
وَالْقَمَرَ ۖ كُلٌّ يَّجْرِيْ لِاَجَلٍ مُّسَمًّى ؕ ذٰلِكُمُ اللّٰهُ رَبُّكُمْ لَهُ الْمُلْكُ ؕ
وَالَّذِيْنَ تَدْعُوْنَ مِنْ دُوْنِهٖ مَا يَمْلِكُوْنَ مِنْ قِطْمِيْرٍ ﴿۱۳﴾ؕ

१४. जर तुम्ही त्यांना साद घालाल तर ते तुमची साद ऐकू शकणार नाहीत आणि जर ऐकून ही घेतील तर प्रत्युत्तरा दाखल, तुमच्यासाठी काही करु शकणार नाहीत आणि कियामतीच्या दिवशी तुमच्या शिर्क (अनेकेश्वर भक्ति) चा इन्कार करतील.[३१] आणि या जाणकार (अल्लाह) प्रमाणे तुम्हाला (खरी हकीगत) कोणी ही सांगू शकत नाही.[३२]

اِنْ تَدْعُوْهُمْ لَا يَسْمَعُوْا دُعَآءَكُمْ ۚ وَلَوْ سَمِعُوْا مَا اسْتَجَابُوْا
لَكُمْ ؕ وَيَوْمَ الْقِيٰمَةِ يَكْفُرُوْنَ بِشِرْكِكُمْ ؕ وَلَا يُنَبِّئُكَ
مِثْلُ خَبِيْرٍ ﴿۱۴﴾ع

१५. लोक हो ! तुम्हीच अल्लाहचे गरजवंत आहात. अल्लाह तर नि:स्पृह (गरजवंत नसलेला) आणि गुणसम्पन्न आहे, प्रशंसेस पात्र.

يٰاَيُّهَا النَّاسُ اَنْتُمُ الْفُقَرَآءُ اِلَى اللّٰهِ ۚ وَاللّٰهُ هُوَ الْغَنِيُّ
الْحَمِيْدُ ﴿۱۵﴾

१६. त्याने इच्छिल्यास तुमचा नाश करील आणि एक नवीन सृष्ट-निर्मिती आणून उभी करील.[३३]

اِنْ يَّشَاْ يُذْهِبْكُمْ وَيَاْتِ بِخَلْقٍ جَدِيْدٍ ﴿۱۶﴾ۚ

१७. असे करणे अल्लाह करीता काहीच कठीण नाही.

وَمَا ذٰلِكَ عَلَى اللّٰهِ بِعَزِيْزٍ ﴿۱۷﴾

२४. म्हणजे गोड पाण्या (नदी तळया) पासून ही मासे प्राप्त करता आणि खारट पाण्या (समुद्रा) पासून ही.

२५. उदाहरणार्थ मोती मर्जान आणि काही समुद्रातून हीरे आणि सोने देखील प्राप्त होते. नद्यांच्या पात्रातून आणलेल्या वाळू मध्ये सोन्याचे कण आढळून येतात. इन्साक्लोपिडीया ब्रिटानिका मध्ये हे स्पष्टीकरण आहे की-

'Alluvial deposits of native gold found in or along streams were the principal sources of the matal for the ancient civilization of the Middle East.'

'The alluvial deposits mined by placer methods are the gold-bearing sands and gravel that have been deposited by rapidly moving streams and other rivers at places where they widen or for some other reason lose speed.'

(The New Ency. Britannica. Vol. 8. P.237)

आणि हिऱ्या विषयी इन्साक्लोपिडीया ऑफ सायन्स ॲड टेक्नालॉजी मध्ये हे स्पष्टीकरण आहे की हे नद्यांच्या जमलेल्या परती मध्ये आढळून येतात.

'but a signifiicant amount (of diamonds) comes from individual operation from stream bed deposits in Sierra Leone, Ghana and the Union of South Africa'

(Mc Grow-Hill Ency. of Science and Technology New york Vol. 4. P. 164)

अधिक स्पष्टीकरणा साठी पहा सूरह नहल टीप क्र.२४

२६. म्हणजे व्यापारीक प्रवास करुन अर्थोपार्जन करा जो अल्लाहचा अनुग्रह आहे.

२७. स्पष्टीकरणा साठी पहा सूरह आले इमरान टीप क्र.३९

२८. स्पष्टीकरणा साठी पहा सूरह रअद टीप. क्र. ८

२९. म्हणजे त्याचे बुद्धिकौशल्य मानवासहीत समस्त सृष्टीवर पसरलेले आहे आणि त्याचेच आदेश लागू पडतात.

३०. 'कतमीर' त्या पातळ आवरणास म्हणतात जी खजूराच्या गुठली वर असते. अर्थात ते इतका मामुली अधिकार ही बाळगत नाहीत.

३१. कियामतीच्या दिवशी आपल्या भक्तांच्या अनेकेश्वरवादाचा इन्कार व त्यापासून अद्विग्नता जाहीर करणारे ते फरीश्ते आणि बुजुर्ग (थोर) पुरुष असतील ज्यांना गरजपूर्ति, संकट निवारण, व दाद फिर्यादी करीता पुकारले जात होते. त्यांच्याच संदर्भात येथे फर्माविले गेले आहे की प्रथम तर हे पुकारणाऱ्यांची पुकार ऐकतच नाही आणि ऐकले तरी ते ना गरजपूर्ति करु शकतात आणि ना गाऱ्हाणे ऐकू शकतात. फरिशत्यांना ज्या कामां वर नियुक्त केले गेले आहे त्यांचे कार्यक्षेत्र त्याच मर्यादे प्रत आहे. त्याच्या पुढे त्यांची मजाल नव्हे की एखादा मनुष्य जिथूनही पुकारील साद घालील त्याची पुकार किंवा साद ऐकावी व त्याच्या मदतीस पोहचावे. आणि समजा साद ऐकली तरी ते पुकारणाऱ्याची गरज मुळीच भागवू शकत नाही. राहीलेत बुजर्ग माणसांचे आत्मे तर त्यांच्या बाबत ही हे समजणे की ते प्रत्येक पुकारणाऱ्याची पुकार ऐकतात अगदी निराधार व पुर्णत: खोटे आहे. ते आलमे बर्जख (मरणोत्तर विश्वा) मध्ये राहून ना एखाद्याचे गाऱ्हाणे ऐकतात आणि ना त्याची मदत व गरजपूर्ततेस पोहचतात.

आयतीच्या आशयास मूर्तिपूजकांचे खण्डन करण्या प्रत मर्यादित समजण्याचे काही एक कारण नाही किंबहुना याच्या व्यापक अर्थात प्रत्येक प्रकारची विभुति पूजा व कबर-पूजा देखील सामील आहे. यास्तव जो मुसलमान 'या अली अल मदद' आणि या गौस (अब्दुल कादर जिलानी) अल मदद चे नारे लावतात. ते उघड पणे शिर्क करतात आणि त्या बुजुर्गांचे यांच्या मदतीस पोहचणे तर दूरच राहीले. उलट ते यांची पुकार मुळात ऐकतच नाही. आणि विचार करण्या जोगी गोष्ट अशी की जेव्हा बुजुर्ग आपल्या जीवनात प्रत्येक पुकारणाऱ्या ची पुकार ऐकत नव्हते आणि गाऱ्हाणे ऐकून प्रत्येका जवळ पोहचणे त्यांच्या अवाक्यात नव्हते, तेव्हा कबरीत पोहचल्या नंतर अचानक हे सामर्थ्य त्यांना कोठून प्राप्त झाले?

३२. म्हणजे या गोष्टींची खबर जी वरच्या विश्वाशी व अपरोक्षा शी संबंधित आहे. एक जाणकार शक्तिच देऊ शकते आणि ती शक्ति म्हणजे अल्लाहच होय. त्याच्या खेरीज आणखी कोणी नाही जो तुम्हाला तिथली खरी वार्ता सांगेल यास्तव अल्लाह आपला ग्रंथ व आपल्या पैगंबरा द्वारे अपरोक्षाच्या ज्या खबरी देत आहे त्यांच्यावर दृढविश्वास राखा आणि त्या लोकांच्या गोष्टी सोडून द्या जे केवळ अनुमानाने अपरोक्षा विषयीच्या गोष्टी करतात.

३३. म्हणजे असे समजू नका की तुमचे अस्तित्व जमीनी वर आबाधित ठेवण्यात अल्लाहची काही गरज आहे. तो नि:स्पृह आहे आणि कोणी त्याची प्रशंसा करो वा न करो तो प्रशंसनीयच आहे. त्याने इच्छिले तर संपूर्ण मानव जात समूळ नष्ट करु शकतो व त्या जागी एक नवीन उत्पात्ति आणू शकतो.

१८. कोणी ही ओझे उचलणारा अन्य एखाद्याचे ओझे उचलणार नाही.[३४] आणि जर एखादा भार लादलेला मनुष्य आपले ओझे उचलण्या करीता एखाद्या स विनवणी करील तर कोणी ही त्याच्या ओझ्याचा काही भाग आपल्या शिरावर घेणार नाही मग तो त्याचा जवळचा नातेवाईक का असेना. (हे पैगंबर ! ) तुम्ही केवळ अशाच लोकांना खबरदार करु शकता जे न पाहता आपल्या पालन कर्त्याचे भय बाळगतात आणि नमाज कायम करतात.[३५] आणि जो स्वच्छ-शुध्दता अंगिकारतो,तो आपल्याच लाभास्तव करतो.[३६] आणि सर्वांना अल्लाहच्याच समोर पोहचायचे आहे !

وَلَا تَزِرُ وَازِرَةٌ وِّزْرَ اُخْرٰى ؕ وَاِنْ تَدْعُ مُثْقَلَةٌ اِلٰى حِمْلِهَا
لَا يُحْمَلْ مِنْهُ شَىْءٌ وَّلَوْ كَانَ ذَا قُرْبٰى ؕ اِنَّمَا تُنْذِرُ
الَّذِيْنَ يَخْشَوْنَ رَبَّهُمْ بِالْغَيْبِ وَاَقَامُوا الصَّلٰوةَ ؕ
وَمَنْ تَزَكّٰى فَاِنَّمَا يَتَزَكّٰى لِنَفْسِهٖ ؕ وَاِلَى اللّٰهِ الْمَصِيْرُ ﴿١٨﴾

१९. आंधळा व डोळस दोन्ही समान नाहीत.[३७]

وَمَا يَسْتَوِى الْاَعْمٰى وَالْبَصِيْرُ ﴿١٩﴾

२०. ना अंध:कार व प्रकाश समान आहेत.[३८]

وَلَا الظُّلُمٰتُ وَلَا النُّوْرُ ﴿٢٠﴾

२१. ना सावली व ऊन समान आहेत.[३९]

وَلَا الظِّلُّ وَلَا الْحَرُوْرُ ﴿٢١﴾

२२. आणि ना जिवित व मृत समान आहेत.[४०] अल्लाह ज्यांना इच्छितो ऐकवितो [४१] आणि तुम्ही त्यांना ऐकवू शकत नाही जे कबरी मध्ये आहेत.[४२]

وَمَا يَسْتَوِى الْاَحْيَآءُ وَلَا الْاَمْوَاتُ ؕ اِنَّ اللّٰهَ يُسْمِعُ
مَنْ يَّشَآءُ ۚ وَمَآ اَنْتَ بِمُسْمِعٍ مَّنْ فِى الْقُبُوْرِ ﴿٢٢﴾

२३. तुम्ही तर खबरदार करणारे मात्र आहात.

اِنْ اَنْتَ اِلَّا نَذِيْرٌ ﴿٢٣﴾

२४. आम्ही तुम्हाला (हे पैगंबर !) सत्यासह पाठविले आहे,जो खुश खबर देणारा व खबरदार करणारा बनवून (पाठविला आहे) आणि असा कोणताही जनसमूह नाही ज्यात एखादा खबरदार करणारा आला नसावा.[४३]

اِنَّآ اَرْسَلْنٰكَ بِالْحَقِّ بَشِيْرًا وَّنَذِيْرًا ؕ وَاِنْ مِّنْ اُمَّةٍ
اِلَّا خَلَا فِيْهَا نَذِيْرٌ ﴿٢٤﴾

२५. जर हे लोक तुम्हाला खोटे ठरवितात तर यांच्या पूर्वी होऊन गेलेल्या लोकांनी देखील (पैगंबरांना) खोटे ठरविलेले आहे. त्यांच्या जवळ त्यांचे पैगंबर स्पष्ट प्रमाण सहीफे (पोथी) आणि दिव्य ग्रंथ घेऊन आले होते.[४४]

وَاِنْ يُّكَذِّبُوْكَ فَقَدْ كَذَّبَ الَّذِيْنَ مِنْ قَبْلِهِمْ ۚ جَآءَتْهُمْ
رُسُلُهُمْ بِالْبَيِّنٰتِ وَبِالزُّبُرِ وَبِالْكِتٰبِ الْمُنِيْرِ ﴿٢٥﴾

३४. म्हणजे कियामतीच्या दिवशी अपराधांचे ओझे उचलणारा.

स्पष्टीकरणा साठी पहा सूरह बनी इस्त्राईल टीप क्र. १८ आणि सूरह अन्कबूत टीप क्र. १८

३५. अर्थात तुमच्या खबरदार करण्याचा लाभ केवळ तेच लोक घेऊ शकतात जे अल्लाह शी निर्भय नाहीत, किंबहुना आपल्या अंगी अल्लाहचे भय बाळगतात आणि अल्लाहचे भय व्यक्त करणाऱ्या नमाज ला कायम करतात.

३६. म्हणजे श्रद्धा व आचरणाची स्वच्छ शुध्दता अंगिकारण्या चा लाभ त्यालाच घडतो जो हा गुण आपल्या अंगी निर्माण करतो. आणि कुरआन संबोधितांकडून हीच अपेक्षा करतो की त्यांनी सर्वप्रथम आपल्या श्रद्धा व आचरणास स्वच्छ शुद्ध बनाविण्याची काळजी घ्यावी.

आयती वरुन हे ही स्पष्ट होते की अल्लाहचे भय आणि नमाज चा इतमाम माणसाला शुचिर्भूतते च्या मार्गाला लावतो मग त्याला एक स्वच्छ शुद्ध जीवन व्यतीत करणे सहज सुलभ होते.

३७. म्हणजे ज्याअर्थी आंधळा व डोळस एकसमान नाहीत, तर अंतर्दृष्टी नसलेला व अंतर्दृष्टी बाळगणारा दोन्ही समान कसे असू शकतात? आणि ज्याअर्थी दोघे ही आपल्या आचरणाच्या दृष्टीने समान नाहीत तर दोघांची ही परिणति समान कशी असू शकते.

३८. म्हणजे ज्याअर्थी अंध:कार व प्रकाश समान असू शकत नाही तर अज्ञानाचा अंध:कार व ज्ञानरुपी प्रकाश दोन्ही कशा प्रकारे समान असू शकतात?

३९. म्हणजे ज्या अर्थी सावली व ऊन एकसमान नाहीत तर सदा चाराचा गारवा व दुराचाराचे चटके देणारे ऊन दोन्ही कशा प्रकारे समान असू शकतात. परिणामांच्या दृष्टीने अपरिहार्यत: दोघां मध्ये तफावत आहे.

४०. म्हणजे ज्याअर्थी जिवंत माणसे व मेलेली माणसे समान नाहीत तर अल्लाह च्या संदेशान्वये नवजीवन प्राप्त करणारा व त्या लाभापासून वंचित राहून आपल्या विवेक बुद्धिस मारणारा हे दोन्ही ही समान कसे ठरु शकतात? आणि जेव्हा हे समान नाहीत तर त्यांची परिणति ही भिन्न असली पाहीजे अर्थात या वस्तुस्थितीस या गोष्टीची निकड जाणवते की मानवांच्या पालन कर्त्याने एक दिवस न्यायालय प्रस्थापित करावे आणि शिक्षा व मोबदल्याचा मामला प्रकट व्हावा.

४१. म्हणजे सत्य गोष्ट केवळ तेच लोक ऐकतात व कबूल करतात ज्यांना अल्लाह तशी सुबुद्धि देतो आणि तो अशा लोकांना ही सुबुद्धि देत नाही ज्यांची मने मृत झाली आहेत.

४२. म्हणजे हे पैगंबर! ज्या प्रकारे तुम्ही त्या लोकांना ऐकवू शकत नाही जे कबरींमध्ये गाडले गेले आहेत, त्याच प्रकारे तुम्ही त्या लोकांनाही ऐकवू शकत नाही ज्यांची मने मेली आहेत. अर्थात चेतनाशून्य मन बाळगणाऱ्या माणसांवर तुमच्या उपदेशाचा काहीच परिणाम होऊ शकत नाही. बोध ग्रहण करीता मनाचा जिवंतपणा व विवेक बुद्धिचे जागृत असणे आवश्यक आहे.

या ठिकाणी मृतांच्या न ऐकण्याची गोष्ट एक उदाहरण म्हणून सांगितली गेली असावी तरी उदाहरण वस्तुस्थिती पूर्णच आहे. आणि या गोष्टीचे स्पष्ट प्रमाण होय की कबरींमध्ये दफन झालेल्या मृतांना ऐकविणे कोणाच्या ही आवाक्यातले नाही, येथ पावेतो पैगंबर देखील त्यांना ऐकवू शकत नाही. मग जेव्हा कबरीत निवास करणाऱ्यांना ऐकवलेच जाऊ शकत नाही तेव्हा जे लोक यांच्यापुढे गाऱ्हणी मांडतात ते एक व्यर्थ काम करतात. ही आयत कबर भक्तीचे मूळ खणून काढते. अधिक स्पष्टीकरणा साठी पहा सूरह नमल टीप.क्र. ११८.

४३. अर्थात सर्वश्रेष्ठ अल्लाहने संपूर्ण मानव जातीच्या मार्गदर्शना करीता ही उपाय योजना केली की कोणत्याही जनसमूहास अंध:कारात दिशाहीन पणे भटकण्यास सोडले नाही. त्याने प्रत्येक जन समूहात एक रसूल (पैगंबर) पाठविला, ज्याने त्या जन समूहास, कियामतीचा दिवस व अल्लाहच्या अवज्ञेचे पायी होणयाऱ्या दुष्परिणति बाबत खबरदार केले. पवित्र कुरआनाने अनेक जन मसूहांचा उल्लेख त्यांच्याकडे जे पैगंबर पाठविले गेले होते त्यांच्या नावांच्या स्पष्ट उल्लेखा सह केला आहे. परंतु ज्या जन समूहांचा उल्लेख केला गेला नाही, त्यांच्या बाबत हे गृहीत धरण्याचे आमच्या जवळ कोणते ही विश्वासपूर्ण साधन नाही की त्यांच्याकडे कोण पैगंबर पाठविले गेले होते म्हणून आम्ही खात्रीपूर्वक हे सांगू शकत नाही की या जनसमूहाती अमुक अमुक व्यक्ति पैगंबर होते. क़ुर्आनाने फारस च्या अग्निपूजक जनसमूहाचा उल्लेख केला आहे. परंतु त्याच्याकडे कोणास पैगंबर बनवून पाठविले गेले होते, हे स्पष्ट सांगितले नाही म्हणून आम्हाला हा अधिकार पोहचत नाहीकी झरतुष्टास नबी किंवा रसूल ठरवावे, अशाच प्रकारे हिंदू जनसमूहा बाबत आम्ही विश्वासाने सांगू शकत नाही की त्यांच्यातली अमुक अमुक व्यक्तिमत्वे नबी किंवा रसूल (पैगंबर) होते. एखाद्यास नबी किंवा रसूल ज्ञान व विश्वासाच्या आधारा वरच ठरविले जाऊ शकते. केवळ कयास व अनुमानाच्या आधारे नव्हे कारण हा प्रश्न श्रद्धेशी संबंधित आहे आणि श्रद्धेचा आधार स्पष्ट प्रमाण असतो. या विवादात पडण्याची गरज अशा साठी ही बाकी राहाली नाही की हजरत मुहम्मद

(सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) जगातील समस्त जनसमूहां कडे रसूल पैगंबर आणि भिवविणारा बनवून पाठविले गेले आहेत आणि त्यांच्यावर अवतरीत झालेला ग्रंथ (कुरआन) मार्गदर्शना साठी हजर आहे. तसेच त्यांच्या जन समूहास (उम्मते मुस्लिमास) प्रस्थापित केले गेले आहे. अशासाठी की त्याने जगाच्या कोना कोपऱ्यात सत्य संदेश पोहचवावा आणि लोकांना सत्य धर्माचे आवाहन करावे.

४४. म्हणजे अशी प्रमाणे घेऊन आले होते जी त्यांच्या प्रेषित्वाचा स्पष्ट पुरावा होती. या पैगंबरां मध्ये असे ही होते ज्यांना धर्म-पोथी दिली गेली होती. उदाहरणार्थ हजरत इब्राहीम यांना आणि काही असे ही होते ज्यांना धर्म-ग्रंथ दिले गेले होते उदाहरणार्थ हजरत मूसा व हजरत ईसा (येशू) यांना सहीफा (पोथी) आणि ग्रंथ यात फरक असा की पोथी संक्षिप्त असते आणि ग्रंथ सविस्तर.

काय तुम्ही पाहात नाही की अल्लाह आकाशातून पाणी वर्षावितो आणि त्याद्वारे फळे निर्माण करतो,ज्यांचे रंग वेगवेगळे असतात आणि पर्वतां मध्ये ही शुभ आणि लाल विविध रंगाचे प्रदेश आहेत व गडद काळे देखील. *(अल-क़ुर्आन)*

२६. मग ज्या लोकांनी कुफ्र (सत्याचा विरोध) केला त्यांना मी धरले तर पहा कशी होती माझी शिक्षा !

ثُمَّ أَخَذْتُ الَّذِيْنَ كَفَرُوْا فَكَيْفَ كَانَ نَكِيْرِ ﴿٢٦﴾

२७. काय तुम्ही पाहात नाही की अल्लाह आकाशातून पाणी वर्षावितो [४५] आणि त्याद्वारे फळे निर्माण करतो, ज्यांचे रंग वेगवेगळे असतात आणि पर्वतां मध्ये ही शुभ्र आणि लाल विविध रंगाचे प्रदेश आहेत [४६] व गडद काळे देखील.

أَلَمْ تَرَ أَنَّ اللّٰهَ أَنْزَلَ مِنَ السَّمَآءِ مَآءً ۚ فَأَخْرَجْنَا بِهٖ
ثَمَرٰتٍ مُّخْتَلِفًا أَلْوَانُهَا ۗ وَمِنَ الْجِبَالِ جُدَدٌۢ بِيْضٌ
وَّحُمْرٌ مُّخْتَلِفٌ أَلْوَانُهَا وَغَرَابِيْبُ سُوْدٌ ﴿٢٧﴾

२८. अशा प्रकारे माणसांचे, जनावरांचे आणि चतुष्पाद प्राण्यांचे रंग ही वेगवेगळे आहेत.[४७] वास्तविकता ही होय की अल्लाह शी त्याचे तेच दास भय बाळगतात जे ज्ञान बाळगणारे आहेत [४८] निःसंशय अल्लाह वर्चस्वशाली, माफ करणारा आहे.[४९]

وَمِنَ النَّاسِ وَالدَّوَآبِّ وَالْأَنْعَامِ مُخْتَلِفٌ أَلْوَانُهٗ
كَذٰلِكَ ۗ إِنَّمَا يَخْشَى اللّٰهَ مِنْ عِبَادِهِ الْعُلَمٰٓؤُا ۗ
إِنَّ اللّٰهَ عَزِيْزٌ غَفُوْرٌ ﴿٢٨﴾

२९. जे लोक अल्लाहच्या ग्रंथाचे पठण करतात [५०] आणि नमाज कायम करतात [५१] आणि जी काही उपजिविका आम्ही त्यांना दिली आहे त्यातून गुप्तरित्या व उघडरित्या खर्च करतात [५२] ते एका अशा व्यापाराची आशा बाळगताता ज्यात कदापि तोटा होणार नाही. [५३]

إِنَّ الَّذِيْنَ يَتْلُوْنَ كِتٰبَ اللّٰهِ وَأَقَامُوا الصَّلٰوةَ
وَأَنْفَقُوْا مِمَّا رَزَقْنٰهُمْ سِرًّا وَّعَلَانِيَةً يَّرْجُوْنَ
تِجَارَةً لَّنْ تَبُوْرَ ﴿٢٩﴾

३०. अशासाठी की त्याने (अल्लाहने) यांना यांचा पूरेपूर मोबदला द्यावा आणि आपल्या कृपेने अधिक प्रदान करावे. निःसंशय तो माफ करणारा व गुण ग्राहक आहे. [५४]

لِيُوَفِّيَهُمْ أُجُوْرَهُمْ وَيَزِيْدَهُمْ مِّنْ فَضْلِهٖ ۗ
إِنَّهٗ غَفُوْرٌ شَكُوْرٌ ﴿٣٠﴾

३१. आणि (हे पैगंबर !) आम्ही जो ग्रंथ तुमच्या कडे वह्य केला आहे तोच सत्य होय.[५५] त्या ग्रंथांचे सत्य-समर्थन करणारा जे या पूर्वी येऊन गेले आहेत.[५६] निःसंशय अल्लाह आपल्या दासांची जाण राखणारा व पाहणारा आहे.[५७]

وَالَّذِيْٓ أَوْحَيْنَآ إِلَيْكَ مِنَ الْكِتٰبِ هُوَ الْحَقُّ مُصَدِّقًا
لِّمَا بَيْنَ يَدَيْهِ ۗ إِنَّ اللّٰهَ بِعِبَادِهٖ لَخَبِيْرٌۢ بَصِيْرٌ ﴿٣١﴾

४५. आकाशातून पाणी वर्षाविण्याचा अर्थ आकाशाकडून म्हणजे वरून पाण्याचा वर्षाव करणे.

४६. म्हणजे पर्वतांमध्ये पांढऱ्या दगडांचे ही प्रदेश असतात, जसे संगमरवर. आणि लाल रंगांचेही. म्हणून राजस्थानात लाल रंगांचे पर्वत आहेत. दिल्लीची जामा मस्जिद आणि प्रसिध्द लाल किल्ला यांची उभारणी बांधकाम लाल दगडांनी केले गेले आहे.

४७. म्हणजे रंगांची ही विविधता अल्लाहचे कमालीचे सामर्थ्यव्यक्त करते. त्याने जी गोष्ट देखील निर्माण केली तिचे विविध नमुने सादर केले. या साठी की त्यांना पाहून बुद्धि ईश्वरा कडे वळावी. जर ही सृष्टी ईश्वरा शिवाय असती तर इथे ही रंगांची विविधता राहीली नसती आणि जर ईश्वराचे सामर्थ्य मर्यादित असते तर त्याच्या निर्मितीत ही विभिन्नता ही दिसून आली नसती.

४८. ज्ञान बाळगणाऱ्यांशी अभिप्रेत अल्लाहचा परिचय राखणारे म्हणजे जे लोक ईश्वराला ओळखून असतात ते अल्लाहच्या केवळ कल्पनेनेच भयकंपित होतात. सर्वत्र पसरलेल्या अल्लाहच्या निशाण्यांना जेव्हा ते उघड्या डोळ्यांनी पाहतात तेव्हा त्यांना त्याच्या गुणविशेषांची तेजोवलये लागतात. आणि अल्लाहच्या गुणवैशिष्ट्यांचे उचित ज्ञान त्यांचे भय निर्माण करते. हे सत्य ज्ञान होय आणि जो मनुष्य या ज्ञानात जेवढी प्रगती साध्य करतो, तितका जास्त तो अल्लाहचे भय बाळगणारा बनतो. ही अल्लाहची ओळखच होय जी माणसाच्या अंगी ईमान व सदाचारांचे तत्व निर्माण करते. या उलट जो मनुष्य अल्लाहच्या परिचया पासून बेपर्वा आहे तो नितांत मूर्ख आहे अज्ञानी आहे मग तो ऐहिक ज्ञान व कलेत कितीही निपुण का असेना.

४९. संकेत या गोष्टी कडे आहे की अल्लाहची प्रसन्नता जे अंगिकारतील त्यांच्या अपराधांना, ते भयंकर असतांनाही माफ करील.

५०. तिलावत (कुरआन-पठणा) च्या स्पष्टिकरणा करीता पहा सूरह अन्कबूत टीप क्र. ८३

५१. नमाज कायम करणे म्हणजे केवळ बाह्यत: नमाज चा इतमाम राखणे नव्हे किंबहुना ती नियमित पणे व यथायोग्य रित्या अदा करणे होय. ही सूरह मक्की आहे आणि मक्केत नमाज कायम करण्याच्या आंतरीक पैलूंवरच विशेष जोर होता. कारण बाह्यत: इतमामास अधिक अवसर नव्हता मात्र जेव्हा मदीनेत हा अवसर लाभला तेव्हा मसजिदीही बांधल्या गेल्या आणि अजान व जमाअत चा ही इतमाम राखला गेला.

शब्दकोषात ही नमाज कायम करणे 'चा अर्थ नियमितता आणि सुरक्षित राखणे हाच सांगितला गेला आहे. लिसानुल अरब या अरबी भाषेच्या शब्दकोषात पुढील उल्लेख आहे.

واَقامَ الشيَ اَدَامَهٗ مِن قولِه تعالىٰ وَيُقِيمُونَ

الصَّلوٰةَ (ج ۱۲ صفحہ ۴۹۸)

''एखाद्या गोष्टीस कायम करण्याचा अर्थ त्यावर नियमितता अंगिकारणे होय. सर्वश्रेष्ठ अल्लाहचे कथन 'नमाज कायम करतात' याच अर्थाने आहे.'' (खंड - १२ पृ. ४९८)

तसेच 'मुफरदात रागिब' मधील उल्लेख असा

يُقِيمُوْنَ الصَّلوٰة اى يُديمُونَ فِعْلَهَاوَيُحَافِظُونَ

عَلَيُهَا۔ (ص ۴۲۸)

''नमाज कायम करतात म्हणजे नित्य हे कर्म करतात व नमाज चे संरक्षण करतात.' (पृ. ४२८)

या वरुन हे स्पष्ट झाले की 'नमाज कायम करण्या' त मूलभूत महत्व या गोष्टीस आहे की माणसाने नमाज नित्य व उचितरित्या अदा करावी.

५२. अल्लाहच्या मार्गात गुप्तपणे खर्च करणे अधिक चांगले आहे. परंतु ज्या ठिकाणी तशी गरज भासेल तर उघडपणेही खर्च करु शकतो.

५३. म्हणजे ते अल्लाहच्या मार्गात खर्च करुन आखिरतच्या लाभा ची अपेक्षा बाळगतात.

५४. अल्लाह कदर जाणणारा आहे यास्तव मन:पूर्वक खर्च केला जाईल व त्यासाठी जे बलीदान दिले जाईल त्याची सर्वश्रेष्ठ अल्लाह जरुर कदर जाणील.

५५. म्हणजे हा ग्रंथ अगदी सत्य आहे. यात असत्याचे कोठून ही व कशाही स्वरुपाचे मिश्रण मुळीच झालेले नाही यासाठी याचे अनुसरण सत्याचे अनुसरण आहे.

५६. अभिप्रेत तौरात व इंजील (बायबल) होत. कुरआन या ग्रंथाचे समर्थन या अर्थानेही करतो की हे ग्रंथ सर्वश्रेष्ठ अल्लाहने अवतरीत केले होते व या अर्थानेही त्यांची शिकवण देखील तिच होती जी कुरआना ची शिकवण आहे. तसेच या अर्थाने ही की या ग्रंथामध्ये जी भाकिते पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या संबंधी आहे त्यांचा पुरावा मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) होत. दुसऱ्या शब्दात सांगायचे म्हणजे त्यांच्या प्रेषित्वाने तोरात आणि इंजिल या ग्रंथांची भाकिते खरी ठरली आहे. आणि हे त्या ग्रंथांच्या सत्यतेचे प्रमाण होय.

स्पष्ट व्हावे की कुरआन मूळ तौरात व इंजिल (बायबल) चे सत्य असण्याविषयी समर्थ करते. ज्यू व ख्रिश्चनांनी यात जे फेरफार केले आहेत व जी आपल्या तर्फे वाढ केली आहे त्यांचे नव्हे.

५७. यास्तव आता तो पाहील की त्याचे दास या सत्य-ग्रंथाशी कोणता व्यवहार करतात.

३२. मग आम्ही ग्रंथाचा वारसदार त्या लोकांना बनविले ज्यांना आम्ही आपल्या दासांमधून निवडले. तर कोणी यांच्या पैकी आपल्या स्वत:वर अत्याचार करणारा आहे तर कोणी मध्यम मार्गाने जाणारा आहे आणि कोणी अल्लाह प्रणित सुबुद्धिने सत्कर्मा मध्ये (इतरांना मागे टाकणारा आहे.[५८] हा फार मोठा अनुग्रह आहे.[५९]

ثُمَّ أَوْرَثْنَا الْكِتٰبَ الَّذِيْنَ اصْطَفَيْنَا مِنْ عِبَادِنَا ۚ
فَمِنْهُمْ ظَالِمٌ لِّنَفْسِهٖ ۚ وَمِنْهُمْ مُّقْتَصِدٌ ۚ وَمِنْهُمْ سَابِقٌۢ
بِالْخَيْرٰتِ بِإِذْنِ اللّٰهِ ۗ ذٰلِكَ هُوَ الْفَضْلُ الْكَبِيْرُ ﴿٣٢﴾

३३. सदैव कालीन बागा आहेत, ज्यात हे दाखल होतील.[६०] तिथे यांना सोन्याची कांकणे आणि मोती घातली जातील आणि यात त्यांचा पोषाख रेशमचा असेल.[६१]

جَنّٰتُ عَدْنٍ يَّدْخُلُوْنَهَا يُحَلَّوْنَ فِيْهَا مِنْ أَسَاوِرَ مِنْ
ذَهَبٍ وَّلُؤْلُؤًا ۚ وَلِبَاسُهُمْ فِيْهَا حَرِيْرٌ ﴿٣٣﴾

३४. ते म्हणतील, कृतज्ञता आहे अल्लाहशी ज्याने दु:खास आमच्या पासून दूर केले[६२] आमचा पालन कर्ता मोठा माफ करणारा व कदर जाणणारा आहे.[६३]

وَقَالُوا الْحَمْدُ لِلّٰهِ الَّذِيْٓ أَذْهَبَ عَنَّا الْحَزَنَ ۗ إِنَّ رَبَّنَا
لَغَفُوْرٌ شَكُوْرٌ ﴿٣٤﴾

३५. ज्याने आम्हाला आपल्या कृपेने राहण्याच्या घरात वसविले. इथे ना आम्हाला एखादे कष्ट उदभवते आणि ना कसला थकवा लागतो.[६४]

الَّذِيْٓ أَحَلَّنَا دَارَ الْمُقَامَةِ مِنْ فَضْلِهٖ ۚ لَا يَمَسُّنَا فِيْهَا
نَصَبٌ وَّلَا يَمَسُّنَا فِيْهَا لُغُوْبٌ ﴿٣٥﴾

३६. आणि ज्यांनी कुफ्र (सत्याचा विरोध) केला[६५] त्यांच्या करीता जहन्नम ची आग आहे. ना त्यांना मृत्यु येईल की मरण पावावे[६६] आणि ना त्यांच्या पासून या (जहन्नम) ची शिक्षा च सौम्य केली जाईल. अशा प्रकारे प्रत्येक कृतघ्नास आम्ही मोबदला देऊ.[६७]

وَالَّذِيْنَ كَفَرُوْا لَهُمْ نَارُ جَهَنَّمَ ۚ لَا يُقْضٰى عَلَيْهِمْ فَيَمُوْتُوْا
وَلَا يُخَفَّفُ عَنْهُمْ مِّنْ عَذَابِهَا ۗ كَذٰلِكَ نَجْزِيْ
كُلَّ كَفُوْرٍ ﴿٣٦﴾

३७. आणि ते यात मोठयाने ओरडून म्हणतील, हे आमच्या पालन कर्त्या ! आम्हाला यातून काढ. आता आम्ही सदाचरण करु. या आचरणा पासून वेगळे जे आम्ही करीत राहीलो.[६८] काय आम्ही तुम्हाला एवढे आयुष्य दिले नव्हते की एखाद्याने स्मरणिका (बोध) प्राप्त करु इच्छिले असते तर स्मरणिका (बोध) प्राप्त करु शकला असता.[६९] आणि तुमच्या जवळ खबरदार करणारा ही आला होता.[७०] आता गोडी चाखा. अत्याचारींचा कोणी ही सहाय्यक नाही.

وَهُمْ يَصْطَرِخُوْنَ فِيْهَا ۚ رَبَّنَآ أَخْرِجْنَا نَعْمَلْ صَالِحًا
غَيْرَ الَّذِيْ كُنَّا نَعْمَلُ ۗ أَوَلَمْ نُعَمِّرْكُمْ مَّا يَتَذَكَّرُ فِيْهِ
مَنْ تَذَكَّرَ وَجَآءَكُمُ النَّذِيْرُ ۗ فَذُوْقُوْا
فَمَا لِلظّٰلِمِيْنَ مِنْ نَّصِيْرٍ ﴿٣٧﴾

३८. अल्लाह आकाशांच्या व जमीनीच्या अपरोक्षास जाणणारा आहे. तो मनात लपलेल्या गोष्टींना ही जाणतो.

إِنَّ اللّٰهَ عٰلِمُ غَيْبِ السَّمٰوٰتِ وَالْأَرْضِ ۗ إِنَّهٗ عَلِيْمٌۢ بِذَاتِ
الصُّدُوْرِ ﴿٣٨﴾

५८. म्हणजे या ग्रंथास पैगंबरावर अवतरीत करुन त्याचा वारसदार त्याच्या उम्मत ला (समस्त अनुयायींना) बनविले, ग्रंथाशी अभिप्रेत कुरआन होय. आणि याचा वारसदार बनविण्याचा अर्थ त्यास धारण करणारा बनविणे होय. आणि 'आपल्या दासां पैकी ज्यांना निवडले' शी अभिप्रेत 'उम्मते मुस्लिमा' (मुस्लिम जन-समूह) होय. ज्याची निवड सत्य धर्माची साक्ष देण्याकरीता झाली आहे. कुरआनातील निवेदनानुसार.

وَكَذٰلِكَ جَعَلْنَا كُمْ اُمَّةً وَّسَطًا لِّتَكُونوا شُهَدَاءَ
عَلَى النَّاسِ۔ (البقره۔١٤٣)

''आणि अशा प्रकारे आम्ही तुम्हास मध्य जन समूह बनविले. अशासाठी की तुम्ही लोकांवर साक्षी राहावे.'' (सूरह बकरा. १४३)

आणि दुसऱ्या एका ठिकाणी कुरआनात फर्माविले गेले.

هُوَاجْتَبَاكُمْ (حج۔٧٨)

'त्याने तुम्हास निवडून घेतले आहे' (हज्ज-७८)

ही निवड समूह या नात्याने आहे आणि या समूहास अशासाठी निवडते गेले आहे; की यास ईश ग्रंथ प्रदान केला जावा व तो त्याने धारण करावा. हा समूह तर या माना-सन्मानाने उपकृत केला गेला आहे परंतु यातील माणसांची दशा मात्र वेगळी आहे, यात काही जण असे ही आहेत, जे चुकीचे वर्तन अंगिकारुन आपल्या स्वत:वरच अत्याचार करीत आहेत. त्यांनी ना या ग्रंथाची कदर जाणली आणि ना आपल्या त्या प्रतिष्ठेचा विचार केला जो यांना उम्मते मुस्लिमा (मुस्लिम जन समूहा) मध्ये सामील असण्याच्या नात्याने प्राप्त होता. कुरआन अशा लोकांना जालीम ठरवितो. यास्तव ते खरे पाहता या मान-प्रतिष्ठेस पात्र नाहीत जी उम्मते-मुस्लिमा स प्रदान केली गेली आहे आणि उम्मते मुस्लिमा मध्ये दुसऱ्या प्रकारचे लोक ते होत जे समतोल प्रिय आणि मध्यम मार्गाने वागणारे आहेत. अर्थात ईमाना सह सत्कर्म करणारे लोक होत. सूरह मायदा आयत क्र. ६६ मध्ये 'मध्यम मार्गाने जाणारा समूह' अशा लोकांना म्हटले गेले आहे जे दुराचारी नाहीत. आणि या मुस्लिम जन समूहात तिसऱ्या प्रकारचे लोक ते होत जे अल्लाह तर्फे लाभलेल्या सुबुद्धि ने सत्कर्मात अग्रेसर होणारे आहेत. म्हणजे सत्कर्मात पुढाकार घेणारे सत्कर्मात अग्रेसर होणारे आहेत सत्कर्मात पुढाकार घेणारे व धर्माच्या वृध्दी करीता प्रयत्नरत राहणारे आहेत. हे सर्वसामान्य सदाचारी लोकांहून उच्च स्थान बाळगणारे व अव्वल दर्जाचे लोक आहेत.

५९. म्हणजे ईश ग्रंथाचा खऱ्या अर्थाने धारण कर्ता बनणे फार मोठया सदभाग्याची गोष्ट होय आणि ज्या लोकांना हे सद्‌भाग्य लाभले त्यांच्यावर अल्लाहची फार मोठी कृपा झाली.

६०. म्हणजे जन्नत च्या चिरकालीन बागा. हा चांगला मोबदला, जसे संभाषणाच्या रोखाने, तसेच कुरआनाच्या दुसऱ्या स्पष्टीकरणावरुन स्पष्ट आहे शेवटच्या दोन समूहांना अर्थात सदाचारी व सत्कर्मात पुढे जाणाऱ्यांचा सांगितला गेला आहे. राहीला पहिला समूह म्हणजे आपल्या स्वत:वर अत्याचार करणाऱ्यांचा तर ते आपल्या श्रध्दा व आचरणानुसार ईश-शिक्षेस पात्र आहेत ज्याचे स्पष्टीकण कुरआनाने अन्य ठिकाणी केले आहे. उदाहरणार्थ एखाद्या ईमान बाळगणाऱ्याची निष्कारण हत्या करण्याची शिक्षा जहन्नम आहे. जसे सूरह निसा आयत क्र.९३ मध्ये निवेदिले गेले आहे. अशा प्रकारे अल्लाह व त्याच्या रसूल (पैगंबरा) ची अवज्ञा करणाऱ्यांना ही जहन्नमच्या शिक्षेची भिती दर्शाविली गेली आहे.

وَمَنْ يَعْصِ اللّٰهَ وَرَسُولَه وَيَتَعَدَّحُدُوْدَهٗ يُدْخِلْهُ
نَارًا خَالِدًا فِيْهَا وَلَهٗ عَذَابٌ مُّهِيْنٌ۔ (نساء۔١٤)

''आणि जो अल्लाह व त्याच्या रसूल ची अवज्ञ करील आणि त्याने निर्धारीत केलेल्या मर्यादा चे उल्लंघन करील त्याला तो आगीत टाकील ज्यात तो सदैव राहील आणि त्याच्या करीता अपमान दायक अजाब (ईश शिक्षा) आहे.'' (निसा - १४ )

तेव्हा आपल्या स्वत:वर अत्याचार करणारे दुराचारी ही असू शकतात व दांभिक देखील, यास्तव कुरआन या ठिकाणी जन्नत ची जी खुशखबर देत आहे तिला त्या लोकांसंबंधी गृहीत धरणे कदापि योग्य ठरु शकत नाही. परंतु अनेक भाष्यकारांनी या शुभ-वार्तेत स्वत:वर अत्याचार करणाऱ्या लोकांना ही सामील करुन आयतीचे चुकीचे स्पष्टीकरण केले आहे. जन्नतचा जो मोबदला या ठिकाणी सांगितला गेला आहे व या स्पष्टीकरणासह की हा अशा लोकांचा मोबदला आहे ज्यांनी ईमान बाळगले व सत्कर्मे केलीत.

اِنَّ اللّٰهَ يُدْخِلُ الَّذِيْنَ اٰمَنُوا وَعَمِلُوا الصّٰلِحٰتِ جَنّٰتٍ
تَجْرِى مِنْ تَحْتِهَا الْاَنْهٰرُ يُحَلَّوْنَ فِيْهَا مِنْ اَسَاوِرَ مِنْ
ذَهَبٍ وَّلُؤْلُؤًا وَلِبَاسُهُمْ فِيْهَا حَرِيْرٌ۔ (حج۔٢٣)

'ज्या लोकांनी ईमान बाळगले व ज्यांनी सत्कर्मे केलीत, अल्लाह त्यांना अशा बागांमध्ये दाखल करील ज्यांच्या सोन्याची कांकणे व मोत्यांचे दागिने घातली जातील आणि तिथे त्यांचा

पोषाख रेशमी असेल' (हज्ज - २३ )

आणि ज्या हदीस वचनांना या गोष्टीच्या समर्थनार्थ प्रस्तुत केले जाते की आयतीत जी जन्नतची खुशखबर ऐकविली गेली आहे ती या उम्मती (जन समूहा) च्या अत्याचारी लोकां करीता ही आहे तर ती हदीस वचने योग्य नव्हेत. उदाहरणार्थ तिर्मिजी ची अबु सईद खुदरी वाले हदीस वचन की त्याच्या प्रमाणात दोन कथन कर्त्याच्या नावाचा अगदी सुरवाती पासून उल्लेख च नाही, किंबहुना तायफच्या एका माणसा कडून ऐकले आणि कनानाच्या एका माणसाद्वारे उल्लिखित आहे. एवढयावर समाधान बाळगले गेले आहे (तिर्मिजी अबवाबुत्तफसीर. तफसील सूरतुल मलायकत) आता उघड आहे, जेव्हा कथन कर्ता कोण हेच ठाऊक नाही तर ते कथन कशा प्रकारे उचित ठरु शकते. अशा प्रकारे अहमद बिन हंबल ने अबु दर्दा तर्फे जे हदीस वचन उल्लेखिले आहे, त्याचा एक कथन कर्ता इसहाक बिन ईसा आहे आणि दुसरा कथन कर्ता अली बिन अब्दुल्लाह अलअजदी आहे आणि या दोघांबद्दल हाफीज इब्ने हजर यांनी स्पष्टीकरण दिले आहे की ते प्रामाणिक आहेत परंतु हदीस वचन निवेदन करण्यात चूका करतात (तकरीबुत्तहजीब पृ. ३७, २७३)

स्पष्ट असावे की या वेळी मुस्लिम जन समूहात दुराचारी आणि सत्कर्महीन लोकांची संख्या फार मोठी आहे आणि दाभिकांची ही कमतरता नाही. या सर्वांना केवळ उम्मते मुस्लिमा मध्ये सामील असण्यापायी जन्नत-योग्य ठरविणे म्हणजे त्यांना या अवस्थेत सोडणे की त्यांनी दुष्कर्म करण्यात लीन राहावे. आम्ही नाही जाणत की अल्लाह यांच्या पैकी कोणत्या लोकांना क्षमा करील व केव्हा करील म्हणून आम्ही दाव्याने असे सांगावयास नको की ज्यामुळे दुराचारी लोक समाधान बाळगून राहावेत.

६१. स्पष्टीकरणा साठी पहा सूरह हज्ज टीप क्र. ३५

६२. दु:खाशी अभिप्रेत प्रत्येक प्रकारचे दु:ख होय. जन्नतचे जीवन अगदी दु:खविरहीत व परिपूर्ण सुख आनंदाचे जीवन असेल. माणसाची मनोवृत्ती अशाच जीवनाची निकड बाळगतो व माणूस याचीच अभिलाषा बाळगतो. परंतु हे स्वप्न साकार होण्याचे स्थान हे नाशिवंत जग नव्हे, तर चिरकालीन जन्नत होय ही वास्तविकता त्याने जाणून घेतली तर त्याच्या समस्त दु:खाचे परिमार्जन होईल.

६३. संकेत या गोष्टी कडे आहे की आमच्या कडून जे अपराध घडले होते ते आमच्या पालन कर्त्याने माफ केलेत आणि आमच्या सत्कर्मांची कदर जाणली.

६४. म्हणजे आमच्या पालन कर्त्याने आम्हास अशा पडावा वर उतरविले आहे जे सदैव कालीन टिकणारे घर आहे व तिथे आमचे वास्तव्य ही सदैव कालीन आहे. तसेच या घरा (जन्नत) चे वैशिष्टय हे की इथे ना मेहनत व कष्ट करावे लागतात आणि ना कोणत्याही प्रकारचा थकवा जाणवतो.

मनुष्य जेव्हा कष्ट करतो तेव्हा त्याला थकवा जाणवतोच. परंतु जन्नतचे वातावरण या जगाच्या वातावरणा पासून अगदी उच्च व अप्रतिम असेल. तिथे कोणत्याही गोष्टीस प्राप्त करण्यासाठी कष्ट, परिश्रम करण्याची गरज नसेल. म्हणून थकवा ही जाणवणार नाही.

६५. अभिप्रेत प्रामुख्याने ते लोक होत ज्यांनी कुरआनास ईश ग्रंथ मानण्यास नकार दिला.

६६. म्हणजे मृत्यु येऊन यांच्या कष्ट - यातना संपणार नाहीत, किंबहुना ते निरंतर दु:ख यातना ग्रस्त अवस्थेत राहतील.

६७. एवढी सक्त शिक्षा अल्लाहच्या त्या न्याय-नियमानुसार असेल की जिथे कृतज्ञशील लोकांचा मोबदला चिरकालीन जन्नत आहे तिथे कृतघ्नशील लोकांचा मोबदला सदैव कालीन जहन्नम.

जो मनुष्य आपल्या डोळ्यांना फोडून घेतो, त्याला पुन्हा डोळे लाभत नाही. तद्वतच जो मनुष्य अल्लाहच्या देणग्यांना ठोकर मारतो, त्याला चिरकाल टिकणाऱ्या ईशा देणग्यां पासून वंचित राहणे क्रमप्राप्त ठरते.

६८. जहन्नम चे हे केवढे दु:खदायक दृश्य आहे ज्यात काफिरांना किंचाळत, ओरडत व आपल्या दुराचारांची कबूली देतांना दाखविले गेले आहे. आणि हे अशासाठी दाखविले गेले आहे की जे लोक कुरआनाचा इन्कार करतात त्यांनी आपल्या भयंकर व दु:ख दायक परिणति ची एक झळक पहावी. नवल नव्हे की ही झळक त्यांना आपल्या सुधारणा करण्यास प्रवृत्त करावी.

६९. अभिप्रेत ते वय होय ज्यात मनुष्य सत्य व असत्यात तारतम्य करण्या व घटना पासून बोध ग्रहण करण्या योग्य होतो कुरआनाने अन्य एका ठिकाणी तारुण्यावस्थेस सामंजस्याचे वय ठरविले आहे.

حَتّٰى يَبْلُغَ اَشُدَّهٗ ۔ (بنی اسرائیل ۔ ۳۴)

(बनी इस्राईल ३४) जो मनुष्य देखील सामंजस्याच्या वयाप्रत पोहचला त्याच्यावर ही जबाबदारी येते की त्याने जगात आपले स्थान निश्चित करण्या संबंधात जागृत व्हावे आणि स्मरणिका (बोध) प्राप्ती च्या ज्या गोष्टी त्याच्या समोर येतील त्याद्वारे त्याने बोध ग्रहण करावा.

७०. म्हणजे एवढेच नव्हे तर अल्लाह तर्फे तुमच्या जवळ रसूल (पैगंबर) आला होता ज्याने तुम्हावर प्रमाण प्रस्थापित केले होते.

**हे लोक अल्लाहच्च्या दृढ शपथा घेऊन म्हणत की जर त्यांच्या जवळ एखादा खबरदार करणारा आला तर ते प्रत्येक उम्मत (जनसमूहा) हून अधिक मार्गदर्शन अंगिकारणारे बनतील.परंतु जेव्हा खबरदार करणारा त्यांच्या जवळ आला तेव्हा त्यांच्या दूर जाण्यातच भर पडली.(अल-क़ुर्आन)**

३९. त्यानेच तुम्हाला जमीनी वर खलीफा [७१]
(सत्ताधिकारी) बनविले तेव्हा जो कुफ्र करील
त्याच्या कुफ्र (सत्य-विरोधा) ची आपत्ति त्याच्या
वरच कोसळेल [७२]आणि काफिरां करीता त्यांचे
कुफ्र त्यांच्या पालन कर्त्याच्या दृष्टीने त्याच्या
क्रोधाला च वाढविणारे असेल, आणि काफिरां
करीता त्यांचे कुफ्र त्यांच्या तोटया तच भर
करील.

هُوَ الَّذِيْ جَعَلَكُمْ خَلٰٓئِفَ فِي الْاَرْضِ ۭ فَمَنْ كَفَرَ فَعَلَيْهِ كُفْرُهٗ ۭ
وَلَا يَزِيْدُ الْكٰفِرِيْنَ كُفْرُهُمْ عِنْدَ رَبِّهِمْ اِلَّا مَقْتًا ۚ وَلَا يَزِيْدُ
الْكٰفِرِيْنَ كُفْرُهُمْ اِلَّا خَسَارًا ﴿٣٩﴾

४०. सांगा, काय तुम्ही पाहीले आपल्या त्या
सहभागींना, ज्यांना तुम्ही अल्लाह ला सोडून
साद घालता ! मला सांगा, यांनी जमीनी तून
एखादी गोष्ट निर्माण केली आहे ? किंवा आकाशां
मध्ये यांची काही भागीदारी आहे? किंवा आम्ही
यांना एखादा ग्रंथ दिला आहे तर ते त्यांच्या
एखाद्या स्पष्ट प्रमाणावर (कायम) आहेत? नव्हे,
किंबहुना हे अत्याचारी एकमेकांशी केवळ
फसवणुकीचे वायदे करीत आहे.[७३]

قُلْ اَرَءَيْتُمْ شُرَكَاۗءَكُمُ الَّذِيْنَ تَدْعُوْنَ مِنْ دُوْنِ اللّٰهِ ۭ
اَرُوْنِيْ مَاذَا خَلَقُوْا مِنَ الْاَرْضِ اَمْ لَهُمْ شِرْكٌ فِي السَّمٰوٰتِ ۚ
اَمْ اٰتَيْنٰهُمْ كِتٰبًا فَهُمْ عَلٰي بَيِّنَتٍ مِّنْهُ ۚ بَلْ اِنْ يَّعِدُ
الظّٰلِمُوْنَ بَعْضُهُمْ بَعْضًا اِلَّا غُرُوْرًا ﴿٤٠﴾

४१. नि:संशय अल्लाहच होय जो आकाशांना व
जमीनीला धरुन आहे की ते डगमगू नयेत [७४]
आणि जर ते डगमगले तर त्यानंतर असा कोणी
नाही जो त्यांना धरु शकेल. [७५] नि:संशय तो
मोठा प्रेमळ आणि क्षमा करणारा आहे. [७६]

اِنَّ اللّٰهَ يُمْسِكُ السَّمٰوٰتِ وَالْاَرْضَ اَنْ تَزُوْلَا ڬ وَلَىِٕنْ
زَالَتَآ اِنْ اَمْسَكَهُمَا مِنْ اَحَدٍ مِّنْۢ بَعْدِهٖ ۭ اِنَّهٗ كَانَ
حَلِيْمًا غَفُوْرًا ﴿٤١﴾

४२. हे लोक अल्लाहच्या दृढ शपथा घेऊन म्हणत
की जर त्यांच्या जवळ एखादा खबरदार करणारा
आला तर ते प्रत्येक उम्मत (जनसमूहा) हून
अधिक मार्गदर्शन अंगिकारणारे बनतील.[७७] परंतु
जेव्हा खबरदार करणारा त्यांच्या जवळ आला
तेव्हा त्यांच्या दूर जाण्यातच भर पडली.

وَاَقْسَمُوْا بِاللّٰهِ جَهْدَ اَيْمَانِهِمْ لَىِٕنْ جَاۗءَهُمْ نَذِيْرٌ
لَّيَكُوْنُنَّ اَهْدٰى مِنْ اِحْدَى الْاُمَمِ ۚ فَلَمَّا جَاۗءَهُمْ نَذِيْرٌ
مَّا زَادَهُمْ اِلَّا نُفُوْرَا ﴿٤٢﴾

७१. खलीफा म्हणजे सत्ताधिकारी होय. याचे स्पष्टीकरण सूरह नूर टीप क्र. ९५ मध्ये केले गेले आहे.

स्पष्ट असावे की कुरआनात माणसाला 'अल्लाहचा खलीफा' असे कोठे ही म्हटले गेले नाही, किंबहुना असे म्हटले गेले आहे की त्याला अल्लाहने खलीफा बनविले आहे. अर्थात तो एक अधिकार बाळगणारी ईश निर्मिती आहे आणि हे अधिकार अल्लाहने निर्माण केलेले व त्याच्या तर्फे अनामत म्हणून आहेत. ईश्वरीच अधिकारांचा किंचित मात्र अंश त्याला लाभलेला नाही आणि ना तो ईश्वराच्या जागी त्याचे काम करणारा आहे. ईश्वराचा खलीफा किंवा नायब म्हटल्याने चुकीची समजूत निर्माण होऊ शकते म्हणून खलीफाचा अर्थ अधिकार बाळगणारा हाच योग्य ठरतो आणि हे म्हणणे अधिक योग्य होय की अल्लाहने मानवाला जमीनी वर खलीफा (अधिकार असलेला) बनविले.

७२. म्हणजे जो या वस्तुस्थितीस मानण्यास इन्कार करील की अल्लाहने त्यास खलीफा बनविले आहे व याउलट स्वत:ला खुदमुखत्यार ठरविल तर त्याची पात्रता अल्लाहचा विद्रोही व फार मोठा गुन्हेगार म्हणून असेल आणि याचे सर्व संकट त्याच्यावर येईल.

७३. म्हणजे अल्लाहला सोडून ज्यांना तुम्ही ईश्वराचा दर्जा देऊन ठेवला आहे याचा एखादा बौध्दिक किंवा आचरण विषयक पुरावा तुमच्या जवळ आहे? जर आहे तर दाखवा,त्यांनी जमीनीतून कोणती गोष्ट निर्माण केली आहे किंवा आकाशांच्या रचनेत त्यांचा कोणता हिस्सा आहे? आणि जर आकाश व जमीनीच्या निर्मितीत त्यांचा कसलाही हिस्सा नाही तर मग ते ईश्वर कसे ठरले? जर अनेक देव देवतांच्या बाबतीत कोणतेही बौध्दिक प्रमाण अस्तित्वात नाही तर काय एखादा ईश ग्रंथ तुमच्या जवळ आहे ज्यात असे सांगितले गेले असावे? जर असे नाही आणि वास्तविक बाब हीच की अनेक ईश्वरांच्या अस्तितवा विषयी ना एखादे बौद्धिक प्रमाण आहे आणि ना याच्या समर्थनार्थ तुम्ही एखादी आकाशातून अवतरलेली ईश-ग्रंथ प्रस्तुत करु शकता. तेव्हा तुमची ही श्रद्धा निराधार नव्हे तर आणखी काय आहे? आणि या निराधार व खोटया श्रद्धेशी चिमटून राहण्या करीता तुम्ही एकमेकांना ज्या आशा-अपेक्षा दाखविताता की ही श्रद्धा आणि हा धर्मच धनसंपन्न करणारा आहे, हे या खेरीज आणखी काय आहे की एकमेंकाना भुरळ पाडून धोक्यात ठेवणे.

७४. अरबस्तानातल्या अनेकेश्वरवाद्यां जवळ तर कोणताही धार्मिक ग्रंथ नव्हता ज्याला तो ईश-ग्रंथ असण्याचा दावा त्यांनी केला असता परंतु भारता च्या अनेकेश्वरवाद्या जवळ अतिप्राचीन धर्म ग्रंथ वेद आहे ज्यात अनेकविध देवी देवतांची कल्पना आढळून येते परंतु वेद ना स्वत: आकाशातून अवतरल्याचा दावा करते आणि ना तो ईशसंदेश असल्याची साक्ष अस्तित्वात आहे. येथपावेतो की हे ही माहीत नाही की याचा लेखक किंवा प्रस्तुतकर्ता कोण होता.

वेदांसबंधी सी. कुन्हन राजा लिहितात-

'In most of the religions, the person who had the revelation had that revelation imparted by a God, and there may be religions where he received that revelation through personal effort without a God. Even within the scheme of the rituals of the Vedas, there is no such original Teacher of the religion and there are no dogmas for belief.'

(The Quintessence of the Rigveda. p.6)

यास्तव वेदात आढळून येणास्या अनेक ईश्वर व देवी देवतांच्या कल्पनेस प्रमाण मुळीच ठरवले जाऊ शकत नाही.

७४. म्हणजे यांना ज्या प्रकारे कायम केले गेले आहे कायम च रहावेत. जमीन कोठे ढळू नये व आकाश कोठे कोसळू नये.

७५. म्हणजे जर अल्लाह आकाश व जमीनीच्या पकडीस ढील देईल किंवा नष्ट करील तर त्यांना आपल्या जागी कायम (स्थिर) राखणारा कोणी नाही. अर्थात आकाश व जमीन अल्लाहने कायम केल्यामुळे कायम आहेत आणि जर तो यांना कायम ठेवू इच्छित नसेल तर असा कोणी नाही जो यांना कायम राखू शकेल.

७६. संकेत या गोष्टी कडे आहे की काफिरांच्या गोष्टी अशा आहेत की अल्लाहचा प्रकोप कोसळून पडावा आणि आकाश व जमीनीची व्यवस्था अस्ताव्यस्त व्हावी, परंतु अल्लाह फार प्रेमळ आहे म्हणून त्याचा प्रकोप अचानक होत नाही आणि तो माफ करणारा आहे म्हणून काफिरांना ही सवड देतो की त्यांनी त्याच्याजवळ क्षमेची अभिलाषा बाळगून आपल्या आचरणात सुधारणा करावी.

७७. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या आगमना पूर्वी मक्केचे अनेकेश्वर वादी यहूदी व ख्रिश्चनांना पाहून म्हणत की जर आमच्या जवळ अल्लाहचा एखादा रसूल (पैगंबर) आला तर आम्ही त्या जन समूहांच्या तुलनेने स्वत:ला अधिक मार्गदर्शन प्राप्त सिद्ध करुन दाखवू.

४३. ते जमीनी वर गर्व करु लागले आणि वाईट खेळी खेळू लागले. वस्तुत: वाईट खेळी त्यांनाच आपल्या तावडीत घेतात; जे या खेळी खेळतात. [७८] आता काय हे लोक या गोष्टीची वाट बघत आहेत की यांच्याशी ही तोच व्यवहार केला जावा जो पूर्वीच्या जनसमूहा सोबत केला गेला होता. [७९] असे जर आहे तर तुम्हाला अल्लाहच्या विधि नियमात कोणताही बदल आढळणार नाही आणि ना आल्लाह चा विधिनियम टळत असलेला पाहाल. [८०]

اِسْتِكْبَارًا فِى الْاَرْضِ وَمَكْرَ السَّيِّئِ ؕ وَلَا يَحِيْقُ الْمَكْرُ
السَّيِّئُ اِلَّا بِاَهْلِهٖ ؕ فَهَلْ يَنْظُرُوْنَ اِلَّا سُنَّتَ الْاَوَّلِيْنَ ۚ
فَلَنْ تَجِدَ لِسُنَّتِ اللّٰهِ تَبْدِيْلًا ۚ وَلَنْ تَجِدَ لِسُنَّتِ
اللّٰهِ تَحْوِيْلًا ﴿۴۳﴾

४४. काय हे लोक जमीनी वर हिंडले फिरले नाहीत की त्यांनी पाहीले असते त्या लोकांची काय परिणति झाली जे यांच्या पूर्वी होऊन गेलेत. ते यांच्याहून कितीतरी पटींनी अधिक शक्तिशाली होते. आणि आकाश व जमीनी वर अशी कोणती ही गोष्ट नाही जी अल्लाहला विवश करणारी असावी. तो सर्व काही जाणणारा आणि मोठा सामर्थ्य शाली आहे.

اَوَلَمْ يَسِيْرُوْا فِى الْاَرْضِ فَيَنْظُرُوْا كَيْفَ كَانَ عَاقِبَةُ
الَّذِيْنَ مِنْ قَبْلِهِمْ وَكَانُوْٓا اَشَدَّ مِنْهُمْ قُوَّةً ؕ وَمَا
كَانَ اللّٰهُ لِيُعْجِزَهٗ مِنْ شَيْءٍ فِى السَّمٰوٰتِ وَلَا فِى الْاَرْضِ ؕ
اِنَّهٗ كَانَ عَلِيْمًا قَدِيْرًا ﴿۴۴﴾

४५. जर त्याने लोकांना त्यांच्या आचरणा पायी पकडले असते तर ज़मीनीवर एक सजीव ही सोडला नसता. परंतु तो यांना एका निर्धारीत वेळे पावेतो सवड देतो, मग जेव्हा त्यांची निश्चित वेळ येईल तेव्हा अल्लाह आपल्या दासांना पाहून घेईल. [८१]

وَلَوْ يُؤَاخِذُ اللّٰهُ النَّاسَ بِمَا كَسَبُوْا مَا تَرَكَ عَلٰى ظَهْرِهَا
مِنْ دَآبَّةٍ وَّلٰكِنْ يُّؤَخِّرُهُمْ اِلٰٓى اَجَلٍ مُّسَمًّى ۚ
فَاِذَا جَآءَ اَجَلُهُمْ فَاِنَّ اللّٰهَ كَانَ بِعِبَادِهٖ بَصِيْرًا ﴿۴۵﴾

७८. म्हणजे अल्लाहचे रसूल आणि सत्य धर्माच्या विरोधात जी कारस्थाने देखील रचली जातील त्यांच्या जाळ्यात शेवटी कारस्थान रचणारेच फसतील आणि जगाने पाहीले की हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या विरुद्ध कट कारस्थाने रचणाऱ्यांचे प्रयत्न कसे त्यांच्यावरच उलटले. ही झाली त्यांची ऐहिक परिणति आणि आखिरत (मरणोत्तर जीवना) मध्ये तर भयंकर अशा दुष्परिणतीस त्यांना तोंड द्यावे लागेल.

७९. म्हणजे पैगंबरांना खोटे ठरविण्याची जी दुष्परिणति भूतकालीन जनसमूहांची झाली तीच दशा यांची व्हावी?

८०. म्हणजे अल्लाहचा हा नियम की त्याच्या पैगंबरास खोटे ठरविणाऱ्यांना तो जगातच उध्वस्त करतो एक अटळ नियम आहे. यात कोणत्याही जनसमूहा सोबत सवलतीचा व्यवहार केला जात नाही. प्रत्येक खोटे ठरविणाऱ्या जनसमूहाचा हाच शेवट झाला. म्हणून कुरआनच्या पैगंबरास खोटे ठरविणाऱ्या जन समूहाचीही निश्चित हीच दुष्परिणति होईल. अल्लाहच्या या नियमात ना कसला बदल होऊ शकतो आणि ना यानुसार येणाऱ्या ईश शिक्षेस टाळले जाऊ शकते. अधिक स्पष्टीकरणा साठी पहा सूरह बनी इस्राईल टीप क्र.१०७.

८१. हे इन्कार करणाऱ्यांच्या शंकेला उत्तर आहे की जर आम्ही मार्गभ्रष्ट आहोत तर अल्लाह आम्हाला शिक्षा का म्हणून देत नाही? फर्माविले, जर अल्लाहने लोकांना त्यांच्या अपराधां बद्दल त्वरीत धरले असते तर मग संपूर्ण मानव जाति चा नायनाट झाला असता कारण असा एकही मनुष्य नाही ज्याच्या हातून काही ना काही चूक घडली नसावी परंतु अल्लाह लोकांना सुधारणा करुन घेण्याची संधी देतो. येथपावेतो की तो मार्गभ्रष्ट जन समूहांना ही एका निर्धारीत वेळे पावेतो सवड देतो अशा साठी की त्यांनी आपल्या वर्तनात सुधारणा करुन घ्यावी जेव्हा हा अवधि संपेल आणि निर्णयाची वेळ येईल तेव्हा अल्लाह पाहील की त्यांच्या दासांनी काय कर्म केले आहे व त्यांच्याशी कोणता व्यवहार केला गेला पाहीजे. यात मार्गभ्रष्ट व दुराचारी लोकां करीता सक्त ताकीद आहे की त्यांनी हे गृहीत धरु नये की अल्लाह त्यांना अगदी मोकळे सोडून देईल.

# सूरह यासीन

# ३६. सूरह यासीन

**नाव:** सूरह चा आरंभ 'या' आणि 'सीन' या दोन अक्षरांनी होतो, तद्नुषंगे या सूरह चे नाव 'सूरह यासीन' असे आहे.

**अवतरण काळ :** मजकूरां वरुन असे दिसून येते की मक्केच्या मध्य काळाच्या शेवटी अवतरली असेल. तसेच हे ही दिसून येते की सूरह फातिर नंतर अवतरली असेल. कारण त्यात खबरदार करणारे (नज़ीर) चा उल्लेख संक्षिप्त रित्या झाला होता आणि यात अधिक स्पष्टीकरणा सह झालेला आहे.

**मध्यवर्ति कल्पना:** आखिरत (मरणोत्तर जीवना) च्या परिणति विषयी खबरदार करणे व ते अशा रीतीने की गफलतीत पडलेल्या लोकांनी जागे व्हावे आणि त्यांना आपल्या मुक्तिची काळजी लागावी. पैगंबराना अल्लाह तर्फे अशासाठी पाठविले जाते की लोकांना खबरदार करण्याचे कर्तव्य त्यांनी पार पाडावे.

**आयत रचना:** आयत १ ते १२ मध्ये पैगंबरांच्या सत्यते विषयी कुरआनाची साक्षी सादर करतांना स्पष्ट केले गेले आहे की त्यांना पाठविण्याचा उद्देश गफलतीत पडलेल्या लोकांना खबरदार करणे होय.

आयत क्र. १३ ते ३२ मध्ये बोध घडावा म्हणून एका वस्तीचे उदाहरण दिले गेले आहे जिने खबरदार करणाऱ्या पैगंबराना खोटे ठरविले होते.

**परिणामत:** अल्लाहने अजाब (ईश-प्रकोप) पाठवून त्या वस्तीचा नायनाट केला.

आयत क्र. ३३ ते ५० मध्ये एकेश्वरवादाच्या निशाण्या कडे मार्गदर्शन करीत इन्कार करणाऱ्यांच्या आक्षेपांचे खंडन केले गेले आहे. आयत क्र. ५१ ते ६५ मध्ये कियामतीचा अहवाल अशा प्रकारे सादर केले गेले आहेत की वाचकाला हे जाणू लागते की कियामत घडून आली आहे आणि तो हशर च्या मैदानात उभा आहे.

आयत क्र. ६६ ते ६८ मध्ये इन्कार करणाऱ्यांना ताकीद केली गेली आहे. आयत ६९ ते ८३ मध्ये प्रेषित्व, एकेश्वरवाद आणि दुसऱ्या जीवना संबंधी इन्कार करणाऱ्यांच्या शंकांना उत्तर दिले गेले आहे.

**फज़ीलत (श्रेष्ठत्वा) विषयी ची कथने:** या सूरह च्या श्रेष्ठत्वा विषयी तिर्मिजीने हजरत अनस द्वारे हे हदीस वचन उल्लेखिले आहे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी फर्माविले, 'यासीन कुरआनाचे अंत:करण आहे' त्याच बरोबर त्यांनी हे स्पष्ट केले की हे हदीस वचन हस्न गरीब आहे आणि याचा एक कथन कर्ता हारुन अबु मुहम्मद अज्ञात आहे (पहा तिर्मिजी अबवाब फजाईले कुर्आन)

दुसरे हदीस वचन अबु दाऊद चे आहे ज्यात त्यांनी मुअकील बिन यसार द्वारे पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचे हे कथन उल्लेखिले आहे की,

اقرأوا يس علىٰ موتاكم (ابوداؤد كتاب الجنائز)

''मरण पावणाऱ्यांवर यासीन पढत जा' (अबु दाऊद किताबुल जनाझा)

हे कथन अबु उस्मान यांनी आपल्या पित्याच्या माध्यमान्वये मुअकील बिन यसार द्वारे निवेदिली आहे. परंतु इमाम जहबी अबु उस्मान संबंधी लिहितात, ''ना त्याचा पिता परिचित आहे आणि ना तो'' (पहा मिजानुल एतेदाल खंड. ४ पृष्ठ. ५५०)

या आशयाची कथने मस्नद अहमद आणि इतर हदीस ग्रंथामध्ये ही निवेदिली गेली आहेत परंतु प्रमाण दृष्टया ती निकोपतेच्या दर्जास पोहचत नाहीत. या साठी त्यांना पैगंबरांचे कथन ठरविले जाऊ शकत नाही आणि ही गोष्ट देखील सिद्ध नाही की सहाबा. (पैगंबर सहवासातील अनुयायी) या सूरह ला एखाद्या व्यक्ति चा मृत्यु होत असतांना पढत होते.

# ३६. सूरह यासीन

سُوْرَةُ يٰسٓ

आयतीः ८३

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ

१. या सीन [१]

يٰسٓ ﴿١﴾

२. शपथ आहे बुद्धि कौशल्याने युक्त कुरआनाची.

وَالْقُرْاٰنِ الْحَكِيْمِ ﴿٢﴾

३. तुम्ही निश्चितच पैगंबरां पैकी आहात.[२]

اِنَّكَ لَمِنَ الْمُرْسَلِيْنَ ﴿٣﴾

४. सरळ मार्गावर.[३]

عَلٰى صِرَاطٍ مُّسْتَقِيْمٍ ﴿٤﴾

५. हे अवतरीत केलेले आहे त्याने, जो वर्चस्वशाली व दयावंत आहे.[४]

تَنْزِيْلَ الْعَزِيْزِ الرَّحِيْمِ ﴿٥﴾

६. अशा साठी की तुम्ही एका अशा जन समूहास खबरदार करावे ज्याच्या वाड वडीलांना खबरदार केले गेले नव्हते, म्हणून ते गफलतीत पडले आहेत.[५]

لِتُنْذِرَ قَوْمًا مَّاۤ اُنْذِرَ اٰبَآؤُهُمْ فَهُمْ غٰفِلُوْنَ ﴿٦﴾

७. यांच्या पैकी अधिकांश लोकां बाबत आमचे म्हणणे खरे ठरले आहे [६] म्हणून ते ईमान बाळगत नाहीत.

لَقَدْ حَقَّ الْقَوْلُ عَلٰۤى اَكْثَرِهِمْ فَهُمْ لَا يُؤْمِنُوْنَ ﴿٧﴾

८. आम्ही त्यांच्या मानांवर जोखंड टाकले आहे जे त्यांच्या हनुवटी पर्यंत आहे. म्हणून त्यांची डोके वर उठलेल्या स्थितीत राहीली आहेत.[७]

اِنَّا جَعَلْنَا فِيْۤ اَعْنَاقِهِمْ اَغْلٰلًا فَهِيَ اِلَى
الْاَذْقَانِ فَهُمْ مُّقْمَحُوْنَ ﴿٨﴾

९. आम्ही त्यांच्या पुढे ही एक भिंत उभी केली आहे आणि त्यांच्या मागे देखील एक भिंत आणि आम्ही त्यांना झाकून टाकले आहे. यास्तव त्यांना काही दिसून येत नाही.[८]

وَجَعَلْنَا مِنْۢ بَيْنِ اَيْدِيْهِمْ سَدًّا وَّمِنْ خَلْفِهِمْ سَدًّا
فَاَغْشَيْنٰهُمْ فَهُمْ لَا يُبْصِرُوْنَ ﴿٩﴾

१. काही भाष्यकारांनी यासीनचा अर्थ हे मानव ! असा निवेदिला आहे आणि काहींच्या मते यास अभिप्रेत पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) होत. परंतु ही गोष्ट ना शब्दकोषा ने सीद्ध आहे आणि ना हदीस वचना द्वारे.

ज्यांचा अर्थ निश्चित लावला जाऊ शकत नाही अशी ही अक्षरे, आम्ही या आधी निवेदिल्या प्रमाणे सूरतींच्या काही महत्वपूर्ण मजकूरांकडे संकेत करतात (पहा सूरह बकरा टीप क्र. १ आणि सूरह यूनुस टीप क्र. १) या सूरह मध्ये 'या'चा संकेत يَحَسۡرَةً عَلَى ٱلۡعِبَادِ 'दासांच्या अवस्थेवर खेद!' आयात क्र. ३० कडे आहे आणि 'सीन'चा संकेत سَلَٰمٌ قَوۡلًا مِّن رَّبٍّ رَّحِيمٍ ''जन्नत मध्ये त्यांच्या करीता दयाळू पालन कर्त्या तर्फे कौल असेल, 'सलाम' आयत क्र. ५८ कडे आहे. तात्पर्य एकही कडे त्या सूरह मध्ये या दासांच्या अवस्थे विषयी खेद प्रकट केला गेला आहे, जे पैगंबरांच्या सत्यते बाबत विश्वास बाळगत नाही किंबहुना त्यांची थट्टां मस्करी करतात आणि दुसरी कडे ईमान बाळगणाऱ्यांना खुशखबर दिली गेली आहे की त्यांना दयावंत पालन कर्ता त्यांचा सलाम (शांती) चा नजराणा पेश करील.

२. अरबी भाषेत अशा प्रसंगी शपथ 'साक्ष' या अर्थाने प्रयोजिले जाते. म्हणजे ज्या गोष्टीची शपथ घेतली जाते तिला पुरावा व प्रमाण म्हणून मांडले जाते. या ठिकाणी ही हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) हे पैगंबर असण्या विषयी चा पुरावा म्हणून बुद्धि कौशल्य युक्त कुरआन सादर केले गेले आहे.

जो मनुष्य देखील कुरआना चे विशुद्ध बुद्धि ने अध्ययन करील त्याला हे जाणवल्या खेरीज राहणार नाही की.

१) कुरआनाची ज्ञान विषयक पातळी अत्युच्च आहे.माणसाच्या ज्ञानात तो मोठी मोलाची भर घालतो: आणि त्याला सृष्टीच्या रहस्य भेदांचा उलगडा करुन देतो आणि मनुष्य जीवना विषयी सत्यांना अनावरीत करतो.

२) तो माणसाला उंची कडे नेतो व त्याला उच्चता प्रदान करतो.

३) विचार चिंतना च्या सुप्त गुणांना चालना देतो आणि त्याच्या बुद्धिस प्रखरता प्रदान करतो.

४) याची शिकवण अतिशय उच्चतम व मानव-स्वभाव धर्माशी अगदी सुसंगत आहेत.

५) तो न्याय-तुला प्रस्थिापित करतो आणि शत्रू शी ही न्याय करण्यास शिकवितो.

६) तो इतिहासाच्या विस्मृत पानांना सादर करतो ज्यात माणुसकी करीता फार मोठा धडा आहे. आणि भविष्यकालीन विश्वात जे काही घडून येणार आहे त्या बाबत पूर्व सूचना देतो.

७) तो माणसाच्या बाहय रुपास ही शुचिर्भूतता प्रदान करतो आणि आंतरिक रुपास देखील आणि त्याच्यात असे नव चैतन्य निर्माण करतो कि मनुष्याला जीवनाच्या खऱ्या वास्तवते ची गोडी कळून येते.

अशी बुद्धि कौशल्य युक्त वाणी जी माणसाचा काया पालट करत असावी व त्याला उच्च पदी नेऊन पोहचवित असावी तीच ईश-वाणी किंवा ईश-संदेश असू शकते. आणि जेव्हा ही वाणी अल्लाहची वाणी आहे तर तिला प्रस्तुत करणारा अपरिहार्यत: अल्लाहचा रसूल (पैगंबर) आहे. थोडक्यात हे की कुरआनाचे चमत्काराच्या मर्यादे प्रत बुद्धि कौशल्य युक्त ग्रंथ असणे. त्याला प्रस्तुत करणारा जो एक अशिक्षित मनुष्य आहे, पैगंबर असण्याचा चक्षुर्वे सत्यं प्रमाण होय आणि हे असे प्रमाण होय जे यावच्चंद्र दिवाकरौ कायम राहणारे आहे. अशासाठी की प्रत्येक काळातील लोकांनी त्यांच्या प्रेषित्वावर विश्वास राखावा.

३. सरळ मार्गाशी अभिप्रेत तो मार्ग होय जो सरळ अल्लाह पर्यंत पोहचवितो आणि तो म्हणजे एकेश्वरवादाचा मार्ग होय अर्थात इस्लामचा मार्ग.

सूरह फातेहा मध्ये ज्या सिराते मुस्तकीम (सरळ मार्गा) करीता दासांच्या मुखाने प्रार्थना निघते आणि हाच तो सरळ मार्ग होय ज्याचे पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी अनुसरण केले होते.

४. म्हणजे या कुरआनास अल्लाहने अवतरीत केले आहे, जो वर्चस्वशाली ही आहे आणि दयावंत देखील. या दोन गुणविशेषांकडे निर्देश करण्याचा हेतु हे स्पष्ट करणे होय की हे कुरआन त्या हस्ती चे फर्मान आहे ज्याची सत्ता सर्वांवर पसरली आहे म्हणून त्यास रोखणे किंवा त्याकडे दुर्लक्ष करणे ही काही सामान्य बाब नव्हे, किंबहुना फार मोठी अवज्ञा आहे ज्याबद्दल त्याच्या कडून सक्तीने जाब विचारला जाईल आणि जर तुम्ही त्याच्या फर्मानास कबूल कराल तर त्याच्या कृपेस पात्र होऊ शकता.

५. अभिप्रेत अरब म्हणजे बनी इस्माईल होत. या वंशात हजरत इब्राहीम नंतर कोणी ही पैगंबर (खबरदार करणारा) झाला नाही. हजरत इब्राहीम आणि हजरत इस्माईल यांचा काळ सुमारे इ. स. पूर्वी दोन हजार वर्षे होता आणि हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना अल्लाह तर्फे इ. स. ६१० मध्ये पाठविले गेले. तात्पर्य अडीच हजार वर्षोनंतर यांच्यात पैगंबराचे आगमन झाले. एवढ्या दीर्घ काळापावेतो यांच्यात एखादा पैगंबर अशासाठी पाठविले गेले नाही की हजरत इब्राहीम व हजरत इस्माईल यांनी मक्का येथे अल्लाहचे घर उभारुन आणि नमाज व हज्ज ची पद्धति प्रचलीत करुन एकेश्वरवादाचे सखोल परिणाम मागे सोडले होते, आणि एका असंस्कृत समाजा करीता ज्या मर्यादे प्रत शरीअत विषयक

आदेशांची गरज होती ते ही सुन्नते इब्राहीम च्या स्वरुपात अस्तित्वात येत राहीले होते. या खेरीज त्यांचा उल्लेख माध्यमान्वये हजरत शुएब यांच्या द्वारे जे दक्षिण हिजाज च्या प्रदेशात अल्लाह तर्फे पाठविले गेले होते. तसेच बनी इस्राईल चे पैगंबर, विशेषत: हजरत मूसा आणि हजरत ईशा यांच्या द्वारे पार पडत राहीला. अर्थात त्यांच्या जवळ पास च्या प्रदेशात बास्तव्य करीत राहीले आणि दीन (धर्मा) च्या गोष्टी त्यांच्या प्रत पोहचत राहील्या यास्तव हे समजणे योग्य नव्हे की या दीर्घ काळात ते अगदीच काळोखात राहीले आणि मार्गदर्शन च्या प्रकाशाची त्यांच्या करीता कसली ही उपाय योजना केली गेली नव्हती. या ठिकाणी अरब लोकांना हे स्पष्ट विदित करण्याचा हेतु आहे की एका प्रदिर्घ काळा नंतर जो पैगंबर अल्लाह मार्फत तुमच्या कडे पाठविला गेला आहे त्याची तुम्ही कदर जाणली पाहीचे की अल्लाहने तुम्हाला फार मोठ्या कृपेने उपकृत केले आहे. ज्या गफलतीत तुम्ही पडला होता, त्यातून तुम्हाला जागृत करण्याची उपाय योजना केली गेली आणि मार्गदर्शन चा जो प्रकाश मंद पडला होता त्यास तेजस्वी केले गेले. परंतु तुम्ही त्याच्या उपमर्द करीत आहात. जणू तुम्हाला ना रसूल ची गरज आहे आणि ना मार्गदर्शनाची.

६. अभिप्रेत सर्वश्रेष्ठ अल्लाहचे कथन होय; जे त्याने इब्लीस (सैताना) ला संबोधून केले होते.

لَاَمۡلَئَنَّ جَهَنَّمَ مِنۡکَ وَمِمَّنۡ تَبِعَکَ مِنۡهُمۡ اَجۡمَعِیۡنَ۔ (ص-٨٥)

''मी तुझ्या द्वारे आणि जे यांच्या पैकी तुझे अनुसरण करतील त्या सर्वांनी जहन्नम ला भरुन टाकीन.''

(स्वाद. ८५)

अर्थात यांच्या पैकी अधिकांश लोकांनी सैतानाचे अनुसरण करुन स्वत:ला जहन्नम पात्र बनविले आहे. या ठिकाणी विशेषत: मक्केचे अनेकेश्वर वादी अभिप्रेत आहेत ज्यांच्या वर अल्लाह चे प्रमाण चांगल्या प्रकारे कायम झाले होते. तरी ही यांच्या पैकी अधिकांश लोकांनी ईमान बाळगले नाही व शेवटी कुफ्र (इन्कार करण्याच्या) स्थितीतच मेले किंवा युद्धाने त्यांचा शेवट केला. मक्केत फार थोडेच लोक असे निघालेत ज्यांनी उशीरा उशीरा ईमान बाळगले.

७. जोखंड शी अभिप्रेत वाड वडीलांच्या अंधानुकरणाचे जोखंड होय यांनी ज्या अर्थी हेच जोखंड पसंत केले. तेव्हा अल्लाहच्या अपमानित करणाऱ्या नियमाने त्यांना हेच जोखंड घातले. हे जोखंड त्यांच्या हनुवटी पर्यंत आले आहेत, म्हणून त्यांचे डोके वरच्या दिशेने उंचावलेल्या स्थितीत राहीले आहेत. हे त्यांच्या गर्वाचे व बंडखोरांचे चित्र आहे की आता त्यांचे डोके अल्लाह पुढे लवणार नाही. स्पष्ट आहे की श्रद्धा व धर्म संदर्भात पूर्वजांचे अंधानुकरण माणसाच्या अंगी गर्व अहंकार निर्माण करते आणि त्याला अल्लाहचा बंडखोर बनविते. प्रत्येक माणसाची ही जबाबदारी आहे की त्याने सत्याचा शोध घ्यावा आणि अल्लाहने दिलेल्या बुद्धिचा उचित रित्या वापर करावा.

८. हे त्या मार्गभ्रष्ट लोकांच्या या अवस्थेचे चित्र आहे की त्यांच्या समोर सत्या कडे मार्गदर्शन करणाऱ्या ज्या निशाण्या पसरलेल्या आहेत त्या त्यांना दिसून येत नाहीत, कारण त्यांच्या व सत्याच्या दरम्यान दूषित पूर्वग्रहाची भिंत आडवी आली आहे. त्याच प्रमाणे पूर्वी होऊन गेलेल्या जन समूहांच्या बोध दायक परिणति पासून ही त्यांना काही धडा मिळत नाही कारण त्यांच्या मागे ही भिंत आहे. दुराभिमान व दूषित पूर्वग्रहाचे पडदे त्यांच्या डोळ्यांवर अशा प्रकारे पडले आहेत की त्यांना काहीच दिसत नाही.

**तुम्ही त्यालाच खबरदार करु शकता जो उपदेशाचे अनुसरण करील आणि रहमान पासून न पाहता भय बाळगील. अशा व्यक्तिस क्षमा आणि प्रतिष्ठा पूर्वक मोबदल्या ची खुशखबर द्या. (अल-क़ुर्आन)**

१०. त्यांच्या करीता सारखेच होय, तुम्ही त्यांना खबरदार करा किंवा करु नका. ते ईमान बाळगणार नाहीत. [९]

وَسَوَآءٌ عَلَيۡهِمۡ ءَأَنذَرۡتَهُمۡ أَمۡ لَمۡ تُنذِرۡهُمۡ لَا يُؤۡمِنُونَ ١٠

११. तुम्ही त्यालाच खबरदार करु शकता जो उपदेशाचे अनुसरण करील आणि रहमान पासून न पाहता भय बाळगील.[१०] अशा व्यक्तिस क्षमा आणि प्रतिष्ठा पूर्वक मोबदल्या ची खुशखबर द्या.

إِنَّمَا تُنذِرُ مَنِ ٱتَّبَعَ ٱلذِّكۡرَ وَخَشِيَ ٱلرَّحۡمَٰنَ بِٱلۡغَيۡبِۖ
فَبَشِّرۡهُ بِمَغۡفِرَةٖ وَأَجۡرٖ كَرِيمٍ ١١

१२. आम्ही निःसंशय मृतांना जिवंत करु.[११] आणि आम्ही लिहीत आहोत जे काही त्यांनी पुढे पाठविले आणि जे अवशेष (चिन्हे) त्यांनी मागे सोडले. आम्ही प्रत्येक गोष्टीस एका स्पष्ट ग्रंथात समाविष्ट करुन ठेवले आहे.[१२]

إِنَّا نَحۡنُ نُحۡيِ ٱلۡمَوۡتَىٰ وَنَكۡتُبُ مَا قَدَّمُواْ وَءَاثَٰرَهُمۡۚ
وَكُلَّ شَيۡءٍ أَحۡصَيۡنَٰهُ فِيٓ إِمَامٖ مُّبِينٖ ١٢

१३. यांना उदाहरणा दाखल वस्तीवाल्यां चा वृत्तांत ऐकवा, जेव्हा त्यांच्या जवळ रसूल आले.[१३]

وَٱضۡرِبۡ لَهُم مَّثَلًا أَصۡحَٰبَ ٱلۡقَرۡيَةِ إِذۡ
جَآءَهَا ٱلۡمُرۡسَلُونَ ١٣

१४. जेव्हा आम्ही त्यांच्या जवळ दोन रसूल (पैगंबर) पाठविलेत तेव्हा त्यांनी त्यांना खोटे ठरविले, मग आम्ही तिसरा रसूल पाठवून (त्या पैगंबरांचे) समर्थन केले. या सगळ्यांनी म्हटले आम्ही तुमच्या कडे रसूल (पैगंबर) बनवून पाठविले गेले आहोत.[१४]

إِذۡ أَرۡسَلۡنَآ إِلَيۡهِمُ ٱثۡنَيۡنِ فَكَذَّبُوهُمَا فَعَزَّزۡنَا بِثَالِثٖ
فَقَالُوٓاْ إِنَّآ إِلَيۡكُم مُّرۡسَلُونَ ١٤

१५. त्या लोकांनी उत्तर दिले, तुम्ही तर आमच्या सारखे च मनुष्य आहात, आणि रहमान ने कोणती ही गोष्ट अवतरीत केली नाही. तुम्ही अगदी खोटे बोलता.[१५]

قَالُواْ مَآ أَنتُمۡ إِلَّا بَشَرٞ مِّثۡلُنَا وَمَآ أَنزَلَ ٱلرَّحۡمَٰنُ
مِن شَيۡءٍ إِنۡ أَنتُمۡ إِلَّا تَكۡذِبُونَ ١٥

१६. ते म्हणाले, आमचा पालन कर्ता जाणतो की आम्हाला तुमच्या कडे रसूल बनवून पाठविले गेले आहे.[१६]

قَالُواْ رَبُّنَا يَعۡلَمُ إِنَّآ إِلَيۡكُمۡ لَمُرۡسَلُونَ ١٦

९. म्हणजे असले हट्टी लोक पैगंबरांच्या ताकीदींचा कसलाही प्रभाव कबूल करणारे नाहीत.

१०. म्हणजे असेच लोक पैगंबरांच्या ताकीदींचा प्रभाव स्विकारतील. जे उपदेशाची गोष्ट मान्य करण्यास तयार आहेत. आणि अत्यंत दयावंत अशा अल्लाह च्या महानते पासून भयभीत असावेत. ईश्वराला न पहाता भिण्याच्या स्पष्टीकरणा करीता पहा सूरह अंबिया टीप. क्र. ६८

११. म्हणजे कियामती च्या दिवशी समस्त मरण पावलेल्या इसमांना पुन्हा जिवित केले जाईल. या साठी की अल्लाह समोर त्यांनी आपल्या कृतकर्माचा जाब द्यावा व त्यानुसार चांगला किंवा वाईट मोबदला प्राप्त करावा.

१२. म्हणजे आम्ही ना केवळ या आचरणास लेख बद्ध करीत आहोत जे त्यांनी केले, किंबहुना जे परिणाम व चिन्हे त्यांनी आपल्या मागे सोडली आहेत, त्यांचे ही रेकॉर्ड तयार करीत आहोत. अल्लाह ने असे रेकॉर्ड तयार करण्याची व्यवस्था केली आहे की प्रत्येक मनुष्याचे प्रत्येक कर्म व त्याने आपल्या पश्चात सोडलेले चिन्ह अंकित केले जावे. अशासाठी की कियामती च्या दिवशी त्यांनी ही बघून घ्यावे की त्यांनी जगात चांगली कामे केली होती कि वाईट कामे आपल्या मागे चांगली चिन्ह सोडली होती कि वाईट आणि चांगले पीक पेरले होते कि काटे.

त्या काळात कुरआना चे हे निवेदन लोकांना विचित्र वाटत होते, की माणसाच्या आचरणाचे असे तपशीलवार रेकॉर्ड कशा प्रकारे तयार केले जाऊ शकते. परंतु आजच्या काळात जेव्हा माणसाने टेप रेकॉर्ड, कंप्यूटर आणि बोलक्या चित्रपटांचा शोध लावला. या वर विश्वास ठेवणे किंचितही कठीण राहीले नाही आणि अल्लाह तर प्रत्येक गोष्ट करण्यास समर्थ आणि प्रत्येक गोष्ट जाणणारा आहे.

مَاقَدَّمُوا

''जे काही त्यांनी पुढे पाठविले''शी अभिप्रेत त्यांचे आचरण होय ज्याचा निष्कर्ष आखिरत (मरणोत्तर जीवना) मध्ये त्यांच्या समोर येणार आहे. अधिक स्पष्टीकरणा साठी पहा सूरह इन्फितार, टीप क्र. ५

१३. या आयती मध्ये एक ऐतिहासिक घटना सादर केली गेली आहे. अशासाठी की पैगंबरांचा इन्कार करणाऱ्यांनी या पासून बोध घ्यावा. घटनेच्या केवळ त्या अंशाचाच उल्लेख करण्यात आला आहे जे बोध ग्रहणाकरीता पर्याप्त ठरु शकतात. ही वस्ती कोणती होती. कोण कोणत्या पैगंबरास तेचे पाठविले गेले होते आणि ही घटना केव्हा घडून आली? वगैरे गोष्टी चे स्पष्टीकरण कुरआनाने दिलेले नाही आणि संभवत: याचे कारण हे आहे की ही घटना अति प्राचीन काळात हजरत इब्राहीम यांच्या ही पूर्वी घडली असावी आणि ज्याअर्थी तिचे ऐतिहासिक अवशेष नष्ट झाले होते, म्हणून वस्ती च्या नाव वगैरे स्पष्टीकरण चा काहीच लाभ नव्हता.

अधिकांश भाष्यकारांनी वस्ती शी अभिप्रेत अन्ताकिया (Antioch) घेतले आहे जे सिरीया मध्ये तुर्कस्थानच्या सरहदी जवळील एक मोठे व्यापारी शहर होते. आणि पैगंबराशी अभिप्रेत हजरत ईसा यांचे सहकारी ज्यांनी या शहरात धर्म प्रचार केला होता. परंतु अल्लामा इब्ने कसीर यांनी यास सकारण चुकीचे दर्शविले आहे (पहा तफसीर इब्ने कसीर खंड ३ पृष्ठ ५६९) आम्ही असे समजतो की या आयती अन्ताकिया व तेथल्या धर्मप्रचारकांना कोणत्या ही प्रकारे लागू पडत नाही.

१) अन्ताकिया ती वस्ती नव्हे जी ईश-शिक्षेद्वारे नष्ट केली गेली असावी, जेव्हा कुरआन या गोष्टीचे पुढे स्पष्टीकरण (आयत क्र. २९ मध्ये) करतो की या वस्ती वर अल्लाह ने शेवटी अजाब (शिक्षा) अवतरीत केली, ज्याच्या परिणाम स्वरुपी ते अगदी नाश पावले. बायबल च्या निवेदनानुसार अन्ताकिया मध्ये ख्रिस्ती धर्म प्रचारकांना मोठे यश लाभले होते. (पहा बायबल. भाग. ११)

२) ज्या तीन व्यक्तिना वस्ती वाल्यांकडे पाठविले गेले होते, त्यांच्या विषयी कुरआन स्पष्टत: निवेदन करतो की ते अल्लाह ने पाठविलेले रसूल होते (आयत १४,१६) त्या अर्थी हजरत ईसा (येशू) यांचे सहकारी पारिभाषिक अर्थाने अल्लाहचे रसूल नव्हते. ते कुरआना च्या निवेदना नुसार हजरत ईसा यांचे सोबती व सहाय्यक होते. (सूरह सफ आयत.१४)

३) वस्तीवाल्यांचा हा आक्षेप की तुम्ही आमच्या सारखेच मनुष्य आहात आणि रहमान ने (अर्थात अल्लाहने) कोणतीही गोष्ट अवतरीत केली नाही (आयत.१५) अल्लाहच्या या पैगंबरां संबंधी असू शकत होते? जे हे म्हणत होते की आमच्यावर ईश-संदेश अवतरला आहे हजरत ईसा यांचे सहकारी तर प्रचारक या नात्याने अन्ताकिया गेले होते. आणि एखाद्या धर्म प्रचारकावर जेव्हा तो अल्लाहचा पैगंबर होण्याचा दावा करीत नसेल, तर कोणताही मनुष्य हा आक्षेप घेऊ शकत नाही की तुम्ही तर आमच्या सारखे मनुष्य आहात.

'तदब्बुर कुरआन'च्या लेखकाने याहून वेगळे आपले मत व्यक्त करतांना म्हटले आहे की वस्ती शी अभिप्रेत मिस्र (इजिप्त) होय आणि दोन पैगंबरांशी अभिप्रेत हजरत मूसा व हजरत हारुन हे होते. आणि तिसरा इसम ज्याच्या द्वारे समर्थन केले गेले फिरऔनच्या दरबारचा तो मनुष्य होता ज्याने ईमान बाळगले. परंतु हे मत या कारणास्तव उदित नाही की कुरआन तिन्ही व्यक्तिना पैगंबर असल्याचे दर्शवितो. (आयत. १६) आणि आयतींचे जे स्पष्टीकरण यांनी दिले आहे ते नि:संकोच

नाही तसेच या ही गोष्टीचा काही पुरावा नाही की मिस्र चा सर्वनाश भयानक चित्कारा द्वारे झाला होता म्हणून आयत २९ मध्ये ज्या ईश-शिक्षेचा उल्लेख केला गेला आहे त्यास अभिप्रेत ती ईश शिक्षा गृहीत धरली जाऊ शकत नाही जी फिरऔन च्या देशावर कोसळली होती. थोडक्यात म्हणजे कुरआनाच्या निवेदना ने या विचाराचे खंडन होते. वर स्पष्ट केल्या प्रमाणे आमच्या मते केवळ अंदाज बांधून त्या गोष्टी निश्चित करणे ज्याची निश्चिती कुरआनाने केलेली नाही. या पेक्षा कुरआनाच्या निवेदनावरच समाधान मानणे हे अधिक चांगले.

१४. स्पष्ट झाले की तिसरा मनुष्य देखील पैगंबर होता. आणि हे तिन्ही पैगंबर अल्लाहने पाठविलेले होते म्हणजे ते परिभाषिक अर्थाने पैगंबर होते म्हणून त्याना हजरत ईसा चा वृतांत ठरविणे मुळीच योग्य नव्हे. एका वस्तीत तीन पैगंबर पाठविण्याचा हेतु हा दिसून येतो की प्रमाणाच्या इतमामाचे एक उदाहरण हे ही कायम व्हावे आणि जगातील माणसांना हे स्पष्ट पणे कळावे की जो जन समूह हेकेखोर वृत्तीत कायम राहतो तो एकच काय पण तीन तीन पैगंबरांनाही खोटे ठरविण्यास मागे पुढे पाहत नाही.

१५. हे त्याच स्वरुपाचे आक्षेप होते जसे मक्काचे अनेकेश्वरवादी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या संबंधी घेत.

१६. म्हणजे जर तुम्ही हे पुरावे असतांना ही आम्हाला पैगंबर या नात्याने मान्य करण्यास तयार नाहीत, जे आम्ही सादर करीत आहोत, तर नका मानू आम्ही तर अल्लाहला साक्षी ठेवून सांगतो की त्याने आम्हाला रसूल अर्थात पैगंबर बनवून पाठविले.

ते लोक म्हणाले, आम्ही तर तुम्हाला अभद्र समजतो. जर तुम्ही (आपल्या वक्तव्या पासून) परत फिरले नाहीत तर आम्ही तुम्हावर दगडांचा वर्षाव करु. आणि तुम्हाला आमच्या हातून दू:खदायक शिक्षा मिळेल. (अल-क़ुर्आन)

१७. आणि आमची जबाबदारी या खेरीज आणखी काहीच नाही की स्पष्ट संदेश पोहचवावा.[१७]

وَمَا عَلَيْنَآ إِلَّا الْبَلٰغُ الْمُبِينُ ﴿١٧﴾

१८. ते लोक म्हणाले, आम्ही तर तुम्हाला अभद्र समजतो.[१८] जर तुम्ही (आपल्या वक्तव्या पासून) परत फिरले नाहीत तर आम्ही तुम्हावर दगडांचा वर्षाव करु. आणि तुम्हाला आमच्या हातून दू:खदायक शिक्षा मिळेल.

قَالُوٓا إِنَّا تَطَيَّرْنَا بِكُمْ لَئِن لَّمْ تَنتَهُوا لَنَرْجُمَنَّكُمْ
وَلَيَمَسَّنَّكُم مِّنَّا عَذَابٌ أَلِيمٌ ﴿١٨﴾

१९. त्यांनी (पैगंबरांनी) उत्तर दिले, तुमचे अभद्रपण / तुमच्या समवेत आहे. [१९] काय ही (शिक्षा) यामुळे (द्याल) की तुम्हाला उपदेश केला गेला. [२०] वस्तुस्थिती अशी की तुम्ही मर्यादा ओलांडलेले लोक आहात.[२१]

قَالُوا طَٰٓئِرُكُم مَّعَكُمْ أَئِن
ذُكِّرْتُم بَلْ أَنتُمْ قَوْمٌ مُّسْرِفُونَ ﴿١٩﴾

२०. आणि शहराच्या शेवटच्या किनाऱ्या पासून एक इसम धावत आला.[२२] तो म्हणाला हे माझ्या जन समूहाच्या लोकांनो ! पैगंबरांचे अनुसरण करा.[२३]

وَجَآءَ مِنْ أَقْصَا الْمَدِينَةِ رَجُلٌ يَسْعَىٰ قَالَ يَٰقَوْمِ
اتَّبِعُوا الْمُرْسَلِينَ ﴿٢٠﴾

२१. अनुसरण करा त्या लोकांचे जे तुमच्या कडून कसलाही मोबदला मागत नाहीत आणि सन्मार्गावर आहेत.[२४]

اتَّبِعُوا مَن لَّا يَسْـَٔلُكُمْ أَجْرًا وَهُم مُّهْتَدُونَ ﴿٢١﴾

२२. आणि मी का म्हणून त्याची उपासना करु नये, ज्याने मला निर्माण केले आहे [२५] आणि ज्याच्या कडे तुम्ही सर्व परतविले जाल.[२६]

وَمَا لِيَ لَآ أَعْبُدُ الَّذِي فَطَرَنِي وَإِلَيْهِ تُرْجَعُونَ ﴿٢٢﴾

२३. काय मी त्याला सोडून अन्य उपास्य बनवू? जर रहमान मला त्रास-यातना देऊ इच्छिल तर ना यांची शिफारस मला उपयोगी पडू शकते आणि ना ते माझी सुटका करु शकतात.

ءَأَتَّخِذُ مِن دُونِهِۦٓ ءَالِهَةً إِن يُرِدْنِ الرَّحْمَٰنُ بِضُرٍّ لَّا تُغْنِ عَنِّي
شَفَٰعَتُهُمْ شَيْـًٔا وَلَا يُنقِذُونِ ﴿٢٣﴾

२४.

जर मी असे करीन तर मी उघड मार्गभ्रष्टतेत असेन.

إِنِّيٓ إِذًا لَّفِي ضَلَٰلٍ مُّبِينٍ ﴿٢٤﴾

१७. म्हणजे आमची जबाबदारी एवढीच की स्पष्टत: अल्लाहचा संदेश पोहचवावा, त्यानंतर आपल्या आचरणास तुम्ही स्वत:च जबाबदार आहात. आमची जबाबदारी ही नव्हे की तुम्हाला ईमान बाळगण्या करीता विवश करावे.

स्पष्ट व्हावे की या ठिकाणी जी गोष्ट सांगीतली गेली आहे ती अशा लोकांसंबंधी आहे ज्यांनी ईमान बाळगले नाही यावरुन हा निष्कर्ष काढणे योग्य नव्हे की रसूल ची जबाबदारी ईमान बाळगणाऱ्यांच्या संदर्भातहि संदेश पोहचविच्या पलीकडे आणखी काहीच नसते. हजरत मूसा यांना बनी इस्राईल वंशा च्या संबंधाने कोणकोणत्या जबाबदारी बाबत वचन बद्ध व्हेवे लागले, हजरत दाऊद यांना खिलाफती ची जबाबदारी सोपवली गेली. हजरत सुलेमान यांनी एक वैभवशाली राज्य प्रस्थापित करण्या सोबत च न्यायालयीन कर्तव्य देखील पार पाडले आणि पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी आत्मशुद्धि व प्रशिक्षिण आणि ईश ग्रंथ व बुद्धि कौशल्याचे शिक्षण ही दिले तसेच न्यायालयीन फैसले देखील केले. त्याच प्रमाणे इन्कार करणाऱ्यांशी जेहाद सारखी जबाबदारी ही अदा केली. तात्पर्य संपूर्ण धर्माची त्यांनी आपल्या वचनाने व आचरणाने व्याख्या व स्पष्टीकरण केले ज्याचे अनुसरण ईमान बाळगणाऱ्या करीता आवश्यक आहे.

१८. असे दिसून येते की सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्यांना दुष्काळ किंवा अन्य एखाद्या बाबतीत संकट ग्रस्त केले होते, या साठी की त्यांनी अल्लाह कडे रुजू व्हावे. परंतु त्यानी आपल्या पैगंबरास अभद्र ठरविले.

१९. म्हणजे अभद्रपणाचे अस्तित्व बाह्य रुपाने नव्हे, तर तुमच्या स्वत:च्या अंतर्यामी आहे. वाईट कर्माचे फळ वाईटच म्हणून दुष्कर्म करुन परिणामाची जबाबदारी इतरांच्या शिरावर टाकता येत नाही.

२०. अर्थात आम्ही असा काय गुन्हा केला ज्याची एवढी कठोर शिक्षा तुम्ही आम्हाला देऊ इच्छिता. काय आत्मशुद्धी व उपदेशाचे काम करणे देखील अपराध आहे?

२१. म्हणजे चारित्र्य व न्याया च्या सर्व निकडींना तुम्ही पाठीमागे टाकले आणि उत्पात मांडू लागले.

२२. अर्थात या संपूर्ण वस्तीत एक ईमान बाळगणारा मनुष्य निघाला अन्यथा संपूर्ण जन समूहा ने पैगंबराच्या आवाहनास रद्द बातल ठरविले होते. हा मनुष्य शहराच्या अगदी अंतिम टोका वर राहात असला तरी जेव्हा पैगंबरांचे आवाहन त्याच्या पावेतो पोहचताच तो धावत धावत म्हणजे मोठ्या तत्परतेने त्या ठिकाणी पोहचला जिथे पैगंबर व वस्ती वाल्या मध्ये संघर्ष उद्‌भवला होता.

२३. त्याने वस्ती वाल्यांच्या दरम्यान पोहचून सत्याचे ऐलान केले आणि आपल्या जनसमूहास पैगंबरांचे अनुसरण करण्या बाबत आवाहन केले. ईमाना ने त्यांच्या अंगी असे चैतन्य निर्माण केले की तो बघता बघता सत्याचा आवाहक व पुरस्कर्ता बनला.

२४. म्हणजे रसूल आपल्या आचरणाच्या दृष्टीने नि:स्पृह आहेत आणि अगदि उचित मार्गदर्शन करणारे आहेत कारण ते सत्य मार्गावर आहेत व त्या मार्गाकडे तुम्हाला बोलावत आहेत.

२५. म्हणजे उपासना केवळ सृष्टी रचयित्याची (अर्थात अल्लाहची) व्हावयास हवी कारण त्याचाच तो अधिकार आहे. असे असताना मी 'खालीक' (सृष्टी निर्मात्या) ची उपासना का म्हणून करु नये?

२६. या शब्दात त्या माणसाने आखिरत (मरणोत्तर जीवना) वरील आपली श्रद्धा/ही व्यक्त केली आणि जन समूहास ही सचेत केले की तुम्हा सर्वाना शेवटी त्याच्याच कडे परतून जायचे आहे यास्तव आपल्या मरणोत्तर जीवनाची काळजी घ्या.

२५. मी तर तुमच्या पालन कर्त्या वर [२८] ईमान बाळगले, तेव्हा माझे म्हणणे ऐका.[२९]

إِنِّيٓ ءَامَنتُ بِرَبِّكُمۡ فَٱسۡمَعُونِ ﴿٢٥﴾

२६. फर्माविले गेले, जन्नत मध्ये दाखल व्हा. तो म्हणाला, माझ्या जन समूहाने जाणून घेतले असते तर बरे झाले असते!

قِيلَ ٱدۡخُلِ ٱلۡجَنَّةَۖ قَالَ يَٰلَيۡتَ قَوۡمِي يَعۡلَمُونَ ﴿٢٦﴾

२७. की माझ्या पालन कर्त्याने मला क्षमा केली आणि मला सन्मान्य लोकांमध्ये सामील केले.[३०]

بِمَا غَفَرَ لِي رَبِّي وَجَعَلَنِي مِنَ ٱلۡمُكۡرَمِينَ ﴿٢٧﴾

२८. त्या नंतर [३१] आम्ही त्याच्या जन समूहा वर आकाशातून एखादे सैन्य अवतरीत केले नाही आही ना आम्ही सैन्य अवतरीत करतो.

وَمَآ أَنزَلۡنَا عَلَىٰ قَوۡمِهِۦ مِنۢ بَعۡدِهِۦ مِن جُندٖ مِّنَ ٱلسَّمَآءِ
وَمَا كُنَّا مُنزِلِينَ ﴿٢٨﴾

२९. फक्त एक भयंकर चित्कार होता की (त्यामुळे) सर्वजण विझून (थंडगार) पडले.[३२]

إِن كَانَتۡ إِلَّا صَيۡحَةٗ وَٰحِدَةٗ فَإِذَا هُمۡ خَٰمِدُونَ ﴿٢٩﴾

३०. खेद आहे दासांच्या अवस्थेवर ! जो पैगंबर देखील यांच्या जवळ आला, त्याची ते थट्टा च उडवित राहीले.[३३]

يَٰحَسۡرَةً عَلَى ٱلۡعِبَادِۚ مَا يَأۡتِيهِم مِّن رَّسُولٍ
إِلَّا كَانُواْ بِهِۦ يَسۡتَهۡزِءُونَ ﴿٣٠﴾

३१. काय यांनी हे पाहीले नाही की [३४] यांच्या पूर्वी किती तरी जन समूहांना आम्ही नष्ट करुन टाकले आहे आणि ते लोक यांच्या जवळ परत येणार नाहीत.[३५]

أَلَمۡ يَرَوۡاْ كَمۡ أَهۡلَكۡنَا قَبۡلَهُم مِّنَ ٱلۡقُرُونِ
أَنَّهُمۡ إِلَيۡهِمۡ لَا يَرۡجِعُونَ ﴿٣١﴾

३२. आणि निःसंशय सर्वच आमच्या समोर हजर केले जातील.[३६]

وَإِن كُلّٞ لَّمَّا جَمِيعٞ لَّدَيۡنَا مُحۡضَرُونَ ﴿٣٢﴾

३३. आणि एक मोठी निशाणी यांच्या करीता मृत जमीन आहे. आम्ही तिला जिवंत केले [३७] आणि तिच्यातून धान्य काढले, ज्यास ते खातात.

وَءَايَةٞ لَّهُمُ ٱلۡأَرۡضُ ٱلۡمَيۡتَةُ أَحۡيَيۡنَٰهَا وَأَخۡرَجۡنَا مِنۡهَا حَبّٗا
فَمِنۡهُ يَأۡكُلُونَ ﴿٣٣﴾

३४. आम्ही तिच्यावर खजुरांच्या आणि द्राक्षांच्या बागा निर्माण केल्या आणि तिच्यात झरे प्रवाहीत केले.

وَجَعَلۡنَا فِيهَا جَنَّٰتٖ مِّن نَّخِيلٖ وَأَعۡنَٰبٖ
وَفَجَّرۡنَا فِيهَا مِنَ ٱلۡعُيُونِ ﴿٣٤﴾

२७. या प्रसंगी त्या माणसाच्या तोंडून रहमान चा उल्लेख त्याचा अल्लाहशी अंत:करण पूर्वक संबंधी ही दर्शावितो व या स्विकृतीस ही की तो मोठा मेहरबान आहे. अशा दयाशील ईश्वरास सोडून इतरांना उपास्य बनविण्यात काय लाभ की ज्यांच्या हाती काहीच अधिकार नाही. जर दयाशील ईश्वराने त्रास यातना देण्याचे ठरविले तर अशा वेळी ना यांची शिफारस उपयोगी पडू शकते आणि ना ते संकटातून सुटका देऊ शकतात. तेव्हा हे माध्यम आणि वशीले अर्थहीन नव्हते काय?

२८. अर्थात अल्लाह वर, जो तुम्हा सर्वांचा खऱ्या अर्थाने पालनकर्ता आहे.

२९. म्हणजे ईमान बाळगून पैगंबरांचे अनुसरण करण्याचा जो उपदेश मी तुम्हाला करीत राहीलो तो तुम्ही कबूल करा.

३०. शब्द शैली वरुन असे दिसून येते की या धाडसी ईमान बाळगणाऱ्यांचे म्हणणे लोकांना मोठे अप्रिय वाटले आणि त्यांनी त्याला ठार मारले. त्याने साहसपूर्ण ईमानाचा पुरावा दिला आणि तो तळहाता वर शिर घेऊन अल्लाहच्या मार्गात शहीद झाला म्हणून त्याला तत्क्षणी जन्नत ची शुभवार्ता दिली गेली.

कुरआनाच्या निवेदनानुसार ईमान बाळगणारा सशरीर जन्नत मध्ये कियामतीच्या दिवशीच प्रवेश करील,परंतु या आधी बर्जख-विश्वात स्वच्छ शुद्ध आत्म्यांना मान-सन्मानाने उपकृत केले जाते आणि शहीद झालेल्या वीर पुरुषास एक विशेष प्रकारचे जीवन लाभते आणि त्यास उपजिविका ही मिळते (सूरह बकरा आयत १५४ आले इमारान. आयत क्र. १६९) या वीर ईमानधारका ने ही बर्जखच्या विश्वात पोहचल्यावर अल्लाहच्या या महान देणगी बद्दल आपला आनंद व्यक्त केला की माझ्या पालन कर्त्याने मला क्षमा केली आणि मला अशा लोकांमध्ये सामील केले ज्यांना मोठा मान-सन्मान दिला गेला. तसेच ही अभिलाषा ही व्यक्त केली की माझ्या जनसमूहाला हे कळाले असते व त्यानी ईमान बाळगले असते तर बरे झाले असते. सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्या ईमान बाळगणाऱ्या वीर पुरुषाची ही अभिलाषा कुरआन वाचणाऱ्या पावेतो पोहचविली. आता त्यांची ही जबाबदारी ठरते की या संदर्भात आपापल्या आचरणास पारखून पाहावे.

ही आयत या गोष्टी चे प्रमाण होय की मेल्यानंतर आलमे बर्जख मध्ये, ज्याला हदीस वचनात कब्र या अर्थाने घेतले आहे, पोहचतात आणि त्या ठिकाणी त्यांच्याशी त्यांच्या कर्मा नुसार वागणूक केली जाते. राहीला हा प्रश्न की कियामती च्या पूर्वीनुसार वागणूक केली जाते. राहीला हा प्रश्न की कियामतीच्या पूर्वी मोबदला किंवा शिक्षा कोणाला मिळते? तर खरे पाहता कियामतीच्या दिवशी माणसाला सशरीर उठविले (जिवंज केले) जाईल. मग त्याच्या आचरणाचा कर्माचा हिशेब करुन त्याला पूरेपूर बदला दिला जाईल मात्र कियामत पूर्वी मोबदला किंवा शिक्षेचा केवळ एक भाग मिळतो आणि तो देखील आत्म्याला अर्थात यात नवल करण्या जोगे काहीच नाही कारण जगात देखील एका मर्यादे पावेतो मोबदला व शिक्षेचा मामला घडत राहतो. ज्या काफीर (इन्कार करणाऱ्या) जन समूहांना या जगात सर्वश्रेष्ठ अल्लाहने शिक्षा अवतरीत करुन नष्ट केले, त्यांना देखील कियामत येण्यापूर्वीच शिक्षेचा एक भाग लाभला.

३१. म्हणजे या ईमान बाळगणाऱ्या वीर पुरुषाने जगाचा निरोप घेतल्या नंतर.

३२. अर्थात या जन समूहाच्या विनाशा करीता अल्लाहला एखाद्या विशेष इतमाम करावा लागला नाही की एवढ्या मोठया वस्ती ला शिक्षा देण्या करीता एखादे सैन्य अवतरीत करावे लागले असावे आणि ना सर्वश्रेष्ठ अल्लाहने या पूर्वी एखाद्या जन समूहाचा नायनाट करण्या करीता एखादे लष्कर अवतरीत केले, किंबहुना त्याचा एक संकेत मात्र एखाद्या जन समूहास नष्ट करण्यास पुरेसा ठरतो; म्हणूनच या जन समूहास ही नष्ट करण्या करीता एक भयंकर आवाज पुरेसा ठरला. संभवत: ही विद्युत गर्जना असावी किंवा भूकंप व लाव्हा स्फोट अथवा अन्य एखादा असामान्य भयंकर आवाज, आता वस्तुस्थिती काय ती अल्लाहलाच ठाऊक! काही हि असो, मात्र या भयंकर आवाजाने संपूर्ण जनसमूहाचा अशा प्रकारे सर्वनाश केला की त्या सर्वांचे राखीच्या ढिगाऱ्यात रुपांतर झाले.

३३. ही केवळ भुतकाळाचीच गोष्ट नव्हे, तर आज देखील बहुतेक लोक असे आहेत की प्रेषित्वाचा आणि ईश, संदेशाच्या गोष्टी ऐकताच टवाळखोर बनून या गोष्टी ची थट्टा उडवू लागतात परंतु एक वेळ अशी येईल, जेव्हा हे लोक आपल्या हरकती वर पश्चाताप करु लागतील.

दासांच्या अवस्थेवर खेदव्यक्त करण्याचा अर्थ असा की दासांनी (अर्थात माणसांनी) स्वत:लाच या अवस्थेप्रत पोहचविले आहे की त्यांच्या करीता शोक-खेदा खेरीज आणखी काहीच नाही.

३४. 'काय यांनी हे पाहीले नाही' हा वाक्य प्रयोग अरबी भाषेत 'काय यांनी विचार चिंतन केले नाही' या अर्था ने केला जातो.

३५. म्हणजे ज्या जन समूहास एकदा नष्ट केले गेले तो दुसऱ्यांदा जगात परतला नाही. ही अशी वस्तुस्थिती आहे जिचा कोणीही इन्कार करु शकत नाही. या द्वारे 'आवागमन'

दृष्टीकोनाचे ही खंडन होते.

३६. अर्थात या जनसमूहांचे आज जगात अस्तित्व राहीले नसेल तरी त्यांचे आत्मे आलमे बर्जख (कबरींच्या विश्वात) आहेत. आणि कियामतीच्या दिवशी त्यांना सशीर (जिवंत) उठविले जाईल. आणि अल्लाह समोर आपल्या कृतकर्मांचा जाब देण्यासाठी हजर केले जाईल. अर्थात ही गोष्ट केवळ त्या जन समूहां पुरतीच नाही, तर जन्मास येणाऱ्या प्रत्येक माणसाला कियामतीच्या दिवशी अल्लाह समोर हजर व्हावयाचे आहे.

३७. मृत जमीनीला जिवंत करण्याचा अर्थ असा की जमीन कोरडी ठणठणीत पडली होती, परंतु पाण्याचा वर्षाव झाल्याने हिरवी व टवटवीत झाली व तिच्यातून विविध वनस्पती निघाल्या. प्रत्येक मनुष्य या गोष्टीचे अवलोकन करतो की मृत जमीन पाऊस झाल्यावर धान्य उगवू लागते. काय हे या गोष्टीचे लक्षण नव्हे की या मागे एक जबरदस्त सामर्थ्य बाळगणाऱ्या आस्तित्वाचा हात कार्य करीत आहे आणि काय याने हा विश्वास निर्माण होत नाही की तो मृतांना जिवंत करण्यास समर्थ आहे?

स्वच्छ-शुद्ध आहे तो ज्याने प्रत्येक प्रकारच्या जोडया निर्माण केल्या. जमीनी वरील वनस्पती पैकी ही, यांच्या स्वत:मधून ही आणि त्या गोष्टी मधून ही ज्यांना ते जानत नाहीत. त्यांच्या करीता एक निशाणी रात्र आहे. आम्ही तिच्यातून दिवस ओढून घेतो तेव्हा ते अंधारातच राहतात. (अल-क़ुर्आन)

३५. या साठी की त्यांनी तिची फळे खावीत. हे त्यांच्या हाताचे काम नव्हे, मग काय ते आभार व्यक्त करणार नाहीत?[३८]

لِيَأْكُلُوا مِنْ ثَمَرِهِ ۙ وَمَا عَمِلَتْهُ أَيْدِيهِمْ ۖ أَفَلَا يَشْكُرُونَ ﴿٣٥﴾

३६. स्वच्छ-शुद्ध आहे तो ज्याने प्रत्येक प्रकारच्या जोडया निर्माण केल्या. [३९] जमीनी वरील वनस्पती पैकी ही, [४०] यांच्या स्वत:मधून ही [४१] आणि त्या गोष्टीं मधून ही ज्यांना ते जानत नाहीत.[४२]

سُبْحَانَ الَّذِي خَلَقَ الْأَزْوَاجَ كُلَّهَا مِمَّا تُنْبِتُ الْأَرْضُ
وَمِنْ أَنْفُسِهِمْ وَمِمَّا لَا يَعْلَمُونَ ﴿٣٦﴾

३७. त्यांच्या करीता एक निशाणी रात्र आहे. आम्ही तिच्यातून दिवस ओढून घेतो तेव्हा ते अंधारातच राहतात.[४३]

وَآيَةٌ لَهُمُ اللَّيْلُ ۚ نَسْلَخُ مِنْهُ النَّهَارَ فَإِذَا هُمْ مُظْلِمُونَ ﴿٣٧﴾

३८. आणि सूर्य आपल्या विश्रांती स्थाना कडे चालत जात आहे.[४४] ही त्या हस्ती (आस्तित्वा)ची योजना बद्धता होय जी वर्चस्वशाली आणि ज्ञानी आहे.[४५]

وَالشَّمْسُ تَجْرِي لِمُسْتَقَرٍّ لَهَا ۚ ذَٰلِكَ تَقْدِيرُ الْعَزِيزِ الْعَلِيمِ ﴿٣٨﴾

३९. आणि चंद्र, की आम्ही त्याच्या मजली निर्धारीत केल्या आहेत, येथपावेतो की तो खजुरीच्या जुन्या फांदी प्रमाणे होऊन राहतो.[४६]

وَالْقَمَرَ قَدَّرْنَاهُ مَنَازِلَ حَتَّىٰ عَادَ كَالْعُرْجُونِ الْقَدِيمِ ﴿٣٩﴾

४०. ना सूर्याच्या अवाक्यात आहे की चंद्राला जाऊन धरावे आणि ना रात्र दिवसा पूर्वी येऊ शकते. सर्व एकेक कक्षेत गतिमान आहेत.[४७]

لَا الشَّمْسُ يَنْبَغِي لَهَا أَنْ تُدْرِكَ الْقَمَرَ وَلَا اللَّيْلُ سَابِقُ النَّهَارِ ۚ
وَكُلٌّ فِي فَلَكٍ يَسْبَحُونَ ﴿٤٠﴾

४१. आणि यांच्या करीता एक मोठी निशाणी ही आहे की आम्ही यांच्या वंशास भरलेल्या नौकेत चढविले.[४८]

وَآيَةٌ لَهُمْ أَنَّا حَمَلْنَا ذُرِّيَّتَهُمْ فِي الْفُلْكِ الْمَشْحُونِ ﴿٤١﴾

४२. आणि यांच्या करीता त्या सारख्याच आणखी (नौका) निर्माण केल्या ज्यावर ते चढतात.[४९]

وَخَلَقْنَا لَهُمْ مِنْ مِثْلِهِ مَا يَرْكَبُونَ ﴿٤٢﴾

४३. जर आम्ही इच्छिले तर यांना बुडवून टाकू मग ना यांचा कोणी तक्रार ऐकणारा असेल आणि ना ते वाचविले जाऊ शकतील.[५०]

وَإِنْ نَشَأْ نُغْرِقْهُمْ فَلَا صَرِيخَ لَهُمْ وَلَا هُمْ يُنْقَذُونَ ﴿٤٣﴾

३८. धान्य आणि फळे वगैरे माणसा करीता खाद्य पदार्थ होत आणि या खाद्य-पदार्था मध्ये अशी कोणतीही वस्तू नाही जी माणसाने निर्माण केली असावी मनुष्य तर अल्लाहनेच निर्माण केलेले बीज जमीनीत पेरतो आणि जमीन अल्लाहच्या आदेशाने धान्य उगवते त्याच प्रमाणे मनुष्य केवळ वृक्षारोपण करतो आणि सर्वश्रेष्ठ अल्लाह झाडे आणि बागा निर्माण करतो ज्या फळांनी डवरलेल्या असतात. परंतु ही गोष्ट केवढी विचित्र होय की अल्लाहने प्रदान केलेल्या या देणग्यांचा लाभ घेऊनहि माणूस त्याच्याशी कृतज्ञशील होत नाही.

खजूर आणि द्राक्षांच्या उल्लेख प्रमुख्याने अशा करीता केला गेला आहे की ज्या भूमी वर कुरआनाचे अवतरण झाले तिच्या परिसरात खजूर आणि द्राक्षांच्या बागा आढळून येतात, तसेच ही दोन्ही फळे स्वादिष्ट ही आहेत आणि पोषक ही आहेत.

३९. म्हणजे जोडया असणे निर्मिती चे वैशिष्टय आहे कारण जोडया एकमेंका सारखेही असतात आणि एकमेकांची पूर्तता ही करतात. परंतु निर्मात्याचा कयास निर्मिती वरुन केला जाऊ शकत नाही तो प्रत्येक प्रकारच्या व्यंग-दोषा पासून अलिप्त आहे. म्हणून त्याच्या जोडीचा कोणी ही नाही. तो अगदी एकमेव आहे.

४०. वनस्पती मध्ये जोडयांचे अस्तित्व विविध स्वरुपात आढळून येते. काही वनस्पती फळे देणाऱ्या असतात, तर कांहीना फळेच येत नाही. काही फळे दोन भाग मिळून एकत्र असल्याचे सर्वांनाच माहीत आहे. उदाहरणार्थ, चणे (हरे भरे), डाळी, विविध प्रकारचे बी-बीयाचे, बदाम, काजू, पीस्ता इत्यादी. यांचे दोन्ही भाग सहजपणे अलग केले जाऊ शकतात. आणि काही असे ज्यांच्या पराग कणात नर-मादा ची वैशिष्टयें आढळून येतात.

'Most forest trees in fact, have separate flowers for each sex (Some for pollen, others for ovules) but have both types of flowers on every tree.'

(Hugh Johnsons Ency. of Trees London p. 15)

आणि यांच्यात फळ धारणा (Fertilization )झाल्याने फळे निर्माण होतात. आंकूर बीज फाडून म्हणजे त्यास दोन भागांमध्ये विभागून बाहेर पडते. वनस्पती शास्त्र (Botony) नुसार हे विभाजन (Fragmentation) बहुतेक वनस्पती मध्ये उत्पत्ति ची क्रिया होय. (पहा इन्सायक्लोपिडीया ब्रिटानिका. शिर्षक. (Reproductive systems plant cells). आजच्या विज्ञाना ने हे रहस्य ही उलगडले आहे की झाड-झुड्यां मध्ये पेशी (Cells)असतात आणि प्रत्येक पेशीत क्रोमोझोम्स (Chromosomes)च्या जोडया असतात. (सूरह रअद टीप क्र. १३ ही विचाराधीन असावी)

४१. म्हणजे पुरुष आणि स्त्री.

४२. अर्थात अल्लाहने प्रत्येक बाबतीत जोडी निर्माण केली आहे, परंतु अशा कितीतरी गोष्टी आहेत(Nucleus) ज्यांचे ज्ञान माणसाला नाही की त्यांच्या जोडीचे नेमके स्वरुप काय आहे. जड पदार्था विषयी हे कोणास ठाऊक होते की त्यांच्यात ही जोडया असतात परंतु आजच्या विज्ञानाने हे रहस्य उलगडले की अणु (Atom)मध्ये एक केंद्रस्थान (Nucleus) असते जे घन विद्युत (Positive charge) बाळगते आणि दुसरे इलेकट्रान (Electron),जे ऋण विद्युत (Negative charge) बाळगते आणि हे आपल्या केंद्रस्थान भोवती भ्रमण करते. मग केंद्रस्थान ही प्रोटोन (Proton) आणि न्यूट्रान (Nutron) ने बनते (पहा MC.Grow Hill Ency. of Science and Technology-New York Vol. 1. P. 844)

खरे तर कुरआनाने प्रस्तुत केलली सत्ये आपल्या सत्यते करीता ज्ञानविषयक संशोधनांवर अवलंबून नाहीत.कारण ती एका सर्वज्ञ अशा अस्तित्वाने प्रदान केलली सत्ये आहेत. ज्यात चूक असण्याचा किंचित मात्र संभव नाही. परंतु आजच्या विज्ञानाद्वारे कुरआनाची सत्याता अधिक प्रखरपणे दिसून येते.

४३. म्हणजे दिवसाचे शुभ्र पांघरुण जेव्हा आम्ही ओढून घेतो तेव्हा फक्त अंधारच उरतो. अर्थात दिवसाचा प्रकाश मानव जाति करीता अल्लाहची फार मोठी देणगी व त्याच्या सामर्थ्याचा चमत्कार आहे. जर माणूस या पैलूने या गोष्टींचा विचार करील ज्या रोज दिसून येतात तर त्याचा एकमेव ईश्वरावर म्हणजेच अल्लाहवर विश्वास बसून मनात कृतज्ञता भाव निर्माण होईल.

४४. म्हणजे सूर्य गतिमान आहे आणि त्याची ही गतिमानता त्याला त्याच्या मुकामाच्या ठिकाणी नेत आहे. अर्थात जो मार्ग त्याच्या करीता निर्धारीत केला गेला आहे त्याच मार्गानुसार तो जात आहे व आपल्या शेवटच्या स्थानाच्या दिशेने पुढे सरकत आहे. त्याचे शेवटचे स्थान कियामत ची मजल होय. तिथे पोहचल्यावर त्याची गती थांबेल.

'बुखारी'या हदीस संग्रहात पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या द्वारे या आयतीचे हे स्पष्टीकरण उल्लिखित आहे की सूर्य जेव्हा अस्तास जातो तेव्हा ईश सिंहासना खाली सजदा करण्या साठी जातो. (बुखारी किताबुत्तफसीर) उक्ति-प्रसंग या गोष्टीचे प्रमाण होय की या ठिकाणी मूळ वस्तुस्थिती

कडे विचार सरणी वळविण्या करीता रुपक (Metaphor) शैली अंगिकारली गेली आहे. उद्देश्य हे स्पष्ट करण्याचा आहे की सूर्य आपल्या तेजस्विते नंतर जेव्हा दृष्टीआड होतो, तेव्हा तो अल्लाहच्या अखत्यारीत च असतो आणि अल्लाहच्या त्या नियमाचे पालन करीत जो त्याच्या साठी निर्धारीत केला गेला आहे. ही गोष्ट जाहीर करतो की तो केवळ अल्लाह पुढेच झुकलेला आहे. जे लोक एखाद्या गोष्टीस प्रसंगानुरुप समजून घेण्याचा प्रयत्न करीत नाहीत, ते केवळ शब्दांना कवटाळून विवाद उभा करतात आणि असांमजस्या पायी हदीस वचनाचेच इन्कार करतात.

जेथपावेतो आधुनिक विज्ञानाचा संबंध आहे ते सूर्याला गतिमान मानते. विज्ञानानुसार सूर्य आपल्या आसा भोवती सुमारे २७ दिवसात १ प्रदक्षिणा पूर्ण करतो.

'The Sun is a slow rotator----period of rotation 26.9 days'.

(The new Ency. Britanica Vol. 17 p. 799 and 801)

राहीली सूर्याचे वक्रमार्गी भ्रमण (Orbital Rotation) तर या संदर्भात आतापावेतो कोणतीही विवरणात्मक गोष्ट समोर येऊ शकली नाही. परंतु शास्त्रज्ञांचे असे अनुमान आहे की सूर्य आपल्या मालिके सह सेकंदाला २५० किलो मीटर या वेगाने गातिमान आहे.

' Earth's Sun moves with the system at a speed of about 250 kilomiters (160 miles) per second.'.

(The New Ency. Britanica. Vol. 17 15th Edn. P. 833)

विज्ञानाचे हे स्पष्टीकरण कुरआनाच्या या निवेदनाशी येथपावेतो तर सुसंगत आहे की सूर्य गतिमान आहे. परंतु विज्ञानाच्या स्पष्टीकरणात अनुमानाचे हे मिश्रण आहे, तेव्हा हा प्रश्न निर्माण होतो की जर सूर्य आपल्या आसा भोवती भ्रमण करतो तर मग जमीन व सूर्याच्या अंतरामध्ये ही कमी अधिकता होत राहीली पाहीजे. संभवत: सूर्य आपल्या मालिके सह भ्रमण करीत असावा आणि ही दुसरी अवस्थाच कुरआनाच्या निवेदनाशी सुसंगत असलेली दिसून येते. कारण कुरआनाचे हे स्पष्ट निवेदन आहे की सूर्य आपल्या मुक्कामाच्या स्थळा कडे चालत जात आहे, आणि कुरआनाचे निवेदन सत्य-स्थिती ची अभिव्यक्ति होय. आता आमचे ज्ञान व आकलन येथपावेतो पोहोचू शकत नाही, की याचे नेमके स्वरुप पूर्णपणे आम्हास कळून यावे, ही गोष्ट वेगळी.

४५. म्हणजे सूर्याची ही गतिमानता केवळ संयोगवश नव्हे, तर एका जबरदस्त ज्ञानी अस्तित्वाची योजना आहे. ही योजना इतकी मजबूत आहे की सूर्य स्वत:या योजने कडे पाठ फिरवू शकत नाही. अनेकेश्वर वाद्यांच्या श्रद्धे प्रमाणे सूर्य खरोखर देवता असता तर एका विशिष्ट गती चा गुलाम राहीला नसता आणि जर संयोगाने घडलेला घटना म्हणून तो अस्तित्वात आला असता, जसे नास्तिक समजतात, तर त्याच्या गती विधित ही नियमितता व त्याच्या व्यवस्थेत ही दृढता राहीली नसती. तेव्हा,काय सूर्याची ही नियम बद्ध व्यवस्था, जिचे प्रत्येक जण अवलोकन करतो, या गोष्टीचा विश्वास निर्माण करीत नाही की हे सर्व काही एका योजनेनुसार घडत आहे. आणि ही योजना त्याच हस्ती (अस्तित्वा) ने तयार केलेली आहे जो सर्वांवर प्रभावशाली आणि सर्व काही जाणणारा आहे.

४६. चंद्र आपली प्रदक्षिणा एका महिन्यात पूर्ण करतो. त्याचे स्वरुप दररोज बदलत असते. चंद्रकोर पासून पूर्णचंद्र बनतो आणि मग हळू हळू घटत चंद्रकोर अवस्थेत राहतो. जणू खजुरी ची जुनी फांदी जी सुकून वाकडी होते. चंद्राची ही अवस्था वक्र मार्गी भ्रमणा (Orbital Motion)च्या परिणाम स्वरुपी होते. म्हणूनच त्याच्या या गतिविधीस पडावांचा प्रवास या अर्थाने घेतले गेले आहे. तात्पर्य चंद्र दररोज एक पडाव टाकीत व आपल्या बदलत जाणाऱ्या अवस्था दाखवित आपली प्रदक्षिणा पूर्ण करतो.

४७. अर्थात सूर्य आपल्या कक्षेबाहेर जाऊन चंद्राच्या कक्षेत प्रवेश करु शकत नाही आणि ना दिवसा ढवळया रात्र प्रकट होऊ शकते. प्रत्येका साठी जी कक्षा निर्धारीत केली गेली आहे तिच्यात राहूनच त्यास गतिमान राहायचे आहे. (अधिक स्पष्टिकरणा साठी पहा. सूरह अंबिया टीप क्र. ४६)

४८. 'यांच्या वंशा' शी अभिप्रेत मानव वंश होय आणि भरलेल्या नौकेशी अभिप्रेत हजरत नूह यांची नौका होय जी ईमान बाळगणाऱ्यांनी व त्यांना उपयोगी पडणाऱ्या प्राण्यांनी भरलेली होती. ही नौका, संपूर्ण मानव वस्तीस नष्ट करुन टाकणाऱ्या भयंकर वादळात ही सुखरुप पणे चालत राहीली.

فَأَنجَيْنَاهُ وَمَن مَّعَهُ فِي الْفُلْكِ الْمَشْحُونِ۔ (شعراء:۱۱۹)

''शेवटी आम्ही त्याला (म्हणजे नूह ला) आणि त्यांना जे त्याच्या सोबत होते, भरलेल्या नौकेत मुक्ति दिली''. (शोअरा. ११९)

नौकेत जे ईमान बाळगणारे चढले होते. तीच काय ती मानव वंशाची पूंजी होती. नंतर त्यांच्याच वंशाद्वारे पृथ्वीवर वस्ती वाढली. म्हणून नावेत चढलेल्या लोकांना 'मानव-वंश' (ذُرِّيَّتَهُمْ) या अर्थाने घेतले गेले आहे. सर्वश्रेष्ठ अल्लाहने

या लोकांना वाचविले नसते तर जमीनीवर माणसाचा मागमूस ही राहीला नसता. ही महत्वपूर्ण ऐतिहासिक घटना या गोष्टी चे स्पष्ट लक्षण होय की तो अल्लाहच होय, ज्याने मानव जातिच्या नौकेला पैलतीरी नेले आणि ही त्याची दयाळूता होय की मानव वंश सुरक्षित राहीला.

४९. पहिली नौका हजरत नूह यांची होती, जी त्यांनी अल्लाहच्या मार्गदर्शना नुसार बनविली होती. त्यानंतर लोकांनी त्या नौके सारख्या इतर नौका बनविल्या आणि आजच्या काळातील मोठ मोठे जहाज देखील त्याच ज्ञाना पासून घेतलेला लाभ होय, जे अल्लाहने सर्वात पहिल्या नौके बाबत माणसाला प्रदान केले होते म्हणून या नावा आणि जहाज माणसाची कारागिरी असली तरी, वास्तविक पाहता अल्लाह नेच निर्माण केलेली वाहने होत.

५०. अर्थात हे लोक या गोष्टीवर विचार चिंतन कां करीत नाही की जर अल्लाहने या लोकांना, जेव्हा ते नावेत चढतात, बुडवू इच्छिले तर ना कोणी त्यांच्या हाकेलाओ देऊ शकतो आणि ना ते या संकटातून सुटका मिळवू शकतात.

आयतीत 'सरीख' हा शब्दप्रयोग केला गेला आहे याचा अर्थ गाऱ्हाणे ऐकणारा. हाच अर्थ 'गौस' या शब्दाचा ही आहे. ही आयत या वस्तुस्थितीचे स्पष्टपणे ऐलान करते की अल्लाह खेरीज ना कोणी गौस आहे आणि ना कोणी नाव किनाऱ्यावर नेणारा. यास्तव ज्या प्रमाणे अनेकेश्वरवाद्यांचे आपल्या देवी देवतांना गौस (गाऱ्हाणे ऐकणारा) समजणे खोटे आहे, तद्वतच मुसलमानांचे आपल्या पीर-वळींना 'गौस' समजणे देखील अगदीच खोटे व अनेकेश्वरवादीय श्रद्धा होय.

४४. परंतु ही आमची कृपा होय आणि एक वेळ पावेतो लाभ घेण्याची सामुग्री आहे.

إِلَّا رَحْمَةً مِّنَّا وَمَتَاعًا إِلَىٰ حِينٍ ﴿٤٤﴾

४५. आणि जेव्हा यांना सांगितले जाते की भय बाळगा त्या गोष्टी चे जी तुमच्या पुढे व मागे आहे.[५१] या साठी की तुमच्यावर कृपा केली जावी. (तर ते तोंड फिरवितात)

وَإِذَا قِيلَ لَهُمُ اتَّقُوا مَا بَيْنَ أَيْدِيكُمْ وَمَا خَلْفَكُمْ
لَعَلَّكُمْ تُرْحَمُونَ ﴿٤٥﴾

४६. आणि यांच्या पालन कर्त्याच्या निशाण्यां पैकी जी निशाणी देखील यांच्या प्रत येते ते तिच्या पासून तोंड फिरवतात.

وَمَا تَأْتِيهِم مِّنْ آيَةٍ مِّنْ آيَاتِ رَبِّهِمْ إِلَّا كَانُوا عَنْهَا مُعْرِضِينَ ﴿٤٦﴾

४७. आणि जेव्हा यांना सांगितले जाते की अल्लाहने जी उपजिविका तुम्हाला प्रदान केली आहे, त्यातून (गरजवंता वर) खर्च करा तेव्हा हे काफीर ईमान बाळगणाऱ्यांना म्हणतात की काय आम्ही त्या लोकांना खाऊ घालावे, ज्यांना अल्लाहने इच्छिले असते तर खाऊ घातले असते.[५२] तुम्ही लोक उघड अशा मार्ग भ्रष्टतेत पडला आहात.

وَإِذَا قِيلَ لَهُمْ أَنفِقُوا مِمَّا رَزَقَكُمُ اللَّهُ قَالَ الَّذِينَ كَفَرُوا لِلَّذِينَ
آمَنُوا أَنُطْعِمُ مَن لَّوْ يَشَاءُ اللَّهُ أَطْعَمَهُ إِنْ أَنتُمْ إِلَّا
فِي ضَلَالٍ مُّبِينٍ ﴿٤٧﴾

४८. आणि म्हणतात, हा (कियामती चा ) वायदा केव्हा पूर्ण होईल ?[५३] जर तुम्ही सच्चे असाल (तर सांगा).

وَيَقُولُونَ مَتَىٰ هَٰذَا الْوَعْدُ إِن كُنتُمْ صَادِقِينَ ﴿٤٨﴾

४९. हे लोक केवळ एका भयंकर गर्जने ची वाट बघत आहेत, जी त्यांना अशा अवस्थेत की आपसात भांडत असतील, येऊन धरील.[५४]

مَا يَنظُرُونَ إِلَّا صَيْحَةً وَاحِدَةً تَأْخُذُهُمْ وَهُمْ يَخِصِّمُونَ ﴿٤٩﴾

५०. मग ना ते मृत्युपत्र करु शकतील आणि ना आपल्या कुटुंबियां जवळ परतू शकतील.[५५]

فَلَا يَسْتَطِيعُونَ تَوْصِيَةً وَلَا إِلَىٰ أَهْلِهِمْ يَرْجِعُونَ ﴿٥٠﴾

५१. आणि सूर फुंकला जाईल तेव्हा अकस्मात ते आपल्या कबरींमधून बाहेर पडून आपल्या पालन कर्त्या कडे धाव घेतील.[५६]

وَنُفِخَ فِي الصُّورِ فَإِذَا هُم مِّنَ الْأَجْدَاثِ إِلَىٰ رَبِّهِمْ يَنسِلُونَ ﴿٥١﴾

५१. 'जे तुमच्या पुढे आहे' शी अभिप्रेत ऐहिक अजाब (ईशशिक्षा) होय आणि 'जे तुमच्या मागे आहे' शी अभिप्रेत आखिरत (मरणोत्तर जीवना) चा अजाब होय. अर्थात या गोष्टीचे भय बाळगा की अल्लाहच्या अजाब ने तुम्हाला पुढून व मागून घेरुन न टाकावे.

५२. या आयती मध्ये त्या काफीर (इन्कार करणाऱ्या लोकांची अवस्था निवेदिली गेली आहे ज्यांची धन-भक्ति कठोर हृदयी होण्याप्रत पोहचली होती. त्यांना गरजवंतांच्या अवस्थेबद्दल दया वाटत नव्हती आणि जेव्हा त्यांना ईमान बाळगणारे सांगत की या लोकांवर खर्च करा तर ते यांच्या बोलण्याची थट्टा उडवित म्हणत की आम्ही अशांना काय खाऊ घालावे ज्यांना अल्लाहने च खाऊ घालणे पसंत केले नाही, काय याच कारणास्तव की ते गरीब व गरजू आहेत.

त्यांच्या या आक्षेपाचे अयोग्य असणे अगदी उघड आहे म्हणून त्यास कोणतेही उत्तर दिले-गेले नाही. मनुष्य स्वभाव भूकेल्यांना खाऊ घालण्यास प्रवृत्त करतो आणि संकट ग्रस्तांना पाहून सहानुभूति ची भावना निर्माण होणे स्वाभाविकच आहे. तसेच यात माणसाची परीक्षा ही आहे की तो धर्म आणि स्वभावाच्या या निकडीस पूर्ण करतो किंवा नाही परंतु निर्बुद्ध लोक आपल्या जबाबदारींची जाणीव बाळगण्या ऐवजी अल्लाह व त्याच्या धर्मावर आक्षेप घेऊ लागतात!

५३. अभिप्रेत कियामती चा वायदा होय.

५४. म्हणजे हे आपल्या वाईट परिणतिस पाहू इच्छितात, कियामत, जिची खबर यांना दिली जात आहे, ती तर एका भयंकर गर्जने च्या रुपाने प्रकट होईल आणि अशावेळी प्रकट होईल की लोक बेभान अवस्थेत राहतील व याच विवादात गुरफटलेले असतील की कियामत येईल किंवा नाही.

तात्पर्य कियामती विषयीची चर्चा-विवाद जगात चालतच राहील आणि तिचा इन्कार करणारे इन्कार करतच राहतील. येथपावेतो की कियामत आपल्या भीषणते सह प्रकट होऊन या सर्व विवादांचा डोगर गिळंकृत करील.

५५. अर्थात कियामत अशा प्रकारे अकस्मात येईल की लोकांना संधी ही लाभणार नाही. ना कोणाला काही मार्गदर्शन करण्याची संधी आणि ना स्वगृही परतण्याची संधी. त्या क्षणी जो जिथे असेल तिथेच संपेल !

५६. म्हणजे जेव्हा कियामती चा दुसरा सूर (शंख) फुंकला जाईल तर अचानक पणे तमाम मेलेले लोक कबरी मधून (अर्थात जमीनी तून) बाहेर पडतील आणि आपल्या हजर होण्याच्या स्थानाकडे चालू लागतील. माणसांच्या एवढ्या मोठया संख्येस पुन्हा जिवंत करण्यात अल्लाहला काहीच अडचण येणार नाही.

५२. म्हणतील, खेद आम्हावर ! कोणी आम्हाला आमच्या शयनागारा तून उठविले ?[५७] हेच ते ज्याचा रहमान ने वायदा केला होता आणि पैगंबरांनी खरे सांगितले होते.[५८]

قَالُوْا يٰوَيْلَنَا مَنْۢ بَعَثَنَا مِنْ مَّرْقَدِنَا ۜ هٰذَا مَا وَعَدَ
الرَّحْمٰنُ وَصَدَقَ الْمُرْسَلُوْنَ ﴿٥٢﴾

५३. केवळ एक भयंकर गर्जना होईल आणि अकस्मात ते सर्वच्या सर्व आमच्या समोर हजर केले जातील.[५९]

اِنْ كَانَتْ اِلَّا صَيْحَةً وَّاحِدَةً فَاِذَا هُمْ جَمِيْعٌ لَّدَيْنَا مُحْضَرُوْنَ ﴿٥٣﴾

५४. आज कोणावर कसलाही अत्याचार होणार नाही आणि तुम्हाला त्याचाच मोबदला मिळेल, जे तुम्ही करीत राहीलात.[६०]

فَالْيَوْمَ لَا تُظْلَمُ نَفْسٌ شَيْـًٔا وَّلَا تُجْزَوْنَ اِلَّا مَا كُنْتُمْ تَعْمَلُوْنَ ﴿٥٤﴾

५५. आज जन्नत वाले आपल्या मनोरंजनात आनंदित असतील.[६१]

اِنَّ اَصْحٰبَ الْجَنَّةِ الْيَوْمَ فِىْ شُغُلٍ فٰكِهُوْنَ ﴿٥٥﴾

५६. ते आणि त्यांच्या पत्न्या सावलीत तक्त्यांवर टेकून बसले असतील.[६२]

هُمْ وَاَزْوَاجُهُمْ فِىْ ظِلٰلٍ عَلَى الْاَرَآئِكِ مُتَّكِـُٔوْنَ ﴿٥٦﴾

५७. तिथे (जन्नत मध्ये) त्यांच्या करीता मेवे असतील आणि जे काही ते मागतील, ते त्यांना मिळेल.[६३]

لَهُمْ فِيْهَا فَاكِهَةٌ وَّلَهُمْ مَّا يَدَّعُوْنَ ﴿٥٧﴾

५८. त्यांना सलाम सांगितला जाईल दयाळू पालनकर्त्या तर्फे.[६४]

سَلٰمٌ ۣ قَوْلًا مِّنْ رَّبٍّ رَّحِيْمٍ ﴿٥٨﴾

५९. आणि हे अपराध्यांनो ! आज तुम्ही अलग व्हा.[६५]

وَامْتَازُوا الْيَوْمَ اَيُّهَا الْمُجْرِمُوْنَ ﴿٥٩﴾

६०. हे आदम संतती काय मी तुम्हाला ताकीद केली नव्हती की सैतानाची उपासना करु नका. तो तुमचा उघड शत्रू आहे.

اَلَمْ اَعْهَدْ اِلَيْكُمْ يٰبَنِىْٓ اٰدَمَ اَنْ
لَّا تَعْبُدُوا الشَّيْطٰنَ ۚ اِنَّهٗ لَكُمْ عَدُوٌّ مُّبِيْنٌ ﴿٦٠﴾

६१. आणि हे की माझीच उपासना करा, हा सरळ मार्ग आहे.[६७]

وَّاَنِ اعْبُدُوْنِىْ ۚ هٰذَا صِرَاطٌ مُّسْتَقِيْمٌ ﴿٦١﴾

५७. अर्थात हे लोक जे दुसऱ्यांदा लाभणाऱ्या जीवनाचा इन्कार करीत आहेत, जेव्हा कबरी मधून उठविले जातील तेव्हा त्यांना आश्चर्य व खेद वाटेल की आम्ही या कोणत्या विश्वात येऊन पोहचलो आणि कोणत्या अवस्थेत उठलो!

'मरकद' चा अर्थ शयनागार (निद्रा-स्थान) असा आहे. कियामतीचा दुसरा सूर फुंकला जाण्या पूर्वी बर्जख (कबरीच्या विश्वा) ची जी अंतिम अवस्था असेल त्यात त्यांच्या आत्म्यांवर झोपे ची कैफियत असेल आणि दुसरा सूर फुंकला गेला नंतर ते जागे होतील आणि सशरीर उठून उभे होतील म्हणून त्यांना आश्चर्य वाटेल की आम्हाला हे अचानक झोपेतून कोणी जागे केले?

यावरुन कबरींच्या अजाब (शिक्षे) चा नकार होत नाही कारण या निद्रावस्थेत ते कबरींच्या अंतिम स्थितीत असतील.

५८. स्फूर्ति ने दिलेले हे उत्तर ईमान बाळगणाऱ्यांचे असेल. ते या इन्कार करणाऱ्यांना आठवण करुन देतील की एकमेव अल्लाहने दुसऱ्यांदा जिवंत करण्याचा जो वायदा केला होता ही त्याचीच पूर्तता होय आणि पैगंबरांनी कियामती बाबत जी खबर दिली होती ती अगदी सत्य होती आणि आजचा दिवस त्यांच्या सत्यतेचा पुरावा आहे. कियामतीच्या दिवशी ईमान बाळगणाऱ्यांचे इन्कार करणाऱ्यांना उत्तर देण्या संबंधांचे निवेदन सूरह रूम मध्ये आहे.

وَقَالَ الَّذِيْنَ اُوْتُوا الْعِلْمَ وَالْاِيْمَانَ لَقَدْ لَبِثْتُمْ فِيْ
كِتَابِ اللّٰهِ اِلٰى يَوْمِ الْبَعْثِ فَهٰذَا يَوْمُ الْبَعْثِ
وَلٰكِنَّكُمْ كُنْتُمْ لَا تَعْلَمُوْنَ۔ (سورۂ روم:۵۶)

'आणि ज्या लोकांना ज्ञान व ईमान प्रदान केले गेले होते, ते म्हणतील अल्लाहच्या लिखाणात तुम्ही उठविले जाण्याच्या दिवसा पावेतो राहीलात तेव्हा, हा उठविले जाण्याचा दिवस आहे, परंतु तुम्ही जाणत नव्हता.'(सूरह रूम:५६)

५९. या भयंकर गर्जनेस अन्य एका ठिकाणी धमकाविणे या अर्थाने घेतले गेले आहे

فَاِنَّمَا هِيَ زَجْرَةٌ وَّاحِدَةٌ۔ (نازعات:۱۳)

''ते केवळ एक दरडावणे असेल.'' (नाजिआत-१३)

म्हणजे कियामतीचा दुसरा बिगल (सूर) कोणता असेल एक भयंकर आवाजाच्या रुपाने सर्वश्रेष्ठ अल्लाह तर्फे सक्त दरडावणे असेल की उठा आणि हजर व्हा माझ्या समोर या दरडावण्याच्या परिणाम स्वरुपी सर्वच्या सर्व मृत हजर होण्या करीता उठून उभे होतील.

६०. जेव्हा सर्व मेलेली माणसे उठून उभे राहतील तेव्हा ऐलान केले जाईल की हा न्याय दिवस आहे आणि प्रत्येक माणसाला आपल्या कृतकर्माचे फळ प्राप्त करावयाचे आहे.

६१. म्हणजे कियामतीच्या दिवशी त्या लोकांना, जे सत्कर्म करीत राहीलेत,मोबदल्यात जन्नत मिळेल तिथे त्यांच्या करीता एकापेक्षा एक मनोरंजना ची सामग्री असेल.

६२. जन्नतच्या राजेशाही व ऐश विलास पूर्ण जीवनाची ही एक छटा होय. जन्नत मध्ये वैराग्य विरक्ति चे नव्हे, तर वैवाहिक जीवन असेल, जे सुखशांती चे जीवन आहे. तिथे कडक उन्हाचा ताप नसेल, किंबहुना शीतलता देणारे सावलीमय वातावरण असेल आणि बसण्या करीता शाही थाटाची अतिशय आरामदायक आसने असतील.

६३. म्हणजे खाण्या करीता उच्च प्रकारचे मेवे देखील मिळतील आणि जे काही ते आपल्या आवडीनुसार मागतील तेही त्यांना मिळेल.

६४. दयाशील पालनकर्त्या तर्फे सलाम (अभिवादन) त्यांच्या मान सन्मानास कारक ही असेल आणि समाधान कारक ही, अशासाठी की ही या गोष्टीची हमी होय की ते सदैव सलामती पूर्वक राहतील.

६५. या जगात तर ईमान बाळगणारे व ईमान विरोधक, वंश-कुटुंब, राष्ट्र, समाज इत्यादिच्या आधारे आपसात संमिश्र होतात, परंतु कियामतीच्या दिवशी यांच्या दरम्यान पूर्णत: भेद केला जाईल. त्या दिवशी श्रद्धा व आचरणा च्या आधारावर माणसांचे गट पाडले जातील; म्हणून काफीरांना सांगितले जाईल की तुमचा ईमान बाळगणाऱ्यांशी कसला ही संबंध नाही, मग ते तुमचे स्वत:चे नातेवाईक का असेनात. आज तुम्हाला यांच्याप्रत (जहन्नम मध्ये) पोहचणे क्रमप्राप्त आहे.

६६. जगातील समस्त माणसे हजरत आदम यांची संतति होय आणि हजरत आदम यांच्याशी सैतानाची जी घटना घडली होती, तिच्यात त्यांच्या करीता हा बोध होता की त्यानी सैतानाच्या इशाऱ्या प्रमाणे चालू नये. त्यांचा स्वभाव देखील उपद्रवा पासून अलिप्त राहण्यासच प्रोत्साहित करत होती आणि पैगंबरांच्या माधमान्वये सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्यांना ताकीद केली होती की सैतानाचे अनुसरण करु नका कारण तो माणसाचा उघड वैरी आहे.

'सैतानाची उपासना करु नका' यात उपासने शी अभिप्रेत सैतानाचे आज्ञापालन होय, ज्यात मनुष्य आपल्या मनाची सुत्रे त्याच्या हाती सोपवून त्याच्याच आदेशानुसार वागू लागतो. दुसऱ्या शब्दात सांगायचे म्हणजे माणूस सैतानाच्या आज्ञा पालनाचा पट्टा आपल्या गळ्यात टाकतो परिणामी त्याचे आज्ञा पालन अल्लाहच्या आज्ञा पालना ची जागा घेते. अशा प्रकारे

मनुष्य अल्लाहचा नव्हे तर सैतानाचा गुलाम बनतो. म्हणूनच त्याच्या आज्ञा पालनास त्याच्या उपासनेच्या अर्था ने घेतले गेले आहे. ही अशीच गोष्ट होय जसे हदीस मध्ये धन-भक्तास दुनिया व दिरहम (पैशा) च्या दास म्हटले गेले आहे:-

تَعِسَ عَبْدُ الدِّيْنَارِ وَ الدِرْهَمْ

'इहलोक आणि पैशाचा दास नष्ट व्हावा'

आणि याचाच खुलासा हदीस वचनात अशा प्रकारे केला गेला आहे.

اِنْ اُعْطِيَ رَضِيَ وَاِن لَّمْ يُعْطَ لَمْ يَرْضَ ۔ (بخاری کتاب الرقاق)

'जर याला दिले गेले तर राजी आणि न दिले गेले तर नाराज'. (बुखारी-किताबुर्रिकाक)

म्हणजे माल (धन) मिळाल्यावर अल्लाहशी खुश होणे आणि न मिळाल्या बद्दल त्याच्याशी नाराज होणे अल्लाहशी खऱ्या अर्थाने दास्यत्व नव्हे, किंबहुना हे भौतिक दास्यत्व होय. या हदीस वचनातही इहलोक व पैशाचा गुलाम त्याच्याशी अत्याधिक संबंधा मुळे म्हटला गेला आहे. असा संबंध जो वास्तविक अल्लाहशी च असावयास पाहिजे, उलट मनुष्य जग आणि पैशाच्याच जाळ्यात अडकून राहतो.

तसेच सैतानाच्या आज्ञापालनास त्याच्या उपासनेच्या अर्थाने या कारणास्तव घेतले गेले आहे की, माणूस खरेतर त्याच्याच आदेशाने अल्लाह खेरीजच्या उपास्यांची उपासना करु लागतो, म्हणून खऱ्या अर्थाने ही सैतानाची च पूजा अर्चना होय. अल्लामा आलूसी यांनी याचे फार चांगले स्पष्टीकरण केले आहे. ते फर्मावितात.

'सैतानाच्या उपासनेशी अभिप्रेत त्याचे आज्ञा पालन होय त्या गोष्टी मध्ये, ज्यासंबंधी तो यांच्या मनात कु विचार उत्पन्न करतो आणि यांच्यासाठी त्या विचारांना सुशोभित करुन सादर करतो. त्याच्या आज्ञापालनास उपासनेच्या अर्थाने एवढया साठी घेतले गेले आहे की त्याच्या पासून दूरता व तिरस्कार वाढावा, तसेच यासाठी ही की ती अल्लाहच्या उपासनेच्या विरोधात असते. आणि यास अभिप्रेत अल्लाह खेरीजच्या अन्य उपास्यांची उपासना ही असू शकते, याचा संबंध सैतानाशी या कारणास्तव जोडला गेला आहे की तो याचा आदेश देतो व यास नयनरम्य बनवितो. यास्तव हा अर्थ याच अनुषंगाने आहे' (रुहूल मआनी भाग-१३ पृ. ४०)

स्पष्ट असावे की आज्ञापालनास उपासना या अर्थाने घेणे म्हणजे हे नव्हे की उपासना व आज्ञापालन दोन्ही अगदी समानार्थी शब्द आहेत. व यात काहीच फरक नाही. असे गृहीत धरणे म्हणजे अल्लाहच्या उपासने ची प्रतिष्ठा घटविणे आणि धर्मात याचे जे स्थान आहे त्याहून कमी प्रतीचे स्थान त्याच्या करीता योजणे होय आज्ञापालन व उपासना यात जो फरक आहे त्याचे काही उघड पैलू असे.

१) उपासना मानव स्वभावाचा एक विशेष अधिकार आहे जो श्रद्धा व प्रेम-भावना आणि नम्रता व शालीनतेची कैफियत व्यक्त करतो, या उलट आज्ञापालना चा संबंध संकल्प व आचरणाशी आहे.

२) श्रद्धा व ईमान ची सर्वप्रथम अभिव्यक्ति उपासना म्हणजे भक्ति आराधना होय या नंतर आज्ञापालन म्हणजे आदेशांची अंमलबजावणी.

३) उपासनेत मनाची विशिष्ट कैफियत अपेक्षित असते, याऊलट आज्ञा पालना करीता उचित संकल्प पुरेसा ठरतो.

४) उपासने च्या आशयात आज्ञापालनाचाही समावेश होतो, कारण उपासनाही आदेशाच्या पालनार्थ केली जाते. असे असतानाही उपासनेचे एक क्षेत्र आहे व व्यवहाराचे वेगवेगळे क्षेत्र निर्धारीत केले आहे.

५) उपासना अल्लाह करीता विशेषत्वाने आहे आणि यात नम्रता व शालीनता, मनाची पापभीरुता, आपल्या दास असण्या संबंधी ची जाणीव, पश्चाताप दग्ध मनाने ईश-स्मरण या सारख्या गोष्टी मूलत: अपेक्षित असतात. या ऊलट आज्ञापालना करीता जे आदेश दिले गेले त्याच्या द्वारे दासांचे हक्क अदा करणे, समाज सुधारणा आणि सार्वजनिक न्यायाची स्थापना या गोष्टी अपेक्षित असतात.

६) उपासना अल्लाह खेरीज अन्य कोणाची ही न करण्याचा आदेश दिला गेला आहे उलट आज्ञापालन पैगंबराचेही करण्याचा आदेश दिला गेला आहे आणि मुस्लिम शासकांचेही. यावरुन उपासना व आज्ञापालन यातील फरक अगदी स्पष्ट आहे.

७) शरीअत बाह्य आदेश व विधिनियमांच्या पालना करीता विवश असणे एक सबब ठरु शकते परंतु अल्लाह खेलीजच्या उपास्थांच्या उपासने करीता विवशता देखील सबब नाही, मात्र हे की जीवाला धोका उत्पन्न व्हावा आणि तात्पुरते बह्यात:एखादी अनुचित स्थिती अंगिकारणे भाग पडावे.

८) उपासनेच्या चाली रीतीत बुद्धि आणि विवेकाचा काहीच हस्तक्षेप नसतो, किंबहुना ज्या चालीरीती ईश संदेशाने निश्‍चित केल्या आहेत त्यांची जशीच्या तशीच कार्यवाही केली जाते, परंतु आज्ञा पालना संदर्भात जे आदेश दिले गेले आहेत त्यांच्या गुण दोषां कडे ईश-संदेशाने स्वत:च संकेत दिले आहेत. म्हणून आधुनिक परिस्थितीत यांचे प्रयोजन आणि नव्या समस्या उद्‌भवल्या वर यांच्या उदितते स विचाराधीन राखून योग्य मार्ग काढला जातो.

९) एखादा ईमान बाळगणारा अज्ञाना पायी काही काळ

सैतानाच्या कारस्थानास बळी पडून गुन्हेगार बनू शकतो परंतु त्याच्या या आचरणास सैतानाच्या उपासनेच्या अर्थाने घेतले जाऊ शकत नाही, किंबहुना सैतानाचे निरंतर आज्ञा पालन हीच त्याची उपासना ठरु शकते.

१०) अल्लाहच्या आज्ञापालनाचा संबंध या गोष्टीशी आहे की त्याने कोणकोणते आदेश दिले आहेत. परंतु उपासना तर माणसाची ती सुप्त भावना होय जी त्याच्या पालन कर्त्या करीता स्वाभाविक पणे दृगोचर होते.

६७. एकमेव ईश्वराच्या उपासनेत 'सिराते मुस्तकीम' (सरळ मार्ग) या अर्थाने घेतले गेले आहे. कारण हाच एक मार्ग अल्लाह पर्यंत पोहचतो आणि हीच यशाची मजल होय अर्थात याच मार्गाचे नाव 'इस्लाम' आहे.

६२. तरी ही त्याने तुमच्या पैकी फार मोठया जनसमुदायास मार्ग भ्रष्ट केले.[६८] तर काय तुम्ही बुद्धि बाळगत नव्हते ?[६९]

وَلَقَدْ أَضَلَّ مِنْكُمْ جِبِلًّا كَثِيرًا ۖ أَفَلَمْ تَكُونُوا تَعْقِلُونَ ﴿٦٢﴾

६३. ही आहे ती जहन्नम जिचा तुमच्या शी वायदा केला जात होता.

هَٰذِهِ جَهَنَّمُ الَّتِي كُنْتُمْ تُوعَدُونَ ﴿٦٣﴾

६४. आता दाखल व्हा तिच्यात, त्या कुफ्र च्या पायी जे तुम्ही करीत राहीले.

اصْلَوْهَا الْيَوْمَ بِمَا كُنْتُمْ تَكْفُرُونَ ﴿٦٤﴾

६५. आज आम्ही त्यांच्या मुखावर मोहर लावू आणि त्यांचे हात आमच्या शी बोलतील आणि त्यांचे पाय साक्ष देतील की ते काय करीत राहीले.[७०]

الْيَوْمَ نَخْتِمُ عَلَىٰ أَفْوَاهِهِمْ وَتُكَلِّمُنَا أَيْدِيهِمْ وَتَشْهَدُ أَرْجُلُهُمْ
بِمَا كَانُوا يَكْسِبُونَ ﴿٦٥﴾

६६. जर आम्ही इच्छिले तर यांचे डोळे नाहीसे करु मग त्यांनी मार्गा कडे चालू लागावे, त्यांना कोठून दिसू लागेल ? [७१]

وَلَوْ نَشَاءُ لَطَمَسْنَا عَلَىٰ أَعْيُنِهِمْ فَاسْتَبَقُوا الصِّرَاطَ فَأَنَّىٰ
يُبْصِرُونَ ﴿٦٦﴾

६७. आणि जर आम्ही इच्छिले तर त्यांना त्यांच्या जागेवरच विकृत करुन टाकू, मग ना ते पुढे जाऊ शकावेत आणि ना मागे परतु शकावे.[७२]

وَلَوْ نَشَاءُ لَمَسَخْنَاهُمْ عَلَىٰ مَكَانَتِهِمْ فَمَا اسْتَطَاعُوا
مُضِيًّا وَلَا يَرْجِعُونَ ﴿٦٧﴾

६८. आणि ज्याला आम्ही दिर्घायुष्य देतो त्याला आम्ही रचने मध्ये पालथा करतो मग काय ते बुद्धि चा वापर करीत नाही?[७३]

وَمَنْ نُعَمِّرْهُ نُنَكِّسْهُ فِي الْخَلْقِ ۖ أَفَلَا يَعْقِلُونَ ﴿٦٨﴾

६९. आम्ही या (पैगंबरा) ला काव्य-वाचन नाही शिकविले आणि ना हे त्याला साजेलसे आहे. ही तर एक स्मरणिका आणि स्पष्ट कुरआन आहे.[७४]

وَمَا عَلَّمْنَاهُ الشِّعْرَ وَمَا يَنْبَغِي لَهُ ۚ إِنْ هُوَ إِلَّا ذِكْرٌ وَقُرْآنٌ مُبِينٌ ﴿٦٩﴾

७०. अशासाठी की त्याने त्या लोकांना खबरदार करावे जे जिवंत आहेत आणि काफिरांवर प्रमाण प्रस्थापित व्हावे.[७५]

لِيُنْذِرَ مَنْ كَانَ حَيًّا وَيَحِقَّ الْقَوْلُ عَلَى الْكَافِرِينَ ﴿٧٠﴾

६८. म्हणजे ही ताकीद केली गेल्या नंतर ही माणसांची फार मोठी संख्या सैताना मागे चालू लागली व त्याच्या इशाऱ्यानुसार अल्लाह खेरीजचा उपास्यांना आपले दैवत मानून बसली. अशा प्रकारे ते मार्गदर्शनाची वाट चुकले व मार्गभ्रष्टतेत पडले.

६९. सर्वश्रेष्ठ अल्लाहने बुद्धि अशा साठी दिली नव्हती की तिला बेकार व निरुपयोगी करुन ठेवले जावे आणि ईश्वर व धर्म संदर्भात तिला वापरले न जावे, किंबहुना अशासाठी दिली गेली की माणसाने ईश्वर व धर्म संदर्भात उद्‌भवणाऱ्या महत्वपूर्ण व मूलभूत प्रश्नांचे उचित उत्तर जाणून घेण्यासाठी तिचा वापर करावा जर माणसाने आपल्या इच्छे चे अनुसरण केले नाही आणि अल्लाहने प्रदान केलेल्या बुद्धिचा वापर केला तर त्याला या प्रश्नाचे हेच उत्तर मिळेल की या संपूर्ण सृष्टीचा एकमेव ईश्वर आहे आणि तोच उपासना करण्याजोगा आहे. परंतु अधिकांश लोकांची ही दशा आहे की ते आपल्या इच्छामागे धावून आपल्या वाड वडिलांच्या धर्माशीच संलग्न राहतात मग यासाठी त्यांना सहस्त्रावधी ईश्वरांना मान्य करावे लागले तरी चालते.या गोष्टीची अनुचितता अगदी स्पष्ट आहे. परंतु जेव्हा यांनी या संदर्भात आपल्या बुद्धिच्या उजेडात चालण्याचे सोडून दिले आहे तेव्हा यांचे बनाावटी ईश्वर देखील यांना खरे खुरे दिसू लागतात.

कुरआन समस्त माणसांना आवाहन करतो की ईश्वर आणि धर्म यांच्या बाबतीत सत्य कोणते व हे जाणून घेण्या करीता त्यांनी आपल्या बुद्धिच्या वापर करुन विचार चिंतन करावे व त्यासाठी पैगंबरांच्या मार्गदर्शनाची मदत घ्यावी.

स्पष्ट असावे की नास्तिकता देखील बुद्धिची निकड नाही किंबहुना ती देखील तशीच गोष्ट होय जसे अनेकविध ईश्वर मानणे.

७०. कियामतीचा दिवशी काफिरांना वेगवेगळ्या अवस्थेतून जावे लागेल एक अवस्था अशी येईल की त्यांची जिव्हा त्यांच्या इराद्या प्रमाणे बोलू शकणार नाही, उलट त्यांचे अवयव हात पाय वगैरे बोलू लागतील व साक्ष देतील की ते कोणकोणते कर्म करीत राहीलेत.

७१. म्हणजे हे लोक अल्लाहचे भय का म्हणून बाळगत नाही की जर अल्लाहने समजा यांचे डोळे च नाहीसे करुन टाकले तर यांची काय दशा होईल? एखाद्या मार्गाकडे चालत जाण्या योग्य ते राहतील की डोळेच नसतील तर यांना दिसेल कोठून? डोळे नाहीस करण्याची विविध स्थिती असू शकेल. एक स्थिती अशी ही असू शकते की एखाद्या दुर्घटनेशी समोरे जावे लागेल व त्यात डोळे फुटावेत. आणि हे ही की दृष्टीला नष्ट करणारा अज़ाब अवतरावा, ज्याप्रमाणे हजरत लूत यांच्या घरावर हल्ला करणाऱ्यांचे डोळे नाहीसे केले गेले ! माणसाने जर या गोष्टीवर विचार केला की, त्याच्या निर्मात्या वस्वामी ने मनात आणले तर, त्याला लाभलेली सामर्थ्ये व शक्ति कोणत्याही क्षणी नष्ट करु शकतो या विचारानेच माणूस भयकंपित होईल. आणि जेव्हा तो अल्लाहच्या भयाने कंपित होईल तेव्हा स्वत:ला अशा मार्गी लावील जो ईश भयाचा व सदाचारा चा मार्ग आहे.

७२. म्हणजे अल्लाहच्या अजाब (शिक्षे) चे एक स्वरुप असेहि असू शकते की या काफिरांचे चेहरे तो ऐन अशा वेळी विकृत करील जेव्हा हे मार्गस्थ असावेत आणि केवळ चेहरेच नव्हे तर यांना पूर्णत: विकृत-विद्रुप करुन टाकील मग (या स्थितीत) ते ना पुढे पाऊल टाकू शकतील ना मागे परतू शकतील, किंबहुना मार्गात, असतील त्याच ठिकाणी धराशायी पडतील, घरी ही परतू शकणार नाहीत. यांचे स्वरुप आकाशातून अवतरणाऱ्या ईश शिक्षेचेही असू शकते आणि अशा दुर्घटनां चेही, ज्यात प्रेते अशी निघतात की त्यांचे हात पाय गायब असतात व चेहरे अगदीच विद्रुप. आजच्या काळात तर मोटार, रेल्वे आणि विमानांचे भयंकर अपघात मोठ्या प्रमाणात होतात आणि क्षणो - क्षणी बोध घडवित आहेत, पण या भयंकर आपघातांना डोळयांनी पाहून कोणाला तरी अल्लाहचे भय वाटावे !

७३. स्पष्टीकरणा साठी पहा सूरह नहल टीप क्र. १०४

इथे हे स्पष्ट करण्याचा हेतु आहे की जो ईश्वर माणसाची सुप्त शक्ति (सामर्थ्य) म्हतारपणी हळू हळू क्रमश: घटवितो, त्याने इच्छिले तर कोणत्याही क्षणी या सामर्थ्यास पूर्णपणे नष्ट करु शकतो. या दृष्टीकोनातून माणसाने आपल्या सुप्त सामर्थ्याबाबत विचार केला तर तो कधीही गर्वन्मत्त होणार नाही व सदैव ईश्वरापुढे झुकेल.

७४. हे काफिरांच्या या आक्षेपाचे खंडन होय की हा मनुष्य 'नबी' (पैगंबर) नव्हे, किंबहुना कवी आहे व कुरआन कविता संग्रह आहे यावर फर्माविले गेले की आम्ही आपल्या पैगंबरास कविता करणे शिकविले नाही आणि ना काव्य पैगंबरास साजेलसे आहे. ही वाणी तंतोतंत स्मराणिका आणि स्पष्टत: पठण केला जाणारा ग्रंथ (कुरआन) आहे.

काव्य रचनेत यमक रचना आणि वाणी स विषय बनविणे आवश्यक असते. म्हणून कवी यमक जुळविण्या करीता व वाणीस विषय बनविण्या करीता काल्पनिक व अवास्तवे------गोष्टी करु लागतात एखादी ठोस गोष्ट प्रस्तुत करण्या ऐवजी तो विस्कळीत गोष्ट कवितेच्या स्वरुपात मांडतो. तात्पर्य कवितेचे वैशिष्टय च कल्पना विलास होय म्हणून ही पैगंबर पदाहून अतिशय उच्च दर्जाची गोष्ट होय. पैगंबर जी गोष्ट देखील सांगतो भरीव,अटळ, व सत्यनिष्ठ असते. यास्तव सर्वश्रेष्ठ अल्लाहने पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना कविता करणे शिकविले नाही आणि जे कुरआन त्यांच्यावर अवतरले

काव्याशी किंचितहि सुसंगत नाही, कुरआनाचा अभ्यास करणाऱ्या प्रत्येक माणसाला ही अनुभूति होऊ शकते की यात काल्पनिकतेचा तिळमात्र अंश नाही आणि ना यमक जुळविण्या करीता यात ओढाताण केली गेली आहे. किंबहुना हा ग्रंथ माणसाला विसर पडलेल्या धडया ची उजळणी, पूरेपूर उपदेश आणि अशी स्पष्ट वाणी आहे की प्रत्येक मनुष्य समजू शकतो व त्यापासून मार्गदर्शन प्राप्त करु शकतो.

७५. म्हणजे ज्यांची मने मेलेली नाहीत, किंबहुना जिवंत आहेत त्यांच्यावर पैगंबराच्या तंबीचा प्रभाव पडेल जी कुरआना द्वारे केली जात आहे. राहीलेत ते लोक ज्यांची मने अगदी मृत झाली आहेत तर त्यांच्यावर काही प्रभाव पडायचा तर राहीला, उलट त्यांच्यावर अल्लाहचे प्रमाण अवश्य प्रस्थापित होईल. मग कियामतीच्या दिवशी ते ही सबब पुढे करु शकणार नाहीत की त्यांना या परिणती ची खबर दिली गेली नव्हती.

*तो आमच्या करीता उदाहरणे निवेदितो आणि आपल्या जन्मास विसरतो. म्हणतो की हाडांना कोण जिवंत करु शकतो जेव्हा ती (हाडे) अगदी जुनाट झालेली असतील. (अल-क़ुर्आन)*

७१. काय ते विचार चिंतन करीत नाही की आम्ही आपल्या हातांनी बनविलेल्या वस्तूं पैकी यांच्या करीता चतुष्पाद निर्माण केले, तर हे त्यांचे मालक आहेत.[७६]

أَوَلَمْ يَرَوْا أَنَّا خَلَقْنَا لَهُم مِّمَّا عَمِلَتْ أَيْدِينَا أَنْعَامًا فَهُمْ لَهَا مَالِكُونَ ﴿٧١﴾

७२. आणि आम्ही यांना यांच्या अधीन केले, तेव्हा यांच्या पैकी कोणी यांच्या वाहनाचे काम करतो आणि कोणाचे ते मांस खातात.

وَذَلَّلْنَاهَا لَهُمْ فَمِنْهَا رَكُوبُهُمْ وَمِنْهَا يَأْكُلُونَ ﴿٧٢﴾

७३. आणि यांच्या करीता त्यांच्यात इतर (अनेक) लाभ [७७]आणि पेये देखील आहेत.[७८] तेव्हा काय ते कृतज्ञता व्यक्त करणार नाहीत?[७९]

وَلَهُمْ فِيهَا مَنَافِعُ وَمَشَارِبُ ۖ أَفَلَا يَشْكُرُونَ ﴿٧٣﴾

७४. परंतु यांनी अल्लाह ऐवजी इतर उपास्ये बनविली आहेत. या आशेवर की त्यांची मदत केली जाईल.

وَاتَّخَذُوا مِن دُونِ اللَّهِ آلِهَةً لَّعَلَّهُمْ يُنصَرُونَ ﴿٧٤﴾

७५. ते यांची मदत करु शकणार नाहीत, किंबहुना हे त्यांचे सैन्य या नात्याने हजर केले जातील.[८०]

لَا يَسْتَطِيعُونَ نَصْرَهُمْ وَهُمْ لَهُمْ جُندٌ مُّحْضَرُونَ ﴿٧٥﴾

७६. तेव्हा यांच्या गोष्टी तुमच्या करीता दुःख कारक न ठराव्यात.[८१] आम्ही यांच्या त्या गोष्टी ही जाणतो ज्या हे लपवितात आणि त्या देखील, ज्या हे व्यक्त करतात.

فَلَا يَحْزُنكَ قَوْلُهُمْ ۘ إِنَّا نَعْلَمُ مَا يُسِرُّونَ وَمَا يُعْلِنُونَ ﴿٧٦﴾

७७. काय माणसाने विचार-चिंतन केले नाही की आम्ही त्याला वीर्य बिंदू पासून निर्माण केले, मग तो उघड भांडखोर बनून उभा रहीला ! [८२]

أَوَلَمْ يَرَ الْإِنسَانُ أَنَّا خَلَقْنَاهُ مِن نُّطْفَةٍ فَإِذَا هُوَ خَصِيمٌ مُّبِينٌ ﴿٧٧﴾

७८. तो आमच्या करीता उदाहरणे निवेदितो [८३] आणि आपल्या जन्मास विसरतो.[८४] म्हणतो की हाडांना कोण जिवंत करु शकतो जेव्हा ती (हाडे) अगदी जुनाट झालेली असतील.

وَضَرَبَ لَنَا مَثَلًا وَنَسِيَ خَلْقَهُ ۖ قَالَ مَن يُحْيِي الْعِظَامَ وَهِيَ رَمِيمٌ ﴿٧٨﴾

७६. अर्थात ही चतुष्पद जनावरे जी यांच्या मिळकतीत येतात व ज्यांच्यापासून ते निरनिराळे लाभ घेतात अल्लाहच्याच हातांची कारागिरी आहे. अन्य कोणाच्या हातांची नव्हे.

आयतीचा आशय अगदी स्पष्ट आहे आणि या विवादा मध्ये गुरफटण्याची गरज नाही की अल्लाहच्या हातांची हकीगत काय आहे. आमच्या करीता हे जाणून घेणे पुरेसे आहे की या सारखी दुसरी गोष्ट नाही. म्हणून निर्मितीच्या हातांवरुन निर्मात्याच्या हातांचा कयास कदापि केला जाऊ शकत नाही.

७७. चामडे, लोकर इत्यादि तसेच बैलांकडून जमीन नांगरण्याचे काम.

७८. म्हणजे गाय, बकरी उंट इत्यादिचे विविध प्रकारचे दूध.

७९. या देणग्या ज्याअर्थी अल्लाहनेच प्रदान केलेल्या आहेत, तेव्हा याबद्दल त्याने अल्लाह शी कृतज्ञ असणे आवश्यक आहे आणि ही कृतज्ञता या स्वरुपात अदा होऊ शकते जेव्हा अल्लाहला एकमेव ईश्वर आणि पालनकर्ता मानून त्याची उपासना व आज्ञापालन केले जावे.

८०. म्हणजे त्यांची ही उपास्थे (दैवते) त्यांची मदत कसली करणार, उलट हेच आपल्या दैवतांचे सैन्य म्हणून बंदिस्त अवस्थेत अल्लाह समोर हजर केले जातील. या जगात हे आपल्या उपास्यांचा, दैवतांचा जयजयकार करीत राहीले. आपल्या मनोकाल्पित दैवतांच्या मूर्त्या बनवून व त्यांच्या साठी मंदिरे उभारुन अल्लाहच्या उपासकांशी वाद घालीत राहीले, ओढाताण करीत राहीले. येथपावेतो की या उपास्यांच्या समर्थनार्थ यांच्या शी लढाया देखील केल्या अशा प्रकारे जगात या उपास्यांची फौज बनून राहीले. यास्तव कियामती च्या दिवशी यांना यांच्या उपास्थांचे सैन्य म्हणून बंदिस्त करुन अल्लाह समोर हजर केले जाईल.

८१. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वल्लम) यांच्या करीता हे सांत्वनप्रद शब्द आहेत, की हे इतक्या स्पष्ट व उचित गोष्टींना ही समजून घेण्यास तयार नाहीत तर तुम्ही यांचे दुःख का म्हणून करावे? ते तर आपल्या दुष्परिणति प्रत पोहचल्याखेरीज राहणार नाहीत.

८२. म्हणजे माणूस खरे पाहता, एका क्षुद्र पाण्याच्या थेंबा पासून तयार झाला आहे, परंतु आपल्या मोठेपणाची घमेंड त्याच्या डोक्यांत एवढी शिरली आहे की तो आपल्या पालनकर्त्याची ही गोष्ट मान्य करण्यास तयार होत नाही, उलट त्याचा विरोधक बनून उभा राहतो आपल्या क्षुद्रतेवर जर त्याने विचार चिंतन केले असते तर त्याच्या अंगी आपल्या पालन कर्त्याशी दास्यत्व, नम्रता व शालीनतेची जाणीव निर्माण झाली असती. परंतु आपल्या वास्तवतेस विसरुन तो ईश्वराबाबत अशा गोष्टी करतो ज्या सत्याच्या विपरीत आहेत ज्यांचा उच्चार करणे त्याला शोभत नाही.

८३. म्हणजे निर्मिती वरुन अल्लाहचा कयास करुन त्याच्या संबंधी अशा गोष्टी बोलू लागतो की ज्यामुळे त्याच्या स्वत्वात गुणवैशिष्टयात व्यंग-दोष वाट्र लागतात. वास्तविक तो प्रत्येक बाबतीत व्यंग दोष विरहित आहे.

८४. म्हणजे अल्लाह विषयी तो असे समजतो की तो माणसाला त्याच्या मृत्युनंतर पुन्हा जिवंत करु शकत नाही आणि आपल्या जन्मास विसरतो की त्याला अल्लाहने तुच्छ पाण्याच्या एका थेंबापासून निर्माण केले आहे.ज्या हस्ती (अस्तित्वा) ने त्याला घडविले त्याचे सामर्थ्य मर्यादित कसे असू शकते?

७९. सांगा, त्यांना तोच जिवंत करील, ज्याने त्यांना पहिल्यांदा निर्माण केले आणि तो प्रत्येक निर्मितीस जाणतो. [८५]

قُلْ يُحْيِيهَا الَّذِي أَنشَأَهَا أَوَّلَ مَرَّةٍ ۖ وَهُوَ بِكُلِّ خَلْقٍ عَلِيمٌ ﴿٧٩﴾

८०. तोच होय ज्याने तुमच्या करीता हिरव्या वृक्षा पासून आग निर्माण केली आणि तुम्ही त्यापासून अग्नि प्रज्वलीत करता.[८६]

الَّذِي جَعَلَ لَكُم مِّنَ الشَّجَرِ الْأَخْضَرِ نَارًا فَإِذَا أَنتُم مِّنْهُ
تُوقِدُونَ ﴿٨٠﴾

८१. काय तो, ज्याने आकाशांना व जमीनीला निर्माण केले, या गोष्टीस समर्थ नाही की यांच्या सारख्यांना निर्माण करावे. [८७] कां नाही? तो मोठा निमार्ण करणारा, ज्ञान बाळगणारा आहे.[८८]

أَوَلَيْسَ الَّذِي خَلَقَ السَّمَاوَاتِ وَالْأَرْضَ
بِقَادِرٍ عَلَىٰ أَن يَخْلُقَ مِثْلَهُم ۚ بَلَىٰ وَهُوَ الْخَلَّاقُ الْعَلِيمُ ﴿٨١﴾

८२. तो जेव्हा एखाद्या गोष्टीचा इरादा करतो तेव्हा तिला आदेश देतो की घडून ये आणि ती घडून येते.[८९]

إِنَّمَا أَمْرُهُ إِذَا أَرَادَ شَيْئًا أَن يَقُولَ لَهُ كُن فَيَكُونُ ﴿٨٢﴾

८३. तेव्हा पवित्र आहे तो, ज्याच्या हाती प्रत्येक गोष्टीचा सत्ताधिकार आहे आणि त्याच्याच कडे तुम्ही परतविले जाल.[९०]

فَسُبْحَانَ الَّذِي بِيَدِهِ مَلَكُوتُ كُلِّ شَيْءٍ وَإِلَيْهِ تُرْجَعُونَ ﴿٨٣﴾

८५. म्हणजे तो आपल्या प्रत्येक निर्मितीस बारीक सारीक तपशिलसह जाणतो त्याला प्रत्येक गोष्टीचे ही ज्ञान आहे व इतर समस्त वैशिष्टया चे ही. असे असतांना त्याच्या करीता माणसाला दुसऱ्यांदा जिवंत करणे कोणते कठीण काम आहे?

८६. प्राचीन काळात जेव्हा आगपेटी व लायटर वगैरे चा शोध लागला नव्हता, आग निर्माण करण्याचे एक साधन काही झाडांच्या फांद्या होत्या, ज्यांना एकमेकांवर घासल्याने आग निर्माण होत असे अरबस्तानात त्याकाळी या प्रकारची दोन झाडे आढळून येत ज्यांची नावे 'मर्ख' आणि अफार अशी होती ज्या पैकी एक नर होता तर दुसरी मादा. यास्तव 'लिसानुल अरब' या अरबी भाषेच्या सुप्रासिद्ध शब्दकोषात यांच्याविषयी पुढील खुलासा मिळतो.

'हे मर्ख आणि अफार आहेत. आणि या दोन्ही झाडांमध्ये आग असते, इतर झाडांमध्ये नव्हे आणि यांच्या फांद्यापासून चकमक बनविली जाते व त्यापासून आग निर्मित केली जाते. अज़हरी म्हणतात, मी ही झाडे वाळवंटात पाहीली आहेत.' (लिसानुल अरब खंड. ४ पृ. ५८९)

हिरव्या टवटवीत झाडांपासून आगीच्या ठिणग्या निर्माण करणे अल्लाहच्या सामर्थ्याचा फार मोठा चमत्कार होय आणि हा ही त्याच्या सामर्थ्याचा चमत्कार होय की आगीत जे लाकूड जाळले जाते ते देखील हिरव्या झाडांपासून प्राप्त केले जाते. पाणी देखील. ऑक्सीजन व हैड्रोजन (H2O) ने संमिश्रण असते आणि ऑक्सीजन ज्वालाग्रही वायु होय. विज्ञानाच्या या संशोधनाने अल्लाहच्या सामर्थ्याचे कितीतरी नमुने आमच्या पुढे मांडले आहेत.

८७. अर्थात ज्या रक्त मांसाची माणसे या पृथ्वीवर जन्मास आलीत त्याच रक्त मांसाची माणसे दुसऱ्यांदा निर्माण केली जावीत.

८८. अर्थात माणसांच्या एवढया मोठ्या संख्येस निर्माण करुन तो थकला भागला नाही, किंबहुना तो जबरदस्त सामर्थ्य बाळगणारा आहे व त्याच्या सामर्थ्यात कधीही उणीव होणार नाही आणि तो अतिशय ज्ञानी आहे. त्याच्याकडून कधीही भूल होणार नाही.

८९. म्हणजे त्याला कोणत्याही गोष्टीच्या निर्मिती करीता कसलेही श्रम घ्यावे लागत नाही, किंबहुना जेव्हा तो इरादा करतो तर ज्या गोष्टीचा इरादा करतो तर तिच्यासाठी तो फक्त 'हो' म्हणतो, तत्क्षणी ती गोष्ट अस्तित्वात येते.

अल्लाहच्या निर्मिती सामर्थ्या बाबत हे अगदी सत्य ज्ञान होय जे कुरआना च्या माध्यामान्वये माणसाला प्रदान केले गेले आहे. त्यानंतर त्या तत्वज्ञानीय विवादांकरीता कोणतीही जागा राहात नाही, ज्यात अन्यधर्मीय गुरफटून गेले आहेत.

९०. ही या सूरह ची समारोपाची आयत होय ज्यात मोजक्या शब्दात तीन महत्वपूर्ण गोष्टी निवेदिल्या गेल्या आहेत आणि अशा प्रकारे निवेदिल्या गेल्या आहेत की त्यांचा सहजगत्या मनात शिरकाव होतो एक ही की अल्लाह प्रत्येक प्रकारच्या व्यंग-दोषांपासून मुक्त आहे. दुसरी अशी की प्रत्येक गोष्ट त्याच्या सत्ताधिकारात आहे. आणि सर्वांवर त्याचे शासन पसरलेले आहे. या सृष्टीत सर्व अधिकार त्याच्याच हाती आहे आणि तिसरी गोष्ट ही की शेवटी जेव्हा लोकांना परतून त्याच्याच समोर जायचे आहे, या साठी की त्यांनी आपल्या आचरणाचा जाब द्यावा व आपल्या आचरणानुसार चांगला-वाईट मोबदला प्राप्त करावा अशा प्रकारे तौहीद (एकेश्वरवाद) व आखिरत (मरणोत्तर जीवन) दोन्ही विषय या आयतीत समाविष्ट केले गेले आहेत. आणि त्यातून प्रेषित्वाची निकड आपोआप उद्भवते. कुरआनाच्या संक्षेप व चमत्कार पूर्ण (ओजस्व) वाणी चे हे एक स्पष्ट उदाहरण आहे.

# सूरह अस्साफ्फात

# ३७. अस्साफ्फात

**नावः** सूरह चा आरंभ ''वस्साफ्फाती'' (शपथ आहे पांक्तिबद्ध फरिश्त्यांची) ने केला गेला आहे, तद्नुषंगे या सूरह चे नाव 'अस्साफ्फात' आहे.

**अवतरण काळः** आयतींचा क्रम आणि मजकूरां वरुन असे दिसून येते की ही मक्काच्या मध्य युगात अवतरली असावी.

**मध्यवर्ति कल्पनाः** या सूरह मध्ये अल्लाह एकमेव उपास्य असण्या बद्दल एका वेगळ्या शैलीने निवेदन केले गेले आहे आणि याच्या समर्थनार्थ 'मला ए अअला' ची साक्ष प्रस्तुत केली गेली आहे आणि या वस्तुस्थितीस मानण्याच्या परिणाम स्वरुपी संपादित होणारा चांगला मोबदला आणि न मानण्याच्या परिणामी मिळणाऱ्या शिक्षेस अशा प्रकारे प्रस्तुत केले आहे की भविष्य कालीन परिस्थितींची एक छटा वर्तमान काळात ही पाहीली जाऊ शकते.

**आयत रचनाः** आयत क्र. १ ते १० मध्ये अल्लाह एकमेव उपास्य असण्या संबंधी फरिश्त्यांची साक्ष प्रस्तुत केली गेली आहे आणि हे स्पष्ट केले गेले आहे की सैतान आकाशाच्या दरबारा पर्यंत पोहोचू शकत नाही. त्यांना यापासून दूर ठेवले गेले आहे.

आयत क्र. ११ ते ७४ मध्ये दुसऱ्यांदा लाभणाऱ्या जीवनाचा अहवाल सादर केला गेला आहे. एकी कडे अल्लाह खेरीज च्या उपास्यांच्या भक्तांची दुष्परिणति निवेदिली गेली आहे तर दुसरी कडे अल्लाहच्या उपासकांची उत्कृष्ट परिणति

आयत क्र. ७५ ते १४८ मध्ये अनेक पैगंबरांचा उल्लेख केला गेला आहे ज्यांनी एकेश्वरी आवाहनास प्रस्तुत करतांना निरनिराळी संकटे झेलेली; आणि अल्लाहच्या मार्गात जबरदस्त बलीदान दिले, तेव्हा सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्यांना उत्कृष्ट मोबदला देऊन उपकृत केले.

आयत क्र. १४९ ते १७० मध्ये अनेकेश्वर वाद्यांच्या खोट्या श्रद्धा, विशेषतः फरिश्त्या विषयी चुकीच्या कल्पनांचे खंडन करतांना फरिश्त्यांचे आत्म-निवेदन ही सादर केले गेले आहे.

आयत क्र. १७१ ते १८२ सूरहच्या समारोपाच्या आयती होत ज्या मध्ये पैगंबरानी अल्लाहची मदत आणि अल्लाहशी कृतज्ञता अर्थात पैगंबरांच्या अनुयायीं करीता वर्चस्वाची खुशखबर दिली गेली आहे.

# ३७.सूरतुस्साफ्फात

سُورَةُ الصَّافَّاتِ

आयती १८२

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाह च्या नावाने

بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ

१. रांगा रांगानी उभ्या राहणाऱ्या (फरिश्त्यां) ची शपथ.[१]

وَالصّٰٓفّٰتِ صَفًّا ۙ﴿۱﴾

२. आणि दरडाविणाऱ्या धुत्कारणाऱ्यांची.[२]

فَالزّٰجِرٰتِ زَجْرًا ۙ﴿۲﴾

३. आणि (ईश) स्मरणाचा पाठ करणाऱ्यांची.[३]

فَالتّٰلِيٰتِ ذِكْرًا ۙ﴿۳﴾

४. तुमचे उपास्य एकच आहे.[४]

اِنَّ اِلٰـهَكُمْ لَوَاحِدٌ ؕ﴿۴﴾

५. तो जो आकाश आणि जमीन आणि यांच्या दरम्यान च्या अस्तित्वांचा स्वामी (रब्ब) आहे. आणि समस्त पूर्व (दिशां) चा स्वामी.[५]

رَبُّ السَّمٰوٰتِ وَالْاَرْضِ وَمَا بَيْنَهُمَا وَرَبُّ الْمَشَارِقِ ؕ﴿۵﴾

६. आम्ही आकाश विश्वा ला ताऱ्यांच्या सौंदर्याने सुशोभित केले आहे.[६]

اِنَّا زَيَّنَّا السَّمَآءَ الدُّنْيَا بِزِيْنَةِ ۨالْكَوَاكِبِ ۙ﴿۶﴾

७. आणि प्रत्येक बंडखोर सैताना पासून त्याला सुरक्षित केले.[७]

وَحِفْظًا مِّنْ كُلِّ شَيْطٰنٍ مَّارِدٍ ۚ﴿۷﴾

८. ते आकाशस्थ दरबाराच्या गोष्टी ऐकू शकत नाही आणि चोहोंकडून त्यांच्यावर मारा होतो.[८]

لَا يَسَّمَّعُوْنَ اِلَى الْمَلَاِ الْاَعْلٰى وَيُقْذَفُوْنَ مِنْ كُلِّ جَانِبٍ ۖ﴿۸﴾

९. ते धुत्कारले जातात [९] आणि त्यांच्या करीता कायम स्वरुपी अजाब आहे.[१०]

دُحُوْرًا وَّلَهُمْ عَذَابٌ وَّاصِبٌ ۙ﴿۹﴾

१. पांक्तिबद्ध होऊन (रांगा रांगाने) राहणाऱ्यांशी अभिप्रेत फरिश्ते होत, जसे या सूरह च्या आयत क्र. १६५ वरुन स्पष्ट आहे, ज्यात फरिश्त्यांचे हे निवेदन उल्लेखिले गेले आहे- وَإِنَّا لَنَحْنُ الصَّافُّونَ ''आणि आम्ही (अल्लाह समोर) पांक्तिबद्ध होऊन उभे राहतो' आणि शपथ साक्षी च्या अर्थाने आहे. आरबी भाषेत ही एक अलंकारीक शैली आहे. अशा प्रसंगी 'शपथ' चा तो अर्थ नसतो जो आम्ही आपल्या भाषेत घेतो. म्हणजे एखाद्याच्या महानतेस लक्षात घेता त्याची शपथ घेणे. अशी शपथ केवळ अल्लाहची घेतली जाते.

आयतीत مَلَإِ الْأَعْلَىٰ ''आकाशस्थ दरबारा'' ची एक छटा दाखवली गेली आहे. फरिश्त्यांचे अल्लाह समोर पंक्तिबद्ध होऊन नम्रता पूर्वक उभे राहणे या गोष्टीची साक्ष आहे की त्यांच्या दृष्टीने अल्लाह च उपासनीय आहे.

२. म्हणजे फरिश्ते सैतानांना दरडावितात व धुत्कारतात. ते या विद्रोहयांशी कसलाही संबंध ठेवत नाही. किंबहुना त्याचा धिक्कार करतात.

३. अभिप्रेत फरिश्ते होत जे अल्लाहच्या नाम:स्मरणात लीन आहेत नाम:स्मरणा सोबत तिलावत (पठण) हा शब्द या गोष्टींचा निर्देश करतो की फरिशत्यां करीता ही नाम:स्मरणा ची काही वचने खास केली गेली आहेत. ज्या प्रमाणे आमच्या करीता سُبْحَانَ اللهِ، اَلْحَمْدُ لِلّٰهِ ''सुबहानल्लाही, अलहम्दुलिल्लाही'' वगैरे वचने खास केली गेली आहेत, नाम:स्मरणाची ही वचने, जी अल्लाहनेच शिकविली आहेत मोठे महत्वपूर्ण आहेत.

फरिश्ते अल्लाहने शिकवलेल्या वचनांसह नाम:स्मरणाचा इतमाम करतात म्हणून यास नाम:स्मरणाचा पाठ या अर्थाने घेतले गेले आहे. आणि नाम:स्मरणाची तिलावत उपासना आहे.

४. हीच ती गोष्ट की जिच्याबद्दल फरिश्त्यांच्या उपासनेस एक साक्ष म्हणून प्रस्तुत केले गेले आहे. अर्थात तुमचे उपास्य एकच आहे आणि तोच आकाश विश्वात फरिश्त्यांचेही उपास्य आहे.

५. आकाश आणि जमीनी च्या दरम्यान ची अस्तित्वे अगणित ज्यात आहेत. खगोल शास्त्रज्ञ म्हणतात की केवळ या आकाशगंगेत ज्यात आमची पृथ्वी आहे, कोटयावधी तारे आढळून येतात.

" Our Galaxy is a vast system of 100 billion stars."

(The Cambridge Ency. of Astronomy, London - P. 313)

एवढया विशाल सृष्टीचा निर्माता व स्वामी कोण आहे आणि तिच्यावर कोणाचे शासन स्थापित आहे? या प्रश्नाचे ज्ञान विषयक स्तरावरील उत्तर या खेरीज कोणतेही असू शकत नाही की एकमेव ईश्वर (अर्थात अल्लाह) च संपूर्ण सृष्टीचा निर्माता व स्वामी आहे. व त्याचेच शासन प्रस्थापित आहे.

आयती द्वारे हे की कळाले की पूर्व दिशा एकच नाही, किंबहुना अनेक आहेत. आणि ही गोष्ट आजच्या खगोल शास्त्रा च्या मदती ने सहजगत्या लक्षात येऊ शकते. ज्या प्रमाणे पृथ्वीवर सूर्याच्या उदय व अस्ता द्वारे पूर्व आणि पश्चिम दिशा ठरल्या आहेत, तद्वतच इतर ग्रहांवर देखील पूर्व आणि पश्चिम दिशा अस्तित्वात आहेत कुरआनाने 'पूर्व दिशांचा स्वामी असे संबोधून या वस्तुस्थिती कडे निर्देश केला आहे की ही सृष्टी अतिविशाल आहे. हिला केवळ एकाच पूर्वे पर्यंत मर्यादित समजू नका आणि ह्या अति विशाल सृष्टीचा एकच स्वामी आहे आणि तो आहे अल्लाह.

६. म्हणजे आकाशाला ताऱ्यांनी अशा प्रकारे सुशोभित केले आहे की त्यांचा सौंदर्य देखावा चित्ताकर्षक बनला आहे आणि अवलोकन करणाऱ्यांना विचार-चिंतना चे आवाहन करतो की असा तो कोण आहे ज्याने आपल्या कला कुसरीचा हा नमुना सादर केला आहे?

७. म्हणजे बंडखोर सैतान जेव्हा आकाशा कडे परलोकाच्या खबरी आणण्या करीता झेप घेतात तेव्हा ते आकाशा पर्यंत पोहचत नाहीत. त्यांना शिरकाव न करता यावा या दृष्टीने आकाशाला अगदी सुरक्षित केले गेले आहे.

८. مَلَإِ الْأَعْلَىٰ ''मलाइ आला''चा अर्थ आकाशस्थ दरबार म्हणजे फरिश्त्यांची सभा होय. या सभेची कोणतीही गोष्ट सैतान ऐकू शकत नाही. म्हणून ही कल्पना चुकीची आहे की सैतान आकाशाच्या खबरी ज्योतिषां पर्यंत पोहचवितात आणि याच चुकीच्या कल्पनेमुळे मक्केचे काफिर लोक पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्याविषयी ज्योतिषी असण्याची शंका व्यक्त करीत . ते म्हणत की पैगंबर आकाशाच्या विश्वाच्या ज्या खबरी ऐकवित आहेत. त्या सैताना नी आणलेल्या खबरी आहेत. ज्यात असत्याचे मिश्रण आहे. या कल्पनेचे खंडन करण्या करीता या ठिकाणी. फर्माविले गेले की सैतान आकाशा च्या गोष्टी ऐकूच शकत नाहीत. त्यांना त्यापासून दूर ठेवले गेले आहे आणि अशी व्यवस्था केली गेली आहे की जर ते त्या मर्यादे पलीकडे जाण्याचा प्रयत्न करतात, जी त्यांच्या करीता निरधारीत केली गेली आहे, तेव्हा चोहींकडून त्यांच्यावर मारा होतो.

९. म्हणजे फरिश्ते त्यांना धुतकारतात.

१०. म्हणजे आखिरत मध्ये तर या सैतांना करीता सदैव काळ टिकणारी ईश शिक्षा (अजाब) राहील.

१०. जर एखाद्याने काही उचकले तर एक तेजस्वी अग्नि-शिखा त्याचा पाठलाग करते.[११]

إِلَّا مَنْ خَطِفَ الْخَطْفَةَ فَأَتْبَعَهُ شِهَابٌ ثَاقِبٌ ﴿١٠﴾

११. यांना विचारा, काय यांना निर्माण करणे कठीण आहे किंवा ज्यांना आम्ही निर्माण केले आहे, त्यांना निर्माण करणे कठीण होते ?[१२] आम्ही त्यांना चिकट माती पासून निर्माण केले आहे.[१३]

فَاسْتَفْتِهِمْ أَهُمْ أَشَدُّ خَلْقًا أَمْ مَنْ خَلَقْنَا ۚ إِنَّا خَلَقْنَاهُمْ مِنْ طِينٍ لَازِبٍ ﴿١١﴾

१२. तुम्ही आश्चर्य व्यक्त करता आणि हे थट्टा उडवितात.[१४]

بَلْ عَجِبْتَ وَيَسْخَرُونَ ﴿١٢﴾

१३. आणि जेव्हा यांना उपदेश केला जातो, तेव्हा ते उपदेश ग्रहण करीत नाहीत.

وَإِذَا ذُكِّرُوا لَا يَذْكُرُونَ ﴿١٣﴾

१४. आणि जेव्हा एखादी निशाणी पाहतात तेव्हा तिची थट्टा उडवितात.

وَإِذَا رَأَوْا آيَةً يَسْتَسْخِرُونَ ﴿١٤﴾

१५. आणि म्हणतात, ही उघड जादू आहे.[१५]

وَقَالُوا إِنْ هَٰذَا إِلَّا سِحْرٌ مُبِينٌ ﴿١٥﴾

१६. काय जेव्हा आम्ही मरण पावणार आणि माती व हाडे बनून राहणार, तेव्हा आम्हाला उठवून उभे केले जाईल ?

أَإِذَا مِتْنَا وَكُنَّا تُرَابًا وَعِظَامًا أَإِنَّا لَمَبْعُوثُونَ ﴿١٦﴾

१७. आणि काय आमच्या पूर्वजांना देखील?

أَوَآبَاؤُنَا الْأَوَّلُونَ ﴿١٧﴾

१८. सांगा, होय आणि तुम्ही अपमानित ही व्हाल.[१६]

قُلْ نَعَمْ وَأَنْتُمْ دَاخِرُونَ ﴿١٨﴾

१९. ती तर एकच दटावणी असेल आणि अकस्मात ते (कियामतीचा देखावा) पाहू लागतील. [१७]

فَإِنَّمَا هِيَ زَجْرَةٌ وَاحِدَةٌ فَإِذَا هُمْ يَنْظُرُونَ ﴿١٩﴾

२०. म्हणतील अरेरे ! हा मोबदल्याचा दिवस आहे.[१८]

وَقَالُوا يَا وَيْلَنَا هَٰذَا يَوْمُ الدِّينِ ﴿٢٠﴾

२१. हा तोच निर्णयाचा दिवस होय, ज्याला तुम्ही खोटे ठरवित होता.[१९]

هَٰذَا يَوْمُ الْفَصْلِ الَّذِي كُنْتُمْ بِهِ تُكَذِّبُونَ ﴿٢١﴾

११. मूळ शब्द 'शहाब' आर्थात आगीचा लोळ. यास अभिप्रेत ताऱ्यां पासून निघणाऱ्या अग्नि शिखा होत. एखादा सैतान आकाशाची वार्ता आणण्या करीता ताऱ्यांच्या ही पुढे झेप घेण्याचा जेव्हा प्रयत्न करतो. तेव्हा ताऱ्यांपासून निघणारी अग्नि शिखा त्याचा पाठलाग करते म्हणजेच तिचा मारा त्यावर पडतो परिणामी तो पुढे जाऊ शकत नाही. अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह हिज्र टीप क्र.१६

१२. म्हणजे मनुष्य, फरिश्ते, जिन्न इत्यादिंना आम्ही जे निर्माण केले आहे तर त्यांना शून्यातून अस्तित्वात आणणे अतिशय कठीण कार्य होते कि माणसाला दुसऱ्यांदा निर्माण करणे अधिक कठीण काम आहे? जर पहिली गोष्ट अल्लाह करीता सोपी होती तर दुसरी गोष्ट अधिक सोपी असायला हवी. या लोकांजवळ याचे काय उत्तर आहे?

مَنْ "मन" अरबी भाषेत ذوی العقول करीता योजिला जातो म्हणून आम्ही اَمَّنْ خَلَقْنَا चा अनुवाद 'कि ज्यांना आम्ही निर्माण केलेले आहे त्यांना' असा केला आहे..

१३. माणसाची निर्मिती माती पासून झाली आहे आणि ज्या माती पासून माणसाला घडवले गेले तिला वेगवेगळया अवस्थांमधून जावे लागले. कुरआनाने वेगवेगळया ठिकाणी, तिच्या विविध अवस्थां विषयी उल्लेख केला आहे. या ठिकाणी तिच्या या अवस्थे संबंधी उल्लेख केला गेला आहे जेव्हा पाण्याच्या मिश्रणाने ती लसदार म्हणजे चिकट बनली होती. याच मातीतून माणसाचा सांगाडा घडविला गेला.

१४. म्हणजे हे पैगंबरा अल्लाहच्या सामर्थ्याच्या या चमत्कृतिंना पाहून तुम्हाला अत्याधिक आश्चर्य वाटते की, अल्लाहने आपल्या निर्मिती चे कस कसे उच्च दर्जा चे नमूने सादर केले आहेत, परंतु या लोकांची दशा अशी की ते अल्लाहच्या सामर्थ्याची थट्टा उडवित आहेत आणि असे म्हणत आहेत की दुसऱ्यांदा निर्माण करणे संभव नाही.

१५. म्हणजे जेव्हा यांच्या समोर एखादे असे प्रमाण येते जे पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या प्रेषित्वास प्रमाणित करणारे असते तर ते थट्टा उडवू लागतात आणि जेव्हा त्याचा हा प्रभाव पाहतात की ते हृदयांना जिंकत जात आहे तेव्हा त्याचे स्पष्टीकरण असे करतात की ही केवळ जादू आहे जी आपला प्रभाव दाखवित आहे अशा प्रकारे यांच्यावर ना उपदेशाचा परिणाम होतो आणि ना प्रमाणाचा.

१६. अर्थात तुम्हाला अशा स्थितीत उठविले जाईल की तुमच्या गर्वाचे घर कोसळून जमीन दोस्त झालेले असेल. आणि आपण अगदीच अगतिक असल्याचे तुम्हाला दिसून येईल.

१७. अर्थात कियामतीच्या दिवशी अल्लाहची आपल्या दासां करीता एक दटावणी असेल की उठा आता आणि कर्माचा हिशेब देण्या करीता माझ्या समोर हजर व्हा. या दरडावण्याच्या परिणामी सर्व मेलेली माणसे जिवित होऊन तत्क्षणीच उठून उभे राहतील तात्पर्य एक दरडावणे, समस्त माणसांना जे निद्रावस्थेत होते जागे करील आणि हश्र च्या मैदानात आणून उभे करील, जिथे सर्वांच्या समोर कियामतीचे दृश्य असेल.

१८. कियामतीचे महाभयंकर दृश्य पाहून त्यांना आपल्या स्वत:बद्दल खेद वाटू लागले की काय हे घडले! आम्ही तर शिक्षा आणि मोबदल्याच्या दिवसाला खोटे ठरवित राहीलो आणि आज नेमका तोच दिवस उगवला! आता आमचे काय होईल ते होवो !

१९. म्हणजे त्या वेळी त्यांना ही जाणीव दिली जाईल की तुम्ही तर निर्णयाच्या दिवसाला खोटे ठरवित होता. आता बघा तो दिवस उजाडला !

२२. एकत्रित करा अत्याचारींना व त्यांच्या सहकाऱ्यांना आणि त्यांना देखील, ज्यांची हे भक्ति (आराधना) करीत असत.

احْشُرُوا الَّذِينَ ظَلَمُوا وَأَزْوَاجَهُمْ وَمَا كَانُوا يَعْبُدُونَ ﴿٢٢﴾

२३. अल्लाह ला सोडून (ज्यांची भक्ति आराधना करीत होते ) मग या सर्वांना जहन्नम चा मार्ग दाखवा.[२०]

مِنْ دُونِ اللَّهِ فَاهْدُوهُمْ إِلَىٰ صِرَاطِ الْجَحِيمِ ﴿٢٣﴾

२४. आणि यांना (थोडे) थांबवा. यांना काही विचारायचे आहे.[२१]

وَقِفُوهُمْ إِنَّهُمْ مَسْئُولُونَ ﴿٢٤﴾

२५. काय झांलय आता तुम्ही एकमेकाची मदत नाही करीत ?[२२]

مَا لَكُمْ لَا تَنَاصَرُونَ ﴿٢٥﴾

२६. किंबहुना आज हे मोठे आज्ञाधारक बनलेले आहे. [२३]

بَلْ هُمُ الْيَوْمَ مُسْتَسْلِمُونَ ﴿٢٦﴾

२७. आणि ते एकमेकां कडे लक्ष देऊन परस्परांना विचारणा करतील.[२४]

وَأَقْبَلَ بَعْضُهُمْ عَلَىٰ بَعْضٍ يَتَسَاءَلُونَ ﴿٢٧﴾

२८. म्हणतील, तुम्हीच आमच्या जवळ उजवी कडून येत.[२५]

قَالُوا إِنَّكُمْ كُنْتُمْ تَأْتُونَنَا عَنِ الْيَمِينِ ﴿٢٨﴾

२९. ते प्रत्युत्तर देतील, नव्हे, किंबहुना तुम्ही स्वतः ईमान बाळगणार नव्हते.

قَالُوا بَلْ لَمْ تَكُونُوا مُؤْمِنِينَ ﴿٢٩﴾

३०. आणि आमचा तुम्हावर काहीच जोर नव्हता, तुम्ही स्वतःच बंडखोर लोक होते.[२६]

وَمَا كَانَ لَنَا عَلَيْكُمْ مِنْ سُلْطَانٍ ۖ بَلْ كُنْتُمْ قَوْمًا طَاغِينَ ﴿٣٠﴾

३१. शेवटी आमच्या बाबत आमच्या पालनकर्त्याचे फर्मान पूर्ण झालेच.[२७] आम्हास (ईश-शिक्षेची) गोडी चाखावीच लागणार.

فَحَقَّ عَلَيْنَا قَوْلُ رَبِّنَا ۖ إِنَّا لَذَائِقُونَ ﴿٣١﴾

३२. तेव्हा, आम्ही तुम्हाला बहकाविले. आम्ही स्वतःच बहकलेले होतो.[२८]

فَأَغْوَيْنَاكُمْ إِنَّا كُنَّا غَاوِينَ ﴿٣٢﴾

२०. हा आदेश फरिश्त्यांना संबोधून असेल की अत्याचारी नेत्यांना व प्रमुखांना एकत्रित करा व त्यांच्या साथीदारांना व अनुयायींना ही तसेच त्या उपास्य दैवतांना ही ज्यांची हे अल्लाहला सोडून भक्ति आराधना करीत राहीलेत मग त्या सर्वांना जहन्नम कडे न्या.

२१. म्हणजे जेव्हा ते जहन्नम जवळ पोहचतील, तेव्हा सर्वश्रेष्ठ अल्लाह फरिश्त्यांना फर्माविल की यांना जरा थांबवा. अशासाठी की यांना हे विचारले जावे, आता जे काही विचारले जाईल त्याचे निवेदन पुढे येत आहे.

२२. म्हणजे जगात तर तुम्ही एकमेकांचे मदत नीस बनून राहीलेत एक धार्मिक समूह या नात्याने एकात्मतेचे प्रदर्शन करीत राहीले. आता तुम्हाला झाले तरी काय की एकमेकांपासून अगदीच वेगळे झालात आणि एवढी जवळीक असूनही एकमेकांची मदत करीत नाहीत? या प्रश्नाचे ते काहीच उत्तर देऊ शकणार नाहीत, ज्यावरुन त्यांची विवशता दिसून येईल.

२३. म्हणजे जगात तर ते अल्लाहचे अवज्ञाकारी बनून राहीलेत परंतु आज त्यांनी स्वत: अल्लाहपुढे शरणागती (Surrender) पत्करली आहे. आता जो आदेश यांना दिला जातो त्याचे ते पालन करतात. कोठे गेली आता यांची स्वच्छंदी पणाची घमेंड?

२४. म्हणजे एकमेकावर आरोप ठेवू लागतील. नेता जनतेवर आणि जनता नेत्यावर. धर्म-प्रमुख आपल्या अनुयायींवर आणि अनुयायी आपल्या प्रमुखांवर आणि सैतान आपल्या चेल्यांवर आणि चेले आपल्या गुरुंवर

२५. उजवीकडून 'चा अर्थ अरबी वाकप्रचारानुसार' भल्यामार्गाकडून असा आहे. अर्थात हे की आम्ही तुमचे हित चिंतक बनून आलो होतो परंतु खरे पाहता तुम्ही आमचे अहित चिंतले. तुम्ही आम्हाला भुरळ पाडली आणि आम्ही तुमच्या प्रलोभनाला बळी पडून या परिणतिस पोहचलो.

२६. ते मार्गभ्रष्ट करणाऱ्यांना उत्तर देतील की तुम्ही केव्हा ईमान बाळगणार होते. जर ईमान बाळगण्याची तुमची मनापासून तयारी असती तर निश्चितपणे ईमान बाळगले असते. आमचा तुमच्यावर काही जोर नव्हता. की तुम्हाला ईमान बाळगण्या पासून रोखले असते. तुम्ही स्वत:च आपल्या विद्रोहास जबाबदार आहात.

२७. अर्थात त्याचे हे फर्मान की सैतानाच्या अनुयायींना जहन्नम ची शिक्षा भोगावी लागेल.

२८. ते हे मान्य करतील की आम्ही पथभ्रष्ट होतो आणि जेव्हा आम्हीच पथभ्रष्ट होतो तर तुम्हालाही बहकविण्याचे काम करु शकत होतो, परंतु तुम्ही का म्हणून आमच्या बहकाविण्यास बळी पडले?

३३. अशा रीतीने त्या दिवशी ते सर्व अजाबा (ईश शिक्षे) त सहभागी होतील.[२९]

فَإِنَّهُمْ يَوْمَئِذٍ فِي الْعَذَابِ مُشْتَرِكُونَ ٣٣

३४. अपराध्यांशी आम्ही असेच करु. [३०]

إِنَّا كَذَٰلِكَ نَفْعَلُ بِالْمُجْرِمِينَ ٣٤

३५. हे असे लोक होते की जेव्हा त्यांना सांगितले जाई, अल्लाह खेरीज कोणी उपास्य नाही, तेव्हा गर्व करीत असत.

إِنَّهُمْ كَانُوا إِذَا قِيلَ لَهُمْ لَا إِلَٰهَ إِلَّا اللَّهُ يَسْتَكْبِرُونَ ٣٥

३६. आणि म्हणत, आम्ही एका वेडया कवीच्या सांगण्या वरुन आपल्या उपास्यांना सोडून द्यावे ! [३१]

وَيَقُولُونَ أَئِنَّا لَتَارِكُو آلِهَتِنَا لِشَاعِرٍ مَجْنُونٍ ٣٦

३७. वस्तुतः तो सत्य घेऊन आला होता आणि त्याने (भूतपूर्व) पैगंबरांचे सत्य-समर्थन केले होते.[३२]

بَلْ جَاءَ بِالْحَقِّ وَصَدَّقَ الْمُرْسَلِينَ ٣٧

३८. आता तुम्हाला दु:ख दायक अजाब ची गोडी चाखायची आहे.

إِنَّكُمْ لَذَائِقُو الْعَذَابِ الْأَلِيمِ ٣٨

३९. आणि तुम्हाला त्याचाच मोबदला दिला जाईल, जे तुम्ही करीत राहीलात.[३३]

وَمَا تُجْزَوْنَ إِلَّا مَا كُنْتُمْ تَعْمَلُونَ ٣٩

४०. परंतु अल्लाहचे विशिष्ट दास या पासून सुरक्षित राहतील.[३४]

إِلَّا عِبَادَ اللَّهِ الْمُخْلَصِينَ ٤٠

४१. त्यांच्या करीता निर्धारीत उपजिविका असेल.[३५]

أُولَٰئِكَ لَهُمْ رِزْقٌ مَعْلُومٌ ٤١

४२. मेवे असतील.[३६] आणि त्यांना सम्मान पूर्वक प्रतिष्ठा दिली जाईल.[३७]

فَوَاكِهُ ۖ وَهُمْ مُكْرَمُونَ ٤٢

४३. ईश देणग्यां नी युक्त अशा जन्नती मध्ये.

فِي جَنَّاتِ النَّعِيمِ ٤٣

४४. आसनां वर समोरा समोर बसले असतील.[३८]

عَلَىٰ سُرُرٍ مُتَقَابِلِينَ ٤٤

२९. अर्थात नेता प्रजा आणि धर्म प्रमुख व त्यांचे अनुयायी सर्वच आपापल्या मार्गभ्रष्टतेस जबाबदार होते. यास्तव अजाब भोगण्यात सर्वच सहभागी राहतील.

लोक देखील निरापराध नाही. ते का म्हणून डोळे मिटून मार्गभ्रष्ट नेते व धर्म प्रमुखांच्या मागे चालत राहीलेत. आणि ज्याअर्थी त्यांच्यामागे चालत राहीले तेव्हा ज्या खाईत ते पडतील त्याच खाईत त्यांना ही पडावे लागेल.

३०. संकेत मक्का च्या काफीरां कडे आहे की आम्ही या अपराध्यांना ही जहन्नमची शिक्षा देऊ.

३१. अल्लाहच्या पैगंबरांना ते वेडसर कवी म्हणत.

३२. म्हणजे कुरआनाचा पैगंबर सत्य घेऊन आला होता आणि त्याची शिकवण पूर्वी होऊन गेलेल्या पैगंबरांच्या शिकवणीहून भिन्न नव्हती. जेणेकरुन त्यांच्या नकाराला काही कारण असते. किंबहुना त्याने आपल्या पूर्वीच्या पैगंबरांच्या सत्यते विषयी ही ऐलान केले आणि त्यांची शिकवण देखील त्यांच्या शिकवणीशी अगदी सुसंगत होती. तसेच ती भाकिते त्यांच्या बाबत खरी ठरली होती जी पूर्वीच्या पैगंबरांनी त्यांच्या विषयी निवेदिली होती.

३३. म्हणजे तुमच्यावर कसलाही अतिरेक केला जाणार नाही. किंबहुना तुमच्या आचरणाचा यथायोग्य मोबदला दिला जाईल.

३४. 'विशिष्ट दासा' शी अभिप्रेत ते लोक होत ज्यांना सर्वश्रेष्ठ अल्लाहने आपल्या दास्यत्वा साठी व उपासनेसाठी निवडले, त्यांच्यावर सैतानाचा एक ही वार चालू शकला नाही आणि ते अल्लाहने दिलेल्या सुबुद्धि मुळे त्याचेच होऊन राहीले. असे लोक कियामतीच्या दिवशी ईश शिक्षे पासून सुरक्षित राहतील. केवळ ईश शिक्षे पासून सुरक्षित राहणार नाहीत,तर पुढे दिल्या जाणाऱ्या निवेदनानुसार अति मौल्यावान ईश देणग्यांनी उपकृत केले जातील.

स्पष्ट व्हावे की या ईश देणग्यांचे वचन नामधारी मुसलमानांना दिले गेले नाही, तर अशा लोकांना दिले गेले आहे जे आपल्या ईमान व आचरणाने खरोखर अल्लाहचे दास ठरतील.

३५. म्हणजे त्यांना आपल्या उपजिविकेची काहीच काळजी करावी लागणार नाही, किंबहुना त्यांना हे समाधान राहील की त्यांच्या करीता उपजिविका निर्धारीत आहे जी त्यांना सदैव लाभत राहील.

३६. मेवयांचा उल्लेख या ठिकांणी उदाहरणा दाखल केला गेला आहे, अन्यथा इतर स्थानी खाण्याचा अन्य उत्कृष्ट वस्तूंचा ही उल्लेख केला गेला आहे. वास्तविक जन्नत मध्ये शरीर स्वास्था करीता व जिवंत राहण्या करीता खाद्य पदार्थांची गरज राहणार नाही कारण त्यांना अशा प्रकारचे शरीर लाभेल ज्यात कसलेही व्यंग निर्माण होणार नाही. त्या ठिकाणी खाणे पिणे स्वाद व किंचित कैफ प्राप्त करण्यासाठी असेल. म्हणूनच मेवयांचा उल्लेख विशेषत्वाने केला गेला आहे.

३७. म्हणजे त्यांना फक्त खाण्या पिण्याच्याच वस्तु पुरविल्या जाणार नाहीत. तर मान प्रतिष्ठा ही लाभेल.

३८. जन्नत मध्ये बसण्या करीता राजेशाही आसने असतील आणि जन्नत निवासी एकमेकांसमोर अशा प्रकारे बसतील की जणू प्रेम सलोख्याची बैठक आहे.

४५. प्रवाहित मद्याचे प्याले यांच्या दरम्यान (सर्वत्र) फिरतील.

يُطَافُ عَلَيْهِم بِكَأْسٍ مِّن مَّعِينٍ ﴿٤٥﴾

४६. स्वच्छ निर्मळ. पिणाऱ्या करीता फारच चवदार.

بَيْضَاءَ لَذَّةٍ لِّلشَّارِبِينَ ﴿٤٦﴾

४७. ना यात काही हानी होईल आणि ना यामुळे त्यांची बुद्धि भ्रमिष्ट होईल.[३९]

لَا فِيهَا غَوْلٌ وَلَا هُمْ عَنْهَا يُنزَفُونَ ﴿٤٧﴾

४८. आणि यांच्या जवळ नजर खाली ठेवणाऱ्या व सुंदर डोळे असणाऱ्या स्त्रीया असतील.[४०]

وَعِندَهُمْ قَاصِرَاتُ الطَّرْفِ عِينٌ ﴿٤٨﴾

४९. जणू अंडी होत लपविलेली.[४१]

كَأَنَّهُنَّ بَيْضٌ مَّكْنُونٌ ﴿٤٩﴾

५०. मग ते एकमेकां कडे लक्ष देऊन क्षेम कुशल विचारतील.

فَأَقْبَلَ بَعْضُهُمْ عَلَىٰ بَعْضٍ يَتَسَاءَلُونَ ﴿٥٠﴾

५१. यांच्या पैकी एक जण म्हणेल, माझा एक सोबती होता.

قَالَ قَائِلٌ مِّنْهُمْ إِنِّي كَانَ لِي قَرِينٌ ﴿٥١﴾

५२. जो म्हणत असे, काय तुम्ही देखील सत्य समर्थन करणाऱ्या पैकी आहात? [४२]

يَقُولُ أَإِنَّكَ لَمِنَ الْمُصَدِّقِينَ ﴿٥٢﴾

५३. काय जेव्हा आम्ही मरण पावू आणि माती व हाडे बनून राहू तेव्हा आम्हाला (उठवून) मोबदला दिला जाईल?

أَإِذَا مِتْنَا وَكُنَّا تُرَابًا وَعِظَامًا أَإِنَّا لَمَدِينُونَ ﴿٥٣﴾

५४. फर्माविले जाईल काय तुम्ही त्याला डोकावून पाहू इच्छिता?[४३]

قَالَ هَلْ أَنتُم مُّطَّلِعُونَ ﴿٥٤﴾

५५. तो डोकाविल आणि पाहिल की तो जहन्नमच्या मध्य भागी आहे.[४४]

فَاطَّلَعَ فَرَآهُ فِي سَوَاءِ الْجَحِيمِ ﴿٥٥﴾

५६. तो म्हणेल, अल्लाह शपथ तू तर माझा सर्वनाश च करुन टाकणार होता.

قَالَ تَاللَّهِ إِن كِدتَّ لَتُرْدِينِ ﴿٥٦﴾

३९. अर्थात जन्नत चे मद्य जगातल्या मद्यापेक्षा अगदी वेगळे असेल ना त्यामुळे डोके दुखी होईल ना कोणत्याही प्रकारची शारीरिक हानी होईल आणि ना बुद्धि वरील ताबा जाईल. ते प्रत्येक प्रकारच्या वाईट गोष्टी पासून मुक्त, स्वच्छ निर्मळ आणि अतिशय स्वादीष्ट मद्य असेल. जन्नतच्या पेयास 'मद्य' या अर्थाने अशासाठी घेतले गेले आहे की त्याने एक विशेष प्रकारचा कैफ व स्वाद मिळेल ज्याच्या पुढे जगातील मद्य निकृष्ट आहे. तात्पर्य नावापुरते दोघांत साम्य जरुर आहे, परंतु आपले स्वरुप व कैफ (नशा) निर्माण करण्याच्या दृष्टीने दोघांत जमीन अस्मानाचे अंतर आहे.

४०. म्हणजे त्यांच्या साथीला अशा पत्न्या असतील ज्या लज्जा संकोचाने नजर खाली केलेल्या (अधोमुख) असतील ''अैन'' चा अर्थ टपोरे डोळे बाळगणाऱ्या असा आहे. जे सौंदर्याचे लक्षण होय.

४१. त्यांच्या श्वेत वर्ण व त्यांचे सुरक्षित आणि पडद्याआड असण्यास अंडयांची उपमा दिली गेली आहे, ज्यांना पक्ष्यांनी आपल्या पिसाऱ्या खाली लपवून ठेवले असावे. अरब देशाच्या निरक्षर काबे अमराउल कैस ने देखील पडद्यात राहणाऱ्या कुमारीकां करीता- وَبَيْضَةِ خِدْرٍ لَا يُرَامُ خِبَاءُهَا हा शब्द प्रयोग केला आहे.

४२. म्हणजे काय तुम्ही कियामत व दुसऱ्यांदा लाभणाऱ्या जीवनावर विश्वास राखता?

४३. त्याची गोष्ट अजून पूर्ण झाली नसेल की अल्लाह तआला फर्माविल, काय तुम्ही त्याला डोकावून पाहू इच्छिता. जर बघू इच्छित असाल तर तुम्हा सर्वांना ही संधी मिळेल.

४४. तो मनुष्य डोकावून पाहताच त्याला आपला जगातील साथी जहन्नम च्या मध्यभागी दिसून येईल. यावरुन असे दिसते की जन्नत वासी जर जहन्नमच्या लोकांना पाहू इच्छितील तर सहज़गत्या पाहू शकतील. त्या करीता दुर्बिण वगैरे कसल्याही साधनाची गरज भासणार नाही.

५७. जर माझ्या पालन कर्त्याची कृपा नसती तर मी देखील त्या लोकां पैकी असतो, ज्यांना पकडून आणले गेले आहे.[४५]

وَلَوْلَا نِعْمَةُ رَبِّي لَكُنتُ مِنَ الْمُحْضَرِينَ ﴿٥٧﴾

५८. काय ही गोष्ट नव्हे की आता आम्ही मरणार नाहीत ?[४६]

أَفَمَا نَحْنُ بِمَيِّتِينَ ﴿٥٨﴾

५९. तर पहिला मृत्यु होता जो आला [४७] आणि ना आम्हाला एखादा अजाब (ईश-शिक्षा) दिला जाईल. [४८]

إِلَّا مَوْتَتَنَا الْأُولَىٰ وَمَا نَحْنُ بِمُعَذَّبِينَ ﴿٥٩﴾

६०. नि:संशय हीच मोठी सफलता होय.[४९]

إِنَّ هَٰذَا لَهُوَ الْفَوْزُ الْعَظِيمُ ﴿٦٠﴾

६१. अशाच सफलते करीता आचरण करणाऱ्यांनी आचरण केले पाहीजे.[५०]

لِمِثْلِ هَٰذَا فَلْيَعْمَلِ الْعَامِلُونَ ﴿٦١﴾

६२. हे आतिथ्य अधिक चांगले कि जक्कूम चे (कोटेरी) झाड ?[५१]

أَذَٰلِكَ خَيْرٌ نُّزُلًا أَمْ شَجَرَةُ الزَّقُّومِ ﴿٦٢﴾

६३. आम्ही यास अत्याचारीं करीता उपद्रव बनविले आहे .[५२]

إِنَّا جَعَلْنَاهَا فِتْنَةً لِّلظَّالِمِينَ ﴿٦٣﴾

६४. ते असे झाड आहे जे जहन्नमच्या तळा पासून उगते. [५३]

إِنَّهَا شَجَرَةٌ تَخْرُجُ فِي أَصْلِ الْجَحِيمِ ﴿٦٤﴾

६५. त्याचे (फळांचे) घोस असे आहेत जणू सैतानाची मुंडकी.[५४]

طَلْعُهَا كَأَنَّهُ رُءُوسُ الشَّيَاطِينِ ﴿٦٥﴾

६६. ते याला खातील आणि याने उदर भरण करतील.[५५]

فَإِنَّهُمْ لَآكِلُونَ مِنْهَا فَمَالِئُونَ مِنْهَا الْبُطُونَ ﴿٦٦﴾

६७. मग यावर त्यांना प्यायला गरम पाणी दिले जाईल.[५६]

ثُمَّ إِنَّ لَهُمْ عَلَيْهَا لَشَوْبًا مِّنْ حَمِيمٍ ﴿٦٧﴾

६८. मग त्यांचे परतणे जहन्नमच्या आगी कडे होईल.[५७]

ثُمَّ إِنَّ مَرْجِعَهُمْ لَإِلَى الْجَحِيمِ ﴿٦٨﴾

४५. तो जन्नत मधील मनुष्य अल्लाहशी कृतज्ञता व्यक्त करील की हे अल्लाहच्याच कृपेने झाले की मी आपल्या साथीदाराच्या बहकविण्यास बळी पडलो नाही. भविष्यात उद्भवणाऱ्या या घटनेचे सर्वश्रेष्ठ अल्लाह ने अशासाठी निवेदन केले आहे की प्रत्येक माणसाने आपल्या साथीदाराच्या बाबतीत सावधगिरी बाळगावी. तो जर आखिरतचा इन्कार करणारा असेल तर त्याच्या बहकविण्यात येऊ नये.

४६. मग तो जन्नती मनुष्य बैठकीतल्या लोकांना संबोधून म्हणेल की काय ही सत्य घटना ! वस्तुस्थिती नव्हे की जन्नत मध्ये आम्हाला निरंतर जीवन लाभलेले आहे. आणि आता मरणाशी कधीही गाठ पडणार नाही अशा प्रकारे प्रश्न रुपाने तो आपला विश्वास व्यक्त करील.

४७. म्हणजे जगात आम्हाला जे मरण लाभले ते शेवटचेच होते.

४८. 'जन्नत' सर्वश्रेष्ठ अल्लाहचे सदैव कालीन बक्षीस असेल, म्हणून अजाब व दु:ख यातनांचा प्रश्नच उद्भवत नाही.

४९. अर्थात अशी सफलता की त्याहून मोठया अन्य कोणत्याही सफलते ची कल्पना केली जाऊ शकत नाही.

५०. त्या जन्नती माणसाचे निवेदन वर संपले आता सर्वश्रेष्ठ अल्लाहतर्फे लोकांना हे प्रोत्साहन होय की त्यांनी हीच सफलता प्राप्त करण्यासाठी प्रयत्न करावा, जी त्यांना जन्नत कडे नेणारी आहे.

५१. जक्कूम अतिशय कडू व विषाक्त झाडाचे नाव आहे जे अरबस्तानात तहामा च्या इलाक्यात आढळून येत होते. जहन्नम मध्ये जे अतिशय कडवट व विषारी फळ खायला मिळेल त्याची थोडीशी कल्पना जक्कूमच्या झाडावरुन केली जाऊ शकते.

५२. म्हणजे जक्कूम चे झाड अत्याचारी लोकांकरीता कसोटीचे कारण होय. वास्तविक त्याच्या केवळ कल्पनेनेच यांनी भयकंपित व्हायला हवे. परंतु ते थट्टा उडवतील की काय कल्पना आहे आगीत झाड उगण्याची!

५३. अल्लाहच्या सामर्थ्या बाहेर ची गोष्ट नव्हे की त्याने जहन्नम मध्ये झाड निर्माण करावे आणि त्या संबंधी जो खुलासा या आयतींमध्ये दिला गेला आहे त्यावरुन विश्वास आणखी बाळावतो जे झाड जहन्नमच्या अगदी तळापासून निघत असावे ते किती भयंकर असेल व ते खाणाऱ्यांची काय दशा होईल!

५४. सैतानाला माणसाने पाहीले नसेल तरी त्याची भयंकर कल्पना मनात आहे. त्या दृष्टीने जक्कूमच्या घोसांना सैतानाच्या मुंडक्यांची उपमा दिली गेली आहे. अर्थात अतिशय घृणास्पद व तिरस्करणीय असतील.

५५. जहन्नम मध्ये राहणारे जेव्हा भूकेने व्याकूळ होतील, तेव्हा त्यांना आपले पोट जक्कूमच्या कडू विषाक्त फळांनी भरावे लागेल. हे खरे पाहता त्याच्या दुराचाराचीच फळे असतील, जी त्यांना खायला मिळतील.

५६. जक्कूमचे फळ खाल्लाया नंतर पिण्या करीता त्यांना गरम पाणी मिळेल.

५७. जहन्नम अतिविशाल असेल आणि तिचे विविध भाग वेगवेगळ्या शिक्षे करीता खास करुन असतील. अपराध्यांना जहन्नमच्या एकाच हिश्श्यात खाण्याकरीता जक्कुम व पिण्या करीता गरम पाणी दिले जाईल त्यानंतर जहन्नमच्या त्या भागात जिथे प्रखरपणे आग धगधगत असेल, ज्याचे नाव 'जहीम' आहे त्याकडे परतावे लागेल.

६९. त्यांना आपले वाड वडील मार्गभ्रष्ट (असल्याचे) आढळून आले.

إِنَّهُمْ أَلْفَوْا آبَاءَهُمْ ضَالِّينَ ﴿٦٩﴾

७०. आणि हे त्यांच्याच पदचिन्हांवर धावत आहेत.[५८]

فَهُمْ عَلَىٰ آثَارِهِمْ يُهْرَعُونَ ﴿٧٠﴾

७१. यांच्या पूर्वी होऊन गेलेल्या लोकांमध्ये ही बहुतेक लोक मार्गभ्रष्ट झाले होते.[५९]

وَلَقَدْ ضَلَّ قَبْلَهُمْ أَكْثَرُ الْأَوَّلِينَ ﴿٧١﴾

७२. आणि आम्ही त्यांच्यात खबरदार करणारे पैगंबर पाठविले होते.

وَلَقَدْ أَرْسَلْنَا فِيهِمْ مُنْذِرِينَ ﴿٧٢﴾

७३. तर पहा त्या लोकांचा काय शेवट झाला ज्यांना खबरदार केले गेले होते.

فَانْظُرْ كَيْفَ كَانَ عَاقِبَةُ الْمُنْذَرِينَ ﴿٧٣﴾

७४. या परिणति पासून अल्लाहचे विशिष्ट दास च सुरक्षित राहीले.[६०]

إِلَّا عِبَادَ اللَّهِ الْمُخْلَصِينَ ﴿٧٤﴾

७५. आणि नूह [६१] ने आम्हाला साद घातली होती, तर किती चांगले आहोत आम्ही साद ला प्रतिसाद देणारे. [६२]

وَلَقَدْ نَادَانَا نُوحٌ فَلَنِعْمَ الْمُجِيبُونَ ﴿٧٥﴾

७६. आम्ही त्याला व त्याच्या संबंधितांना सक्त यातने पासून मुक्ति दिली.[६३]

وَنَجَّيْنَاهُ وَأَهْلَهُ مِنَ الْكَرْبِ الْعَظِيمِ ﴿٧٦﴾

७७. आणि त्याच्या वंशास शिल्लक ठेवले.[६४]

وَجَعَلْنَا ذُرِّيَّتَهُ هُمُ الْبَاقِينَ ﴿٧٧﴾

७८. आणि नंतरच्या लोकांमध्ये त्याच्या साठी सुस्मरण राखले.[६५]

وَتَرَكْنَا عَلَيْهِ فِي الْآخِرِينَ ﴿٧٨﴾

७९. सलाम (शांती) आहे नूहवर इहलोक वासी मध्ये. [६६]

سَلَامٌ عَلَىٰ نُوحٍ فِي الْعَالَمِينَ ﴿٧٩﴾

८०. आम्ही सदाचारी लोकांना अशाच प्रकारे मोबदला देत असतो. [६७]

إِنَّا كَذَٰلِكَ نَجْزِي الْمُحْسِنِينَ ﴿٨٠﴾

५८. ही गोष्ट मक्केच्या अनेकेश्वरवाद्या बाबत सांगितली जात आहे म्हणजे हे की यांचे पूर्वज पथभ्रष्ट होते तरी ही त्यांच्या अनुसरणाची धुंद यांना एवढी चढली की त्यांच्याच पावलांवर पाऊल ठेवून चालत जात आहेत. वाडवडीलांच्या धर्माचे अनुसरण करण्याची धुंद एवढी असते की माणूस विवेक बुद्धिचा वापर करीत नाही.

५९. लोकांच्या मार्गभ्रष्टतेचे मूळ कारण हेच की ते असे समजतात की जो धर्म आणि संस्कृती प्राचीन काळापासून चालत आली आहे ती अगदी योग्य आहे व तिलाच चिटकून राहायला हवे. याच आधारावर धार्मिक सम्प्रदाय अस्तित्वात आलेत. वस्तुतः भुतकाळात देखील फार मोठया प्रमाणात माणसे मार्गभ्रष्ट होती. ना त्यांच्या जवळ सत्याचे प्रमाण होते आणि ना यांच्या जवळ आहे. सत्याचा प्रकाश तर प्रमाणांच्या माध्यमाने प्राप्त होतो; अंधानुसरणाने नव्हे.

६०. स्पष्टीकरणा साठी पहा टीप क्र. ३४

६१. हजरत नूह यांच्या वृत्तांताचा हिस्सा या ठिकाणी सादर केला गेला आहे ज्यावरुन हे स्पष्ट होते की कशा रीतीने सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्यांना त्या दुःख यातने पासून मुक्ति दिली जी त्यांना त्यांच्या जन समूहा तर्फे सत्य विरोधार्थ दिली जात होती आणि त्या अजाब (ईश-शिक्षे) पासून कशा प्रकारे वाचविले ज्या त्यांच्या जनसमूहावर शेवटी अवतरली तसेच त्यांना कशा प्रकारे सर्वश्रेष्ठ अल्लाहने ईश देणग्यांनी उपकृत केले. हजरत नूह यांच्या संदर्भात विवरणा साठी पहा सूरह अअराफ टीप क्र. ९५.

६२. संकेत आहे त्या दुवा (प्रार्थने) कडे जी हजरत नूह यांनी आपल्या जन समूहात दीर्घ काळ घालविल्या नंतर व त्यांच्यावर प्रमाण प्रस्थापित केल्या नंतर केली होती. ज्याचा उल्लेख सूरह कमर आयत क्र. १० मध्ये केला गेला आहे. अल्लाहने त्यांची दुवा कबूल केली आणि ज्या प्रकारे कबूल केली ते या गोष्टीचे स्पष्ट उदाहरण आहे की जेव्हा त्याचे खास दास त्याला पुकारतात तेव्हा तो न केवळ त्यांचे आर्जव च ऐकत नाही तर अधिक चांगल्या प्रकारे प्रत्युत्तर ही देतो. यात सत्य मार्गात संकेट झेलणाऱ्या करीता सांत्वनाची पूर्ण सामग्री आहे.

६३. संबंधितांशी अभिप्रेत ते लोक होत ज्यांनी हजरत नूह वर ईमान बाळगले होते आणि सक्त यातनांशी अभिप्रेत त्या यातना होत ज्या काफिरांकडून त्यांना दिल्या जात होत्या. तसेच ते भयंकर वादळ देखील जे या जनसमूहावर ईशशिक्षेच्या रुपाने अवतरले.

६४. महाभयंकर वादळाने साऱ्या मानव जाती चा नायनाट करुन टाकला होता फक्त तेच लोक वाचविले गेले होते, जे हजरत नूह यांच्या सोबत नौकेत स्वार झाले होते व ज्यांनी ईमान बाळगले होते. यात बहुतेक त्यांच्या घरातले सदस्य ईमान बाळगले होते आणि नंतर हजरत नूह यांच्या संतती पासून, जे वाचविले गेले होते, मानव वंश वृद्धिंगत होत राहीले मग पुढे जन समूह अस्तित्वात आले. बायबल च्या निवेदनानुसार हजरत नूह यांच्या साम, हाम याफस या तीन मुलां पासून मानव वंश क्रम सुरु झाला. साम पासून अरब, रोम वगैरे सॅमेटीक (Sametic) जनसमूह अस्तित्वात आले. हाम पासून हबशी (निग्रो),मिसरी (इजिप्शियन) इत्यादि आणि याफस पासून तुर्क, मुगल आणि याजूज माजूज इत्यादि. अल्लाह सर्वज्ञानी आहे.

६५. हजरत नूह यांना सर्वश्रेष्ठ अल्लाह तर्फे जगात जो मोबदला मिळाला, त्यापैकी एक तर तो होय ज्याचा उल्लेख यापूर्वीच्या आयतीत केला गेला म्हणजे त्यांच्याच संततीद्वारे मानव वंश क्रम चालला आणि दुसरा मोबदला असा की नंतरच्या लोकांमध्ये त्यांचे चांगले स्मरण बाकी राखले गेले. विशेषतः कुरआनावर ईमान राखणारे ना केवळ सुवचनांनी त्यांचे स्मरण करतात, तर कुरआनात अनेक ठिकाणी ज्या वैभवासह त्यांचा उल्लेख केला गेला आहे तो वारंवार जिभेवर येतो व ते त्यांच्याविषयी श्रद्धा व प्रेम व्यक्त करीत राहतात.

६६. हा तिसरा मोबदला होय जो त्यांना जगात लाभला. तो असा की त्यांना शांती सुबत्तेने उपकृत केले गेले. त्यांचे शत्रू त्यांना काहीच त्रास देवू शकले नाहीत. जगातील मोठ मोठे जन समूह यहूदी, ख्रिश्चन व मुसलमान त्यांचा आदर करतात आणि ईमान बाळगणाऱ्यांच्या अंतःकरणातून त्यांच्याकरीता प्रार्थना निघतात आणि त्यांच्यावर ते सलाम पाठवितात.

६७. म्हणजे जे लोक सदाचारी असतात त्यांना सर्वश्रेष्ठ अल्लाह त्यांच्या आचरणानुसार जगातही चांगला मोबदला प्रदान करतो.

८१. निःसंशय तो आमच्या मोमीन (ईमान बाळगणाऱ्या ) दासांपैकी होता.

إِنَّهُ مِنْ عِبَادِنَا الْمُؤْمِنِينَ ﴿٨١﴾

८२. पण इतरांना आम्ही बुडवून टाकले. [६८]

ثُمَّ أَغْرَقْنَا الْآخَرِينَ ﴿٨٢﴾

८३. आणि त्याच्याच जमाती पैकी इब्राहीम होता.[६९]

وَإِنَّ مِنْ شِيعَتِهِ لَإِبْرَاهِيمَ ﴿٨٣﴾

८४. जेव्हा तो आपल्या पालन कर्त्या समोर शुद्ध अंतःकरणा सह आला.[७०]

إِذْ جَاءَ رَبَّهُ بِقَلْبٍ سَلِيمٍ ﴿٨٤﴾

८५. जेव्हा तो आपल्या पित्यास आणि आपल्या जन-समूहास म्हणाला कि ही तुम्ही कशाची भक्ती करता? [७१]

إِذْ قَالَ لِأَبِيهِ وَقَوْمِهِ مَاذَا تَعْبُدُونَ ﴿٨٥﴾

८६. काय अल्लाहला सोडून काल्पनिक उपास्ये इच्छिता ?[७२]

أَئِفْكًا آلِهَةً دُونَ اللَّهِ تُرِيدُونَ ﴿٨٦﴾

८७. आणि सर्व विश्वांच्या पालन कर्त्या विषयी तुमची काय कल्पना आहे ?[७३]

فَمَا ظَنُّكُمْ بِرَبِّ الْعَالَمِينَ ﴿٨٧﴾

८८. मग त्याने एक नजर ताऱ्यांवर टाकली.[७४]

فَنَظَرَ نَظْرَةً فِي النُّجُومِ ﴿٨٨﴾

८९. आणि म्हणला माझी तब्येत नादुरुस्त आहे. [७५]

فَقَالَ إِنِّي سَقِيمٌ ﴿٨٩﴾

९०. तर ते लोक त्याला सोडून चालले गेले.

فَتَوَلَّوْا عَنْهُ مُدْبِرِينَ ﴿٩٠﴾

९१. मग तो हळूच त्यांच्या उपास्यां जवळ गेला व म्हणाला तुम्ही लोक खात नाहीत ![७६]

فَرَاغَ إِلَىٰ آلِهَتِهِمْ فَقَالَ أَلَا تَأْكُلُونَ ﴿٩١﴾

९२. तुम्हाला काय झाले, बोलत सुद्धा नाहीत ![७७]

مَا لَكُمْ لَا تَنْطِقُونَ ﴿٩٢﴾

९३. मग त्यांच्यावर तुटून पडला आणि उजव्या हाताने प्रहार केले.

فَرَاغَ عَلَيْهِمْ ضَرْبًا بِالْيَمِينِ ﴿٩٣﴾

६८. अर्थात ज्यांनी कुफ्र केले होते त्या सर्वांना बुडविले. अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह अअराफ टीप. क्र. १०३.

६९. अर्थात हजरत इब्राहीम हजरत नूह च्याच धर्म व समाजाशी संबंधित होते. जो धर्म हजरत नूह यांचा होता तोच हजरत इब्राहीम यांचा ही होता आणि त्याच समुदायातील सदस्य होते जो हजरत नूह यांचा अनुयायी होता.

७०. म्हणजे हजरत इब्राहीम यांनी स्वत:ला अल्लाह समोर अशा प्रकारे सादर केले की त्यांचे अंत:करण शिर्क (अनेकेश्वर वाद) व गुन्हयां पासून मुक्त होते. स्वच्छ शुद्ध होते. प्रकृति ने जे निकोप व निरोगी मन त्यांना प्रदान केले होते, ती निकोपता त्यांनी कायम राखली आणि जाण येताच त्यांनी आपल्या पालनकर्त्या अल्लाहचे दास्यत्व पत्करले.

७१. ही त्या वेळची गोष्ट होय जेव्हा हजरत इब्राहीम पैगंबर पदाने सम्मानित केले गेले होते. त्यांचे पिता आजर मूर्तिपूजक होते व त्यांचा जन समूह देखील मूर्ति पूजा करणारा होता अर्थात मूर्तिपूजा सर्वात वाईट प्रकारचे शिर्क, उघड मार्गभ्रष्टता, आणि घोर अपराध आहे. म्हणून आपल्या आवाहनाचा आरंभ त्यांनी अशा प्रकारे केला की मूर्तिपूजेवरच घाव घातला. त्यांनी त्यांना वैचारीक आवाहन केले की ज्या वस्तूंची तुम्ही पूजा अर्चा करता, काय ते खरोखर पूज्य आहेत व उपासनेस योग्य आहेत?

७२. केवळ अल्लाहच खराखुरा उपास्य होय त्याखेरीज ज्याला देखील उपास्य बनविले जावे वस्तुस्थिच्या विपरीत व मनाने घडविलेले उपास्य ठरेल.

७३. अनेकविध उपास्यांची श्रद्धा मनुष्य या कल्पने पोटी अंगिकारतो सृष्टी नियंता ना तर प्रत्यक्ष पणे प्रार्थना ऐकतो आणि ना तक्रार निवारण करतो आणि ना सृष्टी-व्यवस्था तो एकटा सांभाळत आहे व ना तो एकटाच भक्ती उपासनेस पात्र आहे, किंबहुना ईशत्वास त्याने विभागून ठेवले आहे या कारणास्तव इतर ही उपासनेस योग्य आहेत. अर्थात सर्व विश्वांच्या पालन कर्त्या विषयी हा अगदी गैरसमज आहे आणि जो शिर्क व मूर्तिपूजा अंगिकारतो तो अपरिहार्य पणे सर्व विश्वांच्या पालन कर्त्याची अवहेलना करतो व त्याच्या विषयी गैरसमज बाळगतो. हीच जाणीव देण्या करीता हजरत इब्राहीम यांनी मूर्तिपूजकांना प्रश्न केला कि, सांगा शेवटी सृष्टीच्या पालनकर्त्या विषयी तुमची कल्पना कोणती?

७४. ही त्या वेळची गोष्ट होय. जेव्हा लोक संभवत: एखाद्या यात्रेत सहभागी होण्याकरीता गावाबाहेर जात होत. रात्र झाली व तारे दिसू लागले. त्यांनी हजरत इब्राहीम यानां ही सोबत येण्यास सांगितले. हजरत इब्राहीम यांनी पाहीले की ताऱ्यांना ईश्वर मानून त्यांच्या मूर्तीची पूजा करणाऱ्या तारा पूजकांना धडा शिकविण्याची ही चांगली संधी आहे. प्रथम तर त्यांनी ताऱ्यांवर एक विचार पूर्ण दृष्टिक्षेप टाकला की हे आहेत यांचे ईश्वर ज्यांचे प्रतिनिधित्व यांच्या कोरलेल्या मूर्त्या करतात! यांच्यात ईशत्वाचा असा कोणता गुणधर्म आहे? आश्चर्य वाटते या लोकांच्या अकले बद्दल त्यानंतर त्यांनी सोबत जाण्याबाबत सबब मांडली जिचा उल्लेख पुढे आला आहे.

७५. ही सबब हजरत इब्राहीम यांनी यासाठी ही मांडली होती की खरोखर त्यांची तब्येत ठिक नव्हती आणि रात्रीच्या वेळी बाहेर प्रवासा करीता जाण्यात त्यांना त्रास होऊ शकत होता आणि यासाठी ही की लोकांच्या अनुपस्थितीचा लाभ घेऊन ते मूर्तिच्या विरुद्ध कारवायी करु इच्छित होते अर्थात ही कारवाई निवांतपणे एकटयानेच केली जाऊ शकत होती. म्हणून आपला मूळ हेतु जाहीर न करता त्यांनी तब्येत ठीक नसल्याची सबब मांडण्यात समाधान बाळगले. परंतु काही भाष्याकारांनी या सबबी ला अवास्तव जाणून त्याचे मोठे विचित्र स्पष्टीकरण दिले आहे. त्याचे समर्थन म्हणून ते एक हदीस वचन सादर करतात ज्यात निवेदिले गेले आहे की हजरत इब्राहीम यांनी तीन प्रसंगी चुकीच्या निवेदनाचा आश्रय घेतला त्या पैकी एक प्रसंग हा होय जेव्हा ते म्हणाले إِنِّي سَقِيمٌ ''माझी तब्येत नादुरुस्त आहे'' (बुखारी किताबुल अम्बिया) या हदीस वचना वर विवरणात्मक चर्चा आम्ही सूरह अम्बियाच्या स्पष्टीकरणात्मक टीप क्र.८०मध्ये केलेले आहे. जिचा खुलासा असा की या हदीस वचनास सकारण उचित हदीस वचन मानले जाऊ शकत नाही. आणि हजरत इब्राहीम यांच्या आजारपणाच्या सबबीस खोटे समजण्यास काही एक कारण नाही. ही गोष्ट त्याच स्थितीत म्हटली जाऊ शकते जेव्हा हे सिद्ध व्हावे की त्या वेळी त्यांची प्रकृति विघडलेली नव्हती. मग जेव्हाहे सिद्ध होत नाही तर त्यांच्या या निवेदनास जे कुरआनात उल्लेखिले गेले आहे वस्तुस्थितीला अनुरुप असेच मानावे लागेल.

७६. लोक गावाबाहेर गेल्यानंतर हजरत इब्राहीम यांना देवळात शिरुन मूर्ति विरोधी कारवाई करण्याचा अवसर मिळाला ते जेव्हा देवळात शिरले तेव्हा मूर्ति समोर नैवद्य वगैरे ठेवलेला पाहीला त्यांनी मूर्तिना संबोधून म्हटले, तुम्ही लोक खात का नाही? वास्तविक हा टोमणा होता त्यांच्या भक्तांवर जे आपल्या दैवतां समोर नैवद्य प्रसाद मांडण्याचा मूर्खपणा करतात.

७७. हा दुसरा टोपणा होता त्यांच्या भक्त गणावर की जे बोलू ही शकत नाही त्यांना या लोकांनी ईश्वर बनवून घेतले!

७८. उजवा हात अधिक सामर्थ्य बाळगतो. हजरत इब्राहीम यांनी सर्व शक्तिनिशी मूर्तिवर प्रहार केले व त्यांना अगदी क्षत विक्षत करुन टाकले. हा किस्सा सविस्तर पणे सूरह अम्बिया मध्ये निवेदिला गेला आहे. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह अम्बिया टीप क्र. ७६

९४. लोक त्याच्या जवळ धावत आले. [७९]

فَأَقْبَلُوٓا إِلَيْهِ يَزِفُّونَ ﴿٩٤﴾

९५. तो म्हणाला, काय तुम्ही लोक स्वत:च कोरुन काढलेल्या वस्तू ची पूजा करता ? [८०]

قَالَ أَتَعْبُدُونَ مَا تَنْحِتُونَ ﴿٩٥﴾

९६. वस्तुतः अल्लाहनेच निर्माण केले आहे तुम्हाला ही आणि त्या वस्तुंना ही ज्या तुम्ही बनविता.[८१]

وَاللَّهُ خَلَقَكُمْ وَمَا تَعْمَلُونَ ﴿٩٦﴾

९७. ते (आपासत) म्हणाले, याच्या करीता एक अग्नि-कुण्ड तयार करा आणि याला धगधगत्या आगीत फेकून द्या.[८२]

قَالُوا ابْنُوا لَهُ بُنْيَانًا فَأَلْقُوهُ فِي الْجَحِيمِ ﴿٩٧﴾

९८. त्यांनी त्याच्याशी एक डाव करण्याचे योजले परंतु आम्ही त्यांना च तोंडघशी पाडले.[८३]

فَأَرَادُوا بِهِ كَيْدًا فَجَعَلْنَاهُمُ الْأَسْفَلِينَ ﴿٩٨﴾

९९. आणि तो म्हणाला मी आपल्या पालन कर्त्याकडे जातो, तो मला मार्ग दर्शन करील.[८४]

وَقَالَ إِنِّي ذَاهِبٌ إِلَىٰ رَبِّي سَيَهْدِينِ ﴿٩٩﴾

१००. हे माझ्या पालन कर्त्या ! मला सदाचारी संतती प्रदान कर.[८५]

رَبِّ هَبْ لِي مِنَ الصَّالِحِينَ ﴿١٠٠﴾

१०१. तेव्हा आम्ही त्यास शांत-गंभीर पुत्राची शुभवार्ता दिली. [८६]

فَبَشَّرْنَاهُ بِغُلَامٍ حَلِيمٍ ﴿١٠١﴾

१०२. आणि जेव्हा तो मुलगा त्याच्या सोबत धावपळ करण्याच्या वयाप्रत पोहचला [८७] तेव्हा हा म्हणाला, हे माझ्या पुत्रा ! मी स्वप्नात असे पाहतो की तुला जबह करीत आहे,[८८] तेव्हा तुझे काय मत आहे.[८९]तो म्हणाला, हे पिता ! करुन टाका, ज्याचा आदेश आपणास दिला जात आहे.अल्लाहने इच्छिल्यास आपण मला सहनशील (असल्याचे) पहाल.[९०]

فَلَمَّا بَلَغَ مَعَهُ السَّعْيَ قَالَ يَا بُنَيَّ إِنِّي أَرَىٰ فِي الْمَنَامِ أَنِّي
أَذْبَحُكَ فَانْظُرْ مَاذَا تَرَىٰ ۚ قَالَ يَا أَبَتِ افْعَلْ مَا تُؤْمَرُ ۖ
سَتَجِدُنِي إِنْ شَاءَ اللَّهُ مِنَ الصَّابِرِينَ ﴿١٠٢﴾

७९. म्हणजे जेव्हा लोक यात्रेहून परतले तेव्हा पाहीले की मूर्तिची ही दशा झाली आहे आणि ज्याअर्थी हजरत इब्राहीम आधीच म्हणाले होते की मी तुमच्या मूर्तिविरुद्ध कारवाई करणार जसे सूरह अंबिया आयत क्र. ५७ मध्ये निवेदिले गेले आहे. म्हणून लोक धावत धावत यांच्या जवळ आले, हे जाणण्या करीता की खरोखर यांनीच हे कृत्य केले आहे काय?

८०. हजरत इब्राहीम यांनी त्यांना जे उत्तर दिले ते सूरह अम्बिया मध्ये सविस्तर पणे निवेदिले गेले आहे. या आयतींमध्ये त्यांच्या उत्तराचा एक भाग प्रस्तुत केला गेला आहे.

हजरत इब्राहीम यांनी मूर्तिच्या अवास्तवतेस स्पष्ट करण्याकरीता हा प्रश्न कायम केला की आपल्या हातांनी घडविलेल्या वस्तुंना पुजण्यात काय अर्थ? या मूर्तिपैकी कोणी ही निर्माता नाही कारण त्यांना तुम्हीच घडविले आहे मग ते ईश्वर आणि उपासनीय कसे ठरले?

८१. म्हणजे निर्माता तर अल्लाह आहे; तुमचा देखील आणि या दगड, माती, लाकडाचा देखील ज्यापासून तुम्ही मूर्ती तयार करता. यावरुन अल्लाह हाच खराखुरा उपास्य आहे ही अगदी स्पष्ट हकीगत आहे आणि आपल्या हातांनी कोरुन काढलेल्या मूर्तिना उपास्य बनविणे उघड मूर्खपणा होय.

८२. त्यांच्या जवळ हजरत इब्राहीम यांच्या प्रमाण स्वरुप प्रश्नांचे काही एक उत्तर नव्हते आणि धार्मिक पक्षपाता मुळे ते सत्य स्वीकारण्यास ही तयार नव्हते म्हणून हजरत इब्राहीम यांना आगीत टाकण्याचा त्यांनी निर्णय घेतला.

आग्नि कुण्ड बनविण्याचा उद्देश हा राहीला असेल की भिंतीमध्ये आग प्रखरतेने भडकविली जाऊ शकते व त्यातून त्यांना बाहेर येण्याचीही संधी लाभणार नाही, तसेच त्यांच्या कुटुंबियांच्या नजरे पासून लपवून त्यांना आगीत टाकणे सोपे ठरेल.

८३. त्यांनी हजरत इब्राहीम यांना आगीत झोकून देण्याचा कट रचला होता. परंतु सूरह अंबिया आयत क्र. ६९ मधील निवेदनानुसार सर्वश्रेष्ठ अल्लाहने आगी ला हजरत इब्राहीम करीता थंड केले व ते सुखरुप राहीलेत. अशा प्रकारे त्यांच्या शत्रूंना तोंडघशी पडावे लागले आणि ते नाउमेद झाले.

८४. ज्याअर्थी जनसमूहावर अल्लाहचे प्रमाण पूर्णत: प्रस्थापित झाले होते आणि लोक त्यांच्या जीवावर उठले होते. यास्तव हजरत इब्राहीम यांनी देश त्याग करण्याचा निर्णय घेतला. या देश त्यागाच्या तपशिला करीता पहा सूरह अन्कबूत टीप क्र. ४८

८५. हजरत इब्राहीम इराक हून हिजरत (स्थलांतर) करुन शाम (सिरीया) येथे पोहचले. तिथे त्यांनी सदाचारी संतती करीता प्रार्थना केली. यासाठी की त्यांनी (अपत्यांनी) यांच्या सामर्थ्यात वाढ करावी व धर्माचा प्रसार त्यांच्या करवी व्हावा. सदाचारी संतीती अल्लाहची मोठी देणगी आहे आणि संतती प्राप्ती साठी प्रार्थना करतांना सदाचारी संतती चीच प्रार्थना केली पाहीजे.

८६. अर्थात हजरत इस्माईल यांची जे हजरत इब्राहीम यांचे प्रथम पुत्र होते. स्वभावाने ते अत्याधिक शांत गंभीर होते. ज्यांचा पुरावा त्यांचे अनुपमेय बलीदान होय.

८७. म्हणजे इब्राहीम करीता आधार बनला जेणेकरुन सोबतीला हिंडावे व त्यांच्या कामात मदत करावी.

८८. म्हणजे अल्लाह करीता तुम्हाला कुर्बान करीत आहे. हे स्वप्न एका पैगंबराचे होते ज्यात अल्लाहतर्फे सुप्त संकेत असतात आणि जे सैतानी कुविचारांच्या मिश्रणा पासून अगदी मुक्त असते. म्हणून हजरत इब्राहीम यांनी या स्वप्नाला अल्लाहतर्फे संकेत या अर्थाने जाणले.

स्पष्ट असावे की, स्वप्न बघितल्या वरुन कोणत्याही माणसाने असे पाऊल उचलणे ऊचित नव्हे ज्याविषयी शरीअत अनुमती देत नसेल परंतु पैगंबरांना ज्याअर्थी प्रतिष्ठा प्राप्त अस ते म्हणून त्यांची स्वप्ने देखील खरी ठरतात आणि त्या स्वप्नांची विशेष बाब ही असते की, जर समजा एखादा प्रेषित स्वप्नाचा आशय जाणून घेण्यात चुक करतो, तेव्हा सर्वश्रेष्ट अल्लाह वेळीच सुधारणा करतो.

८९. हजरत इब्राहीम यांनी आपल्या मुलास त्याचे मत अशासाठी विचारले की जबह त्यालाच करायचे होते, तसेच यासाठी ही की त्याच्या संयम व सहनशीलतेचा अंदाज व्हावा.

९०. हे होते मुलाचे उत्तर, ज्याचा एकेक शब्द ईमान व भरवसा एक निष्ठा व प्रामाणिकता, संयम व धैर्य, निर्धार व दृढता व त्याग आणि बलीदानाच्या भावनेने ओतप्रोत होता. या सच्चा निर्धारा नंतर ही इन्शा अल्लाह (अल्लाहने इच्छिले तर) असे म्हणणे अल्लाह वरील भरवशाचे उत्कृष्ट उदाहरण होय.

सूज्ञमुलाच्या या उत्तरावरुन हे ही दिसून येते की त्या वेळी तो केवळ सूज्ञ (जाणता) च झाला नव्हता तर त्यच्या अंगी विवेक ही आला होता.

१०३. मग जेव्हा दोघांनी स्वत:ला (आपल्या पालन कर्त्याच्या) हवाली केले [९१] आणि इब्राहीम ने त्याला कपाळावर पाडले.[९२]

فَلَمَّآ أَسْلَمَا وَتَلَّهُۥ لِلْجَبِينِ ﴿١٠٣﴾

१०४. तेव्हा आम्ही त्याला हाक मारली, हे इब्राहीम [९३]

وَنَٰدَيْنَٰهُ أَن يَٰٓإِبْرَٰهِيمُ ﴿١٠٤﴾

१०५. तुम्ही स्वप्न खरे करुन दाखविले.[९४] आम्ही सत्कर्मी लोकांना अशाच प्रकारे मोबदला देत असतो.[९५]

قَدْ صَدَّقْتَ ٱلرُّءْيَآ ۚ إِنَّا كَذَٰلِكَ نَجْزِى ٱلْمُحْسِنِينَ ﴿١٠٥﴾

१०६. नि:संशय ही एक खुली कसोटी होती.[९६]

إِنَّ هَٰذَا لَهُوَ ٱلْبَلَٰٓؤُا۟ ٱلْمُبِينُ ﴿١٠٦﴾

१०७. आणि आम्ही त्या (मुला) चा जीव वाचविला, एका महान बलिदानाच्या मोबदल्यात.[९७]

وَفَدَيْنَٰهُ بِذِبْحٍ عَظِيمٍ ﴿١٠٧﴾

१०८. आणि आम्ही नंतर च्या लोकांमध्ये त्याचे सुस्मरण बाकी राखले.

وَتَرَكْنَا عَلَيْهِ فِى ٱلْءَاخِرِينَ ﴿١٠٨﴾

१०९. सलाम आहे इब्राहीम वर.

سَلَٰمٌ عَلَىٰٓ إِبْرَٰهِيمَ ﴿١٠٩﴾

११०. अशा प्रकारे आम्ही सत्कर्मी लोकांना मोबदला देतो.

كَذَٰلِكَ نَجْزِى ٱلْمُحْسِنِينَ ﴿١١٠﴾

१११. नि:संशय तो आमच्या मोमीन (ईमान बाळगणाऱ्या ) दासां पैकी होता.

إِنَّهُۥ مِنْ عِبَادِنَا ٱلْمُؤْمِنِينَ ﴿١١١﴾

११२. आणि आम्ही त्याला इसहाकची शुभ वार्ता दिली. एक पैगंबर होईल सदाचारी लोकां पैकी.[९८]

وَبَشَّرْنَٰهُ بِإِسْحَٰقَ نَبِيًّا مِّنَ ٱلصَّٰلِحِينَ ﴿١١٢﴾

११३. आणि आम्ही त्यावर आणि इसहाक वर अनेक (प्रकारची) समृद्धी अवतरीत केली.[९९] आणि या दोघांच्या वंशा पासून सत्कर्मी ही आहेत आणि आपल्या जीवांवर उघड अत्याचार करणारे देखील. [१००]

وَبَٰرَكْنَا عَلَيْهِ وَعَلَىٰٓ إِسْحَٰقَ ۚ وَمِن ذُرِّيَّتِهِمَا مُحْسِنٌ وَظَالِمٌ لِّنَفْسِهِۦ مُبِينٌ ﴿١١٣﴾

९१. मूळ शब्द ''अस्लमा''अर्थात दोघांनी स्वत:ला आपल्या पालन कर्त्याच्या अधीन केले आणि हूं कि चू न करता अल्लाहच्या आदेशाच्या पालना करीता तयार झाले. स्पष्ट झाले की इस्लाम ची हकीगत कसल्याही संरक्षणाविना स्वत:ला अल्लाहच्या हवाली करणे होय. येथपावेतो की जर जीवाचे बलिदान करण्याचा आदेश असेल. तर त्यचेही पालन करण्यात दासाने हय गय करु नये. हजरत इब्राहीम आणि हजरत इस्माईल एका अशाच आदेशाचे पालन करुन, ज्यात त्यांची कठीण परीक्षा होती, इस्लामच्या अत्युच्च शिखरा वर पोहचले.

९२. म्हणजे हजरत इस्माईल यांना जबह करण्या करीता डोके टेकलेल्या स्थितीत झोपवले गेले. शक्यतो याचा हेतु हा राहीला असावा की जबह करतांना चेहरा समोर येऊ नये.

९३. म्हणजे अजून सूरी चालविण्याचा प्रसंग ही आला नव्हता तोच अल्लाहने हजरत इब्राहीम यांना पुकारले व जबह करण्या पासून रोखले.

९४. हजरत इब्राहीम यांनी स्वप्नात आपल्या मुलाला बळी देतांना पाहीले व अल्लाहच्या या संकेताचे पालन करण्यात काहीच कसर बाकी ठेवली नाही किंबहुना जबह (बळी) करण्याचा पुरेपुर इतमाम केला अशा प्रकारे त्यांनी आपले स्वप्न खरे करुन दाखविले. मग जेव्हा गळ्यावर सुरी फिरवली जाणार होती सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्यांना रोखले कारण मूळ हेतु हजरत इस्माईल यांचे रक्त वाहविण्याचा नव्हता, तर अल्लाहला हे बघावयाचे होते की या कठीण परीक्षेत पिता पुत्र खरे उतरतात किंवा नाही आणि जेव्हा ते खरे उतरले तेव्हा अल्लाहने जबह करण्या आधीच त्यांची कुर्बानी कबुल केली यास्तव सूरी फिरविण्याची गरज उरली नव्हती. ही अल्लाहची कृपा होती व त्यांच्या तर्फे केली जाणारी कदर होती.

९५. म्हणजे जे लोक सत्कर्मास आपला परिपाठ बनवितात त्यांना सर्वश्रेष्ठ अल्लाह कठीण कसोटीतून ही सही सलामत बाहेर काढतो आणि मान सन्मानाने उपकृत करतो.

९६. म्हणजे यात काही शंका नाही की ही फार मोठी परीक्षा होती हजरत इब्राहीम यांची परीक्षा या बाबत की ते आपल्या प्रिय व एकुलत्या एक मुलास बळी देण्याकरीता तयार होतात किंवा नाही आणि हजरत इस्माईल यांची परिक्षा या बाबत की ते स्वत:या बलिदाना साठी तयार होतात किंवा नाही.

९७. अर्थात अल्लाह ने त्याच्या प्राणाची भरपाई म्हणून एक मेंढा सादर केला की याला बळी देऊन या कुर्बानीचे महानस्मारक कायम केले जावे. यास्तव हज्ज च्या विधी पैकी एक महत्वाचा विधी कुर्बानी होय जी उंट, गाय, बैल, बकरी, मेंढे व दुंबा यांपैकी कोणत्याही जनावाराची केली जाते. तसेच बकरा-ईद प्रसंगी जगात सर्वच मुसलमान कुर्बानी करतात.

हजरत इब्राहीम यांनी आपल्या मुलाच्या प्राणाची भरपाई म्हणून अल्लाहच्या आदेशानुसार एक मेंढा जबह केला होता. ज्यास सर्वश्रेष्ठ अल्लाहने एक महान कुर्बानी या नात्याने कबूल केले आणि ही कुर्बानी या दृष्टीने ही महान कुर्बानी ठरली की, हजरत इब्राहीम यांच्या या प्रथेला एक महान स्मरण म्हणून जारी केले गेले. बायबल चे पुस्तक निर्मिती. प्रकरण २२ मध्ये मेंढयाच्या कुर्बानीचा उल्लेख केला गेला आहे.

कुर्बानीची घटना मक्का येथे मरवाह पहाडीवर उद्भवली होती जी काबा गृहा जवळच आहे व ज्याची सई केली जाते. या संदर्भात संक्षिप्त प्रमाणे खालील प्रमाणे:-

१. ही एक अद्वितीय कुर्बानी होती. या करीता साजेलसे स्थान बैतुल मक्दस असू शकत होते किंवा मक्का. जेथपावेतो बैतुल मक्दसचा संबंध आहे त्याची उभारणी हजरत इब्राहीम यांच्या नंतर बऱ्याच काळाने हजरत दाऊद आणि हजरत सुलेमान यांच्या काळात झाली. मात्र मक्का येथे बैतुल्लाह (काबागृहा) ची उभारणी हजरत इब्राहीम आणि हजरत इस्माईल यांच्या हस्ते झाली म्हणून ही पवित्र भूमीच या कुर्बानी करीता सर्वात योग्य असे स्थान होते.

२. कुर्बानी चे खरे स्थान बैतुल्लाह (काबागृह) आहे

ثُمَّ مَحِلُّهَا اِلَى الْبَيْتِ الْعَتِيْقِ (سورہ حج - ۳۲)

म्हणून त्याच्या शास्त्राविहीतते नुसार कुर्बानी अगदी त्याच स्थळांवर कुर्बानी होय.

३. बायबलच्या निवेदनानुसार हजरत इब्राहीम यांना 'मोरयाह च्या देशात जाऊन एका पहाडावर कुर्बानी करण्याचा आदेश दिला गेला होता (पहा निर्मिती प्रकरण-२२) हा मोरयाह देश कोणता याचा खुलासा बायबल वाले करु शकले नाहीत म्हणून बायबल चा भाष्यकार लिहितो-

''The land of Moriah cannot be identified''

(The Interpreters one volume Commentary of the Bible P.18)

'मोरयाह' खरे पाहता मरवह चा अपभ्रंश आहे आणि मरवह पहाडी मक्का येथे काबागृहा जवळ आहे जे अल्लाहच्या निशाण्यां पैकी आहे. या पहाडीवर हजरत इस्माईल यांच्या कुर्बानीची घटना घडली होती. हदीस वचनात असा उल्लेख आहे की बैगंबरांनी मरवह संबंधी फर्माविले,

هٰذَا الْمَنْحَرُ وَكُلُّ فِجَاجِ مَكَّةَ وَطُرُقِهَا مَنْحَر (مؤطا كتاب الحج)

''हे बलिदान स्थळ आहे आणि मक्के चे सर्व लहान मोठे रस्ते कुर्बानी (बलिदान) ची स्थळे होत.'' (मूता-किताबुल

हज्ज)

हदीस वचनात मिना (स्थळा) ला जे कुर्बानी चे स्थान म्हटले गेले आहे ते शरीअत विषयक दृष्टीकोनातून आहे. एकतर मिना (स्थळ) मक्का शहराला लागून आहे दुसरे म्हणजे हज्ज यात्रे प्रसंगी मोठया प्रमाणात जनावरे जबह करण्या करीता व्यापक जागा असणे आवश्यक होते म्हणूनच मिना मध्ये कुर्बानी करणे शरीअत नुसार झाले.

९८. ही आयत स्पष्ट करते की हजरत इब्राहीम यांना इसहाकची खुशखबर, पहिल्या मुलाचा जन्म व त्याच्या कुर्बानीच्या घटने नंतर दिली गेली होती. म्हणून ज्या मुलाचे बलिदान दिले गेले ते हजरत इस्माईल हेच होते. परंतु बायबल मध्ये हजरत इसहाक यांना बळी ठरवले गेले आहे जो यहूदी नी केलेला फेरफार आहे. हजरत इस्माईल हेच 'बळी' असण्या समर्थनार्थ ती प्रमाणे ही आहेत जी आम्ही वर टीप क्र. ९७ मध्ये सादर केले आणि अधिक हे की-

१) बायबल मधील उल्लेख असा की तो हजरत इब्राहीमचा एकुलता एक मुलगा होता (निर्मिती-प्रकरण २२) आणि निर्मिती या पुस्तकातील २२ व्या प्रकरणात निवेदिले गेले आहे की हजरत सारा यांना कोणतेही अपत्य नव्हते आणि हजरत हाजिरा पासून इस्माईल जन्माला आले होते.

''हागोरेला (हाजिरा ला) अब्रामा पासून मुलगा झाला. होगोर पासून झालेल्या आपल्या मुलाचे नांव अब्रामानें इशमाएल ठेविले. होगोरला अब्रामापासून इश्माएल झाला तेव्हा अब्राम शहांयशी वर्षाचा होता'' (उत्पत्ति-१६: १५-१६)

आणि ही गोष्ट बायबल द्वारेच सिद्ध आहे की हजरत इस्माईल, हजरत इसहाक हून १४ वर्षानी मोठे होते (निर्मिती-प्रकरण-१७) तेव्हा एकुलते एक पुत्र हजरत इस्माईलच असू शकतात परंतु यहूदी लोकांनी केवळ पक्षपाती वृत्तीने हजरत इस्माईल यांच्या जागी हजरत इसहाक यांचे नाव सामील केले. त्यांनी केलेला हा फेरबद्दल उघड स्वरुपाचा आहे.

२) बायबल मधील एक उल्लेख असा की जेव्हा सर्वश्रेष्ठ अल्लाहने हजरत इब्राहीम यांना इसहाक यांच्या जन्माची खुशखबर दिली तेव्हा फर्माविले,

'मग देव म्हणाला, नाही, नाही तुझी बायको सारा हिच्याच पोटी तुला मुलगा होईल, तू त्याचे नांव इसहाक ठेव, त्याच्या पश्चात त्याच्या संततीशी निरंतर टाकेल असा करार मी त्याच्याशी करीन.' (उत्पत्ति-१७:१९)

म्हणजे इसहाक च्या जन्माच्या शुभ समाचारा सोबतच ही खुशखबर ही दिली गेली की त्याला ही संतती प्राप्ती होईल. मग इसहाक यांना संतती प्राप्त होण्या आधी त्यांना जबह करण्याचा आदेश कशा प्रकारे दिला जाऊ शकत होता? कुरआनात ही निवेदिले गेले आहे की जेव्हा हजरत इब्राहीम यांच्या पत्नीस इसहाक च्या जन्माची शुभवर्ताता दिली गेली तेव्हा त्यांना याकूब च्या जन्माची ही खुशखबर दिली गेली.

فَبَشَّرْنَاهَا بِاِسْحَاقَ وَمِنْ وَّرَاءِ اِسْحَاقَ يَعْقُوْبَ (هود:٧١)

''आम्ही तिला इसहाक ची व इसहाक नंतर याकूबची खुशखबर दिली.'' (हूद-७१)

३) जर इसहाक यांचे बलिदान झाले असते तर बनी इस्राईल वंशात ही कुर्बानी एक रीत म्हणून शिल्लक राहीली असती. परंतु त्यांच्यात या कुर्बानी ची परंपरा कायम न राहणे आणि ईद फ़सीह'ची कुर्बानी, जिचा संबंध इजिप्तहून त्यांच्या प्रस्थानाशी आहे, प्रचलित होणे या गोष्टीचे स्पष्ट प्रमाण होय की त्यांचा बळी दिला जाणार होता ते इसहाक नव्हते. तर हजरत इस्माईल होते, कारण हज्ज प्रसंगी या कुर्बानी ला परिपाठ म्हणून कायम ठेवले गेले आहे तसेच ईदुल अज़्हा (बकरा ईद) च्या काळात ही.

४) हजरत इस्माईल यांचे दोन गुणविशेष पवित्र कुरआनात अशे निवेदिले गेले आहेत जे त्यांच्या जबह होण्याशी मोठे सुसंगत आहेत. एक तर त्यांचे **''हलीम''** (सहनशील) असणे (आयत क्र. १०१) आणि दुसरा त्यांचे **''सादिकुल वाद''** (सत्य वचनी) असणे (सूरह मरीयम. आयत क्र. ५४) हजरत इसहाक यांचा गुणविशेष **''अलीम''** (ज्ञानी) हा निवेदला गेला आहे. (सूरह हिज्र - ५३)

भाष्यकारांनी हजरत इसहाक यांच्या बलिदानाच्या समर्थनार्थ ज्या कथनांचा उल्लेख केला आहे, ती ईश-ग्रंथ बाळगणाऱ्यांच्या गोष्टींवर विश्वास ठेवून निवेदिले आहेत असे वाटते परंतु सप्रमाण जसे वर स्पष्ट केले गेले आहे त्याचे समर्थन कुरआना द्वारे होत नाही.

९९. म्हणजे इस्माईल व इस्हाक दोघांवर अनेक प्रकारची समृद्धी अवतरीत केली. यास्तव या दोन्ही उगमां पासून दोन अशा वंशांचा क्रम चालला जो इतिहासात विशेष स्थान बाळगून आहे. हजरत इस्माईल पासून बनी इस्माईल (अरब) वंशाचा क्रम आणि हजरत इसहाक पासून बनी इस्राईल वंशाचा क्रम.

१००. म्हणजे बनी इस्माईल असो किंवा बनी इस्राईल दोघांपैकी चांगले व वाईट लोक अस्तित्वात आहेत.असे ही ज्यांनी सत्कर्म सदाचारास अंगिकारले आहे आणि असे देखील जे शिर्क, कुफ्र व बंडखोरी करुन स्वत:वर अत्याचार करीत आहेत. अर्थात हे दोन्ही वंश या दृष्टीने उत्तम जरुर आहेत की त्यांचा क्रम दोन महान व्यक्तिंपासून चालत आला आहे. परंतु अल्लाहच्या तराजूत जर काही वजन वाढविणारी गोष्टी असेल तर ती म्हणजे प्रत्येकाचे आपले सत्कर्म होय. वंश गोत्रादी वर्चस्व नव्हे.

त्यांना व त्यांच्या जन समूहाला फार मोठया आपत्तितून सोडवले. आणि त्यांची मदत केली तर तेच वर्चव शाली राहीले. त्यांना दिव्य-ग्रंथ प्रदान केला. आणि त्यांना सरळ मार्गाची सुबुद्धि प्रदान केली.(अल-क़ुरआन)

११४.आणि आम्ही मूसा व हारुन वर कृपा केली.

وَلَقَدْ مَنَنَّا عَلَىٰ مُوسَىٰ وَهَارُونَ ﴿١١٤﴾

११५.त्यांना व त्यांच्या जन समूहाला फार मोठया आपत्तितून सोडवले.[१०१]

وَنَجَّيْنَاهُمَا وَقَوْمَهُمَا مِنَ الْكَرْبِ الْعَظِيمِ ﴿١١٥﴾

११६.आणि त्यांची मदत केली तर तेच वर्चस्व शाली राहीले.[१०२]

وَنَصَرْنَاهُمْ فَكَانُوا هُمُ الْغَالِبِينَ ﴿١١٦﴾

११७.त्यांना दिव्य-ग्रंथ प्रदान केला.[१०३]

وَآتَيْنَاهُمَا الْكِتَابَ الْمُسْتَبِينَ ﴿١١٧﴾

११८.आणि त्यांना सरळ मार्गाची सुबुद्धि प्रदान केली.[१०४]

وَهَدَيْنَاهُمَا الصِّرَاطَ الْمُسْتَقِيمَ ﴿١١٨﴾

११९.आणि नंतरच्या लोकांमध्ये त्यांचे सुस्मरण बाकी राखले.[१०५]

وَتَرَكْنَا عَلَيْهِمَا فِي الْآخِرِينَ ﴿١١٩﴾

१२०.सलाम आहे मूसा व हारुन वर.[१०६]

سَلَامٌ عَلَىٰ مُوسَىٰ وَهَارُونَ ﴿١٢٠﴾

१२१.अशाच प्रकारे आम्ही सत्कर्म करणाऱ्यांना मोबदला देतो.

إِنَّا كَذَٰلِكَ نَجْزِي الْمُحْسِنِينَ ﴿١٢١﴾

१२२.नि:संशय ते आमच्या मोमिन दासां पैकी होते.

إِنَّهُمَا مِنْ عِبَادِنَا الْمُؤْمِنِينَ ﴿١٢٢﴾

१२३.आणि निश्चितच इलियास देखील [१०७] पैगंबरां पैकी होता.

وَإِنَّ إِلْيَاسَ لَمِنَ الْمُرْسَلِينَ ﴿١٢٣﴾

१२४.जेव्हा तो आपल्या जन समूहास म्हणाला तुम्ही लोक (अल्लाह चे) भय नाही बाळगत?[१०८]

إِذْ قَالَ لِقَوْمِهِ أَلَا تَتَّقُونَ ﴿١٢٤﴾

१२५.काय तुम्ही बअल [१०९] ला पुकारता आणि सर्वोत्कृष्ट निर्मात्यास सोडून देता !

أَتَدْعُونَ بَعْلًا وَتَذَرُونَ أَحْسَنَ الْخَالِقِينَ ﴿١٢٥﴾

१२६.अल्लाहला जो तुमचा ही पालन कर्ता आहे आणि तुमच्या पूर्वी होऊन गेलेल्या वाड वडिलांचा ही. [११०]

اللَّهَ رَبَّكُمْ وَرَبَّ آبَائِكُمُ الْأَوَّلِينَ ﴿١٢٦﴾

१०१. म्हणजे त्या त्रास यांतना पासून, ज्या फिरऔन त्यांना देत होता.

१०२. बनी इस्राईल मिस्र (इजिप्त) मध्ये अल्पसंख्याक होते व फिरऔन ने त्यांना अत्याचाराचे निशाण बनविले होते असे असले तरी, ज्याअर्थी ते ईमान बाळगणारे होते व हजरत मूसा व हजरत हारुन यांच्या मार्गदर्शनास त्यांनी कबूल केले होते म्हणून अल्लाहची मदत त्यांच्या सोबत होती आणि शेवटी वर्चस्व त्यांनाच लाभले. फिरऔन ला आपल्या सैन्या सह जल समाधि मिळाली आणि बनी इस्राईल ला मुक्ति मिळाली. अशा प्रकारे हे अत्याचार ग्रस्त अल्पसंख्यांक पैगंबरांना साथ दिल्यामुळे सत्ताधारी फिरऔन च्या मुकाबल्यात वरचढ ठरले.

१०३. अभिप्रेत तौरात होय. जो एक दिव्य (स्पष्ट) ग्रंथ होता.

१०४. सरळ मार्ग अल्लाहचा धर्म अर्थात इस्लाम होय ज्याचे सर्वप्रथम वैशिष्टय तौहीद (एकेश्वरवाद) होय.

१०५. म्हणजे मूसा व हारुन चा म्हणून ईमान बाळगणारे यांच्याशी श्रद्धा भाव राखतात व त्यांची स्तुति-प्रशंसा करतात याऊलट फिरऔन ची सर्वजण निर्भत्सना करतात.

१०६. म्हणजे अल्लाह तर्फे मूसा व हारुन करीता सलामती आहे. यात ईमान बाळगणाऱ्या करीता उत्तेजन आहे की त्यांनी यांच्यावर सलाम (शांती) पाठवावा. सलाम असो मूसा व हारुन वर.

१०७. हजरत इलियास यांचे नाव बायबल मध्ये इलियाह (Elijah)असे आहे व ते बनी इस्राईल वंशाचे होते. त्यांचा काळ इ. स. पूर्व ९ शतकाचा सांगितला जातो. बायबल चे पुस्तक साम्राज्ये प्रकरण १८ मध्ये त्यांचा वृत्तांत निवेदिला गेला आहे.

१०८. ते कोणत्या जनसमूहाकडे पाठविले गेले होते याचा खुलासा कुरआनाने केलेला नाही. मात्र बायबल च्या निवेदना नुसार ते बनी इस्राईल च्याच एका समूहा कडे पाठविले गेले होते, जो मूर्तिपूजेत व्यस्त झाला होता.

१०९. ''बअल'' म्हणजे मालक किंवा सरदार परंतु हजरत इलियास यांच्या जनसमूहाने ज्या मूर्ति ला उपास्य बनविले होते तिचे नाव 'बअल' पालनकर्ता' (Lord) या अर्थाने होते.

११०. हजरत इलियास यांनी आपल्या जन समूहास मूर्ति पूजे तून बाहेर काढण्याचा प्रयत्न केला आणि हे स्पष्ट प्रमाण प्रस्तुत केले की अल्लाह, जो तुम्हा सर्वांचा पालनकर्ता आहे आणि सर्वोत्कृष्ट निर्माता आहे, त्याला सोडून आपल्या हातांनी कोरलेल्या मूर्तिला उपास्य बनविण्यात काय अर्थ?

فَكَذَّبُوهُ فَإِنَّهُمْ لَمُحْضَرُونَ ﴿١٢٧﴾

१२७. परंतु त्यांनी यास खोटे ठरविले तेव्हा निश्चितच त्यांना बंदिस्त करुन सादर केले जाईल.[१११]

إِلَّا عِبَادَ اللَّهِ الْمُخْلَصِينَ ﴿١٢٨﴾

१२८. मात्र अल्लाहचे विशेष दास या पासून सुरक्षित राहतील.[११२]

وَتَرَكْنَا عَلَيْهِ فِي الْآخِرِينَ ﴿١٢٩﴾

१२९. आणि नंतर च्या लोकां मध्ये आम्ही त्याचे सुस्मरण [११३] बाकी ठेवले.

سَلَامٌ عَلَىٰ إِلْ يَاسِينَ ﴿١٣٠﴾

१३०. सलाम आहे इलियासीन वर.[११४]

إِنَّا كَذَٰلِكَ نَجْزِي الْمُحْسِنِينَ ﴿١٣١﴾

१३१. आम्ही सत्कर्मी लोकांना अशाच प्रकारे मोबदला देतो.

إِنَّهُ مِنْ عِبَادِنَا الْمُؤْمِنِينَ ﴿١٣٢﴾

१३२. नि:संशय तो आमच्या मोमीन दासां पैकी होता.

وَإِنَّ لُوطًا لَمِنَ الْمُرْسَلِينَ ﴿١٣٣﴾

१३३. आणि लूत [११५] देखील पैगंबरां पैकी होता.

إِذْ نَجَّيْنَاهُ وَأَهْلَهُ أَجْمَعِينَ ﴿١٣٤﴾

१३४. जेव्हा अम्ही त्याला व त्याच्या समस्त संबंधितांना मुक्ति दिली.[११६]

إِلَّا عَجُوزًا فِي الْغَابِرِينَ ﴿١٣٥﴾

१३५. एक म्हातारी वगळता, जी मागे राहणाऱ्यां पैकी होती.[११७]

ثُمَّ دَمَّرْنَا الْآخَرِينَ ﴿١٣٦﴾

१३६. मग तर सर्वांना आम्ही नष्ट करुन टाकले. [११८]

وَإِنَّكُمْ لَتَمُرُّونَ عَلَيْهِمْ مُصْبِحِينَ ﴿١٣٧﴾

१३७. आणि तुम्ही यांच्या (उध्वस्त) वस्त्यां वरुन जाता, प्रात: काळी ही,

وَبِاللَّيْلِ ۚ أَفَلَا تَعْقِلُونَ ﴿١٣٨﴾

१३८. आणि रात्रीस ही. [११९] मग काय तुम्ही बुद्धिचा वापर नाही करीत !

१११. म्हणजे पैगंबराना खोटे ठरविण्याचा व मूर्ति पूजेवर कायम राहण्याचा अपरिहार्य परिणाम आखिरतचा अजाब होय. कियामतीच्या दिवशी अशा लोकांना बंदिवान बनवून अल्लाह समोर शिक्षाकरीता हजर केले जाईल.

११२. म्हणजे ज्यांनी केवळ अल्लाहला एकमेव उपास्य मानून त्यांची उपासना व आज्ञापालन केले ते या शिक्षेपासून सुरक्षित राहतील.

११३. म्हणजे हजरत इलियास यांचा.

११४. इलियासीन व इलियास हे एकाच नावाचे दोन उच्चार आहेत उदाहरणार्थ तूर सीना व तूर सीनीन.

११५. हजरत लूत यांचा किस्सा अनेक सुरती (अध्यायां) मध्ये आला आहे. या ठिकाणी कुरआनने या घटने कडे संक्षिप्त इशारा करुन मक्केच्या अनेकेश्वर वाद्यांना बोध दिला आहे.

११६. म्हणजे हजरत लूत च्या संबंधितांना, ज्यांनी ईमान बाळगले होते, अजाब (ईश-शिक्षे) पासून वाचाविले.

११७. ही हजरत लूत यांची पत्नी होती, जिने ईमान बाळगले नव्हते म्हणून मागे राहीली आणि ईश शिक्षेच्या तावडीत सापडली. अधिक स्पष्टीकरणा साठी पहा सूरह अअराफ टीप क्र. १३२

११८. अभिप्रेत हजरत लूत आणि त्यांच्यावर ईमान बाळगणाऱ्या संबंधितांना सोडून इतर सर्व लोक होत म्हणजे त्या सर्वांना जे काफीर होते नष्ट केले.

११९. हजरत लूत यांच्या जनसमूहाच्या वस्त्या मृत सागराच्या किनाऱ्यावर होत्या, ज्यावरुन सिरीया व पॅलेस्टीन मार्गे मक्का वाल्यांचे जाणे होत असे. त्या काळात रखरखत्या उन्हात वाळवंटातील प्रवास करणे मोठे कठीण होते. म्हणून लोक सर्व साधारणतः रात्रीच्या वेळी आणि सकाळच्या थंड वेळेस प्रवास करीत. तद्नुषंगे सकाळी आणि रात्रीच्या वेळी या वस्त्यांवरुन जाण्याचा उल्लेख केला गेला आहे. सकाळ चा उल्लेख या कारणास्तव अग्रक्रमाने केला गेला की या निर्मनुष्य वस्त्यांचे अवलोक सकाळच्या उजेडात अधिक चांगल्या प्रकारे केले जाऊ शकत होते. अधिक स्पष्टीकरणा साठी पहा सूरह हीज्र टीप क्र. ७५

१३९. आणि नि:संशय युनूस [१२०] देखील पैगंबरां पैकी होता.

وَإِنَّ يُونُسَ لَمِنَ الْمُرْسَلِينَ ﴿١٣٩﴾

१४०. जेव्हा तो पळून जाऊन एका भरलेल्या नौके जवळ पोहचला.[१२१]

إِذْ أَبَقَ إِلَى الْفُلْكِ الْمَشْحُونِ ﴿١٤٠﴾

१४१. मग (नौका वाल्यांनी) फासा टाकला तेव्हा तो त्यात पराभूत झाला.[१२२]

فَسَاهَمَ فَكَانَ مِنَ الْمُدْحَضِينَ ﴿١٤١﴾

१४२. मग माशाने त्याला गिळून टाकले [१२३] अशा अवस्थेत की तो (स्वत:लाच) धि:क्कारीत होता.[१२४]

فَالْتَقَمَهُ الْحُوتُ وَهُوَ مُلِيمٌ ﴿١٤٢﴾

१४३. जर तो तस्बीह (ईश स्तवन) करणाऱ्यां पैकी नसता.[१२५]

فَلَوْلَا أَنَّهُ كَانَ مِنَ الْمُسَبِّحِينَ ﴿١٤٣﴾

१४४. तर लोकांना उठविले जाण्याच्या दिवसा पावेतो, तो त्याच्या पोटात राहीला असता.[१२६]

لَلَبِثَ فِي بَطْنِهِ إِلَىٰ يَوْمِ يُبْعَثُونَ ﴿١٤٤﴾

१४५. मग आम्ही त्याला एका उघडया जमीनीवर टाकून दिले अशा अवस्थेत की तो दुर्बल होता.[१२७]

فَنَبَذْنَاهُ بِالْعَرَاءِ وَهُوَ سَقِيمٌ ﴿١٤٥﴾

१४६. आणि आम्ही त्यावर एक वेलीचे झाड उगवले.[१२८]

وَأَنْبَتْنَا عَلَيْهِ شَجَرَةً مِنْ يَقْطِينٍ ﴿١٤٦﴾

१४७. आणि त्याला पाठविले एक लाखाहून ही अधिक लोकांकडे.[१२९]

وَأَرْسَلْنَاهُ إِلَىٰ مِائَةِ أَلْفٍ أَوْ يَزِيدُونَ ﴿١٤٧﴾

१४८. त्यांनी ईमान बाळगले, यास्तव एक काळ पावेतो आम्ही त्यांना जीवन सामुग्री दिली.[१३०]

فَآمَنُوا فَمَتَّعْنَاهُمْ إِلَىٰ حِينٍ ﴿١٤٨﴾

१४९. त्यांना विचारा काय तुमच्या पालन कर्त्या साठी कन्या आहेत आणि त्यांच्या करीता पुत्र ? [१३१]

فَاسْتَفْتِهِمْ أَلِرَبِّكَ الْبَنَاتُ وَلَهُمُ الْبَنُونَ ﴿١٤٩﴾

१५०. काय आम्ही फरिश्त्यांना स्त्रीया बनविले आहे आणि हे या गोष्टीस साक्षी आहेत?[१३२]

أَمْ خَلَقْنَا الْمَلَائِكَةَ إِنَاثًا وَهُمْ شَاهِدُونَ ﴿١٥٠﴾

१२०. हजरत युनूस यांच्या वृत्तांताच्या तपशिला करीता पहा सूरह युनूस टीप क्र. १४७ आणि सूरह अंबिया टीप क्र. ११७, ११८.

१२१. हजरत युनूस यांना इराक च्या जन समूहाकडे पैगंबर म्हणून पाठविले गेले होते. त्यांचा काळ इ. स. पूर्व आठव्या शतकाचा दर्शविला जातो. त्यांनी जेव्हा दअवत (आवाहन सादर केले तेव्हा त्यांच्या जन समूहाने इन्कार केला.

हजरत युनूस यांनी जेव्हा आपल्या जन समूहा कडून निराशा झाली तेव्हा उद्विग्न होऊन त्यांनी तिथून काढता पाय घेतला व संभवत: पॅलेस्टीनचा निश्चय केला आणि समुद्र मार्गाने याफा येथे पोहचण्याचा इरादा केला. किनाऱ्यावर त्यांना एक भरलेली नाव मिळाली व ते तिच्यात बसले.

१२२. नौका समुद्राच्या मध्यभागी हेलकावे जाऊ लागली. कदाचित एकाद्या वादळाला तोंड द्यावे लागले असेल. नाव वाल्यांनी ओझे कमी करणे आवश्यक जाणले व त्यासाठी फासे टाकून पाहीले की ज्या नावाचा फासा पडेल त्याला समुद्राच्या हवाले केले जाईल संयोगवश हजरत युनूस, यांचे नाव निघाले म्हणून त्यांना समुद्राच्या हवाली केले गेले.

१२३. अल्लाहने अशी उपाय योजना केली की एका मोठया माशाने त्यांना गिळून टाकले. बहुधा हा व्हेल किंवा शार्क सारखा मोठा मासा असावा.

१२४. मूळ शब्द 'मूलीम' याचा अर्थ निर्भत्सना करणारे असा आहे ज्याप्रमाणे ''मतीअ'' चा अर्थ आज्ञापालन करणारे व मुनीबचा अर्थ रुजू करणारा असा आहे. म्हणजे माशा ने जेव्हा हजरत युनूस यांना गिळंकृत केले तेव्हा त्यांना आपल्या चुकीचा पश्चाताप वाटत होता, म्हणून आपल्या स्वत:चा ते धिक्कार करीत होते.

१२५. सूरह अंबिया आयत क्र. ८७ मधील उल्लेखानुसार हजरत युनूस यांनी माशाच्या पोटात अल्लाहचे पवित्र वर्णन व स्तुति केली आणि ही तस्बीह होती

لَا اِلٰهَ اِلَّا اَنْتَ سُبْحٰنَكَ اِنِّىْ كُنْتُ مِنَ الظّٰلِمِيْنَ

**''ला इलाहा इल्ला अन्ता सुबहानका इन्नी कुन्तो मिनज्जालेमीन.''**

अर्थात ''तुझ्याखेरीज कोणी ही उपास्य नाही, पवित्र आहेस तू, मीच अपराधी आहे.' या तस्बीहच्या पायी त्यांच्या करीता मुक्ति द्वार उघडले'' !

यावरुन हे मार्गदर्शन लाभते की मनुष्य जेव्हा एखाद्या घोर संकटात सापडला असावा, तेव्हा या समृद्ध शाली तस्बीहचा जप त्याच्या प्रार्थना स्विकृतिचे साधन ठरु शकते.

स्पष्ट असावे की हजरत युनूस ''मुसब्बीहीन'' (तसबीह करणाऱ्या पैकी) होते याचा अर्थ केवळ हा नव्हे की त्यांनी फक्त माशाच्या पोटात तस्बीह केली होती, किंबहुना असा की ते अल्लाहच्या त्या दासा पैकी होते जे त्याची उपासना करणारे व त्याचे पावित्र्य वर्णन करणारे आहेत या गुणांसह त्यानी माशाच्या पोटात तस्बीह ची वचने अदा केलीत.

१२६. म्हणजे ही अल्लाहच्या स्तुतिची समृद्धी होती की माशाने त्यांना ओकून बाहेर टाकले अन्यथा कियामतीच्या दिवसा पावेतो माशाचे पोटच त्यांची कबर बनली असती. आयतीतले शब्द हा आशय स्पष्ट करीत नाही की ते कियामती पावेतो माशाच्यापोटात जिवंत राहीले असते. किंबहुना हाच अर्थ बाळगतात की कियामती पर्यंत ते माशाच्या पोटातच राहीले असते. आणि अल्लाहच आपल्या वाणीच्या रहस्य भेदांना अधिक उत्तम जाणतो.

१२७. म्हणजे अल्लाहच्या आदेशाने माशाने हजरत युनूस यांना समुद्र किनाऱ्या जवळ ओकून दिले. हा समुद्र किनारा एक खुले मैदान होते आणि ते अतिशय कमजोर व दुबळे झाले होते.

१२८. अल्लाहने त्यांची विवशता पाहून त्यांना आधार दिला आणि त्या खुल्या मैदानात चमत्कार पूर्ण रित्या एक वेलीचे झाड उगवले, ज्याने सावली चे काम केले. अशा प्रकारे अगदी वेळेवर त्यांना शांती व आराम मिळाला.

१२९. म्हणजे जेव्हा त्यांची प्रकृती चांगली झाली तेव्हा अल्लाहने त्यांना आदेश दिला की त्या वस्तीकडे जा, जिची लोकसंख्या लाखाहून जास्त आहे, अभिप्रेत नेनवा शहर ज्यांची एवढी जास्त लोकासंख्या होती. तिथे हजरत युनूस यांना आपल्या आवाहन कार्याच्या पूर्तते करीता पुन्हा पाठविले गेले.

स्पष्ट झाले की हजरत युनूस यांच्या हातून जी चूक घडली होती, ती प्रेषित कर्तव्य पार पाडण्या संदर्भात होती. आणि त्यांनी जाणून बुजून कोणता ही गुन्हा केला नव्हता किंबहुना एक भूल चूक होती जी त्यांच्या हातून घडली आणि ती देखील सत्य समर्थनात, परंतु अल्लाहच्या दृष्टीने-प्रेषित कर्तव्य पार पाडण्यात ही उणीव की अल्लाहच्या आदेशा खेरीज त्या वस्तीला सोडून जाणे जिच्यावर प्रमाण प्रस्थापित करण्या करीता त्याने आपल्या पैगंबरास नियुक्त केले होते, अतिशय आक्षेपाई बाब होती म्हणूनच अल्लाहने त्यांना सक्त कसोटीत टाकले परंतु आपल्या चूकीची जाणीव होताच त्यांनी आपली चूक स्विकारुन ईश स्तवनात रममाण झाले परिणामत: अल्लाहने त्यांना संकट-मुक्त केले आणि चमत्कार पूर्ण रित्या त्यांची मदत ही केली. यावरुन हे ही स्पष्ट झाले की पैगंबर निरागस असला म्हणजे त्याच्या हातून गुन्हा घडत नसला तरी माणूस या नात्याने या प्रकारची भूल चूक त्याच्या कडून होऊ शकते ज्याची वेळीच

अल्लाह सुधारणा करतो. केवळ अल्लाहच असा आहे ज्याच्या कडून कोणत्याही प्रकारची चूक होत नाही. नि:संशय तो वैगुण्यविरहीत व पवित्र आहे.

१३०. हजरत युनूस जेव्हा पुन्हा नेनवा परतले तेव्हा त्यांच्या आवाहनास संपूर्ण जन समूहाने स्विकारले आणि जेव्हा त्यांनी ईमान बाळगले तेव्हा सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्यांना आपल्या कृपेने उपकृत केले व जगात लाभन्वित होण्याची संधी त्यांना प्रदान केली.

संपूर्ण जनसमूहाने पैगंबरावर ईमान बाळगण्याचे हे एकमेव उदाहरण आहे जे प्रेषितांच्या इतिहासात मिळते आणि यास सूरह युनूसच्या आयत क्र. ९८ मध्ये स्पष्टत: सादर केले गेले आहे.

१३१. तत्कालीन अनेकेश्वर वादी फरिश्त्यां बाबत अशी श्रद्धा ठेवत होते की त्या अल्लाहच्या मुली आहेत. अर्थात अल्लाह करीता मुले योजिले जावेत किंवा मुली या दोन्ही गोष्टी अगदी चुकीच्या व अयोग्य आहेत. परंतु अरबच्या अनेकेश्वरवाद्याचे अल्लाह करीता मुली योजणे फारच निकृष्टतम बाब होय कारण मुलींना ते स्वत:साठी लज्जास्पद समजत. त्यांच्या या खालावलेल्या वृत्तीस स्पष्ट करण्या करीता त्यांना विचारले जात आहे की सांगा, जेव्हा तुम्हीस्वत:साठी मुलींना सोडून मुलांना पसंत करता तेव्हा अल्लाह साठी मुली का ठरविता? ज्या गोष्टीस तुम्ही निकृष्ट जाणता तिचा अल्लाहशी संबंध जोडतांना तुम्हाला काहीच संकोच वाटत नाही? हा एक टोमणा होय की ज्याने त्यांच्या श्रद्धेची अयोग्यता उघडपणे दिसून येते.

१३२. म्हणजे त्या लोकांना शेवटी हे माहीत कसे झाले की फरिश्ते स्त्रीया आहेत. काय यांनी स्वत: आपल्या डोळयांनी हे पाहीले आहे?

ऐका हे लोक केवळ काल्पनिक रित्या ही गोष्ट बोलत आहेत. की अल्लाहला संतती आहे आणि हे अगदी खोटारडे आहेत.काय त्याने पुत्रां ऐवजी कन्या पसंत केल्या? तुम्हाला झाले तरी काय, कसा निर्णय करता? काय तुम्ही विचार चिंतन करीत नाही ?(अल-कुर्आन)

१५१. ऐका हे लोक केवळ काल्पनिक रित्या ही गोष्ट बोलत आहेत.

أَلَآ إِنَّهُم مِّنْ إِفْكِهِمْ لَيَقُولُونَ ﴿١٥١﴾

१५२. की अल्लाहला संतती आहे आणि हे अगदी खोटारडे आहेत.

وَلَدَ ٱللَّهُ وَإِنَّهُمْ لَكَٰذِبُونَ ﴿١٥٢﴾

१५३. काय त्याने पुत्रां ऐवजी कन्या पसंत केल्यात?

أَصْطَفَى ٱلْبَنَاتِ عَلَى ٱلْبَنِينَ ﴿١٥٣﴾

१५४. तुम्हाला झाले तरी काय, कसा निर्णय करता?

مَا لَكُمْ كَيْفَ تَحْكُمُونَ ﴿١٥٤﴾

१५५. काय तुम्ही विचार चिंतन करीत नाही ?[१३३]

أَفَلَا تَذَكَّرُونَ ﴿١٥٥﴾

१५६. की तुमच्या जवळ स्पष्ट प्रमाण आहे?

أَمْ لَكُمْ سُلْطَٰنٌ مُّبِينٌ ﴿١٥٦﴾

१५७. तर सादर करा आपला ग्रंथ जर तुम्ही सच्चे असाल.[१३४]

فَأْتُوا بِكِتَٰبِكُمْ إِن كُنتُمْ صَٰدِقِينَ ﴿١٥٧﴾

१५८. यांनी अल्लाह व जिन्नांच्या दरम्यान ही वंश-गोत्राचे नाते जोडून ठेवले आहे आणि जिन्नांना ठाऊक आहे की ते बंदी बनवून सादर केले जाणार आहेत.[१३५]

وَجَعَلُوا بَيْنَهُ وَبَيْنَ ٱلْجِنَّةِ نَسَبًا ۚ
وَلَقَدْ عَلِمَتِ ٱلْجِنَّةُ إِنَّهُمْ لَمُحْضَرُونَ ﴿١٥٨﴾

१५९. ------अल्लाह अलिप्त आहे त्या गेष्टीं पासून ज्या हे निवेदितात-----[१३६]

سُبْحَٰنَ ٱللَّهِ عَمَّا يَصِفُونَ ﴿١٥٩﴾

१६०. अल्लाहच्या विशेष दासां खेरीज.[१३७]

إِلَّا عِبَادَ ٱللَّهِ ٱلْمُخْلَصِينَ ﴿١٦٠﴾

१६१. तेव्हा तुम्ही आणि ते ज्यांची तुम्ही आराधना करता. [१३८]

فَإِنَّكُمْ وَمَا تَعْبُدُونَ ﴿١٦١﴾

१६२. त्याच्या पासून कोणाला ही बहकवू शकत नाही.

مَآ أَنتُمْ عَلَيْهِ بِفَٰتِنِينَ ﴿١٦٢﴾

१६३. फक्त त्यानांच, जे जहन्नम मध्ये जाणार आहेत.[१३९]

إِلَّا مَنْ هُوَ صَالِ ٱلْجَحِيمِ ﴿١٦٣﴾

१३३. म्हणजे एक अशी गोष्ट जी अगदीच अयोग्य आहे, तिचा अल्लाहशी कशा प्रकारे संबंध जोडता? ईश्वरावर श्रद्धा ठेवण्यात माणसाला अधिकतर मार्गभ्रष्टता या कारणास्तव आहे की तो अल्लाहने दिलेल्या बुद्धिचा वापर करीत नाही व अशा गोष्टीना डोळे मिटून स्विकारतो ज्या मुळातच अयोग्य असतात. कुरआन अशा गोष्टींवर अंकूष ठेवतो व फर्मावितो की ईश्वरावर श्रद्धा ठेवण्या संदर्भात माणसाने जागरुक राहीले पाहीजे आणि कोणत्याही गोष्टींचा अल्लाहशी संबंध जोडण्या आधी त्याने प्रदान केलेल्या बुद्धिच्या उजेडात तिला पारखून पाहीले पाहीजे. विविध धर्माच्या लोकांनी योग्यतेचा पुरावा दिला असता तर श्रद्धाविषयक मार्गभ्रष्टतेत भरकटले नसते.

१३४. जर तुमच्या जवळ एखादे प्रमाण आहे तर ते सादर करा. प्रमाण हे की अवतरीत ग्रंथात ईश्वरा संबंधी काही सांगितले गेले असावे. मक्केच्या अनेकेश्वर वाद्यांजवळ असा कोणताही ग्रंथ नव्हता, जो आकाशातून अवतरलेला असावा आणि ना कोणत्याही अवतरलेल्या ग्रंथात फरिश्त्यांना अल्लाहच्या मुली म्हटले गेले आहे. यास्तव अनेकेश्वरवाद्यांची ही श्रद्धा ना बौद्धिक प्रमाणावर आधारीत आहे आणि ना अनुकरणीय प्रमाणावर, किंबहुना केवळ एक काल्पनिक गोष्ट होती. जिचा अल्लाहशी संबंध जोडला गेला होता. भारतातील अनेकेश्वरवाद्यांची अनेकविध देवी देवतांची श्रद्धा देखील अशाच प्रकारे खोटी व मिथ्या आहे कारण याच्या समर्थनार्थ ना एखादे बौद्धिक प्रमाण आहे आणि ना अनुकरणीय.

१३५. अरब देशातील काही कबिले जिन्नां संबंधी अशी श्रद्धा बाळगत की ते ईश्वराशी वांशिक संबंध राखतात. यांचे खंडन करतांना येथे फर्माविले गेले की जिन्न (अर्थात सैतान जिन्न) तर कियामतीच्या दिवशी, बंदी बनवून ईश्वरासमोर शिक्षा भोगण्या करीता हजर केले जाणार आहेत. आणि ते स्वत: ही आपल्या या पात्रतेस चांगल्या प्रकारे जाणून आहेत. परंतु हे अनेकेश्वरवादी या सैतानी जिन्नां ना ईश्वराचा दर्जा बहाल करीत आहेत.

१३६. हे आक्षेपाई विधान होय जे अनेकेश्वर वाद्यांच्या चुकीच्या श्रद्धेचे खंडन करते.

१३७. याचा संबंध वरच्या त्या आयतीशी आहे, ज्यात जिन्नांना बंदीवान बनवून हजर केले जाण्या विषयी फर्माविले गेले आहे या अपवादाचा अर्थ असा की जिन्नांमध्ये जे अल्लाहचे प्रामाणिक, सच्चे दास असतील. ते कियामतीच्या दिवशी शिक्षेकरीता हजर केले जाणार नाहीत जिन्न समुदायात सैतानी जिन्नांची संख्या जास्त असली तरी त्यांच्यात अल्लाहचे असे दास ही आहेत जे मोमीन (ईमान बाळगणारे) व स्वालेह (सदाचारी) आहेत.

१३८. हे अनेकेश्वरवाद्यांना संबोधून आहे.

१३९. म्हणजे तुम्ही अशाच लोकांना मार्गभ्रष्ट करु शकता आणि तुमचे हे कथन त्याच लोकांच्या मार्गभ्रष्टतेस कारणीभूत ठरु शकते, ज्यांनी जहन्नमचा मार्ग अंगिकारला आहे. अल्लाहच्या सच्च्या दासांवर याचा किंचितमात्र प्रभाव पडू शकत नाही.

१६४.आणि आमच्या पैकी प्रत्येकाचे स्थान निश्चित आहे .[१४०]

وَمَا مِنَّآ إِلَّا لَهُۥ مَقَامٌ مَّعْلُومٌ ﴿١٦٤﴾

१६५. आणि आम्ही पंक्ति बध्द राहणारे आहोत.[१४१]

وَإِنَّا لَنَحْنُ ٱلصَّآفُّونَ ﴿١٦٥﴾

१६६.आणि आम्ही तस्बीह (ईश-स्तवन) करणारे आहोत.[१४२]

وَإِنَّا لَنَحْنُ ٱلْمُسَبِّحُونَ ﴿١٦٦﴾

१६७. हे लोक म्हणत असत.[१४३]

وَإِن كَانُوا۟ لَيَقُولُونَ ﴿١٦٧﴾

१६८. जर आमच्या जवळ पूर्वीच्या लोकांची शिकवण असती.[१४४]

لَوْ أَنَّ عِندَنَا ذِكْرًا مِّنَ ٱلْأَوَّلِينَ ﴿١٦٨﴾

१६९. तर आम्ही अल्लाहचे खास (विशेष) दास असतो. [१४५]

لَكُنَّا عِبَادَ ٱللَّهِ ٱلْمُخْلَصِينَ ﴿١٦٩﴾

१७०.परंतु त्यांनी याचा इन्कार केला, तर ते लवकरच जाणून घेतील.[१४६]

فَكَفَرُوا۟ بِهِۦ فَسَوْفَ يَعْلَمُونَ ﴿١٧٠﴾

१७१.आणि आमचे फर्मान आम्ही पाठविलेल्या दासां करीता, आधीच सादर केले गेले आहे.[१४७]

وَلَقَدْ سَبَقَتْ كَلِمَتُنَا لِعِبَادِنَا ٱلْمُرْسَلِينَ ﴿١٧١﴾

१७२.की नि:श्चितच त्यांची मदत केली जाईल.[१४८]

إِنَّهُمْ لَهُمُ ٱلْمَنصُورُونَ ﴿١٧٢﴾

१७३. आणि आमचे लशकरच वर्चस्वी होऊन राहील.[१४९]

وَإِنَّ جُندَنَا لَهُمُ ٱلْغَٰلِبُونَ ﴿١٧٣﴾

१७४. तेव्हा, यांच्याकडून आपले लक्ष हटवा एक वेळ पावेतो.[१५०]

فَتَوَلَّ عَنْهُمْ حَتَّىٰ حِينٍ ﴿١٧٤﴾

१७५. आणि बघत राहा.[१५१] ते ही लवकरच पाहतील.[१५२]

وَأَبْصِرْهُمْ فَسَوْفَ يُبْصِرُونَ ﴿١٧٥﴾

१४०. हे फरिश्त्यांचे निवेदन होय, ज्याचा अल्लाहने कुरआनात उल्लेख केला आहे. सूरह च्या सुरवातीला फरिश्त्यां बाबत जे निवेदिले गेले होते, तेच त्यांच्या मुखाने या काही आयतीत निवेदिले गेले आहे.

फरिश्ते म्हणतात की आमच्या पैकी प्रत्येकाचे स्थान निर्धारीत आहे म्हणजे ज्याला ज्या सेवेसाठी नियुक्त केले गेले आहे त्याने तिच सेवा पार पाडायची आहे. उपासने संदर्भात ही आणि इतर ईश-आदेशांच्या पालना संदर्भातही. अर्थात आम्ही अल्लाहच्या हुकुमाचे ताबेदार आहोत आणि आमच्या पैकी ज्याला जे काम सोपविले गेले आहे, ते पार पाडण्यात तो मग्न आहे.

फरिशत्यांच्या या निवेदनाने अनेकेश्वरवाद्यांच्या या कल्पनेचे खंडन होते की ते ईश्वराच्या मुली आहेत किंवा त्यांना ईशत्वात काही अधिकार प्राप्त आहे.

१४१. म्हणजे आम्ही अल्लाहच्या उपासनेत रांगा बांधून उभे राहणारे आहोत. उपासनेत पंक्ति-बद्धता फरिश्त्यांचा गुणधर्म आहे, जो अल्लाहला अतिशय प्रिय आहे. म्हणूनच इस्लामने दिवसातून पाच वेळा अदा केल्या जाणाऱ्या सामूहीक नमाज (बाजमाअत) मध्ये रांगा बांधून उभे राहण्याचा आदेश दिला आहे.

१४२. म्हणजे आम्ही अल्लाहचे पावित्र्य वर्णन करण्यात लीन आहोत. अल्लाहचे पावित्र वर्णन करणे अतिशय उच्च उपासना होय. जी करण्यात फरीश्ते मग्न असतात. या ठिकाणी फरिशत्यांचे निवेदन संपले.

१४३. म्हणजे मक्केचे अनेकेश्वरवादी म्हणत असत.

१४४. म्हणजे ज्या प्रमाणे यहूदी व ख्रिश्चनांना अवतरीत ग्रंथ लाभले. तद्वतच आम्हाला ही अवतरीत ग्रंथ मिळाला असता.

१४५. म्हणजे यांचा दावा तर हा होता की आम्हाला ही जर एखादा अवतरीत ग्रंथ मिळाला असता तर आम्ही अल्लाहचे विशेष दास बनलो असतो, परंतु जेव्हा अल्लाहने यांच्या कडे ग्रंथ (कुरआन) पाठविला तर ते याचा इन्कार करणारे बनले.

१४६. म्हणजे लवकरच त्यांना आपली परिणति कळून येईल.

१४७. अर्थात पैगंबरांशी अल्लाहचा हा वायदा आधीच झाला आहे.

१४८. पैगंबरांना कितीही कसोटीतून जावे लागो अल्लाहची मदत त्याच्या च सोबत असते. यास्तव पैगंबराचे वचन नेहमी उच्च असते व त्यास प्रतिष्ठा लाभते. त्याचे प्रमाण मन मस्तिष्कास वर ताबा मिळवते जेव्हा सत्य असत्याचा संघर्ष घडून येतो तर पैगंबरा सोबत नेहमी राहणारे सत्य वर्चस्वशाली ठरते.

१४९. पैगंबराचा साथ देणाऱ्या ईमान धारकांना सर्वश्रेष्ठ अल्लाहने आपले सैन्य या अर्थाने घेतले आहे आणि फर्माविले की शेवटी हेच सैन्य प्रभुत्वशाली राहील. पैगंबरांच्या इतिहास या गोष्टीची साक्ष देतो, यास्तव फिरऔनच्या मुकाबल्यात विजय बनी इस्राईल चाच झाला. इतर पैगंबरां बाबत ही असेच घडले की त्यांच्य विरोधकांचा नायनाट केला गेला व ईमान बाळगणाऱ्यांना वाचवले गेले आणि शेवटी अधिकार त्यांनाच लाभला पैगंबर मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या बाबत ही कुरआनाचे निवेदन शब्दश: खरे ठरले ईमान बाळंगणाऱ्यांचे सैन्य शेवटी काफीरांवर वर्चस्वी झाले आणि अरब च्या भूमीवर इस्लामची अधिसत्ता प्रस्थापित झाली.

१५०. म्हणजे ते जेव्हा इन्कार करण्यावरच अडून बसले आहेत तर एक काळापावेतो त्यांना त्यांच्या दशेवर सोडा.

१५१. म्हणजे परिणतिची प्रतिक्षा करा.

१५२. अर्थात लवकरच त्यांना आपल्या दुष्परिणतीस तोंड द्यावे लागेल यास्तव याच्या काही काळांनतर लढयांचा क्रम सुरु झाला आणि ईमान बाळगणाऱ्यांच्या हस्ते काफीरांना मृत्यु मुखी पडावे लागले येथपावेतो की त्यांचा अगदी नि:पात झाला.

१७६.काय ते आमच्या शिक्षे करीता घाई माजवत आहेत?

أَفَبِعَذَابِنَا يَسْتَعْجِلُونَ ﴿١٧٦﴾

१७७.जेव्हा ती (शिक्षा) यांच्या अंगणात अवतरीत होईल, तेव्हा मोठी वाईट असेल त्या लोकांची सकाळ, ज्यांना या पासून खबरदार केले गेले आहे.[१५३]

فَإِذَا نَزَلَ بِسَاحَتِهِمْ فَسَاءَ صَبَاحُ الْمُنْذَرِينَ ﴿١٧٧﴾

१७८. तेव्हा यांच्या कडून लक्ष हटवा एक वेळ पावेतो.

وَتَوَلَّ عَنْهُمْ حَتَّىٰ حِينٍ ﴿١٧٨﴾

१७९.आणि बघत राहा, ते ही लवकरच पाहतील.

وَأَبْصِرْ فَسَوْفَ يُبْصِرُونَ ﴿١٧٩﴾

१८०.पवित्र आहे तुमचा पालन कर्ता, प्रतिष्ठावान पालनकर्ता,[१५४] त्या गोष्टीं पासून ज्या हे लोक निवेदितात.[१५५]

سُبْحَانَ رَبِّكَ رَبِّ الْعِزَّةِ عَمَّا يَصِفُونَ ﴿١٨٠﴾

१८१.आणि सलाम आहे पैगंबरांवर.[१५६]

وَسَلَامٌ عَلَى الْمُرْسَلِينَ ﴿١٨١﴾

१८२.आणि प्रशंसा आहे सर्व विश्वांच्या मालक (रब्ब) अल्लाह करीता.[१५७]

وَالْحَمْدُ لِلَّهِ رَبِّ الْعَالَمِينَ ﴿١٨٢﴾

१५३. बद्रची लढाई देखील सकाळच्या वेळेस झाली ज्यात ईमान धारकांची तरवार काफीरांवर ईश-प्रकोप बनून अवतरली. तसेच मक्का विजयाची घटना ही सकाळचीच होय, जेव्हा पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) दहा हजार सैन्यासह मक्का शहरात दाखल झाले आणि काबागृहास आपल्या ताब्यात घेऊन मस्जिदे हराम मध्ये स्थानापन्न झाले आणि तेथून काफीरांना पकडण्याचे व त्यांना ठार करण्याचे आदेश जारी केले अशा प्रकारे अल्लाहचा प्रकोप ईमान धारकांच्या तरवारीच्या रुपाने मक्केच्या काफीरांवर अवतरला आणि ही सकाळ त्यांच्या करीता मोठी दुर्दैवी सकाळ ठरली. अशा प्रकारचे कुरआनाचे कथन शब्दास:खरे ठरले.

१५४. मूळ शब्द 'रब्बुल इज्जत' या ठिकाणी प्रतिष्ठावान शी अभिप्रेत वर्चस्वशाली, सत्ताधिकारी आणि उच्चपदस्थ.

१५५. म्हणजे त्या समस्त व्यंग, दोष व उणीवां पासून ज्याचा अनेकेश्‍वरवादी अल्लाहशी संबंध जोडतात.

१५६. म्हणजे समस्त पैगंबर करीता अल्लाह जवळ शांती व सलामती आहे. ते समस्त आपत्ति पासून सुरक्षित आहेत आणि या गोष्टीस पात्र आहेत की ईमान बाळगणाऱ्यांच्या जीभेवर त्यांच्याकरीता प्रार्थनात्मक वचने असावीत.
وَسَلٰمٌ عَلَى الْمُرْسَلِيْنَ स्मस्त पैगंबरांवर सलाम असो.

१५७. संकेत या गोष्टी कडे की अल्लाहने आपल्या पैगंबरांची ज्या प्रकारे मदद केली आणि त्यांच्या करीता कसोटया च्या प्रकारे दर्जा उंचावण्यास कारक ठरल्या या बद्दल निश्चितच तो प्रशंसा व कृतज्ञता व्यक्त करण्यास पात्र आहे.

हम्द (प्रशंसा)च्या स्पष्टीकरणा साठी पहा सूरह फातेहा टीप क्रं.२

# सूरह सॉद

# ३८. सूरह सॉद

**शिर्षकः** सूरह चा आरंभ सॉद या अरबी अक्षराने झाला आहे तद्नुपंगे या सूरह चे नाव 'सॉद' असे आहे.

**अवतरण काळः** मक्की आहे आणि मजकूरां वरुन असे दिसून येते की प्रेषितत्वाच्या आठ-दहा वर्षांनी अवतरली असेल.

**मध्यवर्ति कल्पनाः** स्मरण घडविणे होय, या पैलूने की अल्लाह कडे रुजू आणि पश्चात्ताप ची दग्ध स्थिती निर्माण व्हावी.यास्तव यात प्रेषितांच्या चारित्र्याच्या या पैलूस प्रकट केले गेले आहे.

**आयत रचनाः** आयत क्र. १ ते ११ प्रास्ताविक स्वरुपाची वचने होत. ज्यात कुरआन स्मरण घडविणारा ग्रंथ असण्याच्या पैलूस प्रकट करीत सावध केले गेले आहे की जे लोक या स्मरणिके पासून बोध घेणार नाहीत ते आपल्या दुष्परिणती प्रत पोहचतील.

आयत क्र. १२ ते १६ मध्ये संक्षिप्तपणे त्या जनसमूहांच्या परिणती पासून खबरदार केले गेले आहे ज्यांनी पैगंबरांना खोटे ठरविले होते.

आयत क्र. १७ ते ४८ मध्ये पैगंबरांच्या चारित्र्याचे ते पैलू सादर केले गेले आहेत, जे रुजू व पश्चातापाची उत्कृष्ट उदाहरणे होत.

आयत क्र. ४९ ते ६४ मध्ये अल्लाहचे भय बाळगणाऱ्यांची व त्याच्याशी बंड करणाऱ्यांची, आखिरतच्या वेळेची वेगवेगळी परिणती निवेदिली गेली आहे.

आयत क्र. ६५ ते ८५ मध्ये पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या 'नजीर' (खबरदार करणारा) असण्याच्या पात्रतेस स्पष्ट करतांना इन्कार-करणाऱ्यांना सावध केले गेले आहे की त्यांनी लक्षात ठेवावे की त्यांच्या घमेंडीची ही तीच दशा होईल. जी इब्लीस म्हणजे सैतानाच्या घमेंडीची झाली.

आयत क्र. ८६ ते ८८ सूरहच्या समारोपाच्या आयती होत. ज्यात पैगंबरांचे प्रमाणिक व्यक्तिमत्व, कुरआनाची बोधपूर्ण शिकवण व त्याने दिलेल्या वार्ते चे अपरिहार्य पणे घडून येण्याकडे संकेत निर्देश केला गेला आहे.

# ३८. सूरह सॉद

سُوْرَةُ صٓ

आयती- ८८

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِیْمِ

१. सॉद.[१] बोध पूर्ण कुरआनाची शपथ [२] (हा अल्लाहने अवतरीत केलेला आहे )

صٓ وَالْقُرْاٰنِ ذِی الذِّكْرِ ۝١

२. परंतु इन्कार करणारे घमेंड आणि हेकेखोरीत पडले आहेत.[३]

بَلِ الَّذِیْنَ كَفَرُوْا فِیْ عِزَّةٍ وَّشِقَاقٍ ۝٢

३. यांच्या पूर्वी आम्ही किती तरी जन समूहांना नष्ट करुन टाकले आहे. ते अशा वेळी ओरडले जेव्हा (जीव) वाचण्याचा कोणताच उपाय शिल्लक राहीला नव्हता.[४]

كَمْ اَهْلَكْنَا مِنْ قَبْلِهِمْ مِّنْ قَرْنٍ فَنَادَوْا وَّلَاتَ حِیْنَ مَنَاصٍ ۝٣

४. या लोकांना या गोष्टी बद्दल नवल वाटले की यांच्या जवळ, यांच्या पैकीच एक खबरदार करणारा आला, आणि काफीर म्हणाले, हा जादूगार आहे. खोटारडा.

وَعَجِبُوْٓا اَنْ جَآءَهُمْ مُّنْذِرٌ مِّنْهُمْ وَقَالَ الْكٰفِرُوْنَ هٰذَا سٰحِرٌ كَذَّابٌ ۝٤

५. काय याने समस्त उपास्यांच्या ठायी एक उपास्य बनविले ? ही तर मोठी विचित्र गोष्ट होय.[५]

اَجَعَلَ الْاٰلِهَةَ اِلٰهًا وَّاحِدًا ۚ اِنَّ هٰذَا لَشَیْءٌ عُجَابٌ ۝٥

६. त्यांचे सरदार उठून चालू लागले की, चला आणि आपल्या उपास्यांवर अटळ राहा. या गोष्टी पासून (जी हा मनुष्य बोलत आहे) अपेक्षित काही निराळेच आहे.[६]

وَانْطَلَقَ الْمَلَاُ مِنْهُمْ اَنِ امْشُوْا وَاصْبِرُوْا عَلٰٓی اٰلِهَتِكُمْ ۚ اِنَّ هٰذَا لَشَیْءٌ یُّرَادُ ۝٦

७. ही गोष्ट आम्ही पूर्वी होऊन गेलेल्या धर्मावलंबी मध्ये नाही ऐकली.[७] ही केवळ मनोरचित गोष्ट होय.

مَا سَمِعْنَا بِهٰذَا فِی الْمِلَّةِ الْاٰخِرَةِ ۚ اِنْ هٰذَآ اِلَّا اخْتِلَاقٌ ۝٧

१. हे संदिग्ध अक्षरां पैकी होय. स्पष्टीकरणा साठी पहा सूरह बकरा टीप क्र. १, सूरह युनूस टीप क्र. १ आणि सूरह अन्कबूत टीप क्र. १

या सूरह मध्ये 'सॉद' चा संकेत घोडयाकडे आहे. साफिनात हा शब्द आयत क्र. ३१ मध्ये हजरत सुलेमान यांच्या घोडयां करीता वापरला गेला आहे हा एक विशेष शब्द (Significant word) आहे. अशी अक्षरे ज्या सूरतींच्या प्रारंभी आली आहेत, ती त्या सूरतींशी केवळ गाढ संबंध च बाळगत नाही तर ध्वनिविषयक दृष्टया ही त्यांच्याशी अनुरुप आहेत, ज्यामुळे वाणीत मोठी ओजस्विता निर्माण झाली आहे. ही अक्षरे आपापल्या जागी अशा प्रकारे योग्य आहेत की जर एखादा मनुष्य एका अक्षराला दुसऱ्या अक्षराने बदलू इच्छिल तर ही योग्यता व ध्वनि अनुरुपता बाकी राहणार नाही. उदाहरणार्थ आयत 'सॉद वल कुरआनि जिज जिक्र' صٓ وَالْقُرْاٰنِ ذِی الذِّکْرِ मध्ये 'सॉद' च्या जागी कॉफ हे अक्षर घेतल्यास आणि सूरह काफ ची पहिली आयत 'काफ वल कुरआनिल मजीद' قٓ وَالْقُرْاٰنِ الْمَجِیْدِ मध्ये काफच्या जागी सॉद घेतल्यास वाचतांना संकोच ही जाणवेल आणि योग्यता ही राहणार नाही. हा या गोष्टीचा पुरावा होय की कुरआन एक चमत्कार पूर्ण ग्रंथ आहे, ज्याचे एक अक्षर ही दुसऱ्या अक्षराशी बदलविले जाऊ शकत नाही. तसेच ही अक्षरे संबंधित आयती शी अशा प्रकारे संलग्न आहेत की जर एखादा मनुष्य यांना वगळून आयतीचे पठण करु इच्छिल, उदा. صٓ وَالْقُرْاٰنِ ذِی الذِّکْرِ "सॉद" वल कुरआनि. जिज जिक्रच्या ऐवजी वल-कुरआनि ज़िज जिक्र وَالْقُرْاٰنِ ذِی الذِّکْرِ असे पठण करु इच्छिल तर त्यास मोठी पोकळी, उणीव जाणवेल. हे या गोष्टीचे प्रमाण होय की संदिग्ध अक्षरे कुरआनात सहज म्हणून आलेली नाहीत, किंबहुना ती कुरआनाच्या चमत्कारपूर्ण वैभवास व्यक्त करतात.

२. कुरआनाचे एक महत्वपूर्ण वैशिष्टय हे आहे की तो बोधपूर्ण गोष्टी नी ओतप्रोत भरलेला आहे. बोध दायकता या गोष्टीची की अल्लाहच माणसाचा पालनकर्ता आहे व या गोष्टीची ही की 'कर्मफळ' एक हकीगत आहे, या गोष्टीची ही की पैगंबरांना खोटे ठरविणाऱ्यांना दुष्परिणतीशी तोंड द्यावे लागले, या गोष्टीची ही की समस्त अवतरीत ग्रंथांची शिकवण एकमेव ईश्वराशी दास्यत्व, सदाचार व ईश-भयाची च शिकवण होती. तसेच या धडयाची ही उजळणी, जो पहिल्या दिवशी हजरत आदम यांना दिला गेला की सैतान माणसाचा शत्रू आहे त्याच्या धोका पूर्ण बहकाविण्यात येऊ नये.

कुरआनाचे हे स्मरण घडविणे सत्य आणि सचोटी वर आधारीत आहे व आपल्या अंगी कमालीची प्रभाव शैली बाळगते अर्थात त्याचे हे वैशिष्टयपूर्ण वैभव तो अल्लाह ची वाणी असल्याचे प्रमाण होय.

३. म्हणजे अल्लाहने बोध दायक गोष्टींनी भरलेला हा ग्रंथ अशाकरीता अवतरीत केला की लोकांनी बोध ग्रहण करावा परंतु हे इन्कार करणारे या पासून कसलाच धडा घेत नाही आणि धडा न घेण्याचे कारण असे की हे लोक घमेंड व हेकेखोर वृत्तीत मग्न आहेत एकीकडे आपल्या स्वत:विषयीचा अंहकाराने त्यांना सत्य स्वीकारण्या पासून रोखलेले आहे तर दुसरीकडे पक्षपात. अगदी हीच अवस्था आजच्या काळातील कुरआनाचा इन्कार करणाऱ्यांची ही आहे. कुरआनाच्या शिकवणी शी परिचित असून ही या कारणास्तव आपल्या भूमिकेला चिटकून आहेत की या शिकवणीचा स्विकार करण्यात त्यांना आपल्या प्रतिष्ठेस गालबोट लागेल असे वाटते. आणि धार्मिक पक्षपात ही एका अशा धर्माला स्विकारण्यात अडसर बनतो जो त्यांच्या आपल्या संप्रदाया चा धर्म नाही.

४. म्हणजे त्या नष्ट झालेल्या जनसमूहांची दशा ही राहीली की प्रथम तर त्यांनी उपदेशांस ऐकून न ऐकल्या सारखे केले, परंतु जेव्हा ईश प्रकोप प्रकट झाला तेव्हा आर्जवे करु लागले. परंतु अवधि संपल्या नंतर ते ईश प्रकोपा पासून कोठे वाचू शकत होते?

५. म्हणजे समस्त उपास्यांना खोटे व केवळ एक अल्लाह ला खरेखुरे उपास्य ठरविले. अनेकेश्वरवाद्यांना या गोष्टीचे नवल वाटते की ईश्वर एकच कसा असू शकतो. ईश्वर तर एकाहून अधिक असले पाहीजेत. निदान तीन किंवा जास्तीत जास्त सहस्त्रावधि, खरे पाहता ही बुद्धिगम्य नसणारी गोष्ट अनेकविध ईश्वरांची कल्पना च होय.

६. हे चित्र आहे, पैगंबरां जवळून सरदारांच्या उठून चालू लागण्याचे, आपल्या साथीदारांना हे सांगत की त्यांनी पैगंबरा पासून दूर व्हावे आणि आपल्या उपास्यांच्या भक्ति वर अटळ राहावे कारण बाहयत: तर हा मनुष्य अल्लाह ला एकमेव उपास्य मानण्याचे आवाहन करीत आहे, परंतु याचा हेतु काही वेगळाच आहे म्हणजे आपल्या नेतृत्वाचे बस्तान बसविणे.

७. म्हणजे आमचा जो धर्म पूर्वीच्या लोकां पासून चालत आला आहे तो हाच अनेकेश्वरवादी धर्म होय. अल्लाहला एकमेव उपास्य ठरविण्याची गोष्ट तर आम्ही त्या लोकां कडून ऐकलेली नाही.

अनेकेश्वरवाद्यांची ही गोष्ट अगदी चुकीची होती,कारण तौहीद (एकेश्वरवादा) चा स्पष्ट पुरावा काबागृह होते, ज्याची वास्तु -उभारणी हजरत इब्राहीम व हजरत इस्माईल या मान्यवर पैगंबरांनी केली होती आणि कुरेश लोक त्यांचेच वंशज होते. आणि पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या शुभागमनापूर्वी ही एकेश्वर वादास मानणारे थोडेयाफार प्रमाणात होते.

८. काय आमच्या दरम्यान याच माणसा वर स्मरणिका अवतरीत केली गेली ! [८] खरी गोष्ट अशी की हे लोक माझ्या स्मरणिके बाबत संशय-ग्रस्त आहेत. त्यांनी अजून माझ्या प्रकोपाची गोडी नाही चाखली.[९]

ءَأُنْزِلَ عَلَيْهِ الذِّكْرُ مِنْ بَيْنِنَا ۚ بَلْ هُمْ فِي شَكٍّ مِّنْ ذِكْرِي ۚ بَلْ لَّمَّا يَذُوقُوا عَذَابِ ﴿٨﴾

९. काय तुमच्या प्रभुत्वशाली आणि उदार पालन कर्त्याच्या कृपेचे खजीने यांच्या जवळ आहेत?[१०]

أَمْ عِنْدَهُمْ خَزَائِنُ رَحْمَةِ رَبِّكَ الْعَزِيزِ الْوَهَّابِ ﴿٩﴾

१०. कि हे आकाश व जमीन आणि यांच्या दरम्यान च्या अस्तित्वांवर अधिकार बाळगतात ? असे आहे तर त्यांनी आकाशांवर चढून जावे.[११]

أَمْ لَهُمْ مُلْكُ السَّمٰوٰتِ وَالْأَرْضِ وَمَا بَيْنَهُمَا ۖ فَلْيَرْتَقُوا فِي الْأَسْبَابِ ﴿١٠﴾

११. हे (काफीर) समूहां पैकी एक सैन्य होय जे याच ठिकाणी पराभूत होईल.[१२]

جُنْدٌ مَّا هُنَالِكَ مَهْزُومٌ مِّنَ الْأَحْزَابِ ﴿١١﴾

१२. यांच्या पूर्वी नूह जन समूह, आद जन समूह आणि लश्करे बाळगणाऱ्या फिरऔन ने खोटे ठरविले होते.

كَذَّبَتْ قَبْلَهُمْ قَوْمُ نُوحٍ وَّعَادٌ وَّفِرْعَوْنُ ذُو الْأَوْتَادِ ﴿١٢﴾

१३. आणि समूद व लूत जन समूह आणि अयका वाल्यां नी ही [१३] हे ते समूह होते.

وَثَمُودُ وَقَوْمُ لُوطٍ وَّأَصْحٰبُ لْـَٔيْكَةِ ۚ أُولٰٓئِكَ الْأَحْزَابُ ﴿١٣﴾

१४. ज्यापैकी प्रत्येकाने पैगंबरांना खोटे ठरविले तेव्हा माझा प्रकोप त्यांच्या वर घडून आला.

إِنْ كُلٌّ إِلَّا كَذَّبَ الرُّسُلَ فَحَقَّ عِقَابِ ﴿١٤﴾

१५. हे लोक एका भयंकर आवाजाची वाट बघत आहे, ज्या नंतर किंचित ही विलंब होणार नाही.[१४]

وَمَا يَنْظُرُ هٰٓؤُلَآءِ إِلَّا صَيْحَةً وَّاحِدَةً مَّا لَهَا مِنْ فَوَاقٍ ﴿١٥﴾

१६. आणि हे लोक म्हणतात, हे आमच्या पालन कर्त्या ! हिशेबाच्या दिवसा आधीच आम्हाला आमचा हिस्सा त्वरीत देऊन टाक.[१५]

وَقَالُوا رَبَّنَا عَجِّلْ لَّنَا قِطَّنَا قَبْلَ يَوْمِ الْحِسَابِ ﴿١٦﴾

१७. (हे पैगंबर !) यांच्या वक्तव्यावर सहनशीलता पाळा आणि आमचा दास दाऊद ची स्थिती निवेदन करा, जो सामर्थ्य सम्पन्न होता [१६] तो अल्लाहकडे मोठा रुजू करणारा होता.[१७]

اِصْبِرْ عَلٰى مَا يَقُولُونَ وَاذْكُرْ عَبْدَنَا دَاوُدَ ذَا الْأَيْدِ ۚ إِنَّهُ أَوَّابٌ ﴿١٧﴾

८. म्हणजे अल्लाहला ग्रंथ अवतरीत करावयाचा च होता तर त्याने आमच्या मधून याच माणसाची निवड का केली आणि मोठयामोठ्या सरदारांना का नाही?

९. हे सर्वश्रेष्ठ अल्लाहचे निवेदन आहे की या लोकांना खरे तर या गोष्टीचा विश्वासच होत नाही की अल्लाह तर्फे एखादा बोधदायक ग्रंथ अवतरीत होऊ शकतो आणि जेव्हा प्रमाणे उपलब्ध असतांना ही हे संशयात पडले आहेत तर त्यांचा हा संशय त्याच वेळी दूर होईल जेव्हा ते ईश शिक्षेच्या तावडीत सापडतील.

१०. हे त्यांच्या या आक्षेपाचे उत्तर होय की आमच्या मधून याच माणसाची प्रेषित पदा साठी का निवड झाली. फर्माविले गेले. अल्लाहच्या कृपेचे खजीने यांच्या जवळ आहेत की अल्लाह यांच्या मर्जीनुसार प्रेषित पदा करीता एखाद्याची निवड करतो. जर वस्तुस्थिती अशी नाही आणि अल्लाहच्या कृपेचे खजीने अल्लाहच्या च ताब्यात आहेत. तेव्हा मग तो आपल्या कृपेने ज्याला देखील उपकृत करील, कोणाला आक्षेप घेण्याचा काय अधिकार ? तो वर्चस्वशाली आहे म्हणून त्याचा प्रत्येक फैसला कोणत्याही परिस्थितीत लागू पडतो आणि यात हस्तक्षेप करण्याची कोणाची ही मजाल नाही आणि तो उदार आहे म्हणून आपल्या ज्या दासाला इच्छितो आपल्या देणग्यांनी सम्पन्न करुन टाकतो.

११. म्हणजे जर आकाश व जमीनी ची सत्ता यांना प्राप्त आहे तर मग हे आकाशात चढून का नाही जात? आणि जी वही (ईश-संदेश) तेथून हे पैगंबर! तुमच्यावर अवतरीत होत आहे, तिला रोखत का नाही? जर या गोष्टी यांच्या आवाक्यातल्या नाहीत आणि उघडपणे नाहीतच. तर मग अल्लाहच्या फैसल्याच्या विरोधात, जो त्याने प्रेषित पदा संदर्भात फर्माविला आहे, त्यांचे गर्वोन्मत्त होण्याचा काय अर्थ?

१२. म्हणजे आज हे अल्लाहच्या प्रेषिताच्या विरोधात घमेंडी बनलेले आहेत परंतु लवकरच ती वेळ येईल जेव्हा सत्य असत्याच्या युद्धाचे मैदान पेट घेईल त्या वेळी या इन्कार करणाऱ्यांचे लश्कर अगदी हलके ठरेल आणि याच जागी वाईट रित्या पराभूत होईल. यास्तव मक्का विजयाच्या प्रसंगी या काफिरांचे लष्कर अगदी कूचकामी होते, येथपावेतो की हे लोक इस्लाम च्या सैन्याशी दोन हात करुच शकले नाहीत. अशा प्रकारे कुरआनाचे हे भकित खरे ठरले की पैगंबरांच्या विरोधात काफिरांचे हे सैन्य शेवटी पराभूत होईल अगदी त्याच प्रमाणे जसे काफिरांच्या दुसऱ्या समूहांनी पैगंबरांच्या मुकाबल्यात पराजय पत्कारला होता.

१३. अभिप्रेत हजरत शुएब यांचा जन समूह होय. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह हिज्र टीप क्र. ७७

१४. भयंकर आवाजाशी अभिप्रेत कियामतीचा दुसरा सूर होय. हा भंयकर आवाज असा असेल की समस्त मेलेले लोक त्वरित जिवंत उठून उभे राहतील. यासाठी की आपल्या पालन कर्त्या समोर आपल्या कृत कर्मांचा जाब द्यावा. या भयंकर अवाजा नंतर कोणतीही सवलत आणि कोणही थोडासा वेळ दिला जाणार नाही कारण तत्क्षणीच अल्लाहच्या समोर हजर व्हावे लागेल.

१५. कर्म लेखाच्या हिशेबाच्या दिवसाची गोष्ट जेव्हा करणाऱ्यां समोर केली जाते तेव्हा ते गंभीर होत नाही उलट असे म्हणतात की जो अजाब (ईश प्रकोप) आमच्या वाटयाला येणार आहे, तो याचि देही याचे डोळा लाभल्यास उत्तम. कियामत पर्यंत कोण धीर धरील?

१६. अर्थात हजरत दाऊद यांचे व्यक्तित्व मोठे सामर्थ्य शाली होते. शारिरीक दृष्या ही ते मोठे सशक्त होते म्हणूनच जालूत सारख्या हैकल ला त्यांनी एकटयानेच पछाडले होते (सूरह बकरा आयत क्र. २५१) आणि त्यांनी या युद्धात जे शौर्य दाखविले, त्याच्या परिणामी त्यांचे व्यक्तित्वास निखार आला.तसेच त्यांच्या हाती लोखंडास नरम केले गेले होते आणि ते यापासून चिलखते तयार करीत. त्याच प्रमाणे ते राजकिय दृष्या ही बरेच सामर्थ्यवान होते कारण त्यांचे साम्राज्य अतिशय मजबूत व स्थीर होते.

१७. अल्लाहकडे रुजू करण्याचा अर्थ त्याच्याकडे एकाग्रचित्त होणे कोणत्याही व्यवहारा बाबत त्याच्याकडे पलटणे आपल्या अपराधांची त्याच्या समोर माफी मागणे आणि त्याच्या उपासनेचा व आज्ञापालनाचा मार्ग अनुसरणे.

हजरत दाऊद यांच्या या गुण विशेषांना निवेदन करण्याचा हेतु येथे हे स्पष्ट करण्याचा आहे की नष्ट केल्या गेलेल्या आद् समूद व फिरऔन इ. जनसमूहांना अल्लाहने सामर्थ्यशाली बनविले होते. परंतु त्यांनी या सामर्थ्यांच्या घमेंडीत अल्लाहशी विद्रोह केला. याऊलट हजरत दाऊद यांचे व्यक्तिमत्व असे आहे की अतिशय सामर्थ्यशाली असूनही ते अल्लाहकडे रुजू करणारे होते. या लोकांनी जर या व्यक्तिमत्वाचा आदर्श आपल्या समोर ठेवला, तर ते आपल्या भौतिक सामर्थ्यावर उडया मारणार नाहीत किंबहुना अल्लाहकडे रुजू करणारे बनतील.

१८. आम्ही पर्वतांना अधीन केले होते की ते याच्या सह संध्याकाळी व सकाळी त्याच्या पवित्र्याचा जाप करीत असत,[१८]

إِنَّا سَخَّرْنَا الْجِبَالَ مَعَهُ يُسَبِّحْنَ بِالْعَشِيِّ وَالْإِشْرَاقِ ﴿١٨﴾

१९. आणि पक्ष्यानी ही एकत्र होऊन.[१९]सर्व अल्लाहकडे रुजू करणारे होते.[२०]

وَالطَّيْرَ مَحْشُورَةً ۖ كُلٌّ لَّهُ أَوَّابٌ ﴿١٩﴾

२०. आम्ही त्याचे राज्य मजबूत केले होते [२१] आणि त्यास बुद्धि [२२]आणि निर्णायक गोष्ट सादर करण्याचे सामर्थ्य प्रदान केले होते.[२३]

وَشَدَدْنَا مُلْكَهُ وَآتَيْنَاهُ الْحِكْمَةَ وَفَصْلَ الْخِطَابِ ﴿٢٠﴾

२१. काय तुमच्या पावेतो खटल्या वाल्यांची खबर पोहचली आहे? जे भिंतीवर चढून एकांत जागेत घुसले होते.[२४]

وَهَلْ أَتَاكَ نَبَأُ الْخَصْمِ إِذْ تَسَوَّرُوا الْمِحْرَابَ ﴿٢١﴾

२२. जेव्हा ते दाऊद जवळ पोहचले तेव्हा तो यांना पाहून घाबरला.[२५] ते म्हणाले, भिऊ नका आम्ही दाव्याचे दोन पक्ष आहोत. एकाने दुसऱ्या वर अतिरेक केला आहे. तुम्ही आमच्या दरम्यान सत्या सह निवाडा करुन द्या आणि अन्याय करु नका आणि आम्हाला सरळ मार्ग दाखवा.[२६]

إِذْ دَخَلُوا عَلَىٰ دَاوُودَ فَفَزِعَ مِنْهُمْ ۖ قَالُوا لَا تَخَفْ ۖ خَصْمَانِ بَغَىٰ
بَعْضُنَا عَلَىٰ بَعْضٍ فَاحْكُم بَيْنَنَا بِالْحَقِّ وَلَا تُشْطِطْ وَاهْدِنَا إِلَىٰ
سَوَاءِ الصِّرَاطِ ﴿٢٢﴾

२३. हा माझा भाऊ आहे. याच्या जवळ नव्याण्णव मेंढया आहेत आणि माझ्या जवळ एकच मेंढी आहे. हा म्हणाला ही सुद्धा माझ्या हवाली कर आणि वाद विवादात याने मला चेपून टाकले.[२७]

إِنَّ هَٰذَا أَخِي لَهُ تِسْعٌ وَتِسْعُونَ نَعْجَةً وَلِيَ نَعْجَةٌ وَاحِدَةٌ
فَقَالَ أَكْفِلْنِيهَا وَعَزَّنِي فِي الْخِطَابِ ﴿٢٣﴾

२४. दाऊद म्हणाला,याने तुमच्या मेंढीस आपल्या मेंढी मध्ये मिसळवण्या ची मागणी करुन निश्चितच तुमच्यावर अत्याचार केला [२८]आणि बहुतेक भागीदार एकमेंकांवर अतिरेक करतात,[२९] केवळ तेच लोक यापासून सुरक्षित आहेत जे ईमान बाळगतात आणि सत्कर्म करतात [३०]आणि असे लोक फार कमी आहेत[३१]आणि दाऊद ला उमजले की आम्ही त्याची कसोटी घेतली आहे; आणि (हे लक्षात येताच) त्याने आपल्या रब (पालन कर्त्या) शी क्षमा याचना केली व त्याच्या पुढयात झुकला आणि रुजू केले.[३२]

قَالَ لَقَدْ ظَلَمَكَ بِسُؤَالِ نَعْجَتِكَ إِلَىٰ نِعَاجِهِ ۖ وَإِنَّ كَثِيرًا مِّنَ
الْخُلَطَاءِ لَيَبْغِي بَعْضُهُمْ عَلَىٰ بَعْضٍ إِلَّا الَّذِينَ آمَنُوا وَعَمِلُوا
الصَّالِحَاتِ وَقَلِيلٌ مَّا هُمْ ۗ وَظَنَّ دَاوُودُ أَنَّمَا فَتَنَّاهُ فَاسْتَغْفَرَ رَبَّهُ
وَخَرَّ رَاكِعًا وَأَنَابَ ۩ ﴿٢٤﴾

१८. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह अंबिया टीप क्र. १०६

१९. हजरत दाऊद जेव्हा आपल्या विशिष्ट स्वरात ईश-स्तवनात मग्न होत तेव्हा पर्वतांमधून ही तेच बोल निनादत आणि पक्ष्यांचे थवेच्या थवे जमा होऊन ईश स्तवनात सुरेल स्वराने साथ देत. अशा प्रकारे मोठे आनंदमय वातावरण निर्माण होत असे. हा अल्लाहतर्फे हजरत दाऊद यांच्या करीता एक चमत्कार प्रकटला.

२०. म्हणजे केवळ दाऊदच नव्हे तर त्यांच्या सोबत पर्वत आणि पक्षी ही अल्लाहचे ध्यान करण्यात मग्न होत असत.

२१. अर्थात इस्राईलने पॅलेस्टीन मध्ये प्रवेश केल्या नंतर त्यांना सतत लढायांना तोंड द्यावे लागले आणि क्रमश: ते पलेस्टीनचे  इलाके जिंकत गेले. येथपावेतो की हजरत दाऊद यांच्या हस्ते एका मजबुत राज्याची स्थापना झाली. परिणामी साम्राज्याचा विस्तार बराच वाढला.

२२. अर्थात आकलन आणि बुद्धिमत्ता.

२३. म्हणजे त्यांना काटेकोर व निर्णायक गोष्ट बोलण्याची असामान्य गुणवत्ता लाभली होती. म्हणून त्यांच्या बोलण्यात कमालीचा प्रभाव असे आणि दाव्यांचा निवाडा करतांना ही त्यांचे हे वैशिष्टय दिसून येई.

२४. या ठिकाणी त्या वादींची घटना निवेदिली जात आहे, जे अचानक भिंत ओलांडून हजरत दाऊद यांच्या एकांत स्थळी दाखल झाले. 'मेहराब' शी अभिप्रेत एकांत स्थळ होय जे उपासने करीता खास करुन होते. यावरुन असे दिसून येते की जेव्हा दावेदार आत घुसले त्यावेळी हजरत दाऊद उपासनेत गर्क असतील.

२५. ते अवेळी हजरत दाऊद यांच्या जवळ पोहचले होते आणि एकांत स्थळाचे द्वार बंद असलेले पाहून भिंतीवर चढून आत घुसले होते. त्यांच्या या अशा अचानक आगमनाने हजरत दाऊद घाबरले की माहीत नाही हे कोणत्या इराद्याने आले आहेत. अर्थात त्यांचे हे घाबरणे स्वाभाविकच होते.

२६. दावेदारांनी हजरत दाऊद यांना निश्चित केले की आमच्या येण्यांचा हेतु या पलिकडे आणखी काहीच नाही की जो तंटा आमच्या दरम्यान उद्‌भवला आहे त्याचा आपण निवाडा करावा. परंतु त्यांच्या संभाषणाची शैली असभ्य होती म्हणून त्यांनी हे कठोर शब्द अनाठायी वापरले की अन्याय करु नका. खरे पाहता हजरत दाऊद पैगंबर होते आणि एकाद्या पैगंबरा विषयी ही कल्पना केली जाऊ शकत नाही की तो अन्याय करील.

२७. एका पक्षाने दावा अशा प्रकारे सादर केला की हा दुसरा वादी वास्तविक माझा भाऊ आहे आणि नव्याण्णव मेंढयांचा मालक आहे आणि माझी फक्त एकच मेंढी आहे, जिच्या बाबत याचे म्हणणे असे की हिला ही माझ्या हवाली कर मला ही गोष्ट पसंत नाही परंतु वाद विवादात हा मला मात देतो आणि या गोष्टीवरुन आमचे आपसात भांडण होते तेव्हा आपण न्यायपूर्ण निवाडा करावा की याची मागणी न्याय्य आहे अथवा नाही.

स्पष्ट असावे की दुसऱ्या पक्षाने पहिल्या पक्षाकडे ही मागणी केली नव्हती की तू मला आपली एक मेंढी ही देऊन टाक किंबहुना अशी मागणी केली होती की तिला ही माझ्या हवाली कर यासाठी मी तिची देखरेख करीन. मूळ ग्रंथातील 'तिला माझ्या पालकत्वात दे या वाक्यावरुन उघड होते. त्याचा इरादा तर त्या मेंढीला हडप करण्याचाच असावा म्हणूनच तो या गोष्टीचा आग्रह धरुन होता की त्याने मेंढीला हवाली करावे जेणेकरुन त्याने आपल्या नव्व्याण्णव मेंढयांमध्येस तिला सामील करुन शंभरांची संख्या पूर्ण करावी. परंतु त्याने आपली ही लालसा पूर्ण करण्या करीता मागणी या स्वरूपात मांडली की तो या एकटया मेंढीची राखण करु इच्छितो तो त्याचा भाऊ होता म्हणून त्याने जोर देऊन म्हटले असेल की तू आपल्या एका मेंढीला चारण्याची व तिचे पालन पोषण करण्याची व्यवस्था कोठून करशील माझ्या नव्व्याण्णव मेंढयांमध्ये तिला सामील करशील तर सहजपणे ही व्यवस्था होईल. परंतु त्याच्या भावाच्या हे लक्षात आले की याची निती बिघडली आहे म्हणून तो आपल्या मेंढीस त्याच्या हवाली करण्यास नकार देत राहीला परंतु जेव्हा त्याच्या भावाकडून आग्रह वाढत गेला व भांडण तंटया पर्यंत पाळी आली तेव्हा दोन्ही पक्ष निवाडया करीता हजरत दाऊद जवळ आले.

२८. दुसऱ्या पक्षाचे म्हणणे ही निश्चितच हजरत दाऊद यांनी ऐकले असेल कारण कोणत्याही न्याय देणाऱ्या कडून ही अपेक्षा केली जाऊ शकत नाही की तो एकाच पक्षाचे म्हणणे ऐकून निवाडा देईल. परंतु कुरआनाने ते याचे निवेदन अशासाठी उल्लेखिले नाही की त्याच्या निवेदनाने पहिल्या पक्षाचा दावा चुकीचा ठरत नव्हता, विशेषत: यासाठी ही की दुसऱ्या पक्षा (नव्व्याण्णव मेंढीचा मालक) चा दावा हा नव्हता की ही मेंढी माझी आहे. जसे वरील टीपणीत स्पष्ट केले गेले आहे.

हजरत दाऊद यांनी निवाडा हा दिला की या माणसाच्या एका मेंढीस आपल्या मेंढया मध्ये सामील करुन घेण्याची दुसऱ्या पक्षाची मागणी अगदी चुकीची व पहिल्या पक्षाचा हक्क हिरावून घेणारी आहे. जेव्हा पहिला पक्ष आपल्या मेंढीस दुसऱ्या पक्षाच्या हवाली करु इच्छित नाही तर त्याला आपल्या गोष्टीचा आग्रह धरण्याचा काहीच अधिकार नाही निर्णय अगदी योग्य व न्याय्य होता.

२९. भागीदार सामान्यत: एकमेकांवर अन्याय करतात.

त्यांच्या संदर्भात हजरत दाऊद यांनी हे न्यायालयीन मत व्यक्त केले (Observed) यात या गोष्टीकडे संकेत की या गरीब माणसाची एक मेंढी आपल्या संपत्तित सामील करण्याची मागणी तिला हडप करण्याची एक युक्ती होय.

३०. वादी प्रतिवादीनी हजरत दाऊद यांना ही देखील विनंती केली होती त्यांनी यांना सरळ मार्ग दाखवावा यास्तव हजरत दाऊद यांनी आपल्या निर्णय सादर करतांना हे मार्गदर्शनही केले की ईमान पूर्ण व सदाचारावर आधारीत जीवन च माणसांना ईश्वराच्या इतर दासांचे हक्क हिरावून घेण्यापासून वाचवू शकते.

३१. म्हणजे अल्लाहचे असे दास जे आपल्या ईमानात सच्चे आणि आपल्या कर्म विषयक जीवनात सदाचारी असावेत फार थोडेच आहेत आणि ही वस्तुस्थिती आहे की असे लोक प्रत्येक काळात अत्यल्प राहीले आहेत. कारण आपल्या अंगी चांगले गुण निर्माण करणे हे सर्वाधिक कठीण काम होय आणि जगात उच्च दर्जाच्या वस्तू कमीच आढळतात. रत्ने माणके, हिरे मोठ्या प्रयासाने आढळतात, उलट दगडांची रेलचेल आहे. सोने फार थोडे च गवसते, उलट इतर सर्वधातु मोठया प्रमाणात आढळतात. तेव्हा अल्लाह ज्याला सुबुद्धि प्रदान करील तोच सच्चा मोमिन व सदाचारी बनतो.

३२. तंटा मांडणाऱ्यारनी अवेळी आणि भिंत ओलांडून खलिफाच्या इमारतीत शिरण्याचे जे साहस केले होते आणि संभाषणाची जी अवमान कारक शैली अंगिकारली होती, त्याबद्दल हजरत दाऊद यांनी अत्याधिक संयम व धैर्याने काम घेतले आणि सत्य व न्याया सह खटल्याचा निकाल दिला त्याच बरोबर त्यांचे लक्ष या गोष्टीकडे वळले की खटला वाल्यांची ही हिम्मत सर्वश्रेष्ठ अल्लाह तर्फ त्यांच्या करीता कसोटी होती आणि जेव्हा एखाद्या शुद्धित असलेल्या माणसाला ठोकर लागते तेव्हा त्याला आपला अपराध आठवतो. हजरत दाऊद यांना ही त्या वेळी आपला अपराध आठवला म्हणून तत्क्षणी ते अल्लाहच्या माफीचे याचक बनले. त्याच्या पुढे झुकून सजद्यात पडले आणि मन:पूर्वक पश्चाताप दग्ध होऊन त्याच्याकडे वळले.

हे होते हजरत दाऊद यांचे आदर्श चारित्र्य की एक महान राज्यसत्तेचा स्वामी असून ही त्यांची निष्ठा प्रामाणिकता ईश भय व पश्चात्तापाची ही दशा होती की ते आपल्या कर्मांचा हिशेब घेत व आपल्या अपराधांवर लज्जित होऊन त्यासाठी अल्लाहशी क्षमा याचना करीत. त्यांच्या कारकिर्दीत गरीबंना न्याय मिळे आणि त्यांची शासन व्यवस्था न्यायपूर्ण व सदाचारावर आधारीत शासन व्यवस्था होती.

ही सजद्याची आयत होय म्हणून तिचे पठण केल्यावर किंवा ऐकल्यावर सजदा केला पाहिजे. या साठी की वाचक किंवा श्रोत्याच्या मनात रुजू (प्रवृत्त होणे) व पश्चात्तापाची कैफियत निर्माण व्हावी. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) द्वारे या प्रसंगी सजदा करणे सिद्ध आहे. (बुखारी अबवाब सुजूदुल कुरआन)

**आम्ही आकाश व जमीन आणि यांच्या दरम्यान च्या अस्तित्वांना निरुद्देश्य (उगीच) निर्माण केले नाही. हा त्या लोकांचा भ्रम आहे ज्यांनी कुफ्र केले तेव्हा अशा काफिरां करीता आग स्वरुप सर्वनाश आहे.(अल-क़ुर्आन)**

२५. तेव्हा आम्ही त्याचा अपराध माफ केला.[३३] आणि निःसंशय, त्याच्या करीता आमच्या जवळ निकटचे स्थान आणि उत्कृष्ट ठिकाण आहे.

فَغَفَرْنَا لَهُ ذَٰلِكَ ۖ وَإِنَّ لَهُ عِندَنَا لَزُلْفَىٰ
وَحُسْنَ مَآبٍ ﴿٢٥﴾

२६. हे दाऊद ! आम्ही तुम्हाला पृथ्वीवर खलीफा [३४] बनविले आहे यास्तव लोकांच्या दरम्यान सत्यनिष्ठ निवाढा (फैसला) करा आणि मना च्या इच्छेचे अनुसरण करु नका की तिने तुम्हाला अल्लाहच्या मार्गा पासून विचलीत करावे.[३५] जे लोक अल्लाहच्या मार्गा पासून भटकतात त्यांच्या करीता सक्त शिक्षा आहे. या कारणास्तव की ते हिशेबाच्या दिवसाला विसरले.[३६]

يَا دَاوُودُ إِنَّا جَعَلْنَاكَ خَلِيفَةً فِي الْأَرْضِ فَاحْكُم بَيْنَ النَّاسِ
بِالْحَقِّ وَلَا تَتَّبِعِ الْهَوَىٰ فَيُضِلَّكَ عَن سَبِيلِ اللَّهِ ۚ إِنَّ
الَّذِينَ يَضِلُّونَ عَن سَبِيلِ اللَّهِ لَهُمْ عَذَابٌ شَدِيدٌ بِمَا نَسُوا
يَوْمَ الْحِسَابِ ﴿٢٦﴾

२७. आम्ही आकाश व जमीन आणि यांच्या दरम्यान च्या अस्तित्वांना निरुद्देश्य (उगीच) निर्माण केले नाही.[३७] हा त्या लोकांचा भ्रम आहे ज्यांनी कुफ्र केले [३८] तेव्हा अशा काफिरां करीता आग स्वरुप सर्वनाश आहे.

وَمَا خَلَقْنَا السَّمَاءَ وَالْأَرْضَ وَمَا بَيْنَهُمَا بَاطِلًا ۚ ذَٰلِكَ ظَنُّ
الَّذِينَ كَفَرُوا ۚ فَوَيْلٌ لِّلَّذِينَ كَفَرُوا مِنَ النَّارِ ﴿٢٧﴾

२८. काय आम्ही त्या लोकांना ज्यानी ईमान बाळगले आणि सत्कर्म केले त्या लोकां सारखे बनवू जे जमीनीवर उत्पात माजवितात. काय आम्ही ईश-भय बाळगणाऱ्यांना दुराचाऱ्यां सारखे बनवू?

أَمْ نَجْعَلُ الَّذِينَ آمَنُوا وَعَمِلُوا الصَّالِحَاتِ كَالْمُفْسِدِينَ فِي الْأَرْضِ
أَمْ نَجْعَلُ الْمُتَّقِينَ كَالْفُجَّارِ ﴿٢٨﴾

२९. हा मोठा शुभ ग्रंथ आहे, जो आम्ही (हे पैगंबर!) तुमच्या कडे अवतरीत केला आहे. या साठी की त्यांनी याच्या आयतींवर विचार चिंतन करावे.[४०]आणि अक्क़ल बाळगणाऱ्यांनी या पासून बोध ग्रहण करावा.[४१]

كِتَابٌ أَنزَلْنَاهُ إِلَيْكَ مُبَارَكٌ لِّيَدَّبَّرُوا آيَاتِهِ وَلِيَتَذَكَّرَ
أُولُو الْأَلْبَابِ ﴿٢٩﴾

३०. आणि आम्ही दाऊद ला सुलेमान प्रदान केला [४२] अत्युत्कृष्ट दास [४३] (अल्लाह कडे) फार रुजू करणारा होता.[४४]

وَوَهَبْنَا لِدَاوُودَ سُلَيْمَانَ ۚ نِعْمَ الْعَبْدُ ۖ إِنَّهُ أَوَّابٌ ﴿٣٠﴾

३१. जेव्हा याच्या समोर सायंकाळ च्या वेळी प्रशिक्षित [४५] वेगवान घोडे सादर केले गेले.[४६]

إِذْ عُرِضَ عَلَيْهِ بِالْعَشِيِّ الصَّافِنَاتُ الْجِيَادُ ﴿٣١﴾

३३. हजरत दाऊद यांचा काय अपराध होता याचे स्पष्टीकरण कुरआनात केलेले नाही, परंतु नंतरच्या आयतीवरुन असे दिसून येते की खलिफा (शासन) कर्तव्य पार पाडण्या संदर्भात त्यांच्या हातून एखादी चूक निश्‍चितच झाली होती. ज्याची जाणीव त्यांना त्यावेळी झाली. आता कुरआनाने जेव्हा त्यांच्या अपराधावर पांघरुण घातले आहे तर त्याला उकरुन काढण्याची गरज राहात नाही. ज्या भाष्यकारांनी यांस उकरुन काढण्याचा प्रयत्न केला त्यांनी या आयतींचे प्रमाण बाहेर स्पष्टीकरण केले आणि हजरत दाऊद यांच्या शी अशा गोष्टींचा संबंध जोडला ज्या एका पैगंबराला शोभून दिसणाऱ्या ठरु शकत नाही आणि प्रसिद्ध भाष्यकार इब्ने जरीर तबरी ने तर उघडपणे हित्तीच्या पत्नीशी हजरत दाऊद यांच्या निकाह चा फालतू किस्सा उल्लेखून खेदजनक चूक केली आहे अल्लाह त्यांना माफ करो उरैय्या हित्तीच्या पत्नीशी हजरत दाऊद यांचा निकाहा (विवाह) चा किस्सा खरे तर बायबल मध्ये निवेदिला गेला आहे (२-समूईल प्रकरण ११ -१२) जे हजरत दाऊद यांच्यावर आक्षेप व आळवयांनी पूर्ण व इतका अतिरंजित आहे की त्याचा उल्लेख करण्यास आमची लेखणी असमर्थ आहे.

سُبۡحٰنَكَ هٰذَا بُهۡتَانٌ عَظِيۡمٌ

हा किस्सा थोडा फार बद्दल करुन कथन कर्त्यांनी सादर केला आणि कथनांवर गरजेहून अधिक भरवसा करणाऱ्यांनी त्याला मान्याता दिली परंतु अनेक भाष्यकारांनी जोरदारपणे याचे खंडन ही केले. उदाहरणार्थ अल्लामा राजी यांनी आपल्या भाष्यात या किश्श्याला अगदी लज्जास्पद दर्शविले व त्याचे सप्रमाण खंडन केले आहे आणि अल्लामा इब्ने कसीर यांनी लिहीले आहे:

'या प्रसंगी भाष्यकारांनी एक किस्सा निवेदन केला आहे ज्याचा अधिकांश भाग इस्राईली धर्म ग्रंथामधून घेतला गेला आहे आणि पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) द्वारे या संदर्भात कोणतेही हदीस वचन सिद्ध नाही, ज्याचे अनुसरण आवश्यक ठरावे' (तफसीर इब्ने कसीर खंड ४ पृ. ३१)

आणि मौलाना हिफ्जुर्रहमान आपल्या संशोधनात्मक ग्रंथ 'कससुल कुरआन' मध्ये लिहितात-

'परंतु खेदाची, अत्यंत खेदाची बाब अशी की कुरआनाच्या या पवित्र घोषणे नंतर ही हित्ती उरैय्या ची पत्नी च्या भ्रमिष्ट कथेस तौरात व इस्राईली कथना मधून घेऊन काही भाष्यकारांनी पवित्र कुरआनाच्या भाष्यात उल्लेखिले आणि इस्राईली बकवासाला कसल्याही प्रमाण व पुराव्याशिवाय इस्लामी कथनेचे स्वरुप दिले.'

या साध्या भोळया विभूतिंनि किंचितही हा विचार केला नाही की ज्या कथांना ते आज इस्राईली कथनांच्या स्वरुपात पवित्र कुरआनात उल्लेखित आहेत, उद्या ते कुरआनाच्या आयतींचे भाष्य व स्पष्टीकरण समजले जाऊन समस्त जनसमूहाच्या उपद्रवाचे सबब ठरणार नाही? आणि अतिशय आश्चर्य वाटते त्या काही नव्या जुन्या मीमासकां बद्दल ज्यांनी या प्रकारच्या निंदा नालस्तीजनक मजकुरास कठोर पणे रद्द बातल ठरविण्या ऐवजी व या आरोप घेणाऱ्यांचा नतद्रष्ट ठरविण्या ऐवजी या कथनांचे शुभ स्थळे शोधून त्यांना स्विकारार्ह बनविण्याची खटपट मात्र केली आहे आणि अयोग्या ठिकाणी चांगला समज करुन घेऊन या हकीगतीस दृष्टीआड केले की ही स्पष्टीकरणे जी या दृष्ट कथाबाबत केली जात आहेत, वाळूचे घरकूल मात्र आहेत आणि कोणत्या न कोणत्या शैलीने यास मान्यता दिल्याने पैगंबरांच्या प्रतिष्ठेला या सारख्या महत्वपूर्ण व मूळ इस्लामी श्रद्धे तडा पोहचतो आणि हे की पैगंबर व रसूल यांच्याशी या प्रकारच्या भलत्या सलत्या गोष्टीचा संबंध जोडल्याने त्यांचा व्यक्तिमत्वास गालबोट लागते वास्तविक कुरआनाचे अंतरंग पवित्र आणि नि:स्पृह आहे आणि तो या प्रकारच्या कथनांना मोठा आळ समजतो. असे असतांना एखाद्याला हा अधिकार कोठून पोहचतो की त्याने कुरआनाच्या भाष्यात अशा प्रकारच्या खोडसळ गोष्टींचा उल्लेख करावा' (कससुल कुरआन खंड २ पृ. १५९)

परंतु याहून आश्चर्याची गोष्ट म्हणजे तफहीमुल कुरआन च्या ग्रंथकारा ने ही बायबल च्या या किश्शयाला रिफाइन्ड (Refined)करुन सादर केले आहे आणि त्याचा खुलासा असा केला आहे की-

'असे दिसून येते की हजरत दाऊद यांना या स्त्री च्या गुणां बाबत कोणाकडून तरी माहिती झाली होती आणि त्यांच्या मनात हा विचार आला होता की अशी गुणसम्पन्न स्त्री एखाद्या मामूली अधिकाऱ्याची पत्नी असण्या ऐवजी देशाची राणी असावयात हवी. याच विचाराने प्रभावित होऊन त्यांनी तिच्या पती जवळ ही इच्छा व्यक्त केली की त्याने तिला तलाक द्यावा. या संदर्भात त्यांना वाईटपणा अशासाठी जाणवला नाही की बनी इस्राईल च्या ठिकाणी ही एखादी सदोष गोष्ट समजली जात नव्हती.' (तफहिमुल कुरआन खंड ४ पृ. ३२८)

हा खुलासा ही अगदी चूकीचा व निराधार आहे. हे की हजरत दाऊद यांच्या मनात एका दुसऱ्या माणसाच्या पत्नीशी निकाह करण्याचा विचार उद्‌भवला व त्यांनी तिच्या पतीजवळ आपले मनोगत व्यक्त केले की त्याने तिला तलाक (घटस्फोट) द्यावा. नैतिक दृष्टया अतिशय खालावलेली गोष्ट आहे,

अर्थात एका पैगंबराशी अशा गोष्टीचा संबंध जोडल्याने प्रेषित अस्मितेस कलंक पोहचतो. वास्तविक पैगंबर चारित्र्याच्या उच्च शिखरावर असतो. आणि हे कसे कळले की हजरत दाऊद यांच्या मनात हा कुविचार निर्माण झाला होता. शरीअत विषयक दृष्टीकोनातून ही, ही गोष्ट आक्षेपार्ह ठरते की एखाद्या माणसाला त्याच्या पत्नीस तलाक देण्यास सांगावे, यासाठी की त्याने तलाक दिल्यानंतर तीला तिच्याशी निकाह करता यावा. हे तर पती-पत्नींच्या दरम्यान फूट पाडण्याचे काम ठरेल. याला धर्मशास्त्र विहीतता कशी लाभू शकते? मग अशी गोष्ट जी ना नैतिक दृष्टया योग्य ठरु शकते आणि ना शरीअत च्या दृष्टीने तिचा एका पैगंबराशी संबंध कशा प्रकारे जोडला जाऊ शकतो? विद्वान भाष्यकरांना हा सर्व खटाटोप अशासाठी करावा लागला की अल्लाहने आपल्या पैगंबराच्या एका चूकी वर पांघरुण घातले होते ते ओढण्याचा यांनी असफल प्रयत्न केला. अल्लाह यांना क्षमा करो आणि आपल्या पैगंबर दाऊद यांना सलाम (शांती) व कृपेने उपकृत करो.

३४. या ठिकाणी खलीफा चा अर्थ सत्ताधिकारी व शासक असा आहे बनी इस्राईल वंशाला पॅलेस्टीन भूमीत क्रमश: जी सत्ता प्राप्त होत गेली तिने हजरत दाऊद यांच्या काळात एक मजबूत व दृढ साम्राज्याचे रुप धारण केले. ही एक विशुद्ध इस्लामी राज्य सत्ता होती ज्याचे सूत्र संचालन एका पैगंबराच्या हाती होते. ही खिलाफत (इस्लामी शासन व्यवस्था) त्या राज्या सत्ते पासून अगदी भिन्न होती जिच्या वैशिष्टया मध्ये हुकूमशाही इच्छा भक्ति या सारख्या गोष्टी सामील आहेत. ('खलीफा' या शब्दा च्या अधिक स्पष्टीकरणा साठी पहा सूरह फातिर टीप क्र. ७१)

३५. सत्ताधिकार लाभल्यावर मनुष्य सत्य आणि न्यायाच्या निकडी भागवित नाही, किंबहुना आपल्या इच्छा-आकांक्षा मागे धावून मनाला येईल तसे वागू लागतो. याचा परिणाम मार्गभ्रष्टा होय. यासाठी सर्वश्रेष्ठ अल्लाहने ताकीद फर्माविली की शासनाचे समस्त निवाडे सत्याच्या आधारावर झाले पाहिजेत. हजरत दाऊद यांच्या माध्यमान्वये बनी इस्राईल वंशाला ही सतत ची ताकीद होती की, जो अधिकार त्यांना प्रदान केला गेला आहे, त्यांचा त्यानी गैर वापर करु नये आणि हीच ताकीद मुस्लिम जन समूहा करीता ही आहे की त्यांनी सत्ताधिकार प्राप्त झाल्यानंतर आपल्या शासकिय अधिकारांना सत्य व न्यायाच्या आधारावर वापरात आणावे ज्यात शरीअतचे पालन अपरिहार्यत: सामील आहेत.

३६. स्पष्ट झाले की सत्य व न्यायावर कायम राखणारी गोष्ट म्हणजे कियामतीच्या दिवशी अल्लाह समोर जाब द्यावा लागेल या विषयीचा विश्वास होय.जर ही कल्पना मन मस्तिष्कात भिनली नाही तर इच्छा-आकांक्षा प्रबळ होतात, मग मनुष्य चुकीचे फैसले (निर्णय) करु लागतो व अशा प्रकारे मार्गदर्शनाची वाट चुकतो.

३७. म्हणजे या सृष्टीच्या निर्मितीचे एक उद्दिष्ट व एक लक्ष्य आहे. आणि ते म्हणजे कर्म-फळ व त्यासाठी कियामतीच्या दिवशी अल्लाहचे न्यायालय प्रस्थापित होणे.

३८. म्हणजे जे लोक अल्लाहच्या निशाण्यांचा, ज्या सृष्टी निर्मितीच्या महान उद्देश्याकडे मार्गदर्शन करणाऱ्या आहेत, इन्कार करतात तेच ही कल्पना करतात की याच्या मागे कोणतीही बुद्धिकौशल्य युक्त योजना कार्यरत नाही, किंबहुना ही सृष्टी एक अकस्मात घडणारी घटना म्हणून निर्माण झाली आहे किंवा नेहमी पासून अशीच चालत आली आहे. ईश-संदेशाच्या प्रकाशा पासून वंचित झाल्या नंतर ते या सृष्टीच्या निर्मिती संबंधी कोणताही उचित खुलासा करु शकत नाही.

३९. म्हणजे आखिरत आणि कर्मफळ म्हणून प्राप्त होणाऱ्या शिक्षा किंवा मोबदल्याचा इन्कार करणे याचा अर्थ हा झाला की, अल्लाहच्या दृष्टीने ईमान बाळगणारे सदाचारी व दुराचारी सर्व समान आहेत आणि ईश-भय पूर्ण जीवन जगण्यात व दुराचार व दुष्कृत्यात मग्न होण्यात परिणामाच्या दृष्टीने कसलाच फरक नाही. तसेच अल्लाह ना अत्याचार पिडीताचे गाऱ्हाणे ऐकणारा आहे ना अत्याचारींना शिक्षा देणारा आहे. परंतु काय विवेक बुद्धि आणि मानव स्वभाव या विचाराचे समर्थन करतो? मुळीच नाही. ना विवेक बुद्धि सदाचारी व दुराचारींना समान ठरवते आणि ना मनुष्य स्वभाव अत्याचारीस व अत्याचार पिडीतास एकाच पातळीवर ठेवतो. आणि हा या गोष्टीचा स्पष्ट पुरावा होय की ईश संदेश मोबदला व शिक्षे बद्दल जी खबर देत आहे ती अगदी सत्य आहे.

४०. कुरआन एक शुभ ग्रंथ असण्याचा अर्थ असा की तो मांगल्य स्त्रोत आहे आणि त्याची लाभदायकता कधीच संपणार नाही. जो मनुष्य देखील यावर विशुद्ध बुद्धिने विचार चिंतन करील, तो त्याच्या लाभा पासून वंचित राहणार नाही आणि जो मनुष्य या ग्रंथावर जेवढे चिंतन करील तेवढया जास्त प्रमाणात तो लाभन्वित होईल. आणि जितका जास्त खोलवर जाईल तेवढे जास्त ज्ञान व अध्यात्माचे मोती वेचून घेईल.

कुरआनाने विचार चिंतनाचे जे आवाहन केले आहे, ते ज्ञात असतांनाही बहुसंख्य मुस्लिम असे आहेत जे केवळ तिलावत (पठण) करण्यासच पर्याप्त समजतात आणि याच्या

अर्थ आशयास समजून घेण्याची व त्यावर विचार चिंतन करण्याची त्यांनी जणू गरजच भासत नाही. परिणामी त्यांचा या ग्रंथाशी असलेला संबंध फार कमजोर झाला आहे आणि त्याच्या लाभदायकते पासून त्यांनी स्वत:ला वंचित करुन घेतले आहे. अल्लामा शोकानी यांनी आपल्या भाष्यात कुरआनाच्या आकलनावर जोर देतांना लिहीले आहे :-

‘या आयतीत या गोष्टीचे प्रमाण आहे की पवित्र अल्लाहने कुरआन अशासाठी अवतरीत केला आहे की याच्या अर्थावर चिंतन केले जावे. विचार चिंतना शिवाय केवळ तिलावत (पठणा) करीता अवतरीत केले गेले नाही.’

(फतहुल कदीर खं ४ पृ. ४३०)

४१. म्हणजे जे लोक आपल्या बुद्धिचा वापर करतील, त्यांना या ग्रंथाच्या अध्ययनाने स्मरणिका (बोध) व उपदेश प्राप्त होईल आणि कुरआनाचे सर्व प्रथम उद्दिष्ट हेच की लोकांनी या ईश-ग्रंथा पासून लाभान्वित व्हावे. अर्थात हा लाभ एक सामन्य माणूसही याचा अभ्यास करुन प्राप्त करु शकतो. मात्र या अटीवर की हा अभ्यास त्याने विशुद्ध बुद्धिने करावा.

४२. म्हणजे हजरत दाऊद यांना सुलेमान सारखा पुत्र प्रदान केला. अधिक स्पष्टिकरणा साठी पहा सूरह अंबिया टीप. क्र. १०४ आणि सूरह नमल टीप. क्र. २१

४३. यावरुन बायबलच्या त्या चुकीच्या निवेदना चे आपोआप खंडन होते जे हजरत सुलेमान विषयी दिले गेले आहे आणि ज्या द्वारे त्यांचे चारित्र्य कलंकित होते. जेव्हा सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्यांना अति उत्कृष्ट दास ठरविले तेव्हा नैतिक व आचरणाच्या दृष्टीने ज्या भलत्या सलत्या गोष्टींचा संबंध त्यांच्याशी जोडला गेला आहे, तो कितपत योग्य असू शकतो?

४४. म्हणजे अल्लाह कडे रुजू करण्याचा (सर्वतोपरि प्रवृत्त होण्याचा) गुणधर्म त्यांच्या ठायी अत्यधिक स्वरुपात होता. ‘रुजू’ विषयी चे स्पष्टीकरण वर टीप क्र. १७ मध्ये केले गेले आहे.

४५. मूळ ग्रंथात اَلصَّافِنَاتُ ‘अस्साफेनात’ हा शब्द प्रयोग केला गेला आहे जो अशा घोडयां करीता वापरला जातो जे अशा प्रकारे उभे असावेत की त्यांचा पुढचा एक पाय उचललेला व दुमडलेला असावा म्हणजे त्याच्या खूराचा फक्त एक किनारा जमीनीवर असावा. अशा पद्धति ने घोडयांचे उभे राहणे या गोष्टीचे लक्षण होय की ते एका इशाऱ्या वर धाव घेण्यास तत्पर आहेत. हे घोडे, ज्याअर्थी जिहाद करीता होते म्हणून त्यांना हे प्रशिक्षण दिले गेले होते. या अनुषंगाने आम्ही ‘‘अस्साफेनात’’ या शब्दाचा अनुवाद ‘प्रशिक्षित घोडे’ असा केला आहे.

४६. सायंकाळ च्या वेळेच्या उल्लेखान्वये हा संकेत निघतो की हे घोडे जिहाद (धर्म युद्धा) च्या मोहीमे वर निघणार होते कारण वाळवंटात प्रवास आधिकतर रात्रीच्या काळात केला जात असे; आणि सकाळ होताच हल्ला चढवला जात असे. (سورہ عادیات:٣) فَالْمُغِيرَاتِ صُبْحًا ‘‘त्या घोडयांची शपथ जे प्रात: काळी हल्ला चढवितात.’’

(सूरह आदियात-३)

आयतिचा अर्थ असा की हजरत सुलेमान यांच्या जवळ अतिशय चांगले, वेगवान आणि प्रशिक्षण दिलेले (Trained) घोडे होते. आणि संध्याकाळी जेव्हा ते जिहादच्या मोहीमेवर पाठविले जाणार होते, हजरत सुलेमान यांच्या समोर आणले गेले.

बायबल मध्ये या घटनेचा उल्लेख तर केला गेला नाही, जो कुरआन ने या ठिकाणी निवेदन केला आहे. परंतु हजरत सुलेमान यांच्या घोडयां (Cavalry) चा उल्लेख आहे-

‘शलमोनाने रथ व राऊत यांचा संग्रह केला, त्याच्या पाशी चौदाशे रथ व बारा हजार राऊत झाले------- शलमोनाचे घोडे मिसर देशातून येत; राजाचे व्यापारी घोडयांच्या एका एका ताडयाची किंमत ठरवून तांडेचे तांडे घेत.’ (राजे-१०-२६ ते २८)

३२. तेव्हा तो म्हणाला, मला या सम्पत्ति चे प्रेम अल्लाह च्या प्रेमा पायी आहे [४७] येथपावेतो की ते पडद्या आड लपले.[४८]

فَقَالَ إِنِّيٓ أَحۡبَبۡتُ حُبَّ ٱلۡخَيۡرِ عَن ذِكۡرِ رَبِّي حَتَّىٰ تَوَارَتۡ بِٱلۡحِجَابِ ﴿٣٢﴾

३३. (त्याने आदेश दिला) त्यांना माझ्या जवळ परत आणा [४९] मग तो त्यांच्या पोटऱ्या व मानां वर हात फिरवू लागला.[५०]

رُدُّوهَا عَلَيَّۖ فَطَفِقَ مَسۡحَۢا بِٱلسُّوقِ وَٱلۡأَعۡنَاقِ ﴿٣٣﴾

३४. आणि आम्ही सुलेमान ची परीक्षा घेतली आणि त्याच्या आसना वर एक धड (कलेवर) टाकून दिले मग त्याने रुजू केले.[५१]

وَلَقَدۡ فَتَنَّا سُلَيۡمَٰنَ وَأَلۡقَيۡنَا عَلَىٰ كُرۡسِيِّهِۦ جَسَدٗا ثُمَّ أَنَابَ ﴿٣٤﴾

३५. त्याने प्रार्थना केली हे माझ्या पालन कर्त्या ! मला क्षमा कर, आणि मला असे राज्य प्रदान कर जे माझ्या नंतर कोणाला ही पात्र ठरु नये. [५२] निःसंशय तू मोठा माफ करणारा आहेस.

قَالَ رَبِّ ٱغۡفِرۡ لِي وَهَبۡ لِي مُلۡكٗا لَّا يَنۢبَغِي لِأَحَدٖ مِّنۢ بَعۡدِيٓۖ إِنَّكَ أَنتَ ٱلۡوَهَّابُ ﴿٣٥﴾

३६. तेव्हा आम्ही हवे ला त्याच्या अधीन केले, जी त्याच्या हुकुमाने जिकडे तो संकल्प करीत असे, मंद मंद पणे वाहत असे.[५३]

فَسَخَّرۡنَا لَهُ ٱلرِّيحَ تَجۡرِي بِأَمۡرِهِۦ رُخَآءً حَيۡثُ أَصَابَ ﴿٣٦﴾

३७. आणि सैतानांना त्याच्या अधीन केले.[५४] प्रत्येक प्रकारचे गवंडी [५५] आणि पाणबुडे.[५६]

وَٱلشَّيَٰطِينَ كُلَّ بَنَّآءٖ وَغَوَّاصٖ ﴿٣٧﴾

३८. आणि इतर श्रृंखलात जखडलेले होते.[५७]

وَءَاخَرِينَ مُقَرَّنِينَ فِي ٱلۡأَصۡفَادِ ﴿٣٨﴾

३९. ही आमची देणगी आहे. अगणित [५८] तेव्हा उपकार करा किंवा रोखून ठेवा.[५९]

هَٰذَا عَطَآؤُنَا فَٱمۡنُنۡ أَوۡ أَمۡسِكۡ بِغَيۡرِ حِسَابٖ ﴿٣٩﴾

४०. आणि त्याच्या करीता आमच्या जवळ निकटचे स्थान व उत्कृष्ट ठिकाण आहे.[६०]

وَإِنَّ لَهُۥ عِندَنَا لَزُلۡفَىٰ وَحُسۡنَ مَـَٔابٖ ﴿٤٠﴾

४१. आणि आमचा दास अय्युब [६१] चे स्मरण करा. जेव्हा त्याने आपल्या पालन कर्त्यास पुकारले की सैतानाने मला अतिशय दुःख व यातनेत ग्रस्त केले आहे.[६२]

وَٱذۡكُرۡ عَبۡدَنَآ أَيُّوبَ إِذۡ نَادَىٰ رَبَّهُۥٓ أَنِّي مَسَّنِيَ ٱلشَّيۡطَٰنُ بِنُصۡبٖ وَعَذَابٍ ﴿٤١﴾

४७. हजरत सुलेमान, त्या घोडयांना, जे फार चांगले होते व ज्यांना युद्धाचे प्रशिक्षण ही दिले गेले होते, पाहून फार आनंदीत झाले, परंतु आपल्या जवळ असलेल्या युद्ध-सामुग्री वर त्यांना आकाश ठेंगणे झाले नाही, किंबहुना त्यांनी अल्लाहचे स्मरण केले आणि फर्माविले, या माल (संपत्ति) शी माझे प्रेम ऐहिक वभैव मिरविण्याच्या हेतुने नाही, तर अल्लाहच्या स्मरणामुळे आहे. कारण ही सम्पत्ति, हे सानर्थ्य, अल्लाहच्या मार्गात जिहाद करण्या करीता उपलब्ध केले गेले आहे. म्हणजे हजरत सुलेमान यांची दृष्टि अल्लाहच्या वचनास उंचाविण्या सारख्या महान ध्येयावर होती, आपल्या राज्याच्या बाह्य थाट-वैभवावर नव्हे. आणि हजरत सुलेमान सारख्या विशाल साम्राज्याच्या स्वामी चे हेच ते आदर्श आचरण होय जे त्यांच्या रुजू, पश्चात्ताप दग्ध वृत्ती चा पुरावा आहे. अर्थात साधन सामुग्री व सत्ताधिकार लाभल्यावर लोक गर्वोन्मत होतात, याऊलट हजरत सुलेमान यांनी जे वर्तन अंगिकारले आहे. तेच वर्तन अल्लाहच्या इतर दासांनी ही पत्करायचे आहे. अर्थात अल्लाह ला प्रत्येक प्रसंगी स्मरणे व त्याच्या कडे प्रवृत्त होणे.

काही भाष्य कारांनी عَنْ ذِكْرِ رَبِّى ''अन जिक्रि रब्बी'' चा अर्थ 'माझ्या पालन कर्त्याच्या स्मरणा पासून गाफिल केले' असा घेतला आहे आणि मग त्या आयतीच्या स्पष्टीकरणार्थ अशा गोष्टी सांगितल्या आहेत. ज्या ना हजरत सुलेमान यांच्या पैगंबरीच महानतेशी सुसंगत आहेत आणि ना त्या द्वारे ते उद्दिष्ट स्पष्ट होते जे या घटनेत सुप्त आहे व ज्याचा संबंध वरील संदर्भाशी आहे. अल्लामा राजी यांनी आपल्या भाष्यात या स्पष्टीकरणा चे परिपूर्ण खंडन केले आहे आणि मौलाना मौदूदी यांनी ही 'तफ्हीमुल कुरआन' मध्ये सबळ प्रमाणां द्वारे या स्पष्टीकरणाच्या आधारे सांगितल्या जाणाऱ्या अनुमान पूर्ण गोष्टी चे खंडन केले आहे.

भाष्यकारांमध्ये खरा मतभेद अरबी अक्षरे **''जर अन''** चे अर्थ निश्चित करण्या संदर्भात झाला आहे हे अक्षर 'या कारणास्तव' च्या **(मिन अजल)** अर्थानेही येते. जसे अरबी भाषेचा सनदशीर कोरा 'लिसानुल अरब' खंड १३ पृ. २९६ मध्ये निवेदिले गेले आहे. तसेच कुरआनात ही सूरह तौबा आयत क्र. ११४ मध्ये अन 'च्या मुळे' या अर्थाने वापरला गेला आहे.

وَمَا كَانَ اسْتِغْفَارُ اِبْرَاهِيْمَ لِاَبِيْهِ اِلَّا عَنْ مَّوْعِدَةٍ وَّعَدَهَا اِيَّاهُ

''आणि इब्राहीम ने आपल्या पित्या करीता जी मग़फिरत (क्षमा) ची प्रार्थना केली होती, ती त्या वायद्या मुळे होती, जो त्याने केला होता.''

अशा प्रकारे सूरह हूद आयत क्र. ५३ मध्ये ही. याच कारणास्तव आम्ही आयतीचा अनुवाद 'मला या सम्पत्तिचे प्रेम अल्लाहच्या स्मरणामुळे आहे' असा केला.

४८. अर्थात हजरत सुलेमान त्या घोड्यांना प्रेमपूर्ण नजरेने पाहात राहीले येथपावेतो की त्यांची दौड सुरु झाली व ते दृष्टी आड झाले. मूळ शब्द ''हिजाब'' याचा अर्थ आड असा आहे. संभवत: घोडे धावत धावत एखाद्या पहाडाच्या अडोशाला चालले गेले असावेत व याच कारणास्तव ते दृष्टीआड झालेत.

४९. जेव्हा घोडे दृष्टीआड झाले, तेव्हा हजरत सुलेमान यांनी पुन्हा त्यांना परत बोलाविले यासाठी की त्यांच्या अंगावरुन हात फिरवावा. ही गोष्ट नंतर त्यांच्या लक्षात आली असेल.

५०. जेव्हा घोडे परत आणले गेले तेव्हा हजरत सुलेमान, प्रेमभावाने त्यांच्या माने वरुन व पायाच्या पोटऱ्यां वरुन हात फिरवू लागले ज्याअर्थी हे युद्धासाठी वापरले जाणारे घोडे होते व जिहाद साठी जात होते म्हणून आपला हात त्यांनी त्यांच्या अवयवां वरुन फिरवला, जे तरवारीच्या वारा खाली येतात. युद्धात शत्रू-सैन्य घोड्यांच्या मानेवर तरवार चालवितात किंवा त्यांचे पाय कापतात. हजरत सुलेमान यांचे त्यांच्या मानेवरुन व पोटऱ्यांवरुन हात फिरविणे या गोष्टीचे लक्षण आहे की ते त्यांना अल्लाहच्या संरक्षणात देत आहेत.

५१. सर्वश्रेष्ठ अल्लाह पैगंबरांची विविध रित्या कसोटी घेत राहिला या साठी की त्यांच्या रुजू (प्रवृत्त) होण्यात व पश्चाताप करण्यात आणखी वाढ व्हावी आणि त्यांचे स्थान अधिक उच्च व्हावे, हजरत सुलेमान यांना ही अल्लाह ने एका विशिष्ट कसोटीत टाकले होते, ज्याचा तपशील कुरआनाने दिलेला नाही, किंबहुना संकेतनिर्देश करण्यातच पर्याप्तता जाणली कारण विचाराधीन उद्दिष्टा करीता एवढेच पुरेसे होते.

आयतीचा बाह्य आशय असा की सर्वश्रेष्ठ अल्लाहने हजरत सुलेमान यांची कुरसी (आसना) वर असाधारण पणे एक धड टाकले होते. अर्थात हे धड माणसाचेच राहीले असावे आणि जेव्हा हजरत सुलेमान यांनी हे पाहीले असेल की माझ्या आसना वर हा कोणता मनुष्य येऊन बसला, तेव्हा घाबरले असतील. परंतु जेव्हा जवळ जाऊन पाहिले असेल तर एका निष्प्राण माणसाचे धड पाहून त्यांना आश्चर्य वाटले असेल की ही काय भानगड आहे. परंतु ते जागृत मनाचे होते. म्हणून त्यांचे लक्ष या गोष्टी कडे वळले असेल की असाधारण पणे एका मेलेल्या माणसाच्या धडाचे त्यांच्या आसनावर येऊन पडणे अल्लाह तर्फे कसोटी आहे आणि

संभवत: ही कसोटी शासक कर्तव्य पार पाडण्या संदर्भात एखादी चूक घडल्या मुळे असावी आणि अल्लाहने त्यांना सावध करु इच्छिले असावे यासाठी त्यांनी अल्लाहकडे रुजू केले आणि क्षमा याचना केली. त्यांच्या चारित्र्याच्या उच्चतमतेचा हाच तो विशेष पैलू होय, ज्यास या ठिकाणी सादर करण्याचा हेतु आहे. एका महान साम्राज्याचा शासक असतांना ही त्यांच्या विनम्रतेची ही स्थिति होती की ते अपल्या अपराधां बाबत अल्लाहजवळ क्षमा याचना करीत आणि अंत:करणा पासून पश्चात्तापदग्ध होऊन अल्लाहकडे एकाग्रचित होत.

आम्हाला हे कळत नाही की आयतीच्या बाह्य आशयाला सोडून अधिक खोलवर जाण्याची काय गरज आहे. परंतु काही भाष्यकारांनी आयतीच्या स्पष्टीकरणार्थ बिनबुडा चे किस्से कहाण्यां चा उल्लेख केला आहे., जे इतके निरर्थक आहेत की यांचा हजरत सुलेमान यांच्याशी संबंध जोडणे फार मोठा भाबडेपणा आहे. यावरून असे दिसून येते की कथा कथनांना मान्य करण्या बाबत तबरी सराख्या भाष्यकाराची पातळी किती खालावलेली राहीली आहे. अल्लामा इब्ने कसीर यांनी अशा कहाण्यांना इस्राईली गोष्टी ठरवित म्हटले आहे -

'इब्ने जरीर व इब्ने अबि हातम इत्यादी भाष्यकारांनी या संदर्भात पूर्वीच्या एका समूहा पासून मोठया प्रमाणात कथनांचा उल्लेख केला आहे. ज्यात अधिकांश, किंबहुना समस्त कथने इस्राईली धर्म ग्रंथांमधून घेतलेली आहेत आणि यापैकी बहुतेक कथनांमध्ये सक्त गूढ गोष्टी आढळतात' (अलबिदाया वन निहाय: खंड २ पृ २६)

आणि काही भाष्यकारांनी बुखारी व मुस्लिमच्या हदीस वचनास या आयतीचे स्पष्टीकरण ठरविले आहे, ज्यात हजरत सुलेमान यांचे एका प्रसंगी इन्शाअल्लाह न म्हणण्याचा व त्याच्या परिणामी त्यांच्या पत्नीला व्यंगपूर्ण मूल होण्याचा किस्सा निवेदिला गेला आहे. परंतु हे हदीस वचन अयोग्य गोष्टीनी युक्त असूनही समजा मान्य केले तर त्यास या आयतीचे स्पष्टीकरण म्हटले जाऊ शकत नाही कारण यात त्या घटने कडे कोणताही संकेत केला गेला नाही जो या आयतीत निवेदिला गेला आहे (अब्दुल वहाब नजार यांनी या हदीस वचनास सकारण न मानण्या योग्य ठरविले आहे- कस्सुल कुरआन पृ. ३२९. ३३१)

५२. म्हणजे असे राज्य जे आपल्या परिने अनुपमेय असावे. हजरत सुलेमान यांचीही प्रार्थना मान्य झाली आणि हवा व जिन्नांना त्याच्या अधीन केले गेले, जसे नंतरच्या आयतींमध्ये निवेदिले गेले आहे आणि ही वस्तुस्थिती आहे की जगात मोठ मोठी राज्ये प्रस्थापित झाली परंतु जी वैशिष्टये हजरत सुलेमान यांच्या साम्राज्याची होती, ती अन्य कोणत्याही साम्राज्यात नव्हती.

हजरत सुलेमान यांनी हे अद्वितीय राज्य कोणत्याही व्यक्तिगत गरजे पोटी मागितले नव्हते किंबहुना अतिश्य पवित्र भावने सह अल्लाहचे वचन उंचावण्या करीता आणि इस्लामी शासनाचे समस्त मुस्लिमेतर राज्यांवर वर्चस्व जाहीर करण्या करीता मागितले होते, तसेच यासाठी ही की अल्लाहचा चमत्कार एका पैगंबराच्या समर्थनार्थ जाहीर व्हावा.

५३. स्पष्टीकरणा साठी पहा सूरह अंबिया टीप क्र. १०९ आणि सूरह सबा टीप क्र. २३

५४. अभिप्रेत बंडखोर जिन्न होत अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह अंबिया टीप क्र. ११० आणि सूरह नमल टीप क्र.२५

५५. स्पष्टीकरणा साठी पहा सूरह सबा टीप क्र. २७

५६. असे जिन्न जे समुद्राच्या तळाशी जाऊन मोती वगैरे आणीत.

५७. म्हणजे बंडखोर जिन्न हजरत सुलेमान यांच्या कैदेत राहात जिन्न एक न दिसून येणारी ईश निर्मिती आहे म्हणून त्यांना जखडून टाकणारी शृंखलाही विशेष प्रकारची असेल.

५८. अगणित देणग्यांचा अर्थ असा नव्हे की अल्लाहला त्याचा हिशेब द्यावा लागणार नाही. एका पैगंबरावर राज्य संबंधाने न्याय वगैरे ची जबाबदारी येते. त्याचा उल्लेख वर आयत क्र. १६ मध्ये केला गेला आहे. म्हणून अशा प्रकारचा अर्थ घेण्यास या ठिकाणी वाव नाही, किंबहुना याचा अर्थ असा की ही देणगी अतिशय विपुल प्रमाणात आहे. कुरआनात एके ठिकाणी फर्माविले गेले आहे की,

وَاللّٰهُ يَرْزُقُ مَنْ يَّشَآءُ بِغَيْرِ حِسَابٍ

''अल्लाह ज्याला इच्छितो अमर्याद अगणित उपाजिविका प्रदान करतो''-(सूरह बकरा आयत क्र. २१२) या आयतीत ही हिशेबा शिवाय शी अभिप्रेत विपुल उपजिविका होय जी अनुमान व अपेक्षे पेक्षा अधिक जास्त असावी, अशी उपजिविका नव्हे, जिच्याबद्दल आखिरत मध्ये हिशेब घेतला जाणार नाही.

५९. म्हणजे त्या जिन्नांपैकी जे तुमच्या ताब्यात दिले गेले आहेत ज्यांना वाटल्यास उपकार करुन सोडून द्या व ज्यांना वाटल्यास आपल्या सेवेसाठी रोखून ठेवा.

६०. अभिप्रेत जन्नत होय.

६१. हजरत अय्यूब यांच्या परिस्थिती विषयी पहा सूरह अंबिया टीप क्र. १११ ते ११३.

६२. म्हणजे मला दोन्ही प्रकारे त्रास पोहचला आहे. आजार पणाचे दु:खही आणि कुटुंबियां पासून दूर होण्याचे दु:ख ही. अर्थात ह्या दु:ख यातना अल्लाहच्या मर्जीने च पोहचल्या होत्या कारण केवळ अल्लाहच लाभ हानी पोहचविणारा आहे. यास्तव हजरत अय्यूब यांनी या दु:ख यातनां च्या निवारणा करीता अल्लाह समोरच गाऱ्हाणे मांडले. परंतु त्यांचा संबंध सैतानाशी अशा साठी जोडला गेला की ही कसोटी जी अल्लाह तर्फे होती, सैतानाच्या उपद्रवाचा परिणाम म्हणून उद्‌भवली होती. आता हा उपद्रव नेमका काय होता ते अल्लाहला माहीत. संभवत: सैतान ने प्रवृत्त केल्या वर एखाद्या कबिल्याने रक्तपात केला असावा व त्यात हजरत अय्यूब यांचे कुटुंब दुरावले गेले असावे. आणि या दु:खा तच ते आजारी पडले असावेत मग हे आजारपण नंतर शिगेला पोहचले असावे. म्हणूनच त्यांनी आपले शारीरिक दु:ख, मानसिक पिडा या दोघांस कारणीभूत सैतानाला ठरविले असावे. अर्थात वस्तुस्थिती चे ज्ञान केवळ अल्लाहला आहे.

हजरत अय्यूब जरी अतिशय आजारी पडले होते, ज्यात त्यांच्या संयम-सहनशीलतेची परीक्षा घेतली गेली, तरी हा विचार करणे योग्य नव्हे की त्यांना एखादा असा आजार जडला होता की ज्यामुळे तिरस्कार व घृणा निर्माण होते. उदाहरणार्थ महारोग वगैरे. माणूस या नात्याने पैगंबर ही आजारी पडतो, परंतु अशा कोणत्याही प्रकारे त्याला रोग ग्रस्त केले जात नाही की लोकांनी त्यांच्या जवळ फिरकू नये कारण अशा स्थितीत केवळ प्रेषित पद च प्रभावित होत नाही, तर आवाहन व कथन, सुधारणा व प्रशिक्षणा चे कार्य देखील प्रभावित होते ज्याकरीता पैगंबरास पाठविले जाते. बायबल मध्ये जो पोथी आहे तो काव्य आणि गद्याचा संग्रह आहे च्या ईयोब नावाने ज्यात मोठया अतिशयोक्ति पूर्ण शैलीत किस्सा सांगितला गेला आहे. यातल्या मजकूरां वरुन स्पष्टत: दिसून येते की हजरत अय्यूब यांच्या घटनेस अगदी चुकीच्या पद्धतिने आणि कथा-कहाणी च्या ढंगात प्रस्तुत केले गेले आहे. बायबल चा स्पष्टीकरण कर्ता लिहितो की याच्या लेखका संबंधी ज्ञात नाही की तो कोण होता.'Despite our richer acquaintance with the back-ground of Job, the name of the author remains quite unknown to us'.

(The Interpreters one -Vol - Commen-tary on the Bible- P. 239)

परंतु ग्रंथ धारकांच्या तोंडून ऐकून कथन कर्त्यांनी ही हजरत अय्यूब विषयी विचित्र व विलक्षण किस्से निवेदिले, जे कुरआनाच्या भाष्यात उल्लेखिले गेले आहेत. या अविश्वासाई किश्शयांचा शेख मुहम्मद बिन अबु शहब यांनी आपल्या 'अल इस्राईलीयात वल मौजुआत फी किताबित्तफसीर' या पुस्तकात चांगला समाचार घेतला आहे. या संदर्भात ते लिहितात :-

'वस्तुस्थिती अशी की या किश्श्याचा ताना-बाना अगदी कमकुवत आहे आणि तो टीके पुढे तग धरु शकत नाही. याचे समर्थन ना विवेक बुद्धि करते आणि ना यथार्थ अनुकरण. हजरत अय्यूब यांना जो रोग जडला होता, तो घृणा व तिरस्कार निर्माण करणारा नव्हाता, किंबहुना असा रोग होता, ज्याचा प्रभाव त्वचेवर जाहीर होत नाही. उदाहरणार्थ रोमेट्रझम, सांधे व हाडांचे विकार वगैरे'.

(वर उल्लेखिलेला ग्रंथ - पान २८१)

आश्चर्याची गोष्ट म्हणजे 'तदब्बुर कुरआन' च्या रचयित्याने ही बायबल ची पोथी 'इयोब' वर विश्वास ठेवून हजरत अय्यूब यांच्या आजारपणा बाबत काही अयोग्य गोष्टींचा उल्लेख केला आहे.

ارْكُضْ بِرِجْلِكَ ۖ هَٰذَا مُغْتَسَلٌ بَارِدٌ وَشَرَابٌ ﴿٤٢﴾

४२. (आम्ही त्याला म्हणालो) आपला पाय जमीनीवर मार. हे थंड पाणी आहे. स्नाना करीता ही आणि पिण्या करीता ही.[६३]

وَوَهَبْنَا لَهُ أَهْلَهُ وَمِثْلَهُم مَّعَهُمْ رَحْمَةً مِّنَّا وَذِكْرَىٰ لِأُولِي الْأَلْبَابِ ﴿٤٣﴾

४३. आम्ही त्याला त्याची बायका मुले प्रदान केली आणि त्यांच्या सोबत अधिक इतकेच. [६४] आपली कृपा म्हणून [६५] आणि बुद्धिमानां करीता स्मरणिका म्हणून. [६६]

وَخُذْ بِيَدِكَ ضِغْثًا فَاضْرِب بِّهِ وَلَا تَحْنَثْ ۗ إِنَّا وَجَدْنَاهُ صَابِرًا ۚ نِّعْمَ الْعَبْدُ ۖ إِنَّهُ أَوَّابٌ ﴿٤٤﴾

४४. आणि (आम्ही त्याला ताकीद केली की) मूठभर काडयांचा एक (गुच्छा) आपल्या हाती घ्या व त्याने मारा आणि आपली शपथ मोडू नका.[६७] आम्हास तो सहनशील आढळून आला. मोठा उत्तम दास. आपल्या पालन कर्त्या कडे मोठा रुजू करणारा होता.

وَاذْكُرْ عِبَادَنَا إِبْرَاهِيمَ وَإِسْحَاقَ وَيَعْقُوبَ أُولِي الْأَيْدِي وَالْأَبْصَارِ ﴿٤٥﴾

४५. आणि आमचे दास इब्राहीम इसहाक व याकूब यांचे स्मरण करा, जे कार्य शक्ति [६८] आणि दृष्टि बाळगणारे होते.[६९]

إِنَّا أَخْلَصْنَاهُم بِخَالِصَةٍ ذِكْرَى الدَّارِ ﴿٤٦﴾

४६. आम्ही त्यांना विशेष करुन घेतले होते, त्या घराच्या स्मरणार्थ. [७०]

وَإِنَّهُمْ عِندَنَا لَمِنَ الْمُصْطَفَيْنَ الْأَخْيَارِ ﴿٤٧﴾

४७. निश्चितच ते आमच्या जवळ निवडक सत्कर्मी दासांपैकी आहेत.

وَاذْكُرْ إِسْمَاعِيلَ وَالْيَسَعَ وَذَا الْكِفْلِ ۖ وَكُلٌّ مِّنَ الْأَخْيَارِ ﴿٤٨﴾

४८. आणि इस्माईल, अलयसअ [७१] व जुलकिफ्ल [७२] चे स्मरण करा. हे सर्व सत्कर्मी दासां पैकी होते.

هَٰذَا ذِكْرٌ ۚ وَإِنَّ لِلْمُتَّقِينَ لَحُسْنَ مَآبٍ ﴿٤٩﴾

४९. ही स्मरणिका आहे.[७३] आणि निःसंशय ईश भय बाळगणाऱ्यां करीता उत्कृष्ट स्थान आहे.

جَنَّاتِ عَدْنٍ مُّفَتَّحَةً لَّهُمُ الْأَبْوَابُ ﴿٥٠﴾

५०. सदैव कालीन जन्नती, ज्यांची दारे यांच्या साठी उघडी असतील. [७४]

६३. सर्वश्रेष्ठ अल्लाहने हजरत अय्यूब यांची दुआ (प्रार्थना) ऐकली व स्विकृत केली आणि त्यांना आरोग्य प्राप्तीचा मार्ग दर्शविला. तो असा की त्यांनी आपला पाय जमीनी वर मारावा, ज्यामुळे थंड पाण्याचा एक झरा प्रवाहीत होईल. या पाण्याने अंघोळ ही करावी व ते प्यावे देखील. हजरत अय्यूब यांनी या मार्गदर्शन नुसार आचरण केले व आरोग्य सम्पन्न झाले. थंड पाण्याच्या झऱ्याचे अशा रीतीने प्रवाहीत होणे अल्लाह तर्फे आपल्या पैगंबरा करीता एक असामान्य गोष्टीची अभिव्यक्ति होती.

या वरुन हे ही दिसून येते की थंड पाण्याने आंघोळ करणे काही रोगां करीता विलक्षण उपाय ठरु शकतो.

६४. सर्वश्रेष्ठ अल्लाहने काही अशी उपाय योजना बनविली की त्यांचे दुरावलेले कुटुंब देखील त्यांना पुन्हा येऊन मिळाले तसेच त्यांच्या मुलाबाळां मध्ये अधिक वाढ झाली म्हणजे त्यांची संख्या दुप्पट झाली.

६५. हजरत अय्यूब जेव्हा या कसोटीत खरे ठरले व त्यांनी धैर्य व सहनशीलते चे उच्चतम उदाहरण प्रस्तुत केले तेव्हा अल्लाहने त्यांना आपल्या कृपेने अशा प्रकारे उपकृत केले की त्यांना केवळ आपले दुरावलेले कुटुंब च लाभले नाही, तर अधिक ईश देणग्या ही प्राप्त झाल्या.

६६. स्पष्टीकरणा करीता पहा सूरह अंबिया टीप क्र. ११४.

६७. कुरआनाने हे स्पष्टीकरण दिले नाही की हा आदेश कोणाला मारण्या करीता दिला गेला होता. बाहयत: असे दिसून येते की आजारपणाच्या कालावधित हजरत अय्यूब यांच्या सहनशीलतेत कोणीतरी अडथळा आणत होता आणि तो त्यांच्याच संबंधितापैकी होता. संभवत: तो त्यांच्या गुलाम असावा आणि जेव्हा त्याने अल्लाहच्या बाबतीत तक्रार दर्शविणाऱ्या गोष्टी केल्या असाव्यात तेव्हा हजरत अय्यूब यांनी ईमान विषयक स्वाभीमानामुळे शपथ पूर्वक म्हटले असावे की त्याला तंबी देण्या करीता ते त्याला कोडे मारतील. परंतु स्वास्थ्य लाभल्यानंतर बहुधा त्या ने माफी मागितली असावी व आजारपणात यांची सेवा देखील करीत राहीला असावा. तेव्हा हजरत अय्यूब यांना हा प्रश्न पडला असावा की जर ते गुलामा ला मारतात, तर बदललेल्या परिस्थितीत एक अनुचित बाब होईल आणि जर असे करीत नाहीत तर शपथ तोडावी लागेल. या प्रसंगी अल्लाहने आपल्या कृपेने त्यांच्या करीता ही घट केली की त्यांनी काडयांचा एक गुच्छा घेऊन त्याने मारावे. अशाने मार ही लागणार नाही व शपथ ही पूर्ण होईल. ही विशिष्ट परिस्थिती लक्षात घेता अल्लाह तर्फे त्यांच्या करीता सौम्यता व सहजतेचा व्यवहार होता. यावरुन हा निष्कर्ष निघतो की जर एखाद्या शरीअत विषयक आदेशाचे पालन एखाद्या उचित सबबीमुळे पुर्णत: होणे शक्य नसेल तेव्हा कमीत कमी त्याच्या बाह्य स्थितीस अवश्य कायम राखले पाहीजे, या साठी की ईश आदेशाच्या पालनाची जाणीव कायम राहावी. परंतु यात बहाण्या करीता कोणतेही प्रमाण नाही आणि अनुचित गोष्टीस उचित ठरविण्या करीता जे निकृद्धतम बहाणे 'शरीअत विषयक सबीबी' च्या नावाने अंगगिकारले जातात त्या शरीअत पासून पळ काढण्याच्या चोरवाटा मात्र आहेत. या संदर्भात बुखारीचा ग्रंथ 'अलहीला' चा अभ्यास बराच लाभप्रद ठरेल. इमाम बुखारी यांनी यात हदीस वचनांचा हवाला देऊन बहाणे बाजी करणाऱ्यांवर अंकूश ठेवला आहे.

६८. अर्थात हे सर्व आचरण सम्पन्न होते. त्यांनी आपली शक्ति, आपले सामर्थ्य अल्लाहची उपासना व आज्ञा पालन त्याच्या धर्माचे आवाहन, शिकवण व स्मृती व त्याचे नाव उंचाविण्यात खर्च केले.

६९. म्हणजे ते डोळस दृष्टी बाळगतात. घटनांचे अंतर्दृष्टिने अवलोकन करीत आणि ज्ञान व अंतर्दृष्टि च्या उजेडात चालत.

७०. या घराशी अभिप्रेत आखिरत चे घर होय. हजरत इब्राहीम हजरत इसहाक आणि हजरत याकूब जे प्रेषित्व. नभाचे दैदिप्थमान तारे आहेत, आखिरत च्या स्मरणिके साठी विशेष केले गेले होते. ते स्वत: देखील आखिरतच्या विवंचनेत ग्रस्त राहात. आणि त्यांचे मिशन देखील हेच होते की लोकांनी आखिरत मुक्ति ची काळजी घ्यावी व आखिरतच्या यशास आपले ध्येय बनवावे.

आखिरत ची आठवण करुन देणे हा समस्त पैगंबरांच्या आवाहनाचा अतिशय महत्वपूर्ण व विशेष पैलू होय. परंतु आजच्या काळात जे लोक इस्लामी आवाहना साठी उठून उभे राहीले आहेत ते आखिरत च्या स्मृती चा काही खास इतमाम करतांना आढळून येत नाहीत.

७१. पहा सूरह अनआम टीप क्र. १४८

७२. पहा सूरह अंबिया टीप क्र. ११६

७३. म्हणजे या सदाचारी दासांचा जो उल्लेख केला गेला व त्यांचे जे वृत्तांत निवेदिले गेले ते आठवण करुन देण्या करीताच होत त्यामागे केवळ किस्से-कहाण्या ऐकविण्याचा हेतु नाही.

७४. म्हणजे ईश-भीरु लोकांच्या स्वागता करीता जन्नत चे दरवाजे खुले राहतील.

५१. यांच्यात ते तक्ये (उशी) लावून बसले असतील. भरपूर मेवे व पेये मागत असतील.

مُتَّكِـِٔينَ فِيهَا يَدۡعُونَ فِيهَا بِفَٰكِهَةٖ كَثِيرَةٖ وَشَرَابٖ ٥١

५२. आणि यांच्या जवळ नजर खाली ठेवणाऱ्या [७५] समवयस्क [७६] स्त्रीया असतील.

وَعِندَهُمۡ قَٰصِرَٰتُ ٱلطَّرۡفِ أَتۡرَابٌ ٥٢

५३. ही आहे ती गोष्ट जिचा तुमच्याशी हिशेबाच्या दिवसा करीता वायदा केला जात होता.

هَٰذَا مَا تُوعَدُونَ لِيَوۡمِ ٱلۡحِسَابِ ٥٣

५४. ही आमची उपजिविका होय जी कधी ही संपणार नाही. [७७]

إِنَّ هَٰذَا لَرِزۡقُنَا مَا لَهُۥ مِن نَّفَادٍ ٥٤

५५. हा आहे (ईश-भय बाळगणाऱ्यांचा शेवट) आणि बंडखोर करीता फार वाईट स्थान आहे. [७८]

هَٰذَاۚ وَإِنَّ لِلطَّٰغِينَ لَشَرَّ مَـَٔابٖ ٥٥

५६. जहन्नम-ज्यात ते दाखल होतील तेव्हा किती वाईट जागा आहे ती !

جَهَنَّمَ يَصۡلَوۡنَهَا فَبِئۡسَ ٱلۡمِهَادُ ٥٦

५७. हे आहे त्यांच्या करीता. तेव्हा त्यांनी याची गोडी चाखावी अर्थात उकळत्या पाण्या ची व पूची.

هَٰذَا فَلۡيَذُوقُوهُ حَمِيمٞ وَغَسَّاقٞ ٥٧

५८. आणि याच प्रकारच्या दुसऱ्या वस्तूंची.[७९]

وَءَاخَرُ مِن شَكۡلِهِۦٓ أَزۡوَٰجٌ ٥٨

५९. ही फौज आहे,जी तुमच्या सोबत (जहन्नम मध्ये) कोसळणार आहे. या लोकां करीता सुस्वागतम नाही. हे आगीत प्रवेश करणार आहेत. [८०]

هَٰذَا فَوۡجٞ مُّقۡتَحِمٞ مَّعَكُمۡ لَا مَرۡحَبَۢا بِهِمۡۚ إِنَّهُمۡ صَالُواْ ٱلنَّارِ ٥٩

६०. ते उत्तर देतील, किंबहुना तुमच्या करीता सुस्वागतम नाही. तुम्हीच आम्हाला या परिणति प्रत पोहचविले.[८१] तर मोठे वाईट आहे हे ठिकाण.

قَالُواْ بَلۡ أَنتُمۡ لَا مَرۡحَبَۢا بِكُمۡۖ أَنتُمۡ قَدَّمۡتُمُوهُ لَنَاۖ فَبِئۡسَ ٱلۡقَرَارُ ٦٠

६१. ते म्हणतील, हे आमच्या पालन कर्त्या ! ज्या लोकांनी आम्हाला या परिणति प्रत पोहचविले, त्यांना जहन्नम मध्ये दुहेरी अजाब (शिक्षा) दे.[८२]

قَالُواْ رَبَّنَا مَن قَدَّمَ لَنَا هَٰذَا فَزِدۡهُ عَذَابٗا ضِعۡفٗا فِي ٱلنَّارِ ٦١

७५. अर्थात लाजाळू स्त्रीया, ज्या आपल्या पती व्यतिरिक्त अन्य कोणाकडे ही नजर वर करुन पाहणे पसंत करीत नाहीत.

७६. म्हणजे सर्व समान वयाच्या तरुण स्त्रीया असतील, मग जगात त्या कितीही अधिक वयाच्या राहील्या असाव्यात. जन्नत मध्ये ना एखादी स्त्री म्हतारी असेल ना एखादा पुरुष म्हातारा. दोघेही सारख्याच रयाने तरुण असतील.

७७. म्हणजे जन्नतच्या या देणग्या त्यांना सदैव लाभतील. यांचा हा क्रम कधीही संपणार नाही.

७८. वर त्या लोकांची परिणति निवेदिली गेली होती, जे अल्लाहचे भय बाळगून त्याच्या दास्यत्वात आपले जीवन व्यतीत करतात आता अशा लोकांची परिणति निवेदिली जात आहे, जे अल्लाहच्या उपासना व आज्ञापालना पासून तोंड फिरवून बंडखोरी चे वर्तन अंगिकारतात. अशा प्रकारे आखिरतच्या परिणतीचा दोन्ही दिशा दर्शाविल्या गेल्या आहेत. या साठी की कुरआनाच्या प्रत्येक वाचकाने यावर विचार करावा की तो स्वत:साठी कोणती परिणति पसंत करतो.

७९. म्हणजे या प्रकारच्या इतर ईश शिक्षेची गोडी त्यांना चाखावी लागेल. माणसाने याची कल्पना केल्यास तो भयकंपित होईल.

८०. या आयती मध्ये जहन्नम मध्ये दाखल होणाऱ्यांचे एक दृश्य प्रस्तुत केले गेले आहे. अल्लाहशी बंड करणारे नेते व समाज प्रमुख जेव्हा जहन्नम च्या जवळ पोहचतील, तेव्हा असे पाहतील की यांच्या मागोमाग यांच्या अनुयायींचे ही सैन्य चालत येत आहे ते (नेते-प्रमुख) आपसात म्हणतील की हे सैन्य देखील आपल्या सोबत जहन्नम मध्ये जाणार आहे. त्यांचे सम्मान पूर्वक स्वागत होणार नाही, किंबहुना मोठ्या अपमानास त्यांना तोंड द्यावे लागेल.

८१. अनुयायी आपल्या नेत्याना व प्रमुखांना उत्तर देतील. अपमान व अवहेलना वास्तविक तुमच्या करीता आहे. कारण तुम्हीच या दुष्परिणति प्रत आम्हाला पोहचविले. अर्थात लोक आपल्या मार्गभ्रष्ट होण्यास आपल्या प्रमुखांना जबाबदार धरतील.

८२. मग ते आपल्या पालन कर्त्या जवळ गाऱ्हाणे मांडतील की आम्हाला ज्या लोकांनी मार्गभ्रष्ट केले होते त्यांना दुहेरी अजाब (शिक्षा) दे. ती अशी की एक आपल्या स्वत:च्या मार्गभ्रष्ट होण्या बद्दल व दुसरी आम्हाला मार्गभ्रष्ट करण्याबद्दल.

६२. आणि ते म्हणतील, हे काय, आम्हाला ते लोक (या ठिकाणी) दिसून येत नाही, ज्यांची आम्ही दुष्ट लोकांत गणना करीत होतो.[८३]

وَقَالُوا مَا لَنَا لَا نَرَىٰ رِجَالًا كُنَّا نَعُدُّهُم مِّنَ الْأَشْرَارِ ﴿٦٢﴾

६३. आम्ही त्यांना उपहास (नीय) बनविले होते की नजर त्यांच्या पासून चुकली आहे.[८४]

أَتَّخَذْنَاهُمْ سِخْرِيًّا أَمْ زَاغَتْ عَنْهُمُ الْأَبْصَارُ ﴿٦٣﴾

६४. नि:संशय जहन्नम वाल्यांचे हे आपसातील भांडण एक सत्य घटना होय.[८५]

إِنَّ ذَٰلِكَ لَحَقٌّ تَخَاصُمُ أَهْلِ النَّارِ ﴿٦٤﴾

६५. सांगा, मी तर खबरदार करणारा आहे आणि एकमेव व जबरदस्त [८६] प्रबल अशा अल्लाह खेरीज कोणी ही उपास्य नाही.

قُلْ إِنَّمَا أَنَا مُنذِرٌ ۖ وَمَا مِنْ إِلَٰهٍ إِلَّا اللَّهُ
الْوَاحِدُ الْقَهَّارُ ﴿٦٥﴾

६६. आकाश आणि जमीन आणि यांच्या दरम्यानच्या समस्त अस्तित्वांचा स्वामी, प्रभूत्वशाली व क्षमा करणारा. [८७]

رَبُّ السَّمَاوَاتِ وَالْأَرْضِ وَمَا بَيْنَهُمَا الْعَزِيزُ الْغَفَّارُ ﴿٦٦﴾

६७. सांगा ही फार मोठी खबर आहे. [८८]

قُلْ هُوَ نَبَأٌ عَظِيمٌ ﴿٦٧﴾

६८. ज्याकडे तुम्ही दुर्लक्ष करीत आहात. [८९]

أَنتُمْ عَنْهُ مُعْرِضُونَ ﴿٦٨﴾

६९. मला उच्च विश्व वासींची काहीच खबर नव्हती, जेव्हा ते भांडत होते.[९०]

مَا كَانَ لِيَ مِنْ عِلْمٍ بِالْمَلَإِ الْأَعْلَىٰ إِذْ يَخْتَصِمُونَ ﴿٦٩﴾

७०. माझ्या कडे वहय (ईश-संदेशाचे अवतरण) केवळ अशा साठी केले जाते की मी उघड रित्या खबरदार करणारा आहे.[९१]

إِن يُوحَىٰ إِلَيَّ إِلَّا أَنَّمَا أَنَا نَذِيرٌ مُّبِينٌ ﴿٧٠﴾

७१. जेव्हा तुमचा पालन कर्ता फरिश्त्यांना म्हणाला, मी माती पासून एक मानव निर्माण करणार आहे. [९२]

إِذْ قَالَ رَبُّكَ لِلْمَلَائِكَةِ إِنِّي خَالِقٌ بَشَرًا مِّن طِينٍ ﴿٧١﴾

७२. तर जेव्हा मी त्यास यथा योग्य बनवीन व त्यात आपला आत्मा फुंकीन [९३] तेव्हा तुम्ही त्याच्या पुढे सजदा करा.

فَإِذَا سَوَّيْتُهُ وَنَفَخْتُ فِيهِ مِن رُّوحِي فَقَعُوا لَهُ سَاجِدِينَ ﴿٧٢﴾

८३. अभिप्रेत ईमान बाळगणारे होत; ज्यांना हे काफिर उपद्रवी समजतात कारण यांच्या मते सत्य धर्माचे आवाहन सांप्रदायिकतेचे आवाहन होते व ते असे समजत की मूर्तिपूजा व अनेकेश्वरवादी श्रद्धेचा विरोध समाजात फूट पाडण्यास कारणीभूत आहे.

८४. काफिरां तर्फे ही आश्चर्याची अभिव्यक्ति होय की आम्ही या लोकांची थट्टा उडविली होती जेव्हा ते सदाचारी होते किंवा ते अन्यत्र कोठेतरी आहेत आणि आमची दृष्टी त्यांना पाहण्यास असमर्थ आहे. अर्थात या जहन्नमी लोकांना या वेळी या गोष्टीची जाणीव होईल की ज्या लोकांना आम्ही त्यांच्या ईमान बाळगण्या बद्दल उपद्रवी ठरवित राहीलो ते खरोखर उपद्रवी नव्हेत. यास्तव ते आज आमच्या सोबत या दुष्परिणतिस पोहचण्याकरीता हजर नाहीत.

८५. म्हणजे जहन्नम मध्ये दाखल होण्या प्रसंगी मार्गभ्रष्ट नेते व त्यांचे अनुसरण करणारा समूह या दोघात जो वादविवाद व भांडण होईल ती अगदी सत्य गोष्ट होय जी अपरिहार्यपणे घडून येईल आणि कुरआन याची पूर्व सूचना देत आहे यासाठी की लोकांनी शुध्दीवर यावे.

८६. मूळ शब्द कहार अर्थात जबरदस्त, ज्याने प्रत्येक गोष्टीस आपल्या ताब्यात घेतले आहे आणि कोणी ही त्याच्या काबू बाहेर नाही आणि ज्याचे आदेश बल:पूर्वक सर्वांना लागू होतात.

८७. अल्लाहचा हा सुपरिचय की तो जबरदस्त सामर्थ्यशाली आहे, संपूर्ण सृष्टीचा स्वामी आहे सर्वांवर प्रभुत्व शाली आहे मनात त्याचे भय व पापभीरुता निर्माण करतो आणि त्याची ही ओळख की तो माफ करणारा आहे, दासांना या गोष्टीस प्रवृत्त करते की त्याने आपल्या अपराधांची त्याच्याजवळ माफी मागावी.

८८. म्हणजे कियामती ची खबर. जेव्हा त्या घटना उद्‌भवतील ज्या वर निवेदिल्या गेल्या आहेत, एक जबरदस्त घटनेची खबर आहे. अशी खबर की जी ऐकताच लोकांना भयाचा धक्का बसायला हवा.

८९. म्हणजे तुमची दशा मोठी विचित्र आहे की कियामती ची एवढी जबरदस्त वार्ता ऐकून ही तुम्ही नि:स्तब्ध आणि निश्चल आहात.

९०. अभिप्रेत ती घटना होय जी पुढे निवेदिली गेली आहे. जेव्हा सर्वश्रेष्ठ अल्लाहने फरिश्त्यांना व सैतानाला आदेश दिला की त्यांनी हजरत आदम यांना सजदा करावा तेव्हा फरिश्ते या आदेशाचे पालन करण्यास तत्पर झाले. परंतु सैतानाला हा आदेश असहय व अप्रिय झाला म्हणून तो या बाबतीत फरिश्त्यांशी वाद घालू लागला व तर्क लढवू लागला. हा किस्सा वरच्या विश्वातील आहे जिथे फरिश्त्यां सोबत त्या वेळी इब्लीस (सैतान) ही उपस्थित होता आणि त्यांच्या दरम्यान आदम ला सजदा करण्या बाबत वाद उद्‌भवला होता.

९१. अर्थात आकाश विश्वाच्या या वार्ता माझ्याप्रत 'वही' (ईश-संदेश) द्वारे पोहचत आहेत अन्यथा मी या घटनांविषयी अगदी अनभिज्ञ होतो आणि माझ्या जवळ ईश संदेश या साठी पोहचत आहे की मी लोकांना खबरदार करावे.

९२. स्पष्टीकरणा साठी पहा सूरह हिज्र टीप क्र. २४

९३. स्पष्टीकरणा साठी पहा सूरह हिज्र टीप क्र. २७

७३. तेव्हा समस्त फरीश्त्यांनी सजदा केला. [९४]

فَسَجَدَ الْمَلٰٓئِكَةُ كُلُّهُمْ اَجْمَعُوْنَ ۙ ﴿۷۳﴾

७४. इबलीस [९५] च्या खेरीज त्याने घमेंड केली आणि इन्कार करणाऱ्यां पैकी झाला.[९६]

اِلَّآ اِبْلِيْسَ ۭ اِسْتَكْبَرَ وَكَانَ مِنَ الْكٰفِرِيْنَ ﴿۷۴﴾

७५. फर्माविले. हे इब्लीस ! तुला कोणत्या गोष्टीने याला सजदा करण्या पासून रोखले, ज्याला मी आपल्या दोन्ही हातांनी [९७] निर्माण केले आहे? तु घमेंड केलीस किंवा विद्रोही झाला आहेस.

قَالَ يٰٓاِبْلِيْسُ مَا مَنَعَكَ اَنْ تَسْجُدَ لِمَا خَلَقْتُ بِيَدَيَّ ۭ
اَسْتَكْبَرْتَ اَمْ كُنْتَ مِنَ الْعَالِيْنَ ﴿۷۵﴾

७६. तो म्हणाला, मी याच्या पेक्षा अधिक श्रेष्ठ आहे. तू मला आगी पासून निर्माण केलेस आणि याला माती पासून.[९८]

قَالَ اَنَا خَيْرٌ مِّنْهُ ۭ خَلَقْتَنِيْ مِنْ نَّارٍ وَّخَلَقْتَهٗ
مِنْ طِيْنٍ ﴿۷۶﴾

७७. फर्माविले, येथून चालता हो [९९] तू बहिष्कृत आहेस.

قَالَ فَاخْرُجْ مِنْهَا فَاِنَّكَ رَجِيْمٌ ﴿۷۷﴾

७८. आणि तुझ्रा माझ्यातर्फे धिक्कार आहे, मोबदल्याच्या दिवसा पावेतो.[१००]

وَّاِنَّ عَلَيْكَ لَعْنَتِيْٓ اِلٰى يَوْمِ الدِّيْنِ ﴿۷۸﴾

७९. तो म्हणाला, हे माझ्या पालन कर्त्या (रब) ! मला त्या दिवसा पावेतो. सवड दे, जेव्हा लोकांना (पुन्हा जिवंत करुन) उठविले जाईल.

قَالَ رَبِّ فَاَنْظِرْنِيْٓ اِلٰى يَوْمِ يُبْعَثُوْنَ ﴿۷۹﴾

८०. फर्माविले, तुला सवड दिली गेली.[१०१]

قَالَ فَاِنَّكَ مِنَ الْمُنْظَرِيْنَ ۙ ﴿۸۰﴾

८१. त्या दिवसा पावेतो ज्याची वेळ निश्चित आहे.[१०२]

اِلٰى يَوْمِ الْوَقْتِ الْمَعْلُوْمِ ﴿۸۱﴾

८२. तो म्हणाला तुझ्या प्रतिष्ठे ची शपथ [१०३] मी या सर्वांना बहकाविल्या खेरीज राहणार नाही.[१०४]

قَالَ فَبِعِزَّتِكَ لَاُغْوِيَنَّهُمْ اَجْمَعِيْنَ ۙ ﴿۸۲﴾

८३. तुझ्या त्या दासां खेरीज ज्यांना तू निखालस केले असेल.[१०५]

اِلَّا عِبَادَكَ مِنْهُمُ الْمُخْلَصِيْنَ ﴿۸۳﴾

९४. हा सजदा उपासनेच्या सजद्याहून अगदी वेगळा असा हजरत आदम यांच्या केवळ आदर सम्मान करीता होता. ज्याचा आदेश सर्वश्रेष्ठ अल्लाहनेच दिलेला होता. या वरुन बुजुर्ग व कबरींच्या पुढे सजदा करण्या साठी कसलीच शास्त्र विहीतता नाही. कारण अल्लाहने ना बुजुर्गांच्या सम्माना साठी सजदा करण्याचा आदेश दिला आहे आणि ना अवलीयां च्या कबरींपुढे सजदा करण्याचा. अधिक स्पष्टीकरणा साठी पहा सूरह बकरा टीप क्र. ४७

९५. स्पष्टीकरणा साठी पहा सूरह बकरा टीप क्र. ४८

९६. स्पष्टीकरणा साठी पहा सूरह बकरा टीप क्र. ४९

९७. सर्वश्रेष्ठ अल्लाहचे हे फर्माविणे की मी आदम ला आपल्या दोन्ही हातांनी घडविले आहे, आदम निर्मितीच्या वैभवास प्रकट करते अर्थात ही अल्लाहची विशिष्ट निर्मिती होय, जिच्या अंगी उच्च प्रतीचे गुण आहेत. आणि अशी श्रेष्ठता यास प्रदान केली गेली आहे की जी जणू अल्लाहच्या निर्मिती ची उत्कृष्ट कृती होय.

या ठिकाणी अल्लाहच्या हातांचा जो उल्लेख केला गेला आहे तर याचे काही स्पष्टीकरण करणे योग्य नव्हे. अल्लाहने आपली ओळख ज्या प्रकारे दिली आहे, तिला त्याच प्रकारे मान्य केली पाहीजे पूर्वजांची रीत हीच होती की कोणत्याही विवादात न पडता या गोष्टींवर जसे त्यांचे निवेदन केले गेले आहे, ईमान बाळगत आणि सलामतीचा हाच मार्ग आहे.

९८. स्पष्टीकरणा साठी पहा सूरह अअराफ टीप क्र. १६

९९. स्पष्टीकरणा साठी पहा सूरह अअराफ टीप क्र. १७

१००. म्हणजे कियामती पर्यंत तुझी अल्लाहतर्फे निर्भत्सना होत राहील आणि कियामतीचा दिवस तर निर्णयाचा दिवस आहे. त्या दिवशी तू निश्चितच शिक्षा भोगशील.

१०१. स्पष्टीकरणा करीता पहा सूरह अअराफ टीप क्र. १८

१०२. म्हणजे कियामतीच्या दिवसा पर्यंत.

१०३. तुझ्या प्रतिष्ठेची शपथ म्हणजे तुझ्या महानतेची शपथ.

१०४. स्पष्टीकरणा साठी पहा सूरह हिज्र टीप क्र. ३६

१०५. स्पष्टीकरणा साठी पहा सूरह हिज्र टीप क्र. ३७

८४. फर्माविले तर सत्य हे आहे आणि मी सत्य च सांगतो.[१०६]

قَالَ فَالْحَقُّ وَالْحَقَّ أَقُولُ ﴿٨٤﴾

८५. कि मी जहन्नम ला तुझ्या द्वारे आणि त्या सर्वां द्वारे भरुन टाकेन जे यापैकी तुझे अनुसरण करतील .[१०७]

لَأَمْلَأَنَّ جَهَنَّمَ مِنْكَ وَمِمَّنْ تَبِعَكَ مِنْهُمْ أَجْمَعِينَ ﴿٨٥﴾

८६. सांगा मी याबदल तुमच्या कडून कसलाही मोबदला मागत नाही. [१०८] आणि ना मी बनावट करणाऱ्यां पैकी आहे.[१०९]

قُلْ مَا أَسْأَلُكُمْ عَلَيْهِ مِنْ أَجْرٍ وَمَا أَنَا مِنَ الْمُتَكَلِّفِينَ ﴿٨٦﴾

८७. ही तर एक स्मरणिका आहे समस्त जग वाल्यां करीता.[११०]

إِنْ هُوَ إِلَّا ذِكْرٌ لِلْعَالَمِينَ ﴿٨٧﴾

८८. आणि थोडयाच अवधि नंतर तुम्हाला याची (दिलेली) वार्ता माहीत पडेल. [१११]

وَلَتَعْلَمُنَّ نَبَأَهُ بَعْدَ حِينٍ ﴿٨٨﴾

१०६. म्हणजे अल्लाहचे प्रत्येक वचन सत्य प्रसंगानुरूप व घटनेच्या वस्तुस्थितीस प्रतिबिंबित करते.

१०७. स्पष्टीकरणा साठी पहा सूरह अअराफ टीप क्र. २२ या ठीकाणी ही घटना निवेदन करण्याचा हेतु कुरआनाचा इन्कार करणाऱ्यांना या गोष्टीबाबत सावध करणे की त्यांनी सैतानाच्या भूलभाषा ना बळी पडू नये. माणसाने मार्गदर्शनाचा मार्ग अंगिकारावा हे तो इच्छित नाही. तसेच इन्कार करणाऱ्यांनी हे ही लक्षात ठेवावे की ज्या प्रकारे सैतान घमेंड केल्या पायी निर्भत्सनेस पात्र ठरला तद्वतच ते देखील घमेंडीत पडून धिक्कार करण्या योग्य ठरु शकतात.

१०८. म्हणजे अपरोक्ष वार्ता सामील असलेला अल्लाहचा हा संदेश जो मी तुम्हाला पोहचवित आहे, या बदल ना तुमच्या कडून कसल्याही मोबदल्या ची मागणी करतो आणि ना याच्या मागे माझी कसली ऐहीक गरज आहे, किंबहुना आपल्या कर्तव्यांचे पालन व तुमच्या शुभचिंतना करीता निःस्पृह होऊन प्रचारा ची ही सेवा पार पाडत आहे.

१०९. म्हणजे माझ्या गोष्टी अगदी स्पष्ट व निर्व्याज आहेत. बनावट करुन मी कोणती ही गोष्ट सांगितलेली नाही यास्तवज्या गोष्टीची मी खबर देत आहे त्यात संशयाला किंचित मात्र जागा नाही.

११०. म्हणजे कुरआन जगातील समस्त जाति, समूहां करीता अल्लाहतर्फे स्मरणिका व बोध म्हणून अवतरला आहे. यास्तव कसल्याही सामूहीक, राष्ट्रीय, व धार्मिक पक्षपातात न पडता याच्या स्मरणा पासून लाभ घ्या.

१११. महणजे कुरआन अपरोक्षाची जी वार्ता देत आहे, त्यांची वास्तविकता लवकरच तुम्हाला कळून येईल. काहीशी मरणाच्या वेळी कळून येईल आणि पूर्णत: कियामतीच्या दिवशी जो लवकरच प्रस्थापित होणार आहे.

# सूरह अज्जुमर

# ३९. सूरह अज्जुमर

**नावः** आयत क्र. ७१ मध्ये काफिरांना जहन्नम कडे 'जुमर' च्या स्वरुपात म्हणजे टोळी टोळीने हाकत नेण्याचा आणि आयत क्र ७३ मध्ये ईश-भय बाळगणाऱ्या सदाचारी लोकांना जन्नत कडे समूहा-समूहा ने नेले जाण्याचा उल्लेख केला गेला आहे. तद्नुषंगे या सूरह चे नाव 'अज्जुमर' असे आहे.

**अवतरण काळः** मक्का चा मध्ययुगीन काळ होय.

**मध्यवर्ति कल्पनाः** आज्ञा पालन व उपासनेस अल्लाहकरीता च खास करणे.

**आयत रचनाः** आयत क्र. १ ते ८ मध्ये कुरआनाच्या या मूळ शिकवणीस सप्रमाण प्रस्तुत केले गेले आहे की दीन (धर्म) केवळ अल्लाह करीताच आहे.

आयत क्र.९ ते २० मध्ये दोन्ही गटातील फरक स्पष्ट केला गेला आहे. एक तो जो विशुद्ध धर्माचा अनुयायी व केवळ अल्लाह चा उपासक आहे आणि दुसरा तो जो अल्लाह खेरीज च्या उपास्यांचा भक्त आहे.

आयत क्र. २१ ते ३५ मध्ये कुरआनाच्या मार्गदर्शनास कबूल करणाऱ्यांची वैशिष्टये व त्यांचा मोबदला निवेदन केला गेला आहे आणि याची उपेक्षा करणाऱ्यांना भयंकर दुष्परिणती बाबत सावध केले गेले आहे.

आयत क्र. ३६ ते ५२ मध्ये अशा प्रकारे ताकीद केली गेली आहे की 'तौहीद' (एकेश्वरवाद) उजळ पणे समोर यावा व ईमान बाळगण्याची प्रेरणा निर्माण व्हावी.

आयत क्र. ५३ ते ६३ मध्ये ईश्वराच्या त्या दासांना जे मार्गहीन अवस्थेत पडले आहेत, अल्लाह कडे वळण्याचे आवाहन केले गेले आहे.

आयत क्र. ६४ ते ७५ सूरह च्या समारोपाच्या आयती आहेत, ज्यात हे स्पष्ट करीत की एकेश्वरवादा ची भूमिकाच दृढ भूमिका होय, कियामती चे एक दृश्य प्रस्तुत केले गेले आहे आणि इन्कार करणारे व ईश-भय बाळगणाऱ्यांचे समूहा समूहा ने आपापल्या ठिकाणाकडे विभक्तपणे रवानगी व त्यांच्या अंतिम परिणतिस निवेदिले गेले आहे.

**झोपण्या पूर्वी या सूरह चे पठण करणेः** 'तिर्मिजी' या हदीस संग्रहात हजरत आयशा द्वारे उल्लिखित आहे की

كَانَ النَّبِىُّ صلى الله عليه وآله وسلم لَايَنَامُ حَتّٰى يَقْرَاءَ بَنِى
اسرائيل وَالزُّمَر۔ (ترمذی ابواب فضائل القرآن)

'पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) सूरह बनी इस्राईल व सूरह जुमर चे पठण केल्या विना झोपत नसत'. (तिर्मिजी अबवाब फजायलुल कुरआन)

# ३९. सूरतुज्जुमर

سُوْرَةُ الزُّمَرِ

आयती-७५

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ

१. या ग्रंथाचे अवतरीत होणे अल्लाह तर्फे आहे [१] जो वर्चस्वशाली आणि बुद्धिकौशल्य बाळगणारा आहे [२]

تَنْزِيْلُ الْكِتٰبِ مِنَ اللّٰهِ الْعَزِيْزِ الْحَكِيْمِ ①

२. हा ग्रंथ आम्ही तुमच्या कडे सत्य (उद्दिष्टा) सह अवतरीत केला आहे. [३] यास्तव तुम्ही अल्लाहचीच उपासना करा. दीन (नम्रता व दास्यत्वा) ला त्याच्या करीता खास करीत.[४]

اِنَّآ اَنْزَلْنَآ اِلَيْكَ الْكِتٰبَ بِالْحَقِّ فَاعْبُدِ اللّٰهَ
مُخْلِصًا لَّهُ الدِّيْنَ ②

३. ऐका ! विशुद्ध धर्म (दास्यत्व) अल्लाह प्रित्यर्थच होय. [५] आणि ज्या लोकांनी इतर कार्यसाधक बनवून ठेवले आहेत (आणि म्हणतात) आम्ही यांची उपासना केवळ या साठी करतो की त्यांनी आम्हाला अल्लाहच्या समीप करावे. [६] निःसंशय, अल्लाह या लोकांच्या दरम्यान या गोष्टीचा निर्णय लावील, ज्यात ते मतभेद करीत आहेत.[७] अल्लाह एखाद्या अशा माणसाला मार्ग दर्शनाचा लाभ घडवित नाही जो खोटारडा व कृतघ्न असावा. [८]

اَلَا لِلّٰهِ الدِّيْنُ الْخَالِصُ ؕ وَالَّذِيْنَ اتَّخَذُوْا مِنْ دُوْنِهٖۤ اَوْلِيَآءَ ۘ
مَا نَعْبُدُهُمْ اِلَّا لِيُقَرِّبُوْنَآ اِلَى اللّٰهِ زُلْفٰى ؕ اِنَّ اللّٰهَ يَحْكُمُ
بَيْنَهُمْ فِيْ مَا هُمْ فِيْهِ يَخْتَلِفُوْنَ ؕ اِنَّ اللّٰهَ لَا يَهْدِيْ مَنْ
هُوَ كٰذِبٌ كَفَّارٌ ③

४. जर अल्लाहने पुत्र बनविण्याची इच्छा बाळगली असती, तर आपल्या निर्मिती मधून वाटेल त्याची निवड केली असती. तो पवित्र आहे (या पासून की त्याचा पुत्र असावा ).[९] तो अल्लाह एक आहे; सर्वांवर मजबूत पकड राखणारा.[१०]

لَوْ اَرَادَ اللّٰهُ اَنْ يَّتَّخِذَ وَلَدًا لَّاصْطَفٰى مِمَّا يَخْلُقُ مَا يَشَآءُ ۙ
سُبْحٰنَهٗ ؕ هُوَ اللّٰهُ الْوَاحِدُ الْقَهَّارُ ④

५. त्याने आकाशांना व जमीनीला हेतुपूर्वक निर्माण केले आहे [११] तो रात्रीला दिवसा वर आणि दिवसाला रात्री वर गुंडाळतो, आणि त्यानेच सूर्य व चंद्राला अधीन करुन ठेवले आहे, ज्या योगे प्रत्येक एका निर्धारीत वेळे पावेतो चालत जात आहे. [१२] ऐका ! तो वर्चस्व शाली आहे. माफ करणारा.[१३]

خَلَقَ السَّمٰوٰتِ وَالْاَرْضَ بِالْحَقِّ ۚ يُكَوِّرُ الَّيْلَ عَلَى النَّهَارِ
وَيُكَوِّرُ النَّهَارَ عَلَى الَّيْلِ وَسَخَّرَ الشَّمْسَ وَالْقَمَرَ ؕ كُلٌّ يَّجْرِيْ
لِاَجَلٍ مُّسَمًّى ؕ اَلَا هُوَ الْعَزِيْزُ الْغَفَّارُ ⑤

१. अर्थात या ग्रंथाचे पैगंबरांवर अवतरीत केले जाणे अल्लाह तर्फेच आहे. यात कोणाचा कसला ही हस्तक्षेप नाही. ना सैताना चा आणि ना माणसाचा. हा आकाशातून अवतरीत केला जात आहे. स्वत: पैगंबरांनी लिहिलेला नव्हे. हा कुरआनाचा फार मोठा दावा आहे, ज्याची त्याने वारंवार पुनरावृत्ति केली आहे. अशासाठी की या ग्रंथाला लोकांनी सर्वसामान्य धर्म-ग्रंथांपैकी एक ग्रंथ समजू नये, किंबहुना चांगल्या प्रकारे हे लक्षात घ्यावे की हा अल्लाह मार्फत अवतरीत केला गेला आहे, आणि म्हणूनच तो अतिशय वैशिष्टय पूर्ण वैभव बाळगतो. आणि ही वस्तुस्थिती आहे की आज जगातील कोणताही धर्म ग्रंथ पवित्र कुरआना खेरीज स्वत:ला दृढता पूर्वक या नात्याने प्रस्तुत करीत नाही की त्यास अवतरीत करणारा अल्लाह संपूर्ण सृष्टीचा सत्ताधिकारी आहे.

२. अल्लाह अजीज (वर्चस्वशाली) आहे. यास्तव त्याची योजना कार्यान्वित झाल्या खेरीज राहात नाही व त्याचे फर्मान पूर्ण होतेच आणि तो हकीम (बुद्धि कौशल्य बाळगणारा) आहे, म्हणून त्याचा ग्रंथ देखील बुध्दि कौशल्याने नटलेला आहे, ज्याचा अनुभव या ग्रंथाच्या पठणाने चांगल्या प्रकारे होऊ शकतो.

३. 'सत्या सह अवतरीत केला आहे' याचा अर्थ असा की हा ग्रंथ सत्य घेऊन अवतरला आहे. याची शिकवण परिपूर्ण सत्य आहे, आणि असत्याचा यात तिळमात्र अंश नाही आणि ना एखादी गोष्ट निरुद्देश्य सांगितली गेली आहे.

४. दीन (धर्मा) ला केवळ त्याच्याच करीता जाणून या वाक्यात 'दिन' हा शब्द दास्यत्व व नम्रता या अर्थाने वापरला गेला आहे याचे समर्थन कुरआना च्या त्या अनेक आयती द्वारे होते ज्यात अनेकेश्वरवाद्यांच्या या आचरणाचा उल्लेख केला गेला आहे की जेव्हा एखाद्या वादळाशी त्यांचा सामना होतो तेव्हा दास्यत्व व नम्रतेस केवळ त्याच्याच करीता जाणून अल्लाहला पुकारतात:

وَاِذَاغَشِيَهُمْ مَّوْجٌ كَالظُّلَلِ دَعَوُااللّٰهَ مُخْلِصِيْنَ
لَهُ الدِّيْنَ ـ (لقمان:٣٢)

'आणि जेव्हा लाटा छप्परां प्रमाणे यांच्यावर आच्छादित होतात, तेव्हा ते अल्लाहला पुकारतात दीन (नम्रता व दास्यत्वा)ला त्याच्याच प्रित्यर्थ खास करुन'. (लूकमान : ३२)

या ठिकाणी 'अद्दिन' चा अर्थ मनाची विनम्रता व दासताच असू शकते आणि हे अनेकेश्वरवाद्यांच्या मानसिकतेचे चित्र रेखाटले गेले आहे, जी वादळ ग्रस्त होण्याचा स्थितीत निर्माण होत असे. यास्तव आयतीचा अर्थ असा की अल्लाहची उपासना अशा प्रकारे करा की मनाची विनम्रता, श्रद्धा-भक्ति (Devotion) आणि दास्यत्वाची शान केवळ त्याच्याच प्रित्यर्थ आहे. आशी उपासना नव्हे, ज्यात मन अल्लाह शिवाय अन्य एखाद्या कडे झुकलेले असावे आणि दास्यत्व व नम्रतेचा नजराणा अन्य एखाद्यास ही अर्पण केला जावा. अल्लाह अशाच उपासनेचा स्विकार करतो, जी अगदी प्रामाणिक मनाने, नम्रता व दास्यत्वाला त्याच्याच प्रित्यर्थ जाणून केली गेली असावी; म्हणजे या नम्रता व दास्यत्वात ना देखावा वगैरे चे मिश्रण असावे आणि ना अल्लाहखेरीजच्या उपास्यांकरीता काही हिस्सा.

स्पष्ट असावे की शब्दकोषात 'दीन' चा अर्थ अज्ञापालन असा आहे, परंतु केवळ शब्दकोषावर समाधान बाळगून कुरआनाच्या परिभाषेचा सर्वकष आशय निश्चित केला जाऊ शकत नाही, किंबहुना या गोष्टीची आवश्यकता आहे की अशा शब्दांच्या संदर्भात कुरआनाच्या प्रयोजनास ही विचाराधीन राखले जावे आणि संभाषण स्थळाच्या अनुषंगाने आशय निश्चित केला जावा.

५. म्हणजे असे दास्यत्व जे प्रत्येक प्रकारच्या शिर्क (अनेकेश्वरवादा) पासून अलिप्त असावे, केवळ अल्लाह प्रित्यर्थच आहे आणि तोच यास पात्र आहे आणि दीन (दास्यत्वा) च्या आशयात, जसे वरील टीपेत स्पष्ट केले गेले आहे नम्रतेची ती कैफीयत जी मनात निर्माण होते, आणि आपण दास असल्याची जाणीव सामील आहे.

६. अनेकेश्वर वाद्यांनी फरिश्त्यांना आपला कार्यसाधक (कर्ताकरविता) बनविले होते की त्यांची भक्ति करा, ते आपली कार्ये तडीस नेतील त्यांची अशी धारणा होती की अल्लाहचे सान्निध्य प्राप्त करण्या करीता फरिश्त्यांना वशिला बनविणे आवश्यक आहे आणि फरिश्त्यांना वशिला बनविण्या करीता ते या गोष्टींना स्वत: साठी योग्य जाणत, ज्या केवळ अल्लाह प्रित्यर्थ आहेत. उदाहरणार्थ त्यांच्याजवळ गाऱ्हाणे मांडत, आपल्या गरजा भागविण्यासाठी त्यांच्याकडे याचना करतात, संकट प्रसंगी त्यांना पुकारतात, खरे तर या सर्व गोष्टी मूर्तिपूजेत सामील आहेत आणि ते याचे स्पष्टीकरण असे करतात की आम्ही फरिश्त्यांची भक्ति-आराधना अशासाठी करतो की त्यांनी आम्हाला अल्लाह च्या समीप करावे अर्थात फरिश्त्यांची पूजा अल्लाहच्या सान्निध्य प्राप्तिचे साधन व माध्यम आहे. या आयतीत त्यांच्या या भ्रमपूर्ण स्पष्टीकरणास खोटे ठरविले गेले आहे. अल्लाहचे सान्निध्य प्राप्त करण्या करीता कोणाचीही पूजा करण्याची गरज नाही. एकमेव अल्लाह ची कसल्याही माध्यमाविना व अगदी प्रामाणिक पणे उपासना केल्यानेच त्याचे सान्निध्य प्राप्त केले जाऊ शकते.

जो खुलासा मक्का चे अनेकेश्वरवादी फरिश्त्यांच्या उपासने

बाबत करीत, तोच खुलासा कबरींची पूजा करणारे, अवलीया व पीर बुजर्गांच्या बाबतीत करतात. ते म्हणतात आम्ही यांना भेट नजराणे अशा साठी करतो की यांच्या वशिल्याने आमची पोहोच ईश्वरापर्यंत होओ. कुरआनाच्या या आयतींचा जर त्यांनी विचार चिंतनपूर्वक अभ्यास केला असता, तर सैतानाच्या भुलावणीस बळी पडले नसते.

७. म्हणजे कियामतीच्या दिवशी अल्लाह आपला फैसला लागू करील.

८. अर्थात अल्लाह विषयी खोटे बोलणारे आणि त्याच्या नावाने खोटी धार्मिकता दर्शाविणारे आणि त्याच्या देणग्यांना प्राप्त करुन अन्य एखाद्याशी कृतज्ञता व्यक्त करणारे अल्लाहच्या मार्गदर्शना पासून वंचित राहतात. जो पर्यंत ते आपल्या चुकीच्या वर्तनाचा त्याग करण्यास तयार होत नाही.

९. म्हणजे अल्लाह करीता पुत्र-कन्या असण्याची कल्पना अगदी खोटी आहे. आणि समजा त्याने आपल्यासाठी पुत्र बनविण्याची इच्छा बाळगली असती तर आपल्या निर्मिती पैकी कोणाची ही पुत्र म्हणून त्याने निवड केली असती पण अशा स्थितीत पुत्र त्याचा दास व गुलाम च राहीला असता. कारण समस्त निर्मिती त्याची दास व गुलाम आहे आणि ईश्वराचा अंश तो होऊ शकत नव्हता कारण ईश्वराचा ना एखादा अंश असतो आणि ना त्या पासून काही अंश बाहेर पडतो. कोणी ही त्याच्या समान नाही. परंतु अल्लाहने आपल्या निर्मितीतून ही एखाद्यास पुत्र या नात्याने निवडले नाही कारण एखाद्यास पुत्राचे स्थान देणे ईश-वैभवाच्या विपरीत आहे आणि यावरुन दुर्बलता व्यक्त होते आणि अल्लाह तर सर्व प्रकारच्या दुर्बलते पासून व वैगुण्या पासून मुक्त आहे. त्याची शान याहून अतिशय उच्च आहे की त्याने एखाद्यास पुत्र बनवावे.

१०. अल्लाहची जर संतती असती तर त्याच्या महानतेत ही विभागणी झाली असती. परंतु ईशत्व अगदी अविभक्त आहे. तो एकटा आहे आणि सर्वांवर त्याची मजबूत पकड आहे. म्हणून कोणतीही निर्मिती त्याच्या तावडी बाहेर जाऊ शकत नाही. मग त्याच्या साठी संतती असण्याची कल्पना काय अर्थ बाळगते?

११. स्पष्टीकरणा साठी पहा सूरह अनआम टीप क्र. १२४ आणि सूरह युनूस टीप क्र.१५

१२. स्पष्टीकरणा साठी पहा सूरह रअद टीप क्र. ८

१३. तो वर्चस्व शाली आहे म्हणून त्याची अवज्ञा करण्या पासून तुम्ही भय बाळगले पाहीजे आणि तो माफ करणारा आहे यास्तव तुम्ही आपल्या अपराधांबद्दल त्याच्या जवळ माफी मागितली पाहीजे.

त्याने तुम्हाला एका जीवा पासून उत्पन्न केले मग त्या द्वारे त्याची जोडी बनविली. आणि त्याने तुमच्या करीता गुरांचे आठ प्रकार (नर व मादा) निर्माण केले.तो तुम्हाला तुमच्या मातांच्या उदरात अंधारांच्या दरम्यान निर्माण करतो, एका उत्पत्ति नंतर दुसऱ्या उत्पत्तित. तोच अल्लाह तुमचा पालन कर्ता आहे. त्याचीच सत्ता आहे. त्याच्या खेरीज कोणी ही ईश्वर नाही.मग तुम्हाला कोठे वळविले जात आहे ? (अल-क़ुर्आन)

६. त्याने तुम्हाला एका जीवा पासून उत्पन्न केले मग त्या द्वारे त्याची जोडी बनविली. [१४] आणि त्याने तुमच्या करीता गुरांचे आठ प्रकार (नर व मादा) निर्माण केले.[१५] तो तुम्हाला तुमच्या मातांच्या उदरात अंधारांच्या दरम्यान निर्माण करतो,[१६] एका उत्पत्ति नंतर दुसऱ्या उत्पत्तित.[१७] तोच अल्लाह तुमचा पालन कर्ता आहे. त्याचीच सत्ता आहे. त्याच्या खेरीज कोणी ही ईश्वर नाही. [१८] मग तुम्हाला कोठे वळविले जात आहे ? [१९]

خَلَقَكُم مِّن نَّفْسٍ وَاحِدَةٍ ثُمَّ جَعَلَ مِنْهَا زَوْجَهَا وَأَنزَلَ لَكُم
مِّنَ الْأَنْعَامِ ثَمَانِيَةَ أَزْوَاجٍ ۚ يَخْلُقُكُمْ فِي بُطُونِ أُمَّهَاتِكُمْ خَلْقًا مِّن
بَعْدِ خَلْقٍ فِي ظُلُمَاتٍ ثَلَاثٍ ۚ ذَٰلِكُمُ اللَّهُ رَبُّكُمْ لَهُ الْمُلْكُ ۖ لَا إِلَٰهَ إِلَّا
هُوَ ۖ فَأَنَّىٰ تُصْرَفُونَ ﴿٦﴾

७. जर तुम्ही कृतघ्नता कराल तर अल्लाह तुमच्या शी निःस्पृह आहे (तुमचा गरजवंत नाही) आणि आपल्या दासां करीता कृतघ्नता पसंत करीत नाही. आणि जर तुम्ही कृतज्ञता दाखवाल, तर तो या गोष्टीस तुमच्या करीता पसंत करतो. [२०] एखादा ओझे उचलणारा अन्य एखाद्याचे ओझे उचलणार नाही.[२१] मग तुमचे परतणे तुमच्या पालन कर्त्या कडेच आहे. तो तुम्हाला दाखवील की तुम्ही काय करीत राहीलात.[२२] तो मनाची स्थिती जाणतो. [२३]

إِن تَكْفُرُوا فَإِنَّ اللَّهَ غَنِيٌّ عَنكُمْ ۖ وَلَا يَرْضَىٰ لِعِبَادِهِ الْكُفْرَ ۖ
وَإِن تَشْكُرُوا يَرْضَهُ لَكُمْ ۗ وَلَا تَزِرُ وَازِرَةٌ وِزْرَ أُخْرَىٰ ۗ ثُمَّ إِلَىٰ
رَبِّكُم مَّرْجِعُكُمْ فَيُنَبِّئُكُم بِمَا كُنتُمْ تَعْمَلُونَ ۚ إِنَّهُ
عَلِيمٌ بِذَاتِ الصُّدُورِ ﴿٧﴾

८. माणसाला जेव्हा एखादा त्रास किंवा यातना पोहचते तेव्हा तो आपल्या पालन कर्त्या कडे वळून त्यास पुकारतो,[२४] मग जेव्हा तो याला आपली देणगी प्रदान करतो, तेव्हा तो या गोष्टीस विसरतो ज्याकरीता तो आधी पुकारत होता; [२५] आणि अल्लाह चे समकक्ष (बरोबरीचे) ठरवू लागतो.[२६] अशा साठी की (लोकांना) त्याच्या मार्गा पासून विचलीत करावे.[२७](अशा माणसाला) सांगा, आपल्या कुफ्र (ईश-विरोधा) चा थोडे दिवस लाभ घे. तू निश्चितच दोजख वाल्यां पैकी आहेस.[२८]

وَإِذَا مَسَّ الْإِنسَانَ ضُرٌّ دَعَا رَبَّهُ مُنِيبًا إِلَيْهِ ثُمَّ إِذَا خَوَّلَهُ
نِعْمَةً مِّنْهُ نَسِيَ مَا كَانَ يَدْعُو إِلَيْهِ مِن قَبْلُ وَجَعَلَ لِلَّهِ
أَندَادًا لِّيُضِلَّ عَن سَبِيلِهِ ۚ قُلْ تَمَتَّعْ بِكُفْرِكَ قَلِيلًا ۖ
إِنَّكَ مِنْ أَصْحَابِ النَّارِ ﴿٨﴾

१४. मूळ शब्द ثُمَّ "सुम्मा" (मग) याचा अर्थ असा की मग त्याच्या सामर्थ्याच्या या चमत्कृतिसही पहा की त्याने याच एका जीवा पासून त्याची जोडी बनविली. स्पष्टीकरणा करीता पहा सूरह निसा टीप क्र.३ आणि सूरह अआराफ टीप क्र.२९२

१५. अनआम (गुरे) शी अभिप्रेत पाळीव चतुष्पाद प्राणी उंट, गाय, शेळी मेंढी होत आणि त्यांचे नर-मादा मिळून आठ प्रकार होतात. अधिक स्पष्टीकरणा साठी पहा सूरह अनआम टीप क्र.२६१ "أَنزَلْنَا"

या गुरांच्या निर्मिती करीता 'अन्जलना' (आम्ही अवतरीत केले) हा शब्द प्रयोग केला गेला आहे, जो या गोष्टीकडे संकेत करतो की यांची रचना अशा प्रकारे झाली आहे की जणू ती ईश-देणगी आहे जी माणसा करीता आकाशातून अवतरीत केली गेली.

१६. तीन अंध:कारांशी अभिप्रेत तीन आवरणे होत. एक उदर, दुसरे गर्भाशय व तिसरे आवरण म्हणजे ती पातळ त्वचा होय जिने गर्भाला आच्छादून टाकलेले असते. हे या गोष्टीचे प्रमाण होय की माणसाचा निर्माता उघड व लपलेल्या स्पष्ट व अस्पष्ट अशा सर्वच गोष्टींना जाणणारा आहे आणि त्याच्या निर्मितीचे कार्य अंध:कारातही पार पडत असते.

१७. म्हणजे या तीन आवरणांच्या दरम्यान जन्मास येणाऱ्या बाळाला निर्मितीच्या विविध अवस्थेतून जावे लागते आणि त्याचे स्वरुप बदलत राहाते. प्रथम तो मांसाचा एक गोळा असतो मग नंतर मानव स्वरुप धारण करतो.

१८. ही सर्व कार्य कुशलता, जिचा आताच उल्लेख केला गेला आहे. अल्लाहचीच होय. या कामांत कोणाची कसलीही दखल नाही. आणि हा या गोष्टीचा पुरावा आहे की तोच तुमचा पालन कर्ता आहे आणि तोच समस्त सृष्टीचा सत्ताधिकारी आहे. एवढे असतांना अल्लाह खेरिज अन्य एखाद्याच ईश्वर वा उपास्य असण्याचा प्रश्न कोठे उद्‌भवतो?

१९. म्हणजे अल्लाहचे एकमेव ईश्वर व उपास्य असणे अगदी स्पष्ट हकीगत आहे. ज्याचे अवलोकन तुम्ही आहोरात्र करता मग अशी कोणती गोष्ट आहे जी तुम्हाला या वास्तवते पासून हटवते? हा संकेत सैताना कडे आहे जो माणसाला एकेश्वरवादाच्या मार्गापासून विचलीत करुन अनेकेश्वरवादात अडकवतो.

२०. कृतघ्नता वास्तविक कूफ्र आहे. जो मनुष्य अल्लाहने दिलेल्या देणग्यां पासून लाभ उचलतो, परंतु त्याच्या मनात अल्लाहसाठी कृतज्ञता-भाव उचंबळत नाही किंवा या देणण्यांना तो अन्य एखाद्याचा कृपा-प्रसाद समजून त्याच्या पुढे भेट-नजराणे अर्पण करु लागतो तर ही फार मोठी कृतघ्नता होय. जे अगदी परिपूर्ण कुफ्र (अल्लाहचा नकार) होय. कृतघ्नतेचे वर्तन अंगिकारून मनुष्य अल्लाहचे काहीच नुकसान करु शकत नाही. किंबहुना स्वत:ला अल्लाहच्या कृपे पासून वंचित ठेवण्या चा उपाय मात्र करतो. अल्लाह या गोष्टीचा किंचित मात्र गरजवंत नाही की दासांनी त्याच्याशी कृतज्ञता व्यक्त करावी, अल्लाहला ना दासांच्या कृतज्ञते पासून काही लाभ पोहचतो आणि ना त्यांच्या कृतघ्नते पासून काही नुकसान पोहचते. ही हकीगत एका हदीस वचनात पुढील प्रमाणे निवेदिली गेली आहे.

'सर्वश्रेष्ठ अल्लाह फर्मावितो. हे माझ्या दासांनो जर तुमच्या पूर्वीचे व नंतर चे सर्व मानव-जिन्न सर्वाधिक ईश-भय बाळगणाऱ्या माणसा समान होतील. तर याने माझ्या साम्राज्यात कसलीच वाढ होणार नाही. आणि हे माझ्या दासांनो जर तुमच्या पूर्वीचे व नंतरचे सर्व मानव-जिन्न सर्वाधिक दुराचारी माणसा समान होतील तर अशाने माझ्या साम्राज्यात काहीच कमतरता होणार नाही.' (मुस्लिम)

मात्र जो मनुष्य कृतज्ञतेचे वर्तन अंगिकारतो तो वास्तव प्रिय असल्याचा पुरावा देतो. आणि अल्लाहला आपल्या दासांसाठी हीच गोष्ट पसंत आहे. या साठी त्याची प्रसन्नता अशाच लोकांना प्राप्त होते जे कृतज्ञशील असतात. या उलट कृतघ्नता अल्लाहला अगदी नापसंत आहे आणि जे कृतघ्न असतात त्यांना अल्लाहची प्रसन्नता लाभत नाही.

२१. म्हणजे प्रत्येक माणसाला आपल्या अपराधाचे ओझे स्वत:च उचलायचे आहे. कोणताही मनुष्य दुसऱ्याचा अपराध आपल्या शिरावर घेणार नाही. यास्तव प्रत्येक माणसाने आपल्या जबाबदारीची जाणीव करावी व इतरांच्या सांगण्या वरुन अपराध करु नये.

२२. अर्थात कियामतीच्या दिवशी प्रत्येक माणसा समोर त्याचा कर्मलेख उघडून दाखविला जाईल.

२३. अल्लाहला प्रत्येक माणसाच्या मनाची अवस्था ठाऊक आहे की अल्लाह करीता त्याच्या मनात कृतज्ञता भावना आहे किंवा कृतघ्नतेची, ईमान विषयक प्रेरणा आहे कि कुफ्र व अपराधाची आणि अल्लाहशी प्रेम आहे कि द्वेष.

२४. अर्थात दु:ख-यातनेत हृदय सर्वतोपरि आपल्या खऱ्या खुऱ्या उपास्यास (अर्थात अल्लाहला) पुकारते व दुआ मागते.

२५. म्हणजे जेव्हा अल्लाह त्याच्या दु:ख यातनेस दूर करतो व त्याला आराम पोहचवितो तेव्हा तो हे विसरतो की, या आधी तो यातना-ग्रस्त होता व ती दूर करण्यासाठी त्याने आपल्या पालन कर्त्याजवळ प्रार्थना केली होती. हे त्याच्या कृतघ्नतेचेच उदाहरण होय.

२६. अल्लाहचा समकक्ष (बरोबरीचा) ठरविण्याचा अर्थ असा की जसा व्यवहार अल्लाहच्या सोबत केला गेला पाहिजे, तसा व्यवहार तो अल्लाह खेरीजच्या उपास्यांशी करु लागतो. उदाहरणार्थ अल्लाह खेरीज च्या उपास्यां करीता भेट-नजराणे, कुर्बानी आणि भक्ति-उपासना च्या इतर प्रथा.

२७. म्हणजे स्वत: तर बहकालच, इतरांना ही बहकवित आहे.

२८. अर्थात अशा माणसाचे ठिकाण शेवटी दोजख (जहन्नम) च बनणार आहे.

या आयती द्वारे त्या माणसाला जो मूर्तिपूजा व उघड नास्तिकतेत पडला असावा आणि एकेश्वरवाद कबूल करण्यास तयार नसावा सावध केले पाहीजे की तो जहन्नमी आहे. या साठी की त्याच्यावर अल्लाहचे प्रमाण पूर्णत: प्रस्थापित व्हावे.

आणि मला आदेश दिला गेला आहे की मी सर्वात प्रथम मुस्लिम व्हावे. सांगा, जर मी आपल्या पालन कर्त्याची अवज्ञा करीन तर मला एका सक्त दिवसाच्या शिक्षेचे भय आहे.(अल-कुर्आन)

أَمَّنْ هُوَ قَانِتٌ آنَاءَ اللَّيْلِ سَاجِدًا وَقَائِمًا يَحْذَرُ الْآخِرَةَ
وَيَرْجُو رَحْمَةَ رَبِّهِ ۗ قُلْ هَلْ يَسْتَوِي الَّذِينَ يَعْلَمُونَ
وَالَّذِينَ لَا يَعْلَمُونَ ۗ إِنَّمَا يَتَذَكَّرُ أُولُو الْأَلْبَابِ ﴿٩﴾

९. काय तो मनुष्य जो रात्रीच्या वेळी सजदा आणि कयामच्या (नमाजच्या) अवस्थेत उपासनेत मग्न राहतो [२९] आखिरत चे भय बाळगतो आणि आपाल्या पालन कर्त्याच्या कृपेची आशा बाळगतो [३०](आणि तो जो काफिर आहे, दोन्ही समान असू शकतात काय?)[३१] यांना विचारा,[३२] काय जे ज्ञान बाळगतात आणि ते जे ज्ञान बाळगत नाहीत, दोन्ही ही समान असू शकतात? [३३]बोध तर बुध्दिमान लोकच प्राप्त करतात.[३४]

قُلْ يَا عِبَادِ الَّذِينَ آمَنُوا اتَّقُوا رَبَّكُمْ ۚ لِلَّذِينَ أَحْسَنُوا
فِي هَٰذِهِ الدُّنْيَا حَسَنَةٌ ۗ وَأَرْضُ اللَّهِ وَاسِعَةٌ ۗ إِنَّمَا يُوَفَّى
الصَّابِرُونَ أَجْرَهُمْ بِغَيْرِ حِسَابٍ ﴿١٠﴾

१०. सांगा, (अल्लाह फर्मावितो) हे माझ्या ईमान बाळगणाऱ्या दासांनो,आपल्या पालन कर्त्याचे भय बाळगा. जे लोक या जगात सदाचारी बनून राहीले, त्यांच्या करीता चांगला मोबदला आहे आणि अल्लाहची जमीन विशाल आहे.[३५] सब्र (धीर-संयम) बाळगणाऱ्यांना तर त्यांचा मोबदला अगणित दिला जाईल.[३६]

قُلْ إِنِّي أُمِرْتُ أَنْ أَعْبُدَ اللَّهَ مُخْلِصًا لَهُ الدِّينَ ﴿١١﴾

११. सांगा, मला आदेश दिला गेला आहे की मी अल्लाहचीच उपासना करावी, आज्ञापालन व दास्यत्वास त्याच्याच प्रित्यर्थ जाणून.

وَأُمِرْتُ لِأَنْ أَكُونَ أَوَّلَ الْمُسْلِمِينَ ﴿١٢﴾

१२. आणि मला आदेश दिला गेला आहे की मी सर्वात प्रथम मुस्लिम व्हावे.[३७]

قُلْ إِنِّي أَخَافُ إِنْ عَصَيْتُ رَبِّي عَذَابَ يَوْمٍ عَظِيمٍ ﴿١٣﴾

१३. सांगा, जर मी आपल्या पालन कर्त्याची अवज्ञा करीन तर मला एका सक्त दिवसाच्या [३८] शिक्षेचे भय आहे.

قُلِ اللَّهَ أَعْبُدُ مُخْلِصًا لَهُ دِينِي ﴿١٤﴾

१४. सांगा, मी तर अल्लाहचीच उपासना करतो, आज्ञापालन व दास्यत्वास त्याच्याच प्रित्यर्थ जाणून.[३९]

فَاعْبُدُوا مَا شِئْتُمْ مِنْ دُونِهِ ۗ قُلْ إِنَّ الْخَاسِرِينَ الَّذِينَ
خَسِرُوا أَنْفُسَهُمْ وَأَهْلِيهِمْ يَوْمَ الْقِيَامَةِ ۗ أَلَا ذَٰلِكَ
هُوَ الْخُسْرَانُ الْمُبِينُ ﴿١٥﴾

१५. तुम्ही याच्या खेरीज वाटले त्याची उपासना करा.[४०] सांगा, खऱ्या तोटयात राहणारे तेच लोक होत ज्यांनी कियामती च्या दिवशी स्वत:ला व आपल्या कुटुंबियांना तोटयात टाकले. ऐका, हाच उघड तोटा आहे. [४१]

२९. मूळ शब्द 'कानत' याचा अर्थ या ठिकाणी उपासना-मग्न असणे असा आहे. आणि रात्रीच्या वेळी अल्लाहच्या उपासनेत मग्न राहणे, ईमान बाळगणाऱ्यांचे उच्च वैशिष्ट्य होय. यावरुन हे ही स्पष्ट झाले की रात्री मनुष्य जास्तीत जास्त जेवढी नमाज अदा करील, लाभदायकच ठरेल. रकात वगैरे चे काहीच बंधन नाही सूरह फुर्कान मध्ये ही या गुणविशेषास प्रकट केले गेले आहे.

وَالَّذِيْنَ يَبِيْتُوْنَ لِرَبِّهِمْ سُجَّدًا وَّقِيَامًا ـ (الفرقان: ٦٤)

'जे आपल्या पालन कर्त्या पुढे सजदा व कियाम करण्यात (अर्थात नमाज पढण्यात) रात्र घालवतात.' (सूरह फुर्कान)

३०. अर्थात आखिरत मध्ये अल्लाह समोर जाब देण्याबाबत ही भितो व त्याच्या कृपेची आस ही बाळगतो. यास्तव तो ना गोड भ्रमात व अभिलाषेत जीवन जगतो आणि ना नैराश्यास बळी, पडतो, किंबहुना समतोल मार्गावर कायम राहतो.

३१. हे वाक्य अरबी भाषेच्या अलंकार युक्त शैली स अनुसरुन आहे म्हणजे शब्दात निवेदिली गेली नाही म्हणून आम्ही कंसात तो स्पष्ट केला आहे. प्रश्न हा उद्‌भवतो की जर अल्लाह चे दोन दास, ज्यापैकी एक त्याचे इतके भय बाळगतो की रात्री आपल्या झोपेचा व आरामाचा त्याग करुन अल्लाहच्या उपासनेत मग्न होतो व त्याच्या कृपेची आशा बाळगतो. आणि दुसरा तो मनुष्य जो अल्लाह शी गाफील आहे. त्याच्या उपासनेची त्याला काहीच पर्वा नाही, उलट अल्लाहशी कृतघ्न बनतो, कशा प्रकारे या गोड भ्रमात राहतो की कोणत्या न कोणत्या वशिल्या ने वा माध्यमाने अल्लाहचे सान्निध्य प्राप्त केले जावे?

३२. म्हणजे या इन्कार करणाऱ्यांना विचारा.

३३. ज्ञाना शी अभिप्रेत अल्लाह ची ओळख, जीवनाच्या उद्देश्याची जाणीव, अल्लाहच्या आदेशांचा परिचय आणि अखिरत च्या शिक्षा व मोबदल्या संबंधी पूर्व सूचना, जो मनुष्य हे ज्ञान बाळगतो आणि जो हे ज्ञान बाळगत नाही, दोन्ही कशा प्रकारे आपल्या गुणविशेषा मध्ये आणि आपल्या परिणतिच्या दृष्टीने समान ठरु शकतात? हे वास्तवपूर्ण व मूलभूत ज्ञान जे माणसाच्या जीवनाची दिशा निश्चित करते. प्रत्येक माणसा करीता याची प्राप्ती अनिवार्य आहे. जे लोक या ज्ञाना पासून बेपर्वा होऊन जे भौतिक ज्ञान प्राप्त करतात, अज्ञानाच्या अंध:कारात खितपत पडतात आणि आपल्या दुष्परिणतीशी अनभिज्ञ राहतात.

३४. म्हणजे या गोष्टींना समजण्या करीता आपल्या बुद्धिचा वापर करण्याची आवश्यकता आहे. बुद्धिला वेष्टनात बंद करुन या हकीगतींचे आकलन होणे शक्य नाही.

३५. संकेत या गोष्टी कडे आहे की एकमेव ईश्वराची उपासना करण्यात व त्याचे भय बाळगून जगण्यात जर काफीर (नास्तिक) लोक अडथळा आणत आहेत तर आपल्या धर्म व ईमानाच्या रक्षण करीता अन्य एखाद्या प्रदेशात किंवा दुसऱ्या देशात स्थलांतर करुन जाऊ शकतात. अल्लाहची जमीन कोणा एका देशाच्या हद्दी पावेतो मर्यादित नाही, किंबहुना अतिशय विस्तृत आहे आणि धर्मा करीता देश-त्याग केला जाऊ शकतो, परंतु देशा खातीर धर्माचा त्याग कदापि केला जाऊ शकत नाही.

स्पष्ट असावे की या काळात देशांतरा करीता मार्ग खुले होते आणि जर आजच्या काळात जवळ जवळ सर्वच अडवलेले आहेत तर परिस्थितीत जबरदस्त परिवर्तनही घडले आहे. त्या काळात श्रद्धा व उपासने चे स्वातंत्र्य नव्हते. कबीला व जाती समूहाच्या धर्माचा त्याग करण्या पायी नेहमी संघर्षाला तोंड द्यावे लागत असे. परंतु आजच्या काळात कायद्यान्वये श्रद्धा व धर्मा बाबत स्वातंत्र्य आहे. आणि धर्म परिवर्तना मुळे अपरिहार्यत: संघर्षाला तोंड द्यावे लागत नाही, म्हणून देशांतरा ची गरज कचितच उद्‌भवते. विशेषत: सेक्युलर राज्यांमध्ये आपापल्या धर्माच्या प्रचार व प्रसाराचे स्वातंत्र्य दिले गेले आहे.

३६. सब्र (धीर-संयम) बाळगणाऱ्यांशी अभिप्रेत सत्य धर्मावर स्थैर्य शील राहणारे व सत्य मार्गातील संकंटाना व दु:ख यातनांना सहन करणारे लोक होत. आणि अगणित मोबदल्या शी अभिप्रेत अमर्याद मोबदला होय म्हणजे एवढा मोठा मोबदला, ज्याचे अनुमान लावले जाऊ शकत नाही. मराठीत 'अमाप' हा शब्द याच अर्थाने वापरला जातो.

हा आहे सब्र करण्याचा लाभ आणि कुरआन या प्रकारचे गुण विशेष निर्माण करण्यावर जोर देतो व त्यांची फार मोठी महत्ता निवेदन करतो. परंतु जीर्ण व कमकुवत हदीस वचनांनी लहान सहान सत्कर्मांचा एवढा मोठा मोबदला निवेदन केला आहे की लोक या सत्कर्मांचाच इतमाम करु लागले व या गुणविशेषां बाबत गाफिल झाले. परिणामी धर्म संदर्भात तो समतोल कायम राहीला नाही, जो कुरआनने कायम केला होता. कुरआना पेक्षा प्रमाण दृष्टया कमकुवत हदीस वचनांना चिकटून राहण्याची ही फार मोठी हानी होय, जी इस्लामी जन समूहाला भोगावी लागत आहे.

३७. म्हणजे मला हा आदेश दिला गेला आहे की कोणी स्वत:ला अल्लाहच्या हवाली करो किंवा न करो, मी सर्वप्रथम स्वत:ला अल्लाहच्या हवाली करावे.

मुस्लिम म्हणजे तो ज्याने अल्लाहचा धर्म इस्लाम कबूल करुन स्वत:ला परिपूर्ण रित्या अल्लाहच्या हवाली केले असावे.

३८. अभिप्रेत कियामतीचा दिवस होय.

३९. आयत क्र. ८ मध्ये अल्लाहची मन:पूर्वक उपासना करण्याचा आदेश पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना दिला गेला होता. या आयतीत त्याचे पालन करण्याचा उल्लेख केला गेला आहे.

४०. म्हणजे जर तुम्ही अल्लाहची मनोभावे उपासना करु इच्छित नाही तर मग वाटले त्याची करा आणि आपल्या दुष्परिणतीस भोगण्यास तयार रहा.

४१. ऐहिक लाभ काही काळा पुरेत आहेत आणि जे आखिरत (मरणोत्तर जीवना) ला दृष्टीआड करुन याच तात्पुरत्या लाभांना प्राप्त करण्या करीता आयुष्य खपवितात ते फार मोठया तोटयाचा सौदा करतात. म्हणजे जगाच्या तात्पुरत्या फायद्या करीता आखिरतच्या सदैव कालीन लाभां पासून वंचित राहतात. परंतु असे लोक या भ्रमात पडतात की ते मोठे यशस्वी जीवन जगत आहेत आणि मेल्यानंतर त्यांना कोणत्याही हानी ला तोंड द्यावे लागणार नाही ते आपल्या कुटुंबियांना ही ऐहिक भक्तिचाच मार्ग दाखवितात. आणि सर्वसामान्यत: ते त्यांच्याच पावलांवर पावले ठेवून चालतात. यास्तव कियामती च्या दिवशी त्यांच्या सोबत त्यांचे कुटुंबिय (आप्त-स्वकीय) देखील नाश पावतील.

**त्यांच्या करीता आगी चे थर असतील, वरुन ही आणि खालून ही हीच ती गोष्ट होय, जिचे अल्लाह आपल्या दासांना भय दर्शाविती. हे माझ्या दासांनो ! माझा तकवा (अल्लाहचे भय) अंगिकारा. *(अल-क़ुर्आन)***

१६. त्यांच्या करीता आगी चे थर असतील, वरुन ही आणि खालून ही [४२] हीच ती गोष्ट होय, जिचे अल्लाह आपल्या दासांना भय दर्शावितो.[४३] हे माझ्या दासांनो ! माझा तकवा (अल्लाहचे भय) अंगिकारा. [४४]

لَهُم مِّن فَوْقِهِمْ ظُلَلٌ مِّنَ النَّارِ وَمِن تَحْتِهِمْ ظُلَلٌ ۚ ذَٰلِكَ يُخَوِّفُ
اللَّهُ بِهِ عِبَادَهُ ۚ يَا عِبَادِ فَاتَّقُونِ ﴿١٦﴾

१७. आणि ज्या लोकांनी सैतानाच्या [४५] उपासने पासून अलिप्तता बाळगली व अल्लाह कडे (स्वत:ला) रुजू केले, त्यांच्या करीता शुभ समाचार आहे.[४६] तेव्हा माझ्या त्या दासांना शुभ वार्ता कळवा.

وَالَّذِينَ اجْتَنَبُوا الطَّاغُوتَ أَن يَعْبُدُوهَا وَأَنَابُوا إِلَى اللَّهِ
لَهُمُ الْبُشْرَىٰ ۚ فَبَشِّرْ عِبَادِ ﴿١٧﴾

१८. जे (ईश) वाणीस लक्षपूर्वक ऐकतात आणि त्याच्या उत्कृष्ट अर्थाचे अनुसरण करतात. हे असे लोक होत, ज्यांना अल्लाहने मार्गदर्शन प्रदान केले आहे आणि हेच बुद्धिमान होत.[४७]

الَّذِينَ يَسْتَمِعُونَ الْقَوْلَ فَيَتَّبِعُونَ أَحْسَنَهُ ۚ أُولَٰئِكَ الَّذِينَ
هَدَاهُمُ اللَّهُ ۖ وَأُولَٰئِكَ هُمْ أُولُو الْأَلْبَابِ ﴿١٨﴾

१९. काय, ज्याला ईश-शिक्षेचे फर्मान लागू झाले असावे (त्याला कोणी वाचवू शकतो ?) काय तुम्ही त्याला वाचवू शकता जो जहन्नम (आगी) मध्ये जाणार आहे?[४८]

أَفَمَنْ حَقَّ عَلَيْهِ كَلِمَةُ الْعَذَابِ أَفَأَنتَ تُنقِذُ مَن
فِي النَّارِ ﴿١٩﴾

२०. मात्र, जे लोक आपल्या पालन कर्त्याचे भय बाळगत राहीलेत, त्यांच्या करीता (अशा अत्युच्च इमारती असतील, ज्यांच्या) मजल्यांवर मजले बनलेले असतील. त्यांच्या खाली प्रवाह वाहत असतील. हा अल्लाहचा वायदा आहे. अल्लाह आपल्या वचनाचे उल्लंघन करीत नाही.

لَٰكِنِ الَّذِينَ اتَّقَوْا رَبَّهُمْ لَهُمْ غُرَفٌ مِّن فَوْقِهَا غُرَفٌ مَّبْنِيَّةٌ تَجْرِي
مِن تَحْتِهَا الْأَنْهَارُ ۖ وَعْدَ اللَّهِ ۖ لَا يُخْلِفُ اللَّهُ الْمِيعَادَ ﴿٢٠﴾

२१. काय तुम्ही पाहत नाही की अल्लाह आकाशातून पाणी वर्षावितो मग त्यास जमीनीत झऱ्यांच्या रुपाने प्रवाहीत करतो, नंतर त्या द्वारे विविध प्रकारची शेते उगवतो. मग ती सुकतात आणि तुम्ही पाहता की ती (शेते) पिवळी पडली आहेत मग तो त्यांना चूर चूर करुन टाकतो. नि:संशय यात बोध [४९] आहे. बुद्धि बाळगणाऱ्यां करीता.

أَلَمْ تَرَ أَنَّ اللَّهَ أَنزَلَ مِنَ السَّمَاءِ مَاءً فَسَلَكَهُ يَنَابِيعَ فِي الْأَرْضِ
ثُمَّ يُخْرِجُ بِهِ زَرْعًا مُّخْتَلِفًا أَلْوَانُهُ ثُمَّ يَهِيجُ فَتَرَاهُ مُصْفَرًّا ثُمَّ يَجْعَلُهُ
حُطَامًا ۚ إِنَّ فِي ذَٰلِكَ لَذِكْرَىٰ لِأُولِي الْأَلْبَابِ ﴿٢١﴾

४२. आगीचे थर वरुन ही असतील आणि खालून ही अशा प्रकारे ते आगीने अगदी घेरले जातील.

४३. म्हणजे या परिणती चे भय बाळगतो.

४४. म्हणजे जर तुम्ही या दुष्परिणतीस तोंड देऊ इच्छित नाही तर अल्लाहशी भय बाळगण्याचे व त्याच्या अवज्ञे पासून अलिप्त राहण्याचे वर्तन अंगिकारा.

४५. तागूतचा अर्थ इमाम रागीब यांनी, जे कुरआनी शब्दकोषाचे ईमाम आहेत अशा प्रकारे निवेदिला आहे:-

والطاغوت عبارة عن كل متعدو كل معبود من دون الله ......سمى الساحر والكاهن والماردمن الجن والصارف عن طريق الخير طاغوتاً۔ (مفردات راغب ص ٣٠٧)

"तागूत शी अभिप्रेत असा तो प्रत्येक मनुष्य होय जो मर्यादेचे उल्लंघन करणारा असावा आणि ते प्रत्येक उपास्य होय जे अल्लाहच्या खेरीज असावे -------- जादूगर, ज्योतिषी, अल्लाहशी बंड करणारा जिन्न, आणि सन्मार्गापासून हटविणारा इत्यादिंना तागूत म्हटले जाते." (मुफर्रदात रागिब.पृष्ठ - ३०७)

अधिक स्पष्टीकरणा साठी पहा सूरह नहल टीप क्र.५५

४६. शुभवार्ता त्या लोकांना दिली गेली आहे जे अल्लाह कडे रुजू करतील, ज्यायोगे अल्लाह खेरीजच्या उपास्यांची भक्ति उपासना व दास्यत्वा पासून त्यांनी स्वत:ला मुक्त केले आहे.

४७. बुद्धिमानता ही आहे की माणसाने अल्लाहच्या वाणीस नीट लक्षपूर्वक ऐकावे आणि त्याचा उत्कृष्ट आशय ग्रहण करुन त्याचे अनुसरण करावे. ईश-मार्गदर्शनाचा मार्ग अशाच लोकांना खुला आहे व याच लोकांना यशाची शुभवार्ता दिली गेली आहे. याऊलट जे लोक अल्लाहच्या वाणीस लक्षपूर्वक रित्या ऐकत नाही व त्याच्या उत्कृष्ट आशयाला सोडून त्याला दुसराच अर्थ लावण्याचा प्रयत्न करतात ते विवादात गुरफटून पडतात व बुद्धिमान नसण्याचा पुरावा देतात ज्याचा परिणाम अल्लाहच्या मार्गदर्शना पासून वंचितता होय.

या आयती द्वारे हे मार्गदर्शन लाभते की जर एका शब्दाचे, शब्दकोषात अनेक अर्थ असतील तेव्हा विचार केला पाहीजे की कुरआनात ज्या ठिकाणी तो शब्द वापरला गेला आहे कोणत्या उत्कृष्ट आशायास व्यक्त करीत आहे कारण अल्लाहची वाणी आपल्या अर्थ व आशायाच्या दृष्टीने उच्चतमच ठरते.

४८. अर्थात काफीर ज्यांना अल्लाहच्या शिक्षेचा फैसला लागू झाला असावा त्याला त्या शिक्षेपासून कोण वाचूव शकतो? स्वत: अल्लाहचे पैगंबर ही त्याला वाचवू शकत नाही. सलामतीचा मार्ग हाच की लोकांनी बुद्धिचा वापर करावा व अल्लाहच्या वाणी चे अनुसरण (म्हणजे त्यानुसार आचरण) करावे जे अल्लाहचा प्रेषित यांच्या समोर सादर करीत आहे.

४९. बोध या गोष्टीची की हे विश्व चिरस्थायी नाही किंबहुना यावर अपरिहार्यपणे विनाशाची कुऱ्हाड कोसळणार आहे. यास्तव बुद्धिमानतेची निकड अशी की माणसाने जगाच्या चकाकीवर आपली दृष्टी खिळवू नये आणि त्याच्या मनमोहकतेवर आनंदीत होऊ नये, किंबहुना आखिरतला (मरणोत्तर जीवना) ला ध्येय उद्दिष्ट जाणून जगात जबाबदारी पूर्ण जीवन जगावे कारण खरे खुरे व सदैव काळ टिकणाच्या ईश-देणग्या आखिरतच्याच आहेत.

२२. काय तो मनुष्य ज्याचा ऊर अल्लाहने इस्लाम करीता खुला केला आहे आणि तो आपल्या पालन कर्त्या तर्फे उजेडा (च्या मार्गा) वर आहे (तो त्या माणसा सारखा असू शकतो जो अंध:कारात भटकत असावा?)[५०] तेव्हा, सर्वनाश आहे त्या लोकां करीता ज्यांची मने अल्लाहच्या स्मरणा बाबत कठोर झाली आहेत.[५१] हे लोक उघड मार्गभ्रष्टतेत पडले आहेत.

أَفَمَنْ شَرَحَ اللّٰهُ صَدْرَهٗ لِلْاِسْلَامِ فَهُوَ عَلٰى نُوْرٍ مِّنْ رَّبِّهٖ ؕ فَوَيْلٌ
لِّلْقٰسِيَةِ قُلُوْبُهُمْ مِّنْ ذِكْرِ اللّٰهِ ؕ اُولٰٓئِكَ فِيْ ضَلٰلٍ مُّبِيْنٍ ﴿٢٢﴾

२३. अल्लाहने अत्युत्कृष्ट वाणी अवतरीत केली आहे. [५२] एक असा ग्रंथ ज्याच्या आयती एकमेकांशी मिळत्या-जुळत्या आहेत.[५३] आणि पुनरावृत्ति करण्या जोग्या आहेत.[५४] अशाने त्या लोकांच्या अंगावर शहारे उभे राहतात जे आपल्या पालन कर्त्याचे भय बाळगतात. [५५] मग त्यांचे तन-मन कोमल होऊन अल्लाहच्या स्मरणा कडे प्रवृत्त होतात.[५६] हे अल्लाहचे मार्गदर्शन आहे.[५७] या द्वारे तो ज्याला इच्छितो सन्मार्गाला लावतो. आणि ज्याला अल्लाह या मार्गा पासून वंचित करील त्याला कोणी ही मार्ग दाखविणार नाही.

اَللّٰهُ نَزَّلَ اَحْسَنَ الْحَدِيْثِ كِتٰبًا مُّتَشَابِهًا مَّثَانِيَ ۖ تَقْشَعِرُّ مِنْهُ
جُلُوْدُ الَّذِيْنَ يَخْشَوْنَ رَبَّهُمْ ۚ ثُمَّ تَلِيْنُ جُلُوْدُهُمْ وَقُلُوْبُهُمْ
اِلٰى ذِكْرِ اللّٰهِ ؕ ذٰلِكَ هُدَى اللّٰهِ يَهْدِيْ بِهٖ مَنْ يَّشَآءُ ؕ وَمَنْ
يُّضْلِلِ اللّٰهُ فَمَا لَهٗ مِنْ هَادٍ ﴿٢٣﴾

२४. मग काय तो मनुष्य जो कियामतीच्या दिवशी भयंकर ईश-शिक्षेपासून आपला बचाव करण्या करीता आपल्या चेहऱ्याला ढाल बनवील ? [५८] (आणि तो मनुष्य जो या शिक्षे पासून सुरक्षित राहील, दोन्ही सारखेच असतील?) आणि अत्याचारींना सांगितले जाईल, जे काही तुम्ही कमवित राहीलात [५९] आता त्याची गोडी चाखा.

اَفَمَنْ يَّتَّقِيْ بِوَجْهِهٖ سُوْٓءَ الْعَذَابِ يَوْمَ الْقِيٰمَةِ ؕ وَقِيْلَ
لِلظّٰلِمِيْنَ ذُوْقُوْا مَا كُنْتُمْ تَكْسِبُوْنَ ﴿٢٤﴾

२५. यांच्या पूर्वीच्या लोकांनी खोटे ठरविलेले आहे तेव्हा त्यांच्या वर अशा दिशेने ईश-शिक्षा अवतरली, ज्याची ते कल्पना ही करु शकत नव्हते.

كَذَّبَ الَّذِيْنَ مِنْ قَبْلِهِمْ فَاَتٰىهُمُ الْعَذَابُ
مِنْ حَيْثُ لَا يَشْعُرُوْنَ ﴿٢٥﴾

२६. तेव्हा अल्लाहने त्यांना ऐहिक जीवनात ही अपमानाची गोडी चाखवली [६०] आणि आखिरत ची शिक्षा तर फार मोठी आहे. या लोकांनी हे जाणले असते तर !

كَذَّبَ الَّذِيْنَ مِنْ قَبْلِهِمْ فَاَتٰىهُمُ الْعَذَابُ
مِنْ حَيْثُ لَا يَشْعُرُوْنَ ﴿٢٥﴾

२७. आणि आम्ही या कुरआनात लोकां करीता सर्व प्रकारची उदाहरणे निवेदिली आहेत.[६१] या साठी की त्यांनी बोध प्राप्त करावा.

فَاَذَاقَهُمُ اللّٰهُ الْخِزْيَ فِي الْحَيٰوةِ الدُّنْيَا ۚ وَلَعَذَابُ الْاٰخِرَةِ
اَكْبَرُ ۘ لَوْ كَانُوْا يَعْلَمُوْنَ ﴿٢٦﴾

५०. ऊर खुले करण्याशी अभिप्रेत संतुष्ट करणे होय. अर्थात ज्या माणसाचे अंत:करण अल्लाह ने दिलेल्या सुबुद्धिने इस्लाम बाबत संतुष्ट झाले असावे आणि या धर्मा बाबत कसलीही शंका अडचण त्याला जाणवत नसावी, त्याला मार्गदर्शनाचा प्रकाश लाभतो आणि या उजेडात तो आपली जीवन-यात्रा पार पाडतो काय असा मनुष्य त्या माणसा सारखा असू शकतो ज्याचे मन इस्लाम विषयी पक्षपात व घमेंडी मुळे कठोर झाले असावे आणि तो या प्रकाशा पासून वंचित होऊन अज्ञानाच्या अंध:कारात इतस्तत:भटकत असावा. जो ना आपल्या पालन कर्त्यास ओळखत असावा आणि ना ज्याला आपल्या जीवन-उद्दिष्टाची जाणीव असावी, तसेच ना हे जाणत असावा की आपल्या जबाबदाऱ्या कोणत्या आहेत आणि आचरणाचे कोणते परिणाम व निष्कर्ष दिसून येणार आहेत. या दोन्ही व्यक्तिंना जर एकमेकाहून भिन्न वैशिष्टये व परस्पर विरोधी वर्तनाच्या आधारावर जेव्हा समान लेखले जाऊ शकत नाही, तर दोघांची परिणति समान कशी असू शकते?

५१. कुफ्र (अल्लाहचा इन्कार) व अपराधावर कायम राहील्याने मने कठोर होतात, मग ना त्यांना अल्लाहच्या स्मरणाची काही गोडी असते आणि ना एखाद्या उपदेशाचा त्यांच्यावर प्रभाव पडतो. सत्य-स्विकृतिचा स्वाभाविक गुणधर्माला ते पारखे होतात. ज्या प्रमाणे खडकाळ जमीनीवर पाण्याचा काहीच परिणाम होत नाही तद्‌वतच या पाषाण हृदयी लोकांवर कुरआनाच्या स्मरणाचा काहीच प्रभाव पडत नाही.

५२. कुरआन अत्युत्कृष्ट वाणी होय. कारण तो आपल्या अंगी शाब्दिक व अर्थाविषयक, बाह्य व आंतरिक प्रत्येक प्रकारचे वैशिष्टय बाळगून आहे. यात उत्कृष्ट शैलीत उत्कृष्ट गोष्ट सांगितली गेली आहे. याची शैली एवढी परिणाम कारक आहे की मनात अनुकंपा निर्माण होते. याचे पठण निश्चय व विश्वासात दृढता निर्माण करते याचा प्रवाहीपणा तोंडपाठ करण्यास सोपे करतो. या वाणी चे सर्वात मोठे वैशिष्टय हे की एक ईमान बाळगणारा मनुष्य याचे वारंवार पठण केल्यानंतर ही थकत नाही की त्याला कंटाळा येत नाही. हदीस वचनात उल्लेखित आहे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) आपल्या प्रवचनात फर्मावित असत:

فَإِنَّ خَيْرَ الْحَدِيثِ كِتَابُ اللهِ - (رياض الصالحين برواية مسلم)

'नि:संशय सर्वोत्कृष्ट वाणी अल्लाह चा ग्रंथ आहे' (मुस्लिम)

यास्तव या ग्रंथाचे पठण या ग्रंथाचे अध्ययना चा अधिकाधिक इतमाम केला गेला पाहीजे व हे चांगल्या प्रकारे समजून घेतले पाहिजे की जगातला कोणताही ग्रंथ याच्या योग्यतेचा ठरु शकत नाही.

५३. म्हणजे ही वाणी सर्वश्रेष्ठ अल्लाहने एका अशा ग्रंथाच्या रुपाने अवतरीत केली ज्याचे अंश एकमेकांशी मिळते जुळते आहेत आणि त्याच्या मजकूरां मध्ये अत्याधिकरित्या एकवाक्यात आढळून येते. या ग्रंथाचा विषय अतिशय व्यापक आहे मात्र असे असूनही याच्या कथनां मध्ये कोठेही फरक नाही आणि ना याचा एक भाग दुसऱ्या भागाशी विसंगत आहे. याला कोठूनही वाचा वाणी चे सत्य एकच असेल व सौंदर्य प्रत्येक ठिकाणी दिसून येईल.

५४. या ग्रंथाचे एक महत्वपूर्ण वैशिष्टय असे की याच्या आयती पुनरावृत्ती करण्या योग्य म्हणजे पुन्हा पुन्हा पठण करण्या योग्य आहे नमाज मध्ये आयती वारंवार पढल्या जातात आणि प्रत्येक वेळी त्याचे मनोहर परिणाम मन-मस्तिष्कावर अंकित होतात.

५५. अल्लाहचे भय बाळगणारे जेव्हा अल्लाहच्या वाणीचे (अर्थात कुरआनाचे) श्रवण किंवा पठण करतात, तेव्हा अल्लाहची महानता व प्रतापाच्या कल्पनेने त्यांच्या वर भयाचा असा कैफ चढतो की त्यांच्या अंगावर शहारे उभे राहतात. अल्लाहच्या वाणीचा हा जबरदस्त परिणाम होय जो मनात भय निर्माण करतो व त्यास वृध्दिगत करतो. आणि अल्लाहशी बाळगले जाणारे हे भय च होय जे माणसाला सदाचारी व पाप-भीरु बनवते. हे भय तर कुरआनाच्या एकाकी पठणा द्वारे ही निर्माण होते, जो कुरआनाचा चमत्कार आहे, परंतु अंगावर शहारे उभे राहण्याची कैफियत अशा स्थितीत निर्माण होते जेव्हा कुरआनास अर्थासह वाचले जावे. अल्लाहच्या अजाब (शिक्षे) पासून कुरआनात ज्या प्रकारे भय दाखवले गेले आहे आणि जहन्नम मध्ये शिक्षा भोगणाऱ्यांची जी दशा निवेदिली गेली आहे. ती निश्चितच अंगावर शहारे उभे करणारी आहे. परंतु जो मनुष्य या आयतींना समजून उमजून वाचत नाही, त्याच्यावर ही कैफियत कशा प्रकारे येईल? विचार करा, कुरआन-आकलना पासून बेपर्वाई केवढया मोठया मांगल्या पासून वंचित राखण्यास कारणीभूत ठरते.

आयती वरुन ही गोष्ट स्पष्ट आहे की अल्लाहच्या भया चा उच्चतम दर्जा हाच होय की माणसाच्या अंगावर भिती ने शहारे उभे राहावेत आणि हीच कैफीयत अपेक्षित आहे. राहीली तल्लीनतेची कैफीयत तर ही निवळ औपचारिकता व सूफी संतांची मनगढत पद्धति होत. कुरआनात याचा कोठे ही उल्लेख नाही आणि पैगंबरांच्या आचरणातही नाही. पैगंबरांच्या सहवासातील अनुयायी ज्यांना कुरआनाशी अत्याधिक लगाव होता ते देखील वज्द (तल्लीनतेच्या) कैफियतीशी अनभिज्ञ होते. त्यांच्या कुरआनाच्या पठण व श्रवणा संबंधी अल्लामा इब्ने कसीर फर्मावितात :-

'ते ना ओरडत आणि ना औपचारिकतेचा अंगिकार करुन एखाद्या बनावटी कैफियतीस व्यक्त करीत, किंबहुना ते ------, शांती आदर व अल्लाहच्या भयात असे वैशिष्टय पूर्ण होते की कोणी ही त्यांच्या स्थाना प्रत पोहचू शकला नाही.' (तफसीर इब्ने कसीर खं. ४ पृ. ५१)

५६. कुरआनात जिथे अल्लाहच्या महानता व प्रतापाचे निवेदन केले गेले आहे तिथे तो माफ करणारा व दयावंत असल्याचे गुणविशेष ही निवेदिले गेले आहेत. यास्तव अंगावर शहारे आणणारी कैफियत शांतीत बदलते. जेव्हा वाचका समोर अल्लाहच्या सुंदर गुणविशेषाचा उल्लेख येतो तेव्हा त्यांच्या मनात अर्द्रता निर्माण होते, मग तो अल्लाहशी आशा बाळगतो, परिणामी त्याच्या भयकंपित शरीरावर शांतीची कैफियत निर्माण होते या शांती व समाधाना सोबतच तो अल्लाहच्या स्मरणाकडे प्रवृत्त होतो व त्याचे अत्याधिकपणे स्मरण करु लागतो. तात्पर्य अल्लाहच्या स्मरणा कडे ओढ कुरआनाशी संबंध जोडल्या चा परिणाम म्हणून निर्माण होते व वाढत जाते.

५७. अल्लाहच्या वाणीच्या या प्रभावास ईश मार्गदर्शनचा अर्थाने घेतले गेले आहे. ज्याने हा प्रभाव मान्य केला त्याला सन्मार्गाचे द्वार खुले झाले.

५८. काफिर कियामतीच्या दिवशी ईश शिक्षेच्या तावडीतून स्वत:चा बचाव करण्या करीता आपल्या हातांना शृंखलेत जखडलेले पाहून आपल्या चेहऱ्यास ढाल बनवण्याचा प्रयत्न करील परंतु तो अजाब (ईश-शिक्षे) च्या तावडीतून वाचू शकणार नाही त्याच्या याच अगतिकतेचा या ठिकाणी उल्लेख केला गेला आहे.

५९. माणसाचे प्रत्येक कर्म आपला एक प्रभाव व निष्पर्ष राखते म्हणूनच आचरणाला 'कमाई' या अर्थाने घेतले गेले आहे. कियामतीच्या दिवशी प्रत्येक माणसाला हे जाणवेल की जे चांगले-वाईट कर्म त्याने केले होते, ती त्यांची चांगली वाईट कमाई होती, जी आज त्याला पुरेपूर लाभत आहे.

६०. सर्वश्रेष्ठ अल्लाह काफीरांना व दुराचारीने या जगात ही शिक्षा देत असतो. या संदर्भात काही लोकांच्या मनात हा प्रश्न उद्‌भवतो की कियामतीच्या दिवसा पुर्वी जो कर्मांच्या हिशेबा करीता निश्चित आहे, का म्हणून शिक्षा दिली जाऊ शकते? तेव्हा, खरे पाहता, शिक्षा देण्याचा मामला कर्माच्या हिशेबावर आधारीत नाही हा इतमाम अशा साठी की त्याला पूरेपूर शिक्षा देण्या आधी सर्वश्रेष्ठ अल्लाह त्याच्या कर्माचे प्रमाण त्याच्यावर प्रस्थापित करु इच्छितो. या साठी की त्याला ही गोष्ट चांगल्या प्रकारे कळून यावी की सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्याच्याशी कोणताही अन्याय केलेला नाही, किंबहुना जे काही तो करीत राहीला, त्याचेच फळ तो चाखत आहे. परंतु याचा अर्थ असा नव्हे की आखिरत चे न्यायालय स्थापित होण्यापूर्वी तो अपराध्यांना कोणतीही शिक्षा देणार नाही. ज्याअर्थी सर्वश्रेष्ठ अल्लाहला हे चांगल्या प्रकारे ठाऊक आहे ते काफीर व अपराधी आहेत, म्हणून तो आपल्या ज्ञानाच्या आधारे या जगात ही त्यांना शिक्षेची गोडी चाखवित असतो, जो शिक्षेचा एक अंश मात्र असतो. त्याच प्रमाणे त्यांच्या आत्म्यांना 'आलमे बर्जख' मध्ये म्हणजे कबरी मध्ये शिक्षा-ग्रस्त राखतो. परंतु अंतदृष्टि नसलेले लोक कबरीच्या शिक्षेचा इन्कार करतात आणि म्हणतात की कर्मांचा हिशेब होण्यापूर्वी शिक्षा कसली? परंतु त्यांच्या या शंकेचे निरसण करण्यासाठी ही गोष्ट पुरेशी आहे की सर्वश्रेष्ठ अल्लाह काफिरांवर जगातही शिक्षा अवतरीत करीत राहीला आहे व शिक्षेचा हा हिस्सा त्यांना हिशेबा पूर्वीच मिळत राहीला आहे.

६१. उदाहरणे निवेदण्याचा अर्थ केवळ उपमा देणे नव्हे, किंबहुना त्या घटना ही, ज्यात बोध कारक गोष्टी वर्णिल्या गेल्या आहेत. उदा. त्या जाति समूहांची दशा ज्यांच्या कुफ्र निती मुळे त्यांच्यावर ईश-शिक्षा अवतरली.

**मग त्याहून अधिक अत्याचारी कोण असेल ज्याने अल्लाह च्या संबंधाने खोटे रचले आणि सत्य जेव्हा त्याच्या जवळ आले, तेव्हा त्याला खोटे ठरविले. काय अशा काफिरांचे ठिकाण जहन्नम नव्हे? *(अल-क़ुर्आन)***

२८. अरबी कुरआन [६२] ज्यात कसलीही वक्रता नाही,[६३] या साठी की त्यांनी (ईश-शिक्षेपासून आपला) बचाव करावा.

قُرْاٰنًا عَرَبِيًّا غَيْرَ ذِىْ عِوَجٍ لَّعَلَّهُمْ يَتَّقُوْنَ ﴿۲۸﴾

२९. अल्लाह उदाहरण देतो एका (गुलाम) व्यक्तिचे ज्याच्या मिळकतीत भांडण करणारे अनेक मालक सहभागी आहेत आणि दुसरी व्यक्ति जी पूरेपूर एकाच मालकाची दास आहे. काय या दोघांची अवस्था सारखीच असू शकते ? [६४] अल्लाह करीता प्रशंसा आहे परंतु अधिकांश लोक हे जाणत नाही. [६५]

ضَرَبَ اللّٰهُ مَثَلًا رَّجُلًا فِيْهِ شُرَكَآءُ مُتَشٰكِسُوْنَ وَرَجُلًا
سَلَمًا لِّرَجُلٍ ؕ هَلْ يَسْتَوِيٰنِ مَثَلًا ؕ اَلْحَمْدُ لِلّٰهِ ۚ بَلْ اَكْثَرُهُمْ
لَا يَعْلَمُوْنَ ﴿۲۹﴾

३०. (हे पैगंबर!) तुम्हाला ही मरावयाचे आहे आणि त्या लोकांनाही मरावयाचे आहे. [६६]

اِنَّكَ مَيِّتٌ وَّاِنَّهُمْ مَّيِّتُوْنَ ﴿۳۰﴾

३१. मग कियामतीच्या दिवशी तुम्ही लोक आपल्या पालन कर्त्या समोर आपापला खटला सादर कराल.[६७]

ثُمَّ اِنَّكُمْ يَوْمَ الْقِيٰمَةِ عِنْدَ رَبِّكُمْ تَخْتَصِمُوْنَ ﴿۳۱﴾

३२. मग त्याहून अधिक अत्याचारी कोण असेल ज्याने अल्लाह च्या संबंधाने खोटे रचले [६८] आणि सत्य [६९] जेव्हा त्याच्या जवळ आले, तेव्हा त्याला खोटे ठरविले. काय अशा काफिरांचे ठिकाण जहन्नम नव्हे?

فَمَنْ اَظْلَمُ مِمَّنْ كَذَبَ عَلَى اللّٰهِ وَكَذَّبَ بِالصِّدْقِ
اِذْ جَآءَهٗ ؕ اَلَيْسَ فِيْ جَهَنَّمَ مَثْوًى لِّلْكٰفِرِيْنَ ﴿۳۲﴾

३३. आणि जो सत्य घेऊन आला [७०] आणि ज्याने त्याला सत्य मानले [७१] असेच लोक ईश-भय बाळगणारे आहेत.[७२]

وَالَّذِيْ جَآءَ بِالصِّدْقِ وَصَدَّقَ بِهٖٓ اُولٰٓئِكَ
هُمُ الْمُتَّقُوْنَ ﴿۳۳﴾

३४. त्यांच्या करीता त्यांच्या पालन कर्त्या जवळ ते सर्व काही असेल, जे ते इच्छितील. हा मोबदला आहे सत्कर्म करणाऱ्यांचा.[७३]

لَهُمْ مَّا يَشَآءُوْنَ عِنْدَ رَبِّهِمْ ؕ ذٰلِكَ جَزٰٓؤُا الْمُحْسِنِيْنَ ﴿۳۴﴾

३५. अशा साठी की अल्लाहने दूर करावे त्यांच्या वाईटाहून वाईट कर्मास आणि जे उत्कृष्ट आचरण ते करीत राहीले, त्याचा त्यांना मोबदला द्यावा.[७४]

لِيُكَفِّرَ اللّٰهُ عَنْهُمْ اَسْوَاَ الَّذِيْ عَمِلُوْا وَيَجْزِيَهُمْ
اَجْرَهُمْ بِاَحْسَنِ الَّذِيْ كَانُوْا يَعْمَلُوْنَ ﴿۳۵﴾

६२. स्पष्टीकरणा करीता पहा सूरह यूसुफ टीप क्र. ३

६३. स्पष्टीकरणा करीता पहा सूरह कहफ टीप क्र. १

६४. हे उदाहरण आहे एकेश्वरवादी व अनेकेश्वरवादी यांचे. जर एखाद्या गुलामाचे अनेक मालक असावेत व त्यांच्यात भांडण तंटा व्हावा तर त्या गुलामाची काय दशा होईल. तो या स्थितीत कोणा कोणाची सेवा पार पाडील व कोणा कोणाला खुश करण्याचा प्रयत्न करील? याउलट जर एखाद्या गुलामाचा एकच धनी असेल तर त्याला फक्त त्याचीच चाकरी करावी लागेल व त्यालाच खुश राखण्याचा प्रयत्न करावा लागेल. मग जेव्हा या दोघांची अवस्था समान असू शकत नाही तेव्हा अनेक ईश्वरांची श्रद्धा बाळगणाऱ्या माणसा करीता प्रत्येक ईश्वराची भक्ति करणे क्रमाप्राप्त ठरेल व त्या प्रत्येकाला खुश करण्याऱ्या प्रयत्नात त्याची केवढी त्रेधातिरपिट होईल कारण कितीही प्रयत्न केला तरी प्रत्येक ईश्वराला तो खुश करु शकत नाही, विशेषत: जेव्हा त्यांचा सत्ताधिकार परस्परविरोधी स्वरुपाचा असेल. उदाहरणार्थ जर एक युद्ध-देवता आहे तर दुसरा शांती सुबत्तेचा. जर एक विनाशकारी देवता आहे तर दुसरा विधायक उपाय योजना करणारा. तसेच जर एक देवी आजारपण आणते तर दुसरी आरोग्य सुख प्रदान करते. जर एक पर्जन्य-देवता आहे तर दुसरा अग्नि-देवता. आता सांगा. माणूस कोण कोणत्या दैवताची भक्ति करील व कोणा कोणास खुश करण्याचा प्रयत्न करील? भारताच्या अनेकेश्वर वादी धर्मात तर कोटयावधी देवी-देवता आहेत. या धर्माचे लोक कितीही दैवतांची पूजा करतील, थोडे फार शिल्लक राहतीलच. ते ना सर्वांची पूजा करु शकतात आणि ना एकाच वेळी सर्वांना खुश करु शकतात असे असतांना त्यांना मानसिक शांती समाधान कोठून लाभू शकते?

याऊलट एकाच ईश्वरास (अर्थात अल्लाह ला) मानणाऱ्यास एकाचीच उपासना करावी लागते. व त्याच्याच प्रसन्नतेची कास बाळगावी लागते. यास्तव तो मानसिक त्रागापासून मुक्त राहतो त्याला एकाग्रता लाभते आणि मनाला खरी शांती व समाधान ही प्राप्त होते.

६५. म्हणजे प्रशंसेस पात्र केवळ अल्लाह आहे जो मोठा गुणवैशिष्टय बाळगणारा आहे. परंतु अधिकांश लोक या उघड वस्तुस्थितीस ही जाणत नाही आणि इतरांमध्ये ईशत्वाचा गुणधर्म असल्याची श्रद्धा बाळगतात व त्यांचे गुण-गान करतात.

६६. अर्थात या स्पष्ट प्रमाणा नंतर ही हे लोक पैगंबरांच्या एकेश्वरवादी आवाहनास मान्य करीत नाही तर हरकत नाही. मरणे तर सगळयांना क्रम प्राप्तचा आहे मग हे मेल्यावर कोठे जातील? त्यांना अल्लाह कडेच परतावयाचे आहे.

आयतीत पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना संबोधून फर्माविले गेले आहे की 'तुम्हाला ही मृत्यु येणार आहे' ज्यावरुन हे स्पष्ट होते की पैगंबरां सारखे महान व्यक्तिमत्व ही मृत्युला अपवाद नाही. त्यांना ही मृत्यु अटळ होता आणि मृत्यु म्हणजे आत्म्याचे शरीरा पासून अलग होणे यास्तव त्यांच्याही शरीरात आत्मा उरला नाही. मात्र आलमे बर्जख (कबरी) मध्ये त्यांच्या आत्मा निश्चितच जिवंत आहे व जीवन ही अतिशय उच्च दर्जाचे कारण जेव्हा शहीद लोकांवषयी कुरआन असे फर्मावितो की ते जिवंत आहेत, परंतु तुम्हाला त्यांच्या जिवंत असल्याची जाणीव नाही तेव्हा एक पैगंबर ज्याचे स्थान शहीद झालेल्या व्यक्ति पेक्षाही अधिक उच्चतम आहे. त्याने कबरीत जिवंत असणे नि:शंक आहे. परंतु या जीवनाचे ऐहीक जीवना वरुन अनुमान कदापि लावले जाऊ शकत नाही आणि ना यावरुन हा निष्कर्ष काढला जाऊ शकतो की ते प्रत्येक ठिकाणी हजर व पहात आहेत.

६७. अर्थात कियामतीच्या दिवशी प्रत्येक पक्ष आपापला दावा (खटला) अल्लाहच्या न्यायालयात सादर करील. तौहीद (एकेश्वरवादा) चे मानणारे, अनेकेश्वरवादी व काफिरां विरुद्ध खटला मांडतील आणि अनेकेश्वर वादी आणि काफिर आपल्या संरक्षणा चा निष्फळ प्रयत्न करतील.

६८. अल्लाहच्या बाबतीत अशी कोणतीही गोष्ट सांगणे जी वस्तु स्थितीच्या विपरीत आहे, त्याच्या संबंधाने खोटे नाटे रचणे होय, मग ती अल्लाहच्या स्वत:च्या गुणविशेषां बाबत असो किंवा त्याच्या धर्म संदर्भात, उदाहरणार्थ असे सांगणे की ईश्वराला पुत्र किंवा मुळी आहेत, किंवा हे की समस्त धर्म त्याला आवडते आहेत किंवा हे की त्याने अवलियांना परिवर्तनाचे असे अधिकार दिले आहेत ते हजर आहेत व पाहू ही शकतात आणि एखाद्याचे गाऱ्हाणे ही ऐकतात तात्पर्य अल्लाह संबंधाने जे काही खोटे रचले जावे मोठया धारीष्टया ची बाब होय. आणि असा मनुष्य अतिशय दुराचारी व सर्वात मोठा अत्याचारी होय.

६९. 'सत्या' शी अभिप्रेत कुरआन होय.

७०. अर्थात अल्लाहचा प्रेषित ज्यावर कुरआन अवतरले.

७१. अभिप्रेत पैगंबरांचे अनुयायी होत. ज्यांनी कुरआन व पैगंबरास सत्य मानून त्यांच्यावर ईमान बाळगले.

७२. म्हणजे हेच लोक खऱ्या अर्थाने अल्लाहचे भय बाळगणारे आहेत.

७३. अर्थात ईमान, अल्लाहचे भय, आणि सत्कर्म इ. गुणविशेष ज्यांनी अपल्या अंगी निर्माण केले ते अल्लाहच्या जवळ आपल्या ध्येय-उद्दिष्टात अशा प्रकारे यशस्वी होतील

की त्यांच्या समस्त अभिलाषा पूर्ण होतील आणि ते जे काही इच्छितील ते त्यांना मिळेल कोणत्याही गोष्टीस प्राप्त करण्या करीता त्यांना कष्ट-यातनेला वा अडथळयाला तोंड द्यावे लागणार नाही. म्हणून त्यांचे जीवन, समाधान सुखशांती व आनंद पूर्ण जीवन असेल.

७४. हा सत्कर्मी लोकांचा मोबदला निवेदिला गेला आहे की अशा माणसाकडून जर एखादे फार वाईट कर्म घडले असेल तरी अल्लाह ते मिटवील आणि त्याच्या उत्कृष्ट कर्मांची कदर जाणत त्याला उत्कृष्ट मोबदला प्रदान करील. ही गोष्ट अशा माणसा करीता जो सत्कर्म पूर्ण जीवन जगत असावा. संयोगाने घडणाऱ्या अपराधांच्या माफी संदर्भात आशेचा हा मोठा किरण होय.

स्पष्ट असावे की हा वायदा त्या लोकांसाठी नव्हे जे मुस्लिम असून ही दुराचाराचे जीवन जगतात. यास्तव आयतींचे शब्द दुराचारी व कुकर्मी लोकांवर कोणत्याही स्थितीत लागू पडत नाही.

**काय अल्लाह आपल्या दासां करीता पुरेसा नाही? हे लोक तुम्हाला त्या (उपास्यां) चे भय दाखवितात, ज्यांना त्यांनी त्याला (अल्लाहला) सोडून बनवून ठेवले आहे. आणि ज्याला अल्लाह मार्ग भ्रष्ट करील, त्याला मार्ग-दर्शन करणारा कोणी नाही. *(अल-क़ुर्आन)***

३६. काय अल्लाह आपल्या दासां करीता पुरेसा नाही? हे लोक तुम्हाला त्या (उपास्यां) चे भय दाखवितात, ज्यांना त्यांनी त्याला (अल्लाहला) सोडून बनवून ठेवले आहे.[७५] आणि ज्याला अल्लाह मार्ग भ्रष्ट करील, त्याला मार्ग-दर्शन करणारा कोणी नाही.

أَلَيْسَ اللَّهُ بِكَافٍ عَبْدَهُ ۖ وَيُخَوِّفُونَكَ بِالَّذِينَ مِن دُونِهِ ۚ
وَمَن يُضْلِلِ اللَّهُ فَمَا لَهُ مِنْ هَادٍ ﴿٣٦﴾

३७. आणि ज्याला अल्लाह मार्गदर्शन करील, त्याला कोणी ही पथ भ्रष्ट करु शकत नाही.[७६] काय अल्लाह वर्चस्वशाली व शिक्षा देणारा नाही?[७७]

وَمَن يَهْدِ اللَّهُ فَمَا لَهُ مِن مُّضِلٍّ ۗ أَلَيْسَ اللَّهُ بِعَزِيزٍ
ذِي انتِقَامٍ ﴿٣٧﴾

३८. जर तुम्ही त्यांना विचाराल आकाशांना व जमीनी ला कोणी निर्माण केले आहे तर ते म्हणतील अल्लाह ने. सांगा, मग तुम्ही हा ही विचार केला की ज्यांची तुम्ही पूजा करता, काय ते या दु:ख यातनेला, जी अल्लाह मला पोहचवू इच्छिल, दूर करु शकतात? किंवा जर तो माझ्यावर मेहरबानी करु इच्छिल, तर काय हे त्याच्या कृपेला अडवू शकतात ?[७८] सांगा, माझ्या करीता अल्लाह पुरेसा आहे आणि भरवसा करणारे त्याच्या वरच भरवसा करतात.

وَلَئِن سَأَلْتَهُم مَّنْ خَلَقَ السَّمَاوَاتِ وَالْأَرْضَ لَيَقُولُنَّ
اللَّهُ ۚ قُلْ أَفَرَأَيْتُم مَّا تَدْعُونَ مِن دُونِ اللَّهِ إِنْ
أَرَادَنِيَ اللَّهُ بِضُرٍّ هَلْ هُنَّ كَاشِفَاتُ ضُرِّهِ أَوْ أَرَادَنِي
بِرَحْمَةٍ هَلْ هُنَّ مُمْسِكَاتُ رَحْمَتِهِ ۚ قُلْ حَسْبِيَ اللَّهُ ۖ
عَلَيْهِ يَتَوَكَّلُ الْمُتَوَكِّلُونَ ﴿٣٨﴾

३९. सांगा, हे माझ्या जाति-समूहातील लोक हो! तुम्ही आपल्या जागी काम करा, मी आपल्या जागी काम करीत राहीन. लवकरच तुम्हाला कळून येईल.

قُلْ يَا قَوْمِ اعْمَلُوا عَلَىٰ مَكَانَتِكُمْ إِنِّي عَامِلٌ ۖ فَسَوْفَ
تَعْلَمُونَ ﴿٣٩﴾

४०. की कोणावर ती ईश-शिक्षा अवतरते, जी त्याला अपमानित करुन टाकील आणि तो अजाब अवतरीत होणारच जो त्यावर कायम स्वरूपी राहील.

مَن يَأْتِيهِ عَذَابٌ يُخْزِيهِ وَيَحِلُّ عَلَيْهِ عَذَابٌ مُّقِيمٌ ﴿٤٠﴾

७५. म्हणजे यांनी जी खोटी उपास्ये बनवून ठेवली आहेत, त्यांचे भय तुम्हाला हे दाखवतात की न जाणी त्यांनी (दैवतांनी) तुम्हाला संकट ग्रस्त न करावे. या त्यांच्या निव्वळ भ्रमिक गोष्टी होत, अन्यथा अल्लाह खेरीज कोणाच्याही अधिकारात काहीही नाही की त्याने एखाद्याला काही हानी पोहचवावी. ना मूर्तिच्या अधिकारात आणि ना देवी-देवतांच्या अधिकार-कक्षेत.

७६. मार्गदर्शन व पथभ्रष्टते बाबत सर्वश्रेष्ठ अल्लाह ने जो नियम निश्चित केला आहे त्यानुसार च मनुष्य मार्गदर्शन प्राप्त करतो किंवा पथभ्रष्ट होतो. एखाद्या पथभ्रष्ट माणसाला ईश-मार्गदर्शन घडविणे कोणाच्याही अवाक्यात नाही आणि ना एखाद्या मार्गदर्शन प्राप्त माणसाला मार्गभ्रष्ट करणे कोणाच्या अवाक्यातले आहे. सैतान मार्गभ्रष्टतेने कडे बोलवू जरुर शकतो परंतु जबरदस्ती पूर्वक कोणाला ही मार्ग भ्रष्ट करु शकत नाही.

७७. अल्लाह वर्चस्व शाली आहे म्हणूनच त्याचे आदेश लागू झाल्या खेरीज राहात नाही आणि तो शिक्षा देणारा आहे म्हणून जिथे सत्य व न्यायाची निकड जाणवते, त्याच्या शिक्षेचा कायदा अमलात येतो ही सक्त ताकीद आहे अल्लाहचा इन्कार करणाऱ्यांना व अनेकेश्वरवादींना की त्यांनी हे समजू नये की अल्लाह त्यांच्या इन्काराची, अनेकेश्वरभक्ति ची व अल्लाहशी विद्रोह करण्याची शिक्षा त्यांना देणार नाही.

७८. म्हणजे जेव्हा तुम्ही हे मान्य करता की आकाशांचा व जमीनीचा निर्माता अल्लाहच आहे, मूर्ति किंवा देवी देवता नव्हे, तेव्हा नफा-नुकसान पोहचविणारा देखील तोच आहे. ज्यांना तुम्ही उपास्य बनवून ठेवले आहे, ते त्याच्या इराद्यास, (निर्णयास) लागू होण्या पासून कशा प्रकारे रोखू शकतात? मग जो वास्तविक पणे नफा-नुकसान पोहचविणारा आहे, त्याला सोडून इतरांना (देवी-देवतांना) नफा-नुकसान पोहचविणारा समजणे किती अयोग्य गोष्ट होय.

४१. आणि आम्ही लोकां करीता हा ग्रंथ तुमच्यावर सत्या सह अवतरीत केला आहे.[७९] तेव्हा, जो मार्गदर्शन प्राप्त करील तो आपल्या स्वत: साठीच करील आणि जो मार्ग-भ्रष्ट होईल तर त्याच्या मार्ग भ्रष्टतेचे संकट त्याच्या वरच कोसळेल. [८०] आणि (हे पैगंबर !) तुम्हाला यांच्या वतीने जबाबदार ठरविले गेले नाही.[८१]

إِنَّآ أَنزَلْنَا عَلَيْكَ ٱلْكِتَٰبَ لِلنَّاسِ بِٱلْحَقِّ ۖ فَمَنِ ٱهْتَدَىٰ
فَلِنَفْسِهِۦ ۖ وَمَن ضَلَّ فَإِنَّمَا يَضِلُّ عَلَيْهَا ۖ وَمَآ أَنتَ عَلَيْهِم
بِوَكِيلٍ ﴿٤١﴾

४२. अल्लाहच प्राणांना (आत्म्यांना) काबीज करतो यांच्या मृत्यु समयी आणि त्यां (प्राणां) ना ही ज्यांना मृत्यु आला नाही निद्रावस्थेत.[८२] मग ज्यांच्या मृत्युचा फैसला त्याने केलेला असतो, त्यांना तो रोखून घेतो [८३] आणि दुसऱ्या प्राणांना (आत्म्यांना) एका निर्धारीत वेळे पावेतो परत पाठवितो [८४] यात त्या लोकांकरीता निशाण्या आहेत जे विचार-चिंतन करतात. [८५]

ٱللَّهُ يَتَوَفَّى ٱلْأَنفُسَ حِينَ مَوْتِهَا وَٱلَّتِى لَمْ تَمُتْ
فِى مَنَامِهَا ۖ فَيُمْسِكُ ٱلَّتِى قَضَىٰ عَلَيْهَا ٱلْمَوْتَ وَيُرْسِلُ
ٱلْأُخْرَىٰٓ إِلَىٰٓ أَجَلٍ مُّسَمًّى ۚ إِنَّ فِى ذَٰلِكَ لَءَايَٰتٍ لِّقَوْمٍ
يَتَفَكَّرُونَ ﴿٤٢﴾

४३. काय यांनी अल्लाह ला सोडून इतरांना (त्याच्या समोर) शिफारस करणारे बनवून ठेवले आहे, सांगा, काय ते या स्थितीत ही शिफारस करतील जेव्हा ते ना एखादा अधिकार बाळगत असावेत आणि ना काही समजत असावेत?[८६]

أَمِ ٱتَّخَذُوا۟ مِن دُونِ ٱللَّهِ شُفَعَآءَ ۚ قُلْ أَوَلَوْ كَانُوا۟
لَا يَمْلِكُونَ شَيْـًٔا وَلَا يَعْقِلُونَ ﴿٤٣﴾

४४. सांगा,शिफारस संपूर्णत: अल्लाहच्या अधिकार-कक्षेत आहे. [८७] आकाशांची व जमीनी ची सत्ता अल्लाह करीताच आहे. मग तुम्ही त्याच्या च कडे परतविले जाल.

قُل لِّلَّهِ ٱلشَّفَٰعَةُ جَمِيعًا ۖ لَّهُۥ مُلْكُ ٱلسَّمَٰوَٰتِ
وَٱلْأَرْضِ ۖ ثُمَّ إِلَيْهِ تُرْجَعُونَ ﴿٤٤﴾

४५. जेव्हा फक्त अल्लाहचे स्मरण केले जाते तेव्हा आखिरत वर ईमान न राखणाऱ्यांची मने संकुचित होऊ लागतात आणि जेव्हा त्याच्या खेरीज इतरांचा उल्लेख केला जातो तेव्हा मात्र ते आनंद विभोर होतात. [८८]

وَإِذَا ذُكِرَ ٱللَّهُ وَحْدَهُ ٱشْمَأَزَّتْ قُلُوبُ ٱلَّذِينَ لَا يُؤْمِنُونَ
بِٱلْءَاخِرَةِ ۖ وَإِذَا ذُكِرَ ٱلَّذِينَ مِن دُونِهِۦٓ إِذَا هُمْ
يَسْتَبْشِرُونَ ﴿٤٥﴾

४६. सांगा, हे अल्लाह ! [८९] आकाशांना व जमीनीला निर्माण करणाऱ्या,अपरोक्ष व विद्यमान (सर्वकाही) जाणणाऱ्या, तू आपल्या दासांच्या दरम्यान या गोष्टींचा फैसला करशील ज्या बाबत ते मतभेद करीत आहेत. [९०]

قُلِ ٱللَّهُمَّ فَاطِرَ ٱلسَّمَٰوَٰتِ وَٱلْأَرْضِ عَٰلِمَ ٱلْغَيْبِ
وَٱلشَّهَٰدَةِ أَنتَ تَحْكُمُ بَيْنَ عِبَادِكَ فِى مَا كَانُوا۟
فِيهِ يَخْتَلِفُونَ ﴿٤٦﴾

७९. म्हणजे या ग्रंथाचे अल्लाहतर्फे अवतरीत होणे ही सत्यनिष्ठ आहे व यात जे काही प्रस्तुत केले गेले आहे ते ही परिपूर्ण सत्य आहे आणि हा ग्रंथ अशासाठी अवतरीत केला गेला आहे की त्याचा लाभ समस्त लोकांना घडावा व लोकांनी या द्वारे मार्गदर्शन प्राप्त करावे.

८०. कुरआन ज्या मार्गाकडे बोलावित आहे, त्याला जो मनुष्य देखील होकार देणार नाही तो मार्गभ्रष्ट होय व आपल्या या मार्ग भ्रष्टतेचे कटूफळ त्याला च चाखावे लागणार आहे.

८१. म्हणजे तुम्ही त्यांच्या आचरणास जबाबदार नाहीत.

८२. मृत्युची वास्तविकता तर मानव-प्राणाचे, ज्याला आत्मा म्हणतात, त्याचे शरीरापासून पूर्णत: अलग होणे होय अगदी याच्याशी मिळती-जुळती कैफियत झोपेत ही असते जेव्हा ओळख, आकलन व ज्ञानानुभवाची सामर्थ्ये लोप पावतात. यास्तव निद्रावस्थेला ही मृत्युच्या अर्थाने घेतले गेले आहे.

وَهُوَ الَّذِیْ يَتَوَفّٰكُمْ بِالَّيْلِ۔ (انعام:٦٠)

'आणि तोच होय जो रात्रीच्या वेळी तुम्हाला मरण देतो' (अनआम-६०)

तात्पर्य प्रज्ञे चे गायब होणे मानव प्राणाचे गायब होणेच होय. आता हा कशा प्रकारे अंतर्धान पावतो व कोठे जातो, याविषयी आम्ही अगदी अनभिज्ञ आहोत मात्र कुरआन आम्हाला या वास्तविकतेची पूर्व सूचना देतो की अल्लाह प्राण काबीज करतो आणि प्रज्ञाहीनतेची ही अवस्था मृत्यु समान होय.

८३. म्हणजे निद्रावस्थेत ज्यांना मृत्यु येतो, मग त्यांना पुन्हा सचेतावस्थेत आणले जात नाही आणि ही वस्तुस्थिती आहे की कितीतरी लोक झोपेत च मरण पावतात.

८४. म्हणजे ज्यांच्या मृत्युचा निर्णय घेतला गेलेला नसतो त्यांची चेतना (प्रज्ञा) परत येते व ते जागे होतात. चेतना व प्रज्ञेचे हे परतणे जणू मनुष्य-जीवाचे परतणे होय जो अल्लहच्या सामर्थ्याचा चमत्कार होय.

८५. निशाण्या अल्लाहच्या जबरदस्त सामर्थ्याच्या, मानव-जीवावरील त्याच्या अधिकार व वर्चस्वाच्या, त्याच्या ज्ञान व बुद्धि कौशल्याच्या तसेच या गोष्टीचीही की जीवन-मरण त्याच्याच हाती आहे आणि झोपे नंतर जागृत होणे, मेल्यानंतर पुन्हा जिवंत होण्याचे स्पष्ट उदाहरण ही आहे व प्रमाण ही. परंतु या निशाण्यां पासून तेच लोक लाभ घेतात जे विचार -चिंतन करणारे म्हणजे जागृत बुद्धिचे असतात. राहीलेत प्रज्ञाहीन लोक तर ते झोपूनच राहतील त्यांना त्या वेळी शुध्दी येईल जेव्हा त्यांनी या जगाचा निरोप घेतलेला असेल.

८६. अभिप्रेत मूर्त्या होत, ज्यांच्या पूजेविषयीचा एक खुलासा त्यांचे भक्त असा करतात की ते आमच्या पूजेमूळे प्रसन्न होऊन ईश्वरा समोर आमच्या करीता शिफारस करतील आणि संकट व ईश शिक्षेपासून आम्हाला वाचवतील आणि जर आखिरत प्रस्थापित झाली तर आम्हाला मुक्तिची सनद देतील. तात्पर्य त्यांची पूजा माध्यम व वाशिल्याचे स्थान राखते. त्याची अयोग्यता त्यांना स्पष्ट उमजून सांगण्या करीता त्यांना विचारले जात आहे की ते शिफारस कोणत्या रीतीने करतील जेव्हा त्यांना शिफारस करण्याचा काडीमात्र अधिकार नाही आणि ना त्यांना एवढी बुद्धि आहे की एखाद्याचे आर्जव ऐकू शकतील व त्याच्या करीता शिफारस करु शकतील. हे दगड-माती चे देव काय कपाळा ची शिफारस करतील!

८७. म्हणजे अल्लाहच्या शिक्षेपासून मुक्ति देणे कोणाच्या ही अवाक्यात नाही.असा कोणी नाही जो त्याच्या समोर एखाद्यास ईश-शिक्षे पासून वाचविण्या करीता त्याच्या परवानगी शिवायत तोंड उघडू शकेल की ज्यायोगे ते शिफारस मान्य करवून घेतील.

शिफारस (मूळ शब्द शफाअत) विषयी चुकीची कल्पना च माणसाला अनेकेश्वर वादात गुरफटून टाकते आणि तो आखिरत-मुक्ति च्या संदर्भात नि:श्चित होऊन जातो.

कुरआनने ठिकठिकाणी या गोष्टीचे स्पष्टीकरण दिले आहे की शिफारसीवर अगदी विसंबून राहणे योग्य नव्ह. मुक्ति खरे तर आचरणावर अवलंबून आहे आणि शिफारस अल्लाहच्या अनुज्ञेविना होणार नाही. तो ज्याला, ज्या क्षणी परवानगी देईल ते त्याच वेळी एखाद्याची शिफारस करु शकतील ज्याचा करीता तो शिफारस पसंत फर्माविल आणि अनेकेश्वरवाद्यां करीता तर शिफारसीचा प्रश्नच उद्‌भवत नाही कारण शिर्क (अनेकेश्वर भक्ति) माफ न करण्या जोगा गुन्हा आहे.

८८.ही आहे शिर्क (अनेकेश्वर भक्ति) करणाऱ्यांची विचार सरणी अल्लाहच्या नाम:स्मरणा विषयी त्यांना गोडी नसते. जेव्हा अल्लाहच्या एकत्वा विषयी बोलले जाते. तेव्हा त्यांना मोठे अप्रिय व अरुचिकारक वाटू लागते, मात्र जेव्हा त्यांनी ठरविलेल्या ईश्वराच्या सहभागी चे नाम: स्मरण त्यांच्या समक्ष केले जाते तेव्हा त्यांच्या आनंदाला उधाण येते.

मुसलमानां पैकी ही ते लोक ज्यांनी अंबिया (प्रेषित) व अवलीयांना ईश्वराचा दर्जा देऊन ठेवला आहे. या रसूलल्लाह! आणि या गौस ! सारखे नारे लावणे व ऐकणे फार पसंत करतात. मात्र तौहीदच्या गोष्टी म्हणजे अल्लाह खेरीज ना कोणी हजर राहणरा व पाहणारा आहे आणि ना गौस (गाऱ्हाणे ऐकणारा) आहे, ऐकणे ही पसंत करीत नाही.

८९. हे पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना संबोधून आहे आणि त्यांच्या माध्यमान्वये समस्त ईमान बाळगणाऱ्यांना.

९०. प्रार्थनामय शैलीत अल्लाहवरील भरवशांची ही अभिव्यक्ति होय.

४७. आणि जर या अत्याचारी जवळ ते सर्व काही असावे जे जमीनीवर आहे आणि या एवढेच आणखी जास्त असावे तर हे कियामतीच्या दिवशी भयंकर ईश-शिक्षेपासून (स्वत:ला) वाचविण्या करीता मुक्ति-मूल्य म्हणून देण्याकरीता तयार होतील [९१] आणि अल्लाह तर्फे असे काही त्यांच्या समोर येईल, ज्याची त्यांना कल्पना सुद्धा नव्हती.

وَلَوْ أَنَّ لِلَّذِينَ ظَلَمُوا مَا فِي الْأَرْضِ جَمِيعًا وَمِثْلَهُ
مَعَهُ لَافْتَدَوْا بِهِ مِن سُوءِ الْعَذَابِ يَوْمَ الْقِيَامَةِ ۚ
وَبَدَا لَهُم مِّنَ اللَّهِ مَا لَمْ يَكُونُوا يَحْتَسِبُونَ ﴿٤٧﴾

४८. त्यांच्या कमाई चे दुष्परिणाम त्यांच्या समोर येतील आणि ज्या गोष्टीची ते थट्टा-मस्करी उडवित राहीले, ती त्यांना घेरील.[९२]

وَبَدَا لَهُمْ سَيِّئَاتُ مَا كَسَبُوا وَحَاقَ بِهِم مَّا كَانُوا بِهِ
يَسْتَهْزِئُونَ ﴿٤٨﴾

४९. जेव्हा माणसाला एखादे दु:ख यातना पोहचते तेव्हा आम्हाला पुकारतो, मग जेव्हा आम्ही त्याला आपल्या तर्फे नेअमत (देणगी) प्रदान करतो, तेव्हा असे म्हणतो की ही तर मला (आपल्या) ज्ञाना मुळे लाभली आहे.[९३] नव्हे, किंबहुना ही एक कसोटी आहे, परंतु अधिकांश लोक जाणत नाही.[९४]

فَإِذَا مَسَّ الْإِنسَانَ ضُرٌّ دَعَانَا ثُمَّ إِذَا خَوَّلْنَاهُ نِعْمَةً
مِّنَّا قَالَ إِنَّمَا أُوتِيتُهُ عَلَىٰ عِلْمٍ ۚ بَلْ هِيَ فِتْنَةٌ
وَلَٰكِنَّ أَكْثَرَهُمْ لَا يَعْلَمُونَ ﴿٤٩﴾

५०. हीच गोष्ट यांच्या पूर्वीच्या लोकांनी ही म्हटली होती, परंतु त्यांनी जे काही कमविले होते ते त्यांच्या काहीच कामी आले नाही. [९५]

قَدْ قَالَهَا الَّذِينَ مِن قَبْلِهِمْ فَمَا أَغْنَىٰ عَنْهُم
مَّا كَانُوا يَكْسِبُونَ ﴿٥٠﴾

५१. आणि आपल्या कमाई चे दुष्परिणाम त्यांना भोगावे लागले आणि या लोकां पैकी ही जे अत्याचारी आहेत, त्यांना आपल्या कमाईच्या दुष्परिणामांना लवकरच तोंड द्यावे लागेल. ते आमच्या काबू बाहेर जाणार नाहीत.

فَأَصَابَهُمْ سَيِّئَاتُ مَا كَسَبُوا ۚ وَالَّذِينَ ظَلَمُوا مِنْ
هَٰؤُلَاءِ سَيُصِيبُهُمْ سَيِّئَاتُ مَا كَسَبُوا وَمَا هُم بِمُعْجِزِينَ ﴿٥١﴾

५२. काय यांना हे माहीत नाही की अल्लाह ज्याच्या करीता इच्छितो, उपजिविका व्यापक करतो आणि ज्याच्या करीता इच्छितो मोजून मापून देतो. नि:संशय यात निशाण्या आहेत त्या लोकां करीता जे ईमान बाळगतात.[९६]

أَوَلَمْ يَعْلَمُوا أَنَّ اللَّهَ يَبْسُطُ الرِّزْقَ لِمَن يَشَاءُ وَيَقْدِرُ ۚ
إِنَّ فِي ذَٰلِكَ لَآيَاتٍ لِّقَوْمٍ يُؤْمِنُونَ ﴿٥٢﴾

९१. स्पष्टीकरणा साठी पहा सूरह मायदा टीप क्र. १२४

९२. अर्थात ईश-शिक्षा.

९३. अर्थात आपल्या पात्रता व बुद्धिमत्ते मुळे वस्तुत: त्याने असे म्हणावयास हवे होते की ही ईश-देणगी मला अल्लाहच्या कृपा व त्याच्या अनुग्रहा मुळे लाभली परंतु तो आपल्या योग्यते च्या गुर्मीत आपल्या उपकार कर्त्यास विसरतो, जर केवळ योग्यतेच्या आधारावर ऐहिक ईशदेणगी प्राप्त करणे शक्य असते तर कितीतरी चांगली योग्यता बाळगणारे वंचित राहीले नसते आणि कित्येक असे लोक जे ज्ञान व योग्यता बाळगत नाही, ऐहिक माल मत्तेच्या विपुलतेने समृध्द झाले नसते.

९४. अर्थात कित्येक लोक या वस्तुस्थिती शी अनभिज्ञ आहेत की देणग्या अल्लाहने प्रदान केल्यामुळेच लाभतात आणि अशासाठी प्रदान केल्या जातात की ती कसोटी चे कारण ठरावे, ज्यायोगे हे दिसून यावे की या देणग्या प्राप्त झाल्यानंतर मनुष्य अल्लाहचे उपकार मानतो किंवा नाही व त्याच्याशी कृतज्ञ राहतो किंवा नाही.

९५. म्हणजे पूर्वी होऊन गेलेले जन समूह ही धन सम्पत्ति च्या विपुलतेस व आपल्या ऐहीक प्रगतीस आपल्या कलाकौशल्य व विज्ञानाचा परिणाम ठरवित व त्याबद्दल अभिमान बाळगत राहीले परंतु त्यांच्या कारवाया/कर्मा मुळे त्यांच्यावर अल्लाहचा प्रकोप अवतरला तेव्हा ही प्रगती ही समृद्धि आणि हे ऐश्वर्य त्यांच्या काही ही उपयोगी पडू शकले नाही.

९६. स्पष्टीकरणा करीता पहा सूरह रूम टीप क्र. ६६

५३. (हे पैगंबर !) सांगा, (अल्लाह फर्मावितो) हे माझ्या दासांनो ! [९७] (ज्यांनी आपल्या जीवावर अत्याचार केला आहे,[९८] त्यांनी अल्लाहच्या कृपे पासून निराश होऊ नये.अल्लाह सर्व अपराध माफ करील.[९९] तो मोठा माफ करणारा, कृपावंत आहे.

قُلْ يٰعِبَادِيَ الَّذِيْنَ اَسْرَفُوْا عَلٰٓى اَنْفُسِهِمْ لَا تَقْنَطُوْا
مِنْ رَّحْمَةِ اللّٰهِ ۭ اِنَّ اللّٰهَ يَغْفِرُ الذُّنُوْبَ جَمِيْعًا ۭ
اِنَّهٗ هُوَ الْغَفُوْرُ الرَّحِيْمُ ﴿٥٣﴾

५४. आणि रुजू करा (वळा) आपल्या पालन कर्त्याकडे आणि त्याचे आज्ञाधारक बना, या आधी की तुमच्यावर अजाब (ईश-प्रकोप) अवतरीत व्हावा. मग तुम्हाला कसलीही मदत लाभू शकणार नाही.[१००]

وَاَنِيْبُوْٓا اِلٰى رَبِّكُمْ وَاَسْلِمُوْا لَهٗ مِنْ قَبْلِ اَنْ يَّاْتِيَكُمُ الْعَذَابُ
ثُمَّ لَا تُنْصَرُوْنَ ﴿٥٤﴾

५५. आणि तुमच्या पालन कर्त्या तर्फे जी उत्कृष्ट गोष्ट तुमच्या कडे अवतरीत केली गेली आहे [१०१] तिचे अनुसरण करा, या आधी की तुमच्यावर अकस्मात ईश-प्रकोप अवतरीत व्हावा आणि तुम्हाला त्याची खबर सुद्धा नसावी.

وَاتَّبِعُوْٓا اَحْسَنَ مَآ اُنْزِلَ اِلَيْكُمْ مِّنْ رَّبِّكُمْ مِّنْ قَبْلِ اَنْ
يَّاْتِيَكُمُ الْعَذَابُ بَغْتَةً وَّاَنْتُمْ لَا تَشْعُرُوْنَ ﴿٥٥﴾

५६. कदाचित असे न व्हावे की एखाद्या माणसाने हे सांगावे, खेद आहे माझ्या त्या गफलती बद्दल जी मी अल्लाह च्या बाबतीत करीत राहीलो आणि मी थट्टा उडविणाऱ्यां पैकी होतो.[१०२]

اَنْ تَقُوْلَ نَفْسٌ يّٰحَسْرَتٰى عَلٰى مَا فَرَّطْتُّ فِيْ جَنْۢبِ اللّٰهِ
وَاِنْ كُنْتُ لَمِنَ السّٰخِرِيْنَ ﴿٥٦﴾

५७. किंवा असे म्हणावे,जर अल्लाह ने मला मार्गदर्शन केले असते तर मी देखील ईश-भय बाळगणाऱ्यां पैकी असतो.[१०३]

اَوْ تَقُوْلَ لَوْ اَنَّ اللّٰهَ هَدٰىنِيْ لَكُنْتُ مِنَ الْمُتَّقِيْنَ ﴿٥٧﴾

५८. किंवा अजाब (ईश-शिक्षे) ला पाहून म्हणू लागावे,जर मला (जगात) परत जाण्याची आणखी एक संधी लाभली, तर मी सत्कर्म करणाऱ्यां पैकी होईन. [१०४]

اَوْ تَقُوْلَ حِيْنَ تَرَى الْعَذَابَ لَوْ اَنَّ لِيْ كَرَّةً فَاَكُوْنَ
مِنَ الْمُحْسِنِيْنَ ﴿٥٨﴾

५९. का नव्हे माझ्या आयती तुझ्या जवळ पोहचल्या होत्या परंतु तू त्यांना खोटे ठरविले आणि गर्व केला आणि तू काफीर लोकां पैकी होतास.[१०५]

بَلٰى قَدْ جَآءَتْكَ اٰيٰتِيْ فَكَذَّبْتَ بِهَا وَاسْتَكْبَرْتَ
وَكُنْتَ مِنَ الْكٰفِرِيْنَ ﴿٥٩﴾

९७. 'हे माझ्या दासांनो' शी अभिप्रेत अल्लाहचे दास होत, पैगंबराचे नव्हेत. आणि ही गोष्ट विषयाच्या तथ्यावरुन ही स्पष्ट होते आणि कुरआनाच्या इतर अनेक स्थानांद्वारे ही जिथे अल्लाहने आपल्या दासांना या इबादी असे संबोधिले आहे. तसेच या साठी ही की इस्लाम ची मूलभूत श्रद्धा हीच आहे की सर्व मानव अल्लाह चे दास होत अन्य कोणाचे नव्हेत. मग या आयतीत 'रसूल चे दास' हा अर्थ अभिप्रेत घेण्याचां काय संबंध? परंतु बिदअत पूर्ण भाष्यात अशा वायफळ गोष्टी शुद्धा निवेदिल्या गेल्या आहेत. आणि मोठ्या धारिष्टयाने म्हटले गेले आहे की समस्त मुसलमान पैगंबरांचे दास आहेत. वास्तविक अरबी च्या प्रमाणित विश्वसनीय भाष्यां पैकी कोणत्याही भाष्यात असा अर्थ निवेदिला गेला नाही.

खरे पाहता, कुरआनाची शैली संक्षेपात्मक आहे म्हणून तो त्या अक्षरांना कमी करतो ज्यावर मजकूर युक्तिवाद करतो परंतु जे लोक आपल्या धर्मात वाढवून घेतलेल्या श्रध्देला कुरआन द्वारे सिद्ध करु इच्छितात ते शब्दांच्या वेटोळयात गुरफटून राहतात त्यांना फक्त शिपल्याशी काम असते, मोत्याशी नव्हे.

अल्लाहच्या निवेदनाचा अर्थ अगदी स्पष्ट आहे आणि तो असा की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना संबोधून सर्वश्रेष्ठ अल्लाह फर्मावितो की माझ्या गुन्हेगार दासांना सांगा की अल्लाह असे फर्मावितो की हे माझ्या (अशा) दासांनो, ज्यांनी आपल्या स्वत:वर अत्याचार केला आहे त्यांनी अल्लाहच्या कृपे बाबत निराश होऊ नये.

९८. म्हणजे अपराध केले आहेत.

९९. अपराध्यां करीता हा मोठा आशा वाढविणारा संदेश आहे. अपराध कसे ही मोठयात मोठे घडले असावेत. अल्लाहच्या कृपे पासून निराश होण्याचे काहीच कारण नाही. तौबा (माफी) चा दरवाजा खुला आहे आणि सुधारणे ची संधी ही बाकी आहे. जर पश्चाताप दग्ध होऊन व अल्लाहशी आपल्या अपराधांची क्षमा मागून आपले आचरण दुरुस्त करुन घ्याल तर अल्लाह तुमचे ते सर्व अपराध जे तुमच्या हातून घडले, माफ करील. यास्तव आपले वर्तन बदला आणि अल्लाहच्या कृपेस व माफीस पात्र व्हा.

आयतीचा हा अशय नंतरच्या आयतींशी ही सुसंगत आहे ज्यात अल्लाह कडे रुजू करण्याची, त्याचा आज्ञाधारक बनण्याची व कुरआनाच्या आदेशांचे पालन करण्याची ताकीद केली गेली आहे आणि असे न केल्या बद्दल ईश–शिक्षेची धमकी दिली गेली आहे. म्हणून या वाक्य संबंधात आयतीचा हा अर्थ होऊच शकत नाही की वाटेल तेवढे अपराध करीत रहा, अल्लाह माफ करील आयतीचा उद्देश अपराध्यांना अपराधाचे लायसेन्स देणे नव्हे तर त्यांना क्षमायाचना व वर्तन सुधारण्या कडे प्रवृत्त करणे होय. विशेषत: अनेकेश्वर वादी व काफीरांना ज्यांचे जीवन अपराधांनी भरलेले आहे.

अल्लामा इब्ने कसीर यांनी याबाबत चांगले स्पष्टीकरण दिले आहे.

अल्लाहची ही आयत काफीरांना व इतर तमाम गुन्हेगारांना अल्लाहशी माफी मागण्याचे व त्याच्या कडे प्रवृत्त होण्याचे आवाहन करते आणि ही खबर देते की सर्वश्रेष्ठ अल्लाह त्या लोकांचे सर्व अपराध माफ करील जे अपराधांची क्षमा मागतील व पुन्हा अपराध न करण्याचा संकल्प करतील मग ते कितीका असेनात समुद्राच्या फेसाहूनही अधिक का असेनात परंतु या आयतीला तौबा (क्षमा याचना) न करणाऱ्यांवर लागू करणे उचित ठरणार नाही कारण तौबा केल्या शिवाय शिर्क सारखा गुन्हा माफ केला जाणार नाही. (तफसीर इब्ने कसीर खंड. ४ पृ. ५८)

१०२. म्हणजे जर तुम्ही कुरआनाचे अनुकरण केले नाही तर कियामतीच्या दिवशी पश्चाताप करावा लागेल. अल्लाहच्या बाबतीत ज्याने देखील बेपर्वाई केली असेल म्हणजे आपल्या जबाबदाऱ्यांना पार पाडले नसेल तो यावर खेद प्रकट करील आणि त्या वेळी त्याला जाणीव होईल की कुरआन व इस्लामला थट्टेचा विषय बनविणे केवढी भयंकर चूक होती.

१०३. अल्लाहने कुरआनाच्या माध्यमान्वये समस्त माणसांना मार्ग दर्शनाची उपाय योजना केली आहे. या साठी की कियामतीच्या दिवशी कोणी असे म्हणू नये की जर अल्लाहने मला मार्गदर्शन केले असते तर मी ईश-भय बाळगणारा असतो.

१०४. म्हणजे अल्लाहचा प्रकोप पाहील्या नंतर कसोटीची संधी बाकी राहणार नाही आणि जगात पुन्हा परत पाठविले जाण्याची तुमची अभिलाषा कदापि पुर्ण होऊ शकणार नाही यास्तव प्रत्येक माणसाने अल्लाहच्या संबंधाने आपल्या कर्तव्यांची जाण राखली पाहीजे आणि सत्याला कबूल करण्यात व त्याचे अनुसरण करण्यात मागे पुढे करु नये.

१०५. म्हणजे कियामतीच्या दिवशी या पश्चाताप करणाऱ्यांना सांगितले जाईल की तुम्ही ईश-मार्ग दर्शन का प्राप्त केले नाही आणि सदाचारी का बनले नाहीत? वस्तुत: माझ्या आयती तुमच्याजवळ पोहचल्या होत्या. त्यांना कबूल करण्यात कोणती सबब अडसर बनली होती? तुम्ही तर त्यांना खोटे ठरविले होते व घमेंड करीत राहीले आणि शेवट पावेतो इन्कार करीत राहीले. म्हणून तुम्ही आपल्या कृतकर्मास स्वत: जबाबदार आहात आणि आता तुम्हाला अजाब भोगावाच लागेल.

६०. आणि ज्या लोकांनी अल्लाहच्या संबंधाने खोटे नाटे रचले आहे, कियामतीच्या दिवशी तुम्ही पहाल की त्यांचे चेहरे काळे कुट्ट आहेत.[१०६] काय या गर्व (घमेंड) करणाऱ्यांचे ठिकाण- जहन्नम मध्ये नाही ?[१०७]

وَيَوْمَ الْقِيٰمَةِ تَرَى الَّذِيْنَ كَذَبُوْا عَلَى اللّٰهِ وُجُوْهُهُمْ
مُّسْوَدَّةٌ ۭ اَلَيْسَ فِيْ جَهَنَّمَ مَثْوًى لِّلْمُتَكَبِّرِيْنَ ﴿۶۰﴾

६१. आणि अल्लाह त्या लोकांना मुक्ति देईल [१०८] जे त्याचे भय बाळगून राहीले, ते यशस्वी झाल्या मुळे त्यांना ना कसली दु:ख यातना पोहचेल आणि ना ते दु:खी होतील.

وَيُنَجِّي اللّٰهُ الَّذِيْنَ اتَّقَوْا بِمَفَازَتِهِمْ ۡ لَا يَمَسُّهُمُ السُّوْۗءُ
وَلَا هُمْ يَحْزَنُوْنَ ﴿۶۱﴾

६२. अल्लाह प्रत्येक गोष्टीचा निर्माता आहे आणि तो प्रत्येक गोष्टीची देखरेख करणारा आहे. [१०९]

اَللّٰهُ خَالِقُ كُلِّ شَيْءٍ ۡ وَّهُوَ عَلٰي كُلِّ شَيْءٍ وَّكِيْلٌ ﴿۶۲﴾

६३. आकाशांच्या व जमीनीच्या चाव्या त्याच्याच जवळ आहेत [११०] आणि ज्यांनी अल्लाहच्या आयतींचा [१११] इन्कार केला तेच लोग तोटयात राहणारे आहेत.

لَهٗ مَقَالِيْدُ السَّمٰوٰتِ وَالْاَرْضِ ۭ وَالَّذِيْنَ كَفَرُوْا بِاٰيٰتِ اللّٰهِ
اُولٰۗىِٕكَ هُمُ الْخٰسِرُوْنَ ﴿۶۳﴾

६४. सांगा, हे अडाण्यांनो ! काय, तुम्ही मला अल्लाह खेरीज अन्य एखाद्याची उपासना करण्याचा आदेश देता ? [११२]

قُلْ اَفَغَيْرَ اللّٰهِ تَاْمُرُوْۗنِّىْٓ اَعْبُدُ اَيُّهَا الْجٰهِلُوْنَ ﴿۶۴﴾

६५. वस्तुत: तुमच्या कडे ही आणि तुमच्या पूर्वी होऊन गेलेल्या (पैगंबरां) कडे ही हा ईश-संदेश पाठविला गेला आहे की तुम्ही शिर्क (अनेकेश्वर उपासना) केल्यास तुमचे कर्म वाया जाईल, आणि तुम्ही तोटयात राहाल.[११३]

وَلَقَدْ اُوْحِيَ اِلَيْكَ وَاِلَى الَّذِيْنَ مِنْ قَبْلِكَ ۚ لَىِٕنْ
اَشْرَكْتَ لَيَحْبَطَنَّ عَمَلُكَ وَلَتَكُوْنَنَّ مِنَ الْخٰسِرِيْنَ ﴿۶۵﴾

६६. (यास्तव अल्लाह खेरीजच्या उपास्यांची उपासना करु नका) किंबहुना अल्लाहचीच उपासना करा आणि त्याचे कृतज्ञ बना.[११४]

بَلِ اللّٰهَ فَاعْبُدْ وَكُنْ مِّنَ الشّٰكِرِيْنَ ﴿۶۶﴾

१०६. खोटे आणि ते ही अल्लाहच्या संबंधाने बोलले जावे, चेहऱ्यावरील तेज नाहीसे करते आणि कियामतीच्या दिवशीतर या गुन्हयाची काजळी चेहऱ्याला आगदी काळा कुट्ट करुन टाकील.

१०७. म्हणजे जे लोक अल्लाहचे फर्मान मानण्या ऐवजी आपल्याच म्हणण्यावर अडून बसतात ते गर्व आणि घमेंडीत पडतात अर्थात जे लोक अल्लाहच्या विरोधात घमेंड करतील त्यांचे ठिकाण अपरिहार्यपणे जहन्नमच असू शकते कारण न्यायाची निकड हीच होय की अल्लाहशी विद्रोह करण्याची शिक्षा जहन्नम असावी.

१०८. म्हणजे कियामतीच्या दिवशी ईश-शिक्षे पासून वाचविल.

१०९. म्हणजे अल्लाहने सृष्टी निर्माण करुन तिला तसेच सोडून दिले नाही, किंबहुना तो सृष्टीतील प्रत्येक चीज-वस्तूची देख रेख करीत आहे. प्रत्येक माणसावर तो लक्ष ठेवून आहे.

११०. म्हणजे तोच आकाशांच्या व जमीनीच्या खजीन्यांचा मालक व आपल्या अधिकारांचा वापर करणारा आहे. त्याच्या खेरीज असा कोणी नाही ज्याचा या खजीन्यांवर अधिकार असावा की एखाद्याला काही देऊ शकेल ना मूर्ति ना देवी-देवता.

१११. आयतींशी अभिप्रेत एकेश्वर वादाची चिन्हे होत. अल्लाहचे आदेश ही आणि कुरआनाच्या आयाती देखील.

११२. हे कठोर उत्तर आहे त्या अडाण्यांना जे एकेश्वरवादाची प्रमाणे स्पष्ट झाल्या नंतर ही पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना आग्रह करीत की त्यांनी ही या मुर्तिची उपासना करावी अशा नादान व मुर्ख लोकांवर मृदु भाषेचा काहीही प्रभाव पडत नाही. यास्तव आवाहनाच्या बुद्धि कौशल्याची ही निकड आहे की त्यांना सक्त ताकीद केली जावी आणि मूर्ख अडाणी म्हणून त्यांना संबोधण्यात हा लाभ आहे की सभंवत: त्यांनी शुद्धीवर यावे.

११३. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना संबोधून आहे की आम्ही तुमच्यावर ही हा ईश-संदेश अवतरीत केला आहे आणि तुमच्या पूर्वी जे प्रेषित होऊन गेले त्यांच्यावर ही हा ईश-संदेश अवतरीत केला होता. असे असताना जर तुम्ही अल्लाह ऐवजी दूसऱ्याची उपासना केली तर तुमचे सर्व केले सवरले वाया जाईल आणि तुम्ही नाश पावाल. प्रत्येक पैगंबरास शिर्क पासून अलिपा राहण्याची जी ताकीद केली गेली आहे त्यावरुन हे स्पष्ट होते की शिर्क असा घोर अपराध आहे की या संदर्भात कोणाचीही कसलीच गय केली जाणार नाही. मग तो पैगंबर का असेना. याचा हा अर्थ नव्हे की एखाद्या पैगंबराच्या हातून हा घोर अपराध घडण्याची शक्याता असते. किंबहुना हे अशासाठी फर्माविले गेले आहे की शिर्क च्या शिक्षेबाबत अल्लाहच्या कायद्याचे निर्बंध असणे स्पष्ट व्हावे.

११४. स्पष्ट झाले की अल्लाहशी कृतज्ञशील तोच होऊ शकतो जो फक्त त्याचीच उपासना करील. मूर्ति पूजा करणारे व अनेकेश्वरवादी अल्लाहशी कदापि कृतज्ञशील होऊ शकत नाही.

६७. या लोकांनी अल्लाहची कदर केली नाही, जसा त्याची कदर करण्याचा हक्क आहे.[११५] कियामतीच्या दिवशी संपूर्ण धरती त्याच्या मुठीत असेल आणि आकाश त्याच्या उजव्या हाताला गुंडाळलेले असतील.[११६] पवित्र आणि उच्चतम आहे तो या शिर्क पासून जे हे करतात.[११७]

وَمَا قَدَرُوا اللّٰهَ حَقَّ قَدْرِهٖ ۖ وَالْاَرْضُ جَمِيْعًا قَبْضَتُهٗ
يَوْمَ الْقِيٰمَةِ وَالسَّمٰوٰتُ مَطْوِيّٰتٌۢ بِيَمِيْنِهٖ ۭ
سُبْحٰنَهٗ وَتَعٰلٰى عَمَّا يُشْرِكُوْنَ ﴿٦٧﴾

६८. आणि सूर फुंकला जाईल, तेव्हा जे काही आकाशां मध्ये आणि जमीनीवर आहे, सर्व बेशुद्ध होऊन पडतील मात्र त्यांच्या खेरीज ज्यांना अल्लाह इच्छिल [११८] (की बेशुद्ध न व्हावेत) मग दूसरा सूर फुंकला जाईल तेव्हा अकस्मात लोक उठून उभे राहतील आणि पाहू लागतील. [११९]

وَنُفِخَ فِي الصُّوْرِ فَصَعِقَ مَنْ فِي السَّمٰوٰتِ وَمَنْ فِي الْاَرْضِ
اِلَّا مَنْ شَاۗءَ اللّٰهُ ۭ ثُمَّ نُفِخَ فِيْهِ اُخْرٰى فَاِذَا هُمْ قِيَامٌ يَّنْظُرُوْنَ ﴿٦٨﴾

६९. जमीन आपल्या पालन कर्त्याच्या तेजामुळे लखलखीत होईल [१२०] कर्मांचे रेकॉर्ड (दफ्तर) मांडले जाईल.[१२१] पैगंबर आणि साक्षी हजर केले जातील.[१२२] आणि लोकांच्या दरम्यान सत्यासह फैसला केला जाईल [१२३]आणि त्यांच्यावर कसलाही अन्याय केला जाणार नाही.

وَاَشْرَقَتِ الْاَرْضُ بِنُوْرِ رَبِّهَا وَوُضِعَ الْكِتٰبُ وَجِايْۗءَ بِالنَّـبِيّٖنَ
وَالشُّهَدَاۗءِ وَقُضِيَ بَيْنَهُمْ بِالْحَقِّ وَهُمْ لَا يُظْلَمُوْنَ ﴿٦٩﴾

७०. प्रत्येक माणसाला त्याच्या कर्मा चा पूरेपूर मोबदला दिला जाईल. लोक जे काही करतात ते तो (अल्लाह) चांगल्या प्रकारे जाणतो.

وَوُفِّيَتْ كُلُّ نَفْسٍ مَّا عَمِلَتْ وَهُوَ اَعْلَمُ بِمَا يَفْعَلُوْنَ ﴿٧٠﴾ ع

७१. आणि काफिरांना जहन्नमकडे टोळक्या टोळक्यांनी हाकत नेले जाईल.[१२४] येथ पावेतो की जेव्हा ते त्या (जहन्नम) जवळ पोहचतील तेव्हा त्याचे दरवाजे उघडले जातील [१२५] आणि त्याचे संरक्षक यांना विचारतील, काय तुमच्या जवळ तुमच्या मधूनच रसूल आले नव्हते, ज्यांनी तुमच्या पालन कर्त्याच्या आयती तुम्हाला ऐकविल्या असाव्यात आणि तुमच्यावर हा दिवस येण्या बाबत तुम्हाला भय दाखविले असावे? [१२६] ते म्हणतील, निश्चितच आले होते, परंतु काफिरांवर अजाबा (शिक्षे) चे फर्मान (शेवटी) पूर्ण झालेच.[१२७]

وَسِيْقَ الَّذِيْنَ كَفَرُوْٓا اِلٰى جَهَنَّمَ زُمَرًا ۭ حَتّٰٓي اِذَا جَاۗءُوْهَا
فُتِحَتْ اَبْوَابُهَا وَقَالَ لَهُمْ خَزَنَتُهَآ اَلَمْ يَاْتِكُمْ رُسُلٌ
مِّنْكُمْ يَتْلُوْنَ عَلَيْكُمْ اٰيٰتِ رَبِّكُمْ وَيُنْذِرُوْنَكُمْ
لِقَاۗءَ يَوْمِكُمْ هٰذَا ۭ قَالُوْا بَلٰى وَلٰكِنْ حَقَّتْ كَلِمَةُ
الْعَذَابِ عَلَي الْكٰفِرِيْنَ ﴿٧١﴾

११५. म्हणजे अल्लाहच्या महानतेची योग्य कल्पना करु शकले नाहीत आणि त्याचा मर्तबा ओळखू शकले नाहीत.

११६. यावरुन अल्लाहच्या महानतेची कल्पना कायम होते. कियामतीच्या दिवशी जमीनीचे त्याच्या एका मुठीत असणे व आकाशाचे एका हातात गुंडळलेले असणे त्याच्या जबरदस्त सामर्थ्याची व अधिकाराची अभिव्यक्ति असेल. कियामतीच्या दिवशी जेव्हा लोक हे पाहतील तेव्हा त्यांना अल्लाहच्या महानतेचे योग्य अनुमान होईल. या ठिकाणी ही चर्चा व्यर्थ होय की अल्लाहची मूठ व हाताशी काय अभिप्रेत आहे? स्पष्टीकरणात खोलवर शिरण्या ऐवजी तथ्य समजून घेण्याचा प्रयत्न केला पाहीजे आणि तथ्य अगदी स्पष्ट आहे. जेथपावेतो पूर्वीच्या लोकांचा संबंध आहे, ते म्हणत की या वाक्याचा उद्देश लोकांना अल्लाहची महानता व त्याच्या प्रतापाची पूर्वसूचना देणे होय परंतु ते अल्लाहची मूठ आणि हाता ला लाक्षाणिक अर्थाने घेत नव्हते. त्याच सोबत अल्लाहला शरीर व अवयवां पासून मुक्त ठरवित (पहा तफसीर रुहुल मआनी-भाग २४ पृ. २६) खरे पाहता अल्लाहच्या गुणविशेषां बाबत श्रद्धेची समस्या मोठी नाजुक आहे आणि नंतरच्या भाष्यकारांनी तत्वज्ञानीय विवादात पडून या समस्येला आणखी गुंतागुंतीची केले आहे. म्हणून योग्य मार्ग हाच की माणसाने पूर्वजांच्या रीतीचा अवलंब करावा आणि अल्लाह करीता मूठ, हात वगैरे जे शब्द वापरले गेले आहेत याचे भलते सलते स्पष्टीकरण करु नये, किंबहुना वाक्याचा सारगर्भ जाणून घेण्याचा प्रयत्न करावा.

आयतीचा मतितार्थ सहीह मुस्लिमच्या हदीस वचनाने अधिक स्पष्ट कला आहे, त्यात निवेदिले गेले आहे की -

'पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी एक दिवस या आयतीचे मिंबर (मशीदीतल उंच चबुतरा) वर पठण केले. पैगंबर आपल्या बोटांना बंद करीत व उधडत फर्मावित होते अल्लाह आकाश व जमीनीला आपल्या दोन्ही हातात घेईल आणि फर्माविल, मी आहे अल्लाह, मी आहे बादशहा. अब्दुल्लाह बिन उमर फर्मावितात की मी पाहत होतो की मिंबर खालून हलत आहे. येथपावेतो की मला ही भिती जाणवली की कदाचित मिंबर त्यांच्यासह खाली न कोसळावा' (मुस्लिम किताब सफातुल मुनाफीकीन)

११७. जेव्हा जमीन व आकाश अल्लाहच्या सामर्थ्या अधीन आहे तेव्हा अन्य एखाद्या ईश्वराचे आस्तित्व कोठून आले?

११८. कियामतीचा पहीला सूर जेव्हा फुंकला जाईल तेव्हा जमीन व आकाशांची सर्व बुद्धिमान व सजीव निर्मितीवर सक्त दहशत पसरेल (जसे सूरह नमल आयत क्र. ८७. मध्ये निवेदिले गेले आहे) आणि सर्व बेशुद्ध होऊन खाली कोसळतील आणि जे मुनष्य जमीनीवर असतील ते सर्व मरण पावतील. कियामतीच्या बेशुद्धी पासून केवळ तेच फरिश्ते आणि आत्मे अपवाद ठरतील ज्यांना अल्लाहच्या मर्जीस अपवाद ठरविण्याची निकड जाणवेल. अर्थात याचे ज्ञान अल्लाहलाच आहे की तो कोणत्या व्यक्तिंना अपवाद ठरविल.

११९. दुसऱ्या सूर च्या संबंधाने माणसाची अवस्था निवेदिली जात आहे की जेव्हा तो फुंकला जाईल तेव्हा समस्त माणसे त्वरीत जिवंत होऊन कबरींमधून उठून उभे राहतील आणि मोठया आश्चर्याने पाहू लागतील की आम्ही कोणत्या जगात आलो आहोत.

१२०. सूर्याचा गाशा तर आधीच गुंडाळला गेला असेल. म्हणून हश्र च्या मैदानात नव्या प्रकाशाची व्यवस्था होईल आणि ती अशी की अल्लाहच्या दिव्य तेजा ने जमीन चकाकू लागेल या तेजाचा संबंध अल्लाहकडे कोणत्या अर्थाने आहे हे निश्चित करणे आमच्या करीता कठीण आहे. कारण ही केवळ अनुमानाची गोष्ट होईल, तेव्हा यापासून अलिप्त राहणे. अगत्याचे आहे मात्र ही गोष्ट चांगल्या प्रकारे स्पष्ट आहे ही जेव्हा जमीन या प्रकाशाने चमकू लागेल तेव्हा प्रत्येक वस्तू आपल्या मूळ स्थितीत दिसू लागेल. कोणतीही गोष्ट झाकलेली वा लपलेली आणि अदृश्य राहणार नाही.

माणसाची दृष्टी देखील अतिशय तीक्ष्ण होईल आणि ज्या हकीगती त्याच्या दृष्टी पासून लपून राहल्यात त्यांना तो आपल्या डोळयांनी पाहील.

१२१. म्हणजे अल्लाहचे न्यायालय प्रस्थापित होईल. सर्व माणसांच्या कर्माचे रेकॉर्ड, जे फरीश्ते जगात तयार करीत राहीलेत, समोर ठेवले जाईल.

१२२. समस्त प्रेषित अल्लाहच्या न्यायालयात हजर होऊन साक्ष देतील की त्यांनी अल्लाहचा संदेश त्याच्या दासांपर्यंत पोहचविला होता आणि त्यांनी असअसे उत्तर दिले. इतर साक्षींशी अभिप्रेत पैगंबरांचे सच्चे अनुयायी होत ज्यांनी लोकांना सत्य धर्माचे आवाहन केले. ते देखील साक्ष देतील की त्यांनी लोकांना सत्कर्माचे आमंत्रण पोचविले होते.

१२३. म्हणजे आचरणाचे रेकॉर्ड आणि साक्षीच्या निवेदना नंतर प्रत्येक व्यक्ति बाबत निर्णय लावला जाईल अर्थात हा निर्णय अल्लाह सत्य व न्यायासह फर्माविल.

१२४. हया सूरहच्या समारोपाच्या आयती होत ज्यात त्या प्रसंगाचे चित्र उभे केले गेले आहे जेव्हा अल्लाहच्या न्यायालयाने आपला फैसला देऊन टाकला असेल आणि काफिरांना जहन्नमकडे व ईश-भय बाळगणाऱ्यांना जन्नत कडे नेले जाईल. कुरआनाने कियामतच्या या घटनेचे अशा प्रकारे चित्र रेखाटले आहे की जणू जहन्नम व जन्नत या जगातच उघड रुपाने डोळयासमोर

आल्या आहेत. या द्वारे विश्वासाची जी कैफियत निर्माण होते ती तार्कीक युक्तिवादाने होऊ शकत नाही.

सूरहचा आरंभ व तिची मध्यवर्ति कल्पना लक्षात घेता काफिरशी अभिप्रेत ते लोक होत ज्यांनी एकेश्वर वाद कबूल करण्या पासून व अल्लाहची मन:पूर्वक उपासना करण्या पासून इन्कार केला. कुरआन व त्याच्या पैगंबरास खोटे ठरवित राहीले. आखिरतच्या परिणामाची काहीच पर्वा केली नाही आणि शिर्क, मूर्तिपूजा आणि अंधश्रद्धेत गुरफटून राहीलेत.

१२५. जहन्नम कैदखाना आहे ज्याचे दरवाजे अपराध्यांचे तेथे पोहोचल्यावर उघडले जातील.

१२६. अर्थात जहन्नमच्या दरवाज्यांवर जे फरिश्ते नियुक्त असतील ते या अपराध्यांना म्हणतील की काय अल्लाह चे प्रमाण त्याच्या पैगंबरां द्वारे तुमच्या पर्यंत पोहचले नव्हते आणि काय तुम्ही या दिवसाच्या पेशी (हजर होण्या) पासून पूर्वसूचित केले गेले नव्हते? मग तुम्ही काफिर का म्हणून बनून राहीले?

१२७. ते हे मान्य करतील की अल्लाहच्या प्रेषितां द्वारे आमच्यावर अल्लाहचे प्रमाण प्रस्थापित झाले होते, परंतु ईश-शिक्षा आमच्या नशीबी होती म्हणून आम्ही सत्याचा इन्कार करीत राहीलो. ते आपल्या अपराधाचे काही ही स्पष्टीकरण देऊ शकणार नाहीत म्हणून आपल्या नशीबालाच दोष देतील.

*आणि तुम्ही पाहाल की फरिश्ते अर्श (सिंहासना) भोवती घोळका रचून आपल्या पालन कर्त्या ची प्रशंसा व गुण-गान करीत आहेत आणि लोकांच्या दरम्यान सत्यासह निर्णय लावला जाईल. आणि सांगितले जाईल की प्रशंसा आहे अल्लाह सर्व विश्वांच्या पालन कर्त्या करीता.* (अल-कुर्आन)

**७२.** फर्माविले जाईल, दाखल व्हा जहन्नमच्या दरवाज्यां मध्ये, यात सदैव राहाल. केवढे वाईट ठिकाण आहे घमेंड करणाऱ्यां चे ! [१२८]

قِيلَ ادْخُلُوٓا أَبْوَابَ جَهَنَّمَ خَٰلِدِينَ فِيهَا ۖ فَبِئْسَ مَثْوَى
الْمُتَكَبِّرِينَ ﴿٧٢﴾

**७३.** आणि जे लोक अल्लाहचे भय बाळगत राहीले त्यांना समूहा समूहा ने जन्नत कडे नेले जाईल [१२९] येथ पावेतो की, जेव्हा ते तिच्याजवळ पोहचतील आणि तिचे दरवाजे उघडले गेले असतील [१३०] तेव्हा तिचे पहारेकरी यांना म्हणतील, सलाम असो तुम्हावर, फार चांगले आहात तुम्ही, दाखल व्हा यात नेहमी करीता. [१३१]

وَسِيقَ الَّذِينَ اتَّقَوْا رَبَّهُمْ إِلَى الْجَنَّةِ زُمَرًا ۖ حَتَّىٰٓ إِذَا
جَآءُوهَا وَفُتِحَتْ أَبْوَٰبُهَا وَقَالَ لَهُمْ خَزَنَتُهَا
سَلَٰمٌ عَلَيْكُمْ طِبْتُمْ فَادْخُلُوهَا خَٰلِدِينَ ﴿٧٣﴾

**७४.** ते म्हणतील, कृतज्ञ आहोत अल्लाहचे [१३२] ज्याने आमच्या हक्कात आपले वचन खरे करुन दाखविले आणि आम्हाला जमीनीचा वारसदार बनविले, [१३३] जेणेकरुन आम्ही जन्नत मध्ये वाटेल तेथे रहावे. [१३४] तेव्हा किती चांगला मोबदला आहे (सत) कर्म करणाऱ्यांचा ! [१३५]

وَقَالُوا الْحَمْدُ لِلَّهِ الَّذِي صَدَقَنَا وَعْدَهُ وَأَوْرَثَنَا
الْأَرْضَ نَتَبَوَّأُ مِنَ الْجَنَّةِ حَيْثُ نَشَآءُ ۖ فَنِعْمَ
أَجْرُ الْعَٰمِلِينَ ﴿٧٤﴾

**७५.** आणि तुम्ही पाहाल की फरिश्ते अर्श (सिंहासना) भोवती घोळका रचून आपल्या पालन कर्त्या ची प्रशंसा व गुण-गान करीत आहेत [१३६] आणि लोकांच्या दरम्यान सत्यासह निर्णय लावला जाईल. [१३७] आणि सांगितले जाईल की प्रशंसा आहे अल्लाह सर्व विश्वांच्या पालन कर्त्या करीता. [१३८]

وَتَرَى الْمَلَٰٓئِكَةَ حَآفِّينَ مِنْ حَوْلِ الْعَرْشِ يُسَبِّحُونَ بِحَمْدِ
رَبِّهِمْ ۖ وَقُضِيَ بَيْنَهُم بِالْحَقِّ وَقِيلَ الْحَمْدُ لِلَّهِ رَبِّ الْعَٰلَمِينَ ﴿٧٥﴾

१२८. अल्लाहच्या विरोधीत घमेंड करणाऱ्यांची शिक्षा जहन्नम आहे. आणि ती ही नेहमी करीता. एवढी कठोर शिक्षा ऐकून ही जे लोक अटळ राहतील ते अजाब (ईश-शिक्षे) ला पाहूनच शुद्धीवर येतील.

१२९. काफिर आणि घमेंडी लोकांच्या विरोधात ईश-भय बाळगणाऱ्यांची परिणति निवेदिली गेली आहे. स्पष्ट झाले की जे लोक आपल्या पालन कर्त्या अल्लाहचे भय बाळगतात त्यांचे वर्तन घमेंड करणाऱ्यांच्या वर्तनाहून अगदी भिन्न असते.ते प्रत्येक दुष्कर्म व दुराचारा पासून दूर राहण्याचा प्रयत्न करतात, उलट घमेंड करणारे गुन्हयाची व त्याच्या दुष्परिणामाची पर्वा करीत नाही. ईश भय बाळगणाऱ्यांच्या यशाचा फैसला जेव्हा ऐकविला जाईल, तेव्हा त्यांना फरिश्ते जन्नत कडे नेतील. त्यांना मोठया थाटाने व सन्मानाने नेण्यात येईल व समूहा -समूहाने नेले जाईल, तात्पर्य ईश-भय बाळगणाऱ्यांच्या मिरवणूका फरिश्त्यांच्या शोभेत पूर्ण थाटा माटाने सदैव काळ राहणाऱ्या यशाच्या मजलीकडे रवाना होतील केवढे मनोहारी दृश्य असेल ते !

१३०. म्हणजे जन्नतचे दरवाजे त्यांच्या स्वागता करीता आधीच उघडले गेले असतील, जणू जन्नत त्यांचीच वाट बघत असेल.

१३१. जन्नतचे पहारेकरी यांचे मोठया तत्परतेने स्वागत करतील 'सलाम' द्वारे यांचे सुस्वागत करतील आणि यांची शुचिर्भूतता व भलेपणाचा उल्लेख करुन त्याची कदर वाढवतील. ते यांना जन्नतमध्ये दाखल होण्यास सांगतील, या शुभवार्तेसह की या ठिकाणी सदैव राहाल.

१३२. जन्नत मध्ये दाखल होणाऱ्यांची ही एक आगळीच शान असेल की ते जन्नत मध्ये दाखल होताच अल्लाहशी कृतज्ञता व्यक्त करु लागतील व त्यांच्या जिभेवर अल्लाहच्या प्रशंसेची वचने असतील.

१३३. जमीन शी अभिप्रेत जन्नत ची जमीन होय व तिचे वारस बनविले जाण्याचा अर्थ तिचे मालक बनविले जाणे होय.

१३४. म्हणजे जन्नत अतिश्य विस्तृत असेल. यास्तव आपल्या महाला बाहेर हिंडण्या, फिरण्याची व मुक्काम करण्याची पूर्ण संधी लाभेल.

१३५. जन्नतच्या बाबत अधिकांश लोक या गोड भ्रमात असतात की ती फुकटात लाभेल. परंतु ही आयत या तात्विक हकीगतीस स्पष्ट करते की जन्नत सत्कर्म करणाऱ्यांना मोबदला म्हणून दिली जाईल.

१३६. म्हणजे कियामतीच्या दिवशी तुम्ही आपल्या डोळयांनी पाहाल की फरिश्ते अल्लाहच्या उपासनेत मग्न असतील. ते ईश-सिंहासना भोवती घोळका बनवून सामुदायिक रित्या अल्लाहची स्तुति व गुणगान करण्यास मग्न आहेत. अल्लाहची महानता व त्याचे वैभव व्यक्त करणारे हे दृश्य केवढे आत्मवर्धक असेल !

१३७. म्हणजे समस्त माणसांच्या दरम्यान त्यांच्या परिणती संबंधाने निर्णय लावून दिला जाईल आणि हा निर्णय सत्य व न्यायनिष्ठ असेल जो मनुष्य आपल्या आचरणाच्या दृष्टीने ज्या गोष्टीस पात्र असेल तीच मोबदला म्हणून त्याला दिली जाईल. अन्याय कोणा वर ही केला जाणार नाही.

१३८. म्हणजे समस्त लोकांचा फैसला केला गेल्यावर हा उद्घोष केला जाईल की सर्व विश्वांच्या पालन कर्त्या अल्लाह करीता प्रशंसाच प्रशंसा आहे कारण खरे पाहता प्रशंसेस पात्र केवळ अल्लाह आहे व यासाठी ही की त्याने आपले नायायालय प्रस्थापित करून जे फैसले केले ते अत्याधिक न्यायनिष्ठ होते व यासाठी ही की या प्रसंगी त्याचे हे वैभव ही जाहीर झाले की तो अत्युच्च दर्जाच्या गुणवैशिष्टयांनी युक्त आहे.

# सूरह मोमिन

# ४०- सूरह मोमिन

**नावः** आयत क्र. २८ मध्ये एका साहसी ईमान बाळगणाऱ्याचा किस्सा निवेदिला गेला आहे. ज्याने फिरऔनच्या दरबारात पैगंबर हजरत मूसा यांचे उघड रित्या समर्थन केले होते. तद्नुषंगे या सूरह चे नांव 'अल् मोमिन' असे आहे.

**अवतरण काळ :** मक्की आहे आणि मजकूरा वरून असे दिसून येते की सूरह जुमरच्या पाठोपाठ अवतरली असेल.

**मध्यवर्ति कल्पनाः** या सूरह मध्ये अशा लोकांवर अंकुश ठेवला गेला आहे ज्यांनी एकेश्वरवादा विरुद्ध विवाद उभे केले होते आणि जे पैगंबराच्या विरोधात कटीबद्ध झाले होते.

**आयात रचनाः** आयत क्र.१ ते ३ प्रास्ताविक स्वरूपाच्या आयती होत ज्यात या ग्रंथास अवतरीत करणाऱ्या (अल्लाह) ची ओळख दिली गेली आहे.

आयत क्र.४ ते ६ मध्ये अल्लाहच्या आयती मध्ये विवाद उभा करणाऱ्यांना दुष्परिणामा बाबत खबरदार केले गेले आहे.

आयत क्र. ७ ते ९ मध्ये ईमान बाळगणाऱ्यांना ही आत्मवर्धक शुभवार्ता ऐकवली गेली आहे की त्यांच्या मोक्ष-प्राप्ती करीता दुआ करतात.

आयत क्र. १० ते २२ मध्ये काफिर व अनेकेश्वर वाद्यांकरीता तंबी व उपदेश आहे.

आयत क्र. २३ ते ४६ मध्ये हजरत मूसा यांच्या आवाहनाच्या विरोधात फिरऔनने जो वाद विवाद केला, त्याचे वर्णन आहे. आणि त्या ओघाने त्या साहसी ईमान धारकाच्या ईमान विषयक आवाहनास सविस्तरपणे निवेदिले गेले आहे, जे त्याने फिरऔनच्या दरबारात पूर्ण साहसाने व उघड रित्या हजरत मूसा यांचे समर्थन करीत, सादर केले होते. आणि नंतर फिरऔनच्या वंशजांची परिणति ही निवेदिली गेली आहे.

आयत क्र. ४७ ते ५५ मध्ये त्या लोकांना खबरदार केले गेले आहे जे डोळे मिटून मोठेपणा मिरवणाऱ्यांच्या मार्गाचे अनुसरण करतात. त्याच बरोबर ईमान बाळगणाऱ्यांचे धैर्य वाढविले गेले आहे की त्यांनी विरोधकांच्या विरोधाने खचून जाऊ नये, किंबहुना आपल्या भूमिकेवर निश्चल रहावे.

आयत क्र. ५६ ते ८५ मध्ये अल्लाहच्या धर्म-संदर्भात वाद-विवाद करणाऱ्यां समोर उचितरित्या एकेश्वरवादाचे प्रमाण प्रस्तुत केले गेले आहे. त्याच बरोबर कुफ्र (अल्लाहचा इन्कार) व शिर्क (अनेकेश्वरवादा) च्या दुष्परिणामांविषयी सावधही केले गेले आहे.

# ४०- सूरतुल् मोमिन

سُوْرَةُ الْمُؤْمِنِ

(आयती ८५)

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ

१. हा - मीम [१]

حٰمٓ ۝١

२. या ग्रंथाचे अवतरीत केले जाणे अल्लाह तर्फे आहे, जो वर्चस्वशाली आणि ज्ञान बाळगणारा आहे.[२]

تَنْزِيْلُ الْكِتٰبِ مِنَ اللّٰهِ الْعَزِيْزِ الْعَلِيْمِ ۝٢

३. अपराधांना क्षमा करणारा, तौबा (क्षमा याचना) कबूल करणारा, कठोर शिक्षा देणारा आणि मोठा कृपाशील आहे [३] त्याच्या खेरीज कोणी ही उपास्य. नाही. त्याच्याच कडे परतावयाचे आहे.

غَافِرِ الذَّنْۢبِ وَقَابِلِ التَّوْبِ شَدِيْدِ الْعِقَابِ ذِي الطَّوْلِ ۭ
لَآ اِلٰهَ اِلَّا هُوَ ۭ اِلَيْهِ الْمَصِيْرُ ۝٣

४. अल्लाहच्या आयती मध्ये तेच लोक विवाद उभे करतात, जे काफिर आहेत. [४] मोठ मोठ्या शहरांमध्ये यांचे येणे-जाणे तुम्हाला धोक्यात पाडू नये.[५]

مَا يُجَادِلُ فِيْٓ اٰيٰتِ اللّٰهِ اِلَّا الَّذِيْنَ كَفَرُوْا فَلَا يَغْرُرْكَ
تَقَلُّبُهُمْ فِي الْبِلَادِ ۝٤

५. या पूर्वी नूह [६]च्या जन-समूहाने ही खोटे ठरविले आहे आणि त्यांच्या नंतर इतर जन-समूहांनी ही. प्रत्येक जन-समूहाने आपल्या प्रेषितास आपल्या काबूत घेऊ इच्छिले.[७] असत्याचा आधार घेऊन ते विवाद करीत राहीले,या साठी की या द्वारे सत्याला पराभूत करावे. परंतु मी त्यांना धरले, तर बघा कसा होता माझा अजाब !

كَذَّبَتْ قَبْلَهُمْ قَوْمُ نُوْحٍ وَّالْاَحْزَابُ مِنْۢ بَعْدِهِمْ ۠
وَهَمَّتْ كُلُّ اُمَّةٍۢ بِرَسُوْلِهِمْ لِيَاْخُذُوْهُ وَجٰدَلُوْا
بِالْبَاطِلِ لِيُدْحِضُوْا بِهِ الْحَقَّ فَاَخَذْتُهُمْ ۣ فَكَيْفَ
كَانَ عِقَابِ ۝٥

६. याच प्रकारे तुमच्या पालन कर्त्यांचे फर्मान त्या लोकांवर ही लागू झाले आहे, ज्यांनी कुफ्र (अल्लाहचा इन्कार) केला आहे, या साठी की ते जहन्नमी होत.[८]

وَكَذٰلِكَ حَقَّتْ كَلِمَتُ رَبِّكَ عَلَى الَّذِيْنَ كَفَرُوْٓا اَنَّهُمْ
اَصْحٰبُ النَّارِ ۝٦

१. **'ह'** ح आणि **'म'** م दोन वेगवेगळी अक्षरे होत. अशा अक्षरांना त्रोटक व संदिग्ध अक्षर म्हणतात. ज्यांचे स्पष्टीकरण सूरह बकरा, टीप क्र. १ व सूरह यूनुस, टीप क्र. १ मध्ये दिले गेले आहे.

**'ह'** ح व **'म'** م चा संकेत अल्लाहच्या बुद्धिकौशल्ययुक्त असण्याकडे आहे. ज्याचा हवाला फरिश्त्यांनी आपल्या प्रार्थनांमध्ये ही दिला आहे व ज्याचा उल्लेख या सूरह च्या आयत क्र.७ मध्ये केला गेला आहे. मूळ शब्द 'हकीम' चे पहिले अक्षर **'ह'** ح आणि शेवटचे अक्षर **'म'** م तात्पर्य, हे केवळ अल्लाहच्या परिचयाचे चिन्ह होय जे त्याच्या बुद्धिकौशल्या कडे बोट दाखवते.

या सूरह नंतरच्या सहा लागोपाठ सूरतींचा आरंभ ही याच अक्षरांनी (حم **हा मीम** ने) झाला आहे आणि या सर्व सुरतींमध्ये त्याच्या बुद्धिकौशल्याचा गुणविशेष किंवा त्याच्या बुद्धिकौशल्य युक्त फैसल्यांचा उल्लेख केला गेला आहे.

२. ज्याअर्थी हा ग्रंथ त्या अस्तित्वा (अल्लाह) तर्फे अवतरीत केला गेला आहे, जो सर्व काही जाणणारा आहे आणि ज्याच्या ज्ञानाला काहीच सीमा नाही, तर या ग्रंथात जे काही निवेदिले गेले आहे त्याचे सत्य व वास्तवतेशी सुसंगत असणे अपरिहार्य व निश्चित होय.

३. या गुणविशेषांचा उल्लेख करण्याचा हेतु या गोष्टीस उत्तेजन देणे होय की दासांनी आपल्या अपराधांची त्याच्याजवळ क्षमा मागावी कारण तो तौबा कबूल करतो. दुष्कर्मांपासून दूर रहावे कारण तो मोठी कठोर शिक्षा देतो आणि त्याच्या कृपेचे अभिलाषी बनावे कारण तो मोठा कृपावंत आहे.

४. म्हणजे ज्या लोकांनी कुरआनाच्या बाबतीत योग्य वर्तन अंगिकारण्याऐवजी अविचारी मार्ग अंगिकारला आहे व इन्कार करण्याखेरीज दुसरे काही करत नाही, ते याच्या आयतींवर उलट सुलट आक्षेप घेतात व विवाद उभे करतात.

आज देखील अशा लोकांची कमतरता नाही जे कुरआनाला समजून घेण्याचा प्रयत्न तर करीत नाही उलट त्यास आपल्या आक्षेपांचे लक्ष्य बनवितात.

५. म्हणजे या काफिरांना जी भौतिक साधने प्राप्त आहेत, आणि ते आपल्या ऐहीक जीवनास वैभवशाली बनविण्याकरीता जी तल्लीनता दाखवित आहेत, त्यावरून हा गैरसमज होता कामा नये की हे लोक अल्लाहच्या नजरेत प्रिय आहेत आणि तो यांना कुफ्र व अपराधांची शिक्षा देणार नाही.

६. स्पष्टीकरणाकरीता पहा सूरह अअराफ टीप क्र. ९५

७. म्हणजे अल्लाहची मदत नेहमी आपल्या पैगंबरा सोबत असते म्हणून त्याचे शत्रू त्यास आपल्या पकडीत घेऊ शकले नाहीत व आपल्या कट-कारस्थानां मध्ये सफल होऊ शकले नाही. तद्वतच या पैगंबरा बाबतही त्याचे वैरी तोंडघशी पडतील.

८. म्हणजे आपल्या कुफ्र निती मुळे शेवटी जहन्नम मध्येच पोहचणारा आहेत.

७. (ते फरिश्ते) ज्यांनी ईश- सिंहासनास (अर्शला) उचलून धरले आहे. [९] आणि जे त्याच्या अवती-भोवती आहेत, ते आपल्या पालन कर्त्याचे प्रशंसे सह गुणगान करतात. [१०] आणि त्यावर ईमान राखतात.[११] आणि ज्यांनी ईमान बाळगले आहे, त्यांच्या करीता ते माफीची प्रार्थना करतात की, हे आमच्या पालनकर्त्या ! तू आपल्या कृपा व आपल्या ज्ञानाने प्रत्येक गोष्टीस घेरून ठेवले आहे, तेव्हा त्या लोकांना माफ कर ज्यांनी क्षमा-याचना केली आणि तुझा मार्ग अंगिकारला आणि त्यांना जहन्नमच्या शिक्षेपासून वाचव.[१२]

الَّذِينَ يَحْمِلُونَ الْعَرْشَ وَمَنْ حَوْلَهُ يُسَبِّحُونَ
بِحَمْدِ رَبِّهِمْ وَيُؤْمِنُونَ بِهِ وَيَسْتَغْفِرُونَ لِلَّذِينَ آمَنُوا
رَبَّنَا وَسِعْتَ كُلَّ شَيْءٍ رَحْمَةً وَعِلْمًا فَاغْفِرْ لِلَّذِينَ
تَابُوا وَاتَّبَعُوا سَبِيلَكَ وَقِهِمْ عَذَابَ الْجَحِيمِ ⑦

८. हे आमच्या पालनकर्त्या ! यांना सदैव कालीन जन्नतीमध्ये दाखल कर, ज्यांचे तू यांना वचन दिले आहेस आणि त्यांना देखील जे यांच्या माता-पिता, यांच्या पत्न्या आणि यांच्या संतती पैकी सदाचारी असावेत.[१३] नि:संशय तू वर्चस्वशाली व बुद्धिकौशल्य बाळगणारा आहे.[१४]

رَبَّنَا وَأَدْخِلْهُمْ جَنَّاتِ عَدْنٍ الَّتِي وَعَدْتَهُمْ وَمَنْ صَلَحَ
مِنْ آبَائِهِمْ وَأَزْوَاجِهِمْ وَذُرِّيَّاتِهِمْ إِنَّكَ أَنْتَ الْعَزِيزُ
الْحَكِيمُ ⑧

९. आणि यांना दुष्परिणामां पासून वाचव. आणि ज्यांना तू या दिवशी दुष्परिणामां पासून वाचविले त्यांच्यावर तू निश्चितच कृपा केली.[१५] हीच मोठी सफलता होय.

وَقِهِمُ السَّيِّئَاتِ وَمَنْ تَقِ السَّيِّئَاتِ يَوْمَئِذٍ
فَقَدْ رَحِمْتَهُ وَذَٰلِكَ هُوَ الْفَوْزُ الْعَظِيمُ ⑨

१०. ज्या लोकांनी कुफ्र केले, त्यांना मोठ्याने सांगितले जाईल, तुम्ही स्वत:शी जेवढे उद्विग्न आहात, याहून कितीतरी जास्त अल्लाह तुमच्याशी बेजार होता. जेव्हा तुम्हाला ईमान बाळगण्याचे आवाहन केले जात होते आणि तुम्ही कुफ्र करीत होते.[१६]

إِنَّ الَّذِينَ كَفَرُوا يُنَادَوْنَ لَمَقْتُ اللَّهِ أَكْبَرُ مِنْ
مَقْتِكُمْ أَنْفُسَكُمْ إِذْ تُدْعَوْنَ إِلَى الْإِيمَانِ
فَتَكْفُرُونَ ⑩

११. ते म्हणतील, हे आमच्या पालनकर्त्या ! तू आम्हाला दोनदा मृत्यु दिला आणि दोनदा जीवन दिले.[१७] आता आम्ही आपले अपराध मान्य करतो. तर काय येथून ही बाहेर पडण्याचा एखादा मार्ग आहे ?

قَالُوا رَبَّنَا أَمَتَّنَا اثْنَتَيْنِ وَأَحْيَيْتَنَا اثْنَتَيْنِ فَاعْتَرَفْنَا
بِذُنُوبِنَا فَهَلْ إِلَىٰ خُرُوجٍ مِنْ سَبِيلٍ ⑪

९. याची कैफियत आम्हास ठाऊक नाही आणि ज्याअर्थी ही गोष्ट अपरोक्षाशी संबंधित आहे, तेव्हा कोणत्याही विवादात न पडता यावर ईमान राखले पाहीजे.

१०. म्हणजे अल्लाहच्या समीप असलेले फरिश्ते अल्लाहची स्तुती व त्याच्या पावित्र्याचे गुणगान करण्यात मग्न राहतात. यावरून हे अनुमान लावले जाऊ शकते की अल्लाहची प्रशंसा व त्याचे पावित्र्य-वर्णन केवढी वैभवपूर्ण उपासना आहे. तिचा जेवढा जास्त इतमाम राखला जावा तितका जास्त अल्लाहशी लगाव होईल. मात्र या अटीवर की हा केवळ जीभेचा जाप नसावा, किंबहुना अंत:करणाशी ही एकरूप असावा.

११. 'ईश-सिंहासना' सारख्या किती ही हकीगतींना फरिश्ते जाणत असले तरी अल्लाहच्या स्वत:विषयी व त्याच्या गुणविशेषा विषयी त्यांना कित्येक गोष्टी रहस्यमय असतील. म्हणून त्यांनी ही अल्लाहवर नि:शंकपणे ईमान राखणे अगत्याचे आहे आणि ही आयत हे स्पष्ट करते की ते देखील अल्लाह वर ईमान राखतात.

१२. केवढ्या मोठ्या मानाची व सद्‌भाग्याची गोष्ट आहे की ईमान बाळगणाऱ्यां करीता फरिश्ते ईश-सिंहासनाजवळ यांच्या क्षमा दानाकरीता प्रार्थना करतात!

स्पष्ट असावे की फरिश्ते मगफिरत (क्षमा केली जाणे) ची ही प्रार्थना नामधारी मुसलमानां करीता करीत नाही जे दुष्कर्म व दुराचारात आकंठ बुडाले आहेत, किंबहुना आयतीच्या स्पष्टीकरणा नुसार अशा लोकांकरीता करतात, ज्यांनी आपल्या अपराधांची क्षमा मागून पुन्हा तसे न करण्याचा दृढ संकल्प केला आणि अल्लाहच्या मार्गाला लागले अर्थात ज्यांनी आपल्या आचरणात सुधारणा करून सन्मार्गाचा अंगिकार केला आहे.

तसेच हे ही स्पष्ट व्हावे की या ठिकाणी फरिश्त्यांच्या दुआ (प्रार्थने) चा उल्लेख केला गेला आहे, शिफारसीचा नव्हे आणि ही दुआ देखील ईमान धारक समूहा करीता आहे, निवडक लोकांकरीता नव्हे. शिफारसीचा मामला तर कियामतीच्या दिवशी उद्‌भवेल आणि तो निवडक लोकांशी संबंधित असेल, अर्थात अल्लाहच्या अनुज्ञेविना कोणीही शिफारस करण्या करीता तोंड उघडू शकणार नाही.

१३. स्पष्टीकरणा करीता पहा सूरह रअद टीप क्र. ५५ 'सदाचारी असावेत' चे स्पष्टीकरण या गोष्टीला अधिक स्पष्ट करते की फरिश्त्यांची ही प्रार्थना ईमान बाळगणाऱ्या सदाचारींकरीता आहे. ज्यावरून त्यांचा विशुध्द मनोभाव व प्रेम दिसून येते.

१४. अल्लाहच्या या गुणविशेषांचा उल्लेख ही गोष्ट व्यक्त करण्या करीता आहे की फैसला तुझ्याच हाती आहे आणि तुझा कोणताही फैसला बुद्धिकौशल्य विरहीत असू शकत नाही.

१५. म्हणजे तू यांच्यावर दया कर, जेणेकरून कियामतीच्या दिवशी यांना दुष्परिणामांना तोंड द्यायची पाळी येऊ नये आणि ते त्या दिवसाच्या संकटापासून सुरक्षित रहावेत.

१६. काफिर (अल्लाहचा इन्कार करणाऱ्या) लोकांना जहन्नम मध्ये दाखल झाल्यावर स्वत:शीच भयंकर उदविग्नता जाणवेल की अरे हे अम्ही काय करून बसलो, ज्यामुळे आम्हाला ही कठोर शिक्षा भोगावी लागत आहे. त्यावेळी त्यांना आठवण करून दिली जाईल तुम्हाला जगात ईमान बाळगण्याचे आवाहन केले जात होते, पण तुम्ही इन्कार करत राहीले त्या वेळी अल्लाह तुमच्याशी याहून अधिक उद्विग्न होता जेवढी आज तुम्हाला स्वत:बद्दल वाटते आणि ज्याअर्थी तुम्ही असा घोर अपराध केला जो अल्लाहच्या उद्विग्नतेस व त्याच्या क्रोधास कारणीभूत आहे, तर आता आपल्या कृतकर्माचे फळ चाखा.

१७. दोनदा 'मृत्यु' शी अभिप्रेत एक तर ते शरीर होय जे गर्भाशयात निर्मितीच्या प्रथमावस्थेत असते आणि अजून त्यात जीव टाकला गेलेला नसतो. हे शरीर मृत असते म्हणून त्यास मृत्युच्या अर्थाने घेतले गेले आहे आणि दुसऱ्यांदा येणारा मृत्यु म्हणजे जेव्हा प्राण शरीरातून काढला जातो व तो या जगाचा निरोप घेतो आणि दोन वेळा 'जिवन' शी अभिप्रेत एक तर ऐहिक जीवन होय व दुसरे कियामतीच्या दिवशी जेव्हा मृत माणसे कबरीतून उठून उभे राहतील. सूरह बकराची आयत क्र. २८ या आयतीचे भाष्य करते. त्यात फर्मांविले गेले आहे की-

وَكُنتُمْ أَمْوَاتًا فَأَحْيَاكُمْ ثُمَّ يُمِيتُكُمْ ثُمَّ يُحْيِيكُمْ
ثُمَّ إِلَيْهِ تُرْجَعُونَ ۔ (البقرہ:٢٨)

------'तुम्ही मेलेले होते तेव्हा त्याने तुम्हाला जीवन प्रदान केले मग तो तुम्हाला मृत्यु देईल मग (पुन्हा) तुम्हाला जिवंत करील मग त्याच्याच कडे तुम्ही परतविले जाल.'

स्पष्ट असावे की या ठिकाणी फक्त शारीरिक मृत्युचा व शारीरिक जीवनाचा उल्लेख केला गेला आहे. राहीले आलमे बर्जख व (कबरी) चे जीवन तर याचा संबंध ज्याअर्थी आत्म्याशी आहे, कारण शरीर तर नष्ट होते, म्हणून त्याचे स्वरूप या जीवनासारखे नाही जे आत्म्याचा शरीराशी संबंध असणाऱ्या स्थितीत असते किंबहुना ते एक खास प्रकारचे आत्मिक जीवन आहे ज्यात एक तर आत्म्यावर अजाब अवतरीत होतो किंवा तो सुख समाधानात राहतो. यास्तव या आयतीत त्या लोकां करीता कसलेही प्रमाण नाही जे कबरीच्या अजाबचा (कबरीत आत्म्यावर होणाऱ्या ईश प्रकोपाचा) इन्कार करतात.

१२. तुम्ही या परिणतीस या कारणास्तव पोहचले की जेव्हा एकमेव अल्लाहकडे बोलावले जात होते, तेव्हा तुम्ही इन्कार करीत असत आणि जेव्हा त्याचे सहभागी ठरवले जात, तेव्हा (त्यांना) तुम्ही मानत. [१८] आता आदेश (फैसला) अत्युच्च व श्रेष्ठतम अल्लाहचाच आहे.

ذَٰلِكُم بِأَنَّهُۥٓ إِذَا دُعِىَ ٱللَّهُ وَحْدَهُۥ كَفَرْتُمْ ۖ وَإِن يُشْرَكْ بِهِۦ
تُؤْمِنُوا۟ ۚ فَٱلْحُكْمُ لِلَّهِ ٱلْعَلِىِّ ٱلْكَبِيرِ ﴿١٢﴾

१३. तोच होय, [१९] जो तुम्हाला आपल्या निशाण्या दाखवितो, आणि आकाशातून तुमच्या करीता उपजिविका अवतरीत करतो, परंतु बोध तोच ग्रहण करतो, जो (अल्लाह कडे) रूजू करणारा असावा.

هُوَ ٱلَّذِى يُرِيكُمْ ءَايَٰتِهِۦ وَيُنَزِّلُ لَكُم مِّنَ ٱلسَّمَآءِ رِزْقًا ۚ
وَمَا يَتَذَكَّرُ إِلَّا مَن يُنِيبُ ﴿١٣﴾

१४. तेव्हा अल्लाह लाच पुकारा, धर्मा (दास्यत्वा) ला त्याच्याच प्रित्यर्थ निर्भेळ करून [२०] मग काफिरांना कितीही अप्रिय वाटो ! [२१]

فَٱدْعُوا۟ ٱللَّهَ مُخْلِصِينَ لَهُ ٱلدِّينَ وَلَوْ كَرِهَ ٱلْكَٰفِرُونَ ﴿١٤﴾

१५. तो अत्युच्च दर्जे बाळगणारा, [२२] ईश-सिंहासनाचा स्वामी [२३] आपल्या दासांपैकी ज्याच्यावर इच्छितो आपल्या आदेशाने रूह (ईश-संदेश) अवतरीत करतो [२४] अशासाठी की त्याने हजर होण्याच्या दिवसाबाबत खबरदार करावे.

رَفِيعُ ٱلدَّرَجَٰتِ ذُو ٱلْعَرْشِ يُلْقِى ٱلرُّوحَ مِنْ أَمْرِهِۦ
عَلَىٰ مَن يَشَآءُ مِنْ عِبَادِهِۦ لِيُنذِرَ يَوْمَ ٱلتَّلَاقِ ﴿١٥﴾

१६. तो दिवस की लोक बाहेर पडतील. [२५] त्यांची कोणती ही गोष्ट अल्लाह पासून लपून राहणार नाही. आज सत्ता कोणाची आहे? एकमेव आणि प्रभुत्वशाली अल्लाहची. [२६]

يَوْمَ هُم بَٰرِزُونَ ۖ لَا يَخْفَىٰ عَلَى ٱللَّهِ مِنْهُمْ شَىْءٌ ۚ لِّمَنِ
ٱلْمُلْكُ ٱلْيَوْمَ ۖ لِلَّهِ ٱلْوَٰحِدِ ٱلْقَهَّارِ ﴿١٦﴾

१७. आज प्रत्येक जीवाला त्याच्या कमाईचा मोबदला दिला जाईल. आज कसलाही अत्याचार होणार नाही. निःसंशय अल्लाह हिशेब घेण्यात विलंब करीत नाही. [२७]

ٱلْيَوْمَ تُجْزَىٰ كُلُّ نَفْسٍۭ بِمَا كَسَبَتْ ۚ لَا ظُلْمَ ٱلْيَوْمَ ۚ إِنَّ ٱللَّهَ
سَرِيعُ ٱلْحِسَابِ ﴿١٧﴾

१८. म्हणजे तुम्हाला तौहीद (एकेश्वरवादा) शी अभिरूची नव्हती. उलट, शिर्क (अनेकेश्वर उपासने) मध्ये गोडी होती. वाईट श्रद्धा बाळगाणाऱ्या लोकांची हीच दशा असते. त्याच्या समोर निर्भेळ एकेश्वरवाद प्रस्तुत केल्यास त्याचा ते इन्कार करतील, ऐकले न ऐकल्या सारखे करतील परंतु जर एखादा मार्ग भ्रष्ट मनुष्य त्यांनी ठरविलेल्या अल्लाहच्या सहभागींचा उल्लेख करील तेव्हा मात्र ते आपली नितांत श्रद्धा व्यक्त करतील.

१९. वर अनेकेश्वर वादाची परिणती निवेदिली गेली आहे. आता तौहीद (एकेश्वरवादा) ला कबूल करण्याचे आवाहन केले जात आहे.

२०. म्हणजे अल्लाहचेच दास बनून त्यालाच गरज पूर्ति करीता साद घाला व त्याचीच मनोभावे उपासना करा.

२१. म्हणजे निर्भेळ एकेश्वरवाद अंगिकारण्यात काफिर व मुस्लिमेतर लोकांची नाराजी आड येता कामा नये. मामला खरे पाहता अल्लाहशी संबंधित आहे, तेव्हा त्याच्याच रागा लोभाची पर्वा केली पाहीजे.

२२. म्हणजे त्याची शान व त्याचा मर्तबा अतिशय उच्च आहे म्हणून निर्मितीवरून त्याला कयास करणे व त्याचा समकक्ष ठरविणे अगदी मिथ्या व त्याच्या प्रतिष्ठेस गालबोट लावणारे आहे.

२३. स्पष्टीकरणा करीता पहा सूरह अअराफ टीप क्र. ८३

२४. रूह (ईशसंदेश) च्या स्पष्टीकरणा करीता पहा सूरह नहल टीप क्र.३

२५. म्हणजे कबरीमधून बाहेर पडतील.

२६. या जगात ज्यांना सर्वश्रेष्ठ अल्लाहने विश्वस्त या नात्याने सत्ताधिकार सोपविला होता. या पैकी अधिकांश लोक स्वत:ला सत्तेचा स्वामी समजत राहीले आणि आपली बादशाही व शासकत्वाचे दावेदार बनत राहीले. परंतु कियामतीच्या दिवशी जेव्हा प्रश्न-चिन्ह बनून हा उद्घोष उंचावले की आज सत्ता कोणाची आहे? तेव्हा बादशाही व शासकत्वाचा डंका वाजविणाऱ्या या दावेदारांची दातखिळी बसेल. कारण त्या दिवशी कोणाजवळ कसलीही सत्ता असणार नाही. सर्व अगति दास म्हणून अल्लाह समोर हजर होतील, त्यावेळी हा स्वर उंचावेल की आज सत्ताधिकार एकट्या अल्लाहचाच आहे, जो असा जबरदस्त आहे की सर्व त्याच्यापुढे नि:ष्प्रभ आहेत.

कियामतीच्या दिवशी तर ही हकीगत उघडपणे समोर येईल की अल्लाहच सत्ताधिकार बाळगणारा खराखुरा शासक आहे, परंतु जगातही त्याला अंतर्दृष्टीने पाहीले जाऊ शकते, यास्तव इस्लामची ही अपेक्षा आहे की एकमेव अल्लाहला खराखुरा शासक मानावे.

२७. म्हणजे असे समजू नका की अब्जावधी किंबहुना त्याहून अधिक लोकांचा हिशेब घेण्यात अल्लाहला विलंब होईल. मानव-शासकावरून अल्लाहचा कयास करणे उचित नव्हे. तो जर दररोज हजारो जीव निर्माण करतो व हजारो जीवांना मरण देतो आणि जिवित असलेल्या असंख्य जीवांना खाद्य पुरवितो, तेव्हा अब्जावधी व खरगावधी माणसांचा एकाच वेळी हिशेब घेणे त्याला काय कठीण आहे? एकाच वेळी तो असंख्य माणसांकडे व्यक्तिश: लक्ष देऊ शकतो आणि त्यांचा वेगवेगळा हिशेब घेऊ शकतो.

१८. आणि यांना त्या दिवसाचे भय दाखवा, जो जवळ येऊन ठेपला आहे [२८] जेव्हा काळीज तोंडाशी येईल, आणि ते शोकाकुल होतील. अत्याचारींचा असा कोणी दोस्त नसेल आणि ना शिफारस करणारा, ज्याचे म्हणणे मानले जावे.[२९]

وَأَنذِرْهُمْ يَوْمَ الْآزِفَةِ إِذِ الْقُلُوبُ لَدَى الْحَنَاجِرِ كَاظِمِينَ ۚ
مَا لِلظَّالِمِينَ مِنْ حَمِيمٍ وَلَا شَفِيعٍ يُطَاعُ ﴿١٨﴾

१९. तो नजरांच्या चोरीस ही जाणतो [३०] आणि त्या गोष्टींना ही ज्या छातीत (अंतः करणात) लपवून ठेवल्या आहेत.[३१]

يَعْلَمُ خَائِنَةَ الْأَعْيُنِ وَمَا تُخْفِي الصُّدُورُ ﴿١٩﴾

२०. अल्लाह अगदी उचित फैसला फर्माविल आणि ज्या (उपास्यांना) हे अल्लाहला सोडून पुकारतात, ते कोणत्याही गोष्टीचा फैसला करणारा नाहीत. [३२] निःसंशय अल्लाहच सर्व काही ऐकणारा, पाहणारा आहे.[३३]

وَاللَّهُ يَقْضِي بِالْحَقِّ ۖ وَالَّذِينَ يَدْعُونَ مِن دُونِهِ
لَا يَقْضُونَ بِشَيْءٍ ۗ إِنَّ اللَّهَ هُوَ السَّمِيعُ الْبَصِيرُ ﴿٢٠﴾

२१. काय हे लोक जमिनीवर हिंडले फिरले नाहीत की यांनी पाहीले असते त्या लोकांचा शेवट कसा झाला जे यांच्या पूर्वी होऊन गेले आहेत. ते सामर्थ्यात ही यांच्याहून कितीतरी जास्त होते आणि जमिनीवर अवशेष सोडण्याच्या दृष्टीने ही.[३४] परंतु अल्लाहने त्यांना त्यांच्या अपराधांपायी धरले. आणि असा कोणी नव्हता, ज्याने यांना अल्लाह (च्या तावडी) पासून वाचविले असते.

أَوَلَمْ يَسِيرُوا فِي الْأَرْضِ فَيَنظُرُوا كَيْفَ كَانَ عَاقِبَةُ
الَّذِينَ كَانُوا مِن قَبْلِهِمْ ۚ كَانُوا هُمْ أَشَدَّ مِنْهُمْ قُوَّةً
وَآثَارًا فِي الْأَرْضِ فَأَخَذَهُمُ اللَّهُ بِذُنُوبِهِمْ وَمَا كَانَ
لَهُم مِّنَ اللَّهِ مِن وَاقٍ ﴿٢١﴾

२२. हे अशासाठी झाले की त्यांच्या जवळ त्यांचे रसूल (पैगंबर) स्पष्ट निशाण्या घेऊन आले होते, परंतु त्यांनी इन्कर केला, तेव्हा अल्लाहने त्यांना धरले. निश्चितच, तो मोठा सामर्थ्यशाली आणि कठोर शिक्षा देणारा आहे.[३५]

ذَٰلِكَ بِأَنَّهُمْ كَانَت تَّأْتِيهِمْ رُسُلُهُم بِالْبَيِّنَاتِ فَكَفَرُوا
فَأَخَذَهُمُ اللَّهُ ۚ إِنَّهُ قَوِيٌّ شَدِيدُ الْعِقَابِ ﴿٢٢﴾

२३. आम्ही मूसा ला आपल्या निशाण्या व स्पष्ट प्रमाणासह पाठविले.[३६]

وَلَقَدْ أَرْسَلْنَا مُوسَىٰ بِآيَاتِنَا وَسُلْطَانٍ مُّبِينٍ ﴿٢٣﴾

२४. फिरऔन, हामान,[३७] आणि कारून [३८] कडे. तेव्हा ते म्हणाले हा जादूगार आहे, खोटारडा.

إِلَىٰ فِرْعَوْنَ وَهَامَانَ وَقَارُونَ فَقَالُوا سَاحِرٌ كَذَّابٌ ﴿٢٤﴾

२८. म्हणजे कियामतीच्या वेळेला दूर समजू नका. ती लवकरच प्रस्थापित होणार आहे.

२९. हे त्या दुषित श्रद्धेचे खंडन आहे की अमुक एक आमची शिफारस करतील आणि त्यांची शिफारस अपरिहार्यपणे मानली जाईल. शिफारसीच्या या चुकीच्या श्रद्धेमुळेच लोक आखिरत बाबत बेपर्वा झाले आहेत.

३०. 'नजरांची चोरी' अशी की माणसाने लपून छपून त्या गोष्टींवर नजर टाकावी, ज्यांना पाहण्याची मनाई आहे. उदाहरणार्थ एखाद्या अनोळखी स्त्री ला पाहण्यासाठी डोकावणे, गुप्तपणे एखाद्याच्या लपविण्याजोग्या अवयवांवर नजर टाकणे किंवा अश्लील दृश्ये व चित्रे पाहणे इत्यादी. माणूस खरोखर अल्लाहचे भय बाळगणारा असेल तर तो आपल्या दृष्टीला या सर्व गोष्टींपासून वाचवील की ती अशा कोणत्याही गोष्टीवर न पडावी जिला पाहणे हराम आहे, कारण तो हे जाणतो की अल्लाह पासून कोणतीही गोष्ट लपून राहू शकत नाही. येथपावेतो की डोळ्यांनी लपून छपून पाहणे देखील.

३१. म्हणजे पैगंबरांची अवस्था-नियत, इरादे, दृढ संकल्प इ.

३२. म्हणजे कियामतीच्या दिवशी, जो फैसल्याचा दिवस असेल, अल्लाह खेरीज असा कोणी नसेल जो माणसांचे आचरण व त्यांच्या दरम्यान भांडण-तंट्याचा फैसला करील. ख्रिश्चन धर्मीय हजरत ईसा (येशू) यांच्याविषयी ही श्रद्धा बाळगतात की ते कियामतीच्या दिवशी माणसांच्या दरम्यान त्यांच्या आचरणानुसार फैसला करतील (पहा मत्तय २५: ३१ ते ४६) ही श्रद्धा नितांत खोटी आहे आणि कुरआनाची ही एकच आयत या श्रद्धेचे खंडन करण्यास पुरेशी आहे.

३३. हे या गोष्टीचे प्रमाण होय की जेव्हा अल्लाह खेरीज सर्व काही ऐकणारा व पाहणारा दुसरा कोणी नाही तर फैसला करण्यास पात्र असा त्याच्याखेरीज अन्य कोणीही असू शकत नाही.

३४. म्हणजे सांस्कृतिक विकासाचे अवशेष. हा संकेत समूद, मदयन, इत्यादि जन समूहांकडे आहे. ज्यांच्या सांस्कृतिक विकासाचे अवशेष आज देखील भग्न व ओसाड इमारतींच्या स्वरूपात आहेत.

३५. जेव्हा ही वस्तुस्थिती अवलोकनात आलेली आहे की अल्लाह या जगात अपराधी जन-समूहांना त्यांच्या अपराधांची शिक्षा देतो तर आखिरत बाबत या गोड-भ्रमात राहणे कितपत योग्य ठरु शकते की तिथे माफीच माफी असेल मग माणसाने केवढाही घोर अपराध केलेला असेल, त्याची शिक्षा त्याला मिळणार नाही.

३६. स्पष्टीकरणा करीता पहा सूरह मोमिनून टीप क्र. ४४

३७. विवरणासाठी पहा सूरह कसस टीप क्र. ११

३८. विवरणासाठी पहा सूरह कसस टीप क्र. १४३

२५. आणि जेव्हा तो आमच्या जवळून सत्य घेऊन त्यांच्या जवळ पोहचला. तेव्हा ते म्हणाले, हत्या करा त्या लोकांच्या मुलांची ज्यांनी याच्या सोबत ईमान बाळगले आहे आणि त्यांच्या मुलींना जिवंत राहू द्या.[३९] परंतु त्या काफिरांचा कट व्यर्थ गेला.[४०]

فَلَمَّا جَآءَهُمْ بِالْحَقِّ مِنْ عِنْدِنَا قَالُوا اقْتُلُوٓا اَبْنَآءَ
الَّذِيْنَ اٰمَنُوْا مَعَهٗ وَاسْتَحْيُوْا نِسَآءَهُمْ ؕ وَمَا كَيْدُ الْكٰفِرِيْنَ
اِلَّا فِيْ ضَلٰلٍ ﴿۲۵﴾

२६. आणि फिरऔन म्हणाला, मला सोडा की मी मूसाची हत्या करावी आणि त्याने आपल्या पालन कर्त्याचा धावा करावा ![४१] मला भय वाटते की, त्याने कदाचित तुमचा धर्म ना बदलून टाकावा,[४२] किंवा जमिनीवर उत्पात ना कायम करावा. [४३]

وَقَالَ فِرْعَوْنُ ذَرُوْنِيْٓ اَقْتُلْ مُوْسٰى
وَلْيَدْعُ رَبَّهٗ ۚ اِنِّيْٓ اَخَافُ اَنْ يُّبَدِّلَ دِيْنَكُمْ اَوْ اَنْ
يُّظْهِرَ فِي الْاَرْضِ الْفَسَادَ ﴿۲۶﴾

२७. मूसा म्हणाला, मी त्या प्रत्येक घमेंडी (च्या उपद्रवा) पासून, जो हिशेबाच्या दिवसा वर ईमान राखत नाही, आपल्या व तुमच्या पालन कर्त्याचे शरण पत्करले.[४४]

وَقَالَ مُوْسٰٓى اِنِّيْ عُذْتُ بِرَبِّيْ وَرَبِّكُمْ مِّنْ كُلِّ
مُتَكَبِّرٍ لَّا يُؤْمِنُ بِيَوْمِ الْحِسَابِ ﴿۲۷﴾

२८. आणि एक ईमान बाळगणारा पुरुष, जो फिरऔन-वंशापैकी होता आणि आपल्या ईमानास लपवून होता,[४५] उद्गारला, काय तुम्ही एका माणसाची यामुळे हत्या कराल की तो म्हणतो माझा पालन कर्ता अल्लाह आहे, वस्तुतः तो तुमच्या पालन कर्त्या तर्फे स्पष्ट निशाण्या घेऊन आला आहे. जर तो खोटारडा असेल तर त्याच्या खोटेपणाचे संकट त्याच्यावरच ओढवेल आणि जर तो सच्चा असेल तर ज्या ईश-शिक्षेचे भय तो तुम्हाला दाखवत आहे, ती कोणत्या न कोणत्या मर्यादेप्रत निश्चितच तुम्हाला पोहचल्या शिवाय राहणार नाही.[४६] अल्लाह अशा माणसाला मार्गदर्शन करीत नाही जो मर्यादेचे उल्लंघन करणारा व खोटारडा असावा.[४७]

وَقَالَ رَجُلٌ مُّؤْمِنٌ ۖۗ مِّنْ اٰلِ فِرْعَوْنَ يَكْتُمُ اِيْمَانَهٗٓ
اَتَقْتُلُوْنَ رَجُلًا اَنْ يَّقُوْلَ رَبِّيَ اللّٰهُ وَقَدْ جَآءَكُمْ
بِالْبَيِّنٰتِ مِنْ رَّبِّكُمْ ؕ وَاِنْ يَّكُ كَاذِبًا فَعَلَيْهِ كَذِبُهٗ ۚ
وَاِنْ يَّكُ صَادِقًا يُّصِبْكُمْ بَعْضُ الَّذِيْ يَعِدُكُمْ ؕ
اِنَّ اللّٰهَ لَا يَهْدِيْ مَنْ هُوَ مُسْرِفٌ كَذَّابٌ ﴿۲۸﴾

३९. बनी इस्राईल वंशाची संख्या घटविण्या करीता मुलांच्या जन्म प्रसंगी मुलांना (पुत्रांना) ठार करण्याचा आदेश फिरऔनने पूर्वी देखील दिला होता आणि हजरत मूसा यांचा जन्म अशाच परिस्थितीत झाला होता, परंतु आता जेव्हा हजरत मूसा यांच्या आवाहनाने फिरऔनला धोका जाणवला तेव्हा त्याने बनी इस्राईलच्या नवजात मुलांना ठार करण्याचा दुसऱ्यांदा आदेश दिला, या साठी की या अल्पसंख्यांक जमातीने डोके वर काढू नये व त्यांची संख्या ही घटावी. अशा प्रकारे फिरऔनने अतिशय पक्षपातपूर्ण व क्रूर नितीचे पाऊल उचलले (आधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह अअराफ टीप क्र. १८१)

४०. फिरऔनचे हे कट कारस्थान सफल होऊ शकले नाही. बनी इस्राईल वंशाला दु:ख यातना अवश्य पोहचली, परंतु ईमानधारक असल्यामुळे व पैगंबराचे अनुसरण केल्यामुळे अल्लाहचे समर्थन त्यांना लाभले आणि विनाशाला केवळ फिरऔनला ताँड द्यावे लागले.

४१. फिरऔन असे आपल्या दरबारातील लोकांना म्हणाला त्याने हजरत मूसा यांची हत्या करण्याचा संकल्प जाहीर केला व त्या सोबतच त्यांच्या बद्दल व्यंगपूर्ण बोलला की त्यांनी स्वत:ला वाचविण्या करीता आपल्या पालन कर्त्याचा धावा करावा. अशा प्रकारे फिरऔनने हजरत मूसा व त्यांच्या पालनकर्त्याची थट्टा केली. ज्यावरून हे दिसून येते की तो केवढा घमेंडी व गर्वोन्मत्त होता.

४२. धर्म बदलण्याशी अभिप्रेत श्रद्धा व धर्माचे परिवर्तन होय. फिरऔनचा जनसमूह ताऱ्यांची पूजा करणारा होता. त्यांनी अल्लाहला सोडून ताऱ्यांना देवी-देवता बनवून ठेवले होते आणि ते फिरऔनची ही पूजा करीत जो स्वत: सूर्य देवतेचा अवतार असल्याचा दावा करीत असे. हजरत मूसा यांचे एकेश्वरवादाचे आवाहन आखिरत व प्रेषित्वावर ईमान राखण्यात, व एक अल्लाहची उपासना करण्यात व त्याचे आज्ञापालन करण्यात स्वत:ला समर्पित करण्याचे आवाहन होते. हा अल्लाहचा धर्म होता, ज्याला ते प्रस्तुत करीत होते. फिरऔन हे केव्हा सहन करू शकत होता की, त्याच्या जनसमूहाने हजरत मूसा यांनी प्रस्तुत केलेल्या धर्मावर-अर्थात इस्लाम वर ईमान राखावे. म्हणूनच त्याने आपल्या जन समूहास हजरत मूसा यांच्या विरूद्ध भडकविले.

सर्वसामान्य भाष्यकारांनी ही धर्माला बदलण्याचा अर्थ श्रद्धा-तत्वांना बदलणे असा घेतला आहे. राजकीय व्यवस्था बदलणे नव्हे आणि कश्शाफच्या मुफास्सिरने तर कुरआना द्वारेच हे प्रमाण ही प्रस्तुत केले आहे- 'ते फिरऔनची व त्याच्या मूर्त्यांची पूजा करीत आणि याबद्दलचे प्रमाण सर्वश्रेष्ठ अल्लाहचे हे कथन होय.

وَيَذَرَكَ وَاٰلِهَتَكَ (اعراف-۱۲۷)

अर्थात ''त्यांनी तुला व तुझ्या उपास्यांना सोडावे'' (सूरह अअराफ-१२७) (कश्शाफ- खंड ३ पृष्ट-४३३)

यास्तव 'तफहीमुल कुरआन' च्या ग्रंथकाराने हा खुलासा केला की 'या ठिकाणी 'दीन' (धर्म) शी अभिप्रेत शासन व्यवस्था होय' तफहीमुल कुरआन-खंड ४ पृष्ठ ४०५) अगदी औपचारिकपणा होय. अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह अअराफ टीप क्र. १८०)

४३. हजरत मूसा यांचे आवाहन संपूर्णपणे सुधारणेचे आवाहन होते, परंतु फिरऔनने यांच्यावर हा खोटा आरोप ठेवला की ते देशात उत्पात कायम करू इच्छित आहेत. तो असे समजत होता की हजरत मूसा यांचे आवाहन त्यांच्या जन समूहाच्या दरम्यान फूट पाडण्यास कारणीभूत होईल. जर एक गट हजरत मूसा यांच्या आवाहनास कबूल करतो व दुसरा गट आपल्या वाडवडीलांच्या धर्मावर टिकून राहतो तर या दोघांमध्ये सांप्रदायिक भावना उद्भवेल. परिणामत: अशांतता व रक्तपात घडून येईल.

आजच्या काळात ही ईश्वराशी उदास असलेल्या शासनांच्या विचार सरणीची शैली अशीच आहे. ते एखाद्या इस्लामी आवाहनास सहन करण्यास तयार नसतात. यात त्यांना सांप्रदायिकतेचा वास जाणवतो व याला सार्वजनिक शांततेकरीता धोका समजतात. वस्तुत: हा धोका खरा असला तरी याला ते लोक जबाबदार ठरतात जे इस्लामी आवाहनाच्या विरोधात उपद्रवाची मजल गाठतात. आणि जर याँ शासनांच्या या तर्कास योग्य मानले गेले तर जगात सुधारणेचे कोणतेही कार्य कदापि पार पडू शकत नाही. तर काय लोकांना स्वैर सोडले जावे की त्यांनी नरकाग्नित जाऊन पडावे व त्यांना वाचविण्याची कोणतीही उपाययोजना केली जाऊ नये?

४४. हजरत मूसा यांनी या दुराचारी लोकांच्या उपद्रवापासून स्वत:ला वाचविण्या करीता अल्लाहचे शरण मागितले व स्वत:ला अल्लाहच्या हवाली केले. अल्लाहवरील भरवशाचे हे उच्च उदाहरण होय.

४५. फिरऔनच्या कुटुंबात एक मनुष्य असा निघाला ज्याने हजरत मूसा यांच्या आवाहनाने प्रभावित होऊन त्यांच्यावर ईमान बाळगले. त्याने आपले ईमान बाळगणे उघड केले नव्हते. परंतु जेव्हा हजरत मूसा यांच्या वधा संबंधीच्या गोष्टी बोलल्या जाऊ लागल्या तेव्हा त्याच्या ईमान विषयक स्वाभिमानास राहावले गेले नाही आणि त्याने भरल्या दरबारात हजरत मूसा यांची बाजू धरली, किंबहुना उघडपणे सत्याचे आवाहनही प्रस्तुत केले आणि आपले म्हणणे मांडण्यास अशी शैली

अंगिकारली की फिरऔन व त्याच्या दरबारी मंडळीवर त्याची योग्यता जाहीर व्हावी.

स्पष्ट असावे की इस्लाम ‘ईमान’ लपविण्याची परवानगी देत नाही. इस्लामचा पहिला आधार स्तंभच ‘कलमा ए शहादत’ (साक्षीचे वचन) अदा करणे होय आणि त्याची निकड अशी की इस्लाम कबूल करण्याचे एलान स्पष्टत:व्हावे, आणि तो मुस्लिम समाजाचा एक अविभाज्य घटक ठरला जावा. मात्र असे करण्यात जर जीवावर बेतण्याची शक्यता असेल तर इस्लामने एवढी मुभा निश्चित दिली आहे की माणसाने काही काळ (धोका टळेपावेतो) आपले ईमान जाहीर न केल्यास हरकत नाही.

४६. ईमानधारक युवकाच्या कथनाचा हेतु फिरऔनला हत्येपासून रोखणे हा होता. या संदर्भात त्याने एक अशी गोष्ट सांगितली जी सहजगत्या त्या लोकांना उमजू शकत होती आणि ती ही की हजरत मूसा यांचे आपल्या पैगंबरी दाव्यात खोटे असणे सिद्ध नाही की ज्यामुळे तुम्ही त्यांना शिक्षा द्यावी आणि केवळ संशयापायी एवढे मोठे पाऊल उचलणे योग्य नव्हे. जर समजा ते खोटारडे आहेत. तर त्यांच्या खोटेपणाचे संकट अपरिहार्यपणे त्यांच्यावरच कोसळेल, परंतु जर ते खरे आहेत तर विचार करा, त्यांचा वध करण्याने काय साध्य होईल? परिणामत: तुम्ही अल्लाहच्या प्रकोपास आमंत्रण द्याल आणि ज्या ईश शिक्षेची भयपूर्ण ताकीद हजरत मूसा तुम्हाला ऐकवित आहेत. तिचा एक हिस्सा तुम्हाला या जगातच लाभेल.

४७. हा संकेत हजरत मूसा यांना खोटे ठरविणाऱ्यांकडे होता की जे लोक स्वाभाविक व नैतिक मर्यादांचे उल्लंघन करण्यात निर्भिड आहे आणि एका पैगंबराद्वारे अल्लाहच्या निशाण्या जाहीर झाल्यानंतरही संशयग्रस्त आहेत ते अल्लाह प्रणित सुबुद्धि व त्याच्या मार्गदर्शनापासून वंचित राहतात.

**आणि त्या ईमान बाळगलेल्या माणसाने म्हटले, हे माझ्या जन समूहातील लोकांनो ! मला हे भय वाटते की तुमच्यावर कदाचित तो दिवस न यावा जो पूर्वी होऊन गेलेल्या) जन समूहांवर आला होता.(अल-क़ुर्आन)**

يقوم لكم الملك اليوم ظهرين في الأرض فمن ينصرنا
من بأس الله إن جاءنا قال فرعون ما أريكم
إلا ما أرى وما أهديكم إلا سبيل الرشاد ٢٩

२९. हे माझ्या जन समूहाच्या लोकांनो ! आज तुम्हाला राज्य लाभले आहे आणि तुम्ही या देशात वर्चस्वशाली आहात, परंतु जर अल्लाहचा प्रकोप आम्हावर झाला तर असा कोण आहे जो आमची मदत करील ? [४८] फिरऔन म्हणाला, मी तुम्हाला तेच सांगतो जे माझ्या मते योग्य आहे आणि तुम्हाला त्याच पथाचे मार्गदर्शन करतो, जो अगदी उचित आहे.[४९]

وقال الذي آمن يقوم إني أخاف عليكم مثل
يوم الأحزاب ٣٠

३०. आणि त्या ईमान बाळगलेल्या माणसाने म्हटले, [५०] हे माझ्या जन समूहातील लोकांनो ! मला हे भय वाटते की तुमच्यावर कदाचित तो दिवस न यावा जो पूर्वी होऊन गेलेल्या) जन समूहांवर आला होता.

مثل دأب قوم نوح وعاد وثمود والذين
من بعدهم وما الله يريد ظلما للعباد ٣١

३१. ती परिणती जी नूह, आद, समूद जनसमूहांची आणि त्यांच्या नंतरच्या जनसमूहांची झाली, [५१] आणि अल्लाह आपल्या दासांवर कसलाही अत्याचार करु इच्छित नाही.

ويقوم إني أخاف عليكم يوم التناد ٣٢

३२. हे माझ्या जन समूहातील लोकांनो ! मला तुमच्या विषयी पुकारले जाण्याच्या दिवसाचे [५२] भय आहे.

يوم تولون مدبرين ما لكم من الله من عاصم ومن يضلل
الله فما له من هاد ٣٣

३३. ज्या दिवशी तुम्ही पाठ फिरवून पळाल आणि तुम्हाला अल्लाह पासून वाचविणारा कोणी नसेल. [५३] आणि ज्याला अल्लाह मार्गभ्रष्ट करील त्याला मार्गदर्शन करणारा कोणी ही असू शकणार नाही.

ولقد جاءكم يوسف من قبل بالبينت فما زلتم
في شك مما جاءكم به حتى إذا هلك قلتم لن يبعث الله
من بعده رسولا كذلك يضل الله من هو
مسرف مرتاب ٣٤

३४. यापूर्वी यूसुफ स्पष्ट निशाण्यांसह आले होते, परंतु तुम्ही त्यांनी आणलेल्या शिकवणी विषयी संशय-ग्रस्तच राहीलात. येथपावेतो की जेव्हा त्यांचे निधन झाले, तेव्हा तुम्ही म्हणू लागले आता यांच्या नंतर अल्लाह एखादा प्रेषित मुळीच पाठवणार नाही.[५४] अशा प्रकारे अल्लाह त्या लोकांना मार्ग भ्रष्ट करतो जे मर्यादेचे उल्लंघन करणारे आणि संशयात पडणारे असतात.

४८. म्हणजे शासन व सत्ताधिकाराच्या घमेंडीत राहू नका. अशाने अल्लाहचा प्रकोप तुमच्यावर अवतरीत होऊ शकतो. ज्याच्यापुढे तुम्ही अगतिक होऊन जाल.

४९. फिरऔन, या ईमान बाळगणाऱ्या युवकाच्या भाषणात अडथळा आणत म्हणाला की, हजरत मूसा यांचा वध करणे अगत्याचे आहे हे माझे मत पूर्ण विचारांती आहे. आणि मजवर भरवसा राखा की मी तुमचे योग्य मार्गदर्शन करीत आहे. हा हस्तक्षेप फिरऔनने अशासाठी केला की त्याला ही भिती जाणवली की हजरत मुसाशी श्रद्धा बाळगणाऱ्या या माणसाच्या भाषणाने दरबारी लोक प्रभावित न व्हावेत.

५०. फिरऔनच्या हस्तक्षेपानंतर या ईमान धारक युवकाने आपले भाषण चालू ठेवत म्हटले.

५१. यावररुन हे स्पष्ट झाले की नूह जनसमूह, आद, समूद तसेच लूत व शुएब इत्यादि जन समूहांवर कुफ्रमुळे जी ईश-शिक्षा अवतरली तिला तत्कालीन लोक प्रसिद्ध ऐतिहासिक घटना या स्वरुपात जाणत.

५२. पुकारच्या दिवसाशी अभिप्रेत कियामतीचा दिवस होय, जेव्हा एकाच बोलावण्यात सर्व लोक कबरीमधून बाहेर पडतील. सूरह 'कॉफ' मध्ये फर्माविले गेले आहे की-

وَاسْتَمِعْ يَوْمَ يُنَادِ الْمُنَادِ مِنْ مَّكَانٍ قَرِيْبٍ
يَّوْمَ يَسْمَعُوْنَ الصَّيْحَةَ بِالْحَقِّ ـ ذٰلِكَ يَوْمُ
الْخُرُوْجِ ـ (ق:۴۱،۴۲)

'आणि ऐका, ज्या दिवशी पुकारणारा निकट स्थानापासून पुकारेल. ज्या दिवशी लोक भयावह आवाज ऐकतील. सत्यनिष्ठ तो दिवस (कबरीतून) बाहेर पडण्याचा दिवस असेल.' (कॉफ ४१, ४२)

५३. कियामतीचे महाभयानक दृश्य पाहून अपराधी इकडे तिकडे पळण्याचा प्रयत्न करतील परंतु फरिशते त्यांना धरतील व त्यांना अल्लाहच्या शिक्षेपासून वाचविणारा कोणीच नसेल.

५४. अर्थात हजरत युसूफ यांचे चरित्र, शिकवण व स्वप्नार्थ उकलण्यात प्रेषित्वाची स्पष्ट चिन्ह होती. परंतु तुम्ही (फिरऔन व त्याचा जनसमूह) त्यांच्या प्रेषित्वाबाबत संशयग्रस्तच राहीलेय येथपावेतो की जेव्हा त्यांनी या जगाचा निरोप घेतला तेव्हा तुम्हाला ही जाणीव झाली की आम्ही त्यांची कदर जाणली नाही आणि जेव्हा आम्ही अशा थोर व्यक्तीची कदर जाणली नाही, तेव्हा अल्लाह आता कोणताही पैगंबर पाठवणार नाही परंतु अल्लाहने हजरत मूसा यांना पाठवून तुम्हाला तोल सावरण्याची दुसरी संधी दिली आहे. यास्तव तुम्ही यांची कदर जाणली पाहीजे, परंतु तुम्ही असे आहात की अल्लाहच्या पैगंबरांचा वध करण्याचा विचार करीत आहात.

३५. जे अल्लाहच्या आयतींमध्ये ज्या त्यांच्याजवळ आल्या आसाव्यात [५५] कसल्या ही प्रमाणा शिवाय भांडण करतात. ही गोष्ट अल्लाह आणि ईमान बाळगणाऱ्यांच्या नजदीक अतिशय तिरस्करणीय आहे.[५६] अशा प्रकारे अल्लाह प्रत्येक गर्विष्ठ व जन्मत्ताच्या अंत:करणा वर मोहर लावतो.[५७]

الذين يجادلون في آيات الله بغير سلطان أتاهم كبر مقتا عند الله وعند الذين آمنوا كذلك يطبع الله على كل قلب متكبر جبار ﴿٣٥﴾

३६. फिरऔन म्हणाला, हे हामान ! माझ्या करीता एक उंच इमारत बनव की ज्यायोगे मी त्या मार्गावर पोहोचावे.

وقال فرعون يا هامان ابن لي صرحا لعلي أبلغ الأسباب ﴿٣٦﴾

३७. जे आकाशाचे मार्ग आहेत आणि मूसाच्या पालन कर्त्यास डोकावून पहावे.[५८] मला वाटते हा अगदी खोटारडा आहे. अशा प्रकारे फिरऔनच्या नजरेत त्याचे कुकर्म शोभिवंत बनविले गेले आणि त्याला सन्मार्गा पासून रोखले गेले.[५९] आणि फिरऔनची खेळी विनाशातच पडली.[६०]

أسباب السماوات فأطلع إلى إله موسى وإني لأظنه كاذبا وكذلك زين لفرعون سوء عمله وصد عن السبيل وما كيد فرعون إلا في تباب ﴿٣٧﴾

३८. आणि तो ईमान बाळगलेला माणूस म्हणाला, हे माझ्या जन समूहाच्या लोकांनो [६१] माझे म्हणणे ऐका, मी तुम्हाला मार्गदर्शनाचा मार्ग दाखवित आहे.

وقال الذي آمن يا قوم اتبعون أهدكم سبيل الرشاد ﴿٣٨﴾

३९. हे माझ्या जन समूहाच्या लोकांनो ! हे ऐहिक जीवन तर केवळ थोड्याशा लाभाची सामुग्री होय. आणि आखिरतच नेहमीचे घर आहे.

يا قوم إنما هذه الحياة الدنيا متاع وإن الآخرة هي دار القرار ﴿٣٩﴾

४०. जो दुष्कर्म करील त्याला तितकाच मोबदला मिळेल आणि जो सत्कर्म करील, मग तो पुरुष असो वा स्त्री, मात्र तो ईमान बाळगणारा असावा, तर असे लोक जन्नत मध्ये प्रवेश करतील, जिथे त्यांना अगणित उपजिविका लाभेल.

من عمل سيئة فلا يجزى إلا مثلها ومن عمل صالحا من ذكر أو أنثى وهو مؤمن فأولئك يدخلون الجنة يرزقون فيها بغير حساب ﴿٤٠﴾

४१. हे माझ्या जन समूहातील लोकांनो ! याला काय म्हणावे की मी तुम्हाला मुक्तिकडे बोलावितो आणि तुम्ही मला आगीकडे बोलाविता.[६२]

ويا قوم ما لي أدعوكم إلى النجاة وتدعونني إلى النار ﴿٤١﴾

५५. म्हणजे एखादे असे प्रमाण जे 'वही' (ईश-संदेशा) द्वारे यांच्या प्रत पोहचले असावे. अभिप्रेत एखाद्या पैगंबराची शिकवण किंवा एखाद्या आकाशातून अवतरलेल्या ग्रंथांचे प्रमाण. असले कोणतेही प्रमाण या लोकांजवळ नाही. ज्याला हे कुरआनी आयतींच्या खंडनार्थ सादर करू शकतील. ते केवळ भ्रमाच्या आधारे विवाद उभा करीत आहे.

५६. अर्थात हे भांडण व या प्रकारचे विवाद करणारे अल्लाहच्या नजरेत तर तिरस्करणीय आहेतच. ईमान बाळगणारे देखील यांच्याशी सक्त घृणा करतात.

हा आहे ईमान बाळगणाऱ्यांचा प्रशंसनीय गुण, परंतु आजच्या काळात अशा मुसलमानांची कमतरता नाही जे कुरआनाच्या शिकवणीवर स्वत:च आक्षेप घेतात आणि उलट-सुलट चर्चा-विवाद उभे करतात.

५७. गर्विष्ठ म्हणजे अल्लाहच्या विरोधात स्वत:ला श्रेष्ठतम समजणारा आणि उन्मत्त म्हणजे जबरदस्त, असे की जे ईश्वराच्या दासांना आपल्या मर्जीनुसार चालण्यास विवश करतात. त्यांच्यावर जुलुम करतात. असे लोक सत्य-स्विकृतीच्या स्वाभाविक पात्रतेस पारखे होतात, म्हणून सत्य कितीही तेजस्वी स्वरूपात त्यांच्या समोर का येईना. त्यांच्या मनात शिरकाव करीत नाही. हे सर्व त्या नियमानुसार होते. जो अल्लाहने मार्गभ्रष्टते करीता निर्धारीत केला आहे आणि यालाच अंत: करणावर मोहर लावण्याच्या अर्थाने घेतले गेले आहे.

५८. अशा प्रकारे फिरऔनने हजरत मूसा यांच्या म्हणण्याची थट्टा उडवली आणि त्यांच्या पालन कर्त्याच्या प्रतिष्ठेला गालबोट लावले. ज्यावरून त्याची घमेंड पूर्णपणे दिसून आली.

हे समजणे योग्य नव्हे की फिरऔनने हामानला इमारत बनविण्याचा खरोखर आदेश दिला होता, जेणेकरून त्याने त्यावर चढून मूसा यांच्या पालनकर्त्यास डोकावून पहावे. या हेतुस्तव पहाडांची काय कमतरता होती की ज्यामुळे त्याने इमारत बनविण्याचा आदेश दिला असता. फिरऔनच्या प्रत्येक शब्दातून व्यंगच दिसून येते.

५९. म्हणजे त्याचा दुराचार चुकीच्या स्पष्टीकरणामुळे त्याच्या नजरेत सदाचार बनला. वस्तुत: मनुष्य स्वभाव दुष्कर्म करण्यास तयार होत नाही, परंतु मनुष्य जेव्हा एखाद्या गोष्टीचे चुकीचे स्पष्टीकरण करून दुराचारा करीता योग्य कारण निर्माण करतो, तेव्हा ते दुष्कर्म त्याच्या नजरेत सत्कृत्य बनते. आणि तो सैतानाच्या बहकाविण्यात येतो. मग सैतान असे तात्विक अडथळे उभे करतो की त्याला सन्मार्गी लागणे अशक्य प्राय होते.

६०. अभिप्रेत फिरऔनची ती कट-कारस्थाने होत, ज्यांना तो हजरत मूसा यांच्या विरूद्ध वापरत राहीला. परंतु त्याची कोणतीही युक्ति सफल होऊ शकली नाही, किंबहुना त्याच्या विनाशास कारणीभूत ठरली.

६१. ईमानधारक युवकाने फिरऔनच्या दरबारात सत्यास व्यक्त केल्यावरच समाधान बाळगले नाही, किंबहुना आपल्या जनसमूहा जवळ येऊन लोकांसमोर सत्य-आवाहन प्रस्तुत केले.

६२. ईमान बाळगणाऱ्या युवकाचे हे आवाहन केवढे साधे व मनात शिरकाव करणारे होते त्याने आपल्या व्याकुळ स्वरात जन समूहा समोर आखिरतला प्रस्तुत केले की प्रत्येक माणसाला सर्वप्रथम आखिरत विषयक मुक्तिची काळजी वाहीली पाहीजे.

४२. तुम्ही मला आवाहन करता की मी अल्लाहचा इन्कार करावा आणि त्याचे सहभागी ठरवू ज्यांना मी जाणत नाही (की ते अल्लाहचे सहभागी आहेत ).[६३] आणि मी तुम्हाला त्या हस्तीकडे बोलवित आहे, जो सर्वांवर वर्चस्वशाली आणि माफ करणारा आहे.[६४]

تَدْعُونَنِي لِأَكْفُرَ بِاللَّهِ وَأُشْرِكَ بِهِ مَا لَيْسَ لِي بِهِ عِلْمٌ
وَأَنَا أَدْعُوكُمْ إِلَى الْعَزِيزِ الْغَفَّارِ ﴿٤٢﴾

४३. ही अटळ वस्तुस्थिती आहे की ज्या (उपास्यां) कडे तुम्ही मला बोलावित आहात, ते ना या जगात या गोष्टीस पात्र आहेत की त्यांना पुकारले जावे आणि ना आखिरत मध्ये [६५] आम्हा सर्वांना अल्लाह कडेच परतायचे आहे आणि जे मर्यादेचे उल्लंघन करणारे आहेत,[६६] ते जहन्नम मध्ये जाणार आहेत.

لَا جَرَمَ أَنَّمَا تَدْعُونَنِي إِلَيْهِ لَيْسَ لَهُ دَعْوَةٌ فِي الدُّنْيَا
وَلَا فِي الْآخِرَةِ وَأَنَّ مَرَدَّنَا إِلَى اللَّهِ
وَأَنَّ الْمُسْرِفِينَ هُمْ أَصْحَابُ النَّارِ ﴿٤٣﴾

४४. तर लवकरच तुम्ही आठवण कराल त्या गोष्टींची, ज्या मी तुम्हाला सांगत आहे [६७] आणि मी आपला मामला अल्लाहच्या हवाली करतो. [६८] तो आपल्या दासांना पाहत आहे.

فَسَتَذْكُرُونَ مَا أَقُولُ لَكُمْ وَأُفَوِّضُ أَمْرِي إِلَى اللَّهِ إِنَّ
اللَّهَ بَصِيرٌ بِالْعِبَادِ ﴿٤٤﴾

४५. तेव्हा अल्लाहने याला त्यांच्या वाईट डावांपासून वाचविले [६९] आणि फिरऔन वाल्यांना भयंकर ईश-शिक्षेने विळखा घातला. [७०]

فَوَقَاهُ اللَّهُ سَيِّئَاتِ مَا مَكَرُوا وَحَاقَ بِآلِ فِرْعَوْنَ
سُوءُ الْعَذَابِ ﴿٤٥﴾

४६. ती आग आहे, जिच्या समोर ते सकाळ-संध्याकाळ हजर केले जातात आणि ज्या दिवशी कियामत प्रस्थापित होईल, आदेश दिला जाईल की फिरऔन वाल्यांना अत्याधिक ईश-शिक्षेत टाका.[७१]

النَّارُ يُعْرَضُونَ عَلَيْهَا غُدُوًّا وَعَشِيًّا وَيَوْمَ تَقُومُ
السَّاعَةُ أَدْخِلُوا آلَ فِرْعَوْنَ أَشَدَّ الْعَذَابِ ﴿٤٦﴾

४७. आणि जेव्हा ते जहन्नम मध्ये एकमेकांशी भांडत असतील तेव्हा जे लोक कमजोर होते ते त्या लोकांना जे मोठेपणा मिरवत होते, म्हणतील, आम्ही तुमच्या अधीन होतो, तर काय तूम्ही जहन्नमच्या ईश-शिक्षेचा एक हिस्सा आमच्या पासून दूर कराल?

وَإِذْ يَتَحَاجُّونَ فِي النَّارِ فَيَقُولُ الضُّعَفَاءُ لِلَّذِينَ
اسْتَكْبَرُوا إِنَّا كُنَّا لَكُمْ تَبَعًا فَهَلْ أَنْتُمْ مُغْنُونَ
عَنَّا نَصِيبًا مِنَ النَّارِ ﴿٤٧﴾

६३. म्हणजे जेव्हा माझ्या आकलनात ही गोष्ट आली नाही की अल्लाहचा एखादा सहभागी आहे तर काय केवळ तुमच्या सांगण्या वरून या गोष्टीस प्रमाणाशिवाय मान्य करू?

ईमान बाळगणाऱ्या युवकाच्या या निवेदनावरून हे स्पष्ट होते की फिरऔनचा जन समूह अनेकेश्वरापासनेत ग्रस्त होता व देवी देवतांचा भक्त होता.

६४. म्हणजे मी त्या ईश्‍वरावर तुम्हाला ईमान बाळगण्याचे आवाहन करीत आहे, जो मोठा महान व श्रेष्ठतम आहे आणि सर्वांना आपल्या पकडीत घेऊन आहे. त्याचबरोबर तो आपल्या दासांवर इतका कृपावंत आहे की जर ते आपल्या चूकीच्या वर्तनापासून परावृत्त होतील तर तो त्यांची क्षमायाचना कबूल करतो व त्यांना माफ करतो.

६५. म्हणजे तुम्ही ठरविलेल्या अल्लाहच्या सहभागींना गरज पूर्ति करीता व गाऱ्हाणे ऐकण्याकरीता पुकारणे एक निरर्थक बाब होय. कारण हे ना तुमचा धावा ऐकू शकतात आणि ना तुमचा गरजा भागवू शकतात, आणि ना आखिरत मध्ये तुमच्याकरीता शिफारस करू शकतील.

६६. याचे स्पष्टीकरण टीप क्र. ४७ मध्ये केले गेले आहे.

६७. म्हणजे कियामतीच्या दिवशी तुम्हाला पश्चाताप होईल की आम्ही या माणसाचे म्हणणे का ऐकले नाही जो आम्हाला अल्लाहवर ईमान बाळगण्याचे व आखिरतच्या अजाब पासून स्वत:ला वाचविण्याचे आवाहन करीत होता. जे लोक देखील सत्याकडे बोलविणाऱ्याच्या उपदेशाकडे दुर्लक्ष करतात, ते कियामतीच्या दिवशी आठवण करतील की अमुक एक मनुष्य आम्हाला उपदेश करीत होता, परंतु खेदाची बाब अशी की आम्ही त्याचा उपदेश ग्रहण केला नाही.

६८. म्हणजे फिरऔन जर मला खरे बोलण्याची शिक्षा देऊ इच्छितो किंवा जन समूह मला त्रास देऊ इच्छितो तर मला याची पर्वा नाही. मी अल्लाहवर भरवसा केला. तो मला निश्चितच यशो शिखरावर पोहचविल.

६९. अर्थात हे अत्याचारी त्या ईमान धारक पुरूषाचे काहीही नुकसान करू शकले नाहीत. त्याने स्वत:ला अल्लाहच्या हवाली सोपविले होते. अल्लाहने यांच्या उपद्रवापासून त्याला सुरक्षित राखले.

सर्वसाधारणपणे सत्य-आवाहन प्रस्तुत करण्यात भय जाणवते. परंतु जर आवाहक कोणत्याही संकटाची पर्वा करीत नाही आणि अल्लाहवर भरवसा करून सत्याचे आवाहन सादर करतो तेव्हा सर्व प्रकारचे भय फोल ठरते आणि तेवढाच त्रास पोहचतो जेवढा अल्लाहने नशीबी लिहीला असेल.

७०. म्हणजे जेव्हा परिणाम दिसून येण्याची वेळ आली तेव्हा ईश-शिक्षेच्या विळख्यात फिरऔन व त्याच्या इशाऱ्यावर चालणारे लोकच सापडले. ईमान बाळगणारे अगदी सुरक्षित राहीले.

७१. या आयतीत फिरऔन वाल्यांकरीता दोन प्रकारच्या ईश-शिक्षेचा उल्लेख केला गेला आहे. एक ती जी त्यांना सकाळ-संध्याकाळ दिली जात आहे आणि दुसरी ती जी कियामतीच्या दिवशी दिली जाईल. पहिली शिक्षा कबरींमध्ये त्यांच्या आत्म्यांना दिली जात आहे आणि ती आगीची शिक्षा आहे. राहीली दुसरी शिक्षा तर कियामतीच्या दिवशी जेव्हा ते जिवंत केले जातील, तेव्हा आत्मा व शरीर दोघांच्या ही शिक्षेची गोडी चाखावी लागेल ही शिक्षा कबरीतल्या शिक्षेहून कितीतरी पटीनी अधिक असेल.

सकाळ-संध्याकाळशी अभिप्रेत आलमे बर्जख (कबरीच्या) विश्वाचे सकाळ संध्याकाळ होत. आणि वाक्यप्रचारात सकाळ संध्याकाळचे शब्द दररोज व निरंतर या अर्थाने ही वापरले जातात. उदा. सूरह मरीयम आयत क्र. ६२ मध्ये निवेदिले गेले आहे की जन्नतच्या लोकांना त्यांची उपजिविका सकाळ संध्याकाळ दिली जाईल. आणि फिरऔनच्या वंशात फिरऔन, त्याचे जुलमी कुटुंब जे सत्ताधारी होते, त्याचे राक्षसी सैन्य आणि त्याच्या मागे चालणाऱ्या सर्वांचाच समावेश होतो. या आयतीवरून आणि कुरआनच्या इतर अनेक आयतींवरून ही गोष्ट सिद्ध होते की आलमे बर्जख (कबरी) मध्ये काफिरांच्या आत्म्यांना ईश-शिक्षा दिली जाते. उदाहरणार्थ सूरह अनफाल मध्ये फर्माविले गेले की-

وَلَوْ تَرٰٓی اِذْ یَتَوَفَّی الَّذِیْنَ کَفَرُوا الْمَلٰٓئِکَۃُ
یَضْرِبُوْنَ وُجُوْھَھُمْ وَاَدْبَارَھُمْ وَ ذُوْقُوْا
عَذَابَ الْحَرِیْقِ۔(انفال۔۵۰)

"आणि जर तुम्ही त्या अवस्थेला पाहीले असते जेव्हा फरिश्ते काफीरांच्य आत्म्यांना ताब्यात घेतात आणि त्यांच्या तोंडावर व पाठींवर प्रहार करतात आणि म्हणतात, जळण्याच्या ईश-शिक्षेची गोडी आता चाखा." (अन्फाल : ५०)

जेव्हा मरणाऱ्याच्या शरीरावर ईश शिक्षेचे सावट दिस्ता नाही, यालाच हदीस वचनात अजाबे कब्र (कबरीतील ईश शिक्षा) या अर्थाने घेतले गेले आहे. परंतु शाब्दिक विवादात गुरफटून लोक कबरीच्या ईश शिक्षेचा इन्कार करतात. ते म्हणतात की ही गोष्ट कुरआनाद्वारे सिद्ध होत नाही. वस्तुत: कुरआना द्वारेच आलमे बर्जख म्हणजे कबरीच्या विश्वातील ईश शिक्षा सिद्ध आहे आणि हदीस वचनात याला कबरीतील ईश शिक्षा या अर्थाने अशासाठी घेतले गेले आहे की कबरीला पाहून

माणसाचे विचार सहजपणे आलमे बर्जख कडे वळतात. आणि मानसिक दृष्ट्या कबर बोध कारक स्थान होय.

कबरीतल्या ईश शिक्षेचा हा अर्थ नव्हे की, जे शरीर मातीत गाडले गेले त्यावर ईश शिक्षा अवतरत आहे कारण शरीर तर नासून कुजून नष्ट होते. आणि जे लोक समुद्रात बुडून मरण पावतात, त्यांना मासे खाऊन टाकतात व त्यांची कबर ही बनत नाही. फिरऔन चे सैन्य देखील समुद्रात बुडाले होते. त्या लोकांच्या कबरी ही बनल्या नव्हत्या. परंतु कुरआनने हे स्पष्ट निवेदन केले आहे की सकाळ संध्याकाळ त्यांच्यावर ईश शिक्षा अवतरत आहे. त्याच प्रमाणे ज्या प्रेतांना जाळले जाते, त्यांची ही कबर बनत नाही, तर काय कबरीच्या ईश शिक्षे पासून त्यांची सुटका होते? या सर्व गोष्टींचे उत्तर या खेरीज आणखी काही नाही की ईश शिक्षा मृत शरीरावर नव्हे तर आत्म्यांवर अवतरत असते. आणि हे आलमे बर्जख मध्ये घडते. मग एखाद्याची कबर बनलेली असो किंवा नसो. या संदर्भात हदीस वचनातील उल्लेख असा-

عَنْ اِبْنِ عُمَرَ قَالَ قَالَ النَّبِيُّ ﷺ اِذَامَاتَ الرَّجُلُ عُرِضَ عَلَيْهِ مَقْعَدُهُ بِالْغَدَاةِ وَالْعَشِيِّ اِنْ كَانَ مِنْ اَهْلِ الْجَنَّةِ فَالْجَنَّةُ وَاِنْ كَانَ مِنْ اَهْلِ النَّارِ فَالنَّارِ۔ قَالَ ثُمَّ يُقَالُ هٰذَا مَقْعَدُكَ الَّذِىْ تُبْعَثُ اِلَيْهِ يَوْمَ الْقِيَامَةِ۔ (مسلم کتاب التوبہ، بخاری کتاب الزہد)

''हजरत इब्ने उमर यांचे निवेदन आहे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी असे फर्माविले की, मनुष्य जेव्हा मरण पावतो तेव्हा सकाळ-संध्याकाळ त्याला त्याचे ठिकाण दाखविले जाते.जर तो जन्नती आहे तर त्याला जन्नतची झळक दाखविली जाते आणि जर जहन्नमी आहे तर जहन्नमची झळक दाखविली जाते. मग त्याला सांगितले जाते की कियामतीच्या दिवशी हेच तुझे ठिकाण राहील.'' (मुस्लिम किताबुत्तौबा, बुखारी किताबुज्जुहद)

आणि अनेक हदीस वचनांमध्ये पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांची ही दुआ (प्रार्थना) उल्लेखिली गेली आहे.

وَاَعُوْذُبِكَ مِنْ عَذَابِ الْقَبْرِ۔ (بخاری کتاب الدعوات)

'आणि मी कबरीच्या अजाब (ईश-शिक्षे) पासून तुझे शरण मागतो.' (बुखारी)

अल्लामा इब्ने कसीर उपरोक्त वर उल्लेखिलेल्या आयतींचे स्पष्टीकरण करतांना फर्मावितात:

'यांच्या आत्म्यांना सकाळ संध्याकाळ आगी वर हजर केले जाते आणि हा क्रम कियामती पावेतो चालत राहील. मग जेव्हा कियामतीचा दिवस उजाडेल, तेव्हा त्यांचे आत्मे त्यांच्या शरीरांसह आगीत प्रवेश करतील. यास्तव फर्माविले गेले की

يَوْمَ تَقُوْمُ السَّاعَةُ اَدْخِلُوا آلَ فِرْعَوْنَ اَشَدَّ الْعَذَابِ۔ (تفسیر ابن کثیر ج ۴ ص ۸۱)

''असा अजाब जो दु:खदायक असण्याच्या दृष्टीने प्रखर आणि शिक्षा या नात्याने भयंकर असेल आणि ही आयत या युक्तिवादाचा फार मोठा आधार होय, जो अहले सुन्नत (पंथ) कबरीच्या अजाब विषयी करतात.

(तफ्सीर इब्ने कसीर. खंड-४ पृ.८१)

हे गृहित धरणे योग्य नव्हे की आयतीत आगी समोर फिरऔन वंशास हजर करण्याविषयी जो उल्लेख केला गेला आहे तर याचा अपरिहार्य अर्थ ईश शिक्षा नव्हे. असे असते तर सकाळ संध्याकाळ आगी समोर हजर करण्याचा काय अर्थ असेल? आणि समजा आगी समोर यांना फक्त हजर केले जात असेल आणि अगीत त्यांना टाकले गेले नसेल तर या स्थितीत ही आगीचा त्रास त्यांना पोहचणारच आणि हा ईश-शिक्षेचाच एक प्रकार झाला. वास्तविक अरबी वाक्प्रचारानुसार आगीसमोर हजर करण्याचा अर्थ आगीचे जाळणेच होय. यास्तव 'कश्शाफ' च्या रचयित्यांनी याचा हाच अर्थ निवेदिला आहे.

وعرضهم عليها احراقهم بها ـ يقال عرض الامام الاسارىٰ على السيف اذاقتلهم۔ (تفسیر کشاف ج ۳ ص ۴۳۰)

''यांना आगीवर हजर करण्याचा अर्थ आगीने त्यांना जाळणे होय. असे म्हटले जाते की इमाम ने कैद्यांना तरवारी पुढे हजर केले, वास्तविक त्याने त्यांना ठार केले.'' (तफ्सीर कश्शाफ खंड ३ पृष्ठ ४३०)

राहीला हा प्रश्न की कर्माचा हिशेब होण्यापूर्वी शिक्षा कशी याचे उत्तर सूरह जुमर टीप क्र. ६० मध्ये दिले गेले आहे. या प्रसंगी ही टीप ही विचाराधीन असावी.

**आणि आगीत पडलेले लोक, जहन्नमची देखभाल करणाऱ्यांना म्हणतील, आपल्या पालनकर्त्या जवळ प्रार्थना करा की (त्याने) आमच्या शिक्षेत एक दिवसाचा बदल करावा.(अल-कुरआन)**

४८. जे मोठे बनून राहीले होते, म्हणतील, आम्ही सर्वच याच्यात आहोत. आणि अल्लाहने आपल्या दासांच्या दरम्यान फैसला केलेला आहे.[७२]

قَالَ الَّذِينَ اسْتَكْبَرُوٓا إِنَّا كُلٌّ فِيهَآ إِنَّ اللّٰهَ قَدْ حَكَمَ
بَيْنَ الْعِبَادِ ﴿٤٨﴾

४९. आणि आगीत पडलेले लोक, जहन्नमची देखभाल करणाऱ्यांना म्हणतील, आपल्या पालनकर्त्या जवळ प्रार्थना करा की (त्याने) आमच्या शिक्षेत एक दिवसाचा बदल करावा.

وَقَالَ الَّذِينَ فِي النَّارِ لِخَزَنَةِ جَهَنَّمَ ادْعُوا رَبَّكُمْ
يُخَفِّفْ عَنَّا يَوْمًا مِّنَ الْعَذَابِ ﴿٤٩﴾

५०. ते म्हणतील, काय तुमच्या जवळ तुमचे रसूल (पैगंबर) स्पष्ट प्रमाणे घेऊन येत नव्हते? ते उत्तर देतील, निश्चितच येत राहीले. ते म्हणतील, तेव्हा आता तुम्हीच प्रार्थना करा.[७३] आणि अल्लाहचा इन्कार करणाऱ्यांची प्रार्थना अगदी व्यर्थ जाईल.[७४]

قَالُوٓا أَوَلَمْ تَكُ تَأْتِيكُمْ رُسُلُكُم بِالْبَيِّنٰتِ ۖ
قَالُوا بَلٰى ۚ قَالُوا فَادْعُوا ۗ وَمَا دُعٰٓؤُا الْكٰفِرِينَ
إِلَّا فِي ضَلٰلٍ ﴿٥٠﴾

५१. आम्ही आपल्या पैगंबरांची व ईमान बाळगणाऱ्यांची या जगातही मदत करतो[७५] आणि त्या दिवशीही करू जेव्हा साक्षी उभे राहतील.[७६]

إِنَّا لَنَنصُرُ رُسُلَنَا وَالَّذِينَ اٰمَنُوا فِي الْحَيٰوةِ الدُّنْيَا
وَيَوْمَ يَقُومُ الْأَشْهَادُ ﴿٥١﴾

५२. ज्या दिवशी अत्याचारीं करीता त्यांची क्षमा-याचना व्यर्थ ठरेल.[७७] त्यांचा धिःक्कार होईल व त्यांच्या करीता वाईट ठिकाण असेल.

يَوْمَ لَا يَنفَعُ الظّٰلِمِينَ مَعْذِرَتُهُمْ وَلَهُمُ اللَّعْنَةُ
وَلَهُمْ سُوٓءُ الدَّارِ ﴿٥٢﴾

५३. आम्ही मूसाला मार्गदर्शन प्रदान केले आणि बनी इस्राईलला ईश ग्रंथाचा उत्तराधिकारी बनविले.[७८]

وَلَقَدْ اٰتَيْنَا مُوسَى الْهُدٰى وَأَوْرَثْنَا بَنِيٓ
إِسْرَآءِيلَ الْكِتٰبَ ﴿٥٣﴾

५४. जो बुद्धिमानां करीता मार्गदर्शन व बोध होता.

هُدًى وَّذِكْرٰى لِأُولِي الْأَلْبَابِ ﴿٥٤﴾

५५. तेव्हा संयम पाळा. अल्लाहचा वायदा सत्य आहे आणि आपल्या अपराधांसाठी क्षमा याचना करा.[७९] व सकाळ-संध्याकाळ आपल्या पालन कर्त्याचे प्रशंसा पूर्ण पावित्र्य गुणगान करा.

فَاصْبِرْ إِنَّ وَعْدَ اللّٰهِ حَقٌّ وَّاسْتَغْفِرْ لِذَنۢبِكَ وَسَبِّحْ
بِحَمْدِ رَبِّكَ بِالْعَشِيِّ وَالْإِبْكٰرِ ﴿٥٥﴾

७२. मोठे बनणाऱ्यांशी अभिप्रेत ते धर्म-प्रमुख व नेते होत जे स्वत:मार्गभ्रष्ट होते आणि श्रद्धा व आचरण संदर्भात लोकांना चुकीचे मार्गदर्शन करीत राहीले आणि कमजोर लोकांशी अभिप्रेत त्यांच्या वर्चस्वाने प्रभावित होऊन व त्याच्या प्राबल्यामुळे त्यांच्या मागे चालणारे लोक होत. हे लोक आपापल्या नेत्यांशी व प्रमुखांशी जहन्नम मध्ये भांडतील की तुमच्या मागे चालण्यामुळेच आम्ही जहन्नम मध्ये पोहचलो. तेव्हा आता तुम्ही आमच्या शिक्षेचा एक तरी हिस्सा दूर करा. तेव्हा ते उत्तर देतील की आम्ही स्वत:च जहन्नम मध्ये शिक्षा भोगत आहोत तेव्हा तुमच्या शिक्षेला काय दूर करणार आणि अल्लाहने आमच्यासाठी निरंतर शिक्षेचा फैसला घेतला आहे. अशा प्रकारे ते आपली विवशता जाहीर करतील. कुरआन त्यांच्या या विवशतेस जगातच लोकांपुढे सादर करीत आहे. यासाठी की प्रत्येकाने आपली जबाबदारी ओळखावी आणि मार्गभ्रष्ट धर्म प्रमुख व नेत्यांचे अनुसरण करू नये.

७३. जहन्नम मध्ये काफिरांना सतत ईश शिक्षा भोगावी लागेल. क्षणभर देखील त्यांना समाधानाचा श्वास लाभणार नाही म्हणून ते जहन्नम च्या रक्षक फरिश्त्यांना म्हणतील की त्यांनी आपल्या पालनकर्त्याजवळ प्रार्थना करावी की त्याने निदान एक दिवसा करीता यांच्या शिक्षेत कमी करावी. परंतु फरिश्त्यांकडून त्यांना निराशाजनक उत्तर मिळेल. शिफारस करण्यापासून माफी मागताना ते म्हणतील की पैगंबरांनी तुमच्या समोर प्रामाण प्रस्थापित केले होते परंतु तुम्ही इन्कार करणारे बनून राहीले आणि काफिरांकरीता कसलीही शिफारस केली जाऊ शकत नाही, तेव्हा आता तुम्हीच तुमच्या करीता प्रार्थना करा.

७४. अर्थात हे काफिर जी प्रार्थना देखील करतील, त्याची काहीच सुनावणी केली जाणार नाही.

७५. सर्वश्रेष्ठ अल्लाह नेहमी काफिरांच्या विरोधात पैगंबरांची आणि ईमान बाळगणाऱ्यांची मदत करीत राहीला आहे. ज्याचे स्पष्ट उदाहरण हजरत मूसा, हजरत हारून आणि बनी इस्राइलचे फिरऔनच्या तावडीतून सुरक्षितपणे बाहेर पडणे व सुखरूपपणे समुद्राला पार करणे होय. जेव्हा फिरऔन आपल्या लष्करासमवेत समुद्रात बुडाला. अल्लाहची मदत पैगंबर आणि त्यांचे ईमान बाळगणाऱ्या सहकाऱ्यांच्या हक्कात विविध स्वरूपात प्रकट होत राहीली. नूह, हूद, सालेह आणि इतर अनेक पैगंबरांना व त्यांच्यावर ईमान बाळगणाऱ्यांना त्या ईश शिक्षेपासून वाचविले गेले जी त्यांच्या जनसमूहांवर इन्कार करण्याच्या परिणामी अवतरली होती व जिने त्यांना नष्ट करून टाकले होते. यानंतर जमिनविर सत्ताधिकार ईमान बाळगणाऱ्यांनाच प्राप्त झाला. तद्‌वतच अल्लाहची मदत तरवारीच्या रूपानेही जाहीर झाली आहे. यास्तव हजरत दाऊद यांनी जालूतची हत्या करून त्याच्या काफीर जन समूहांवर विजय प्राप्त केला. तसेच हजरत सुलेमान यांना कित्येक काफीर जन समूहांवर वर्चस्व लाभले आणि त्यांना असे साम्राज्य प्रदान केले गेले की त्याला दुसरे उदाहरण नाही. या आयतीत पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) आणि त्यांच्यावर ईमान बाळगणाऱ्यां करीता अल्लाहच्या तर्फे मदतीची जी शुभवार्ता दडलेली आहे ती काही वर्षांनी बद्र युद्धाच्या प्रसंगी अगदी स्पष्टत: जाहीर झाली, नंतर मक्का विजयाने तर याचा आणखी पुरावा दिला. येथपावेतो की संपूर्ण अरब पैगंबराच्या अधिपत्याखाली आला.

हजरत ईसा (येशू) यांच्या बाबत एकदाही गैरसमज व्हायला नको. ती अल्लाहचीच मदत होती जिने त्यांना शत्रूंच्या वेढ्यातून बाहेर काढून सुखरूपपणे आकाशात उचलून घेतले व शत्रूंचे कट कारस्थान मनातल्या मनातच राहीले. त्यांच्या अनुयायींची कसोटी दीर्घ काळ होत राहीली असे असले तरी त्यांचे आवाहन प्रसारित होत गेले. त्यांचे वैरी असणाऱ्या यहूदची शक्ती सर्वश्रेष्ठ अल्लाहने रोमी लोकांद्वारे नष्ट केली आणि शेवटी हजरत ईसा यांच्या अनुयायीनाच वर्चस्व व सत्ताधिकार लाभला.

७६. म्हणजे कियामतीच्या दिवशी जेव्हा सर्वश्रेष्ठ अल्लाह न्यायालय प्रस्थापित करील आणि पैगंबर आपल्या काफीर जन समूहांच्या विरूद्ध साक्ष देण्याकरीता उभे राहतील. त्या वेळी अल्लाहची मदत अत्याधिकपणे पैगंबर व ईमान बाळगणाऱ्यांच्या हक्कात जाहीर होईल. त्यांची भूमिकाच योग्य ठरेल व ते या न्यायालयातून यशस्वी होऊन बाहेर पडतील.

७७. अत्याचारींशी अभिप्रेत काफीर होत जे सत्य व न्यायाकडे पाठ फिरवून आपल्या स्वत:वर अत्याचार करीत राहीले. त्यांची कोणतीही सबब ऐकून घेतली जाणार नाही. यासाठी की त्यांच्यावर अल्लाहचे प्रमाण प्रस्थापित झाले होते.

७८. म्हणजे तौरातचा उत्तराधिकारी बनविले.

७९. रसूल (पैगंबर) ही अल्लाहचा दास असतो आणि एका दासाला शोभून दिसेल असे हेच की त्याने स्वत:ला कमी लेखावे व आपल्या अपराधांकरीता क्षमा याचना करावी, मग त्याचे अपराध त्याला माहित असावेत किंवा नसावेत. याने दास्यत्व भावना बळावते. परिणामी मनुष्य अल्लाहच्या कृपेस अधिक पात्र ठरतो. अर्थात पैगंबराच्या माध्यमान्वये हीच शिकवण ईमान बाळगणाऱ्यांना दिली गेली आहे.

एखादा पैगंबर जाणून बुजून चूक करीत नाही. तो तर लोकांसाठी आपल्या आचरणाद्वारे उत्कृष्ट आदर्श कायम करतो आणि अमानत (विश्वस्तता) सत्यता, ईश भय आणि स्वच्छ शुद्ध चारित्र्य प्रेषित्वाची आवश्यक ठरणारी वैशिष्टे असतात ज्याला पारिभाषिकरित्या पैगंबर-प्रतिष्ठा या अर्थाने घेतले जाते.

परंतु काही वेळा प्रेषित कर्तव्य पार पाडण्यात किंचित उणीव यांच्यातर्फे राहते, ज्याबद्दल ईश संदेशा द्वारे त्यांना तंबी दिली जाते व ते तत्काळ सावध होतात. अशाच काही उणीवा पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या हातून घडल्या ज्यावर कुरआनने अंकुश ठेवला आहे. या व्यतिरिक्त जर त्यांच्या हातून एखादी चूक घडली असेल तर तो त्यांचा व त्यांच्या पालनकर्त्याच्या दरम्यानचा मामला आहे. आम्हाला ना याचे ज्ञान आहे आणि ना या विवादात पडून काही लाभ घडेल.

काही भाष्यकारांनी 'आपल्या अपराधांसाठी क्षमा-याचना करा' चे स्पष्टीकरण असे केले आहे की हा आदेश खरे पाहता पैगंबरांच्या माध्यमाने त्यांच्या जनसमूहाला म्हणजे समस्त मुसलमानांना दिला गेला आहे. परंतु हा खुलासा अशासाठी योग्य नाही की सूरह मुहम्मद मध्ये स्पष्टत: पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना आपल्या व ईमान बाळगणाऱ्यांच्या अपराधांसाठी क्षमा-याचना करण्याची ताकीद केली गेली आहे

وَاسْتَغْفِرْ لِذَنْبِكَ وَلِلْمُؤْمِنِيْنَ وَالْمُؤْمِنَاتِ ـ (محمد:١٩)

अर्थ:-''आणि आपल्या चूकांसाठी व ईमान बाळगणाऱ्या पुरुष व स्त्रियां साठी क्षमा याचना करा.'' (मुहम्मद-१९)

आंधळा आणि डोळस समान असू शकत नाही आणि ना ते लोक, ज्यांनी ईमान बाळगले व सत्कर्म केले, दुष्कर्मी लोकांसमान असू शकतात. परंतु तुम्ही लोक कमीच समजता.(अल-क़ुरआन)

५६. जे लोक अल्लाहच्या आयतीं बाबत कसल्याही प्रमाणाशिवाय, जे त्यांच्या प्रत पोहचले असावे, विवाद उभे करतात. त्यांच्या मनात अहंकार भरलेला असतो, परंतु ते या मोठेपणास पोहचणार नाहीत.[८०] तेव्हा तुम्ही अल्लाहचे शरण मागा.[८१] नि:संशय तो सर्व काही पाहणारा आणि ऐकणारा आहे.

إِنَّ الَّذِينَ يُجَادِلُونَ فِي آيَاتِ اللَّهِ بِغَيْرِ سُلْطَانٍ
أَتَاهُمْ ۙ إِنْ فِي صُدُورِهِمْ إِلَّا كِبْرٌ مَا هُمْ بِبَالِغِيهِ ۚ
فَاسْتَعِذْ بِاللَّهِ ۖ إِنَّهُ هُوَ السَّمِيعُ الْبَصِيرُ ﴿٥٦﴾

५७. आकाशांना व जमिनिला निर्माण करणे माणसांना निर्माण करण्यापेक्षा अधिक मोठे काम आहे, परंतु बहुतेक लोक जाणत नाहीत.[८२]

لَخَلْقُ السَّمَاوَاتِ وَالْأَرْضِ أَكْبَرُ مِنْ خَلْقِ النَّاسِ
وَلَٰكِنَّ أَكْثَرَ النَّاسِ لَا يَعْلَمُونَ ﴿٥٧﴾

५८. आंधळा आणि डोळस समान असू शकत नाही[८३] आणि ना ते लोक, ज्यांनी ईमान बाळगले व सत्कर्म केले, दुष्कर्मी लोकांसमान असू शकतात. परंतु तुम्ही लोक कमीच समजता.

وَمَا يَسْتَوِي الْأَعْمَىٰ وَالْبَصِيرُ وَالَّذِينَ
آمَنُوا وَعَمِلُوا الصَّالِحَاتِ
وَلَا الْمُسِيءُ ۚ قَلِيلًا مَا تَتَذَكَّرُونَ ﴿٥٨﴾

५९. कियामतीची वेळ निश्चितच येणार आहे यात काहीही शंका नाही, परंतु अधिकांश लोक ईमान बाळगत नाही.

إِنَّ السَّاعَةَ لَآتِيَةٌ لَا رَيْبَ فِيهَا وَلَٰكِنَّ أَكْثَرَ النَّاسِ
لَا يُؤْمِنُونَ ﴿٥٩﴾

६०. तुमचा रब्ब (पालन कर्ता) फर्मावितो, मला साद घाला, मी तुमच्या प्रार्थना कबूल करीन.जे लोक माझ्या उपासनेशी विद्रोह करतात ते निश्चितपणे अपमानित होऊन जहन्नम मध्ये दाखल होतील.

وَقَالَ رَبُّكُمُ ادْعُونِي أَسْتَجِبْ لَكُمْ ۚ إِنَّ الَّذِينَ
يَسْتَكْبِرُونَ عَنْ عِبَادَتِي سَيَدْخُلُونَ جَهَنَّمَ دَاخِرِينَ ﴿٦٠﴾

६१. तो अल्लाह होय, ज्याने तुमच्या करीता रात्र बनविली यासाठी की तुम्ही यात विश्रांती प्राप्त करावी आणि दिवसाला उज्वल बनविले.[८५] अल्लाह लोकांवर मोठा मेहरबान आहे, परंतु अधिकांश लोक कृतज्ञता व्यक्त करीत नाही.

اللَّهُ الَّذِي جَعَلَ لَكُمُ اللَّيْلَ لِتَسْكُنُوا فِيهِ وَالنَّهَارَ
مُبْصِرًا ۚ إِنَّ اللَّهَ لَذُو فَضْلٍ عَلَى النَّاسِ وَلَٰكِنَّ
أَكْثَرَ النَّاسِ لَا يَشْكُرُونَ ﴿٦١﴾

६२. तोच अल्लाह तुमचा पालन कर्ता होय.[८६] प्रत्येक वस्तूचा निर्माता त्याच्या खेरीज कोणी ही उपास्य नाही मग तुम्ही कोणत्या बाजूला बहकाविले जात आहात ?[८७]

ذَٰلِكُمُ اللَّهُ رَبُّكُمْ خَالِقُ كُلِّ شَيْءٍ لَا إِلَٰهَ إِلَّا هُوَ ۖ
فَأَنَّىٰ تُؤْفَكُونَ ﴿٦٢﴾

८०. खरे तर माणसा समोर जेव्हा त्याच्या पालनकर्त्याचे एखादे फर्मान आल्यावर त्याने नतमस्तक होऊन ते मान्य करावयास हवे. परंतु जे लोक आपल्या मोठेपणाच्या घमेंडीत मग्न असतात ते वेडे वाकडे वाद घालू लागतात. पण त्यांना तो मोठेपणा लाभणार नाही ज्याचे ते स्वप्न पाहात आहेत. त्यांना लवकरच अपमानाला तोंड द्यावे लागेल.

८१. म्हणजे अशा लोकांच्या उपद्रवा पासून तुम्ही अल्लाहचे शरण मागा.

८२. म्हणजे ज्याने आकाशांना व जमीनीला निर्माण केले, त्याच्याकरीता माणसाला दुसऱ्यांदा निर्माण करणे काय कठीण आहे. परंतु अधिकांश लोक एवढी स्पष्ट बाब ही समजून घेत नाहीत.

आजच्या काळात तर विज्ञानाने सृष्टी विषयी अनेक आश्चर्यकारक रहस्ये उलगडली आहेत. हे लक्षात घेता सृष्टीच्या व्यापकतेचे अनुमान लावणे कठीण आहे. कारण आम्ही आपल्या आकाशगंगेत अगणित ताऱ्यांना पाहतो आणि अशा कितीतरी आकाशगंगा कित्येक प्रकाश वर्षांच्या अंतरावर आहेत. तेव्हा ज्या हस्तीने (अर्थात अल्लाहने) एवढी विशाल सृष्टी निर्माण केली व तिला एका अतिशय दृढ व्यवस्थेत जकडून टाकले. त्याच्या सामर्थ्या पलीकडे अशी कोणतीही गोष्ट नाही. तो मेलेल्या माणसांनाही उठवून उभे करू शकतो आणि या सृष्टीची पुनर्रचनाही करू शकतो.

८३. आंधळा तो जो वस्तुस्थितीस पाहू शकत नाही आणि डोळस तो जो वस्तुस्थितीस पाहत आहे. या दोघांची ही अवस्था समान कशी असू शकते?

८४. प्रार्थनेचा अर्थ पुकारणे, आर्जव करणे असा ही आहे व विनंती करणे असा ही. अर्थात हे दोन्ही अर्थ या ठिकाणी अभिप्रेत आहेत. साद ही अल्लाहलाच घालावी आणि विनवणी (दुआ) देखील त्यालाच केली जावी कारण साद ऐकणाराही तोच आहे व प्रार्थना स्विकारणाराही तोच आहे.

ही आयत अधिक स्पष्टीकरण करते की हे पुकारणे व दुआ करणे, उपासना होय. म्हणून या गोष्टींचा निखालस संबंध अल्लाहशीच असला पाहीजे आणि जर अन्य एखाद्याला या प्रकारे पुकारले गेले किंवा विनविले गेले तर ही त्याचीच उपासना होईल आणि अल्लाहच्या उपासने पासून उघड प्रतारणा होईल. हदीस वचनातील उल्लेखा नुसार पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी या आयती द्वारे युक्तिवाद करीत प्रार्थनेला उपासना या अर्थाने फर्माविले आहे.

اَلدُّعَاهُوَ الْعِبَادَةُ

'दुआ उपासनाच होय.' (तिर्मिजी किताबुत्तफसीर)

आणि म्हणूनच जीभेवर 'या अल्लाह' 'या रब्ब' 'या रहमान' 'या रहीम' या सारखी वचने असावयात हवीत. परंतु आजच्या काळतील मुसलमानांमध्ये अशा लोकांची कमतरता नाही जे 'या अली' 'या ग़ौस' (अब्दुल कादर जिलानी) आणि 'या ख्वाजा' ची रट लावतात व शिर्क सारखा गुन्हा करतात. अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह बकरा टीप क्र.२४७. २४८.

८५. या साठी की दिवसाच्या उजेडात अर्थोपार्जना स्तव धावपळ करणे शक्य व्हावे.

८६. म्हणजे ज्याने तुमच्या संगोपनाची ही उपाय योजना केली आहे तोच तुमचा स्वामी ही आहे.

८७. अर्थात जो निर्माता व स्वामी आहे, तोच या गोष्टीस पात्र आहे की त्याची उपासना केली जावी. परंतु तुम्ही सैतानाच्या बहकाविण्यात येऊन एवढ्या स्पष्ट वस्तुस्थिती कडे ही पाठ फिरवता.

६३. याच प्रमाणे ते लोक ही बहकाविले जात राहीले जे अल्लाहच्या आयतींचा इन्कार करीत होते.[८८]

كَذٰلِكَ يُؤْفَكُ الَّذِيْنَ كَانُوْا بِاٰيٰتِ اللّٰهِ
يَجْحَدُوْنَ ﴿٦٣﴾

६४. तो अल्लाहच होय, ज्याने तुमच्या करीता जमिनीला विश्रांती-स्थळ [८९] आणि आकाशाला छत्र बनविले.[९०] आणि तुम्हाला आकार दिला तेव्हा उत्तमोत्तम आकृत्या घडविल्या. [९१] आणि तुम्हाला स्वच्छ शुद्ध वस्तूंची उपजिविका दिली.[९२] तोच अल्लाह तुमचा रब आहे तर अतिशय बरकतीवाला आहे अल्लाह सर्व विश्वांचा रब.

اَللّٰهُ الَّذِيْ جَعَلَ لَكُمُ الْاَرْضَ قَرَارًا وَّالسَّمَآءَ بِنَآءً
وَّصَوَّرَكُمْ فَاَحْسَنَ صُوَرَكُمْ وَرَزَقَكُمْ مِّنَ
الطَّيِّبٰتِ ۭ ذٰلِكُمُ اللّٰهُ رَبُّكُمْ ښ فَتَبٰرَكَ اللّٰهُ
رَبُّ الْعٰلَمِيْنَ ﴿٦٤﴾

६५. तोच जिवंत आहे.[९३] त्याच्या खेरीज कोणी ही उपास्य नाही. यास्तव त्यालाच साद घाला. दास्यत्वास त्याच्याच करीता विशुद्ध जाणून प्रशंसा अल्लाह सर्व विश्वांच्या मालका करीता आहे.

هُوَ الْحَيُّ لَآ اِلٰهَ اِلَّا هُوَ فَادْعُوْهُ مُخْلِصِيْنَ
لَهُ الدِّيْنَ ۭ اَلْحَمْدُ لِلّٰهِ رَبِّ الْعٰلَمِيْنَ ﴿٦٥﴾

६६. सांगा, मला या गोष्टी विषयी मनाई केली गेली की मी त्यांची उपासना करावी. ज्यांना तुम्ही अल्लाहला सोडून पुकारता, जेव्हा माझ्या जवळ माझ्या पालन कर्त्या तर्फे स्पष्ट प्रमाणे आलेली आहेत. मला आदेश दिला गेला आहे की मी स्वत:ला सर्व विश्वांच्या पालन कर्त्याच्या हवाली करावे.[९४]

قُلْ اِنِّىْ نُهِيْتُ اَنْ اَعْبُدَ الَّذِيْنَ تَدْعُوْنَ مِنْ دُوْنِ
اللّٰهِ لَمَّا جَآءَنِيَ الْبَيِّنٰتُ مِنْ رَّبِّيْ ۡ وَاُمِرْتُ اَنْ
اُسْلِمَ لِرَبِّ الْعٰلَمِيْنَ ﴿٦٦﴾

६७. तोच होय, ज्याने तुम्हाला माती पासून निर्माण केले,[९५] नंतर वीर्य बिंदू पासून,[९६] मग जमलेल्या रक्ता पासून,[९७] नंतर तो तुम्हाला अर्भकाच्या स्वरूपात बाहेर आणतो,[९८] मग तो तुम्हाला वाढीस लावतो यासाठी की तुम्ही आपल्या तारुण्या प्रत पोहचावे, मग तुम्हाला आयुष्य देतो यासाठी की तुम्ही वार्धक्याप्रत पोहचावे [९९]आणि तुमच्या पैकी काहींना या आधीच मरण दिले जाते [१००] आणि हे अशासाठी होते की तुम्ही निर्धारीत केलेल्या वेळेप्रत पोहचावे [१०१] आणि यासाठी की तुम्ही समजून घ्यावे.[१०२]

هُوَ الَّذِيْ خَلَقَكُمْ مِّنْ تُرَابٍ ثُمَّ مِنْ نُّطْفَةٍ ثُمَّ مِنْ عَلَقَةٍ
ثُمَّ يُخْرِجُكُمْ طِفْلًا ثُمَّ لِتَبْلُغُوْٓا اَشُدَّكُمْ ثُمَّ لِتَكُوْنُوْا شُيُوْخًا ۚ
وَمِنْكُمْ مَّنْ يُّتَوَفّٰى مِنْ قَبْلُ وَلِتَبْلُغُوْٓا اَجَلًا مُّسَمًّى وَّلَعَلَّكُمْ
تَعْقِلُوْنَ ﴿٦٧﴾

६८. तोच जीवन प्रदान करतो आणि तोच मृत्यु देतो. जेव्हा तो एखाद्या कार्यचा निर्णय घेतो, तेव्हा फक्त आदेश देतो की घडून ये आणि ती घडून येते.

هُوَ الَّذِيْ يُحْيٖ وَيُمِيْتُ ۚ فَاِذَا قَضٰٓى اَمْرًا فَاِنَّمَا يَقُوْلُ لَهٗ
كُنْ فَيَكُوْنُ ﴿٦٨﴾ ۧ

८८. अभिप्रेत पूर्वी होऊन गेलेले काफीर जन समूह.

८९. म्हणजे जमिनीला असे योग्य बनविले की तिंच्यात कंप न व्हावा व तुम्ही तिच्यावर सहजगत्या हिंडावे-फिरावे वास्तव्य करावे.

९०. आकाशाच्या संदर्भात पहा सूरह इन्शिकाक टीप क्र.१

९१. म्हणजे इतर सजीव निर्मितीच्या तुलनेने माणसाला उत्कृष्ट चेहरा-मोहरा प्रदान केला.

९२. जनावरांना कस कसे निकृष्टतम खाद्य खायला मिळते आणि काही सजीव प्राणी तर घाणीतच जन्मतात व वाढतात. परंतु माणसाला कशी स्वच्छ शुद्ध व उत्तम प्रकारचे खाद्य लाभते. हा अल्लाहचा माणसावर केवढा मोठा उपकार आहे.

९३. म्हणजे तोच एक होय जो नेहमी पासून जिवंत आहे आणि सदैव जिवंत राहील. राहीली त्याची निर्मिती तर तिला जे जीवन लाभले आहे ते त्याने प्रदान केल्यामुळेच लाभले आहे.

९४. स्वत:ला अल्लाहच्या हवाली करण्याचा अर्थ असा की माणसाने सुज्ञपणे हा निर्णय घ्यावा की मला अल्लाहचा आज्ञाधारक बनून राहायचे व त्याच्या आदेशांचे पूरेपूर पालन करावयाचे आहे. जो मनुष्य विचारपूर्वक हा निर्णय घेतो तो केवळ अल्लाहचीच उपासना करतो. कारण जेव्हा अल्लाहने अन्य कोणाच्याही उपसनेपासून मनाई केली आहे तेव्हा तो एवढ्या मोठ्या गुन्ह्याचे काम कसे करू शकतो. अल्लाहचे आज्ञापालन व अल्लाह खेरीजच्या उपास्यांची भक्ती उपासना या दोन्ही गोष्टी एकत्रित होऊ शकत नाही.

९५. स्पष्टीकरणा करीता पहा सूरह हज्ज टीप क्र. ७

९६. स्पष्टीकरणा करीता पहा सूरह हज्ज टीप क्र. ८

९७. स्पष्टीकरणा करीता पहा सूरह हज्ज टीप क्र. ९

९८. स्पष्टीकरणा करीता पहा सूरह हज्ज टीप क्र. १३

९९. स्पष्टीकरणा करीता पहा सूरह हज्ज टीप क्र. १४,१६

१००. म्हणजे एखाद्यास तारूण्या पूर्वी व एखाद्यास म्हातारपण येण्याआधी.

१०१. म्हणजे ज्याच्या साठी जे आयुष्य निर्धारीत आहे ते त्याने पूर्ण करावे. दुसऱ्या शब्दात सांगायचे म्हणजे मनुष्य त्याच वेळी मरण पावतो जेव्हा त्याने आपल्या आयुष्याचा अवधि पूर्ण केला असेल जो अल्लाहने त्यास जिवंत राहण्या करीता निर्धारीत केला होता.

१०२. अर्थात तुम्हाला निर्मितीच्या या अवस्थांमधून व त्यानंतर जन्म, तारूण्य व वार्धक्याच्या अवस्थांमधून याकरीता पार पाडले जाते की तुम्ही आपल्या बुद्धी व सुज्ञतेचा वापर करावा जेणेकरून आपल्या निर्मात्या व पालनकर्त्यास ओळखावे.

६९. तुम्ही त्या लोकांना पाहीले, जे अल्लाहच्या आयतीं बाबत भांडण करतात.[१०३] यांना कोठे परतविले जात आहे ?[१०४]

أَلَمْ تَرَ إِلَى الَّذِينَ يُجَادِلُونَ فِي آيَاتِ اللَّهِ أَنَّىٰ
يُصْرَفُونَ ﴿٦٩﴾

७०. त्यांनी या ग्रंथाला खोटे ठरविले आणि त्या गोष्टींना ही ज्या आम्ही आपल्या पैगंबरां समवेत पाठविल्या होत्या [१०५]लवकरच त्यांना कळून येईल. [१०६]

الَّذِينَ كَذَّبُوا بِالْكِتَابِ وَبِمَا أَرْسَلْنَا بِهِ رُسُلَنَا ۖ
فَسَوْفَ يَعْلَمُونَ ﴿٧٠﴾

७१. जेव्हा जोखड [१०७] त्यांच्या गळयांमध्ये असतील आणि श्रृंखला देखील (ज्यांच्या द्वारे) त्यांना फरफटत ओढले जाईल.

إِذِ الْأَغْلَالُ فِي أَعْنَاقِهِمْ وَالسَّلَاسِلُ يُسْحَبُونَ ﴿٧١﴾

७२. उकळत्या पाण्यात, मग आगीत फेकून दिले जातील.

فِي الْحَمِيمِ ثُمَّ فِي النَّارِ يُسْجَرُونَ ﴿٧٢﴾

७३. मग त्यांना विचारले जाईल, कोठे आहेत ते ज्यांना तुम्ही (अल्लाहचे) सहभागी ठरवित होता.

ثُمَّ قِيلَ لَهُمْ أَيْنَ مَا كُنْتُمْ تُشْرِكُونَ ﴿٧٣﴾

७४. अल्लाहला सोडून ते म्हणतील, हरवलेत ते आमच्या कडून किंबहुना आम्ही या पूर्वी कोणत्याही वस्तूला पुकारत नव्हतो.[१०८] अशा प्रकारे अल्लाह काफिरांना मार्गभ्रष्ट करील.[१०९]

مِنْ دُونِ اللَّهِ ۖ قَالُوا ضَلُّوا عَنَّا بَلْ لَمْ نَكُنْ نَدْعُو مِنْ
قَبْلُ شَيْئًا ۚ كَذَٰلِكَ يُضِلُّ اللَّهُ الْكَافِرِينَ ﴿٧٤﴾

७५. हे अशासाठी की तुम्ही जमिनीवर उगीच तोरा मिरवित व ताठ होत राहीले.[११०]

ذَٰلِكُمْ بِمَا كُنْتُمْ تَفْرَحُونَ فِي الْأَرْضِ بِغَيْرِ الْحَقِّ وَبِمَا
كُنْتُمْ تَمْرَحُونَ ﴿٧٥﴾

७६. दाखल व्हा जहन्नमच्या दरवाज्यांमध्ये त्यात सदैव राहण्या करीता. केवढे वाईट स्थान आहे घमेंड करणाऱ्यांचे !

ادْخُلُوا أَبْوَابَ جَهَنَّمَ خَالِدِينَ فِيهَا ۖ فَبِئْسَ مَثْوَى
الْمُتَكَبِّرِينَ ﴿٧٦﴾

१०३. म्हणजे अल्लाहची वाणी व त्याच्या आदेशांबाबत उलट सुलट चार्चा विवाद करतात.

१०४. अर्थात यांच्यावर सैतानाच्या जादूचा प्रभाव पडला आहे. तो त्यांना सत्या पासून परावृत्त करून इतस्तत: भटकावित आहे.

१०५. अर्थात त्या शिकवणींना, ज्यांना पैगंबर घेऊन आले होते.

१०६. म्हणजे ती वेळ लांब नाही जेव्हा त्यांना कळून येईल की ज्या गोष्टीस यांनी खोटे ठरविले होते ती सत्य होती.

१०७. अभिप्रेत कियामतीचा दिवस होय.

१०८. म्हणजे आम्ही ज्यांच्या नावाचा जप करीत होतो व ज्यांना आपल्या गरजा भागविण्या करीता पुकारत होतो त्यांचे ईश्वर म्हणून काहीही अस्तित्व नव्हते मग ते भान हरपून या गोष्टीस नकार दर्शवतील की आम्ही सुरवाती पासूनच यांना पुकारतच नव्हतो. अशा प्रकारे ते आपल्या उपास्यांशी काडीमात्र संबंध नसल्याचे जाहीर करतील.

१०९. म्हणजे हतबुद्ध करून टाकील..

११०. म्हणजे एवढी कठोर शिक्षा तुम्हाला अशासाठी दिली जात आहे की या जगात तुम्हाला ज्या ईश देणग्या लाभल्या होत्या त्यावर तुम्ही शेखी मिरवित राहीले, वास्तविक त्या लाभल्या बद्दल तुम्ही अल्लाहशी कृतज्ञता बाळगावयास हवी होती. त्याच प्रमाणे तुम्ही आपल्या गर्वापायी सत्याचा विरोध करीत राहीले, खरे तर त्यापुढे तुम्ही नतमस्तक व्हावयास पाहीजे होते.

७७. तेव्हा (हे पैगंबर !)धैर्य पाळा. अल्लाहचा वायदा सच्चा आहे.[१११] एकतर आम्ही तुम्हाला त्या (ईश शिक्षे) चा काही हिस्सा, ज्याचा वायदा आम्ही यांच्याशी करीत आहो, दाखवून द्यावा किंवा तुम्हाला मृत्यु द्यावा. यांचे परतणे तर आमच्याच कडे आहे.[११२]

فَاصْبِرْ إِنَّ وَعْدَ اللَّهِ حَقٌّ ۚ فَإِمَّا نُرِيَنَّكَ بَعْضَ الَّذِي
نَعِدُهُمْ أَوْ نَتَوَفَّيَنَّكَ فَإِلَيْنَا يُرْجَعُونَ ﴿٧٧﴾

७८. (हे पैगंबर !) आम्ही तुमच्या पूर्वी पैगंबर पाठविले होते, ज्यांच्या पैकी काहीचे वृत्तांत आम्ही तुम्हाला ऐकविले आहेत, आणि काहींचे वृत्तांत ऐकविले नाहीत.[११३] कोणत्याही पैगंबराच्या अवाक्यात हे नव्हते की त्याने अल्लाहच्या हुकुमा शिवाय एखादी निशाणी (ईश-चमत्कार) आणला असता.[११४] जेव्हा अल्लाहचा आदेश [११५] येईल, तेव्हा सत्यासह फैसला केला जाईल आणि त्या वेळी असत्याचे पुजारी विनाश ग्रस्त होतील.

وَلَقَدْ أَرْسَلْنَا رُسُلًا مِّن قَبْلِكَ مِنْهُم مَّن قَصَصْنَا عَلَيْكَ
وَمِنْهُم مَّن لَّمْ نَقْصُصْ عَلَيْكَ ۗ وَمَا كَانَ لِرَسُولٍ أَن يَأْتِيَ
بِآيَةٍ إِلَّا بِإِذْنِ اللَّهِ ۚ فَإِذَا جَاءَ أَمْرُ اللَّهِ قُضِيَ بِالْحَقِّ وَخَسِرَ
هُنَالِكَ الْمُبْطِلُونَ ﴿٧٨﴾

७९. अल्लाहनेच तुमच्या करीता चतुष्पाद निर्माण केले की, तुम्ही काहींना वाहन म्हणून उपयोगात आणावे आणि काही तुमच्या खाद्याच्या कामी येतात.

اللَّهُ الَّذِي جَعَلَ لَكُمُ الْأَنْعَامَ لِتَرْكَبُوا مِنْهَا
وَمِنْهَا تَأْكُلُونَ ﴿٧٩﴾

८०. यांच्यात तुमच्या करीता इतरही फायदे आहेत [११६] आणि (या साठीच निर्माण केले गेले आहेत) की तुम्ही यांच्या द्वारे ती गरज पूर्ण करावी, जी तुमच्या मनात असावी. [११७] तुम्हाला यांच्यावर आणि नौकांवर आरूढ केले जाते. [११८]

وَلَكُمْ فِيهَا مَنَافِعُ وَلِتَبْلُغُوا عَلَيْهَا حَاجَةً
فِي صُدُورِكُمْ وَعَلَيْهَا وَعَلَى الْفُلْكِ تُحْمَلُونَ ﴿٨٠﴾

८१. तो आपल्या निशाण्या तुम्हाला दाखवित आहे, तेव्हा तुम्ही अल्लाहच्या कोण कोणत्या निशाण्यांचा इन्कार कराल ?[११९]

وَيُرِيكُمْ آيَاتِهِ فَأَيَّ آيَاتِ اللَّهِ تُنكِرُونَ ﴿٨١﴾

१११. म्हणजे अल्लाहचा हा वायदा की पैगंबरना खोटे ठरवणारे जन समूह शेवटी ईश-शिक्षे चे तावडीत सापडेल.

११२. स्पष्टीकरणा करीता पहा सुरह युनुस टीप क्र. ७५

११३. पवित्र कुरआनात ज्या पैगंबरांचा उल्लेख स्पष्टत: त्यांच्या नांवानिशी केला गेला आहे, ते आहेत हजरत आदम, नूह, हूद, सालेह, इद्रीस, इब्राहीम, लूत, इस्माईल, इसहाक, याकूब, यूसुफ, अय्युब, शुएब, मूसा, हारून, यूनुस, दाऊद, सुलेमान, इलियास, अल यसअ, जुलकिफ्ल, जकरीया, यहया, ईसा, आणि मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) या प्रषितां मध्ये विशेष संख्या रसूलांची आहे. रसूल नबीच्या तुलनेने विशेष होय. त्याला एखाद्या जनसमूहाकडे ईश्वराचा संदेश देऊन पाठविले जाते. मात्र नबी वर ईश-संदेश तर अवतरीत होतो, परंतु त्याच्यावर काही ठराविक कामांची जबाबदारी असते. उदाहरणार्थ हजरत आदम हे नबी होते, ज्यांचे कार्य आपल्या संततीस मार्गदर्शन करण्या पुरते मर्यादित होते. कारण त्या वेळी कोणताही जनसमूह अस्तित्वात आला नव्हता की त्याकडे रसूल पाठविला गेला असता. त्याचप्रमाणे हजरत खिज्र ज्यांच्या नांवाचा उल्लेख कुरआनात स्पष्टत: नाही, परंतु हदीस वचनांमध्ये केला गेला आहे, त्यांचे प्रेषित कार्य, सृष्टीच्या काही रहस्य भेदांवरून आवरण हटविणे होते. हे ही स्पष्ट असावे की प्रत्येक रसूल 'नबी' असतो परंतु प्रत्येक नबी पारिभाषिक अर्थाने रसूल नसतो.

पवित्र कुरआनाने अधिकतर अशाच पैगंबरांचा उल्लेख केला आहे जे आपला एक इतिहास बाळगत होते आणि प्रमाण प्रस्थापित करण्या करीता यांचेच वृत्तांत निवेदणे लाभदायक ठरू शकत होते परंतु कुरआन स्पष्टत: सांगतो की यांच्या खेरीजही पैगंबर पाठविले गेले ज्यांना ईश्वराने अर्थात अल्लाहने वेगवेगळया काल खंडात वेगवेगळया जन समूहांकडे पाठविले. अशा समस्त पैगंबरांवर ईमान बाळगणे अगत्याचे आहे. राहीला संख्येचा प्रश्न, तर ना कुरआनात संख्या दर्शविली गेली आहे आणि ना एखाद्या सहीह हदीस मध्ये. ज्या कथनांमध्ये पैगंबर व रसूलांची संख्या दर्शविली गेली आहे, त्यापैकी एक ही निकोप ठरत नाही. या संदर्भात प्रसिद्ध कथन अबू जर यांच्या द्वारे आहे, ज्याला इब्ने मर्दूया यांनी आपल्या भाष्यात निवेदिले आहे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी फर्माविले की एक लाख चोवीस हजार पैगंबर होऊन गेले, ज्यापैकी तीनशे तेरा रसूल होते, परंतु याचा एक कथन कर्ता इब्राहीम बिन हशाम आहे, ज्याच्या विषयी अइम्मा जिरह व तादील ने बरेच काही सांगितले आहे आणि इब्ने जोजी यांनी या हदीस वचनास मनोरचित हदीस वचनांपैकी ठरविले आहे (पहा- तफसीर ईब्ने कसीर खंड १ पृष्ठ- ५८७)

११४. या ठिकाणी आयत (निशाणी) शी अभिप्रेत ईश-चमत्कार होय. आणि ईश-चमत्कार दाखविणे हे कोणत्याही पैगंबराच्या अधिकारातली बाब नव्हे, किंबहुना जेव्हा अल्लाहच्या बुद्धिकौशल्यास या गोष्टीची निकड जाणवते तेव्हा तो आपल्या पैगंबराकरवी चमत्कार जाहीर करतो.

११५. आदेशाशी अभिप्रेत निर्णायक आदेश होय.

११६. उदाहरणार्थ या चतुष्पाद प्राण्यांपासून तुम्हाला दुध, दही प्राप्त होते. यांचे चामडे, लोकर आणि हाडे तुमच्या विविध प्रकारच्या गरजा भागवितात.

११७. अर्थात त्यांना ओझे लादण्याच्या कामी उपयोगात आणू शकावे आणि ही एक अशी महत्वपूर्ण गरज आहे, जिला तुम्ही स्वत: जाणता, तसेच ही वस्तुस्थिती आहे की यंत्रयुगा पूर्वी ओझे लादून नेण्याचे काम चतुष्पाद प्राण्यांकडूनच घेतले जात होते. शेत नांगरण्याचे व शेताला पाणी देण्याचे कामही चतुष्पाद प्राण्यांकडून घेतले जाते.

११८. अर्थात तुम्हाला चतुष्पाद प्राणी स्वत:वर बसवून फिरतात व नौका देखील.

११९. म्हणजे हे चतुष्पाद, ज्यांच्या पासून तुम्हाला अनेकविध लाभ घडतात. आणि या नौका, ज्या तुम्हाला आरूढ करवून फिरतात, काय या गोष्टीचे लक्षण नव्हे की ही सर्व तुमच्या संगोपनाची उपाय योजना आहे जी अल्लाहने केली आहे. त्याच्या ईशत्वाच्या या स्पष्ट निशाण्या पाहून ही तुम्ही तो खराखुरा पालनकर्ता व एकमेव ईश असण्याचा इन्कार कसा करता?

८२. काय हे लोक जमिनीवर हिंडले फिरले नाहीत की पाहीले असते, त्या लोकांची काय परिणति झाली, जे यांच्यापूर्वी होऊन गेलेत.[१२०] ते यांच्याहून संख्येने अधिक होते आणि सामर्थ्यात आणि जमिनविर अवशेष मागे सोडण्याच्या दृष्टीने सरस होते परंतु त्यांची ही कमाई त्यांच्या काहीही उपयोगी पडली नाही.

أَفَلَمْ يَسِيرُوا فِي الْأَرْضِ فَيَنظُرُوا كَيْفَ كَانَ عَاقِبَةُ
الَّذِينَ مِن قَبْلِهِمْ ۚ كَانُوا أَكْثَرَ مِنْهُمْ وَأَشَدَّ قُوَّةً وَ
آثَارًا فِي الْأَرْضِ فَمَا أَغْنَىٰ عَنْهُم مَّا كَانُوا يَكْسِبُونَ ﴿٨٢﴾

८३. जेव्हा त्यांचे रसूल (पैगंबर) त्यांच्या जवळ स्पष्ट प्रमाणे घेऊन आले तेव्हा ते त्या ज्ञानावर घमेंड करीत राहीले. जे त्यांच्याजवळ होते [१२१] आणि त्या अजाब (ईश शिक्षे) ने त्यांना घेरले, ज्याची ते थट्टा उडवित होते.

فَلَمَّا جَاءَتْهُمْ رُسُلُهُم بِالْبَيِّنَاتِ فَرِحُوا بِمَا عِندَهُم مِّنَ الْعِلْمِ
وَحَاقَ بِهِم مَّا كَانُوا بِهِ يَسْتَهْزِئُونَ ﴿٨٣﴾

८४. जेव्हा त्यांनी आमची शिक्षा पाहून घेतली, तेव्हा उद्‌गारले, आम्ही एकमेव अल्लाह वर ईमान बाळगले आणि त्यांचा इन्कार करतो ज्यांना आम्ही याचा (अल्लाहचा) सहभागी ठरवित होतो.[१२२]

فَلَمَّا رَأَوْا بَأْسَنَا قَالُوا آمَنَّا بِاللَّهِ وَحْدَهُ وَكَفَرْنَا بِمَا
كُنَّا بِهِ مُشْرِكِينَ ﴿٨٤﴾

८५. परंतु त्यांचे ईमान बाळगणे त्यांच्या करीता काहीच लाभदायक ठरू शकत नव्हते, जेव्हा त्यांनी आमच्या शिक्षेस पाहून घेतले.[१२३] हाच अल्लाहचा नियम आहे जो त्याच्या दासांमध्ये प्रचलित राहीला आहे. आणि त्या वेळी काफीर नाश पावले.

فَلَمْ يَكُ يَنفَعُهُمْ إِيمَانُهُمْ لَمَّا رَأَوْا بَأْسَنَا ۖ سُنَّتَ اللَّهِ
الَّتِي قَدْ خَلَتْ فِي عِبَادِهِ ۖ وَخَسِرَ هُنَالِكَ الْكَافِرُونَ ﴿٨٥﴾

१२०. संकेत आहे त्या नाश पावलेल्या जन समूहांकडे, ज्यांच्या इतिहास व अवशेषांपासून बोध घेतला जाऊ शकतो.

१२१. म्हणजे धर्माविषयीचे जे तुटपूंजे ज्ञान त्यांच्या जवळ होते आणि भौतिक ज्ञान व कला नैपुण्यात जे काही त्यांनी संपादले होते, त्याविषयी त्यांना मोठी घमेंड झाली त्यामुळे त्यांनी या सत्यनिष्ठ ज्ञानाची कदर जाणली नाही, ज्याचा उगम ईश-संदेशातून होतो व ज्याची शिकवण तत्कालीन पैगंबर देत होता.

आजचा काळ तर विज्ञान व तंत्र-ज्ञानाचा काळ आहे आणि आजचा मनुष्य भौतिक ज्ञान व कलेलाच सर्व काही समजतो व त्याबद्दल मोठा अभिमान बाळगतो, वस्तुत:या ज्ञानाने ती सत्ये उजेडात येत नाही, जी प्रेषित्व-ज्ञानाने उजेडात येतात. ज्या ज्ञानाला प्रगतीचे लक्षण समजले जाते, त्याचा उपयोग क्षितिजा पलिकडे नाही. या ज्ञानाने ना आता पावेतो जीवनाचे उद्दीष्ट निश्चित होऊ शकले आणि ना हे माहीत झाले की मेल्यानंतर माणसाबरोबर काय व्यवहार केला जाणार आहे आणि ना हे ज्ञान माणसाच्या अध्यात्मिक गरजा भागवू शकते. माणसाच्या अंतर्यामी ही जाणीव जागृत झाल्यास तो त्या ज्ञानाकडे धाव घेईल ज्याने हे सर्व प्रश्न सुटू शकतात. परिणामी तो कुरआनाची कदर जाणणारा होईल, जो सत्य-ज्ञानाचा व ईश-परिचयाचा खजीना आहे.

१२२. म्हणजे जेव्हा अल्लाहचा अजाब आला, तेव्हा आपल्या उपास्यांना व देवी देवतांना विसरले त्या वेळी त्यांनी अल्लाह एकमेव ईश्वर व पालनकर्ता असल्याचे मान्य केले आणि आपण ठरविलेल्या ईश्वराच्या सहभागींचा इन्कार केला.

१२३. म्हणजे अल्लाहचा अजाब पाहील्यानंतर कर्म करण्याचा अवधि संपतो व कसोटीची वेळ बाकी राहात नाही म्हणून अशा वेळी ईमान बाळगणे व्यर्थ ठरते. ईमान तेच सार्थ ठरते जे अजाब पाहण्यापूर्वी किंवा मृत्यु येण्यापूर्वी बाळगले जाते.

# सूरह
# हा मीम अस्सजदा

# ४१. हा मीम अस्सजदा

**नाव :** या सूरह चा आरंभ हा मीम या अक्षरांनी होतो आणि आयत क्र. ३७ मध्ये फक्त अल्लाहलाच सजदा करण्याचा आदेश दिला गेला आहे. तद्नुषंगे या सूरहचे नाव 'हा मीम अस्सजदा' असे आहे.

**अवतरण काळ :** मजकूरां वरुन असे दिसून येते की ही मक्काच्या मध्य युगात अवतरली असेल.

**मध्यवर्ती कल्पना** : कुरआनाचा इन्कार करणाऱ्यांना सावध करणे आणि त्यावर ईमान बाळगणाऱ्यांना खुश खबर देणे होय.

**आयत रचना:** आयत क्र. १ ते ८ मध्ये या गोष्टीवर जोर दिला गेला आहे की कुरआनाची कदर जाणा.

आयत क्र. ९ ते १८ मध्ये इन्कार करणाऱ्यांना वैचारीक आवाहन केले गेले आहे आणि ईश संदेश व प्रेषित्वास खोटे ठरविल्याच्या परिणाम स्वरूपी अवतरणाऱ्या ईश-शिक्षे पासून सावध केले गेले आहे.

आयत क्र.१९ ते २५ मध्ये अल्लाहच्या शत्रूंची ती दुष्परिणति निवेदिली गेली आहे. जिला कियामतीच्या दिवशी त्यांना तोंड द्यावे लागेल.

आयत क्र. २६ ते २९ मध्ये कुरआना विरूद्ध ओरड करणाऱ्यांना जहन्नमच्या शिक्षेची ताकीद दिली गेली आहे.

आयत क्र. ३० ते ३६ मध्ये अशा लोकांना जन्नतचा शुभ समाचार दिला गेला आहे जे काफीरांच्या या आरडा ओरडा व समस्त विरोध नंतर ही आपल्या ईमानावर निश्चल राहिले. त्या सोबतच आवाहनाच्या मार्गात विरोध करणाऱ्यांशी क्षमा वृत्तीने वागण्याची ताकीद केली गेली आहे.

आयत क्र. ३७ ते ४० मध्ये अल्लाहचे एकमेव उपास्य असणे मृतांना जिवंत करण्यास समर्थ असणेचे प्रमाण स्पष्ट केले गेले आहे.

आयत क्र. ४१ ते ४६ मध्ये स्पष्ट केले गेले आहे की कुरआन केवढा भव्य-दिव्य ग्रंथ आहे आणि इन्कार करणारे यांच्याशी कसा व्यवहार करीत आहेत आणि याचे काय परिणाम घडून येतील.

आयत क्र. ४७ ते ५१ मध्ये माणसाचे अनेकेश्वरवादी वर्तन व कियामतीचा इन्कार करण्यावर अंकुश ठेवला गेला आहे.

आयत ५२ ते ५४ सूरहच्या समारोपाच्या आयती होत, ज्यात कुरआना विषयी इन्कार करणायांच्या शंका-कुशंकाचे निरसन करीत हे भाकित केले गेले आहे की लवकरच यांच्या सत्यतेची चिन्हे क्षितिजावर प्रकट होतील.

# सूरह हा मीम अस्सजदा

سُوْرَةُ حٰمٓ السَّجْدَة

आयती-५४

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ

१. हा मीम [१]

حٰمٓ ۚ ﴿١﴾

२. हा (ग्रंथ) रहमान व रहीम कडून अवतरीत केला गेला आहे .[२]

تَنْزِيْلٌ مِّنَ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ ۚ ﴿٢﴾

३. एक असा ग्रंथ ज्याच्या आयती (पवित्र वचने) स्पष्टतः निवेदिली गेली आहेत. [३] अरबी कुरआन [४] त्या लोकां करीता जे ज्ञान बाळगतात.[५]

كِتٰبٌ فُصِّلَتْ اٰيٰتُهٗ قُرْاٰنًا عَرَبِيًّا لِّقَوْمٍ يَّعْلَمُوْنَ ۙ ﴿٣﴾

४. खुश खबर देणारा आणि सावध करणारा,[६] परंतु या पैकी अधिकांश लोकांनी तोंड फिरविले आणि ते यास ऐकतच नाहीत.

بَشِيْرًا وَّنَذِيْرًا ۚ فَاَعْرَضَ اَكْثَرُهُمْ فَهُمْ لَا يَسْمَعُوْنَ ﴿٤﴾

५. म्हणतात, ज्या गोष्टीकडे तुम्ही आम्हाला बोलवित आहात, त्या कडून आमची मने आवरणात आहेत आणि आमचे कान बधीर आहेत आणि आमच्या व तुमच्या दरम्यान एक पडदा पडला आहे. तेव्हा तुम्ही आपले काम करा, आम्ही आमचे काम करीत राहू. [७]

وَقَالُوْا قُلُوْبُنَا فِيْٓ اَكِنَّةٍ مِّمَّا تَدْعُوْنَآ اِلَيْهِ وَفِيْٓ اٰذَانِنَا وَقْرٌ
وَّمِنْۢ بَيْنِنَا وَبَيْنِكَ حِجَابٌ فَاعْمَلْ اِنَّنَا عٰمِلُوْنَ ﴿٥﴾

६. सांगा, मी तर तुमच्या सारखाच एक मनुष्य आहे. माझ्याकडे ईश-संदेश पाठविला जात आहे की तुमचे उपास्य एकमेव उपास्य आहे.[८] तेव्हा तुम्ही सरळ त्या कडेच वळा.[९] आणि त्याच्याकडे क्षमा याचना करा.[१०] अनेकेश्वर वाद्यां करीता सर्वनाश आहे.

قُلْ اِنَّمَآ اَنَا بَشَرٌ مِّثْلُكُمْ يُوْحٰٓى اِلَيَّ اَنَّمَآ اِلٰهُكُمْ اِلٰهٌ وَّاحِدٌ
فَاسْتَقِيْمُوْٓا اِلَيْهِ وَاسْتَغْفِرُوْهُ ۗ وَوَيْلٌ لِّلْمُشْرِكِيْنَ ۙ ﴿٦﴾

७. जे जकात देत नाहीत [११] आणि आखिरतचा इन्कार करतात.

الَّذِيْنَ لَا يُؤْتُوْنَ الزَّكٰوةَ وَهُمْ بِالْاٰخِرَةِ هُمْ كٰفِرُوْنَ ﴿٧﴾

१. या अक्षरांचे स्पष्टीकरण सूरह मोमीन टीप क्र. १ मध्ये केले गेले आहे. या सूरह मध्ये अल्लाहचे बुद्धिकौशल्य आयत क्र. ४२ मध्ये निवेदिले गेले आहे. ज्या कडे ही अक्षरे संकेत करतात.

२. ज्या अल्लाहच्या कृपा छता खाली माणसाचे पालन पोषण होत आहे आणि जो आपल्या निवडक दासांना विशेष कृपेने उपकृत करतो. हीच ती कृपा होय जी या ग्रंथाच्या अवतरणास कारणीभूत ठरली. यास्तव हा ग्रंथ पूरेपूर ईश-कृपाच होय.

३. स्पष्टीकरणा करीता पहा सूरह हूद टीप क्र. ३

४. कुरआन सर्वप्रथम अरबांना संबोधून होते; म्हणून कुरआन अरबी भाषेत अवतरीत केले गेले. इतर जन समूहांकरीता अप्रत्यक्षपणे प्रमाण होय. याचा हा अर्थ नव्हे की अरबी भाषेत असल्याने केवळ अरब लोकांवरच प्रमाण प्रस्थापित होते. इतरांवर नाही. कैसर व कसरा बादशहांची भाषा अरबी नव्हती परंतु त्यांच्यावर कुरआनाद्वारे अप्रत्यक्षत: प्रमाण प्रस्थापित केले गेले आणि या काळात मुस्लिम समुदायाद्वारे जगातल्या अनेकविध भाषांमध्ये पवित्र कुरआनाची भाषांतरे प्रसिद्ध होत आहे. तेव्हा कोणाला हे सांगायची संधी नाही की कुरआन अरबी भाषेत आहे, म्हणून अरबी न जाणणाऱ्यां लोकांकरीता प्रमाण कसे ठरू शकते?

५. याचा अर्थ हा नव्हे की या ग्रंथान्वये मोठमोठे विद्वान व ज्ञानीच लाभ घेऊ शकतात किंबहुना याचा अर्थ असा की जे लोक ईश्वर व धर्म संदर्भात अज्ञान ग्रस्त होत नाही, तर ज्ञानाला आधार ठरवितात, त्यांना हा ग्रंथ मार्गदर्शनाचामार्ग खुला करतो आणि ते यापासून लाभान्वित होतात.

६. म्हणजे हा ग्रंथ ईमान बाळगणाऱ्या व सन्मार्गावर चालणाऱ्यांना सदैव कालीन यशाची शुभवार्ता देतो व त्याला मानण्यास नकार दर्शविणाऱ्यांना निरंतर ईश-शिक्षेपासून सावध करतो.

७. काफिरांचे हे उत्तर त्यांचे दु:सहास व गर्वोन्मत्तता जाहीर करते आणि मनुष्य जेव्हा कुरआनाच्या आराहनाच्या विरोधात हे वर्तन अंगिकारतो तेव्हा त्याला हा ग्रंथ ऐकण्याची व समजून घेण्याची सुबुद्धि लाभत नाही.

८. म्हणजे तुम्ही मानत नसाल तर नका मानू परंतु माझी भूमिका तुम्हावर स्पष्ट राहीली आहे की मी ईश्वर असण्याचा दावा केलेला नाही आणि ना फरिश्ता असण्याचा. मी तर तुमच्या सारखाच हाडा-मांसाचा एक मनुष्य आहे. तथापि अल्लाहने जी वैशिष्टये मला प्रदान केली आहेत ती ही की मजवर अल्लाहची वही (ईश-संदेश) अवतरते, या साठी की मी त्याचा संदेश तुमच्या पावेतो पोहचवावा आणि या संदेशाचा सर्वप्रथम मुद्दा असा की तुमचा ईश्वर हा एकमेव ईश्वर आहे आणि तोच उपासना करण्या योग्य आहे.

९. म्हणजे प्रामाणिक पणे त्याचीच उपासना करा, त्याच्याच हुकुमाअधीन राहा, आशा, आकांक्षा त्यच्याशीच बाळगा व त्याच्याच प्रसन्नतेचे अभिलाषी व्हा.

१०. म्हणजे आता पर्यंत तुम्ही जे चुकीचे वर्तन करीत राहीलात व जे काही अपराध करीत राहीले, त्याबद्दल अल्लाहकडे क्षमा याचना करणारे व्हा.

११. अनेकेश्वरवाद्यांचा एक फार मोठा अपराध हा की ते जकात (कर्तव्य-दान) अदा करीत नाही, जो इस्लामचा अतिमहत्वपूर्ण आधारस्तंभ आहे आणि पूर्वीच्या शरीअतींमध्ये ही जकातचे स्वरूप एक महत्वपूर्ण कर्तव्य म्हणून राहीले आहे. अरबांचे पूर्वज असलेल्या हजरत इस्माईल यांनी ही जकात अदा करण्या संबंधी ताकीद पूर्ण आदेश दिला होता (पहा सूरह मरीयम आयत क्र. ५५)

स्पष्ट असावे की शरीअत (इस्लामी धर्म शास्त्र) समस्त लोकांना संबोधून आहे. म्हणजे अल्लाहच्या आदेशांचे पालन ज्या प्रमाणे ईमान बाळगणाऱ्यांना लागू पडते त्याच प्रमाणे अनेकेश्वर वादी व काफीर लोकांना ही. मात्र कोणत्याही सत्कर्माच्या स्विकृति करीता मोमीन (ईमान धारक) असणे अगत्याचे आहे. ईमान बाळगल्याशिवाय मोठयात मोठे सत्कर्म देखील अल्लाहच्या नजरेत कुचकामी ठरते. काफिर व अनेकेश्वर वादींच्या शरीअत विरोधी वर्तनामुळे त्यांच्या अपराधात आणखी भर पडते. आणि ते अत्याधिक प्रखर स्वरूपाच्या ईश शिक्षेस पात्र ठरतात. अशा रीतीने जकात उपासनेचे एक स्वरूप आहे ज्याप्रमाणे कुर्बानी. तसेच हा गरीबांचा व दीन दुबळयांचा हक्क देखील आहे. ज्यास अल्लाहने धन-सम्पत्तित निर्धारीत केले आहे. हा हक्क पूर्वीच्या शरीअतींमध्ये ही परिचित व निश्चित राहीला आहे. आणि मक्केच्या सुरवातीच्या काळात जे शरीअत विषयक आदेश दिले गेले त्यात ही जकात अदा करण्याची ताकीद या स्पष्टीकरणासह दिली गेली की हा एक निर्धारीत हक्क आहे.

وَالَّذِيْنَ فِيْٓ اَمْوَالِهِمْ حَقٌّ مَّعْلُوْمٌ ۔ لِّلسَّآئِلِ
وَالْمَحْرُوْمِ ۔ (معارج ۔ ۲۴،۲۵)

''ज्यांच्या धन सम्पतित हक्क निर्धारीत आहे. याचना करणाऱ्यांचा ही आणि जे वंचित आहेत, त्यांचा ही.' (मआरिज-२४-२५)

नंतर जेव्हा मदीनेत जकातची व्यवस्थित स्थापना करण्याची वेळ आली तेव्हा विवरणात्मक आदेश दिले गेले.

८. मात्र ज्यांनी ईमान बाळगले व सत्कर्म करीत राहीले, त्यांच्या करीता असा मोबदला आहे जो कधी ही संपणार नाही.[१२]

إِنَّ الَّذِينَ آمَنُوا وَعَمِلُوا الصَّالِحَاتِ لَهُمْ أَجْرٌ غَيْرُ مَمْنُونٍ ﴿٨﴾

९. सांगा, काय तुम्ही त्या अस्तित्वाचा इन्कार करता व त्याचे समकक्ष ठरविता, ज्याने दोन दिवसात जमीन तयार केली? तोच तर सर्व विश्वांचा पालन कर्ता आहे.[१३]

قُلْ أَئِنَّكُمْ لَتَكْفُرُونَ بِالَّذِي خَلَقَ الْأَرْضَ فِي يَوْمَيْنِ
وَتَجْعَلُونَ لَهُ أَنْدَادًا ذَٰلِكَ رَبُّ الْعَالَمِينَ ﴿٩﴾

१०. त्याने जमीनीत वरून पर्वत रोवले आणि तिच्यात समृद्धि राखली व खाद्य-सामुग्री राखली.[१४] हे चार दिवसात झाले.[१५] (ह्या ईश-देणग्या) समान आहेत, समस्त याचना करणाऱ्यां साठी.[१६]

وَجَعَلَ فِيهَا رَوَاسِيَ مِنْ فَوْقِهَا وَبَارَكَ فِيهَا وَقَدَّرَ فِيهَا
أَقْوَاتَهَا فِي أَرْبَعَةِ أَيَّامٍ سَوَاءً لِلسَّائِلِينَ ﴿١٠﴾

११. मग त्याने आकाशाकडे लक्ष दिले जे धूर-स्वरूप होते.[१७] त्याने त्याला (आकाशाला) व जमीनीला फर्माविले, आदेशाचे पालन करा, राजीखुषीने किंवा नापसंतीने. ते म्हणाले आम्ही पालन केले राजीखुषीने.[१८]

ثُمَّ اسْتَوَىٰ إِلَى السَّمَاءِ وَهِيَ دُخَانٌ فَقَالَ لَهَا وَلِلْأَرْضِ
ائْتِيَا طَوْعًا أَوْ كَرْهًا قَالَتَا أَتَيْنَا طَائِعِينَ ﴿١١﴾

१२. तेव्हा त्याने सात आकाश बनविले दोन दिवसात [१९] आणि प्रत्येक आकाशात त्याचे आदेश वहय केले (अवतरीत केले [२०]) आम्ही विश्वाच्या आकाशाला दिव्यांची शोभा प्रदान केली [२१] आणि त्याला सुरक्षित केले.[२२] ही त्या अस्तित्वाची आखणी होय जो प्रभुत्वशाली आणि अतिशय ज्ञानी आहे.[२३]

فَقَضَاهُنَّ سَبْعَ سَمَاوَاتٍ فِي يَوْمَيْنِ وَأَوْحَىٰ فِي كُلِّ سَمَاءٍ أَمْرَهَا
وَزَيَّنَّا السَّمَاءَ الدُّنْيَا بِمَصَابِيحَ وَحِفْظًا
ذَٰلِكَ تَقْدِيرُ الْعَزِيزِ الْعَلِيمِ ﴿١٢﴾

१३. आणि तरीही जर हे उपेक्षा दर्शवितात तर यांना सांगा, मी तुम्हाला अशा प्रकारची ईश शिक्षेचे भय दर्शवितो, ज्या प्रकारची ईश शिक्षा आद आणि समूद वर कोसळली होती.[२४]

فَإِنْ أَعْرَضُوا فَقُلْ أَنْذَرْتُكُمْ صَاعِقَةً مِثْلَ صَاعِقَةِ
عَادٍ وَثَمُودَ ﴿١٣﴾

१२. म्हणजे त्यांचा मोबदला कधीही खंडीत होणार नाही, किंबहुना तो त्यांना सतत मिळत राहील.

१३. दिवसाशी अभिप्रेत वेळेच ते प्रमाण होय जे अल्लाहलाच ठाऊक आहे. (अधिक स्पष्टीकरणा साठी पहा सूरह अअराफ टीप क्र. ८२) जमीनीला दोन दिवसात निर्माण करण्याचा अर्थ हा लक्षात येतो की जमीनीची रचना दोन काळखंडात झाली. संभवत: एक काळ तिच्या मूलत्वाची रचना व तिच्या घटकांच्या उपाय योजनेत पार पडला असावा आणि दुसरा तिचे थर बनण्यात व एक विशेष योग्यता अंगिकारण्यात. काही असो, या ठिकाणी हे स्पष्ट करण्याचा हेतु आहे की जमीन ना अनादि अनंत आहे की नेहमी पासून आपोआप चालत आली असावी आणि ना योगायोगाने अस्तित्वात आली आहे, किंबहुना अस्तित्वात आणल्याने ती अस्तित्वात आली आहे. अर्थात तिला अस्तित्वात आणणारी शक्ति म्हणजे सर्व विश्वांचा पालनकर्ता अल्लाह होय; ज्याने नियोजित योजनेनुसार तिला अस्तित्वात आणले दोन कालखंडात तिला तयार करणे हे जाहीर करते की ही अतिशय बुद्धिकौशल्यायुक्त योजना होती; जिच्या परिणामस्वरूपी जमीनीचे मूलतत्व क्रमाक्रमाने उन्नत स्वरूप आंगिकारत गेले. येथपावेतो की तिने गोलाकार पृथ्वीचे स्वरूप धारण केले तेव्हा ज्या अल्लाहची ही कामगिरी आहे, त्याला एकमेव ईश्वर मानण्यास इन्कार करणे आणि इतरांना त्याच्या बरोबरीचे ठरविणे, वास्तविक या सृष्टीची रचना करण्यात अन्य कोणाचाही सहभाग नाही, केवढी नादानपणाची गोष्ट आहे व केवढी मोठी अत्याचार पूर्ण हरकत!

या प्रसंगी ही गोष्ट देखील चांगल्या प्रकारे लक्षात घेतली पाहिजे की कुरआन ना भूगर्भशास्त्राचे (Geology) पुस्तक आहे आणि ना खगोलशास्त्राचे (Astronomy) आणि ना नैसर्गिक शास्त्राचे (Physical Science) किंबहुना मार्गदर्शक-ग्रंथ आहे. आणि मार्गदर्शना करीता जेथपावेतो ज्या ज्ञानाची गरज होती, कुरआनने त्यास पूर्ण केले. सृष्टीच्या आरंभाचा क्रम असो किंवा अंताचा, कुरआनने याच पैलूने प्रकाश टाकला आहे, म्हणून संबंधित आयतींचा अभ्यास याच दृष्टीकोनातून केला गेला पाहिजे, परंतु आजच्या काळात ते विचारवंत जे आधुनिक ज्ञान-विज्ञानाच्या नवनवीन संशोधनाने प्रभावित आहेत वैज्ञानिक दृष्टीकोनाच्या समर्थनार्थ कुरआनाच्या आयती सादर करू लागतात. मग यासाठी त्यांना कितीही ओढाताण करावी लागली तरी चालेल. तसेच या वस्तुस्थितीस ही दृष्टीआड केले जाऊ शकत नाही की कोणत्याही आयतीच्या संदर्भात माहीती व इतर ज्ञान विषयक बाबींचा डोंगर रचल्याने कुरआनच्या अभ्यासकांच्या नजरेतून मार्गदर्शन व ईश-स्मरणाचा पैलू दिसेनासा होतो आणि मन बुध्दी सामान्य ज्ञानाच्या भोवऱ्यातच अडकून पडते. भौतिक ज्ञानाच्या प्रभावाच्या या युगात कुरआनाचे आवाहन प्रस्तुत करणाऱ्यांनी तर याबाबतीत अधिक सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे.

जमीनीत सर्वश्रेष्ठ अल्लाहने अशी समृध्दी राखली आहे की माणसाच्या समस्त नागरी-गरजा तिच्याद्वारे भागवल्या जातात. जमीनीत अशा वेगवेगळया धातूंच्या अशा खाणी आढळून येतात ज्यांना मनुष्य वर्षानुवर्षे काढत आला आहे आणि ते कधीही संपत नाही. ज्या गोष्टींवर मनुष्य-जीवन अवलंबून आहे, त्या चीज वस्तू जमीन विपुल प्रमाणात उपलब्ध करून देते. यास्तव पाण्याचे झरे सर्वत्र प्रवाहीत आहेत. अनेकविध प्रकारच्या खाद्य वस्तु जमीन सतत उत्पन्न करीत आली आहे. एक दाणा टाकला तर जमीन शेकडो दाणे परत करते. एक रोप लावल्यास जमीन खोड व झाड उभे करते आणि फळा-फुलांच्या रूपाने आपली देणगी सादर करू लागते. मानवी जीवनाच्या उपजिविकेची ही सामुग्री आणि सुख-समृध्दीच्या या खाणी जमीनीत कोणी लपवून ठेवल्या आहेत? या मूळ प्रश्नावरच माणसाने विचार करावयास हवा आणि याच्या योग्य उत्तरा द्वारेच माणसाला मार्गदर्शन लाभू शकते.

१५. म्हणजे दोन दिवसात जमीनीची रचना झाली आणि दोन दिवसात पर्वत उभे केले गेले आणि जमीनीच्या अंगी खाद्य सामुग्री निर्माण करण्याची क्षमता राखण्याचे काम पार पडले. अशा प्रकारे चार दिवस म्हणजे चार कालखंडात जमीनीची रचना पूर्ण झाली.

१६. म्हणजे जमीनीतल्या या ईश देणग्या एखाद्या विशिष्ट मानव समूहाकरीता अस्तित्वात आणल्या गेल्या नाहीत, किंबहुना त्यांचा लाभ सर्वांकरीता आहे. हे मनुष्य स्वभावाच्या मागण्या पूर्ण करण्याकरीता आहे. हवा, पाणी आणि प्रत्येक प्रकारचे जमीनीचे उत्पादन समस्त मानवांकरीता आजिविका सामुग्री आहे आणि हीच वस्तुस्थितीही आहे की यापासून जगातील प्रत्येक मनुष्य लाभ घेतो, परंतु ज्याने सर्वांच्या गरजा भागविण्याची उपाय योजना केली आहे त्याला अर्थात अल्लाहला सर्वसामान्यत: लोक विसरतात.

१७. आकाश व जमीनीचे मूलतत्व तर एकाच वेळी निर्माण केले गेले, जसे सूरह अंबिया-आयत क्र. ३० वरून स्पष्ट होते. परंतु जमीनीची रचना आधी केली गेली व आकाशाची त्यानंतर जेव्हा जमीनीची रचना झाली तेव्हा आकाश धूर स्वरूप होते. धूरावरून उष्ण वायु (Hot Gaxes) कडे लक्ष जाते. संभवत: हा याचाच आशय असावा.

१८. जमीन आणि आकाश जडपदार्थ असले तरी जडपदार्था विषयी हा विचार करणे उचित नव्हे की ते अगदीच प्रज्ञा हीन आहेत. आम्ही त्यांच्या संज्ञा वा प्रज्ञेची कैफीयत जाणत नाही

परंतु कुरआनने या सृष्टीच्या ज्या रहस्यांवरून आवरण हटविले आहे, त्यावरून आमच्या ज्ञानात एवडी भर निश्चित पडली की सृष्टीतील प्रत्येक जीव प्रत्येक वस्तू आपल्या निर्मात्यास, जो या सृष्टीचा पालनकर्ता ही आहे ओळखते. त्याचा हुकुम ऐकते व त्याचे पालनही करते आणि त्याचे पावित्र्य वर्णन व प्रशंसा करण्यात मग्न आहे. या आयती वरून अधिक हे ही स्पष्ट होते की आकाश व जमीन, अल्लाहच्या आदेशांचे पालन अगतिकपणे, अनिच्छापूर्वक करीत नाही. किंबहुना मन: पूर्वक करीत आहेत. यावरून हा संकेत आपोआप मिळतो की माणसाने आपल्या पालनकर्त्या अल्लाहाचे आज्ञापालन राजी खुषीने केले पाहिजे.

१९. आमची दृष्टी क्षितिजापर्यंत भिडलेल्या आकाशापर्यंतच पोहचू शकते; परंतु हे समजणे योग्य नव्हे की सृष्टी केवळ या हद्दी पावेतो मर्यादित आहे. कुरआन स्पष्टत: सांगतो की आकाशाच्या ही वर आकाश आहे. आकाशाचा जी प्राथमिक अवस्था रचली गेली होती त्यापासून सात आकाशे त्याने स्थिर केली. या सप्त आकाशात काय काय आहे ते अल्लाहलाच ठाऊक. मात्र या जगाच्या आकाशस्थ वातावरणात अगणिक (heavenly bodies) अवलोकनात येणारी गोष्ट आहे.

२०. म्हणजे अल्लाहच्या ज्या नियमांचे यांना पालन करावयाचे आहे आणि जे कार्य त्याच्या मार्गदर्शनानुसार पार पाडावयाचे आहे या विषयी त्यांना ईश-आदेश / अेत:प्रेरणा दिली गेली आहे.

२१. म्हणजे तारे आकाशाचे सौंदर्यपूर्ण दृश्य प्रस्तुत करतात आणि अवलोकन करणाऱ्यांना विचार चिंतनाचे आवाहन करतात. की कसकशा कौशल्यांनी व चमत्कृतिंनी नटलेली आहे ती हस्ती (म्हणजे अल्लाह) जिने एवढी सुंदर मैफल सजविली.

२२. तारे एक तर या पैलूने आकाशाच्या संरक्षणाचे साधन आहेत की यांच्यापासून निघणारी प्रखर किरणे, आकाशाकडे वर चढणाया पासून सैतानांना रोखतात (पहा सूरह हिज्र आयत क्र.१८. टीप क्र. १६) आणि काही इतरपैलूंनी ही जे आम्हाला माहीत नाहीत. संभवत: ताऱ्यांच्या गुरूत्वाकर्षणाच्या नियमाद्वारे आकाशाच्या संरक्षणाची उपाय योजना केली गेली आहे. अल्लाह सर्वज्ञ आहे.

२३. म्हणजे ही सृष्टी एखाद्या योजनेविना ना अस्तित्वात आली आहे आणि ना चालत आहे, किंबहुना यामागे एक जबरदस्त सामर्थ्य बाळगणाऱ्या व अतिशय ज्ञानी अशा अस्तित्वाची योजना कार्य करीत आहे. ही योजना एक बुद्धिकौशल्यपूर्ण स्कीम व एक उद्दिष्टपूर्ण व्यवस्था आहे, ज्या मागे एक उद्देश्य आहे. या योजनेला वही (ईश-संदेशा) च्या उजेडातच समजले जाऊ शकते अर्थात तो संदेश म्हणजे कुरआन होय.

२४. म्हणजे जर हे अनेकेश्वरवादी या वस्तुस्थितींना मान्य करीत नाही आणि तौहीद (एकेश्वरवादा) ला मानण्यास इन्कार करतात तर त्यांना अल्लाहच्या शिक्षेपासून सावध करा.

**तो दिवस की जेव्हा अल्लाहच्या शत्रूंना जहन्नमकडे नेण्याकरीता एकत्र केले जाईल आणि त्यांची वर्गवारी केली जाईल. (अल-क़ुर्आन)**

१४. जेव्हा त्यांचे रसूल त्यांच्या पुढून व मागून आले [२५] की अल्लाह खेरीज अन्य कोणाची उपासना करू नका, तेव्हा ते म्हणाले, आमच्या पालन कर्त्याने इच्छिले असते तर त्याने फरिश्त्यांना अवतरीत केले असते. यास्तव आम्ही तो संदेश मानत नाही, ज्यासह तुम्ही पाठविले गेलात.

إِذْ جَآءَتْهُمُ الرُّسُلُ مِنْ بَيْنِ أَيْدِيهِمْ وَمِنْ خَلْفِهِمْ
أَلَّا تَعْبُدُوٓا إِلَّا اللّٰهَ قَالُوا لَوْ شَآءَ رَبُّنَا لَأَنْزَلَ مَلٰٓئِكَةً
فَإِنَّا بِمَآ أُرْسِلْتُمْ بِهٖ كٰفِرُونَ ﴿١٤﴾

१५. आदचा वृत्तांत असा की त्यांनी जमीनीवर घमेंड केली ज्याचा त्यांना काही एक हक्क नव्हता. आणि म्हणू लागले, कोण आहे आमच्याहून अधिक शक्तिशाली ? त्यांनी हा विचार नाही केला की ज्याने त्यांना निर्माण केले आहे तो त्यांच्याहून अधिक शक्तिशाली आहे.[२६] ते आमच्या आयतींचा इन्कारच करत राहीले.

فَأَمَّا عَادٌ فَاسْتَكْبَرُوا فِي الْأَرْضِ بِغَيْرِ الْحَقِّ وَقَالُوا
مَنْ أَشَدُّ مِنَّا قُوَّةً أَوَلَمْ يَرَوْا أَنَّ اللّٰهَ الَّذِي خَلَقَهُمْ هُوَ أَشَدُّ
مِنْهُمْ قُوَّةً وَكَانُوا بِاٰيٰتِنَا يَجْحَدُونَ ﴿١٥﴾

१६. शेवटी आम्ही त्यांच्यावर अशुभ दिवसांत [२७] सोसाटयाचे वारे पाठविले.[२८]अशासाठी की त्यांना ऐहिक जीवनात अपमानाच्या शिक्षेची गोडी चाखवावी आणि आखिरतची शिक्षा तर याहून अधिक अपमान जनक असेल आणि त्यांना कसलीही मदत लाभू शकणार नाही.

فَأَرْسَلْنَا عَلَيْهِمْ رِيحًا صَرْصَرًا فِيٓ أَيَّامٍ نَّحِسَاتٍ لِّنُذِيقَهُمْ
عَذَابَ الْخِزْيِ فِي الْحَيٰوةِ الدُّنْيَا وَلَعَذَابُ الْاٰخِرَةِ أَخْزٰى وَهُمْ
لَا يُنْصَرُونَ ﴿١٦﴾

१७. राहीलेत समूद तर आम्ही त्यांना मार्ग दाखविला, परंतु त्यांनी मार्गदर्शनाच्या तुलनेत अंधत्वास पसंत केले,[२९] तेव्हा यांच्या करतुतींमुळे यांना अपमानाच्या विनाशकारक शिक्षेने धरले.[३०]

وَأَمَّا ثَمُودُ فَهَدَيْنٰهُمْ فَاسْتَحَبُّوا الْعَمٰى عَلَى الْهُدٰى فَأَخَذَتْهُمْ
صٰعِقَةُ الْعَذَابِ الْهُونِ بِمَا كَانُوا يَكْسِبُونَ ﴿١٧﴾

१८. आणि आम्ही त्या लोकांना वाचविले ज्यांनी ईमान बाळगले होते आणि जे अल्लाहचे भय बाळगत होते.

وَنَجَّيْنَا الَّذِينَ اٰمَنُوا وَكَانُوا يَتَّقُونَ ﴿١٨﴾

१९. तो दिवस की जेव्हा अल्लाहच्या शत्रूंना जहन्नमकडे नेण्याकरीता एकत्र केले जाईल आणि त्यांची वर्गवारी केली जाईल.[३१]

وَيَوْمَ يُحْشَرُ أَعْدَآءُ اللّٰهِ إِلَى النَّارِ فَهُمْ يُوزَعُونَ ﴿١٩﴾

२५. पैगंबरांच्या पुढून व मागून येण्याचा अर्थ असा की यांनी आपल्या जनसमूहांसमोर सत्य धर्माचे आवाहन सर्वथा सादर केले व त्यांना समजाविण्याचा सर्वतोपरि प्रयत्न केला.

२६. म्हणजे भौतिक साधनांची रेलचेल व आपल्या नागरी प्रगतीची त्यांना अशी घमेंड राहीली की ते अल्लाहला विसरले. जर त्यांनी हे समजून घेतले असते की आमच्यावर एक जबरदस्त सामर्थ्यशाली हस्ती अस्तित्वात आहे तर त्यांनी अल्लाहचे भय बाळगले असते व घमेंडखोर बनले नसते.

२७. अशुभ दिवसांशी अभिप्रेत ते दिवस होत जेव्हा यांच्या कुफ्र (इन्कार) करण्यापायी त्यांचे दुदैव ओढवले आणि ते नाश पावले. याचा हा अर्थ नव्हे की ते दिवसच अशुभ होते. असे असते तर ईमान बाळगणाऱ्यांना त्या दिवसांचा अशुभपणा भोवला असता परंतु ते अगदी सुरक्षित राहीले. त्या दिवसांनाच अशुभ समजणे हा निव्वळ भ्रम मात्र होय आणि इस्लाम धर्मात कोणतही दिवस अशुभ नाही. किंबहुना ज्या दिवशी एखाद्याचे दुर्भाग्य त्याच्या दुराचारापायी ओढवल्यास तो दिवस त्याच्या करीता या अर्थाने अशुभ ठरेल की त्याला दुष्परिणतीस तोंड दयावे लागेल.

२८. अतिशय वेगवान वारे, ज्यानी सर्व काही उध्वस्त करून टाकले.

२९. म्हणजे समूद जनसमूहाला स्पष्टत: ईश-मार्गदर्शन दिले होते परंतु त्यांनी या मार्गदर्शनाचा अंगिकार केला नाही, किंबहुना त्याच्या कडून आपले डोळे बंद केले अशाप्रकारे ते आंधळे बनून भटकत राहीले.

३०. समूद जन समूहावर जी ईश शिक्षा अवतरली त्याच्या तपशीला करीता पहा सूरह अअराफ टीप क्र. १२३, १२४

३१. म्हणजे त्यांच्या अपराधांच्या स्तरानुसार त्यांना वेगवेगळया समूहांमध्ये विभागले जाईल.

२०. येथपावेतो की जेव्हा ते तिथे पोहचतील,[३२] तेव्हा त्यांचे कान,त्यांचे डोळे आणि त्यांची त्वाचा त्यांच्या विरूद्ध साक्ष देतील की ते काय काय करीत राहीलेत.[३३]

حَتّٰٓى اِذَا مَا جَآءُوْهَا شَهِدَ عَلَيْهِمْ سَمْعُهُمْ وَاَبْصَارُهُمْ
وَجُلُوْدُهُمْ بِمَا كَانُوْا يَعْمَلُوْنَ ﴿٢٠﴾

२१. ते आपल्या त्वचांना म्हणतील की तुम्ही आमच्या विरूद्ध साक्ष कां दिली ? त्या म्हणतील, आम्हाला त्याच अल्लाहने बोलके केले ज्याने प्रत्येक वस्तूस वाकशक्ति दिली.[३४] त्यानेच [३५] तुम्हाला पहिल्यांदा निर्माण केले आणि आता तुम्ही त्याच्याचकडे परतविले जात आहात.[३६]

وَقَالُوْا لِجُلُوْدِهِمْ لِمَ شَهِدْتُّمْ عَلَيْنَا ۗ قَالُوْٓا اَنْطَقَنَا اللّٰهُ
الَّذِيْٓ اَنْطَقَ كُلَّ شَيْءٍ وَّهُوَ خَلَقَكُمْ اَوَّلَ مَرَّةٍ وَّاِلَيْهِ
تُرْجَعُوْنَ ﴿٢١﴾

२२. तुम्ही ही भिती बाळगत नव्हते की तुमचे कान, तुमचे डोळे आणि तुमची त्वचा तुमच्याच विरूद्ध साक्ष देतील, किंबहुना तुम्ही तर हे गृहीत धरले होते की अल्लाह देखील त्या अनेक गोष्टींना जाणत नाही, ज्या तुम्ही करता.

وَمَا كُنْتُمْ تَسْتَتِرُوْنَ اَنْ يَّشْهَدَ عَلَيْكُمْ سَمْعُكُمْ
وَلَآ اَبْصَارُكُمْ وَلَا جُلُوْدُكُمْ وَلٰكِنْ ظَنَنْتُمْ اَنَّ اللّٰهَ
لَا يَعْلَمُ كَثِيْرًا مِّمَّا تَعْمَلُوْنَ ﴿٢٢﴾

२३. आपल्या पालनकर्त्या विषयी तुमची हीच कल्पना होती, जिने तुम्हाला विनाश ग्रस्त केले व तुम्ही तोटयात पडले.[३७]

وَذٰلِكُمْ ظَنُّكُمُ الَّذِيْ ظَنَنْتُمْ بِرَبِّكُمْ اَرْدٰىكُمْ فَاَصْبَحْتُمْ
مِّنَ الْخٰسِرِيْنَ ﴿٢٣﴾

२४. आता जर ते धीर धरतील तर जहन्नमच त्यांचे ठिकाण आहे आणि जर माफी मागतील तर त्यांना माफ केले जाणार नाही.[३८]

فَاِنْ يَّصْبِرُوْا فَالنَّارُ مَثْوًى لَّهُمْ ۚ وَاِنْ يَّسْتَعْتِبُوْا فَمَا هُمْ
مِّنَ الْمُعْتَبِيْنَ ﴿٢٤﴾

२५. आणि आम्ही त्यांच्यावर असे साथी तैनात केले होते जे त्यांच्या पुढील व मागील प्रत्येक गोष्ट त्यांना सुशोभित बनवून दाखवित.[३८(अ)] शेवटी यांच्या बाबतीत ही माझे ते फर्मान पूर्ण झालेच जे यांच्या पूर्वी होऊन गेलेल्या जिन्न व माणसांच्या समूहांबाबत पूर्ण झाले होते.[३९] ते नष्ट होऊन गेलेत.

وَقَيَّضْنَا لَهُمْ قُرَنَآءَ فَزَيَّنُوْا لَهُمْ مَّا بَيْنَ اَيْدِيْهِمْ وَمَا
خَلْفَهُمْ وَحَقَّ عَلَيْهِمُ الْقَوْلُ فِيْٓ اُمَمٍ قَدْ خَلَتْ مِنْ
قَبْلِهِمْ مِّنَ الْجِنِّ وَالْاِنْسِ ۚ اِنَّهُمْ كَانُوْا خٰسِرِيْنَ ﴿٢٥﴾

२६. ज्या लोकांनी कुफ्र केले,ते म्हणतात,या कुरआनास ऐकू नका आणि या (च्या पठणा) त गोगाट माजवा, जेणे करून तुम्ही वरचढ रहावे.[४०]

وَقَالَ الَّذِيْنَ كَفَرُوْا لَا تَسْمَعُوْا لِهٰذَا الْقُرْاٰنِ
وَالْغَوْا فِيْهِ لَعَلَّكُمْ تَغْلِبُوْنَ ﴿٢٦﴾

३२. म्हणजे जहन्नमच्या जवळ पोहचतील.

३३. डोळे व कान साक्ष देतील की कोणकोणत्या गुन्हयांसाठी त्यांचा वापर केला गेला होता. अल्लाहच्या निशाण्या पाहण्या पासून डोळे व उपदेशप्रद गोष्टी ऐकण्यापासून कान बंद करणे सर्वात मोठा अपराध होय. आणि ज्या गोष्टींना पाहणे हराम (वर्ज्य) आहे त्या पाहणे, व ज्या गोष्टींना ऐकणे हराम आहे, त्या ऐकणे उघड स्वरूपाचा अपराध आहे. यास्तव जे अपराध डोळेयांनी व कानांद्वारे घडले ते कियामतीच्या दिवशी याची साक्ष देतील. एवढेच नव्हे तर शरीराचा एकेक बाल साक्ष देईल की त्याचा कशा प्रकारे कुफ्र व अपराधाच्या कामासाठी वापर केला गेला होता.

यावरून हे कळाले की माणसाच्या अंगावरील त्वाचा मोठी संवेदनशील असते, जणू तो असा टेप होय जो प्रत्येक कृतीस रेकॉर्ड करून घेतो आणि कियामतीच्या दिवशी हा टेप आपले रेकॉर्ड ऐकविल. (अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह यासीन टीप क्र. ७०).

३४. कियामतीच्या दिवशी ही वस्तुस्थिती ही अनावरित होईल की जगात ज्या चीज-वस्तु बोलतांना आढळून येत नाहीत त्या वाक्शक्ति पासून अगदीच वंचित नाहीत त्या दिवशी प्रत्येक वस्तु बोलू लागेल. जमीन आपले वृत्तांत ऐकविल (सूरह जिलजाल) आणि माणसाचे अवयव देखील बोलू लागतील, अशासाठी की माणसाच्या आचरणा विषयी अगदी यथायोग्य साक्ष दिली जावी.

आजच्या काळातील माणसाकरीता ही कल्पना की त्याची त्वचा बोलू लागेल व त्याच्या अपराधांची साक्ष देईल, काहीच नवलाची नाही कारण आज विडीयो कॅसेटद्वारे तो कोणत्याही घटनेचा बोलपट तयार करतो.

३५. येथून पुन्हा सर्वश्रेष्ठ अल्लाहचे स्वत:चे निवेदन सुरु होते.

३६. म्हणजे तुम्हाला या गोष्टीचा इन्कार होता की तुमचे परतणे अल्लाहच्या समोर होईल, पण आता तुम्हीच पाहात आहात की ज्याने तुम्हाला पहिल्यांदा निर्माण केले होते, त्याच्याकडे तुम्ही परत आला आहात.

३७. अपराध करतांना हे समजणे की हा अल्लाहच्या नजरेपासून लपून राहील. पूरेपूर कुफ्र (सत्याचा इन्कार) आहे. कोणताही गुन्हा अल्लाहच्या नजरेपासून लपू शकत नाही आणि ना तो याबाबत अनभिज्ञ असतो. परंतु जेव्हा मनुष्य अपराध करू इच्छितो तेव्हा तो स्वत:लाच धोका देतो की अल्लाहच्या नजरेपासून हा अपराध लपून राहील, मग जेव्हा हा विचार मनात घर करतो तेव्हा तो अधिकाधिक अपराध करू लागतो आणि शेवटी विनाशाच्या गर्तेत कोसळतो.

३८. म्हणजे आता कोणत्याही परिस्थितीत, यांना जहन्नम मध्ये राहणे भाग आहे, मग हे त्यास सहन करोत वा न करोत. तसेच यांच्याकरीता माफीचीही संधी आता उरली नाही.

३८.[अ] अभिप्रेत वाईट सोबती होत. मनुष्य जेव्हा बुद्धि व सुज्ञतेचा वापर करीत नाही आणि इच्छा आकांक्षाच्या मागे धाव घेतो तेव्हा सैतान त्याचा जोडीदार बनतो आणि मार्गभ्रष्ट लोक त्याचे मित्र सवंगडी बनतात आणि त्याच्या बुद्धिमत्तेला एवढे प्रभावित करतात की खोटया श्रद्धा व दृष्टीकोन आणि वाईट निति व आचरण त्याच्या करीता आकर्षक ठरतात. पुढच्या व मागच्या प्रत्येक गोष्टीस नयनरम्य बनविण्याचा अर्थ असा की हे वाईट सोबती आपल्या मनमोहक गोष्टींनी भविष्यकाळासही उज्वल स्वरूपात दाखवितात आणि भूतकाळातील मार्गभ्रष्टतेला देखील एक चांगला आदर्श (Ideal) अवलोकनात म्हणून प्रस्तुत करतात. आणि ही वस्तुस्थिती आहे की आज देखील किती तरी जन समूह आपल्या प्राचीन संस्कृतिचा अभिमान बाळगतात; वास्तविक त्यांची संस्कृति अज्ञान, निर्लज्जता आणि भ्रम पूजेचे निकृष्टतम उदाहरण असते. त्याच प्रमाणे ते आपल्या भौतिक प्रगतीत आपले वैभवशाली भविष्य पाहू लागतात परंतु त्याची वास्तविकता मृगजळा पेक्षा वेगळी नसते.

३९. म्हणजे अल्लाहचे हे फर्मान आहे की,

لَاَ مْلَئَنَّ جَهَنَّمَ مِنْکَ وَ مِمَّنْ تَبِعَکَ

مِنْهُمْ اَجمَعِيْنَ۔ (ص:٨٥)

'मी तुझ्याद्वारे (अर्थात सैतानाद्वारे) आणि जे यांच्या पैकी तुझ्या मार्गाचे अनुसरण करतील त्या सर्वांद्वारे जहन्नमला भरून टाकेत'. (सॉद-८५)

४०. काफिरांनी जेव्हा पाहीले की कुरआन हृदयांवर ताबा मिळवित जात आहेत आणि एखादे प्रमाण असे नाही जे त्याच्या विरोधात टिकू शकेल तेव्हा ते ओरड करू लागले. त्यांच्या नेत्यांनी लोकांना सांगितले की जेव्हा कुरआनाचे पठण केले जाईल तेव्हा ते ऐकूच नका उलट गोंधळ-गोंगाट माजवा यासाठी की तुम्ही त्या कुरआन पठणाचा स्वर दाबून टाकावा. परंतु ते सत्य होते म्हणून त्यास जेवढा दाबण्याचा प्रयत्न केला गेला. तेवढा अधिक तो स्वर उंचावला आणि आज समस्त विश्वात ते एवढया मोठया प्रमाणात वाचले व ऐकले जाते की त्याला दुसरे उदाहरण दिले जाऊ शकत नाही.

२७. या काफिरांना आम्ही सक्त शिक्षेची गोडी चाखवू आणि जे वाईटात वाईट काम ते करीत राहीलेत; त्यांचा मोबदला निश्चितच त्यांना देऊ.

فَلَنُذِيقَنَّ الَّذِينَ كَفَرُوا عَذَابًا شَدِيدًا
وَلَنَجْزِيَنَّهُمْ أَسْوَأَ الَّذِي كَانُوا يَعْمَلُونَ ﴿٢٧﴾

२८. हा अल्लाहच्या शत्रूंचा [४१] मोबदला आहे अर्थात जहन्नम. यातच त्यांच्या करीता सदैव कालीन घर असेल. ही शिक्षा आहे या गोष्टीची की ते आमच्या आयतींचा इन्कार करीत राहीले.

ذَٰلِكَ جَزَاءُ أَعْدَاءِ اللَّهِ النَّارُ ۖ لَهُمْ فِيهَا دَارُ الْخُلْدِ ۖ
جَزَاءً بِمَا كَانُوا بِآيَاتِنَا يَجْحَدُونَ ﴿٢٨﴾

२९. आणि काफिर म्हणतील की हे आमच्या पालन कर्त्या ! आम्हाला ते जिन्न आणि मानव दाखव, ज्यांनी आम्हाला मार्गभ्रष्ट केले होते. आम्ही त्यांना आपल्या पायाखाली तुडवू. यासाठी की त्यांनी कनिष्ठ बनून रहावे.[४२]

وَقَالَ الَّذِينَ كَفَرُوا رَبَّنَا أَرِنَا الَّذَيْنِ أَضَلَّانَا مِنَ الْجِنِّ
وَالْإِنْسِ نَجْعَلْهُمَا تَحْتَ أَقْدَامِنَا لِيَكُونَا مِنَ الْأَسْفَلِينَ ﴿٢٩﴾

३०. ज्या लोकांनी [४३] म्हटले, अल्लाह आमचा पालन कर्ता आहे, मग त्यावर दृढ राहीले,[४४] निःसंशय त्यांच्यावर फरिश्ते अवतरीत होतात की भिऊ नका व दुःख करू नका आणि आनंदीत व्हा जन्नतच्या शुभ समाचाराने ज्याबाबत तुम्हाला वचन दिले जात होते.[४५]

إِنَّ الَّذِينَ قَالُوا رَبُّنَا اللَّهُ ثُمَّ اسْتَقَامُوا تَتَنَزَّلُ عَلَيْهِمُ
الْمَلَائِكَةُ أَلَّا تَخَافُوا وَلَا تَحْزَنُوا وَأَبْشِرُوا بِالْجَنَّةِ الَّتِي كُنْتُمْ
تُوعَدُونَ ﴿٣٠﴾

३१. आम्ही ऐहिक जीवनात ही तुमचे मित्र होतो आणि मरणोत्तर जीवनात ही आहोत.[४६] यात तुमच्या मनाला जी इच्छा होईल ते तुम्हाला लाभेल आणि जे काही तुम्ही मागाल, तुम्हाला मिळेल.[४७]

نَحْنُ أَوْلِيَاؤُكُمْ فِي الْحَيَاةِ الدُّنْيَا وَفِي الْآخِرَةِ ۖ وَلَكُمْ فِيهَا
مَا تَشْتَهِي أَنْفُسُكُمْ وَلَكُمْ فِيهَا مَا تَدَّعُونَ ﴿٣١﴾

३२. हा पाहुणचार होय त्या (हस्ती) तर्फे जो क्षमाशील व दयाळू आहे.[४८]

نُزُلًا مِنْ غَفُورٍ رَحِيمٍ ﴿٣٢﴾

३३. आणि त्या माणसाहून अधिक चांगली गोष्ट कोणाची असू शकते. जो अल्लाहकडे बोलाविल, सत्कर्म करील आणि सांगेल की मी मुसलमानां पैकी आहे.[४९]

وَمَنْ أَحْسَنُ قَوْلًا مِمَّنْ دَعَا إِلَى اللَّهِ وَعَمِلَ صَالِحًا
وَقَالَ إِنَّنِي مِنَ الْمُسْلِمِينَ ﴿٣٣﴾

४१. स्पष्ट झाले की कुरआनाच्या मार्गात अडथळे आणणे जेणेकरून ते सर्वसामान्य लोकांप्रत पोहोचू नये किंवा त्यांनी यापासून लाभ घेऊ नये, हे त्याच लोकांचे काम होय जे अल्लाहाचे शत्रू असतात.

४२. काफिर (सत्याचा इन्कार व विरोध करणारे) जेव्हा जहन्नम मध्ये दाखल होतील तेव्हा त्यांना ही जाणीव होईल की मार्गभ्रष्ट जिन्नांनी, तसेच आमच्या नेते व प्रमुखांनी आम्हाला मोठे चुकीचे मार्गदर्शन केले होते. त्यांनीच पथभ्रष्ट केल्यामुळे आम्ही मार्गभ्रष्ट झालो. म्हणून ते यांच्या विरूद्ध अतिशय संताप व्यक्त करतील आणि आपल्या पालनकर्त्यास विनवणी करतील की या मार्गभ्रष्ट करणाऱ्यांना आम्हाला दाखवून दे अशासाठी की आम्ही त्यांना जहन्नम मध्ये पायदळी तुडवावे व अपमानित करून टाकावे.

जगात मात्र कफिर आपल्या मार्गभ्रष्ट नेत्या व प्रमुखां विषयी मोठी श्रद्धा व्यक्त करतात आणि डोळे मिटून त्यांच्या मार्गाचे अनुसरण करतात. परंतु जहन्नम मध्ये पोहचल्यावर ते यांचा धि:क्कार करतील व त्यांना पायदळी तुडवू इच्छितील.

४३. काफिरांची अवस्था वर निवेदिली गेली आता काही ठराविक ईमान बाळगणाऱ्यांची अवस्था निवेदिली जात आहे.

४४. अल्लाहला आपला पालन कर्ता म्हणण्याचा अर्थ या वस्तुस्थितीस मान्य करणे की अल्लाहच माझा निर्माता, परमेश्वर, स्वामी, उपास्य शासक व मार्गदर्शक आहे. जो मनुष्य सुज्ञतापूर्वक या वस्तुस्थितीस मान्य करतो तो अपरिहार्यत: आपल्या या पात्रतेसही मान्य करतो की मी त्याची निमिती, त्याचा पाल्य, त्याचा दास व गुलाम आहे माझे काम त्याची उपासना करणे, त्याच्या आदेशांचे पालन करणे व त्याच्या मार्गदर्शनाचा अवलंब करणे होय.

आणि या गोष्टीवर दृढतापूर्वक राहण्याचा अर्थ असा की मरेपर्यंत यावर कायम राहणे व आपल्या जीवन-कार्यात सदाचार अंगिकारणे,पुढील मजकुरामध्ये जन्नत ची शुभवार्ता दिली गेली आहे, ती अशाच लोकांकरीता आहे. कुरआनाने ठिकठिकाणी जन्नतची शुभवार्ता अशा लोकांना दिली आहे, ज्यांनी ईमान बाळगले व सत्कर्म केले. या आयतीत ही, 'ज्यांनी म्हटले आमचा रब्ब (पालनकर्ता) अल्लाह आहे' शी ईमान आणि, 'यावर दृढता अंगिकारली' शी सदाचारच अभिप्रेत आहे. परंतु प्रसंगानुरोधाने याच्या खास पैलूंवर जोर दिला गेला आहे. हदीस वचनातही हे जे फर्माविले गेले आहे की,

مَا مِنْ عبد قَالَ لَااِلٰهَ اِلَّااللّٰهُ ثُمَّ مَاتَ عَلٰی
ذٰلِکَ اِلَّا دَخَلَ الْجَنَّةَ۔ (مسلم کتاب الایمان)

'जो ईश-दास देखील لَآاِلٰهَ اِلَّااللّٰهُ **ला इलाह इल्लल्लाहु** म्हणतो व त्याचा मृत्यु या (म्हणण्या) वरच होतो, तर तो जन्नत मध्ये दाखल होईल.' (मुस्लिम-किताबुल ईमान) तर ते ही याच अर्थाने आहे आणि आपल्या समस्त निकडीसह आहे. परंतु जे लोक औपचारिक पारंपारीक धार्मिकतेला मानणारे असतात ते तोंडी हिशेबाला पुरेसे जाणतात आणि या गोड भ्रमात राहतात की त्यांची कर्मे कशी ही असोत, केवळ कलिमा पढल्याने त्यांना जन्नत पदरात पडेल व जहन्नम पासून ते अगदी सुरक्षित राहतील.

इमाम राजी आपल्या भाष्यात

اِنَّ الَّذِيْنَ قَالُوا رَبُّنَا اللّٰهُ

''ज्या लोकांनी म्हटले आमचा पालन कर्ता अल्लाह आहे' चे स्पष्टीकरण करतांना म्हणतात

'याशी अभिप्रेत केवळ तोंडाने उच्चार करणे नव्हे कारण मग दृढतेचा काही अर्थ राहात नाही. परंतु जेव्हा त्यांच्या या म्हणण्यानंतर त्यांच्या दृढतेचा उल्लेख केला गेला तेव्हा यावरून ही गोष्ट स्पष्ट झाली की हे कथन (म्हणजे आमचा पालनकर्ता अल्लाहच आहे हे म्हणणे) पूर्ण विश्वास व खऱ्या ईश परिचयासह अदा करण्याच्या अर्थाने आहे.' (तफसीर कबीर - खंड - २७ पृ. १२१)

इमाम राजी यांनी पुढे हे ही स्पष्ट केले की पैगंबरांच्या सहवासातील अनुयाची व त्यानंतर च्या अनुयायींच्या एक मोठया संख्येने दृढतेला सत्कर्म-सदाचार या अर्थाने घेतले आहे.

४५. जन्नतची शुभवार्ता देण्याकरीता फरिश्ते त्या ईमान बाळगणाऱ्यांवर अवतरीत होऊ शकतात ज्यांनी मरेपावेतो दृढता अंगिकारली जगात आयुष्यभर माणसाची परीक्षा होत असते आणि यात यश-अपयशाचा निष्कर्ष त्याच वेळी बाहेर येऊ लागतो जेव्हा परीक्षेची वेळ संपते. यास्तव जेव्हा सदाचारी मोमीन (ईमान बाळगणाऱ्या) लोकांचे प्राण ताब्यात घेण्याकरीता फरिश्ते प्रकट होतात तेव्हा ते जन्नतची शुभवार्ता ही ऐकवितात.

मृत्युच्या फरिश्त्यांना पाहून मनुष्य भयकंपित होत असेल परंतु सदाचारी ईमान बाळगणाऱ्यांना फरिश्ते त्याच क्षणी समाधान व दिलासा देतात की तुमच्या करीता भय बाळगण्याची एक ही वेळ नाही, कारण तुमचे भवितव्य अतिशय वैभवशाली आहे आणि हे जग सोडण्याचे दु:ख ही तुम्हाला होऊ शकत नाही कारण तुम्ही आपल्या उद्दिष्टा प्रत पोहचत आहात. आनंदित व्हा की आम्ही तुमच्या करीता जन्नतचे आनंद विभोर वातावरण आणले आहे.

या आयतीत मृत्यु समयीची जी झळक दाखविली गेली आहे, ती ईमान बाळगणायां करीता मोठी आत्मवर्धक आहे!

४६. सदाचारी ईमान बाळगणायांचे प्राण ताब्यात घेतांना फरिश्ते आपला परिचय अशा प्रकारे करवतात की आम्ही जगात ही तुमचे मित्र होतो. आता ही गोष्ट वेगळी की तुम्ही आम्हाला पाहू शकत नव्हते, आणि आखिरत मध्ये ही तुमचे मित्र आहोत. यास्तव तुम्हाला घाबरण्याचे काही एक कारण नाही. समाधान बाळगा की तुम्ही आपल्या मित्रांच्या सहवासात आहात.'

जगात ईमान बाळगणाऱ्या सदाचारी लोकांचे दोस्त फरिश्ते असतात; या उलट काफिर व दुराचारींचे दोस्त सैतान असतात फरिश्त्यांची सदाचारी ईमान-धारकांशी दोस्ती मोठी मांगल्य व समृध्दी कारक असते. ते यांच्या करीता ईश कृपेची प्रार्थना करतात. या खेरीज नाजुक व कठीण प्रसंगी, विशेषत: सत्य व असत्याच्या संघर्षाच्या वेळी जेव्हा पाय उखडण्याचे भय असते, अल्लाहच्या हुकुमाने ते यांचे साहस वाढविण्याचे काम करतात, यासाठी की त्यांनी स्थैर्यशील रहावे (पहा सूरह अन्फाल आयत क्र. १२, टीप क्र. १९) आणि हदीस वचनात उल्लेखित आहे की जो मनुष्य धर्मशास्त्रीय न्याय दानाच्या हुद्यावर त्याच्या मागणी विना नियुक्त केला जातो, तेव्हा सर्वश्रेष्ठ अल्लाह एक फरिश्ता पाठवितो जो त्याला उचित मार्ग दाखवितो. (तिर्मिजी अबवाबुल अहकाम) आणि हदीस वचनात हे ही उल्लेखित आहे की अल्लाहचे स्मरण करणाऱ्या भोवती फरिश्ते एकत्र होतात. (तिर्मिजी अबवाबुद्दअवात)

आणि आखिरत मध्ये फरिश्ते ईमान बाळगणायांचे स्वागत 'सलाम' द्वारे करतील. त्यांच्याशी हस्तांदोलन करून संभाषण करतील आणि जन्नतमध्ये त्यांची मैत्री त्यांना प्राप्त होईल.

४७. जन्नतच्या या स्पष्ट वैशिष्टयांवरून तिच्या वैभवाची कल्पना येते. हा इच्छा-मणी ज्याला लाभला त्यांच्या सर्व अपेक्षा पूर्ण झाल्या, त्याची प्रत्येक आशा सफल झाली. माणसाच्या अंगी स्वभावत: ही गोष्ट दिसून येते की जी गोष्ट तो इच्छितो ती त्याला मिळावी व त्याची अभिलाषा पूर्ण व्हावी. परंतु जगात असा एक ही मनुष्य नाही ज्याची प्रत्येक इच्छा व अभिलाषा पूर्ण झाली असावी. जर माणसाजवळ धन सम्पत्तिचा ढीग लागला असेल किंवा एखाद्या मोठया साम्राज्याचा मालक असेल तरी ही त्याला ते सर्व काही लाभत नाही जे तो इच्छितो. कधी त्याला आजारपण त्रास देते तर कधी एखाद्या प्रिय व्यक्तिचा मृत्यु आणि कधी युद्धाचे संकट, तात्पर्य हे जग कदापि ते स्थान नव्हे, जिथे माणसाची प्रत्येक इच्छा-अभिलाषा पूर्ण होऊ शकेल. असे असते तर हे विश्वच जन्नत बनले असते परंतु सर्वश्रेष्ठ अल्लाहने माणसाचा हा दावा पूर्ण करण्याची उपाय योजना आखिरत मध्ये केली आहे; अर्थात जन्नत, जिथे त्याची ही स्वाभाविक मागणी उत्कृष्टरित्या पूर्ण होईल.

माणसाची ही स्वाभाविक मागणी की त्याच्या समस्त इच्छा आकांक्षा पूर्ण व्हाव्यात, जन्नतची अभिलाषा आपल्या अंगी बाळगतो आणि हे या गोष्टीचे प्रमाण होय की कुरआन ज्या जन्नतचा वायदा ईमान बाळगणाऱ्या लोकांशी करतो, तिची इच्छा माणसाच्या स्वभावात सुप्त आहे. यास्तव इन्कार करणाऱ्यांचे जन्नत विषयी हा टोमणा मारणे की मनाला रिझवण्या करीता ही कल्पना चांगली आहे, नितांत अज्ञान होय. त्यांनी जर आपल्या स्वभावाच्या मागणीवर विचार केला असता आणि जन्नतला कुरआनाच्या दृष्टीतून पाहीले असते तर त्यांना आपल्या चुकीची जाणीव झाली असती.

स्पष्ट असावे की जन्नत मध्ये जाणारे लोक सत्शील, आणि शुद्ध विचार बाळगणारे असतील म्हणून वाईट इच्छा, अयोग्य मागणी आणि निरर्थक गोष्टींचे तिथे अस्तित्व ही नसेल. मग त्या ठिकाणी केवळ स्वादाचीच उपाय योजना नसेल, किंबहुना त्या सोबतच जी गोष्ट देखील मागितली जाईल,ती त्वरीत उपलब्ध केली जाईल. यास्तव तिथे अध्यात्मिक शिदोरीची ही पूर्ण व्यवस्था असेल.

४८. म्हणजे ईमान बाळगणायांस जन्नतच्या या देणग्या अशा मान प्रतिष्ठेसह सादर केल्या जातील की जणू ते शाही अतिथी होत ज्यांच्या आदर सत्कारा करीता जन्नतचे भोज-पत्र मांडले गेले असावे आणि ही जन्नत अल्लाहच्या क्षमा दानाची व कृपेची अभिव्यक्ति असेल.

जन्नतच्या या कल्पनेत जी अध्यात्मिक स्थिती आणि जो कैफ आहे त्याला तेच लोक जाणू शकतात ज्यांना ईमानाची गोडी माहीत आहे.

४९. हा त्याच लोकांचा गुणविशेष निवेदिला जात आहे, ज्यांनी ईमान बाळगून दृढता अंगिकारली की ते सत्य व असत्या च्या संघर्षाला घाबरत नाहीत, किंबहुना अल्लाहच्या दासांना अल्लाहकडे बोलावितात. स्वत: सत्कर्म करतात आणि स्वत: मुसलमान असल्याचे जाहीर करतात.

जगात बहुसंख्य लोक आपापल्या श्रद्धा व धर्माकडे इतरांना बोलावितात, आवाहन करतात. तसेच भौतिक वादी कल्पनाच्या नुसार चळवळ चालवतात, परंतु अल्लाह कडेच्या आवाहनाच्या तुलनेने ही सर्व आवाहने व चळवळी अवास्तव व कुचकामी होत. अल्लाहकडे आवाहन म्हणजे इस्लामकडे लोकांना बोलाविणे ती सर्वोत्कृष्ट गोष्ट होय की जिच्याहून अधिक चांगल्या गोष्टीची कल्पनाच केली जाऊ शकत नाही. यास्तव मोठे भाग्यशाली आहेत ते लोक जे अल्लाहाकडे आवाहन करण्या करीता अशा स्थितीत उठून उभे असावेत की आपल्या चारित्र्यास त्यांनी सदाचाराने सुशोभित केले असावे म्हणजे ज्यांचे काम केवळ शब्दांचे बुडबुडेसोडणे नव्हे, किंबहुना आत्मासुधारणे सह इतरांची ही सुधारणा करणे होय. याच बरोबर ते आपण मुस्लिम

असल्याचे ही जाहीर करीत असावेत.

स्पष्ट झाले की आपण मुसलमान असल्याचे लपविणे योग्य नव्हे किंबहुना ते जाहीर करीत राहीले पाहीजे यासाठी की आपल्या खऱ्याखुऱ्या योग्यतेची ही अभिव्यक्ति व्हावी आणि इतरानां ही मुसलमान बनण्यास प्रोत्साहन मिळावे. परंतु आजच्या काळात बहुसंख्य मुसलमानांची दशा अशी आहे की ते केवळ ऐहिक उद्दिष्टा खातीर किंवा आधुनिक संस्कृतिने प्रभावित होऊन आपण मुसलमान असल्याचे जाहीर करणे पसंत करीत नाही. यास्तव ना त्यांच्या नावावरून ते मुसलमान असल्याचे कळते आणि ना त्यांच्या वेशभूषेवरून आणि ना बोलण्या चालण्यावरून. जर ते खरोखर इस्लाम धर्माला सत्य जाणतात तर त्यांच्या अंगी हे नैतिक धैर्य का नाही त्यांनी मुस्लिम व मुस्लिमेतरांच्या नजरेत संशयित न बनविता वेळोवेळी मुसलमान असल्याचे जाहीर करावे.

३४. भद्र व अभद्र समान असू शकत नाही तुम्ही वाईट गोष्टीस अशा पद्धतिने दूर करा जी सर्वाधिक चांगली असावी.[५०] या स्थितीत तुम्ही पाहाल की तुमच्या व ज्या माणसाच्या दरम्यान वैर होते तो जणू गाढ मित्र बनला.[५१]

وَلَا تَسْتَوِي الْحَسَنَةُ وَلَا السَّيِّئَةُ ۚ ادْفَعْ بِالَّتِي هِيَ أَحْسَنُ فَإِذَا
الَّذِي بَيْنَكَ وَبَيْنَهُ عَدَاوَةٌ كَأَنَّهُ وَلِيٌّ حَمِيمٌ ﴿٣٤﴾

३५. परंतु याची सुबुद्धी त्याच लोकांना मिळते जे धैर्य पाळतात आणि हे (आकलन) त्याच लोकांना प्राप्त होते जे मोठे भाग्यशाली असतात.[५२]

وَمَا يُلَقَّاهَا إِلَّا الَّذِينَ صَبَرُوا وَمَا يُلَقَّاهَا إِلَّا ذُو
حَظٍّ عَظِيمٍ ﴿٣٥﴾

३६. आणि जर सैतानाद्वारे तुमच्या मनात काही चलबिचल निर्माण झाल्यास अल्लाहचे शरण मागा. तो सर्व काही ऐकणारा, जाणणारा आहे.[५३]

وَإِمَّا يَنْزَغَنَّكَ مِنَ الشَّيْطَانِ نَزْغٌ فَاسْتَعِذْ بِاللَّهِ ۖ إِنَّهُ
هُوَ السَّمِيعُ الْعَلِيمُ ﴿٣٦﴾

३७. त्याच्या निशाण्यांपैकी रात्र व दिवस आणि सूर्य व चंद्र आहेत.[५४] ना सूर्याला सजदा करा आणि ना चंद्राला, किंबहुना अल्लाहलाच सदजा करा, ज्याने या सर्व वस्तूंना निर्माण केले आहे, जर तुम्ही त्याचीच उपासना करणारे असाल.[५५]

وَمِنْ آيَاتِهِ اللَّيْلُ وَالنَّهَارُ وَالشَّمْسُ وَالْقَمَرُ ۚ لَا تَسْجُدُوا لِلشَّمْسِ
وَلَا لِلْقَمَرِ وَاسْجُدُوا لِلَّهِ الَّذِي خَلَقَهُنَّ إِنْ كُنْتُمْ
إِيَّاهُ تَعْبُدُونَ ﴿٣٧﴾

३८. परंतु जर हे घमेंड करतात तर (त्यांना हे स्पष्ट कळावे की ) जे फरिश्ते त्याच्या समोर आहेत ते रात्र दिवस त्याचे पावित्र्य जपतात आणि कधी ही थकत नाहीत.[५६]

فَإِنِ اسْتَكْبَرُوا فَالَّذِينَ عِنْدَ رَبِّكَ يُسَبِّحُونَ لَهُ بِاللَّيْلِ
وَالنَّهَارِ وَهُمْ لَا يَسْأَمُونَ ۩ ﴿٣٨﴾

३९. आणि त्याच्या निशाण्यांपैकी हे आहे की, तुम्ही पाहता जमीन कोरडी पडली आहे मग जेव्हा आम्ही तिच्यावर पाण्याचा वर्षाव करतो. तेव्हा ती हालचाल करू लागते व फुगते. नि:संशय ज्याने हिला जिवंत केले तो मृतांना ही जिवंत करणारा आहे.[५७] निश्चितच तो प्रत्येक गोष्ट करण्यास समर्थ आहे.

وَمِنْ آيَاتِهِ أَنَّكَ تَرَى الْأَرْضَ خَاشِعَةً فَإِذَا أَنْزَلْنَا عَلَيْهَا الْمَاءَ
اهْتَزَّتْ وَرَبَتْ ۚ إِنَّ الَّذِي أَحْيَاهَا لَمُحْيِي الْمَوْتَىٰ ۚ
إِنَّهُ عَلَىٰ كُلِّ شَيْءٍ قَدِيرٌ ﴿٣٩﴾

५०. म्हणजे चांगुलपणा व वाईटपणा आपल्या प्रभाव व निष्कर्षाच्या दृष्टीने समान नव्हे, आणि जो मनुष्य लोकांना अल्लाहकडे बोलविण्या करीता व त्यांच्या सुधारणे करीता उभा रहावा त्याने या गोष्टीची अधिक तमा बाळगली पाहिजे की सत्कर्म हेच दुष्कर्माला बदलविण्याचे साधन आहे. जे लोक वाईट वागणूक देतील त्यांच्याशी ही सद्व्यवहार करावा. शिव्यांचे उत्तर शिव्यांनी नव्हे तर दुवा-प्रार्थनांनी द्यावे, कारण घाणीला घाणीनेच दूर केले जाऊ शकत नाही तर स्वच्छ पाण्यानेच दूर केले जाऊ शकते.

५१. याची उत्कृष्ट उदाहरणे पैगंबरांच्या व त्यांच्या सदाचारी अनुयायीच्या चारित्र्यात आढळू शकते हजरत युसुफ यांनी कशा प्रकारे त्यांची मने जिंकली होती ज्यांनी त्यांना मोठी वाईट वागणूक दिली होती. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या आवाहना मागे त्यांचे जबरदस्त नैतिक सामर्थ्य होते. ज्याने त्या लोकांनाही त्यांचा मित्र बनविले जे त्यांचे रक्तपिपासु वैरी होते.

५२. म्हणजे वाईट गोष्टीस चांगल्या गोष्टीद्वारे दूर करण्याचे काम मोठे सहनशीलतेची परीक्षा घेणारे असते यास्तव जे लोक सयंम व धैर्याने काम करू इच्छितात त्यांना अल्लाह या कामाची सुबुद्धि प्रदान करतो आणि ज्यांना ही समज लाभते ते मोठे नशीबवान लोक असतात कारण आखिरत त्यांचे जीवन-ध्येय व अल्लाहच्या प्रसन्नतेची प्राप्ती त्यांच्या यशाची हमी असते.

५३. म्हणजे विरोधकांच्या प्रक्षोभक गोष्टींनी तुम्ही प्रभावित व्हावे यासाठी सैतान तुमच्या मनात त्रागा, चलबिचल निर्माण करू शकतो परंतु अशा प्रसंगी सावध राहीले पाहीजे आणि आपल्या मनात अशी काही भावना निर्माण होताच अल्लाहचे शरण मागितले पाहीजे. तो तुम्हाला सैतानाच्या भडकविण्यापासून व प्रत्येक प्रकारच्या त्रासा पासून सुरक्षित ठेविल तो ऐकणारा आहे म्हणून तुमची प्रार्थना ऐकले आणि तो जाणणारा आहे यास्तव त्याला हे माहीत आहे की कोणता मनुष्य असल्या उपद्रवा पासून सुरक्षित राहू इच्छितो.

या आयतीचा सर्वसामान्य पैलू हा आहे ज्याकडे हदीस वचनात लक्ष वेधले गेले आहे, तो असा की माणसाने जेव्हा स्वत:ला रागाच्या अवस्थेत पहावे तेव्हा

اَعُوْذُ بِاللّٰهِ مِنَ الشَّيْطٰنِ الرَّجِيْمِ

''मी तिरस्कृत अशा सैताना पासून अल्लाहचे शरण मागतो' असे म्हणावे.'' (बुखारी-किताबुल अदब)

५४. आता या गोष्टीकडे लक्ष वेधले जात आहे की एकेश्वरवादाच्या निशाण्या या सृष्टीत अगदी उघड स्वरूपात आहेत.दिवस आणि रात्र, सूर्य व चंद्र सर्व एकमेव ईश्वराचे अस्तित्व असण्याबद्दल आणि तो सर्वशक्तिमान व सर्वसत्ताधिकारी व सर्व विश्वांचा पालन कर्ता असण्याबद्दल पुरावा देतात. यातली कोणतीही गोष्ट अशी नाही. जी स्वत:च्या ईश्वर असण्याविषयी प्रमाणित करते.

५५. म्हणजे सजद्यास पात्र केवळ खालिक (निर्माता आहे; त्याची निर्मिती नव्हे सूर्य, चंद्र, तारे सर्व त्याच्या अधिकारातील निर्मिती होय. म्हणून यांना सजदा (प्रणिपात) करणे एक निरर्थक गोष्ट ठरेल आणि जो असे करतो तो निर्मात्या (ईश्वराच्या) हक्कात त्याच्या निर्मितीलाही सहभागी करतो अर्थात हा सर्वात मोठा अन्याय होय.

सूर्योपासक प्राचीन काळातही बहुसंख्यने राहीले आणि आजच्या काळात ही विपुलतेने आहेत. आमच्या या देशातही सूर्याची उपासना करणायांची संख्या काही कमी नाही. परंतु हे नितांत अज्ञान व स्पष्ट अशी मार्गभ्रष्टता होय.

सजदा (प्रणिपात) हे उपासनेचे उच्च स्वरूप होय म्हणून ते अल्लाह करीताच विशेषत्वाने आहे. यास्तव फर्मािवले की जर तुम्ही अल्लाहचीच उपासना करणारे असाल तर त्यालाच सदजा करा. त्याच्या खेरीज कोणी ही या गोष्टीस पात्र नाही. कारण इतर सर्वच्या सर्व निर्मिती होत मग ते सूर्य-चंद्र असोत किंवा एखादी थोर व्यक्ति. ही आयत या बाबतीत काटेकोर निर्णय देते की कोणत्याही निर्मितीला सजदा करणे हराम आहे. यास्तव धार्मिक नेते, थोर व्यक्ति आणि अवलीयांच्या कबरींना सजदा करण्या करीता कसलीही शास्त्रविहितता नाही.

राहीला आदरार्थी सजदा जो उपासना म्हणून नव्हे तर मान-सन्मान देण्याच्या इच्छेने केला जातो तर इस्लामी धर्मशास्त्र याचीही परवानगी देत नाही. जर एखाद्या थोर व्यक्तिला सजदा करणे उचित असते तर पैगंबर मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्याहून अधिक श्रेष्ठ अशी व्यक्ति कोण असू शकत होती? परंतु त्यांनी आपल्याला सजदा करण्याची मनाई केली (तिर्मिजी अबवाबुन्निकाह) यास्तव त्यांच्या सहवासातील अनुयायी ना त्यांना आदर सूचक सजदा करीत आणि ना त्यांच्या पुढे झुकत असत.

स्पष्ट असावे की हजरत आदम यांना सजदा करण्याचा जो आदेश फरिश्त्यांना व सैतानाला दिला गेला होता. त्याचे स्वरूप अगदी वेगळे होते म्हणजे उपासना म्हणून नव्हे, किंवा एखाद्या आदराने ही नव्हे की ज्यामुळे शिर्कचा मार्ग खुला व्हावा, किंबहुना हा अल्लाहचा विशेष आदेश होता ज्या मागे फार मोठा हेतु होता. (स्पष्टीकरणा साठी पहा सूरह बकरा टीप क्र. ४७)

ही आयत सजद्याची आयत होय म्हणून तिचे पठण

करतांना सजदा केला पाहीजे.

५६. म्हणजे जर हे अनेकेश्वरवादी अल्लाहच्या या आदेशाच्या विरोधात की फक्त अल्लाहलाच सजदा करा, घमेंड करीत असतील तर करू द्या, अशाने त्यांना जहन्नमचेच ठिकाण मिळेल. त्यांच्या घमेंड केल्याने अल्लाहच्या महत्तेत काही घट होणार नाही. त्याची शान तर अशी आहे की त्याच्या समोर फरिश्ते सदैव पावित्र्य वर्णन, प्रशंसा, व गुणगान करण्यात मग्न असतात, आणि हे सातत्याने करीत राहूनही त्यांना थकवा येत नाही ज्या प्रमाणे मनुष्य श्वास घेतांना थकत नाही.

५७. हा कियामतीच्या दिवशी दुसऱ्यांदा जिवंत केले जाण्याबद्दल युक्तिवाद आहे (स्पष्टीकरणा करीता पहा सूरह रूम टीप ८३)

**असस्त्य यात ना त्याच्या समोरून शिरकाव करू शकते आणि ना त्याच्या पाठीमागून हा (ग्रंथ) त्या हस्ती (अस्तित्वा) कडून अवतरीत केला गेला आहे, जी बुद्धि कौशल्य युक्त आणि गुणसम्पन्न आहे.(अल-क़ुर्आन)**

४०. जे लोक आमच्या आयतीं मध्ये वक्रता आणतात [५८] ते आमच्या पासून लपलेले नाही [५९] काय तो मनुष्य अधिक चांगला आहे जो आगीत टाकला जाईल कि तो,जो कियामतीच्या दिवशी शांतीपूर्वक स्थितीत येईल ? मनाला येईल ते करा,[६०] तुम्ही जे काही करता ते तो पाहत आहे.

اِنَّ الَّذِيْنَ يُلْحِدُوْنَ فِيْٓ اٰيٰتِنَا لَا يَخْفَوْنَ عَلَيْنَا ۭ اَفَمَنْ يُّلْقٰى
فِي النَّارِ خَيْرٌ اَمْ مَّنْ يَّاْتِيْٓ اٰمِنًا يَّوْمَ الْقِيٰمَةِ ۭ اِعْمَلُوْا مَا شِئْتُمْ ۙ اِنَّهٗ
بِمَا تَعْمَلُوْنَ بَصِيْرٌ ﴿۴۰﴾

४१. ज्या लोकांनी स्मरणीकेचा इन्कार केला, जेव्हा त्यांच्या प्रत पोहचली, ते या वस्तुस्थितीशी अनभिज्ञ आहेत की हा एक भव्य-दीव्य ग्रंथ आहे.[६१]

اِنَّ الَّذِيْنَ كَفَرُوْا بِالذِّكْرِ لَمَّا جَاۗءَهُمْ ۚ وَاِنَّهٗ لَكِتٰبٌ عَزِيْزٌ ﴿۴۱﴾

४२. असस्त्य यात ना त्याच्या समोरून शिरकाव करू शकते आणि ना त्याच्या पाठीमागून [६२] हा (ग्रंथ) त्या हस्ती (अस्तित्वा) कडून अवतरीत केला गेला आहे, जी बुद्धि कौशल्य युक्त आणि गुणसम्पन्न आहे.

لَّا يَاْتِيْهِ الْبَاطِلُ مِنْۢ بَيْنِ يَدَيْهِ وَلَا مِنْ خَلْفِهٖ ۭ تَنْزِيْلٌ مِّنْ
حَكِيْمٍ حَمِيْدٍ ﴿۴۲﴾

४३. (हे पैगंबर !) तुम्हाला त्याच गोष्टी सांगितल्या जात आहेत, ज्या तुमच्या पूर्वी होऊन गेलेल्या पैगंबरांना सांगितल्या गेल्या आहेत.[६३] नि:संशय तुमचा पालन कर्ता मोठा क्षमाशील ही आहे आणि दु:ख दायक शिक्षा देणार ही.

مَا يُقَالُ لَكَ اِلَّا مَا قَدْ قِيْلَ لِلرُّسُلِ مِنْ قَبْلِكَ ۭ اِنَّ رَبَّكَ
لَذُوْ مَغْفِرَةٍ وَّذُوْ عِقَابٍ اَلِيْمٍ ﴿۴۳﴾

४४. जर आम्ही यास परकिय भाषेचे कुरआन बनवून अवतरीत केले असते, तर हे लोक म्हणाले असते, याच्या आयती (वचने) स्पष्टत: का निवेदिली गेली नाहीत? वाणी परकिय भाषेची आणि संबोधित अरबी ![६४] सांगा, हे ईमान बाळगणाऱ्यां करीता तर मार्गदर्शन आहे आणि रोग मुक्ति आहे.[६५] आणि जे लोक ईमान बाळगत नाही त्यांच्या कानात बधिरता आहे आणि तो (कुरआन) यांच्या डोळयांकरीता पडदा आहे.[६६] जणू या लोकांना दूरच्या स्थाना पासून पुकारले जात आहे.[६७]

وَلَوْ جَعَلْنٰهُ قُرْاٰنًا اَعْجَمِيًّا لَّقَالُوْا لَوْلَا فُصِّلَتْ اٰيٰتُهٗ ۭ
ءَاَعْجَمِيٌّ وَّعَرَبِيٌّ ۭ قُلْ هُوَ لِلَّذِيْنَ اٰمَنُوْا هُدًى وَّشِفَاۗءٌ ۭ
وَالَّذِيْنَ لَا يُؤْمِنُوْنَ فِيْٓ اٰذَانِهِمْ وَقْرٌ وَّهُوَ عَلَيْهِمْ عَمًى ۭ اُولٰۗىِٕكَ
يُنَادَوْنَ مِنْ مَّكَانٍۢ بَعِيْدٍ ﴿۴۴﴾

५८. अल्लाहच्या आयतींमध्ये वक्रता आणण्याचा अर्थ असा की त्यांचा उलट सुलट अर्थ लावणे, योग्य दिशेकडून त्यांना फिरवणे, त्यांच्या आशयात संशय निर्माण करणे आणि त्यांच्यावर आक्षेप घेणे.

५९. म्हणजे त्यांच्या मनाची स्थिती अल्लाहलाच ठाऊक.

६०. ही ताकीद होय की जर उपदेशाच्या या गोष्टी समजूत घेण्याकरीता तयार नसावेत तर त्यांनी मनाला येईल, ते करावे. आपल्या विनाशाला ते स्वत:च जबाबदार राहतील.

६१. म्हणजे या ग्रंथाचा इन्कार करणायांनी यास एक सामान्य ग्रंथ समजून घेतले. आणि सन्मानपूर्ण दृष्टीने पाहीले नाही, वस्तुत: हा एखादा सामान्य ग्रंथ नाही, किंबहुना एक जबरदस्त ग्रंथ आहे जो आपल्या प्रमाण वस्तुस्थिती वर्धक निवेदन, प्रभावपूर्ण वाणी आणि तन्मयतेशी अपील करणाऱ्या गोष्टींद्वारे माणसाचा कायापलट करतो आणि काही काळानंतरच जगाने हे पाहीले की हा एवढा सामर्थ्य शाली ग्रंथ आहे की याने कित्येक जनसमूहांना आपल्या अधीन केले व कितीतरी देशांवर विजय पताका उभारली.

६२. या ग्रंथात समोरून असत्याचा प्रवेश होऊ न शकण्याचा अर्थ असा की सैतान, जिन्न, मनुष्य पैकी कोणीही यावर अधिकार बाळगत नाही की यात काही शाब्दिक फेरफार करावा. जगाच्या अंतापावेतो अक्षर न अक्षर सुरक्षित राहणारा ग्रंथ आहे. तसेच पाठीमागून यात असत्याचा प्रवेश होऊ न शकण्याचा अर्थ असा की या ग्रंथाची व्यवस्था अशा स्वरूपाची आहे की तो कोणत्याही अर्थविषयक फेरफारास कबूल करीत नाही यातल्या आयतींना (पवित्र वचनांना) त्याच्या मूळ अर्थापासून हटविण्याचा लाख प्रयत्न केला गेला तरी ते आपल्या आशय व तात्पर्यात अगदी स्पष्ट आहेत. चोर दरवाज्याने खोटया श्रद्धा व विचार सरणींना यात दाखल करण्या करीता किती ही शक्ति पणाला लावली तरी किंचितमात्र सफलता लाभणार नाही, कारण यातली प्रत्येक आयत (वचन) आपल्या आशयात अगदी स्पष्ट व अटळ आहे.

६३. म्हणजे ज्या प्रकारे पूर्वी होऊन गेलेल्या पैगंबरांना जादूगर, वेडसर वगैरे म्हटले गेले होते तद्वतच, हे पैगंबर, तुमच्या बाबत ही अशाच प्रकारच्या गोष्टी सांगितल्या जात आहेत.

६४. हे काफिरांच्या या आक्षेपास उत्तर होय की कुरआन अरबी भाषेतच का अवतरले. या ऐवजी दुसऱ्या एखाद्या भाषेत का अवतरले नाही, जेव्हा की तौरात इबरानी भाषेत अवतरला होता. याच्या उत्तरादाखल फर्माविले गेले की कुरआन जर अरबी व्यतिरिक्त दुसऱ्या भाषेत अवतरीत केले गेले असते तर याच लोकांनी आक्षेप घेतला असता की आमच्या स्वत:च्या भाषेत का अवतरीत केले गेले नाही की ज्यामुळे त्यातील वचनांचा आशय आम्हाला स्पष्टत: काळाला असता ही मोठी नवलाची गोष्ट होय की वाणी अरबी ऐवजी दुसरी वस्तुत: संबोधित जन समूहाची भाषा आरबी आहे. याचा अर्थ असा की ज्या लोकांना मानायचेच नाही तर ते प्रत्येक परिस्थितीत आक्षेप घेतात.

आयती द्वारे हा संकेत ही मिळतो की अरबी भाषा ईश संदेशाच्या अर्थ व आशयास अदा करण्याच्या दृष्टीने यथायोग्य भाषा होय. ज्यांना अरबी भाषा अवगत आहे ते हे जाणतात की ही भाषा मोठी वैशिष्टयपूर्ण आहे. उदाहरणार्थ ती एक व्यवस्थित भाषा आहे, ज्यात क्रियापद, नाम, कर्ता, कर्म इत्यादिंना विशेष साच्यात रचले जाते हिच्या व्याकरण शैलीतही मोठी नियमितता असते. यातले कित्येक शब्द आपल्या प्राथमिक व मूळ शब्दांकडे संकेत करतात ज्यावरून त्यांचा योग्य अर्थ लक्षात येण्यास मदत मिळते. ती सत्य व वास्तव गोष्टींना व चांगल्या गोष्टींना अदा करण्याची उत्कृष्ट क्षमता बाळगते आणि म्हणूनच ईश-संदेशाच्या सुक्ष्मतेस व त्याच्या अथांग आशयास निवेदिण्यास पूरेपूर समर्थ आहे. यात सर्वकष वचने सांगितली जाऊ शकतात. आणि प्रभावपूर्ण ओजस्वी वाणी सादर केली जाऊ शकते. पाठांतराच्या पैलूने ही अतिशय योग्य भाषा होय यास्तव कुरआन अवतरणासाठी एका उत्कृष्ट व योग्यतम भाषेची निवड झाली. त्याच रित्या, ज्या प्रमाणे शेवटचा पैगंबर पाठविण्या करीता मक्काच्या पवित्रतम भूमीची निवड झाली.

६५. स्पष्टीकरणा साठी पहा सूरह यूनुस टीप क्र. ८८

६६. म्हणजे जे लोक कुरआनावर ईमान बाळगण्या पासून इन्कार करतात ते कुरआनाचा उपदेश ऐकण्यास बहीरे आणि त्याच्या मार्गदर्शनास पाहण्यासाठी आंधळे बनतात. अज्ञानाच्या ज्या रोगाने ते पछाडलेले आहेत त्याकरीता कुरआन रोगमुक्तिचे दिव्य औषध आहे परंतु जेव्हा ते या पासून रोग मुक्ति प्राप्त करूच इच्छित नाही तेव्हा अज्ञान आपला प्रभाव दाखविल्याशिवाय राहणार नाही.

६७. म्हणजे त्यांची दशा अशी आहे की त्यांना कोणी दुरून हाक मारीत आहे ज्याचा स्वर त्यांना ऐकू येत नसावा. कुरआनाचा स्वर हृदयस्पर्शी स्वर आहे परंतु त्यांच्या करीता दूरचा स्वर बनला आहे.

४५. आम्ही मूसाला ग्रंथ प्रदान केला होता, तेव्हा त्यात मतभेद केला गेला. [६८] जर तुमच्या पालन कर्त्या तर्फे एक गोष्ट आधी पासून निश्चित झाली नसती, तर यांच्या दरम्यान निर्णय लावला गेला असता.[६९] आणि हे लोक त्याच्या विषयी संशय-ग्रस्त आहेत, ज्याने यांना गोंधळात टाकले आहे.[७०]

وَلَقَدْ آتَيْنَا مُوسَى الْكِتَابَ فَاخْتُلِفَ فِيهِ ۗ
وَلَوْلَا كَلِمَةٌ سَبَقَتْ مِن رَّبِّكَ لَقُضِيَ بَيْنَهُمْ ۚ وَإِنَّهُمْ
لَفِي شَكٍّ مِّنْهُ مُرِيبٍ ﴿٤٥﴾

४६. जो सत्कर्म करील तर आपल्या स्वतः साठीच करील, आणि जो दुष्कर्म करील तर त्याचा दुष्परिणाम ही त्यावरच कोसळेल.[७१] तुमचा पालन कर्ता, दासांवर अत्याचार करणारा कदापि नाही.

مَنْ عَمِلَ صَالِحًا فَلِنَفْسِهِ ۖ وَمَنْ أَسَاءَ فَعَلَيْهَا ۗ وَمَا رَبُّكَ
بِظَلَّامٍ لِّلْعَبِيدِ ﴿٤٦﴾

४७. कियामतीच्या वेळेचे ज्ञान त्याच्याच कडे परतते [७२] कोणते ही फळ आपल्या बोंडा बाहेर निघत नाही आणि ना एखादी स्त्री गर्भवती होते व प्रसवते परंतु त्याच्या ज्ञान कक्षेत असते. [७३] आणि ज्या दिवशी तो यांना पुकारेल की कोठे आहेत माझे सहभागी ? [७४] ते म्हणतील, आम्ही सांगून टाकले आहे, आमच्या पैकी कोणी ही याची साक्ष देणार नाही.[७५]

إِلَيْهِ يُرَدُّ عِلْمُ السَّاعَةِ ۚ وَمَا تَخْرُجُ مِن ثَمَرَاتٍ مِّنْ
أَكْمَامِهَا وَمَا تَحْمِلُ مِنْ أُنثَىٰ وَلَا تَضَعُ إِلَّا بِعِلْمِهِ ۚ وَيَوْمَ
يُنَادِيهِمْ أَيْنَ شُرَكَائِي قَالُوا آذَنَّاكَ مَا مِنَّا مِن شَهِيدٍ ﴿٤٧﴾

४८. यापूर्वी ते ज्यांना पुकारत राहीले ते सर्व यांच्या पासून हरवतील आणि ते जाणून घेतील की आता यांच्या करीता कोठलेही आश्रय-स्थान नाही. [७६]

وَضَلَّ عَنْهُم مَّا كَانُوا يَدْعُونَ مِن قَبْلُ ۖ وَظَنُّوا مَا لَهُم مِّن
مَّحِيصٍ ﴿٤٨﴾

४९. मनुष्य भलेपणाची दुआ (प्रार्थना) मागण्या पासून थकत नाही आणि जर त्याला एखादा त्रास वा यातना पोहचते तर निराश आणि हतोत्साह होतो.[७७]

لَّا يَسْأَمُ الْإِنسَانُ مِن دُعَاءِ الْخَيْرِ وَإِن مَّسَّهُ الشَّرُّ
فَيَئُوسٌ قَنُوطٌ ﴿٤٩﴾

६८. हजरत मूसा यांना 'तौरात' हा ग्रंथ प्रदान केला गेला होता. जो परिपूर्ण ईश-मार्गदर्शनाचा ग्रंथ होता. परंतु नंतरच्या काळात इस्राईल वंशाच्या भौतिक वादी व अहंकारी धर्म-पंडीतांनी यात वेगवेगळे मतभेद निर्माण केले. जेव्हा त्यांनी तौरातच्या वचनांचे चुकीचे स्पष्टीकरण देण्यास सुरूवात केली, तेव्हा शब्दांचा फेरफारकरण्या पर्यंत मजल गाठली मग यांनी ईश-स्मरण आणि विशेषत: आखिरतच्या शिक्षा व मोबदल्याशी संबंधित स्मरणिकेस तौरातच्या पृष्ठांवरून गायब केले आणि आपल्या तर्फे यात अनेक गोष्टीची वाढ केली. उदाहरणार्थ यात आपल्या बिदआत (नवीन प्रथा) समाविष्ट केल्या धर्मशास्त्रवेत टाकां ना यात स्थान दिले आणि आपल्या आठवणीने उलट सुलट ऐतिहासिक घटनांचा ही उल्लेख केला. येथपावेतो की वाह्यात किस्से आणि पैगंबरांच्या आदर्श चारित्र्यावर शिंतोडे उडविणाऱ्या गोष्टी देखील. यांचे हेच मतभेद होत, ज्याकडे या आयतीत संकेत दर्शविला गेला आहे.

६९. म्हणजे बनी इस्राईलचे हे कृत्य तर असे होते की याचा काटेकोर निर्णय या जगातच लावला जाऊ शकत होता, परंतु सर्वश्रेष्ठ अल्लाहने समस्त धार्मिक मतभेदांच्या अंतिम निर्णया करीता कियामतीचा दिवस निर्धारीत केला आहे. त्या दिवशी अल्लाहच्या न्यायालयात या समस्त विवादांचा निवाडा दिला जाईल.

७०. म्हणजे तौरात मध्ये ईश-ग्रंथ बाळगणाऱ्यांनी शाब्दिक व अर्थविषयक फेरफार करून जे मतभेद निर्माण केले आहेत, त्या पायी ते स्वत: आपल्या ग्रंथाबाबतच संशयग्रस्त झाले आहेत की कोण जाणे मूळबाब काय होती आणि काय निवेदिले गेले आहे. अशा कितीतरी मतभेदाच्या गोष्टी आहेत ज्या बद्दल ते विश्वासाने व भरवशाने काही ही सांगू शकत नाही आणि त्यामुळे ते अतिशय गोंधळात पडले आहेत.

७१. ही आणि या प्रकारच्या इतर अनेक आयती (वचने) आखिरतच्या शिक्षा व मोबदल्या संदर्भात हा सर्व व्यापक नियम सादर करतात की सत्कर्माचा मोबदला त्या माणसाला मिळेल ज्याने सत्कर्म केले असेल आणि दुष्कर्माची शिक्षा त्याच माणसाला भोगावी लागेल ज्याने दुष्कर्म केले असेल. असे मुळीच घडणार नाही की एखादयाचे पाप किंवा पुण्य दुसऱ्याच्या नावी लिहीले जाईल. प्रत्येक मनुष्य आपापल्या कर्माला स्वत: जबाबदार आहे आणि त्यानुसार त्याला शिक्षा किंवा मोबदला मिळेल.

आचरणाचा मोबदला या संदर्भात हा अतिशय महत्वाचा नियम होय, ज्याला कुरआनने ठिकठिकाणी स्पष्टत: निवेदिले आहे. याने इसाले सवाबच्या त्या पद्धतिचे खंडन होते जो सर्व सामान्यत:मुसलमानांमध्ये प्रचलित आहे. एक मनुष्य एखादे सत्कर्म करतो आणि त्याच्या सवाब (पुण्य) आपल्या एखाद्या प्रियस्वकिय किंवा बुजुर्गास प्रदान करतो, आणि असे गृहीत धरतो की मी अमुक एका दिवंगत इसमाला, ज्याच्याशी माझा संबंध आहे किंवा ज्या बुजुर्ग व्यक्तिची मी श्रद्धा बाळगतो, त्याला हे पुण्य पोहचवित आहे या कल्पने नुसार मेलेल्यां करीता कुरआन ख्वानी केली जाते. तिजा, चहलूम वगैरे रिवाज पार पाडले जातात, नियाज व फातेहा ख्वानी होते. ग्यारहवी शरीफचा इतमाम राखला जातो डेगा चढविल्या जातात; आणि उमदा भोजन तयार करून त्याचे पुण्य एखाद्या वली किंवा पीरला पोहचविले जाते. हे भोजन ते स्वताही घेतात व आपल्या मित्रमंडळीला ही खाऊ घालतात. मृतांतर्फे सदका (दान) व खैरात ही करतात आणि मदरसे व इस्पितळ वगैरे बनून त्यांच्या नावाने वक्फ केले जाते यासाठी की या मांगल्य-कार्यांचे पुण्य त्या मृतांना लाभत रहावे. तात्पर्य इसाले सवाबच्या कल्पनेने इस्लामी शरीअतवर वाढ करण्याचे जे काम केले आहे म्हणून यावर अंकुश ठेवणे आवश्यक आहे. आम्ही या ठिकाणी संक्षिप्तपणे काही गोष्टींना प्रस्तुत करतो-

१) इसाले सवाबाच्या समर्थनार्थ कुरआनातील कोणतीही आयत सादर केली जाऊ शकत नाही, उलट ईश-शिक्षा व मोबदल्याचा नियम सादर करणाऱ्या अनेक आयतीं द्वारे याचे खंडन होते. उदाहरणार्थ-

وَوُفِّيَتْ كُلُّ نَفْسٍ مَّا كَسَبَتْ ـ (آل عمران:٢٥)

'प्रत्येक माणसाला त्याच्या कमाईची पूरेपूर मोबदला दिला जाईल.' (आले इमरान: २५)

परंतु इसाले सवाबच्या स्थितीत एका माण्साच्या आचरंणाचे पुण्य दुसऱ्याला दिले गेले तर त्याला आपल्या कर्माचा पूरेपूर मोबदला कोठे लाभला?

لَيْسَ لِلْاِنْسَانِ اِلَّا مَا سَعٰى (النجم:٣٩)

''माणसाला तेच लाभेल, ज्याचा त्याने प्रयत्न केला असेल.'' (अननज्म: ३९)

परंतु इसाले सवाबच्या स्थितीत माणसाने जे शुभ-कार्य केले नाही त्याचे पुण्य ही त्याला प्राप्त होते.

२) सवाब (पुण्य) तर अल्लाह तर्फे दिले जाणारे बक्षीस आहे जे कियामतीच्या दिवशी सदाचाराचा मोबदला म्हणून मिळेल जेव्हा ते अल्लाहच्या नजरेत स्विकृत ठरतील. परंतु जे लोक इसाले सवाबला मान्य करणारे आहेत ते आधीच प्राप्त होणाऱ्या पुण्याला आपला हक्क ठरवून इतरांना पोहचवितात, वास्तविक आम्हाला हे मुळीच माहीत नाही की आमच्या अमुक एका आचरणा बद्दल अल्लाह तर्फे मोबदला देण्याचा निर्णय

घेतला गेला आहे आणि त्याचे पुण्य आमच्या खात्यात जमा झाले आहे तेव्हा आम्ही हे आधीच कसे ठरवू शकतो की या मोबदल्यास दुसऱ्याच्या खात्यात ट्रान्सफर केले जावे.

३) अज्र (कर्मफळ) आणि सवाब (पुण्य किंवा मांगल्यपूर्ण मोबदला) एखाद्या आचरणा पायी अल्लाह कडून मिळणारे बक्षीस होय, म्हणून ही एक अस्थानांतरणीय बाब होय. कोणी ही आपल्या सत्कर्माचे पार्सल दुसऱ्या एखादयाच्या नावावर पाठवू शकत नाही आणि ना आपल्या दुष्कर्माचे. ज्या प्रमाणे दुराचाराचे खापर दुसऱ्याच्या शिरावर फोडले जाऊ शकत नाही. त्याच प्रमाणे सत्कर्म व सदाचाराचा मोबदला दुसऱ्याला प्रदान केला जाऊ शकत नाही.

४) असे एक ही हदीस वचन नाही ज्यात इसाले सवाब करीता प्रोत्साहन दिले गेले असावे आणि ज्या कथनांना इसाले सवाबचे प्रमाण म्हणून सादर केले जाते त्यावरून इसाले सवाब सिद्ध होत नाही, किंबहुना जास्तीत जास्त जी गोष्ट सिद्ध होते ती अशी की जर एखाद्या माणसावर हज्ज फर्ज (अनिवार्य) ठरले होते आणि तो हे कर्तव्य पार पाडायचा निश्चय बाळगून होता, परंतु या आधीच त्याचा मृत्यु झाला किंवा एखादा इसम वार्धक्यामुळे हज्ज याते चे कर्तव्य पार पाडू शकत नाही आणि त्याच्या जवळच्या नातेवाईकांपैकी एखादा इसम त्याच्या तर्फे प्रतिनिधी म्हणून. हज्ज पार पाडू इच्छितो तर तो तसे करु शकतो. प्रतिनिधित्वाचा आश्य अन या अरबी अक्षरावरुन अगदी स्पष्ट आहे, जो या संदर्भात हदीस वचनात उल्लेखिला गेला आहे. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी असे फर्माविले,

حُجّی عَنْهَا۔(بخاری ابواب العمرہ)

'तुम्ही त्याच्या तर्फे हज्ज करा' (बुखारी अबवाबुल उमरह)

आणि एका दुसऱ्या हदीस वचनात उल्लेखित आहे की एका स्त्रीने निरोपाच्या हज्ज यात्रे प्रसंगी पैगंबरांना विचारले,

يا رسولَ اللهِ اِنَّ فَرِيْضَةَ اللهِ عَلىٰ عِبَادِهٖ فِى الحَجِّ اَدْرَكَتْ اَبِىْ شَيْخاً كَبِيْرًا لَا يَسْتَطِيْعُ اَنْ يَسْتَوِىَ عَلَى الرَّاحِلَةِ فَهَلْ يَقْضِى عَنْهُ اِنْ اَحُجَّ عَنْهُ؟ قَالَ نَعَمْ۔(بخاری ابواب العمرۃ)

''हे अल्लाहचे पैगंबर ! अल्लाहने आपल्या दासांवर हज्जचे धर्म-कर्तव्य लागू केले आहे ते माझ्या पित्यावर अनिवार्य झाले आहे आणि ते अगदी म्हातारे झाले आहेत. वाहनावर सरळ बसू देखील शकत नाही. तेव्हा जर मी त्यांच्या तर्फे हज्ज केले तर ते त्यांच्या तर्फे अदा होईल? पैगंबरांनी फर्माविले, होय'' (बुखारी-अबवाबुल उमरह)

उघडपणे हे प्रतिनिधित्व आहे आणि हे प्रतिनिधित्व हज्ज-कर्तव्य पार पाडण्या संदर्भात असमर्थतेच्या स्थितीत आहे. आणि ही एक सशर्त परवानगी आहे. यात इसाले सवाब करीता कसले ही प्रमाण नाही कारण हदीस वचनात असे कोठेही म्हटले गेले नाही की हज्ज करा आणि त्याचा सवाब दुसऱ्याला प्रदान करा. आणि ना एखादया प्रश्नकर्त्याने हा प्रश्न केला होता की काय मी अमुक एका इसमा करीता हज्ज करावे किंवा हज्ज करुन अमुक एका माणसाला त्याचा सवाब पोहचवावा.

प्रतिनिधी या नात्याने हज्ज करण्या संदर्भात इमाम मालीक यांचे मत असे की हे अशा स्थितीत केले जावे, जेव्हा मेलेल्या व्यक्तिने तसे मृत्युपत्र केले असेल. जर त्याने मृत्युपत्र केले नव्हते तर त्याच्या तर्फे हज्ज केले जाऊ नये (फिकहुस्सुन्नह खंड - १ पृष्ठ ६३७) आणि हेच मत अधिक योग्य वाटते. कारण मृत्युपत्राच्या स्थितीत मरणाऱ्यांचा संकल्प ही जाहीर होतो आणि त्याच्या धन सम्पत्ति द्वारे हज्ज यात्रावर खर्च करण्याची ही उपाय योजना होतो.

इतर कथने जी इसाले सवाबच्या समर्थनार्थ प्रस्तुत केली जातात यांच्यापैकी काही या अर्थाने आहेत की जर एखाद्या माणसाने एखाद्या चांगल्या कार्यासंबंधी मृत्युपत्रात लिहीले होते तर त्याच्या वारसदारांनी ते पूर्ण करावे, कारण मरण पावणाऱ्याला आपल्या धन सम्पत्तितून १/३ पावेतो मृत्युपत्र करण्याचा हक्क आहे आणि काही कथने प्रमाण दृष्टया उचित नव्हेत आणि जे कथन कुरआनाने निवेदिलेल्या व्यापक नियमा विरूद्ध असेल तर ते कदापि प्रमाण ठरू शकत नाही.

५) इसाले सवाबला पद्धत पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या सहवासातील अनुयायी मध्ये प्रचलीत नव्हती, यास्तव उहद युद्धात शहीद झालेल्या करीता ना कुरआन ख्वानी केली गेली आणि ना नियाज व फातेहा.

६) इसाले सवाबचा प्रार्थना (दुआ) वरून कयास करणे ही योग्य नव्हे, यासाठी की प्रार्थना तर सर्वश्रेष्ठ अल्लाहशी एखादया दासा करीता क्षमा याचनेची विनवणी होय. एखाद्याच्या सत्कर्माचे पुण्य दुसऱ्याच्या नावी करणे नव्हे. जर दुआ (प्रार्थने) ला इसाले सवाब ठरवले गेले तर बददुआ (शाप) ला इसाले अजाब मानावे लागेल अर्थात असे मानणारा कोणी ही नाही. काफिरांकरीता ईश-मार्गदर्शन लाभो अशी प्रार्थना केली जाते तर काय हा इसाले सवाब होय? आणि दुआ तर जिवंत लोकांसाठी ही केली जाते तर काय इसाले सवाब जिवंत लोकांसाठी ही केला जाईल?

७) हदीस वचनात उल्लेखित आहे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी फर्मावि‍ले.

اِذَامَاتَ الْاِنْسَانُ اِنْقَطَعَ عَنْهُ عَمَلُهُ اِلَّا مِنْ ثَلَاثَةٍ
مِنْ صَدَقَةٍ جَارِيَةٍ اَوْ عِلْمٍ يُنْتَفَعُ بِهٖ وَ وَلَدٍ صَالِحٍ
يَدْعُوْلَهُ ـ (مسلم كتاب الوصية)

''जेव्हा मनुष्य मरण पावतो तेव्हा त्याचे आचरण संपते, तीन गोष्टी खेरीज एक सदका जारीया (निरंतरदान) दुसरी ज्ञान, ज्या पासून लोक फायदा घेतील आणि तिसरी सदाचारी संतति जी त्याच्या करीता प्रार्थना करील.'' (मुस्लिम किताबुल वसीयत)

या तीन गोष्टी त्या होत ज्यात माणसाचे स्वत: चे आचरण कारणीभूत असते. सदका जारीया (निरंतर-दान) तर वक्फच्या अवस्थेत त्याचे धन होय. उपयुक्त पुस्तकांचे लेखन आणि या प्रकारच्या इतर ज्ञान विषयक सेवा देखील त्याचेच आचरण होय. ज्यामुळे लोक त्याच्या मृत्युनंतर ही लाभान्वित होतात. आणि सदाचारी संततीचे प्रार्थना करणे त्याच्या करीता अशासाठी मोबदला दायक आहे की त्याने त्यांना धर्म शिकविला होता व त्यांचे योग्य संगोपन केले होते. या हदीस वचनात इसाले सवाबचा काही ही उल्लेख नाही. जर याची काही वास्तविकता असती तर याचाही त्यात उल्लेख आला असता.

८) ज्या गोष्टी खुलासा स्वरूपाच्या आहेत त्यात कयास आणि आपल्या बुद्धिने निर्णय घेण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही आणि सवाब (पुण्य)चा संबंध ज्याअर्थी स्पष्टीकरणात्मक गोष्टींशी आहे म्हणून सवाब पोहचविण्याची समस्या, आपल्या बुद्धिने निर्णय घेण्याचे स्थान नव्हे.

या कारणास्तव आम्ही से समजतो की ज्या आचरणात माणसाचा स्वत:चा इरादा व प्रयत्न वगैरे कसलाही अंतर्भाव नसेल, किंबहुना ते दुसऱ्या एखाद्याचे आचरण असेल तर त्याचा सवाब त्याला प्रदान केला जाऊ शकत नाही. पवित्र कुरआन व पैगंबरीय आचरणात एखाद्याचे कर्म फळ अन्य एखाद्यास प्रदान करण्या करीता कसलेही प्रमाण नाही, परंतु आजच्या काळात इसाले सवाबाच्या कल्पनेने किती तरी नवनवीन गोष्टी (ज्या मुळातच धर्मात नाही) प्रचलित केले आहे या लोकांजवळ सवाबाचा एवढा मोठा संग्रह कोठून आला हे काय कळत नाही, जो त्यांनी इतरांना वाटायला सुरवात केली आणि विशेषत: त्या बुजुर्ग व अवलीयांना ज्यांच्याबद्दल ते आधी पासूनच या गोष्टीचा दावा करीत होते की ते जन्नती आहेत. जर या लोकांमध्ये आपल्या जबाबदारीची जाणीव असती तर त्यांनी आपल्या स्वत:च्या मुक्तिची काळजी घेतली असती आणि आपल्या सदाचारा बाबत कधीही असे समजले नसते की ते अधिक जास्त (Surplus) झाले आहेत म्हणून आपल्या काही सत्कर्मांचे पुण्य त्यांनी इतरांना वाटून द्यावे.

इसाले सवाब वरील अधिक चर्चे साठी पहा सूरह नजम टीप क्र. ४८

७२. म्हणजे कियामत केव्हा येईल याचे ज्ञान फक्त अल्लाहला आहे. त्याच्या खेरीज कोणी नाही, जो हे जाणत असावा. यास्तव स्वत: अल्लाहचे पैगंबर देखील कियामतीची वेळ सांगू शकत नाहीत.

७३. म्हणजे ज्या प्रमाणे फळ बोंडाचे आवरण तोंडून बाहेर येते व ज्या प्रमाणे एक गर्भवती स्त्री मूल प्रसवते, त्याच प्रमाणे कियामत देखील जगाचे आवरण फाडून प्रकट होईल आणि या सृष्टीच्या उदरातून बाहेर पडेल आणि ज्या प्रकारे ही गोष्ट अल्लाहलाच माहीत असते की फळ केव्हा अस्तित्वात येईल आणि कोणती स्त्री गर्भवती होईल व मूल प्रसवेल. तद्‌वतच कियामत केव्हा घडून येईल याचे ज्ञान ही अल्लाहलाच आहे. ती ठीक आपल्या वेळेवर प्रकट होईल.

७४. म्हणजे ईशत्वात माझे जे सहभागी तुम्ही ठरवून घेतले आहेत ते कोठे आहेत.

७५. म्हणजे आज आमच्या पैकी कोणीही या गोष्टीचा दावेदार नाही की अल्लाहचा त्याच्या ईशत्वात एखादा सहभागी आहे.

७६. म्हणजे ज्यांना त्यांनी ईश्वर समजून घेतले होते आणि ज्यांची पूजा ते करीत होते त्यांच्यापैकी कोणीही त्याच्या मदतीला धावून येणार नाही. सर्व हवेत विरतील!

७७. म्हणजे सर्व साधारणत: माणसाची दशा आहे की तो आपल्या पालन कर्त्या जवळ ऐहिक देणग्या मागतच राहतो आणि स्वत:साठी सुख समृध्दीची जास्तीत जास्त अभिलाषा बाळगतो. धन-सम्पत्ति आणि सुखोपभोगाच्या सामुग्रीच्या वृद्धि करीता प्रार्थना करतांना तो कधीच थकत नाही. परंतु जेव्हा एखादा त्रास किंवा यातना पोहचते अथवा संकटात सापडतो. तेव्हा अल्लाह समोर रूदन पूर्वक दुआ करण्या ऐवजी व दुआ कबूल होण्यात विलंब झाल्या मुळे थकून हार न खाण्या ऐवजी, लवकर निराश होतो आणि दु:खी होण्याची लक्षणे त्यावर दिसू लागतात.

५०. आणि जर त्रास-यातने नंतर, जी त्याला पोहचली आहे आम्ही त्याला आपल्या कृपेची गोडी चाखवितो, तेव्हा म्हणतो, मी तर याला पात्र आहे आणि मला नाही वाटत की कियामत प्रस्थापित होईल आणि जर मला आपल्या पालन कर्त्या कडे परतविले गेलेच तर माझ्या साठी त्याच्या जवळ ही सुस्थितीच आहे.[७८] तेव्हा आम्ही या काफिरांना निश्चितच हे दाखवू की त्यांनी कोणते आचरण केले आहे आणि आम्ही त्यांना अपरिहार्यतः भयंकर शिक्षेची गोडी चाखवू.

وَلَئِنْ أَذَقْنَاهُ رَحْمَةً مِّنَّا مِنْ بَعْدِ ضَرَّاءَ مَسَّتْهُ لَيَقُولَنَّ
هٰذَا لِيْ وَمَا أَظُنُّ السَّاعَةَ قَائِمَةً ۙ وَّلَئِنْ رُّجِعْتُ إِلٰى
رَبِّيْ إِنَّ لِيْ عِنْدَهٗ لَلْحُسْنٰى ۚ فَلَنُنَبِّئَنَّ الَّذِيْنَ كَفَرُوْا بِمَا
عَمِلُوْا ۡ وَلَنُذِيْقَنَّهُمْ مِّنْ عَذَابٍ غَلِيْظٍ ﴿٥٠﴾

५१. माणसाला जेव्हा आम्ही देणगी द्वारे उपकृत करतो, तेव्हा तो तोंड फिरवतो आणि अंग काढून घेतो आणि जेव्हा त्रास पोहचतो तेव्हा लांब-रूंद प्रार्थना करू लागतो.[७९]

وَإِذَا أَنْعَمْنَا عَلَى الْإِنْسَانِ أَعْرَضَ وَنَا بِجَانِبِهٖ ۚ وَإِذَا مَسَّهُ
الشَّرُّ فَذُوْ دُعَاءٍ عَرِيْضٍ ﴿٥١﴾

५२. सांगा, तुम्ही हा विचार ही केला की जर हे अल्लाह तर्फे घडले आणि तुम्ही त्याचा इन्कार केला तर त्या माणसाहून अधिक मार्गभ्रष्ट असा कोण असेल जो विरोध करण्यात दूर पावेतो निघून गेला असावा.[८०]

قُلْ أَرَءَيْتُمْ إِنْ كَانَ مِنْ عِنْدِ اللّٰهِ ثُمَّ كَفَرْتُمْ بِهٖ مَنْ
أَضَلُّ مِمَّنْ هُوَ فِيْ شِقَاقٍ ۢ بَعِيْدٍ ﴿٥٢﴾

५३. लवकरच आम्ही त्यांना आपल्या निशाण्या क्षितिजांमध्ये ही दाखवू आणि त्यांच्या स्वतः मध्ये ही, येथपावेतो की त्यांना या गोष्टीचा उलगडा होईल की हे सत्य आहे.[८१] काय ही गोष्ट पुरेशी नव्हे की तुमचा पालन कर्ता सर्वसाक्षी आहे.

سَنُرِيْهِمْ اٰيٰتِنَا فِي الْاٰفَاقِ وَفِيْٓ أَنْفُسِهِمْ حَتّٰى يَتَبَيَّنَ لَهُمْ
أَنَّهُ الْحَقُّ ۭ أَوَلَمْ يَكْفِ بِرَبِّكَ أَنَّهٗ عَلٰى كُلِّ شَيْءٍ شَهِيْدٌ ﴿٥٣﴾

५४. ऐका ! हे लोक आपल्या पालन कर्त्या समोर हजर केल्या जाण्याबद्दल संशय ग्रस्त आहेत. ऐकून घ्या. त्याने समस्त गोष्टींना घेरा केलेला आहे. [८२]

أَلَآ إِنَّهُمْ فِيْ مِرْيَةٍ مِّنْ لِّقَاءِ رَبِّهِمْ ۭ أَلَآ إِنَّهٗ بِكُلِّ
شَيْءٍ مُّحِيْطٌ ﴿٥٤﴾

७८. म्हणजे माणसाची ही दशा ही मोठी विचित्र आहे की जेव्हा सर्वश्रेष्ठ अल्लाह त्याचा त्रास वा यातना दूर करून आराम व सुख शांती प्रदान करतो तेव्हा तो यास अल्लाहचा अनुग्रह किंवा उपकार समजत नाही आणि ना याला कसोटीची सामुग्री समजतो, किंबहुना त्याला आपल्या स्वत:च्या पात्रतेची घमेंड असते आणि असे समजतो की मी यथा योग्य रित्या या गोष्टीस पात्र आहे. कियामतीच्या विषयी तो असे समजतो की प्रथम तर ती घडून येणार नाही आणि घडून आलीच तर माझ्या पालन कर्त्या जवळ ही मला देणग्याच लाभतील. अर्थात हे की असे किती तरी लोक या गोड भ्रमात राहतात की जेव्हा जगात धन सम्पत्ति व ऐहिक साधनांची विपुलता यांना प्राप्त झालेली आहे तेव्हा कियामत प्रस्थापित झाल्यावर ही यांना ही समुध्दी लाभेलच. ज्या प्रमाणे ते या जगात सुख समृध्दीत लोळत राहीले तसे आखिरत मध्ये ही राहतील. परंतु कियामतीच्या एका झटक्या सरशी त्यांचा हा गोड भ्रम चकनाचूर होऊन जाईल.

७९. म्हणजे किती कृतघ्न आहे माणूस की जेव्हा सर्वश्रेष्ठ अल्लाह याच्यावर आपला अनुग्रह करतो तेव्हा तो आपल्या पालन कर्त्या कडे लक्ष देत नाही, किंबहुना आचरण दृष्टया याच्याशी आपला संबंध तोडतो परंतु संकट ओढवताच अल्लाहचे स्मरण निश्चित होते. आणि लांबलचक दुआ (प्रार्थना) करू लागतो.

स्पष्ट असावे की या आयती मध्ये माणसाचे विविध आचरण सादर केले गेले आहे. आपल्या पालन कर्त्याशी संबंधित एकाचा काही एक संबंध असतो तर एखाद्याचा दुसराच काही, तर एखाद्याचा याहून ही अगदी भिन्न.

८०. म्हणजे कुरआनाच्या विरोधात एवढया दूरवर निघून जाऊ नका की शक्य असतांना ही त्यावर विचार चिंतन करण्यास तयार न व्हावे कारण हा जर अल्लाहचा ग्रंथ असेल तर त्याचा इन्कार आम्हाला किती महागात पडेल. आम्ही अल्लाह समोर त्याच्या ग्रंथास रद्द करण्याचे कोणते शास्त्र-संमत कारण मांडू शकू. आणि मग या नकाराची आम्हाला केवढी भयंकर शिक्षा भोगावी लागेल. यास्तव बुद्धिमत्तेची निकड हीच की गंभीरपणे या गोष्टीवर विचार केला जावा की खरोखर हा अल्लाहचा ग्रंथ आहे किंवा नाही.

८१. हे फार मोठे भाकित आहे जे कुरआनाने केले आहे की याच्या सत्यतेच्या निशाण्या जगाच्या क्षितिजांवर ही जाहीर होतील. आणि माणसांच्या स्वत: मध्ये ही. आणि ही वस्तुस्थिती आहे की थोडया कालावधी नंतर कुरआनाचा इन्कार करणाऱ्यांनी हे पाहीले की कुरआनने पैगंबर व त्यावर ईमान बाळगणाऱ्यांच्या हक्कात अल्लाहच्या मदततीविषयी जे भाकित केले होते ते पूर्ण झाले. इस्लामला वर्चस्व आणि सत्ताधिकार प्राप्त झाला. कुरआनाच्या उज्वल प्रकाशात वाटचाल करणाऱ्यांचे स्वच्छ शुद्ध जीवन पाहून लोक हा विचार करण्यास प्रवृत्त झाले की ही ना काव्यात्मक रचना आहे आणि ना वेडसर पणाच्या गोष्टी आणि ना जादू-टोणा. जन समूहच्या जन समूह इस्लाम धर्माचा अंगिकार करीत गेले आणि जे कट्टर काफिर (इन्कार करणारे) होते, त्याची परिणती या जगातच मोठी वाईट झाली. परंतु आयतीचा अर्थ एवढया पुरताच मर्यादित नाही. याच्या सत्यतेची चिन्ह कियामती पर्यंत जाहीर होत राहतील.

भूतकाळात कुरआनाच्या कितीतरी गोष्टीं लोकांना मोठया विचित्र वाटत होत्या; परंतु आजच्या काळात माणसाने अशा आश्चर्य जनक गोष्टींचा शोध लावला आहे की कुरआनाची कोणतीही गोष्ट विचित्र किंवा नवलाची राहीली नाही.

कुरआनने म्हटले होते, कियामतीच्या दिवशी माणसाची कर्मे तोलली जातील. बाह्यत: ही गोष्ट विचित्र वाटत होती परंतु आजच्या काळात माणसाने उष्णता मापक व भूकंप मापक यंत्रांचा शोध लावून ही गोष्ट सिद्ध केली आहे की माणसाच्या अवस्थेचे ही मोज-माप केले जाऊ शकते. कुरआनने म्हटले होते की जगातल्या प्रत्येक माणसाच्या आचरणाचे रेकॉर्ड तयार केले जात आहे ज्यात कोणतीही गोष्ट , मग ती अति सूक्ष्म असो किंवा फार मोठी, नमूद झाल्याखेरीज राहात नाही. या गोष्टीस ही खरे समजणे तत्कालीन लोकां करीता कठीण होते परंतु मायक्रोफिल्म (Micro-Film) च्या शोधाने हा प्रश्न सोडवला. कुरआनने फर्माविले होते की माणसाचे हात-पाय, आणि त्याची त्वचा कियामतीच्या दिवशी बोलू लागेल आणि त्याच्या कर्माची साक्ष देईल. ही गोष्ट देखील लोकांच्या दृष्टीने नवलाईची होती. परंतु बोलपट आणि विडीओ कॅसेटच्या शोधाने हे दर्शविले की या गोष्टी अगदी शक्य आहेत.

कुरआनने फर्माविले होते की चंद्र, सूर्य, तारे ही दैवते नाहीत, किंबहुना अल्लाहनेच निर्माण केलेले आहेत. ज्यांना एका विशिष्टय कामासाठी लावले गेले आहे. भूत काळातील भ्रम पूजा करणारे लोक ही वास्तविकता मान्य करण्यास तयार झाले नाहीत, परंतु विज्ञानाच्या संशोधनाने या सर्व गोष्टींची हकीगत जाहीर केली. अता माणसाला हे ज्ञान झाले आहे की सूर्यात कोणती मूलतत्वे आढळून येतात. येथपावेतो की माणसाने त्याचे तापमान ही माहीत करून घेतले आहे आणि हे ही की त्याची उष्णता कोणत्या प्रकारे जमीनी पर्यंत पोहचते. ग्रह-तारे कोणत्या वस्तूंपासून निर्माण झाले आहेत आणि ते प्रकाश का देतात याचा ही शोध लावून माणसाने आपल्या ज्ञानात फार मोठी भर घातली आहे. आणि चंद्रावर पोहचून माणसाने त्याचे आपल्या डोळयांनी अवलोकन केले की हा दगड माती चाच बनला आहे, येथपावेतो की तेथली माती आपल्या सोबत

पृथ्वीवर आणली जेणेकरून इतरांनी ही ती पहावी काय या क्षितीजांवर प्रकट होणाऱ्या अल्लाहच्या निशाण्या नव्हेत? आणि काय अशा गोष्टींनी अनेकश्वरवादी श्रद्धेचे खंडन होत नाही? आणि एकमेव ईश्वराचे परिपूर्ण सामर्थ्य व तो संपूर्ण सृष्टीचा सर्व सत्ताधिकारी असल्याचा पुरावा मिळत नाही?

अशा प्रकारे माणसां मध्ये ही त्या निशाण्या जाहीर झाल्या आहेत ज्या एकेश्वरवाद व मरणा नंतरच्या दुसऱ्या जीवनास प्रमाणित करतात. जीवशस्त्र (Biology)आणि गर्भशास्त्रा (Embroyology)ने माणसाच्या निमिर्ती विषयी ते रहस्पोदघाटन केले आहे की भयंकर आश्चर्य वाटते. उदाहरणार्थ पुरूषाच्या वीर्यात शुक्रजन्तु (Spermotozoa)चे अस्तित्व आणि स्त्रीच्या उत्पत्ति तत्वा (रज) चे अंडकोषा (Orum)च्या स्वरूपात असणे आणि दोघांच्या मिलनाने गर्भ निर्मितीचा आरंभ होणे मग या शुक्रजन्तु व रजोगोलात, ज्यांना सूक्ष्मदर्शक यंत्राद्वारेच पाहीले जाऊ शकते अनुवांशिक गुणधर्मा hereditary peculiarities (Chromosomes) चे अस्तित्व असणे एका निर्मात्याच्या निर्मिती-सामर्थ्याचा केवढा जबरदस्त पुरावा आहे. त्याच्या सामर्थ्याच्या व ईशत्वाच्या या चत्मकृतिंना पाहता दुसऱ्या जीवनाचा विश्वास निर्माण होतो ज्याची वार्ता कुरआन देत आहे.

अशा प्रकारे कुरआनाने निवेदिलेली प्रत्येक गोष्ट ज्ञानाच्या कसोटीवर खरी ठरत आहे आणि त्याची सत्यता अधिक जास्त उज्वल होत चालली आहे. कुरआनाची काही भाकिते अशी ही आहेत जी आपला अर्थ विशद करण्या करीता वेळेची प्रतिक्षा करीत आहेत. उदाहरणार्थ याजूज माजूज चे आक्रमण (सूरह अंबिया आयत क्रमांक ९६) आणि ''दाब्बतुल अर्द'' (ज़मीनीतून एका विचित्र जनावरा) चे बाहेर पडणे जो माणसाशी बोलेल (सूरह नमल आयत ८२) इत्यादि या निशाण्यांना कियामतीच्या अगदी जवळच्या काळात जन्मास येणारे मानव वंशच पाहू शकतील.

८२. या समस्त निशाण्या सांगितल्यावर ही ज्यांचा वर उल्लेख केला गेला आहे, आज देखील बहुतेक लोकांची ही दशा आहे की ते आपल्या स्वामी व पालन कर्त्या ( अल्लाह) समोर हजर होण्या संबंधी संशयात पडले आहेत ते असे समजतात की या जगात मनमानी करण्या करीता त्यांना अगदी मोकळे सोडले गेले आहे. यद्यपि ती हस्ती जिने यांना निर्माण केले आहे ती सर्वव्यापी आहे अर्थात अल्लाहच्या ज्ञान व नियंत्रणा बाहेर कोणतीही गोष्ट वा वस्तु नाही म्हणून त्याच्या दासांची त्याच्या समोर पेशी (हजेरी) अगदी अपरिहर्य आहे, ते कोणत्याही प्रकारे आपला बचाव करू शकत नाही.

# ४२. सूरह अश्शूरा

**नावः** आयत क्र.३८ मध्ये 'शूरा' (आपसातील सल्लामसलत) ला ईमान बाळगणाऱ्यांची रीत दर्शविले गेले आहे. या अनुरोधाने या सूरहचे नाव 'अश्शूरा' असे आहे.

**अवतरण काळः** मक्की आहे. आणि मजकूरांवरून असे दिसून येते की ही सूरह (अध्याय) सूरह हा मीम अस्सजदा नंतर अवतरली असावी. अर्थात मक्काच्या मध्य युगात.

**मध्यवर्ति कल्पनाः** ईश्वर व धर्म संदर्भात सत्य काय आहे हे जाणून घेण्याचे साधन 'वही' (ईश-संदेश) आहे. हा धर्म, ज्याला अल्लाहचे पैगंबर कुरआनाच्या माध्यमान्वये प्रस्तुत करीत आहेत, अल्लाहने निर्धारीत केलेला धर्म होय, ज्या विषयीचा संदेश त्याने आपल्या पैगंबरावर अवतरीत केला आहे.

**आयत रचनाः** आयत क्र. १ ते १२ प्रास्ताविक स्वरूपाच्या आयती होत, ज्यात संक्षिप्तपणे त्या गोष्टी सादर केल्या गेल्या आहेत, ज्यांच्या द्वारे ईश-संदेशाचा तपशीलवार मजकूर समजण्यास मदत मिळते.

आयत क्र. १३ ते २० मध्ये हे स्पष्ट केले गेले आहे की हाच तो धर्म होय, ज्या संबंधीचा ईश-संदेश पैगंबरांकडे अवतरीत केला गेला होता. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना हे मार्गदर्शन की तुम्ही या (धर्मा) वर अटळ रहा आणि लोकांना याचे आवाहन करा. जे लोक या संदर्भात विवादात पडले आहेत त्यांच्या जवळ सत्याचे कोणतेही प्रमाण नाही.

आयत क्र. २१ ते ३५ मध्ये आपल्या तर्फे धर्म स्थापित करणाऱ्यांवर व त्याचे अनुसरण करणाऱ्यांवर सक्त तंबी केली गेली आहे. आणि त्या लोकांना खुशखबर ऐकविली गेली आहे जे अल्लाहच्या धर्मावर ईमान बाळगून सत्कर्म करीत राहीले. तसेच इन्कार करणाऱ्यांच्या काही शंकाचे निरसन ही केले गेले आहे.

आयत क्र. ३६ ते ४३ मध्ये या धर्मास कबूल करणाऱ्यांचे ते गुणविशेष सांगितले गेले आहेत, जे किंकर्तव्यमूढते ज्या या अवस्थेतून त्यांना सुखरूप पणे पार पाडू शकते. आणि जे यशाची हमी म्हणून आहेत.

आयत क्र. ४४ ते ५० मध्ये विरोधकांना त्यांच्या मार्गभ्रष्टते बद्दल सावध करीत आपल्या पालन कर्त्याच्या बोलाविण्यावर 'मी हजर आहे' असे म्हणण्याचे आवाहन केले गेले आहे.

आयत क्र.५१ ते ५३ सूरहच्या समारोपाच्या आयती होत, ज्यात या मजकूराचे अधिक स्पष्टीकरण आहे ज्याने सूरहचा आरंभ झाला होता अल्लाहचा संदेश.

# ४२. सूरतुश्शूरा

سُورَةُ الشُّورَىٰ

(आयती-५३)

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بِسْمِ اللَّهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيمِ

१. हा. मीम.

حٰمٓ ﴿١﴾

२. अैन. सीन. काफ. [1]

عٓسٓقٓ ﴿٢﴾

३. अशा प्रकारे वर्चस्वशाली व बुद्धिकौशल्य बाळगणारा अल्लाह तुमच्या कडे वह्य करतो (संदेश पाठवितो ) आणि तुमच्या पूर्वी जे (पैगंबर) होऊन गेले, त्यांच्याकडे देखील वहय करीत राहीला.[2]

كَذٰلِكَ يُوحِيٓ إِلَيْكَ وَإِلَى الَّذِينَ مِن قَبْلِكَ
اللَّهُ الْعَزِيزُ الْحَكِيمُ ﴿٣﴾

४. जे काही आकाशांमध्ये आहे आणि जे काही जमीनीत आहे सर्व त्याचेच होय. तो अतिशय उच्चतम आणि महान आहे.[3]

لَهُۥ مَا فِي السَّمٰوٰتِ وَمَا فِي الْأَرْضِ وَهُوَ الْعَلِيُّ الْعَظِيمُ ﴿٤﴾

५. समीप आहे की आकाश आपल्या वरून विदीर्ण व्हावे. [4] फरीशते आपल्या पालन कर्त्याचे प्रशंसे सह गुणगान करतात. आणि जमीनीवरील लोकांकरीता क्षमेची प्रार्थना करीत राहतात.[5] ऐका ! अल्लाहच माफ करणारा, दया करणारा आहे.[6]

تَكَادُ السَّمٰوٰتُ يَتَفَطَّرْنَ مِن فَوْقِهِنَّ وَالْمَلٰٓئِكَةُ يُسَبِّحُونَ بِحَمْدِ
رَبِّهِمْ وَيَسْتَغْفِرُونَ لِمَن فِي الْأَرْضِ أَلَآ إِنَّ اللَّهَ هُوَ الْغَفُورُ
الرَّحِيمُ ﴿٥﴾

६. ज्या लोकांनी त्याच्या ऐवजी इतर कार्य साधक बनवून ठेवले आहेत.[7] अल्लाह त्यांच्यावर नजर ठेवून आहे [8]आणि तुम्हाला त्यांच्याकरीता जबाबदार ठरविले गेले नाही.[9]

وَالَّذِينَ اتَّخَذُوا مِن دُونِهِۦٓ أَوْلِيَآءَ اللَّهُ حَفِيظٌ عَلَيْهِمْ وَمَآ أَنتَ
عَلَيْهِم بِوَكِيلٍ ﴿٦﴾

१. ही वेगवेगळी अक्षरे आहेत, ज्यांच्या द्वारे संभाषणाला सुरवात करण्याचा लाभ असा की यांचे पठण माणसाला सचेत करते आणि तो मूळ संभाषणाकडे लक्ष देतो. (अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह बकरा टीप क्र. १)

या सूरहमध्ये 'हा मीम' या अक्षरांचा संकेत अल्लाह बुद्धिकौशल्य बाळगणारा आहे या त्याच्या गुणविशेषाकडे आहे, ज्याचा उल्लेख आयत क्र. ३ मध्ये आणि ५१ मध्ये केला गेला आहे. त्याच प्रमाणे 'ऐन' या अक्षराचा संकेत अल्लाहच्या वर्चस्वशाली, उच्चतम, आणि ज्ञानी इत्यादि गुणविशेषांकडे आहे, ज्यांचा उल्लेख क्रमवार आयत क्र. ३, ४, आणि ५ मध्ये केला गेला आहे. 'सीन' या अक्षराचा संकेत अल्लाहच्या 'सर्व काही ऐकणारा' या गुणविशेषाकडे आहे, ज्याचा उल्लेख आयत क्र.११ मध्ये केला गेला आहे आणि 'काफ' या अक्षराचा संकेत अल्लाहच्या सामर्थ्यशाली व शक्तिशाली या गुणविशेषांकडे आहे, ज्यांचा उल्लेख आयत क्र. ९ आणि १९ मध्ये केला गेला आहे.

२. 'वही' संदेश पोहचविण्याचे ते विशेष माध्यम होय जे सर्वश्रेष्ठ अल्लाह आपल्या पैगंबरांकरीता अंगिकारतो. सर्व सामान्य मनुष्य या माध्यमाची अनुभूति घेऊ शकत नाही आणि म्हणूनच जे सत्य-प्रिय नसतात त्यांना या गोष्टीचे मोठे नवल वाटते आणि ते याचा इन्कार करू लागतात. कुरआनचे ईश-संदेश असण्या बाबतही आश्चर्य व्यक्त केले जात होते, यास्तव ही एक वस्तुस्थिती असण्याविषयी विश्वास देताना फर्माविले की संदेश-पोहचविण्याची हीच पद्धत आम्ही या पैगंबराबाबत ही अंगिकारली आहे आणि याच पद्धतीचा या पूर्वीच्या समस्त पैगंबरांसाठी ही अवलंब केला जात राहीला. आयतीत पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना संबोधिले गेले आहे, परंतु त्या लोकांना समजावण्याचा हेतु आहे जे वही (ईश-संदेशा) ला नवलाईच्या नजरेने पाहतात.

आजचा आधुनिक मानव देखील ईश्वर व धर्म संदर्भात पक्षपाती वृत्ती मुळे 'वही'ला जे या बाबत ज्ञानाचे सर्वाधिक विश्वसनीय साधन आहे, मानण्यास तयार नाही. वास्तविक स्वतः मानवाने अवकाशात सटेलाईट सोडले आहेत, ज्यांचे संकेत तो ऐकतो व समजतो.

३. अला (उच्चतम) आहे पदाच्या दृष्टीने व 'अजीम' (महान) आहे आदर सन्मानाच्या दृष्टीने.

४. म्हणजे अल्लाहचा दबदबा आकाशांवर इतका जबरदस्त आहे की नवल नव्हे की ते विदीर्ण व्हावे आणि कियामतीच्या दिवशी ते निश्चितच विदीर्ण होतील.

५. जमीनवाल्यांशी अभिप्रेत जमीनीवर वास्तव्य करणारे ईमान धारक होत; जसे सूरह मोमीन आयत क्र. ७ मध्ये स्पष्टतः निवेदिले गेले आहे या ठिकाणी हे स्पष्ट करण्याचा हेतु आहे की फरिश्ते आकाशात राहून जमीनीवरील ईमान बाळगणाऱ्या लोकांशी सखोल आंतरिक संबंध राखतात आणि त्यांच्या विषयीच्या सहानुभूति पायी त्यांना क्षमा-दान लाभावे म्हणून अल्लाह समोर प्रार्थना करतात.

या आयतीत जे काही निवेदिले गेले त्यावरून असे दिसून येते की अल्लाहचे केवढे मोठे वैभव आहे आणि आकाशात त्याचा किती दबदबा आहे.

६. म्हणजे अपराधांना क्षमा करणे व दया करणे हे अल्लाहचेच काम होय. फरिश्ते केवळ दुआ (प्रार्थना)च करू शकतात. यास्तव आपल्या अपराधांची क्षमा अल्लाहकडेच मागितली पाहीजे आणि त्याच्याजवळच दया भाकली पाहिजे.

या वरून ख्रिश्चनांच्या या श्रद्धेचे आपोआप खंडन होते की हजरत येशू प्रायश्चित आहे आणि कियामतीच्या दिवशी ते आपल्या अनुयायींचे अपराध माफ करतील.

७. 'वली' (कार्यसाधक) च्या स्पष्टीकरणा करीता पहा सूरह कहफ टीप क्र.१२८ तसेच सूरह अअराफ टीप क्र.६.

८. आणि जेव्हा अल्लाह यांच्यावर नजर ठेवून आहे तेव्हा तो हमखास यांच्या या अपराधी वर्तनावर अंकूश ठेवील.

९. म्हणजे यांच्या आचरणास तुम्ही जबाबदार नाहीत तुमचे हे काम नव्हे की अल्लाहचा धर्म जबरीने त्यांना मान्य करण्यास लावावे. किंबहुना तुमचे काम केवळ संदेश पोहचविण्याचे आहे.

وَكَذٰلِكَ اَوْحَيْنَآ اِلَيْكَ قُرْاٰنًا عَرَبِيًّا لِّتُنْذِرَ اُمَّ الْقُرٰى
وَمَنْ حَوْلَهَا وَتُنْذِرَ يَوْمَ الْجَمْعِ لَا رَيْبَ فِيْهِ ؕ
فَرِيْقٌ فِى الْجَنَّةِ وَفَرِيْقٌ فِى السَّعِيْرِ ۝

७. आणि (हे पैगंबर!) अशा प्रकारे आम्ही तुमच्या वर अरबी कुरआन अवतरीत केले आहे. या साठी की तुम्ही ''उम्मल क़ुरा''[१०] (मक्का) आणि त्याच्या जवळ पास राहणाऱ्यांना खबरदार करावे.[११] आणि एकत्रित होण्याच्या दिवसा पासून भय दाखववावे, जो येण्यात काहीच शंका नाही.[१२] एक समूह जन्नत मध्ये जाईल [१३] आणि दुसरा समूह दोजख (धगधगणाऱ्या आगी) मध्ये.[१४]

وَلَوْ شَآءَ اللّٰهُ لَجَعَلَهُمْ اُمَّةً وَّاحِدَةً وَّلٰكِنْ يُّدْخِلُ مَنْ
يَّشَآءُ فِىْ رَحْمَتِهٖ ؕ وَالظّٰلِمُوْنَ مَا لَهُمْ مِّنْ وَّلِىٍّ وَّلَا نَصِيْرٍ ۝

८. जर अल्लाहने इच्छिले असते तर सर्वांचा एकच पंथ बनविला असता.[१५] परंतु तो ज्याला इच्छितो, आपल्या कृपेत दाखल करतो.[१६] आणि अत्याचारींचा ना कोणी कार्यसाधक असेल आणि ना सहाय्यक.

اَمِ اتَّخَذُوْا مِنْ دُوْنِهٖۤ اَوْلِيَآءَ ۚ فَاللّٰهُ هُوَ الْوَلِىُّ وَهُوَ يُحْىِ
الْمَوْتٰى وَهُوَ عَلٰى كُلِّ شَىْءٍ قَدِيْرٌ ۝

९. काय यांनी त्याला सोडून दुसरे कार्यसाधक बनवून ठेवले आहेत?[१७] कार्य साधक तर अल्लाहच आहे आणि तो मृतांना जिवंत करील. तो प्रत्येक गोष्टीचे सामर्थ्य बाळगतो.

وَمَا اخْتَلَفْتُمْ فِيْهِ مِنْ شَىْءٍ فَحُكْمُهٗۤ اِلَى اللّٰهِ ؕ ذٰلِكُمُ اللّٰهُ رَبِّىْ
عَلَيْهِ تَوَكَّلْتُ ۖۗ وَاِلَيْهِ اُنِيْبُ ۝

१०. ज्या ज्या गोष्टीत तुम्ही लोकांनी मतभेद केला आहे, त्याचा निर्णय अल्लाहच्या हवाली आहे.[१८] तोच अल्लाह माझा रब्ब (पालन कर्ता) आहे. त्याच्या वरच मी भरवसा केला आणि त्याच्या कडेच मी रूजू करतो.

فَاطِرُ السَّمٰوٰتِ وَالْاَرْضِ ؕ جَعَلَ لَكُمْ مِّنْ اَنْفُسِكُمْ اَزْوَاجًا
وَّمِنَ الْاَنْعَامِ اَزْوَاجًا ۚ يَذْرَؤُكُمْ فِيْهِ ؕ لَيْسَ كَمِثْلِهٖ شَىْءٌ ۚ وَهُوَ
السَّمِيْعُ الْبَصِيْرُ ۝

११. आकाशांना व जमीनीला निर्माण करणारा, ज्याने तुमच्या मधूनच तुमचे जोडे बनविले आणि चतुष्पाद प्राण्यांचे ही जोड (Pair) निर्माण केले. तो तुमच्या वंशांना यात पसरवितो.[१९] त्याच्या सारखी अन्य कोणतीही गोष्ट नाही.[२०] तो सर्व काही ऐकणारा व पाहणारा आहे.

لَهٗ مَقَالِيْدُ السَّمٰوٰتِ وَالْاَرْضِ ۚ يَبْسُطُ الرِّزْقَ لِمَنْ
يَّشَآءُ وَيَقْدِرُ ؕ اِنَّهٗ بِكُلِّ شَىْءٍ عَلِيْمٌ ۝

१२. आकाशांच्या व जमीनीच्या किल्ल्या त्याच्याच ताब्यात आहेत.[२१] तो ज्याला इच्छितो अमाप उपजिविका प्रदान करतो आणि ज्याला इच्छितो मोजून मापून देतो.[२२] तो प्रत्येक गोष्टीचे ज्ञान बाळगणारा आहे.

१०. 'उम्मुल कुरा' म्हणजे वसाहतींचे केन्द्र. मक्का केवळ अरब-इलाक्याचे मध्यवर्ति शहर नव्हते तर धार्मिक दृष्टयाही केन्द्र स्थान बाळगत होते म्हणूनच त्यास 'उम्मुल कुरा' म्हटले गेले आहे.

११. ज्याअर्थी क़ुरआनाने सर्वप्रथम ज्यांना संबोधिले ते मक्का व त्याच्या जवळ पासचे लोक होते आणि त्यांची भाषा अरबी होती. यास्तव क़ुरआनास अरबी भाषेत अवतरीत केले गेले आहे.

१२. कियामतीच्या दिवसा पासून खबरदार करणे कुरआन अवतरणाचे महत्वपूर्ण उद्दिष्ट होय. यास्तव पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना हे मार्गदर्शन केले गेले की त्यांनी कियामतीच्या महाभयंकर दिवसाचे लोकांना भय दाखवावे. कुरआनाच्या आवाहनाचा हा महत्वपूर्ण पैलू आहे, ज्याची भिड त्या लोकांनी बाळगली पाहीजे जे धर्म आवाहनाची सेवा पार पाडण्याकरीता उभे राहतील.

१३. म्हणजे ईमान बाळगून सत्कर्म करणाऱ्यांचा समूह.

१४. म्हणजे काफीर व अनेकेश्वरवादी लोकांचा समूह.

१५. म्हणजे अल्लाहने इच्छिले असते तर बलपूर्वक सर्वांना एकच धर्म-इस्लाम,चा अनुयायी बनविले असते. तेव्हा दुसऱ्या कोणत्या ही धर्माचे अस्तित्व उद्‌भवलेच नसते परंतु अल्लाहची इच्छा होती की माणसाला निवड व अधिकाराचे स्वातंत्र्य देऊन त्याची कसोटी घेतली जावी. अशी की तो आपल्या बुद्धि व अंतदृष्टिचा वापर करून त्या धर्माचा स्विकार करतो, जो अल्लाहने 'वहय' (अवतरणा) द्वारे पैगंबरांमार्फत पाठविला किंवा जन समूह व संप्रदायांच्या स्वरचित धर्मापैकी एखाद्या धर्माचा अनुयायी बनून राहतो. अधिक स्पष्टीकरणा साठी पहा सूरह मायदा टीप क्र. १५९.

१६. म्हणजे ज्याला सत्य धर्मावर चालण्याची सुबुद्धि लाभली तो अल्लाहच्या कृपा छत्रात आला आणि ही सुबुद्धि अशाच लोकांना लाभते जे खरोखर तिची इच्छा बाळगतात. अल्लाहची इच्छा त्याच्या बुद्धिकौशल्यास अगदी अनुसरून असते.

१७. येथे विशेषत: संकेत त्या लोकांकडे आहे ज्यांनी वेगवेगळे धर्म बनविले आणि त्यांच्या संस्थापकांना त्यांच्या श्रद्धाळूंनी आपला पालक व संरक्षक आणि कार्यसाधक बनवून घेतले आणि त्या मार्गभ्रष्ट धर्म-प्रमुखांच्या मार्गाचे अनुसरण करून स्वत:ही मार्गभ्रष्ट होत राहीले.

१८. ही आणि या प्रकारच्या इतर आयती हे स्पष्ट करतात की समस्त मतभेदाच्या व विवादात्मक गोष्टींच्या निर्णयाचा हक्क केवळ अल्लाहला आहे. यास्तव अल्लाहच्या धर्माने ज्या ज्या गोष्टींना आपल्या कक्षेत घेतले आहे. यापैकी कोणत्याही मामल्या बाबत अन्य कोणाचाही निर्णय स्वीकारला जाऊ शकत नाही. मग त्या मामल्याचा संबंध श्रद्धा किंवा उपासनेशी असो, अथवा सामाजिक, सांस्कृतिक व राजकिय गोष्टींशी असो. या आयतीत अल्लाहचे स्वामीत्व आणि शासकत्वास अगदी सडेतोड शैलीत प्रस्तुत केले गेले आहे. यावरून हे अपरिहार्य ठरते की-----

१) लोकांच्या दरम्यान धर्म-संबंधाने जे मतभेद प्रकट झालेत त्या संदर्भात त्यांनी अल्लाहचा ग्रंथ 'कुरआन' चा आदेश मानावा.

२) हलाल व हराम, कौटूंबिक (निकाह, तलाक, अन्न, वस्त्र इ.) सांस्कृतिक (कला वगैरे) नागरी व राजकिय समस्यां बाबत अल्लाहच्या आदेशांकडेच रूजू करावे आणि असा कोणताही कायदा बनूव नये जो अल्लाहचा कानून व त्याच्या पैगंबराच्या पद्धतिच्या विरूद्ध असावा.

३) अल्लाहच्या धर्मात ना काही वाढ केली जावी आणि ना कसली घट. ज्या नवनवीन प्रथा मुसलमानांच्या वेगवेगळया पंथांनी अस्तित्वात आणल्या आहेत. त्या रद्द केल्या जाव्यात आणि अल्लाह व त्याच्या पैगंबराच्या आदेशांपुढे कोणाच्याही वक्तव्यास प्राधान्य दिले जाऊ नये आणि ना एखाद्याच्या अनुसरणाचा पट्टा आपल्या गळयात अडकविला जावा. अगदी विशुद्ध बुद्धिने ती प्रत्येक गोष्ट कबूल केली जावी, जिचा आदेश अल्लाहने दिलेला आहे आणि जो त्याच्या पैगंबराच्या आचरणाद्वारे सिद्ध आहे.

१९. म्हणजे या खल्क (निर्मितीत) अल्लाहने ही समृद्धी राखली की वंश पसरत जात आहेत.

२०. अल्लाह सारखी कोणतीही गोष्ट नाही ही उक्ति श्रद्धा-प्रकरणात फार मोठया वस्तुस्थितीची घोषणा होय. अर्थात हे की अल्लाह आपल्या स्वत्वात व गुणविशेषात एकटा आहे अद्वितीय आहे. निर्मिती वरून निर्मात्याचा ना कयास केला जाऊ शकतो आणि ना त्याला निर्मितीची उपमा दिली जाऊ शकते. धर्मानुयायींच्या मार्गभ्रष्टतेचे मूळ कारण हेच होय की त्यांनी आपल्या निर्मात्यास व आपल्या पालन कर्त्यास या निर्मितीवरून व दासांवरून कयास केला आणि मग मार्गभ्रष्ट करणारे तत्वज्ञान शोधून काढले. मुसलमानांमध्येही जे शाब्दीक (वाणी) विषयक वाद उभे राहीले. ते देखील या मूळ स्त्रोताकडे पाठ फिरविण्याचा परिणाम होता. श्रद्धा निकोप व निर्दोष असण्या करीता हे आवश्यक आहे की कोणत्याही तत्वज्ञानी विवादात न पडता या साध्या वस्तुस्थितीवर विश्वास ठेवला जावा की अल्लाह समान कोणतीही गोष्ट नाही.

२१. याचे स्पष्टीकरण सूरह जुमर-टीप क्र.११०मध्ये केले गेले आहे.

२२. स्पष्टीकरणा करीता पहा सूरह रअद टीप क्र. ५७.

१३. त्याने तुमच्या करीता तोच धर्म निश्चित केला आहे. ज्याचे मार्गदर्शन त्याने नूह ला केले होते आणि ज्याचे 'वहय' (ज्याचा ईश -आदेश) (हे पैगंबर !) आम्ही तुमच्या कडे पाठविला आहे आणि ज्याचे मार्गदर्शन आम्ही इब्राहीम आणि मूसा आणि ईसा ला केले होते की या धर्माला कायम राखा आणि या संदर्भात मतभेदात पडू नका.[२३] अनेकेश्वरवाद्यांना ती गोष्ट अप्रिय आहे, जिचे आवाहन तुम्ही त्यांना करीत आहात. [२४] अल्लाह ज्याला इच्छितो, आपल्या मार्गा करीता निवडतो आणि आपल्या दिशेने त्याचेच मार्गदर्शन करतो जो त्याकडे रूजू करील.[२५]

شَرَعَ لَكُمْ مِّنَ الدِّيْنِ مَا وَصّٰى بِهٖ نُوْحًا وَّالَّذِيْٓ اَوْحَيْنَآ
اِلَيْكَ وَمَا وَصَّيْنَا بِهٖٓ اِبْرٰهِيْمَ وَمُوْسٰى وَعِيْسٰٓى اَنْ اَقِيْمُوا
الدِّيْنَ وَلَا تَتَفَرَّقُوْا فِيْهِ ۭ كَبُرَ عَلَي الْمُشْرِكِيْنَ مَا
تَدْعُوْهُمْ اِلَيْهِ ۭ اَللّٰهُ يَجْتَبِيْٓ اِلَيْهِ مَنْ يَّشَاۗءُ
وَيَهْدِيْٓ اِلَيْهِ مَنْ يُّنِيْبُ ﴿١٣﴾

१४. आणि लोक, त्यांच्याजवळ ज्ञान येऊन पोहचले असतांना ही केवळ आपसातील हट्टा पायी मतभेदात पडले. [२६] आणि तुमच्या पालन कर्त्याचे फर्मान [२७] एका निर्धारीत मुदती करीता निघाले नसते तर यांच्या दरम्यान निर्णय लावला गेला असता. [२८] आणि या (पूर्वी होऊन गेलेल्या) लोकानंतर जे लोक ग्रंथाचे उत्तराधिकारी बनविले गेले ते याच्या संबंधाने संशय -ग्रस्त झाले आहेत. ज्याने त्यांना गोंधळात टाकले आहे.[२९]

وَمَا تَفَرَّقُوْٓا اِلَّا مِنْۢ بَعْدِ مَا جَاۗءَهُمُ الْعِلْمُ بَغْيًۢا بَيْنَهُمْ ۭ
وَلَوْلَا كَلِمَةٌ سَبَقَتْ مِنْ رَّبِّكَ اِلٰٓى اَجَلٍ مُّسَمًّى لَّقُضِيَ
بَيْنَهُمْ ۭ وَاِنَّ الَّذِيْنَ اُوْرِثُوا الْكِتٰبَ مِنْۢ بَعْدِهِمْ لَفِيْ شَكٍّ
مِّنْهُ مُرِيْبٍ ﴿١٤﴾

१५. यास्तव तुम्ही याच धर्माचे आवाहन करा आणि यावरच स्थैर्यशील रहा, जसा की तुम्हाला आदेश दिला गेला आहे.[३०] आणि त्या लोकांच्या इच्छा-आकांक्षांचे अनुसरण करू नका. [३१] आणि सांगा, अल्लाहने जो ग्रंथ अवतरीत केला आहे, त्यावर मी ईमान बाळगले. [३२] मला आदेश दिला गेला आहे की तुमच्या दरम्यान न्याय-निवाडा करावा. [३३] अल्लाह आमचा पालन कर्ता देखील आहे आणि तुमचा ही पालन कर्ता. आमची कर्मे आमच्या करीता आहेत आणि तुमची कर्मे तुमच्या करीता. आमच्या व तुमच्या दरम्यान कसलाही वाद नाही.[३४] अल्लाह आम्हा सर्वांना एकत्र करील आणि त्याच्याच कडे सर्वांना जायचे आहे.

فَلِذٰلِكَ فَادْعُ ۚ وَاسْتَقِمْ كَمَآ اُمِرْتَ ۚ وَلَا تَتَّبِعْ اَهْوَاۗءَهُمْ ۚ
وَقُلْ اٰمَنْتُ بِمَآ اَنْزَلَ اللّٰهُ مِنْ كِتٰبٍ ۚ وَاُمِرْتُ لِاَعْدِلَ
بَيْنَكُمْ ۭ اَللّٰهُ رَبُّنَا وَرَبُّكُمْ ۭ
لَنَآ اَعْمَالُنَا وَلَكُمْ اَعْمَالُكُمْ ۭ لَا حُجَّةَ بَيْنَنَا وَبَيْنَكُمْ ۭ اَللّٰهُ
يَجْمَعُ بَيْنَنَا ۚ وَاِلَيْهِ الْمَصِيْرُ ﴿١٥﴾

२३. या आयतीचा अर्थ योग्यरित्या समजून घेण्याकरीता शब्द संदर्भास दृष्टीपथात ठेवणे अगत्याचे आहे. सूरहचा आरंभ या गोष्टीने झाला होता की कुरआन त्याच प्रकारचा ईश-संदेश आहे, ज्या प्रकारचा ईश-संदेश अल्लाहतर्फे इतर पैगंबरांवर अवतरीत होत राहीला. ही काही वेगळी किंवा नाविन्यपूर्ण बाब नव्हे की ज्या बाबत मनुष्य अनभिज्ञ असावा. मग त्या हस्ती (अस्तित्वा) कडून प्रदान केला गेला आहे ज्याकडून 'वही' अवतरीत होते आणि या संदर्भात एकेश्वरवादाच्या निशाण्यांकडे लक्ष वेधले गेले आहे. याच संदर्भात या ठिकाणी हे स्पष्ट केले जात आहे की ज्या धर्माचे आवाहन कुरआन व त्याचा पैगंबर सादर करीत आहे. तो धर्म एकेश्वरवादी धर्म आहे आणि हा तोच धर्म होय जो समस्त प्रतिष्ठीत व थोर अशा पैगंबरांचा धर्म राहीला आहे. यास्तव याच एकेश्वरवादी धर्माचे प्रामाणिकपणे अनुसरण करा आणि त्यात नवनवीन मार्ग (नव्या रूढी नव्या प्रथा) काढू नका की ज्यामुळे सत्य धर्माचे टोक हातातून निघून जावे आणि वेगवेगळया धार्मिक जमाती व संप्रदायांमध्ये विभागले जावे.

हजरत नूह प्रथम पैगंबर होते जे मानव वस्तीकडे पाठविले गेले. त्यांना ज्या धर्मावर चालण्याचे मार्गदर्शन सर्वश्रेष्ठ अल्लाहने फर्माविले होते तोच धर्म त्याने या पैगंबरावर ही अवतरीत केला आहे. आणि हाच धर्म त्या प्रतिष्ठीत व थोर अशा पैगंबरांचाही राहीला आहे ज्यांच्याशी वेगवेळे जन-समूह संबंधित आहेत. हा धर्म आपल्या मूलभूत दृष्टया एकच आहे जरी शरीअती वेगवेगळया राहील्या असाव्यात. पवित्र कुरआनाच्या कथना नुसार---

لِكُلٍّ جَعَلْنَا مِنْكُمْ شِرْعَةً وَّمِنْهَاجًا۔ (مائدہ:٤٨)

'आम्ही तुमच्यापैकी प्रत्येक समूहा करीता एक शरीअत आणि एक मिनहाज (कर्म-पथ) निर्धारीत केला आहे.' (मायदा-४८)

शरीअत (धर्म शास्त्रां)ची ही भिन्नता शाखांचे स्वरूप बाळगते ज्यांचा धर्म-तत्वांवर काही ही प्रभाव पडत नाही. धर्म-तत्वामध्ये तौहीद (एकेश्वरवाद) आखिरत (मरणोत्तर जीवन) रिसालत (प्रेषित्व) एकमेव अल्लाहची उपासना व आज्ञापालन, ईश भय आणि पापभीरूता, सत्याचे प्रोत्साहन आणि न्याय व उपकार सारख्या मूलभूत गोष्टी सामील आहेत आणि शरीअत तर अल्लाहच्या आज्ञापालनाचे स्वरूप व त्याचे विवरण आहे जे धर्माचे अपरिहार्य अंग आहे.

शरीअती वर ही जरी धर्म लागू झालेला आहे जसे की आयत اَلْيَوْمَ اَكْمَلْتُ لَكُمْ دِيْنَكُمْ (مائدہ:٣)

'आज मी तुमच्या करीता तुमच्या धर्माला परिपूर्ण केले.' (मायदा-३)

मध्ये फर्माविले गेले आहे, तरी ही या ठिकाणी पैगंबरांच्या वेगवेगळया धर्म (शास्त्रा)स सादर केले गेले आहे. यास्तव येथे धर्माशी अभिप्रेत धर्म-तत्वेच होत परंतु याचा हा अर्थ घेणे योग्य ठरणार नाही की शरीअत धर्माच्या बाहेरची बाब होय कारण धर्म तत्वात, आम्ही वर स्पष्टीकरण केल्या प्रमाणे अल्लाहची उपासना व आज्ञापालन सामील आहे आणि याचे प्रात्यक्षिक स्वरूप व याचा विवरणात्मक आचरण शरीअत व्यवस्था होय. कुरआनात धर्माचा शब्द सर्वकष अर्थानेही वापरला गेला आहे आणि प्रसंगी त्याच्या एखाद्या विशेष पैलू करीता ही उदाहरणार्थ-

وَاِذَا غَشِيَهُمْ مَّوْجٌ كَالظُّلَلِ دَعَوُا اللّٰهَ مُخْلِصِيْنَ لَهُ الدِّيْنَ۔ (لقمان:٣٢)

'आणि जेव्हा लाटा छप्परांप्रमाणे यांच्यावर आच्छादित होतात तेव्हा ते अल्लाहला पुकारतात धर्मा (नम्रता व दास्यत्वा)ला त्याच्या करीता निव्वळ जाणून.' (लुकमान-३२)

या आयतीत धर्म हा शब्द नम्रता व दास्यत्वाच्या अर्थाने प्रयोजिला गेला आहे कारण अनेकेश्वरवाद्यांचे वादळाशी सामना झाल्यावर अल्लाहलाच पुकारणे त्यांच्या विनविण्याच्या अर्थाने आहे, त्याच्या शरीअतीस प्रामाणिकपणे कबूल करण्याच्या अर्थाने नव्हे. यास्तव जर विचाराधीन आयतीत धर्म हा शब्द धर्म-तत्व या अर्थाने वापरला गेला आहे तर हे उक्ति-प्रसंगाच्या निकडीद्वारे झाले आहे. यास्तव संकोच बाळगून शरीअतच्या विवरणासही यात सामील करण्याचा प्रयत्न करण्याचे काही एक कारण नाही. सर्वसामान्य भाष्यकारांनी ही या आयतीच्या भाष्यात धर्माशी अभिप्रेत धर्मतत्व हाच अर्थ घेतला आहे इमाम राजी लिहीतात :

'तेव्हा आवश्यक आहे की धर्माशी अभिप्रेत त्या गोष्टी होत ज्या शरीअत-भिन्नते मुळे वेगवेगळया नसतात अर्थात त्या आहेत अल्लाह, त्याचे फरिश्ते, त्याचे ग्रंथ, त्याचे पैगंबर आणि अंतिम दिनावर ईमान आणि ईमानाने अपरिहार्य पणे येते की माणसाने जगापासून पाठ फिरवणे व आखिरतकडे लक्ष केंद्रित करणे सदाचाराचा प्रयत्न करावा आणि दुष्कर्मा पासून दूर राहवे.' (अत्तफसीरूल कबीर खंड २७, पृ १५६)

अल्लामा जमखशरी फर्मावितात:-

'अभिप्रेत इस्लाम धर्माची स्थापना होय, जो अल्लाहचा एकेश्वरवाद त्याचे आज्ञापालन आणि त्याच्या पैगंबरांवर त्याच्या ग्रंथांवर आणि मोबदल्याच्या दिवसावर ईमान तसेच त्या सर्व गोष्टींचा अंतर्भाव आहे ज्यांना कायम केल्याने मनुष्य मुस्लिम होतो आणि अभिप्रेत शरीअती नव्हेत ज्या जनसमूहांच्या परिस्थितीनुसार उचित गोष्टींवर आधारीत असतात. कारण त्या

विभिन्न आणि वेगवेगळया असतात. (अल-कश्शाफ खंड-३ पृष्ठ ४६३)

जवळ जवळ हीच गोष्ट अल्लामा आलूसी यांनी ही आपल्या भाष्यात लिहीली आहे (पहा-रूहूल मआनी खंड- २ पृष्ठ २१)

अल्लामा इब्ने कसीर फर्मावितात-

'म्हणजे सामाईक मान प्रतिष्ठा या (पैगंबरां)च्या दरम्यान एक अल्लाहची उपासना होय, ज्याचा कोणी सहभागी नाही जरी त्यांच्या शरीअती व आचरण संहिता भिन्न आहेत.' (तफसीर इब्ने कसीर खंड - ४ पृ. १०९)

या संदर्भात मौलाना अमीन अहसन इस्लाही फर्मावितात की-

اِنَّ الدِّيْنَ عِنْدَاللهِ الْاِسْلَامِ

''अल्लाहचा धर्म अगदी सुरवाती पासूनच इस्लाम आहे'' जसे अल्लाहने फर्माविले की, 'खरा धर्म अल्लाहच्या दृष्टीने इस्लाम आहे' या धर्माचा पाया निव्वळ व परिपूर्ण एकेश्वरवाद आहे. हाच धर्म (अर्थात इस्लाम) सर्वश्रेष्ठ अल्लाहने हजरत नूह, किंबहुना हजरत आदम यांना ही दिला आणि हाच धर्म मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्यावर ही अवतरीत केला. याची श्रद्धा-तत्वे आणि मूळ पाया सुरवातीपासून शेवट पावेतो अगदी एकच राहीला आहे. फरक झाला तो शरीअतीच्या बारीक सारीक गोष्टींमध्ये ज्याला कुरआनने कर्म-पथ या अर्थाने घेतले आहे.' (तदब्बुरे कुरआन खंड -६ पृष्ठ १५३)

परंतु 'तफहीमुल कुरआन'च्या रचयित्याने त्या लोकांवर अंकुश ठेवला आहे ज्यांनी या प्रसंगी धर्माशी अभिप्रेत शरीअत विषयक आदेश व नियमावली हा अर्थ घेतला नाही, किंबहुना तात्विक गोष्टीच अभिप्रेत घेतल्या आहेत ज्या समस्त पैगंबरांच्या दरम्यान सामाईक राहील्या आहेत. विद्वान भाष्यकारानी या मतास धोकादायक ठरवतांना लिहीले आहे-

'जर यात सुधारणा केली गेली नाही तर पुढे ही गोष्ट धर्म व शरीअतच्या या फरका पावेतो पोहोचेल. ज्यात गुरफटून सेंट पॉलने शरीअत विरहीत धर्माचा दृष्टिकोन प्रस्तुत केला आणि पैगंबर मसीह (येशू) यांच्या जन-समूहास बिघडविले. या साठी की जेव्हा शरीअत धर्मापासून एक अलग बाब आहे आणि आदेश केवळ धर्म प्रस्थापित करण्याचा आहे. शरीअतला नव्हे, तर अपरिहार्यपणे मुसलमान देखील ख्रिश्चनांप्रमाणे शरीअतला महत्वशून्य आणि तिच्या स्थापनेस निरूद्देश जाणून दृष्टीआड करतील आणि फक्त ईमान विषयक गोष्टी व ठळक अशा निती-नियमांना धरून बसतील.' (तफहीमुल कुरआन खंड ४ पृ. ४८४)

परंतु हा उघड असा भ्रम आहे. कोणत्याही भाष्यकाराने हे सांगितले नाही की शरीअत धर्मापासून वेगळी आहे किंवा धर्म शरीअतीवर लागू होत नाही आणि ना एखाद्या भाष्यकाराने शरीअतचे महत्व घटविले आहे. गोष्ट केवळ हीच की सूरह शूराच्या या विचाराधीन आयतीत अनेक भाष्यकार शरीअतच्या आदेश व नियमांना अंतर्भूत जाणत नाहीत. त्यांच्या दृष्टीने याचा हा अर्थ मुळीच नाही कीं कुरआनात कोठे ही धर्म हा शब्द शरीअतच्या अर्थाने आलेला नाही किंवा धर्म हा शब्द ज्या ज्या ठिकाणी वापरला गेला आहे त्यात शरीअत सामील नाही. कुरआनात असे कितीतरी शब्द आहेत जे एका ठिकाणी मर्यादीत अर्थाने वापरले गेले आहेत तर दुसऱ्या ठिकाणी आपल्या व्यापक अर्थाने. उदाहरणार्थ 'तागूत' हा शब्द काही ठिकाणी मूर्ति करीता वापरला गेला आहे तर काही ठिकाणी सैतानाकरीता तर काही ठिकाणी मार्गभ्रष्ट नेते व शासकांकरीता, तसेच काही ठिकाणी बंडखोर व दुराचारी लोकांकरीता वापरला गेला आहे. आता जर एखादा भाष्यकार एका आयतीत उक्ति प्रसंगास विचाराधीन ठेवित तागूत शी अभिप्रेत मूर्ति हा अर्थ घेतो, तर त्याच्यावर हा आरोप कसा ठेवला जाऊ शकतो की तो इतर गोष्टींच्या 'तागूत' असण्याचा इन्कार करणारा आहे?

اِقَامَةَ الشيء توفية حقه۔ (مفردات راغب صفحہ ۴۲۹)

''एखाद्या गोष्टीची प्रस्थापितता तिच्या हक्कास पूरेपूर अदा करणे होय.'' (मुफर्रदात रागीब पृष्ठ ४२९)

इमाम रागीब यांनी पुढे स्पष्टीकरण दिले आहे की नमाज कायम करण्याचा उद्देश केवळ नमाज पढणे हा नव्हे, किंबहुना नमाजला तिच्या सर्व शर्तीसह अदा करणे होय आणि (सूरह मायदा आयत ६८मध्ये) तौरात व इंजील (बायबल)ला कायम करण्याशी अभिप्रेत ज्ञान व आचरणाने त्यांचे हक्क पूरेपूर अदा करणे होय.

'लिसानुल अरब' या शब्दकोषातील उल्लेख असा-

اَقَامَ الشئ : اَدَامَهٗ من قوله تعالىٰ :وَيُقِيْمُوْنَ الصَّلٰوةَ۔ (لسان العرب ج۱۲ص۴۹۸)

'एखाद्या गोष्टीस कायम करणे म्हणजे तिला निरंतरपणे करीत राहणे. याच अर्थाने आहे सर्वश्रेष्ठ अल्लाहचे फर्मान, ते नमाज कायम करतात.'(लिसानुल अरब खंड -१२ पृष्ठ ४९८)

आणि इकामतचा अर्थ सरळ राखणे असा ही होतो.

कुरआनात फर्माविले गेले आहे-

وَاَنْ اَقِمْ وَجْهَكَ لِلدِّيْنِ حَنِيْفًا۔ (یونس:۱۰۵)

''आपले रोख सत्यनिष्ठ धर्माकडे सरळ राखा''(यूनूस १०५)

وَاَقِيْمُوا وُجُوهَكُمْ عِنْدَ كُلِّ مَسْجِدٍ۔ (اعراف:۲۹)

''आणि आपला चेहरा सरळ राखा प्रत्येक उपासना गृहात'' (अअराफ-२९)

यास्तव अकीमुद्दीनचा अर्थ झाला धर्माला सरळ राखा, त्यावर आचरण बद्ध राहा आणि त्याचे हक्क पूरेपूरे अदा करा आणि धर्माचा हक्क सर्वप्रथम आपल्या स्वत:शी संबंधित असतो नंतर इतरांशी. म्हणून संबोधनाचा रोख या ठिकाणी व्यक्तिच्या आपल्या श्रद्धा व आचरण आणि तिच्या आपल्या सुधारणेकडे आहे कारण हाच आरंभ बिंदू आहे आणि धर्मात याला प्राथमिकता प्राप्त आहे. अल्लामा (विद्वान) आलूसी यांनी याचे स्पष्टीकरण अशा प्रकारे केले आहे :-

'याला कायम करण्याशी अभिप्रेत त्याच्या तत्वांचे पालन व या गोष्टीपासून त्याचे रक्षण करणे होय की त्यात एखादी वक्रता निर्माण न व्हावी. तसेच त्यावर सतत आचरणबद्ध राहाणे होय.' (रूहुल मआनी खंड-९ पृ. २१)

अल्लामा शब्बीर अहमद उस्मानी लिहितात :-

'' म्हणजे सर्व पैगंबर आणि त्यांच्या जन समूहांना आदेश दिला गेला की अल्लाहच्या धर्माला आपल्या उक्तिने व आचरणाने कायम राखा आणि मूळ धर्मात कसल्याही प्रकारची फूट व मतभेदास जारी ठेवू नका.'' (तफसीर मौलाना शब्बीर अहमद उस्मानी पृ. ६२८)

आणि या संदर्भात मौलाना अमीन अहसन फर्मावितात की-

''कायम राखण्याशी अभिप्रेत असे की याच्या ज्या गोष्टी मान्य करावयाच्या आहेत त्या सत्यतेसह मान्य केल्या जाव्यात, ज्या करावयाच्या आहेत त्या प्रामाणिकपणे व सदाचारा सह केल्या जाव्यात तसेच लोकांवर व्यवस्थित लक्ष ठेवले जावे की या पासून गाफील किंवा विमुख न व्हावेत आणि या गोष्टीचाही पूर्ण इतमाम राखला जावा की बिदअत करणारे यात काही नवीन प्रथा निर्माण न करावेत.''(तदब्बुर कुरआन-खंड ६ पृ १५३)

आणि सर्वश्रेष्ठ अल्लाहने हे जे फर्माविले की,

''وَلَا تَتَفَرَّقُوْا فِيْهِ''

''या बाबतीत दुफळीत पडू नका, तेव्हा दुफळीत पडणे धर्म कायम करण्याच्या उलट अर्थी आहे आणि याचा अर्थ असा की अल्लाहच्या धर्म-संदर्भात नवनवीन मार्ग काढू नका. यात आपल्या तर्फे ना एखादी वाढ करा आणि ना काही घट. आपल्या तर्फे धर्म निर्माण करू नका आणि ना एखाद्या धर्माची जोडी या सत्य धर्माशी लावा. नव्या गोष्टी (बिदअती) यात सामील करू नका की ज्यामुळे धर्माच्या मूळ राजपथापासून भटकून जाल व वेगवेगळया संप्रदायांत विभागले जाल. अल्लाहचा धर्म एक शुचिर्भूत करणारा झरा आहे आणि हेच मानवते करीता जीवन स्त्रोत आहे. यास्तव याला प्रत्येक प्रकारच्या मिश्रणापासून नेहमी स्वच्छ व शुद्ध राखा. यात जे काही मिसळले जाईल ते विषच असेल.

हा आहे धर्माला कायम करण्याचा साधा सरळ अर्थ, ज्याचे समर्थन अरबी शब्दकोषा द्वारे ही होतो आणि सर्वसामान्य भाष्यकारांच्या स्पष्टीकरणांद्वारे ही. परंतु आजच्या काळातील इस्लामी चळवळी धर्माला कायम करण्यास एक सर्वकष परिभाषा या नात्याने मुसलमानांचे ध्येय या स्वरूपात प्रस्तुत करीत आहेत. ज्याचा प्रभाव धर्माच्या सामर्थ्यावर ही पडतो आणि आवाहनाच्या सामर्थ्यावर ही. सूरह शूराची ही आयत धर्माला कायम करण्यास एक अनिवार्य कर्तव्य म्हणून प्रस्तुत करते, ध्येय उद्दिष्ट म्हणून नव्हे, कर्तव्य तर माणसाची जबाबदारी असते जे अपरिहार्यत: त्याला पार पाडावेच लागते उलटपक्षी ध्येय-उद्दिष्ट प्रयत्नांच्या परिणाम स्वरूपी प्राप्त होणारी गोष्ट आहे. कुरआनाने आखिरतच्या यशास ध्येय उद्दिष्टाच्या स्वरूपात प्रस्तुत केले आहे. यास्तव मक्की सूरती आखिरत व तिच्या यशावरच लक्ष केंद्रित करतात आणि मदनी सूरती मध्ये ही यालाच धवल उद्दिष्ट या नात्याने प्रस्तुत केले गेले आहे.

मग धर्माला कायम करण्यास सर्वकष परिभाषा ठरवून त्याची व्याख्या व स्पष्टीकरण असे केले जाते की धर्माच्या त्या निकडी ज्या सामूहीक जीवनाशी संबंधित आहेत, प्रकट होऊन समोर येतात. इस्लामच्या आर्थिक, सामाजिक व राजकीय व्यवस्थेच्या स्थापनेस प्राधान्य प्राप्त होते आणि श्रद्धा व उपासनेचा पैलू, ज्यास कुरआनाने या ठिकाणी प्रकट केले आहे, त्याची गळचेपी होते. येथपावेतो की **'आकीमुद्दीन'चा** अनुवाद ''इस्लामी जीवन-व्यवस्था कायम करा'' असा केला जातो आणि कायम करा' शी अभिप्रेत जमीनीवर कायम करणे हा अर्थ घेतला जातो आणि जोर या गोष्टीवर दिला जातो की सत्ताधिकार प्राप्त करून इस्लामच्या राजकीय व्यवस्थेस कायम करा आणि त्याचे नियम लागू करा. यापैकी कोणतीही गोष्ट चुकीची नाही. कारण कुरआनात या सर्व गोष्टींची ताकीद केली गेली आहे, परंतु प्रत्येक गोष्टीचे एक स्थान आहे. सूरह शूराची ही आयत या गोष्टीचे स्थान नव्हे आणि म्हणूनच इस्लामच्या सामूहीक निकडींना या ठिकाणी लादणे अगदीच संकोच पूर्ण बाब होय. या संकोचापासून अरबीतली काही भाष्ये अपवाद आहेत. परंतु आजच्या काळात राजकिय व आर्थिक व्यवस्थांच्या चढाओढीने बुद्धिला प्रभावित केले आहे आणि याच्याच प्रभावाखाली इस्लामी चळवळी धर्माला नव्या शैलीत प्रस्तुत करीत आहे ज्यात पाया भरण्या आधीच इमारत उभी करण्याची योजना आखली जाते. तात्पर्य जी गोष्ट धर्मात सर्वप्रथम लक्ष देण्याजोगी होती तिच्या महत्वास

पूर्णतः विचाराधीन राखले गेले नाही आणि जी गोष्ट गौण स्वरूपाची होती तिला प्रथम अवस्थेतच लक्ष देण्या योग्य बनविले गेले. परिणामी जो धर्म हृदयांवर प्रस्थापित होतो तो फार कमी प्रमाणात चर्चिला जातो आणि जो धर्म जमीनीवर कायम होतो तो चर्चेचा मूळ विषय बनतो.

ज्या पैगंबरांचा या आयतीत उल्लेख केला गेला आहे, त्यांचे आचरण ही धर्माला कायम करण्याचा अर्थ निश्‍चित करतांना लक्षात घेतला पाहीजे. हजरत नूह यांनी आपले प्रदीर्घ आयुष्य आपल्या जनसमूहास धर्माचे आवाहन करण्यात घालविले. हे आवाहन मूर्तिपूजा व शिर्क (अनेकेश्वरवादा)ला सोडून देण्याचे व एकेश्वरवादाला स्विकारण्याचे होते. मात्र जेव्हा जनसमूहावर ईश-प्रकोप अवतरला तेव्हा त्याच्या विनाशानंतर ईमान बाळगणाऱ्यांना सत्ताधिकार प्राप्त झाला: आणि इस्लामने सामूहीक सत्ते चे स्वरूप धारण केले. दुसरे व्यक्तिमत्व हजरत इब्राहीम यांचे आहे. त्यांनी ही आपल्या मूर्तिपूजक जन-समूहाला खोटया उपास्य व दैवतांना सोडून देण्याचे व एकेश्वरवाद अंगिकारण्याचे आवाहन केले. आणि सत्य व असत्याच्या या संघर्षात त्यांना शेवटी- स्थानांतर करावे लागले. स्थानांतरानंतर त्यांनी आपल्या संततीला स्वतंत्र वातावरणात वसविले, अशासाठी त्यांच्यावर अल्लाहच्याच धर्माचा अधिकार प्रस्थापित व्हावा आणि त्यांनी इस्लामच्या आवाहन व प्रचाराचे कार्य पार पाडावे.या हेतुस्तव त्यांनी पॅलेस्टीन व मक्का दोघांचीही निवड केली. तिसरे व्यक्तिमत्व हजरत मूसा यांचे आहे. त्यांनी फिरऔन व त्याच्या जन समूहा समोर एकेश्वरवादाचे आवाहन प्रस्तुत केले आणि बनी इस्राईलला जे आधीपासून मुसलमान होते, धैर्यपूर्वक इस्लामच्या मूलभूत आदेशांवर आचरण करण्याचा आदेश दिला. येथपावेतो की इजिप्तला सोडून ते बनी इस्राईल सह निघून गेले आणि जेव्हा कोहे-तूर पर्वताच्या कुशीत त्यांना शरीअत प्रदान केली गेली तेव्हा त्या मोकळया वातावरणात तिचे आदेश बनी इस्राईलवर लागू केले गेले. चौथे व्यक्तिमत्व हजरत ईसा यांचे आहे. त्यांना बनी इस्राईल वंशाकडे रसूल या नात्याने पाठविले गेले होते आणि बनी इस्राईलवर रोमन लोकांचे शासन होते. ज्याअर्थी त्या काळी बनी इस्राईल वंशात बिघाड सार्वत्रिक झाला होता. त्यांचा विद्रोह अगदी पराकोटीला पोहचला होता आणि धार्मिकता केवळ नावाला उरली होती म्हणून त्यांनी धर्माची मूळ हकीगतीस स्पष्ट केले आणि अल्लाहचे आज्ञापालन व दास्यत्व पत्करण्याचे आवाहन केले. मुस्लिम जन समूह अस्तित्वात असतांना त्यांनी हे म्हटले नाही की 'कैसर' चे शासन हटवा आणि इस्लामी शासन व्यवस्था कायम करा अर्थात असे न म्हणण्याचे कारण हे नव्हते की त्यांच्या धर्माचा राजकारणाशी कसलाही संबंध नव्हता आणि ते तत्कालीन राजकीय व्यवस्थेत त्यांना परिवर्तित करू इच्छित होते, किंबहुना यासाठी की मुसलमानांचा समाज अगदी जर्जर झाला होता आणि अजून ती वेळ आली नव्हती की एखादे राजकीय पाऊल उचलले जाते. अन्यथा 'तौरात' मध्ये राजकीय आदेश तर त्या काळातही होते. जे इस्लामसाठी सत्तेची निकड असलेले होते.

अंतिम व्यक्तित्व पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचे होय. त्यांनी तेरा वर्षे पावेतो मक्का मध्ये जे आवाहन केले ते शिर्क व मूर्तिपूजा सोडण्याचे, आणि एकेश्‍वरवाद, आखिरत, प्रेषित्व या सारख्या हकीगतींना कबूल करण्याचे आवाहन होते आणि ईमान बाळगणाऱ्यांची जी जमात घडवली गेली तिच्यासाठी तकवा (अल्लाहच्या भया) चे आधार उपलब्ध केले जेणे करून प्रत्येकाचे जीवन सुशोभित व्हावे. येथपावेतो की 'हिजरत' (देशांतरा) ची वेळ आली आणि त्यांना मदीनामध्ये स्वतंत्र इस्लामी राज्य स्थापन करण्यासाठी संधी मिळाली आणि या कालावधीत शरीअतचे ते आदेश ही अवतरीत झाले ज्यांचा संबंध इस्लामचे वर्चस्व व त्याच्या राजकीय व्यवस्थेस कायम करण्याशी आहे. निःसंशय त्यांनी इस्लामच्या राजकीय व सामूहीक व्यवस्थेस प्रस्थापित करून दाखविले, परंतु प्रश्न हा उद्‌भवतो की ज्या वेळी सूरह शूराची आयत اَنْ اَقِيْمُوا الدِّيْنَ ''धर्माला कायम करा'' अवतरली तेव्हा, काय त्यांनी त्याच वेळी मुसलमांना इस्लामची राजकीय व्यवस्था कायम करण्याचे आवाहन केले किंवा ते याकरीता पार्श्‍वभूमी तयार करीत राहीले? जर पार्श्‍वभूमी तयार करीत राहीले तर हेच कार्य आजच्या काळातही अगतिकतेच्या परिस्थितीत पार पाडले जाऊ शकते. म्हणजे अशा परिस्थितीत की जिथे मुसलमानांना सत्ताधिकार प्राप्त नसावा किंवा उद्दिष्ट प्राप्तीचे मार्ग प्रत्यक्षतः मर्यादीत असावेत. यास्तव या संदर्भात जी काही सेवा पार पाडली जाऊ शकते ती धर्म कायम करण्याचेच कार्य ठरेल. परंतु आजच्या काळातील इस्लामी चळवळी धर्माला कायम करण्यास आपला शिरपेच समजतात आणि इतरांच्या धार्मिक-सेवा व त्यांच्या आवाहन (प्रचार-प्रसार) विषयक प्रयत्नांना धर्माला कायम करण्याच्या अर्थाने घेण्यास तयार नाहीत. ही चुकीची विचार सरणी अशामुळे निर्माण झाली आहे. की त्यांनी कुरआनाच्या या साध्या सरळ आदेशास की, 'धर्म कायम करा इस्लामी व्यवस्था व तत्सम अन्य उपाय योजनांचा विपुल प्रमाणात वापर करून एका विशिष्ट परिभाषेचे स्वरूप दिले आणि त्या स्तरावर इतरांच्या कार्यांचा आढावा घ्यायला सुरवात केली तेव्हा त्यांना आपल्या खेरीज कोणीही धर्माला कायम करणारा दिसून आला नाही. ते असे समजतात की इतर सर्व अंशात्मक कार्य करीत आहेत आणि धर्माची संपूर्ण सेवा करण्याचे भाग्य फक्त त्यांच्याच वाटयाला आले आहे.

स्पष्ट असावे की اَقِيْمُوا الدِّين ''धर्माला कायम करण्याची'' उपाय योजना संपूर्ण कुरआनात फक्त एका ठिकाणी आली आहे आणि ती म्हणजे सूरह शूराची ही आयत होय. वास्तविक कुरआनने या आदेशास जो या शब्दात या ठिकाणी निवेदिला केला आहे, इतर शब्दात व इतर उपाय योजनांनी अनेक ठिकाणी निवेदिला केला आहे. मग इकामते दीन (धर्माला कायम करण्या) च्या शब्दांनाच ध्येय उद्दिष्टाच्या अर्थाने घेणे का म्हणून आवश्यक ठरविले जावे ? (धर्माला कायम करणे 'या विषयावर लेखकाची ती लिखाणे जी तफसीर दअवतुल कुरआन' या भाष्याच्या पूर्वीची आहेत आणि आयतीच्या या स्पष्टीकरणाशी सुसंगत नाहीत त्या लिखाणांशी लेखक रूजू करतो.

गैर समजच्या निवारण साठी लाही गोष्टी अधिक स्पष्टीकरणा प्रस्तुत केली जात आहे.

२४. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) एकेश्वरवादाचे आवाहन करीत होते आणि नेमकी हीच गोष्ट अनेकेश्वरवाद्यांना मोठी अप्रिय वाटत होती.

२५. अल्लाहची दूरदर्शिता त्याच्या बुद्धिकौशल्यानुसार असते, जो मनुष्य त्यांच्याकडे रूजू करतो, अल्लाह निश्चितपणे त्याच्या मार्गदर्शनाची उपाय योजना करतो आणि सुबुद्धि प्रदान करतो की त्याने अल्लाहच्या मार्गावर चालावे, सत्य-धर्माचा स्वीकार करून त्याच्या उज्वल प्रकाशात चालण्याचे सद्‌भाग्य अशाच लोकांना लाभते, ज्यांना सर्वश्रेष्ठ अल्लाह या महान कार्याकरीता निवडतो.

२६. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह बकरा टीप क्र. ३०९ आणि सूरह आले इमारान टीप क्र. २८, हा मीम अस्सजदा टीप क्र.२८

२७. म्हणजे जगात आचरणाची संधी देण्याचे फर्मान आहे.

२८. स्पष्टीकरणाकरीता पहा सूरह हा मीम अस्सजदा टीप क्र. ६९.

२९. म्हणजे ग्रंथ धारकांनी जे बदलून टाकलेले ग्रंथ तौरात, इंजील (बायबल) वगैरे वारसाधिकाराने मिळविले आहेत, त्यांच्या बाबतीत ते स्वत:संशय व गोंधळात पडले आहेत. त्यांना विश्वास व भरवसा नाही की आज उपलब्ध असलेल्या ग्रंथामध्ये ज्या गोष्टी निवेदिल्या गेल्या आहेत त्या अगदी तशाच आहेत जशा मूळ ग्रंथात होत्या आता या संशयातून बाहेर पडण्याचे साधन फक्त कुरआन आहे जो अल्लाहचा सुरक्षित ग्रंथ आहे.

३०. म्हणजे जेव्हा अशी परिस्थिती आहे की लोकांनी आपले वेगवेगळे धर्म बनविले आहेत आणि विभिन्न पंथामध्ये विभागले गेले आहेत तेव्हा तुमचे काम त्या सर्वांना सत्य धर्माचे आवाहन करण्याचे, व स्वत: या धर्मावर स्थैर्यशील राहण्याचे आहे.

या ठिकाणी ही धर्म-प्रस्थापनेचा हा पैलू प्रकट आहे की, सत्य धर्मावर स्वत: ही कायम रहा व इतरांना ही त्याचे आवाहन करा.

३१. म्हणजे धर्म-संदर्भात अनुसरण केवळ ईश-संदेशाचे व्हायला हवे, लोकांच्या मर्जीचे नव्हे लोकांनी जेव्हा आपल्या इच्छा-आकांक्षांना धर्मात दाखल करून घेतले तेव्हा यात निरनिराळया प्रकारच्या नवीन गोष्टींना फाटा फुटला. येथपावेतो की धर्माचे मूळ स्वरूपच पार विघडून गेले. आणि नवनवीन धर्म अस्तित्वात आले. याचा अपरिहार्य निष्कर्ष हा निघाला की लोक वेगवेगळया पंथ-संप्रदायत विभागले गेले.

३२. म्हणजे अशा वैभवाचा ग्रंथ की तो सत्याला परखड शैलीत प्रस्तुत करतो.

३३. म्हणजे एखाद्या व्यक्ति किंवा संप्रदायाची तरफदारी करू नका आणि एखाद्या व्यक्ति किंवा धर्माविरूद्ध से बोलू नका जे न्यायाच्या विपरीत असावे. किबंहुना सडेतोड न्यायाची गोष्ट बोलणे तुमच्या पदाचे कर्तव्य आहे.

३४. अर्थात प्रमाणे स्पष्ट झाल्यानंतर ही जर तुम्ही मान्य करीत नाही तर विवाद संपला पाहीजे. मामला अल्लाहच्या न्यायालयाच्या अधीन आहे. तिथे या तंटयाचा निवाडा केला जाईल.

वَالَّذِينَ يُحَاجُّونَ فِي اللَّهِ مِنْ بَعْدِ مَا اسْتُجِيبَ لَهُ حُجَّتُهُمْ
دَاحِضَةٌ عِنْدَ رَبِّهِمْ وَعَلَيْهِمْ غَضَبٌ وَلَهُمْ عَذَابٌ شَدِيدٌ ﴿١٦﴾

१६. जे लोक अल्लाहच्या बाबत भांडण करतात, या नंतर की त्यांच्या बोलाविण्यावर 'लब्बैक' (मी हजर आहे) म्हटले गेले आहे.[३५] त्यांचे प्रमाण त्यांच्या पालन कर्त्या जवळ खोटे आहे [३६] आणि त्यांच्यावर ईश-प्रकोप आहे व त्यांच्या करीता सक्त अजाब (ईश-शिक्षा) आहे.

اللَّهُ الَّذِي أَنْزَلَ الْكِتَابَ بِالْحَقِّ وَالْمِيزَانَ ۗ وَمَا يُدْرِيكَ
لَعَلَّ السَّاعَةَ قَرِيبٌ ﴿١٧﴾

१७. अल्लाहच होय ज्याने ग्रंथ सत्यासह अवतरीत केला आहे आणि तराजू देखील [३७] आणि तुम्हाला काय माहीत, कदाचित कियामतीची वेळ जवळ येऊन ठेपली असेल. [३८]

يَسْتَعْجِلُ بِهَا الَّذِينَ لَا يُؤْمِنُونَ بِهَا ۖ وَالَّذِينَ آمَنُوا
مُشْفِقُونَ مِنْهَا وَيَعْلَمُونَ أَنَّهَا الْحَقُّ ۗ أَلَا إِنَّ الَّذِينَ
يُمَارُونَ فِي السَّاعَةِ لَفِي ضَلَالٍ بَعِيدٍ ﴿١٨﴾

१८. याच्या करीता घाई तेच लोक करतात, जे यावर ईमान बाळगत नाहीत.[३९] ईमान बाळगणारे तर याचे भय बाळगतात.[४०] आणि जाणतात की ती एक वस्तुस्थिती आहे. ऐका ! जे लोक या वेळे विषयी विवादात पडत आहेत, ते मार्गभ्रष्टतेत दूर जाऊन पडलेत.[४१]

اللَّهُ لَطِيفٌ بِعِبَادِهِ يَرْزُقُ مَنْ يَشَاءُ ۖ وَهُوَ
الْقَوِيُّ الْعَزِيزُ ﴿١٩﴾

१९. अल्लाह आपल्या दासांवर मोठा मेहेरबान आहे. तो ज्याला इच्छितो उपजिविका प्रदान करतो आणि तो मोठा सामर्थ्यशाली व वर्चस्वशाली आहे. [४२]

مَنْ كَانَ يُرِيدُ حَرْثَ الْآخِرَةِ نَزِدْ لَهُ فِي حَرْثِهِ ۖ وَمَنْ
كَانَ يُرِيدُ حَرْثَ الدُّنْيَا نُؤْتِهِ مِنْهَا وَمَا لَهُ فِي الْآخِرَةِ
مِنْ نَصِيبٍ ﴿٢٠﴾

२०. जो कोणी आखिरतच्या शेतीचा इच्छुक असतो, आम्ही त्यांची शेती वाढवितो.[४३] आणि जो ऐहिक शेतीचा अभिलाषी असतो, आम्ही त्याला त्यातूनच देतो. परंतु आखिरत मध्ये त्याचा काहीही हिस्सा नाही.[४४]

أَمْ لَهُمْ شُرَكَاءُ شَرَعُوا لَهُمْ مِنَ الدِّينِ مَا لَمْ يَأْذَنْ
بِهِ اللَّهُ ۚ وَلَوْلَا كَلِمَةُ الْفَصْلِ لَقُضِيَ بَيْنَهُمْ ۗ
وَإِنَّ الظَّالِمِينَ لَهُمْ عَذَابٌ أَلِيمٌ ﴿٢١﴾

२१. काय यांचे काही असे सहभागी आहेत, ज्यांनी यांच्याकरीता धार्मिक पद्धती शोधून काढल्या आहेत, ज्याची अल्लाहने मुभा दिली नाही.[४५] जर निर्णयाची गोष्ट (की निश्चित वेळेवर केले जाईल)ठरविली गेली नसती तर यांचा निकाल लावला गेला असता [४६] नि:संशय या अत्याचारी करीता दु:खदायक अजाब (ईश शिक्षा) आहे.

३५. म्हणजे ज्या अर्थी मानव-स्वभावाने आपल्या पालन कर्त्याच्या बोलाविण्यावर होकार भरला आहे. मनुष्य स्वभाव एका ईश्वराशी, जो त्याचा निर्माता आहे. परिचित आहे आणि या जगात येण्यापूर्वी प्रत्येक माणसाचा आत्मा आपल्या खऱ्याखुऱ्या पालन कर्त्यास मान्य करून चुकला आहे. (सूरह अअराफ.आयत क्र.१७२ टीप क्र.२६५ )

३६. म्हणजे अल्लाह बाबतीत अशी प्रमाणे प्रस्तुत करणे जी मनुष्य-स्वभावाशी मेळ खात नाहीत आणि त्याच्या हृदय व विवेकाच्या म्हणण्याविरूद्ध आहेत. वाद विवादा खेरीज काहीही नाही आणि अल्लाहच्या बाबत वादविवाद व तर्क वितर्क लढविणे अगदी असत्य गोष्ट होय.

३७. मिजान (तराजू) म्हणजे न्यायाला कायम करणारी गोष्ट ईश ग्रंथ अर्थात ईश-तुला (Divine Balance) आहे. जो मानव समाजाकरीता न्याय-प्रस्थापनेचे साधन आहे. हा अशा नियम व आदेशांवर आधारीत आहे, ज्यांना आचरणात आणल्याने व ज्यांच्या नुसार तंटयांचा निवाडा केल्याने मामसाची वैयक्तिक व सामूहीक जीवनात न्यायाचा नगारा वाजू लागतो. हा तराजू प्रत्येक गोष्टीचे मूल्य निर्धारीत करतो की कोणते कर्म कशा प्रकारचे महत्व आणि लाभ बाळगते. आणि कोणत्या गोष्टींना धर्मात प्राधान्य प्राप्त आहे. हा तराजू ईश्वराच्या दासांच्या परस्पर-हक्कांचे ही मोजमाप करतो, यासाठी की कोणा वर ही अन्याय न व्हावा.

स्पष्ट असावे की तराजूची उपमा शरीअत (धर्म शास्त्र) ला ही लागू पडते. ज्यातले ईश-आदेश कुरआन व प्रेषित-आचरण दोघांतही निवेदिले गेले आहेत कारण ती एक न्यायपूर्ण व्यवस्था आहे.

३८. म्हणजे अल्लाहने ग्रंथ (कुरआन) व तराजू (न्याय-तुला) यासाठी अवतरीत केला नाही की लोकांकरीता यास मानणे न मानणे एकच व्हावे, किंबहुना यासाठी अवतरीत केला आहे की याला मानण्याचे व न मानण्याचे वेगवेगळे निष्कर्ष जाहीर व्हावेत, ज्याकरीता सर्वश्रेष्ठ अल्लाहने कियामतीचा दिवस निर्धारीत केला आहे, जो नवल नव्हे की जवळच येऊन ठेपला असावा.

३९. म्हणजे ते असे म्हणतात की कियामतीला जर यायचे आहे तर ती येत का नाही. अशा प्रकारे ते कियामतीची थट्टा उडवितात.

४०. म्हणजे अल्लाहच्या न्यायालयात हजर होण्यापासून व त्याच्या समोर आपल्या कर्माचा जाब देण्यापासून ते भयभीत राहतात.

४१. कियामतीचा इन्कार स्पष्टत: मार्गभ्रष्टता आहे आणि या विषयी वादविवादात गुरफटणे म्हणजे मार्गभ्रष्टतेत दूरवर जाणे होय.

४२. या शंकेचे निराकरण होय की, जेव्हा वस्तुस्थिती ती आहे जी वर निवेदिली गेली आहे तर अल्लाह काफिरांना उपजिविका का म्हणून देतो ? फर्माविले, अल्लाह आपल्या दासांवर मेहेरबान आहे यास्तव तो काफिरांना ही उपजिविका देतो. उपजिविकेचा मामला त्याच्या मर्जीवर अवलंबून आहे. तो ज्याला इच्छितो उपजिविका देतो. आणि त्याची मर्जी पूर्ण झाल्याखेरीज राहात नाही. त्याला अडथळा करणारा किंवा प्रतिबंध घालणारा कोणीही नाही. अल्लाह जर आपल्या दासांवर कृपाळू नसता तर इन्कार करण्याची शिक्षा म्हणून त्याने काफिरांना अन्न पाणी मिळू दिले नसते. परंतु तो यांना आचरणाची संधी देतो. या साठी की यांच्या अंगी आपल्या पालन कर्त्याच्या कृपाळू होण्याची जाणीव निर्माण व्हावीव त्यांनी याच्याकडे परतावे.

४३. म्हणजे जो आखिरत करीता बीज पेरेल व त्याला खतपाणी घालील अल्लाह त्याची वाढ करील आणि जेव्हा तो आखिरत मध्ये पोहोचेल तेव्हा आपले पीक भरघोस तयार असल्याचे त्याला दिसून येईल.

ही आयत आणि कुरआनातील इतर अनेक आयती आखिरतला ध्येय-उद्दिष्टच्या स्वरूपात प्रस्तुत करतात म्हणून आखिरतला कर्माकरीता केवळ प्रेरक समजणे योग्य नव्हे. ती प्रेरक ही आहे आणि ध्येय-उद्दिष्ट ही. यास्तव दृष्टी आखिरतच्या यशावरच केंद्रिभूत झाली पाहीजे.

४४. म्हणजे जो मनुष्य आखिरतला ध्येय उद्दिष्ट बनविण्याऐवजी इहलोकास ध्येय उद्दिष्ट बनवितो त्याला जगातल्या सगळयाच वस्तू लाभतात असे नाही, मात्र ज्या प्रमाणात अल्लाह इच्छितो त्याला या जगातच देऊन टाकतो परंतु त्याचा आखिरत मध्ये काहीही हिस्सा राहात नाही कारण जेव्हा याने आखिरतला ध्येय उद्दिष्ट बनविले नाही तेव्हा त्याला आखिरतच्या ईश देणग्या कशा लाभतील. जेव्हा त्याने मरणोत्तर जीवनासाठी काही पेरलेच नाही तर उगवणार कोठून?

४५. म्हणजे काय यांनी आपल्या धार्मिक नेत्या व प्रमुखांना अल्लाहच्या सहभागीचे स्वरूप दिले आहे की त्यांनी यांच्याकरीता धर्म शोधून काढले, ज्याची अल्लाहने मुळीच परवानगी दिलेली नाही या प्रश्नात अनेक महत्वपूर्ण हकीगती लपलेल्या आहेत.

एक ही की ज्या धार्मिक नेत्या व प्रमुखांनी आपल्या तर्फे धर्म तयार केले आहेत किंवा ज्या धर्म-प्रमुखांनी आपल्या तर्फे धार्मिक रीती-रिवाज प्रचलीत केले किंवा अल्लाहच्या कायद्यांच्या विरोधात आपल्या मर्जीने कायदे कानून बनविले त्यांनी स्वत:ला अल्लाहच्या अधिकारात बरोबरीचे जाणले अन्यथा अल्लाहने त्यांना याची मुळीच अनुज्ञा दिली नव्हती की त्यांनी लोकांकरीता

एखादा धर्म शोधून काढावा किंवा धार्मिक पद्धति निर्धारीत करावी अथवा आपल्या मर्जीने धर्मशास्त्र रचावे वा विधिनियम घडवावेत मग ते अल्लाहची शरीअत व त्याच्या विधि नियमांच्या विरूद्ध का असेना.

दुसरी ही की जे लोक आपल्या धर्म प्रमुखांचे व नेत्यांचे अनुसरण करीत आहेत आणि अल्लाहचा धर्म व त्याच्या शरीअतच्या तुलनेने स्वत:निर्धारीत केलेल्या पद्धतिंचे व नियमांचे अनुसरण करीत आहेत. त्यांनी वास्तविक पाहता त्यांना ईश्वराच्या सहभागीचे स्वरूप देऊन ठेवले आहे. मग ते आपल्या तोंडाने यांना ईश्वराचे सहभागी म्हणोत किंवा न म्हणोत. कारण ईश-दासांकरीता धार्मिक रिती रिवाज निर्धारीत करणे किंवा जीवनविषयक नियम बनविणे हा अल्लाहचा हक्क होय. त्याच्या या हक्कात इतरांना सहभागी करणे त्यांना ईश्वराचे सहभागी ठरविण्याच्या अर्था समानच होय.

तिसरी अशी की अल्लाहने मंजूर केलेला धर्म इस्लामच्या खेरीज जे जे धर्म तयार केले गेले आहेत त्यांच्यापैकी कोणत्याही धर्माच्या अनुसरणाकरीता शास्त्रविहीतता नाही. म्हणून ज्या धर्माचे देखील अनुसरण केले जाईल तो अल्लाहचा इन्कार करणारा व अवज्ञाकारी ठरेल.

चौथी अशी की अल्लाहच्या धर्माने ज्या गोष्टींना आपल्या कक्षेत घेतले आहे यांच्या पैकी कोणाच्याही तुलनेत एखादी पद्धत प्रचलीत करण्याचा किंवा कायदा तयार करण्याचा कोणालाही अधिकार नाही. जो मनुष्य असे करतो तो शिर्क करतो.

४६. म्हणजे अंतिम फैसल्याकरीता कियामतीचा दिवस निश्चित केला गेला नसता तर या जगातच निवाडा केला गेला असता.

तो अशा लोकांची दुआ (प्रार्थना) कबूल करतो ज्यांनी ईमान बाळगले व ज्यांनी सत्कर्म केले आणि आपल्या कृपेने त्यांना अधिक प्रदान करतो. राहीलेत काफीर तर त्यांच्या करीता सक्त अजाब (ईश शिक्षा) आहे. (अल-कुरआन)

२२. तुम्ही पहाल की अत्याचारी आपल्या कमाईच्या संकटापासून भीत असतील आणि ते यांच्यावर ओढवल्या खेरीज राहणार नाही. मात्र ज्या लोकांनी ईमान बाळगले आणि ज्यांनी सत्कर्म केले ते जन्नतीच्या बागांमध्ये असतील. ते जे काही इच्छितील, त्यांना त्यांच्या पालन कर्त्याजवळ मिळेल.[४७] हाच होय फार मोठा अनुग्रह.

تَرَى الظّٰلِمِيْنَ مُشْفِقِيْنَ مِمَّا كَسَبُوْا وَهُوَ وَاقِعٌۢ
بِهِمْ ؕ وَالَّذِيْنَ اٰمَنُوْا وَعَمِلُوا الصّٰلِحٰتِ فِيْ رَوْضٰتِ
الْجَنّٰتِ ۚ لَهُمْ مَّا يَشَآءُوْنَ عِنْدَ رَبِّهِمْ ؕ ذٰلِكَ
هُوَ الْفَضْلُ الْكَبِيْرُ ﴿٢٢﴾

२३. हीच ती गोष्ट होय, ज्याची खुशखबर अल्लाह आपल्या त्या दासांना देतो ज्यांनी ईमान बाळगले व सत्कर्म करीत राहीले (हे पैगंबर ! यांना) सांगा, मी या बद्दल काही ही मोबदला मागत नाही, परंतु सान्निध्याचे प्रेम आहे (ज्याची निकड पूर्ण करीत आहे ).[४८] जो कोणी सत्कर्म करील आम्ही त्याच्याकरीता त्याच्या सत्कर्मात वैशिष्टयाची वाढ करू अल्लाह मोठा माफ करणारा आणि मोठा कदर जाणणारा आहे.[४९]

ذٰلِكَ الَّذِيْ يُبَشِّرُ اللّٰهُ عِبَادَهُ الَّذِيْنَ اٰمَنُوْا وَعَمِلُوا الصّٰلِحٰتِ ؕ
قُلْ لَّآ اَسْـَٔلُكُمْ عَلَيْهِ اَجْرًا اِلَّا الْمَوَدَّةَ فِي الْقُرْبٰى ؕ وَمَنْ يَّقْتَرِفْ
حَسَنَةً نَّزِدْ لَهٗ فِيْهَا حُسْنًا ؕ اِنَّ اللّٰهَ غَفُوْرٌ شَكُوْرٌ ﴿٢٣﴾

२४. काय हे लोक म्हणतात की या माणसाने अल्लाह बद्दल खोटे रचले आहे. अल्लाहने इच्छिले तर (हे पैगंबर !) तुमच्या अंत:करणावर मोहर लावील. [५०] तो असत्याचा नाश करतो [५१] आणि सत्यास आपल्या वचनांनी सत्य सिद्ध करून दाखवितो नि:संशय तो अंत: करणांचे भेद जाणतो.[५२]

اَمْ يَقُوْلُوْنَ افْتَرٰى عَلَى اللّٰهِ كَذِبًا ۚ فَاِنْ يَّشَاِ اللّٰهُ يَخْتِمْ عَلٰى
قَلْبِكَ ؕ وَيَمْحُ اللّٰهُ الْبَاطِلَ وَيُحِقُّ الْحَقَّ بِكَلِمٰتِهٖ ؕ اِنَّهٗ
عَلِيْمٌۢ بِذَاتِ الصُّدُوْرِ ﴿٢٤﴾

२५. तोच होय जो आपल्या दासांची क्षमा-याचना कबूल करतो आणि अपराधांना क्षमा करतो. [५३] आणि तुम्ही जे काही करता ते जाणतो.

وَهُوَ الَّذِيْ يَقْبَلُ التَّوْبَةَ عَنْ عِبَادِهٖ
وَيَعْفُوْا عَنِ السَّيِّاٰتِ وَيَعْلَمُ مَا تَفْعَلُوْنَ ﴿٢٥﴾

२६. तो अशा लोकांची दुआ (प्रार्थना) कबूल करतो ज्यांनी ईमान बाळगले व ज्यांनी सत्कर्म केले [५४] आणि आपल्या कृपेने त्यांना अधिक प्रदान करतो. राहीलेत काफीर तर त्यांच्या करीता सक्त अजाब (ईश शिक्षा) आहे.

وَيَسْتَجِيْبُ الَّذِيْنَ اٰمَنُوْا وَعَمِلُوا الصّٰلِحٰتِ وَيَزِيْدُهُمْ مِّنْ
فَضْلِهٖ ؕ وَالْكٰفِرُوْنَ لَهُمْ عَذَابٌ شَدِيْدٌ ﴿٢٦﴾

४७. बागांशी अभिप्रेत जन्नतची बहरलेली स्थाने होत. अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह रूम टीप क्र. २१

४८. हे पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी कुरेश जनसमूहास संबोधिले आहे. ज्यांच्याशी त्यांचे अतिशय जवळचे नाते होते तात्पर्य हे की मी अल्लाहचा जो संदेश तुम्हाला पोहचवित आहे याबद्दल तुमच्याकडून कसल्याही मोबदल्याची अपेक्षा बाळगत नाही, किंबहुना ही तुमच्याशी असलेल्या नात्याचे प्रेम आहे, ज्याची निकड पूर्ण करीत आहे. यासाठी की तुम्ही मी आणलेल्या ईश-संदेशास कबूल करावे. अशा प्रकारे तुम्ही जहन्नमच्या शिक्षेपासून वाचाल व तुम्हाला निरंतर असे यश लाभेल.

आयतीत 'इल्ला' अपवाद म्हणून आहे, जो परंतु किंवा किंबहुना या अर्थाने वापरला गेला आहे आणि हा अशाच प्रकारचा अपवाद होय जसा सूरह फुर्कानच्या आयत क्र. ५७ मध्ये आहे.

قُلْ مَا اَسْئَلُكُمْ عَلَيْهِ مِنْ اَجْرٍ اِلَّا مَنْ شَآءَ اَنْ
يَتَّخِذَ اِلٰى رَبِّهٖ سَبِيْلاً۔ (الفرقان:٥٧)

'सांगा, मी तुमच्या कडून या बद्दल कसलाही मोबदला मागत नाही, मात्र हे की, ज्याला वाटेल त्याने आपल्या पालन कर्त्याचा मार्ग पत्करावा.'

उघड आहे, या ठिकाणी एखाद्याचे आपल्या पालनकर्त्याचा मार्ग अंगिकारणे, पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्याकरीता धर्म प्रसाराचा मोबदला नव्हे. तद्वतच या संदर्भात कुरेशच्या नात्याचे प्रेमाचा हवाला मोबदला या अर्थाने नाही, किंबहुना त्यांची निकड भागविण्याच्या अर्थाने आहे. एखादा पैगंबर धर्म-प्रचाराचे कार्य एक कर्तव्य या नात्याने पार पाडतो. आणि कर्तव्य ही असे जे त्याच्या प्रेषित-पदाचे कर्तव्य असते. परंतु ज्या जन समूहाशी त्याचा नात्याचा संबंध असतो त्याचे स्वभाविक प्रेम त्याला या स्थितीत अधिक बेचैन करते जेव्हा तो जनसमूह कुफ्र (अल्लाहशी इन्कार)चा मार्ग पत्करून अल्लाहच्या शिक्षेला आंमत्रण देतो.

काही भाष्यकारांनी आयतीचे हे स्पष्टीकरण केले आहे की मी तुमच्या कडून या कामाचा कसलाही मोबदला मागत नाही परंतु असे इच्छितो की तुम्ही निदान नाते-संबंधाची कास बाळगा मात्र ही गोष्ट एका पैगंबराच्या स्थानापासून उच्चतम आहे की त्याने आपल्या विरोधकांना नाते-संबंधाच्या प्रेमाची गळ घालावी कुरआनात प्रत्येक पैगंबराच्या मुखातून हीच गोष्ट निघते.

مَا اَسْئَلُكُمْ عَلَيْهِ مِنْ اَجْرٍ اِنْ اَجْرِىَ
اِلَّا عَلٰى رَبِّ الْعَالَمِيْنَ۔ (شعراء:١٠٩)

'मी याबद्दल तुमच्याकडून कसला ही मोबदला मागत नाही. माझा मोबदला सर्व विश्वांच्या पालन कर्त्याच्या जिम्मे आहे.' (शुअरा-१०९)

आणि पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना ताकीद केली गेली की-

قُلْ مَا سَاَلْتُكُمْ مِنْ اَجْرٍ فَهُوَ لَكُمْ اِنْ
اَجْرِىَ اِلَّا عَلَى اللّٰهِ۔ (سبا۔٤٧)

'सांगा, जर मी तुमच्याकडून एखादा मोबदला मागतो तर तो तुमच्या साठीच आहे. माझा मोबदला देण्याची जबाबदारी अल्लाहवर आहे.' (सबा-४७)

तसेच मुसलमानांच्या एका संप्रदायाने, जो हजरत अली यांची इमामत व त्यांच्याविषयी अतिशयोक्ति पूर्ण श्रद्धेस कुरआनाद्वारे सिद्ध करू इच्छितो, اِلَّا الْمَوَدَّةَ فِى الْقُرْبٰى शी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचे नातेवाईक हजरत अली, हजरत फातमा, हजरत हसन व हजरत हुसेन यांचे प्रेम अभिप्रेत घेतो. वस्तुत: ज्या वेळी ही सूरह अवतरली होती त्यावेळी ना हजरत हसन होते आणि ना हजरत हुसेन. आणि पैगंबरांचे अदिकांश नातेवाईक अनेकेश्वरवादी होते म्हणून या वाक्यांशाचा हा अर्थ घेणे कदापि उचित नव्हे की मी धर्म-प्रचाराच्या कामाबद्दल असे इच्छितो की तुम्ही माझ्या नातेवाईकांशी प्रेम भाव बाळगा कुरआनात पैगंबरांच्या नि:स्वार्थ सेवेसंबंधी जे काही फर्माविले गेले आहे आणि ज्या आयतींचा आम्ही वर हवाला दिला आहे त्यांना लक्षात घेता असा अर्थ घेण्यास मुळीच वाव नाही.

४९. अल्लाहतर्फे कदर वाढविणे आहे की ईश-दास जेव्हा त्याच्याकडे सरसावतो व सत्कर्म करतो तेव्हा तो यात अधिक सौंदर्य व वैशिष्टय निर्माण करतो. जर एखाद्या माणसाने बनविलेल्या महालास चांदणे अधिकाधिक सुशोभित करते तर अल्लाह जेव्हा एखाद्या माणसाच्या सत्कर्मास सुशोभित करील तेव्हा त्याच्या शोभा व सौंदर्याची कल्पना ही करता येणार नाही.

५०. म्हणजे जी वही (अर्थात जो ईश संदेश) तुमच्या मनावर अवतरीत होते. तिचा आगमन-क्रम थांबवावा. ही अगदी अशीच गोष्ट होय जशी सूरह बनी इस्राईलमध्ये फर्माविले गेली आहे.

وَلَوْ شِئْنَا لَنَذْهَبَنَّ بِالَّذِىْٓ اَوْحَيْنَا
اِلَيْكَ۔ (بنی اسرائیل۔٨٦)

''आणि आम्ही इच्छिले तर जी वही आम्ही तुमच्यावर अवतरीत केली आहे. तिला हिरावून घेऊ '' (बनी इस्राईल-८६)

आणि याद्वारे हे स्पष्ट करण्याचा हेतु आहे की ही वाणी ईश-संदेश होय, जी अल्लाहने अवतरीत केल्यामुळे अवतरीत झाली आहे आणि त्याने इच्छिले तर या 'वही'ला मिटवू ही शकतो. यात पैगंबराचा स्वत:चा काहीच हस्तक्षेप नाही. यास्तव हा आरोप अगदी निराधार आहे की कुरआन पैगंबरानी रचले आहे.

५१. म्हणजे डोळे उघडून पहा की या ग्रंथाद्वारे सत्य सिद्ध होत आहे किंवा नाही. जर सत्य सिद्ध होत आहे आणि निश्चितच सिद्ध होत आहे तर तो अल्लाहतर्फे अवतरीत होण्याचा उघड पुरावा आहे.

५२. संकेत त्या लोकांकडे आहे, ज्यांना मनात हे जाणवते की हा ग्रंथ सत्य आहे परंतु पक्षपात व अनुचित उद्देश्यांपायी हा सत्य असल्याचे मान्य करीत नाही आणि त्यांचे हे वर्तन त्यांच्या विवेक बुद्धिच्या विरूद्ध असतो परंतु अल्लाह मनाचे भेद जाणतो. म्हणून एक दिवस असा येईल, जेव्हा तो यांना सांगेल की यांनी आपल्या विवेक बुद्धिची कशा प्रकारे गळचेपी केली होती.

५३. हे 'तौबा' (क्षमा-याचने) साठी प्रोत्साहन आहे गुन्हेगारांकरीता अजूनही संधी आहे की त्यांनी तोल सावरावा व अल्लाह समोर माफी मागावी. जो मनुष्य देखील सच्च्या मनाने अल्लाह समोर तौबा करतो, अल्लाह त्याला झिडकारीत नाही, किंबहुना त्याच्या क्षमा-याचनेस कबूल करतो व अपराधांना माफ करतो.

५४. म्हणजे ईमान बाळगा व सत्कर्म करा तर अल्लाह तुमची प्रार्थना निश्चितच ऐकेल, कारण सदाचारी लोकांची प्रार्थना अल्लाह जवळ स्विकृत होते.

स्पष्ट असावे की सत्कर्मी लोकांची प्रार्थना ऐहीक देणग्यांच्या प्राप्ती पेक्षा जहन्नमच्या अजाबपासून वाचण्या करीता व आखिरतच्या यशाच्या प्राप्ती करीता असते आणि अल्लाह त्यांच्या या प्रार्थनांना निश्चितच कबूल करतो.

*जर अल्लाहने आपल्या दासांना विपुलता पूर्वक उपजिविका दिली असती तर ते जमीनीवर अत्याचार करू लागले असते. परंतु तो एका विशिष्ट प्रमाणात ज्या प्रकारे इच्छितो, अवतरीत करतो. तो आपल्या दासांविषयी जाणकार आहे, आणि त्यांना पाहात आहे.(अल-क़ुर्आन)*

२७. जर अल्लाहने आपल्या दासांना विपुलता पूर्वक उपजिविका दिली असती तर ते जमीनीवर अत्याचार करू लागले असते. परंतु तो एका विशिष्ट प्रमाणात ज्या प्रकारे इच्छितो, अवतरीत करतो.[५५] तो आपल्या दासांविषयी जाणकार आहे, आणि त्यांना पाहात आहे.

وَلَوْ بَسَطَ اللّٰهُ الرِّزْقَ لِعِبَادِهٖ لَبَغَوْا فِی الْاَرْضِ وَلٰكِنْ یُّنَزِّلُ بِقَدَرٍ مَّا یَشَآءُ ؕ اِنَّهٗ بِعِبَادِهٖ خَبِیْرٌۢ بَصِیْرٌ ﴿۲۷﴾

२८. तोच होय, जो लोक निराश झाल्यानंतर पाऊस वर्षावितो [५६] आणि आपली कृपा पसरविले. तोच कार्यसाधक आहे, प्रशंसेस पात्र.[५७]

وَهُوَ الَّذِیْ یُنَزِّلُ الْغَیْثَ مِنْۢ بَعْدِ مَا قَنَطُوْا وَیَنْشُرُ رَحْمَتَهٗ ؕ وَهُوَ الْوَلِیُّ الْحَمِیْدُ ﴿۲۸﴾

२९. आणि त्याच्या निशाण्यांपैकी आहे आकाशांची व जमीनीची उत्पत्ति आणि सजीव जे त्याने यांच्यात पसरविले [५९] आणि तो यांना जेव्हा इच्छिल एकत्र,करण्यावर समर्थ आहे.

وَمِنْ اٰیٰتِهٖ خَلْقُ السَّمٰوٰتِ وَالْاَرْضِ وَمَا بَثَّ فِیْهِمَا مِنْ دَآبَّةٍ ؕ وَهُوَ عَلٰی جَمْعِهِمْ اِذَا یَشَآءُ قَدِیْرٌ ﴿۲۹﴾

३०. जे काही संकट तुमच्या प्रत पोहोचते, तुमच्या स्वतःच्या दुष्कृत्यांमुळे पोहोचते.[६०] आणि कित्येक दुष्कृत्यांना तो दृष्टीआड ही करतो.

وَمَاۤ اَصَابَكُمْ مِّنْ مُّصِیْبَةٍ فَبِمَا كَسَبَتْ اَیْدِیْكُمْ وَیَعْفُوْا عَنْ كَثِیْرٍ ﴿۳۰﴾

३१. तुम्ही जमीनीवर त्याच्या कब्ज्याबाहेर जाऊ शकत नाही आणि ना अल्लाहच्या विरोधात तुमचा एखादा कार्यसाधक व सहाय्यक आहे.[६१]

وَمَاۤ اَنْتُمْ بِمُعْجِزِیْنَ فِی الْاَرْضِ ۖۚ وَمَا لَكُمْ مِّنْ دُوْنِ اللّٰهِ مِنْ وَّلِیٍّ وَّلَا نَصِیْرٍ ﴿۳۱﴾

३२. त्याच्या निशाण्यांपैकी समुद्रात चालणारे जहाज आहेत. जणू पहाड .[६२]

وَمِنْ اٰیٰتِهِ الْجَوَارِ فِی الْبَحْرِ كَالْاَعْلَامِ ﴿۳۲﴾

३३. जर त्याने इच्छिले तर हवेला स्थिर करील तर ती तिच्या पातळीवर स्थिर होऊन राहील.[६३] निश्चितच यात निशाण्या आहेत, अशा प्रत्येक माणसाकरीता जो संयमशील व कृतज्ञशील असावा.[६४]

اِنْ یَّشَاْ یُسْكِنِ الرِّیْحَ فَیَظْلَلْنَ رَوَاكِدَ عَلٰی ظَهْرِهٖ ؕ اِنَّ فِیْ ذٰلِكَ لَاٰیٰتٍ لِّكُلِّ صَبَّارٍ شَكُوْرٍ ﴿۳۳﴾

३४. किंवा (त्याने इच्छिले) तर यांच्या दुष्कृत्यांपायी या जहाजांना नष्ट करून टाकील. आणि (इच्छिल्यास) बहुतेक गोष्टींना माफ करील.

اَوْ یُوْبِقْهُنَّ بِمَا كَسَبُوْا وَیَعْفُ عَنْ كَثِیْرٍ ﴿۳۴﴾

५५. या आयतीत एका फार मोठया आर्थिक हकीगतीवरून पडदा हटविला गेला आहे. जगात एखाद्याला विपुल प्रमाणात उपजिविका लाभते तर एखाद्याला मोजून मापून. असे का म्हणून झाले नाही की प्रत्येक माणसाला अगदी विस्तृत प्रमाणात उपजिविका मिळाली असती येथपावेतो की त्याने आपल्या आर्थिक गरजांकरीता दुसऱ्यापुढे हात पसरला नसता. असे करणे अल्लाहकरीता किंचित ही कठीण नव्हते आणि अशाने अल्लाहच्या खजीन्यांमध्ये तिळमात्र कमतरता झाली नसती परंतु दासांच्या हित-कल्याणाची निकड होती की एका विशिष्ट प्रमाणातच यांना उपजिविका दिली जावी. कारण फार मोठया प्रमाणात उपजिविका प्राप्त केल्याने मनुष्य गर्विष्ठ व घमेंडखोर होतो आणि हा गर्व व ही घमेंड त्याला ईश्वराच्या विद्रोही बनविते आणि या गोष्टीस प्रवृत्त करते की इतर लोकांपेक्षा श्रेष्ठत्व प्राप्त करावे. ज्याकरीता तो अत्याचार व अतिरेकाची पायरी गाठतो. या प्रकारे मानव समाजात फार मोठया प्रमाणात रक्तपात झाला असता व हिंसाचार माजला असता. ज्या लोकांसाठी उपजिविकेचे दरवाजे अगदी खुले झाले आहेत त्यांची मनोवृत्ती व त्यांचे आचरण अशाच प्रकारचे आहे आणि या मुळे मानव-समाजात अत्याचार व अतिरेकाची विपुलता झाली आहे. तरी देखील ही स्थिती एका विशिष्ट मर्यादेपर्यंतच आढळून येते. परंतु जर उपजिविकेचे द्वार सर्वांकरीता विस्तृत पणे खुले असते तर अत्याचार व अतिरेकाने अगदी कळस गाठला असता, परिणामी मानव-समाजात फार मोठया प्रमाणात उत्पात माजला असता.

आजच्या काळात जी आर्थिक प्रगती झाली आहे व त्याच्या परिणाम स्वरूपी सुखसम्पन्नता जी सार्वत्रिक होत चालली आहे. त्याच्या संबंधाने, अशांती, अहंकारीता, दहशतवाद व रक्तपात इ. गोष्टींमध्ये ही वाढ होत चालली आहे. जो दिवस देखील उगवतो, उत्पात व हिंसाचाराची भयंकर वार्ता ऐकवितो आणि युद्धात माणसांना मारण्याकरीता अशी संहारक अस्त्रे वापरली जातात की मानवतेचा थरकाप उडावा. मनुष्य-संहारक रासायनिक औषधे आणि अस्त्र-निर्मिता वर अमाप धन खर्च केले जाते यावरून अनुमान लावले जाऊ शकते की जर सर्वश्रेष्ठ अल्लाह लोकांना आणखी जास्त सुख सम्पन्न बनविले तर ते उत्पात, अत्याचार व अतिरेकाचा कसे भयंकर तांडव-नृत्य करू लागतील.

५६. स्पष्टीकरणाकरीता पहा सूरह रूम टीप क्र. ८६

५७. म्हणजे हे सर्व कार्य त्याचेच होय आणि तोच प्रशंसा व कृतज्ञतेस पात्र आहे. त्याच्या खेरीज ना कोणाचा साधनांच्या जगावर अधिकार आहे आणि ना एखादी हस्ती (महापुरूष) ईश-दासांवर कृपा करणारी आहे की जी प्रशंसेस पात्र ठरावी

५८.स्पष्टीकरणाकरीता पहा सूरह बकरा टीप क्र. १९६

५९. जमीनीवर तर सजीव प्राणी पसरलेले आहेत. वातावरणातही पक्षी उडत फिरतात. हे सजीव तर आपल्या जीवाचे ही स्वामी नाहीत मग असा कोण आहे जो यांचा स्वामी व पालन कर्ता आहे. याचे उत्तर या खेरीज आणखी काय असू शकते की तोच ज्याने यांना निर्माण केले व यांना जमीन व अवकाशात पसरविले आहे.

आयतीच्या या शब्दांमध्ये की وَبَثَّ فِيهِمَا ''या दोघांमध्ये (म्हणजे जमीन व आकाशात) सजीव पसरविले'' या गोष्टीकडे संकेत आढळून येतो की आकाश-विश्वात ही सजीव निर्मिती आहे.

६०. आयतीत काफिरांना व अवज्ञाकारींना संबोधिले गेले आहे. त्यांना असे म्हटले जात आहे की ही तुमची दुष्कृत्येच होत, जी तुमच्या करीता काही ना काही संकट घेऊन येतात. एखादा मनुष्य जो दुराचार करतो, त्याचा परिणाम म्हणून त्याच्यावर काही ना काही आपत्ति कोसळते आणि जो समाज दुष्कृत्यांना आत्मसात करतो तो सामूहीक रित्या संकटांना बळी पडतो.

आयतीचा हेतु या हकीगतीस स्पष्ट करतो अन्यथा संकटे सदाचारी माणसांवर ही ओढवतात, ज्या द्वारे त्यांची कसोटी घेण्याचा उद्देश असतो. परंतु या ठिकाणी हा पैलू चर्चातर्गत नाही.

६१. म्हणजे अल्लाह वाटेल तेव्हा तुमचे स्वातंत्र्य नामशेष करू शकतो आणि तुम्ही त्याच्या शिक्षेच्या तावडीत सापडू शकता. ना तुमचे स्वत: चे हे सामर्थ्य आहे की त्याच्या तावडीत सापडण्यापासून स्वत:ला वाचवू शकावे आणि ना तुमचा कोणी कार्यसाधक व मदतनीस होऊ शकतो. जो तुम्हाला यापासून वाचवू शकेल.

६२. म्हणजे मोठ मोठी जहाजे जी पर्वतांसारखी समुद्रात उभी असतात.

६३. त्या काळात फक्त शिडे असलेले जहाज होते जे वाऱ्याविना चालू शकत नव्हते आणि वारे देखील अल्लाहच वाहवितो. जर त्याने हवेचे इतस्तत: वाहणे थांबवले तर या जहाजांचे चालणेच बंद होईल. आणि आजच्या काळात विमानांचा शोध लागला आहे ज्यांचे उडणे हवेवरच अवलंबून आहे. ही या गोष्टीची स्पष्ट निशाणी आहे की साधन-विश्वावर अधिकार बाळगणारा व नियंत्रण ठेवणारा केवळ अल्लाह आहे. मग अन्य एखाद्यास अधिकार बाळगणारा व नियंत्रण राखणारा मानून त्याला आपल्या गरजपूर्ति करीता पुकारण्यात अर्थ काय?

६४. स्पष्टीकरणा करीता पहा सूरह लुकमान टीप क्र. ५३.

३५. आणि (जर नष्ट करील तर अशासाठी की) ते लोक, जे आमच्या आयतींबाबत वाद घालतात त्यांनी जाणून घ्यावे की यांच्याकरीता कोणतीही पळवाट नाही.

وَّيَعْلَمَ الَّذِيْنَ يُجَادِلُوْنَ فِيْٓ اٰيٰتِنَا ۭ مَا لَهُمْ مِّنْ مَّحِيْصٍ ۝٣٥

३६. तुम्हाला जे काही दिले गेले ती केवळ ऐहिक जीवनाची सामुग्री आहे आणि जे काही अल्लाह जवळ आहे ते कितीतरी अधिक चांगले व स्थिर आहे.[६५] त्या लोकांकरीता ज्यांनी ईमान बाळगले आणि आपल्या पालन कर्त्यावर भरवसा ठेवतात.[६६]

فَمَآ اُوْتِيْتُمْ مِّنْ شَيْءٍ فَمَتَاعُ الْحَيٰوةِ الدُّنْيَا ۚ وَمَا عِنْدَ اللّٰهِ
خَيْرٌ وَّاَبْقٰى لِلَّذِيْنَ اٰمَنُوْا وَعَلٰي رَبِّهِمْ يَتَوَكَّلُوْنَ ۝٣٦

३७. जे मोठया अपराधांच्या [६७] व निर्लज्जतेच्या कामांपासून [६८] अलिप्त राहतात आणि जेव्हा राग येतो तेव्हा माफ करतात.[६९]

وَالَّذِيْنَ يَجْتَنِبُوْنَ كَبٰۗىِٕرَ الْاِثْمِ وَالْفَوَاحِشَ وَاِذَا مَا
غَضِبُوْا هُمْ يَغْفِرُوْنَ ۝٣٧

३८. जे आपल्या पालन कर्त्याच्या बोलविण्यावर 'मी हजर आहे, असे म्हणतात [७०] आणि नमाज कायम करतात [७१] आणि आपले व्यवहार एकमेकांच्या सल्ला मसलतीने चालवतात [७२] आणि आम्ही दिलेल्या उपजिविके मधून खर्च करतात.[७३]

وَالَّذِيْنَ اسْتَجَابُوْا لِرَبِّهِمْ وَاَقَامُوا الصَّلٰوةَ ۠ وَاَمْرُهُمْ شُوْرٰى
بَيْنَهُمْ ۠ وَمِمَّا رَزَقْنٰهُمْ يُنْفِقُوْنَ ۝٣٨

३९. आणि जेव्हा यांच्यावर अत्याचार होतो तेव्हा ते आपले संरक्षण करतात.[७४]

وَالَّذِيْنَ اِذَآ اَصَابَهُمُ الْبَغْيُ هُمْ يَنْتَصِرُوْنَ ۝٣٩

४०. आणि वाईट पणाचा बदला तसलाच वाईटपणा होय [७५] मग जो कोणी माफ करील आणि सुधारणा करील तर त्याचा मोबदला अल्लाहच्या जबाबदारीवर आहे [७६] अल्लाह अत्याचारींना पसंत करीत नाही.[७७]

وَجَزٰۗؤُا سَيِّئَةٍ سَيِّئَةٌ مِّثْلُهَا ۚ فَمَنْ عَفَا وَاَصْلَحَ
فَاَجْرُهٗ عَلَي اللّٰهِ ۭ اِنَّهٗ لَا يُحِبُّ الظّٰلِمِيْنَ ۝٤٠

४१. आणि ज्यांनी आपल्यावर अत्याचार झाल्यानंतर बदला घेतला त्यांच्यावर काही आरोप नाही. [७८]

وَلَمَنِ انْتَصَرَ بَعْدَ ظُلْمِهٖ فَاُولٰۗىِٕكَ مَا عَلَيْهِمْ مِّنْ
سَبِيْلٍ ۝٤١

६५. जगात जी काही मालमत्ता माणसाला लाभते ती येथल्या काही दिवसांच्या जीवनापुरतीच असते. जेव्हा मरण येते तेव्हा मनुष्य सर्व काही सोडून जगाचा निरोप घेतो आणि कोणतीही गोष्ट त्याच्या सोबत जात नसते की जी मरणोत्तर जीवनात त्याच्या कामी यावी. या ऊलट आखिरतच्या देणग्या ऐहिक देणग्यांच्या तुलनेने कितीतरी पटींनी अधिक चांगल्या आहेत आणि सदैव बाकी राहणाऱ्या आहेत. आता हे माणसाच्या योग्यतेवर आहे की तो स्वत: करीता हलक्या प्रतीची व तात्पुरत्या सामुग्रीची निवड करतो किंवा उच्च प्रतीची व सदैव टिकणाऱ्या साधन सामुग्रीची निवड करतो. जर तो पहिल्या गोष्टीची निवड करतो तर हे जग त्याचे ध्येय-उद्दिष्ट ठरेल. आणि तो आपल्या आचार-विचारात आखिरत (मरणोत्तर जीवना) ला दृष्टीआड करील. परंतु जर दुसऱ्या गोष्टीची निवड करतो तर त्याच्या आचार-विचारात आखिरतचे वर्चस्व असेल आणि तो आखिरतलाच आपले ध्येय-उद्दिष्ट जाणून जीवन व्यतीत करील.

६६. या ठिकाणी त्या लोकांचे गुण विशेष वर्णिले जात आहेत जे आखिरतच्या देणग्यांनी सम्पन्न होतील. त्यांचा सर्वात प्रथम गुणविशेष हा आहे की ते त्या गोष्टींवर ईमान बाळगतात ज्यावर ईमान बाळगण्याचे आवाहन कुरआनने केले आहे. मग या ईमानाचा हा प्रभाव आहे की त्यांच्या अंगी ईश-भरवशाचा गुणविशेष निर्माण झाला यास्तव यांचा भरवसा साधनांच्या विश्वावर नाही, किंबहुना साधन निर्माण करणाऱ्यावर असतो.

अल्लाहवरील भरवसा असा की माणसाने अधिकाधिक चांगली उपाय योजना करावी. परंतु सर्व काही प्रयत्नांनाच जाणू नये किंबहुना या विश्वासाने मामला अल्लाहच्या सुपूर्द करावा की तेच होते जे अल्लाहला मंजूर असते आणि ही वस्तुस्थिती आहे की एखादी उपाय योजना त्याच वेळी कामी येते जेव्हा अल्लाहची मर्जी त्याकरीता अनुकूलता निर्माण करते.

स्पष्ट असावे की इस्लाम आणि कुफ्रच्या संघर्षात अल्लाहवरील भरवसा ईमान बाळगणाऱ्यांकरीता अतिशय आवश्यक आहे आणि याच अनुषंगाने त्यांचा हा गुणविशेष प्रकट केला गेला आहे.

६७. कबीरा गुन्हा (मोठे अपराध) च्या स्पष्टीकरणासाठी पहा सूरह निसा टीप क्र. ७९.

६८. इच्छा (निर्लज्जतेच्या कामा)च्या स्पष्टीकरणासाठी पहा सूरह अनआम टीप क्र. २७७

६९. एखाद्या व्यक्तिकडून इजा पोहोचल्यावर राग येणे अगदी स्वभाविक आहे. परंतु त्याकडे काना डोळा करणे व माफ करणे हे ईमान बाळगणाऱ्याचे सर्वात उत्कृष्ट वैशिष्टय होय. हा गुणविशेष भावनांवर नियंत्रण, ईश्वराच्या दासांशी सद्वर्तन आणि न्यायाकडे प्रवृत्त करते. राग गिळणे निश्चितच फार मोठा गुण आहे परंतु याहून मोठा गुण असा की राग आल्यावर अपराध्याला माफ केले जावे. परंतु जे लोक अल्लाहशी निडर असतात ते रागाच्या भरात अनावर होतात आणि अत्याचार व अतिरेकाची पायरी गाठथात.

७०. म्हणजे आपल्या पालन कर्त्याचा प्रत्येक आदेश मन:पूर्वक ऐकतात व त्याला कबूल करतात याऊलट नामधारी मुसलमानांची दशा अशी असते की ते आपल्या पालन कर्त्याच्या आवाहनास ऐकण्यास ही तयार नसतात आणि ना त्यांना त्याचे आदेश ऐकण्यात काही स्वारस्य असते.

७१. म्हणजे नमाज नियमितपणे पढतात व या कर्तव्यास मोठया इतमामने पार पाडतात ज्यात मनाची विनम्रता ही असते आणि शालीनता व समाधान ही तसेच या गोष्टीची पर्वा देखील ज्यांची पर्वा करणे शरीअतने आवश्यक ठरविले आहे.

नमाज कायम करणे एक सर्वकष परिभाषा आहे, ज्यात जमात सह नमाज अदा करणे व त्याकरीता पंक्तिबद्ध होणे देखील सामील आहे. हदीस वचनातील उल्लेखानुसार-

سَوُّوا صُفُوفَكُمْ فَإِنَّ تَسْوِيَةَ الصُّفُوفِ
مِنْ إِقَامَةِ الصَّلٰوةِ۔ (بخاری کتاب الصلوة)

''रांगा दुरूस्त ठेवा कारण रांगा दुरूस्त ठेवणे इकामते सलात (नमाज कायम करण्या) पैकी आहे.'' (बुखारी-किताबुस्सलात)

या संदर्भात आणखी एक हदीस वचन असे-

صَلُّوا كَمَا رَأَيْتُمُونِي أُصَلِّيْ۔
(بلوغ المرام بروایۃ البخاری)

'अशाच प्रकारे नमाज पढा, ज्या प्रकारे तुम्ही मला नमाज पढतांना पाहता' (बुखारी)

या करीता कुरआन व प्रेषित-आचरणात नमाजची जी पद्धत सांगितली गेली आहे त्यानुसार नमाज अदा केल्यानेच इकामते सलातचे उद्दिष्ट पूर्ण होऊ शकते.

७२. मूळ शब्द 'अम्र'शी अभिप्रेत सामूहीक व्यवहार होत ज्यांना एका व्यवस्थेची निकड असते. तद्नुषंगे त्या लोकांना ज्यांच्या हाती सामूहीक व्यवहारांची सूत्रे असतात त्यांना असहाबे अम्र (सूत्रधार) म्हटले जाते. या ठिकाणी ईमान बाळगणाऱ्यांचा एक महत्वपूर्ण गुण म्हणून ही गोष्ट निवेदिली गेली आहे की त्यांचे व्यवहार परस्पर सल्ला मसलतीने पार पडतात.

स्पष्ट असावे की ही सूरह मक्की आहे आणि मक्की काळात

मुसलमान या स्थितीत नव्हते की आपली राजकीय व्यवस्था कायम केली असती. तरी देखील सल्ला मसलतीने व्यवहार पार पाडण्याची ताकीद केली गेली, ज्याचा अर्थ असा होता की काफिरांची सत्ता असतांनाही मुसलमान आपल्या ज्या सामूहीक गोष्टी व समस्यांच्या संदर्भात एखादा निर्णय घेऊ शकतात व एखादे पाऊल उचलू शकतात त्या गोष्टी व समस्यांसाठी त्यांनी सल्ला मसलतीचा मार्ग अंगिकारावा. हे फार मोठे मार्गदर्शन आहे त्या मुसलमानां करीता ही जे एखाद्या इस्लामेतर देशात राहतात. त्यांनी आपल्या धार्मिक समस्यां बाबत एक संघपणे सल्ला मसलतीच्या व्यवस्थेचा इतमाम राखला पाहीजे, जेणकरून मुस्लिम समुदायाचे योग्य प्रतिनिधित्व व्हावे आणि त्याच्या निर्णयांना संपूर्ण समाजाने आचरणात आणू शकावे.

या आयतीत सल्ला मसलतीस ज्या महत्वपूर्णतेसह प्रस्तुत केले गेले आहे तो इस्लामच्या राजकीय व्यवस्थेचा फार मोठा आधार आहे. म्हणजे मुसलमानांमध्ये सत्ताधिकार तेच लोक सांभाळतील, ज्यांना ते या कामासाठी निवडतील. मनमानी करणाऱ्या व्यक्तिंचा यावर दबाव असणे मोठी अतिरेकाची बाब होय. ही सल्ला मसलत हुकूमशाही आणि मुलुकियत (ज्यात बादशाहालाच सर्वाधिकार प्राप्त असतात) ची पाळे मुळे खणून काढते. मग आजच्या काळातील लोकाशाही आणि इस्लामच्या सल्ला मसलतीत तात्विक फरक असा की लोकशाही निर्बंध व स्वैर असते. जर तिला काही पायबंद असतो; तर आपणच तयार केलेल्या घटनेचा, म्हणून तिचे फैसले सत्य -विरोध,वाईट गोष्टींना बढावा देणारे आणि अत्याचार व अतिरेक वर आधारीत असतात. या ऊलट इस्लामी सल्ला मसलत अल्लाहचे आदेश व त्याच्या प्रेषिताच्या मार्गदर्शनाच्या अधीन असते. ती या गोष्टीस समर्थ नसते की शरीअतच्या विरूद्ध एखादा फैसला करावा किंवा शरीअतच्या मर्यादांचे उल्लंघन केले जावे. ती ईश-ग्रंथ व सुन्नतच्या प्रकाशात उद्‌भवणाऱ्या समस्यांवर विचार चिंतन करते आणि यांच्याच प्रकाशात फैसले करते.

विचार विनामयाचा फैसला त्यालाच म्हटले जाऊ शकते ज्यावर सर्वांचे एकमत असावे किंवा ज्याच्या समर्थनार्थ सल्ला करणाऱ्यांपैकी जास्त जण असावेत. एकटया अमीर किंवा खलीफाचे मत हे सर्वांच्या सल्ला मसलतीने घेतलेला फैसला ठरू शकत नाही आणि ना विचार विनिमय करणाऱ्यांपैकी अल्पसंख्यांकांच्या मतास सर्वांचा फैसला या अर्थाने घेतले जाऊ शकते. कारण कोणत्याही बाबतीत आदेश वर्चस्वशाली गोष्टीचाच असतो आणि जर अमीर (प्रमुख) सल्ला मसलत करणाऱ्यांपैकी अधिकांश लोकांच्या निर्णयास मानणारा नसेल तर सल्ला मसलत अर्थशून्य ठरते. स्ल्ला मसलतीसाठी तेच लोक योग्य असू शकतात जे ईश-भय बाळगणारे, स्पष्टवक्ते व भरवशा योग्य असावेत, व्यभिचारी, दुराचारी व निम्नस्तरीय लोक समस्यांचा गुंता सोडविण्याऐवजी उलट गुंता वाढवितात.

आयतीत नमाज सोबतच सल्ला-मसलतीचा उल्लेख केला गेला आहे. हा या गोष्टीकडे संकेत आहे की सल्ला-मसलत नमाजचा लाभ आहे आणि तिच सल्ला मसलत मांगल्या व समृद्धी कारक होऊ शकते जी नमाज कायम करणारी आसावी. बेनमाजी लोक सल्ला मसलतीसाठी मुळीच योग्य नव्हेत. या प्रसंगी सूरह आले इमरानची आयत

وَشَاوِرْهُمْ فِي الْاَمْرِ ۔ (آیت: ۱۵۹)

(आयत १५९) चे स्पष्टीकरण टीप क्र. ९१ ला दृष्टीपथात राखले जावे.

७३. अभिप्रेत अल्लाहच्या मार्गात खर्च करणे होय. ज्यात जकात, सदका आणि धार्मिक उद्देश्यांकरीता खर्च करणे सामील आहे. (पहा सूरह बकरा आयत क्र. २६४. अन्फाल आयत क्र. ६०, तौबा-आयत. २३)

७४. मूळ शब्द इन्तेसार ज्याचा अर्थ अरबी भाषेत संरक्षण करण्याकरीता ही आहे आणि बदला घेण्याकरीता ही. इस्लामची शिकवण ही मुळीच नाही की, वाटेल तेवढा अत्याचार झाला तरी सहन करा व प्रत्युत्तर म्हणून काही कारवायी करण्याचा तुम्हाला मुळीच हक्क नाही. हा धर्म एक आचरण व्यवस्था आहे. केवळ काल्पनिक गोष्टी व आचरणात न आणण्याजोग्या दृष्टीकोनांचा संग्रह नव्हे; म्हणून तो ना अहिंसा वादाशी सुसंगत आहे आणि ना ख्रिश्चन मताच्या या शिकवणीशी की जर एखाद्याने तुमच्या एका गालावर चापट मारली तर तुम्ही दुसरा गाल त्याच्यापुढे करा. इस्लाम हिंसेचे उत्तर हिंसेने देण्याची व शत्रूला नामोहरम करण्याची परवानगी देतो परंतु या शर्तीवर की न्यायाचा मार्ग सुटता कामा नये, जसे नंतरच्या आयतीवरून स्पष्ट आहे. वास्तविक इस्लामने प्रत्येक प्रकारच्या परिस्थितीची तमा बाळगली आहे आणि वेगवेगळया स्वभावांना नंतर पुढे ठेवले आहे. कधी कधी परिस्थितीला या गोष्टीची निकड जाणवते की हिंसाचाराचे उत्तर हिंसाचाराने दिले जावे. यासाठी की अत्याचाराचा जोर नाहीसा व्हावा आणि काही गोष्टींच्या बाबतीत प्रत्येक वेळी माफ करणे सयुक्तिक ठरू शकत नाही. यास्तव इस्लामने जी शिकवण दिली आहे ती संतुलनावर आधारीत आहे. त्याने बदला घेण्यास दुषित ठरविले नाही, उलट याची परवानगी दिली आहे आणि त्यासोबत संयम पाळण्यास व दृष्टीआड करण्यास प्रोत्साहन ही दिली आहे आणि या बाबत हिम्मत वाढविली आहे.

राहीले हजरत ईसा यांचे ते कथन जे बायबलमध्ये त्यांच्या संबंधाने निवेदिले गेले आहे-

'' डोळयाबद्दल डोळा व दातांबद्दल दांत असे सांगितले होते, हे तुम्ही ऐकले आहे मी तर तुम्हाला सांगतो, दृष्टीला अडवू नका. जो कोणी तुझ्या उजव्या गालावर मारितो त्याच्याकडे दुसरा गाल कर, जो तुझ्यावर फिर्याद करून तुझी बंडी घेऊ पाहतो त्याला तुझा अंगरखाहि घेऊं दे.'' (मत्तय ५: ३८-४०)

तेव्हा हजरत ईसा यांचा उद्देश, तौरातच्या या आदेशास जो बदल्या संबंधी आहे, रद्द करण्याचा नव्हता, किंबहुना तत्कालीन परिस्थितीत त्यांनी आपल्या मोजक्या अनुयायींना जे अशा स्थिती नव्हते की एखादी उलट कारवायी करू शकतील धीर राखण्याची ताकीद केली आणि रूपक शैलीत फर्माविले की जर कोणी तुमच्या गालावर एक चापट मारील तर तुम्ही दुसरा गाल ही त्याच्या पुढे करावा याचा अर्थ हा की रोमन शासन व दुराचारी घटक तुमच्यावर अत्याचार करतील आणि तुमच्या जवळ आपल्या संरक्षणाची काहीच सामुग्री नसेल अशा परिस्थितीत तुम्ही या गोष्टीकरीता तयार राहीले पाहीजे की एका गालावर चापट बसल्यावर दुसऱ्या गालावर ही खावी लागेल. हे एक नैतिक मार्गदर्शन होते, शरीअतविषयक नियमाची गोष्ट नव्हे. आणि ह्या नैतिक मार्गदर्शनाचा ही तो अर्थ नव्हता जो ख्रिश्चनांनी लक्षात घेतला. किंबहुना एक रूपक आहे जसे वर स्पष्ट केले गेले आहे आणि लूका कृत बायबल मध्ये ही हे मार्गदर्शन अशा प्रकारे निवेदिले गेले आहे की तौरातच्या या आदेशाचा की डोळयाच्या बदली डोळा एखादा हवाला नाही आणि हजरत ईसा (येशू) तौरातच्या आदेशांना रद्द करण्या करीता आले नव्हते. म्हणून एखाद्या कथनाचा सरळ सरळ त्यांच्यासाशी संबंध जोडणे, जे तौरातच्या शरीअत विषयक आदेशास रद्द करण्यासारखे आहे, योग्य असू शकत नाही.

७५. म्हणजे जेवढी यातना कोणी दिली आहे, तेवढीच यातना त्याला दिली जाऊ शकते. आणि जेवढे नुकसान एखाद्याने पोहचविले आहे, त्यांच्याकडून तेवढीच भरपाई मागितली जाऊ शकते. आपले संरक्षण करण्यात किंवा बदला घेण्यात न्यायाची बाजू डावलली जाऊ नये. एखाद्याचे जर एखाद्याचा गलास तोडला आहे तर त्याचे प्रत्युत्तर म्हणून त्याच्या घराला आग लावणे अगदी चुकीचे आहे.

७६. प्रोत्साहन दृष्टीआड करण्याचे, तडजोड करण्याचे व सुधारणेचे काम करण्याचेच होय. आणि या कामाबद्दल सर्वश्रेष्ठ अल्लाहने मोबदला देण्याचा वायदा केला आहे.

७७. यात अशी ताकीद आहे की जर तुम्ही बदला घेण्यात मर्यादेचे उल्लंघन केले तर लक्षात ठेवा हा अत्याचार होईल आणि अल्लाह अत्याचारी लोकांना मुळीच पसंत करीत नाही.

७८. म्हणजे अत्याचार पिडीतास हा हक्क पोहचतो की त्याने अत्याचार करण्याऱ्यांशी बदला घ्यावा. यास्तव जर एखादा अत्याचार पिडीत अत्याचारीचा बरोबरीने सूड घेतो तर त्याची निंदा करण्याचे काही कारण नाही. याबाबत त्याच्या वर कसलाही दोषारोप ठेवला जाणार नाही.

४२. आरोप तर त्या लोकांवर आहे जे लोकांवर अत्याचार करतात आणि जमीनीवर नाहक विद्रोह करतात. [७१] अशा लोकांकरीता दुख:दायक अजाब (ईश-शिक्षा) आहे.

إِنَّمَا السَّبِيلُ عَلَى الَّذِينَ يَظْلِمُونَ النَّاسَ وَ يَبْغُونَ فِي
الْأَرْضِ بِغَيْرِ الْحَقِّ ۚ أُولَٰئِكَ لَهُمْ عَذَابٌ أَلِيمٌ ﴿٤٢﴾

४३. मात्र ज्याने संयम पाळला आणि माफ केले तर हे मोठे महानतेचे काम होय. [८०]

وَلَمَنْ صَبَرَ وَغَفَرَ إِنَّ ذَٰلِكَ لَمِنْ عَزْمِ الْأُمُورِ ﴿٤٣﴾

४४. ज्याला अल्लाह मार्गभ्रष्ट करील तर त्या नंतर त्याचा कोणी कार्यसाधक नाही.[८१] तुम्ही अत्याचारींना पाहाल की जेव्हा ते ईश-शिक्षा पाहतील, तेव्हा म्हणतील, आहे एखादा परतीचा मार्ग ?[८२]

وَمَنْ يُضْلِلِ اللَّهُ فَمَا لَهُ مِنْ وَلِيٍّ مِنْ بَعْدِهِ ۗ وَتَرَى الظَّالِمِينَ
لَمَّا رَأَوُا الْعَذَابَ يَقُولُونَ هَلْ إِلَىٰ مَرَدٍّ مِنْ سَبِيلٍ ﴿٤٤﴾

४५. आणि तुम्ही पाहाल की त्यांना जहन्नम समोर अशा प्रकारे सादर केले जाईल की अपमानाने झुकलेले, खालच्या नजरेने पाहत असतील.[८३] त्यावेळी ईमान बाळगणारे म्हणतील की, खऱ्या अर्थाने तोटयात राहणारे तेच होत ज्यांनी कियामतीच्या दिवशी स्वत:ला व आपल्या संबंधितांना तोटयात टाकले.[८४] खबरदार! हे अत्याचारी कायम राहणाऱ्या अजाब मध्ये असतील.[८५]

وَتَرَاهُمْ يُعْرَضُونَ عَلَيْهَا خَاشِعِينَ مِنَ الذُّلِّ يَنْظُرُونَ مِنْ
طَرْفٍ خَفِيٍّ ۗ وَقَالَ الَّذِينَ آمَنُوا إِنَّ الْخَاسِرِينَ الَّذِينَ خَسِرُوا
أَنْفُسَهُمْ وَأَهْلِيهِمْ يَوْمَ الْقِيَامَةِ ۗ أَلَا إِنَّ الظَّالِمِينَ
فِي عَذَابٍ مُقِيمٍ ﴿٤٥﴾

४६. आणि यांचा कोणी मित्र नसेल, जो अल्लाहच्या विरोधात यांची मदत करू शकेल. आणि ज्याला अल्लाह मार्गभ्रष्ट करील त्याच्याकरीता कोणताही मार्ग नाही.

وَمَا كَانَ لَهُمْ مِنْ أَوْلِيَاءَ يَنْصُرُونَهُمْ مِنْ دُونِ اللَّهِ ۗ وَمَنْ يُضْلِلِ
اللَّهُ فَمَا لَهُ مِنْ سَبِيلٍ ﴿٤٦﴾

४७. आपल्या पालन कर्त्याचे आवाहन कबूल करा, या आधी की अल्लाह तर्फे एक असा दिवस यावा ज्याला टाळले जाऊ शकणार नाही, [८६] त्या दिवशी तुमच्या करीता कोणतेही आश्रय स्थान नसेल आणि ना तुम्ही (ईश-शिक्षे)ला हटवू शकाल. [८७]

اسْتَجِيبُوا لِرَبِّكُمْ مِنْ قَبْلِ أَنْ يَأْتِيَ يَوْمٌ لَا مَرَدَّ لَهُ مِنَ اللَّهِ ۚ
مَا لَكُمْ مِنْ مَلْجَإٍ يَوْمَئِذٍ وَمَا لَكُمْ مِنْ نَكِيرٍ ﴿٤٧﴾

७९. म्हणजे निंदनीय लोक ते होत जे अल्लाहच्या दासांवर अत्याचार करतात आणि अल्लाहशी विद्रोह करणारे बनतात. आणि समाजात उत्पात माजवितात. पकड अशाच लोकांची होईल.

८०. म्हणजे जर एखाद्याने अत्याचार केलाच तर त्यावर संयम पाळणे, व दुर्लक्ष करणे व आपल्या शत्रूस माफ करणे ही फार मोठी नैतिकता होय. हा असा गुण विशेष होय जो माणसाच्या चारित्र्यास मजबूत करतो व त्याची हिम्मत वाढवितो. हे असे काम होय जे माणसाला धैर्यवान बनविते.

८१. म्हणजे असा कोणी नाही जो त्याला मार्गदर्शन देऊ शकेल व त्याच्या प्रयत्नांना उचित वळण लावू शकेल. त्याचा असा कोणताही मित्र नसेल जो त्याच्या प्रयत्नांना परिणाम कारक व त्याच्या कामांना निर्णायक बनविल.

८२. म्हणजे जगात परतीचा एखादा मार्ग आहे की तिथे जाऊन ईमान बाळगले जावे व सदाचारी बनावे.

८३. म्हणजे ज्या प्रकारे एक अपराधी दिल्या जाणाऱ्या शिक्षेपासून नजरा वळविण्याचा प्रयत्न करतो. तिच दशा त्या लोकांची ही होईल. ते जहन्नमला बघण्यापासून नजर चुकवतील. त्या अपराध्यांची अवहेलना व अगतिकतेचे चित्र होय.

८४. म्हणजे त्या दिवशी ईमान बाळगणारे तत्क्षणी उद्‌गारतील की मूळ खसारा (तोटा) ऐहीक तोटा नव्हता, किंबहुना आखिरतचा तोटा आहे. यास्तव ज्या लोकांनी आखिरतला दृष्टीआड केले होते त्यांना आज निरंतर स्वरूपाच्या तोटयाला तोंड द्यावे लागेल तसेच यांचे आप्त-स्वकीय ही ज्यांना यांनी चुकीचे मार्गदर्शन केले होते व ते यांच्या मागे चालून मार्गभ्रष्ट झाले होते.

८५. म्हणजे आखिरतचा सदैव कालीन अजाब.

८६. शब्दशैली मनुष्य-स्वभावाला मोठी अपील करणारी आहे. कुरआनाचे आवाहन प्रत्येक व्यक्ति करीता आपल्या पालनकर्त्याचे आवाहन आहे म्हणून तुम्ही आपल्या पालन कर्त्याच्या आवाहनास प्रतिसाद द्या व त्याचे आवाहन कबूल करून आपल्या आखिरत विषयक मुक्तिची उपाय योजना करा. कियामतीचा दिवस तर अपरिहार्यत: येणारच आहे. असा कोणी नाही जो याला टाळू शकेल.

८७. म्हणजे हे तुमच्या अवाक्यात नसेल की अजाब (ईश-शिक्षे)ला दूर करू शकावे किंवा जे फरिश्ते तुम्हाला बंदिस्त करू इच्छितील त्यांना तसे करण्यापासून रोखू शकावे.

४८. परंतु जर हे तोंड फिरवितात तर (हे पैगंबर!) आम्ही तुम्हाला यांच्यावर देखरेख ठेवेणारा बनवून पाठविले नाही.[८८]तुमच्या वर केवळ (संदेश) पोहचविण्याची जबाबदारी आहे. आणि माणसाला जेव्हा आम्ही आपल्या कृपेची गोडी चाखवितो, तेव्हा यावर तो शेफारू लागतो आणि जर याच्या दुष्कृत्यांपायी एखादे संकट त्याच्यावर येते तेव्हा तो कृतघ्न बनतो.[८९]

فَإِنْ أَعْرَضُوا فَمَا أَرْسَلْنَاكَ عَلَيْهِمْ حَفِيظًا ۖ إِنْ عَلَيْكَ إِلَّا الْبَلَاغُ ۗ وَإِنَّا
إِذَا أَذَقْنَا الْإِنْسَانَ مِنَّا رَحْمَةً فَرِحَ بِهَا ۖ وَإِنْ تُصِبْهُمْ سَيِّئَةٌ
بِمَا قَدَّمَتْ أَيْدِيهِمْ فَإِنَّ الْإِنْسَانَ كَفُورٌ ﴿٤٨﴾

४९. आकाशांची व जमीनीची राज्य सत्ता अल्लाह करीताच आहे. जे इच्छितो ते निर्माण करतो. ज्याला इच्छितो मुली देतो आणि ज्याला इच्छितो मुले देतो.

لِلَّهِ مُلْكُ السَّمَاوَاتِ وَالْأَرْضِ ۚ يَخْلُقُ مَا يَشَاءُ ۚ يَهَبُ لِمَنْ
يَشَاءُ إِنَاثًا وَيَهَبُ لِمَنْ يَشَاءُ الذُّكُورَ ﴿٤٩﴾

५०. किंवा त्यांना मुळे व मुली दोन्ही प्रदान करतो आणि ज्याला इच्छितो नि:संतान ठेवतो. तो जाणणारा, सामर्थ्यशाली आहे.[९०]

أَوْ يُزَوِّجُهُمْ ذُكْرَانًا وَإِنَاثًا ۖ وَيَجْعَلُ مَنْ يَشَاءُ عَقِيمًا ۚ إِنَّهُ عَلِيمٌ
قَدِيرٌ ﴿٥٠﴾

५१. एखाद्या माणसाची ही शान नव्हे की अल्लाहने त्याच्याशी संभाषण करावे, परंतु 'वहय' (संदेशा) च्या माध्यमात किंवा पडद्या मागून किंवा हे की एखाद्या फरिश्त्यास पाठवावे,जो त्याच्या आदेशाने संदेश पोहचविल जो तो इच्छिल.[९१] तो अत्युच्च दर्जा आणि बुद्धि कौशल्य बाळगणारा आहे.[९२]

وَمَا كَانَ لِبَشَرٍ أَنْ يُكَلِّمَهُ اللَّهُ إِلَّا وَحْيًا أَوْ مِنْ وَرَاءِ حِجَابٍ
أَوْ يُرْسِلَ رَسُولًا فَيُوحِيَ بِإِذْنِهِ مَا يَشَاءُ ۚ إِنَّهُ عَلِيٌّ حَكِيمٌ ﴿٥١﴾

५२. आणि अशा प्रकारे (हे पैगंबर!) आम्ही तुमच्या कडे एक आत्मा आपल्या हुकुमाने वह्य केला आहे.[९३] तुम्ही जाणत नव्हते की ग्रंथ काय आहे व ईमान काय आहे.[९४] परंतु आम्ही त्यास एक दिव्य प्रकाश [९५] बनविले, ज्याद्वारे आम्ही मार्गदर्शन करतो आपल्या दासांपैकी ज्याला इच्छितो आणि निश्चितच तुम्ही सरळ मार्गाकडे मार्गदर्शन करीत आहात.[९६]

وَكَذَٰلِكَ أَوْحَيْنَا إِلَيْكَ رُوحًا مِنْ أَمْرِنَا ۚ مَا كُنْتَ تَدْرِي مَا الْكِتَابُ
وَلَا الْإِيمَانُ وَلَٰكِنْ جَعَلْنَاهُ نُورًا نَهْدِي بِهِ مَنْ نَشَاءُ مِنْ عِبَادِنَا ۚ
وَإِنَّكَ لَتَهْدِي إِلَىٰ صِرَاطٍ مُسْتَقِيمٍ ﴿٥٢﴾

५३. अल्लाहच्या मार्गाकडे जो आकाशांच्या व जमीनीच्या समस्त वस्तूंचा स्वामी आहे. सावध व्हा ! समस्त व्यवहार अल्लाहकडेच परततात.[९७]

صِرَاطِ اللَّهِ الَّذِي لَهُ مَا فِي السَّمَاوَاتِ وَمَا فِي الْأَرْضِ ۗ أَلَا إِلَى
اللَّهِ تَصِيرُ الْأُمُورُ ﴿٥٣﴾

८८. पैगंबराना संबोधून आहे की तुम्ही त्या लोकांच्या आचरणास जबाबदार नाहीत की त्यांना जबरदस्ती पूर्वक सन्मार्गाला लावावे.

८९. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह रूम टीप क्र.६४,६५

९०. आकाशांचा व जमीनीचा सत्ताधिकारी केवळ अल्लाह आहे आणि त्याच्या सत्ताधिकाराचे वैभव असे आहे की जे इच्छिल ते निर्माण करावे आणि ज्याला इच्छिल मुली देईल व ज्याला इच्छिल मुले द्यावीत किंवा मुले व मुली दोन्ही प्रदान करावेत. तसेच ज्याला इच्छिल नि:संतान राखावे. तो संपूर्ण ज्ञान व अत्याधिक सामर्थ्यासह सत्ता चालवित आहे. त्याच्या खेरीज असा कोणी नाही जो या गोष्टीचा अधिकार बाळगत असावा की एखाद्याला संतती प्रदान करावी.

याद्वारे जिथे अनेकेश्वरवाद्यांच्या या श्रद्धेचे खंडन होते की अमुक एक देवी-देवता संतती प्रदान करणारे आहेत. तिथे अज्ञानी मुसलमानांच्या या श्रद्धेचेही खंडन होते की अमुक एक पीर किंवा वली संतती प्रदान करतात. या चुकीच्या श्रद्धेपायी स्त्रीया दरगा वगैरे ना हजेरी लावतात आणि संतती करीता पीर औलीयांच्या नावाने नवस मानतात. ही श्रद्धा अगदी खोटी आहे आणि हे कृत्य उघडपणे अनेकेश्वरवादी आहे. परंतु अज्ञानी मुसलमानांनी इस्लाम सोबत यांची सांगड घातली आहे.

९१. म्हणजे कोणताही मनुष्य, मानवी उणीवामुळे हे सहन करू शकत नाही की अल्लाहने त्याच्याशी समक्ष संभाषण करावे कारण अल्लाहचा प्रताप व त्याची महानता अशी आहे की मनुष्य त्याला पाहण्याचे साहस करू शकत नाही. यास्तव हजरत मूसा यांच्या विनंती वर जेव्हा सर्वश्रेष्ठ अल्लाहने पर्वतावर आपली दिव्य तेज प्रकट केले होते तेव्हा तो पर्वत चूर चूर झाला होता आणि हजरत मूसा बेशुद्ध होऊन कोसळले होते (पहा सूरह अअराफ आयत क्र.४३) यास्तव सर्वश्रेष्ठ अल्लाहने आपल्या पैगंबरांशी संभाषण करण्याचा जो मार्ग पत्करला, त्याचे तीन प्रकार होत :-

एक असा की अल्लाहने आपल्या पैगंबराच्या हृदयावर सरळ सरळ (कसल्याही माध्यमाविना) आपला संदेश अवतरीत करावा. मूळ शब्द 'वही' याचा अर्थ जसा टीप क्र.२ मध्ये स्पष्ट केला गेला आहे, संकेत करणे किंवा गुप्तपणे संभाषण करणे असा आहे. सर्वश्रेष्ठ अल्लाह आपल्या पैगंबरांशी गुप्तपणे वार्तालाप करतो व त्याना आपल्या संदेश, आदेश व मार्गदर्शनाविषयी अवगत करतो ज्याला इतर कोणताही मनुष्य ऐकू शकत नाही. संदेश वहनाच्या या अदृश्य माध्यमाचे नाव कुरआनाच्या परिभाषेत 'वही' असे आहे.

दुसरा प्रकार असा की अल्लाहने आपल्या पैगंबरास संभाषण करण्याचा मान प्रदान करावा. परंतु त्याला तो दिसून न याव म्हणजे पैगंबराने अल्लाहचा स्वर व त्याच्या संभाषणास ऐकावे, त्याच्याशी संभाषण ही करावे परंतु स्वत: अल्लाह त्याच्या समोर प्रकट न व्हावा. हजरत मूसा यांच्याशी संभाषण करतांना हीच पद्धत अवलंबिली गेली. यास्तव त्यांना प्रेषित-पद प्रदान करतांना ही संभाषण करण्याचा मान दिला गेला (पहा सूरह ताहा-आयत क्र. ११,१२) आणि कोहेतूर पर्वतावर शरीअत प्रदान करतांना ही.

तिसरा प्रकार असा की अल्लाहने फरिशत्याला संदेश वाहक बनवून पाठवावे, ज्याने त्याच्या संदेशास पैगंबरा पावेतो गुप्तपणे पोहचवावा. या पैकी पहिल्या व तिसऱ्या पद्धतीन्वये पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्यावर वही (ईश-संदेशा) चे अवतरण होत राहीले. हदीस वचनांत या दोन्ही स्थितीचा उल्लेख अशा प्रकारे केला गेला आहे:-

''मोमिनांची (ईमान बाळगणाऱ्यांची) माता हजरत आयशा फर्मावितात की हारीस बिन हिशामने विचारले, हे अल्लाहचे प्रेषित! आपल्या वर ईश संदेश कशा प्रकारे अवतरीत होतो? पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी फर्माविले, कधी तर घंटा-नादा प्रमाणे होतो आणि ही अवस्था मला मोठी जड जाते. मग जेव्हा मी तो (ईश-संदेश) सुरक्षित करून घेतो, तेव्हा ही अवस्था संपते, आणि कधी ही अवस्था असते की फरिश्ता मनुष्य-रूपात माझ्या समोर येतो व माझ्याशी संभाषण करतो, तेव्हा मी ते स्मरणात ठेवतो.

''हजरत आयशा फर्मावितात की मी कडाक्याच्या थंडीच्या दिवशी 'वही' अवतरतांना पाहीली आहे. वही संपताच पैगंबरांची ही दशा होत असे की त्यांच्या कपाळावरून घाम वाहू लागे'' (बुखारी-किताबुल वही)

स्पष्ट असावे की पैगंबरांवर अल्लाहचा संदेश अवतरीत होण्याचा उल्लेख तौरात,जबूर व इंजिल (बायबल) या तिन्ही ईश-ग्रंथात मोठया प्रमाणात आहे. उदाहरणार्थ तौरात मधील उल्लेख असा-

''या गोष्टी घडल्यावर अब्रामास दृष्टांतांत परमेश्वराचे वचन प्राप्त झाले.'' (उप्तत्ति १५:१)

''आणि झुडपांतून देवाने त्यास हाक मारून म्हटले, मोशे, मोशे. तेव्हा तो म्हणाला काय आज्ञा.''(निर्गम ३:४)

''मग परमेश्वर मोशेला महणाला फारोकडे जाऊन सांग इब्र्यांचा देव परमेश्वर असे सांगतो की माझ्या लोकांना माझी सेवा करावी म्हणून त्यास जाऊ द्यावे.'' (निर्गेम ९:१)

''तुझे वचन माझ्या पावलांकरीता दिव्या सारखे व माझ्या मार्गावर प्रकाशा सारखे आहे.'' (स्त्रोत्रासंहिता ११९:१०५)

''येशू पवित्र आत्म्याने परिपूर्ण असा यार्देनेपासून परतला.''

(लूक ४:१)

'' लोक समुदाय त्याच्या जवळ गर्दी करून देवाचे वचन ऐकत असतां.'' (लूक ५:१)

अशा प्रकारे अल्लाहची वाणी आणि वहीची जी कल्पना अवतरीत ग्रंथांद्वारे पूर्वी पासूनच चालत आली होती, तिला कुरआनने पूर्ण स्पष्टीकरणासह प्रस्तुत केले. यासाठी की या ज्ञान-माध्यमावर लोकांनी विश्वास करावा. हे ही स्पष्ट असावे की वही आणि इल्हाम मध्ये फार मोठा फरक आहे. 'वहय' अगदी स्पष्ट असते व ती अल्लाहतर्फे असण्याबाबत काहीही शंका नसते. आणि कुरआन तर शब्दश: वही आणि अल्लाहची वाणी आहे. शब्द आणि अर्थ दोघांच्या दृष्टीने आणि जेथपावेतो हिंदु धर्माचा संबंध आहे यात इल्हामचे स्पष्ट से चित्रे आहे, ज्याला ते 'शृती' (Revelation- Shruti) या अर्थाने घेतात.

९२. अल्लाह अत्युच्च आहे म्हणून माणसाचे हे स्थान नव्हे की त्याने त्याच्याशी समक्षरित्या संभाषण करावे. आणि तो बुद्धि कौशल्य बाळगणारा आहे, म्हणून त्याच्या बुद्धि कौशल्यास ही निकड जाणवली की त्याने आपला ग्रंथ (वाणी) आपल्या पैगंबरांवर अवतरीत करून माणसाच्या मार्गदर्शनाची उपाय योजना करावी.

९३. या आयतीत 'रूह' शी अभिप्रेत कुरआन होय आणि याला रूह (आत्मा) या अर्थाने अशासाठी घेतले गेले आहे की तो माणसाला खरेखुरे जीवन प्रदान करतो. तो मानवाकरीता अमृत आहे आणि एवढी सूक्ष्म व प्रभावी वाणी आहे की अंतर्यामी एक विशेष आत्मा (Spirit)भरतो.

९४. म्हणजे तुम्ही ईमान व ईश-ग्रंथाविषयी अशा प्रकारे परिचित नव्हते. जसे आता आहात. हेतु प्रेषित्वाच्या चमत्कारपूर्ण पैलूस स्पष्ट करणे आहे की ज्या माणसाच्या आयुष्याचा फार मोठा भाग अशा प्रकारे व्यतीत झाला असावा की ना त्याला ईमान विषयी तपशीलवार ज्ञान प्राप्त झाले असावे आणि ना ईश-ग्रंथाविषयी, तर अकस्मात ईमानची हकीगत तो कशा प्रकारे सांगू शकेल व ईश-ग्रंथाच्या आयती कशा प्रकारे सादर करील. हा प्रेषित्वाचा स्पष्ट असा पुरावा आहे. आयतीचा हा अर्थ नव्हे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) प्रेषित्व प्राप्तीपूर्वी आपल्या विवेकशील स्वभावावर कायम होते. एरेश्वरवाद ही त्याची मूळ श्रद्धा होती. मूर्तिपूजा आणि शिर्क पासून अगदी दूर राहीले. येथपावेतो की मूर्तिच्या नावे बळी दिलेल्या जनावराचे मांस खाण्यापासून ही अलिप्त राहात. इब्राहीमी धर्म ज्या स्वरूपात बाकी होता त्याचे अनुयायी होते. या धर्माचे एक महत्वपूर्ण तत्व हज्ज होते आणि पैगंबरांचे 'गारे हिरा' नावाच्या गुफेत अल्लाहच्या उपासनेत मग्न असणे ही सिद्ध आहे. म्हणून हे कसे म्हटले जाऊ शकते की त्यांना ईमान विषयी काहीच माहित नव्हते. तद्वतच ईश-ग्रंथा विषयी ही असे म्हटले जाऊ शकत नाही की त्यांना या संदर्भात काही ही माहित नव्हते. यहूदी आणि ख्रिश्चन मक्केच्या जवळ पासच वसले होते. त्यांचे ग्रंथ धारक असणे सर्वांना माहित होते; म्हणून ते याबाबत अनभिज्ञ कसे राहू शकत होते की हजरत मूसा वर तौरात आणि हजरत ईसावर इंजील (बायबल) अवतरीत झाले होते परंतु ज्या अर्थी ते निरक्षर होते म्हणून त्यांनी ना हे ग्रंथ वाचले होते आणि ना त्यांना या विषयी जास्त माहिती होती, परंतु कुरआनाच्या अवतरणाने ना केवळ त्यांच्या ज्ञानात भर घातली तर त्यांना तो दिव्य प्रकाश प्रदान केला की ईमानची वास्तविकता स्पष्टत: निवेदन करावी आणि ईश ग्रंथाच्या आयती ऐकवाव्यात त्यांच धडा घावा.

९५. म्हणजे कुरआनास तेज बनविले गेले आहे कारण तो मार्गदर्शनाचा पथ उज्वल करतो व ज्ञानाचा प्रकाश देतो.

९६. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी ज्या मार्गाकडे मार्गदर्शन केले आहे तोच सरळ मार्ग होय जो अल्लाह पावेतो पोहचतो आणि त्याचे नाव इस्लाम आहे.

९७. म्हणजे सावध व्हा की ज्याने ईश्वर व धर्माच्या संबंधाने जे वर्तन अंगिकारले असेल शेवटी त्याला अल्लाह समोर याचा जाब द्यावा लागेल कारण समस्त व्यवहार फैसल्यासाठी त्याच्याच समोर सादर केले जाणार आहे.

# ४३. सूरह अज्जुखरूफ

**नाव :**आयत क्र. ३५ मध्ये जुखरूफ (सोन्या) चा उल्लेख ऐहिक सम्पत्ति या नात्याने केला गेला आहे. तद्नुषंगे सूरहचे नाव अज्जुखरूफ असे आहे.

**अवतरण काळ :** मजकूरांवरून असे दिसून येते की मक्काच्या मध्ययुगात अवतरली असेल.

**मध्यवर्ति कल्पना :** शिर्क (अनेकेश्वर वादा) च्या अयोग्यतेस स्पष्ट करतांना तौहीद (एकेश्वर वाद) सत्य असण्याचा विश्वास निर्माण करणे.

**आयत रचना :** आयत क्र. १ ते ४ प्रास्ताविक स्वरूपाच्या आयती होत. ज्या क़ुरआनाची लाभकारीता व महानता स्पष्ट करतात.

आयत क्र. ५ ते १४ मध्ये त्या निशाण्यांकडे लक्ष वेधले गेले आहे ज्यावर विचार चिंतन केल्याने अल्लाहच्या एकमेवतेचा विश्वास निर्माण होतो .

आयत क्र. १५ ते २५ मध्ये अनेकेश्वर वादी श्रद्धेची अयोग्यता स्पष्ट केली गेली आहे. प्रामुख्याने फरिशत्यांचे ईश्वराचा सहभागी असण्याची.

आयत क्र. २६ ते ३२ मध्ये हजरत इब्राहीम यांच्या या ऐतिहासिक घोषणेस प्रस्तुत केले गेले आहे जी त्यांनी अल्लाह खेरीजच्या भक्तिशी संबंध नसण्या संदर्भात केली होती. आणि जी स्मरणीय वचनाच्या स्वरूपात बाकी राहीली. परंतु त्यांच्याच वंशापैकी असणारा क़ुरेश जनसमूहने या ऐतिहासिक हकीगतीस दृष्टीआड करून शिर्क व मूर्तिपूजेच्या समर्थनार्थ उठून उभा राहीला. आणि अल्लाहच्या पैगंबराचा या कारणास्तव विरोध करीत आहे की तो एकेश्वर वादाचे आवाहन करतो.

आयत क्र.३३ ते ४५ मध्ये तुच्छ ऐहिक लाभां खातीर आखिरतला दृष्टीआड करण्याचा आणि 'वही' व प्रेषित्वाचा इन्कार करण्याचा परिणाम निवेदिला गेला आहे.

आयत क्र.४६ ते ६५ मध्ये हजरत मूसा व हजरत ईसा (येशू) यांचे काही वृत्तांत सादर केले गेले आहेत ज्यावरून हे स्पष्ट होते की त्यांचे आवाहन देखील एकेश्वरवादाचेच आवाहन होते.आणि त्यांचा विरोध करणारे बंडखोर लोक होते जे आपल्या हीन चारित्र्या प्रत पोहचले.

आयत क्र. ६६ ते ८९ या सूरहच्या समारोपाच्या आयती होत. ज्यात इन्कार करणाऱ्यांना तंबी ही आहे व अल्लाहचे भय बाळगणाऱ्यांना शुभ समाचार ही. तसेच अपराध्यांना त्यांच्या दुष्परिणति बाबत सावध केले गेले आहे व काही शंकांचे निरसन केले गेले आहे.

# ४३.सूरतुज्जुखरूफ

سُوْرَةُ الزُّخْرُفِ

(आयती-८९)

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ

१. हा मीम.[१]

حٰمٓ ﴿١﴾

२. शपथ आहे सुस्पष्ट ग्रंथाची.[२]

وَالْكِتٰبِ الْمُبِيْنِ ﴿٢﴾

३. आम्ही याला अरबी कुरआन बनविले आहे. या साठी की तुम्ही लोकांनी याला समजून घ्यावे.[३]

اِنَّا جَعَلْنٰهُ قُرْءٰنًا عَرَبِيًّا لَّعَلَّكُمْ تَعْقِلُوْنَ ﴿٣﴾

४. आणि वास्तविक पाहता हे उम्मुल किताब (मूल ग्रंथा) त आमच्या जवळ आहे. अत्युच्च दर्जा व बुद्धिकौशल्याने ओतप्रोत.[४]

وَاِنَّهٗ فِيْٓ اُمِّ الْكِتٰبِ لَدَيْنَا لَعَلِيٌّ حَكِيْمٌ ﴿٤﴾

५. काय आम्ही तुम्हाला बोध देण्यापासून यासाठी कानाडोळा करावा की तुम्ही मर्यादिचे उल्लंघन करणारे लोक आहात?[५]

اَفَنَضْرِبُ عَنْكُمُ الذِّكْرَ صَفْحًا اَنْ كُنْتُمْ قَوْمًا مُّسْرِفِيْنَ ﴿٥﴾

६. आम्ही पूर्वी होऊन गेलेल्या लोकांतही कित्येक पैगंबर पाठविले होते.[६]

وَكَمْ اَرْسَلْنَا مِنْ نَّبِيٍّ فِي الْاَوَّلِيْنَ ﴿٦﴾

७. जो पैगंबर देखील यांच्याजवळ येत असे ते त्याची थट्टा उडवित.

وَمَا يَاْتِيْهِمْ مِّنْ نَّبِيٍّ اِلَّا كَانُوْا بِهٖ يَسْتَهْزِءُوْنَ ﴿٧﴾

८. तेव्हा आम्ही या लोकांना नष्ट केले जे यांच्याहून अधिक सामर्थ्यशाली होते.[७] आणि पूर्वीच्या जन-समूहांची उदाहरणे होऊन गेली आहेत.

فَاَهْلَكْنَآ اَشَدَّ مِنْهُمْ بَطْشًا وَّمَضٰى مَثَلُ الْاَوَّلِيْنَ ﴿٨﴾

१. ही संदिग्ध अक्षरे होत. ज्यांचे स्पष्टीकरण यापूर्वी केले गेले आहे. या सूरह मध्ये हा मीम चा संकेत अल्लाहच्या 'बुद्धिकौशल्य युक्त' या गुणविशेषाकडे आहे. जो आयत क्र. ८४ मध्ये निवेदन केला गेला आहे. तसेच कुरआनाच्या 'बुद्धिकौशल्य युक्त' या गुण विशेषाकडे ही जो आयत क्र. ४ मध्ये निवेदिला गेला आहे.

२. कुरआन हा स्पष्ट ग्रंथ असण्याचे स्पष्टीकरण सूरह यूसुफ टीप क्र. २ आणि सूरह नमल टीप क्र. २ मध्ये केले गेले आहे.

या ठिकाणी स्पष्ट ग्रंथाची शपथ घेण्याचा अर्थ असा की हा ग्रंथ ज्या अदृश्य हकीगतींवरील आवरण हटवित आहे आणि मन-मस्तिष्कास अपील करणारी जी शिकवण सादर करीत आहे आणि ज्या स्पष्टीकरणासह सादर करीत आहे; ती या गोष्टीचा उघड पुरावा आहे की हा ग्रंथ अल्लाहतर्फेच अवतरीत झाला आहे आणि याने मार्गदर्शनाचा मार्ग खुला केला आहे.

३. स्पष्टीकरणा करीता पहा सूरह यूसुफ टीप क्र. ३

४. उम्मुल किताबशी अभिप्रेत 'लोहे महफूज' होय. या बाबत सूरह बुरूज मध्ये फर्माविले गेले आहे.

بَلْ هُوَ قُرْآنٌ مَّجِيْدٌ فِي لَوْحٍ مَّحْفُوْظٍ (بروج:٢٤)

'' किंबहुना हा महानता बाळगणारा कुरआन आहे जो 'लोहे महफूज' मध्ये (अंकित) आहे.'' (बुरूज - २४)

म्हणजे सर्वश्रेष्ठ अल्लाहने आकाशात आपल्या वाणीस शब्दांकित करण्याचा जो इतमाम करून ठेवला आहे. त्यात अल्लाहचा हा ग्रंथ सामील आहे; आणि तिथे याचे वैभव अतिशय उच्च आहे. या वैशिष्टयासह की तो ज्ञान व बुद्धिकौशल्याचा खजीना आहे. जर तुम्ही याची कदर न जाणाल तर हा तुमच्या अपात्रतेचा पुरावा ठरेल अन्यथा आकाशात याला अत्युच्च व फार मोठया प्रतिष्ठेचा ग्रंथ असण्याचा मान प्राप्त आहे. या तेजस्वी हिऱ्याला तेच लोक दगड समजतात ज्यांच्या बुद्धीवर धोंड पडली आहे.

कुरआन सैतानाच्या हस्तक्षेपा पासून ही सुरक्षित आहे. आणि माणसाच्या हस्तक्षेपा पासून ही. याचा मूळ स्त्रोत त्या उच्च ठिकाणी आहे जेथपावेतो कोणी पोहोचू शकत नाही.

आयतीवरून हा संकेत ही मिळतो की जे लोक या अत्युच्च अशा ग्रंथाची कदर करतील त्यांचा दर्जा उंचावेल. आणि त्यांना ज्ञान व बुद्धिकौशल्याच्या रत्नांची खाण लाभेल.

५. संबोधन कुरआनाचा इन्कार करणाऱ्यांशी आहे. त्यांना असे सांगितले जात आहे की तुम्ही आपल्या विद्रोहामुळे असे इच्छितात की उपदेश व ताकीदीच्या गोष्टी तुमच्या समोर न याव्यात. परंतु सर्वश्रेष्ठ अल्लाह तुम्हाला सुधारणेची संधी देऊ इच्छितो. आणि तुम्हावर आपले कृपाछत्र कायम करू इच्छितो. म्हणूनच तो कुरआन अवतरीत करून तुमच्या बोध व स्मरणाची उपाय योजना करीत आहे. तुमच्या चुकीच्या इच्छा आकांक्षा पायी हा क्रम थांबविला जाऊ शकत नाही.

६. म्हणजे हा काही पहिला नबी (पैगंबर) नाही, जो अल्लाहतर्फे बोध घेऊन आला असावा, किंबहुना या पूर्वीही कित्येक पैगंबर होऊन गेले जे विविध प्रसंगी अल्लाहतर्फे उपदेशाचा संदेश घेऊन आले होते.

७. म्हणजे फिरऔन सारख्या जबरदस्त शासकांना जे कुरेशच्या सरदारांच्या तुलनेत कितीतरी पटींनी अधिक शक्तिशाली व वर्चस्व बाळगणारे होते.

९. जर तुम्ही यांना विचाराल की आकाशांना व जमीनीला कोणी निर्माण केले आहे? तर ते हेच म्हणतील की यांना त्या हस्ती (अस्तित्वा) ने निर्माण केले आहे जो वर्चस्वशाली व ज्ञानी आहे.[८]

وَلَئِن سَأَلْتَهُم مَّنْ خَلَقَ السَّمٰوٰتِ وَالْاَرْضَ لَيَقُوْلُنَّ خَلَقَهُنَّ الْعَزِيْزُ الْعَلِيْمُ ۙ ﴿٩﴾

१०. तोच आहे [९] ज्याने जमीनीला तुमच्या करीता पाळणा बनविले आणि त्यात तुमच्या करीता रस्ते बनविले. [१०] यासाठी की तुम्हाला मार्ग लाभावा.[११]

الَّذِيْ جَعَلَ لَكُمُ الْاَرْضَ مَهْدًا وَّجَعَلَ لَكُمْ فِيْهَا سُبُلًا لَّعَلَّكُمْ تَهْتَدُوْنَ ۚ ﴿١٠﴾

११. आणि ज्याने आकाशातून एका विशिष्ट प्रमाणात पाणी अवतरीत केले आणि त्याद्वारे मृत जमीनीला जिवंत केले, याच प्रकारे तुम्ही (कबरी मधून ) बाहेर काढले जाल.[१२]

وَالَّذِيْ نَزَّلَ مِنَ السَّمَآءِ مَآءًۢ بِقَدَرٍ ۚ فَاَنْشَرْنَا بِهٖ بَلْدَةً مَّيْتًا ۚ كَذٰلِكَ تُخْرَجُوْنَ ﴿١١﴾

१२. ज्याने प्रत्येक प्रकारचे जोडे निर्माण केले [१३] आणि तुमच्या करीता नावा आणि चतुष्पाद प्राण्यांना वाहन बनविले.

وَالَّذِيْ خَلَقَ الْاَزْوَاجَ كُلَّهَا وَجَعَلَ لَكُمْ مِّنَ الْفُلْكِ وَالْاَنْعَامِ مَا تَرْكَبُوْنَ ۙ ﴿١٢﴾

१३. यासाठी की तुम्ही त्यांच्या पाठीवर स्वार व्हावे आणि जेव्हा तुम्ही यांच्यावर स्वार व्हावे तेव्हा आपल्या पालन कर्त्याच्या देणगीचे स्मरण करावे [१४] आणि म्हणावे पवित्र आहे ते अस्तित्व ज्याने या वस्तूना आमच्या ताब्यात दिले अन्यथा आमच्या अवाक्यात नव्हते की यांना काबूत आणले असते.

لِتَسْتَوٗا عَلٰى ظُهُوْرِهٖ ثُمَّ تَذْكُرُوْا نِعْمَةَ رَبِّكُمْ اِذَا اسْتَوَيْتُمْ عَلَيْهِ وَتَقُوْلُوْا سُبْحٰنَ الَّذِيْ سَخَّرَ لَنَا هٰذَا وَمَا كُنَّا لَهٗ مُقْرِنِيْنَ ۙ ﴿١٣﴾

१४. आणि आम्ही आपल्या पालन कर्त्या कडेच परतणार आहोत.[१५]

وَاِنَّآ اِلٰى رَبِّنَا لَمُنْقَلِبُوْنَ ﴿١٤﴾

१५. या लोकांनी त्याच्या काही दासांना त्याचा अंश बनविले.[१६] नि:संशय, मनुष्य उघडरित्या कृतघ्न आहे.[१७]

وَجَعَلُوْا لَهٗ مِنْ عِبَادِهٖ جُزْءًا ۭ اِنَّ الْاِنْسَانَ لَكَفُوْرٌ مُّبِيْنٌ ۭ ﴿١٥﴾

८. हा एकेश्वरवादावर युक्तिवाद आहे की जेव्हा तुम्ही एवडया मोठया हकीगतीस मान्य करता की आकाश व जमीनीला अल्लाहनेच निर्माण केले आहे, ज्याच्या सामर्थ्याधीन समस्त सृष्टी आहे आणि जे अतिशय ज्ञानी असे अस्तित्व आहे, तेव्हा दुसऱ्या कोणाच्या ईश्वर असण्यास वाव कोठे राहतो? तुम्ही कशा परस्परविरोधी गोष्टी जमा केल्या आहेत. एकीकडे हकीगतीस मान्य करणे ही व दुसरीकडे तिचा इन्कार ही. अल्लाहच्या सामर्थ्याची कबूली ही आणि तो एकमेव उपास्य असण्याचा इन्कार ही.

९. हे अल्लाहतर्फे एकेश्वरवादा संदर्भात अधिक स्पष्टीकरण होय यासाठी की यावर विश्वास बसावा.

१०. अभिप्रेत नैसर्गिक मार्ग होत जे पर्वत राईत असतात.

११. म्हणजे या नैसर्गिक रस्त्यांद्वारे आपल्या उद्दिष्टाप्रत पोहचू शकावे. तसेच हे रस्ते पाहून तुमची बुद्धि अल्लाहच्याच मार्गाकडे वळावी आणि तुम्हाला सन्मार्ग लाभावा.

१२. हा कियामतीच्या दिवशी उठविले जाण्यावर युक्तिवाद आहे की ज्या प्रकारे मृत जमीन पावसाच्या पाण्याने जिवंत होते व हरित आणि टवटवीत होऊन डोलू लागते, त्याच प्रमाणे अल्लाह मृतांना जिवंत करून कबरींमधून उठवील.

१३. स्पष्टीकरणा साठी पहा सूरह यासीन टीप क्र. ३९

१४. म्हणजे अल्लाहच्या या देणगीत की त्याने कोरडया भूभागात व जलाशय असलेल्या भागात तुमच्या वाहनांची व्यवस्था केली. वाहनाकरीता त्या काळात एकतर जनावराचा उपयोग होत असे किंवा नावांचा यास्तव आयतीत यांचा उल्लेख केला गेला आहे. आजच्या काळात वाहनाकरीता ज्या नवनवीन वस्तू संशोधिल्या गेल्या आहेत उदाहरणार्थ मोटार, रेल्वे, जहाज, विमान इत्यादि. या वस्तू माणसाने संशोधिल्या असल्या तरी वास्तविक पणे त्या अल्लाहच्याच देणग्या होत कारण ज्या शक्ति (इंधना) द्वारे ही वाहने चालतात त्या त्यानेच निर्माण केलेल्या आहेत आणि त्यानेच माणसाकरीता याना अनुकूल बनविले आहे. यास्तव वाहन कोणते का असेना त्याला वापरतांना ही जाणीव असली पाहीजे की हा अल्लाहचा फार मोठा अनुग्रह आहे की त्याने या देणग्यांनी माणसाला उपकृत केले.

१५. या दोन आयती (क्र. १३ व १४) मध्ये वाहना संबंधाने काही महत्वपूर्ण गोष्टी फर्माविल्या गेल्या आहेत.

एक ही की माणसाने कोणत्याही वाहनावर स्वार होतांना सुज्ञपणे अल्लाहचा हा उपकार स्मरणवा की त्याने या शक्तिंना त्याच्या अधीन केले. दुसरे असे की त्याने जीभेने ही अल्लाहचे पावित्र्य व त्याच्या विषयीच्या कृतज्ञतेस या वचनांद्वारे प्रकट करावे-

سُبۡحَانَ الَّذِىۡ سَخَّرَ لَنَا هٰذَا وَمَا كُنَّا لَهٗ مُقۡرِنِيۡنَ۔
وَاِنَّاۤ اِلٰى رَبِّنَا لَمُنۡقَلِبُوۡنَ۔

''पवित्र आहे ते अस्तित्व ज्याने आमच्या करीता या वस्तूंना ताब्यात दिले अन्यथा आमच्या अवाक्यात नव्हेत की यांना काबूत आणले असते आणि आम्ही आपल्या पालनकर्त्या कडेच परतणार आहोत''

या दुआ (प्रार्थनेचा) इतमाम वाहनावर सवार होतांना आवश्यक आहे आणि याचे प्रेषित आचरणानुसार असणे हदीस वचनांद्वारे सिद्ध आहे.

**तिसरी गोष्ट** अशी की कोणत्याही वाहनावर सवार होऊन गर्विष्ठपणा नव्हे तर ईश-दास्यत्वाचा गुण प्रकट झाला पाहीजे आणि ही प्रार्थनामय वचने अल्लाहशी दास्यत्वाची जाणीव निर्माण करतात.

**चौथी गोष्ट** अशी की प्रवास करतांना माणसाने आखिरतच्या प्रवासाला विसरू नये आणि अल्लाह समोर परत जायचे आहे या अंतिम उद्दिष्टास ध्यानी ठेवावे. वाहन एखाद्या जनावराचे असो किंवा नौकेचे, मोटर असो किंवा विमान, संकट विरहीत असू शकत नाही. न जाणो केव्हा काय दुर्घटना घडून यावी; म्हणून चौकसपणे अल्लाहचे स्मरण करीत आणि आखिरतला डोळयासमोर ठेवून प्रवास आरंभ करावा. वास्तविक सदोदित घडणाऱ्या विनाशकारी दुर्घटना माणसाचे डोळे उघडण्यासाठी पुरेशा आहेत.

१६. अभिप्रेत अल्लाहचे खास दास होत. उदाहरणार्थ फरिश्ते, पैगंबर वगैरे आणि यांना अल्लाहचा अंश बनविण्याचा अर्थ असा की त्यांना अल्लाहचा एक हिस्सा समजून घेतले.वास्तविक पाहता अल्लाहचे अस्तित्व अगदी अविभाज्य आहे. त्याच्या अस्तित्वापासून ना एखादी गोष्ट बाहेर पडते आणि ना त्यात एखादी गोष्ट दाखल होते. तो एकमेव आहे आणि अनुपमेय आहे (स्पष्टीकरणा साठी पहा सूरह इखलास टीप क्र. ३, ४, व ७) अरब देशाच्या अनेकेश्वरवाद्यांनी फरिश्त्यांना अल्लाहच्या मुली ठरवून त्यांना अल्लाहच्या अस्तित्वाचा अंश बनविले. त्याच प्रमाणे ख्रिश्चनांनी ही हजरत मसीह (येशू) ला अल्लाहचा पुत्र ठरविले. खरे तर पुत्र किंवा कन्या पित्याचा अंश असतो आणि ही सर्वांना माहित असलेली हकीगत आहे की फरिश्ते असोत किंवा पैगंबर किंवा औलीया सर्व अल्लाहचीच निर्मिती व त्याचे दास आहेत मग ते निर्मात्याचा अंश कसे असू शकतात?

राहीले हिंदू मत तर ते संपूर्ण सृष्टीला ईश्वराचा अंश ठरविते :-

"He both is and is not the created Universe, for while the created Universe, is a part of his being it is not the whole of it.' (Spiritual Heritage of India by Swami Prabhavananda. P. 32)

म्हणजे ईश्वराने सृष्टीला उत्पन्न केले ही आहे व नाही ही. कारण निर्मिती सृष्टी त्याच्याच अस्तित्वाचा अंश आहे. पूर्णत: त्याचे अस्तित्व नव्हे. कशा परस्पर विरोधी, गोंधळात टाकणाऱ्या व मार्गभ्रष्ट करणाऱ्या गोष्टी आहेत या ज्यांना तत्वज्ञानाच्या स्वरूपात सादर केले गेले आहे. अल्लाह या पासून आमचे रक्षण करो.

य़ाच हिंदू मताच्या तत्वज्ञानाचा प्रभाव आहे की काही सूफीसंत **''वहदतुलवजूद''** ला मानणारे झालेत. त्यांनी निर्माता व निर्मिती या दोहोंमधील फरक मिटविला आणि ईश्वर व सृष्टीला एकच अस्तित्व या अर्थाने घेतले. ही मार्गभ्रष्टता मुसलमानांमध्ये 'तसवुफ'च्या मार्गाने आली. जर मुसलमानांनी खुल्या डोळयांनी कुरआनाचा अभ्यास केला असता तर त्यांना निव्वळ तौहीद (एकेश्वरवाद) लाभला असता; आणि ते मार्गभ्रष्ट सूफी संताच्या जाळयात फसले नसते.

१७. ही उघडपणे कृतघ्नता आहे की माणसाने लाभ घ्यावा अल्लाहच्या देणग्यांपासून परंतु उपासना करावी अल्लाह खेरीजच्या उपास्यांची.

**यांनी फरिशत्यांना, जे रहमानचे दास आहेत, मुली बनविले आहे. काय ते यांच्या जन्माच्या वेळी हजर होते ? यांची साक्ष लिहून घेतली जाईल आणि त्यांना जाब विचारला जाईल. *(अल-क़ुर्आन)***

أَمِ اتَّخَذَ مِمَّا يَخْلُقُ بَنَاتٍ وَأَصْفَاكُم بِالْبَنِينَ ﴿١٦﴾

१६. काय त्याने (अल्लाहने ) आपल्या निर्मिती मधून स्वतः करीता मुली बाळगल्या आणि तुमच्या करीता मुले (पुत्र) खास केलेत ?[१८]

وَإِذَا بُشِّرَ أَحَدُهُم بِمَا ضَرَبَ لِلرَّحْمَٰنِ مَثَلًا
ظَلَّ وَجْهُهُ مُسْوَدًّا وَهُوَ كَظِيمٌ ﴿١٧﴾

१७. आणि जेव्हा यांच्या पैकी एखाद्यास त्या गोष्टीची खुशखबर दिली जाते, जी रहमान करीता तो योजितो, तेव्हा त्याचा चेहरा काळवंडतो आणि दुःखाने तो कासाविस होतो.[१९]

أَوَمَن يُنَشَّأُ فِي الْحِلْيَةِ وَهُوَ فِي الْخِصَامِ غَيْرُ مُبِينٍ ﴿١٨﴾

१८. काय ती (जाती) जी दाग दागिन्यात वाढते आणि भांडण-तंटयात स्पष्ट बोलायला धजत नाही ?[२०]

وَجَعَلُوا الْمَلَائِكَةَ الَّذِينَ هُمْ عِبَادُ الرَّحْمَٰنِ إِنَاثًا ۚ أَشَهِدُوا
خَلْقَهُمْ ۚ سَتُكْتَبُ شَهَادَتُهُمْ وَيُسْأَلُونَ ﴿١٩﴾

१९. यांनी फरिशत्यांना,जे रहमानचे दास आहेत, मुली बनविले आहे. काय ते यांच्या जन्माच्या वेळी हजर होते ?[२१] यांची साक्ष लिहून घेतली जाईल आणि त्यांना जाब विचारला जाईल.

وَقَالُوا لَوْ شَاءَ الرَّحْمَٰنُ مَا عَبَدْنَاهُم ۗ مَّا لَهُم بِذَٰلِكَ مِنْ عِلْمٍ ۖ
إِنْ هُمْ إِلَّا يَخْرُصُونَ ﴿٢٠﴾

२०. म्हणतात, जर रहमान ने इच्छिले असते तर आम्ही यांची उपासना केली नसती.[२२] यांना याचे काहीच ज्ञान नाही. हे केवळ अटकळीच्या गोष्टी करतात.[२३]

أَمْ آتَيْنَاهُمْ كِتَابًا مِّن قَبْلِهِ فَهُم بِهِ مُسْتَمْسِكُونَ ﴿٢١﴾

२१. काय आम्ही या पूर्वी यांना एखादा ग्रंथ दिला होता की ज्याचा आधार हे धरत असावेत ?[२४]

بَلْ قَالُوا إِنَّا وَجَدْنَا آبَاءَنَا عَلَىٰ أُمَّةٍ وَإِنَّا عَلَىٰ آثَارِهِم
مُّهْتَدُونَ ﴿٢٢﴾

२२. नव्हे, किंबहुना ते म्हणतात आम्ही आपल्या वाडवडीलांना एका मार्गावर पाहीले आहे आणि आम्ही त्यांच्याच पद-चिन्हांवर चालून उचित मार्गाने जात आहोत.[२५]

وَكَذَٰلِكَ مَا أَرْسَلْنَا مِن قَبْلِكَ فِي قَرْيَةٍ مِّن نَّذِيرٍ إِلَّا قَالَ
مُتْرَفُوهَا إِنَّا وَجَدْنَا آبَاءَنَا عَلَىٰ أُمَّةٍ وَإِنَّا عَلَىٰ آثَارِهِم
مُّقْتَدُونَ ﴿٢٣﴾

२३. अशा प्रकारे तुमच्या पूर्वी ज्या वस्तीत देखील आम्ही एखादा खबरदार करणारा पाठविला, तिच्या सुखवस्तु लोकांनी हेच म्हटले की आम्हाला आमचे वाडवडील एका मार्गावर आढळून आले आहेत आणि आम्ही त्यांच्या पद-चिन्हांचे अनुसरण करीत आहोत.

१८. अरब देशीय अनेकेश्वरवादी असे म्हणत की फरिश्ते अल्लाहच्या मुली आहेत. त्यांच्या याच दाव्याच्या अयोग्यतेस येथे स्पष्ट केले गेले आहे. ते मुलांवर मोठा अभिमान बाळगत आणि मुलींना स्वत:करीता अवहेलना व लज्जास्पद समजत, त्यांची ही विचार सरणी लक्षात घेता त्यांच्या दाव्याची अयोग्यता त्यांना स्पष्ट करून सांगितली जात आहे. तात्पर्य हे की प्रथम तर अल्लाहला संतती असण्याची कल्पनाच मूळात खोटी आहे. त्यात भर ही की तुम्ही फरिश्त्यांना अल्लाहच्या मुली ठरवले, उलट मुलींना तुम्ही स्वत:साठी हे पसंत करीत नाही किंबहुना व्यंग जाणतात, तर ज्या गोष्टीला वैगुण्य जाणता,ती अल्लाहकरीता योजणे हे कितपत योग्य आहे? या एक पैलूने विचार कराल तर तुम्हाला हे जाणवल्या खेरीज राहणार नाही की तुमच्या तोंडून अतिशय मूर्खतापूर्ण गोष्ट निघत आहे.

१९. स्पष्टीकरणा करीता पहा सूरह नहल टीप क्र. ८०

२०. हा मुलींच्या संबंधाने अनेकेश्वरवाद्यांच्याच विचार सरणीतून पुढे येणारा प्रश्न आहे, जो त्यांच्यावरच उलटविला गेला आहे. ते मुलींच्या जन्मास आपल्या करीता लज्जास्पद समजत कारण कबीला-पद्धतीत लोक-शक्तिचे मोठे महत्व होते व ही शक्ति पुरूषांवरच अवलंबून होती. शत्रूशी मुकाबला पुरूषच करीत, स्त्रीया नव्हे, मग एखाद्या तंटा विषयक समस्येतही आपल्या भूमिकेस पुरूषचस स्पष्टीकरण सादर करू शकत होते. स्त्रीया अशा प्रसंगी सर्व सामान्यत: भावनावश होतात व आपल्या भूमिकेस स्पष्टपणे मांडू शकत नाही. यास्तव मुलीच्या जन्माची वार्ता ऐकून त्यांच्या मनात हा प्रश्न निर्माण होत असे की ही (स्त्री) जाती जी आभूषणांच्या खणखणणाऱ्या ध्वनीत लहानाची मोठी होते, शत्रूशी दोन हात करण्यास आणि युद्ध प्रसंगी आमच्या काय उपयोगी पडू शकते. याउलट मुलगा सामर्थ्य शाली असतो आणि तरवारीच्या छायेत वाढतो, म्हणून शत्रूशी मुकाबला करण्याचे सामर्थ्य बाळगतो व लढण्यास योग्य आहे. त्याच प्रमाणे त्यांच्या मनात हा प्रश्न ही उद्‌भवत असे की विभिन्न कबिल्यांमध्ये जे भांडण-तंटे उद्‌भवतात त्यात एक मुलगी कोणती भूमिका पार पाडू शकेल, जेव्हा अशा प्रसंगी ती भावनाविवश असते. त्यांच्या याच विचारसरणीला त्यांच्यावर उलटविले गेले आहे की जेव्हा तुम्ही या कारणास्तव मुलींना स्वत: करीता लज्जास्पद समजता तर मग अल्लाह करीता मुली कशा प्रकारे योजिता? प्रथम तर अल्लाह करीता संतती योजणे मूर्खपणा आहे आणि यात अधिक भर अशी की मुलींना त्याची संतती ठरविले जावे. जणू अल्लाहने आपले ईश्वत्व चालविण्याकरीता व आपल्या सत्ताधिकार कायम करण्याकरीता, ज्याची निवड केली त्या म्हणजे मुली होत हा एक असा दावा आहे, ज्याचे निराधार असणे व निरर्थक असणे अगदी उघड आहे. तेव्हा अल्लाहविषयी अशी मुर्खतापूर्ण गोष्ट बोलतांना तुम्हाला काहीच लाज वाटत नाही आयतीत अशी कोणतीही गोष्ट नाही की ज्या द्वारे स्त्रीयांच्या वैगुण्याचा एखादा पैलू निघत असावा. सर्वश्रेष्ठ अल्लाहने पुरुषांप्रमाणे स्त्रीयांना ही उत्कृष्टपणे घडविले आहे म्हणून त्यांच्या स्वभावातही काही वैगुण्य नाही. मात्र पुरुषांनी वैशिष्टये आणि स्त्रीयांच्या वैशिष्टयांमध्ये फार मोठी तफावत आहे. पुरूष सामर्थ्याचे लक्षण आहे, तर स्त्रीया सौंदर्य-सामग्री आणि जेथपावेती ईश्वरी-व्यवस्थेचा संबंध आहे, यात ना पुरूषांचा काही अधिकार आहे आणि ना स्त्रीयांचा आणि कोणचाही अधिकार असण्याची कल्पनाच मूळात खोटी आहे परंतु स्त्रीयांनाच असे समजणे मोठी हलक्या पातळीची बाब होय. सूरह नजम मध्ये हीच गोष्ट फर्माविली गेली आहे-

اَلَكُمُ الذَّكَرُ وَ لَهُ الْاُنْثٰى تِلْكَ اِذًا قِسْمَةٌ

ضِيْزٰى۔ (نجم:٢١،٢٢)

“ काय तुमच्या करीता मुले आहेत आणि अल्लाहकरीता मुली? ही विभागणी तर फार हलक्या प्रतीची झाली.” (नजम - २१-२२)

२१. शेवटी यांना हे कसे माहित झाले की फरिश्ते मुली आहेत. फरिश्ते अपरोक्ष-विश्वाशी संबंधित आहेत आणि अपरोक्षाच्या वास्तवतेस जाणण्याचे साधन ‘वही’ (ईश-संदेश) आहे, ज्याला हे मान्य करीत नाही. मग काय हे त्यांच्या जन्म-प्रसंगी हजर होते, की ज्यामुळे यांना त्या ‘मुली’ आहेत हे कळाले.

हे स्पष्ट करण्याचा हेतु आहे की फरिश्त्यांच्या ‘जाती’ विषयी यांचा दावा अगदी चुकीचा आहे. दुसरे असे की ते ईश्वराचा अंश ही नाहीत की मुली ठरवल्या जाव्यात. वस्तुस्थिती ही आहे की ते रहमान (दयाळू) अल्लाहचे खास दास आहेत ज्यांना स्त्री किंवा पुरूष पैकी कोणत्याही जातीत समजले जाऊ शकत नाही.

२२. हा निष्फळ वार होय. मनुष्य जेव्हा वादविवादाचे स्तर गाठतो तेव्हा अल्लाहच्या मर्जीवर सर्व काही सोपवितो. जणू तो भाग्याच्या अधीन अगदी विवश आहे. असमर्थ आहे. परंतु मनुष्य इतरांसोबत व्यवहार करण्यात हे वर्तन अंगिकारत नाही. जर एखादा मनुष्य त्याचा माल चोरी करतो किंवा त्याला मारतो किंवा त्याच्यावर अत्याचार करतो. तेव्हा तो असे का नाही समजत की तो असे करण्यासाठी भाग्याच्या अधीन विवश आहे म्हणून शिक्षेस पात्र नाही.

२३. श्रद्धा आणि उपासनेचा मामला ज्ञानावर आधारीत असतो, केवळ अनुमानाच्या आधारावर नव्हे. हे अनेकेश्वर वादींचे फरिश्त्यांना अल्लाहच्या सत्ताधिकारात सहभागी व उपासनीय

समजणे एखाद्या शोध-बोधावर आधारीत नव्हते, किंबहुना ही निव्वळ अटकळीची बाब होती जी फार मोठी मार्गभ्रष्टता आहे.

२४. म्हणजे फरिश्त्यांना यांनी जे उपास्य (दैवत) बनवून ठेवले आहे तर याच्या समर्थनार्थ आकाशातून अवतरलेल्या ग्रंथाचे एखादे प्रमाण यांच्या जवळ नाही कारण अरब लोका (बनी इस्माईल वंशा) मध्ये सर्वश्रेष्ठ अल्लाहने कुरआना पूर्वी कोणताही ग्रंथ अवतरीत केला नव्हता मग कोणत्या प्रमाणाच्या आधारावर हे असा दावा करीत आहेत?

स्पष्ट असावे की अल्लाहचे पैगंबर विविध जन-समूहात आणि विविध देशात येत राहीले; परंतु अल्लाहने प्रत्येक जन समूहास ग्रंथ प्रदान केला नाही कारण त्या काळात लिहिण्या-वाचण्याची प्रथा फार कमी प्रमाणात असल्यामुळे प्रत्येक जन समूहा ग्रंथ-धारक होऊ शकत नव्हता. अरब एक निरक्षर जन समूह होता, म्हणून हजरत इब्राहीम व हजरत इस्माईल यांनी जे काही अवशेष आपल्या पश्चात सोडले, ते यांच्या मार्गदर्शनाचे साधन होते. अगदी याच स्वरूपाचा मामला जगातल्या विविध जन समूहांसोबत राहीला असावा. त्यांच्या करीता पैगंबरीय उपदेशाची सामुग्री केली जात राहीली मात्र बनी इस्राईल वंशात पैगंबरांचे ही आगमन झाले व ईश-ग्रंथ ही अवतरीत झाले.

२५. म्हणजे ज्या शिर्क व मूर्तिपूजेत ते व्यस्त आहेत, त्याच्या समर्थनार्थ त्यांच्याजवळ कसले ही प्रमाण नाही, किंबहुना आपल्या पूर्वजांचे ते निव्वळ अंधानुकरण करीत आहेत आणि अशा गोड भ्रमात पडले आहेत की वाडवडीलांच्या धर्माचे अनुकरण करणे म्हणजे मार्ग प्राप्त करणे होय.

श्रद्धा व धर्म संदर्भात माणसाची सर्वात मोठी मार्गभ्रष्टता हीच राहीली आहे की तो अल्लाहच्या प्रमाणाच्या तुलनेने अंधानुकरणास प्राधान्य देत राहीला आहे. मग ते वाडवडीलांचे अनुकरण असो किंवा धर्म प्रमुखांचे किंवा नेत्यांचे. परंतु कुरआन सर्व प्रकारच्या अनुकरणांना मूठमाती देतो आणि ईश संदेशाचा मार्ग उज्वल करतो जो ज्ञानाचा मर्गा आहे. इमाम राजी अनुकरणाच्या मार्गभ्रष्टतेस स्पष्ट करतांना लिहीतात

'जर अल्लाहच्या ग्रंथात फक्त याच आयती असत्या तर त्या अनुकरणास खोटे ठरविण्या करीता पुरेशा ठरल्या असत्या. कारण सर्वश्रेष्ठ अल्लाहने स्पष्ट फर्माविले आहे की या काफिरांजवळ आपल्या संप्रदायाच्या समर्थनार्थ ना एखादे बौद्धिक प्रमाण आहे ना एखादे आचरणविषयक ज्याला यांनी कवटाळून ठेवले आहे. किंबहुना ते केवळ अनुकरण आहे आपल्या वाडवडीलांचे व पूर्वी होऊन गेलेल्या लोकांचे' (अत्तफसीरूल कबीर खंड-२७ पृ. २०६)

तसेच अल्लामा शोकानी यांनी या आयती संदर्भात मुसलमानांमध्ये आढळून येणाऱ्या अनुकरणाशील विचार सरणीवर टीका करतांना लिहीले आहे-

'हे फार मोठे प्रमाण आहे अनुकरण खोटे व वाईट असण्या विषयीचे. परंतु इस्लाम धर्मात राहून हे अनुकरण करणारे आपल्या पूर्वी होऊन गेलेल्या लोकांच्या गोष्टींवर आचरण करतात त्यांच्या पावलांवर पाऊल ठेवून चालतात, आणि त्यांचे अनुसरण करतात. जेव्हा सत्याकडे बोलाविणारा यांना मार्गभ्रष्टतेतून काढू इच्छितो किंवा धर्मात नसलेल्या या गोष्टींपासून वाचवू इच्छितो, ज्यास त्यांनी दृढपणे अंगिकारले आहे आणि आपल्या थोरा मोठयां कडून एखाद्या स्पष्ट प्रमाण व उघड पुराव्या शिवाय वारसाधिकाराने मिळविले आहे आणि जे चुकीच्या शंका, संदिग्ध प्रमाण व खोटया कथनांवर आधारीत असल्यामुळे केवळ चर्चा-संभाषणाचे स्वरूप बाळगतात तर हे लोक तेच उत्तर देतात जे त्या धर्माच्या सुखवस्तू लोकांनी दिले होते की आम्हाला आमचे वाडवडील एका संप्रदायावर आढळून आले आहेत, आणि आम्ही त्यांचे अनुसरण करून मार्ग प्राप्त केला आहे किंवा अशा अर्थाचे काहीतरी सांगतात.' (फतहुल कदीर खंड -४ पृ. ५५२)

त्या खबरदार करणाऱ्याने म्हटले, जर मी या पद्धतिच्या तुलनेत,ज्यावर तुम्ही आपल्या वाडवडीलांना पाहीले आहे, उत्कृष्ट मार्गदर्शन घेऊन तुमच्या जवळ आलो आहे तर काय या स्थितीत ही तुम्ही त्यांच्या पद-चिन्हांवर चालाल? त्यांनी उत्तर दिले, तुम्हाला जो संदेश देऊन पाठविले गेले आहे,आम्ही त्याचा इन्कार करणारे आहोत.*(अल-क़ुर्आन)*

२४. त्या खबरदार करणाऱ्याने म्हटले, जर मी या पद्धतिच्या तुलनेत,ज्यावर तुम्ही आपल्या वाडवडीलांना पाहीले आहे, उत्कृष्ट मार्गदर्शन घेऊन तुमच्या जवळ आलो आहे तर काय या स्थितीत ही तुम्ही त्यांच्या पद-चिन्हांवर चालाल? त्यांनी उत्तर दिले, तुम्हाला जो संदेश देऊन पाठविले गेले आहे,आम्ही त्याचा इन्कार करणारे आहोत.[२६]

قٰلَ اَوَلَوْ جِئْتُكُمْ بِاَهْدٰى مِمَّا وَجَدْتُّمْ عَلَيْهِ اٰبَآءَكُمْ ۗ
قَالُوْٓا اِنَّا بِمَآ اُرْسِلْتُمْ بِهٖ كٰفِرُوْنَ ﴿٢٤﴾

२५. शेवटी आम्ही त्यांना शिक्षा दिली तर पहा कसा अंत झाला खोटे ठरविणाऱ्यांचा !

فَانْتَقَمْنَا مِنْهُمْ فَانْظُرْ كَيْفَ كَانَ عَاقِبَةُ الْمُكَذِّبِيْنَ ﴿٢٥﴾

२६. आणि जेव्हा इब्राहीमने आपल्या पित्या व आपल्या जन समूहास म्हटले होते, मी त्या वस्तूंशी अगदी असंबंधित आहे ज्यांची तुम्ही आराधना करता.

وَاِذْ قَالَ اِبْرٰهِيْمُ لِاَبِيْهِ وَقَوْمِهٖٓ اِنَّنِيْ
بَرَآءٌ مِّمَّا تَعْبُدُوْنَ ﴿٢٦﴾

२७. मी फक्त त्याचीच उपासना करतो, ज्याने मला निर्माण केले आहे. तोच मला मार्गदर्शन करील.

اِلَّا الَّذِيْ فَطَرَنِيْ فَاِنَّهٗ سَيَهْدِيْنِ ﴿٢٧﴾

२८. आणि त्याने यास बाकी राहणाऱ्या वचनाच्या स्वरूपात आपल्या संतती मध्ये सोडले, यासाठी की त्यानी याच्याकडे रूजू करावे.[२७]

وَجَعَلَهَا كَلِمَةًۢ بَاقِيَةً فِيْ عَقِبِهٖ لَعَلَّهُمْ يَرْجِعُوْنَ ﴿٢٨﴾

२९. वस्तुस्थिती अशी की मी त्यांना व त्यांच्या वाडवडीलांना जीवन-सामुग्री प्रदान केली येथपावेतो की त्यांच्याजवळ सत्य आणि एक स्पष्ट पैगंबर आला.[२८]

بَلْ مَتَّعْتُ هٰٓؤُلَآءِ وَاٰبَآءَهُمْ حَتّٰى جَآءَهُمُ الْحَقُّ
وَرَسُوْلٌ مُّبِيْنٌ ﴿٢٩﴾

३०. आणि जेव्हा सत्य त्यांच्याजवळ आले तेव्हा ते म्हणाले, ही तर जादू आहे आणि आम्ही याचा इन्कार करणारे आहोत.[२९]

وَلَمَّا جَآءَهُمُ الْحَقُّ قَالُوْا هٰذَا سِحْرٌ وَّاِنَّا بِهٖ كٰفِرُوْنَ ﴿٣٠﴾

३१. आणि ते म्हणाले, हे कुरआन या दोन शहरांच्या मोठया माणसावर का अवतरीत केले गेले नाही ?[३०]

وَقَالُوْا لَوْلَا نُزِّلَ هٰذَا الْقُرْاٰنُ عَلٰى رَجُلٍ
مِّنَ الْقَرْيَتَيْنِ عَظِيْمٍ ﴿٣١﴾

२६. यांचे हे उत्तर पूरेपूर हटवादी पणाची अभिव्यक्ति होती.

२७. हजरत इब्राहीम यांच्या आचरणास सादर करून अरबच्या अनेकेश्वरवाद्यांना ताकीद केली गेली की तुम्ही आपल्या मार्गभ्रष्ट पूर्वजांचे अंधानुकरण करून शिर्क व मूर्तिपूजेचा मार्ग पत्करला. परंतु अल्लाहचे पैगंबर असलेल्या हजरत इब्राहीमच्या आचरणास सोडले. वास्तविक पाहता अनुसरण करण्या योग्य तर केवळ पैगंबराचेच आचरण असते. पूर्वजांचे आचरण नव्हे.

हजरत इब्राहीम यांनी आपल्या वाडवडीलांचे व जन समूहाचे अनुसरण केले नाही, उलट त्यांच्या अनेकेश्वरवादी श्रद्धा व त्यांच्या मूर्तिपूजेबाबत उद्विग्नता जाहीर केली आणि एकेश्वरवादास अंत:प्रेरणा व प्रामाण्यांच्या आधारावर अंगिकारले होते. एकेश्वरवादाचे हे वचन त्यांनी आपली संतती व आपल्या अनुयायींमध्ये एक स्मरणीय वचन या नात्याने मागे सोडले. अशासाठी की जर समाजात मार्गभ्रष्टता निर्माण झाल्यास लोकांनी या ऐतिहासिक वचनाकडे रूजू करावे. हे वचन या कारणास्तव स्मरणीय वचन ठरले की या मागे जबरदस्त बलीदाने होती जी त्यांनी दिली, तसेच एक इतिहास होता जो त्यांनी घडविला आणि या वचनांचा हा प्रभाव होता की जेव्हा अरब लोकांमध्ये मूर्तिपूजा प्रचलीत झाली तेव्हा जे लोक आपल्या विवेक बुद्धिवर कायम होते ते मूर्तिपूजे पासून दूर राहीले आणि हजरत इब्राहीम यांच्या मार्गाचे अनुसरण करून केवळ सर्वश्रेष्ठ अल्लाहची उपासना करीत राहीले. यास्तव पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या प्रेषित्वापूर्वी हीरा गुफेत केवळ अल्लाहची उपासना करणे साबीत आहे.

२८. म्हणजे सर्वश्रेष्ठ अल्लाहने हजरत इब्राहीम यांच्या संततीला (अरबांना) जी धन सामग्री दिली ते त्यातच मग्न राहीले आणि ईश्वर व आखिरत पासून अगदी बेपर्वा झाले. फार दीर्घकाळा पासून यांची हीच अवस्था राहीली. येथपावेतो की सत्याचा प्रकाश प्रकट झाला आणि एक असा पैगंबर त्यांच्यात पाठविला गेला ज्याचे पैगंबर होणे अगदी स्पष्ट आहे.

२९. म्हणजे कुरआनाद्वारे जेव्हा सत्य जाहीर झाले तेव्हा त्यांनी याचा प्रभाव पाहून त्यास जादू ठरविले व मानण्यास इन्कार केला.

३०. दोन शहरांशी अभिप्रेत मक्का आणि तायफ होय जी मध्यवर्ति शहरे होती. मक्केच्या अनेकेश्वरवाद्यांचा हा आक्षेप होता की कुरआन जर खरोखर अल्लाहतर्फे आहे तर ते मक्का किंवा तायफच्या एखाद्या रहिवाश्यावर अवतरीत व्हावयास हवे होते एक असा मनुष्य या करीता कशा प्रकारे योग्य झाला जो ना श्रीमंत आहे आणि ना उच्च पदस्थ आहे?

३२. काय तुमच्या पालनकर्त्याच्या कृपेचे हे लोक विभाजन करतात ?[३१] ऐहिक जीवनात यांच्या अर्थोपार्जनाची सामुग्री आम्ही यांच्या दरम्यान विभाजित केली आहे [३२]आणि यांच्या पैकी काहींचे दर्जे काहींवर उंचावले आहेत अशासाठी की त्यांनी एकमेकांपासून सेवा घ्यावी [३३] आणि तुमच्या पालनकर्त्याची कृपा त्या (धन सम्पत्ति) हून कितीतरी पटींनी अधिक श्रेष्ठ आहे, जी हे लोक जमवित आहेत.[३४]

أَهُمْ يَقْسِمُونَ رَحْمَتَ رَبِّكَ ۚ
نَحْنُ قَسَمْنَا بَيْنَهُم مَّعِيشَتَهُمْ فِي الْحَيَاةِ الدُّنْيَا ۚ وَرَفَعْنَا بَعْضَهُمْ
فَوْقَ بَعْضٍ دَرَجَاتٍ لِّيَتَّخِذَ بَعْضُهُم بَعْضًا سُخْرِيًّا ۗ وَرَحْمَتُ
رَبِّكَ خَيْرٌ مِّمَّا يَجْمَعُونَ ﴿٣٢﴾

३३. आणि जर या गोष्टीची शक्यता नसती की लोक एकाच पद्धतीचे अनुसरण करतील तर आम्ही रहमानशी कुफ्र करणाऱ्यांच्या घरांची छते आणि जीने, ज्यावर ते चढतात चांदीची बनविली असती.

وَلَوْلَا أَن يَكُونَ النَّاسُ أُمَّةً وَاحِدَةً لَّجَعَلْنَا لِمَن
يَكْفُرُ بِالرَّحْمَٰنِ لِبُيُوتِهِمْ سُقُفًا مِّن فِضَّةٍ وَمَعَارِجَ
عَلَيْهَا يَظْهَرُونَ ﴿٣٣﴾

३४. तसेच त्यांच्या घरांचे दरवाजे व त्यांचे तक्ते देखील ज्यावर ते तकीये लावून बसतात.

وَلِبُيُوتِهِمْ أَبْوَابًا وَسُرُرًا عَلَيْهَا يَتَّكِئُونَ ﴿٣٤﴾

३५. आणि सोन्याने ही त्यांना सम्पन्न केले असते ही सर्व ऐहिक जीवनाचीच सामुग्री आहे आणि आखिरत (मरणोत्तर जीवन) तुमच्या पालन कर्त्याच्या जवळ फक्त मुत्तकी (पाप भीरू) लोकां करीताच आहे.[३५]

وَزُخْرُفًا ۚ وَإِن كُلُّ ذَٰلِكَ لَمَّا مَتَاعُ الْحَيَاةِ الدُّنْيَا ۚ وَالْآخِرَةُ
عِندَ رَبِّكَ لِلْمُتَّقِينَ ﴿٣٥﴾

३६. आणि जो रहमानच्या स्मरणापासून बेपर्वा होतो आम्ही त्याच्यावर एक सैतान तैनात करतो आणि तो त्याचा जोडीदार बनतो. [३६]

وَمَن يَعْشُ عَن ذِكْرِ الرَّحْمَٰنِ نُقَيِّضْ لَهُ شَيْطَانًا فَهُوَ لَهُ قَرِينٌ ﴿٣٦﴾

३७. ते सैतान यांना अल्लाहच्या मार्गापासून रोखतात आणि हे लोक असे समजतात की आम्ही सरळ मार्गावर आहोत.

وَإِنَّهُمْ لَيَصُدُّونَهُمْ عَنِ السَّبِيلِ وَيَحْسَبُونَ أَنَّهُم مُّهْتَدُونَ ﴿٣٧﴾

३८. येथपावेतो की जेव्हा असा मनुष्य आमच्या जवळ पोहोचेल तेव्हा (आपल्या सैतानाला) म्हणेल, माझ्या व तुझ्या दरम्यान पूर्व आणि पश्चिमेचे अंतर असते तर बरे झाले असते.[३७] तेव्हा किती वाईट जोडीदार झाला.

حَتَّىٰ إِذَا جَاءَنَا قَالَ يَا لَيْتَ بَيْنِي وَبَيْنَكَ بُعْدَ الْمَشْرِقَيْنِ
فَبِئْسَ الْقَرِينُ ﴿٣٨﴾

३१. हे त्यांच्या आक्षेपांना उत्तर आहे की प्रेषित्व अल्लाहची कृपा आहे आणि अल्लाहच्या कृपेस विभागणे अल्लाहचे काम आहे की यांचे ? जर हे अल्लाहचेच काम आहे तर अल्लाह अधिक चांगल्या प्रकारे जाणतो की त्याच्या कृपेसाठी कोणता मनुष्य योग्य आहे. एखादा इसम योग्य आहे किंवा नाही याचा फैसला करण्याचा तुम्हाला काय हक्क पोहचतो?

३२. म्हणजे प्रेषित्व तर फार मोठी गोष्ट आहे. लोकांमध्ये उपजिविकेची विभागणी देखील अल्लाहच्याच मर्जीने होत आहे. तो ज्याला इच्छितो सधन बनवितो व ज्याला इच्छितो निर्धन बनवितो आणि कोणाला ही आक्षेप घेण्याचा हक्क पोहचत नाही की अमुक एक इसमाला श्रीमंत का बनविले व अमुक एक इसमाला गरीब का बनविले. दासांच्या उद्देश्यांना अल्लाह अधिक चांगल्या प्रकारे जाणतो आणि त्याच्या बुद्धिकौशल्याला जशी निकड जाणवते तो आपल्या दासांशी तसा व्यवहार करतो.

३३. म्हणजे सर्वश्रेष्ठ अल्लाहने उपजिविकेच्या विभाजनात जी तफावत राखली आहे की एखाद्याला साधन सामुग्रीने सम्पन्न केले तर एखाद्याला फार कमी दिले. कोणी श्रीमंत घराण्यात जन्मास आला तर कोणी गरीब घराण्यात जन्मास आला व कसलाही वारस ठरू शकला नाही. एखाद्याचे शेत सोने पिकवते तर एखादा सुरवाती पासूनच शेती पासून वंचित आहे. एखाद्याला व्यापार उदीमाची साधने प्राप्त आहेत तर एखादा मजूरी करूनच पोट भरू शकतो तेव्हा ही तफावत एक प्रकारे दर्जामधील तफावत निश्चित आहे परंतु याचा प्रतिष्ठा व अवहेलनेशी कसलाही संबंध नाही आणि ना या आधारे अल्लाहजवळ एखाद्याचा दर्जा वाढतो किंवा घटतो. म्हणूनच पैगंबराच्या व्यक्तिमत्वास या दृष्टीने बघणे की त्याच्याजवळ उपजिविकीच्या साधनांची रेलचेल नाही यास्तव तो या पदास योग्य ठरू शकत नाही, अगदी अज्ञानपूर्ण विचार आहे.

मग जेव्हा गोष्ट अर्थोपार्जनाच्या दर्जामधील तफावती संबंधी आली तेव्हा याचा हेतु ही स्पष्ट केला आणि तो असा की लोकांनी एकमेकांची सेवा घ्यावी, जर जगातील समस्त लोक सम समान योग्यता बाळगणारे असते व समान साधन सामुग्री बाळगणारे असते तर कोणी ही कोणाला विचारले नसते आणि मानव-समाजाची व्यवस्था देवघेवीच्या आधारावर चालली नसती जर सर्व माणसे ॲरीस्टाटलची बुद्धि घेऊन जन्मले असते तर सर्वच तत्वज्ञानी बनले असते. शेतकरी, व्यापारी, गवंडी, व मजूर कोठून आले असते आणि जर सर्वच्या सर्व माणसे जन्मजात श्रीमंत अथवा गरीब असते तर ना एखाद्या श्रीमंताला मदतीची गरज भासली असती आणि ना गरीबाशी कोणी संबंध ठेवला असता. अशा प्रकारे मनुष्य समाजाच्या व्यवस्थेत परस्पर सहकार्याचे तत्व नावालाही उरले नसते.

याचा हा अर्थ मुळीच नव्हे की मनुष्य समाजात धनसम्पत्तीची तफावत कमी करण्या करीता योग्य व न्याय माध्यमांचा अवलंब केला जाऊ नये; आणि यांची वर्गवारी केली जावी. कुरआनाचे स्पष्ट आदेश याचे खंडन करतात. उदाहरणार्थ हा आदेश की धनसम्पत्ति तुमच्यातील श्रीमंत लोकांच्या दरम्यान वावरत राहू नये (सूरह हश्र - ७) त्याचप्रमाणे वारसाधिकाराची व्यवस्था, जकातची अदायगी याविषयीचे आदेश वगैरे.

३४. म्हणजे या नश्वर विश्वाची जी धन सम्पत्ति हे लोक समेटत आहेत तिच्या तुलनेने ती धनसंपदा की ज्याद्वारे अल्लाहने तुम्हाला उपकृत केले आहे प्रत्येक दृष्टया अधिक चांगली आहे कारण ही धनसंपदा (प्रेषित्व) अल्लाहची विशेष कृपा आहे ज्या द्वारे तो आपल्या विशेष दासांना उपकृत करतो.

३५. येथे शंकेचे निरसन केले गेले आहे जी सर्वसामान्यत: काफीर लोकांना सुस्थितीत पाहून वरवर विचार करणाऱ्यांच्या मनात उद्‌भवते. ते असे समजतात की जेव्हा अल्लाहने यांना सुखसम्पन्न व धनाढय बनविले आहे तर निश्चितच तो यांच्याशी खूश असेल आणि जर आखिरत प्रकट झाली तर तिथेही यांना सर्व प्रकारच्या ईश देणग्या लाभतील. या ठिकाणी या कल्पनेचे खंडन करतांना फर्माविले गेले की काफिरांचे सुखसम्पन्न व श्रीमंत असणे या गोष्टीचे लक्षण नव्हे की अल्लाह यांच्यावर प्रसन्न आहे आणि आखिरत मध्ये ही ते असेच सुखसम्पन्न अवस्थेत असतील. या जगात जे काही त्यांना दिले जात आहे ते ऐहिक जीवना पुरतेच मर्यादित राहणारी साधन सामुग्री आहे आणि यांना अशासाठी दिले जात आहे की ते कुफ्र (नास्तिकते) मध्ये जेवढे पुढे जाऊ इच्छित असतील तेवढे त्यांनी जावे आणि आपला घडा पूरेपूर भरून घ्यावा त्यानंतर आखिरतच्या ईश देणग्यांमध्ये त्यांचा काहीही हिस्सा राहणार नाही. अल्लाहच्या दृष्टीने ऐहीक धनसम्पत्ति अगदी मूल्याहीन आहे आणि जेवढया विपुलतेने काफिरांना दिले जात आहे त्याहून कित्येक पटींना त्यांना दिले जाते येथपावेतो त्यांनी आपल्या घरांना चांदीने सुशोभित केले असते आणि सोन्याने त्यांना सम्पन्न केले गेले असते परंतु अशाने लोक सोन्या चांदीच्या वैभवाने प्रभावित होऊन कुफ्रच्या मार्गावर चालू लागले असते, प्रत्येक जण ऐहिक धन-संपदा गोळा करण्याच्या नादी लागला असता. परिणामी संपूर्ण मानव जात कुफ्र करण्यास एकत्रित झाली असती. ही अशी विलक्षण कसोटी राहीली असती

अगदी की मोजकेच लोक असे निघाले असते जे आपल्या विवेक बुद्धीवर कायम राहीले असते आणि ऐहिक सुखविलासाच्या साधन सामुग्रीची पर्वा न करता त्यांनी अल्लाहवर ईमान राखले असते व ईश भय पूर्ण जीवन व्यतीत केले असते. परंतु सर्वश्रेष्ठ अल्लाहने मानव जातीवर दया केली व तिला या भयंकर कठीण अशा कसोटीत टाकले नाही.

अल्लाहच्या या कथनाद्वारे ही गोष्ट आपोआप स्पष्ट होते की काफिरांना सर्वश्रेष्ठ अल्लाह ऐहिक सुखविलासाची सामुग्री काहीशी जास्तच देतो आणि नागरी प्रगतीची साधने सामान्यत: त्यांच्यासाठी अधिक प्रमाणात उपलब्ध करवितो परंतु ईमान बाळगणाऱ्यां करीता या गोष्टी ईर्ष्या बाळगण्या करीता नाहीत कारण ही क्षणभंगूर जीवनाची तुच्छ सामुग्री आहे. आखिरतची सर्वोत्कृष्ट व कधीही न संपणाऱ्या ईश देणग्या ईश भय बाळगणाऱ्यांचाच हिश्श्यात येणार आहेत.

आज दुदैवाने मुसलमानांमध्ये असे लोक फार कमी आहेत ज्यांनी विशुद्ध मनाने ही वस्तुस्थिती मान्य केली असावी आणि ऐहिक धन सम्पत्तिची पर्वा न करता ईश भय पूर्ण जीवनाला आपल्या करीता सद्‌भाग्य कारक समजत असावेत.

३६. निवेदन क्रमान्वये हे स्पष्ट होते की जे लोक सोने चांदी धन सम्पत्ति बाळगतात आणि ऐहिक सुखविलासाच्या अधीन होतात ते अल्लाहच्या स्मरणापासून गाफिल होतात आणि अल्लाहच्या स्मरणापासून गाफील होणयाचा परिणाम हा होतो की सैतान त्यांच्यावर आरूढ होतो त्यांच्या जोडीदार बनून पदोपदी त्यांना मार्गभ्रष्ट करतो.

या ठिकाणी अल्लाहच्या स्मरणाशी अभिप्रेत सूज्ञता पूर्वक आपल्या पालन कर्त्या अल्लाहचे स्मरण करणे अर्थात मन-मस्तिष्कास अल्लाहकडे केंद्रित करणे. जीभेने अल्लाहचे नाम: स्मरण करणे या संदर्भात मोठे सहाय्यक आहे व या दृष्टीने त्याचे मोठे महत्व आहे.

या प्रसंगी सूरह ताहा टीप क्र. १५२ ही दृष्टीक्षेपात असावी.

सैतानाचे आरूढ होणे व त्याचे जोडीदार बनून राहणे, ही उघडया डोळयांनी न दिसून येणारी गोष्ट आहे. परंतु त्याचे प्रभाव विचार चिंतन आणि नैतिक व प्रात्यक्षिक जीवनात जाणवतात, आणि कुरआन आम्हाला या गोष्टीपासून सचेत करतो, ही बाब आमच्या दृष्टीपासून लपलेली असली तरी आमची श्रद्धा व आचरणावर प्रभावशाली ठरू शकते.

३७. मूळ ग्रंथात 'बोअदल मश्रिकैन' हा शब्दप्रयोग केला गेला आहे याचा अर्थ दोन अनेकेश्वर वाद्यांमधील दूरता. परंतु अरबी वाकप्रचारात पूर्व आणि पश्चिमे करीता 'मश्रिकैन (दोन पूर्व) म्हटले जाते जसे सूर्य व चंद्राकरीता 'कमरान' (दोन चंद्र) म्हणण्याचा प्रघात आहे. यास्तव बोअदल मश्रिकीनचा अर्थ पूर्व आणि पश्चिमेतील दूरी असा केला गेला आहे.

आयतीचा मतितार्थ हा की आज तर हे काफीर सैतानाला आपला साथीदार बनवून बसले आहेत परंतु कियामतीच्या दिवशी ते आपल्या या साथीदाराशी भयंकर घृणा करतील आणि त्याला त्या क्षणी म्हणतील की तुझ्या आणि माझ्यात अमर्याद अंतर असते तर किती चांगले झाले असतो !

*जर आम्ही तुम्हाला (या जगातून) उचलून घेतले तर (त्या नंतरही) यांना शिक्षा अवश्य देऊ. किंवा असे होईल की तुम्हाला यांचा अंत दाखवू ज्याचा आम्ही यांच्याशी वायदा केला आहे.[४१] असे करण्यास आम्ही पूर्णतः समर्थ आहोत. (अल-क़ुर्आन)*

وَلَنْ يَّنْفَعَكُمُ الْيَوْمَ اِذْ ظَّلَمْتُمْ اَنَّكُمْ فِي الْعَذَابِ مُشْتَرِكُوْنَ ﴿۳۹﴾

३९. आणि जेव्हा तुम्ही अत्याचार करून बसाल तर ही गोष्ट तुमच्या करीता किचींतही लाभदायक नसेल की तुम्ही ईश-शिक्षेत एकमेकांचे सहभागी असावे. [३८]

اَفَاَنْتَ تُسْمِعُ الصُّمَّ اَوْ تَهْدِي الْعُمْيَ وَمَنْ كَانَ
فِيْ ضَلٰلٍ مُّبِيْنٍ ﴿۴۰﴾

४०. (हे पैगंबर !) काय तुम्ही बहीऱ्यांना ऐकविणार किंवा, आंधळयांना व उघड मार्गभ्रष्टतेत पडलेल्या लोकांना मार्ग दाखविणार ?[३९]

فَاِمَّا نَذْهَبَنَّ بِكَ فَاِنَّا مِنْهُمْ مُّنْتَقِمُوْنَ ﴿۴۱﴾

४१. जर आम्ही तुम्हाला (या जगातून) उचलून घेतले तर (त्या नंतरही) यांना शिक्षा अवश्य देऊ.[४०]

اَوْ نُرِيَنَّكَ الَّذِيْ وَعَدْنٰهُمْ فَاِنَّا عَلَيْهِمْ مُّقْتَدِرُوْنَ ﴿۴۲﴾

४२. किंवा असे होईल की तुम्हाला यांचा अंत दाखवू ज्याचा आम्ही यांच्याशी वायदा केला आहे.[४१]असे करण्यास आम्ही पूर्णतः समर्थ आहोत.

فَاسْتَمْسِكْ بِالَّذِيْٓ اُوْحِيَ اِلَيْكَ ۚ اِنَّكَ عَلٰي صِرَاطٍ مُّسْتَقِيْمٍ ﴿۴۳﴾

४३. तेव्हा जी वहय (ईश संदेश) तुमच्याकडे (अवतरीत) केली गेली आहे तिला दृढता पूर्वक बाळगा.[४२] निःसंशय तुम्ही सरळ मार्गावर आहात.

وَاِنَّهٗ لَذِكْرٌ لَّكَ وَلِقَوْمِكَ ۚ وَسَوْفَ تُسْـَٔلُوْنَ ﴿۴۴﴾

४४. आणि निःसंशय हा तुमच्या करीता व तुमच्या जन-समूहाकरीता उपदेश आहे. लवकरच तुम्हाला विचारपूस केली जाईल.[४३]

وَسْـَٔلْ مَنْ اَرْسَلْنَا مِنْ قَبْلِكَ مِنْ رُّسُلِنَآ اَجَعَلْنَا مِنْ
دُوْنِ الرَّحْمٰنِ اٰلِهَةً يُّعْبَدُوْنَ ﴿۴۵﴾

४५. तुमच्या पूर्वी आम्ही जे रसूल पाठविले होते यांना विचारून बघा काय आम्ही रहमान व्यतिरिक्त अन्य इतर उपास्ये बनवली होती की ज्यांची आराधना केली जावी ?[४४]

وَلَقَدْ اَرْسَلْنَا مُوْسٰي بِاٰيٰتِنَآ اِلٰي فِرْعَوْنَ وَمَلَا۟ئِهٖ
فَقَالَ اِنِّيْ رَسُوْلُ رَبِّ الْعٰلَمِيْنَ ﴿۴۶﴾

४६. आम्ही मूसा [४५] ला आपल्या निशाण्यांसह फिरऔन व त्याच्या दरबार मंडळीकडे पाठविले तेव्हा तो म्हणाला, मी सर्व विश्वांच्या पालन कर्त्याचा रसूल (पैगंबर) आहे.

३८. म्हणजे जेव्हा जगात तुम्ही आपल्या स्वत:वर अत्याचार करून आला आहात तेव्हा आज तुम्ही आपल्या सैतानां सोबत ईश शिक्षा भोगण्यात सहभागी व्हा आणि तुमचा हा सहभाग तुमच्या ईश-शिक्षेत घट होण्यास कारणीभूत ठरू शकणार नाही म्हणजे हे सैतान तुमच्या शिक्षेचे ओझे किंचितही हलके करू शकणार नाहीत आणि तुमचे जहन्नम मध्ये एकत्रित होणे यातनांच्या जाणीवेला कमी करू शकत नाही.

३९. अर्थात ज्यांनी सत्य गोष्ट ऐकण्याच्या व सत्य मार्गाला पाहण्याच्या पात्रतेला मूठमाती दिली आहे त्यांच्यावर ना कसलाही उपदेश प्रभावशाली ठरू शकतो आणि ना त्यांना मार्गदर्शन केले जाऊ शकते.

४०. अर्थात हे पैगंबर ! हे लोक तुमच्या मृत्युची वाट बघत आहेत. परंतु जर आम्ही तुम्हाला या जगातून उचलून ही घेतले (म्हणजे तुम्ही मरण ही पावलात) तरी हे लोक अल्लाहच्या शिक्षेपासून, जी कुफ्रच्या मोबदल्यात त्यांना लाभणार आहे, आपला बचाव कदापि करू शकत नाही. या प्रसंगी सूरह यूनुस टीप क्र. ७५ ही विचाराधीन असावी.

४१. आणि हीच दुसरी अवस्था उद्‌भवली. काफिरांची परिणती पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना त्यांच्या जीवनातच दाखविली गेली.

४२. अभिप्रेत कुरआन होय ज्यास दृढपणे धरण्याचा (बाळगण्याचा) अर्थ त्यास मनात अगदी खोलवर रूजवणे व एकाग्रचित्ताने त्याच्या मार्गावर चालणे, जो तो दाखवित आहे.

४३. विचारपूस या गोष्टीची की तुम्ही कुरआनाशी कोणता व्यवहार केला.

४४. पैगंबरांना विचारण्याचा अर्थ त्यांच्यावर अवतरलेल्या ग्रंथात व त्यांच्या शिकवणीत या गोष्टीचा शोध घेणे की काय खरोखर त्यांनी दयाळू ईश्वरा व्यतिरिक्त अन्य एखाद्याच्या उपासनेचा आदेश दिला होता. याचा पुरावा म्हणून कसलाही सनदशीर हवाला सादर केला जाऊ शकत नाही आणि जेव्हा वस्तुस्थिती ही आहे की पैगंबरांपैकी कोणीही अल्लाह खेरीजच्या उपास्यांच्या उपासनेचा आदेश दिला नव्हता तेव्हा शिर्क व मूर्तिपूजे करीता कोणता आधार शिल्लक राहतो?

'पैगंबरांना विचारून बघा' ही शब्दशैली अलंकारीक शैली आहे आणि ती त्याच अर्थाने आहे ज्या अर्थाने आयत'

فَإِنْ تَنَازَعْتُمْ فِي شَيْءٍ فَرُدُّوهُ إِلَى اللَّهِ وَالرَّسُولِ

'जर तुमच्या दरम्यान एखादा मतभेद झाल्यास त्यास अल्लाह व त्याच्या पैगंबरांकडे वळवा' (सूरह निसा-५९) मध्ये आहे. स्पष्टत: या ठिकाणी हि ग्रंथ (कुरआन) व सुन्नत (पैगंबरांचे आचरण) अभिप्रेत आहे. अल्लाहजवळ जाऊन व पैगंबरांजवळ जाऊन, वास्तविक त्यांनी या जगाचा निरोप घेतला आहे, समस्येची धर्मशास्त्रीय वास्तविकता जाणून घेणे नव्हे.

४५. हजरत मूसा यांचा वृत्तांत या पूर्वीच्या सूरतीमध्ये तपशीलपूर्वक निवेदिला गेला आहे. इथे या वृत्तांताचे काही ठराविक पैलू दाखविले गेले आहेत; आणि हे स्पष्ट करण्याचा हेतु आहे की सर्वश्रेष्ठ अल्लाह प्रेषित पदासाठी ज्याची निवड करतो तो एखादा वैभवशाली किंवा ऐहीक ऐश्वर्य बाळगणारा मनुष्य नसतो किंबहुना तो आपल्या गुणांच्या दृष्टीने महान असतो. मूसाला फिरऔनकडे जो महान साम्राज्याचा स्वामी होता, रसूल बनवून पाठविले गेले होते परंतु त्यांच्या सोबत कोणत्याही प्रकारचे ऐहीक ऐश्वर्य नव्हते. यास्तव ज्यांच्यावर कुरआन अवतरीत झाले त्या पैगंबरा समवेत ऐहिक ऐश्वर्य नाही तर अशाने त्यांच्या पैगंबर पदात कोणती उणीव राहते?

فَلَمَّا جَآءَهُم بِـَٔايَٰتِنَآ إِذَا هُم مِّنْهَا يَضْحَكُونَ ﴿٤٧﴾

४७. आणि जेव्हा तो त्यांच्याजवळ आमच्या निशाण्यांसह आला तेव्हा ते त्यांची थट्टा उडवू लागले.

وَمَا نُرِيهِم مِّنْ ءَايَةٍ إِلَّا هِىَ أَكْبَرُ مِنْ أُخْتِهَا ۖ
وَأَخَذْنَٰهُم بِٱلْعَذَابِ لَعَلَّهُمْ يَرْجِعُونَ ﴿٤٨﴾

४८. आम्ही त्यांना एकाहून एक श्रेष्ठ निशाणी दाखवत राहीलो [४६] आणि आम्ही त्यांना ईश-शिक्षेच्या तावडीत घेतले. अशासाठी की त्यांनी रूजू करावे.[४७]

وَقَالُوا۟ يَٰٓأَيُّهَ ٱلسَّاحِرُ ٱدْعُ لَنَا رَبَّكَ بِمَا عَهِدَ عِندَكَ
إِنَّنَا لَمُهْتَدُونَ ﴿٤٩﴾

४९. परंतु ते म्हणत, हे जादूगार ! आपल्या पालन कर्त्याशी त्या वचनाच्या आधारे, जे त्याने तुमच्याशी केलेले आहे, आमच्या करीता प्रार्थना करा. आम्ही अवश्य मार्गदर्शन प्राप्त करू.[४८]

فَلَمَّا كَشَفْنَا عَنْهُمُ ٱلْعَذَابَ إِذَا هُمْ يَنكُثُونَ ﴿٥٠﴾

५०. आणि जेव्हा आम्ही त्यांच्यावरील अजाब (ईश-प्रकोप ) हटवत असू तर ते आपल्या वचनाचा भंग करीत.

وَنَادَىٰ فِرْعَوْنُ فِى قَوْمِهِۦ قَالَ يَٰقَوْمِ أَلَيْسَ لِى مُلْكُ مِصْرَ
وَهَٰذِهِ ٱلْأَنْهَٰرُ تَجْرِى مِن تَحْتِىٓ ۖ أَفَلَا تُبْصِرُونَ ﴿٥١﴾

५१. आणि फिरऔन आपल्या जनसमूहास हाक देऊन म्हणाला, हे माझ्या जन समूहातील लोकांनो काय इजिप्तची राज्यसत्ता माझी नव्हे ? आणि काय हे जल प्रवाह माझ्या खाली वाहत नाहीत? काय तुम्ही लोक बघत नाहीत ![४९]

أَمْ أَنَا۠ خَيْرٌ مِّنْ هَٰذَا ٱلَّذِى هُوَ مَهِينٌ وَلَا يَكَادُ يُبِينُ ﴿٥٢﴾

५२. तेव्हा मी श्रेष्ठ आहे कि हा मनुष्य जो तुच्छ आहे [५०] आणि आपले म्हणणे स्पष्टतः सांगू ही शकत नाही.[५१]

فَلَوْلَآ أُلْقِىَ عَلَيْهِ أَسْوِرَةٌ مِّن ذَهَبٍ أَوْ جَآءَ مَعَهُ ٱلْمَلَٰٓئِكَةُ
مُقْتَرِنِينَ ﴿٥٣﴾

५३. याच्यावर सोन्याची कांकणे का म्हणून अवतरीत केली गेली नाहीत, किंवा फरिश्ते याच्या सोबत गोळा होऊन आलेत ![५२]

فَٱسْتَخَفَّ قَوْمَهُۥ فَأَطَاعُوهُ ۚ إِنَّهُمْ كَانُوا۟ قَوْمًا فَٰسِقِينَ ﴿٥٤﴾

५४. याने आपल्या जन समूहास मूर्ख बनविले आणि त्यांनी याचे अज्ञापालन केले. ते होतेच अवज्ञाकारी लोक.[५३]

४६. अभिप्रेत ईश-चमत्कार होत.

४७. अभिप्रेत ताकीद पूर्ण ईश-शिक्षा होत अर्थात अशा प्रकारची संकटे की ज्याद्वारे या गोष्टीचे समर्थन होत असे की मूसा अल्लाहचे पैगंबर आहेत आणि ही ईश-शिक्षा अशासाठी अवतरीत होत राहीली की त्यांनी शुद्धीवर यावे व त्यांना आपल्या चुकीच्या वर्तनाची जाणीव व्हावी. अधिक तपशीलाकरीता पहा सूरह अअराफ टीप क्र. १८७ ते १९२.

४८. यावरून कल्पना केली जाऊ शकते की हे किती गांभीर्य शून्य लोक होते. ते हजरत मूसाना प्रार्थनेकरीता विनंती ही करीत आणि त्याचबरोबर त्यांना जादूगार ही म्हणत. त्यांच्या दृष्टीने हजरत मूसा यांचे ईश-चमत्कार केवळ त्यांची जादू होती, परंतुजी आसमानी संकटे त्यांच्यावर अवतरीत होत होती, त्यांच्यापासून आपला बचाव करण्यासाठी हजरत मूसा यांच्या प्रार्थनेला ते प्रभावशाली समजत. अशा प्रकारे त्यांनी दोन परस्परविरोधी गोष्टींना एकत्र केले होते. एकीकडे ते हजरत मूसा यांना सदाचारी व अल्लाहचा स्वीकृत दास ही समजत तर दुसरीकडे जादूगार ही समजत.

४९. हा होता फिरऔनचा फिरऔनी दावा की जेव्हा मी इजिप्तचा बादशहा आहे आणि अशा साम्राज्याचा मालक आहे ज्यात जमीनीला सुपीक बनविणारे जलप्रवाह वाहत आहेत तेव्हा माझ्याहून श्रेष्ठतम असा कोण आहे. राज्य सत्तेची ही घमेंड अशी होती की तो आपल्या पालनकर्त्याला ही विसरला.

५०. हजरत मूसा यांना फिरऔनने तुच्छ लेखले केवळ या कारणास्तव की त्यांच्याजवळ ना राज्यसत्ता होती आणि ना सम्पत्ति. कुरेश जन समूहाचे लोक ही याच दृष्टीकोनातून पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना पाहात आणि जेव्हा त्यांची बुद्धिच भ्रष्ट झाली तेव्हा त्यांना काय ठाऊक की पैगंबर पदाचे स्थान केवडे उच्च आहे.

५१. हा फिरऔनचा आरोप होता, खरी वस्तुस्थिती नव्हे कारण हजरत मूसा यांची ती प्रार्थना जी त्यांनी प्रेषित होण्यापूर्वी आपल्या बोलण्यातले व्यंग दूर होण्यासाठी केली होती. मान्य झाली आणि कुरआनाने त्यांची जी भाषणे उल्लेखिली आहेत ते आपल्या आशयात अगदी स्पष्ट आहे. असे दिसून येते की फिरऔनने मागची गोष्ट, जेव्हा हजरत मूसा बोलतांना अडखळत, त्यांच्या या व्यंगाची पुनरावृत्ती करून त्यांच्याविषयी चुकीचा प्रभाव निर्माण करण्याचा प्रयत्न केला होता.

५२. त्या काळी बादशहा सोन्याची कांकणे घालत आणि त्याच्या अवती भोवती फौज फाटा राहात असे. हे लक्षात घेता फिरऔनचा हा आक्षेप होता की जर खरोखर मूसाला सृष्टीच्या पालन कर्त्याने रसूल बनवून पाठविले आहे तर त्यांना राजेशाही थाट का दिला नाही खरे तर असे व्हावयास पाहीजे होते की त्यांच्याकरीता आकाशातून सोन्याची कांकणे अवतरीत केली गेली असती आणि फरिश्त्यांचा घोळका त्यांच्या भोवताली असता. त्याने पैगंबर पदास राज्य सत्तेच्या पातळीवर ठेवले वास्तविक हे पद त्याहून कित्येक पटींनी उच्च आहे.

५३. म्हणजे फिरऔनने आपल्या जनसमूहास मूल्यहीन समजून खूप मूर्ख बनविले. त्यांना एवढे प्रभावित केले की ते आपल्या बुद्धिचा वापर करू शकले नाहीत व त्याच्या धोकेबाज गोष्टींच्या झाळयात अडकले. फिरऔन त्यांना मूर्ख बनविण्यात यास्तव सफल झाला की ते होतेच मोठे दुराचारी लोक. आणि दुराचारी लोक दुराचारी नेतृत्वासच पसंत करतात.

५५. जेव्हा त्यांनी आमच्या प्रकोपास निमंत्रण दिले तेव्हा आम्ही त्यांना शिक्षा दिली आणि त्या सर्वांना (समुद्रात) बुडवून टाकले.[५४]

فَلَمَّا آسَفُونَا انْتَقَمْنَا مِنْهُمْ فَأَغْرَقْنَاهُمْ أَجْمَعِينَ ﴿٥٥﴾

५६. आणि त्यांना असे बनविले की कस्पटा समान झाले आणि नंतरच्या लोकांकरीता बोधकारक नमुना बनून राहीले.[५५]

فَجَعَلْنَاهُمْ سَلَفًا وَمَثَلًا لِلْآخِرِينَ ﴿٥٦﴾

५७. आणि जेव्हा मरीयम पुत्राचा वृत्तांत निवेदिला जातो, तेव्हा तुमच्या जनसमूहाचे लोक आरडा ओरड करू लागतात.[५६]

وَلَمَّا ضُرِبَ ابْنُ مَرْيَمَ مَثَلًا إِذَا قَوْمُكَ مِنْهُ يَصِدُّونَ ﴿٥٧﴾

५८. आणि म्हणतात आमची उपास्ये चांगली आहेत कि तो ? ही गोष्ट केवळ वाद घालण्याकरीता ते सादर करतात.[५७] वास्तविक हे लोक आहेतच भांडखोर.

وَقَالُوا أَآلِهَتُنَا خَيْرٌ أَمْ هُوَ ۚ مَا ضَرَبُوهُ لَكَ إِلَّا جَدَلًا ۚ بَلْ
هُمْ قَوْمٌ خَصِمُونَ ﴿٥٨﴾

५९. तो तर केवळ आमचा एक दास होता, ज्याला आम्ही देणगीने उपकृत केले आणि बनी इस्राईल करीता एक आदर्श बनविला.[५८]

إِنْ هُوَ إِلَّا عَبْدٌ أَنْعَمْنَا عَلَيْهِ وَجَعَلْنَاهُ مَثَلًا
لِبَنِي إِسْرَائِيلَ ﴿٥٩﴾

६०. आम्ही इच्छिले तर तुमच्यातूनच फरिशते बनवू जे जमीनीवर खलीफा (ईश-प्रतिनिधी) असावेत.[५९]

وَلَوْ نَشَاءُ لَجَعَلْنَا مِنْكُمْ مَلَائِكَةً فِي الْأَرْضِ يَخْلُفُونَ ﴿٦٠﴾

६१. आणि तो नि:संशय कियामतीचे फार मोठे प्रमाण आहे [६०] यास्तव यात संशय करू नका आणि माझे अनुसरण करा [६१] हाच सरळ मार्ग आहे.

وَإِنَّهُ لَعِلْمٌ لِلسَّاعَةِ فَلَا تَمْتَرُنَّ بِهَا وَاتَّبِعُونِ ۚ هَٰذَا صِرَاطٌ
مُسْتَقِيمٌ ﴿٦١﴾

६२. सैतानाने तुम्हाला या पासून रोखता कामा नये. नि:संशय तो तुमचा उघड वैरी आहे.

وَلَا يَصُدَّنَّكُمُ الشَّيْطَانُ ۖ إِنَّهُ لَكُمْ عَدُوٌّ مُبِينٌ ﴿٦٢﴾

५४. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह 'ताहा' टीप क्र.९३.

५५. होऊन गेलेले म्हणजे भूतकाळातील किस्से बनवून टाकले आणि नंतरच्या लोकांकरीता बोधकारक नमुना बनविले, यासाठी की शुद्धीवर असलेल्या लोकांनी यापासून धडा घ्यावा.

५६. मरीयम पुत्राशी अभिप्रेत हजरत ईसा (येशू) होय. त्यांच्या संबंध आईकडे दाखविणे हे त्यांच्या पित्याविना जन्मण्यास प्रमाणित करते. तसेच या गोष्टीस ही ते ईश्वराचे पुत्र नव्हते तर मरीयमचे पुत्र होते.

कुरआनात हजरत ईसा यांना या स्वरूपात सादर केले गेले आहे की ते अल्लाहचे दास व त्याचे रसूल (पैगंबर) होते. यास्तव सूरह मरीयम मध्ये, जी या सूरहच्या आधी अवतरली होती त्यांच्या जन्माच्या घटनेस सविस्तर निवेदिले आहे. अशासाठी की त्यांच्या ईश्वर पुत्र असण्याचे व उपास्य असण्याचे अगदी पूर्णत: खंडन व्हावे. परंतु मक्केचे अनेकेश्वरवादी वस्तूस्थितीवर आवरण घालण्याचा अयशस्वी प्रयत्न करीत आणि लोकांना हे सांगून बहकावित की ख्रिश्चन लोक तर त्यांना अल्लाहचा पुत्र मानतात. यास्तव जर आम्ही फरिशत्यांविषयी ही श्रद्धा बाळगतो की त्या अल्लाहच्या मुली आहेत तर चूक कसली?

५७. म्हणजे आम्ही तर फरिश्त्यांना उपास्य बनविले आहे, जेव्हा ख्रिश्चनांनी 'ईसा' ला उपास्य बनविले जे शेवटी एक मनुष्य होते यास्तव आमची उपास्ये ख्रिश्चनांच्या उपास्यांहून अधिक चांगले ठरले ही गोष्ट ते निव्वळ अकारण वाद घालण्याकरीता मांडत असत, अन्यथा त्यांना ही गोष्ट चांगल्या प्रकारे उमजली होती की कुरआन हजरत ईसा यांना ना अल्लाहचा पुत्र ठरवितो आणि ना उपास्य. तो अगदी स्पष्ट करतो की हजरत ईसा हे देखील अल्लाहचे दास आहेत आणि फरिश्ते देखील त्याचेच दास होत.

५८. म्हणजे हजरत ईसा अल्लाहचेच दास होते परंतु अल्लाहने त्यांना आपल्या विशेष कृपेने उपकृत केले होते, यामुळे त्यांच्याद्वारे विविध प्रकारचे ईश-चमत्कार सादर झाले आणि त्यांचा उदय बनी इस्राईल वंशात एक आदर्श व्यक्तिमत्वाचा उदय होता. यासाठी की बाह्य धार्मिकतेच्या तुलनेत वास्तविक धार्मिकतेचा श्रेष्ठ नमुना त्यांच्या समोर यावा.

५९. अर्थात फरिश्त्यांना या कारणास्तव उपास्य समजणे योग्य नव्हे की ते माणसाहून वेगळी अशी जात आहे. ते वेगळी जात असूनही अल्लाहची निर्मिती होय आणि अल्लाहने इच्छिल्यास माणसांमधूनही फरिश्ते निर्माण करू शकतो. ज्यांनी जमीनीवर प्रतिनिधीचे कार्य पार पाडावे. अल्लाहच्या सामर्थ्याबाहेर कोणतीही गोष्ट नाही, म्हणून त्याच्या एखाद्या निर्मितीस तिच्या खास वैशिष्टयांमुळे उपास्य बनवून घेण्याकरीता कसलीही शास्त्रविहीतता (Justification)नाही.

६०. हजरत ईसा यांचा जन्म असामान्य रित्या म्हणजे पित्याविना झाला होता, जो अल्लाहचा फार मोठा चमत्कार होता. तसेच सर्वश्रेष्ठ अल्लाहने हजरत ईसा यांना मोठे नवलपूर्ण चमत्कार प्रदान केले होते. उदाहरणार्थ मातीचे पक्षी बनवून त्यात फूंक मारणे की ज्यामुळे त्यांनी खरोखरीचे पक्षी व्हावे. जन्मजात कोढी व आंधळयांना पूर्णपणे चांगले करणे. मृतांना जिवंत करणे इत्यादि. त्यांचे हे चमत्कार पूर्ण जीवन अल्लाहच्या सामर्थ्याचा उदय होता. यावरून या गोष्टीवर विश्वास बसतो की कियामतीच्या येण्याची व त्या दिवशी मृत माणसांना दुसऱ्यांदा जिवंत केले जाण्याची जी खबर अल्लाहने दिली आहे ती अगदी सत्य आहे वास्तविक गोष्ट अल्लाहचा आदेश आहे, नैसर्गिक नियम नव्हे. तो वाटेल तेव्हा नैसर्गिक नियमांना बदलू शकतो आणि समस्त विश्वाला अस्ताव्यस्त करू शकतो.

तेव्हा हा आहे आयतीचा आशय जो काफिरांकरीता प्रमाण आहे परंतु याच्या आशयात कियामतीच्या निकटच्या काळात हजरत ईसा यांचे अवतरणे हे ही सामील आहे ज्याचे स्पष्टीकरण हदीस वचनात केले गेले आहे. त्यांचे या जगात पुनरागमन होणे आणि त्याच शरीरासह येणे ज्या शरीरासह प्रदीर्घ काळापूर्वी त्यांना जगातून उचलले गेले होते. त्यांचे त्या आक्रमणाला तोंड देणे जे इस्लामच्या वैऱ्यांकडून संपूर्ण इस्लामी जगतावर होत असेल. तसेच आपल्या असामान्य सामर्थ्यानिशी प्रकट होऊन जगाला उपद्रव व उत्पाताच्या गर्तेत लोटणाऱ्या 'दज्जाल'चा नायनाट करणे. यहूद जन समूहाचे समूळ उच्चाटन करणे, आणि ख्रिश्चनांचे क्रास तोडून त्यांच्यावर योग्यरित्या ईमान बाळगणे आणि इस्लामी जनसमूदायाचे एकमेव जनसमूह आणि जगातील सर्वात मोठी शक्ति बनून उभे राहणे आणि इस्लामचे संपूर्ण जगभर पसरणे जगातील इतिहासात सर्वात मोठी क्रान्ती ठरेल आणि ही क्रान्ती कियामतीची नांदी ठरेल कारण हजरत ईसा यांची ही चमत्कार पूर्ण कामगिरी अल्लाहतर्फे मानव जातीकरीता शेवटचे प्रमाण असेल. यानंतर ही जे लोक उपद्रव माजवण्यास तयार होतील ते अतिशय निकृष्ट दर्जाचे लोक असतील व त्यांच्यावर कियामतीचा उदय होईल.

या प्रसंगी सूरह निसा टीप क्र. २६१ विचाराधीन असावी.

६१. ही गोष्ट पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या तोंडून वदविली गेली आहे की हजरत ईसा यांच्याविषयी जी सत्ये कुरआनात सादर केली गेली आहेत त्यात कसल्याही शंका-संशयाला वाव नाही. यास्तव त्यावर विश्वास राखा आणि एकाग्रचित्ताने माझे अनुसरण करा.

६३. आणि जेव्हा ईसा स्पष्ट निशाण्यांसह आला होता तेव्हा त्याने म्हटले होते मी तुम्हा लोकांजवळ बुद्धिकौशल्य घेऊन आलो आहे [६२] आणि अशासाठी आलो आहे ती तुम्हांवर काही अशा गोष्टी स्पष्ट कराव्यात ज्यांच्या बाबत तुम्ही मतभेदात पडले आहात.[६३] म्हणून तुम्ही अल्लाहचे भय बाळगा आणि माझे आज्ञापालन करा.

ولما جاء عيسى بالبينت قال قد جئتكم بالحكمة ولابين
لكم بعض الذي تختلفون فيه فاتقوا الله واطيعون ﴿٦٣﴾

६४. अल्लाहच माझा ही पालन कर्ता आहे आणि तुमचा पालनकर्ता देखील; यास्तव त्याचीच उपासना करा. हाच सरळ मार्ग आहे.[६४]

ان الله هو ربي وربكم فاعبدوه هذا صراط مستقيم ﴿٦٤﴾

६५. परंतु त्यांच्या विभिन्न समूहांनी मतभेद निर्माण केला [६५] तेव्हा सर्वनाश आहे त्या लोकांकरीता ज्यांनी अत्याचार केला [६६] एका दु:खदायक दिवसाच्या ईशा शिक्षेशी.

فاختلف الاحزاب من بينهم فويل للذين ظلموا من
عذاب يوم اليم ﴿٦٥﴾

६६. काय हे लोक या गोष्टीची वाट बघत आहेत की यांच्यावर कियामत यावी आणि यांना तिची वार्ता ही न व्हावी.

هل ينظرون الا الساعة ان تاتيهم بغتة وهم
لا يشعرون ﴿٦٦﴾

६७. त्या दिवशी मित्र एकमेकांचे शत्रू होतील, ईश-भय बाळगणाऱ्या खेरीज.[६८]

الاخلاء يومئذ بعضهم لبعض عدو الا المتقين ﴿٦٧﴾

६८. हे माझ्या दासांनो ! आज तुमच्या करीता ना कसली भिती आहे आणि ना तुम्ही दु:खी व्हाल.

يعباد لا خوف عليكم اليوم ولا انتم تحزنون ﴿٦٨﴾

६९. ज्यांनी आमच्या आयतींवर ईमान बाळगले होते आणि मुस्लिम (आज्ञाधारक) बनून राहीले होते.[६९]

الذين امنوا بايتنا وكانوا مسلمين ﴿٦٩﴾

७०. दाखल व्हा जन्नतमध्ये तुम्ही आणि तुमच्या पत्न्या.[७०] तुम्हाला सुखी व आनंदी राखले जाईल.

ادخلوا الجنة انتم وازواجكم تحبرون ﴿٧٠﴾

६२. बनी इस्राईल वंश धर्माच्या मूळ तत्वास पारखा झाला होता व केवळ पारंपारीक धार्मिकता बाळगून होता. हजरत ईसा यांनी धर्माच्या हिकमती त्यांना स्पष्ट समजाविल्या म्हणजे धर्माचे तत्व उघड केले. अशासाठी की त्यांनी हे समजून घ्यावे कि वास्तविक धार्मिकता कशाला म्हणतात. आज उपलब्ध असलेल्या बायबल मध्ये ही याची झळक पाहीली जाऊ शकते.

६३. बनी इस्राईल वंशात मतभेद तर फार मोठया प्रमाणात निर्माण झाले होते. परंतु त्यापैकी जे मतभेद मूलभूत स्वरूपाचे होते व ज्यामुळे ते विभिन्न संप्रदायात विभागले गेले होते, त्यांची वास्तविकता त्यानी स्पष्ट करून दिली. आणि पैगंबरांची हीच कार्य पद्धति असते की ते मूळ टोक हाताशी धरतात मग पेच आपोआप सुटू लागतात.

६४. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह आले इमरान टीप क्र. ७६.

६५. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह मरीयम टीप क्र. ५५

६६. म्हणजे शिर्क (अनेकेश्वर उपासना) व कुफ्र (नास्तिकता) केली. हजरत ईसा यांच्याविषयी ख्रिश्चनांची ही श्रद्धा की ते अल्लाहचे पुत्र आहेत शिर्क ही आहे आणि कुफ्र ही आणि फार मोठी अत्याचारपूर्ण कृती देखील.

६७. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह अअराफ टीप क्र.२८७

६८. जगात काफिर लोक मार्गभ्रष्ट लोकांना आपला मित्र बनवितात परंतु कियामतीच्या दिवशी ते एकमेकांचे वैरी बनतील, कारण त्यांना हे जाणवेल की ही मैत्री त्यांच्या मार्गभ्रष्टतेचे कारण ठरले. मात्र ईश भय बाळगणाऱ्या सदाचारी लोकांची आपसातील मैत्री कियामतीच्या दिवशी ही कायम राहील. कारण त्यांना हे जाणवेल की ते एकमेकांना सत्य निष्ठ राहण्यास प्रोत्साहन देत राहीले.

कुरआनाची ही आयत सावध करते की प्रत्येक माणसाने ही काळजी घ्यावी की त्याने कोणत्या प्रकारच्या माणसाशी मैत्रीचे नाते जोडले आहे व ही मैत्री त्याला कोणत्या दिशेने नेत आहे.

६९. ही आयत स्पष्टीकरण करते की जन्नतची शुभवार्ता अशा लोकांकरीता आहे, ज्यांनी ईमान बाळगून अल्लाहचे आज्ञाधारक दास बनून राहीले म्हणजे ज्यांच्या जीवनात इस्लाम रूजला होता.

७०. अभिप्रेत ईमान बाळगणाऱ्या पत्न्या होत. ईमान बाळगणाऱ्यां करीता ही शुभवार्ता ही आहे की त्यांच्या सोबत त्यांच्या ईमान धारक पत्न्या देखील जन्नत मध्ये दाखल होतील.

७१. त्यांच्या पुढयात सोन्याची ताटे व प्याले फिरवले
जातील [७१] आणि यात जे काही असेल जे मनाला
आवडणारे व नेत्रांकरीता सुखदायक असेल [७२]
आणि तुम्ही यात सदैव राहाल.

يُطَافُ عَلَيْهِمْ بِصِحَافٍ مِّنْ ذَهَبٍ وَّاَكْوَابٍ ۚ وَفِيْهَا
مَا تَشْتَهِيْهِ الْاَنْفُسُ وَتَلَذُّ الْاَعْيُنُ ۚ وَاَنْتُمْ فِيْهَا
خٰلِدُوْنَ ﴿٧١﴾

७२. ही ती जन्नत आहे जिचे वारस तुम्ही आपल्या
आचरणाच्या मोबदल्यात बनविले गेले आहात.[७३]

وَتِلْكَ الْجَنَّةُ الَّتِيْٓ اُوْرِثْتُمُوْهَا بِمَا كُنْتُمْ تَعْمَلُوْنَ ﴿٧٢﴾

७३. तुमच्यासाठी यात अत्याधिक प्रमाणात मेवे
असतील, जे तुम्ही खाल.[७४]

لَكُمْ فِيْهَا فَاكِهَةٌ كَثِيْرَةٌ مِّنْهَا تَاْكُلُوْنَ ﴿٧٣﴾

७४. नि:संशय अपराधी [७५] सदैव जहन्नमच्या शिक्षेत
(ग्रस्त) राहतील.

اِنَّ الْمُجْرِمِيْنَ فِيْ عَذَابِ جَهَنَّمَ خٰلِدُوْنَ ﴿٧٤﴾

७५. त्यांच्या शिक्षेत घट होणार नाही आणि ते यात
निराश होऊन राहतील.

لَا يُفَتَّرُ عَنْهُمْ وَهُمْ فِيْهِ مُبْلِسُوْنَ ﴿٧٥﴾

७६. आम्ही त्यांच्यावर अत्याचार केला नाही, किंबहुना
ते स्वत:च आपल्यावर अत्याचार करीत राहीले.[७६]

وَمَا ظَلَمْنٰهُمْ وَلٰكِنْ كَانُوْا هُمُ الظّٰلِمِيْنَ ﴿٧٦﴾

७७. ते पुकारतील हे मालक ! तुमच्या पालन कर्त्याने
आमचा नायनाटच करून टाकावा.[७७] ते उत्तर
देतील, तुम्हाला याच अवस्थेत रहावयाचे आहे.

وَنَادَوْا يٰمٰلِكُ لِيَقْضِ عَلَيْنَا رَبُّكَ ۚ قَالَ اِنَّكُمْ مّٰكِثُوْنَ ﴿٧٧﴾

७८. आम्ही तुमच्या समोर सत्य प्रस्तुत केले होते परंतु
तुमच्यापैकी बहुतेक लोकांना सत्य अप्रिय होते.[७८]

لَقَدْ جِئْنٰكُمْ بِالْحَقِّ وَلٰكِنَّ اَكْثَرَكُمْ لِلْحَقِّ كٰرِهُوْنَ ﴿٧٨﴾

७९. काय या लोकांनी अगदी अंतिम निर्णय घेतला
आहे (असेच आहे) तर आम्ही ही अखेरचा
निर्णय घेऊ.[७९]

اَمْ اَبْرَمُوْٓا اَمْرًا فَاِنَّا مُبْرِمُوْنَ ﴿٧٩﴾

८०. काय यांनी हे गृहीत धरले आहे की आम्ही
यांच्या रहस्य भेदाच्या गोष्टी व यांच्या कानगोष्टींना
ऐकत नाहीत ?[८०] आम्ही निश्चितच ऐकत आहोत
आणि आमचे फरिश्ते त्यांच्या जवळच लिहीत
आहेत.[८१]

اَمْ يَحْسَبُوْنَ اَنَّا لَا نَسْمَعُ سِرَّهُمْ وَنَجْوٰىهُمْ ۭ بَلٰى وَرُسُلُنَا لَدَيْهِمْ
يَكْتُبُوْنَ ﴿٨٠﴾

७१. म्हणजे जन्नतची भांडी ही अतिशय उच्च कोटीची असतील. अल्लाहच्या खजिन्यात सोन्याची कसलीही कमतरता नाही. म्हणून तो जन्नत वासी लोकांकरीता सोन्याची भांडी देईल आणि जेव्हा प्याले सोन्याचे असतील तेव्हा-

**''या रब इस सागरे लबरेज की मय क्या होगी !''**

७२. म्हणजे जन्नतचे सौंदर्य अशा प्रकारचे असेल की मनाकरीता प्रसन्नता व डोळयांकरीता सुखदायी. जन्नतची प्रत्येक गोष्ट कलेचा असा नमुना सादर करील जो नयनाभिरूची करीता अत्युत्कृष्ट असेल.

७३. ईमान बाळगणाऱ्यांना सांगितले जाईल की तुम्हाला तुमच्या आचरणाचा मोबदला म्हणून जन्नतचे वारस (मालक) बनविले गेले आहे अशासाठी की तुम्हाला या गोष्टीचा आनंद व्हावा की आमचे प्रयत्न सफल ठरले व आम्हाला आमच्या कष्टाचे फळ लाभले.

७४. जन्नतची शुभवार्ता देतांना मेव्याचा उल्लेख विशेषत्वाने केला गेला आहे. कारण मेवा एक उत्कृष्ट व स्वादिष्ट खाद्य आहे तसेच उत्साह वर्धक ही आहे.

७५. अभिप्रेत काफिर व अनेकेश्वरवादी होत.

७६. म्हणजे काफिर लोकांकरीता एवढी सक्त शिक्षा अल्लाहतर्फे अत्याचार नव्हे, किंबहुना त्याच्या न्यायाची निकड असेल. निसर्गाचा हा नियम आहे की जो आगीत उडी घेतो, आग त्याला जाळून टाकते; आणि जो विष घेतो त्याला जीवन संपवावे लागते.

७७. म्हणजे आमचे अस्तित्वच नसलेले बरे.

७८. हे सर्वश्रेष्ठ अल्लाहतर्फे त्या दोजख (नरक) वासीना उत्तर असेल की आम्ही जेव्हा आमच्या पैगंबरा मार्फत 'सत्य' तुमच्या समोर प्रस्तुत केले होते तेव्हा ते तुम्हाला ऐकावेसे ही वाटत नव्हते. आता सत्याचा इन्कार करण्याची शिक्षा भोगा.

७९. म्हणजे या लोकांनी जर सत्याचा इन्कार करण्याचा अगदी अंतिम स्वरूपाचा निर्णय घेतला आहे तर आम्हीही त्यांना याची कठोर शिक्षा देण्याचा अंतिम निर्णय घेऊ.

८०. संकेत आहे त्या गुप्त कट-कारस्थानांकडे जे इस्लाम व त्याच्या पैगंबरां विरूद्ध रचले जात होते.

८१. म्हणजे अल्लाह तर गुप्तातिलगुप्त गोष्ट ही जाणतो व ऐकतो. त्याचबरोबर त्याने याची व्यवस्था ही केली आहे की फरिश्त्यांनी या गोष्टीचे लिखित रेकॉर्ड तयार करावे. यासाठी की कियामतीच्या दिवशी ते साक्ष म्हणून कामी यावे.

८१. सांगा जर रहमानची एखादी संतती असती तर
सर्वात प्रथम उपासना करणारा मी आहे.[८२]

قُلْ إِنْ كَانَ لِلرَّحْمٰنِ وَلَدٌ فَأَنَا أَوَّلُ الْعٰبِدِيْنَ ٨١

८२. पवित्र आहे आकाशांचा व जमीनीचा स्वामी
अर्श (ईश-सिंहासना) चा स्वामी त्या गोष्टींपासून
ज्या हे निवेदन करीत आहेत.[८३]

سُبْحٰنَ رَبِّ السَّمٰوٰتِ وَالْاَرْضِ رَبِّ الْعَرْشِ
عَمَّا يَصِفُوْنَ ٨٢

८३. तेव्हा यांना सोडून द्या की हे विवादात गुरफटून
रहावेत आणि खेळण्यात मग्न रहावेत, येथपावेतो
की त्या दिवसाला यांनी बघावे ज्या पासून यांना
भय दाखविले जात आहेत.[८४]

فَذَرْهُمْ يَخُوْضُوْا وَيَلْعَبُوْا حَتّٰى يُلٰقُوْا يَوْمَهُمُ
الَّذِيْ يُوْعَدُوْنَ ٨٣

८४. तोच आकाशात ही उपास्य (ईश्वर) आहे आणि
जमीनीवर ही उपास्य आणि तोच बुद्धिकौशल्य
बाळगणारा ज्ञान बाळगणारा आहे.

وَهُوَ الَّذِيْ فِي السَّمَآءِ اِلٰهٌ وَّفِي الْاَرْضِ اِلٰهٌ ۚ وَهُوَ الْحَكِيْمُ
الْعَلِيْمُ ٨٤

८५. मोठा समृद्धशाली आहे तो ज्याच्या ताब्यात
आकाशांची व जमीनीची आणि यांच्या दरम्यानच्या
समस्त गोष्टींची राज्य सत्ता आहे. त्याच्या जवळ
कियामतीच्या वेळेचे ज्ञान आहे,आणि त्याच्याचकडे
तुम्ही परतविले जाल.

وَتَبٰرَكَ الَّذِيْ لَهٗ مُلْكُ السَّمٰوٰتِ وَالْاَرْضِ وَمَا بَيْنَهُمَا ۚ
وَعِنْدَهٗ عِلْمُ السَّاعَةِ ۚ وَاِلَيْهِ تُرْجَعُوْنَ ٨٥

८६. त्याला सोडून हे लोक ज्यांना पुकारतात ते
शिफारस करण्याचा अधिकार बाळगत नाही.
परंतु ते जे ज्ञानाच्या आधारे सत्याची साक्ष देतील.[८५]

وَلَا يَمْلِكُ الَّذِيْنَ يَدْعُوْنَ مِنْ دُوْنِهِ الشَّفَاعَةَ اِلَّا مَنْ
شَهِدَ بِالْحَقِّ وَهُمْ يَعْلَمُوْنَ ٨٦

८७. जर तुम्ही त्यांना विचाराल, तुम्हाला कोणी
निर्माण केले आहे, तर ते म्हणतील अल्लाहने.
मग हे कशाप्रकारे धोक्यात येतात. [८६]

وَلَئِنْ سَاَلْتَهُمْ مَّنْ خَلَقَهُمْ لَيَقُوْلُنَّ اللّٰهُ فَاَنّٰى
يُؤْفَكُوْنَ ٨٧

८८. आणि याची ही फिर्याद की हे माझ्या पालनकर्त्या!
हे ते लोक आहेत जे ईमान बाळगत नाहीत.[८७]

وَقِيْلِهٖ يٰرَبِّ اِنَّ هٰٓؤُلَآءِ قَوْمٌ لَّا يُؤْمِنُوْنَ ٨٨

८९. तेव्हा यांच्याकडे कानाडोळा करा आणि सांगा
सलाम [८८] लवकरच त्यांना माहीत होईल.[८९]

فَاصْفَحْ عَنْهُمْ وَقُلْ سَلٰمٌ ۚ فَسَوْفَ يَعْلَمُوْنَ ٨٩

८२. म्हणजे जर समजा ईश्वराची एखादी संतती असती तर मी कशा प्रकारे इन्कार करू शकलो असतो; तेव्हा मी त्याच्या उपासनेत सर्वात पुढे आहे. तुम्ही हा विचार केला पाहीजे की एक असा मनुष्य जो अल्लाहची उपासना करण्यात प्रामाणिक ही आहे व सर्वाधिक कार्यरत देखील तर तो अल्लाह करीता संतती असण्याचा इन्कार का म्हणून करील ?

فَاَنَا اَوَّلُ الْعٰبِدِيْنَ

''फअना अव्वलुल आबिदीन'' चा अर्थ आमच्या मते हाच की 'तर मी सर्वप्रथम अल्लाहची उपासना करणारा आहे' मी याचा इन्कार का म्हणून केला असता. आयतीच्या शब्दशैलीच्या दृष्टीने हे वाक्य एक अट म्हणून आहे. या संदर्भातील उदाहरण सूरह यूनुसची ही आयत,

قُلْ يٰٓاَيُّهَا النَّاسُ اِنْ كُنْتُمْ فِيْ شَكٍّ مِّنْ دِيْنِيْ فَلَآ اَعْبُدُ الَّذِيْنَ تَعْبُدُوْنَ مِنْ دُوْنِ اللّٰهِ وَلٰكِنْ اَعْبُدُ اللّٰهَ الَّذِيْ يَتَوَفّٰىكُمْ۔ (يونس۔۱۰۴)

''सांगा,लोक हो ! जर तुम्ही माझ्या धर्माबाबत संशय ग्रस्त असाल तर (ऐका) मी त्यांची पूजा करीत नाही, ज्यांची तुम्ही अल्लाहला सोडून पूजा करतात, किंबहुना मी अल्लाहची उपासना करतो जो तुम्हाला मृत्यु देतो.''

या आयतीत ही उत्तर अटीमध्ये 'ऐका' किंवा या प्रकारच्या शब्दात आहे. तात्पर्य हे की विचाराधीन आयतीत अल्लाह करीता संतती असण्याची जी गोष्ट गृहीत (Suppose)धरून सांगितली गेली आहे तो तिच्या खंडनाची एक बुद्धिकौशल्य युक्त शैली आहे एखाद्या गोष्टीच्या खंडनाकरीता असे म्हणणे की, ''समजा ही गोष्ट खरी असती'' तिच्या शक्यतेचे प्रमाण नव्हे, याचे उदाहरण सूरह अंबियाची ही आयत होय-

لَوْ كَانَ فِيْهِمَآ اٰلِهَةٌ اِلَّا اللّٰهُ لَفَسَدَتَا۔ (سورۂ انبیاء :۲۲)

''जर यांच्यात अल्लाह खेरीज आणखी ईश्वर ही असते तर हे अस्ताव्यस्त झाले असते.''

या आयतीत ही जी गोष्ट गृहीत धरून म्हटली गेली आहे ती अनेकेश्वरवाद्यांच्या दाव्याचे खंडन करण्याकरीता आहे आणि याद्वारे एकाहून अधिक ईश्वरांच्या अस्तित्वाची कसलीही शक्यता सिद्ध होत नाही.

८३. म्हणजे अल्लाह त्या समस्त गोष्टींपासून पवित्र आहे ज्या त्याच्या श्रेष्ठत्वाला शोभणाऱ्या नाहीत आणि त्याच्याकरीता संततीची कल्पना कदापि त्याला न शोभणारी आहे.

८४. म्हणजे हे लोक जेव्हा या गोष्टींना समजून घेण्याकरीता तयार नाहीत आणि विवादात गुरफटून राहू इच्छितात आणि अल्लाहच्या आयतींशी खेळू इच्छितात तर त्यांना त्यांच्या दशेवर सोडा. कियामतीच्या दिवशी त्यांना हे कळून येईल की त्यांनी केवढी चुकीची भूमिका अंगिकारली होती, परिणामत: त्यांना केवढी भयंकर शिक्षा भोगावी लागत आहे.

८५. म्हणजे शिफारस करण्याचा अधिकार तर कोणालाही नाही मात्र अल्लाह ज्यांना तशी परवानगी देईल ते शिफारस करतील आणि त्यांची शिफारस डोळे मिटून केलेली नसेल किंबहुना ज्ञानाच्या आधारावर असेल आणि जे सत्य असेल तेच सादर करतील. जेथपावेतो अनेकेश्वर वाद्यांचा व काफिरांचा संबंध आहे, त्यांच्या करीता कोणीही शिफारस करणार नाही. ना फरिश्ते, ना पैगंबर कारण त्यांच्याकरीता शिफारस वर्ज्य असेल. राहीलेत इतर गुन्हेगार दास तर यांच्यापैकी ही एखाद्या विषयी शिफारस करण्यापूर्वी ते हे जाणून घेतील की ते अल्लाह जवळ शिफारस करण्या योग्य आहेत किंवा नाहीत. जर ते पात्र आहेत तर त्यांची शिफारस करतील अन्यथा नाही. यास्तव दुराचारी लोकांचे शिफारसीच्या भरवशावर राहणे उचित नाही. मूलभूत गोष्ट म्हणजे आचरण आहे ज्याचा मोबदला प्रत्येक माणसाला मिळणार आहे. म्हणून आपल्या आचरणास दुरूस्त करण्याचीच काळजी घेतली पाहीजे.

अधिक स्पष्टीकरणा करीता पहा सूरह मरीयम टीप क्र. १११.

८६. म्हणजे हे लोक सैतानाच्या बहकविण्यात कसे येतात की फरिश्ते अल्लाह समोर शिफारसीकरीता वसीला आहेत म्हणून त्यांची उपासना करा. ते तुमच्या उपासनेने प्रसन्न होऊन अल्लाहसमोर तुमच्या करीता शिफारस करतील आणि तुम्हाला प्रत्येक प्रकारची ईश शिक्षा व आपत्ति पासून मुक्ति मिळवून देतील. शिफारसीची ही कल्पनाच होय जिने फरिश्ते उपास्य असण्याची श्रद्धा निर्माण केली अन्यथा वस्तुस्थिती अगदी स्पष्ट आहे की निर्माता फक्त अल्लाह आहे आणि जेव्हा अल्लाहच निर्माता आहे तेव्हा उपास्य ही तोच आहे फरिश्ते ज्याअर्थी निर्माता नाहीत तेव्हा उपास्य कसे ठरतात?

८७. हटवादी लोकांच्या संबंधी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचे आपल्या पालनकर्त्या अल्लाहपुढे गाऱ्हाणे आहे की हे लोक मार्गभ्रष्टतेत एवढया लांबवर निघून गेलेत की कुरआनाची स्पष्ट प्रमाणे ही यांच्यावर प्रभावी ठरत नाही आणि यांनी या गोष्टीचा हेका धरला आहे की ईमान बाळगणार नाहीत.

शब्दशैलीवरून स्पष्ट आहे की अल्लाहने आपल्या पैगंबराचे हे गाऱ्हाणे ऐकले आणि आता त्यांच्याशी तो व्यवहार केला

जावा ज्याची ताकीद पुढे दिली जात आहे.

शब्द शैली वरुन आमच्या जवळ आयती मध्ये ''वाव'' नंतर لَقَدۡسَمِعۡنَا ''लकद समेअना'' (आम्ही ऐकुन घेतले) गुप्त आहे आणि قِيۡلِه ''कीलीही'' मध्ये लाम चा जेर जबर च्या जागी आहे. आणि या प्रकारचा बद्दल काही ठीकाणी वाणीत प्रवाह आणि ससंगरा ऊतपन करण्यासाठी केला जातो जवाचे उधारण सूरह फतह ची आयत १० عَلَيۡهُ اللّٰه''अलैहुल्लाह'' मध्ये (ہ) हा चा पेश आहे.

८८. हा सलाम आदरर्थी सलाम नव्हे जो मुसलमान एकमेकांशी भेटतांना करतात किंबहुना निरर्थक वाद घालणाऱ्यांशी, त्यांच्यावर प्रमाण प्रस्थापित केल्यानंतर चांगल्या रीतीने त्यांचा निरोप घेण्याचा सलाम आहे.

आयतीचा अर्थ असा आहे की हे पैगंबर तुमचे गाऱ्हणे आम्ही ऐकले. हे जर मानतच नाहीत तर यांना यांच्या दशेवर सोडून द्या. त्यांच्याकडे दुर्लक्ष करा आणि 'सलाम' करून चांगल्या रीतीने त्यांचा निरोप घ्या.

८९. म्हणजे लवकरच ते आपल्या दुष्परिणतीस पाहतील.

# ४४. अद् दुखान

**नाव :** आयत क्र. १० मध्ये आकाशातून दुखान (धूर) निघण्याचा उल्लेख केला गेला आहे. त्या अनुषंगाने या सूरहचे नाव 'अद्दुखान' आहे.

**अवतरण काळ :** मक्की आहे आणि मजकूरावरून असे दिसून येते की सूरह जुखरूफ नंतर अवतरली असावी.

**मध्यवर्ति कल्पना :** कुरआनाची कदर न करणाऱ्यांना व ज्यांच्यावर कुरआन अवतरले त्या पैगंबरांचा इन्कार करणाऱ्यांना या गोष्टीबाबत सावध केले गेले आहे की त्यांच्या करीता दु:खदायक अजाब (ईश शिक्षा) आहे.

**आयत रचना:** आयत क्र. १ ते ६. मध्ये कुरआनाची प्रतिष्ठा निवेदिली गेली आहे.

आयत क्र. ७ ते ८ मध्ये कुरआन अवतरीत करणाऱ्याचा परिचय ही दिला गेला आहे.

आयत क्र. ९ ते २३ मध्ये फिरऔनच्या जनसमूहाचा सर्वनाश आणि बनी इस्राईल वंशाची प्रतिष्ठा वृद्धिस एक ऐतिहासिक उदाहरणाच्या स्वरूपात सादर केले गेले आहे.

पैगंबराचा विरोध करणारे कोणत्या परिणतीस पोहचले व त्याचे अनुसरण करणारे कशाप्रकारे प्रतिष्ठित झाले.

आयत क्र. २४ ते ५७ मध्ये मरणोत्तर जीवनाचा इन्कार करणाऱ्यांना आणि यावर विश्वास ठेवून ईश भयाचे जीवन अंगिकारणाऱ्यांची वेगवेगळी परिणती निवेदिली गेली आहे जी कियामतीच्या दिवशी यांच्या समोर येईल.

आयत क्र. ५८ व ५९ सूरहच्या समारोपाच्या आयती आहेत ज्यात कुरआनाची कदर न करणाऱ्यांना सावध केले गेले आहे. अर्थात ज्या मजकूराने सूरहचा आरंभ झाला होता त्यावरच सूरह संपविली गेली आहे.

# ४४. सूरतुद् दुखान

سُوْرَةُ الدُّخَانِ

(आयती-५९)

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ

१. हा-मीम.[१]

حٰمٓ ۝١

२. शपथ आहे दिव्य ग्रंथाची. [२]

وَالْكِتٰبِ الْمُبِيْنِ ۝٢

३. आम्ही यास एका शुभ रात्रीत अवतरीत केले.[३] निःसंशय आम्ही लोकांना खबरदार करणारे होतो.[४]

اِنَّآ اَنْزَلْنٰهُ فِيْ لَيْلَةٍ مُّبٰرَكَةٍ اِنَّا كُنَّا مُنْذِرِيْنَ ۝٣

४. या रात्रीत प्रत्येक प्रकारच्या बुद्धिकौशल्य युक्त गोष्टी निश्चित केल्या जात होत्या.[५]

فِيْهَا يُفْرَقُ كُلُّ اَمْرٍ حَكِيْمٍ ۝٤

५. आमच्या तर्फे एक फर्मान म्हणून.[६] निःसंशय आम्ही पैगंबर पाठविणारे होतो.[७]

اَمْرًا مِّنْ عِنْدِنَا ۭ اِنَّا كُنَّا مُرْسِلِيْنَ ۝٥

६. तुमच्या पालन कर्त्याची कृपा या नात्याने.[८] निःसंशय तो ऐकणारा, जाणणारा आहे.[९]

رَحْمَةً مِّنْ رَّبِّكَ ۭ اِنَّهٗ هُوَ السَّمِيْعُ الْعَلِيْمُ ۝٦

७. आकाशांचा व जमीनीचा तसेच यांच्या दरम्यानच्या समस्त अस्तित्वांचा पालनकर्ता-जर तुम्हाला विश्वास ठेवायचा आहे.[१०]

رَبِّ السَّمٰوٰتِ وَالْاَرْضِ وَمَا بَيْنَهُمَا ۘ اِنْ كُنْتُمْ مُّوْقِنِيْنَ ۝٧

८. त्याच्या खेरीज कोणीही उपास्य (ईश्वर) नाही. तोच जिवंत करतो आणि मरण देतो. तुमचा पालनकर्ता आणि तुमच्या पूर्वी होऊन गेलेल्या वाडवडीलांचा पालनकर्ता.

لَآ اِلٰهَ اِلَّا هُوَ يُحْيٖ وَيُمِيْتُ ۭ رَبُّكُمْ وَرَبُّ اٰبَاۗىِٕكُمُ الْاَوَّلِيْنَ ۝٨

१. या अक्षरांचे स्पष्टीकरण सूरह मोमीन टीप क्र. १ मध्ये केले गेले आहे. या सूरहच्या आयत क्र. ४ मध्ये अल्लाहच्या बुद्धिकौशल्य युक्त फैसल्यांचा उल्लेख केला गेला आहे आणि या अक्षरांचा संकेत याच विषयाकडे आहे. आणि अल्लाहचे बुद्धिकौशल्य युक्त निर्णय तो बुद्धिकौशल्य बाळगण्याचे प्रमाणित करतात.

२. याचे स्पष्टीकरण सूरह जुखरूफ टीप क्र. २मध्ये केले गेले आहे.

३. म्हणजे मार्गदर्शनाचा प्रकाश रात्रीच्या अंध:कारात प्रकटला. जणू तो अज्ञानाच्या अंध:काराला विदीर्ण करीत प्रकट झाला होता आणि ती वेळ मोठी सुख समृद्धीची व भाग्याची वेळ होती जेव्हा कुरआन अवतरणास आरंभ झाला कारण कुरआन अवतरणाने मांगल्याचे स्त्रोत निघाले आणि अध्यात्मिक समृद्धीने वातावरण पुलकीत झाले. ही रात्र आपल्या याच गुणामुळे की यात कुरआन अवतरणास आरंभ झाला, शुभरात्र आणि प्रतिष्ठीत रात्र ठरली. सर्वसामान्यत: भाष्यकारांनी याचा हा अर्थ घेतला आहे की ही शुभरात्र आणि ''लैलतुल कद्र'' आधीपासूनच एक विशेष आणि श्रेष्ठत्व बाळगणारी रात्र होती जिची कुरआन अवतरणासाठी निवड केली गेली. परंतु याच्या समर्थनार्थ ना कुरआनाचे एखादे प्रमाण आहे आणि ना एखादे योग्य हदीस वचन. हजरत मूसा यांना प्रेषित्व पदाने सम्मानित करताना ज्या ठिकाणा हून सर्वश्रेष्ठ अल्लाहने हाक मारली होती त्याला البقعةالمباركه (शुभ क्षेत्र सूरह कसस-३०) म्हटले गेले आहे. उघड आहे याचा हा अर्थ नव्हे की हे क्षेत्र आधीपासूनच शुभ गणले जात होते, किंबहुना याचा अर्थ असा की या क्षेत्राला अल्लाहची साद घालण्यासाठी निवडले जाण्याचा मान प्राप्त झाला म्हणून ते शुभ-क्षेत्र ठरले त्याचप्रमाणे कुरआनाला शुभ रात्रीत अवतरीत करण्याचा अर्थ हा की ही रात्र कुरआन अवतरणाच्या समृद्धीमुळे शुभ रात्र ठरली. (पहा सूरह कद्र टीप क्र. २)

ही तिच रात्र होय जिला सूरह कद्र मध्ये लैलतुल कद्र या अर्थाने घेतले गेले आहे आणि कुरआनाच्या अवतरणाचा आरंभ रमजानच्या महीन्यात झाला होता.

شَهْرُ رَمَضَانَ الَّذِىْٓ اُنْزِلَ فِيْهِ الْقُرْاٰنُ ۔ (بقرہ: ۱۸۵)

''रमजानचा महीना ज्यात कुरआन अवतरीत केले गेले'' (बकरा- १८५)

यास्तव ही शुभ रात्र रमजानची एक रात्र होती आणि हदीसच्या स्पष्टीकरणानुसार ही रमजान महीन्याच्या विषम रात्रींकी एक रात्र होय. काही भाष्यकारांनी 'शुभ रात्री' शी अभिप्रेत शाबान महीन्याची १५ वी रात्र घेतली आहे, जिला 'शबे बरात' या नावाने ओळखले जाते. परंतु हा खुलासा कुरआनाच्या स्पष्टीकरणाच्या विपरीत आहे. म्हणून हे कथन रद्दबातिल ठरते. अल्लामा इब्ने कसीर याचे खंडन करतांना फर्मावितात-

''ज्यांनी हे म्हटले की ही शाबान महीन्याची १५ वी रात्र आहे जसे अकरमाद्वारे उल्लिखित आहे तर ते फार लांब वरचे बोलले कारण कुरआन स्पष्टीकरण करतो की ती रमजान महीन्याची रात्र आहे. राहीले ते हदीस वचन जे अब्दुल्लाह बिन सालेह यांनी लैस, अकील, व जहरीच्या माध्यमान्वये उस्मान बिन मुहम्मद बिन नसीरूल अखन्स द्वारे उल्लिखित केले आहे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी असे फर्माविले की जीवन अवधिपूर्ण होण्याचा (म्हणजे मृत्युचा) फैसला शाबान ते शाबान पर्यंत केला जातो. येथ-पावेतो की ऐक मनुष्य निकाह करतो आणि त्याला संतती होणार असते परंतु त्याचे नाव मृतांमध्ये सामील झालेले असते. तर हे हदीस वचन मुरसल (म्हणजे ताबअी ते सहाबीच्या माध्यमाने बिना पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचा संबंध दर्शवून केलेले) आहे आणि या प्रकारची कथने कुरआनाच्या स्पष्टीकरणाच्या तुलनेत प्रस्तुत केली जाऊ शकत नाही.'' (तफसीर इब्ने कसीर खंड - ४, पृष्ठ - १२७)

वास्तविक पाहता शाबान महीन्याचा १५ व्या रात्रीची श्रेष्ठता ना कुरआनाने सिद्ध आहे आणि ना हदीस वचनाने जी कथने याच्या श्रेष्ठत्वार्थ प्रस्तुत केली जातात ती एकतर प्रमाण दृष्टया अगदी कमकुवत आहेत किंवा निराधार. अशा कथनांद्वारे धर्मात प्रमाण प्रस्थापित केले जाऊ शकत नाही. जर शबे बरातची काही वास्तविकता असती तर ही गोष्ट पैगंबरांच्या निकट असणाऱ्या अनुयायी मध्ये प्रसिद्ध असती आणि त्यास निवेदन करणाऱ्यांची संख्या अधिक असती. परंतु विचित्र गोष्ट ही की एवढी महत्वाची गोष्ट उल्लेखित करणारे एकतर प्रमाण गोळा करण्याच्या दृष्टीने कमजोर कथनकर्ते आहेत किंवा ते ज्यांनी लाभ प्रतिष्ठेच्या संदर्भात हदीस वचन रचण्याचा कारखाना उघडला होता.

४. म्हणजे गफलतीत पडलेल्या आणि आपल्या परिणतीशी बेखबर असलेल्या मानव जातीस सचेत करणे व खबरदार करणे ते महत्वपूर्ण उद्दिष्ट आहे ज्या करीता कुरआनाचे अवतरण झाले आहे.

५. अर्थात या रात्रीत अतिशय महत्वाचे आणि बुद्धिकौशल्य युक्त फैसले घेतले गेले. उदाहरणार्थ हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना प्रेषित्वपदाने सम्मानित करण्याचा निर्णय एक चमत्कारपूर्ण ग्रंथ अवतरीत करण्याचा निर्णय, या ग्रंथाच्या रक्षणाचा निर्णय धर्माची परिपूर्णता व त्याच्या वर्चस्वा विषयीचा निर्णय, मुस्लिम जनसमुदायास उभारण्याचा. त्यास नेतृत्वाच्या पदावर नियुक्त करण्याचा व काबागृहास त्याच्या व्यवस्थे खाली

देण्याचा निर्णय त्याच्याद्वारे जगात सार्वभौमिक धार्मिक क्रान्ती निर्माण करण्याचा निर्णय आणि जन्नतसाठी त्या लोकांची निवड करण्याचा निर्णय जे मानवतेच्या बागेतील टवटवीत फुले असावीत हे आणि या प्रकारचे फैसले. अल्लाहच्या बुद्धिकौशल्य पूर्ण वैभवास व्यक्त करणारे होते.

६. म्हणजे कुरआनाचे अवतरण संपूर्ण सृष्टीच्या स्वामीतर्फे एक अनिवार्य आज्ञापालानाचे फर्मान (Decree)च्या स्वरूपात झाले आहे. ज्याच्या इन्कार करण्याच्या परिस्थितीत शिक्षा अपरिहार्य आहे. कोणीही या भ्रमात राहू नये की या ग्रंथास मानणे किंवा न मानणे सारखेच आहे.

७. म्हणजे आमचा हा फैसला होता की एक पैगंबर पाठवायचा आहे. म्हणून आम्ही प्रेषित्वा करीता मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांची निवड करून त्यांच्यावर ईश संदेश अवतरीत केला.

८. म्हणजे हा ग्रंथ तुमच्या पालन कर्त्या तर्फे ईश कृपा बनून अवतरला आहे. याला आपल्या करीता संकट समजू नका जर मान्य कराल तर तुम्हावर त्याच्या सहस्त्रावधी कृपेचा वर्षाव होईल.

९. अल्लाहच्या या दोन गुणविशेषांचा या ठिकाणी उल्लेख या गोष्टी पासून सावध करण्याकरीता आहे की या भव्य-दिव्य ग्रंथाविषयी कोण काय म्हणतो ते तो ऐकून घेईल व त्याच्याशी कोण कसा व्यवहार करतो ते ही तो पाहील.

१०. म्हणजे अल्लाहचे संपूर्ण सृष्टीचे पालनकर्ता असणे एक वस्तुस्थिती आहे परंतु तुम्हाला याचा विश्वास वाटत नाही. जर तुम्हाला या गोष्टीचा विश्वास असता तर अल्लाह खेरीजच्या उपास्यांना तुम्ही उपास्य (देव) बनविले नसते.

*परंतु हे संशयात पडलेले खेळत आहेत. तेव्हा प्रतिक्षा करा त्या दिवसाची जेव्हा आकाशातून उघडपणे धूर प्रकट होईल. जो लोकांवर आच्छादित होईल. ही आहे दुःखदायक ईश शिक्षा. हे आमच्या पालन कर्त्या ! आमच्या पासून ईश-शिक्षा दूर कर. आम्ही ईमान बाळगतो. (अल-क़ुर्आन)*

९. परंतु हे संशयात पडलेले खेळत आहेत.[११]

بَلْ هُمْ فِي شَكٍّ يَلْعَبُونَ ٩

१०. तेव्हा प्रतिक्षा करा त्या दिवसाची जेव्हा आकाशातून उघडपणे धूर प्रकट होईल.[१२]

فَارْتَقِبْ يَوْمَ تَأْتِي السَّمَاءُ بِدُخَانٍ مُّبِينٍ ١٠

११. जो लोकांवर आच्छादित होईल. ही आहे दु:खदायक ईश शिक्षा.

يَغْشَى النَّاسَ ۖ هَٰذَا عَذَابٌ أَلِيمٌ ١١

१२. हे आमच्या पालन कर्त्या ! आमच्या पासून ईश-शिक्षा दूर कर. आम्ही ईमान बाळगतो.

رَّبَّنَا اكْشِفْ عَنَّا الْعَذَابَ إِنَّا مُؤْمِنُونَ ١٢

१३. आता त्यांच्याकरीता उपदेश ग्रहण करण्याची कोणती संधी राहीली जेव्हा त्यांच्याजवळ पैगंबर जाहीरपणे आला होता.[१३]

أَنَّىٰ لَهُمُ الذِّكْرَىٰ وَقَدْ جَاءَهُمْ رَسُولٌ مُّبِينٌ ١٣

१४. परंतु यांनी त्याच्याकडे पाठ फिरवली होती आणि म्हटले होते, हा तर एक शिकविलेला वेडा आहे.[१४]

ثُمَّ تَوَلَّوْا عَنْهُ وَقَالُوا مُعَلَّمٌ مَّجْنُونٌ ١٤

१५. आम्ही काही काळा करीता अजाब दूर ही केला तरी तुम्ही तेच कराल जे प्रथम करीत होता.[१५]

إِنَّا كَاشِفُو الْعَذَابِ قَلِيلًا ۚ إِنَّكُمْ عَائِدُونَ ١٥

१६. ज्या दिवशी आम्ही मोठया पकडीत घेऊ [१६] त्या दिवशी आम्ही शिक्षा दिल्या खेरीज राहणार नाही.

يَوْمَ نَبْطِشُ الْبَطْشَةَ الْكُبْرَىٰ إِنَّا مُنتَقِمُونَ ١٦

१७. आम्ही [१७] या आधी फिरऔन जन समूहास कसोटीत टाकले होते.[१८]त्यांच्याजवळ एक प्रतिष्ठीत पैगंबर आला.

وَلَقَدْ فَتَنَّا قَبْلَهُمْ قَوْمَ فِرْعَوْنَ وَجَاءَهُمْ رَسُولٌ كَرِيمٌ ١٧

१८. की अल्लाहच्या दासांना माझ्या हवाली करा [१९] मी तुमच्या करीता एक सत्यनिष्ठ पैगंबर आहे.[२०]

أَنْ أَدُّوا إِلَيَّ عِبَادَ اللَّهِ ۖ إِنِّي لَكُمْ رَسُولٌ أَمِينٌ ١٨

११. म्हणजे ईश्वरासंबंधी ते वेगवेगळया प्रकारच्या शंका-संशयात पडले आहेत आणि जी वस्तुस्थिती सादर केली जात आहे त्यावर ते गंभीरपणे विचार करायलाही तयार नाहीत; किंबहुना त्या वास्तव बाबींशी ते एक प्रकारे खेळ खेळत आहेत.

१२. अभिप्रेत कियामतीच धूर जो काफिर लोकांवर आच्छादित होईल जसे नंतरच्या आयतींवरून स्पष्ट आहे. परंतु बुखारीच्या हदीस संग्रहात हजरत अब्दुल्लाह बिन मसऊद द्वारे उल्लिखित आहे की यास अभिप्रेत तो धूर होय जो मक्केत लोकांना दुष्काळाच्या सक्त कष्ट यातना मध्ये ग्रस्त होण्यामुळे आकाशात दिसून येत होता. सर्वसामान्यपणे भाष्यकार या आयतीचे भाष्य करतांना हेच कथन सादर करतात,परंतु अल्लामा इब्ने कसीर यांनी याच्याशी मतभेद करतांना लिहीले आहे की कुरआनाने जे ‘दुखान मुबीन’ म्हटले आहे याचा अर्थ मोकळा आणि प्रकट असा धूर होय ज्याला प्रत्येक माणूस पाहू शकेल परंतु अब्दुल्लाह बिन मसऊदच्या भाष्यान्वये धूर केवळ काल्पनिक होता जो भूकेने अतिशय व्याकूळ झाल्यामुळे लोकांना दिसत होता आणि जर खरोखर हा काल्पनिक धूर असता तर कुरआनाने असे म्हटले नसते की, ‘तो लोकांवर आच्छादित होईल’

(पहा तफसीर इब्ने कसीर खंड-४, पृष्ठ- १३९)

आमच्या मते एखाद्या कथनास लक्षात घेता कुरआनाच्या एखाद्या आयतीचा असा खुलासा करणे, जो याच्या बाह्य पैलू व याच्या विषयाशी सुसंगत नसावा, योग्य नव्हे. मात्र कथनाचे हे स्पष्टीकरण केले जाऊ शकते की कथनाचा उल्लेख करण्यात कथनकर्त्याकडून भूलचूक झाली आहे. आणि जेथपावेतो कियामतीच्या दिवशी काफीर (नास्तिक) लोकांवर धूर सोडला जाण्याचा संबंध आहे. सूरह रहमान मध्ये ही याचा उल्लेख केला गेला आहे.

يُرۡسَلُ عَلَيۡكُمَا شُوَاظٌ مِّنۡ نَارٍ وَنُحَاسٌ
فَلَا تَنۡتَصِرَانِ۔ (رحمٰن:٣٥)

‘तुमच्यावर आगीचे निखारे आणि धूर सोडला जाईल. तेव्हा तुम्ही आपले संरक्षण करू शकणार नाहीत.’ (रहमान-३५)

राहीले ते हदीस वचन ज्यात कियामत जवळ आल्यावर धूर प्रकट होण्याचे भाकित केले गेले आहे (मुस्लिम किताबुल फितन) तर तो दूसरा धूर आहे जो कियामतीच्या लक्षणापैकी आहे आणि हदीस वचनात या धूराला या आयतीचे भाष्य ठरविले गेले नाही.

१३. उपदेश ग्रहण करण्याची संधी उघड आहे कियामतीच्या दिवशीच संपेल आणि हे या गोष्टीचे प्रमाण आहे की कुरआन ज्या धूराच्या शिक्षेचा उल्लेख करीत आहे तो कियामतीच्या दिवसाचा धूर होय.

१४. काफिरांचा हा आरोप अगदी निराधार होता. जर पैगंबरा संबंधी खरोखर ते असे समजत होते की एखाद्या मनुष्य त्यांना शिकवून तयार करीत आहे तर त्यांनी त्या माणसाचा स्पष्ट नामनिर्देश का केला नाही ? आणि तो मनुष्य होता तरी कसा जो शेवटपर्यंत लपून राहीला आणि हे जाहीर केले नाही की या महान ग्रंथाचा लेखक मी आहे? राहीला वेडा असण्याचा आरोप, तर कुरआनाचा अभ्यास करणारा प्रत्येक मनुष्य समजू शकतो की यात सत्याचा अंश कितपत आहे. ही वेडया माणसाची बडबड आहे की बुद्धिकौशल्य पूर्ण वाणी ?

१५. ही त्याच प्रकारची गोष्ट आहे जशी सूरह अनआम आयत क्र. २८ मध्ये फर्माविली गेली आहे.

وَلَوۡ رُدُّوۡا لَعَادُوۡا لِمَا نُهُوۡا عَنۡهُ وَاِنَّهُمۡ لَكٰذِبُوۡنَ۔

‘जर यांना (जगात) परत पाठविले गेले तर ते पुन्हा तेच करतील ज्यापासून यांना वर्ज्य केले गेले होते. ते नि:संशय खोटारडे आहेत.

१६. अभिप्रेत कियामतीच्या दिवसाची पकड होय आणि याचे समर्थन इब्ने अब्बास यांच्या या कथनाद्वारे होते जे तबरीने त्यांच्याद्वारे उल्लेखिले आहे.

‘अकरमाद्वारे उल्लेखित आहे की इब्ने अब्बास यांनी फर्माविले; इब्ने मसऊद म्हणतात البطشة الكبرىٰ शी अभिप्रेत बद्रचा दिवस आसहे. परंतु मी म्हणतो की अभिप्रेत कियामतीचा दिवस आहे.’’ (तफसीर तबरी. खंड २५, पृष्ठ - ७०)

१७. फिरऔन जन समूहाचा किस्सा यापूर्वी अनेक ठिकाणी वर्णिला गेला आहे. या ठिकाणी याचे काही पैलू परिस्थितीनुरूप प्रस्तुत केले गेले आहेत.

१८. कसोटी या गोष्टीची की अधिकार मिळाल्यावर दुर्बलांशी तुम्ही कोणता व्यवहार करता तसेच या गोष्टीची की अल्लाहतर्फे पैगंबर आल्यावर आणि चमत्कार पाहील्या नंतर तुम्ही त्याच्याशी कोणते वर्तन अंगिकारता.

१९. म्हणजे बनी इस्राईल वंशाच्या लोकांना माझ्या सोबत पाठवा की त्यांनी मिस्त्र (इजिप्त) हून प्रस्थान करावे. ते अल्लाहचे दास आहेत, फिरऔनचे नव्हेत आणि अल्लाहने आदेश दिला आहे की त्यांना तुम्ही माझ्या हवाली करा, यासाठी की त्यांना अल्लाहच्या आदेशांचे पालन करण्याकरीता स्वतंत्र वातावरण लाभावे.

२०. विश्वस्त पैगंबर आहे म्हणजे अल्लाहचा संदेश व त्याचे आदेश यथायोग्य रित्या तुमच्या पर्यंत पोहचवित आहे.माझ्या विषयी या गोष्टीचे भय असू शकत नाही की मी एखादी गोष्ट आपल्या तर्फे आल्लाहचा संबंध दर्शवून निवेदन करील.

وَأَن لَّا تَعْلُوا عَلَى اللَّهِ ۖ إِنِّي آتِيكُم بِسُلْطَانٍ مُّبِينٍ ﴿١٩﴾

१९. आणि अल्लाहच्या विरोधात विद्रोह करू नका. मी तुमच्या समोर स्पष्ट प्रमाण प्रस्तुत करतो. [२१]

وَإِنِّي عُذْتُ بِرَبِّي وَرَبِّكُمْ أَن تَرْجُمُونِ ﴿٢٠﴾

२०. आणि मी आपल्या आणि तुमच्या पालनकर्त्याचे शरण मागितले, या पासून की तुम्ही मला दगडांनी ठेचून मारावे.[२२]

وَإِن لَّمْ تُؤْمِنُوا لِي فَاعْتَزِلُونِ ﴿٢١﴾

२१. जर तुम्ही माझे म्हणणे मानत नाही तर मला सोडून द्या.[२३]

فَدَعَا رَبَّهُ أَنَّ هَٰؤُلَاءِ قَوْمٌ مُّجْرِمُونَ ﴿٢٢﴾

२२. शेवटी त्याने आपल्या पालनकर्त्याशी प्रार्थना केली की हे लोक अपराधी आहेत.[२४]

فَأَسْرِ بِعِبَادِي لَيْلًا إِنَّكُم مُّتَّبَعُونَ ﴿٢٣﴾

२३. (आदेश झाला) माझ्या दासांना घेऊन रात्रीच निघून जा [२५] तुम्हा लोकांचा पाठलाग केला जाईल.[२६]

وَاتْرُكِ الْبَحْرَ رَهْوًا ۖ إِنَّهُمْ جُندٌ مُّغْرَقُونَ ﴿٢٤﴾

२४. आणि समुद्राला स्थिर सोडा. हे लोक बुडून जाणारे सैन्य आहे.[२७]

كَمْ تَرَكُوا مِن جَنَّاتٍ وَعُيُونٍ ﴿٢٥﴾

२५. त्यांनी कितीतरी बागा आणि झरे सोडले.

وَزُرُوعٍ وَمَقَامٍ كَرِيمٍ ﴿٢٦﴾

२६. आणि शेत व उत्कृष्ट स्थळे.

وَنَعْمَةٍ كَانُوا فِيهَا فَاكِهِينَ ﴿٢٧﴾

२७. आणि सुखोपभोगाची सामुग्री ज्यात ते मौज उडवित होते.[२८]

كَذَٰلِكَ ۖ وَأَوْرَثْنَاهَا قَوْمًا آخَرِينَ ﴿٢٨﴾

२८. अशा प्रकारे आम्ही त्यांच्याशी व्यवहार केला आणि या वस्तूंचा वारसदार आम्ही इतरांना बनविले.[२९]

فَمَا بَكَتْ عَلَيْهِمُ السَّمَاءُ وَالْأَرْضُ وَمَا كَانُوا مُنظَرِينَ ﴿٢٩﴾

२९. तेव्हा ना आकाश यांच्या बद्दल रडले आणि ना जमीन [३०] आणि ना यांना कसली सवड दिली गेली.

२१. म्हणजे आपला पैगंबर असण्याचे प्रमाण अभिप्रेत चमत्कार होय.

२२. यावरून कल्पना येते की फिरऔनच्या जन समूहाने हजरत मूसा यांना दगडांचा वर्षाव करून ठार मारण्याचा इरादा केला होता आणि यावरून ही कल्पना ही येते की हजरत मूसा यांनी केवढया मोठया दृढ संकल्प व धैर्याचा पुरावा दिला.

या आयतीत हे मार्गदर्शनही आहे की एखाद्या ईमान धारकास जेव्हा शत्रू तर्फे अत्याधिक धोका निर्माण झाल्यास त्याने या उपद्रवापासून अल्लाहचे शरण मागावे.

२३. म्हणजे जर तुम्ही माझे म्हणणे मान्व करू इच्छित नाही तर नका मानू परंतु माझा मार्ग रोखू नका किंबहुना मला माझ्या दशेवर सोडा. परंतु एवढी योग्य गोष्ट देखील फिरऔन व त्याच्या जन-समूहाला मान्य झाली नाही आणि ते हजरत मूसा यांच्या विरोधात कारवाया करीत राहीले.

२४. ही दुआ (प्रार्थना) हजरत मूसा यांनी अशा वेळी केली जेव्हा सुधारणेचा सतत प्रयत्न केल्यानंतर ते त्या लोकां विषयी निराश झाले होते आणि त्यांना ही खात्री झाली होती की आता हे लोक ईमान बाळगणार नाहीत.

२५. संकेत आहे या गोष्टीकडे की फिरऔन जनसमूहाच्या विनाशाचा फैसला केला गेला आहे. यास्तव तुम्ही माझ्या दासांना अर्थात बनी इस्राईल वंशीय लोकांना घेऊन रात्रीतूनच इजिप्तमधून निघून जा.

२६. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह शोअरा टीप क्र. ४९

२७. हजरत मूसा यांनी समुद्रावर लाठी मारल्यामुळे तो दुभंगला होता आणि बनी इस्राईल करीता चमत्कारपूर्ण रित्या मार्ग तयार झाला होता यासाठी की त्यानी समुद्र ओलांडून जावे. या प्रसंगी हजरत मूसा यांना ताकीद केली गेली की बनी इस्राईल सोबत समुद्राला पार केल्यानंतर त्यांनी त्याला त्याच स्थितीत राहू द्यावे आणि पुन्हा लाठी मारून दुभंगलेल्या समुद्राला मिळवण्याचा इरादा करू नये कारण अल्लाहची योजना अशी आहे की फिरऔनने मार्ग मोकळा पाहून आपल्या लष्करा समवेत दाखल व्हावे आणि समुद्राला मध्यभागी तो पोहचताच अल्लाहने समुद्राच्या दोन्ही भागांना परस्पर मिळवावे परिणामी फिरऔन आपल्या सैन्यासह बुडून मरावा.

२८. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह शोअरा टीप क्र. ५२.

२९. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह शोअरा टीप क्र. ५३

३०. म्हणजे फिरऔन आणि त्याच्या जनसमूहाच्या विनाशावर ना आकाशाच्या रहिवाश्यांना दु:ख झाले आणि ना जमीनीवर राहणाऱ्यांना. कारण तो अत्याचारी होता व आपल्या विनाशास स्वत:च कारणीभूत होता.

३०. आणि आम्ही बनी इस्राईलला अपमान जनक अजाब (ईश-शिक्षे) पासून मुक्ति दिली.

وَلَقَدْ نَجَّيْنَا بَنِىٓ إِسْرَٰٓءِيلَ مِنَ ٱلْعَذَابِ ٱلْمُهِينِ ﴿٣٠﴾

३१. फिरऔन पासून[३१] जो मर्यादेचे उल्लंघन करणाऱ्या लोकांपैकी होता,[३२] आणि मोठा बंडखोर.[३३]

مِن فِرْعَوْنَ ۚ إِنَّهُۥ كَانَ عَالِيًا مِّنَ ٱلْمُسْرِفِينَ ﴿٣١﴾

३२. आणि आम्ही यांना (अर्थात बनी इस्राईल वंशाच्या लोकांना) जाणीवपूर्वक जगात राहणाऱ्यांवर प्राधान्य दिले.[३४]

وَلَقَدِ ٱخْتَرْنَٰهُمْ عَلَىٰ عِلْمٍ عَلَى ٱلْعَٰلَمِينَ ﴿٣٢﴾

३३. आणि त्यांना अशा निशाण्या प्रदान केल्या ज्यात उघड कसोटी होती.[३५]

وَءَاتَيْنَٰهُم مِّنَ ٱلْءَايَٰتِ مَا فِيهِ بَلَٰٓؤٌا۟ مُّبِينٌ ﴿٣٣﴾

३४. हे लोक [३६] मोठया दृढपणे म्हणतात

إِنَّ هَٰٓؤُلَآءِ لَيَقُولُونَ ﴿٣٤﴾

३५. की बस हे आमचे पहीले मरण आहे [३७] आणि त्यानंतर आम्ही उठविले जाणार नाहीत.

إِنْ هِىَ إِلَّا مَوْتَتُنَا ٱلْأُولَىٰ وَمَا نَحْنُ بِمُنشَرِينَ ﴿٣٥﴾

३६. जर तुम्ही सच्चे असाल तर घेऊन या आमच्या पूर्वजांना.[३८]

فَأْتُوا۟ بِـَٔابَآئِنَآ إِن كُنتُمْ صَٰدِقِينَ ﴿٣٦﴾

३७. (सामर्थ्य आणि वैभवात) हे लोक श्रेष्ठ आहेत कि तुब्बअ जनसमूह [३९] आणि ते जन समूह जे यांच्या पूर्वी होऊन गेले.[४०] आम्ही त्यांना नष्ट केले. ते मोठे अपराधी होते.

أَهُمْ خَيْرٌ أَمْ قَوْمُ تُبَّعٍ وَٱلَّذِينَ مِن قَبْلِهِمْ ۚ أَهْلَكْنَٰهُمْ ۖ
إِنَّهُمْ كَانُوا۟ مُجْرِمِينَ ﴿٣٧﴾

३८. आम्ही आकाश व जमीन आणि यांच्या दरम्यानच्या वस्तूंना खेळ म्हणून बनविले नाही.[४१]

وَمَا خَلَقْنَا ٱلسَّمَٰوَٰتِ وَٱلْأَرْضَ وَمَا بَيْنَهُمَا لَٰعِبِينَ ﴿٣٨﴾

३९. आम्ही त्यांना सत्य (उद्दिष्टा) सह निर्माण केले आहे, परंतु बहुतांश लोक जाणत नाहीत.[४२]

مَا خَلَقْنَٰهُمَآ إِلَّا بِٱلْحَقِّ وَلَٰكِنَّ أَكْثَرَهُمْ لَا يَعْلَمُونَ ﴿٣٩﴾

४०. निर्णयाचा दिवस [४३] या सर्वांकरीता ठरलेल्या वेळी आहे.

إِنَّ يَوْمَ ٱلْفَصْلِ مِيقَٰتُهُمْ أَجْمَعِينَ ﴿٤٠﴾

३१. म्हणजे फिरऔन बनी इस्राईल करीता प्रकोप ठरला होता आणि प्रकोपही असा जो अपमानित करणारा होता परंतु अल्लाहने बनी इस्राईलवर जो एक ईमान बाळगणारा समूह होता कृपा केली आणि फिरऔनच्या जुलमी तावडीतून त्याची सुटका केली.

या वृत्तांतात ईमान बाळगणाऱ्या करीता एक धडा आहे की जर ते काही कारणास्तव अत्याचारी शासकांच्या तावडीत सापडले तर संयम व धैर्यपूर्वक ईमानाच्या निकडी त्यांनी पूर्ण कराव्यात अल्लाह त्यांना यातून सुटका होण्याचा मार्ग मोकळा करील.

३२. म्हणजे नैतिक मर्यादांचे उल्लंघन करणारा होता. दुसऱ्या शब्दात सांगायचे म्हणजे दुराचारी, दुर्व्यसनी व अत्याचारी होता.

३३. म्हणजे जेथे तो दासांच्या हक्कात अत्याचारी होता, तिथे तो अल्लाहचा अवज्ञाकारी व बंडखोर ही होता.

३४. म्हणजे जगातील लोकांच्या धार्मिक मार्गदर्शन व नेतृत्वाकरीता बनी इस्राईलची जी निवड केली तर ती अल्लाहने आपल्या ज्ञानाच्या आधारावर केली होती. म्हणजे अल्लाहला बनी इस्राईलच्या पात्रता व गुण विशेषांचे ज्ञान होते आणि जगातील समस्त जन समूहामधून या जन समूहाची निवड ही अगदी योग्य अशी निवड होती.

३५. अभिप्रेत ते ईश-चमत्कार होत जे बनी इस्राईल करीता देणग्यांची योग्यता बाळगत होते. उदाहरणार्थ त्यांच्या करीता समुद्राचे दुभंगणे, वाळवंटात ढगांचे छायारूप होणे, झऱ्यांचे प्रवाहीत होणे, मन्न व सलवा या खाद्यपदार्थाचे आकाशातून अवतरीत होणे इत्यादि परंतु यात त्यांच्या धैर्य व स्थैर्यशीलतेची कसोटी ही होती.

३६. अभिप्रेत मक्केचे अनेकेश्वरवादी होत.

३७. म्हणजे पहिल्यांदा जे मरण येईल ती जीवनाची अंतिम अवस्था असेल. त्यानंतर जीवन-मरणाचा क्रम संपतो.

३८. म्हणजे जर दुसऱ्या जीवनाची काही वास्तविकता आहे तर त्याच्या पुष्टिकरीता पूर्वी होऊन गेलेल्या लोकांना जिवंत करून दाखवा जेव्हा आम्ही आपल्या डोळयांनी पूर्वी होऊन गेलेल्या लोकांना आपल्या समक्ष जिवंत झालेले पाहू तेव्हा दुसऱ्या जीवनावर विश्वास ठेवू.

त्यांची ही मागणी मोठी मुर्खतापूर्ण गोष्ट होती. कारण ज्या गोष्टीचे ज्ञान माणसाला अनुभवाद्वारे लाभले ती अपरोक्षाशी संबंधित राहत नाही आणि ना तिच्यावर ईमान बाळगण्याचा प्रश्न उद्भवतो. मग कसोटी कसली, वास्तविक हे जीवन अगदी कसोटीपूर्ण जीवन आहे.

३९. तुब्बअ यमनच्या बादशहांची उपाधि होती जो सबा जन समूहाचा एक कबिला 'हिम्पर'शी संबंधित होते आणि ज्यांचा काळ इ. स. पूर्वीचा राहीला आहे.

त्यांचा काळ अगदी निश्चित करणे कठीण आहे आणि त्यांची तपशीलवार परिस्थिती जाणून घेण्याकरीता ही एखादे सनदशीर प्रमाण नाही. मात्र सूरह काफ-आयत क्र. १४ वरून स्पष्ट होते की तुब्बाअ जनसमूहाकडे ही पैगंबर पाठविला गेला होता, ज्याला त्या जनसमूहाने खोटे ठरविले आणि शेवटी ईश-शिक्षेस पात्र ठरला.

४०. म्हणजे आद समूद या सारखे मार्गभ्रष्ट जन समूह.

४१. स्पष्टीकरणा करीता पहा सूरह अंबिया टीप क्र. १६

४२. म्हणजे या सृष्टीला निर्माण करण्याचा एक हेतु आहे,एक उद्दिष्ट आहे; आणि तो म्हणजे मोबदला व शिक्षेचा मामला आणि मानवजातीमधील रत्न-माणके वेगळी करून त्यांना सदैव टिकणारे यश व जन्नतच्या कधीही न संपणाऱ्या देणग्यांनी सम्मानित करावे. परंतु अधिकांश लोकांची ही अवस्था आहे की ते आपल्या अस्तित्वाच्या हेतु पासून अनभिज्ञ आहेत आणि यांना या गोष्टीची काहीच काळजी नाही की आपल्या जीवनाचे उद्दिष्ट जाणून घ्यावे.

४३. म्हणजे कियामतीचा दिवस.

يَوْمَ لَا يُغْنِىْ مَوْلًى عَنْ مَّوْلًى شَيْـًٔا وَّلَا هُمْ يُنْصَرُوْنَ ﴿٤١﴾

४१. ज्या दिवशी कोणी ही घनिष्ठ मित्र एखाद्या घनिष्ठ मित्राच्या उपयोगी पडणार नाही आणि ना त्यांची काही मदत केली जाईल.

اِلَّا مَنْ رَّحِمَ اللّٰهُ ۭ اِنَّهٗ هُوَ الْعَزِيْزُ الرَّحِيْمُ ﴿٤٢﴾

४२. या खेरीज की अल्लाहनेच एखाद्यावर कृपा करावी.[४४] नि:संशय तो मोठा जबरदस्त कृपा करणारा आहे.[४५]

اِنَّ شَجَرَتَ الزَّقُّوْمِ ﴿٤٣﴾

४३. नि:संशय जक्कुम [४६] चे झाड.

طَعَامُ الْاَثِيْمِ ﴿٤٤﴾

४४. गुन्हेगारांचे खाद्य असेल.

كَالْمُهْلِ ۚ يَغْلِىْ فِى الْبُطُوْنِ ﴿٤٥﴾

४५. जणू वितळलेला धातू. तो पोटात उकळेल.[४८]

كَغَلْىِ الْحَمِيْمِ ﴿٤٦﴾

४६. जणू गरम पाणी उकळत आहे.[४९]

خُذُوْهُ فَاعْتِلُوْهُ اِلٰى سَوَآءِ الْجَحِيْمِ ﴿٤٧﴾

४७. धरा याला [५०] आणि फरफटत नेऊन जहन्नमच्या मधोमध घेऊन जा.

ثُمَّ صُبُّوْا فَوْقَ رَاْسِهٖ مِنْ عَذَابِ الْحَمِيْمِ ﴿٤٨﴾

४८. आणि त्याच्या डोक्यावर उकळत्या पाण्याची ईश-शिक्षा ओता.

ذُقْ ۚ اِنَّكَ اَنْتَ الْعَزِيْزُ الْكَرِيْمُ ﴿٤٩﴾

४९. चाख याची गोडी, तू मोठा जबरदस्त व प्रतिष्ठीत माणूस आहे.[५१]

اِنَّ هٰذَا مَا كُنْتُمْ بِهٖ تَمْتَرُوْنَ ﴿٥٠﴾

५०. ही तीच गोष्ट आहे जिच्या विषयी तुम्ही संशय ग्रस्त होते.[५२]

اِنَّ الْمُتَّقِيْنَ فِىْ مَقَامٍ اَمِيْنٍ ﴿٥١﴾

५१. मात्र अल्लाहचे भय बाळगणारे [५३] शांतीपूर्ण ठिकाणी असतील.[५४]

فِىْ جَنّٰتٍ وَّعُيُوْنٍ ﴿٥٢﴾

५२. बागांमध्ये आणि झऱ्यांच्या ठिकाणी.

४४. कियामतीच्या दिवशी ना नाते-संबंध उपयोगी पडतील आणि ना मैत्री-संबंध, किंबहुना मुक्तिचा मामला अल्लाहच्या दयेवर अवलंबून राहील आणि अल्लाहचा हा फैसला आहे की तो काफीरांवर दया करणार नाही म्हणून कोणी ही कुफ्र (नास्तिकता) करीत अल्लाह कडून कृपेची अभिलाषा बाळगू नये.

४५. अल्लाह मोठा जबरदस्त आहे यास्तव जर तो आपल्या शिक्षेच्या तावडीत घेऊ इच्छितो तर यापासून स्वत:ला कोणी वाचवू शकत नाही आणि तो मोठा दयाळू आहे यास्तव तो ज्याच्यावर कृपा करू इच्छितो तर त्याला कृपा करण्या पासून रोखू शकेल असा कोणीही नाही.

४६. स्पष्टीकरणाकरीता पहा सूरह साफ्फात टीप क्र. ५१.

४७. अभिप्रेत काफीर लोक होते, जसे पुढील आयत क्र. ५० द्वारे स्पष्ट आहे.

४८. म्हणजे जक्कूम खाल्यानंतर त्यांची अवस्था अशी होईल जणू पोटात एखादा वितळलेला धातू उकळत आहे.

४९. म्हणजे जक्कूम पोटात गरम पाण्यासारखे उकळत असेल.

५०. हा आदेश फरिशत्यांना असेल.

५१. हा टोमणा आहे की तू तर स्वत:ला मोठा जबरदस्त आणि प्रतिष्ठीत मनुष्य समजत होता, वास्तविक तू बंडखोर बनून मोठी वाईट कृत्ये केली होती. आता चाख आपल्या कर्माची फळे आणि बघ आज तू कसा अगतिक व अपमानित आहेस !

५२. कियामत व मोबदला आणि शिक्षा या गोष्टींचा इन्कार करणेच नव्हे तर त्या विषयी संशय ग्रस्त होणे ही फार मोठा अपराध आहे कारण संशय ग्रस्त झाल्यावर ही मनुष्य या जगालाच आपले जीवन उद्दिष्ट जाणतो आणि अल्लाहचा अवज्ञाकारी बनून मनाला येईल ते करू लागतो. यास्तव आचरण दृष्टया आखिरतचा इन्कार करणारे आणि त्याबाबत संशय करणारे या दोघांत कसलाही फरक राहात नाही. आणि म्हणूनच दोघे ही यथार्थरित्या जहन्नमच्या शिक्षेस पात्र आहेत.

५३. अपराधी व आखिरत विषयी संशय ग्रस्त असणाऱ्यांच्या तुलनेत अल्लाहचे भय बाळगणाऱ्यांची परिणति निवेदिली जात आहे. ज्यावरून ही गोष्ट आपोआप स्पष्ट होते की ईश-भिरू लोक ते होत जे अखिरतवर श्रद्धा ठेवतात व ज्यांचे जीवन अल्लाहचे आज्ञापालन करण्यात व्यतीत होते.

५४. म्हणजे जिथे कसल्याही प्रकारची भिती वा दहशत नसेल अभिप्रेत जन्नत होय. हदीस वचनातील उल्लेख असाकी

اَنَّ لَكُمْ اَنْ تَصِحُّوْا فَلَا تَسْقَمُوْ اَبَدًا وَاَنَّ لَكُمْ اَنْ تَحْيَوْا فَلَا تَمُوْتُوْا اَبَدًا، وَاَنَّ لَكُمْ اَنْ تَشُبُّوْا فَلَا تَهْرِمُوْا اَبَدًا۔ وَاَنَّ لَكُمْ اَنْ تَنْعَمُوْا فَلَا تَبْأَسُوْا اَبَدًا۔ (مسلم کتاب الجنة)

“तुमच्या करीता ही गोष्ट निश्चित आहे की तुम्ही धडधाकट राहाल. कधीही आजारी पडणार नाहीत तुम्ही जिवित राहाल. कधीही मरण पावणार नाहीत. तुम्ही तरूण राहाल. कधीही म्हातारे होणार नाहीत आणि तुम्ही सुखोपभोगात राहाल. कधीही तुम्हाला त्रास पोहचणार नाही.” (मुस्लिम-किताबुल जन्नत)

५३. पातळ व घट्ट रेशमाची वस्त्रे घालून समोरा समोर बसले असतील.

يَلْبَسُونَ مِن سُندُسٍ وَإِسْتَبْرَقٍ مُّتَقَابِلِينَ ﴿٥٣﴾

५४. अशा प्रकारे ते सम्मानित केले जातील. आणि सुंदर डोळयांच्या अप्सरांशी आम्ही त्यांचा विवाह करून देऊ.[५५]

كَذَٰلِكَ وَزَوَّجْنَاهُم بِحُورٍ عِينٍ ﴿٥٤﴾

५५. तिथे ते समाधानाने सर्व प्रकारचे मेवे मागतील.

يَدْعُونَ فِيهَا بِكُلِّ فَاكِهَةٍ آمِنِينَ ﴿٥٥﴾

५६. पहिल्या मृत्युनंतर ते कोणत्याही मृत्युची गोडी चाखणार नाहीत.[५६] आणि अल्लाह त्यांना जहन्नमच्या अजाब (शिक्षे) पासून सुरक्षित ठेवील.

لَا يَذُوقُونَ فِيهَا الْمَوْتَ إِلَّا الْمَوْتَةَ الْأُولَىٰ ۖ وَوَقَاهُمْ عَذَابَ الْجَحِيمِ ﴿٥٦﴾

५७. हे तुमच्या पालन कर्त्याच्या कृपेने घडेल.[५७] हीच आहे मोठी सफलता.[५८]

فَضْلًا مِّن رَّبِّكَ ۚ ذَٰلِكَ هُوَ الْفَوْزُ الْعَظِيمُ ﴿٥٧﴾

५८. आम्ही (हे पैगंबर!) तुमच्या भाषेत याला सोपे बनविले आहे अशासाठी की लोकांनी उपदेश ग्रहण करावा.[५९]

فَإِنَّمَا يَسَّرْنَاهُ بِلِسَانِكَ لَعَلَّهُمْ يَتَذَكَّرُونَ ﴿٥٨﴾

५९. आता तुम्ही ही प्रतिक्षा करा. ते देखील वाट बघतात.[६०]

فَارْتَقِبْ إِنَّهُم مُّرْتَقِبُونَ ﴿٥٩﴾

५५. मूळ शब्द हूर.हूर अरबी भाषेत गौरवर्णीय टपोरे डोळे असणाऱ्या (मृगनयनी) स्त्रीयांना म्हटले जाते.या ठिकाणी जन्नतच्या अतिसुंदर स्त्रीया अभिप्रेत आहेत, ज्यांचा ईश-भय बाळगणाऱ्या लोकांशी विवाह लावला जाईल.कुरआनात हे कोठे ही सांगितले गेले नाही की ही एखादी अन्य निर्मिती असेल, म्हणून याचा बाहयार्थ हाच की या माणसांपैकी असतील आणि नवल नव्हे की ज्या अविवाहीत मुली मरण पावल्यात त्यांनाच हूर बनवून ईश-भीरू लोकांची पत्नी बनविले जावे. कुरआनाच्या निवेदनावरून हे ही माहीत होते की ईमान बाळगणाऱ्यांना त्यांच्या ईमान धारक पत्न्या तर जन्नत मध्ये लाभतीलच, आणखी हे की हूर (परी) शी ही त्यांचा विवाह करून दिला जाईल. अल्लाह अधिक चांगले जाणतो.

राहीली ही सर्वसामान्य धारणा की जन्नतमध्ये एक एक मनुष्याला सत्तर किंबहुना याहून जास्त संख्येने हूर मिळतील तर याची काही वास्तविकता नाही. ना कुरआनात असे काही सांगितले गेले आहे आणि ना एखाद्या सहीह हदीस वचनाद्वारे हे सिद्ध आहे. अशा गोष्टी कथा कहाण्या सांगणारे लोक निवेदन करीतात आणि जन्नतची थट्टा उडविणारे याला चर्चेचा विषय बनवतात.

५६. म्हणजे जगात जे पहीले मरण येईल त्यानंतर त्यांच्या करीता सदैव कालीन जीवन आहे. मरणाचा पुन्हा त्यांच्यावर कदी प्रसंग येणार नाही.

५७. जहन्नमच्या शिक्षेपासून सुरक्षित असणे ईशभयावर आधारीत असले तरी ते अगदी अल्लाहच्या कृपेनेच होईल. त्याच्या कृपेविना जन्नतमध्ये पोहचणे कोणाच्याही अवाक्यातले नाही.

५८. जहन्नमच्या अजाब (शिक्षे) पासून सुरक्षित राहणे व जन्नत मध्ये दाखल होणे सर्वात मोठी सफलता आहे. जे लोक यास वास्तविक सफलता समजतात ते तिच्या प्राप्तीसाठी प्रत्येक प्रकारचे बलीदान देण्याकरीता तत्पर असतात.

५९. म्हणजे कुरआनाला अरबी भाषेत अवतरीत केले गेले आहे जी पैगंबर मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) व त्यांच्या जनसमूहाची मातृभाषा आहे. तसेच यास अतिशय सोप्या व सर्वांना समजेल अशा शैलीत प्रस्तुत केले गेले आहे. यासाठी की लोकांनी स्मरणाचा लाभ घ्यावा. कुरआनाचे खास वैशिष्टय आहे. की तो सूक्ष्मातिसूक्ष्म विषयांना जे सृष्टीचे रहस्यभेद मनुष्याची आंतरिक अवस्था,अध्यात्मिक अवस्था आणि कियामतीच्या अहवालाशी संबंधित आहेत अशा सोप्या शैलीत प्रस्तुत करतो की त्यांचा प्रारंभिक मजकूर ही सर्व सामान्य माणसाला, जर तो स्वच्छ व निर्मळ बुद्धी बाळगत असेल, समजणे व त्यापासून बोध ग्रहण करणे जे कुरआनाचा सर्वप्रथम हेतु आहे, काहीच कठीण नाही. उपदेश व बोध प्राप्तीचा हा लाभ अरबी भाषा न जाणणारे कुरआनाचा अनुवादाद्वारे ही प्राप्त करू शकतात मात्र तो अनुवाद योग्य असावा.

ही आयत सूरह कमरच्या या आयतीचे

وَلَقَدْ يَسَّرْنَا الْقُرْآنَ لِلذِّكْرِ فَهَلْ مِن
مُّدَّكِرٍ۔ (قمر:٢٢)

'' आम्ही कुरआनास बोध ग्रहण करण्या करीता सोपे केले आहे, तेव्हा आहे कोणी बोध ग्रहण करणारा.'' (कमर-२२)

भाष्य करते आणि यापासून 'जिक्र'चा हा अर्थ की उपदेश व बोध प्राप्त करणे, निर्धारीत होतो. यास्तव ज्या विद्वानांनी हा आश्य सोडून केवळ शब्दकोषाच्या आधारे याचा अर्थ 'मुखोद्गत' असा घेतला आहे म्हणजे कुरआनाला तोंडी पाठ करण्या करीता सोपे बनविले गेले आहे तेव्हा या आयतीने त्यांच्या या स्पष्टीकरणाचे खंडन होते.

६०. म्हणजे या ताकीद व उपदेशा नंतर ही जर हे लोक कर्मफळाचीच वाट बघत आहे तर तुम्हीही यांना यांच्या दशेवर सोडून द्या आणि प्रतिक्षा करा. परिस्थिती स्वत:दाखवून देईल की कुरआन व पैगंबर यांनी जे काही सांगितले होते कशा प्रकारे सत्य ठरले.

# सूरह
# अल् जासिया

# ४५. सूरह अल् जासिया

**नाव :** आयत क्र. २८ मध्ये कियामतीच्या दिवशी प्रत्येक समूहाच्या ''जासिया'' म्हणजे गुडघे टेकून पडल्याचा उल्लेख केला गेला आहे. या अनुषंगाने या सूरहचे नाव ''अल जासिया'' असे आहे !

**अवतरण काळ:** मक्की आहे आणि मजकूरांवरून असे दिसून येते की सूरह दुखान नंतर निकटच्या काळात अवतरली असेल.

**मध्यवर्ति कल्पना:** तौहीद (एकेश्वरवाद) आणि आखिरतच्या निशाण्यांकडे लक्ष वेधीत इन्कार केल्याच्या परिणामां विषयी खबरदार करणे

**आयत रचना :** आयत क्र. १ ते ६ मध्ये तौहीदच्या निशाण्यांकडे लक्ष वेधले गेले आहे. ज्यांचे आवाहन कुरआन करीत आहे.

आयत क्र. ७ ते १५ मध्ये अल्लाहच्या आयतींना ऐकण्यास नकार दर्शविणाऱ्यांना त्यांच्या इन्काराच्या दुष्परिणामा विषयी खबरदार केले गेले आहे आणि ईमान बाळगणाऱ्यांना ताकीद केली गेली आहे की त्यांनी यांच्याकडे कानाडोळा करावा.

आयत क्र. १६ ते २० मध्ये बनी इस्राईलला ही तंबी की त्यांनी धर्माची देणगी लाभल्या नंतर त्यात मतभेद निर्माण केले आणि ही ताकीद की आता जी शरीअत (धर्म शास्त्र) अवतरीत केले जात आहे तिचे अनुसरण केले जावे.

आयत क्र. २१ ते ३५ मध्ये मोबदला व शिक्षेच्या दिवसा विषयी काही आक्षेपांना उत्तर व शंकांचे निरसन आहे.

आयत क्र. ३६ व ३७ सूरहच्या समारोपाच्या आयती होत. ज्यात अल्लाहची प्रशंसा निवेदिली गेली आहे.

# ४५. सूरतुल जासिया

سُورَةُ الجَاثِيَة

आयती - ३७

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بِسْمِ اللَّهِ الرَّحْمَٰنِ الرَّحِيمِ

१. हा-मीम.[१]

حمٓ ①

२. या ग्रंथाचे अवतरण अल्लाह तर्फे आहे [२] जो जबरदस्त आणि बुद्धिकौशल्य बाळगणारा आहे.

تَنزِيلُ الْكِتَابِ مِنَ اللَّهِ الْعَزِيزِ الْحَكِيمِ ②

३. आकाशांमध्ये आणि जमीनीवर मोठमोठया निशाण्या आहेत ईमान बाळगणाऱ्यां करीता.[३]

إِنَّ فِي السَّمَاوَاتِ وَالْأَرْضِ لَآيَاتٍ لِّلْمُؤْمِنِينَ ③

४. आणि तुमच्या निर्मितीत व त्या जनावरांमध्ये, जी त्याने पसरवून ठेवली आहेत; निशाण्या आहेत विश्वास ठेवणाऱ्यां करीता.[४]

وَفِي خَلْقِكُمْ وَمَا يَبُثُّ مِن دَابَّةٍ آيَاتٌ لِّقَوْمٍ يُوقِنُونَ ④

५. आणि रात्र व दिवसाच्या येण्या-जाण्यात आणि त्या उपजिविकेमध्ये जिला अल्लाह आकाशातून अवतरीत करतो, मग त्याद्वारे जमीनीला ती मृत झाल्यानंतर जिवंत करतो आणि वाऱ्यांच्या भ्रमंतीत निशाण्या आहेत त्या लोकांकरीता जे बुद्धिचा वापर करतील.[५]

وَاخْتِلَافِ اللَّيْلِ وَالنَّهَارِ وَمَا أَنزَلَ اللَّهُ مِنَ السَّمَاءِ مِن
رِّزْقٍ فَأَحْيَا بِهِ الْأَرْضَ بَعْدَ مَوْتِهَا وَتَصْرِيفِ الرِّيَاحِ آيَاتٌ
لِّقَوْمٍ يَعْقِلُونَ ⑤

६. ह्या अल्लाहच्या आयती (वचने) होत ज्या तुम्हाला सत्यासह ऐकवित आहोत.[६] आता अल्लाह व त्याच्या आयती नंतर ती अशी कोणती गोष्ट आहे जिच्यावर हे लोक ईमान बाळगतील ![७]

تِلْكَ آيَاتُ اللَّهِ نَتْلُوهَا عَلَيْكَ بِالْحَقِّ ۖ فَبِأَيِّ حَدِيثٍ بَعْدَ
اللَّهِ وَآيَاتِهِ يُؤْمِنُونَ ⑥

७. सर्वनाश आहे प्रत्येक खोटारडया गुन्हेगार माणसा करीता.[८]

وَيْلٌ لِّكُلِّ أَفَّاكٍ أَثِيمٍ ⑦

१. या अक्षरांच्या स्पष्टीकरणा करीता पहा सूरह मोमनि टीप क्र.१

या सूरहमध्ये **''हा मीम'** या अक्षरांचा संकेत अल्लाह 'हकीम' (बुद्धिकौशल्य बाळगणारा) असण्याकडे आहे. ज्याचा उल्लेख आयत क्र.२ मध्ये केला गेला आहे.

२. कुरआन वारंवार हे स्पष्ट करतो की हा ग्रंथ अल्लाहने आपल्या पैगंबरावर अवतरीत केला आहे यासाठी की लोकांना कसलाही संशय बाळगण्यास वाव राहू नये व त्यांनी या ग्रंथाच्या संबंधाने आपल्या जबाबदाराची जाणीव राखावी.

३. अर्थात जे लोक अल्लाहकडे लक्ष वेधून घेणाऱ्या निशाण्यांना पाहून ईमान बाळगण्या करीता तयार असावेत त्यांच्या करीता आकाशात व जमीनीवर मोठमोठया निशाण्या आहेत. कुरआन या निशाण्यांना तपशील पूर्वक निवेदितो अशासाठी की लोकांनी विचार चिंतन करावे. पुढे काही निशाण्यांचा उल्लेख केला गेला आहे.

आयतीवरून हा संकेत ही मिळतो की ईमान एक तन्मयतेची कैफीयत आहे जो आकाश व जमीनीच्या अवलोकानाने माणसाच्या अंगी निर्माण होते. जर मनुष्य आपल्या विवेक बुद्धिवर कायम असेल तर आकाश व जमीनीला पाहून त्याचा अंतरात्मा स्वत: उद्‌गारेल की ही एकाच ईश्वराची कृती आहे तोच खराखुरा उपास्य आहे.

४. या निशाण्यांवर विचार चिंतन केल्याने अल्लाहचा तो परिचय प्राप्त होतो, जो त्याच्या एकमेव उपास्य असण्या बद्दल विश्वास निर्माण करतो.

५. म्हणजे या निशाण्यांवर विचार चिंतन केल्याने जिथे ईमान व विश्वास निर्माण होतो तिथे मन ही अल्लाहच्या एकमेवते बाबत संतुष्ट होते.

६. म्हणजे अल्लाहच्या या आयती तुम्हाला अशा प्रकारे ऐकविल्या जात आहेत की त्या प्रत्येक प्रकारच्या मिश्रणा पासून अलिप्त आहे. त्यांचा प्रत्येक शब्द अल्लाहचा स्वत:च्या संदेश आहे आणि त्याच्या द्वारे सत्य अगदी स्पष्टपणे समोर येत आहे.

७. म्हणजे जेव्हा अल्लाहचे अस्तित्व एक स्पष्ट वस्तुस्थिती आहे आणि त्याच्या आयतींनी त्याच्या अस्तित्व व एकमेवतेस आणखी दिव्य केले आहे तेव्हा यांच्या ईमान बाळगण्या करीता अधिक कोणत्या प्रमाणाची गरज उरते?

८. ईश्वरासंबंधी जो मनुष्य खोटे बोलतो, त्याचे जीवन अपरिहार्यपणे अपराधाचे जीवन असते.

८. जो अल्लाहच्या आयतींना ज्या त्याच्या समोर पठण केल्या जातात, ऐकतो मग गर्वाने (आपल्या कुफ्रवर) हट्ट धरतो, जणू त्याने यांना (आयतींना) ऐकलेच नाही. तेव्हा अशा माणसाला दु:खदायक शिक्षेची खुषखबर द्या.[९]

يَّسْمَعُ اٰيٰتِ اللّٰهِ تُتْلٰى عَلَيْهِ ثُمَّ يُصِرُّ مُسْتَكْبِرًا
كَاَنْ لَّمْ يَسْمَعْهَا ۚ فَبَشِّرْهُ بِعَذَابٍ اَلِيْمٍ ﴿٨﴾

९. आमच्या आयतीपैकी एखादी गोष्ट याच्या ध्यानी येते तेव्हा तो याला थट्टा मस्करी बनवितो. अशा लोकं करीता अपमानाची शिक्षा आहे.

وَاِذَا عَلِمَ مِنْ اٰيٰتِنَا شَيْـًٔا ۨاتَّخَذَهَا هُزُوًا ۗ اُولٰٓئِكَ لَهُمْ
عَذَابٌ مُّهِيْنٌ ﴿٩﴾

१०. त्यांच्या पुढयात जहन्नम आहे [१०] जे काही त्यांनी कमविले आहे [११] ते त्यांच्या काहीच उपयोगी पडणार नाही आणि ना ते यांच्या उपयोगी पडतील ज्यांना यांनी अल्लाहला सोडून कार्य साधक बनवून ठेवले आहे.[१२] यांच्या करीता फार मोठी शिक्षा आहे,

مِنْ وَّرَآئِهِمْ جَهَنَّمُ ۚ وَلَا يُغْنِيْ عَنْهُمْ مَّا كَسَبُوْا شَيْـًٔا وَّلَا مَا اتَّخَذُوْا
مِنْ دُوْنِ اللّٰهِ اَوْلِيَآءَ ۚ وَلَهُمْ عَذَابٌ عَظِيْمٌ ﴿١٠﴾

११. हे पूरेपूर मार्गदर्शन आहे [१३] आणि ज्या लोकांनी आपल्या पालन कर्त्याच्या आयतींचा इन्कार केला त्यांच्याकरीता अत्याधिक तीव्र असा दु:खदायक अजाब (शिक्षा) आहे.

هٰذَا هُدًى ۚ وَالَّذِيْنَ كَفَرُوْا بِاٰيٰتِ رَبِّهِمْ لَهُمْ
عَذَابٌ مِّنْ رِّجْزٍ اَلِيْمٌ ﴿١١﴾

१२. अल्लाहच होय ज्याने तुमच्या करीता समुद्राला अधीन केले [१४] यासाठी की त्याच्या आदेशाने यात नावा चालाव्यात आणि तुम्ही याची कृपा शोधावी.[१५] आणि यासाठी की तुम्ही त्याचे कृतज्ञ व्हावे.

اَللّٰهُ الَّذِيْ سَخَّرَ لَكُمُ الْبَحْرَ لِتَجْرِيَ الْفُلْكُ فِيْهِ بِاَمْرِهٖ وَلِتَبْتَغُوْا
مِنْ فَضْلِهٖ وَلَعَلَّكُمْ تَشْكُرُوْنَ ﴿١٢﴾

१३. आणि त्याने आकाशांच्या व जमीनीच्या समस्त गोष्टींना आपल्या तर्फे तुमच्या सेवेस लावून ठेवले आहे. [१६] यात नि:संशय निशाण्या आहेत [१७] त्या लोकांकरीता जे विचार चिंतन करतील.

وَسَخَّرَ لَكُمْ مَّا فِي السَّمٰوٰتِ وَمَا فِي الْاَرْضِ جَمِيْعًا مِّنْهُ ۗ اِنَّ
فِيْ ذٰلِكَ لَاٰيٰتٍ لِّقَوْمٍ يَّتَفَكَّرُوْنَ ﴿١٣﴾

९. दु:खदायक अजाब ही काही खुशखबर नव्हे परंतु याला खुशखबर या अर्थाने एवढयासाठी घेतले गेले आहे की काफीरांनी शुद्धीवर यावे.

१०. म्हणजे भविष्य कालीन जीवनात यांची जहन्नमशी गाठ असेल.

११. कमविणे धनसंपदा या अर्थानेही आहे व आचरणाच्या अर्थानेही

१२. मग ती मूर्ति असो, देवी देवता असो, फरिश्ते असोत किंवा बुजुर्ग व्यक्तिमत्व, ज्यांच्या श्रद्धेत ते एवढे लीन आहेत, जसे अल्लाहच्या श्रद्धेत असले पाहीजे आणि ज्यांच्याशी तो अशा अपेक्षा बाळगतो ज्या फक्त अल्लाहशीच बाळगल्या जाऊ शकतात.

१३. अर्थात हे कुरआन.

१४. अधीन केले म्हणजे तुमच्या सेवेस लावून दिले हा त्यानेच बनविलेला निसर्ग-नियम आहे की समुद्रात नावा आणि मोठ मोठी जहाजे उभे असतात व बुडत नाही अन्यथा एक दगड जरी टाकला तर तो बुडतो.

१५. अभिप्रेत व्यापारी प्रवास होय जो अर्थोपार्जनाचे माध्यम आहे अर्थोपार्जनास अल्लाहची कृपा अर्थाने घेतले गेले आहे, कारण हे अल्लाहचे पालन कर्ता असणे होय जे माणसाला व्यक्त करणे आवश्यक आहे.

व्यापार उदीम एक ईमान बाळगणारा ही करतो व एक काफिर देखील परंतु दोघांची विचार सरणी मूलभूतपणे भिन्न भिन्न असते. ईमान बाळगणारा असे समजतो, की माझी धावपळ अल्लाहची कृपा शोधण्यासाठी आहे की त्याने आपल्या कृपेने जी उपजिविका उपलब्ध करून दिली आहे, तिला प्राप्त करून मी त्याच्या देणगीची कदर जाणणारा बनावे. याऊलट काफीर असे समजतो की मला आपली उपजिविका आपल्या पात्रतेच्या बळावर प्राप्त करावयाची आहे. मग जे काही प्राप्त होते त्याला तो आपल्या परिश्रमाचे फळ समजतो.

१६. म्हणजे जेव्हा सर्व वस्तू त्यानेच निर्माण केल्या आहेत व तुमच्या सेवेस ही त्यानेच लावल्या आहेत. त्याच्या खेरीज ना कोणी एखाद्या वस्तूचा निर्माता आहे आणि ना तिला कार्यान्वित करणारा.

१७. या निशाण्या, ज्याकडे माणसाचे लक्ष वेधले जात आहे ईश्वराची ओळख घडविण्याचे व त्याच्याशी योग्य असा संबंध जोडण्याचे उत्कृष्ट व महत्वपूर्ण माध्यम आहे आणि प्रत्येक मनुष्य कुरआनाच्या मार्गदर्शनान्वये या निशाण्यांवर विचार चिंतन करून त्या निष्कर्षाप्रत पोहचू शकतो, ज्यास कुरआन याच्या समोर सादर करीत आहे. या निशण्या प्रत्येक विशेष व सर्व साधारण व्यक्तिच्या लक्षात येणाऱ्या व मनाला भिडणाऱ्या आहेत. यांच्या विरोधात ईश्वराच्या अस्तित्व वगैरे विषयी जी लहान मोठी तार्किक प्रमाणे प्रस्थापित करून सादर केली जातात ते ना सर्व सामान्य माणसाच्या ध्यानी येणारे असतात आणि ना ते एवढे प्रभावशाली ठरतात.

१४. ईमान बाळगणाऱ्यांना सांगा, त्यांनी त्या लोकांकडे कानाडोळा करावा जे अल्लाह तर्फे जाहीर होणाऱ्या अहल घडविणाऱ्या दिवसांची भिती बाळगत नाही ज्यायोगे अल्लाह ने एका समूहाला, तो करत आलेल्या कमाईचा बदला द्यावा.[१८]

قُلْ لِّلَّذِيْنَ اٰمَنُوْا يَغْفِرُوْا لِلَّذِيْنَ لَا يَرْجُوْنَ اَيَّامَ اللّٰهِ لِيَجْزِيَ
قَوْمًا بِمَا كَانُوْا يَكْسِبُوْنَ ﴿١٤﴾

१५. जो कोणी सत्कृत्य करील तो आपल्या साठीच करील आणि जो दुष्कर्म करील त्याचे संकट त्याच्यावरच असेल.[१९] मग तुम्ही आपल्या पालन कर्त्याकडे परतविले जाल.[२०]

مَنْ عَمِلَ صَالِحًا فَلِنَفْسِهٖ ۚ
وَمَنْ اَسَآءَ فَعَلَيْهَا ۫ ثُمَّ اِلٰى رَبِّكُمْ تُرْجَعُوْنَ ﴿١٥﴾

१६. आम्ही बनी इस्राईलला ग्रंथ आणि बुद्धि कौशल्य व प्रेषित्व प्रदान केले होते [२१] त्यांना आम्ही स्वच्छ शुद्ध उपजिविका प्रदान केली होती.[२२] आणि जगातल्या समस्त लोकांवर प्राधान्य प्रदान केले होते.[२३]

وَلَقَدْ اٰتَيْنَا بَنِيْٓ اِسْرَآءِيْلَ الْكِتٰبَ وَالْحُكْمَ وَالنُّبُوَّةَ وَرَزَقْنٰهُمْ
مِّنَ الطَّيِّبٰتِ وَفَضَّلْنٰهُمْ عَلَى الْعٰلَمِيْنَ ﴿١٦﴾

१७. त्यांना धर्म-संदर्भात स्पष्ट आदेश दिले. तेव्हा त्यांनी जो मदभेद केला तो ज्ञान प्राप्त झाल्यानंतर केला. केवळ आपसात एकमेकांविरूद्ध अतिरेका पायी. निःसंशय तुमच्या पालन कर्ता कियामतीच्या दिवशी यांच्या दरम्यान त्या गोष्टींचा फैसला करील ज्यात ते मतभेद करीत राहीले.[२४]

وَاٰتَيْنٰهُمْ بَيِّنٰتٍ مِّنَ الْاَمْرِ ۚ فَمَا اخْتَلَفُوْٓا اِلَّا مِنْۢ بَعْدِ مَا جَآءَهُمُ
الْعِلْمُ ۙ بَغْيًۢا بَيْنَهُمْ ۭ اِنَّ رَبَّكَ يَقْضِيْ بَيْنَهُمْ يَوْمَ
الْقِيٰمَةِ فِيْمَا كَانُوْا فِيْهِ يَخْتَلِفُوْنَ ﴿١٧﴾

१८. मग आम्ही तुम्हाला एका स्पष्ट शरीअतीवर कायम केले. यास्तव तुम्ही तिचे अनुसरण करा आणि त्या लोकांच्या इच्छा-आकांक्षांचे अनुसरण करू नका जे ज्ञान बाळगत नाही.[२५]

ثُمَّ جَعَلْنٰكَ عَلٰى شَرِيْعَةٍ مِّنَ الْاَمْرِ فَاتَّبِعْهَا وَلَا تَتَّبِعْ اَهْوَآءَ
الَّذِيْنَ لَا يَعْلَمُوْنَ ﴿١٨﴾

१९. हे लोक अल्लाहच्या विरोधात तुमच्या काहीच उपयोगी पडणार नाहीत.[२६] हे अत्याचारी एकमेकांचे मित्र आहेत आणि अल्लाह ईश भय बाळगणाऱ्यांचा मित्र आहे.

اِنَّهُمْ لَنْ يُّغْنُوْا عَنْكَ مِنَ اللّٰهِ شَيْـًٔا ۭ وَاِنَّ الظّٰلِمِيْنَ بَعْضُهُمْ
اَوْلِيَآءُ بَعْضٍ ۚ وَاللّٰهُ وَلِيُّ الْمُتَّقِيْنَ ﴿١٩﴾

२०. या लोकांकरीता अंतर्दृष्टिच्या गोष्टी आहेत [२७] आणि मार्गदर्शन व कृपा आहे त्या लोकांकरीता जे विश्वास बाळगतील.

هٰذَا بَصَآىِٕرُ لِلنَّاسِ وَهُدًى وَّرَحْمَةٌ لِّقَوْمٍ يُّوْقِنُوْنَ ﴿٢٠﴾

१८. अल्लाहतर्फे जाहीर होणाऱ्या दिवसांशी अभिप्रेत ते ऐतिहासिक दिवस होत ज्यात सर्वश्रेष्ठ अल्लाहने अपराधी जन-समूहांना अद्दल घडविणारी शिक्षा दिली. अशा प्रकारची शिक्षा यापुढे ही त्या लोकांना दिली जाऊ शकते जे अपराधी जन समूहांच्या पावलो पावली चालतील. परंतु जे लोक आपल्या अपराधपूर्ण हरकती नंतर ही या प्रकारची कसली ही भिती बाळगत नाही आणि ईमान बाळगणाऱ्यांना दु:ख यातना पोहचवित राहतात,त्यांच्या दु:ख यातना देण्याकडे दुर्लक्ष करण्याची ताकीद केली गेली आहे. अशासाठी की सर्वश्रेष्ठ अल्लाहने स्वत: यांच्या दुष्कर्माची शिक्षा द्यावी.

एकीकडे कुरआनाचे हे मार्गदर्शन आहे तर दुसरी कडे आजच्या मुसलमानांचे हे आचरण आहे की ते काफिर लोकांकडून दिल्या जाणाऱ्या प्रत्येक दु:ख यातनेवर प्रक्षोभ व्यक्त करतात. आणि निषेधाची चळवळ चालविण्या करीता तत्पर असतात.

स्पष्ट असावे की कानाडोळा करण्याच्या या मार्गदर्शनाचा अवलंब करण्याचे ही एक स्थळ काळ आहे. आणि काफिर लोकांशी युद्ध करण्याचीही काही काळ वेळ आहे. दोघात काही विरोध नाही आणि काही कारण नव्हे की या आयतीला त्या आयतीद्वारे ज्यात 'किताल' चा आदेश दिला गेला आहे, रद्द ठरविले जावे.

१९. स्पष्टीकरणा करीता पहा सूरह हा मीम सजदा टीप क्र. ५१.

२०. म्हणजे जिथून तुमचा आरंभ झाला होता तिथेच तुमची इतिश्री पण होईल. तुमच्या निर्मितीचा आरंभ तुमच्या पालन कर्त्या (अल्लाह) तर्फे झाली यास्तव तुम्ही आपल्या पालन कर्त्याकडे परतविले जाल. ना अन्य कोणी तुम्हाला निर्माण केले आहे आणि ना अन्य एखाद्याकडे तुम्ही परतविले जाल.

२१. बनी इस्राईल वंशाला तौरात, जबूर, इंजील (बायबल) या सारखे ईश-ग्रंथ प्रदान केले गेले. त्या सोबतच हिकमत म्हणजे ईश ग्रंथाचे आकलन ही प्रदान केले गेले. या साठी की त्यांनी आपल्या आचरणात यापासून मार्गदर्शन प्राप्त करावे आणि त्यांच्यात पैगंबरांचा क्रम चालवला.

२२. म्हणजे स्वच्छ शुद्ध व हलाल उपजिवेकेची द्वारे त्यांच्यावर खुली केली होती. मिस्र (इजिप्त) मध्ये तर त्यांना अत्याचार पिडीताचे जीवन व्यतीत करावे लागले होते. परंतु या वातावरणातून बाहेर पडल्या नंतर मोकळे वातावरण त्यांना लाभले आणि मग पॅलेस्टीन मध्ये त्यांना सत्ताधिकार प्राप्त झाला तेव्हा हराम (अवैध) गोष्टींमध्ये गुरफटून जाण्याकरीता त्यांना कसलीही अगतिकता राहीली नाही. शरीअतने निर्धारीत केलेल्या मर्यादांमध्ये राहून स्वच्छ - शुद्ध उपजिविकेची प्राप्ती त्यांच्या करीता सहज सुलभ झाली.

२३. म्हणजे इतर जन समूहांच्या तुलनेत या जन-समूहास सत्य-धर्माकडे आवाहन करण्यासाठी व जगातील सर्व लोकांना मार्गदर्शन करण्यासाठी निवडले गेले. हा फार मोठा सन्मान होता, जो बनी इस्राईलला प्रदान केला गेला आणि या उद्दिष्टाच्या पूर्तते करीता बैतुल मक्दिसला इस्लामच्या आवाहनाचे केंद्र बनविले गेले.

२४. स्पष्टीकरणासाठी पहा सूरह आले इमरान टीप क्र. २७, २८ आणि सूरह हा मीम सजदा टीप क्र. ६८ व सूरह यूनुस टीप क्र. १४४

बनी इस्राईलच्या ज्या मतभेदाचा उल्लेख कुरआन करतो, तो कुरआनाचे अनुसरण करणाऱ्यां करीता बोध आहे. परंतु असे असतांना ही मुसलमानांनी बनी इस्राईल सारखे वर्तन अंगिकारले. त्यांच्या समोर क़ुरआनाचे स्पष्ट आदेश आणि त्याच्या पैगंबराची आचरण पद्धती आहे तरीही ते समूहा समूहात व विभिन्न संप्रदायात विभागले गेले आहेत आणि एकमेकांचा विरोध करण्यात धर्माचे मनाला येईल तसे स्पष्टीकरण करीत आहेत. अंधानुकरण व अंधश्रद्धेच्या बंधनातून मुक्त आणि सामूहीक पक्षपातापासून अलिप्त होऊन कुरआन व पैगंबर आचरणाचे अध्ययन करणारे आणि त्याच्या प्रकाशात वाटचाल करणारे मुसलमान फार कमी आढळतात. अन्यथा मुस्लिम समाजात अत्याधिक नवनवीन प्रथा प्रचलीत झाल्या आहेत आणि ते मोठया वाईट रित्या इच्छा भक्तित मग्न झाले आहेत.

२५. म्हणजे जी शरीयत तुम्हाला कुरआनाद्वारे दिली जात आहे तिचे पालन करा आणि तिला सोडून इतर ईश ग्रंथ बाळगणाऱ्यांच्या पद्धतिचे अनुसरण करू नका, ज्या त्यांनी आपल्या इच्छा आकांक्षांच्या पोटी प्रचलीत केल्या आहेत व ज्या धर्मात बिदअत (नवनवीन प्रथा) चे स्थान बाळगतात.

२६. ही ताकीद आहे की जर तुम्ही कुरआनाच्या शरीअतीस सोडून इतर ईश-ग्रंथाच्या स्वरचित गोष्टींचे अनुसरण केले तर कियामतीच्या दिवशी त्या तुम्हाला अल्लाहच्या पकडीतून सोडवू शकणार नाहीत.

२७. अभिप्रेत अंतदृष्टिच्या गोष्टीं आहेत, म्हणजे ज्ञानाच्या प्रकाशात आणणाऱ्या गोष्टीं आहेत.

२१. काय ते लोक ज्यांनी दुराचार केला आहे असे समजतात की आम्ही यांना त्या लोकांसारखे लेखू ज्यांनी ईमान बाळगले व ज्यांनी सत्कर्मे केली, त्यांचे जगणे व मरणे एक सारखे व्हावे? [२८] फार मोठा फैसला आहे जो ते करीत आहेत.[२९]

أَمْ حَسِبَ الَّذِينَ اجْتَرَحُوا السَّيِّئَاتِ أَنْ نَجْعَلَهُمْ كَالَّذِينَ آمَنُوا
وَعَمِلُوا الصَّالِحَاتِ سَوَاءً مَحْيَاهُمْ وَمَمَاتُهُمْ ۚ سَاءَ مَا يَحْكُمُونَ ﴿٢١﴾

२२. अल्लाहने आकाशांना व जमीनीला सत्य (हेतु) सह निर्माण केले आहे [३०]आणि अशासाठी निर्माण केले आहे की प्रत्येक माणसाला त्याच्या कमाईचा मोबदला दिला जावा [३१]आणि त्यांच्यावर अन्याय मुळीच केला जाणार नाही.[३२]

وَخَلَقَ اللَّهُ السَّمَاوَاتِ وَالْأَرْضَ
بِالْحَقِّ وَلِتُجْزَىٰ كُلُّ نَفْسٍ بِمَا كَسَبَتْ وَهُمْ لَا يُظْلَمُونَ ﴿٢٢﴾

२३. काय तुम्ही त्या माणसाला पाहीले; ज्याने आपल्या इच्छेला आपले उपास्य बनवून घेतले आहे ? [३३] आणि अल्लाहने यास जाणीव पूर्वक मार्गभ्रष्ट केले [३४] आणि त्याच्या काना व हृदयावर मोहर लावली आणि त्याच्या डोळयांवर आवरण घातले [३५] आता कोण आहे जो अल्लाह नंतर याला मार्गदर्शन करील?[३६] मग काय तुम्ही लोक शुद्धीवर येत नाही?[३७]

أَفَرَأَيْتَ مَنِ اتَّخَذَ إِلَٰهَهُ هَوَاهُ وَأَضَلَّهُ اللَّهُ عَلَىٰ عِلْمٍ وَخَتَمَ عَلَىٰ
سَمْعِهِ وَقَلْبِهِ وَجَعَلَ عَلَىٰ بَصَرِهِ غِشَاوَةً فَمَنْ يَهْدِيهِ مِنْ
بَعْدِ اللَّهِ ۚ أَفَلَا تَذَكَّرُونَ ﴿٢٣﴾

२४. हे लोक म्हणतात, आमचे जीवन तर निव्वळ ऐहिक जीवन आहे इथेच आम्हाला मरायचे व जगायचे आहे आणि आम्हाला फक्त काळाचे भ्रमण नष्ट करतो.[३८] (वास्तविक) यांना या विषयी काहीच ज्ञान नाही. हे केवळ अटकळीच्या गोष्टी करतात.[३९]

وَقَالُوا مَا هِيَ إِلَّا حَيَاتُنَا الدُّنْيَا نَمُوتُ وَنَحْيَا وَمَا يُهْلِكُنَا إِلَّا
الدَّهْرُ ۚ وَمَا لَهُمْ بِذَٰلِكَ مِنْ عِلْمٍ ۖ إِنْ هُمْ إِلَّا يَظُنُّونَ ﴿٢٤﴾

२५. आणि जेव्हा यांना आमच्या दिव्य आयती (वचने) ऐकविली जातात तेव्हा यांचा युक्तिवाद केवळ हा असतो की आणा आमच्या वाडवडीलांना जर तुम्ही सच्चे असाल.[४०]

وَإِذَا تُتْلَىٰ عَلَيْهِمْ آيَاتُنَا بَيِّنَاتٍ مَا كَانَ حُجَّتَهُمْ إِلَّا أَنْ قَالُوا
ائْتُوا بِآبَائِنَا إِنْ كُنْتُمْ صَادِقِينَ ﴿٢٥﴾

२८. स्पष्टीकरणा करीता पहा सूरह सॉद टीप क्र. ३९

२९. म्हणजे ही मोठी अयोग्य आणि अन्यायपूर्ण गोष्ट आहे की दुराचारींना सदाचारी लोकांसमान लेखले जावे व असे समजले जावे की मनुष्य जे काही वर्तन अंगिकारील अल्लाहच्या नजरेत सारखेच आहे. तो ना तर दुष्कर्म व अत्याचार करणाऱ्यांकडे लक्ष देतो आणि ना नेकी व भलाई करणाऱ्यांशी खुश होतो व त्यांना त्यांचा चांगला मोबदला देतो.

३०. याचे स्पष्टीकरण सूरह दुखान टीप क्र. ४२ मध्ये केले गेले आहे.

३१. हे आहे ते सत्याचे उद्दिष्ट ज्याकरीता सृष्टीला निर्माण केले गेले. जर मोबदला व शिक्षेचा व्यवहार उद्भवणारा नसता तर या सृष्टीचा काही हेतुच उरला नसता. जे लोक मोबदला व शिक्षा यांचा इन्कार करतात. त्यांना या सृष्टीचे कोणतेही उद्दिष्ट ठरविता येत नाही आणि ही केवढी आश्चर्याची बाब होय की मनुष्य आपल्या सृष्टीच्या निर्मिती विषयी अंधारात रहावा व अशा प्रकारे जगावा की त्याला काही खबरच नसावी की पुढे काय उदभवणार आहे व त्यासाठी काय तयारी करावी लागणार आहे. अशा माणसाच्या अपयशा बाबत शंका उरत नाही जो परीक्षा स्थळाला हिंडण्या फिरण्याचे स्थान समजतो.

३२. स्पष्ट झाले की काफिरांनी जी सक्त व सदैव कालीन शिक्षा दिली जाईल ती अगदी न्याय्य असेल. तिला अत्याचार तेच लोक समजतात जे त्या न्याय तुलेशी अनाभिज्ञ आहेत जी या सृष्टीत कायम केली गेली आहे.

وَالسَّمَاءَ رَفَعَهَا وَوَضَعَ الْمِيزَانَ۔ (الرحمن:٧)

''आकाशाला त्याने उंच केले आणि तुला प्रस्थापित केली.'' (अर्रहमान-७)

३३. स्पष्टीकरणा करीता पहा सूरह फुर्कान टीप क्र. ५७ ज्ञान, बुद्धि आणि ईश-संदेशाच्या प्रकाशास सोडून आपल्या इच्छा-आकाक्षांच्या मागे धावणे म्हणजे त्यांची आराधना व उपासना करणे होय. म्हणूनच त्यांना उपास्य बनविणे या अर्थाने घेतले गेले आहे अन्यथा आपल्या इच्छेची पूजा कोणी करीत नाही अल्लामा आलूसी यांनी आयतीचे स्पष्टीकरण अशा प्रकारे केले आहे :-

''ही आश्चर्याची अभिव्यक्ति आहे त्या माणसाच्या दशेबद्दल जो मार्गदर्शनाचे अनुसरण करण्या ऐवजी आपल्या इच्छा आकांक्षेच्या अधीन होतो. जणू तो त्यांची उपासना करीत आहे तेव्हा हा उपमा अलंकार होय.'' (रूहूल मआनी खंड २५, पृ. १५२)

३४. म्हणजे अल्लाहने याला उगीच मार्गभ्रष्ट केले नाही, किंबहुना त्याच्या स्थितीचे ज्ञान बाळगून मार्गभ्रष्ट केले की तो मार्गदर्शनास कबूल करण्याकरीता तयार नाही. त्याच्या मनाची ही स्थिती अल्लाहला ठाऊक होती म्हणून अल्लाहने त्याला भटकण्यास्तव सोडून दिले.

३५. स्पष्टीकरणा करीता पहा सूरह बकरा टीप क्र.१५

३६. म्हणजे जो मनुष्य अल्लाहच्या अपमानित करणाऱ्या नियमाच्या तावडीत आला, त्याला ना कोणी समजावू शकतो, ना मार्गदर्शन करू शकतो.

३७. कुरआन ऐकणाऱ्यांना ताकीद आहे की तुम्ही शुद्धीवर असावे व त्या लोकांसारखे बनू नये ज्यांनी इच्छा भक्तिचा मार्ग अंगिकारला.

३८. आयतीत 'दहर' हा शब्द प्रयोग केला गेला आहे. ज्याचा अर्थ काळ असा आहे आणि यास अभिप्रेत कालचक्र होय. मक्केचे अनेकेश्वरवादी ईश्वराचा इन्कार करणारे नव्हते, किंबहुना त्याच्या अस्तित्वास मान्य करणारे होते व हे करतांना इतर दैवतांना लाभ हानी पोहचविणारे समजत आणि यांच्यातच एक समूह असा होता, जो मृत्यु देणारा अल्लाहला नव्हे तर कालचक्राला ठरवित होता. त्यांची अशी धारणा होती की मृत्यु ना ईश्वरी योजनेचा भाग आहे आणि ना यानंतर दुसरे एखादे जीवन आहे म्हणून ते आपल्या मृत्युला कालचक्रास कारणीभूत ठरवित की वेळ आली की मनुष्य मरण पावतो. ज्या प्रमाणे मनुष्य वेळे सोबतच तरूण व म्हातारा होतो. याच कारणास्तव तो एखादे संकट कोसळल्यावर किंवा एखादे दु:ख पोहचल्यावर काळ-वेळेला बरे वाईट म्हणत, ज्याची मनाई हदीस वचनात केली गेली आहे.

पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी असे फर्माविले की-

قَالَ اللّٰهُ يَسُبُّ بَنُوْ اٰدَمَ الدَّهْرَ وَاَنَا الدَّهْرُ بِيَدِى اللَّيْلُ وَالنَّهَارُ۔ (صحیح البخاری کتاب الادب)

''अल्लाह फर्मावीतो आमदची संतती काळाला बरे वाईट म्हणते. वस्तुत: काळ मी आहे. रात्र आणि दिवस माझ्या कब्ज्यात आहेत.'' (सहीह बुखारी किताबुल अदब)

'काळ मी आहे' याचा हा अर्थ नव्हे की अल्लाह काळाच्या स्वरूपात भौतिक अस्तित्व बाळगतो. अल्लाह या गोष्टी पासून मुक्त आहे की त्याचे एखादे भौतिक अस्तित्व असावे. भौतिक अस्तित्व बाळगणाऱ्या सर्व गोष्टी निर्मिती होत. जेव्हा अल्लाह या सर्वांचा निर्माता आहे म्हणून काळ देखील निर्मिती होय. निर्माता नव्हे. या हदीसे कुदुसी मध्ये जी गोष्ट सांगितली गेली तिचा अर्थ असा की माणसाला जेव्हा एखादे दु:ख किंवा यातना

पोहचते तेव्हा तो याचा संबंध कालचक्राशी जोडून काळाला बरे वाईट म्हणू लागतो. परंतु खरे पाहता काळाचा उलटफेर करणारा अल्लाह आहे म्हणून जे काही दु:ख वा यातना पोहचते ती अल्लाहने निर्धारीत केलेल्या नशीबानुसार पोहचते याबद्दल काळाला बरेवाईट म्हणणे, अल्लाहला बरे वाईट म्हणण्या समान आहे. कारण काळ स्वत:तर्फे कोणतेही संकट आणत नाही.

स्पष्ट असावे की 'नास्तिक' सध्या प्रचलीत असलेल्या परिभाषेत अशा माणसाला म्हटले जाते जो ईश्वराचा अगदी इन्कार करणारा असावा आणि काल चक्रालाच कर्ता करविता समजतो. परंतु आयतीत जी गोष्ट निवेदिली जाते ती अनेकेश्वर वाद्यांबाबत आहे, ती अल्लाहचा इन्कार करणाऱ्यांना ही लागू पडते.

३९. म्हणजे यांच्या या गोष्टी एखाद्या ज्ञानविषयक प्रमाणांवर आधारीत नाही किंबहुना केवळ अटकळीच्या आधारे ते असे बोलतात. अन्यथा त्यांना हे कसे माहीत झाले की मेल्यानंतर ना आत्म्याशी काही व्यवहार उद्‌भवतो आणि ना दुसऱ्यांदा जिवित व्हायचे आहे.

४०. यांचा हा युक्तिवाद खरोखर एखादे प्रमाण नाही, किंबहुना ते यास आपल्या परीने प्रमाण समजून प्रस्तुत करतात. आणि ते हे की जर मृतांना जिवंत केले जाणार आहे तर आमच्या वाड वडीलांना जिवंत करून आमच्या समोर का आणत नाही, त्यांची ही मागणी अगदी निरर्थक होती कारण कुरआन दुसऱ्या जीवना विषयी जी खबर देत आहे ती कियामतीच्या दिवशी घडून येणारी गोष्ट आहे, या जगात घडणारी नव्हे. जर या जगातच ती घडून आली असती तर मग ईमान बाळगण्याचा प्रश्नच उरत नाही आणि ना कसोटीची संधी बाकी राहते.

**आणि जेव्हा म्हटले जात होते की अल्लाहचा वायदा सच्चा आहे आणि कियामती बाबत काहीच शंका नाही तेव्हा तुम्ही म्हणत, आम्ही नाही जाणत कियामत काय आहे आम्ही तर एक कल्पना बाळगतो आणि आम्ही याचा विश्वास करणारे नाही.*(अल-कुर्आन)***

२६. यांना सांगा, अल्लाहच तुम्हाला जीवन प्रदान करतो मग तुम्हाला मरण देतो. मग तोच तुम्हाला कियामतीच्या दिवशी एकत्रित करील ज्याच्या येण्यात काहीच शंका नाही परंतु अधिकांश लोक हे जाणत नाहीत.[४१]

قُلِ اللّٰهُ يُحْيِيْكُمْ ثُمَّ يُمِيْتُكُمْ ثُمَّ يَجْمَعُكُمْ اِلٰى يَوْمِ الْقِيٰمَةِ
لَا رَيْبَ فِيْهِ وَلٰكِنَّ اَكْثَرَ النَّاسِ لَا يَعْلَمُوْنَ ﴿٢٦﴾

२७. आकाशांची व जमीनीची राज्य-सत्ता अल्लाह करीताच आहे; आणि ज्या दिवशी कियामत प्रस्थापित होईल त्या दिवशी असत्याची पूजा करणारे तोटयात राहतील.

وَلِلّٰهِ مُلْكُ السَّمٰوٰتِ وَالْاَرْضِ ۭ وَيَوْمَ تَقُوْمُ السَّاعَةُ يَوْمَئِذٍ يَّخْسَرُ
الْمُبْطِلُوْنَ ﴿٢٧﴾

२८. आणि तुम्ही प्रत्येक समूहाला गुडघे टेकलेले पाहाल.[४२] प्रत्येक समूहास त्याच्या कर्म लेखाकडे बोलाविले जाईल.जे तुम्ही करीत राहीलात त्याचा आज तुम्हाला मोबदला दिला जाईल.

وَتَرٰى كُلَّ اُمَّةٍ جَاثِيَةً ۣ كُلُّ اُمَّةٍ تُدْعٰٓى اِلٰى كِتٰبِهَا ۭ اَلْيَوْمَ تُجْزَوْنَ
مَا كُنْتُمْ تَعْمَلُوْنَ ﴿٢٨﴾

२९. हे आमचे रेकॉर्ड आहे जे तुमच्या विषयी यथायोग्य बोलत आहे.[४३] जे काही तुम्ही करीत होता आम्ही त्यास लिहवून घेत होतो.[४४]

هٰذَا كِتٰبُنَا يَنْطِقُ عَلَيْكُمْ بِالْحَقِّ ۭ اِنَّا كُنَّا نَسْتَنْسِخُ
مَا كُنْتُمْ تَعْمَلُوْنَ ﴿٢٩﴾

३०. तेव्हा ज्या लोकांनी ईमान बाळगले व सत्कृत्य करीत राहीले त्यांना त्यांचा पालनकर्ता आपल्या कृपेत दाखल करील. ही स्पष्ट अशी सफलता होय.[४५]

فَاَمَّا الَّذِيْنَ اٰمَنُوْا وَعَمِلُوا الصّٰلِحٰتِ فَيُدْخِلُهُمْ رَبُّهُمْ
فِيْ رَحْمَتِهٖ ۭ ذٰلِكَ هُوَ الْفَوْزُ الْمُبِيْنُ ﴿٣٠﴾

३१. आणि ज्या लोकांनी कुफ्र केले, त्यांना म्हटले जाईल, काय माझ्या आयती तुम्हाला वाचून एकविल्या जात नव्हत्या ? परंतु तुम्ही गर्व केला आणि तुम्ही अपराधी लोक होते.

وَاَمَّا الَّذِيْنَ كَفَرُوْا ۣ اَفَلَمْ تَكُنْ اٰيٰتِيْ تُتْلٰى عَلَيْكُمْ
فَاسْتَكْبَرْتُمْ وَكُنْتُمْ قَوْمًا مُّجْرِمِيْنَ ﴿٣١﴾

३२. आणि जेव्हा म्हटले जात होते की अल्लाहचा वायदा सच्चा आहे आणि कियामती बाबत काहीच शंका नाही तेव्हा तुम्ही म्हणत, आम्ही नाही जाणत कियामत काय आहे आम्ही तर एक कल्पना बाळगतो आणि आम्ही याचा विश्वास करणारे नाही.[४६]

وَاِذَا قِيْلَ اِنَّ وَعْدَ اللّٰهِ حَقٌّ وَّالسَّاعَةُ لَا رَيْبَ فِيْهَا قُلْتُمْ
مَّا نَدْرِيْ مَا السَّاعَةُ ۙ اِنْ نَّظُنُّ اِلَّا ظَنًّا وَّمَا نَحْنُ
بِمُسْتَيْقِنِيْنَ ﴿٣٢﴾

४१. हे त्यांच्या आक्षेपांना उत्तर आहे की काळाच्या उलट फेराने एखाद्याला ना जीवन लाभते आणि ना मरण, किंबहुना अल्लाहने प्रदान केल्याने जीवन लाभते व त्यानेच मृत्यु दिल्याने मरण येते आणि दुसऱ्या जीवना करीता त्याने कियामतीचा दिवस निर्धारीत केलेला आहे. परंतु अधिकांश लोक या वस्तुस्थितीशी अगदी अनभिज्ञ आहेत.

४२. म्हणजे कियामतीच्या दिवशी अल्लाह समोर प्रत्येक मानव-समूहाची हजेरी अशा प्रकारे होईल की तो गुडघे टेकून असेल. गुडघे टेकून बसणे म्हणजे नम्रता दर्शविणे. मोठमोठे गर्वोन्मत्त ही त्या दिवशी गुडघे टेकतील आणि सामूहीकरित्या ते जनसमूह देखील जे गर्वाने आपले मस्तक उंचावतात; हश्रच्या मैदानात अतिशय विनम्रपणे हजर होतील.

या आयतीत हश्रची जी झळक दाखवली गेली आहे ती माणसाच्या आत्माभिमानास, गर्वास तोडण्यास व जन समूहांच्या दर्पोक्तिस नष्ट करण्यास पुरेशी आहे, मात्र या अटीवर की त्यांनी मोकळया मनाने याचा अभ्यास करावा.

४३. हे रेकॉर्ड अर्थात आचरणाचे टेप-रेकॉर्ड असेल आणि प्रत्येक मनुष्य आपले रेकॉर्ड ऐकेल. कुरआनाचे हे निवेदन की आचरणाचे रेकॉर्ड बोलके असेल, माणसाकरीता आश्चर्यकारक राहीले नाही कारण असे टेप रेकॉर्ड त्याने तयार केले आहे. नवनवीन संशोधनांनी कुरआनाची सत्यता अधिक जास्त उज्वल होत चालली आहे.

४४. म्हणजे आमचे फरिश्ते त्यांना अंकित करतात.

४५. मनुष्य सदैव काळास्तव अल्लाहच्या कृपा छत्राखाली यावा याहून मोठी सफलता ती कोणती?

४६. काही लोक कियामतीचा अगदी इन्कार करणारे आहेत व काही याविषयी संशय ही बाळगतात आणि कियामत अपरिहार्यत: येईल यावर ते विश्वास ठेवायला तयार नाहीत. हे दोघेही प्रकारचे लोक काफीर व अपराधी आहेत कारण दोघेही आखिरतकडे दुर्लक्ष करून जीवन व्यतीत करतात म्हणून दोघांचीही परिणती एक समान असेल.

३३. आणि यांच्यावर यांच्या आचरणाचा वाईटपणा उघड होईल [४७] आणि ज्या गोष्टीची ते थट्टा उडवित राहीले ती त्यांना वेढा घालील.[४८]

وَبَدَا لَهُمْ سَيِّـَٔاتُ مَا عَمِلُوْا وَحَاقَ بِهِمْ مَّا كَانُوْا بِهٖ
يَسْتَهْزِءُوْنَ ﴿٣٣﴾

३४. आणि यांना सांगितले जाईल आज आम्ही तुम्हाला विसरतो [४९] ज्या प्रकारे तुम्ही आपल्या हजेरीच्या या दिवसाचा विसर पाडला होता. तुमचे ठिकाण दोजख आहे आणि कोणी ही तुमचा सहाय्यक नाही.

وَقِيْلَ الْيَوْمَ نَنْسٰىكُمْ كَمَا نَسِيْتُمْ لِقَآءَ يَوْمِكُمْ هٰذَا
وَمَاْوٰىكُمُ النَّارُ وَمَا لَكُمْ مِّنْ نّٰصِرِيْنَ ﴿٣٤﴾

३५. हे अशासाठी की तुम्ही अल्लाहच्या आयतींना थट्टा मस्करी बनविले होते आणि तुम्हाला ऐहीक जीवनाने धोक्यात टाकले होते [५०] तेव्हा आज ना यांना यामधून बाहेर काढले जाईल आणि ना तौबाची संधी दिली जाईल.[५१]

ذٰلِكُمْ بِاَنَّكُمُ اتَّخَذْتُمْ اٰيٰتِ اللّٰهِ هُزُوًا وَّغَرَّتْكُمُ الْحَيٰوةُ الدُّنْيَا ۚ
فَالْيَوْمَ لَا يُخْرَجُوْنَ مِنْهَا وَلَا هُمْ يُسْتَعْتَبُوْنَ ﴿٣٥﴾

३६. तेव्हा प्रशंसा अल्लाहकरीता आहे [५२] जो आकाशांचा ही पालनकर्ता आहे आणि जमीनीचा ही पालनकर्ता, समस्त विश्वाचा पालन कर्ता.

فَلِلّٰهِ الْحَمْدُ رَبِّ السَّمٰوٰتِ وَرَبِّ الْاَرْضِ رَبِّ الْعٰلَمِيْنَ ﴿٣٦﴾

३७. आणि त्याच्याच करीता श्रेष्ठत्व आहे आकाशांमध्ये व जमीनीवर आणि तो वर्चस्वशाली आहे बुद्धिकौशल्य बाळगणारा.

وَلَهُ الْكِبْرِيَآءُ فِي السَّمٰوٰتِ وَالْاَرْضِ ۪ وَهُوَ الْعَزِيْزُ الْحَكِيْمُ ﴿٣٧﴾ ع

४७. म्हणजे त्या दिवशी आपल्या आचरणाच्या परिणामांना पाहून त्यांना जाणीव होईल की त्यांनी आखिरतचा इन्कार करून कशी चुकीची व वाईट कामे केलीत.

४८. म्हणजे जहन्नमची शिक्षा जिची या जगात ते थट्टा उडवित राहीले.

४९. म्हणजे तुमच्याकडे दुर्लक्ष करतो की तुम्ही कृपेस पात्र नाहीत.

५०. जगाची भव्यदिव्यता पाहून माणूस त्याच्यावर भाळतो की यानंतरच्या जीवनाविषयी काही विचार करण्यास तयार होत नाही. त्याला फक्त हीच काळजी असते की ऐहीक लाभ जास्तीत जास्त घ्यावा राहीली आखिरत तर ती उद्‌भवेल तेव्हा पाहू हा फार मोठा धोका आहे आजही अधिकांश लोक या भ्रमात आहेत आणि तो कुरआनच होय जो यांना साखर झोपेतून जागृत करू इच्छितो. त्यांनी कुरआनाचा गंभीरपणे अभ्यास केला असता तर.

५१. कारण तौबाचे स्थान हे जग आहे, आखिरत नव्हे जगाच्या कसोटीत असफल झाल्यानंतर पुन्हा कसोटीची संधी नाही.

५२. ही सूरहची शेवटची आयत होय जी अल्लाहच्या प्रशंसा व गुणगानावर संपते आणि या गोष्टीची जाणीव देते की या सूरहमध्ये ज्या बुद्धिकौशल्य युक्त गोष्टी सांगितल्या गेल्या आहेत त्याबद्दल अल्लाह प्रशंसा व कृतज्ञतेस पात्र आहे.

# सूरह अल अहकाफ

# ४६. अल अहकाफ

**नाव :** आयत क्र. २१ मध्ये आद समूहाची वस्ती अल-अहकाफचा उल्लेख केला गेला आहे जो यमनच्या जवळ एक वाळवंटी प्रदेश आहे. तद्नुषंगे या सूरहचे नाव या सूरहचे नाव ''अल अहकाफ'' असे आहे.

**अवतरण काळ :** मक्की आहे आणि मजकूरांवरून असे दिसून येते की मध्ययुगांत अवतरली असेल. काही भाष्यकारांनी हे मत प्रकट केले आहे की ही सूरह पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या तायफ प्रवासाहून परततांना अवतरली. परंतु तायफ येथे त्यांच्या आवाहनाची जी थट्टा उडविली गेली व ज्या भयंकर दु:ख यातना त्यांना दिल्या गेल्या त्याकडे या सूरह मध्ये कसला ही संकेत मिळत नाही. राहीले नखला या स्थानी जिन्नांच्या कुरआन ऐकण्याची घटना, तर या संदर्भात आयत क्र. २९ अन्वये याचे स्पष्टीकरण अल्लाहने इच्छिल्यास केले जाईल.

**मध्यवर्ति कल्पना :** या गोष्टीबाबत सावध करणे होय की एकेश्वरवाद, आखिरत व प्रेषित्वाचा इन्कार वस्तुत: त्या सत्य उद्दिष्टाचा इन्कार होय ज्याच्या करीता या सृष्टीची निर्मिती झाली आहे.

**आयत रचना :** आयत क्र. १ ते १२ मध्ये कुरआन ही अल्लाहची वाणी असल्याच्या दाव्यास सादर करीत असतांना अनेकेश्वर वादाची अयोग्यता स्पष्ट केली गेली आहे आणि प्रेषित्वाच्या संदर्भात शंका-संशयाचे निरसन केले गेले आहे.

आयत क्र. १३ ते १६ मध्ये ईमान बाळगणाऱ्यां करीता सांत्वना व शुभवार्ता आहे.

आयत क्र. १७ ते २० मध्ये काफिरांना दुष्परिणति बाबत खबरदार केले गेले आहे.

आयत क्र. २१ ते २८ मध्ये आद जन समूहाच्या परिणतिद्वारे धडा शिकविला गेला आहे.

आयत क्र. २९ ते ३२ मध्ये जिन्नांचे कुरआन ऐकणे व त्यापासून प्रभावित होऊन ईमान बाळगल्याचा उल्लेख केला गेला आहे.

आयत क्र. ३३ व ३४ मध्ये मरणोत्तर जीवना विषयीच्या शंकेचे निरसन ही आहे आणि जहन्नमच्या शिक्षेबाबत खबरदार ही केले गेले आहे.

आयत क्र. ३५ मध्ये पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना धैर्याचे प्रोत्साहन व सांत्वना दिली गेली आहे.

# ४६.सूरतुल अहकाफ

سُوْرَةُ الْأَحْقَافِ

आयती - ३५

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ

१. हा - मीम.[१]

حٰمٓ ۝١

२. हा ग्रंथ अल्लाह तर्फे अवतरीत झाला आहे, जो वर्चस्वशाली आणि बुद्धिकौशल्य बाळगणारा आहे.[२]

تَنْزِيْلُ الْكِتٰبِ مِنَ اللّٰهِ الْعَزِيْزِ الْحَكِيْمِ ۝٢

३. आम्ही आकाशांना व जमीनीला आणि यांच्या दरम्यानच्या वस्तूंना सत्य (उद्दिष्टा) सह [३] आणि एका निर्धारीत मुदती करीताच निर्माण केले आहे [४] परंतु हे काफिर त्या गोष्टी पासून [५] विन्मुख आहेत ज्या विषयी यांना खबरदार केले गेले आहे.

مَا خَلَقْنَا السَّمٰوٰتِ وَالْاَرْضَ وَمَا بَيْنَهُمَآ اِلَّا بِالْحَقِّ وَاَجَلٍ
مُّسَمًّى ؕ وَالَّذِيْنَ كَفَرُوْا عَمَّآ اُنْذِرُوْا مُعْرِضُوْنَ ۝٣

४. सांगा, तुम्ही त्यांच्या बाबत विचार चिंतन केले ज्यांना तुम्ही अल्लाहला सोडून पुकारता? सांगा, जमीनीची कोणती वस्तू यांनी निर्माण केली आहे किंवा आकाशांच्या रचनेत यांचा कोणता सहभाग आहे? या पूर्वीचा एखादा ग्रंथ किंवा एखादा ज्ञान विषयक पुरावा (जो याचे समर्थन करीत असेल) माझ्या जवळ घेऊन या जर तुम्ही सच्चे असाल.[६]

قُلْ اَرَءَيْتُمْ مَّا تَدْعُوْنَ مِنْ دُوْنِ اللّٰهِ اَرُوْنِيْ مَاذَا خَلَقُوْا
مِنَ الْاَرْضِ اَمْ لَهُمْ شِرْكٌ فِي السَّمٰوٰتِ ؕ
اِيْتُوْنِيْ بِكِتٰبٍ مِّنْ قَبْلِ هٰذَآ اَوْ اَثٰرَةٍ مِّنْ عِلْمٍ اِنْ
كُنْتُمْ صٰدِقِيْنَ ۝٤

५. आणि यांच्याहून अधिक मार्गभ्रष्ट आणखी कोण असू शकतात जे अल्लाहला सोडून त्यांना पुकारतात जे कियामती पावेतो त्यांना उत्तर देऊ शकत नाही आणि ते यांच्या आर्जवा पासून अनभिज्ञ आहेत.[७]

وَمَنْ اَضَلُّ مِمَّنْ يَّدْعُوْا مِنْ دُوْنِ اللّٰهِ مَنْ لَّا يَسْتَجِيْبُ
لَهٗٓ اِلٰى يَوْمِ الْقِيٰمَةِ وَهُمْ عَنْ دُعَآئِهِمْ غٰفِلُوْنَ ۝٥

१.या अक्षरांच्या स्पष्टीकरणासाठी पहा सूरह मोमीन टीप क्र १. या सूरह मध्ये आयत क्र.२मध्ये अल्लाह 'हकीम' (बुद्धिकौशल्य युक्त) असल्या संबंधीचा उल्लेख केला गेला आहे आणि ही अक्षरे त्याच्या याच गुणविशेषांकडे संकेत करतात.

२. स्पष्टीकरणा करीता पहा सूरह जासिया टीप क्र.२

३. स्पष्टीकरणा करीता पहा सूरह अनआम टीप क्र. १२४ व सूरह यूनुस टीप क्र. १५.

४. स्पष्टीकरणा करीता पहा सूरह रूम टीप क्र. १४

५. म्हणजे कियामत व मोबदला आणि शिक्षे पासून.

६. म्हणजे उपासनेस पात्र तोच ठरू शकतो जो निर्माता असावा अनेकेश्वर वाद्यांनी सांगावे ते अल्लाह खेरीज ज्यांना उपास्य ठरवतात त्यांनी कोणती वस्तू निर्माण केली आहे? या सृष्टीच्या रचना कार्यात त्यांनी कोणता भाग घेतला? जर नाही तर ते उपास्य कसे ठरले? आणि जर एखाद्याचा हा दावा आहे की अल्लाह खेरीज अन्य अस्तित्वांनीही एखादी वस्तू निर्माण केली आहे आणि ते अल्लाहचे सहभागी आहेत तर त्यांना हे कसे माहीत झाले. वास्तविक हे जाणून घेण्याचे साधन अल्लाहचा ग्रंथ असू शकतो, किंवा पैगंबरांचे मार्गदर्शन, जे या प्रकारे उल्लेखित होऊन ज्ञान व विश्वासाचा दर्जा प्राप्त व्हावा. आता तर याचा पुरावा कुरआना पूर्वीच्या एखाद्या ईश-ग्रंथात उपलब्ध होत नाही आणि ना पैगंबरीय मार्गदर्शनामध्ये, जे हजरत इब्राहीम व हजरत इस्माईल द्वारे उल्लिखित आहे तेव्हा एवढया मोठया दाव्या करीता कोणता आधार बाकी राहतो?

स्पष्ट असावे की कुरआनाचे आव्हान त्याच ग्रंथांबाबत आहे जे खरोखर आकाशातून अवतरलेले ईश-ग्रंथ आहेत आणि ज्यांचे पैगंबरांवर अवतरीत होणे एक ऐतिहासिक सत्य आहे तौरात, जबूर व बायबल मध्ये थोडया फार प्रमाणात फेरफार झालेला असला तरी त्यात ईश-वाणीचे अंश अस्तित्वात आहेत. या ग्रंथांमध्ये असे कोठेही म्हटले गेले नाही की एका ईश्वरा खेरीज अन्य एखाद्याने एखादी वस्तू निर्माण केली आहे किंवा या सृष्टीचे अनेक ईश्वर आहेत किंवा हे की माणसाने एका ईश्वरा खेरीज अन्य एखाद्याची ही भक्ति उपासना केली पाहीजे. राहीलेत ते ग्रंथ ज्यांना वेगवेगळया धार्मिक गटांनी आपल्याला धर्माचे पवित्र ग्रंथ ठरवले आहे तर त्यांचे ईश ग्रंथ असण्या संबंधांचा ना ऐतिहासिक पुरावा आहे आणि ना या ग्रंथांचा हा दावा आहे की ते ईश्वराचे ग्रंथ आहेत आणि ना त्यातील मजकूर ते ईश-ग्रंथ असण्या विषयी साक्ष देतात. यास्तव या धार्मिक-ग्रंथांमध्ये जर विविध देवी देवतांची कल्पना आढळून येते तर ते काही प्रमाण नव्हे, किंबहुना त्या संकलित करणाऱ्यांच्या खोटया श्रद्धा आहेत ज्यांना त्यांनी आपल्या धर्माचे पवित्र ग्रंथ या नात्याने सादर केले आहे वास्तविक हे अल्लाहवर त्यांनी केलेले कुभांड आहे, अल्लाहचे फर्मान नव्हे.

तद्‌वतच श्रद्धेच्या संदर्भात प्रेषितांच्या संबंधाने सांगितल्या जाणाऱ्या त्याच गोष्टी किंवा कथने प्रमाण ठरू शकतात ज्या ज्ञान व विश्वासाच्या दर्जाच्या असाव्यात. उदाहरणार्थ हजरत इब्राहीम यांचे काबागृहास उभारणे आणि हज्ज यात्रेचा क्रम सुरू करणे यासाठी की एकेश्वरवादाची चिन्हे प्रत्येक काळात प्रकट होत रहावीत आणि म्हणूनच कुरआनाने बंधन घातले आहे की त्या गोष्टी ज्यांचा एखाद्या प्रेषिताद्वारे उल्लेख होणे ज्ञान व विश्वासाच्या मर्यादे पावेतो दुरूस्त असावे.

७. आयतीत 'मन'(Whom) हा शब्द प्रयोग केला गेला आहे जो अरबी भाषेत अक्कल बाळगणाऱ्यां करीता प्रयोजिला जातो. म्हणून यास अभिप्रेत फरिश्ते, जिन्न, पैगंबर व बुजुर्ग व्यक्तिच असू शकतात. कुरआन स्पष्टत: फर्मावितो की यांना गरज पूर्ति, संकट निवारण व आर्जवा करीता पुकारणे फार मोठी मार्गभ्रष्टता आहे आणि अगदीच निरर्थक बाब होय. यांना पुकारण्यात कसलीही शास्त्र विहीतता नाही आणि ना ते कोणाचे पुकारणे वा आर्जव ऐकतात.

कुरआनाच्या स्पष्टीकरणा नंतर ही मुसलमानांपैकी बहुसंख्य या मार्गभ्रष्टतेत खितपत पडले आहेत; आणि अवलीया व पीरांना ते मदती करीता पुकारतात व असे समजतात की कबरींमध्ये दफन असूनही ते आमचे गाऱ्हाणे ऐकतात. वस्तुत: ते यांच्या पुकारण्या विषयी अगदी अनभिज्ञ असतात.ही श्रद्धाच खोटी आहे की जे कबरींमध्ये दफन केले गेले आहेत ते पुकारणाऱ्यांची पुकार (आजर्व) ऐकतात. जेव्हा ते आपल्या हयातीत दुरून पुकारणाऱ्याची पुकार ऐकू शकत नव्हते. तर मेल्या नंतर त्यांना हे सामर्थ्य कोठून लाभले की आलमे बर्जख (कबरीच्या विश्वात) राहूनही इहलोक वासींशी संबंध निर्माण करावा आणि आपल्या प्रत्येक श्रद्धाळूची मग तो जगातल्या कुठल्याही कोपऱ्यात राहात असो, पुकार ऐकावी. ही नितांत निरर्थक गोष्ट आहे. परंतु अशा निरर्थक गोष्टींना प्रज्ञाहीन विद्वानांनी इस्लामी श्रद्धेचे स्वरूप दिले आहे आणि या आयतींचे स्पष्टीकरण असे करतात की त्या मूर्ति पूजकांविषयी आहेत. या चुकीच्या स्पष्टीकरणा पायी बहुसंख्य मुसलमान शिर्क (अनेकेश्वरवादा) त गुरफटले आहेत. जर त्यांनी विशुद्ध बुद्धिने कुरआनाचा अभ्यास केला असता तर खचितच त्यांना ईश-मार्गदर्शन लाभले असते.

६. आणि जेव्हा समस्त लोक एकत्रित केले जातील तर ते यांचे शत्रू होतील; आणि यांच्या उपासनेचा इन्कार करतील.[८]

وَإِذَا حُشِرَ النَّاسُ كَانُوا لَهُمْ أَعْدَاءً وَكَانُوا بِعِبَادَتِهِمْ
كٰفِرِينَ ٦

७. या लोकांना जेव्हा आमच्या दिव्य आयती ऐकविल्या जातात तेव्हा हे काफिर सत्या विषयी जे यांच्या जवळ आले आहे, म्हणतात की ही उघड जादू आहे.[९]

وَإِذَا تُتْلٰى عَلَيْهِمْ اٰيٰتُنَا بَيِّنٰتٍ قَالَ الَّذِينَ كَفَرُوا لِلْحَقِّ
لَمَّا جَاءَهُمْ هٰذَا سِحْرٌ مُّبِينٌ ٧

८. काय हे लोक म्हणतात की या माणसाने यास आपल्या मनाने रचले आहे ? सांगा, जर मी मनाने रचले आहे तर तुम्ही लोक मला अल्लाह पासून किंचितही वाचवू शकणार नाहीत, आणि तुम्ही ज्या गोष्टी सांगता त्यांना तो चांगल्या प्रकारे जाणतो. माझ्या व तुमच्या दरम्यान तो साक्ष देण्यास पुरेसा आहे. तो मोठा माफ करणारा, दया करणारा आहे.[१०]

أَمْ يَقُولُونَ افْتَرٰىهُ ۖ قُلْ إِنِ افْتَرَيْتُهُ فَلَا تَمْلِكُونَ
لِي مِنَ اللّٰهِ شَيْئًا ۖ هُوَ أَعْلَمُ بِمَا تُفِيضُونَ فِيهِ ۖ كَفٰى بِهِ
شَهِيدًا بَيْنِي وَبَيْنَكُمْ ۖ وَهُوَ الْغَفُورُ الرَّحِيمُ ٨

९. सांगा, मी काही वेगळा रसूल (पैगंबर) तर नव्हे [११] आणि मी नाही जाणत की माझ्याशी कोणता व्यवहार केला जाईल आणि तुमच्याशी कोणता व्यवहार,[१२] मी तर केवळ त्या वही (ईश-संदेशा) चे अनुसरण करतो, जी माझ्याकडे पाठविली जाते. आणि मी तर केवळ उघड खबरदार करणारा आहे.[१३]

قُلْ مَا كُنْتُ بِدْعًا مِّنَ الرُّسُلِ وَمَا أَدْرِي مَا يُفْعَلُ بِي وَلَا بِكُمْ ۖ
إِنْ أَتَّبِعُ إِلَّا مَا يُوحٰى إِلَيَّ وَمَا أَنَا إِلَّا نَذِيرٌ مُّبِينٌ ٩

१०. सांगा. तुम्ही हा ही विचार केला की जर हा अल्लाह तर्फे असला आणि तुम्ही याचा इन्कार केला, वास्तविक बनी इस्राईलच्या एका साक्षीदाराने या सारख्या ग्रंथाबद्दल साक्ष दिली आहे. यास्तव त्याने ईमान बाळगले आणि तुम्ही गर्व केला [१४] (तर हा केवढा मोठा गुन्हा ठरेल?) अल्लाह अशा अत्याचारी लोकांना सरळ मार्गी लावत नाही.

قُلْ أَرَءَيْتُمْ إِنْ كَانَ مِنْ عِنْدِ اللّٰهِ وَكَفَرْتُمْ بِهِ وَشَهِدَ شَاهِدٌ
مِّنْ بَنِي إِسْرَاءِيلَ عَلٰى مِثْلِهِ فَاٰمَنَ وَاسْتَكْبَرْتُمْ ۖ إِنَّ
اللّٰهَ لَا يَهْدِي الْقَوْمَ الظّٰلِمِينَ ١٠

८. म्हणजे असे समजू नका की ज्यांच्या श्रद्धेत अतिरेक करून तुम्ही त्यांना आपल्या गरज पूर्ति करीता पुकारता ते कियामतीच्या दिवशी तुमच्याशी प्रसन्न राहतील. कदापि नाही, किंबहुना ते तुमचे वैरी होतील की तुम्ही त्यांच्याशी तो व्यवहार का म्हणून केला जो केवळ अल्लाहशी केला गेला पाहीजे होता आणि तुमच्या या आर्जवाचा जे उपासने चे स्वरूप बाळगत होते; स्पष्ट इन्कार करतील की आम्हाला याचा काहीच गंध नाही.

९. म्हणजे अल्लाहच्या वाणीचा प्रभाव पाहून तिला जादू ठरवत आहेत.

१०. म्हणजे तुम्हाला संधी देत आहे की तुम्ही क्षमा याचना व आपल्या आचरणात सुधारणा करून त्याच्या क्षमादानास व कृपेस पात्र व्हावे.

११. म्हणजे असे कदापि नाही की मानव इतिहास पैगंबरां विरहीत राहीला असावा आणि आता माझ्या प्रेषित्वा विषयीचा दावा ऐकून लोकांना नवल वाटावे की ही तर जगावेगळी गोष्ट दिसते जी आमच्या समोर मांडली जात आहे. जेव्हा ऐतिहासिक घटना याबाबत साक्ष देतात की यापूर्वी ही पैगंबर येत राहीले तेव्हा माझे रसूल (पैगंबर) असणे काही वेगळी गोष्ट नव्हे. यास्तव तुम्ही विचार चिंतन केले पाहीजे की एकतर माझा हा दावा केवळ दावा आहे किंवा एक अशी वस्तुस्थिती जी इन्कार न करण्या जोग्या प्रमाणांनी सिद्ध आहे.

१२. म्हणजे मला नाही माहीत की रसूल पैगंबर या नात्याने मला यापुढे कोणकोणत्या अवस्थांमधून पार पाडले जाईल आणि ना मला हे माहीत की तुमच्या बाबतीत कोणता निर्णय घेतला जाणार आहे. एकतर तुम्हाला क्षमा याचनेची सुबुद्धि प्रदान केली जाईल किंवा तुम्हाला ही त्याच प्रकारे नष्ट केले जाईल ज्या प्रकारे तुमच्या पूर्वीच्या जन समूहांना नष्ट केले गेले होते. या गोष्टींचे सविस्तर ज्ञान मला नाही, मात्र ईश संदेशाद्वारे जे ज्ञान मला प्राप्त होते त्यावर मी विश्वास ठेवतो.

ही आयत हे स्पष्ट करते की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना भविष्य कालीन परिस्थितीचे ज्ञान तेवढया पुरतेच होत असे जेवढे ईश-संदेशाद्वारे मिळत असे अन्यथा अपरोक्षाचा ज्ञाता केवळ अल्लाहच आहे.

अल्लामा आलूसी या आयतीचे स्पष्टीकरण करतांना लिहितात.

''मी सांगणाऱ्याच्या या कथनास चांगले समजत नाही की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) अपरोक्ष जाणणारे होते. या खेरीज हे म्हणणे अधिक उचित ठरेल की त्यांना सर्वश्रेष्ठ अल्लाहने अपरोक्षा विषयी सूचित केले होते. व त्यांना त्या संबंधीचे ज्ञान प्रदान केले होते.'' (रूहुल मआनी खंड-२६, पृ. १०)

१३. म्हणजे या उपरान्तयावर ईमान बाळगणे तुमची जबाबदारी आहे माझी जबाबदारी ही नव्हे की ईमान बाळगण्या करीता तुम्हाला विवश करावे.

१४. इस्राईलच्या एका साक्षीदाराशी अभिप्रेत त्यांच्या पैकी एक इसम होय; जो तौरात या ग्रंथाचे ज्ञान बाळगत होता या आयतींच्या अवतरण प्रसंगी त्याने ईमान बाळगले होते त्यानंतर ईश ग्रंथ बाळगणाऱ्या लोकांपैकी आणखी काही लोकांनी ईमान बाळगले ज्यांचा उल्लेख सूरह बनी इस्राईल मध्ये केला गेला आहे.

اِنَّ الَّذِيْنَ اُوْتُوا الْعِلْمَ مِنْ قَبْلِهٖٓ اِذَا يُتْلٰى عَلَيْهِمْ يَخِرُّوْنَ لِلْاَذْقَانِ سُجَّدًا ـ وَيَقُوْلُوْنَ سُبْحٰنَ رَبِّنَآ اِنْ كَانَ وَعْدُ رَبِّنَا لَمَفْعُوْلًا ـ (بنی اسرائیل:۱۰۷، ۱۰۸)

'' ज्या लोकांना या पूर्वी ज्ञान दिले गेले आहे त्यांना जेव्हा हे ऐकविले जाते तेव्हा ते हनुवटी टेकून सजद्यात पडतात आणि उद्‌गारतात की पवित्र आहे आमचा पालन कर्ता. आमच्या पालन कर्त्याचा वायदा या साठीच होता की पूर्ण व्हावा.'' (बनी इस्राईल-१०७- १०८)

तेव्हा ज्या प्रकारे सूरह बनी इस्राईलच्या या आयती मध्ये एखादे विशिष्ट व्यक्तिमत्व अभिप्रेत नाही, किंबहुना तो मनुष्य अभिप्रेत आहे. ज्याने तौरातचे ज्ञान बाळगून ही कुरआनावर ईमान बाळगले होते. आणि अल्लामा इब्ने कसीर यांनी आयतीचे हेच स्पष्टीकरण केले आहे. ज्या भाष्यकारांनी मदीनेचे यहूदी विद्वान अब्दुल्लाह बिन सलाम यांचे व्यक्तिमत्व अभिप्रेत घेतले आहे त्यांनी या आयतीला मदनी ठरविले आहे. वास्तविक संपूर्ण सूरह मक्की आहे. हा खटाटोप यांना अशासाठी करावा लागला की अब्दुल्लाह बिन सलाम यांनी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचे मदीना येथे स्थलांतर झाल्यानंतर, ईमान बाळगले होते. म्हणून या आयतीच्या अवतरण प्रसंगी ते साक्षीदार ठरू शकत नव्हते 'तदब्बरूल कुरआन; च्या रचयित्याने आणखी एक गोष्ट लिहीली आहे आणि ती अशी की या साक्षी दाराशी अभिप्रेत हजरत मसीह (येशू) होत, ज्यांनी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या आगमना विषयी भाकित केले होते. परंतु आयतीचे हे शब्द की त्याने या सारख्या गोष्टीवर ईमान बाळगले, यांच्या बाबत लागू पडत नाहीत.

तात्पर्य या आयतीचा उद्देश क़ुरआनच्या इन्कार करणाऱ्यांचे या गोष्टीकडे लक्ष वेधणे होय की जेव्हा बनी इस्राईलचा एक मनुष्य जो ईश-ग्रंथाचे ज्ञान बाळगत होता, ही साक्ष देते की कुरआनाची शिकवण तौरातच्या शिकवणीशी अगदी सुसंगत आहे, यावर ईमान बाळगले आहे तर तुमचे याला एक वेगळी शिकवण समजून रद्द करणे केवढी मोठी बेजबाबदार पणाची गोष्ठ आहे.

११. काफिर ईमान बाळगणाऱ्यां विषयी म्हणतात की जर हे (कुरआन) मांगल्य असते तर या लोकांना आमच्या आधी गवसले नसते [१५] आणि ज्याअर्थी यांनी यापासून मार्गदर्शन प्राप्त केले नाही म्हणून म्हणतील की हे जुने असत्य आहे.[१६]

وَقَالَ الَّذِينَ كَفَرُوا لِلَّذِينَ آمَنُوا لَوْ كَانَ خَيْرًا مَّا سَبَقُونَا
إِلَيْهِ ۚ وَإِذْ لَمْ يَهْتَدُوا بِهِ فَسَيَقُولُونَ هَٰذَا إِفْكٌ قَدِيمٌ ﴿١١﴾

१२. वस्तुतः या पूर्वी मूसाचा ग्रंथ मार्गदर्शक व कृपा बनून आला आहे.[१७] आणि हा ग्रंथ याचे सत्य-समर्थन करणारा आहे.[१८] अरबी भाषेत, अशासाठी की अत्याचार (दुराचार) करणाऱ्यांना खबरदार करावे आणि हा शुभ संदेश आहे सदाचारी लोकां करीता.

وَمِن قَبْلِهِ كِتَابُ مُوسَىٰ إِمَامًا وَرَحْمَةً ۚ وَهَٰذَا كِتَابٌ مُّصَدِّقٌ
لِّسَانًا عَرَبِيًّا لِّيُنذِرَ الَّذِينَ ظَلَمُوا وَبُشْرَىٰ لِلْمُحْسِنِينَ ﴿١٢﴾

१३. ज्या लोकांनी म्हटले, अल्लाह आमचा पालन कर्ता आहे मग त्यावर अटळ राहीले त्यांच्या करीता ना कसले भय आहे आणि ना ते दुःखी होतील.[२०]

إِنَّ الَّذِينَ قَالُوا رَبُّنَا اللَّهُ ثُمَّ اسْتَقَامُوا فَلَا خَوْفٌ عَلَيْهِمْ
وَلَا هُمْ يَحْزَنُونَ ﴿١٣﴾

१४. हे जन्नत वाले आहेत जिथे ते सदैव राहतील. हा मोबदला असेल त्या कर्मांचा जे ते करीत राहीले.[२१]

أُولَٰئِكَ أَصْحَابُ الْجَنَّةِ خَالِدِينَ فِيهَا جَزَاءً بِمَا كَانُوا
يَعْمَلُونَ ﴿١٤﴾

१५. आम्ही माणसाला मार्गदर्शन केले की आपल्या माता पित्याशी सद् व्यवहार करावा.[२२] त्याच्या आईने कष्ट यातने सह त्याला आपल्या पोटात ठेवले आणि कष्ट यातने सह त्याला जन्म दिला.[२३] त्याचा गर्भ आणि दूध सोडविण्यात तीस महीने लागले.[२४] येथपावेतो की जेव्हा तो तारूण्या प्रत पोहचला आणि (जेव्हा) वयाच्या चाळीसाव्या वर्षाप्रत पोहचला [२५] तेव्हा त्याने प्रार्थना केली, हे माझ्या पालन कर्त्या ! मला सद्बुद्धि प्रदान कर की मी तुझ्या या उपकारा बद्दल कृतज्ञता व्यक्त करावी जी तू मजवर आणि माझ्या माता पित्यावर केली आहे आणि ते सत्कर्म करावे जे तुला प्रिय आहे आणि माझ्या संततीला ही माझ्या करीता सत्कर्मी बनव.मी तुझ्याकडे रूजू केले आणि मी तुझ्या आज्ञा धारक दासांपैकी आहे.[२६]

وَوَصَّيْنَا الْإِنسَانَ بِوَالِدَيْهِ إِحْسَانًا ۖ حَمَلَتْهُ أُمُّهُ
كُرْهًا وَوَضَعَتْهُ كُرْهًا ۖ وَحَمْلُهُ وَفِصَالُهُ ثَلَاثُونَ شَهْرًا ۚ
حَتَّىٰ إِذَا بَلَغَ أَشُدَّهُ وَبَلَغَ أَرْبَعِينَ سَنَةً قَالَ رَبِّ أَوْزِعْنِي أَنْ
أَشْكُرَ نِعْمَتَكَ الَّتِي أَنْعَمْتَ عَلَيَّ وَعَلَىٰ وَالِدَيَّ وَأَنْ أَعْمَلَ
صَالِحًا تَرْضَاهُ وَأَصْلِحْ لِي فِي ذُرِّيَّتِي ۖ إِنِّي تُبْتُ إِلَيْكَ
وَإِنِّي مِنَ الْمُسْلِمِينَ ﴿١٥﴾

१५. हे काफिर (अल्लाहचा इन्कार करणाऱ्या) लोकांचे व ऐहीक पात्रता बाळगणाऱ्यांचे कथन आहे. ते समजत की हे ऐश्वर्य आम्हाला अशासाठी लाभले आहे की अल्लाह आमच्यावर प्रसन्न आहे म्हणून जर कुरआन अल्लाहतर्फे अवतरीत झाले असते तर एवढया मोठया मांगल्यापासून त्याने सर्वप्रथम आम्हाला उपकृत केले असते परंतु जेव्हा याची सुबुद्धि आम्हाला लाभली नाही आणि अशा लोकांनी त्यास कबूल केले जे गरीब आहेत व प्रभावशाली नाहीत तर हे अल्लाह तर्फे अवतरीत झालेले मांगल्य कसे असू शकते? यांची हीच चुकीची विचार सरणी होती. ज्यामुळे ते ईश-मार्गदर्शन पासून वंचित राहीले.

१६. अर्थात कुरआन कियामत व मोबदला आणि शिक्षा संबंधीच्या ज्या गोष्टी निवेदन करतो त्या अगदी खोटया आहेत आणि या असत्याचा इतिहास अगदी प्राचीन आहे कारण भूतपूर्व जन-समूहांना ही अशाच गोष्टी सांगून धमकाविले जात राहीले.

१७. म्हणजे ज्या गोष्टीला ते असत्य ठरवित आहेत ते असत्य कसे असू शकते; जेव्हा की ती गोष्ट लोकांचे यथायोग्य मार्गदर्शन करीत राहीली. यास्तव 'तौरात' या ईश-ग्रंथापासून लोक मार्गदर्शन प्राप्त करीत राहीले आणि या कारणास्तव अल्लाहच्या कृपेची छत्र छाया त्या लोकांवर राहीली.

१८. म्हणजे कुरआन मूलभूत पणे तीच शिकवण सादर करीत आहे जी तौरात या ग्रंथाची शिकवण होती. हा काही असा ग्रंथ नव्हे जो वेगळया प्रकारची शिकवण सादर करीत असावा.

१९. अत्याचार करणाऱ्यांशी अभिप्रेत ते लोक होत जे शिर्क सारख्या अपराधात गुरफटून स्वत:वरच अन्याय करतात.

२०. स्पष्टकरणा करीता पहा सूरह हा मीम अस्सजदा, टीप क्र. ४४-४५

२१. म्हणजे जन्नत काही फुकटात मिळणारी गोष्ट नव्हे किंबहुना तो कर्मांचा मोबदला म्हणून दिली जाईल. यास्तव जो मनुष्य देखील जन्नत प्राप्त करू इच्छितो, त्याने आपल्या कर्माविषयक जीवनाने जन्नतला पात्र असल्याचे सिद्ध करून दाखवावे.

२२.लोकांच्या हक्कांमध्ये सर्वात मोठा हक्क आई-वडीलांचा असतो म्हणूनच सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्यांच्याशी चांगले वर्तन करण्याविषयी सक्तीने बजाविले आहे. चांगल्या वर्तनात त्याचा आदर-सन्मान, त्यांची सेवा, त्यांची मदत, त्यांना आनंदीत ठेवण्याचा प्रयत्न, त्यांच्या करीता समर्पण व त्यांच्या हक्कात कल्याणदायी प्रार्थना या सर्व गोष्टी सामील आहेत. ही त्यांच्याशी असलेल्या स्वाभाविक संबंधाची निकड आहे म्हणून शरीअतने याला मोठे महत्व दिले आहे आणि फार मोठे सत्कर्म ठरविले आहे. परंतु पाश्चात्य समाज जो नितिमत्तेला पारखा झाला आहे. या हक्कास, मान्य करीत नाही. संतती आपल्या माता पित्याशी अगदी बेपर्वा राहते व त्यांच्या संबंधाने आपली कोणतीही जबाबदारी समजत नाहीत अर्थात जे लोक ईश्वराच्या हकाला ओळखत नाही ते लोकांचा हक्क कसा ओळखतील?

अधिक स्पष्टीकरणा साठी पहा सूरह लूकमान टीप क्र. १७,२०आणि २१ तसेच सूरह बनी इस्राईल टीप क्र.२८.

२३. याच आधारावर पित्याचा तुलनेने आई सद्वर्तनास अधिक जास्त पात्र ठरते. आयतीच्या या संकेतास पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी स्पष्टत: फर्माविले आहे यास्तव हदीस वचनात पुढील प्रमाणे उल्लेख आहे-

''एक मनुष्य पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या सेवेत हजर झाला व त्याने विनविले - हे अल्लाहचे प्रेषित! माझ्या चांगल्या वर्तनास सर्वाधिक जास्त पात्र असा कोण आहे?

फर्माविले, तुमची आई त्याने विचारले, नंतर कोण? फर्माविले, तुमची आई. त्याने विचारले, नंतर कोण? फर्माविले, तुमची आई. त्याने विचारले, नंतर कोण? फर्माविले, नंतर तुमचा पिता.'' (बुखारी किताबुल अदब)

२४. या आयतीत गर्भ आणि दूध सोडविण्याची मुदत एकंदरीत तीस महीने सांगितली गेली आहे. मात्र सूरह लुकमान मध्ये दूध सोडविण्याची मुदत दो वर्षे सांगितली गेली आहे

وَفِصٰلُهٗ فِيْ عَامَيْنِ (لقمان:١٤)

'' आणि दोन वर्षे त्याचे दूध सोडविण्यास लागले''

तसेच सूरह बकरा मध्ये बालकाच्या दुग्धपानाची मुदत पूर्ण दोन वर्षे निवेदिली गेली आहे (सूरह बकरा आयत २३३) यास्तव धर्मशास्त्रवेत्त्यांनी सूरह अहकाफच्या या आयती पासून हा बोध घेतला आहे की गर्भावस्थाची मुदत कमीत कमी सहा महीने आहे म्हणजे विवाहा नंतर सहा महिन्यांनी मूल जन्मास आले तर ती उचित संतती समजली जाईल.

२५. तारूण्याचे वय शुद्धीवर राहण्याचे व चाळीस वर्षाचे वय बुद्धिच्या परिपक्कतेचे वय होय.

२६. या आयतीत त्या माणसाचे चारित्र्य वर्णिले गेले आहे जो अल्लाहचे भय बाळगणारा व त्याच्या समोर उत्तर दायी ठरण्याची जाणीव बाळगणारा आहे. तो सुज्ञ होताच अल्लाहच्या उपकारंची आठवण करू लागतो, विशेषत्वाने त्या उपकाराची की अल्लाहने त्याच्या माता पित्यास संतती प्रदान केली व याचे संगोपन करण्याजोगे त्यांना बनविले मग

जेव्हा तो चाळीस वर्षाचा होतो तेव्हा ही जाणीव अधिक प्रखरपणे जागृत होते आणि तो कृतज्ञशील होण्याची व सत्कर्मी बनण्याची सुबुद्धि अल्लाहजवळ मागतो. तसेच ही प्रार्थना करतो की माझ्या संततीला ही सत्कर्मी बनव.

स्पष्ट झाले की सत्कर्मी व सदाचारी मनुष्य आपल्या संततीला ही सत्कर्मी पाहू इच्छितो. असा मनुष्य खचितच आपल्या मुलाबाळांना धार्मिक शिक्षण देईल व त्यांना योग्य संगोपन व प्रशिक्षण देईल.

आयतीत 'ते सत्कर्म करावे जे तुला प्रिय आहे' चा संकेत या गोष्टीकडे आहे की सत्कर्म तेच विश्वासनीय होय जे निव्वळ अल्लाहची प्रसन्नता प्राप्त करण्याच्या हेतुने केले गेले असेल; आणि जे ढोंग व प्रदर्शन पासून मुक्त असेल.

हे ते लोक होत, ज्यांच्यावर (अल्लाहच्या अजाब) चे फर्मान लागू झाले. त्या समूहांमध्ये जे जिन्न आणि माणसां पैकी, यांच्यापूर्वी होऊन गेले निःसंशय हे नाश पावणारे आहेत. आणि प्रत्येक करीता त्यांच्या आचरणा नुसार दर्जे असतील आणि हे (यासाठी घडेल की) त्याने (अल्लाहने) त्यांच्या आचरणाचा पूरेपूर मोबदला द्यावा आणि त्यांच्यावर अत्याचार कदापि केला जाणार नाही.(अल-क़ुर्आन)

१६. अशा लोकांच्या उत्कृष्ट आचरणास आम्ही कबूल करू [२७] आणि त्यांच्या दुष्कर्मांना माफ करू. ते जन्नतवासी मध्ये सामील होतील. सच्चा वायदा जो यांच्याशी केला जात राहीला.

أُولَٰٓئِكَ ٱلَّذِينَ نَتَقَبَّلُ عَنْهُمْ أَحْسَنَ مَا عَمِلُوا۟ وَنَتَجَاوَزُ عَن سَيِّـَٔاتِهِمْ
فِىٓ أَصْحَٰبِ ٱلْجَنَّةِ ۖ وَعْدَ ٱلصِّدْقِ ٱلَّذِى كَانُوا۟ يُوعَدُونَ ﴿١٦﴾

१७. आणि ज्या माणसाने आपल्या माता पित्यास म्हटले, शी तुम्ही ! काय तुम्ही मला याबाबत भय दाखविता की मला कबरीतून बाहेर काढले जाईल, वास्तविक माझ्या पूर्वी कित्येक जन समूह होऊन गेलेत. [२८] आणि ते दोघे अल्लाहशी गाऱ्हाणे करीत याला म्हणतात की खेद आहे तुझ्याबद्दल ! ईमान बाळग. अल्लाहचा वायदा सच्चा आहे. परंतु तो म्हणतो की हे पूर्वी होऊन गेलेल्या लोकांचे किस्से आहेत. [२९]

وَٱلَّذِى قَالَ لِوَٰلِدَيْهِ أُفٍّ لَّكُمَآ أَتَعِدَانِنِىٓ أَنْ أُخْرَجَ وَقَدْ خَلَتِ
ٱلْقُرُونُ مِن قَبْلِى وَهُمَا يَسْتَغِيثَانِ ٱللَّهَ وَيْلَكَ ءَامِنْ إِنَّ وَعْدَ ٱللَّهِ
حَقٌّ فَيَقُولُ مَا هَٰذَآ إِلَّآ أَسَٰطِيرُ ٱلْأَوَّلِينَ ﴿١٧﴾

१८. हे ते लोक होत, ज्यांच्यावर (अल्लाहच्या अजाब) चे फर्मान लागू झाले. त्या समूहांमध्ये जे जिन्न आणि माणसां पैकी, यांच्यापूर्वी होऊन गेले [३०] नि:संशय हे नाश पावणारे आहेत.

أُولَٰٓئِكَ ٱلَّذِينَ حَقَّ عَلَيْهِمُ ٱلْقَوْلُ فِىٓ أُمَمٍ قَدْ خَلَتْ مِن قَبْلِهِم
مِّنَ ٱلْجِنِّ وَٱلْإِنسِ ۖ إِنَّهُمْ كَانُوا۟ خَٰسِرِينَ ﴿١٨﴾

१९. आणि प्रत्येका करीता त्यांच्या आचरणा नुसार दर्जे असतील [३१] आणि हे (यासाठी घडेल की) त्याने (अल्लाहने) त्यांच्या आचरणाचा पूरेपूर मोबदला द्यावा आणि त्यांच्यावर अत्याचार कदापि केला जाणार नाही.

وَلِكُلٍّ دَرَجَٰتٌ مِّمَّا عَمِلُوا۟ ۖ
وَلِيُوَفِّيَهُمْ أَعْمَٰلَهُمْ وَهُمْ لَا يُظْلَمُونَ ﴿١٩﴾

२०. आणि ज्या दिवशी काफिर आगी समोर सादर केले जातील (तेव्हा त्यांना म्हटले जाईल) तुम्ही आपल्या हिश्श्याच्या चांगल्या गोष्टी ऐहिक जीवनात घेऊन टाकल्या व त्यापासून लाभ घेतला. [३२] तेव्हा आज तुम्हाला अपमानाची शिक्षा दिली जाईल. या गोष्टी पायी की तुम्ही जमीनीवर कसल्याही हक्का विना गर्व करीत राहीले आणि यासाठी की तुम्ही अवज्ञा करीत राहीले. [३३]

وَيَوْمَ يُعْرَضُ ٱلَّذِينَ كَفَرُوا۟ عَلَى ٱلنَّارِ أَذْهَبْتُمْ طَيِّبَٰتِكُمْ
فِى حَيَاتِكُمُ ٱلدُّنْيَا وَٱسْتَمْتَعْتُم بِهَا فَٱلْيَوْمَ تُجْزَوْنَ عَذَابَ
ٱلْهُونِ بِمَا كُنتُمْ تَسْتَكْبِرُونَ فِى ٱلْأَرْضِ بِغَيْرِ
ٱلْحَقِّ وَبِمَا كُنتُمْ تَفْسُقُونَ ﴿٢٠﴾

२७. म्हणजे अशा लोकांचे कर्म केवळ चांगलेच नव्हेत तर ते नेक भावनेने, योग्य प्रेरणेने अदा केले आहेत म्हणून अल्लाहच्या नजरेत ते उत्कृष्ट कर्म होय. म्हणूनच ते मान्यतेचा दर्जा प्राप्त करतील.

२८. म्हणजे जे जन समूह होऊन गेलेत ते पुन्हा जिवंत होऊन आले नाहीत.

२९. हे त्या माणसाचे चारित्र्य होय जो आखिरतचा इन्कार करणारा आहे आणि जेव्हा त्याचे ईमान धारक आई-वडील त्याला ईमान बाळगण्यास सांगतात तेव्हा तो मरणोत्तर जीवनास एक कल्पित कथा ठरवू लागतो. आई-वडीलांचा उपदेश ग्रहण करण्या ऐवजी त्यांच्याशी दुर्वतन करू लागतो.

या आयतींचा उघड संकेत तत्कालीन परिस्थितीकडे आहे.जेव्हा ही सूरह अवतरली त्यावेळी दोन्ही प्रकारचे चारित्र्य ज्यांचा या आयतींमध्ये उल्लेख केला गेला आहे, प्रकट झाले होते.

३०. म्हणजे या चारित्र्याचे लोक अजाब (ईश-प्रकोपा) करीता पात्र आहेत आणि मनुष्य व जिन्नांच्या त्या समूहात सामील आहेत जो यापूर्वी ईश शिक्षेला पात्र ठरला आहे.

३१. म्हणजे जो मनुष्य जेवढा सत्कर्मी असेल त्या नुसार जन्नत मध्ये त्याचा दर्जा राहील आणि जो मनुष्य जेवढा दुराचारी असेल त्याच प्रमाणात जहन्नम मध्ये त्याचे ठिकाण राहील.

जर मनुष्य आखिरत मध्ये उच्च दर्जाची अभिलाषा बाळगतो तर त्याने उच्च दर्जाचे कर्म करावे.

३२. म्हणजे जगात ज्या देणग्या अल्लाहने तुम्हाला प्रदान केल्या होत्या त्यात तुम्ही एवढे मग्न राहीलात की तुम्हाला अल्लाहचे स्मरण राहीले नाही आणि आखिरतचे ऐहिक देणग्या तर अशासाठी आहेत की माणसाने आपल्या पालन कर्त्याशी कृतज्ञ असावे व त्या देणग्यांचा अशा रीतीने वापर करावा की आखिरत मध्ये त्याचा मोबदला मिळावा. यासाठी नव्हे की त्याने अधाशीपणे ऐहिक लाभांमागे धावत राहून भौतिकवादी व्हावे.

३३. 'गर्वा'शी अभिप्रेत मनातील घमेंड व अवज्ञा' शी अभिप्रेत वाईट आचरण होय.

२१. स्मरण करा आदच्या भावाचे [३४] जेव्हा त्याने अहकाफ [३५] (च्या प्रदेशा ) मध्ये आपल्या जन समूहास खबरदार केले ----- आणि खबरदार करणारे त्याच्या पुढे ही आले होते व त्याच्या मागे ही आले [३६] ----- की अल्लाह खेरीज कोणाची ही उपासना करू नका. मला तुमच्या बाबत एका भयानक दिवसाच्या शिक्षेचे भय वाटते.[३७]

وَاذْكُرْ أَخَا عَادٍ إِذْ أَنذَرَ قَوْمَهُ بِالْأَحْقَافِ وَقَدْ خَلَتِ
النُّذُرُ مِن بَيْنِ يَدَيْهِ وَمِنْ خَلْفِهِ أَلَّا تَعْبُدُوا إِلَّا
اللَّهَ إِنِّي أَخَافُ عَلَيْكُمْ عَذَابَ يَوْمٍ عَظِيمٍ ﴿٢١﴾

२२. ते म्हणाले, काय तुम्ही एवढया साठी आला आहात की आम्हाला आमच्या उपास्यांपासून परावृत्त करावे.[३८] जर तुम्ही सच्चे असाल तर घेऊन या ती शिक्षा, जिचे भय आम्हाला दाखवित आहात.

قَالُوا أَجِئْتَنَا لِتَأْفِكَنَا عَنْ آلِهَتِنَا فَأْتِنَا بِمَا تَعِدُنَا
إِن كُنتَ مِنَ الصَّادِقِينَ ﴿٢٢﴾

२३. तो म्हणाला, याचे ज्ञान तर अल्लाहलाच आहे. मी तर तो संदेश तुमच्या प्रत पोहचवित आहे ज्यासह मला पाठविले गेले आहे. परंतु मी असे पाहतो की तुम्ही लोक अज्ञान बाळगत आहात.

قَالَ إِنَّمَا الْعِلْمُ عِندَ اللَّهِ وَأُبَلِّغُكُم مَّا أُرْسِلْتُ بِهِ وَلَٰكِنِّي
أَرَاكُمْ قَوْمًا تَجْهَلُونَ ﴿٢٣﴾

२४. मग जेव्हा त्यांनी यास [३९] ढगाच्या स्वरूपात आपल्या दऱ्या खोऱ्यांकडे येतांना पाहीले तेव्हा म्हणू लागले हा ढग आहे जो आमच्या वर पाऊस वर्षवील.नव्हे किंबहुना ही ती गोष्ट आहे जिच्या करीता तुम्ही घाई माजविली होती. ही हवा (वादळ) आहे ज्यात दुःख दायक अजाब आहे. [४०]

فَلَمَّا رَأَوْهُ عَارِضًا مُّسْتَقْبِلَ أَوْدِيَتِهِمْ قَالُوا هَٰذَا
عَارِضٌ مُّمْطِرُنَا ۚ
بَلْ هُوَ مَا اسْتَعْجَلْتُم بِهِ ۖ رِيحٌ فِيهَا عَذَابٌ أَلِيمٌ ﴿٢٤﴾

२५. ही प्रत्येक गोष्टीचा विध्वंस करील आपल्या पालन कर्त्याच्या आदेशाने. यास्तव यांची दशा अशी झाली की त्यांच्या घरांखेरीज काहीच दिसून येत नव्हते.[४१] आम्ही अपराध्यांना अशाच प्रकारे शिक्षा देत असतो.[४२]

تُدَمِّرُ كُلَّ شَيْءٍ بِأَمْرِ رَبِّهَا فَأَصْبَحُوا لَا يُرَىٰ إِلَّا
مَسَاكِنُهُمْ ۚ كَذَٰلِكَ نَجْزِي الْقَوْمَ الْمُجْرِمِينَ ﴿٢٥﴾

३४. अभिप्रेत हूद नावाचे पैगंबर होत जे आद जन समूहापैकी होते. व त्या जन समूहाकडे रसूल (पैगंबर) या नात्याने पाठविले गेले होते. यांचा वृत्तांत सूरह अअराफ व सूरह हूद मध्ये निवेदिला गेला आहे.

३५. अहकाफ म्हणजे वाळूची टेकडी आणि अभिप्रेत तो प्रदेश होय जो हजरमोत जवळ यमनच्या पूर्वेस आहे. या ठिकाणी आद जनसमूह आबाद होता ज्याचा काळ हजरत इब्राहीम यांच्या ही पूर्वीचा होता. हा प्रदेश त्या काळचा सर्वाधिक सूसंस्कृत प्रदेश होता परंतु आता एक वाळवंट आहे जिथे वाळूचे असे ढीग आहेत की प्रवास करणे दुरापास्त आहे.

३६. म्हणजे हजरत हूद हे काही नवे प्रेषित नव्हते त्यांच्या पूर्वी ही रसूल (पैगंबर) आले होते व त्यांच्या नंतर देखील पैगंबर येत राहीले.

३७. अभिप्रेत शिक्षा अवतरणाचा दिवस होय ज्याचा विध्वंस मोठा भयंकर असेल.

३८. तो मूर्तिपूजक जन समूह होता आणि आपल्या मूर्त्यांना सोडून अल्लाहला एकमेव उपास्य मानण्यास मुळीच तयार नव्हता.

३९. म्हणजे ईश-प्रकोपास

४०. ते ढगाला पाहून आनंदित होत होते की आता पाऊस येईल व त्यांना शांती लाभेल परंतु हजरत हूद यांनी कुरआनाच्या निवेदना नुसार त्यांना सावध केले की हा ढग तुमच्या करीता कृपाकारक नाही, तर क्लेश कारक आहे आणि हीच ती अल्लाहची शिक्षा होय जी तुमच्या शिरावर कोसळणार आहे.

४१. म्हणजे वादळी वाऱ्याने त्यांचा अशा प्रकारे सर्वनाश केला की ते नावारूपाला ही उरले नाहीत व त्यांची वैभवशाली नागरी संस्कृती ही मातीत मिळाली.

४२. म्हणजे अपराधी जनसमूहांना सर्वश्रेष्ठ अल्लाह ज्या प्रकारे जगात शिक्षा देतो त्याचा एक नमुना हा अजाब होय जो हूद जन समूहावर अवतरीत झाला.

२६. आम्ही त्यांना तो सत्ताधिकार प्रदान केला होता, जो तुम्हाला प्रदान केला नाही.[४३] आम्ही त्यांना कान, डोळा व हृदय दिले होते परंतु ना त्यांचे कान त्यांच्या काही कामी आले, ना त्यांचे डोळे आणि ना त्यांची हृदये. या कारणास्तव की ते अल्लाहच्या आयतींचा इन्कार करीत होते [४४] आणि यांना वेढून घेतले त्या गोष्टीने जिची ते थट्टा उडवित होते.[४५]

وَلَقَدْ مَكَّنّٰهُمْ فِيْمَآ اِنْ مَّكَّنّٰكُمْ فِيْهِ وَجَعَلْنَا لَهُمْ
سَمْعًا وَّاَبْصَارًا وَّاَفْـِٕدَةً ۖ فَمَآ اَغْنٰى عَنْهُمْ سَمْعُهُمْ
وَلَآ اَبْصَارُهُمْ وَلَآ اَفْـِٕدَتُهُمْ مِّنْ شَيْءٍ اِذْ كَانُوْا
يَجْحَدُوْنَ بِاٰيٰتِ اللّٰهِ وَحَاقَ بِهِمْ مَّا كَانُوْا بِهٖ
يَسْتَهْزِءُوْنَ ﴿٢٦﴾

२७. आम्ही तुमच्या जवळ पासच्या वस्त्यांचा नायनाट करून टाकला आहे [४६] आम्ही आपल्या आयती या ना त्या प्रकारे सादर केल्या होत्या. अशासाठी की त्यांनी रूजू करावे.

وَلَقَدْ اَهْلَكْنَا مَا حَوْلَكُمْ مِّنَ الْقُرٰى وَصَرَّفْنَا الْاٰيٰتِ
لَعَلَّهُمْ يَرْجِعُوْنَ ﴿٢٧﴾

२८. तेव्हा का नाही त्यांची मदत केली त्या अस्तित्वांनी ज्यांना यांनी अल्लाहला सोडून सान्निध्या करीता उपास्य बनूवन ठेवले होते.[४७] किंबहुना ते सर्व यांच्याकडून हरवले हे त्यांचे असत्य व त्यांच्या मनोरचित गोष्टी होत्या.

فَلَوْلَا نَصَرَهُمُ الَّذِيْنَ اتَّخَذُوْا مِنْ دُوْنِ اللّٰهِ قُرْبَانًا
اٰلِهَةً ۭ بَلْ ضَلُّوْا عَنْهُمْ ۚ وَذٰلِكَ اِفْكُهُمْ وَمَا كَانُوْا
يَفْتَرُوْنَ ﴿٢٨﴾

२९. आणि जेव्हा आम्ही जिन्नांच्या [४८] एका समूहास तुमच्याकडे वळविले, अशासाठी की त्यांनी कुरआन ऐकावे.[४९] जेव्हा ते तिथे पोहचले तेव्हा ते (आपसात) म्हणाले, गप्प राहा (आणि ऐका) जेव्हा त्याचे पठण पूर्ण झाले तेव्हा ते आपल्या जन समूहाकडे खबरदार करणारे बनून परतले.

وَاِذْ صَرَفْنَآ اِلَيْكَ نَفَرًا مِّنَ الْجِنِّ يَسْتَمِعُوْنَ الْقُرْاٰنَ ۚ
فَلَمَّا حَضَرُوْهُ قَالُوْٓا اَنْصِتُوْا ۚ فَلَمَّا قُضِيَ وَلَّوْا اِلٰى قَوْمِهِمْ
مُّنْذِرِيْنَ ﴿٢٩﴾

३०. ते म्हणाले, हे आमच्या जाति-बांधवांनो ! आम्ही एक असा ग्रंथ ऐकला आहे जो मूसा नंतर अवतरीत केला गेला आहे.[५०] सत्य-समर्थन करते त्या ग्रंथाचे जो या पूर्वी आलेला आहे [५१] हा सत्य आणि सरळ मार्गाकडे मार्गदर्शन करतो.[५२]

قَالُوْا يٰقَوْمَنَآ اِنَّا سَمِعْنَا كِتٰبًا اُنْزِلَ مِنْۢ بَعْدِ مُوْسٰى مُصَدِّقًا
لِّمَا بَيْنَ يَدَيْهِ يَهْدِيْٓ اِلَى الْحَقِّ وَاِلٰى طَرِيْقٍ مُّسْتَقِيْمٍ ﴿٣٠﴾

३१. हे आमच्या जाति-बांधवांनो ! अल्लाहच्या आवाहकाचे [५३] आवाहन स्विकारा आणि त्यावर ईमान बाळगा.[५४] अल्लाह तुमच्या अपराधांना माफ करील.[५५] आणि तुम्हाला दुःखदायक अजाब (शिक्षे) पासून वाचविल.[५६]

يٰقَوْمَنَآ اَجِيْبُوْا دَاعِيَ اللّٰهِ وَاٰمِنُوْا بِهٖ يَغْفِرْ لَكُمْ مِّنْ ذُنُوْبِكُمْ
وَيُجِرْكُمْ مِّنْ عَذَابٍ اَلِيْمٍ ﴿٣١﴾

४३. हे कुरेश जन समूहाला संबोधून आहे.

४४. स्पष्ट झाले की कान, डोळे, हृदय. बुद्धिची क्षमता अशा स्थितीत उपयोगी ठरते जेव्हा अल्लाहच्या निशाण्यांना पाहण्या करीता व त्याच्या आयतींना वाचण्या व ऐकण्या करीता त्यांचा वापर केला जावा; मग जी वास्तविकता दृगोचर होऊन डोळयासमोर येईल तिला कबूल केले जावे.

४५. म्हणजे अल्लाहच्या अजाबने ज्याची ते थट्टा उडवित होते.

४६. म्हणजे आद, समूद, मदयन इत्यादीच्या वस्त्या ज्या अरब भू प्रदेशातच होत्या.

४७. म्हणजे यांची ही उपास्ये ज्यांच्या बद्दल त्यांची अशी श्रद्धा होती की ते अल्लाहचे सान्निध्य प्राप्त करण्याचे माध्यम आहेत. त्यावेळी त्यांच्या मदतीला का धावून आले नाहीत जेव्हा अल्लाहचा प्रकोप त्यांच्यावर कोसळला? जेव्हा ही उपास्ये आपल्या भक्तांना अल्लाहच्या अजाब पासून वाचवू शकले नाहीत तेव्हा ही हकीगत सिद्ध झाली की अल्लाह खेरीज असा कोणी नाही जो गाऱ्हाणे ऐकणारा (गौस) संकट निवारक व मदत करणारा असावा. आणि त्याच्या खेरीज कोणी ही नाही जो उपासनेस पात्र असावा एखाद्याला ईश-प्राप्तीचे माध्यम समजून त्याच्याशी तो व्यवहार करणे जो केवळ अल्लाहशीच केला जाऊ शकतो नितांत मार्गभ्रष्टता व अल्लाहशी असत्याचा संबंध जोडणे होय.

४८. जिन्न अल्लाहनेच निर्माण केलेली एक निर्मिती आहे, जी आम्हाला दिसून येत नाही परंतु ईश-संदेशाने आम्हाला या बाबत माहिती दिली आहे. त्यांच्या निर्मिती संबंधी पहा सूरह हिज्र टीप क्र.२५

४९. सर्वश्रेष्ठ अल्लाहने जिन्नांच्या एका समूहाचे पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्याकडे लक्ष वेधले आहे. अशासाठी की त्यांनी कुरआन ऐकावे. जेव्हा त्यांनी कुरआन ऐकले तेव्हा त्यांना हे ओळखण्यात कसली ही अडचण उद्‌भवली नाही की हा अल्लाहचा अवतरीत केलेला संदेश आहे. यास्तव गोष्ट त्वरीत त्यांच्या मनात उतरली आणि त्यांनी ईमान बाळगले आणि केवल ईमान बाळगले नाही, किंबहुना त्याचा प्रसार करणारे बनूनच आपल्या जन-समूहाकडे परतले; व त्यांना खबरदार केले. या ठिकाणी या घटनेस सादर करून हे स्पष्ट करण्याचा हेतु आहे की कुरआन अल्लाहची वाणी असणे ही अगदी स्पष्ट वस्तुस्थिती आहे. याला ओळखण्यात ना सुस्वभावी माणसाला काही अडचण येते आणि ना विवेकशील जिन्नांना आणि हे त्याचे चमत्कार पूर्ण वैभव आहे.

सूरह 'जिन्न' मध्ये देखील जिन्नांच्या एका समूहाचे कुरआन ऐकण्याचा व त्यावर ईमान बाळगण्याचा उल्लेख केला गेला आहे. परंतु सूरह अहकाफच्या या आयतींमध्ये त्यांचे प्रचारक बनून आपल्या जन समूहास खबरदार करण्याचा ही उल्लेख केला गेला आहे, म्हणून असे दिसून येते की या दोन वेगवेगळया घटना आहेत. सूरह जिन्नची घटना मक्केच्या आरंभीच्या युगातील दिसते. आणि सूरह अहकाफ मध्ये निवेदन केलेली ती घटना याच्या नंतरचा म्हणजे मक्काच्या मध्य-युगातील. सर्व सामान्यत: भाष्यकारांनी इब्ने हिशामच्या कथनावर भरवसा केला ज्यानुसार ही घटना पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचे तायफच्या प्रवासाहून परततांना नहला या ठिकाणी घडली होती. परंतु बुखारी व मुस्लिमची हदीस वचने नहलाच्या घटनेस सूरह जिन्नच्या अवतरणाशी संबंधित ठरवितात आणि हीच गोष्ट उचित दिसून येते (पहा-बुखारी- तिकाबुत्तफसीर - तफसीर सूरह जिन्न आणि मुस्लिम किताबुस्सलात)

यास्तव सूरह अहकाफ मध्ये निवेदिल्या घटनेस नहलाची घटना समजणे योग्य नव्हे. असे दिसून येते की ही घटना अन्य एखाद्या ठिकाणी घडली असेल.

स्पष्ट असावे की कुरआनाने कोठे ही हे स्पष्टीकरण केले नाही की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी जिन्नांना पाहीले होते आणि त्यांची जिन्नांशी प्रत्यक्ष भेट झाली होती, परंतु हे स्पष्टीकरण करतो की त्यांना जिन्नांच्या कुरआन ऐकण्याची खबर वही (ईश-संदेशा) द्वारे दिली गेली आणि बुखारी व मुस्लिमच्या हदीस वचनांमध्ये ही जी सूरह जिन्नच्या अवतरणाशी संबंधित आहे, ही गोष्ट सांगितली गेली आहे.

अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह अनआम टीप क्र. २४१

५०. हजरत मूसा यांचा उल्लेख जिन्नांनी अशासाठी केला आहे की त्यांना एक सर्वकष ग्रंथ 'तौरात' प्रदान केला होता. जबूर आणि बायबलचे अवतरण या मूळ ग्रंथाच्या पुन:रचना / नवीनी करणा करीता झाला होता तसेच यासाठी ही की हजरत सुलैमान हजरत मूसा यांच्या जन-समूहा पैकी होते आणि जिन्नांना हजरत सुलैमान यांच्या ताब्यात दिले गेले होते.

५१. म्हणजे तो सत्य समर्थन करतो की तौरात अल्लाहचा ग्रंथ होता. तसेच याची शिकवण ही तीच आहे जी तौरातची होती.

५२. अर्थात हा ग्रंथ योग्य व खरी श्रद्धा सादर करतो आणि तो मार्ग दाखवितो जो अल्लाहपर्यंत पोहचणारा आहे.

५३. अभिप्रेत अल्लाहचा रसूल (पैगंबर) होय याचे आवाहन स्विकारण्यात कुरआनावर ईमान बाळगणे ही सामील आहे.

५४. म्हणजे रसूल (पैगंबर) वर ईमान बाळगा.

५५. ज्या प्रकारे मनुष्य अपराधाची कामे करतो त्याच प्रकारे जिन्न देखील अपराधाची कामे करतात आणि ज्या प्रकारे

ईमान बाळगल्याने माणसाचे ते अपराध जे त्याने केले आहेत माफ होतात, त्याच प्रकारे एखाद्या जिन्नाच्या ईमान बाळगल्याने त्याचे अपराध देखील माफ होतात.

स्पष्ट झाले की जिन्नांवर ही अल्लाहच्या पैगंबरांवर व त्याच्या ग्रंथांवर ईमान बाळगण्याची तसेच अल्लाहची उपासना करण्याची, सत्कर्म करण्याची जबाबदारी टाकली गेली आहे आणि त्यांच्या करीता ही हे जग अशा प्रकारे कसोटीचे स्थान आहे, ज्या प्रकारे माणसांकरीता जमीनीवर शासक माणसाला बनवले गेले आहे, जिन्नांना नव्हे. यास्तव दोघांचे कार्यक्षेत्र वेगवेगळे आहे म्हणून शक्य आहे की यांच्याकरीता एखाद्या विवरणात्मक शरीअतची गरज नसावी आणि धैर्याच्या समस्त बाबींनुसार आचरण करणे त्यांना पर्याप्त असावे. उदाहरणार्थ श्रद्धा, उपासना, निति, सत्य व सत्कर्माचे प्रोत्साहन आणि दुष्कर्म व दुराचारा पासून स्वत:ला रोखणे इत्यादि. ज्याअर्थी जिन्नांचा मामला अपरोक्षाशी संबंधित आहे म्हणून त्यांच्या बाबतीत आम्हाला त्याच ज्ञानावर समाधान मानले पाहीजे जे कुरआन व सहीह हदीस द्वारे प्राप्त झाले आणि अधिक खोलवर जाऊ नये.

५६. अल्लाहच्या दु:खदायक शिक्षेपासून मुक्तिही स्वत:च फार मोठी सफलता आहे. राहीली जन्नत तर जसे सूरह रहमान मध्ये जिन्न आणि मनुष्यांना संबोधितांना फर्माविले गेले आहे-

وَلِمَنْ خَافَ مَقَامَ رَبِّهٖ جَنَّتَانِ۔ (سورہ رحمٰن:٤٦)

‘आणि जो कोणी आपल्या पालन कर्त्या समोर उभे राहण्यास भ्याला त्याच्या करीता दोन जन्नती आहेत’ (अर्रहमान-४६)

सदाचारी जिन्नांना ही बक्षिस म्हणून जन्नत त्याच प्रकारे लाभेल ज्या प्रकार सदाचारी माणसांना लाभेल आणि तिथे दोघांपैकी प्रत्येका करीता त्याच्या स्वभावाच्या निकडी नुसार सुख विलासाची सामुग्री राहील.

काय यांनी या गोष्टीवर विचार केला नाही की अल्लाह ज्याने आकाश व जमीनीला निर्माण केले आणि ज्यांची निर्मिती करून तो थकला नाही तो मृतांना जिवंत करण्यास समर्थ आहे. का नव्हे ?तो प्रत्येक गोष्टीचे सामर्थ्य बाळगतो. (अल-कुर्आन)

३२. आणि जो अल्लाहच्या आवाहकाचे आवाहन स्विकारणार नाही तर त्याच्या हे अवाक्यात नाही की जमीनीवर अल्लाहच्या ताब्यातून निसटून जाईल [५७] आणि ना अल्लाहच्या विरोधात याचा एखादा मदतनीस असेल. हे लोक उघड मार्गभ्रष्टतेत पडले आहेत.[५८]

وَمَنْ لَّا يُجِبْ دَاعِيَ اللّٰهِ فَلَيْسَ بِمُعْجِزٍ فِي الْاَرْضِ وَلَيْسَ لَهٗ
مِنْ دُوْنِهٖٓ اَوْلِيَآءُ ۭ اُولٰۗىِٕكَ فِيْ ضَلٰلٍ مُّبِيْنٍ ٣٢

३३. काय यांनी या गोष्टीवर विचार केला नाही की अल्लाह ज्याने आकाश व जमीनीला निर्माण केले आणि ज्यांची निर्मिती करून तो थकला नाही तो मृतांना जिवंत करण्यास समर्थ आहे. का नव्हे ?तो प्रत्येक गोष्टीचे सामर्थ्य बाळगतो.

اَوَلَمْ يَرَوْا اَنَّ اللّٰهَ الَّذِيْ خَلَقَ السَّمٰوٰتِ وَالْاَرْضَ وَلَمْ يَعْيَ
بِخَلْقِهِنَّ بِقٰدِرٍ عَلٰٓي اَنْ يُّـحْيِۦ الْمَوْتٰى ۭ بَلٰٓى اِنَّهٗ عَلٰي كُلِّ شَيْءٍ قَدِيْرٌ ٣٣

३४. ज्या दिवशी [५९] काफिर जहन्नमच्या आगीसमोर हजर केले जातील (त्यांना विचारले जाईल) काय हे सत्य नव्हे ?[६०] ते म्हणतील, होय. आमच्या पालन कर्त्या (अल्लाह) ची शपथ (हे अगदी सत्य आहे) फर्मावीले, तर आपल्या कुफ्र (इन्कार करण्या) पायी चाखा अजाब (ईश शिक्षे) ची गोडी.

وَيَوْمَ يُعْرَضُ الَّذِيْنَ كَفَرُوْا عَلَي النَّارِ ۭ اَلَيْسَ ھٰذَا بِالْحَقِّ ۭ قَالُوْا
بَلٰى وَرَبِّنَا ۭ قَالَ فَذُوْقُوا الْعَذَابَ بِمَا كُنْتُمْ تَكْفُرُوْنَ ٣٤

३५. तर (हे पैगंबर !) धैर्य पाळा ज्या प्रकारे दृढ संकल्प व साहस बाळगणाऱ्या पैगंबरांनी धैर्य पाळले आणि यांच्या करीता घाई करू नका.[६१] ज्या दिवशी हे लोक ती गोष्ट पाहतील जिचा यांच्याशी वायदा केला जात आहे, तेव्हा त्यांना हे जाणवेल की जणू (ते जगात) दिवसाच्या एका घटीके पेक्षा जास्त राहीले नाहीत [६२] हा संदेश आहे. तेव्हा अवज्ञाकारी लोकांखेरीज आणखी कोण नाश पावेल ?[६३]

فَاصْبِرْ كَمَا صَبَرَ اُولُوا الْعَزْمِ مِنَ الرُّسُلِ وَلَا تَسْتَعْجِلْ لَّهُمْ ۭ
كَاَنَّهُمْ يَوْمَ يَرَوْنَ مَا يُوْعَدُوْنَ ۙ لَمْ يَلْبَثُوْٓا اِلَّا سَاعَةً مِّنْ
نَّهَارٍ ۭ بَلٰغٌ ۚ فَهَلْ يُهْلَكُ اِلَّا الْقَوْمُ الْفٰسِقُوْنَ ٣٥

५७. जिन्नांचे खरे वास्तव्य जमीनीवरच आहे म्हणून फर्माविले, '' त्याच्या अवाक्यात नाही की जमीनीवर अल्लाहच्या काबूतून बाहेर जावे.''

५८. या ठिकाणी जिन्नांचे निवेदन संपले.

५९. म्हणजे कियामतीच्या दिवशी.

६०. म्हणजे जहन्नमच्या शिक्षेचा तुम्ही इन्कार करीत राहीले. आता काय ही तुमच्या समोर वास्तव स्थितीत अस्तित्वात नाही?

६१. ही पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या करीता तसेच त्यांच्या माध्यमान्वये धर्माचे आवाहन करणाऱ्यांना सांत्वना ही आहे आणि उपदेश ही की जेव्हा तुम्ही धर्माच्या आवाहनास योग्य रित्या प्रस्तुत केले आणि तरी ही इन्कार करणारे विरोधावर अटळ आहेत आणि क्लेश दायक गोष्टी बोलतात तेव्हा तुम्ही यावर संयम पाळा आणि त्यांच्यापैकी ईश शिक्षेची घाई करू नका.

६२. स्पष्टीकरणा साठी पहा सूरह युनूस टीप क्र. ७४ आणि सूरह नाजिआत टीप क्र. ३२

६३. म्हणजे हा अल्लाहचा संदेश आहे जो त्याच्या पैगंबराने तुमच्या पावेतो पोहचविला आहे. आता एवढे करूनही जे लोक अवज्ञा कारी बनून राहतील तेच नाश पावणार आहेत. याला कबूल करणारे निश्चितच विनाशापासून वाचतील.

# सूरह मुहम्मद

# ४७. सूरह मुहम्मद

**नावः** आयत क्र. २७ मध्ये पैगंबर मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचे नाव आले आहे तद्नुषंगे या सूरहचे नाव 'मुहम्मद' आहे.

**अवतरण काळ :** मदीना येथे हिजरत (स्थलांतरा) च्या पहिल्या वर्षी अवतरली.

**मध्यवर्ति कल्पनाः** युद्धाची घोषणा आहे; त्या काफिरांच्या विरूद्ध जे अल्लाहचा मार्ग रोखतात. त्यांच्याशी सामना करण्याकरीता ईमान बाळगणाऱ्यांना प्रवृत्त करणे आणि या संदर्भात त्यांना आवश्यक ते मार्गदर्शन करणे.

**आयत रचनाः** आयत क्र. १ ते ३ मध्ये फर्माविले गेले की अल्लाहचा इन्कार करणारे व ईमान बाळगणाऱ्यांची आचरण पद्धति मूलतः भिन्न स्वरूपाची आहे,यास्तव सर्वश्रेष्ठ अल्लाह देखील त्यांच्याशी वेगवेगळा व्यवहार करील. काफिरांचे कर्म असफल करील आणि ईमान बाळगणाऱ्यांची स्थिती दुरूस्त करील.

आयत क्र.४ ते १५ मध्ये ईमान बाळगणाऱ्यांना युद्धा संबंधाने ताकीद केली गेली आहे. आणि प्राण पणाला लावणाऱ्यांची हिंमत वाढविली गेली आहे व त्यांना आखिरतच्या उत्कृष्ट परिणतिची शुभ वार्ता दिली गेली आहे.

आयत क्र. १६ ते ३२ मध्ये अप्रामणिक मुसलमानांची दशा निवेदिली गेली आहे ज्यांना जेहादचा आदेश तापदायक वाटत होता आणि जे ईमान बाळगणाऱ्यांच्या तुलनेने काफिरांशी सहानुभूति बाळगत होते व त्यांच्याशी कानगोष्टी करीत.

आयत क्र. ३३ ते ३८ मध्ये सर्वसामान्य मुसलमानांना जेहाद करण्यास आणि अल्लाहच्या मार्गात खर्च (दान) करण्यास प्रोत्साहन दिले गेले आहे.

# ४७. सूरह मुहम्मद

سُورَةُ مُحَمَّدٍ

आयती - ३८

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بِسْمِ اللَّهِ الرَّحْمَٰنِ الرَّحِيمِ

१. ज्या लोकांनी कुफ्र केले आणि अल्लाहच्या मार्गापासून रोखले त्यांची कर्मे त्याने निष्फळ केलीत.[१]

الَّذِينَ كَفَرُوا وَصَدُّوا عَن سَبِيلِ اللَّهِ أَضَلَّ أَعْمَالَهُمْ ①

२. आणि ज्या लोकांनी ईमान बाळगले व सत्कर्म केले व त्या (मार्गदर्शना) वर ईमान बाळगले जे मुहम्मद वर अवतरीत केले गेले आहे [२] ---- आणि ते सत्य आहे त्यांच्या पालन कर्त्या तर्फे---- अल्लाहने त्यांची दुष्कृत्ये त्यांच्यापासून दूर केलीत आणि त्यांची अवस्था दुरूस्त केली.[३]

وَالَّذِينَ آمَنُوا وَعَمِلُوا الصَّالِحَاتِ وَآمَنُوا بِمَا نُزِّلَ عَلَىٰ مُحَمَّدٍ
وَهُوَ الْحَقُّ مِن رَّبِّهِمْ ۙ كَفَّرَ عَنْهُمْ سَيِّئَاتِهِمْ وَأَصْلَحَ بَالَهُمْ ②

३. हे अशासाठी की ज्या लोकांनी कुफ्र केले त्यांनी असत्याचे अनुसरण केले [४] आणि ज्यांनी ईमान बाळगले त्यांनी आपल्या पालन कर्त्या तर्फे आलेल्या सत्याचे अनुसरण केले. अशा प्रकारे अल्लाह लोकांकरीता त्यांची स्थिती निवेदितो.[५]

ذَٰلِكَ بِأَنَّ الَّذِينَ كَفَرُوا اتَّبَعُوا الْبَاطِلَ وَأَنَّ الَّذِينَ آمَنُوا
اتَّبَعُوا الْحَقَّ مِن رَّبِّهِمْ ۚ كَذَٰلِكَ يَضْرِبُ اللَّهُ لِلنَّاسِ أَمْثَالَهُمْ ③

४. यास्तव, जेव्हा तुमचा सामना काफिरांशी होईल तेव्हा त्यांच्या माना उडवा, येथपावेतो की जेव्हा खूप हत्या करून चुकाल तेव्हा यांना मजबूत बांधा.[६] यानंतर एकतर उपकार करणे आहे किंवा फिदीयाचा व्यवहार करणे आहे.[७] येथपावेतो की लढाईने आपले शस्त्र खाली टाकावे. [८]ही आहे तुमची जबाबदारी आणि जर अल्लाहने इच्छिले असते तर त्याने स्वतःच त्यांना शिक्षा दिली असती. परंतु त्याने ही ताकीद अशासाठी केली की तुमची एकमेकांद्वारे कसोटी घ्यावी [९] आणि जे लोक अल्लाहच्या मार्गात मारले गेले, त्यांची कर्मे तो कदापि वाया जाऊ देणार नाही.[१०]

فَإِذَا لَقِيتُمُ الَّذِينَ كَفَرُوا فَضَرْبَ الرِّقَابِ حَتَّىٰ إِذَا أَثْخَنتُمُوهُمْ
فَشُدُّوا الْوَثَاقَ فَإِمَّا مَنًّا بَعْدُ وَإِمَّا فِدَاءً حَتَّىٰ تَضَعَ الْحَرْبُ
أَوْزَارَهَا ۚ ذَٰلِكَ وَلَوْ يَشَاءُ اللَّهُ لَانتَصَرَ مِنْهُمْ وَلَٰكِن لِّيَبْلُوَ
بَعْضَكُم بِبَعْضٍ ۗ وَالَّذِينَ قُتِلُوا فِي سَبِيلِ اللَّهِ فَلَن يُضِلَّ
أَعْمَالَهُمْ ④

१. ही जिहाद (धर्मयुद्धा) संबंधीची सूरह आहे म्हणूनच सूरह अनफाल प्रमाणे कसल्याही प्रस्तावने विना सुरू झाली तात्पर्य काफिरांच्या हक्कात ही सूरह ईश-प्रकोप बनून अवतरली.

अल्लाहच्या मार्गापासून रोखण्याशी अभिप्रेत लोकांना इस्लाम धर्माचा अंगिकार करण्या पासून रोखणे, धर्माच्या प्रचार व प्रसार कार्यात अडथळे निर्माण करणे आणि मुसलमानांना या गोष्टी करीता विवश करणे की त्यांनी इस्लामच्या आदेशांचे पालन न करावे. मक्केच्या काफिरांनी इस्लामशी वैर बाळगण्यातच मुसलमानांना मक्का सोडून जाण्यास विवश केले आणि त्यांनी मदीना येथे स्थलांतर केल्या नंतर त्यांच्या विरूद्ध युद्धाचा वणवा पेटवत होते. कुरआनाने सांगितले आहे की काफिरांची सर्व कर्मे वाया जाणार आहेत म्हणजे ना तर यांचे हे कट कारस्थान सफल होणार आहे आणि ना त्यांचे एखादे कर्म अल्लाह जवळ स्विकृति प्राप्त करणार आहे. यास्तव कुरआनाचे हे भाकित खरे ठरले आणि त्यांचे ते सर्व प्रत्यन फोल ठरले जे ते अल्लाहच्या प्रेषिता विरुद्ध व त्याने आणलेल्या सत्याविरूद्ध करीत होते.

स्पष्ट असावे की ज्या गोष्टीचे भविष्यात घडून येणे निश्चित असते त्यांना कुरआन भूतकाळाच्या रूपाने निवेदितो म्हणून येथे फर्माविले. त्यांची कर्मे त्याने निष्फळ केलीत म्हणजे निश्चितच ती कर्मे व्यर्थ ठरणार आहेत.

२. म्हणजे ईमान व सदाचरण विश्वसनीय याच स्थितीत आहे की अल्लाहचे पैगंबर हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्यावर अवतरलेल्या मार्गदर्शनावर ही ईमान बाळगावे. त्यांना पैगंबर म्हणून अल्लाहतर्फे पाठविले गेल्यानंतर त्यांच्यावर ईमान न बाळगणे व त्या मार्गदर्शनास कबूल न करणे जे कुरआनाच्या स्वरूपात त्यांच्यावर अवतरले आहे, कुफ्र होय आणि कुफ्र सोबत ना ईमान विश्वसनीय आहे आणि ना सदाचरण.

३. म्हणजे अल्लाह या प्रामाणिक ईमान बाळगणाऱ्यांचे अपराध माफ करील आणि त्यांची धार्मिक, नैतिक, व ऐहिक स्थिती ठीक करील.

कुरआनाचे हे भाकित ही खरे ठरले. कुरआनावर ईमान बाळगणाऱ्यांचे जीवन सुशोभित झाले आणि त्यांची स्थिती दिवसेंदिवस उत्तम होत गेली.

४. कुरआन सत्य आहे म्हणजे अल्लाहचे सत्य मार्गदर्शन आहे म्हणून त्याला सोडून कोणत्याही गोष्टचे अनुसरण करणे म्हणजे असत्याचा पाठपुरावा करणे होय.

५. म्हणजे प्रत्येक समूहाची स्थिती भिन्न भिन्न निवेदन करतो यासाठी की लोकांनी काफिर व मोमीन (ईमान बाळगणारा) यांच्यातील फरक जाणावा व दोघांनाही समान लेखू नये.

६. हा आदेश युद्धाशी संबधित आहे आणि हे युद्ध जसे की वरील आयतींवरून, स्पष्ट आहे, सत्याचे अनुसरण करणाऱ्यांच्या अल्लाहच्या मार्गात लढले जाणारे युद्ध आहे; त्या असत्यांच्या पूजकां विरूद्ध जे अल्लाहच्या मार्गा पासून अर्थात इस्लाम अंगिकारण्या पासून लोकांना रोखतात आणि त्याच्या धर्मा विरूद्ध उत्पात उपद्रव माजवितात. या युद्धाचे पारिभाषिक नाव 'जेहाद' असे आहे, जे इस्लामचे एक पवित्र कर्तव्य आहे त्या शर्तीसह ज्या शरीअतने निवेदन केल्या आहेत.

या आयतीत ताकीद केली गेली आहे की जेव्हा काफिरांशी युद्ध करणे क्रमप्राप्त ठरेल व त्यांच्याशी सामना होईल तर त्यांना नि:संकोच ठार करा येथपावेतो की खूप मोठया प्रमाणात रक्तपात व्हावा. हा रक्तपात त्यांची ताकत संपविण्या करीता व त्याचा थाटमाट संपविण्या करीता आवश्यक आहे. म्हणून या बाबतीत नरमीचे धोरण अंगिकारण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. जेव्हा चांगल्या प्रकारे रक्तपात घडून येईल तेव्हा त्यांना बंदिस्त करून कैदेत ठेवण्यात आरंभ करा.

हे ताकीद बद्रच्या युद्धापूर्वी दिली गेली आहे. परंतु बद्रच्या युद्धात मुसलमानांच्या एका समूहा कडूनही चूक घडली की त्यांनी काफिरांचा चांगल्या प्रकारे बिमोड करण्या आधीच त्यांना बंदिवान बनवणे सुरू केले ज्याबाबत सक्त ताकीद अवतरली. पहा सूरह अन्फाल आयत क्र. ६७, ६८ आणि टीप क्र. १०२

७. म्हणजे नंतर युद्धकैद्यांशी दोघांपैकी एक व्यवहार केला जावा. एकतर त्यांना उपकार म्हणून मोकळे सोडावे म्हणजे त्यांची सुटका करावी किंवा कैदी बनवून नंतर त्यांची सुटका करावी. इस्लामी शासन या दोन्ही गोष्टींपैकी जिला प्रसंगानुकूल जाणेल अंगिकारू शकते. जर उपकार म्हणून त्यांची सुटका करण्यामागे हा हेतु असेल की त्यांनी याचा चांगला प्रभाव घ्यावा व परिणामी इस्लामच्या सान्निध्यात यावे तर ही स्थिती प्राधान्य देण्याजोगी आहे. बनी मुस्तलक युद्ध ही. स. ६ नंतर या कबिल्याच्या तमाम कैदींना मुसलमानांनी मुक्त केले होते (सीरत इब्ने हिशाम खंड-३ पृष्ठ ३४०) हुनेन युद्धानंतर हुवाजन कबिल्याचे सुमारे सहा हजार कैदी कसलाही मोबदला न घेता मुक्त केले गेले. (किताबुल अमवाल अबु उबैदा पृ. ११७) यमामाच्या सरदार शमामा बिन उसाल जेव्हा बंदिवान होऊन आला तेव्हा मसजिदे नबवी मध्ये त्याला कैदेत ठेवले गेले. अशासाठी की त्याने इस्लामशी चांगल्या प्रकारे परिचित व्हावे. तो फिदीया देण्या करीता तयार होता परंतु त्यांनी काही दिवसानंतर त्याला काहीही दंड न आकारता सोडून दिले. या चांगल्या वागणुकीने प्रभावित होऊन त्याने इस्लाम धर्माचा स्विकार केला (बुखारी-किताबुल मगाजी) परंतु जर शत्रूने मुसलमानांना कैद

केले असेल आणि त्यांची सुटका शत्रूंच्या कैदींना सोडून देण्यात होत असेल किंवा युद्धकैद्यांद्वारे एखादी विशेष सेवा घेऊन किंवा मोबदला घेऊन त्यांची सुटका करणे सहेतुक ठरत असेल तर या स्थितीला ही अंगिकारले जाऊ शकते. बद्र युद्धाच्या कैद्यांना मोबदला घेऊन किंवा शिक्षण देण्याची सेवा त्यांच्याकरवी घेऊन सोडले गेले होते. (सीरत इब्ने हिशाम खंड- २ पृ. ३०६ किताबुल अमवाल पृ. ११६)

कुरआनाच्या या ताकीदीने स्पष्ट झाले की इस्लाम युद्ध कैद्यांना दीर्घ काळ कैदेत ठेवणे, त्यांचा अनान्वित छळ करणे, किंवा त्यांना जन्मठेपेची शिक्षा देणे पसंत करीत नाही. तसेच या गोष्टीस ही पसंत करीत नाही की कैद्यांना ठार केले जावे. अपवादात्मक स्थितीतच असे करण्याची मुभा आहे. यास्तव पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी बद्र युद्धाच्या कैद्यांपैकी उकबा बिन अबी मुअीत आणि नजर बिन हारिस यांना, जे काफिरांचे नेते व सर्वात मोठे दुराचारी होते, ठार केले गेले होते. (सीरत इब्ने हिशाम खंड-२ पृ. २८६) त्याच प्रमाणे बनी कुरेजाच्या पुरूषांना ठार केले गेले होते कारण त्यांनी विश्वासघात केला होता आणि मदीनेच्या जवळपास राहून ते कट-कारस्थाने रचत होते.

राहीली युद्धकैद्यांना गुलाम बनविण्याची बाब तर कुरआनाने या विषयी आदेश दिलेला नाही आणि या आयतीत ज्या दोन स्थितीचे निवेदन केले गेले आहे की एकतर उपकार म्हणून सोडून द्या किंवा फिदीया वसूल करून सुटका करा तर यावरून हे स्पष्ट होते की इस्लामचा सर्वसामान्य नियम हाच आहे आणि लौंडी गुलाम बनविण्याचा जो पुरावा कथनाद्वारे मिळतो, तर ती एक अपवादात्मक स्थिती होती ज्याची मुभा विशिष्ट परिस्थितीच दिली गेली होती आणि जेथ पावेतो अरब लोकांचा संबंध आहे त्यांच्या कोणत्याही पुरूषाला गुलाम बनविले गेले नाही. यास्तव अबु उबैदा लिहीतात की :-

''हे युद्ध कैद्यां संबंधीचे आदेश आहेत, म्हणजे उपकार म्हणून किंवा दंड आकारून त्यांची सुटका करणे किंवा ठार करणे आणि हे अरब लोकांकरीता विशेष आहे. कारण त्यांच्यातल्या पुरूषांना गुलाम बनविले जाऊ शकत नाही पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचे हेच आचरण राहीले त्यांनी त्यांच्या कोणत्याही पुरूषाला गुलाम बनविले नाही अशाप्रकारे हजरत उमर यांनी ही त्यांच्या मामल्यात हाच निर्णय सादर केला.'' (किताबुल अमवाल - पृ. १३३)

आणि आता ज्याअर्थी जगात गुलामगिरीची प्रथा नष्ट झाली आहे, जिला नष्ट करणे इस्लामच्या अतिमहत्वपूर्ण उद्दिष्टां पैकी होते तर ही मुभा देखील शिल्लक राहीली नाही फिकहा (धर्मशास्त्र) मध्ये या गोष्टीवर चांगला प्रकाश टाकला गेला आहे.

''कुरआनात एखादा स्पष्ट आदेश असा निवेदिला गेला नाही जो गुलामीला योग्य ठरवित असेल मात्र यात गुलामांना स्वतंत्र करण्याचे आवाहन निश्चित केले गेले आहे. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्याद्वारे ही हे सिद्ध नाही की त्यांनी एखाद्याचा कैदीला गुलाम बनविले असावे आणि ही वस्तुस्थिती आहे की त्यांनी मक्केच्या गुलामांना, बनी मुस्तलकच्या गुलामांना आणि हुनेनच्या गुलामांना स्वतंत्र केले होते आणि हे ही सिद्ध आहे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी अज्ञान काळात त्या गुलामांना जे त्यांच्या जवळ होते सोडून दिले होते. तसेच त्यांची ही सुटका केली होती जे त्यांच्या करीता 'भेट' म्हणून पाठविले गेले होते. परंतु खुल्फाए राशेदीन द्वारे सिद्ध आहे की त्यांनी काही युद्ध कैद्यांना गुलाम बनविले होते जे समानता करण्याच्या नियमा नुसार होते, तेव्हा त्यांनी गुलामीच्या सर्व स्थितींना योग्य ठरविले नाही जसे की धार्मिक व पारंपारीक नियमांमध्ये अमलात येत राहीले. किंबहुना यास युद्धाच्या मर्यादे पावेतो मर्यादित ठेवले होते जे मुसलमानां तर्फे शरअी (धर्मशास्त्राच्या) पद्धति नुसार घोषणे सह काफिर शत्रूंशी लढले गेले असावे. आणि इतर सर्व स्थितींना त्यांनी सोडून दिले आणि त्यांना शरीअत दृष्टया हराम ठरविले की कोणत्याही स्थितीत योग्य नाहीत. (फिकहुस्सुन्नह खंड २ पृ.६८८)

सय्यद कुतुब यांनी ही गुलाम बनविण्यास त्या काळच्या विशेष परिस्थितीलाच कारणीभूत ठरविले आहे आणि हे स्पष्ट केले आहे की हा इस्लामचा एखादा सर्वसामान्य नियम नाही. ते या संदर्भात लिहीतात-

'' जेव्हा नवी स्थिती ही निर्माण झाली की युद्ध लढणाऱ्या सर्व लोकांचे कैद्यांना गुलाम न बनविण्या बाबत एकमत झाले आहे तेव्हा इस्लाम आपल्या अद्वितीय शरीअतविषयक नियमाकडे परत आला आहे आणि तो हा आहे

فَاِمَّا مَنًّا بَعْدُ وَ اِمَّا فِدَاءً

'एकतर उपकार करून सोडून देणे किंवा फिदीया घेऊन, यास्तव गुलाम बनविणे ना आवश्यक आहे आणि ना त्या नियमांपैकी आहे. जे इस्लाम मध्ये कैदी लोकांशी व्यवहार करण्या संबंधी आहे.'' (फी जिलालील कुरआन खंड-६ पृ. ३२८५)

स्पष्ट असावे की आयतीत युद्धाच्या स्थितीत काफिरांना कैद करण्याचा व नंतर उपकार भावनेने किंवा फिदीया घेऊन सोडून देण्याचा जो आदेश दिला गेला आहे तो सर्व प्रकारच्या काफिरां करीता आहे मग ते अनेकेश्वरवादी असोत किंवा कुरआन व्यतिरिक्त इतर ईश-ग्रंथ बाळगणारे. परंतु नंतर अरबच्या अनेकेश्वर वाद्यांबाबत, ज्यांच्याकडे पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना अल्लाहने पाठविले होते, हा आदेश दिला गेला आहे-

فَإِذَا انسَلَخَ الْأَشْهُرُ الْحُرُمُ فَاقْتُلُوا الْمُشْرِكِينَ حَيْثُ
وَجَدْتُمُوهُمْ وَخُذُوهُمْ وَاحْصُرُوهُمْ وَاقْعُدُوا لَهُمْ كُلَّ
مَرْصَدٍ فَإِن تَابُوا وَأَقَامُوا الصَّلَوٰةَ وَآتَوُا الزَّكَوٰةَ فَخَلُّوا
سَبِيلَهُمْ - (التوبہ:٥)

''मग जेव्हा प्रतिष्ठीत महीने निघून जातील तेव्हा या अनेकेश्वर वाद्यांना ते जिथे आढळतील तिथे ठार करा त्यांना पकडा व वेढा द्या आणि त्यांच्या पाळतीवर टपून बसा. मात्र जर ते क्षमा याचना करतील व नमाज कायम करतील व जकात देतील तर त्यांना सोडून द्या.''

(अत्तौबा-५)

(स्पष्टीकरणासाठी पहा सूरह तौबा टीप क्र. ९)

हा आदेश अरबच्या अनेकेश्वर वाद्यांकरीता विशेषत्वाने होता म्हणून काही कारण नव्हे की सूरह मुहम्मदच्या या आयतीस, ज्यात सर्व सामान्य नियम निवेदिला गेला आहे रद्द समजला जावा. ज्या भाष्याकारांनी यास रद्द केले आहे त्यांच्याशी सहमत होणे शक्य नाही.

८. म्हणजे त्यांना बंदिस्त करण्याचा क्रम जारी ठेवा, जो पर्यंत युद्ध संपत नाही.

९. म्हणजे अल्लाहने इच्छिले असते तर काफिरांना एखादे भयंकर संकट कोसळवून नष्ट करू शकत होता परंतु त्याचा हेतु हा होता की ईमान बाळगणाऱ्यांच्या हस्ते काफिरांचे शिरकाण केले जावे, यासाठी की ईमान धारक या कसोटीत पडून उच्च दर्जा प्रत पोहचू शकावेत आणि काफिरांना एकतर तौबाची संधी मिळावी किंवा त्यांनी आपल्या दुष्परिणतीस याची देही याची डोळा पहावे.

१०. म्हणजे जे लोक अल्लाहच्या मार्गात मारले गेले त्यांची मेहनत वाया जाणार नाही. ते हरवून बसणार नाहीत तर प्राप्त करतील. त्यांची कर्मे अल्लाह जवळ स्विकृत ठरतील व त्यांना त्यांचा यथायोग्य मोबदला मिळेल.

५. तो त्यांना मार्ग लाभवून देईल व त्यांची अवस्था ठीक करील.[११]

سَيَهْدِيهِمْ وَيُصْلِحُ بَالَهُمْ ﴿٥﴾

६. आणि त्यांना जन्नत मध्ये दाखल करील, जिची ओळख त्यांना करून दिली गेली आहे.[१२]

وَيُدْخِلُهُمُ الْجَنَّةَ عَرَّفَهَا لَهُمْ ﴿٦﴾

७. हे ईमान बाळगणाऱ्या लोकांनो ! जर तुम्ही अल्लाहची मदत कराल [१३] तर तो तुमची मदत करील आणि तुमचे पाय स्थीर करील.[१४]

يَا أَيُّهَا الَّذِينَ آمَنُوا إِنْ تَنْصُرُوا اللَّهَ يَنْصُرْكُمْ وَيُثَبِّتْ
أَقْدَامَكُمْ ﴿٧﴾

८. ज्या लोकांनी कुफ्र केले त्यांच्या करीता विनाश आहे आणि त्याने (अल्लाहने) त्यांची कर्मे निष्फळ केलीत.[१५]

وَالَّذِينَ كَفَرُوا فَتَعْسًا لَهُمْ وَأَضَلَّ أَعْمَالَهُمْ ﴿٨﴾

९. हे अशासाठी की त्यांनी त्या (मार्गदर्शना)स नापसंत केले जे अल्लाहने अवतरीत केले आहे, यास्तव त्याने यांची कर्मे वाया घालवली.[१६]

ذَٰلِكَ بِأَنَّهُمْ كَرِهُوا مَا أَنْزَلَ اللَّهُ فَأَحْبَطَ أَعْمَالَهُمْ ﴿٩﴾

१०. काय हे लोक जमीनीवर हिंडले फिरले नाहीत की यांनी बघितले असते काय परिणति झाली त्या लोकांची जे यांच्या पूर्वी होऊन गेलेत. अल्लाहने त्यांना नष्ट करून टाकले आणि काफिरां करीता अशाच शिक्षा होत.[१७]

أَفَلَمْ يَسِيرُوا فِي الْأَرْضِ فَيَنْظُرُوا كَيْفَ كَانَ عَاقِبَةُ الَّذِينَ
مِنْ قَبْلِهِمْ دَمَّرَ اللَّهُ عَلَيْهِمْ وَلِلْكَافِرِينَ أَمْثَالُهَا ﴿١٠﴾

११. हे अशासाठी की अल्लाह ईमान बाळगणाऱ्यांचा कार्य साधक आहे आणि काफिरांचा कार्य साधक कोणी नाही.[१८]

ذَٰلِكَ بِأَنَّ اللَّهَ مَوْلَى الَّذِينَ آمَنُوا وَأَنَّ الْكَافِرِينَ
لَا مَوْلَىٰ لَهُمْ ﴿١١﴾

१२. नि:संशय अल्लाह त्या लोकांना ज्यांनी ईमान बाळगले व सत्कर्मे केलीत जन्नती मध्ये दाखल करील ज्यांच्या खाली प्रवाह वाहत असतील आणि ज्या लोकांनी कुफ्र केले ते (ऐहिक) सुखोपभोग घेत आहेत आणि अशा प्रकारे खात आहेत ज्या प्रकारे जनावरे खातात [१९]त्यांचे ठिकाण जहन्नम आहे.

إِنَّ اللَّهَ يُدْخِلُ الَّذِينَ آمَنُوا وَعَمِلُوا الصَّالِحَاتِ جَنَّاتٍ تَجْرِي
مِنْ تَحْتِهَا الْأَنْهَارُ وَالَّذِينَ كَفَرُوا يَتَمَتَّعُونَ وَيَأْكُلُونَ
كَمَا تَأْكُلُ الْأَنْعَامُ وَالنَّارُ مَثْوًى لَهُمْ ﴿١٢﴾

११. म्हणजे जेव्हा त्यांनी अल्लाहच्या मार्गात जीव दिला तर ते वृथा मेले नाहीत, किंबहुना अमर झालेत. अल्लाह त्यांना यशाच्या मजली पावेतो पोहचवील आणि त्यांना मान-प्रतिष्ठा प्रदान करील.

१२. म्हणजे कुरआनाने जन्नतचा ज्या प्रकारे परिचय करविला आहे त्याच वैशिष्टयांनी युक्त असलेल्या जन्नत मध्ये अल्लाह त्यांना दाखल करील. कुरआनाने जन्नतची जी रूपरेषा सांगितली आहे ती काल्पनिक नव्हे आणि ना त्यात कसल्या अतिशयोक्तिचे मिश्रण आहे, किंबहुना ती एक नितांत वास्तविकता आहे म्हणून ज्या लोकांशी हिचा वायदा केला गेला आहे त्यांना ती एक सत्य घटना म्हणून आढळून येईल. अगदी त्याच प्रकारे आढळून येईल ज्या प्रकारे जगात त्यांना तिची ओळख करून देण्यात आली होती.

१३. अल्लाहची मदत करण्याशी अभिप्रेत अल्लाहच्या धर्माची मदत करणे आणि त्याच्या कलीमा (वचना)स बुलंद करण्या करीता प्राण पणाला लावणे होय. हे अल्लाह तर्फे कदर वाढविणे होय की त्याने या सेवेला त्याची मदत करण्याच्या अर्थाने घेतले आहे अन्यथा उघड आहे, अल्लाह कोणाच्या ही मदतीचा गरजवंत नाही उलट सर्व माणसे त्याच्या मदतीचे गरजवंत आहेत.

१४. म्हणजे धर्माच्या मदती करीता जे पाऊल ही तुम्ही उचलाल अल्लाहची मदत तुमच्या पाठीशी राहील. तो तुमचे धैर्य वाढविल आणि तुम्हाला अटळ राहण्याची सुबुद्धि प्रदान करील.

१५. म्हणजे यांचा प्रयत्न सफल ठरला नाही व त्यांचे केले सवरले सर्व वाया गेले.

१६. म्हणजे यांनी जरी काही चांगली कामे केली होती तरी कुफ्र मुळे ती निष्फळ झाली. सत्कर्माची स्विकृती साठी ईमान अट आहे.

१७. म्हणजे या काफिरांनाही जर ते कुफ्र पासून परावृत्त झाले नाहीत, अशाच एखाद्या ईश शिक्षेला तोंड द्यावे लागेल, जी भूतकाळात काफिर जन-समूहांवर अवतरली होती.

१८. उहद युद्धात, जे या सूरहच्या अवतरीत होण्याच्या सुमारे दोन वर्षानंतर झाले, काफिरांनी जेव्हा आपली मूर्ति उज्जाचा जय जयकार केला की, لَنا العزىٰ ولا عزىٰ لكم "आमच्या करीता उज्जा आहे आणि तुम्च्या करीता कोणी उज्जा नाही" तेव्हा पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) उत्तरा दाखल म्हणाले, اللّٰهُ مَولانا ولا مَولىٰ لَكُم

"अल्लाह आमच्या मित्र आहे आणि तुमचा कोणी मित्र नाही." (तफसीर इब्ने कसीर खंड ४)

१९. म्हणजे केवळ आर्थिक जनावरे बनून राहीली आहेत की खावे प्यावे आणि एक दिवस मरून जावे. त्यांना या गोष्टीची किंचितही जाणीव नाही की जीवनाचे एक उच्च उद्दिष्ट आहे आणि खाणे पिणे तर केवळ जीवन-शक्ति प्राप्त करण्या करीता आहे.

१३. आणि कित्येक वस्त्या आहेत ज्या सामर्थ्यात तुमच्या या वस्तीहून बलवत्तर होत्या, जिने तुम्हाला (हे पैगंबर !) बाहेर घालविले आहे.[२०] आम्ही त्यांना नष्ट केले तर कोणी ही त्यांना वाचविणारा नव्हता.

وَكَاَيِّنْ مِّنْ قَرْيَةٍ هِيَ اَشَدُّ قُوَّةً مِّنْ قَرْيَتِكَ الَّتِيْٓ اَخْرَجَتْكَ ۚ
اَهْلَكْنٰهُمْ فَلَا نَاصِرَ لَهُمْ ﴿۱۳﴾

१४. काय ते लोक जे आपल्या पालन कर्त्या तर्फे स्पष्ट प्रमाणावर (निश्चल) आहेत [२१] त्या लोकां सारखे होतील ज्यांचे दुष्कर्म त्यांच्या नजरेत शोभिवंत बनविले गेले आहे आणि ते आपल्या इच्छा-आकांक्षा मागे चालत जात आहेत ?

اَفَمَنْ كَانَ عَلٰى بَيِّنَةٍ مِّنْ رَّبِّهٖ كَمَنْ زُيِّنَ لَهٗ سُوْٓءُ عَمَلِهٖ
وَ اتَّبَعُوْٓا اَهْوَآءَهُمْ ﴿۱۴﴾

१५. त्या जन्नतचे वैशिष्टय जिचा अल्लाहचे भय बाळगणाऱ्या लोकांशी वायदा केला गेला आहे, असे आहे की ज्यात अशा पाण्याचे प्रवाह वाहत असतील ज्यात कसला ही गंध नसेल [२२] आणि प्रवाह दुधाचे ज्याची चव बदलणार नाही [२३] आणि प्रवाह अशा मद्याचे जे पिणाऱ्यां करीता अतिशय स्वादीष्ट असेल [२४] आणि प्रवाह स्वच्छ निर्मळ मधाचे.[२५] तिथे त्यांच्याकरीता प्रत्येक प्रकारची फळे असतील [२६] आणि त्यांच्या पालन कर्त्या तर्फे माफी.[२७] काय असे लोक त्या लोकांसारखे असतील जे नेहमी जहन्नम मध्ये राहणारे आहेत व ज्यांना असे गरम पाणी पाजले जाईल जे त्यांच्या आतडींना कापून टाकील [२८]

مَثَلُ الْجَنَّةِ الَّتِيْ وُعِدَ الْمُتَّقُوْنَ ۭ فِيْهَآ اَنْهٰرٌ مِّنْ مَّآءٍ غَيْرِ
اٰسِنٍ ۚ وَاَنْهٰرٌ مِّنْ لَّبَنٍ لَّمْ يَتَغَيَّرْ طَعْمُهٗ ۚ وَاَنْهٰرٌ مِّنْ خَمْرٍ لَّذَّةٍ
لِّلشّٰرِبِيْنَ ڬ وَاَنْهٰرٌ مِّنْ عَسَلٍ مُّصَفًّى ۭ وَلَهُمْ فِيْهَا مِنْ كُلِّ
الثَّمَرٰتِ وَمَغْفِرَةٌ مِّنْ رَّبِّهِمْ ۭ كَمَنْ هُوَ خَالِدٌ فِي النَّارِ وَسُقُوْا
مَآءً حَمِيْمًا فَقَطَّعَ اَمْعَآءَهُمْ ﴿۱۵﴾

१६. यांच्यात काही लोक असे आहेत जे तुमच्या कडे कान लावतात परंतु जेव्हा तुमच्या जवळून निघतात तेव्हा त्या लोकांना, ज्यांना ज्ञान प्रदान केले गेले आहे, विचारतात की (पैगंबराने) आता एवढयात काय फर्माविले ?[२९] हे ते लोक होत ज्यांच्या हृदयांवर अल्लाहने मोहर लावली आहे. [३०] आणि हे आपल्या इच्छा आकांक्षा मागे चालले आहेत. [३१]

وَمِنْهُمْ مَّنْ يَّسْتَمِعُ اِلَيْكَ ۚ حَتّٰٓى اِذَا خَرَجُوْا مِنْ عِنْدِكَ قَالُوْا
لِلَّذِيْنَ اُوْتُوا الْعِلْمَ مَاذَا قَالَ اٰنِفًا ۣ اُولٰٓئِكَ الَّذِيْنَ طَبَعَ
اللّٰهُ عَلٰى قُلُوْبِهِمْ وَ اتَّبَعُوْٓا اَهْوَآءَهُمْ ﴿۱۶﴾

२०. म्हणजे मक्काच्या रहिवाश्यांनी तुम्हाला मक्का सोडून जाण्यास विवश केले. हा मजकूर हे दर्शवित आहे की ही सूरह पैगंबरांच्या स्थलांतरानंतर अवतरली.

२१. म्हणजे ज्यांनी आपली भूमिका ज्ञान व अंतर्दृष्टीच्या उजेडात निश्चित केली आहे आणि ज्ञान व अंतर्दृष्टीचा उजेड त्यांना आपल्या स्वभावाद्वारे ही प्राप्त झाला आहे आणि अल्लाहने अवतरीत केलेल्या ग्रंथाद्वारे ही.

२२. जमीनीवरील पाण्यात माती, वनस्पति इत्यादींच्या संपर्कामुळे कडू पणा ही निर्माण होतो व वास देखील, परंतु जन्नत मध्ये अशा पाण्याचे प्रवाह वाहत असतील ज्यात कधी ही कोणत्याही प्रकारचा दोष निर्माण होणार नाही.

२३. जगात दूध जनावरांच्या स्तनातून निघते आणि काही वेळेनंतर खराब होऊ लागते परंतु जन्नत मध्ये तर दुधाचे पाट वाहात असतील आणि ते ही अशा दुधाचे ज्यात कधीही खराबी निर्माण होणार नाही, त्याची चव नेहमी चांगलीच राहील.

२४. जगातल्या मद्यात सडण्याचा वास ही असतो आणि कडवटपणा परंतु जन्नतचे मद्य इतके चांगले व उत्तम असेल की पिणाऱ्यांना उत्तम स्वाद लाभेल व एक आगळा कैफ आणि याचे प्रमाण ही थोडे फार नसेल कारण त्याचे ही प्रवाह वाहत असतील.

२५. जगात मध, मधमाशांपासून प्राप्त केले जाते ज्यात मेण वगैरेचे मिश्रण असते. परंतु जन्नतमध्ये अशा प्रकारचे मध लाभेल जे प्रत्येक प्रकारच्या मिश्रणा पासून मुक्त व अगदी स्वच्छ व निर्मळ असेल. तसेच त्याचे प्रमाण ही कमी नसेल कारण त्याचे ही प्रवाह वाहत असतील. ज्या सामर्थ्याने या वस्तूंना निर्माण केले आहे. त्याच्या करीता यांचे प्रवाह जारी करणे काहीच कठीण नाही आणि ना त्याला हे कठीण आहे की यांना स्वच्छ शुद्ध, मिश्रण विरहीत, उत्कृष्ट स्वादाचे बनवावे. बुद्धि या गोष्टीचे समर्थन करते. स्वभाव याची मागणी करतो आणि मन यां शुभवार्तेने अत्याधिक प्रसन्न होते.

२६. म्हणजे जिथे पिण्या करीता उत्तम व स्वादीष्ट वस्तू मिळतील तिथे खाण्या करीता ही प्रत्येक प्रकारची उत्कृष्ट फळे असतील.

२७. म्हणजे अल्लाहतर्फे माफ केले जाणे ही त्याची सर्वात मोठी कृपा असेल. उघड आहे अजाब पासून मुक्ति मिळवणे त्याच्या समस्त देणग्यांच्या प्राप्तीहून श्रेष्ठतम आहे.

२८. म्हणजे ईश-भय अंगिकारणाऱ्या लोकांना खाण्या पिण्याच्या उत्कृष्ट देणग्या लाभतील परंतु काफिरांना मात्र प्याला उकळते पाणी मिळेल ज्यामुळे त्यांची आतडी कापली जाईल. दोघांचीही परिणति वेगवेगळी आहे. ईश-भय बाळगून जीवन व्यतीत करणारे व त्याच्याशी बेपर्वा होऊन इहलोकालाच सर्व काही समजणारे ना आपल्या चारित्र्य व गुणवैशिष्टयांच्या दृष्टीने समान आहेत आणि ना आपल्या परिणतीच्या दृष्टीने.

२९. ही अवस्था मदीनेच्या मुसलमानांची सांगितली गेली आहे जे पैगंबर (सल्लल्लाह अलैहि वसल्लम) यांच्या बैठकीत भाग घेत असले तरी पैगंबरांच्या बोलण्यात त्यांना कसली ही गोडी नव्हती. त्यांनी काहीही विचार न करता कसल्या न कसल्या हेतुपायी इस्लाम धर्म कबूल केला होता म्हणून ना ते आपल्या ईमान बाबत प्रामाणिक होते आणि ना त्यांना मुसलमानांशी खरी सहानुभूति होती. त्यांच्या मनात कुफ्र होते. आणि ते काफिरांशी संगनमत करून होते. अशा लोकांना मुनाफिक म्हटले जाते. ते जेव्हा पैगंबरांच्या बैठकीतून निघत तेव्हा ज्ञानी लोकांना विचारीत की काय सांगितले गेले आहे. त्यांचा हा प्रश्न पैगंबरांचे कथन समजून घेण्याकरीता नव्हे तर आश्चर्य व्यक्त करण्या करीता असे की आपण काय फर्मावित आहात आमच्या आकलना बाहेर आहे.

आयतीत 'ज्ञाना'शी अभिप्रेत कुरआन व पैगंबरांच्या कथनाचे ज्ञान होय आणि ज्याला हे ज्ञान प्राप्त झाले त्याला फार मोठी सम्पति लाभली.

३०. म्हणजे ते अल्लाहच्या त्या नियमाच्या तावडीत आले जो त्याने मार्गभ्रष्टते बाबत हट्ट करणाऱ्यांकरीता निश्चित केला आहे. आता यांच्यात सत्य-स्विकृतिची पात्रता बाकी राहीली नाही.

३१. सर्वश्रेष्ठ अल्लाह हृदयावर मोहर अशा स्थितीत लावतो जेव्हा मनुष्य बुद्धि व आकलनाचा वापर करण्यास व ज्ञानाच्या प्रकाशात चालण्यास तयार होत नाही आणि आपल्या इच्छा आकांक्षांमागे धावू लागतो.

वَالَّذِيْنَ اهْتَدَوْا زَادَهُمْ هُدًى وَّاٰتٰىهُمْ تَقْوٰىهُمْ ﴿١٧﴾

१७. आणि ज्या लोकांनी मार्गदर्शनाचा मार्ग अंगिकारला अल्लाहने त्यांच्या मार्गदर्शनात वाढ केली [३२] आणि त्यांना त्यांच्या हिश्श्याचा तकवा (ईश-भय) प्रदान केले.[३३]

فَهَلْ يَنْظُرُوْنَ اِلَّا السَّاعَةَ اَنْ تَاْتِيَهُمْ بَغْتَةً ۚ فَقَدْ جَآءَ اَشْرَاطُهَا ۚ فَاَنّٰى لَهُمْ اِذَا جَآءَتْهُمْ ذِكْرٰىهُمْ ﴿١٨﴾

१८. आता काय हे लोक कियामतीची वाट बघत आहेत की यांच्या वर ती अकस्मात यावी ? तिची लक्षणे तर जाहीर झाली आहेत [३४] जेव्हा ती येईल तेव्हा त्यांच्या करीता बोध प्राप्त करण्याची संधी कोठे बाकी राहील.

فَاعْلَمْ اَنَّهٗ لَآ اِلٰهَ اِلَّا اللّٰهُ وَاسْتَغْفِرْ لِذَنْۢبِكَ وَلِلْمُؤْمِنِيْنَ وَ الْمُؤْمِنٰتِ ۭ وَاللّٰهُ يَعْلَمُ مُتَقَلَّبَكُمْ وَمَثْوٰىكُمْ ﴿١٩﴾

१९. तेव्हा जाणून घ्या [३५] की अल्लाह खेरीज कोणी ही उपास्य नाही आणि आपल्या अपराधां करीता माफी मागा [३६] आणि ईमान बाळगणाऱ्या पुरूष व स्त्रीयां करीता ही. अल्लाह तुमच्या चालण्या फिरण्यास जाणतो आणि तुमच्या ठिकाणालाही.[३७]

وَيَقُوْلُ الَّذِيْنَ اٰمَنُوْا لَوْلَا نُزِّلَتْ سُوْرَةٌ ۚ فَاِذَآ اُنْزِلَتْ سُوْرَةٌ مُّحْكَمَةٌ وَّذُكِرَ فِيْهَا الْقِتَالُ ۙ رَاَيْتَ الَّذِيْنَ فِيْ قُلُوْبِهِمْ مَّرَضٌ يَّنْظُرُوْنَ اِلَيْكَ نَظَرَ الْمَغْشِيِّ عَلَيْهِ مِنَ الْمَوْتِ ۭ فَاَوْلٰى لَهُمْ ﴿٢٠﴾

२०. ईमान बाळगणारे म्हणत होते की एक सूरह (ज्यात जेहादचा आदेश दिला गेला असेल) का अवतरीत केली जात नाही? परंतु जेव्हा एक अंतिम आदेशाची सूरह अवतरीत केली गेली ज्यात किताल (युद्धा) चा उल्लेख आहे तेव्हा तुम्ही पाहीले की ज्यांच्या मनात विकृति आहे ते तुमच्या कडे अशा प्रकारे पाहत आहेत जणू एखाद्यावर मृत्युची मुर्छा चढली असावी [३८] तर खेद आहे यांच्या बद्दल.

طَاعَةٌ وَّقَوْلٌ مَّعْرُوْفٌ ۣ فَاِذَا عَزَمَ الْاَمْرُ ۣ فَلَوْ صَدَقُوا اللّٰهَ لَكَانَ خَيْرًا لَّهُمْ ﴿٢١﴾

२१. (यांच्या करीता योग्य आचरण) आज्ञा पालन करणे व चांगली गोष्ट बोलणे होते आणि जेव्हा अंतिम आदेश दिला गेला तेव्हा जर त्यांनी अल्लाहला सत्य निष्ठेचा पुरावा दिला असता तर त्यांच्याच हक्कात अधिक चांगले झाले असते.[३९]

فَهَلْ عَسَيْتُمْ اِنْ تَوَلَّيْتُمْ اَنْ تُفْسِدُوْا فِي الْاَرْضِ وَتُقَطِّعُوْٓا اَرْحَامَكُمْ ﴿٢٢﴾

२२. आणि जर तुम्ही तोंड फिरवित असाल तर या खेरीज तुमच्याकडून न कोणती अपेक्षा केली जाऊ शकते की जमीनीवर उत्पात निर्माण कराल व आप्त संबंधांना तोडून टाकाल.[४०]

३२. म्हणजे ज्या लोकांनी इच्छा आकांक्षाचे अनुसरण न करता अल्लाहच्या मार्गदर्शनास कबूल केले अल्लाह त्यांचे प्रत्येक पावलावर मार्गदर्शन करीत राहीला आणि त्यांच्या अंतर्दृष्टीत वाढ होत राहीली.

३३. म्हणजे त्यांना त्यांची मागणी व त्यांच्या प्रयत्ना नुसार तकवा (ईश-भया) ची सबुद्धि लाभली.

३४. कियामतीची जी लक्षणे जाहीर झालेली आहेत त्यात सर्वात मोठे लक्षण म्हणजे पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचे अंतिम पैगंबर या नात्याने येणे हदीस वचनात उल्लेख असा की-

قَالَ بِاُصْبعَيْهِ هٰكذا بِالْوُسطٰى وَالَّتِىْ تَلِيْهَا: بُعِثْتُ اَنَا وَالسَّاعَةُ كَهَاتَيْنِ۔ (تفسیر ابن کثیر ج ۴ ص ۷۷ بروایۃ البخاری)

“ पैगंबरांनी आपली दोन बोटे, दरम्यानचे बोट व त्याच्या सोबतचे बोटाने इशारा करीत फर्माविले की मी आणि कियामत अशा प्रकारे सोबत पाठविले गेले आहेत.” (बुखारी)

म्हणजे माझ्या नंतर आता कियामतच येईल, आनखी कोणी पैगंबर येणार नाही. तात्पर्य त्यांच्याद्वारे जगात राहणाऱ्यांना शेवटची ताकीद केली गेली आहे. दुसरे मोठे लक्षण कुरआनाचे अवतरण होय. अल्लाहतर्फे माणसाच्या मार्गदर्शनासाठी एक परिपूर्ण ग्रंथ अवतरल्या नंतर, ज्याच्या रक्षणाची जबाबदारीही अल्लाहने स्वत: घेतली आहे, लोकांवर अल्लाहचे प्रमाण यथायोग्य रित्या कायम होते. यानंतर जर एखादी गोष्ट बाकी राहाते तर ती निर्णयाची वेळ होय, जिचे नाव कियामत आहे.

तिसरे मोठे लक्षण मानव समाजाचा सार्वत्रिक बिघाड होय जो दिवसे दिवस वाढतच चालला आहे आणि त्या ऐतिहासिक घटनांपासून लोकांनी कोणताही धडा घेतला नाही, ज्या दुराचारी जन-समूहांच्या दुष्परिणतीचे चित्र सादर करतात. हा बिघाड जेव्हा आपल्या चरम सीमेला पोहोचेल तेव्हा जगाचा अंत निश्चित आहे. कारण मानव समाज जेव्हा मांगल्य विरहीत होईल तेव्हा फक्त अशुभ अमंगल बाकी राहील आणि अल्लाहचा प्रकोप कियामतीच्या रूपाने भडकणार आहे.

चौथे मोठे लक्षण भूतलावर अत्याचार व अन्यायाचा अतिरेक होणे. अत्याचार पिडीतांचे उसासे गाऱ्हणे मांडतात की अल्लाहचे न्यायालय लवकर स्थापित व्हावे म्हणून न्यायालयाचा दिवस अधिकाधिक जवळ येत चालला आहे.

याखेरीज अशी कितीतरी लक्षणे आहेत, जी कियामतीच्या अगदी जवळच्या काळात जाहीर होतील आणि ज्यांचे भाकित कुरआन व हदीस वचनात केले गेले आहे. उदाहरणार्थ दाब्बतुल अर्जचे जमीनीतून निघणे, याजूज माजूजचे आक्रमण हजरत ईसा यांचे आकाशातून अवतरणे, पश्चिमेकडून सूर्याचा उदय होणे इत्यादि.

३५. म्हणजे चांगल्या प्रकारे ध्यानी मनी घ्या.

३६. हे पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना संबोधून आहे. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना आपल्या चुकींबाबत अल्लाहजवळ माफी मागण्याची जी ताकीद केली गेली आहे तिचे स्पष्टीकरण सूरह मोमीन टीप क्र. ७९ मध्ये केले गेले आहे- हदीस वचनातील उल्लेख असा की पैगंबर दिवसातून शंभर वेळा अल्लाहशी क्षमा याचना करीत.

قَالَ اِنَّهٗ لَيُغَانُ عَلٰى قَلْبِىْ وَاِنِّى لَاَ سْتَغْفِرُ اللّٰهَ فِى الْيَوْمِ مِائَةَ مَرَّةٍ۔ (مسلم کتاب الذکر)

“ पैगंबरानी फर्माविले, माझ्या मनावर गफलत चढते आणि मी दिवसातून शंभर वेळा अल्लाहशी क्षमा याचना करतो (मुस्लिम-किताबुज्जिक्र)

३७. म्हणजे अल्लाहची नजर तुमच्या प्रयत्नांवर ही आहे आणि तो तुमच्या ध्येयास ही जाणतो यास्तव त्याचे भय बाळगून राहा.

३८. म्हणजे जेहादचा आदेश ऐकून अप्रामाणिक मुसलमानांना मरणाची मुर्छा चढली. अल्लाहच्या मार्गात प्राण पणाला तोच मनुष्य लावू शकतो जो आपल्या ईमाना बाबत प्रामाणिक असावा. ज्याला आपला जीव प्रिय असेल तो का म्हणून प्राण पणाला लावील?

३९. म्हणजे जेव्हा युद्ध (जेहाद) चा शेवटचा आदेश दिला गेला तेव्हा त्या लोकांना हे आवश्यक होते की याला मन:पूर्वक मानले असते आणि याच्या करीता आचरण बद्ध झाले असते. जर त्यांनी असे केले असते तर हे त्यांच्याच हक्कात चांगले झाले असते.

४०. म्हणजे तुमच्याकडून अल्लाह व त्याच्या प्रेषिताच्या आज्ञापालनाची अपेक्षा केली जात आहे जी तुम्हाला अप्रिय वाटते, वस्तुत: मांगल्य व सुधारणेचे कार्य या आज्ञापालना द्वारे पार पडू शकते. अवज्ञाच्या स्थितीत मनुष्य वाईट कामे चांगली समजून करू लागतो स्वार्थीपणा मुळे नातेवाईकांशी वाईट व्यवहार करू लागतो आणि मानवी बंधुत्वाच्या नात्याला तोडून टाकतो.

अल्लाह व त्याच्या पैगंबराच्या आज्ञापालनाकडे पाठ फिरविण्याचा ही परिणाम आहे की आज जगात सर्वत्र उत्पात पसरला आहे. सख्खा भाऊ आपल्या भावाचा गाळा कापत आहे आणि मानवी बंधुत्वाचे नाते तोडले जात आहे. अराजकता व लढायांनी माणसाची सुख शांती हिरावून घेतली आहे. तात्पर्य परिस्थिती, कुरआनाची प्रत्येक गोष्ट सत्य असल्याचे सिद्ध करीत आहे. परंतु मनुष्य शुद्धीवर यायलाच तयार नाही.

أُولَٰئِكَ الَّذِينَ لَعَنَهُمُ اللَّهُ فَأَصَمَّهُمْ وَأَعْمَىٰ أَبْصَارَهُمْ ﴿٢٣﴾

२३. हेच लोक होत ज्यांचा अल्लाहने धिक्कार केला आणि त्यांना बहीरे व त्यांच्या डोळयांना आंधळे केले. [४१]

أَفَلَا يَتَدَبَّرُونَ الْقُرْآنَ أَمْ عَلَىٰ قُلُوبٍ أَقْفَالُهَا ﴿٢٤﴾

२४. काय हे लोक कुरआनावर विचार चिंतन करीत नाही की यांच्या ह्रदयांवर कुलुपे पडली आहेत.[४२]

إِنَّ الَّذِينَ ارْتَدُّوا عَلَىٰ أَدْبَارِهِمْ مِنْ بَعْدِ مَا تَبَيَّنَ لَهُمُ الْهُدَى ۙ
الشَّيْطَانُ سَوَّلَ لَهُمْ وَأَمْلَىٰ لَهُمْ ﴿٢٥﴾

२५. जे लोक मार्गदर्शन स्पष्ट झाल्यानंतर परावृत्त झाले, सैतानाने त्यांना कानमंत्र दिला व त्यांच्यासाठी आशा अपेक्षांचा क्रम वाढवून दिला.[४३]

ذَٰلِكَ بِأَنَّهُمْ قَالُوا لِلَّذِينَ كَرِهُوا مَا نَزَّلَ اللَّهُ سَنُطِيعُكُمْ فِي بَعْضِ
الْأَمْرِ ۖ وَاللَّهُ يَعْلَمُ إِسْرَارَهُمْ ﴿٢٦﴾

२६. हे अशासाठी झाले की त्यांनी अल्लाहने अवतरीत केलेल्या मार्गदर्शनास पसंत करणाऱ्यांना म्हटले की काही बाबतीत आम्ही तुमचे म्हणणे मान्य करू.[४४] अल्लाह त्यांच्या रहस्य भेदांना जाणतो.

فَكَيْفَ إِذَا تَوَفَّتْهُمُ الْمَلَائِكَةُ يَضْرِبُونَ وُجُوهَهُمْ وَأَدْبَارَهُمْ ﴿٢٧﴾

२७. तेव्हा त्यावेळी त्यांची काय अवस्था होईल जेव्हा फरिश्ते त्यांच्या चेहऱ्यांवर व त्यांच्या पार्श्वभागांवर मारीत त्यांचे जीव ताब्यात घेतील.[४५]

ذَٰلِكَ بِأَنَّهُمُ اتَّبَعُوا مَا أَسْخَطَ اللَّهَ وَكَرِهُوا رِضْوَانَهُ فَأَحْبَطَ
أَعْمَالَهُمْ ﴿٢٨﴾

२८. हे अशासाठी की त्यांनी त्या पद्धतिचे अनुसरण केले जी अल्लाहला क्रोधित करणारी होती आणि त्याच्या प्रसन्नतेला नापसंत केले. यास्तव त्याने त्यांची कर्मे निष्फळ केली.[४६]

أَمْ حَسِبَ الَّذِينَ فِي قُلُوبِهِمْ مَرَضٌ أَنْ لَنْ يُخْرِجَ
اللَّهُ أَضْغَانَهُمْ ﴿٢٩﴾

२९. काय त्या लोकांनी, ज्यांच्या मनात विकृति आहे [४७] असे गृहीत धरले आहे की अल्लाह त्यांचे कपट जाहीर नाही करणार?[४८]

وَلَوْ نَشَاءُ لَأَرَيْنَاكَهُمْ فَلَعَرَفْتَهُمْ بِسِيمَاهُمْ ۚ وَلَتَعْرِفَنَّهُمْ فِي لَحْنِ
الْقَوْلِ ۚ وَاللَّهُ يَعْلَمُ أَعْمَالَكُمْ ﴿٣٠﴾

३०. (हे पैगंबर !) जर आम्ही इच्छिले असते तर तुम्हाला त्यांना दाखविले असते आणि तुम्ही त्यांच्या लक्षणांद्वारे त्यांना ओळखले असते. आणि त्यांच्या संभाषण शैली वरून तर तुम्ही त्यांना निश्चितच ओळखाल.[४९] अल्लाह तुम्हा लोकांचे आचरण जाणतो.

४१. जेव्हा अल्लाहतर्फे निर्भत्सना होते तेव्हा सत्य ऐकून घेण्यास मनुष्य बधीर बनतो व सत्य पाहण्यास आंधळा.

४२. म्हणजे जर या लोकांनी कुरआनावर विचार चिंतन केले असते तर यांना मार्गदर्शन लाभले असते परंतु कुरआनाकडे यांनी लक्ष दिले नाही आणि आपल्या दुर्वर्तनावर कायम राहीले, याबाबत त्यांच्या आग्रहाचा परिणाम हा निघाला की यांच्या हृदयाची द्वारे सत्य- स्विकृतिसाठी बंद झालीत.

ही आयत देखील इतर आयतींप्रमाणे काफिर आणि दांभिक मुसलमानांना कुरआनावर विचार चिंतन करण्याचे आवाहन करते ज्याचा अर्थ असा आहे की कुरआन प्रत्येक माणसाने समजून घेण्या करीता आहे. आता जे लोक कुरआनाची भाषा अरबी जाणत नाहीत ते एखाद्या अशा भाषांतराद्वारे, जे निकोप असल्याबद्दल मनाला समाधान असावे, लाभ घेऊ शकतात परंतु मुसलमानांमध्ये एक समूह असाही आढळून येतो, ज्याच्या दृष्टीने कुरआन केवळ विद्वानांनी समजून घेण्याकरीता आहे. तो सर्वसामान्य मुसलमानांना कुरआन अर्थासह वाचण्यास प्रोत्सहान देत नाही, एवढेच नव्हे तर त्यांना भाषांतरासह कुरआन वाचण्यास रोखतो आणि असे म्हणतो की अनुवाद वाचून ते मार्गभ्रष्ट होण्याची भिती आहे. वास्तविक असे कितीतरी मुसलमान आहेत ज्यांनी कुरआनास भाषांतरासह वाचले तेव्हा त्यांचे डोळे उघडले आणि त्यांनी यापासून यथेच्छ लाभ घेतला. आणि कितीतरी मुस्लिमेतरांना कुरआनाचा अनुवाद वाचून ईमान-धन लाभले. वस्तुस्थिती अशी आहे की जो मनुष्य देखील कुरआनाचा विशुद्ध बुद्धिने अभ्यास करील तो त्यापासून मार्गदर्शन प्राप्त करील आणि जेवढा जास्त अभ्यास करील, त्याच्या अंतर्दृष्टीत तेवढीच वाढ होईल मात्र ज्या माणसाच्या मनाची कवाडे सत्य स्विकृति करीताच बंद झालेले आहेत तो एवढया मोठया मांगल्यापासून वंचित राहील.

४३. म्हणजे जे लोक मुसलमान झाल्यानंतर काफिर झाले अभिप्रेत दांभिक मुसलमान, ज्यांनी इस्लाम कबूल केला, नंतर त्यापासून परावृत्त झाले. मार्गदर्शनाचा मार्ग खुला झाल्यानंतर कुफ्रच्या मार्गावर अशासाठी चालले की सैतानाने त्यांना भ्रमाचा भोपळा दाखविला व ते त्याच्या बहकविण्यास बळी पडले, त्याने यांना आशा आकांक्षा बांधवल्या की आपल्या वाडवडीलांच्या धर्माकडे परतून तुम्ही अमुक इतके लाभ प्राप्त करू शकतात.

४४. म्हणजे काफिरांशी त्यांनी संगनमत केले आणि म्हटले की जर तुमच्या व मुसलमानांच्या दरम्यान युद्ध झाले तर आम्ही तुम्हाला साथ देऊ. या गोष्टी त्यांनी मोठया गुप्तरितीने त्या काफिरांना सांगितल्या होत्या.

४५. म्हणजे आता तर आपल्या जीवनाला जेहादच्या धोक्यापासून वाचविण्या करीता काफिरांशी संगनमत करीत आहेत. परंतु त्यांना एक दिवस मरण यावयाचे आहे. तर जेव्हा त्यांचा मृत्यु कुफ्रच्या अवस्थेत होईल आणि फरिश्ते मारहाण करीत त्यांची जीव ताब्यात घेतली तर त्यांची काय दशा होईल जर त्यांना या गोष्टीची जाणीव असती तर ते जेहाद पासून आपला जीव वाचविण्या करीता काफिर बनले नसते.

ही आयत देखील स्पष्ट करते की बर्जख विश्वात काफिरांच्या आत्म्यांना अजाब (ईश शिक्षा) भोगावा लागतो ज्याला हदीस वचनात 'अजाबे क़ब्र' या अर्थाने घेतले गेले आहे. मरण पावलेल्या व्यक्तिच्या शरीरावर या अजाबचा कसलाही प्रभाव दिसून येत नाही. याचा स्पष्ट अर्थ हाच की ही शिक्षा आत्म्यावर होते. चेहरा आणि पाठीशी अभिप्रेत आत्म्याचा चेहरा व पाठ होय ज्यावर फरिश्ते मारतील.(अधिक स्पष्टीकरणा करीता पहा सूरह मोमीन टीप क्र.७१)

४६. म्हणजे दांभिक मुसलमानांची उपासना आणि त्यांचे ते आचरण जे बाहयत: सत्कर्म होते, त्यांच्या कुफ्रमुळे अल्लाह जवळ मान्यता प्राप्त करू शकत नाही. म्हणून सर्व काही मुसळकेरात गेले.

४७. अभिप्रेत दांभिकतेची विकृति होय.

४८. म्हणजे हे दांभिक, इस्लाम व मुसलमानां विरूद्ध जे कपट बाळगतात काय याला तो जाहीर करणार नाही?

४९. अर्थात हे पैगंबर,आम्ही इच्छिले असते तर या दांभिकांची अवस्था व्यक्तिश: दाखवून दिली असती. अशा प्रकारे की यांच्या चेहऱ्यांना पाहून त्यांच्या अंतरीची अवस्था तुमच्यावर प्रकट झाली असती.

स्पष्ट असावे की ही गोष्ट त्या लोकांच्या संदर्भात सांगितली जात आहे जे बाहयत: मुसलमान होते परंतु आपल्या मनात कुफ्र लपवून बसले होते. हेच खरे दांभिक होत आणि काफिरांहून निकृष्टतम होत कारण ते मुस्लिम समाजात राहून जे दुतोंडी वर्तन करतात ते इस्लाम व मुसलमानां करीता खुल्या काफिरांपेक्षा अधिक धोकेदायक असते.

ज्या वेळी ही सूरह अवतरली त्यावेळी दांभिक मुसलमानांचे पितळ उघडे पडू लागले होते परंतु खात्रीपूर्वक एखाद्यावर तो दांभिक असल्याविषयी आदेश दिला जाऊ शकत नव्हता परंतु त्यांचे बोलणे चालणे व संभाषणाच्या शैलीवरून त्यांची ओळख होऊ शकत होती. परंतु नंतरच्या अवस्थांमध्ये त्यांची आचरण पद्धति लक्षात घेता ते दांभिक असण्या बाबत कसल्या ही शंका-संशयाला जागा उरली नाही. यास्तव सूरह तौबा मध्ये त्यांच्याशी जेहाद करण्याचा व त्यांच्यावर सक्ती करण्याचा आदेश पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना दिला गेला.

يَا اَيُّهَا النَّبِیُّ جَاهِدِ الْكُفَّارَوَالْمُنَافِقِيْنَ وَاغْلُظْ عَلَيْهِمْ۔(التوبہ:٧٣)

"हे पैगंबर! काफिरांशी व दांभिक मुसलमानांशी जेहाद (युद्ध) करा आणि त्यांच्याशी सक्तिने वागा." (अत्तौबा - ७३)

३१. आम्ही निश्चितच तुमची कसोटी घेऊ जेणे करून हे पहावे की तुमच्यात कोण जेहाद करणारे आणि संयम पाळणारे आहेत, आणि तुमच्या अवस्थेला पारखून पहावे.[५०]

وَلَنَبْلُوَنَّكُمْ حَتّٰى نَعْلَمَ الْمُجٰهِدِيْنَ مِنْكُمْ وَالصّٰبِرِيْنَ
وَنَبْلُوَا۟ اَخْبَارَكُمْ ﴿٣١﴾

३२. ज्या लोकांनी कुफ्र केले [५१] आणि अल्लाहच्या मार्गापासून रोखले आणि पैगंबरांचा विरोध केला. या उपरान्त की त्यांच्यावर मार्गदर्शन स्पष्ट झाले होते ते अल्लाहला कोणतेही नुकसान पोहचविणार नाहीत आणि अल्लाह त्याचे सर्व आचरण ढासळून टाकील.

اِنَّ الَّذِيْنَ كَفَرُوْا وَصَدُّوْا عَنْ سَبِيْلِ اللّٰهِ وَشَآقُّوا
الرَّسُوْلَ مِنْۢ بَعْدِ مَا تَبَيَّنَ لَهُمُ الْهُدٰى لَنْ يَّضُرُّوا اللّٰهَ
شَيْـًٔا وَسَيُحْبِطُ اَعْمَالَهُمْ ﴿٣٢﴾

३३. हे ईमान बाळगलेल्या लोकांनो ! अल्लाहचे आज्ञा पालन करा व पैगंबराचे आज्ञापालन करा आणि आपली कर्मे व्यर्थ घालवू नका.[५२]

يٰۤاَيُّهَا الَّذِيْنَ اٰمَنُوْۤا اَطِيْعُوا اللّٰهَ وَاَطِيْعُوا الرَّسُوْلَ وَلَا تُبْطِلُوْۤا
اَعْمَالَكُمْ ﴿٣٣﴾

३४. ज्या लोकांनी कुफ्र केले आणि अल्लाहच्या मार्गापासून रोखले, मग कुफ्रच्या स्थितीतच मरण पावले, अल्लाह त्यांना कधीही माफ करणार नाही.[५३]

اِنَّ الَّذِيْنَ كَفَرُوْا وَصَدُّوْا عَنْ سَبِيْلِ اللّٰهِ ثُمَّ
مَاتُوْا وَهُمْ كُفَّارٌ فَلَنْ يَّغْفِرَ اللّٰهُ لَهُمْ ﴿٣٤﴾

३५. तेव्हा तुम्ही कमजोर पडू नका आणि तहाचे आमंत्रण देऊ नका [५४] तुम्हीच वर्चस्वशाली राहाल [५५] अल्लाह तुमच्या सोबतीला आहे आणि तो तुमची कर्मे निष्फळ करणार नाही.[५६]

فَلَا تَهِنُوْا وَتَدْعُوْۤا اِلَى السَّلْمِ وَاَنْتُمُ الْاَعْلَوْنَ وَاللّٰهُ
مَعَكُمْ وَلَنْ يَّتِرَكُمْ اَعْمَالَكُمْ ﴿٣٥﴾

३६. ऐहिक जीवन तर केवळ खेळ-तमाशा आहे. आणि जर तुम्ही ईमान बाळगाल व तकवा (ईश-भय) अंगिकाराल तर तो तुम्हाला तुमचा मोबदला देईल [५७]आणि तुमच्याकडून तुमची धन-सम्पत्ति मागणार नाही.[५८]

اِنَّمَا الْحَيٰوةُ الدُّنْيَا لَعِبٌ وَّلَهْوٌ وَاِنْ تُؤْمِنُوْا وَتَتَّقُوْا يُؤْتِكُمْ
اُجُوْرَكُمْ وَلَا يَسْـَٔلْكُمْ اَمْوَالَكُمْ ﴿٣٦﴾

३७. जर तो तुमच्या कडून धन सम्पत्ति मागेल आणि सर्व धन मागेल तर तुम्ही कंजूस पणा कराल आणि तो तुमचा दोष जाहीर करील.[५९]

اِنْ يَّسْـَٔلْكُمُوْهَا فَيُحْفِكُمْ تَبْخَلُوْا وَيُخْرِجْ اَضْغَانَكُمْ ﴿٣٧﴾

५०. अर्थात हे पहावे की तुमची बाहय स्थिती कोठ पावेतो तुमच्या आंतिरिक स्थितीशी सुसंगत आहे आणि तुम्ही आपल्या ईमान विषयक दाव्यात कितपत सच्चे आहात.

५१. मग याचे कुफ्र लपलेले असो किंवा उघड असो.

५२. ही तंबी आहे मुसलमानांना की जर तुम्ही अल्लाहच्या व पैगंबराच्या आज्ञापालनास अंगिकारले नाही तर तुमचे केले सवरले सर्व वाया जाईल.

५३. अल्लाहतर्फे माफी करीता त्या स्थितीवर विश्वास ठेवला जाईल ज्या स्थितीत मनुष्य मरण पावेल. जर एखादा मनुष्य कुफ्रच्या अवस्थेत मेला तर त्याच्या करीता माफीचे द्वार बंद राहील.

५४. काफिर लोक युद्धासाठी प्रवृत्त असतांना स्वत:हून तहाचे निमंत्रण देणे भ्याडपणाचे लक्षण होय म्हणून तसे करण्यास मनाई केली गेली आहे. मात्र जेव्हा काफिर समूह स्वत: हून तहाचे प्रस्ताव मांडेल तर तो प्रस्ताव स्विकारला जाऊ शकतो. सूरह अन्फाल मध्ये फर्मावि‍ले गेले आहे-

فَإِنْ جَنَحُوْا لِلسَّلْمِ فَاجْنَحْ لَهَا وَ تَوَكَّلْ
عَلَى اللّٰهِ۔ (انفال:٦١)

''जर ते तहा करीता झुकतील तर तुम्ही सुद्धा त्या करीता झुका आणि अल्लाहवर भरवसा ठेवा.'' (अनफाल - ६१)

५५. आणि ही वस्तुस्थिती आहे की ईमान बाळगणाऱ्यांचे पारडे प्रत्येक युद्धात जड राहीले व ते काफिरांवर वर्चस्वशाली ठरले अशाप्रकारे कुरआनाचे हे भाकित शब्दश: खरे ठरले.

५६. म्हणजे अल्लाहचे वचन बुलंद करण्यास्तव तुम्ही केलेले प्रयत्न ना या जगात प्रभावहीन ठरतील आणि ना आखिरत मध्ये निष्फळ ठरतील.

५७. यावरून ही गोष्ट आपोआप स्पष्ट आहे की ईमान बाळगून ईश-भय अंगिकारणाऱ्यांचे जीवन खेळ-तमाशा नसते. तर गांभीर्यपूर्ण व उद्दिष्टपूर्ण असते. मात्र ऐहिक जीवन त्यांच्याकरीता खेळ तमाशा हून अधिक वास्तविकता बाळगत नाही जे यालाच आपले ध्येय उद्दिष्ट मानतात आणि ईश्वर व आखिरत पासून अगदी गाफिल होतात.

५८. म्हणजे तुमची सर्व धन-सम्पत्ति मागणार नाही. जसे पुढे निवेदिले गेले आहे.

५९. म्हणजे जर तो तुमच्या कडून ही अपेक्षा करतो की तुम्ही आपली सर्व धन-संपदा अल्लाहच्या मार्गात खर्च करा व स्वत:साठी काहीच राखू नका तर तुम्ही कृपणता केली असती आणि ही गोष्ट अगदी उघडपणे दिसून येते की कुफ्र व इस्लामच्या युद्ध प्रसंगी ही तुम्हाला तुमची सम्पत्ति प्रिय आहे, परंतु अल्लाहने तुम्हाला एवढया कठोर परीक्षेत टाकले नाही. आणि आपल्या सम्पत्तिचा एकच भाग अल्लाहच्या मार्गात खर्च करण्याचा आदेश दिला. यासाठी की तुम्हाला आपल्या सुधारणेची संधी लाभावी व तुमची आत्मशुद्धि व्हावी.

स्पष्ट असावे की या आयतीत दांभिक मुसलमानांना संबोधिले गेले आहे. जे अल्लाहच्या मार्गात खर्च करण्या पासून जीव वाचवित होते.

३८. हे तुम्ही लोक [६०] आहात की अल्लाहच्या मार्गात खर्च करण्याचे तुम्हाला आवाहन कले जात आहे, तर तुमच्यात असेही लोक आहेत जे कंजूस पणा करतात.[६१] वस्तुतः जो कंजूस पणा करतो तो स्वतःशीच कंजूसपणा करतो [६२] अल्लाह निःस्पृह आहे आणि तुम्ही गरजवंत आहात. आणि जर तुम्ही तोंड फिरवाला तर अल्लाह तुमच्या जागी दुसऱ्या लोकांना आणील आणि ते तुमच्या सारखे नसतील. [६३]

هَٰٓأَنتُمْ هَٰٓؤُلَآءِ تُدْعَوْنَ لِتُنفِقُوا۟ فِى سَبِيلِ ٱللَّهِ فَمِنكُم مَّن
يَبْخَلُ ۖ وَمَن يَبْخَلْ فَإِنَّمَا يَبْخَلُ عَن نَّفْسِهِۦ ۚ وَٱللَّهُ ٱلْغَنِىُّ
وَأَنتُمُ ٱلْفُقَرَآءُ ۚ وَإِن تَتَوَلَّوْا۟ يَسْتَبْدِلْ قَوْمًا غَيْرَكُمْ ثُمَّ
لَا يَكُونُوٓا۟ أَمْثَٰلَكُم ﴿٣٨﴾

६०. या ठिकाणी सर्व सामान्य मुसलमानांना संबोधिले गेले आहे.

६१. हे कृपण मुसलमान होते जे अल्लाहच्या मार्गात खर्च करण्यास कंजूसपणा करीत.

६२. म्हणजे तो कंजूसपणा करून स्वत:चेच नुकसान करून घेतो.

६३. म्हणजे तुम्हाला अल्लाहच्या धर्मा करीता बलीदान देण्याची जी संधी लाभत आहे, ती खरे पाहता तुमच्या करीता मोठी भाग्याची गोष्ट होय. जर तुम्ही याची कदर केली नाही तर अल्लाह आपले वचन बुलंद करण्या करीता अन्य एखाद्या समूहाला तुमच्या जागी उभे करील आणि तो तुमच्या सारखा कमकुवत नसेल.

या आयतीचे भाष्य सूरह मायदाची आयत क्र. ५४ करते-

يَا اَيُّهَا الَّذِيْنَ اٰمَنُوا مَنْ يَرْتَدَّ مِنْكُمْ عَنْ دِيْنِهٖ فَسَوْفَ
يَاْتِى اللّٰهُ بِقَوْمٍ يُحِبُّهُمْ وَيُحِبُّوْنَهٗ اَذِلَّةٍ عَلَى الْمُؤْمِنِيْنَ
اَعِزَّةٍ عَلَى الْكَافِرِيْنَ يُجَاهِدُوْنَ فِى سَبِيْلِ اللّٰهِ وَلَا
يَخَافُوْنَ لَوْمَةَ لَائِمٍ۔ (مائده:٥٤)

“हे ईमान बाळगणाऱ्यांनो! तुमच्या पैकी जो कोणी आपल्या धर्मापासून परावृत्त होईल, तर अल्लाह अशा लोकांना आणील, ज्यांच्याशी अल्लाह प्रेम बाळगत असेल आणि जे अल्लाहशी प्रेम बाळगत असतील. ईमान बाळगणाऱ्यांच्या हक्कात नरमी बाळगणारे आणि काफिरांच्या विरोधात कठोर असतील. अल्लाहच्या मार्गात जेहाद करतील आणि एखाद्या निर्भत्सना करणाऱ्याच्या निर्भत्सनेला भित नाहीत.”

# सूरह अल फत्ह

# ४८. सूरह अल फत्ह

**नावः** पहिल्या आयतीत पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना खुल्या विजयाची शुभवार्ता दिले गेली आहे. तद्नुषंगे या सूरहचे नाव ''अल फत्ह'' असे आहे.

**अवतरण काळः** जिकादा हि. स. ६ (इ. स. ६२८) मध्ये हुदैबिया तहानंतर परतीच्या प्रवासात हुदैबिया आणि मदीना यांच्या दरम्यान अवतरली.

**मध्यवर्ति कल्पना :** पैगंबर आणि पैगंबरांच्या अनुयायींना शुभ समाचार की इस्लाम करीता विजयांचा आरंभ झाला आहे. आणि या परिस्थितीवर समीक्षा जी हुदैबिया तहाच्या वेळी उद्भवली होती.

**आयत रचना :** आयत क्र.१ते ७ मध्ये विजयाची शुभवार्ता देतांना पैगंबर आणि त्यांच्या अनुयायीं करीता त्या बक्षिसांचा उल्लेख केला गेला आहे ज्यांना या विजयाने आपल्या सोबत आणले. आणि दांभिक आणि अनेकेश्वर वाद्यांना खबरदार केले गेले आहे की हा विजय त्यांच्या करीता ईश-प्रकोपाचे कारण ठरेल.

आयत क्र. ८ ते १० मध्ये पैगंबर-स्थानास स्पष्ट केले गेले आहे आणि पैगंबराच्या हातावर दिक्षा घेण्यास अल्लाहच्या हातावर दिक्षा घेण्याच्या अर्थाने घेतले आहे.

आयत क्र. ११ ते १७ मध्ये दांभिक मुसलमानांना तंबी आहे जे पैगंबराच्या आवाहनावर त्यांच्या सोबत निघत नव्हते कारण त्यांना आपली धन संपदा व कुटुंबियांची चिंता होती आणि पैगंबराच्या या विचारास की मक्का जाऊन उमरा करावे, धोकेदायक समजत. मात्र जे लोक खरोखर अपंग होते. त्यांना निर्दोष ठरविले गेले.

आयत क्र. १८ ते २६ मध्ये प्रामाणिक ईमान धारकांना ज्यांनी या प्रसंगी जेहाद करीता दिक्षा घेतली आणि पैगंबरांच्या आदेशानुसार प्राण पणाला लावण्यास तयार झाले. त्यांना अल्लाहच्या प्रसन्नतेची शुभ वार्ता दिली गेली. आणि वचन दिले गेले की ते भविष्यात विपुल प्रमाणात युद्धात जिंकलेला माल हस्तगत करतील. अल्लाहची मदत त्यांच्या पाठीशी राहील म्हणून काफिर त्यांच्या विरोधात टिकू शकणार नाहीत.

आयत क्र. २७ ते २९ मध्ये ईमान बाळगणाऱ्यांना हे सांगितले गेले आहे की पैगंबराने मसजिदे हराम मध्ये दाखल होण्याचे जे स्वप्न बघितले होते ते खरे होते आणि ते पूर्ण झाल्या खेरीज राहणार नाही. पैगंबर करीता वर्चस्व निश्चित आहे. आणि त्यांना असे प्रामाणिक सहचारी मिळतील ज्यांचे चित्र तौरात आणि बायबल मध्ये आढळून येईल.

**हुदैबिया तह का व कसा ? :** पैगंबरांच्या स्थलांतरानंतर मक्केच्या कुरेश जन समूहाने मसजिदे हरामच्या दर्शनाचा मार्ग रोखला होता. त्यामुळे ते ना उमरा करू शकत होते. ना हज्ज, वास्तविक मसजिदे हराम मध्ये असलेल्या काबागृहाची उभारणी हजरत इब्राहीम यांनी अल्लाहच्या आदेशान्वये केली होती व अशासाठी केली होती की ते लोकांकरीता केंद्रीय उपासना-स्थळ ठरावे आणि त्यांनी तवाफ (प्रदक्षिणा) उमरा व हज्ज वगैरे करावे. यावर कुरेश जन समूहाचा एकाधिकार तो ही मूर्तिपूजेच्या स्वरूपात एक अशी बाब होती, ज्यामुळे याच्या उभारणीचे उद्दिष्ठ फोल ठरत होते तसेच मुसलमानांवर हा फार मोठा अत्याचार होता की त्यांचा आपल्या मुळ केंद्राशी संबंध तुटावा यास्तव मुसलमानांना हा अधिकार होता की त्यांनी मसजिदे हरामचे दर्शन घ्यावे.

मुसलमान आणि मक्काचे काफिर यांच्या दरम्यान बद्र युद्ध,उहद युद्ध व खंदकचे युद्ध लढले गेले होते आणि मक्काचे काफिर युद्धासाठी तयारच होते की हि. स. ६ मध्ये पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी एक स्वप्न पाहीले की त्यांनी आपल्या सहकाऱ्यांसमवेत मसजिदे हराम मध्ये प्रवेश केला आहे. ज्याअर्थी पैगंबराचे स्वप्न सच्चे व अल्लाहतर्फे असते म्हणून त्यांनी अल्लाह तर्फे संकेत मिळताच उमरा (काबागृहाचे दर्शना) चा इरादा केला आणि याची सार्वत्रिक घोषणा केली जेणे करून लोकांनी अधिकाधिक संख्येत भाग घ्यावा आणि काफिरांना हल्ला करण्याची हिमत होऊ नये. पैगंबरांच्या आवाहना नुसार मदीनाचे चौदाशे मुसलमान या मोहीमेत सहभागी होण्या करीता तयार झाले आणि जिकादा महिन्याच्या पहिल्या तारखेस हा काफिला मक्केच्या दिशेने निघाला. मदीना पासून सहा मैलांच्या अंतरावर जुलहलफा या ठिकाणी उमराचा एहराम (धार्मिक विधी) बांधला. कुर्बानी साठी उंट सोबत नेले होते. ज्यांच्या गळयात लक्षण म्हणून पट्टे बांधलेले होते जेणेकरून कोणीही त्यांना पाहून समजावे की हे कुर्बानीचे उंट आहेत म्हणून एखाद्याने आक्षेप घेऊ नये. ज्याअर्थी युद्धाचा काही इरादा नव्हता म्हणून युद्ध-सामुग्री ही सोबत नव्हती. सर्वसामान्य रिवाजानुसार केवळ तरवारच सोबत होती आणि ती ही म्यान मध्ये. जेव्हा पैगंबर कुराअल गुमीम येथे पोहोचले जेथून मक्का सुमारे शंभर किलो मीटर अंतरावर आहे, तेव्हा असे कळाले की मक्काच्या काफिरांतर्फे खालीद बिन वलीदच्या नेतृत्वात तीनशे घोडेस्वारांचे

एक दल पैगंबरांच्या मुकाबल्यासाठी पोंहोचले आहे. वास्तविक पैगंबर युद्धाचा इरादा करून निघाले नव्हते म्हणून त्यांनी जवळचा मार्ग सोडून दुरचा मार्ग पत्करला आणि हुदैबिया या ठिकाणी पोहोचले जिथून हरमची हद्द सुरु होते आणि मक्का केवळ २२ किलोमीटर अंतरावर राहते. आता या ठिकाणास शुमैसिया म्हणतात.

पैगंबरानी हजरत उस्मान बिन अफ्फान यांना हा संदेश देऊन पाठविले की त्यांनी कुरेश जनसमूहास सांगावे की आम्ही युद्ध करण्यास आलो नाहीत. तर आमचा हेतु फक्त उमरा (काबागृहाच्या दर्शना) चा आहे. तसेच त्यांना इस्लाम धर्म स्विकारण्याचे आवाहन ही केले गेले. हजरत उस्मान जेव्हा मक्का येथे पोहोचले तेव्हा त्यांच्या कबिल्याच्या लोकांनी त्यांना मान सन्मान दिला आणि कुरेश जन समूहाने ही त्यांना काबागृहास प्रदक्षिणा घालण्याचा प्रस्ताव मांडला. परंतु त्यांनी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या आधी प्रदक्षिणा घालण्यास नकार दिला. कुरेश जन समूहाचे लोक या गोष्टीस मुळीच तयार झाले नाहीत की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी आपल्या सहकाऱ्यांसमवेत उमरा करीता मक्का मध्ये प्रवेश करावा. या विवादात हजरत उस्मान यांना परत येण्यास थोडा विलंब लागला. तिकडे मुसलमानांना चिंता पडली आणि बाहयत: परिस्थिती अशी निर्माण झाली की आता बळाचा वापर करूनच मक्का प्रवेश करावा लागेल. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी प्रसंगाची औचित्य ओळखून आपल्या सहकाऱ्यांना जेहाद करण्याचे आवाहन केले. यास्तव पैगंबराच्या सहवासातील सहकाऱ्यांनी पैगंबरांच्या हातावर हात ठेवून किंचितही विलंब न करता वचन दिले, जो या गोष्टीचा संकल्प होता की जर मक्काचे अनेकेश्वर वादी उमरा अदा करण्यापासून रोखतात तर ते युद्ध सामुग्री विना ही केवळ आपल्या तरवारींनी त्यांच्या मुकाबला करण्या करीता तयार आहेत.

हे एक ऐतिहासिक अभिवचन होते जे बैते रिजवान या नावाने प्रसिद्ध आहे. जेव्हा कुरेश जन समूहाला याची सूचना मिळाली तेव्हा ते घाबरले आणि त्यांनी सुहेल बिन अम्रच्या नेतृत्वात एक शिष्ट मंडळ तहाच्या बोलणी करीता पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या जवळ पाठवले. बोलणी झाल्यानंतर जो तहाचा करार ठरला त्यातील महत्वाच्या बाबी पुढील प्रमाणे होत.

१. या वर्षी मुसलमानांनी मदीनेस परत जावे आणि पुढील वर्षी मक्का येऊन उमरा करावा. त्यावेळी कुरेश कोणताही आक्षेप घेणार नाहीत.

२. मुसलमान आपल्या सोबत फक्त तरवारी आणू शकतील आणि त्या म्यानीत असतील.

३. ते मक्केत फक्त तीन दिवस वास्तव्य करतील.

४. मुसलमान आणि कुरैश यांच्या दरम्यान आता युद्धाची स्थिती राहणार नाही आणि हा करार दहा वर्षांकरीता आहे.

५. कुरैश जनसमूहाचा एखादा मनुष्य जर मदीना येईल तर त्याला परत करावे लागेल आणि जर एखादा मुसलमान कुरैश जवळ येईल तर त्यास परत करणे आवश्यक राहणार नाही.

६. हरमच्या परिसरात राहणाऱ्या कबिल्यांना या गोष्टीचे स्वातंत्र्य राहील की त्यांनी दोघांपैकी वाटेल त्या पक्षाला मिळून जावे. नंतर त्या कबिल्याचीही तीच जबाबदारी राहील ज्या करारान्वये त्या कबिल्यास लागू आहेत. त्याच प्रमाणे त्याचे ही तेच अधिकार असतील जे करारानुसार त्या पक्षाचे ठरतात.

७. या कबिल्यांपैकी जर एखाद्या कबिल्यावर आक्षेप घेतला गेला तर यास संबंधित पक्षा विरूद्ध अतिरेक समजला जाईल आणि अशाने कराराचा भंग होईल.

(सुलेह हुदैबिया - मुहम्मद अहमद बाश्मील. पृ.२५२ ते २५४)

या कराराचा बाहय पैलू हा होता की जणू मुसलमानांनी शत्रूला घाबरून तह केला आहे. परंतु खरे पाहता यामुळे मुसलमानांची स्थिती बरीच मजबूत झाली होती कारण यामुळे प्रथम तर मसजिदे हरामच्या दर्शनाचा मार्ग मोकळा होत होता. दुसरे असे की इस्लाम व मुसलमानां विरूद्ध आघाडया उभारणे संपले होते ज्यामुळे तो अडसर दूर होत होता जो इस्लामच्या प्रसार मार्गात आडवा येत होता आणि लोकांना इस्लाम विषयी स्वतंत्र रित्या विचार चिंतन करण्याची संधी मिळत होती.

तहाचा करार झाल्यानंतर पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) आणि त्यांच्या सहवासातील अनुयायींनी हुदैबिया या ठिकाणीच कुर्बानीचे उंट जबह केले आणि उमराचा एहराम काढला नंतर मदीने करीता रवाना झाले. पुढील वर्षी जिकादा मध्येच पैगंबर आपल्या सहकाऱ्यां समवेत मक्का येथे गेले आणि शांतीपूर्ण वातावरणात त्यांनी उमरा विधी अदा केला. अशा प्रकारे ते स्वप्न खरे ठरले जे त्यांनी पाहीले होते.

# मदीना आणि हुदैबिया यांच्या दरम्यानचा मार्ग



# ४८. सूरह फत्ह

سُورَةُ الْفَتْحِ

आयती - २९

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بِسْمِ اللَّهِ الرَّحْمَٰنِ الرَّحِيمِ

१. (हे पैगंबर !) आम्ही तुम्हाला निश्चितच खुला विजय प्रदान केला.[१]

إِنَّا فَتَحْنَا لَكَ فَتْحًا مُّبِينًا (١)

२. यासाठी की अल्लाहने तुमच्या पुढील मागील चुका माफ कराव्यात.[२] आणि तुमच्यावर आपली देणगी पूर्ण करावी.[३] आणि तुम्हाला सरळ मार्गास लावावे.[४]

لِّيَغْفِرَ لَكَ اللَّهُ مَا تَقَدَّمَ مِن ذَنۢبِكَ وَمَا تَأَخَّرَ وَيُتِمَّ نِعْمَتَهُۥ عَلَيْكَ
وَيَهْدِيَكَ صِرَٰطًا مُّسْتَقِيمًا (٢)

३. आणि जबरदस्त मदतीद्वारे अल्लाहने तुमचे सहाय्य करावे.[५]

وَيَنصُرَكَ اللَّهُ نَصْرًا عَزِيزًا (٣)

४. त्यानेच ईमान बाळगणाऱ्यांच्या मनात शांती अवतरीत केली.[६] या साठी की आपल्या ईमाना सोबत त्यांना अधिक ईमान प्राप्त व्हावे.[७] आकाशांच्या व जमीनीच्या समस्त सैन्यांचा मालक अल्लाहच आहे.[८]आणि अल्लाह ज्ञानी व बुद्धिकौशल्य बाळगणारा आहे.[९]

هُوَ الَّذِىٓ أَنزَلَ السَّكِينَةَ فِى قُلُوبِ الْمُؤْمِنِينَ
لِيَزْدَادُوٓا إِيمَٰنًا مَّعَ إِيمَٰنِهِمْ ۗ وَلِلَّهِ جُنُودُ السَّمَٰوَٰتِ
وَالْأَرْضِ ۚ وَكَانَ اللَّهُ عَلِيمًا حَكِيمًا (٤)

५. (त्याने हा विजय अशा साठी प्रदान केला) की त्याने ईमान बाळगणाऱ्या पुरूषांना व ईमान बाळगणाऱ्या स्त्रीयांना जन्नतींमध्ये दाखल करावे, ज्यांच्या खाली प्रवाह वाहत असतील. ते यात सदैव राहतील, आणि यासाठी की त्यांच्या पासून त्यांची दुष्कर्मे दूर करावीत. अल्लाहच्या जवळ हीच मोठी सफलता होय.[१०]

لِّيُدْخِلَ الْمُؤْمِنِينَ وَالْمُؤْمِنَٰتِ جَنَّٰتٍ تَجْرِى مِن تَحْتِهَا
الْأَنْهَٰرُ خَٰلِدِينَ فِيهَا وَيُكَفِّرَ عَنْهُمْ سَيِّـَٔاتِهِمْ ۚ وَكَانَ ذَٰلِكَ
عِندَ اللَّهِ فَوْزًا عَظِيمًا (٥)

१. अभिप्रेत मक्का विजय होय; ज्याची प्रस्तावना हुदैबिया तहाने झाली या कराराच्या दोन वर्षाच्या आत (हि. स. ८ मध्ये) मक्केवर विजय प्राप्त झाला. आणि कुरआनाचे हे भाकित की 'आम्ही तुम्हाला खुला विजय प्रदान केला अगदी खरे ठरले. हुदैबिया तहाचा बाहय पैलू मुसलमानांना अप्रिय कारक होता. कारण त्यांना या वर्षी उमरा न करताच परत जावे लागत होते. परंतु अल्लाहच्या पैगंबराच्या दूर दृष्टिस याचे चांगले परिणाम दिसून येत होते आणि वस्तुस्थिती अशी की इस्लामच्या विजयांचा क्रम हुदैबिया तहानंतरच सुरू होतो. अल्लामा इब्ने कय्यीम यातले मर्म विशद करतांना लिहितात.

''ही नांदी होती एका भव्य अशा विजयाची ज्याद्वारे सर्वश्रेष्ठ अल्लाहने आपल्या पैगंबर व आपल्या सैन्यास प्रतिष्ठा प्रदान केली आणि लोकांनी जथ्था जथ्थाने इस्लाम धर्माचा अंगिकार केला. तेव्हा हा तह या विजयाचे द्वार होते तसेच याची पूर्व घोषणा होती......... हा तह एक भव्य विजय होता कारण याच्यामुळे लोकांना शांती लाभली आणि मुसलमानांना काफिरांशी भेट गाठ घेण्याची, त्याच्या समोर सत्य-आवाहन प्रस्तुत करण्याची, त्यांना कुरआन ऐकविण्याची व निर्भय पणे त्यांच्याशी इस्लाम बाबत चर्चा करण्याची संधी मिळाली. ज्यांनी आपल्या इस्लामला लपवून ठेवले होते ते प्रकट झाले आणि तहाच्या कालावधीत अल्लाहने ज्यांना सुबुद्धि प्रदान केली त्यांनी इस्लामचा स्विकार केला. म्हणून अल्लाहने यास 'फतह मुबीन (स्पष्ट विजय) ठरविले'........... बाहयत: हा तह मुसलमानांना अपला हक्क हिरावून घेणारा वाटला परंतु त्याच्या अंतरंगात प्रतिष्ठा, विजय व अल्लाहची मदत होती. (जादुल मिअद-खंड २ पृष्ठ १३०)

स्पष्ट असावे की आजच्या काळात काही महाशय आपल्या चुकीच्या दृष्टीकोनां करीता हुदैबिया तहाची ढाल पुढे करतात ज्यामुळे जेहादची स्फूर्ति भंग पावते. ते इस्लामचा असा अर्थ लावतात की जणु तो शत्रूकरीता कोमल आहे आणि मुसलमानांनी त्यांच्यासाठी मऊ घास बनले पाहीजे. वास्तविक इस्लाम मध्ये युद्ध ही आहे आणि तह देखील. हुदैबिया तह तर एका विशिष्ट प्रसंगी केला गेला होता. ज्याचा प्रस्ताव मक्केच्या काफिरांनी मांडला होता, मुसलमानांनी नव्हे. मुसलमानांना तर सूरह मुहम्मद मध्ये आधीच ही ताकीद केली गेली होती की त्यांनी तहा करीता पुढाकार घेऊ नये.

فَلَاتَهِنُوا وتدعُوا اِلَی السَّلْمِ۔ (محمد:۳۵)

'' धैर्य सोडू नका आणि तहा करीता बोलवू नका'' (मुहम्मद-३५)

आणि ही देखील वस्तुस्थिती आहे की हुदैबिया तहाच्या आधी बद्र युद्ध (हि. स. २) व उहद युद्ध (हि. स. ३) लढले गेले आणि खंदकचे युद्ध (हि. स. ५) ही लढले गेले होते. अशा प्रकारे हुदैबिया तह संपल्यानंतर बळाचा वापर करून मक्केवर विजय प्राप्त केला आणि हुनैन मध्ये युद्धाचा वणवा पेटला आणि तबुक मध्ये तर रोमन सम्राटाला आव्हान दिले गेले. तर काय या सर्व घटनांना दृष्टीआड करून हुदैबिया तहास भलत्या सलत्या प्रसंगी सादर करणे आणि याच्या आधारे एक विशेष वैचारिक दृष्टीकोन कायम करणे, नितांत असमतोलता व एकेरी भूमिका नव्हे?

२. संकेत आहे या गोष्टीकडे की मक्का विजया नंतर पैगंबराचे मिशन पूर्ण होते व त्यांना ज्या हेतुने पैगंबर म्हणून पाठविण्यात आले तो हेतु ही साध्य होतो. कारण अंतिम पैगंबराद्वारे एकेश्वरवादाच्या केंद्र स्थानास अनेकेश्वर वाद्याच्या ताब्यातून मुक्त करून मुस्लिम जन समूहाच्या ताब्यात देणे आणि इस्लामला अशा प्रकारे बुलंद करणे की समस्त धर्मावर त्याचे वर्चस्व व्हावे. हे अंतिम उद्दिष्ट होते ज्याकरीता अल्लाहने पैगंबराना पाठविले होते. हे अंतिम उद्दिष्ट गाठल्यानंतर इहलोकाचा निरोप घ्यायची वेळ येते म्हणून पैगंबरांना ही शुभवार्ता सांगितली गेली की मक्का विजय आपल्या अंतरंगी, मगफीरत (माफी)चा परवाना घेऊन आला आहे. त्यांच्याकडून ज्या काही चुका घडल्या असतील किंवा पुढे होतील त्या सर्वाकरीता त्यांच्या पालन कर्त्यातर्फे माफीची पूर्व घोषणा आहे. ही शुभवार्ता पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या प्रयत्नांना स्विकृतिचा दर्जा देणारी व प्रेषित कर्तव्ये पार पाडल्या बाबत त्यांची कदर वाढविणारी होती. या सुखद समाचारानंतर पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या अत्याधिक उपासनेची ही दशा होती की; त्यांचे पाय रात्रभर नमाज साठी उभे राहील्याने सूजत. जेव्हा त्यांच्या सहवासातील अनुयायींनी त्यांना विचारले काय तुमच्या पुढील मागील सर्व चुका माफ झाल्या नाहीत? त्यावर पैगंबरांनी फर्माविले,

اَفَلَا اَکُونُ عَبْدًا شَکُورًا۔ (بخاری کتاب التفسیر)

''काय मी कृतज्ञशील दास बनू नये?''(बुखारी - किताबुत्तफसीर)

राहीला हा प्रश्न की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या कडून अपराध घडले होते किंवा नाही तर याचा खुलासा सूरह मोमीन टीप क्र. ७९ मध्ये केला गेला आहे. तो विचाराधीन असावा.

पैगंबरांच्या संदर्भात ही धारणा आहे की त्यांच्या हातून

अपराध घडत नाहीत. त्यांचे अनुसरण करण्याचा आदेश दिला गेला आहे आणि अनुसरण त्यांचेच केले जाऊ शकते जे निष्पाप व निरागस असावेत. यावरून पैगंबरांची सत्शीलता आपोआप स्पष्ट होते. परंतु याचा अर्थ असा नव्हे की त्यांच्या हातून कधीही चूक घडली नाही. एखादी चूक घडणे हे माणूस असण्याचे लक्षण आहे. मात्र नकळत एखादी चूक घडून येण्यात व जाणून बुजून एखादा अपराध करण्यात जमीन अस्मानाचे अंतर आहे. मग ईश-संदेश त्यांच्या चुकांबाबत त्यांना सचेत करतो व ते त्वरीत अल्लाहला शरण जातात. यास्तव लोकांसमोर एखादे चुकीचे उदाहरण मांडण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. कुरआनाने स्वत: काही पैगंबरांच्या चुकांचा उल्लेख या प्रकारे केला आहे की त्यांना त्या बाबत सावध केले गेले आणि ते त्वरीत अल्लाहकडे दास्यत्वाच्या जाणीवेने शरणागत झाले. पैगंबर आपल्या चुकांसाठी अल्लाहजवळ माफीची प्रार्थना ही करीत. हजरत इब्राहीम यांची ही प्रार्थना होती-

وَالَّذِىٓ اَطۡمَعُ اَنۡ يَّغۡفِرَ لِىۡ خَطِيۡٓـَٔتِىۡ يَوۡمَ الدِّيۡنِ ـ (شعراء: ٨٢)

''आणि ज्यापासून मी आशा बाळगतो की मोबदल्याच्या दिवशी तो माझ्या चुका माफ करील.'' (शुअरा-८२)

आणि पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) दररोज सत्तर वेळा क्षमा याचनेची प्रार्थना करीत असत. (बुखारी-किताबुल दअवात)

३. देणगी पूर्ण करण्याशी अभिप्रेत मांगल्याने सम्पन्न करणे मान प्रतिष्ठा प्रदान करणे, व दर्जा उंचाविणे.

४. म्हणजे विजय लाभल्यानंतर ही अल्लाह तुम्हाला सन्मार्गी लावील. हा संकेत या गोष्टीकडे आहे की विजय-प्राप्ती नंतर विजेता गर्व आणि घमेंड करू लागतो आणि दुर्वर्तन अंगिकारतो परंतु पैगंबरांचा व्यवहार असा नाही. ते अल्लाहचे पैगंबर आहेत आणि त्यानेच प्रदान केलेल्या सुबुद्धि व मार्गदर्शनाद्वारे सर्व अवस्था पार पाडत आहेत. म्हणून विजय प्राप्ती नंतर ही ते मार्गदर्शनाच्या वाटे व चालत राहीले आणि घटनांनी याचे समर्थन केले. यास्तव मक्का विजयानंतर त्यांनी ज्या प्रकारे जीवन व्यतीत केले व अधिकार प्राप्त करून ज्या जबाबदारीच्या जाणीवेने त्याचा वापर केला तो त्यांचा अनुपमेय कारनामा होय मक्केत त्यांनी विजेता या नात्याने प्रवेश केला परंतु ताठ मान करून नव्हे तर अल्लाहचा दास या नात्याने नत मस्तक होऊन आणि आपल्या शत्रूंविरूद्ध कसलीही सूडाची कारवाई केली नाही उलट त्यांनी फर्माविले-

لَا تَثۡرِيۡبَ عَلَيۡكُمُ الۡيَوۡمَ

''आज तुमच्यावर कसली ही पकड नाही''

५. म्हणजे अल्लाह तर्फे अशी मदत की जो कोणी तुमच्याशी टक्कर घेईल तो क्षत विक्षत होईल. बायबल मध्ये ही या विषयी भाकित आहे.

'' म्हणून मी तुम्हास सांगतो की देवाचे राज्य तुम्हापासून काढून घेतले जाईल व जी प्रजा त्याचे फळ देईल तिला ते दिले जाईल. (जो या धोंडयावर पडेल त्याचा चुराडा होईल परंतु ज्या कोणावर हा पडेल त्याचा भुगाभुगा करून टाकील (मत्तय २१:४३-४४)

आणि हदीस वचनातील उल्लेख असा

نُصِرۡتُ بِالرُّعۡبِ ـ (مسلم كتاب المساجد)

''माझी दराऱ्याद्वारे मदत केली गेली आहे'' (मुस्लिम किताबुल मसाजिद)

६. म्हणजे हुदैबिया तहाच्या प्रसंगी जेव्हा मुसलमान एहरामच्या अवस्थेत होते आणि युद्धाची पाळी आली होती, तेव्हा मुसलमान मोठया दारूण संकटात सापडू शकत होते. परंतु सर्वश्रेष्ठ अल्लाहने शांती अवतरीत केली म्हणून ते निर्धास्त होते आणि शिर तळहातावर घेऊन मक्केत प्रवेश करण्यास तयार झाले होते. त्यांनी या प्रसंगी कसलीही दुर्बलता दाखविली नाही. येथपावेतो की तहाचा करार मान्य करण्यात ही त्यांना संकोच वाटला ज्यावरून त्यांची हिम्मत आणि आत्म समर्पणाच्या भावनेची कल्पना येते.

७. म्हणजे त्यांच्या ईमाना मध्ये वृद्धि होवो.

जेथपावेतो श्रद्धेचा संबंध आहे. प्रत्येक उचित श्रद्धा बाळगणाऱ्या मुसलमानाची श्रद्धा समान असते. परंतु ईमानाच्या कैफियतीमध्ये सदाचार व त्या बलीदानामुळे, जे तो धर्माकरीता देतो, वाढ होत राहते. कुरआनाच्या अनेक आयती वरून ही वस्तुस्थिती स्पष्ट होते (पहा सूरह अनफाल आयत क्र. २ टीप क्र. ३ आणि सूरह तौबा आयत क्र. १२४, टीप क्र. २२६)

८. यास्तव तो ज्याला जिंकवू इच्छिल त्यास कोणी रोखू शकत नाही.

९. यास्तव त्याचा प्रत्येक निर्णय ज्ञान व बुद्धि कौशल्यावर आधारित असतो.

१०. म्हणजे हा विजय आपल्या अंतरंगी ईमान बाळगणाऱ्यांकरीता आखिरतची सफलता ही घेऊन आला आहे की त्यांचे परिश्रम सार्थक ठरले. त्यांचे प्रयत्न सफल झाले व त्यांना जन्नतचा परवाना मिळाला.

ईमान बाळगणाऱ्या स्त्रीयांचा उल्लेख विशेषत्याने केला

गेला कारण या मोहीमेस यशस्वी करण्यात त्यांनी पुरूषांना सहाय्य केले व त्यांचे धैर्य वाढवित राहील्या.

हदीस वचनात उल्लिखित आहे की पैगंबरांच्या सहवासातील अनुयायींनी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना विचारले, हे अल्लाहचे पैगंबर, अल्लाहचे तर आपणास या सूरह मध्ये आपल्या मागच्या पुढच्या चूका माफ केल्या जाण्याची शुभवार्ता ऐकविली आहे, परंतु आमच्या करीता काय आहे? यावर पैगंबरांनी या आयतीचे पठण केले अर्थात तुमच्या करीता जन्नत आहे.

(तिर्मिजी-अबवाबुत तफसीर)

وَّيُعَذِّبَ الْمُنٰفِقِيْنَ وَالْمُنٰفِقٰتِ وَالْمُشْرِكِيْنَ وَ الْمُشْرِكٰتِ
الظَّآنِّيْنَ بِاللّٰهِ ظَنَّ السَّوْءِ ؕ عَلَيْهِمْ دَآئِرَةُ السَّوْءِ ۚ وَ غَضِبَ
اللّٰهُ عَلَيْهِمْ وَلَعَنَهُمْ وَاَعَدَّ لَهُمْ جَهَنَّمَ ؕ وَسَآءَتْ مَصِيْرًا ﴿٦﴾

६. आणि दांभिक पुरुषांना व दांभिक स्त्रीयांना आणि अनेकेश्वर वादी पुरूषांना व अनेकेश्वर वादी स्त्रीयांना शिक्षा द्यावी [११] जे अल्लाह विषयी दुराग्रह बाळगतात. वाईट पणाचे चक्र. त्यांच्यावरच आहे.अल्लाहचा त्यांच्यावर प्रकोप झाला आणि त्याने त्यांची निर्भत्सना केली. त्यांच्या करीता त्याने जहन्नम तयार करून ठेवली आहे आणि ते मोठे वाईट ठिकाण आहे.

وَلِلّٰهِ جُنُوْدُ السَّمٰوٰتِ وَالْاَرْضِ ؕ وَكَانَ اللّٰهُ عَزِيْزًا حَكِيْمًا ﴿٧﴾

७. आकाशांचे व जमीनीचे सैन्य अल्लाहच्याच ताब्यात आहे.आणि तो वर्चस्वशाली बुद्धि कौशल्य बाळगणारा आहे.

اِنَّاۤ اَرْسَلْنٰكَ شَاهِدًا وَّمُبَشِّرًا وَّنَذِيْرًا ﴿٨﴾

८. (हे पैगंबर !) आम्ही तुम्हाला साक्ष देणारा, [१२] शुभ समाचार देणारा [१३] आणि खबरदार करणारा [१४] बनवून पाठविले.

لِّتُؤْمِنُوْا بِاللّٰهِ وَ رَسُوْلِهٖ وَتُعَزِّرُوْهُ وَتُوَقِّرُوْهُ ؕ وَ تُسَبِّحُوْهُ
بُكْرَةً وَّاَصِيْلًا ﴿٩﴾

९. या साठी की तुम्ही लोकांनी अल्लाह व त्याच्या पैगंबरावर ईमान बाळगावे, त्याचे समर्थन करावे व त्याचा आदर करावा [१५] आणि अल्लाहची स्तुति गुणगान करा सकाळ व संध्याकाळ.[१६]

اِنَّ الَّذِيْنَ يُبَايِعُوْنَكَ اِنَّمَا يُبَايِعُوْنَ اللّٰهَ ؕ يَدُ اللّٰهِ فَوْقَ اَيْدِيْهِمْ ۚ
فَمَنْ نَّكَثَ فَاِنَّمَا يَنْكُثُ عَلٰى نَفْسِهٖ ۚ وَمَنْ اَوْفٰى بِمَا عٰهَدَ
عَلَيْهُ اللّٰهَ فَسَيُؤْتِيْهِ اَجْرًا عَظِيْمًا ﴿١٠﴾

१०. (हे पैगंबर !) जे लोक तुमच्या हातावर हात ठेवून शपथ ग्रहण करीत होते ते वस्तुतः अल्लाहच्या हातावर हात ठेवून शपथ ग्रहण करीत होते. त्यांच्या हातावर अल्लाहचा हात होता. [१७] तेव्हा जो मनुष्य वचन भंग करील तो आपल्या वचन भंगाचे संकट स्वतःवरच ओढवून घेईल. आणि जो या वचनाची पूर्तता करील, जे त्याने अल्लाहशी केले आहे,[१८] त्याला महान मोबदला प्रदान करील.

११. म्हणजे मक्केचा विजय जिथे ईमान बाळगणाऱ्या करीता ईश कृपेला कारक ठरला; तिथे दांभिक व अनेकेश्वर वाद्यांकरीता ईश-प्रकोपास कारक ठरला. यास्तव मक्का विजया नंतर त्यांची गळचेपी करण्याचा क्रम चालत राहीला.

१२. स्पष्टीकरणा करीता पहा सूरह अहजाब टीप क्र. ९९.

१३. स्पष्टीकरणा करीता पहा सूरह अहजाब टीप क्र. १००.

१४. स्पष्टीकरणा करीता पहा सूरह अहजाब टीप क्र. १०१.

१५. म्हणजे पैगंबराचे स्थान अतिशय उच्च असे स्थान आहे. यास्तव तुम्ही त्याच्यावर ईमान बाळगल्या नंतर त्याचे समर्थक व सहाय्यक बनून उभे राहीले पाहीजे व त्याचा यथोचित आदर सन्मान केला पाहीजे.

स्पष्ट असावे की تُعَزِّرُوْهُ 'त्याचे समर्थन करा' व تُوَقِّرُوْهُ ''त्याचा आदर सन्मान करा'' हे शब्द पैगंबरा करीताच उचित ठरू शकतात. (ه) यास्तव सर्वनामाचा संबंध पैगंबराशीच आहे. सूरह एअराफ आयत क्र.१५ मध्ये ही عَزَّرُوْهُ त्याचे समर्थन केले ''हा'' शब्द पैगंबरा करीताच प्रयोग केला गेला आहे.

१६. سَبِّحُوْهُ ''त्याची प्रशंसा व गुणगान करा'' (ه) या वाक्यात सर्वनाम अल्लाह विषयीच असू शकते. कारण प्रशंसा व गुणगान केवळ अल्लाहचेच केले जाऊ शकते, म्हणून अल्लाहची प्रशंसा व गुणगान करा असा अनुवाद केला गेला आहे.

१७. संकेत बैते रिजवान (वचना) कडे आहे जे हुदैबिया या ठिकाणी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी आपल्या सहवासातील अनुयायींकडून घेतले होते की ते मृत्युला मिठी मारावी लागली तरी पळ काढणार नाहीत (अधिक विवरण पुढे आयत क्र.१८ च्या अनुषांगाने येत आहे)

ही प्रतिज्ञा जी पैगंबरांच्या हातावर शपथ पूर्वक घेतली गेली होती. खरे पाहता अल्लाहशी केलेली प्रतिज्ञा होती कारण पैगंबर अल्लाहने पाठविलेला असतो आणि तो जो आदेश देतो अल्लाहच्याच आदेशान्वये देतो. यास्तव त्याला वचन देणे म्हणजे अल्लाहला वचन देणे होय. या वस्तुस्थितीस अशा प्रकारे फर्माविले की 'त्यांच्या हातावर अल्लाहचा हात होता.

स्पष्ट असावे की कुरआनात केवळ पैगंबराच्या हातावर वचन देण्याचा उल्लेख केला गेला आहे आणि याचे महत्व यावरून स्पष्ट होते की पैगंबराच्या हातावर वचन देणे अल्लाहच्या हातावर वचन देण्या सारखे आहे म्हणूनच हे वचन पैगंबरांच्या संबंधाने विशेष आहे. या खेरीज एक वचन ते आहे ज्याचा उल्लेख हदीस वचनात येतो आणि ते म्हणजे खलीफाच्या हातावर वचन देणे हे वचन खलीफाच्या राजकीय सत्ताधिकारास मान्य करण्यासाठी असते. त्या काळात राज्याच्या प्रमुखाच्या निवडीची ती पद्धत प्रचलीत नव्हती आणि ना त्या परिस्थितीत प्रचलीत होऊ शकत होती जी आजच्या लोकशही राज्यांमध्ये प्रचलीत आहे. म्हणून अगदी जवळच्या सहकाऱ्यांच्या सल्लामसलतीने ही निवड होत असे. आणि लोक त्याच्या हातावर एकनिष्ठतेचे व आज्ञा पालनाचे वचन देत, ज्यावरून हे दिसून येईल की लोकांनी त्याला 'खलीफा' म्हणून मान्य केले आहे, ज्याअर्थी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी इहलोकाचा निरोप घेतल्या नंतर अनुयायीं नी खुल्फाए राशेदीन (चार खलीफा) च्या हातावर जी शपथ घेतली, तिचे स्वरूप हेच होते. खलीफाच्या राजकीय सत्ताधिकारास मान्य करणे जेणे करून इस्लामची सामूहीक व्यवस्था प्रस्थापित व्हावी आणि या व्यवस्थेद्वारे विधि नियमांचे, मात्र जे शरीअतशी विसंगत नसावेत, त्यांचे पालन केले जावे.

राहीले ते शपथपूर्वक वचन जे एक पीर एखाद्याला आपला मुरीद (शिष्य) बनविण्या करीता घेतो तर ही नितांत धर्मबाहय प्रथा होय. शरीअतने ना या संबंधीचा आदेश दिला आहे आणि ना पैगंबरांचे सहवासातील अनुयायींमध्ये ही प्रथा प्रचलीत होती. या खेरीज यात वेगवेगळया प्रकारच्या उणीवा आहेत. उदाहरणार्थ पीरांच्या श्रद्धेत अत्याधिकता, व्यक्ति पूजा, या प्रकारच्या वचन देण्यास आखिरत मुक्ति साठी पर्याप्त समजणे, पीरांचा आपल्या विषयी चुकीच्या श्रेष्ठत्वात लीन होणे आणि आपल्या मुरीदांना चुकीचे मार्गदर्शन करणे. त्यांच्यावर शरीअत ऐवजी तरीकत जबरदस्ती पूर्वक लादणे आणि पैगंबर आचरणाचा आदर्श सोडून त्यांना धर्मबाहय रीती रिवाजामध्ये गुंतवून ठेवणे इत्यादि. यास्तव या प्रकारच्या वचनाचा किंवा प्रतिज्ञाचा इस्लामशी सुतराम संबंध नाही.

१८. अरबी भाषेचे शब्द शदली वरुन عَلَيْهِ الله अलैहिल्लाह असने आवश्यक होते, अर्थात अलैहची ه ''हा'' ला जेर असते पण हया आयतीत ه '' हा '' वर पेश अर्थात अलैहुल्लाह عَلَيْهُ الله पठण केले जाते. या प्रकारचे परीवर्तया अरबी भाषेत वार्णात प्रवाह उतपण करण्यासाठी केली जाते. येथे ही अलैह ला पेश (ُ) च्या बरोबर वाचल्याने वाणीत प्रवाह उत्तपण झाले आहे. आणि वाणीचे प्रवाह तर दर्याच्या प्रवाहणे अधिक आहे .

११. ग्रामीण अरब लोकांपैकी जे लोक मागे सोडून दिले गेले होते [११] ते तुम्हाला निश्चित म्हणतील की आम्हाला आपल्या सम्पत्ति व संततीने व्यस्त करून ठेवले होते. यास्तव आपण आमच्या करीता माफीची प्रार्थना करा. हे आपल्या जीभेने त्या गोष्टी बोलतात ज्या त्यांच्या मनात नाहीत [२०] सांगा, असा कोण आहे जो अल्लाहच्या विरोधात तुमच्या साठी काही अधिकार बाळगत असावा, जर तो (अल्लाह) तुम्हाला एखादे नुकसान किंवा लाभ पोहचवू इच्छिल? आणि ही वस्तुस्थिती आहे की अल्लाह तुमच्या कर्मांना जाणून आहे.

سَيَقُولُ لَكَ الْمُخَلَّفُونَ مِنَ الْأَعْرَابِ شَغَلَتْنَا أَمْوَالُنَا
وَأَهْلُونَا فَاسْتَغْفِرْ لَنَا ۚ يَقُولُونَ بِأَلْسِنَتِهِم مَّا لَيْسَ فِي
قُلُوبِهِمْ ۚ قُلْ فَمَن يَمْلِكُ لَكُم مِّنَ اللَّهِ شَيْئًا إِنْ أَرَادَ بِكُمْ
ضَرًّا أَوْ أَرَادَ بِكُمْ نَفْعًا ۚ بَلْ كَانَ اللَّهُ بِمَا تَعْمَلُونَ خَبِيرًا ﴿١١﴾

१२. परंतु तुम्ही हे गृहीत धरले की पैगंबर व ईमान बाळगणारे आता कधी ही आपल्या कुटुंबियांमध्ये परतून येऊ शकणार नाहीत.[२१] आणि ही गोष्ट तुमच्या मनाला मनोरम वाटली [२२] आणि तुम्ही दुराग्रह बाळगले [२३] आणि तुम्ही नाश पावणारे बनले.

بَلْ ظَنَنتُمْ أَن لَّن يَنقَلِبَ الرَّسُولُ وَالْمُؤْمِنُونَ إِلَىٰ أَهْلِيهِمْ أَبَدًا
وَزُيِّنَ ذَٰلِكَ فِي قُلُوبِكُمْ وَظَنَنتُمْ ظَنَّ السَّوْءِ
وَكُنتُمْ قَوْمًا بُورًا ﴿١٢﴾

१३. आणि ज्याने अल्लाह व त्याच्या पैगंबरावर ईमान बाळगले नाही, तर अशा काफिरां करीता [२४] आम्ही धगधगणारी आग तयार करून ठेवली आहे.[२५]

وَمَن لَّمْ يُؤْمِن بِاللَّهِ وَرَسُولِهِ فَإِنَّا أَعْتَدْنَا لِلْكَافِرِينَ
سَعِيرًا ﴿١٣﴾

१४. आकाशांची व जमीनीची राज्यसत्ता अल्लाहचीच आहे. तो ज्याला इच्छिल माफ करील व ज्याला इच्छिल शिक्षा देईल.[२६] तो मगफिरत (माफ) करणारा, दया करणारा आहे.[२७]

وَلِلَّهِ مُلْكُ السَّمَاوَاتِ وَالْأَرْضِ ۚ يَغْفِرُ لِمَن يَشَاءُ وَيُعَذِّبُ
مَن يَشَاءُ ۚ وَكَانَ اللَّهُ غَفُورًا رَّحِيمًا ﴿١٤﴾

१५. जेव्हा तुम्ही युद्धात जिंकलेला माल हस्तगत करण्यासाठी जाऊ लागाल, तेव्हा हे लोक, ज्यांना मागे सोडून दिले गेले, ते निश्चित म्हणतील की आम्हाला ही सोबत येऊ द्या.[२८]हे असे इच्छितात की अल्लाहच्या कथनास बदलून टाकावे (यांना) सांगा, तुम्ही कदापि आमच्या सोबत येऊ शकत नाही. ही गोष्ट अल्लाहने आधीच फर्माविलेली आहे.[२९]हे म्हणतील, नव्हे, किंबहुना तुम्ही लोक आमचा मत्सर करतात. परंतु वस्तुस्थिती अशी की हे लोक कमीच समजतात.[३०]

سَيَقُولُ الْمُخَلَّفُونَ إِذَا انطَلَقْتُمْ إِلَىٰ مَغَانِمَ لِتَأْخُذُوهَا
ذَرُونَا نَتَّبِعْكُمْ ۖ يُرِيدُونَ أَن يُبَدِّلُوا كَلَامَ اللَّهِ ۚ قُل لَّن
تَتَّبِعُونَا كَذَٰلِكُمْ قَالَ اللَّهُ مِن قَبْلُ ۖ فَسَيَقُولُونَ
بَلْ تَحْسُدُونَنَا ۚ بَلْ كَانُوا لَا يَفْقَهُونَ إِلَّا قَلِيلًا ﴿١٥﴾

१९. मदीनेच्या परिसरात राहणारे ग्रामीण अरब जे उमराच्या या मोहीमेत पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या सोबत सहभागी झाले नव्हते. या मागे राहून जाणाऱ्यांचा उल्लेख اَلْمُخَلَّفُوْنَ ''मागे सोडून दिले गेले होते'' या शब्दात केला गेला आहे ज्यात हा संकेत अध्यारूत आहे की त्या लोकांनी जेव्हा मागे राहून जाणे इच्छिले तेव्हा अल्लाहने देखील त्यांना मागे सोडून दिले. आणि त्यांना मोहीमे करीता निघण्याची सुबुद्धि प्रदान केली नाही.

२०. म्हणजे या ग्रामीण अरब लोकांना एखादी खरोखर अशी सबब नव्हती आणि ना त्यांना पैगंबरांच्या आवाहनानुसार या मोहीमेत सहभागी न झाल्या बद्दल पश्चातापाची जाणीव आहे त्यांची अल्लाहतर्फे क्षमा-प्राप्तीची प्रार्थना देखील केवळ त्यांच्या अप्रामाणिकतेवर आवरण घालण्या करीता आहे. अन्यथा अगदी सच्चा मनाने ते मगफिरतची अभिलाषा बाळगणारे नाहीत. यात दांभिकतेचे पितळ ही उघडे पडते आणि ते म्हणजे मन: पूर्वक ईमान न बाळगता स्वत:ला मुस्लिम म्हणून जाहीर करणे.

२१. हे दांभिक मुसलमान असे समजत होते की जेव्हा मुसलमान उमरा करीता मक्का शहरात प्रवेश करतील तेव्हा कुरेश व इतर कबिल्याचे लोक अपरिहार्यत: यांच्याविरूद्ध लढतील आणि मुसलमान ज्याअर्थी युद्धाच्या तयारी निशी जात नाहीत म्हणून आपला बचाव करू शकणार नाहीत. परिणामी आता पैगंबरासह मुसलमानांच्या संपूर्ण जमातीचा नायनाट नक्की आहे. दांभिक मुसलमानांनी हेच गृहीत धरले होते ज्यामुळे त्यांनी या मोहीमेत पैगंबरांना साथ दिली नाही मात्र आता ते या गोष्टीस लपवून आपल्या व्यस्ततेची सबब पुढे करीत आहे.

२२. म्हणजे जेव्हा ते बघत होते की मुसलमानांची जमात पैगंबरांच्या नेतृत्वात एक अतिशय धोक्याची मोहीम सर करण्यासाठी निघाली आहे, तेव्हा ते निर्धास्तपणे कशा रीतीने आपल्या घरांमध्ये बसून राहीले. त्यांची ही भ्याड पणाची कृती त्यांना अशासाठी चांगली वाटली की त्यांची विचारसरणीच मूळात चुकीची होती.

२३. म्हणजे तुम्ही अल्लाह व त्याच्या पैगंबराच्या संबंधाने दुराग्रह बाळगले उदाहरणार्थ हे की अल्लाहचा वायदा पूर्ण होणारा नाही आणि ना पैगंबराचे स्वप्न खरे ठरणार आहे.

२४. अल्लाहवर ईमान बाळगण्या सोबतच त्याच्या पैगंबरावर ही ईमान बाळगणे अगत्याचे आहे. जो मनुष्य अल्लाहवर ईमान बाळगत नाही तो काफीर आहे आणि जो मनुष्य अल्लाहवर तर ईमान बाळगतो परंतु त्याचे पैगंबर मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्यावर ईमान बाळगत नाही, तो देखील काफीर आहे ही आयत ही याचा खुलासा करते आणि इतर आयती देखील या बाबतचे प्रमाण होत.

२५. अर्थात जहन्नम.

२६. हा अल्लाहच्या अमर्याद अधिकारांचा उल्लेख आहे की तो यांना जसे इच्छितो तसे वापरतो. या सोबतच तो न्याय करणारा व बुद्धिकौशल्य बाळगणारा आहे. म्हणून तो आपल्या अधिकारांना न्याय व बुद्धिकौशल्यासह वापरतो. म्हणून असे होत नाही की त्याने उगाच एखाद्याला शिक्षा द्यावी.

२७. हे प्रोत्साहन आहे दासांना की जर त्यांच्या हातून अपराध घडले असतील तर त्यांनी निराश होऊ नये, किंबहुना अल्लाहला सर्वतोपरि शरण जावे आणि त्याच्या माफीचे व कृपेचे अभिलाषी बनावे.

२८. संकेत आहे भविष्यात लवकरच घडून येणाऱ्या विजयांकडे जे सहजगत्या प्राप्त होऊ शकतील व ज्यात विपुल प्रमाणात माले गनीमत (युद्धात जिंकलेला माल) मुसलमानांच्या हाती लागेल. यास्तव हुदैबिया तहाच्या काही दिवसा नंतरच मोहर्रम हि.स.८मध्ये खैबर जिंकले जो मदीनेच्या उत्तर पश्चिमेस सुमारे दिडशे किलोमीटर अंतरावर आहे. या ठिकाणी ग्रामीण अरब राहात होते आणि हा भूप्रदेश मजबूत कील्ले, सुपीक शेतजमीन व हिरवळीच्या जागांमुळे मोठे महत्व बाळगून होता. या विजयात मोठया प्रमाणात माले गनीमत मुसलमानांच्या हाती लागला आणि शेतीच्या जमीनी व हिरवळींच्या जागा व खजूरांच्या बागांच्या उत्पन्नामुळे मुसलमानांच्या साधन सामुग्रीत मोठी वाढ झाली.

हा युद्धात जिंकलेला माल अल्लाहने 'बैअते रिजवान' करणाऱ्यां करीता खास केला होता, म्हणून या युद्धात त्याने त्या लोकांना सहभागी होण्याची परवानगी दिली नाही जे उमराच्या प्रवासात, तो धोकेदायक असल्यामुळे सहभागी झाले नव्हते.

२९. म्हणजे खैबर युद्ध होण्यापूर्वी जेव्हा सूरह फतह अवतरली. या आयतीत अल्लाहने हा आदेश दिला होता की या मागे राहून जाणाऱ्यांना नजिकच्या भविष्यात घडून येणाऱ्या युद्धात सहभागी होण्याची अनुमति दिली जाऊ नये ज्यात माले गनीमत प्राप्त होण्याची अपेक्षा आहे. कारण जेव्हा त्यांनी एका धोकादायक मोहीमेत पैगंबरांची साथ दिली नाही तर या माले गनीमत पासून वंचित राहणेच त्यांच्या नशीबी येईल.

३०. अल्लाहने प्रत्येक माणसाला बुद्धि दिली आहे मग तो शहरात राहणारा असो किंवा ग्रामीण, मग तो सर्वसामान्य लोकांपैकी असो कि विशेष लोकांपैकी. आणि ही बुद्धि अशासाठी दिली गेली आहे की त्याने समंजस पणाचा पुरावा द्यावा परंतु जेव्हा मनुष्य बुद्धिचा वापर करीत नाही तेव्हा असंमजस पणाच्या गोष्टी बोलू लागतो.

१६. या ग्रामीण अरबांना, जे मागे सोडून दिले गेले आहेत, सांगा की लवकरच तुम्हाला एका अति शक्ति शाली जन समूहाशी मुकाबल्या करीता बोलावले जाईल. तुम्हाला त्यांच्याशी युद्ध करावे लागेल किंवा ते इस्लाम मध्ये दाखल होतील. [३१] जर तुम्ही या आदेशाचे पालन केले तर अल्लाह तुम्हाला चांगला मोबदला देईल. आणि जर तुम्ही तोंड फिरवले, तर तो तुम्हाला दुःखदायक शिक्षा देईल.[३२]

قُل لِّلْمُخَلَّفِينَ مِنَ الْأَعْرَابِ سَتُدْعَوْنَ إِلَىٰ قَوْمٍ أُولِي بَأْسٍ
شَدِيدٍ تُقَاتِلُونَهُمْ أَوْ يُسْلِمُونَ ۖ فَإِن تُطِيعُوا يُؤْتِكُمُ اللَّهُ أَجْرًا
حَسَنًا ۖ وَإِن تَتَوَلَّوْا كَمَا تَوَلَّيْتُم مِّن قَبْلُ يُعَذِّبْكُمْ عَذَابًا أَلِيمًا ﴿١٦﴾

१७. आंधळया (च्या जेहाद करीता न निघण्या) बद्दल काही ही आक्षेप नाही आणि ना पांगळा व आजारी बद्दल काही आक्षेप आहे [३३] आणि जो अल्लाह व त्याच्या पैगंबराचे आज्ञा पालन करील, त्याला तो अशा बागांमध्ये दाखल करील, ज्यांच्या खाली प्रवाह वाहत असतील [३४] आणि जो तोंड फिरविल त्याला तो दुःखदायक अजाब (शिक्षा) देईल.

لَّيْسَ عَلَى الْأَعْمَىٰ حَرَجٌ وَلَا عَلَى الْأَعْرَجِ حَرَجٌ وَلَا عَلَى الْمَرِيضِ
حَرَجٌ ۗ وَمَن يُطِعِ اللَّهَ وَرَسُولَهُ يُدْخِلْهُ جَنَّاتٍ تَجْرِي مِن تَحْتِهَا
الْأَنْهَارُ ۖ وَمَن يَتَوَلَّ يُعَذِّبْهُ عَذَابًا أَلِيمًا ﴿١٧﴾

१८. अल्लाह राजी झाला ईमान बाळगणाऱ्यांशी, जेव्हा ते झाडाखाली तुमच्याशी बैअत (प्रतिज्ञा) करीत होते.[३५] त्याने जाणून घेतली त्यांच्या हृदयांची स्थिती.[३६] यास्तव त्याने त्यांच्या वर शांती अवतरीत केली [३७] आणि त्यांना एक निकटचा विजय प्रदान केला.[३८]

لَّقَدْ رَضِيَ اللَّهُ عَنِ الْمُؤْمِنِينَ إِذْ يُبَايِعُونَكَ تَحْتَ الشَّجَرَةِ
فَعَلِمَ مَا فِي قُلُوبِهِمْ فَأَنزَلَ السَّكِينَةَ عَلَيْهِمْ وَأَثَابَهُمْ
فَتْحًا قَرِيبًا ﴿١٨﴾

१९. आणि गनीमतीचे अनेक प्रकारचे माल ज्यांना ते प्राप्त करतील [३९] अल्लाह वर्चस्वशाली, बुद्धिकौशल्य बाळगणारा आहे.[४०]

وَمَغَانِمَ كَثِيرَةً يَأْخُذُونَهَا ۗ وَكَانَ اللَّهُ عَزِيزًا حَكِيمًا ﴿١٩﴾

२०. अल्लाहने तुमच्याशी विपुल (प्रमाणात) युद्धात जिंकलेल्या मालाचा वायदा केला आहे. ज्यांना तुम्ही प्राप्त कराल [४१] आणि ताबडतोब तुम्हाला ही (मदत) प्रदान केली आणि लोकांचे हात तुमच्या पासून रोखले [४२] आणि हे अशासाठी केले की ईमान बाळगणाऱ्यां करीता एक निशाणी व्हावी [४३] आणि तुम्हाला सरळ मार्गावर चालवावे.[४४]

وَعَدَكُمُ اللَّهُ مَغَانِمَ كَثِيرَةً تَأْخُذُونَهَا فَعَجَّلَ لَكُمْ هَٰذِهِ
وَكَفَّ أَيْدِيَ النَّاسِ عَنكُمْ وَلِتَكُونَ آيَةً لِّلْمُؤْمِنِينَ
وَيَهْدِيَكُمْ صِرَاطًا مُّسْتَقِيمًا ﴿٢٠﴾

३१. इशारा आहे हवाजन कबिल्याकडे ज्याच्याशी शव्वाल हि. स. ८ मध्ये लढाई झाली ही मक्का युद्धाच्या शृंखलेचीच एक कडी होती हवाजन मोठे लढवय्ये व तिरंदाजीत निपुण होते. त्यांच्याशी टक्कर घेणे सोपे नव्हते. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी जेव्हा मक्केवर विजय मिळविला तेव्हा हवाजनच्या दिशेने सरसावले ज्यांनी युद्धाची जबरदस्त तयारी करून ठेवली होती. पैगंबरांसोबत बारा हजारांचे सैन्य होते तरी ही कठीण प्रसंगाला तोंड द्यावे लागले. शेवटी हवाजन कबीला पराभूत झाला आणि इस्लामच्या सैन्याला विजय प्राप्त झाला. आणि विपुल प्रमाणात माले गनीमत हाती लागला. यानंतर हवाजनचे लोक ही इस्लाम धर्मात दाखल झाले. अशा प्रकारे मक्केवर इस्लामचा अधिकार मजबूत झाला.

३२. या तंबीचा परिणाम असा झाला की मदीनेच्या परिसरातील मजिना व जहिना सारखे कबीले जे हुदैबिया प्रसंगी मागे राहीले होते. मक्का विजयाच्या मोहीमेत सहभागी झाले आणि हुनेन मध्ये हवाजनशी लढाई केली जो अतिशय शक्तिशाली जन समूह होता.

या युद्धापासून तोंड फिरविणाऱ्यांना दु:खदायक शिक्षेची ताकीद ऐकविली गेली आहे. ज्यावरून या अपराधाची भयानकता स्पष्ट होते. हा गुन्हा अशासाठी भयंकर होता की प्रथम तर अल्लाह व त्याच्या पैगंबराच्या स्पष्ट आदेशा (जेहादच्या आदेशा) ची उघड अवज्ञा होती दुसरे असे की एका अशा नाजुक प्रसंगी जेव्हा इस्लामला अत्याधिक संकटांना तोंड द्यावे लागले व यासाठी अधिकाधिक सामूहीक सामर्थ्याची गरज होती; अशा प्रसंगी चैनीत बसून राहणे एखाद्या मुसलमानाचे काम नव्हते. तिसरे असे की अल्लाहच्या पैगंबराने आपला जीव धोक्यात टाकून युद्धासाठी निघावे व त्याच्या अनुयायींनी चैनीत आपापल्या घरांमध्ये बसून राहावे ही अगदी उघड स्वरूपाची दांभिकता होय. म्हणून हे युद्ध ज्यात मार्गदर्शन व नेतृत्वा करीता स्वत: अल्लाहचे पैगंबर हजर होते, ईमानाची कसोटीच ठरली. यापासून तोंड फिरवणारे तेच लोक असू शकत होते जे आपल्या ईमान संदर्भात प्रामाणिक नव्हते.

३३. म्हणजे असे लोक ज्यांना एखाद्या खऱ्या सबबीमुळे जेहाद मध्ये सहभागी होणे शक्य नाही, त्यांच्यावर काहीच आक्षेप नाही आंधळा, पांगळा व आजारी असणे या खरोखर अगतिकतेच्या अवस्था होत. ज्यांचा शरीअतने विचार केला आहे.

३४. म्हणजे खऱ्या संबबींमुळे जेहाद मध्ये भाग न घेणाऱ्यांवर काहीच आक्षेप नाही. मात्र या अटीवर की त्यांनी अल्लाह व त्याच्या पैगंबराचे प्रामाणिकपणे आज्ञापालन करीत रहावे. त्यांचे मन:पूर्वक आज्ञापालनच त्यांना जन्नत पात्र बनवू शकते.

३५. हे वचन पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी हुदैबिया या ठिकाणी आपल्या सहवासातील अनुयायींकडून त्यावेळी घेतले जेव्हा हजरत उस्मान, ज्यांना पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी कुरेश कबिल्याकडे हा संदेश देऊन पाठविले की आम्ही लढण्या करीता नव्हे. तर उमरा करण्या करीता आलो आहोत; परत आले नाहीत, तेव्हा चिंताजनक स्थिती निर्माण झाली की उमरा अदा करण्या करीता आता मक्केच्या काफिरांकडून प्रतिकाराला तोंड द्यावे लागेल व अशा स्थितीत द्यावे लागेल की मुसलमान एहरामच्या अवस्थेत आहेत आणि त्यांच्याजवळ युद्ध-सामुग्री ही नाही. स्वसंरक्षणाकरीता फक्त तरवारी आहेत ज्या प्रवासात सोबतीला राहत. अशा कठीण प्रसंगी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी एका झाडा खाली आपल्या सोबतच्या अनुयायींकडून हे वचन घेतले की त्यांनी कोणत्याही परिस्थितीत पळ काढू नये आणि डोळयासमोरील उद्दिष्ट गाठण्या करीता आपल्या जीवा निशी लढावे. पैगंबरांच्या सहवासातील अनुयायींनी ज्यांची संख्या एक हजार चारशे होती, मोठया उत्साहाने व प्रसन्न मनाने हे वचन दिले. या वचनाने कुरेश कबिल्यावर दरारा बसला. आणि त्यांनी तहाचा प्रस्ताव मांडला आणि याच्या आधी हजरत उस्मान ही सुखरूपपणे परतले. अल्लाहला हे वचन, जे एका नाजुक प्रसंगी पैगंबराची साथ देण्यासाठी जीव धोक्यात टाकून दिले गेले होते फार आवडले आणि वचन देणाऱ्यांना या आयतीद्वारे ही शुभवार्ता दिली की अल्लाह त्यांच्याशी प्रसन्न झाला. या कारणास्तव या 'वचना' स 'बैअते रिज़वान' असे म्हणतात.

हजरत उस्मान यांचे त्या वेळे पावेतो मक्केहून परतणे झाले नव्हते यासाठी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी त्यांच्यातर्फे स्वत:च वचन दिले. अशा प्रकारे हजरत उस्मान यांना ही या वचन सोहळयात सहभागी होण्याचे सदभाग्य लाभले. हजरत उस्मान यांच्यातर्फे पैगंबरांचे वचन देणे या गोष्टीचा पुरावा आहे की पैगंबरांनी या वार्तेवर विश्वास ठेवला नव्हता की हजरत उस्मान यांना मक्केत ठार केले गेले आणि ना या अफवेमुळे त्यांनी आपल्या सोबतच्या अनुयायींकडून वचन घेतले होते, किंबहुना मक्केच्या काफिरांकडून त्रास दिला जाईल या भितीने हे वचन घेतले गेले.

ही आयत पैगंबरांच्या सहवासातील त्या समस्त अनुयायींना जे या वचनात सहभागी होते, अल्लाहच्या प्रसन्नतेची सनद प्रदान करते. असे असतांना ही मुसलमानांचा एक पंथ असा आहे जो काही व्यक्तिंचा अपवाद वगळता पैगंबरांच्या सहवासातील अनुयायींच्या संपूर्ण समूहाला दोषी ठरवितो. व त्यांच्यावर आळ घेतो. या पंथाच्या लोकांचे अज्ञान पहा की अल्लाहने ज्या

लोकांच्या बाबतीत आपल्या शुभवार्तेचे ऐलान केले आहे, त्यांच्याशी ते कपट जाहीर करतात. या लोकांनी सांप्रदायिकतेहून उच्च स्तर गाठून कुरआनाच्या प्रकाशात आपली भूमिका निश्चित केली असती तर त्यांच्याच हिताचे झाले असते.

३६. म्हणजे यांच्या अंत: करणातील प्रामाणिकता व त्यांची एक निष्ठता जाहीर झाली.

३७. म्हणजे मनाचे समाधान व शांती त्यांना लाभली आणि ही गोष्ट त्यांची हिमत वाढविण्यास कारक ठरली यास्तव धोक्यांनी पूर्ण अशा परिस्थितीत ही त्यांची हिंमत खचली नाही व प्रत्येक प्रकारच्या संकटाला तोंड देण्याकरीता ते तयार झाले.

३८. अभिप्रेत खैबरचा विजय होय. ही घटना हुदैबिया तहाच्या काही दिवसानंतरचीच म्हणजे मुहर्रम हि. स. ८ची घटना होय. हा विजय अल्लाहतर्फे एक देणगी एक बक्षिस होते जे बैअते रिज़वान करणाऱ्यांना लाभले. निकटच्या विजयाचे भाकित एक निश्चित स्वरूपाची गोष्ट होती. यास्तव याला भूतकालीन शैलीत निवेदिले गेले.

३९. संकेत खैबर वगैरे मध्ये प्राप्त होणाऱ्या माले गनीमत कडे आहे. या भाकिता नुसार खैबर मध्ये जो जिंकलेला माल मुसलमानांच्या हाती लागला यात सोने व चांदीचा खजिना, एक हजार भाले, चारशे तरवारी, पाचशे धनुष्य, इतर स्वरूपाची युद्ध सामुग्री, तसेच शेत जमीनी व हिरवळीच्या बागा इत्यादिंचा समावेश आहे ज्यात चाळीस हजार खजूरांची झाडे होती. या शेतांना व बागांना यहूदीच्या हातात या अटीवर राहू दिले गेले की ते उत्पन्नाचा निम्मा हिस्सा मुसलमानांना देतील. अशा प्रकारे मदीनाच्या मुसलमानांकरीता हे उत्पन्नाचे फार मोठे साधन बनले. (गजवा खैबर - मुहम्मद अहमद बाश्मील पृ. २७०-२७१) आणि खैबर जिंकताच फदक आणि कूरा खोरे ही जिंकले गेले जो खैबरच्या जवळ सुपीक भू प्रदेश होता.या प्रदेशातील यहूदींशी ही हे ठरले की त्यांनी उत्पन्नाचा अर्धा हिस्सा मुसलमानांना द्यावा (वर उल्लेखिलेला ग्रंथ - पृ. २९७)

४०. अल्लाह वर्चस्वशाली आहे म्हणून त्याची ही योजना पूर्ण होईलच आणि तो बुद्धि कौशल्य बाळगणारा आहे यास्तव त्याचा हा निर्णय ही बुद्धि कौशल्यावर आधारीत आहे.

४१. म्हणजे खैबर खेरीज इतर अनेक प्रकारचा माले गनीमत तुम्हाला लाभेल. यास्तव निकटच्या भविष्यात हुनेन मध्ये मोठया प्रमाणात माले गनीमत (युद्धात जिंकलेला माल) मुसलमानांच्या हाती लागला.

४२. म्हणजे बैअते रिज़वानचे तत्काळ फळ तुम्हाला हे मिळाले की अल्लाहची मदत तुम्हाला लाभली आणि तुमचा दरारा मक्केतील काफिरांवर असा बसला की त्यांना तुमच्यावर हात उचलण्याची हिंमत झाली नाही, उलट तहाची बोलणी करण्यास तयार झाले.

४३. म्हणजे अशा प्रसंगी, जेव्हा मुसलमान एहरामच्या अवस्थेत असल्यामुळे युद्ध करण्याच्या स्थितीत नव्हते आणि शत्रूच्या प्रदेशात दाखल झाले होते. मक्केच्या काफिरांचे मुसलमानांविरूद्ध कारवायी न करणे व तहाकरीता तयार होणे ही मुसलमानांच्या हक्कात अल्लाहची मदत असल्याचे स्पष्ट चिन्ह होते.

४४. म्हणजे अल्लाहने पाऊला पाऊलावर तुमचे मार्गदर्शन करावे.

## ख़ैबर चे घटना स्थळ
### मदीने पासून सुमारे दीडशे किलोमिटर



२१. आणि इतर माले गनीमत देखील, ज्यावर तुम्ही अद्याप समर्थ झाले नाहीत. परंतु अल्लाहने त्यांचा घेरा करून ठेवला आहे [४५] आणि अल्लाह प्रत्येक गोष्ट करण्यास समर्थ आहे!

وَأُخْرَىٰ لَمْ تَقْدِرُوا عَلَيْهَا قَدْ أَحَاطَ اللَّهُ بِهَا ۚ وَكَانَ اللَّهُ
عَلَىٰ كُلِّ شَيْءٍ قَدِيرًا ﴿٢١﴾

२२. जर या काफिरांनी तुमच्याशी युद्ध केले असते तर निश्चितच त्यांनी पाठ फिरवली असती, मग ना कोणी कार्य साधक त्यांना आढळला असता आणि ना सहाय्यक.[४६]

وَلَوْ قَاتَلَكُمُ الَّذِينَ كَفَرُوا لَوَلَّوُا الْأَدْبَارَ ثُمَّ لَا يَجِدُونَ
وَلِيًّا وَلَا نَصِيرًا ﴿٢٢﴾

२३. हा अल्लाहचा नियम आहे जो पहिल्या पासून चालत आला आहे [४७] आणि अल्लाहच्या नियमात तुम्हाला कदापि एखादे परिवर्तन आढळणार नाही.

سُنَّةَ اللَّهِ الَّتِي قَدْ خَلَتْ مِنْ قَبْلُ ۖ وَلَنْ تَجِدَ لِسُنَّةِ
اللَّهِ تَبْدِيلًا ﴿٢٣﴾

२४. तोच होय ज्याने मक्केच्या खोऱ्यात त्यांच्या हातांना तुमच्या पासून व तुमच्या हातांना त्यांच्या पासून रोखले. यानंतर की त्यांच्यावर तुम्हाला वर्चस्व प्रदान केले होते.[४८] आणि जे काही तुम्ही करीत होते, ते अल्लाह पाहत होता.

وَهُوَ الَّذِي كَفَّ أَيْدِيَهُمْ عَنْكُمْ وَأَيْدِيَكُمْ عَنْهُمْ بِبَطْنِ مَكَّةَ
مِنْ بَعْدِ أَنْ أَظْفَرَكُمْ عَلَيْهِمْ ۚ وَكَانَ اللَّهُ بِمَا تَعْمَلُونَ بَصِيرًا ﴿٢٤﴾

२५. तेच लोक होत ज्यांनी कुफ्र (इन्कार) केला आणि तुम्हाला मसजिदे हराम पासून रोखले आणि कुर्बानीच्या जनावरांना ही रोखून ठेवले की ते आपल्या ठिकाणी (म्हणजे कुर्बानीच्या ठिकाणी) पोहचू नयेत [४९] आणि असे ईमान बाळगणारे पुरूष व ईमान बाळगणाऱ्या स्त्रीया (मक्केत) हजर नसत्या, ज्यांना तुम्ही जाणत नाही आणि ज्यांच्या विषयी हे भय नसते की तुम्ही यांना अजाणते पणी चिरडून टाकाल व त्यांच्या संबंधाने तुमच्यावर आळ येईल (तर युद्ध रोखले गेले नसते. ते एवढया साठी रोखले गेले) की अल्लाहने आपल्या कृपेत इच्छील त्याला दाखल करावे.[५०] आणि जर ते वेगळे झाले असते; तर आम्ही या (मक्का वाल्यां) पैकी ज्यांनी कुफ्र केला (त्यांना) दुःखदायक शिक्षा दिली असती.[५१]

هُمُ الَّذِينَ كَفَرُوا وَصَدُّوكُمْ عَنِ الْمَسْجِدِ الْحَرَامِ وَالْهَدْيَ
مَعْكُوفًا أَنْ يَبْلُغَ مَحِلَّهُ ۚ وَلَوْلَا رِجَالٌ مُؤْمِنُونَ وَنِسَاءٌ مُؤْمِنَاتٌ
لَمْ تَعْلَمُوهُمْ أَنْ تَطَئُوهُمْ فَتُصِيبَكُمْ مِنْهُمْ مَعَرَّةٌ بِغَيْرِ عِلْمٍ ۖ
لِيُدْخِلَ اللَّهُ فِي رَحْمَتِهِ مَنْ يَشَاءُ ۚ لَوْ تَزَيَّلُوا لَعَذَّبْنَا الَّذِينَ
كَفَرُوا مِنْهُمْ عَذَابًا أَلِيمًا ﴿٢٥﴾

४५. संकेत आहे त्या मोठ मोठया विजयांकडे जे भविष्यात मुसलमानांना प्राप्त होणार होते. विशेषतः फारस व रोमचे विजय, ज्यात जबरदस्त खजीने व अनेक विध स्वरूपाचा जिंकलेला माल मुसलमानांच्या हाती लागला.

४६. म्हणजे जर मक्का शहरात प्रवेश करण्या करीता युद्धाची पाळी आली असती तर या युद्धात मुसलमानांना विजय मिळाला असता व मक्केच्या काफिरांना अपरिहार्यतः पराभूत व्हावे लागले असते. हे अशासाठी की मुसलमानांच्या सोबत युद्ध सामुग्री नव्हती तरी जेव्हा ते अल्लाहच्या मार्गात आपला जीव अर्पण करण्यास तयार झाले तेव्हा अल्लाहची मदत ही त्यांच्याकरीता निश्चित झाली आणि अल्लाहच्या मदतीच्या विरोधात काफिरांना पराजयाचेच तोंड पहावे लागले आहे जसे बद्रच्या युद्धात घडले.

४७. अल्लाहचा नियम म्हणजे त्याचा कायदा असा आहे की जेव्हा पैगंबराला स्वतः लढाईच्या मैदानात उतरावे लागते तेव्हा हे युद्ध सत्य व असत्याचा दरम्यान एक निर्णायक युद्ध ठरते. अशा प्रसंगी अल्लाहची मदत नेहमी त्याच्या पैगंबराच्या व त्यावर ईमान बाळगणाऱ्यांच्या सोबत असते.

सूरह रूम मध्ये फर्माविले गेले आहे.

وَلَقَدْ اَرْسَلْنَا مِنْ قَبْلِکَ رُسُلاً اِلٰی قَوْمِهِمْ
فَجَآءُوْهُمْ بِالْبَیِّنَاتِ فَانْتَقَمْنَا مِنَ الَّذِیْنَ اَجْرَمُوْا
وَكَانَ حَقّاً عَلَیْنَا نَصْرُ الْمُؤْمِنِیْنَ۔ (الروم:۴۷)

'' आम्ही तुमच्या पूर्वी ही पैगंबरांना त्यांच्या जन समूहांकडे पाठविले होते आणि ते त्यांच्या जवळ स्पष्ट निशाण्या घेऊन आले होते. मग आम्ही त्या लोकांना शिक्षा दिली ज्यांनी अपराध केला आणि ईमान बाळगणाऱ्यांची मदत करणे आम्हाला भाग होते.'' (रूम - ४७)

४८.म्हणजे हुदैबियात बैअते रिज़वान नंतर तुमची स्थिती चांगली मजबूत झाली होती आणि मक्केच्या काफिरांची हिम्मत खचली होती तरी ही युद्ध दोघांना ही नकोसेच झाले होते परंतु अल्लाहच्या हेतुची ही निकड होती की युद्ध होऊ नये म्हणून त्याने दोन्ही पक्षांना संघर्षा पासून रोखले आणि तहासाठी तयार केले.

संघर्षा पासून रोखण्याची एक स्थिती अशी ही उदभवली की काफिरांचा एक समूह ज्याची संख्या ऐंशी होती, पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांची हत्या करण्याच्या इराद्याने तनईम नावाच्या टेकडीवरून प्रातःकालीन नमाजच्या वेळी उतरला पैगंबरांच्या सहवासातील अनुयायींनी त्यांना पकडले व पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या सेवेश सादर केले. त्यावेळी पैगंबर युद्धाला टाळू इच्छित होते म्हणून त्यांना मुक्त केले गेले. (पहा तिर्मिजी तफसीर सूरह फतह)

४९. हा काफिरांचा हट्टीपणा होता की कुर्बानीच्या जनावरांना ही ज्यांचा ते मोठा आदर करीत, कुर्बानीच्या ठिकाणी जाण्या पासून रोखले.

५०. या ठिकाणी ते म्हान उद्दिष्ट निवेदिली गेले आहे, जे लक्षात घेता अल्लाहने युद्ध होऊ दिले नाही आणि हुदैबिया तहाचा मामला झाला, तो असा की मक्का शहरात मुसलमान पुरूष व स्त्रीया होत्या ज्यांना पैगंबराच्या सहवासातील अनुयायी जाणत नव्हते म्हणून ते लढाईस बळी पडण्याची व चिरडले जाण्याची भिती होती. सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्यांच्या ईमानामुळे त्यांच्यावर दया केली व युद्धाची पाळी येऊ दिली नाही. जर ते मुसलमानांच्या हस्ते चिरडले गेले असते तर ही गोष्ट स्वतः मुसलमानांना अप्रिय वाटली असती. परिणामी शत्रूला हे बोलण्याची संधी मिळाली असती की जे युद्ध पैगंबराच्या नेतृत्वात लढले गेले त्यातही मुसलमानांनी आपल्याच बांधवांचा गळा कापला.

यावरून हा निष्कर्ष निघतो की जर काफिरांच्या वस्तीवर हल्ला करावा लागला तर तिथे जे मुसलमान राहात असतील त्यांना ओळखण्याचा कसोशीने प्रयत्न केला पाहीजे परंतु जर युद्ध अनिवार्य असेल व तिथल्या वस्तीच्या मुसलमानांना वाचविले जाऊ शकत नसेल तर त्यांच्यामुळे युद्ध टाळले जाऊ शकत नाही अन्यथा काफिरांना मुसलमानांवर वरचढ होण्याची संधी मिळेल. हुदैबियात अल्लाहच्या उपाय योजनेने युद्ध टळले अन्यथा बैअते रिज़वान यासाठीच केले गेले होते की जर युद्धाची पाळी आलीच तर मुसलमान पाठ दाखविणार नाहीत.

हुदैबिया तहाचा हा हेतु अल्लाहने नंतर जाहीर केला आणि पैगंबरांच्या सहवासातील अनुयायींनी पैगंबरांच्या आदेशाचे पालन तर हा हेतु जाहीर होण्या आधीच केले होते. वास्तविक हा तहा त्यांना अप्रिय वाटत होता आणि याची कटुता दूर करण्या करीता यांच्यावर हा हेतु उघड केला गेला व त्यांना अनेक शुभ समाचार ऐकविले गेले. तात्पर्य, आदेशाचे पालन हेतु जाणून घेण्यावर अवलंबून नाही. अल्लाह व त्याच्या पैगंबराचा आदेश पालन करण्यास पर्याप्त आहे मग त्याचा हेतु जाहीर होवो अथवा न होवो. पैगंबरांच्या सहवासातील अनुयायींची हीच पद्धत होती ज्यामुळे त्यांना अधिकाधिक सुबुद्धि प्रदान होत गेली व अल्लाहच्या प्रसन्नतेचा लाभ होत गेला आजच्या काळातील मुसलमान आधी हेतु जाणून घेऊ इच्छितो नंतरच पालन करण्यास तयार होतो किंवा होत ही नाही. ही मोठी चुकीची विचार सरणी आहे जी आज्ञा पालना विरूद्ध आहे.

५१.म्हणजे जे मुसलमान मक्केत हजर होते ते जर काफिरांच्या वस्तीपासून वेगळे झाले असते तर अल्लाहची उपाय योजना अशी राहीली असती की मुसलमानांनी मक्का शहरात बलपूर्वक प्रवेश करावा मग त्यांच्या हस्ते काफिरांची गळचेपी केली जावी.

२६. जेव्हा काफिरांनी आपल्या मनात पक्षांधता आणली, अज्ञान पूर्ण पक्षांधता [५२] तेव्हा अल्लाहने आपल्या पैगंबर व ईमान बाळगणाऱ्यांवर आपली शांती अवतरीत केली [५३]आणि त्यांना ईश भयाच्या गोष्टीवर दृढ राखले आणि ते या गोष्टीचे हक्कदार व पात्र होते [५४]आणि अल्लाह प्रत्येक गोष्ट जाणणारा आहे.

إِذْ جَعَلَ الَّذِينَ كَفَرُوا فِي قُلُوبِهِمُ الْحَمِيَّةَ حَمِيَّةَ
الْجَاهِلِيَّةِ فَأَنزَلَ اللَّهُ سَكِينَتَهُ عَلَىٰ رَسُولِهِ وَعَلَى
الْمُؤْمِنِينَ وَأَلْزَمَهُمْ كَلِمَةَ التَّقْوَىٰ وَكَانُوا أَحَقَّ بِهَا
وَأَهْلَهَا ۚ وَكَانَ اللَّهُ بِكُلِّ شَيْءٍ عَلِيمًا ﴿٢٦﴾

२७. अल्लाहने आपल्या पैगंबरास खरे स्वप्न दाखविले होते, जे सत्यावर आधारीत होते. अल्लाहने इच्छिल्यास तुम्ही खचितच मसजिदे हराम मध्ये शांती पूर्वक दाखल व्हाल. आपले डोके मुंडवीत व केस कतरवीत. तुम्हाला कसलेही भय नसेल [५५] तेव्हा,त्याने जाणली ती गोष्ट, जी तुम्ही नाही जाणली.[५६] यास्तव त्याने यापूर्वी तुम्हाला एक निकटचा विजय प्रदान केला.[५७]

لَقَدْ صَدَقَ اللَّهُ رَسُولَهُ الرُّؤْيَا بِالْحَقِّ ۖ لَتَدْخُلُنَّ الْمَسْجِدَ
الْحَرَامَ إِن شَاءَ اللَّهُ آمِنِينَ مُحَلِّقِينَ رُءُوسَكُمْ وَمُقَصِّرِينَ
لَا تَخَافُونَ ۖ فَعَلِمَ مَا لَمْ تَعْلَمُوا فَجَعَلَ مِن دُونِ ذَٰلِكَ فَتْحًا
قَرِيبًا ﴿٢٧﴾

२८. तोच होय ज्याने आपल्या पैगंबरास मार्गदर्शन व सत्य धर्मासह पाठविले. यासाठी की समस्त धर्मांवर याला वर्चस्व शाली करावे [५८] आणि (या बाबत) अल्लाहचे साक्षी असणे पर्याप्त आहे.

هُوَ الَّذِي أَرْسَلَ رَسُولَهُ بِالْهُدَىٰ وَدِينِ الْحَقِّ لِيُظْهِرَهُ
عَلَى الدِّينِ كُلِّهِ ۚ وَكَفَىٰ بِاللَّهِ شَهِيدًا ﴿٢٨﴾

२९ मुहम्मद अल्लाहचे पैगंबर आहेत [५९] आणि जे लोक यांच्या सोबत आहेत ते काफिरांवर कठोर आणि आपसात सहृदय आहेत [६०]तुम्ही यांना रूकूअ व सजद्याच्या अवस्थेत पहाल [६१] (आणि पहाल की) ते अल्लाहची कृपा व त्याच्या प्रसन्नतेच्या याचनेत मग्न आहेत [६२]त्यांचे लक्षण त्यांच्या चेहऱ्यांवर सजद्यांचे निशाण होय.[६३] त्यांचा हा गुणविशेष तौरात मध्ये निवेदिला गेला आहे [६४] आणि इंजिल मध्ये यांचे उदाहरण अशा प्रकारे निवेदिले गेले आहे की जणू शेती, जिने आपले अंकूर बाहेर काढले मग त्याला मजबूती दिली मग ते जाड झाले, मग आपल्या खोडावर उभे राहीले.[६५] ते शेतकऱ्याला प्रसन्नचित करते. या साठी की काफिरांनी यांच्याशी (संतापात) जळावे.[६६]अल्लाहने त्या लोकांशी,ज्यांनी यांच्यापैकी ईमान बाळगले आणि ज्यांनी सत्कर्म केले, मगफिरत (माफी) व महान मोबदल्याचा वायदा केला आहे.[६७]

مُّحَمَّدٌ رَّسُولُ اللَّهِ ۚ وَالَّذِينَ مَعَهُ أَشِدَّاءُ عَلَى الْكُفَّارِ رُحَمَاءُ بَيْنَهُمْ ۖ
تَرَاهُمْ رُكَّعًا سُجَّدًا يَبْتَغُونَ فَضْلًا مِّنَ اللَّهِ وَرِضْوَانًا ۖ سِيمَاهُمْ فِي
وُجُوهِهِم مِّنْ أَثَرِ السُّجُودِ ۚ ذَٰلِكَ مَثَلُهُمْ فِي التَّوْرَاةِ ۚ وَمَثَلُهُمْ فِي
الْإِنجِيلِ كَزَرْعٍ أَخْرَجَ شَطْأَهُ فَآزَرَهُ فَاسْتَغْلَظَ فَاسْتَوَىٰ
عَلَىٰ سُوقِهِ يُعْجِبُ الزُّرَّاعَ لِيَغِيظَ بِهِمُ الْكُفَّارَ ۗ وَعَدَ اللَّهُ الَّذِينَ
آمَنُوا وَعَمِلُوا الصَّالِحَاتِ مِنْهُم مَّغْفِرَةً وَأَجْرًا عَظِيمًا ﴿٢٩﴾

५२. मक्केचे काफिर जाणत होते की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) आपल्या सहकाऱ्यांना घेऊन केवळ उमरा अदा करण्याकरीता आले आहेत जो निव्वळ धार्मिक विधी होता आणि ज्याचा आदर ते स्वत: देखील करीत. परंतु अज्ञानाच्या भावनेने त्यांना एवढे पछाडले की त्यांची पक्षांधता उसळून वर आली व त्यांना या गोष्टीत लज्जा वाटली की मुसलमानांच्या या जमातीने मक्केत प्रवेश करावा. म्हणून त्यांनी केवळ आपला अहंभाव जपण्याकरीता मुसलमानांना रोखू इच्छिले आणि जेव्हा तहा करीता झाले तेव्हा या अटी वर त्यांचा आग्रह राहीला की मुसलमानांनी या वर्षी नव्हे तर पुढच्या वर्षी येऊन उमरा अदा करावा. मग त्यांनी तहाच्या कराराचा आरंभ **'बिस्मिल्लाहिर रहमानिर्रहीम'** بِسۡمِ اللّٰہِ الرَّحۡمٰنِ الرَّحِیۡمِ ने करण्यासही आक्षेप घेतला की रहमना कोण आहे हे आम्ही जाणत नाही, तेव्हा بِاسْمِكَ اللّٰهُمَّ "हे अल्लाह तुझ्या नावाने असे" लिहा हीच त्यांची अज्ञापूर्ण आढयता होती जिचा उल्लेख या आयतीत केला गेला आहे.

५३. म्हणजे शांती-समाधानाची अशी कैफियत की ते प्रतिकूल परिस्थितीने प्रभावित झाले नाही.

५४. كَلِمَةَ التَّقْوٰى (ईश भयाच्या) गोष्टीवर दृढ राखले याचा अर्थ असा की त्या नाजुक क्षणात त्यांना ही सुबुद्धि प्रदान केली गेली की त्यांनी कोणतीही गोष्ट ईश भयाच्या विरूद्ध करू नये. त्यांनी ज्या प्रकारे बैअते रिज़वान केले व हुदैबिया तहास अप्रिय जाणून ही पैगंबरांच्या आदेशाचे पालन केले, तो याचा स्पष्ट पुरावा होय.

अधिक हे की जेव्हा त्यांना उमरा अदा केल्या विनाच हुदैबियाहून परतावे लागले तेव्हा त्यांनी ना पैगंबरांचे स्वप्न खोटे ठरविले आणि ना या बाबत काही आक्षेप घेतला. जर एखादा प्रश्न केला असेल तर तो केवळ स्पष्टीकरणा करीता. अशा प्रकारे त्यांच्या मुखातून ईश-भयाच्याच गोष्टी निघाल्या आणि ही सुबुद्धि त्यांना अशासाठी लाभली की ते आपल्या प्रामाणिक ईमानामुळे यास पात्र होते आणि अल्लाहच्या मार्गात बलीदान देऊन त्यांनी स्वत:ला ईशभयास योग्य असल्याचे सिद्ध करून दाखविले.

तिर्मिजी संकलीत हदीस वचनात असा उल्लेख आहे की ईशभयाची गोष्ट यास अभिप्रेत لَآ اِلٰہَ اِلَّا اللّٰہ ला इलाह इल्लल्लाह (अल्लाह खेरीज कोणी ही उपास्य नाही) होय. परंतु तिर्मिजीने स्वत:च स्पष्टीकरण दिले आहे की या हदीस वचनाला ठोस आधार नाही (यास्तव निकोपतेच्या दर्जास पोहचत नाही) तरी ही ही गोष्ट या दृष्टीने खरी आहे की ईश भयाचा पाया "ला इलाहा इल्लल्लाह" لَآ اِلٰہَ اِلَّا اللّٰہ आहे म्हणून ईश भयाचे वचन खरे तर 'ला इलाह इल्लल्लाह' हेच आहे.

५५. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी असे स्वप्न पाहीले की ते आपल्या सहकाऱ्यां समवेत मक्केत दाखल झालेत व उमरा अदा केला या स्वप्नालाच अल्लाहचा संकेत समजून ते आपल्या सोबतच्या अनुयायी सह उमरा करण्या करीता निघाले होते परंतु हुदैबिया हून जेव्हा उमरा न करताच परतावे लागले तेव्हा अनुयायींच्या मनात हा प्रश्न उदभवला की पैगंबराचे स्वप्न तर खरे असते मग उमरा न करताच आम्ही कसे परत जात आहेत ? या प्रश्नाचे उत्तर या आयतीत दिले गेले आहे की हे स्वप्न अल्लाह तर्फे होते जे अगदी खरे व सत्यावर आधारीत होते म्हणून ते निश्चितपणे पूर्ण होईल. तुम्ही अवश्य मसजिदे हराम मध्ये दाखल व्हाल आणि शांतीपूर्वक दाखल व्हाल. कसल्याही प्रकारची भिती धोका नसेल. तुम्ही एहरामच्या अवस्थेत असाल आणि निश्चितपणे विधी पार पाडू शकाल.

हदीस वचनातील उल्लेखा नुसार हा प्रश्न पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना केला गेला तेव्हा त्यांनी फर्मावित्रे मी हे केव्हा म्हटले की या वर्षी तुम्ही मक्केत दाखल व्हाल. तुम्ही मक्केत जरूर दाखल व्हाल व काबागृहाची प्रदक्षिणा ही कराल (बुखारी) हे स्वप्न दुसऱ्या वर्षी पूर्ण झाले. यास्तव पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी जिकाद: हि. स. ७ मध्ये अनुयायींसह मक्का पोहोचून उमरा अदा केला ज्याला 'उमरतुल क़ज़ा' असे म्हणतात. या प्रसंगी मक्केच्या काफिरांनी तीन दिवसांकरीता शहर खाली केले होते यामुळे मुसलमानांनी शांती व समाधानाने उमराचा संपूर्ण विधी पार पाडला. अशा प्रकारे स्वप्न ही खरे ठरले आणि कुरआनाची सत्यता ही प्रकट झाली.

उमराचा एहराम जेव्हा उतरविला जातो तेव्हा डोक्याचे केस मुंडविले जातात किंवा कापले जातात आणि आयतीत याचा उल्लेख करण्याचा हेतु हे स्पष्ट करणे होय की तुम्ही मसजिदे हराम मध्ये एहरामच्या स्थितीत दाखल व्हाल आणि निश्चितपणे उमराचे समस्त विधी पार पाडून एहराम उतरवाल.

उमरा व हज्जचा एहराम उतरवतांना डोक्याचे केस मुंडवणे ही योग्य आहे व कतरविणे ही, परंतु मुंडवणे अधिक चांगले आहे.

५६. म्हणजे तुम्हाला हे माहीत नव्हते की युद्ध न करता तुम्ही शांतीपूर्वक मक्केत दाखल व्हाल परंतु अल्लाहला हे माहीत होते म्हणून त्याने तुम्हाला याची पूर्व सूचना दिली. त्याच प्रकारे तो हेतु ही ज्याचा उल्लेख यापूर्वी केला गेला. तुम्ही जाणत नव्हते, परंतु अल्लाह जाणत होता म्हणून त्याने युद्धाची पाळी येऊ दिली नाही आणि उमरा पुढील वर्षा करीता निर्धारीत केला.

५७. अभिप्रेत हुदैबिया तह होय जो उमरा अदा करण्यापूर्वी

एक तत्काळ स्वरूपाचा विजय झाला कारण या युद्ध नको कराराने संपूर्ण अरब देशात इस्लामच्या प्रचार व प्रसाराचा मार्ग खुला केला तसेच हा तह मक्का विजयाची प्रस्तावनाच ठरली.

५८. याचे स्पष्टीकरण सूरह तौबा टीप क्र. ६५ मध्ये केले गेले आहे ते या प्रसंगी ही विचाराधीन असावे. तेव्हा आम्ही हे स्पष्टीकरण केले आहे की لِيُظْهِرَهُ ''या साठी की याला वर्चस्व शाली करावे'' चा कर्ता अल्लाह आहे पैगंबर नव्हे. याच्या समर्थनार्थ काही भाष्यकारांची कथने सादर केली जात आहेत. इब्ने जरीर तबरी फर्मावितात-

'' सर्वश्रेष्ठ अल्लाह, पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना फर्मावितो की हे मुहम्मद, तुमचा पालनकर्ता स्वत:ला साक्षी बनवून फर्मावित आहे की तो या धर्माला ज्याच्या सह तुम्हाला (पैगंबर या नात्याने) पाठविले गेले आहे, वर्चस्वशाली करील.''

मग याच्या समर्थनार्थ हजरत हसनचे कथन उल्लेखिले गेले आहे. (तफसीर तबरी खंड-२९पृ.६९)

अल्लामा जमखशरी या संदर्भात लिहीतात-

''सर्वश्रेष्ठ अल्लाह त्यांना शहरांवर विजय प्रदान करील आणि देशांवर असा कब्जा प्रदान करील की मक्का विजयाला ते गौण समजू लागतील.'' (अल कश्शाफ खंड-३ पृ. ५५०)

अल्लामा शोकानी लिहीतात की :-

''म्हणजे अल्लाहचे साक्षी असणे पुरेसे आहे या (वर्चस्वाच्या) अभिव्यक्तिवर मुसलमानांशी वायदा केला आहे.'' (फतहुल कदीर - खंड ५ पृ. ५५)

अल्लामा आलूसी असे फर्मावितात :-

''हे कथन एकटया इसमाचे कथन नव्हे आणि संभवत: आपल्या प्रसंगाच्या दृष्टीने अधिक स्पष्ट आहे की धर्माला (अर्थात इस्लामला) सर्व धर्मांवर वर्चस्वशाली करण्याची स्थिती अशी असेल की तो (म्हणजे अल्लाह) मुसलमानांना समस्त धर्मीयांवर अधिकार प्रदान करील.' (रूहूल मआनी खंड २६ पृ. १२२)

आणि सर्वात मोठी बाब अशी की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी स्वत:धर्माच्या वर्चस्वाचा संबंध अल्लाहशी जोडला आहे. यास्तव 'सीरत इब्ने हिशाम' या ग्रंथात असा उल्लेख आहे की पैगंबरांनी फर्माविले-

فَوَ اللهِ لَا اَزَالُ اُجَاهِدُ عَلَى الَّذِیْ بَعَثَنِیَ اللهُ بِهٖ

حَتّٰی یُظْهِرَهُ اللهُ۔ (سیرت ابن ہشام ج ۳ ص ۳۵۷)

'' अल्लाहची शपथ, ज्या (धर्मा) सह अल्लाहने मला पाठविले आहे. त्याच्या करीता मी जेहाद करीन. येथपावेतो की अल्लाहने त्यास वर्चस्वशाली करावे.'' (सीरत इब्ने हिशाम खंड-३ पृ. ३५७)

५९. म्हणजे कोणी मान्य करो किंवा न करो अल्लाहची साक्ष ही आहे की मुहम्मद त्याचे रसूल (पैगंबर) आहेत.'' مُحَمَّدٌ رَّسُوْلُ اللهِ मुहम्मदुर्रसूलुल्लाह इस्लामच्या कलिमा (वचना)चा दुसरा भाग आहे, संपूर्ण कलिमा असा आहे

لَآ اِلٰهَ اِلَّا اللهُ مُحَمَّدٌ رَّسُوْلُ اللهِ

''ला इलाह इल्लल्लाहु मुहम्मदुर्रसूलुल्लाह'' अर्थात अल्लाह खेरीज कोणी उपास्य (ईश्वर देव) नाही आणि मुहम्मद अल्लाहचे रसूल (पैगंबर) आहेत.''

६०. ईमान आणि कुफ्र या दोन परस्पर भिन्न गोष्टी आहेत. म्हणून दोघांच्या दरम्यान सातत्याने संघर्ष होत राहतो आणि हा संघर्ष युद्धाचे स्वरूप ही अंगिकारतो म्हणूनच ईमान बाळगणारे काफिरां करीता मऊ घास बनू शकत नाही. ते यांच्या विरोधात दगडी शिला बनतात आणि जेव्हा लढाई होते तेव्हा सर्व शक्तिचा त्यांच्या विरूद्ध वापर करतात व त्यांना ठेचून काढण्यात काहीही कसर बाकी ठेवत नाही.

स्पष्ट असावे की काफिरांवर सक्त किंवा कठोर असण्याचा हा अर्थ नव्हे की सर्वसामान्य परिस्थितीत त्यांच्याशी उग्रता पूर्वक बोलले जावे किंवा ऐहिक बाबींमध्ये त्यांच्याशी सद्व्यवहार न केला जावा किंवा त्यांच्याशी दुर्वर्तनाचा अंगिकार केला जावा. नव्हे किंबहुना इस्लामची शिकवण अशी आहे की प्रत्येक माणसाला माणूस या नात्याने चांगली वागणूक दिली जावी मग तो कोणत्याही श्रद्धा वा धर्माचा अनुयायी असो.

आणि मुसलमानांचे आपसात सहृदय होणे ही त्यांच्या ईमानाची निकडच होय. ते एकमेकांच्या हक्कात कठोर नव्हे, तर कोमल हृदयी, दयाळू व स्नेहशील असतात. हदीस वचनात त्यांच्या परस्पर संबंधाना अशा प्रकारे निवेदिले गेले आहे.

مَثَلُ الْمُؤْمِنِيْنَ فِی تَوَادِّهِمْ وَتَرَاحُمِهِمْ وَتَعَاطُفِهِمْ مَثَلُ

الْجَسَدِ اِذَا اشْتَکیٰ مِنْهُ عُضْوٌ تَدَاعیٰ لَهٗ سَائِرُ الْجَسَدِ

بِالسَّهَرِ وَالْحُمّٰی۔ (مسلم کتاب البر)

''ईमान बाळगणारे आपसातल्या प्रेम व सहृदयता आणि एकमेकांवर दयाशील असण्यात असे आहेत जणू एक शरीर की जर त्याच्या एक अवयवाला इजा पोहोचते तर संपूर्ण शरीर बेचैनी व तापाच्या त्रासात ग्रस्त होते.'' (मुस्लिम किताबुल बिर्र)

६१.यास अभिप्रेत ठराविक वेळेवर नियमित पणे नमाज अदा करणे, धर्मात पाच वेळच्या नमाजचा इतमाम राखणाऱ्यांवर हा प्रभाव पडतो की ते रूकूअ (झुकणे) व सजदा (आभा

टेकणे) च्या स्थितीतच मग्न राहतात. त्यांची नमाज विषयीची ओढ एक विशेष गुणधर्माचे स्वरूप बाळगते.

६२. म्हणजे त्यांची सर्व धावपळ अल्लाहच्या कृपेचा शोध व त्याची प्रसन्नता प्राप्त करण्या साठीच असते. ते प्रत्येक पाऊलावर अल्लाहची कृपा शोधतात की त्याने यांच्यावर मेहेरबान व्हावे व आपल्या देणग्यांनी उपकृत करावे आणि त्यांचा अंतिम हेतु हा असतो की अल्लाहची प्रसन्नता लाभावी.

६३. अभिप्रेत ते निशाण होय जे अत्याधिक सजद्यांमुळे कपाळावर पडते तसेच नम्रतेचा तो प्रभाव ही जो चेहऱ्यांवर दिसून येतो. त्यांचे चेहरे त्यांच्या अंतरीचे चित्रण करतात की हे खरे ईश-भक्त लोक आहेत.

६४. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या सहवासातील अनुयायींची ही ओळख तौरात मध्ये ही निवेदिली गेली आहे, जसे कुरआन या संदर्भात स्पष्टीकरण करतो परंतु आजच्या तौरात मधून हा मजकूर गायब झाला आहे आणि फक्त मजकूरच नव्हे तर पैगंबरांच्या संबंधाने इतर कितीतरी भाकिते जी तौरात मध्ये असण्या विषयी कुरआन स्पष्टीकरण देते, आजच्या तौरात मध्ये यांचा उल्लेख ही नाही. एवढेच नव्हे तर त्यांच्या अनुवादात ही फेरबदल केला गेला आहे. यावरून असे दिसून येते की तौरातच्या ज्या प्रती कुरआन अवतरणाच्या वेळी मदीनेतील यहुदीं जवळ उपलब्ध होत्या आणि ज्यांना लक्षात घेता कुरआनने तौरातचे ठिकठिकाणी हवाले दिले आहेत त्या प्रती आता अस्तित्वात राहील्या नाहीत आज ज्या प्रती उपलब्ध आहेत त्यात मोठी उणीव भासू लागते आखिरत व नमाजच्या उल्लेखाच्या दृष्टीने ही आणि पैगंबरांच्या संबंधी भाकिते असण्याच्या दृष्टीने ही. ज्यावरून हे स्पष्टपणे जाहीर होते की अशा कितीतरी गोष्टी तौरात मधून गायब केल्या गेल्या आहेत व कित्येक गोष्टीत फेरफार केला गेला आहे व कित्येक शब्दांच्या चुकीचा अर्थ लावला गेला आहे यासाठी की वास्तविकतेवर आवरण घातले जावे.

६५. इंजिल बायबलाच्या आज उपलब्ध असलेल्या प्रती मध्ये हा मजकूर या स्वरूपात आहे :-

''स्वर्गाचे राज्य मोहरीच्या दाण्यासारखे आहे. तो कोणा एका मनुष्याने घेऊन आपल्या शेतात लाविला. तो तर सर्व दाण्यां मध्ये लाहन आहे; तरी वाढल्यावर भाज्यांपेक्षा मोठा होऊन त्याचे असे झाड होते की, 'आकाशातील पांखरे' येऊन ''त्याच्या फांद्यात वस्ती करतात.'' (मत्तय १३: ३१ -३२)

आयतीत पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या अनुयायींमध्ये दिवसेदिवस वाढ, त्यांच्या जमातीची स्थीरता आणि इस्लामची टप्प्या टप्प्याने प्रगती व वर्चस्वाचे चित्र सादर केले गेले आहे.

६६. म्हणजे ज्यांनी ही शेती (अर्थात इस्लाम) ची पेरणी केली व तिला पाणी देत राहीले ते हे पाहून की शेत बहरून डोलू लागले आहे. आंनद विभोर झाले परंतु काफिरांना इस्लामचे भरभराटीस येणे असहय झाले आणि मुसलमानांना आंनद विभोर होतांना पाहून त्यांच्यावर संतापले व द्वेषाग्नित जळू लागले.

६७. म्हणजे मुसलमानांच्या समूहामध्ये जे लोक आपल्या ईमान बाबत प्रामाणिक व चारित्र्याच्या दृष्टीने सत्शील आहेत त्यांच्याशी अल्लाहचा वायदा आहे की तो त्यांना माफ करील व त्यांना जन्नत मध्ये मोठया मोबदल्याने उपकृत करील. राहीलेत नाम धारी मुसलमान तर त्यांच्या करीता ही शुभवार्ता नाही.

# सूरह अल् हुजुरात

# ४९. सूरह अल् हुजुरात

**नावः** आयत क्र. ४ मध्ये हुजुरात (खोल्यां) च्या बाहेरून पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना हाक मारण्या बद्दल तंबी दिली गेली आहे. तद्नुषंगे या सूरहचे नाव 'अल् हुजुरात' असे आहे.

**अवतरण काळः** ही सूरह मदीना मध्ये हि. स. ९ मध्ये अवतरली जेव्हा अरब देशाच्या कोना कोपऱ्यातून शिष्ट मंडळे यायला सुरूवात झाली होती आणि लोक समूहा समूहाने इस्लाम धर्मात प्रवेश करीत होते.

**मध्यवर्ति कल्पना :** या शिष्टाचार व निति नियमांची शिकवण जी ईमानाची निकड आहे आणि इस्लामी समाजाला निकोप राखण्या करीता आवश्यक आहे.

**आयत रचना :** आयत क्र. १ ते ५ मध्ये या गोष्टीची ताकीद केली गेली आहे की ईमान बाळगणाऱ्यांनी आपले म्हणणे मांडतांना अल्लाह व त्याच्या पैगंबराच्या पुढे जाऊ नये आणि पैगंबरांचा आदर पूर्णतः ध्यानी राखावा.

आयत क्र. ६ ते १० मध्ये इस्लामी बंधुत्वास हानी पोहचविणाऱ्या गोष्टींपासून दूर राहण्याची ताकीद केली गेली आहे आणि शोध व न्यायाचे वर्तन अंगिकारण्याची ही ताकीद केली गेली आहे.

आयत क्र. ११ व १२ मध्ये त्या नैतिक दृष्ट्या वाईट असलेल्या बाबींपासून दूर राहण्याची ताकीद केली गेली आहे ज्या आपसात घृणा निर्माण करतात व उत्पातास कारक ठरतात.

आयत क्र.१३ मध्ये जन सांधिक व वंशीय श्रेष्ठत्वावर प्रहार करीत हे स्पष्ट केले गेले आहे की समस्त जन समूह आणि कबिल्यांचे नाते एकाच पुरूष व स्त्री (आदम व हव्वा) ला जाऊन मिळते म्हणून जनसामूहीक व वांशिक अभिमानाला काहीच आधार नाही. माणसा माणसाच्या दरम्यान खऱ्या अर्थाने फरक करणारी गोष्ट म्हणजे अल्लाहचे भय बाळगून केलेले आचरण.

आयत क्र. १४ तो १८ मध्ये त्या मुसलमानांवर टिका केली गेली आहे ज्यांनी इस्लाम कबूल केल्याचा दावा तर केला आहे परंतु ईमान अद्याप ही त्यांच्या ध्यानी मनी रूजले नाही. त्यांना हे स्पष्ट केले गेले आहे की खरे व उचित ईमान ते होय ज्यात संशयाला जागा नसते. आणि सच्चा मोमिन (ईमान बाळगणारा) तो होय जो अल्लाहच्या मार्गात आपल्या प्राण-वित्त सह जेहाद करतो.

# ४९. सूरह हुजुरात

سورة الحجرات

आयती - १८

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بسم الله الرحمن الرحيم

१. हे ईमान बाळगलेल्या लोकांनो ! अल्लाह आणि त्याच्या पैगंबराच्या पुढे जाऊ नका [१] आणि अल्लाहचे भय बाळगा [२] अल्लाह सर्व काही ऐकणारा, जाणणारा आहे.[३]

يا أيها الذين آمنوا لا تقدموا بين يدي الله ورسوله
واتقوا الله إن الله سميع عليم ①

२. हे ईमान बाळगणाऱ्यांनो !आपला स्वर पैगंबराच्या स्वराहून उंच करू नका [४]आणि त्याच्याशी अशा प्रकारे उंच स्वरात बोलू नका ज्या प्रकारे आपसात एकमेकांशी बोलता.[५] असे न व्हावे की तुमची कर्मे वाया जावीत व तुम्हाला खबर ही न व्हावी.[६]

يا أيها الذين آمنوا لا ترفعوا أصواتكم فوق صوت النبي
ولا تجهروا له بالقول كجهر بعضكم لبعض أن تحبط
أعمالكم وأنتم لا تشعرون ②

३. जे लोक अल्लाहच्या पैगंबराच्या पुढयात आपला स्वर खालचा ठेवतात, तेच होत, ज्यांच्या हृदयांना अल्लाहने तकवा (अल्लाहच्या भया) करीता शुद्ध केले [७] त्यांच्याकरीता अल्लाह तर्फे क्षमा व फार मोठा मोबदला आहे.

إن الذين يغضون أصواتهم عند رسول الله أولئك
الذين امتحن الله قلوبهم للتقوى لهم مغفرة
وأجر عظيم ③

४. (हे पैगंबर !) जे लोक तुम्हाला हुजऱ्यां (खोल्यां) च्या बाहेरून हाक मारतात, त्यांच्यापैकी अधिकांश निर्बुद्ध आहेत.[८]

إن الذين ينادونك من وراء الحجرات أكثرهم
لا يعقلون ④

५. जर त्यांनी धीर धरला असता, येथपावेतो की तुम्ही यांच्या जवळ आले असते तर त्यांच्या करीता अधिक चांगले होते आणि अल्लाह माफ करणारा, दया करणारा आहे.[९]

ولو أنهم صبروا حتى تخرج إليهم لكان خيرا لهم
والله غفور رحيم ⑤

१. अल्लाह व त्याच्या पैगंबराच्या पुढे जाण्याची विभिन्न स्थिती असू शकते. उदाहरणार्थ आपल्या निर्णयास त्यांच्या निर्णयावर व आपल्या कथनास त्यांच्या कथनावर प्राधान्य द्यावे. एखादा मामला समोर आल्यावर त्याच्या विषयी शरीअत काय म्हणते हे न पाहता मत मांडणे व कार्यवाही अंमलात आणणे, कुरआन व पैगंबर आचरणा विषयीच्या कथनांवर, इतरांच्या कथनांना उदा. बुजुर्ग,विद्वान वा धर्मशास्त्र वेत्त्यांच्या कथनांना प्राधान्य देणे या सर्व बाबी अल्लाह व त्याच्या पैगंबराचे आज्ञापालन व पैगंबराच्या अनुसरणाच्या विरूद्ध आहेत.

२. म्हणजे ही अशी गोष्ट आहे जी ईश-भयाच्या अगदी विपरीत आहे यास्तव तुम्ही अल्लाह व त्याच्या पैगंबराच्या पुढे जाण्याचे दु:साहस करू नये.

३. यास्तव हे चांगले जाणून घ्या की तो तुमचे बोलणे ऐकतो आणि तुमच्या अंत:करणाची स्थिती जाणतो.

४. पैगंबराचे स्थान अत्युच्च आहे यास्तव त्यांचा जास्तीत जास्त आदर सन्मान केला पाहीजे. पैगंबराच्या बैठकी साठी हा शिष्टाचार शिकविला गेला आहे की बोलतांना आपला स्वर खालचा राखावा आज पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांची सभा व बैठक अस्तित्वात नसली तरी त्यांची कथने आज ही अस्तित्वात आहेत. त्यांना उच्च स्थान देणे व त्यांच्या विरोधात कोणता ही स्वर उंच न करणे या आयतीचा खरा हेतु आहे.

५. म्हणजे पैगंबरांना अशा प्रकारे संबोधू नका ज्या प्रकारे तुम्ही आपसात एकमेकांना संबोधिता. शिष्टाचाराची ही निकड आहे की त्यांना 'या मुहम्मद' (हे मुहम्मद) असे संबोधिले जाऊ नये, तर 'या रसुलल्लाह' (हे अल्लाहचे पैगंबर!) असे संबोधिले जावे, तसेच संभाषण करतांना त्यांच्या प्रतिष्ठेचा पूरेपूर मान राखला जावा.

६. ही सक्त ताकीद आहे त्या लोकांना जे पैगंबराच्या दर्जाचा विचार करीत नाही आणि शिष्टाचार विरूद्ध कृत्ये करून बसतात. पैगंबरांशी असभ्य वर्तन मनाच्या मोठया विकृतीस जाहीर करते. आणि ती म्हणजे ईश-भयाची कमतरता, ज्यावर वेळीच उपाय केला गेला नाही तर मनातून ईश-भय नाहीसे होऊ शकते आणि जेव्हा ईश-भयच बाकी नसेल तर त्या आचरणाची काहीच किंमत राहात नाही जे वरून सत्कर्म वाटत असावे. सत्कर्म ठरणारे कोणतेही कृत्य त्याच स्थितीत सत्कर्म ठरू शकते जेव्हा त्याच्या मुळाशी तकवा (अल्लाहच्या महानतेच्या कल्पनेने त्याचे भय व त्याच्या अवज्ञे पासून अलिप्त राहण्याची भावना) असावा. पुढच्या आयती वरून आपोआप याचे स्पष्टीकरण होते.

या आयतींच्या अवतरणा नंतर पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या सहवासातील अनुयायींनी पैगंबराच्या बैठकीत आपला स्वर अधिकाधिक खालचा केला होता. येथपावेतो की पैगंबरांना हे विचारावे लागत होते की सांगणाऱ्याने काय सांगितले. आणि ज्यांचा स्वर स्वाभाविकपणे उंच होता ते घाबरले की कदाचित त्यांचे आचरण वाया न जावे. बुखारीचे कथन आहे की ही आयत अवतरल्या नंतर साबित बिन कैसला पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी पाहीले नाही त्यांनी यांची स्थिती जाणून घेण्या करीता एक माणूस पाठविला तो जेव्हा यांच्या घरी पोहचला तेव्हा हे पाहीले की साबित बिन कैस आपल्या घरात नतमस्तक होऊन बसले आहेत. विचारले, कसे काय? त्यांनी उत्तर दिले, फार वाईट दशा आहे कारण जो मनुष्य आपला स्वर पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या स्वराहून उंच करतो त्यांची कर्मे वाया जातात आणि तो जहन्नमी लोकांपैकी होतो. त्या माणसाने या बाबतचा वृत्तांत पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना सांगितला. त्यावर पैगंबरानी फर्माविले की, जा त्यांना सांगा की तुम्ही जहन्नमी नव्हे, तर जन्नती आहात. (बुखारी किताबुत्तफसीर)

७. स्पष्ट झाले की पैगंबराजवळ स्वर धीमे ठेवण्याचा व त्यांचा आदर करण्याचा संबंध मनातील ईश भयाशी आहे. या बाह्य शिष्टाचारांच मन मस्तिष्कावर फार मोठा प्रभाव पडतो आणि अशाने ईश भय पूर्ण वर्तनात वृद्धि होते. जर ईश भय या बाह्य शिष्टाचारां करीता कारक स्वरूप आहेत तर हे शिष्टाचार ईश-भयाच्या पुष्टीस कारक ठरतात.

८. अरब ग्रामीण, ज्यांच्यात सभ्यतेची मोठी उणीव होती, पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या भेटीस येत तेव्हा मसजिदे नबवी मध्ये पैगंबर नाहीत हे पाहील्यावर त्यांच्या घराबाहेरून, ज्यात हुजुरे (खोल्या) होत्या, हाका मारू लागत. त्यांची ही पद्धत शिष्टाचार व आदराच्या विरूद्ध होती आणि हे या गोष्टीचे लक्षण होते की त्यांनी रसूल (पैगंबरा) च्या स्थानास अजून ही ओळखले नाही. पैगंबराचे स्थान सर्व सामान्य लोकांहून अतिशय उच्च असे असते. यास्तव त्याच्याशी वर्तनाची ती पद्धत अंगिकारली जाऊ शकत नाही जी सर्व सामान्यत: लोकांशी अंगिकारली जाते आणि दरवाजा बाहेरून ही हाक मारणे सभ्यतेची पद्धत नव्हे जी पैगंबरा बाबतीत अवलंबली जावी. तिची अयोग्यता अगदी उघड आहे.

आणि ज्याअर्थी हुजुऱ्यांच्या बाहेरून पैगंबरांना हाक मारणे अयोग्य आहे, तेव्हा कबरीच्या बाहेरून त्यांना पुकारणे की जेणेकरून गाऱ्हाणे ऐकण्या करीता त्यांनी पोहचावे, अगदी मुर्खता पूर्ण बाब होय. मात्र दरूद व सलाम त्यांच्यावर कोणत्याही ठिकाणी पाठविला जाऊ शकतो. परंतु यासाठी ही तीच पद्धत अंगिकारली गेली पाहीजे जिची शिकवण पैगंबरांनी दिली आहे.

९. यास्तव आपल्या अपराधा बाबत अल्लाह जवळ माफी मागा आणि त्याच्या कडे दयेची विनवणी करा.

६. हे ईमान बाळगलेल्या लोकांनो ! जर एखादा दुराचारी तुमच्या जवळ एखादी बातमी आणील तर चौकशी करून घेत जा.[१०] असे न व्हावे की तुम्ही एखाद्या समूहा विरूद्ध अजाणतेपणी एखादी कारवायी करून बसावे आणि मग आपल्या कृत्यावर पश्चाताप करू लागावे.[११]

يَا أَيُّهَا الَّذِينَ آمَنُوا إِن جَاءَكُمْ فَاسِقٌ بِنَبَإٍ فَتَبَيَّنُوا أَن تُصِيبُوا قَوْمًا بِجَهَالَةٍ فَتُصْبِحُوا عَلَىٰ مَا فَعَلْتُمْ نَادِمِينَ ⑥

७. जाणून असा की अल्लाहचा पैगंबर तुमच्या दरम्यान हजर आहे. जर बहुतेक व्यवहारात तो तुमचे म्हणणे मान्य करीत राहीला तर तुम्ही कष्ट-यातना ग्रस्त व्हाल.[१२] परंतु अल्लाहने तुमच्या करीता ईमानास प्रिय बनविले आणि यास तुमच्या अंत:करणामध्ये सुशोभित केले आणि कुफ्र व दुराचार आणि अवज्ञेला तुमच्या करीता घृणास्पद बनविले. हेच लोक सरळ मार्गावर चालणारे आहेत.[१३]

وَاعْلَمُوا أَنَّ فِيكُمْ رَسُولَ اللَّهِ ۚ لَوْ يُطِيعُكُمْ فِي كَثِيرٍ مِّنَ الْأَمْرِ لَعَنِتُّمْ وَلَٰكِنَّ اللَّهَ حَبَّبَ إِلَيْكُمُ الْإِيمَانَ وَزَيَّنَهُ فِي قُلُوبِكُمْ وَكَرَّهَ إِلَيْكُمُ الْكُفْرَ وَالْفُسُوقَ وَالْعِصْيَانَ ۚ أُولَٰئِكَ هُمُ الرَّاشِدُونَ ⑦

८. अल्लाहच्या कृपा व अनुग्रहाने.[१४] आणि अल्लाह ज्ञानी व बुद्धिकौशल्य बाळगणारा आहे.

فَضْلًا مِّنَ اللَّهِ وَنِعْمَةً ۚ وَاللَّهُ عَلِيمٌ حَكِيمٌ ⑧

९. आणि जर ईमान बाळगणाऱ्यांचे दोन समूह आपसात लढू लागतील तर त्यांच्या दरम्यान मिलाप करा.[१५] मग जर त्यांच्यापैकी एक समूह दुसऱ्या समूहावर अतिरेक करील तर अतिरेक करणाऱ्या समूहाशी लढा येथपावेतो की त्याने अल्लाहच्या आदेशाकडे रूजू करावे. जर त्याने रूजू केले तर त्यांच्या दरम्यान न्यायपूर्वक तडजोड करा व न्याय करा. अल्लाह न्याय करणाऱ्यांना पसंत करतो.[१६]

وَإِن طَائِفَتَانِ مِنَ الْمُؤْمِنِينَ اقْتَتَلُوا فَأَصْلِحُوا بَيْنَهُمَا ۖ فَإِن بَغَتْ إِحْدَاهُمَا عَلَى الْأُخْرَىٰ فَقَاتِلُوا الَّتِي تَبْغِي حَتَّىٰ تَفِيءَ إِلَىٰ أَمْرِ اللَّهِ ۚ فَإِن فَاءَتْ فَأَصْلِحُوا بَيْنَهُمَا بِالْعَدْلِ وَأَقْسِطُوا ۖ إِنَّ اللَّهَ يُحِبُّ الْمُقْسِطِينَ ⑨

१०. ईमान बाळगणारे तर आपसात भाऊ भाऊ आहेत [१७] तेव्हा आपल्या बांधवांच्या दरम्यान समेट घडवा आणि अल्लाहचे भय बाळगा, यासाठी की तुमच्यावर दया (कृपा) केली जावी.

إِنَّمَا الْمُؤْمِنُونَ إِخْوَةٌ فَأَصْلِحُوا بَيْنَ أَخَوَيْكُمْ ۚ وَاتَّقُوا اللَّهَ لَعَلَّكُمْ تُرْحَمُونَ ⑩

१०. दुराचारीशी अभिप्रेत असा मनुष्य जो अल्लाहचा अवज्ञाकारी व भयंकर अपराध करणारा असावा. अशा इसमाच्या कोणत्याही बातमीवर, जी महत्वपूर्ण असावी, चौकशी विना मान्य करण्यास व त्यावर भरवसा करून एखाद्या विरूद्ध कारवायी करण्यास मनाई केली गेली आहे कारण दुराचारी इसमाची बातमी खोटी ही असू शकते आणि खोटया बातमी वर विश्वास ठेवण्याचे परिणाम वाईटच ठरू शकतात.

ही ताकीद आणि यापुढील ताकीद अशा प्रसंगी दिली गेली जेव्हा मुस्लिम समाजात असे लोक दाखल होत होतो ज्यांनी सुज्ञता पूर्वक इस्लामचा स्विकार केलेला नव्हता आणि जे आपल्या चारित्र्याच्या दृष्टीने विश्वास ठेवण्या योग ठरू शकत नव्हते आणि कबिल्यांच्या आपसातील वैमनस्यामुळे ही या लोकांपासून हे भय होते की त्यांनी बेजबाबदारीची कथने करून कबिल्यांच्या दरम्यान लढाई निर्माण न करावी तात्पर्य ही ताकीद संरक्षणाच्या दृष्टीने होती आणि यात त्या परिस्थिती करीता मार्गदर्शन ही होते जी मुस्लिम जन समूहापुढे उद्भवणार होती. यास्तव हजरत उस्मान यांच्या खिलाफतीच्या कारकिर्दीत त्यांच्या विरूद्ध दुष्ट लोकांनी ज्या खोटया बातम्या पसरविल्या आणि त्यांच्यावर भरवसा ठेवून लोक ज्या उत्पातास बळी पडले, तो कुरआनाच्या या मार्गदर्शनास ज्यात भविष्यकालीन गृहकलहाकडे संकेत होता, दृष्टीआड करण्याचा परिणाम होता.

या आयतीचा मूळ उक्ती प्रसंग हाच आहे. राहिल्यात त्या दोन आयती, ज्या अवतरणाचे वैभव म्हणून निवेदिल्या गेल्या आहेत तर त्यांच्या संदर्भात बरेच काही सांगण्यास वाव आहे. सर्व सामान्य पणे भाष्यकर या आयतीच्या अवतरण महत्ते बाबत हे कथन उल्लेखितात की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी वलीद बिन अक्बा यांना बनी मुस्तलक कबिल्याकडे त्यांची जकात वसूल करण्या करीता पाठविले परंतु ते भ्याले आणि रस्त्यातून परतले आणि येऊन सांगितले, हे अल्लाहचे प्रेषित, हारीस (कबिल्याच्या सरदारा) ने जकात देण्यास नकार दिला व माझी हत्या करण्या साठी टपून बसला. यावर पैगंबरांना राग आला आणि त्यांनी काही लोकांना हारीसकडे पाठविले परंतु मदीनेच्या जवळच त्यांना हारिस भेटले व त्यांनी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना सांगितले की ज्या माणसाला तुम्ही पाठविले, त्याला मी पाहीले सुद्धा नाही आणि तो माझ्यापावेतो आला ही नाही. यावर सूरह हुजुरातची ही आयत अवतरली आणि इब्ने जरीर यांच्या कथनात असा उल्लेख आहे की बनी मुस्तलकचे लोक वलीद बिन अक्बाच्या स्वागता करीता बाहेर पडले होते परंतु यांना असे वाटले की ते यांना ठार करण्यासाठी निघाले आहेत (पहा तफसीर इब्ने कसीर खंड-४ पृ. २०९) प्रथम तर या कथनाच्या मूळ मजकूरात मोठा उतावीळपणा आहे. दुसरे असे की या कथनास इमाम अहमद वगैरेनी मुहम्मद बिन साबिक द्वारे उल्लेख केला आहे, ज्यांना काही हदीस ज्ञात्यांनी प्रमाण दृष्टया दुर्बळ म्हटले आहे (तहजीबुत्तहजीब खंड ९ पृ. १७५). तिसरे असे की इब्ने जरीर तबरी यांनी यांची जी प्रमाणे निवेदिली आहेत यात एक कथन कर्ता मूसा बिन उबैदा आहे ज्यास तिर्मिजी नसाई व अली बिन मदनी वगैरेनी प्रमाण दृष्टया दुर्बल म्हटले आहे (तहजीब - खंड १० पृष्ठ ३५६-३५८) चौथे हे की कथनास लक्षात घेता वलीद बिन अक्बा दुराचारी ठरतात, वास्तविक ते दुराचारी असण्याचा कोणताही पुरावा उपलब्ध नाही आणि हे कसे शक्य आहे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वल्लम) यांनी एका दुराचारी माणसाला जकात वसूल करण्या करीता आपला प्रतिनिधी बनवून पाठवावे? पाचवे असे की ही गोष्ट ही मान्य केली जाऊ शकत नाही की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी एका दुराचारी इसमाच्या बातमीवर विश्वास ठेवला होता. प्रमाण व कथनाच्या या वैगुण्यांना लक्षात घेता हे कथन मान्य करण्या जोगे नाही.

या आयतीद्वारे कथनां संबंधी शरीअतचा हा नियम ही निर्धारीत होतो की दुराचारी इसमाच्या कथनास पडताळून पाहील्या खेरीज मान्य केले जाऊ शकत नाही. यासाठी हदीसच्या विद्वानांनी हदीसच्या निकोपते करीता कथन कर्त्यांचे विश्वसनीय व न्याय्य होणे आवश्यक ठरविले आहे. राहीली श्रद्धेची मार्गभ्रष्टता तर ती आचरणाच्या दुराचाराहून अधिक आहे. यास्तव जे लोक धर्मात फूट पाडणारे व धर्मबाह्य गोष्टींचा अंगिकार करणारे असतील, त्यांची कथने मान्य केली जाऊ शकत नाही आणि ते प्रमाण कदापि नाहीत, इब्ने सिरीन यांनी अगदी योग्य फर्माविले आहे-

اِنَّ هٰذَالْحَدِيْثَ دِيْنٌ فَانْظُرُوا عَمَّنْ تَأْخُذُوْنَ

دِيْنَكُمْ۔ (الكفاية في علم الرواية ١٦٢)

“हे धर्म विषयक हदीस वचन आहे, तर पहा की तुम्ही कोणत्या लोकांपासून आपला धर्म प्राप्त करीत आहात? (अल किफायता इलमुर्रीवायता -१६२)

आणि ही खेदपूर्ण वस्तुस्थिति आहे की हदीस ज्ञात्यांच्या एका समूहाने या संदर्भात सोपेपणाने काम घेतले आहे ज्याचा परिणाम हा निघाला की हदीसच्या ग्रंथांमध्ये मोठया प्रमाणात अशी कथने सामील झालीत ज्यांचे कथन कर्ते शियापंथीय श्रद्धा व बिदअत मध्ये लीप्त होते. आणि ज्यांनी प्रसंगांना चुकीच्या स्वरूपात सादर केले. आणि पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्याशी अशा गोष्टींचा संबंध जोडला, ज्या कोणत्याही प्रकारे त्यांच्या संबंधाने योग्य ठरू शकत नव्हत्या.

अशा कथनांनी धर्माचे स्वरूपच विकृत करून टाकले यास्तव या बाबतीत नरमीचे धोरण अवलंबले जाऊ शकत नाही.

११. म्हणजे असे न व्हावे की एखाद्या चुकीच्या बातमीवर विश्वास ठेवून तुम्ही मुसलमानांच्याच एखाद्या समूहा विरूद्ध काही कारवायी करून बसावे मग नंतर वस्तुस्थिती लक्षात आल्यावर पश्चाताप करू लागावे. यास्तव आधीच चौकशी करून घेत जा.

१२. म्हणजे अल्लाहचा प्रेषित ज्याअर्थी मार्गदर्शना करीता तुमच्या दरम्यान हजर आहे, तेव्हा तुम्ही का म्हणून आपल्या मताचा आग्रह धरावा. तुमची दृष्टी त्या उद्दिष्टांप्रत पोहचू शकत नाही, ज्या उद्दिष्टांप्रत पैगंबराची दूर दृष्टी पोहचते. यास्तव जर पैगंबर तुमच्या बहुतेक गोष्टी मान्य करील तर हेतुच्या विरूद्ध झाल्याने तुम्हालाच नुकसान भोगावे लागेल.

१३. ही आहेत सच्चा व प्रामाणिक ईमान बाळगणाऱ्यांची आंतरीक वैशिष्टये, जी त्यांना सरळ मार्गावर चालणारे बनावितात अर्थात ईमान त्यांच्या नजरेत प्रिय ठरणे, मनात खोलवर रूजणे आणि कुफ्र व दुराचार व अपराधांचा तिटकारा वाटणे ही सुप्त वैशिष्टये त्या मुसलमानांची असू शकत नाही जे एखाद्या हेतुपोटी मुसलमानांच्या समूहात सामील झाले असावेत; किंवा केवळ नावापुरात इस्लामशी त्यांचा संबंध असावा.

१४. अर्थात ही ईमान विषयक वैशिष्टये, ज्यांचा उल्लेख वरील आयतीत केला गेला, ज्या लोकांमध्ये आढळली त्यांनी अल्लाहशी कृतज्ञशील झाले पाहीजे की हे अनमोल धन त्यांना अल्लाहच्याच कृपेने लाभले आहे.

१५. या मार्गदर्शनाचा हा अर्थ नव्हे की मुसलमानांच्या दोन गटात त्यावेळी एखादे युद्ध झाले होते म्हणून समेट घडवून आणण्याचा आदेश दिला गेला, किंबहुना जसे की आम्ही वर टीप क्र. १० मध्ये स्पष्ट केले आहे, पुढे उद्भवणाऱ्या परिस्थितीत सावधगिरी बाळगण्या करीता होते. तसेच नजिकच्या भविष्यात परिस्थिती जे वळण घेणार होती आणि मुसलमानांच्या दरम्यान जे उपद्रव घडून येणार होते, त्यांच्या संबंधाने पूर्व सूचना ही होती व त्या परिस्थितीत मार्गदर्शन ही.

१६. या आयतीत मुसलमानांचा परस्पर संघर्ष व त्यांच्या दरम्यान उद्भवणाऱ्या रक्तपातास दूर करण्या करीता अतिशय महत्वपूर्ण मार्गदर्शन आहे ज्यामुळे कित्येक गोष्टींवर उजेड पडतो. एक ही की अत्याधिक गैरसमज किंवा एखाद्या कटकारस्थानाच्या परिणाम स्वरूपी मुसलमानांच्या दोन गटांमध्ये युद्धाचा प्रसंग उदभवू शकतो. परंतु या आधारावर एखाद्या गटास काफिर ठरविणे उचित ठरणार नाही कारण या आयतीत आपसात लढणाऱ्या दोन्ही गटांचा उल्लेख ईमान बाळगणाऱ्यांचे दोन गट या स्वरूपात केला गेला आहे.

दुसरी गोष्टी अशी की लढाईच्या परिस्थितीत इतर मुसलमानांचे काम हे आहे की त्यांनी या दोघांच्या दरम्यान तडजोड घडवून आणावी. आणि असे कोणतेही आचरण अंगिकारू नये की ज्यामुळे युद्धाचा वणवा अधिक भडकत जावा.

तिसरी अशी की जो गट तडजोडी करीता तयार होत नाही व अत्याचार व अतिरिक करीतच राहतो तर त्याच्या विरूद्ध बळाचा वापर केला जावा. येथपावेतो की त्यांनी अल्लाहच्या आदेशाकडे वळावे आणि अल्लाहच्या आदेशाकडे वळण्याशी अभिप्रेत तहाचा हा आदेश ही आहे व न्यायाचा आदेश ही तसेच शरीअत विषयक तो आदेश ही जो अशा प्रकारच्या युद्धा संबंधी असावा.

चौथी गोष्ट ही की अल्लाहच्या आदेशाकडे वळण्याच्या स्थितीत त्या गटाविरूद्ध बळाचा वापर थांबवला पाहीजे आणि दोन्ही गटांमध्ये समेट घडवून आणला पाहीजे.

पाचवी ही की मुसलमानांच्या दोन गटांच्या परस्पर लढाईत इतर मुसलमानांनी असे काही करता कामा नये जे न्यायाच्या विपरीत असावे ज्यामुळे पक्षपात जाहीर होत असावा त्यांनी न्यायाची गोष्ट निर्भयपणे बोलली पाहीजे मग एखादा पक्ष नाराज होवो किंवा प्रसन्न, कारण अल्लाहला न्याय करणारे लोकच पसंत आहेत.

हे आदेश मुसलमानां करीता मार्ग-दीप होत परंतु आजच्या काळातील मुसलमानांची दशा अशी आहे की अल्लाहच दया करो. यांचे विभिन्न गट एकमेकांशी लढण्यास तयार आहेत आणि मुस्लिम राष्ट्रांमध्ये युद्धे होत राहतात ज्यात हजारो व लाखोंच्या संख्येने मुसलमान मारले जातात. अशा प्रकारे ते यहुदींच्या इतिहासाची पुनरावृत्ति करीत आहेत, ज्यांची साम्राज्ये क्षत विक्षत झाली होती व ज्यांच्यात नेहमी युद्ध होत राहीले.

१७. धार्मिक नात्याच्या दृष्टीने मुसलमान एकमेकांचे भाऊ आहेत वंश, वर्ण आणि जाति व देशाच्या फरक या विश्व बंधुत्वात कसलाही तडा निर्माण करू शकत नाही. ते कोठे ही असोत, एकमेकांशी संलग्न राहतील आणि एकाचे दु:ख दुसऱ्याला आपल्या अंतरी जाणवेल मग त्यांच्यात हजारो मैलांचे अंतर का असेना. या भातृ संबंधास दृढतम करण्याची ताकीद हदीस वचनात ही केली गेली आहे-

पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी फर्माविले

اَلْمُسْلِمُ اَخُو الْمُسْلِمِ لَا يَظْلِمُهٗ وَلَا يُسْلِمُهٗ مَنْ كَانَ فِيْ
حَاجَةِ اَخِيْهِ كَانَ اللّٰهُ فِيْ حَاجَتِهٖ وَمَنْ فَرَّجَ عَنْ مُسْلِمٍ كُرْبَةً
فَرَّجَ اللّٰهُ عَنْهُ بِهَا كُرْبَةً مِنْ كُرَبِ يَوْمِ الْقِيَامَةِ وَمَنْ سَتَرَ
مُسْلِمًا سَتَرَهُ اللّٰهُ يَوْمَ الْقِيَامَةِ۔ (مسلم كتاب البر)

''मुसलमान मुसलमानाचा भाऊ आहे, ना त्याच्यावर अत्याचार करावा आणि ना त्याला अत्याचारीच्या हवाली करावे. जो मनुष्य आपल्या भावाची गरज पूर्ण करण्यात मग्न असतो, अल्लाह त्याची गरज पूर्ण करीत राहतो आणि जो मनुष्य एखाद्या मुसलमानाचा त्रास दूर करील, कियामतीच्या दिवशी अल्लाह त्याचा त्रास दूर करील आणि जो एखाद्या मुसलमानाच्या दोषांवर पांघरूण घालील, अल्लाह कियामतीच्या दिवशी त्याच्या दोषांवर पांघरूण घालील.'' (मुस्लिम किताबुल बिर)

तसेच त्या गोष्टींबाबत ही मनाई केली गेली ज्या या नात्याला तोडणाऱ्या आहेत. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी या संदर्भात फर्मािवले, -

سِبَابُ الْمُسْلِمِ فُسُوْقٌ وَ قِتَالُهٗ كُفْرٌ (صحیح البخاری کتاب الادب)

''मुसलमानाला शिवीगाळ करणे दुराचार आहे आणि त्याची हत्या करणे कुफ्र आहे.''( सहीहुल बुख़ारी-किताबुल अदब)

لَا تَرْجِعُنَّ بَعْدِیْ كُفَّارًا يَضْرِبُ بَعْضُكُمْ رِقَابَ بَعْضٍ۔ (مشکوٰۃ براویۃ البخاری ومسلم)

''माझ्या पश्चात काफिर होऊन जाऊ नका की एकमेकांचे गळे कापू लागावे.'' (मिश्कात-बुखारी-मुस्लिम)

يٰٓاَيُّهَا الَّذِيْنَ اٰمَنُوْا لَا يَسْخَرْ قَوْمٌ مِّنْ قَوْمٍ عَسٰٓى اَنْ يَّكُوْنُوْا خَيْرًا
مِّنْهُمْ وَلَا نِسَآءٌ مِّنْ نِّسَآءٍ عَسٰٓى اَنْ يَّكُنَّ خَيْرًا مِّنْهُنَّ ۚ
وَلَا تَلْمِزُوْٓا اَنْفُسَكُمْ وَلَا تَنَابَزُوْا بِالْاَلْقَابِ ۭ بِئْسَ الِاسْمُ الْفُسُوْقُ
بَعْدَ الْاِيْمَانِ ۚ وَمَنْ لَّمْ يَتُبْ فَاُولٰۗىِٕكَ هُمُ الظّٰلِمُوْنَ ﴿۱۱﴾

११. हे ईमान बाळगलेल्या लोकांनो ! ना पुरूषांनी इतर पुरूषांची थट्टा उडवावी- संभवतः ते यांच्याहून अधिक चांगले असावेत आणि ना स्त्रीयांनी इतर स्त्रीयांची थट्टा उडवावी- संभवतःत्या यांच्याहून अधिक चांगल्या असाव्यात.[१८] आणि आपसात टोमणे मारू नका[१९]आणि ना एकमेकांना वाईट टोपण नावांनी हाक मारा[२०] ईमान (बाळगल्या) नंतर फिस्क (दुराचार) फार वाईट नाव होय[२१]आणि जे लोक तौबा करणार नाहीत तेच अत्याचारी होत.[२२]

يٰٓاَيُّهَا الَّذِيْنَ اٰمَنُوا اجْتَنِبُوْا كَثِيْرًا مِّنَ الظَّنِّ ۡ اِنَّ بَعْضَ الظَّنِّ
اِثْمٌ وَّلَا تَجَسَّسُوْا وَلَا يَغْتَبْ بَّعْضُكُمْ بَعْضًا ۭ اَيُحِبُّ اَحَدُكُمْ اَنْ يَّاْكُلَ
لَحْمَ اَخِيْهِ مَيْتًا فَكَرِهْتُمُوْهُ ۭ وَاتَّقُوا اللّٰهَ ۭ اِنَّ اللّٰهَ تَوَّابٌ رَّحِيْمٌ ﴿۱۲﴾

१२. हे ईमान बाळगलेल्या लोकांनो ! अनेक तर्क (दुराग्रह) (करण्या) पासून अलिप्त रहा कारण काही तर्क (दुराग्रह) अपराध असतात.[२३] आणि पाळतीवर राहू नका[२४] आणि ना तुमच्या पैकी कोणी एखाद्याची निंदा करावी[२५] काय तुमच्या पैकी एखादा मनुष्य ही गोष्ट पसंत करतो की आपल्या मृत भावाचे मांस खावे. तुम्हाला तर याची किळसच येईल.[२६] अल्लाहचे भय बाळगा. निःसंशय अल्लाह तौबा कबूल करणारा, दया करणारा आहे.[२७]

يٰٓاَيُّهَا النَّاسُ اِنَّا خَلَقْنٰكُمْ مِّنْ ذَكَرٍ وَّاُنْثٰى وَجَعَلْنٰكُمْ شُعُوْبًا وَّقَبَاۗىِٕلَ
لِتَعَارَفُوْا ۭ اِنَّ اَكْرَمَكُمْ عِنْدَ اللّٰهِ اَتْقٰىكُمْ ۭ
اِنَّ اللّٰهَ عَلِيْمٌ خَبِيْرٌ ﴿۱۳﴾

१३. लोक हो ! आम्ही तुम्हाला एकाच पुरुष व स्त्री पासून निर्माण केले मग तुमचे जन समूह व कबीले बनविले, यासाठी की तुम्ही एकमेकांना ओळखावे.[२८]अल्लाहच्या जवळ तुमच्यात सर्वाधिक प्रतिष्ठा बाळगणारा तो आहे जो तुमच्यात सर्वाधिक अल्लाहचे भय बाळगणारा आहे.[२९] निःसंशय अल्लाह जाणणारा व ज्ञाता आहे.[३०]

१८. उपरोक्त आयतीत विश्व बंधुत्वाच्या नात्यास कायम व दुरूस्त राखण्याची ताकीद केली गेली होती. आता नैतिक दृष्टया वाईट अशा गोष्टींपासून अलिप्त राहण्याची ताकीद केली जात आहे ज्या परस्पर संबंधांना बिघडविणाऱ्या आणि कपट व अहंकार निर्माण करणाऱ्या आहेत. नैतिक दृष्टया वाईट असणाऱ्या गोष्टींमध्ये एक फार वाईट गोष्ट म्हणजे एकमेकांची टिंगल उडवणे. थट्टा करणारा मनुष्य दुसऱ्याचा अपमान करतो आणि ही गोष्ट तकवा विरूद्ध आहे हदीस वचनातील उल्लेख असा :-

اَلتَّقْوٰی هٰهُنَا وَ يُشِيْرُ اِلٰی صَدْرِهٖ ثَلَاثَ مِرَارٍ بِحَسْبِ امْرِیءٍ مِنَ الشَّرِ اَنْ يَحْقِرَ اَخَاهُ الْمُسْلِمَ، كُلُّ مُسْلِمٍ عَلَی الْمُسْلِمِ حَرَامٌ دَمُهٗ وَ مَالُهٗ وَ عِرْضُهٗ۔ (مسلم كتاب البر)

"पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी आपल्या छातीकडे तीन वेळा इशारा करीत फर्मावले तकवा (अल्लाहचे भय) या ठिकाणी असते माणसाकरीता हे दुष्कर्मच पुरेसे होय की त्याने आपल्या मुसलमान बांधवाला तुच्छ जाणावे प्रत्येक मुसलमानाचे रक्त धन व प्रतिष्ठा दुसऱ्या मुसलमानावर हराम (अवैध) आहे." (मुस्लिम)

थट्टा एक मनुष्य दुसऱ्या मनुष्याची ही उडवितो आणि एक समूह दुसऱ्या समूहाची ही आणि दोन्ही प्रकार घृणास्पद आहेत स्त्रीयां मध्ये ही हा दोष फार मोठया प्रमाणात असतो की त्या इतर स्त्रीयांना हसतात व त्यांची टिंगल उडवितात म्हणून स्त्रीयांना ही विशेषत्वाने ताकीद केली गेली आहे की त्यांनी या पासून अलिप्त रहावे. थट्टा करणारा ज्याची थट्टा करतो, त्याहून स्वत:ला अधिक चांगले समजतो. परंतु शक्य आहे की ज्याची थट्टा उडविली जात आहे तो थट्टा करणाऱ्याहून अधिक चांगला असावा. यास्तव ही विचार सरणीच चुकीची आहे की माणसाने स्वत:ला फार चांगले व इतरांना गौण किंवा निम्नस्तरीय जाणावे.

१९. टोमणे बाजी हृदयांना घायाळ करते म्हणून जीभेला उपरोधी बोल बोलण्या पासून अलिप्त ठेवले पाहीजे, एखाद्याच्या व्यक्तित्वावर हल्ला चढवणे, त्याला टोमणे मारणे व त्यास निंदा नालस्तीचे निशाण बनविणे, क्लेश दायक बाब होय आणि यामुळे परस्पर संबंध दुरावतात.

२०. इतरांना वाईट टोपण नाव ठेवणे आणि वाईट नावांनी त्यांना हाक मारणे व त्यांची आठवण काढणे मोठी अनैतिकतेची बाब होय आणि जो मनुष्य मुसलमानास वाईट नाव ठेवतो तो त्याच्या प्रतिष्ठेची पायमल्ली करतो, म्हणून त्यास मामुली अपराध समजू नये.

या मार्गदर्शनाशी बेपर्वा होण्याचाच हा परिणाम होय की आज मुसलमानांचा एक समूह दुसऱ्या समूहास आणि त्यांची एक जमात दुसऱ्या जमातीस बदनाम करण्याचा प्रयत्न करते. येथपावेतो की जे लोक निव्वळ एकेश्वर वादाचे मान्य कर्ते असतात आणि वास्ता वशिला, अल्लाहखेरीजच्या उपास्यां करीता नजराणे व नियाज, व्यक्तिपूजा आणि कबर पूजा इत्यादिंच्या विरूद्ध असतात त्यांना 'वहाबी' हे टोपण नाव दिले जाते आणि त्यांना २४ नंबर म्हणून पुकारले जाते. जी अरबी वर्णमालेच्या मूल्यांकना नुसार 'वहाबी' या शब्दाची संख्या होय. असले कृत्य ते लोक करतात जे धर्मबह्य रीती रिवाजांमध्ये वाईट रित्या फसलेले आहेत आणि त्यांना या गोष्टीची किंचितही जाणीव होत नाही की ते धर्माच्या मार्गात किती जबरदस्त अडथळे निर्माण करीत आहेत.

२१. अर्थात जो मनुष्य दुसऱ्यांकरीता वाईट नावे योजितो, असे करून तो स्वत:वर अतिशय वाईट नाव चिकटवून घेतो कारण अशा प्रकारची कृत्ये अपराध व अल्लाहची अवज्ञा ठरतात आणि जो मनुष्य असे करतो तो अपराधी आहे व ईमान बाळगल्या नंतर दुराचारात नाव कमविणे फार वाईट गोष्ट होय. अर्थात हे की एका मुसलमानाच्या वाईट नावाने आठवण करणारा दुराचारी ठरतो जो फार मोठा अवगुण आहे.

या मार्गदर्शना वरून असे दिसून येते की इस्लाम मध्ये नैतिक पावित्र्याचे काय महत्व आहे आणि तो समाजात कशा प्रकारची स्वच्छ शुद्धता निर्माण करू इच्छितो. परंतु सांप्रतच्या मुस्लिम समाजात जेव्हा तकवा (अल्लाहच्या भया) ची मूळेच कमजोर झाली तेव्हा निरर्थक बडबडणाऱ्या कवींचे श्रेष्ठत्व वाढले आहे आणि साहित्यात पीका पेक्षा तणा चेच चे वैपुल्य झाले आहे. आजच्या काळात तर पत्रकारितेत तोच यशस्वी आहे जो दुसऱ्याच्या अब्रुचे खूप धिंडवडे काढील. सदाचारी लोकांचे चारित्र्य हनन करील, जबाबदार लोकांविरूद्ध अविश्वास पसरविल आणि स्कॅन्डल सादर करील. या सर्व हरकती मुसलमान दुसऱ्या मुसलमानांविरूद्ध व त्यांच्या जमातींच्या विरूद्ध करतात आणि या बाबतीत इतके पुढे गेले आहेत की मुस्लिम पत्रकारिता व मुस्लिमेतर पत्रकारिता यांच्यात काहीच फरक राहीला नाही. फार थोडे लोक असे आहेत ज्यांनी स्वत:ला या घाणी पासून वाचविले आहे.

हे स्थिती ही मोठी खेदजनक आहे की मुसलमानांमध्ये शिवीगाळ करण्याचा रिवाज सर्वसामान्य झाला आहे आणि शिव्या ही इतक्या अश्लिल की सत्शील माणसाने ऐकून शरमेने मान खाली घालावी. मग ज्याला शिवी दिली जाते त्याच्या आई बहीणीस ज्यांचा काहीही दोष नसतांना, विनाकारण त्यांच्या अब्रुची लक्तरे वेशीवर टांगली जातात. एवढेच नव्हे तर मेलेल्या

व्यक्तिच्या प्रतिष्ठेवर ही प्रहार केला जातो अशा लज्जास्पद हरकती करतांना मुसलमानां मध्ये ही जाणीव मृत पावते की यांच्या या गोष्टींना अल्लाह ऐकत आहे व त्यांचा एकेक शब्द रेकॉर्ड केला जात आहे. ते शिवी देऊन उघडपणे दुराचार व निर्लज्जतेचा अपराध करीत आहेत ज्याची शिक्षा मोठी कठोर आहे.

२२. म्हणजे या स्पष्ट ताकीदी नंतर ही जे लोक या अपराधांपासून अल्लाहजवळ क्षमा मागत नाही व पुन्हा तसे न करण्याचा दृढ संकल्प करीत नाहीत उलट अपराधावर अपराध करीत राहतात ते अत्याचारी होत आणि अत्याचारी करीता अल्लाहची पकड मोठी सक्त आहे.

आयतीच्या या अंतिम वाक्यांशात प्रत्येक मुसलमाना करीता तौबाचे प्रोत्साहन आहे की मार्गदर्शनाचे ज्ञान होण्यापूर्वी जी दुष्कृत्ये यांच्या हातून घडली असतील त्यांच्या बाबत अल्लाहजवळ त्यांनी माफी मागावी व आपल्या आचरणात सुधारणा करावी.

२३. एका ईमान बाळगणाऱ्यास दुसऱ्या ईमान बाळगणाऱ्या व्यक्ति विषयी चांगली भावना मनात बाळगली पाहीजे. सूरह नूर मध्ये फर्माविले गेले आहे की :-

لَوْلَآ اِذْسَمِعْتُمُوْهُ ظَنَّ الْمُؤْمِنُونَ وَالْمُؤْمِنٰتُ بِاَنْفُسِهِمْ خَيْرًا وَّقَالُوْا هٰذَآ اِفْكٌ مُّبِيْنٌ۔ (نور:۱۲)

''जेव्हा लोकांनी ही गोष्ट ऐकली तेव्हा ईमान बाळगणाऱ्यां पुरूषांनी व ईमान बाळगणाऱ्या स्त्रीयांनी एकमेकां विषयी सदभावना का नाही बाळगली?''

परंतु मुसलमानांमध्ये सर्वच चारित्र्यशील नसतात, चारित्र्य हीन ही असतात आणि त्यांच्या उपद्रवा पासून त्रास ही पोहचतो व नुसकान ही म्हणून सदभावनेच्या अर्थ हा नव्हे की माणसाने गोड भ्रमात राहावे. किंबहुना योग्य कारणांमुळे मनुष्य एखाद्या विषयी वाईट ग्रह बाळगण्यात सत्य निष्ठ असू शकतो. उदाहरणार्थ एखाद्या माणसाचे वारंवार वचनभंग पाहून तो ही धारणा बाळगतो की जो वायदा तो माझ्याशी करीत आहे तो पूर्ण करणार नाही तर त्याची ही धारणा निराधार नाही आणि ना हे अपराधाच्या व्याख्येत बसते. त्याचप्रमाणे एखाद्या निष्काळजी डॉक्टर बद्दल हे समजणे की तो माझा इलाज योग्यरित्या करणार नाही आणि या कारणास्तव त्याचा उपचार न घेणे ही काही अशी बाब नव्हे की ज्याबद्दल शरीअत अंकूश ठेवीत असावी. शरीअतचा अंकूश वस्तुत: दुराग्रह बाळगण्यावर आहे; ज्याबद्दल कोणतेही उचित कारण नसावे. आणि जो परस्पर संबंधात कटुता निर्माण करीत असावा. अशाच दुराग्रहाला या आयतीत उघड असा गुन्हा म्हटले गेले आहे. हदीस वचनातील उल्लेख असा :-

اِيَّاكُمْ وَالظَّنَّ فَاِنَّ الظَّنَّ اَكْذَبُ الْحَدِيْثِ۔

(صحیح البخاری کتاب الادب)

''दुराग्रह (बाळगण्या) पासून अलिप्त रहा कारण दुराग्रह अतिशय निकृष्ट असे असत्य आहे.'' (बुखारी)

परंतु सावधगिरीची निकड अशी की माणसाने शक्यतोवर दुराग्रह बाळगण्या पासून स्वत:ला अलिप्त राखावे. यास्तव आयतीत ताकीद ही केली गेली आहे की अनेक दुराग्रहां पासून अलिप्त रहा म्हणून ही गोष्ट आपोआप स्पष्ट होते की प्रत्येक दुराग्रह गुन्हा नव्हे. परंतु ज्याअर्थी काही दुराग्रह उघड स्वरूपाचे गुन्हे आहेत म्हणून एखाद्या विषयी दुराग्रह बाळगण्या संदर्भात माणसाने सावध राहीले पाहीजे.

२४. म्हणजे एखाद्याचे व्यंग दोष शोधत बसू नका. अल्लाहचे भय बाळगणाऱ्या माणसाची दृष्टी स्वत:च्या उणीवांवर असते. आणि त्याला आपल्या आखिरत संबंधीच्या मुक्तिची काळजी लागते. तेव्हा तो इतरांच्या दुष्कर्मांमध्ये का म्हणून रस घेईल हदीस वचनात ही या बाबत मनाई केली गेली आहे -

وَلَاتَجَسَّسُوا وَلَاتَحَسَّسُوا۔ (صحیح البخاری کتاب الادب)

''ना पाळती वर राहा आणि ना रहस्य शोधा'' (बुखारी)

बायबल मध्ये ही दोष काढण्या बद्दल मोठया प्रभावशाली शैलीत हा उपदेश केला गेला आहे-

''तुमचे दोष काढण्यात येऊ नयेत म्हणून तुम्ही कोणाचे दोष काढू नका. कारण ज्या प्रकारे तुम्ही दोष काढाल त्या प्रकारेच तुमचे दोष काढण्यात येतील आणि ज्या मापाने तुम्ही मापून द्याल, त्याच मापाने तुम्हाला मापून देण्यात येईल. तू आपल्या डोळयांतले मुसळ ध्यानात न आणितां आपल्या भावाच्या डोळयांतले कुसळ का पाहतोस? अथवा तुझ्या डोळयातले कुसळ मला काढू दे असे तू आपल्या भावाला कसे म्हणशील? पाहा, तुझ्या डोळयांत तर मुसळ आहे अरे ढोंगया, पहिल्याने आपल्या डोळयांतले मुसळ काढून टाक म्हणजे आपल्या भावाच्या डोळयांतले कुसळ काढण्यास तुला स्पष्ट दिसेल. (मत्तय ७: १ ते ६)

राहीला हा प्रश्न की काय हे मार्गदर्शन लक्षात घेता इस्लामी शासना करीता गुन्हा अन्वेषण करणे योगय होय? तर याचे उत्तर असे आहे की हे मार्गदर्शन त्या जबाबदाऱ्यांना पार पाडण्यात मुळीच नकारात्मक नाही ज्या शांतता सुव्यवस्था कायम राखण्याच्या, इन्कार करणाऱ्यांना रोखण्याच्या व समाजात उत्पात घडून येण्यासंबंधी इस्लामी शासनाला लागू पडतात. या उद्दिष्टां करीता भेद घेण्याचा योग्य मार्ग अवलंबिणे वाईट नाही,

किंबहुना दुष्कृत्य व अपराधांच्या उच्चाटना करीता आवश्यक आहे अन्यथा ना अपराध्यांचा थांग पत्ता लागेल आणि ना कट कारस्थानांचा आणि ना त्या अड्डयांचा जे इस्लामी शासन किंवा मुसलमानांच्या समाजा करीता धोकादायक असावेत. ही बाब शासनाच्या कार्य क्षेत्राशी संबंधित आहे जी या ठिकाणी चर्चा करण्या जोगी नाही.

२५. निंदा म्हणजे एखाद्याच्या पश्चात त्याच्या विषयी वाईट बोलणे मग तो तसा का असेना. हदीस वचनात या विषयीचे स्पष्टीकरण पुढील प्रमाणे दिले गेले आहे :-

ذِكْرُكَ اَخَاكَ بِمَا يَكْرَهُ قِيلَ اَفَرَأَيْتَ اِنْ كَانَ فِي اَخِي مَا اَقُولُ؟ قَالَ اِنْ كَانَ فِيْهِ مَا تَقُوْلُ فَقَدِ اغْتَبْتَهُ وَاِنْ لَّمْ يَكُنْ فِيْهِ مَاتَقُولُ فَقَدْ بَهَتَّهُ۔ (مسلم کتاب البر)

''निंदा ही होय की तुम्ही आपल्या भावाचा उल्लेख अशा प्रकारे करावा जो त्याला अप्रिय व्हावा. कोणी तरी विचारले जर तो दोष माझ्या भावत असला जो मी बोलत आहे तर काय ही सुद्धा निंदा झाली? फर्माविले जर ती गोष्ट त्याच्या अंगी आढळून येत असेल जी तुम्ही सांगत आहात तर तुम्ही त्याची निंदा केली आणि जर ती गोष्ट त्याच्या अंगी नसेल तर तुम्ही त्याच्यावर आळ घेतला.''(मुस्लिम)

परंतु जर एखाद्याच्या वाईट पणाचा उल्लेख खरोखर किंवा शरीअतच्या आवश्यकते पायी करावा लागला तर याला ना कुरआनात निंदा या अर्थाने घेतले गेले आहे आणि ना हदीस वचनात. यास्तव ज्या धर्म पंडीतांनी निंदाचे उचित प्रकार निवेदिले आहेत त्यांच्याशी सहमत होता येणार नाही. हे प्रकार आपल्या परिने योग्य आहेत आणि काही तर आवश्यक स्वरूपाचे आहेत परंतु असे म्हणणे की ही निंदा नालस्ती तर आहे परंतु उचित आहे आणि आपल्या मृत भावाचे मास खाणे हराम तर आहे परंतु अशा प्रसंगी हे मांस हलाल (वैध) ठरते; वस्तुस्थितीचा विपर्यास आहे. कुरआनाचा सप्रमाण व प्रसिद्ध शब्दकोष 'मुफरदात रागिब' मध्ये निंदाचा अर्थ अशा प्रकारे सांगितला गेला आहे :-

وَالغيبةُ اَنْ يَذْكُرَ الانسانُ غيرهُ بما فِيْهِ مِنْ عَيْبٍ مِنْ غَيرِ اَنْ اَحوَجَ اِلىٰ ذِكْرِهِ۔ (مفردات ص ۳۷۳)

''निंदा ही होय की माणसाने दुसऱ्याचा उल्लेख व्यंग दोषासह करावा, वास्तविक त्याच्या उल्लेखाची गरजच नसावी.'' (मुफरदात-पृ.३७३)

एखाद्याने लोकांना उपद्रवा पासून वाचविण्याकरीता, न्यायालयात साक्ष देण्याकरीता, अत्याचारा विरूद्ध आवाज बुलंद करण्या करीता, दुराचाराच्या व विध्वंसक कृत्यांबाबत शासनाला सचेत करण्या करीता, अपराधी इसमा विरूद्ध रिपोर्ट देण्याकरीता, नास्तिकाला रोखण्याकरीता, एखाद्याच्या उपद्रवा विरूद्ध निषेध करण्या करीता कथन कर्त्यांची उलट तपासणी करण्या करीता, लेखक व पत्रकारांवर टिका करण्या करीता, बिदआत (धर्म बाहय प्रथा) व वाहयात गोष्टी आणि मार्गभ्रष्टतेचा प्रचार व प्रसार रोखण्याकरीता, भ्रष्टाचाराला निबंध घालण्याकरीता संबंधित व्यक्तिंच्या ज्या दुष्कर्मांचा, दोषांचा अपराधात्मक कृत्यांचा उल्लेख आवश्यक असेल त्यांचे निवेदन करणे योग्यच नव्हे तर प्रसंगी अनिवार्य ठरते. म्हणून अशा गोष्टींना गीबत (निंदा)चा आदेश लावला जाऊ शकत नाही.

हदीसचे ज्ञाते, ज्यांनी ग्रंथाचे संकलन केले, निंदेचे दुकान मांडून बसले नाही, किंबहुना पैगंबरांच्या वचनांना अविश्वसनीय कथनांपासून वेगळे करण्याकरीता ही वाखाणण्याजोगी सेवा त्यांनी पार पाडली.

२६. हा उत्कृष्ट उपमा अलंकार होय, ज्यावरून निंदेचे किळसवाणेपण उघड होते व त्याविषयी अत्याधिक घृणा निर्माण होते. जो मुसलमान एखाद्या मुसलमानाची निंदा करतो, वास्तविक तो त्याचा धर्म-बांधव आहे ज्याच्या अनुपस्थितीत तो त्याच्या विषयी बरेवाईट बोलतो, तात्पर्य तो आपल्या मेलेल्या भावाच्या प्रतिष्ठेवर हल्ला चढवितो आणि ही देखील वस्तुस्थिती आहे की निंदा नालस्ती करणाऱ्याला इतरांचे व्यंग दोष सांगण्यात गोडी जाणवते म्हणून निंदा करण्यास मृत भावाचे मांस खाण्याची उपमा दिली गेली आहे, ज्या माणसाला निंदा करण्याची सवय असेल, त्याला त्याच्या या दुष्कृत्याची फार मोठी शिक्षा मिळेल. हदीस वचनातील उल्लेख असा की :-

قَالَ رسولُ اللهِ صلى الله عليه وآله وسلم لَمَّا عُرِجَ بِی مَرَرْتُ بِقَوْمٍ لَهُمْ اَظْفَارٌ مِنْ نُحاسٍ يَخْمِشُوْنَ وَجُوهَهَمْ وَ صُدورَهُمْ فَقُلْتُ مَنْ هٰؤُلاءِ يا جِبْرِيلُ؟ قال هٰؤُلاءِ الَّذِيْنَ يَاكُلُونَ لُحُومَ النَّاسِ وَيَقَعُونَ فِی اَعْرَاضِهِمْ۔ (ریاض الصالحین بروایۃ ابی داؤد)

''पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) असे फर्मावितात की (मेअराज प्रसंगी) जेव्हा मला वर नेण्यात आले तर माझे जाणे अशा लोकां जवळून झाले ज्यांची नखे तांब्याची होती आणि ते आपल्या चेहऱ्यांना व छातींना ओरबाडत होते. मी विचारले, हे जिब्रिल, हे कोण लोक आहेत? ते म्हणाले, हे असे लोक होत जे लोकांचे मांस खात होते आणि त्यांच्या प्रतिष्ठेवर हल्ला चढवित होते.''

आज मुस्लिम समाजात निंदा नालस्ती सर्वसामान्य झाली आहे. घरांमध्ये स्त्रीयांचा विषय विशेषत: इतरांची निंदा नालस्ती हाच असतो आणि पुरूष आपल्या बैठकींमध्ये विना कारण इतरांचे अवगुण दोष निवेदन करतात आणि या गोष्टींवर बेजबाबदार पणे समीक्षण करतात; परंतु कुरआनाच्या या तंबींना लक्षात घेता आवश्यक ठरते की मुसलमानांनी आपले घर व बैठकी निंदा नालस्ती पासून दूर ठेवाव्यात आणि कोणत्याही मुसलमानास उगीच अपमानित करण्यापासून सक्तीने अलिप्त रहावे.

२७. निंदा नालस्ती पासून स्वत:ला वाचविण्याची स्थिती अशी की माणसाने अल्लाहचे भय बाळगावे. जे लोक निंदा नालस्तीच्या किळसवाण्या रोगात खितपत पडले असतील त्यांना तौबा करण्यास सांगितले गेले आहे की जर ते अल्लाहकडे रूजू करतील व आपली सुधारणा करतील तर अल्लाह त्यांची तौबा (क्षमा याचना) कबूल करील व त्यांच्यावर दया करील.

२८. या आयतीत समस्त जन समूहांना संबोधून राष्ट्रे आणि जन समूहांच्या संबंधाने ही हकीगत विशद केली गेली आहे की या सर्वांचे मूल स्त्रोत एकाच पित्या व माता पासून मिळते अर्थात समस्त मानव आदम व हव्वा यांची संतती आहे आणि ज्याअर्थी सर्वांचे मूळ एकच आहे तर ना जाति विषयक वा वांशिक अभिमानाला जागा उरते आणि ना इतर भेदांकरीता, जे वर्ण, वंश व देश इत्यादिंच्या आधारावर कायम केले जातात. ज्यांच्यामुळे परस्पर तिरस्कार निर्माण होतो.

जमीनीवर मानव जातिच्या पसरण्याचा हा नैसर्गिक व अपरिहार्य परिणाम होता की त्यांनी विविध प्रदेशात वास्तव्य करावे आणि जेव्हा लोक विभिन्न भू प्रदेशात राहू लागले तेव्हा त्यांचा वर्ण (रंग) ही वेगवेगळा झाला, भाषा ही वेगळया झाल्या या विभिन्नतेने, जी बाह्यत: व निसर्गत: होती, माणसांना जाति जमातींचे स्वरूप दिले. ही विभिन्नता जी निसर्गत:प्रकट झाली, तिचा हा उद्देश होता की लोकांनी एकमेकांना ओळखावे, जवळच्या लोकांशी अधिक प्रेम निर्माण व्हावे आणि त्यांनी नाते संबंधाचा हक्क अदा करावा. परंतु लोकांनी या विभिन्नतेस आपसातील फाटाफूट व तिरस्कारचे साधन बनविले आणि जाति-जमातीमध्ये पक्षापाताच्या भिंती उभ्या केल्या.

आजच्या काळात भाषिक वाद, काळया रंगाच्या लोकांशी गौर वर्णीय लोकांची भेदभावपूर्ण वागणूक वांशिक श्रेष्ठत्वाचा अहंकार आणि जाति निष्ठा, देशभक्ति, ज्यांच्यामुळे वेगवेगळया मानव समूहांमध्ये संघर्ष व लढाया उदभवतात. त्या वस्तुस्थितीला दृष्टीआड करण्याचा हा परिणाम होय जी आयतीत निवेदिली गेली आहे.

भारतातील अनेकेश्वरवादी जन समूह जातिभेदाला मानणारा आहे आणि उच्च नीचतेची कल्पना त्यांच्या धार्मिक कल्पनेत सामील आहे म्हणून उच्च जातीचे लोक खालच्या जातीच्या लोकांना शूद्र (तुच्छ) ठरवितात आणि इतिहास सांगतो की त्यांना अस्पृश्य ठरवून त्यांना अत्यंत वाईट वागणूक दिली गेली व त्यांना अगदी खालचा दर्जा दिला गेला.

इस्लामची सामाजिक व्यवस्था या सर्व वाईट गोष्टींपासून मुक्त आहे. यात ना उच्च नीचतेचा फरक आहे आणि ना जातिभेदाची कल्पना आणि ना स्पृश्यास्पृश्ये करीता वाव. समाजिक समानतेचे अवलोकन या वेळेच्या नमाज द्वारे केले जाऊ शकते ज्यात कोणत्याही प्रकारच्या भेदभाव आणि श्रेष्ठत्वाचा मुलाहीजा ठेवला जात नाही. आणि सर्व एकाच रांगेत (नमाज पडण्या करीता) उभे राहतात. सुप्रसिकद्ध उर्दू कवी डॉ. इकबाल यांनी म्हटले आहे-

**''एक ही सफ मे खडे हो गये मेहमूद व अयाज़**
**न कोई बंदा रहा और न कोई बंदा नवाज''**

राहीला निकाह (विवाह) वगैरे मध्ये खानदानी पात्रता व व्यवसाय इत्यादिची बरोबरीची समस्या तर याचे स्वरूप केवळ दूरदर्शितेचे आहे, जेणेकरून पती-पत्नीच्या दरम्यान निभावण्या योग्य स्थिती निर्माण व्हावी, शरीअत विषयक कायद्याचे नव्हे की या विरूद्ध करणे योग्य नसावे. याचे स्पष्ट उदाहरण हजरत जैनबचे होय. जे कुरेश कबिल्याची होती. त्यांचा हजरत जैद यांच्याशी निकाह झाला जे पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांचे स्वतंत्र केलेले गुलाम होते. तात्पर्य बरोबरीचा संकोच आवश्यक नाही अरब व अरबेतर सर्व एकमेकांच्या स्त्रीयांशी निकाह करू शकतात. कुरआनाने खरे पाहता धर्म (इस्लाम), नैतिक स्वच्छ शुद्धता व सत्शीलता या गोष्टीनाच बरोबरीचे स्तर ठरविले आहे.

**وَالطَّيِّبَاتُ لِلطَّيِّبِينَ وَالطَّيِّبُونَ لِلطَّيِّبَاتِ۔ (نور:٢٦)**

''स्वच्छ शुद्ध स्त्रीया स्वच्छ शुद्ध पुरूषांकरीता आहेत आणि स्वच्छ शुद्ध पुरूष स्वच्छ शुद्ध स्त्रीयांकरीता''(नूर-२६)

२९. म्हणजे अल्लाहच्या दृष्टीने सान्निध्य व श्रेष्ठत्वाचे स्तर तकवा (अल्लाहचे भय) आहे. जो मनुष्य तकवा म्हणजे अल्लाहचे भय व पापभीरूतेत जेवढा अग्रसर आहे तितका त्याचा दर्जा बुलंद आहे. खरी प्रतिष्ठा व मान्यता अल्लाहच्या भयान्वये प्राप्त होते. गोत्र वंश आणि या सारख्या इतर गोष्टींद्वारे नव्हे.

३०. अल्लाह जाणतो की तुमच्या पैकी कोण कितपत अल्लाहचे भय बाळगणारा आहे व त्याच्या स्थितीशी पूर्णत: भिज्ञ आहे. म्हणून तो त्याचे योग्य स्थान निश्चित करील. संभवत: एखाद्या माणसाची लोकांच्या नजरेत काहीच किंमत नसावी. परंतु तो तकवाच्या उच्च स्तरावर असावा, ज्यामुळे सर्वश्रेष्ठ अल्लाह त्याला उच्च स्थान प्रदान करील.

**ईमान बाळगणारे वास्तविक तेच आहेत ज्यांनी अल्लाह व त्याच्या पैगंबरा वर ईमान आणले, मग संशयात पडले नाहीत आणि आपल्या धन व आपल्या प्राणांनी अल्लाहच्या मार्गात जेहाद केले. हेच लोक सच्चे आहेत.*(अल-कुरआन)***

قَالَتِ الْأَعْرَابُ اٰمَنَّا ۭ قُلْ لَّمْ تُؤْمِنُوْا وَلٰكِنْ قُوْلُوْٓا اَسْلَمْنَا وَلَمَّا
يَدْخُلِ الْاِيْمَانُ فِيْ قُلُوْبِكُمْ ۭ وَاِنْ تُطِيْعُوا اللّٰهَ وَرَسُوْلَهٗ لَا يَلِتْكُمْ
مِّنْ اَعْمَالِكُمْ شَيْــــًٔا ۭ اِنَّ اللّٰهَ غَفُوْرٌ رَّحِيْمٌ ﴿١٤﴾

१४. ग्रामीण अरब म्हणतात की आम्ही ईमान बाळगले[३१] यांना सांगा तुम्ही ईमान नाही बाळगले, किंबहुना सांगा की आम्ही इस्लाम (आज्ञा पालन) कबूल केले.[३२] ईमान अद्याप तुमच्या हृदयांमध्ये शिरले नाही.[३३] जर तुम्ही अल्लाह व त्याच्या पैगंबराचे आज्ञापालन कराल तर तो तुमची कर्मे किंचितही घटविणार नाही.[३४] नि:संशय अल्लाह माफ करणारा, दया करणारा आहे.[३५]

اِنَّمَا الْمُؤْمِنُوْنَ الَّذِيْنَ اٰمَنُوْا بِاللّٰهِ وَرَسُوْلِهٖ ثُمَّ لَمْ يَرْتَابُوْا
وَجٰهَدُوْا بِاَمْوَالِهِمْ وَاَنْفُسِهِمْ فِيْ سَبِيْلِ اللّٰهِ ۭ اُولٰۗىِٕكَ
هُمُ الصّٰدِقُوْنَ ﴿١٥﴾

१५. ईमान बाळगणारे वास्तविक तेच आहेत ज्यांनी अल्लाह व त्याच्या पैगंबरा वर ईमान आणले, मग संशयात पडले नाहीत आणि आपल्या धन व आपल्या प्राणांनी अल्लाहच्या मार्गात जेहाद केले. हेच लोक सच्चे आहेत.[३६]

قُلْ اَتُعَلِّمُوْنَ اللّٰهَ بِدِيْنِكُمْ ۭ وَاللّٰهُ يَعْلَمُ مَا فِي السَّمٰوٰتِ
وَمَا فِي الْاَرْضِ ۭ وَاللّٰهُ بِكُلِّ شَيْءٍ عَلِيْمٌ ﴿١٦﴾

१६. सांगा, काय तुम्ही आपला धर्म अल्लाहला जाणविता? वस्तुत: अल्लाह जाणतो जे काही आकाशांमध्ये आहे आणि जे काही जमीनीवर आहे, आणि अल्लाहला प्रत्येक गोष्टीचे ज्ञान आहे.

يَمُنُّوْنَ عَلَيْكَ اَنْ اَسْلَمُوْا ۭ قُلْ لَّا تَمُنُّوْا عَلَيَّ اِسْلَامَكُمْ ۚ بَلِ
اللّٰهُ يَمُنُّ عَلَيْكُمْ اَنْ هَدٰىكُمْ لِلْاِيْمَانِ اِنْ كُنْتُمْ
صٰدِقِيْنَ ﴿١٧﴾

१७. हे लोक तुमच्यावर उपकार ठेवतात की त्यांनी इस्लाम कबूल केला आहे. सांगा, माझ्यावर आपल्या इस्लामचा उपकार ठेवू नका, किंबहुना हा अल्लाहचा तुमच्यावर उपकार आहे की त्याने तुम्हाला ईमानाचा मार्ग दाखविला, जर तुम्ही सच्चे असाल.[३७]

اِنَّ اللّٰهَ يَعْلَمُ غَيْبَ السَّمٰوٰتِ وَالْاَرْضِ ۭ وَاللّٰهُ بَصِيْرٌۢ بِمَا
تَعْمَلُوْنَ ﴿١٨﴾ ع

१८. अल्लाह आकाशांच्या व जमीनीच्या समस्त गुप्त गोष्टींना जाणतो आणि जे काही तुम्ही करता ते अल्लाह पहात आहे.[३८]

३१. या सूरहच्या समारोपाच्या आयती होत ज्यात त्या लोकांवर अंकूश ठेवला गेला आहे जे इस्लामच्या श्रद्धेला कबूल करून मुसलमानांमध्ये सामील तर झाले होते. परंतु त्यांच्या मनात अजून ईमानचा शिरकाव झाला नव्हता, म्हणूनच त्याचे वागणे अल्लाह व त्याच्या पैगंबराशी असे होते जे ईमानाशी सुसंगत नव्हते, किंबहुना विपरीत होते.

३२. या ठिकाणी इस्लाम हा शब्द आपल्या प्राथमिक अर्थाने वापरला गेला आहे म्हणजे कलीमा पढून इस्लाम धर्मात दाखल होणे आणि आज्ञा पालनास व्यक्त करणे. उघड आहे हा इस्लाम आपल्या ईमान स्वरूप आत्म्या विरहीत असल्यामुळे केवळ वरकरणी इस्लाम असतो. खरोखरचा व परिपूर्ण इस्लाम नव्हे आणि जेथपावेतो ईमानाचा संबंध आहे, त्याची वास्तविकता मनाची सत्य परीक्षा होय.यास्तव ईमानाचा तोंडी दावा निरर्थक आहे जर तो मनाच्या समर्थनासह नसेल.

३३. स्पष्ट झाले की कलिमा पढल्याने व ईमानाची तोंडी कबूली दिल्याने माणूस मुसलमानांमध्ये सामील तर होतो. परंतु जो पावेतो मनात ईमान शिरत नाही. अल्लाहच्या दृष्टीने तो ईमान बाळगणारा नाही.

३४. अल्लाह आणि त्याच्या पैगंबराचे आज्ञा पालन त्याच स्थितीत शक्य आहे जेव्हा हृदयात ईमान असावे आणि जे लोक आज्ञाधारक बनतील त्यांच्या प्रत्येक सत्कृत्याचा मोबदला अल्लाह त्यांना प्रदान करील व त्यात काहीही घट करणार नाही.

३५. हे प्रोत्साहन आहे त्या लोकांना की आपल्या आचरणात सुधारणा करून अल्लाहतर्फे माफी व त्याच्या कृपेस पात्र व्हावे.

३६. हे खऱ्या ईमान बाळगणाऱ्याचे लक्षण आहे की तो अल्लाह व त्याच्या पैगंबरावर अशा प्रकारे ईमान बाळगतो की त्याच्या मनात कसलाही संशय उरत नाही; किंबहुना त्याला पूर्ण विश्वास व समाधान असते आणि हा विश्वास त्याला या गोष्टीस प्रवृत्त करतो की त्याने अल्लाहच्या मार्गात कुर्बानी (बलीदान) देण्यात हयगय करू नये. यास्तव तो धर्माकरीता इस्लाम विरोधी शक्तींशी टक्कर घेतो आणि अल्लाहच्या कलिमा बुलंद करण्यासाठी आपले धन ही खर्ची घालतो व आपल्या जीवाची ही पर्वा करीत नाही.

आजच्या काळातील बहुसंख्य मुसलमान धर्माविषयी (इस्लाम विषयी) सुज्ञता बाळगत नाहीत.ते कलमा पढतात म्हणून मुसलमान तर आहेत,परंतु त्यांच्या वागण्या बोलण्यावरून असे दिसून येते की ते खऱ्याखुऱ्या ईमानाशी अजूनही परिचित नाहीत आणि या गोड भ्रमात वावरतात की आखिरतच्या मुक्ति करीता त्यांचे कलमा पढणे पुरेसे आहे. जर त्यांनी या आयतींचा विचार पूर्वक अभ्यास केला असता तर त्यांचे डोळे उघडले असते.

३७. म्हणजे जर तुम्ही आपल्या ईमान विषयक दाव्यात अगदी सच्चे आहात तर तुम्ही हे ध्यानी घ्यायला हवे की तुम्ही ईमान बाळगून अल्लाहच्या पैगंबरावर काही उपकार केला नाही, उलट अल्लाहचा हा उपकार होय की त्याने तुम्हाला ईमानाचा मार्ग दाखविला.

३८. या आयतीत त्या लोकांना, जे केवळ वरकरणी इस्लाम पुरेसा समजतात, तंबी दिली गेली आहे की अल्लाह पासून तुमच्या अंतरीची अवस्था लपून राहू शकत नाही. जर तुमची मने ईमान विरहीत आहेत तर तुमच्या वरकरणी इस्लामची अल्लाहजवळ किंचितही कदर होणार नाही.

# सूरह क़ाफ

# ५०. सूरह क़ाफ

**नाव :**सूरह (अध्याया) चा आरंभ 'क़ाफ' या अरबी वर्णमालेतील अक्षराने झाला आहे आणि हेच या सूरहचे शिर्षक आहे.

**अवतरण काळ :** मक्की आहे मजकूरांवरून असे दिसून येते की मक्केच्या प्रारंभीच्या काळात अवतरली असेल.

**मध्यवर्ति कल्पना :** मरणोत्तर जीवन हश्र (कर्माचा लेखा जोखा) आणि जन्नत व जहन्नमचा विश्वास निर्माण करणे.

**आयत रचना :** आयत क्र. १ ते ५ मध्ये कुरआनाच्या महानतेस प्रस्तुत करीत मरणोत्तर जीवना विषयी काफिरांच्या शंका संशयाचे निवारण केले गेले आहे.

आयत क्र. ६ ते ११ मध्ये आकाश व जमीनीच्या त्या निशाण्यांकडे लक्ष वेधले गेले आहे, ज्या अल्लाहचे शक्ती सामर्थ्य, त्याचे ईशत्व व त्याच्या बुद्धिकौशल्यास प्रमाणित करतात व ज्यांच्यावर विचार चिंतन केल्याने मरणोत्तर जीवनाची खात्री होते.

आयत क्र.१२ते १५मध्ये त्या जन समूहांच्या परिणति द्वारे बोध दिला गेला आहे, ज्यांनी पैगंबरांना अशा साठी खोटे ठरविले होते की ते यांना मरणोत्तर जीवना पासून सावध करीत होते.

आयत क्र. १६ ते ३५ मध्ये आचरणाचे रेकॉर्ड, हश्र, जन्नतचे असे चित्र रेखाटले गेले आहे की जणू आताच कर्माचा हिशेब घ्यायला सुरूवात झाली आहे आणि या सर्व गोष्टी समोर दिसत आहेत.

आयत क्र. ३६ ते ३७ मध्ये स्मृतींची उजळणी आहे.

आयत क्र. ३८ ते ४५ सूरहच्या समारोपाच्या आयती होत ज्यात पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांना आपल्या भूमिकेवर दृढ राहण्याची, अल्लाहचे गुणगान करण्याची व कुरआनाद्वारे ईश-मार्गदर्शनाची उजळणी करण्याची ताकीद केली गेली आहे.

**महत्व :** ही सूरह लहान लहान आयतींवर आधारीत असली तरी यात इतर महत्वपूर्ण व मूलभूत गोष्टी खेरीज कर्माचा हिशेब आणि मृतांचे पुन्हा जिवित होणे या गोष्टींचे चित्र अशा प्रकारे रेखाटले गेले आहे की जणू ही स्थिती आताच उद्‌भवली आहे व जन्नत आणि दोजख समोर हजर आहेत. या वैशिष्टयांमुळे ईद व जुमाच्या नमाज मध्ये या सूरहचे पठण करणे अधिक योग्य समजले जाते. हदीस वचनातील उल्लेख असा की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) ईदच्या नमाज मध्ये व जुमाच्या खुतब्यात (प्रवचनात) या सूरहचे पठण करीत (मुस्लिम किताब सलातुल ईदैन) तसेच फज्र (प्रात:कालीन) नमाज मध्ये ही याचे पठण पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या आचरणान्वये सिद्ध आहे. (मुस्लिम किताबुस्सलात)

# ५०. सूरह क़ाफ

سُوْرَةُ قٓ

आयती - ४५

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ

१. क़ाफ़ [१] आदरणीय कुरआनाची शपथ.[२]

قٓ ۚ وَالْقُرْاٰنِ الْمَجِيْدِ ①

२. परंतु त्या लोकांना आश्चर्य वाटले की त्यांच्याजवळ त्यांच्या मधूनच एक खबरदार करणारा आला, यास्तव काफिर म्हणाले, ही तर विचित्र गोष्ट आहे.[३]

بَلْ عَجِبُوْٓا اَنْ جَآءَهُمْ مُّنْذِرٌ مِّنْهُمْ فَقَالَ الْكٰفِرُوْنَ
هٰذَا شَيْءٌ عَجِيْبٌ ②

३. काय जेव्हा आम्ही मरण पावू व माती होऊन जाऊ तेव्हा पुन्हा निर्माण केले जाऊ? हा परतावा तर (बुद्धि पासून) दूर आहे.[४]

ءَاِذَا مِتْنَا وَكُنَّا تُرَابًا ۚ ذٰلِكَ رَجْعٌۢ بَعِيْدٌ ③

४. आम्ही जाणतो, जमीन यांच्या शरीरातून जे काही घटविते आणि आमच्या जवळ एक ग्रंथ आहे जो समस्त गोष्टींना सुरक्षित राखतो.[५]

قَدْ عَلِمْنَا مَا تَنْقُصُ الْاَرْضُ مِنْهُمْ ۚ وَعِنْدَنَا كِتٰبٌ حَفِيْظٌ ④

५. परंतु या लोकांनी सत्याला खोटे ठरविले, जेव्हा त्यांच्या जवळ आले. यास्तव ते गोंधळात पडले आहेत.[६]

بَلْ كَذَّبُوْا بِالْحَقِّ لَمَّا جَآءَهُمْ فَهُمْ فِيْٓ اَمْرٍ مَّرِيْجٍ ⑤

६. तर काय यांनी आपल्या वर (असलेल्या) आकाशाला नाही पाहीले की कशा प्रकारे आम्ही ते बनविले व सुशोभित केले आणि यात कोठे ही छिद्र नाही.[७]

اَفَلَمْ يَنْظُرُوْٓا اِلَى السَّمَآءِ فَوْقَهُمْ كَيْفَ بَنَيْنٰهَا وَزَيَّنّٰهَا وَمَا لَهَا
مِنْ فُرُوْجٍ ⑥

७. आणि जमीनीला आम्ही पसरविले व त्यात पर्वत रोवले आणि तिच्यात प्रत्येक प्रकारची नयन रम्या वनस्पती उगविली.[८]

وَالْاَرْضَ مَدَدْنٰهَا وَاَلْقَيْنَا فِيْهَا رَوَاسِيَ وَاَنْۢبَتْنَا
فِيْهَا مِنْ كُلِّ زَوْجٍۢ بَهِيْجٍ ⑦

पारा२६

१. सांकेतिक अक्षरांच्या स्पष्टीकरणासाठी पहा सूरह बकरा टीप क्र.१ आणि सूरह यूनुस टीप क्र. १

या सूरह मध्ये काफ या अक्षराचा संकेत कुरआनाकडे आहे ज्याच्या महानतेचा उल्लेख पहिल्याच आयतीत केला गेला आहे आणि ज्याद्वारे पुनरोक्तिची ताकीद शेवटच्या आयतीत केली गेली आहे. या अक्षरान्वये सूरहचा आरंभ करण्यात चमत्काराचा पैलू ही आहे. हे अक्षर या सूरहशी पूर्णत: सुसंगत आहे आणि याचा उच्चार सचेत करतो की अतिशय महत्वपूर्ण गोष्ट सांगितली जात आहे, यासाठी याकडे पूर्णत: लक्ष केंद्रित करा.

२. कुरआनाचे वैशिष्टय 'मजीद' असे निवेदिले गेले आहे. अर्थात महनीय व किर्तीमान (Glorious) आणि शपथ, जसे की या आधी स्पष्ट केले गेले आहे, अरबी भाषेत साक्ष देण्याच्या अर्थाने प्रयोजिली जाते. या ठिकाणी कुरआनाच्या या गुणविशेषास की तो एक महान व अतिशय उच्च कोटिचा ग्रंथ आहे, प्रेषित्वाची साक्ष देण्या करीता सादर केला जात आहे. अर्थात हे की ही उच्च प्रतीची वाणी या गोष्टीचे उघड प्रमाण होय की जी व्यक्ति याला प्रस्तुत करीत आहे, ही त्याची स्वत:ची वाणी नव्हे, किंबहुना अल्लाहने त्या व्यक्तिवर अवतरीत केली आहे आणि त्याला आपला पैगंबर बनवून पाठविले आहे. व अशासाठी पाठविले आहे की त्याने लोकांना या गोष्टीबाबत खबरदार करावे की मृत्युनंतर त्यांना दुसऱ्यांदा जिवित करून उठविले जाईल आणि कर्माचा मोबदला प्राप्त करण्यास्तव अल्लाहपुढे हजर केले जाईल.

३. म्हणजे या ऐवजी की या लोकांनी कुरआनाच्या महानतेस पाहून तो अल्लाहचा ग्रंथ असण्याबद्दल व तो प्रस्तुत करणारा पैगंबर असण्याबद्दल ईमान बाळगले असते, उलट त्यांना या गोष्टीबद्दल आश्चर्य वाटले की यांच्या सारखाच एक मनुष्य पैगंबर कसा झाला. पैगंबर तर एखाद्या माणसाहून श्रेष्ठतमच असू शकतो.

४. अधिक आश्चर्य त्यांना या गोष्टीचे वाटले की ज्या गोष्टी पासून कुरआन व त्यास प्रस्तुत करणारा पैगंबर यांना खबरदार करीत आहे, ती म्हणजे मेल्यानंतर पुन्हा जिवंत अवस्थेत दुसऱ्यांदा उठविले जाणे. परंतु ते समजत की हे दुसऱ्यांदा जिवंत होणे कसे शक्य आहे, वस्तुत: मनुष्य मेल्यानंतर सडून कुजून मातीत मिळतो, मग जेव्हा याचे शरीर ही नावाला उरत नाही तेव्हा याला कशा प्रकारे कियामतीच्या दिवशी जिवंतावस्थेत उठविले जाईल? ते म्हणत ही गोष्ट अकलेच्या अगदी पलीकडे आहे.

५. म्हणजे मनुष्य मेल्यानंतर त्याच्या शरीराचे जे अवयव मातीत मिसळतात. त्याचे अल्लाहला पूरेपूर ज्ञान आहे. आणि अल्लाहने कणा कणाचे रेकॉर्ड सुरक्षित ठेवण्याचा इतमाम ही करून ठेवला आहे. म्हणून अल्लाहचा आदेश होताच प्रत्येक मनुष्य आपल्या पूर्व शरीरासह जमीनीतून उठून उभा राहील.

६. म्हणजे मेल्यानंतर काय काय घडणार आहे या विषयीची हकीगत कुरआन प्रस्तुत करीत आहे. परंतु या लोकांनी जेव्हा कुरआनाने प्रस्तुत केलेल्या हकीगतीस खोटे ठरविले तेव्हा दुसऱ्या जीवनाविषयी संशय व गोंधळात पडले आणि परस्परभिन्न व उलटसुलट गोष्टी बोलू लागले.

मनुष्य जेव्हा सत्य गोष्टीचा इन्कार करतो तेव्हा त्याच्याजवळ विश्वास ठेवण्यास काही आधार राहात नाही मग तो परस्पर भिन्न व उलटसुलट बोलू लागतो. याचे स्पष्ट उदाहरण भारतातील अनेकेश्वर वाद्यांची आवागमनाची किंवा पुनर्जन्माची श्रद्धा होय जी परस्पर भिन्न गोष्टींचे मिश्रण आहे आणि माणसाला मोठा गोंधळात टाकते. याउलट कुरआन मरणोत्तर जीवना विषयी ज्या गोष्टींवर ईमान बाळगण्याचे आवाहन करतो, त्या स्पष्ट हकीगती आहेत ज्या मनाला अपील करतात आणि विश्वास निर्माण करतात की या अपरिहार्यत: घडून येतील.

७. म्हणजे कियामतीचा इन्कार करणाऱ्यांनी जर या पैलूने आकाशाचे अवलोकन केले असते की त्यांना याच्या निर्मात्याची ओळख प्राप्त करावयाची आहे तर त्यांना याच्या रचनेत सर्वथा समर्थ अशा अल्लाहचा हात दिसून आला असता आणि त्यांच्यावर याचा प्रताप ही जाहीर झाला असता व त्याचे सौदर्य ही. मग जेव्हा त्यांना सृष्टीच्या रचयित्याची ओळख झाली असती तर माणसाला दुसऱ्यांदा उठविले जाण्याची गोष्ट यांना विचित्र वाटली नसती व यांनी ती अशक्य ही जाणली नसती कारण ज्या अस्तित्वास एवढया विशाल आकाशाला बनविणे, त्याला असंख्य तारकांनी सुशोभित करणे व त्याला असे मजबूत बनविणे की एक प्रदीर्घ काळ लोटल्यानंतर ही त्याच एक छिद्र ही निर्माण झाले नाही अल्लाहच्या अद्‌भूत सामर्थ्याची भव्य निशाणी आहे आणि आजच्या विज्ञानाने आकाश-विश्वाच्या आश्चर्यांना सविस्तरपणे प्रस्तुत केले आहे. मनुष्य याद्वारे फक्त आपले सामान्य ज्ञान वाढवितो आणि या गोष्टी कडून आपले लक्ष हटवितो की हे कोणत्या शक्तीचे कार्य आहे आणि ती किती जबरदस्त सामर्थ्य बाळगणारी व कशी महानतम आहे.

८. ज्या प्रकारे आकाशात अल्लाहच्या सामर्थ्याचे चमत्कार दिसून येतात तद्‌वतच जमीनीवरही आढळून येतात. जमीनीच्या पृष्ठभागास इतके विस्तृत करणे की तिच्यावर अब्जावधि माणसांचे वास्तव्य व्हावे, तिच्यावर मोठमोठे पर्वत रोवणे, ज्यांनी जमीनीचे संतुलन समान राखावे व ज्यांच्याद्वारे अनेक प्रकारचे लाभ माणसाला होत रहावे, आणि जमीनीतून अशा वनस्पतींचे उगविणे, ज्यांचे दृश्य मनाला मुग्ध करणारे असावे हे सर्व अतिशय जबरदस्त सामर्थ्य बाळगणाऱ्या आणि प्रताप व सौंदर्याने युक्त अशा अल्लाहचेच काम असू शकते.

८. त्या प्रत्येक दासाच्या अंतर्दृष्टि व बोध ग्रहणा करीता जो (आपल्या पालन कर्त्याकडे) रूजू करणारा असावा.[९]

تَبْصِرَةً وَّذِكْرٰى لِكُلِّ عَبْدٍ مُّنِيْبٍ ۝٨

९. आणि आम्ही आकाशातून समृद्ध शाली पाणी अवतरीत केले [१०] व त्यापासून बागा उगविल्या व पीकांची धान्ये ही जी कापली जातात.[११]

وَنَزَّلْنَا مِنَ السَّمَآءِ مَآءً مُّبٰرَكًا فَاَنْۢبَتْنَا بِهٖ
جَنّٰتٍ وَّحَبَّ الْحَصِيْدِ ۝٩

१०. आणि खजूरीची उंच झाडे ही, ज्यांचे झुंबके एकावर एक लोंबकळत असतात.[१२]

وَالنَّخْلَ بٰسِقٰتٍ لَّهَا طَلْعٌ نَّضِيْدٌ ۝١٠

११. दासांच्या उपजिविके करीता - आणि या (पाण्या) द्वारे आम्ही मृत जमीनीला जिवंत केले. अशाच प्रकारे मेल्यानंतर जमीनीतून निघावे लागेल.[१३]

رِّزْقًا لِّلْعِبَادِ ۙ وَاَحْيَيْنَا بِهٖ بَلْدَةً مَّيْتًا ۭ كَذٰلِكَ الْخُرُوْجُ ۝١١

१२. या पूर्वी नूह जन समूहाने खंदक वाल्यांनी [१४] व समूद (जनसमूहाने) खोटे ठरविले.

كَذَّبَتْ قَبْلَهُمْ قَوْمُ نُوْحٍ وَّاَصْحٰبُ الرَّسِّ وَثَمُوْدُ ۝١٢

१३. आणि आद व फिरऔन व लूतच्या भावांनी ही.[१५]

وَعَادٌ وَّفِرْعَوْنُ وَاِخْوَانُ لُوْطٍ ۝١٣

१४. आणि अयका वाले [१६] व तुब्बा [१७] च्या लोकांनी ही. या सर्वांनी पैगंबरांना खोटे ठरविले तेव्हा माझी शिक्षेची तंबी त्यांच्या करीता खरीच ठरली.[१८]

وَّاَصْحٰبُ الْاَيْكَةِ وَقَوْمُ تُبَّعٍ ۭ كُلٌّ كَذَّبَ الرُّسُلَ
فَحَقَّ وَعِيْدِ ۝١٤

१५. काय आम्ही पहिल्यांदा निर्माण करून थकलो? (नव्हे) किंबहुना हे लोक नव-निर्मिती बाबत संशय ग्रस्त आहेत.[१९]

اَفَعَيِيْنَا بِالْخَلْقِ الْاَوَّلِ ۭ بَلْ هُمْ فِيْ لَبْسٍ مِّنْ خَلْقٍ جَدِيْدٍ ۝١٥

१६. आम्ही माणसाला निर्माण केले आणि त्याच्या हृदयात येणाऱ्या आशंका आम्ही जाणतो [२०] आणि आम्ही त्याच्या मुख्य शीरे पेक्षा ही अधिक त्याच्या निकट आहोत.[२१]

وَلَقَدْ خَلَقْنَا الْاِنْسَانَ وَنَعْلَمُ مَا تُوَسْوِسُ بِهٖ نَفْسُهٗ ښ وَنَحْنُ اَقْرَبُ
اِلَيْهِ مِنْ حَبْلِ الْوَرِيْدِ ۝١٦

९. म्हणजे आकाश व जमीनीच्या हया चमत्कारपूर्ण गोष्टी माणसाचे डोळे उघडणाऱ्या आहेत; व यांच्यावर विचार चिंतन केल्याने बोधजनक पैलू दृगोचर होतो. मात्र या अटीवर की माणसाने मन:पूर्वक अल्लाहकडे रूजू करण्याची इच्छा बाळगावी.

१०. म्हणजे असा पाऊस की ज्यामुळे तृप्त होऊन जमीन सोने उगवू लागते व जो माणसाला विपुल प्रमाणात लाभ घडविते.

११. म्हणजे पावसामुळेच पीके उगतात मग त्यांची कापणी करून धान्याचे साठे प्राप्त केले जातात.

१२. खजूरांचे झुंबके एकावर एक असतात जी कला कुसरीचा उत्कृष्ट नमुना प्रस्तुत करतात. आणि ही तर एक झळक आहे, जिचा उल्लेख येथे केला गेला आहे. अन्यथा विविध वृक्ष वेलींवर लोंबकळणारे फळांचे घोस, फळा फुलांची नयन रम्य बनावट यावर माणसाने विचार चिंतन केल्यास बुद्धि दंग राहाते की केवढया इतमामाने या वस्तू निर्माण केल्या गेल्या आहेत. आणि यांच्या रचनेत केवढी सूक्ष्मता व कमालीचे कौशल्य वापरले गेले आहे. अशा प्रकारे मनुष्य जेव्हा या गोष्टींना पाहतो तेव्हा त्याला यांच्यात अल्लाहच्या सामर्थ्याची प्रचंडता ही दिसून येते व त्याचा प्रताप व त्याचे सौंदर्य ही.

१३. आकाशातून पावसाच्या रूपाने येणारे पाणी एकीकडे अल्लाहच्या दासांच्या उपजिविकेचे साधन बनते, तर दुसरी कडे ते अल्लाहच्या या निशाणीसही जाहीर करते की जी जमीन मृत (कोरड) होती, ती अल्लाहच्या सामर्थ्यान्वये जिवंत झाली. आणि त्याच्या जबरदस्त सामर्थ्याने ज्या प्रकारे जमीन जिवंत होऊ शकते. तद्‌वतच मृत माणसे ही जिवंत होऊन जमीनीतून बाहेर पडू शकतील.

१४. स्पष्टीकरणा साठी पहा सूरह फूर्कान टीप क्र. ५१

१५. हजरत लूत यांना 'सदूम' व अमवरहच्या वस्त्यांकडे, ज्या मृत सागराच्या किनाऱ्यावर वसल्या होत्या, पैगंबर बनवून पाठविले गेले होते. हजरत लूत वास्तविक या जनसमूहात जन्मले नव्हते म्हणून त्यांना लूतचे बांधव म्हटले गेले आहे.

१६. स्पष्टीकरणा करीता पहा सूरह हिज्र टीप क्र. ७७.

१७. स्पष्टीकरणा करीता पहा सूरह दुखान टीप क्र. ३९.

१८. या आयतींमध्ये त्या जनसमूहांच्या विनाशाचा उल्लेख केला गेला आहे, ज्यांनी पैगंबरांना खोटे ठरविले होते; यासाठी की कुरआन प्रस्तुत करणाऱ्या पैगंबरास खोटे ठरविणाऱ्यांनी आपल्या परिणतीची काळजी घ्यावी.

१९. म्हणजे अल्लाह माणसाला पहिल्यांदा निर्माण करून थकला नाही की ज्यामुळे त्याच्याकरीता दुसऱ्यांदा निर्माण करणे दुरापास्त ठरावे. पहिल्या निर्मितीस पाहता दुसऱ्या निर्मिती विषयी संशय करण्यास कोणतेही उचित कारण नाही.

२०. मूळ शब्द वस्वसा, अर्थात हळू आवाज. अभिप्रेत ते विचार होत जे माणसाच्या मनात निर्माण होतात. अर्थात अल्लाह माणसाच्या मनात येणाऱ्या बऱ्या वाईट विचारांनाही चांगल्या प्रकारे जाणतो.

२१. अल्लाह माणसा पासून दूर नाही, किंबहुना सर्वतोपरि अगदी निकट आहे, इतका निकट की त्याच्या शरीरातील मुख्य धमनीहूनही अधिक. अल्लाहचे सामर्थ्य व त्याच्या ज्ञानाने याला पूर्णत: कक्षेत घेतले आहे. आणि ज्याअर्थी माणसावर त्याची पकड एवढी मजबूत आहे तर तो अल्लाहचे भय का नाही बाळगत ? आणि हा विचार त्याच्या मनात कोठून उद्‌भवतो की त्याला अल्लाह समोर जाब द्यावा लागणार नाही.

आयतीचा संकेत या गोष्टीकडे ही आहे की जेव्हा अल्लाह माणसाच्या मनात येणाऱ्या विचारांना जाणतो, तेव्हा कियामतीच्या दिवशी प्रत्येक माणसाचे कर्म व त्याच्या हृदयातील भेदांना समोर आणणे व त्यांचा हिशेब घेणे त्याच्याकरीता किंचितहि कठीण नाही.

१७. जेव्हा दोन नोंद करणारे उजव्या व डाव्या बाजूस बसून नोंद (रेकॉर्ड ) करीत असतात.[२२]

إِذْ يَتَلَقَّى الْمُتَلَقِّيَانِ عَنِ الْيَمِينِ وَعَنِ الشِّمَالِ قَعِيدٌ ﴿١٧﴾

१८. तो एखादा शब्द ही उच्चारत नाही, परंतु त्याच्या जवळ एक तत्पर निरीक्षक हजर असतो.[२३]

مَا يَلْفِظُ مِنْ قَوْلٍ إِلَّا لَدَيْهِ رَقِيبٌ عَتِيدٌ ﴿١٨﴾

१९. आणि मृत्युची मुर्छा सत्यासह येऊन पोहोचली. हीच ती गोष्ट जिच्या पासून तू पळ काढत होतास.[२४]

وَجَاءَتْ سَكْرَةُ الْمَوْتِ بِالْحَقِّ ذَٰلِكَ مَا كُنْتَ مِنْهُ تَحِيدُ ﴿١٩﴾

२०. आणि सूर फूंकला गेला. हा आहे तो दिवस, ज्या पासून भय दाखविले गेले होते.[२५]

وَنُفِخَ فِي الصُّورِ ذَٰلِكَ يَوْمُ الْوَعِيدِ ﴿٢٠﴾

२१. आणि प्रत्येक मनुष्य अशा स्थितीत हजर होईल की त्याच्या सोबत एक हाकणारा व एक साक्षी असेल.[२६]

وَجَاءَتْ كُلُّ نَفْسٍ مَعَهَا سَائِقٌ وَشَهِيدٌ ﴿٢١﴾

२२. या गोष्टी बाबत तू गफलतीत राहीलास. आम्ही ते आवरण दूर केले जे तुझ्यावर पडले होते. यास्तव आज तुझी दृष्टी फार तीक्ष्ण आहे.[२७]

لَقَدْ كُنْتَ فِي غَفْلَةٍ مِنْ هَٰذَا فَكَشَفْنَا عَنْكَ غِطَاءَكَ
فَبَصَرُكَ الْيَوْمَ حَدِيدٌ ﴿٢٢﴾

२३. त्याचा सोबती म्हणाला, हे जे माझ्या जवळ होते, हजर आहे.[२८]

وَقَالَ قَرِينُهُ هَٰذَا مَا لَدَيَّ عَتِيدٌ ﴿٢٣﴾

२४. (आदेश झाला) टाकून द्या जहन्नम मध्ये सत्याचा वैरी (असलेल्या) काफीरास.[२९]

أَلْقِيَا فِي جَهَنَّمَ كُلَّ كَفَّارٍ عَنِيدٍ ﴿٢٤﴾

२५. भलाई पासून रोखणाऱ्या मर्यादेचे उल्लंघन करणाऱ्या संशयात टाकणाऱ्यांना

مَنَّاعٍ لِلْخَيْرِ مُعْتَدٍ مُرِيبٍ ﴿٢٥﴾

२६. ज्याने अल्लाह सोबत इतरांना उपास्य ठरविले होते [३०] तर त्याला सक्त अजाब (ईश-प्रकोपा) मध्ये टाका.

الَّذِي جَعَلَ مَعَ اللَّهِ إِلَٰهًا آخَرَ فَأَلْقِيَاهُ فِي الْعَذَابِ الشَّدِيدِ ﴿٢٦﴾

२७. त्याचा सोबती म्हणाला, हे आमच्या पालन कर्त्या ! मी याला बंडखोर बनविले नाही, किंबहुना हा स्वतः पराकाष्ठेच्या मार्गभ्रष्टतेत पडला होता.[३१]

قَالَ قَرِينُهُ رَبَّنَا مَا أَطْغَيْتُهُ وَلَٰكِنْ كَانَ فِي ضَلَالٍ بَعِيدٍ ﴿٢٧﴾

२२. अभिप्रेत दोन फरिश्ते होत जे प्रत्येक माणसाच्या सोबतीला सदैव असतात. एक त्याच्या उजव्या बाजूला बसतो तर दुसरा डाव्या बाजूला, हे दोन्ही फरिश्ते त्या माणसाच्या प्रत्येक गोष्टीची नोंद करतात म्हणजे प्रत्येक कृतीचे, उक्तिचे रेकॉर्ड करतात व त्याला सुरक्षित करतात.

२३. म्हणजे मनुष्य जेव्हा आपल्या मुखाने काही बोलतो, तेव्हा जो फरिश्ता याच्या देखरेखी साठी तैनात असतो तो अगदी तत्परतेने याचे म्हणणे नोंदून घेतो. त्याची कोणती ही गोष्ट रेकॉर्ड झाल्याशिवाय राहात नाही. या दोन्ही फरिश्त्यांमध्ये कामाची विभागणी कशी आहे आणि हे माणसाच्या उजव्या व डाव्या बाजूला कशा प्रकारे बसतात याचा खुलासा ना कुरआनात दिला गेला आहे आणि ना हदीस वचनात यास्तव कुरआनाच्या निवेदनालाच पर्याप्त मानले पाहीजे. राहीले फरिश्त्यांचे शब्द न शब्द नोंद करणे तर आजच्या काळातील माणसा करीता यात नवलाची काही बाबच नाही; कारण टेप रेकॉर्ड सारखी यंत्रे शोधली गेली आहेत. किंबहुना या सारखी संशोधने कुरआन सत्य असण्याचा सबळ व ताजा पुरावा होय.

या आयतीत कथनांना अंकित करून घेण्याची बाब सांगितली गेली आहे.

सूरह इन्फितार मध्ये फर्माविले गेले आहे की:-

وَاِنَّ عَلَيْكُمْ لَحٰفِظِيْنَ۔ كِرَامًا كَاتِبِيْنَ۔ يَعْلَمُوْنَ مَاتَفْعَلُوْنَ۔ (انفطار:١٠تا١٢)

''तुमच्यावर निरीक्षक नियुक्त केले गेले आहेत आदरणीय लिहिणारे, जे तुमच्या प्रत्येक कृतीस जाणतात'' (इन्फितार -१० ते १२)

आणि सूरह जिलजाल मध्ये फर्माविले गेले आहे:-

فَمَنْ يَّعْمَلْ مِثْقَالَ ذَرَّةٍ خَيْرًا يَّرَهٗ وَمَنْ يَّعْمَلْ مِثْقَالَ ذَرَّةٍ شَرًّا يَّرَهٗ۔ (زلزال:٨،٧)

''तेव्हा ज्याने कणा इतकी भलाई केली असेल तो तिला पाहील आणि ज्याने कणा इतकी बुराई (दुष्कर्म) केले असेल, ते ही तो पाहील.'' (जिलजाल - ७,८)

कुरआनाच्या या निवेदनांवरून ही गोष्ट अगदी स्पष्ट आहे की प्रत्येक माणसाच्या प्रत्येक कथन, कृति व त्याच्या समस्त हरकतींचे लिखित रेकॉर्ड ठेवले जात आहे या प्रकारे की कियामतीच्या दिवशी तो आपल्या प्रत्येक कर्मास मग ते सत्कर्म असो वा दुष्कर्म आणि ते कणा इतके का असेना, आपल्या डोळयांनी पाहील. तात्पर्य जगात प्रत्येक माणसाच्या जीवनाचे चित्रिकरण होत होते आणि कियामतीच्या दिवशी तो आपल्या कर्माचा बोलपट स्वत: पाहील आणि हा चित्रपट माणसाने संशोधिलेल्या चित्रपटाच्या तुलनेत असा दर्जेदार असेल की त्याला अन्य कोणतेही उदाहरण दिले जाऊ शकत नाही.

ही वास्तविकता जर माणसाने नेहमी आपल्या दृष्टीपथात ठेवली तर त्याचे जीवन मोठे सावधगिरी पूर्ण होईल. कोणतीही गोष्ट तोंडातून निघण्यापूर्वी तो हा विचार करील की या बाबत जाब तर द्यावा लागणार नाही? व एखादे काम करण्या पूर्वी त्याला ही काळजी राहील की याची गणना सत्कर्मात होईल कि दुष्कर्मात?

२४. मरण पावत असतांना माणसावर मुर्च्छा अवस्था येते, परंतु त्याच्या आत्म्यावर सत्य प्रकट होते. जर तो काफिर असेल तर त्याला सांगितले जाते की हे 'सत्य' आहे ज्यापासून तू जगात दूर पळत राहीला. तात्पर्य मृत्यु कियामतीची प्रस्तावनाच होय. मृत्यु समोर येताच मनुष्य फरिश्त्यांनाही पाहतो आणि त्या विश्वाला ही जे त्यांच्या दृष्टीच्या पलीकडे होते.

२५. हे कियामतीचे चित्र होय की दुसरा सूर फुंकला जाताच सर्व मेलेली माणसे जिवंत होऊन कबरीमधून बाहेर पडू लागतील. त्यावेळी त्यांना सांगितले जाईल की हाच तो दिवस होय ज्या पासून जगात तुम्हाला भय दाखविले जात होते.

२६. म्हणजे प्रत्येक माणसाबरोबर दोन फरिश्ते राहतील. एक त्याला हश्रच्या मैदानाकडे नेईल आणि दुसरा तो, जो त्याच्या आचरण विषयक जीवना संबंधी साक्ष देणारा असेल.

२७. ही गोष्ट कियामतीच्या दिवशी त्या प्रत्येक माणसाला सांगितली जाईल जो आखिरत पासून गाफील होता. या गफलतीच्या परिणाम स्वरूपी त्याच्या डोळयांवर आवरण चढले होते, जे कियामतीच्या दिवशी हटविले जाईल. यास्तव त्याची दृष्टी कियामतीचा अहवाल पाहण्याकरीता तीक्षण होईल.

तात्पर्य जे लोक कियामतीची जाणीव बाळगतात, त्यांची दृष्टी जगात ही तीक्ष्ण असते आणि कियामतीच्या परिस्थितींचा कुरआनाच्या उजेडात अवलोकन करतात.

२८. सोबतीशी अभिप्रेत ते फरिश्ते होत जे या माणसाच्या आचरणाची देखभाल करण्या करीता नियुक्त केले गेले होते. तो याच्या आचरणाचे रेकॉर्ड करतांना म्हणेल की हे रेकॉर्ड अगदी तयार आहे.

२९. हा आदेश त्या दोन फरिश्त्यांना होईल जे अल्लाहच्या

न्यायालयात अपराधींना हजर करतील म्हणजे हाकणारा फरिश्ता आणि साक्ष देणारा फरिश्ता.

३०. या ठिकाणी काफिरांची पाच वैशिष्टये निवेदिली गेली आहेत. एक हे की तो सत्य-विरोधक व याचा शत्रू असतो. तो इतरांना ही सत्य स्विकृती पासून आणि सत्कर्म व भलाईची कामे करण्यापासून रोखतो. आणि नैतिक व शरीअत विषयक मर्यादांचे उल्लंघन करतो. इस्लामच्या बाबतीत शंका संशय निर्माण करतो. तो अल्लाह खेरीजच्या उपास्यांची उपासना करतो जो शिर्क आणि माफ न करण्या जोगा गुन्हा आहे. हा काफिरांच्या काही वैशिष्टयांचा उल्लेख आहे. अन्य स्थानी यांची आणखी काही वैशिष्टये सांगितली गेली आहेत.

३१. या आयतीत 'त्याचा सोबत'शी अभिप्रेत सैतान होय जो जगात या माणसाचा साथीदार म्हणून राहीला.

शब्दशैलीवरून स्पष्ट होते की या माणसाला जेव्हा सक्त अजाब (ईश-शिक्षा) ग्रस्त करण्याचा आदेश झाला असेल तेव्हा तो आपल्या बंडखोरीस सैतानाला जबाबदार ठरविल, मग सैतान त्याच्या म्हणण्याचे खंडन करतांना म्हणेल की मी याच्यावर काहीच जबरदस्ती केली नाही, किंबहुना हा स्वत:च अगदी खालच्या पातळीच्या मार्गभ्रष्टतेत पडला होता. तेव्हा अपराधी व गुन्हेगार हा स्वत:च आहे.

**यांच्या पूर्वी आम्ही किती तरी जन समूहांना नष्ट करून टाकले, जे यांच्याहून कित्येक पटींनी सामर्थ्यशाली होते. ते जगातल्या देशादेशांत फिरले तर काय त्यांना कोठे आश्रय स्थान मिळाले ? *(अल-क़ुर्आन)***

२८. फर्माविले गेले, माझ्याजवळ वाद घालू नका. मी तुम्हाला आधीच आपल्या अजाब (प्रकोपा) विषयी खबरदार केले होते.[३२]

قال لا تختصموا لدي وقد قدمت إليكم بالوعيد ﴿٢٨﴾

२९. माझ्या ठिकाणी गोष्ट बदलली जात नाही [३३] आणि मी दासांवर मुळीच अत्याचार करणारा नाही.[३४]

ما يبدل القول لدي وما أنا بظلام للعبيد ﴿٢٩﴾

३०. तो दिवस जेव्हा आम्ही जहन्नमला विचारू, काय तू भरलीस ? आणि ती म्हणेल आणखी ही काही आहे ?[३५]

يوم نقول لجهنم هل امتلأت وتقول هل من مزيد ﴿٣٠﴾

३१. आणि जन्नत ईश-भय बाळगणाऱ्यांच्या समीप आणली जाईल, किंचितही दूर नसेल.[३६]

وأزلفت الجنة للمتقين غير بعيد ﴿٣١﴾

३२. ही आहे ती गोष्ट जिचा तुमच्याशी वायदा केला जात होता. त्या प्रत्येक माणसा करीता जो रूजू करणारा [३७] आणि संरक्षण करणारा होता.[३८]

هذا ما توعدون لكل أواب حفيظ ﴿٣٢﴾

३३. जो रहमानशी न पाहता भय बाळगत राहीला [३९] आणि जो रूजू राहणाऱ्या अंत:करणासह हजर झाला.[४०]

من خشي الرحمن بالغيب وجاء بقلب منيب ﴿٣٣﴾

३४. दाखल व्हा जन्नत मध्ये सलामती पूर्वक [४१] हा सदैव कालीन दिवस आहे. [४२]

ادخلوها بسلام ذلك يوم الخلود ﴿٣٤﴾

३५. तिथे यांच्या करीता ते सर्व काही असेल जे ते इच्छितील.आणि आमच्या जवळ अधिक ही आहे. [४३]

لهم ما يشاءون فيها ولدينا مزيد ﴿٣٥﴾

३६. यांच्या पूर्वी आम्ही किती तरी जन समूहांना नष्ट करून टाकले, जे यांच्याहून कित्येक पटींनी सामर्थ्यशाली होते.[४४] ते जगातल्या देशादेशांत फिरले तर काय त्यांना कोठे आश्रय स्थान मिळाले ?[४५]

وكم أهلكنا قبلهم من قرن هم أشد منهم بطشا فنقبوا في
البلاد هل من محيص ﴿٣٦﴾

३२. म्हणजे आता या विवादापासून काही लाभ नाही. मी तुम्हाला जगात आपल्या प्रेषितांद्वारे खबरदार केले होते की जर तुम्ही कुफ्र (इन्कार) केला तर याची सक्त शिक्षा कियामतीच्या दिवशी तुम्हाला भोगावी लागेल.

३३. म्हणजे माझा फैसला अटळ आहे आणि या फर्मानात कसलाही बदल होणार नाही की मी सैतान व त्याच्या अनुयायींनी जहन्नमला भरून टाकीन.

३४. म्हणजे जहन्नमची ही निरंतर शिक्षा जी काफिरांना दिली जाईल, अत्याचार पूर्वक नसेल, तर न्यायाची निकड भागविण्या करीता असेल. जे लोक अल्लाहवर आक्षेप घेण्याचे दु:साहस करतात, ते कुरआनात या सक्त शिक्षां विषयींचा उल्लेख ऐकून, अल्लाहला (अल्लाह रक्षण करो) अत्याचारी समजू लागतात. त्यांच्या दृष्टीने न्यायाची गोष्ट हीच की अल्लाहने आपल्या निष्ठावान दास व विद्रोहींच्या दरम्यान काहीच फरक करू नये. बंडखोरांना शिक्षा देण्या ऐवजी त्यांना आपल्या बक्षिसांनी व देणग्यांनी उपकृत करावे किंवा अगदी सुरवाती पासूनच आखिरत कायम करू नये. परंतु त्यांच्या या दोन्ही गोष्टी स्पष्टत: चुकीच्या व न्यायाविरूद्ध आहेत. जगातील समस्त शासने आपल्या बंडखोरांना व भयंकर गुन्हेगारांना मृत्युदंड ही देतात व आजीवन कारावासाची शिक्षा ही आणि याला न्यायाची निकड समजले जाते. मग अल्लाहतर्फे त्याच्या विद्रोही दासांना दिल्या जाणाऱ्या निरंतर शिक्षेला कोणत्या आधारावर अत्याचारपूर्वक ठरवितात? राहीली ही गोष्ट की अल्लाहने सुरवातीपासूनच आखिरत प्रस्थापित करू नये; तर याचा अर्थ असा झाला की हे जग व यात माणसाचे अस्तित्व सर्व निरर्थक आहे. माणसाला जर मरून अगदी नष्टच व्हायचे आहे तर जगातील काही दिवसांच्या जीवनाने साध्य काहीच नाही. जीवन अगदी लाभशून्य व ध्येयशून्य राहते.

या खेरीज, या वस्तुस्थितीचा ही इन्कार केला जाऊ शकत नाही की अत्याचार एखाद्याचा हक्क हिरावून घेण्यासाठी किंवा एखादी अनुचित गरज भागविण्यासाठी केला जातो.परंतु अल्लाहच्या संदर्भात अशी कल्पना ही केली जाऊ शकत नाही. तो नि:स्पृह आहे आणि त्याला कसल्याही गोष्टीची गरज नाही. असे असतांना तो आपल्या दासांवर अत्याचार का म्हणून करील?

३५. म्हणजे असे समजू नका की काफिरांची व गुन्हेगार माणसांची एवढी मोठी संख्या जी न जाणो किती महापद्म (Billion) मनुष्य व जिन्नांवर आधारीत असेल, एवढया अतिप्रचंड जन समूदायाला जहन्नम कशा प्रकारे सामावून घेईल. तिच्या विस्ताराची अवस्था अशी असेल की मनुष्य व जिन्नांच्या अगणित संख्येने तिला भरल्यावरही, ती म्हणेल की आणखी ही काही असेल तर त्यासाठी जागा आहे.

३६. म्हणजे जन्नत मध्ये जाण्या करीता अल्लाहचे भय बाळगणाऱ्यांना कसलेही अंतर पार पाडावे लागणार नाही. उलट फैसला होताच ते जन्नत मध्ये पोहचतील. स्थळ काळाचे कसलेही अंतर त्यांच्या व जन्नतच्या दरम्यान नसेल.

कुरआनच्या आयतींवरून ही गोष्ट स्पष्ट होते की हश्र (कर्माचा हिशेब) जमीनीवरच होईल. राहीले ईश भय बाळगणाऱ्यांसाठी जन्नतचे निकट होणे तर त्याचे स्वरूप अल्लाहलाच माहीत आहे. कारण आखिरतच्या स्थळ-काळाचे आम्ही जगाच्या स्थळ काळावरून अनुमान लावू शकत नाही.

३७. मूळ शब्द अव्वाब म्हणजे वारंवर तौबा करणारा, अल्लाहकडे वळणारा व प्रत्येक बाबतीत व प्रत्येक प्रसंगी त्याच्याकडे रूजू करणारा.

३८. अभिप्रेत अल्लाहने घातलेल्या मर्यादांचे रक्षण करतो म्हणजे तो शरीअतच्या मर्यादांचे पालन करणारा होता.

३९. म्हणजे रहमान (अल्लाह)ला त्याने आपल्या डोळयांनी पाहीले नव्हते तरी त्याच्या महानतेच्या कल्पनेने तो भयकंपित राहात होता. स्पष्ट असावे की रहमान (दयाळू) हा गुणविशेष अल्लाहच्या श्रेष्ठत्वास व प्रतापास प्रमाणित करतो.

अधिक स्पष्टीकरणासाठी पहा सूरह अंबिया टीप क्र. ६८

४०. रूजू राहणाऱ्या अंत:करणाशी अभिप्रेत अल्लाहकडे लक्ष केंद्रित करणारे हृदय. आयतीचा अर्थ असा की तो अशा हृदयासह आला जे अल्लाहच्या बाबतीत नेहमी जागरूक राहीले व त्याच्याकडे लक्ष केंद्रित करून राहीले. त्याचे केवळ शिरच नव्हे तर हृदय ही अल्लाहपुढे झुकलेले होते आणि तो एकाग्र चित्त होऊन अल्लाहची उपासना व आज्ञा पालन करीत होता. या आयतींमध्ये मुत्तकी (अल्लाहचे भय बाळगणाऱ्या लोकांचे गुणविशेष सांगितले गेले आहेत ज्यावरून तकवा (ईश-भीरूता) चा आशय चांगल्या प्रकारे विशद होतो.

४१. म्हणजे प्रत्येक धोक्या व संकटा पासून सुरक्षित.

४२. म्हणजे आजची सफलता सदैव कालीन व आजचे इनाम सदैव काळा करीताचे इनाम आहे.

४३. म्हणजे ते जे इच्छितील ते त्यांना जन्नत मध्ये मिळेलच, या खेरीज यांना आम्ही आपल्या तर्फे अधिक इनामांनी उपकृत करू.

४४. स्पष्टीकरणा करीता पहा सूरह रूम टीप क्र. १६

४५. म्हणजे पूर्वी होऊन गेलेले सामर्थ्यशाली जन समूह वेगवेगळया देशांमध्ये आपला प्रभाव बाळगत होते परंतु जेव्हा त्यांच्यावर ईश शिक्षा कोसळली तेव्हा त्यांना कोठेही आश्रय स्थान लाभू शकले नाही. मग हे लोक कोणत्या घमेंडीत आहेत.

३७. नि:संशय यात बोध आहे त्या प्रत्येक माणसा करीता, जो अंत:करण बाळगत असावा किंवा लक्षपूर्वक म्हणणे ऐकत असावा.[४६]

إِنَّ فِي ذَٰلِكَ لَذِكْرَىٰ لِمَن كَانَ لَهُ قَلْبٌ أَوْ أَلْقَى السَّمْعَ وَهُوَ
شَهِيدٌ ﴿٣٧﴾

३८. आम्ही आकाशांना व जमीनीला आणि जे काही त्यांच्या दरम्यान आहे सर्वांना सहा दिवसात निर्माण केले [४७]आणि आम्हाला काही ही थकवा जाणवला नाही.[४८]

وَلَقَدْ خَلَقْنَا السَّمٰوٰتِ وَالْأَرْضَ وَمَا بَيْنَهُمَا فِي سِتَّةِ
أَيَّامٍ وَمَا مَسَّنَا مِن لُّغُوبٍ ﴿٣٨﴾

३९. तेव्हा संयम पाळा त्यांच्या बोलण्यावर आणि गुणगान करा आपल्या पालन कर्त्याचे प्रशंसेसह सूर्योदय व सूर्यास्ता पूर्वी.[४९]

فَاصْبِرْ عَلَىٰ مَا يَقُولُونَ وَسَبِّحْ بِحَمْدِ رَبِّكَ قَبْلَ طُلُوعِ
الشَّمْسِ وَقَبْلَ الْغُرُوبِ ﴿٣٩﴾

४०. आणि रात्रीच्या काही हिश्श्यात ही त्याचे गुणगान करा,[५०] आणि सजद्या (नमाज) नंतर ही.[५१]

وَمِنَ اللَّيْلِ فَسَبِّحْهُ وَأَدْبَارَ السُّجُودِ ﴿٤٠﴾

४१. आणि ऐका, ज्या दिवशी पुकारणारा निकटच्या ठिकाणाहूनच पुकारील.[५२]

وَاسْتَمِعْ يَوْمَ يُنَادِ الْمُنَادِ مِن مَّكَانٍ قَرِيبٍ ﴿٤١﴾

४२. ज्या दिवशी हे तो महाभयंकर आवाज सत्यासह ऐकतील [५३] तो निघून उभे राहण्याचा दिवस असेल.[५४]

يَوْمَ يَسْمَعُونَ الصَّيْحَةَ بِالْحَقِّ ۚ ذَٰلِكَ يَوْمُ الْخُرُوجِ ﴿٤٢﴾

४३. नि:संशय आम्हीच जिवंत करतो आणि आम्हीच मृत्यु देतो आणि आमच्या कडेच परतायचे आहे.

إِنَّا نَحْنُ نُحْيِي وَنُمِيتُ وَإِلَيْنَا الْمَصِيرُ ﴿٤٣﴾

४४. ज्या दिवशी जमींन यांच्या वरून विदीर्ण होईल आणि ते शीघ्रतेने निघत असतील [५५] हे एकत्र करणे आमच्या करीता अतिशय सोपे आहे.

يَوْمَ تَشَقَّقُ الْأَرْضُ عَنْهُمْ سِرَاعًا ۚ ذَٰلِكَ حَشْرٌ عَلَيْنَا يَسِيرٌ ﴿٤٤﴾

४५. आम्ही चांगल्या प्रकारे जाणतो, जे काही हे लोक बोलतात आणि तुम्ही (हे पैगंबर !) यांच्यावर जबरदस्ती करणारे नाहीत. [५६] तेव्हा या कुरआनाद्वारे उपदेश करा त्या लोकांना जे माझ्या (शिक्षेच्या) सूचनेचे भय बाळगत असतील.[५७]

نَحْنُ أَعْلَمُ بِمَا يَقُولُونَ ۖ وَمَا أَنتَ عَلَيْهِم بِجَبَّارٍ ۖ فَذَكِّرْ
بِالْقُرْآنِ مَن يَخَافُ وَعِيدِ ﴿٤٥﴾

४६. म्हणजे ज्याचे हृदय संवेदनशील व जागृत असावे. असा मनुष्य स्वत:च या जन समूहांच्या बोध दायक परिणती पासून धडा घेईल, परंतु ज्याचे हृदय एवढे जागृत नसेल तर त्याने निदान, लक्ष पूर्वक या घटनांचा अहवाल ऐकावा. अशा स्थितीत ही तो बोध प्राप्त करील. परंतु जो मनुष्य इतिहासाच्या या बोध पूर्ण घटनांवर ना स्वत:विचार चिंतन करतो आणि ना उपदेशाकडे कान देतो, तो दुष्परिणती पासून स्वत:ला कशा प्रकारे वाचवू शकतो?

४७. स्पष्टीकरणा साठी पहा सूरह अअराफ टीप क्र. ८२

४८. हे खंडन आहे यहुदींच्या त्या विचाराचे की अल्लाहने, सातव्या दिवशी, जो यांच्या मते शनिवारचा दिवस आहे, आराम केला.

बायबल मधील उल्लेख असा :-

'' कारण सहा दिवसात परमेश्वराने आकाश, पृथ्वी, समुद्र व त्यातील सर्व काही निर्माण केले आणि सातव्या दिवशी विसावा घेतला; म्हणून परमेश्वराने शब्बाथ दिवस आशीर्वाद देऊन पवित्र केला.'' (निर्गम - ११:२०)

अल्लाहच्या बाबतीत ही कल्पनाच खोटी आहे. त्याला ना थकवा जाणवतो आणि ना त्याला आराम करण्याची गरज भासते. तो अतिशय सामर्थ्यशाली आहे. जर मनुष्य त्याच्या सामर्थ्यशक्तिचा आपल्या वरून कयास करतो तर ही त्याची संकूचित दृष्टीच नव्हे तर मूर्खता ही होय.

४९. म्हणजे हे लोक ज्या गोष्टी तुम्हाला खोटे ठरविण्या करीता सांगत आहेत त्या मनाला लावून घेऊ नका, किंबहुना संयम व धैर्याने वागा आणि आपल्या पालन कर्त्याची प्रशंसेसह गुणगान करीत राहा की मन:शांतीचा हाच उपाय आहे.

प्रशंसेसह अल्लाहचे गुणगान करण्याचा अर्थ हा की अल्लाहचे पावित्र्य अशा प्रकारे वर्णिले जावे की पैलू पैलूने त्याच्या गुणविशेषांचा व कौशल्याधिक्याने युक्त व तो प्रशंसनीय असण्याचा उल्लेख ही व्हावा.

सूर्योदयापूर्वी ईश-स्तवन व गुणगान करण्याचा जो आदेश दिला गेला आहे तर यास अभिप्रेत प्रात:कालीन नमाज होय आणि सूर्यास्तापूर्वीच्या गुणगानाशी अभिप्रेत अस्रची नमाज होय.

५०. अभिप्रेत ईशाची नमाज होय.

फज्र, अस्र व ईशाच्या नमाज अदा करण्याचा आदेश सुरवातीला दिला गेला होता. नंतर पाच वेळच्या नमाजचा आदेश दिला गेला. पहा सूरह बनी इस्राईल टीप क्र.१०८

५१. या ठिकाणी सजद्यांशी अभिप्रेत जसे प्रसंगोक्ति वरून स्पष्ट आहे, नमाज होय. हे या गोष्टीस प्रोत्साहन होय की नमाजी नंतर ही अल्लाहचे गुणगान केले जावे. कारण गुणगान करण्यात नाम:स्मरण ही आहे व उपासना ही आणि आत्म्यास पोषण कारक ही तसेच फार मोठया मोबदल्यास कारक ही. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी याची महत्ता व श्रेष्ठता अशा प्रकारे निवेदिली आहे :-

لَاَنْ اَقُوْلَ سُبْحَانَ اللّٰهِ وَالْحَمْدُ لِلّٰهِ وَلَا اِلٰهَ اِلَّا اللّٰهُ وَاللّٰهُ اَكْبَرُ اَحَبُّ اِلَيَّ مِمَّا طَلَعَتْ عَلَيْهِ الشَّمْسُ۔ (مسلم کتاب الذکر)

''सुबहानल्लाह, अलहम्दुलिल्लाह, व ला ईलाह इल्लल्लाह वल्लाहु अक्बर म्हणणे मला या जगाहून ही अधिक प्रिय आहे, ज्यावर सूर्य उगवतो.'' (मुस्लिम किताबुज्जिक्र)

तसेच पैगंबरांनी फर्माविले :-

اَلَا اُخْبِرُکَ بِاَحَبِّ الْكَلَامِ اِلَى اللّٰهِ اِنَّ اَحَبَّ الْكَلَامِ اِلَى اللّٰهِ سُبْحَانَ اللّٰهِ وَبِحَمْدِهٖ۔

''काय मी तुम्हाला ना सांगावे की अल्लाहच्या जवळ सर्वाधिक पसंत वाणी (बोल) कोणते आहेत? अल्लाहच्या जवळ सर्वाधिक पसंत बोल सुबहानल्लाही व बिहम्दीही हे आहेत.'' (मुस्लिम किताबुलज्जिक्र)

अन्य एका हदीस वचनातील उल्लेखानुसार पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम ) यांनी प्रत्येक नमाज नंतर अल्लाहची प्रशंसा व गुणगानची वचने अदा करण्याचे प्रोत्साहन देतांना फर्माविले-

تُسَبِّحُوْنَ وَتُكَبِّرُوْنَ وَتَحْمَدُوْنَ فِىْ دُبُرِ كُلِّ صَلٰوةٍ ثَلَاثًا وَّثَلَاثِيْنَ مَرَّةً۔ (مسلم کتاب المساجد)

''प्रत्येक नमाज नंतर तेहतीस वेळा सुबहानल्लाह,तेहतीस वेळा अल्लाहु अकबर आणि तेहतीस वेळा अलहम्दु लिल्लाह म्हणत ज्या'' (मुस्लिम)

वर आयत क्र. १८ मध्ये उल्लेख केला गेला की माणसाच्या तोंडून जो शब्द देखील निघतो, त्याची नोंद केली जाते. तेव्हा ईमान बाळगणाऱ्या माणसाने आपल्या तोंडून अधिकाधिक ईश स्तवन व त्याचे गुणगान करणारी वचने का अदा करू नयेत. व आपल्या आचरणास या रत्नांनी का सुशोभित करू नये.

५२. म्हणजे त्या हाकेला जी कियामतीच्या दिवशी कबरींमधून बाहेर पडण्याकरीता दिली जाईल ऐकण्यास तयार व्हा, की हाक मेलेला प्रत्येक मनुष्य ऐकेल व त्याला असे जाणवेल की अगदी जवळूनच कोणी हाक देत आहे.

भूतकालीन मनुष्य हा विचार करू शकत होता की हश्रचा

आवाज सर्व जमीनीवर ज्यात मृत माणसे दफन केली गेली आहेत, कशा प्रकारे प्रसारीत होईल. परंतु आजच्या काळात रेडीओच्या शोधाने या प्रश्नाचे ही उत्तर दिले आहे. अशा प्रकारे कुरआनाच्या सत्यतेच्या निशाण्या या जगात ही जाहीर होत चालल्या आहेत.

५३. म्हणजे हश्रची ही हाक, सत्याची हाक असेल आणि ऐकणाऱ्या वर सत्य प्रकट करील.

५४. म्हणजे ही हाक ऐकताच समस्त मेलेली माणसे जमीनीतून बाहेर पडतील मग त्यांच्या कबरी असोत किंवा नसोत.

५५. हे कियामतीच्या दिवशी जमीनीतून बाहेर पडण्याचे चित्र आहे. जेव्हा दुसरा सूर फुंकला जाईल तेव्हा जमीन ठिकठिकाणी विदीर्ण होईल मग संपूर्ण ईश-निर्मिती जी जमीनीत दफन झाली होती, जिवंत होऊन बाहेर पडेल आणि स्थिती ही असेल की लोक जमीनीतून मोठया वेगाने बाहेर पडून धावू लागतील.

५६. म्हणजे तुमचे काम सावधगिरीची सूचना देणे होय, जबरदस्तीपूर्वक आपले म्हणणे मान्य करावयास लावणे नव्हे, आणि पैगंबर जेव्हा एखाद्याला धर्म कबूल करण्यास भाग पाडू शकत नाही तेव्हा मुसलमान, मुस्लिमेतरांना इस्लाम कबूल करण्यास कसे विवश करू शकतात? राहीला जेहाद तर याचा संबंध युद्धविषयक हेतुंशी आहे, लोकांना जबरदस्ती मुसलमान बनविण्या करीता नव्हे.

५७. ही स्पष्ट ताकीद आहे या गोष्टीची की कुरआनास बोध प्राप्ती साधन बनविले जावे कारण सत्य स्पष्ट करण्याचे, अल्लाहचे प्रमाण त्याच्या दासांवर प्रस्थापित करण्याचे व उपदेश करण्याचे याहून अधिक प्रभावी साधन दुसरे असू शकत नाही.

हे मार्गदर्शन लक्षात घेता तबलीग (धर्म प्रसार) आणि सुधारणेचे कार्य करणाऱ्यांनी कुरआनास त्याच्या अर्थासह लोकांसमोर प्रस्तुत केले पाहीजे मग ते मुस्लिम असोत किंवा मुस्लिमेतर आणि परिस्थिती व प्रसंगानुषंगाने कुरआनाच्या मार्गदर्शनास प्रकट केले पाहीजे. आजच्या काळात धार्मिक ग्रंथाची विपुलता आहे आणि मुसलमानांच्या प्रत्येक गट आपापल्या पुस्तकांवर व आपल्या लिटरेचरवर घमेंड करीत आहे, आणि कुरआनास त्याच्या अर्थासह प्रस्तुत करण्याचा एवढा इतमाम राखत नाही जेवढा आपल्या गटाच्या पुस्तकांना व लिटरेचरला प्रस्तुत करण्याचा इतमाम बाळगतो. फार थोडेच लोक या प्रवृत्तीला अपवाद आहेत यामुळे धर्म-सामंजस्याच्या संदर्भात लोकांचा संबंध कुरआनाशी प्रत्यक्षत: कायम राहात नाही, परिणामत: त्याच विचार चिंतन क़ुर्आन निष्ठ वनत नाही. उलट तो त्याच विचार चिंतनास कबूल करतो जे त्याच्या गटाच्या पुस्तकांमध्ये किंवा लिटरेचर मध्ये प्रस्तुत केले गेले असावे.तेव्हा प्रत्येक प्रकारच्या सामूहीक पक्षपाताहून विभक्त होऊन दअवत व तबलीगचे काम करण्याकरीता, हे जरूरी ठरते की कुरआन-सामंजस्यावर जोर दिला जावा आणि त्यालाच ताकीद व बोध-ग्रहणाचे मूळ साधन बनविले जावे.

# ५१. सूरह अज्जारियात

**नावः** सुरवातीला अज्जारियात (धूळ उडविणारे वारे) चा उल्लेख केला गेला आहे. तद्नुषंगे या सूरहचे नाव 'अज्जारियात' असे आहे.

**अवतरण काळ :** मक्की आहे आणि मजकूरांवरून असे दिसून येते की मक्काच्या मध्य युगात अवतरली असेल.

**मध्यवर्ति कल्पना :** आचरणाचा मोबदला होय.

**आयत रचनाः** आयत क्र. १ ते ६ मध्ये वादळी व पर्जन्य वृष्टी करणाऱ्या वाऱ्यांमध्ये गफलतीत पडलेल्या माणसांना सचेत करण्याची, त्यांचे लक्ष अल्लाहकडे केंद्रित करण्याची आणि आचरणाच्या मोबदल्या विषयी दृढ विश्वास निर्माण करण्याची जी सामग्री आहे, तिच्याकडे लक्ष वेधून मोबदला शिक्षेला अपरिहार्य पणे घडून येणारी हकीगत म्हणून प्रस्तुत केले गेले आहे.

आयत क्र. ७ ते १४ मध्ये आचरणाचा मोबदल्याचा इन्कार करणाऱ्यांना व त्याची थट्टा उडविणाऱ्यांना त्याच्या परिणामाबाबत सावध केले गेले आहे.

आयत क्र. १५ ते १९ मध्ये अल्लाहचे भय बाळगत राहण्यास व सत्कर्म पूर्ण जीवन व्यतीत करण्यास प्रोत्साहन दिले गेले आहे. यास्तव त्याचा उत्कृष्ट मोबदला सांगितला गेला आहे.

आयत क्र. २० ते २३ मध्ये त्या निशाण्यांकडे लक्ष वेधले गेले आहे, ज्या जमीन व आसमंतात विखुरलेल्या आहेत, तसेच माणसाच्या अंगी ही आहेत; आणि ज्यांवर विचार चिंतन केल्याने मोबदला व शिक्षा सत्य असण्याचा विश्वास निर्माण होतो.

आयत क्र. २४ ते ४६ मध्ये प्रेषितांच्या इतिहासातील काही महत्वपूर्ण घटना पासून बोध दिला गेला आहे आणि जो या गोष्टीचा पुरावा आहे की अल्लाहचा शिक्षा विषयक नियम या जगात ही काफिरांना लागू होत राहतो.

आयत क्र. ४७ ते ६० सूरहच्या समारोपाच्या आयती होत, ज्यात अल्लाहचे सामर्थ्य व श्रेष्ठत्व निवेदितांना, त्याच्या दिशेने धाव घेण्याचे व त्याची उपासना करण्याचे आवाहन केले गेले आहे.

# ५१. सूरह अज्जारियात

سُورَةُ الذّٰرِيٰتِ

आयती - ६०

परम दयाळू व परम कृपाळू अल्लाहच्या नावाने

بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ

१. शपथ आहे [१] त्या वाऱ्यांची जे धूळ उडवितात.[२]

وَالذّٰرِيٰتِ ذَرْوًا ۝١

२. मग ( पाण्याने भरलेल्या ढगांचे ) ओझे उचलतात. [३]

فَالْحٰمِلٰتِ وِقْرًا ۝٢

३. मग वेगाने वाहतात.[४]

فَالْجٰرِيٰتِ يُسْرًا ۝٣

४. मग एका गोष्टी ( पावसा ) ची विभागणी करतात. [५]

فَالْمُقَسِّمٰتِ اَمْرًا ۝٤

५. नि:संशय ज्या गोष्टीची तंबी तुम्हाला ऐकविली जात आहे, ती खरी आहे.[६]

اِنَّمَا تُوْعَدُوْنَ لَصَادِقٌ ۝٥

६. आणि मोबदला व शिक्षा निश्चितच घडून येईल.[७]

وَّاِنَّ الدِّيْنَ لَوَاقِعٌ ۝٦

७. शपथ आहे थरावर थर ढग बाळगणाऱ्या आकाशाची.[८]

وَالسَّمَآءِ ذَاتِ الْحُبُكِ ۝٧

८. तुम्ही वेगवेगळया गोष्टी बोलता. [९]

اِنَّكُمْ لَفِيْ قَوْلٍ مُّخْتَلِفٍ ۝٨

९. सत्यापासून त्यांनाच परावृत्त केले जाते ज्यांची मति मारली गेली असावी.[१०]

يُّؤْفَكُ عَنْهُ مَنْ اُفِكَ ۝٩

१०. नाश पावोत अटकळीने गोष्टी बोलणारे.[११]

قُتِلَ الْخَرّٰصُوْنَ ۝١٠

११. जे गफलतीत पडलेले चेतना शून्य आहेत.[१२]

الَّذِيْنَ هُمْ فِيْ غَمْرَةٍ سَاهُوْنَ ۝١١

१. या ठिकाणी वाऱ्यांची शपथ साक्ष म्हणून आहे म्हणजे हे वारे आचरणाच्या मोबदल्या विषयी विश्‍वास निर्माण करतात. साक्ष या अर्थाने शपथ घेणे ही अरबी भाषेची अलंकार युक्त शैली आहे.

२. धूळ उडविणारे वारे पावसाच्या आगमनाचे चिन्ह असते. आणि कधी वादळाचे स्वरूप धारण करतात. हे वारे गाफील माणसांना सचेत करून अल्लाहचे श्रेष्ठत्व, त्याचे सामर्थ्य व त्याच्या प्रताप विषयक वैभवाचा मनात विश्‍वास निर्माण करतात.

३. वारे अति सुक्ष्म असतात परंतु कोटयावधी लीटर पाण्याने भरलेल्या ढगांचे ओझे उचलून इतस्तत: नेतात. पावसाळयात विमानाने प्रवास करणाऱ्यांना खालच्या भागात असे दृश्य दिसते की जणू वातावरणात ढगांचा एक समुद्र आहे जो क्षितीजापर्यंत पसरलेला आहे. पाण्याने भरलेल्या ढगांचे ओझे आपल्या खांद्यावर घेऊन वाऱ्यांचे इतस्तत: फिरणे हे एका श्रेष्ठ व सामर्थ्य शाली अस्तित्वाचे कार्य असल्याचे स्पष्ट लक्षण होय.

४. वारे जेव्हा पाण्याने भरलेल्या ढगांचे ओझे उचलतात तेव्हा या ओझ्यामुळे त्याची गती कमी होत नाही, किंबहुना ते सहजगत्या व वेगाने वाहतात. हे या गोष्टीचे लक्षण होय की त्यांचे सूत्र संचालन एका सर्वसमर्थ व व्यवस्था कुशल अस्तित्वाच्या हाती आहे.

५. पावसाला एक 'वस्तू' या अर्थाने घेतले गेले आहे कारण ही अतिशय महत्वपूर्ण गोष्ट आहे. आणि वारे अल्लाहच्या आदेशान्वये पाण्याच्या विभागणीचे कार्य पार पाडतात. ते एखाद्या भूप्रदेशात अगदी सौम्य पर्जन्य वृष्टी करतात तर एखाद्या ठिकाणी मूसळधार पाऊस पाडतात; एखाद्या ठिकाणी महापूर आणतात तर एखाद्या ठिकाणी वादळ, काही स्थानावर पावसाच्या रूपाने ईश कृपेचा वर्षाव करतात तर कोठे विनाश व ईश-प्रकोपाचा. तात्पर्य वारे एका योजनाबद्ध रितीने पाण्याची विभागणी करतात आणि हे या गोष्टीचे उघड प्रमाण होय की याच्या पाठीमागे एक जबरदस्त सामर्थ्य बाळगणाऱ्या, अतिशय व्यवस्था कुशल व ज्ञानी अशा अस्तित्वाचा हात काम करीत आहे.

वस्तू विभागणीचा वाऱ्यांशी जोडलेला संबंध लाक्षणिक अर्थाने आहे आणि या लाक्षणिक अर्थाची उदाहरणे कुरआनात उपलब्ध आहेत. उदाहरणार्थ भिंतीशी इराद्याचा संबंध,

جِدَارًا يُّرِيْدُ اَنْ يَّنْقَضَّ۔ (سورہ کہف:۷۷)

'भित, जी पडू इच्छित होती' (सूरह कहफ - ७७)

एका कथनात पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्याशी या उक्तिचा संबंध जोडला गेला आहे की فَالْمُقَسِّمَاتِ اَمْرًا शी अभिप्रेत फरिश्ते होत, परंतु हे कथन, अल्लामा इब्ने कसीर यांच्या स्पष्टीकरणानुसार प्रमाण दृष्टया कमकुवत आहे (तफसीर इब्ने कसीर खंड ४ पृ. २३२) म्हणून प्रमाण ठरण्या योग्य नाही.

६. अभिप्रेत कियामतीचा दिवस होय. तसेच तो दिवस ही जो पैगंबरास खोटे ठरविणाऱ्या जन समूहा करीता जगात ईश शिक्षेचा दिवस असेल.

७. विचार चिंतन केल्यास वाऱ्यांच्या या प्रयोजनात अल्लाहचा परिचय करून घेण्याची सामग्री ही आहे आणि मोबदला व शिक्षा यावर विश्‍वास करण्याची सामग्री ही. हे वारे जेव्हा वाहतात तेव्हा मनात अल्लाहचे भय निर्माण करतात व त्याच्या कृपेची कल्पना ही. तात्पर्य हे आपल्या अद्‌भूत प्रयोजनाद्वारे या गोष्टीचे ऐलान करतात की अल्लाहशी विद्रोह करणाऱ्या करीता ईश-शिक्षेचा चाबूक आहे आणि त्याच्या सत्कर्मी व एक निष्ठ दासांकरीता ईश-कृपा आहे. यावरून ही गोष्ट दिसून येते की मोबदला व शिक्षा यांचे घडून येणे अगदी निश्‍चित व सत्य आहे.

८. मूळ ग्रंथात حبک 'हुबुक' हा शब्द वापरला गेला आहे. जे हुबाक या शब्दाचे अनेक वचन आहे. वारे पाण्यात जी वलये निर्माण करतात त्यांना अरबी भाषेत हुबुक म्हटले जाते. त्या अनुषंगानेच हा शब्द थरावर थर आणि विविध स्वरूपात दिसणाऱ्या ढगांसाठी ही वापरला जातो. प्रसिद्ध अरबी कवी अमरूल कैस म्हणतो,

لها حبک کانها من وصائل

''अर्थात-त्यांच्यावर थरावर थर ढग आच्छादित आहेत, जणू त्या धारीदार चादरीच होत.''

वारे आकाशात ढगांना अशा प्रकारे पसरवितात की ते थरावर थर रचल्या सारखे दिसतात मग त्यांचे विविध स्वरूप व आकृत्या बनतात. आकाशाचे हे दृश्य मोठे सचेत करणारे असते आणि पाहणाऱ्यांच्या मनात अल्लाहचे भय निर्माण करते व त्यांना विचार चिंतनास प्रवृत्त करते. हे ईश-भय या गोष्टीचे प्रमाण होय की माणूस ईश्‍वरा समोर उत्तरदायी आहे आणि त्याच्याशी विद्रोह करून त्याच्या शिक्षेपासून वाचू शकत नाही. यास्तव कुरआन मोबदला व शिक्षाच्या दिवसा विषयी जी खबर देत आहे, तिचे समर्थन भिती निर्माण करणाऱ्या ढगांनी ही होते.

९. म्हणजे मोबदला व शिक्षेचे घडून येणे एक वास्तविक बाब आहे परंतु तुम्ही हिचा इन्कार करून स्वत:च गोंधळात पडला आहात. यास्तव भिन्न भिन्न प्रकारचे लोक विभिन्न गोष्टी बोलतात. कोणी म्हणतो शिक्षा व मोबदल्याची काही हकीगत नाही. कोणी म्हणतो शिक्षा व मोबदला जे काही आहे ते या जगातच आहे. कोणी असे म्हणतो की जर मेल्यानंतर शिक्षा व

मोबदल्याचा मामला उद्‌भवलाच तर आमची दैवते आमची शिफारस करतील, आणि कोणी पुनर्जन्माचे तत्वज्ञान मांडू लागतो. कथन आणि श्रद्धा मधील ही भिन्नता शिक्षा व मोबदल्याच्या मूळ वस्तुस्थितीशी इन्कार व विमुख होण्याचाच परिणाम होय. अधिक स्पष्टीकरणा करीता पहा सूरह काफ टीप क्र.६

१०. म्हणजे शिक्षा व मोबदलाच्या श्रद्धेस मानण्यास तेच लोक इन्कार करतात ज्यांची बुद्धि भ्रष्ट झाली आहे अन्यथा जो मनुष्य देखील अल्लाहने दिलेल्या बुद्धीचा वापर करील. तो या स्पष्ट हकीगतीचा इन्कार करूच शकत नाही. अल्लाहचा अपमानित करणारा नियम असा की, ज्या माणसा समोर सत्य मांडले जाते आणि तो बुद्धिचा वापर करण्या ऐवजी आपल्या इच्छया आकांक्षांच्या नादी लागून इन्कार करू लागतो, तेव्हा त्याचे लक्ष सत्या पासून हटविले जाते मग तो त्या (सत्या) कडे पाठ फिरवू लागतो.

११. माणसाला त्याच्या कृतकर्माचा मोबदला व शिक्षा मिळेल किंवा नाही? हा एक असा मूलभूत प्रश्न आहे जो माणसाच्या वर्तनास निश्चित करतो. आणि यावर त्याचे यश-अपयश अवलंबून आहे. म्हणून याचे उत्तर ज्ञान विषयक आधारावर आणि प्रमाण व साक्षींच्या उजेडात लाभणे आवश्यक ठरते सर्वश्रेष्ठ अल्लाहने वही (ईश-संदेश) व प्रेषित्वाचा क्रम जारी करून या बाबतचे ज्ञान प्रदान केले आहे. ते असे की मनुष्य एक जबाबदार व ईश्वरा समोर उत्तरदायी असलेली निर्मिती आहे. आणि मोबदला व शिक्षेचा मामला अपरिहार्यत: घडून येईल. अर्थात यश या गोष्टीवर अवलंबून आहे की माणसाने ईमान बाळगून सदाचाराचे वर्तन अंगिकारावे. या सत्य ज्ञानाच्या समर्थनार्थ सर्वश्रेष्ठ अल्लाहने या सृष्टीत व स्वत: माणसाच्या अंगी अशा निशाण्या ठेवल्या आहेत ज्या प्रमाण व साक्षीचे स्वरूप बाळगतात; व त्याचे यथायोग्य मार्गदर्शन करतात. या ठोस ज्ञानाला सोडून जीवनाच्या या महत्वपूर्ण समस्ये बाबत केवळ अटकळीचे बाण सोडणे, आणि अनुमान व कल्पनेच्या गोष्टी करणे म्हणजे माणसाने उजेड सोडून अंधारात चाचपडत चालणे.या खेरीज आणखी काय? आणि जे लोक असे वागतात ते स्वत:ला विनाश मार्गी लावतात. परंतु बहुसंख्य लोक धार्मिक पक्षपात, इच्छानुसरण व भौतिक वादामुळे अंध:कारात भटकत चालले आहेत. पुनर्जन्म आणि अवागमनाचे तत्वज्ञान असो किंवा मृत्युनंतर कोणतेही जीवन नाही हा दावा असो अथवा आचरणा ऐवजी शिफारसीवर भरवसा ठेवण्याची श्रद्धा असो. या सर्व कयास व भ्रामिक कल्पनांच्या गोष्टी आहेत ज्या दुष्परिणती प्रत पोहचविणाऱ्या आहेत. ज्ञानाचा प्रकाश तोच, जो कुरआन प्रदान करतो. आणि तोच यशाची हमी देतो.

१२. म्हणजे ते अत्याधिक गफलतीत पडले आहेत म्हणून त्यांना या गोष्टीची किंचितही जाणीव नाही की पुढे काय घडणार आहे.

जे विचारतात, मोबदला व शिक्षेचा दिवस केव्हा येईल ? ज्या दिवशी हे आगीवर तापविले जातील. चाखा गोडी आपल्या उपद्रवाची हीच ती गोष्ट होय, जिच्यासाठी तुम्ही घाई माजवित होते. नि:संशय अल्लाहशी भय बाळगणारे बागांमध्ये व झऱ्यांमध्ये असतील.(अल-कुर्आन)

१२. जे विचारतात, मोबदला व शिक्षेचा दिवस केव्हा येईल ?[१३]

يَسْـَٔلُوْنَ اَيَّانَ يَوْمُ الدِّيْنِ ﴿١٢﴾

१३. ज्या दिवशी हे आगीवर तापविले जातील.

يَوْمَ هُمْ عَلَى النَّارِ يُفْتَنُوْنَ ﴿١٣﴾

१४. चाखा गोडी आपल्या उपद्रवाची [१४] हीच ती गोष्ट होय, जिच्यासाठी तुम्ही घाई माजवित होते.

ذُوْقُوْا فِتْنَتَكُمْ ۭ هٰذَا الَّذِيْ كُنْتُمْ بِهٖ تَسْتَعْجِلُوْنَ ﴿١٤﴾

१५. नि:संशय अल्लाहशी भय बाळगणारे [१५] बागांमध्ये व झऱ्यांमध्ये असतील.

اِنَّ الْمُتَّقِيْنَ فِيْ جَنّٰتٍ وَّعُيُوْنٍ ﴿١٥﴾

१६. त्यांच्या पालनकर्त्याने त्यांना जे काही प्रदान केले असेल, त्यास ते घेत असतील. [१६] ते या पूर्वी सत्कर्म करणारे होते.[१७]

اٰخِذِيْنَ مَآ اٰتٰىهُمْ رَبُّهُمْ ۭ اِنَّهُمْ كَانُوْا قَبْلَ ذٰلِكَ مُحْسِنِيْنَ ﴿١٦﴾

१७. ते रात्रींमध्ये कमीच झोपत होते. [१८]

كَانُوْا قَلِيْلًا مِّنَ الَّيْلِ مَا يَهْجَعُوْنَ ﴿١٧﴾

१८. आणि प्रात:काळी क्षमा याचना करीत.[१९]

وَبِالْاَسْحَارِ هُمْ يَسْتَغْفِرُوْنَ ﴿١٨﴾

१९. आणि त्यांच्या धन सम्पत्तित याचक व वंचितां करीता हक्क होता.[२०]

وَفِيْٓ اَمْوَالِهِمْ حَقٌّ لِّلسَّاۗىِٕلِ وَالْمَحْرُوْمِ ﴿١٩﴾

२०. आणि जमीनीवर मोठमोठया निशाण्या आहेत विश्वास ठेवणाऱ्यां करीता.[२१]

وَفِي الْاَرْضِ اٰيٰتٌ لِّلْمُوْقِنِيْنَ ﴿٢٠﴾

२१. आणि स्वत:तुमच्या अंगी ही, काय तुम्ही पाहत नाही ?[२२]

وَفِيْٓ اَنْفُسِكُمْ ۭ اَفَلَا تُبْصِرُوْنَ ﴿٢١﴾

२२. आणि आकाशात तुमची उपजिविका ही आहे [२३] आणि ती गोष्ट देखील, ज्या बाबतची तंबी तुम्हाला ऐकविली जात आहे.[२४]

وَفِي السَّمَاۗءِ رِزْقُكُمْ وَمَا تُوْعَدُوْنَ ﴿٢٢﴾

२३. तेव्हा, आकाश व जमीनीच्या रब्ब (पालन कर्त्या) ची शपथ, ही गोष्ट सत्य आहे.[२५] अशीच खात्रीपूर्वक, जशी तुम्ही बोलत आहात.[२६]

فَوَرَبِّ السَّمَاۗءِ وَالْاَرْضِ اِنَّهٗ لَحَقٌّ مِّثْلَ مَآ اَنَّكُمْ تَنْطِقُوْنَ ﴿٢٣﴾

१३. त्यांचा हा प्रश्न की 'तो दिवस केव्हा येईल जेव्हा माणसाला त्याच्या कर्माचे फळ लाभेल' कियामतीची थट्टा उडविण्या करीता होता म्हणून त्याचे उत्तर ही सक्त तंबी पूर्ण शैलीत दिले गेले.

१४. उपद्रवाशी अभिप्रेत वाईट गोष्टी, दुराचार, जो ते जगात करत होते. हा दुराचार त्यांना ईश प्रकोप बनून आपल्या तावडीत घेईल.

१५. अल्लाहशी भय बाळगणाऱ्यांशी अभिप्रेत, जसे शब्द शैलीवरून स्पष्ट आहे, असे लोक होत जे कर्मफळ लाभणाऱ्या दिवसावर विश्वास ठेवीत व त्याच्या अवज्ञे पासून भय बाळगीत जीवन व्यतीत करीत.

१६. म्हणजे अल्लाहने प्रदान केलेल्या निरंतर देणग्यांचा ते प्रसन्न चित्ताने स्विकार करत असतील.

१७. म्हणजे जगात त्यांनी सदाचाराचे जीवन व्यतीत केले होते. सत्कर्म करणारा तो होय, जो अल्लाहच्या आदेशाचे केवळ पालनच करीत नाही, तर अधिकाधिक चांगल्या रीतीने व मन:पूर्वक पालन करतो व उत्कृष्ट चारित्र्याचा पुरावा देतो.

१८. म्हणजे जे रात्रीचा बहुतेक हिस्सा अल्लाहची उपासना करण्यात घालवीत. त्यांना आपल्या आरामा पेक्षा अल्लाहची उपासना अधिक प्रिय होती आणि कियामती विषयीची चिंता त्यांना निर्धास्त पणे झोपू देत नव्हती. कुरआनने रात्रीच्या या जाग्रणास अपेक्षित स्तराच्या स्वरूपात सादर केले आहे यासाठी की जो मनुष्य जेवढया उच्च पातळीवर जाऊ इच्छिल, त्याने जावे. परंतु यास अत्यावश्यक ठरविले नाही. यास्तव सूरह मुजम्मिल मध्ये या विषयी स्पष्टीकरण दिले गेले आहे :-

अहनफ बिन कैस पैगंबरांच्या सहवासातील अनुयायी होते ते हे मान्य करीत की :-

لَسْتُ مِنْ اَهْلِ هٰذِهِ الآيَةِ

'मी या आयतीस पात्र नाही' (तफसीर तबरी खंड २६ पृष्ट १२२)

१९. स्पष्टीकरणा करीता पहा सूरह आले इमरान टीप क्र. २३, व २४ प्रात: काळची वेळ अल्लाहचे सान्निध्य प्राप्त करण्यासाठी अगदी योग्य अशी वेळ आहे. हदीसे कुदसीतील एक उल्लेख आसा :-

اَنَّ رَسُولُ اللهِ صَلَّى اللهُ عَلَيْهِ وَسَلَّمَ قَالَ: يَنْزِلُ رَبَّنَا تَبَارَكَ وَتَعَالىٰ كُلَّ لَيْلَةٍ اِلَى السَّمَآءِ الدُّنْيَا حِيْنَ يَبْقىٰ ثُلُثُ اللَّيْلِ الآخِرِ يَقُوْلُ :مَنْ يَدْعُوْنِى فَاَسْتَجِيْبُ لَهُ مَن يَسْأَ لُنِىْ فَاُعْطِيَهُ مَنْ يَّسْتَغْفِرُنِىْ فَاَغْفَرَ لَهُ۔ (صحیح البخاری ابواب التہجد)

पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी फर्माविले, आमचा पालनकर्ता प्रत्येक रात्री, जेव्हा रात्रीचा एक तृतीयांश हिस्सा बाकी राहतो जगाच्या आकाशाकडे अवतरीत होतो आणि फर्मावितो, आहे कोणी जो मला पुकारील, की मी त्याच्या पुकारण्यास उत्तर द्यावे. आहे कोणी जो मजजवळ मागेल, तर मी त्याला द्यावे, आहे कोणी जो मजजवळ माफी मागेल तर मी त्याला माफ करावे.'' (सहीहुल बुखारी-अब्वाबुत तहज्जुद)

२०. याचक तो होय जो आपली गरज भागविण्या करीता आर्थिक मदत मागेल. जर याचक बाह्य परिस्थिती वरून गरजवंत असेल तर त्याचा हक्क समजून त्याची मदत केली पाहीजे. परंतु जर खरोखर तो गरजवंत नसेल तर त्याची कसलीही जबाबदारी दान देणाऱ्यावर लागू पडत नाही. राहीलेत भिकारी,ज्यांनी धड धाकट असूनही भिक मागण्याचा धंदा पत्कारला आहे. अधिक हे की अल्लाह अल्लाह खेरीजच्या उपास्यांच्या नावाने भीक मागून शिर्क (अनेकेश्वरवादा) चा प्रचार करीत राहतात. असे लोक दान, किंवा आर्थिक मदतीस मुळीच पात्र नाहीत. या बाबत हदीस वचनातील उल्लेख असा :-

مَا يَزَالُ الرَّجُلُ يَسْأَلُ النَّاسَ حَتّٰى يَأْتِىَ يَوْمَ الْقِيَامَةِ لَيْسَ فِىْ وَجْهِهٖ مُزْعَةُ لَحْمٍ۔ (صحیح بخاری کتاب الزکوٰۃ)

''मनुष्य लोकांजवळ मागत राहतो. येथपावेतो की जेव्हा कियामतीच्या दिवशी तो हजर होईल, तेव्हा त्याच्या चेहऱ्यावर मांसाचा तुकडा ही नसेल.''(सहीहुल बुखारी-किताबुज ज़कात)

आणि वंचित ते लोक होत, जे आपल्या एखाद्या शारीरिक असमर्थतेमुळे, प्रतिकूल परिस्थितीमुळे, किंवा एखाद्या भयंकर संकटात सापडल्यामुळे आपल्या उदरनिर्वाहाची सामग्री प्राप्त करू शकत नसतील आणि आपल्या स्वाभिमानी वृत्तीमुळे कोणाकडून काही मागत ही नसतील, असे लोक खऱ्या अर्थाने सहाय्य करण्यास पात्र आहेत. कुरआनाने विशेषत्वाने यांच्या उल्लेख करून या गोष्टीकडे लक्ष वेधले आहे की ज्यांना अल्लाहने धन सम्पत्तिच्या देणगीने उपकृत केले आहे, त्यांची ही जबाबदारी होय की त्यांनी अशा अगतिक व लाचार लोकांना ओळखून त्यांची मदत करावी, जेव्हा त्यांनी मदत मागण्यात संकोच बाळगला असेल.

आयतीवरून हे ही स्पष्ट झाले की समाजातल्या गरजवंत लोकांची मदत, श्रीमंत लोकांकडून कसलाही उपकार नव्हे, किंबहुना हा त्या लोकांचा यांच्या धन सम्पत्तित हक्क आहे, जो अदा करणे यांना क्रमप्राप्त ठरते. ही सूरह मक्की आहे

आणि जकातचे तपशील पूर्वक आदेश मदनी काळात दिले गेले आहे. यावरून ही गोष्ट स्पष्ट होते की हा हक्क विवरणा शिवाय ही एक परिचित हक्क होता, ज्याची अदायगी करणे ईमान बाळगणाऱ्याचा गुणविशेष आहे.

२१.जमीनीवर अल्लाहच्या सामर्थ्याची, त्याच्या ईशत्वाची आमि त्याच्या ज्ञान व बुद्धिकौशल्याची चिन्हे अगदी प्रकट आहेत आणि अल्लाहच्या या गुणविशेषांवर विचार चिंतन केल्याने त्याच्या विषयी जी कल्पना कायम होते, ती अशी की तो मांगल्य व अमांगल्यात फरक करणारा आणि न्याय करणारा आहे आणि त्याने आपल्या निर्मितीस एका उद्दिष्टासह निर्माण केले आहे. यावरून या गोष्टीचा विश्वास निर्माण होतो की मनुष्य अल्लाह समोर उत्तरदायी आहे आणि आपल्या आचरणा नुसार त्याला मोबदला किंवा शिक्षा भोगणे क्रमप्राप्त आहे.

आजच्या काळात भूगर्भशास्त्र (Geology) ने जमीनीची रचना तिचे तळ, स्तर व तिच्यातील लाव्हा,तिच्यात आढळून येणारे खनिज, तिचे गुरूत्वाकर्षण व भ्रमण इत्यादि विषयी बुद्धिला आश्चर्यात टाकणारे रहस्योद्घाटन केले आहे. हा सर्व इतमाम एवढया साठीच की माणसाने जमीनीवर वास्तव्य करून रहावे, तेव्हा काय ज्याला जमीनीवर आबाद करण्या करीता हा इतमाम केला गेला, त्याचे जीवन निरूद्देश्य असू शकते? आणि काय ते अस्तित्व, ज्याने माणसाला जमीनीवर वास्तव्य करण्यास्तव हा एवढा इतमाम केला आणि सूज्ञता, बुद्धि व तारतम्य बाळगणारी निर्मिती बनविले, त्याला तो असाच सोडून देईल? आणि त्याच्या चांगल्या वाईट आचरणात काहीच फरक करणार नाही? या मुद्यांवर जो मनुष्य देखील कुरआनाच्या प्रकाशात विचारचिंतन करील, त्याच्या मनात अल्लाहच्या ईशत्वाचा आणि त्याच्या कडून लाभणाऱ्या मोबदला व शिक्षा विषयीचा विश्वास निश्चितच निर्माण होईल.

जमीनीवर भूकंपाचे हादरे निद्रीस्त लोकांना जागे करतात आणि त्यांना भयंकपित करून या गोष्टींची वार्निंग (Warning) देतात की या सृष्टीचा पालनकर्ता आपल्या प्रकोपाचा आसूड मारू शकतो; म्हणून त्याच्याशी बेपर्वा होऊ नका, किंबहुना त्याचे भय बाळगून राहा. अशा स्पष्ट निशाण्या डोळयांनी पाहून ही असे म्हणणे की ईश्वराला मोबदला व शिक्षेशी काही कर्तव्य नाही आणि मनुष्य यापासून असंबद्ध होऊन आपली मनमानी करण्यासाठी स्वतंत्र आहे, किती चुकीची, अन्यायपूर्ण, अयोग्य व सत्यप्रियता शून्य बाब आहे.

२२. मनुष्य स्वभाव चांगल्या - वाईटात फरक जाणतो. त्याचा आत्मा वाईट गोष्टींचा धिक्कार करतो व सद्वर्तना बद्दल त्याला समाधान व शांती प्रदान करतो. जणू एक प्रकारचे न्यायालय स्वत: माणसाच्या अंतर्यामी आहे. अशा प्रकारे त्याचा अंतरात्मा ओरडून हे सांगतो की हे माणसा आपल्या पालन कर्त्या अल्लाहचे भय बाळग काय हे या गोष्टीचे उघड लक्षण नव्हे की अवज्ञा करणाऱ्यांना अल्लाहच्या प्रकोपाचा आसूड मारला जाऊ शकतो आणि काय हा या गोष्टीचा पुरावा नव्हे की अल्लाह आपल्या दासांशी त्यांच्या वर्तनानुसार मामला (फैसला) करील.

२३. अर्थात पाऊस, की ज्याद्वारे पिण्याचे पाणी ही उपलब्ध होते आणि खाण्या करीता फळ, धान्ये व वनस्पती वगैरे ही प्राप्त होतात.

२४. म्हणजे अजाब (ईश-शिक्षा) जी वीज, मेघगर्जना, वादळ इत्यादिंच्या स्वरूपात तुमच्यावर अवतरीत होऊ शकते. आकाशात ईश कृपा स्वरूप पाऊस ही आहे आणि ईश शिक्षेच्या आसूड ही. ज्याद्वारे अल्लाहचे दोन्ही गुण विशेष जाहीर होतात; म्हणजे तो रहीम (कृपावंत) ही आहे आणि सक्त शिक्षा देणारा ही. यावरून हे अपरिहार्य ठरते की तो एक दिवस असा आणील, ज्या दिवशी आपल्या सत्कर्मी दासांवर आपल्या कृपेचा वर्षाव करील आणि विद्रोही व गुन्हेगारांना कठोर दंड देईल.

२५. या ठिकाणी शपथ, कथनाला दृढता पूर्वक व ताकीदीसह प्रस्तुत करण्यासाठी घेतली गेली आहे. अर्थात हे की आकाश व जमीनीची वर उल्लेखिलेली लक्षणे सत्य पालनकर्त्या विषयीचा विश्वास निर्माण करतात. त्यासोबत या गोष्टीचा ही विश्वास निर्माण करतात की मोबदला व शिक्षेचा मामला अगदी सत्य आहे.

२६. मनुष्य जेव्हा बोलतो तेव्हा त्याला ही पूरेपूर खात्री असते की हा माझा आत्माच आहे जो या क्षणी बोलत आहे आणि यात त्याला किंचितही शंका वाटत नाही. तद्वतच मोबदला व शिक्षेचा मामला संशयविरहीत व अगदी खात्रीचा आहे.

काय तुम्हाला इब्राहीम च्या सन्माननीय पाहुण्यांची गोष्ट पोहचली आहे ? जेव्हा ते त्यांच्याजवळ आले तेव्हा त्यांनी म्हटले, सलाम. तो म्हणाला तुम्हा लोकांवर ही सलाम असो-अनोळखी लोक आहेत. मग तो गुपचुप पणे कुटुंबियांजवळ गेला आणि एक लठ्ठ वासरू (चे भाजलेले मांस) आणले. *(अल-क़ुर्आन)*

हَلْ أَتَىٰكَ حَدِيثُ ضَيْفِ إِبْرَٰهِيمَ ٱلْمُكْرَمِينَ ﴿٢٤﴾

२४. काय तुम्हाला इब्राहीम च्या सन्माननीय पाहुण्यांची गोष्ट पोहचली आहे ?[२७]

إِذْ دَخَلُوا۟ عَلَيْهِ فَقَالُوا۟ سَلَـٰمًا ۖ قَالَ سَلَـٰمٌ قَوْمٌ مُّنكَرُونَ ﴿٢٥﴾

२५. जेव्हा ते त्यांच्याजवळ आले तेव्हा त्यांनी म्हटले, सलाम. तो म्हणाला तुम्हा लोकांवर ही सलाम असो-अनोळखी लोक आहेत.

فَرَاغَ إِلَىٰٓ أَهْلِهِۦ فَجَآءَ بِعِجْلٍ سَمِينٍ ﴿٢٦﴾

२६. मग तो गुपचुप पणे कुटुंबियांजवळ गेला आणि एक लठ्ठ वासरू (चे भाजलेले मांस) आणले.[२८]

فَقَرَّبَهُۥٓ إِلَيْهِمْ قَالَ أَلَا تَأْكُلُونَ ﴿٢٧﴾

२७. आणि त्यास त्यांच्या समोर सादर केले व म्हणाला, खात नाही?

فَأَوْجَسَ مِنْهُمْ خِيفَةً ۖ قَالُوا۟ لَا تَخَفْ ۖ وَبَشَّرُوهُ بِغُلَـٰمٍ عَلِيمٍ ﴿٢٨﴾

२८. (आणि हे पाहून की ते खात नाहीत) त्याला भिती जाणवली [२९] ते म्हणाले, भिऊ नका आणि त्याला एका ज्ञानी पुत्राची खुशखबर दिली.[३०]

فَأَقْبَلَتِ ٱمْرَأَتُهُۥ فِى صَرَّةٍ فَصَكَّتْ وَجْهَهَا وَقَالَتْ عَجُوزٌ
عَقِيمٌ ﴿٢٩﴾

२९. हे ऐकून त्याची पत्नी [३१] मोठयाने बोलत पुढे आली. तिने आपले तोंड बडवून घेतले [३२] व म्हणाली, म्हातारपण, वांझोटी.

قَالُوا۟ كَذَٰلِكِ قَالَ رَبُّكِ ۖ إِنَّهُۥ هُوَ ٱلْحَكِيمُ ٱلْعَلِيمُ ﴿٣٠﴾

३०. ते म्हणाले असेच फर्माविले आहे तुझ्या पालन कर्त्याने [३३] तो बुद्धिकौशल्य बाळगणारा व ज्ञान सम्पन्न आहे.

قَالَ فَمَا خَطْبُكُمْ أَيُّهَا ٱلْمُرْسَلُونَ ﴿٣١﴾

३१. इब्राहीमने विचारले, हे फरिश्त्यांनो ! तुमच्या समोर कोणती मोहीम आहे?

قَالُوٓا۟ إِنَّآ أُرْسِلْنَآ إِلَىٰ قَوْمٍ مُّجْرِمِينَ ﴿٣٢﴾

३२. ते म्हणाले, आम्हास एका अपराधी जन समूहाकडे पाठविले गेले आहे.[३४]

لِنُرْسِلَ عَلَيْهِمْ حِجَارَةً مِّن طِينٍ ﴿٣٣﴾

३३. अशा साठी की त्यांच्यावर भाजलेल्या मातीच्या दगडांचा (खंगरांचा) वर्षाव करावा.[३५]

२७. ही घटना सूरह हूद आणि सूरह हिज्र मध्ये तपशीलवार सांगितली गेली आहे. तिथे ज्या गोष्टींचा खुलासा हवा त्यांचे स्पष्टीकरण ही केले गेले आहे. पहा सूरह हूद टीप क्र. ९६ ते १०४ आणि सूरह हिज्र टीप क्र. ४९ ते ५५.

हे सन्माननीय पाहुणे फरिश्ते होते जे माणसांच्या रूपाने आले होते. आणि ज्यांच्या मुखांवरून प्रतिष्ठा जाहीर होत होती. सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्यांना हजरत हब्राहीम यांच्या जवळ अशासाठी पाठविले की त्यांनी हजरत इब्राहीम यांना म्हतारपणात एका अशा पुत्र रत्नाची शुभवार्ता द्यावी जो ज्ञानी असावा व ज्याला प्रेषित्व बहाल केले जाईल आणि ज्याच्यापासून एक असा वंश निर्माण होईल की ज्याला जगातल्या समस्त लोकांवर प्राधान्य व श्रेष्ठत्व प्राप्त होईल; व ज्याचे कर्तृत्व इतिहासाच्या पृष्ठांवर अंकित होईल. ही सर्वश्रेष्ठ अल्लाहची फार मोठी देणगी होती जी या जगात हजरत इब्राहीम यांना प्रदान केली गेली. हे या गोष्टीचे प्रमाण होय की अल्लाह आपल्या दासांना त्यांच्या सत्कर्मा मुळे या जगी ही उपकृत करतो. त्याच प्रमाणे पुढे हजरत लूत यांच्या जन समूहावर ईश प्रकोप अवतरीत होण्याची जी घटना निवेदिली गेली आहे ती या गोष्टीचे प्रमाण होय की अल्लाह कुफ्र (सत्याचा इन्कार) व विद्रोह करणाऱ्यांना या जगात ही कठोर शिक्षा देतो. आणि जेव्हा या जगात ईश कृपा व ईश प्रकोप दोन्ही ही आढळून येतात तेव्हा आचरणाला परिणाम शून्य कसे ठरविले जाऊ शकते? आणि कियामतीच्या दिवसाच्या मोबदला व शिक्षेचा इन्कार कोणत्या आधारावर केला जाऊ शकतो? थोडकयात सांगायचे म्हणजे मोबदला व शिक्षे विषयी विश्वास निर्माण करण्या करीता या ठिकाणी दोन्ही वृत्तांत सांगितले गेले आहेत.

२८. या वरून ओघा ओघाने पाहूणाचाराचे शिष्टाचार ही स्पष्ट झाले. आतिथ्याची सामग्री अशा प्रकारे केली जावी की अतिथीला त्याचा थांग पत्ता लागू नये आणि पाहुणचार करण्यात संकुचित वृत्ती बाळगू नये, किंबहुना मोठया मनाचा व विशाल नितीमत्तेचा पुरावा द्यावा. हजरत इब्राहीम यांचे लठ्ठ वासराला भाजून आणणे व पाहुण्यांसमोर मेजबानी म्हणून सादर करणे त्यांच्या सह्रदयात व उदारतेस प्रमाणित करते.

२९. हजरत इब्राहीम यांनी जाणले की हे मनुष्य नव्हते, तर फरिश्ते आहेत. आणि फरिश्त्यांचे मानव स्वरूपात येणे एखाद्या महत्वपूर्ण उद्देश्या साठीच असू शकते म्हणून त्यांना ही भिती जाणवली की न जाणो काय मामला आहे.

३०. ही हजरत इसहाक यांच्या जन्माची शुभवार्ता होती.

३१. अर्थात हजरत सारा.

३२. म्हणजे अश्चर्यातिरेकाने हा हजरत सारा यांची स्त्रीसुलभशैली होती.

३३. म्हणजे म्हातारपण व वांझोटे पण असतांना ही पुत्र जन्माला येईल.

३४. म्हणजे लूत जन समूहा कडे. स्पष्टीकरणा करीता पहा सूरह हूद टीप क्र. १०५ ते १२१ आणि सूरह हिज्र टीप क्र. ५६ ते ७४.

३५. स्पष्टीकरणा करीता पहा सूरह हूद टीप क्र. ११९.

३४. जे तुमच्या पालन कर्त्याजवळ, मर्यादिचे उल्लंघन करणाऱ्या करीता चिन्हांकित आहेत.[३६]

مُّسَوَّمَةً عِندَ رَبِّكَ لِلْمُسْرِفِينَ ﴿٣٤﴾

३५. मग आम्ही ईमान बाळगणाऱ्यांना तेथून बाहेर काढले.[३७]

فَأَخْرَجْنَا مَن كَانَ فِيهَا مِنَ الْمُؤْمِنِينَ ﴿٣٥﴾

३६. आणि तिथे आम्हाला एका घरा खेरीज मुसलमानांचे कोणतेही घर आढळले नाही.[३८]

فَمَا وَجَدْنَا فِيهَا غَيْرَ بَيْتٍ مِّنَ الْمُسْلِمِينَ ﴿٣٦﴾

३७. आणि आम्ही तिथे एक चिन्ह सोडले त्या लोकांकरीता जे दु:ख दायक अजाब (ईश शिक्षे) चे भय बाळगत असावेत. [३९]

وَتَرَكْنَا فِيهَا آيَةً لِّلَّذِينَ يَخَافُونَ الْعَذَابَ الْأَلِيمَ ﴿٣٧﴾

३८. आणि मूसा [४०] च्या वृत्तांतात ही निशाणी आहे. जेव्हा आम्ही त्याला फिरऔन जवळ स्पष्ट प्रमाणासह पाठविले.

وَفِي مُوسَىٰ إِذْ أَرْسَلْنَاهُ إِلَىٰ فِرْعَوْنَ بِسُلْطَانٍ مُّبِينٍ ﴿٣٨﴾

३९. तेव्हा त्याने आपल्या सामर्थ्याच्या घमेंडीत तोंड फिरवले, आणि म्हणाला हा (एकतर) जादूगार आहे किंवा वेडसर.

فَتَوَلَّىٰ بِرُكْنِهِ وَقَالَ سَاحِرٌ أَوْ مَجْنُونٌ ﴿٣٩﴾

४०. शेवटी आम्ही त्याला व त्याच्या सैन्यांना धरले आणि त्यांना अशा अवस्थेत समुद्रात फेकून दिले की तो स्वत:चा धिक्कार करीत होता.[४१]

فَأَخَذْنَاهُ وَجُنُودَهُ فَنَبَذْنَاهُمْ فِي الْيَمِّ وَهُوَ مُلِيمٌ ﴿٤٠﴾

४१. आणि आद [४२] च्या वृत्तांतात ही निशाणी आहे, जेव्हा आम्ही त्यांच्यावर शुष्क हवा पाठविली.

وَفِي عَادٍ إِذْ أَرْسَلْنَا عَلَيْهِمُ الرِّيحَ الْعَقِيمَ ﴿٤١﴾

४२. ती ज्या वस्तू वरून ही गेली, तिला जीर्ण करून टाकले.[४३]

مَا تَذَرُ مِن شَيْءٍ أَتَتْ عَلَيْهِ إِلَّا جَعَلَتْهُ كَالرَّمِيمِ ﴿٤٢﴾

४३. आणि समूद [४४] च्या वृत्तांतातही निशाणी आहे, जेव्हा त्यांना सांगितले गेले की एका वेळे पावेतो लाभ उचला.[४५]

وَفِي ثَمُودَ إِذْ قِيلَ لَهُمْ تَمَتَّعُوا حَتَّىٰ حِينٍ ﴿٤٣﴾

३६. म्हणजे ही गोष्ट ही अल्लाहतर्फे निर्धारित आहे की कोणता दगड कोणाला लागेल व त्याच्या नाशाला कारणीभूत ठरेल.

३७. म्हणजे ईश प्रकोप अवतरण्या आधीच सर्वश्रेष्ठ अल्लाहने ईमान बाळगणाऱ्यांना या वस्तीतून सुखरूप पणे बाहेर काढले.

३८. म्हणजे या वस्तीत मुसलमानांचे केवळ एकच घर होते, आणि ते होते हजरत लूत यांचे त्यांच्या कुटुंबातील माणसां खेरीज कोणी ही इस्लाम धर्माचा स्वीकार केलेला नव्हता.

हजरत लूत यांच्या इस्लाम संबंधी आवाहनात्मक व सुधारणात्मक प्रयत्नांचा हा परिणाम की त्यांचे स्वत:चेच घर फक्त मुसलमानांचे घर बनू शकले, ही गोष्ट इस्लाम विषयक आवाहन व सुधारणा कार्य करणाऱ्यांना विचार चिंतनाचे आवाहन करते. तात्पर्य, आवाहन व सुधारणेचे कार्य किती ही उत्कृष्टपणे पार पाडले गेले असावे व हे कार्य करणारे उच्च चारित्र्य बाळगणारे पैगंबराचे व्यक्तिमत्व का असेना तरी ही लोक आवाहन मान्य करून आपली सुधारणा करून घेतीलच असे मात्र नाही. फार थोडयाचा लोकांना सत्य-स्विकृतिची सुबुद्धि लाभू शकते, यास्तव परिणामांना अल्लाहच्या हवाली करून आपले कर्तव्य अधिकाधिक उत्तम रित्या पार पाडण्याचा प्रयत्न केला पाहीजे.

३९. स्पष्टीकरणा करीता पहा सूरह हूद टीप क्र. १२१.

४०. आता संक्षिप्तरित्या फिरऔन, आद, समूद व नूह जनसमूहा सारख्या विद्रोही जन समूहांच्या बोधदायक परिणतीकडे लक्ष वेधले गेले आहे. हे वृत्तांत या गोष्टीचा डोळस पुरावा आहे की अल्लाह आपल्या दासांच्या अवस्थेशी अनभिज्ञ नाही. विद्रोही जन-समूहांवर त्याच्या प्रकोपाचा असूड नेहमीच कोसळत राहीला आहे.

४१. म्हणजे त्याने विद्रोहपूर्ण व अत्याचार पूर्ण वर्तन अंगिकारले होते; त्याची जाणीव त्याला मरते वेळी झाली. या आधारावर तो स्वत:ची निर्भत्सना करू लागला. फिरऔन व त्याच्या सैन्याचा समुद्रात बुडून मरण्याचा वृत्तांत सूरह यूनुस व सूरह ताहा मध्ये तपशीलवार पणे सांगितला गेला आहे.

४२. आद जन समूहाच्या विनाशाचा वृत्तांत सूरह अहकाफ मध्ये अधिक स्पष्टीकरणा सह निवेदिला गेला आहे.

४३. स्पष्टीकरणा साठी पहा सूरह अहकाफ टीप क्र. ४१ व ४२.

४४. समूद जन समूहाच्या विनाशाचा वृत्तांत सूरह हूद व इतर अनेक सुरतींमध्ये निवेदिला गेला आहे.

४५. म्हणजे ऐहीक लाभ थोडया दिवशी करीता आहे म्हणून यास ध्येय उद्दिष्ट बनवू नका आणि आखिरत वर याला प्राधान्य देऊ नका. आखिरतला ध्येय उद्दिष्ठ बनवून जेवढा ऐहीक लाभ साध्य होऊ शकेल तेवढाच प्राप्त करा.

४४. परंतु त्यांनी आपल्या पालन कर्त्याच्या आदेशाकडे पाठ फिरवली तेव्हा त्यांना एका भयंकर गर्जनेने येऊन गाठले व ते बघतच राहीले.[४६]

فَعَتَوْا عَنْ أَمْرِ رَبِّهِمْ فَأَخَذَتْهُمُ الصَّٰعِقَةُ وَهُمْ يَنظُرُونَ ﴿٤٤﴾

४५. मग ते ना उठू शकलेत आणि ना आपला बचाव करू शकलेत.

فَمَا اسْتَطَٰعُوا مِن قِيَامٍ وَمَا كَانُوا مُنتَصِرِينَ ﴿٤٥﴾

४६. आणि नूहच्या जन समूहास [४७] ही आम्ही यांच्या पूर्वी धरले. ते देखील अवज्ञाकारी लोक होते.

وَقَوْمَ نُوحٍ مِّن قَبْلُ ۖ إِنَّهُمْ كَانُوا قَوْمًا فَٰسِقِينَ ﴿٤٦﴾

४७. आणि आकाशाला आम्ही सामर्थ्याने बनविले आणि आम्ही मोठी व्यापकता बाळगणारे आहोत.[४८]

وَالسَّمَاءَ بَنَيْنَٰهَا بِأَيْيدٍ وَإِنَّا لَمُوسِعُونَ ﴿٤٧﴾

४८. आणि जमीनीला आम्ही अंथरले, तेव्हा किती चांगले अंथरणारे आहोत (आम्ही). [४९]

وَالْأَرْضَ فَرَشْنَٰهَا فَنِعْمَ الْمَٰهِدُونَ ﴿٤٨﴾

४९. आणि प्रत्येक चीज वस्तूच्या आम्ही जोडया निर्माण केल्या, यासाठी की तुम्ही बोध ग्रहण करावा.[५०]

وَمِن كُلِّ شَيْءٍ خَلَقْنَا زَوْجَيْنِ لَعَلَّكُمْ تَذَكَّرُونَ ﴿٤٩﴾

५०. तेव्हा अल्लाहकडे धाव घ्या. [५१] मी त्याच्या तर्फे तुमच्या करीता उघडरित्या खबरदार करणारा आहे. [५२]

فَفِرُّوا إِلَى اللَّهِ ۖ إِنِّي لَكُم مِّنْهُ نَذِيرٌ مُّبِينٌ ﴿٥٠﴾

५१. आणि अल्लाहच्या सोबत अन्य एखादे उपास्य ठरवू नका. मी त्याच्या तर्फे तुमच्या करीता उघड रित्या खबरदार करणारा आहे.[५३]

وَلَا تَجْعَلُوا مَعَ اللَّهِ إِلَٰهًا ءَاخَرَ ۖ إِنِّي لَكُم مِّنْهُ نَذِيرٌ مُّبِينٌ ﴿٥١﴾

५२. अशा प्रकारे यांच्या पूर्वी होऊन गेलेल्या जन समूहांजवळ जो पैगंबर देखील आला त्याला त्यांनी जादूगार किंवा वेडाच म्हटले.[५४]

كَذَٰلِكَ مَا أَتَى الَّذِينَ مِن قَبْلِهِم مِّن رَّسُولٍ إِلَّا قَالُوا سَاحِرٌ أَوْ مَجْنُونٌ ﴿٥٢﴾

५३. काय ते एकमेकांना या विषयी ताकीद करून गेलेत ? वस्तुत: हे बंडखोर लोक आहेत.[५५]

أَتَوَاصَوْا بِهِ ۚ بَلْ هُمْ قَوْمٌ طَاغُونَ ﴿٥٣﴾

४६. म्हणजे त्यांच्या दृष्टीसमोर त्यांना भयंकर गर्जनेने येऊन गाठले आणि ते स्तब्ध होऊन राहीले. स्पष्टीकरणा करीता पहा सूरह अअराफ टीप क्र. १२३.

४७. नूह जनसमूहाच्या विनाशाचा वृत्तांत सूरह हूद मध्ये तपशील वारपणे सांगितला गेला आहे.

४८. या सूरहच्या समारोपाच्या आयती होत; ज्यात बोध दायक शैलीत एकेश्वरवाद, आखिरत व प्रेषित्वाला सुसंगत स्वरूपात सादर केले गेले आहे. कारण अल्लाहच्या उचित परिचयाने मोबदला व शिक्षेची निकड दिसून येते आणि ही निकड भागविण्या करीता प्रेषित्व अत्यावश्यक ठरते.

आकाशाला पाहील्यावर अल्लाहच्या अति विशाल सामर्थ्याची कल्पना येते आणि हे अवलोकन उघडया डोळयांनी केले जाऊ शकते. परंतु आजच्या काळात विज्ञानाने शक्तिशाली दुर्बिणीच्या सहाय्याने जी रहस्ये उलगडली आहेत, ती आकाशाच्या अतिभव्य विस्ताराचा साक्षात्कार घडवतात अब्जावधी ताऱ्यांचे अस्तित्व, आकाश गंगांची व्यवस्था आणि मोठमोठया इतर अनेक आकाश गंगा एवढया उंची वर तारे ज्याचा उजेड कित्येक प्रकाश वर्षात (Light years) जमीनीवर पोहचतो. आणि एवढी माहीती प्रप्त झाल्यावर ही खगोल शास्त्रज्ञांचे हे मान्य करणे की या सृष्टीच्या मर्यादेचे आम्हाला ज्ञान नाही; आणि ही सतत पसरत (Expand) चालली आहे. या आयतीच्या सत्यतेचे स्पष्ट प्रमाण आहे. आणि यावरून अल्लाहच्या अथांग सामर्थ्याची कल्पना येते.

मग जो ईश्वर एवडे विशाल सामर्थ्य बाळगतो, तो एक असे विश्व का निर्माण करू शकत नाही ज्यात समस्त माणसांना जिवंत करून त्यांच्या आचरणाचा त्यांना मोबदला दिला जावा.

४९. जमीनीची सर्वश्रेष्ठ अल्लाहने अशा प्रकारे बिछाईत केली आहे की तिच्यावर अब्जावधी माणसे शांततापूर्वक राहू शकतात. तिचा पृष्ठभाग या वैशिष्टयासह बिछविला आहे की त्यावर चालणे फिरणे अगदी सोपे होईल.

भौगोलिक दृष्टया पाहिल्यास पृथ्वीचा परीघ - मैल आणि तिचा पृष्टभाग सुमारे पन्नास कोटी किलोमीटर आहे. यावरून तिच्या विस्ताराची कल्पना चांगल्या प्रकारे केली जाऊ शकते. परंतु माणसाच्या संकुचित दृष्टीची दशा अशी की तो ईश्वराच्या सामर्थ्याला मर्यादित समजून आखिरतचा इन्कार करणारा बनतो.

५०. स्पष्टीकरणा करीता पहा सूरह यासीन टीप क्र. ३९, ४०, ४१, ४२,

जगात ज्या अर्थी प्रत्येक वस्तू जोडीने आहे आणि आपली पूर्तता आपल्या जोडीने मिळून करते तेव्हा या जगाची ही जोडी असली पाहीजे आणि कुरआन असे सांगतो की याची जोडी आखिरत आहे आणि आखिरतच्या प्राप्तीनेच या जगाची पूर्तता होते. अन्यथा जगाचे अस्तित्व अशक्य, निरर्थक व निरूद्देश्य ठरते.

५१. ही आणि या नंतरच्या दोन आयती अल्लाहचीच वाणी होय, परंतु यांना या शैलीत सादर केले गेले आहे की, बोलणारे पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) आहेत. अशासाठी की ही वचने पैगंबरांच्या मुखातून निघावीत आणि स्पष्ट व्हावे की पैगंबराचे मिशन कशा स्वरूपाचे आहे.

या ठिकाणी संक्षिप्त शब्दात अल्लाहकडे धाव घेण्याचे व द्रुतगतीने जाण्याचे आवाहन केले गेले आहे. ज्याचा अर्थ असा की अल्लाहकडे केवळ जाऊ नका तर द्रुतगतीने जा कारण त्याला गाठणे म्हणजे आपल्या खऱ्या खुऱ्या स्वामीला गाठणे व आपल्या ध्येयाप्रत पोहचणे होय. अल्लाहकडे द्रुतगतीने जाण्यात त्याच्याशी भावना असल्याचे ही जाहीर होत आहे आणि यात आशा आकांक्षांचे एक विश्व ही वसले आहे.

५२. म्हणजे मला सर्वश्रेष्ठ अल्लाहने या साठी पाठविले आहे की मी तुम्हाला कियामतीच्या दिवसा पासून खबरदार करावे की त्या दिवशी कोणकोणत्या गोष्टींना तोंड द्यावे लागेल. जेणेकरून तुम्ही शुद्धीवर यावे व अल्लाह सोबतचे आपले वर्तन सुधारावे.

५३. अर्थात मी तुम्हाला शिर्कच्या दुष्परिणति पासून उघडरित्या खबरदार करतो. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या या ताकीदी नंतर ही जे लोक मूर्तिपूजा व शिर्क करण्यात व्यस्त राहीले ते कियामतीच्या दिवशी ईश प्रकोपास पाहून असे म्हणू शकणार नाहीत की आम्हाला याच्या दुष्परिणती पासून सावध का केले गेले नव्हते.

५४. म्हणजे ज्या प्रकारे या प्रेषितास जादूगार किंवा वेडा म्हटले जात आहे त्याच प्रकारे या पूर्वीच्या प्रेषितांना ही असेच संबोधिले जात राहीले.

पैगंबरांची कथने ज्या अर्थी ‘वही’ (ईश संदेशांचे अवतरणा) च्या आधारे असतात म्हणून अतिशय प्रभावी व हृदयात शिरकाव करणाऱ्या असतात ज्याचा खुलासा इन्कार करणारे अशा प्रकारे करतात की हा जादू टोणा आहे ज्याद्वारे तो लोकांना मोहीत करीत आहे. परंतु ते हा विचार करीत नाही की एखाद्याच्या मनात ठसेल अशी हकीगत सांगण्याची ताकत जादूगारा जवळ कोठे? आणि लोकांच्या जीवनाला चांगले वळण लावण्याचे सामर्थ्य ही त्यांच्या अंगी कोठे?

अशा प्रकारे पैगंबरांचा इन्कार करणाऱ्यांच्या या दाव्याचे की यावर आकाशातून वही (ईश-संदेश) अवतरीत होतो, हा

खुलासा करतात की हा वेडेपणा आहे. परंतु ते हा विचार करण्याचे कष्ट घेत नाही की काय एखादा वेडा बुद्धिकौशल्याचे गोष्टी बोलू शकतो; आणि मानव-जीवना करीता एक आचर-विचार व्यवस्था प्रदान करू शकतो?

५५. म्हणजे जनसमूहांकडून पैगंबरांना जादूगार किंवा वेडा ठरविण्याचा हा क्रम अशाच स्वरूपाचा आहे की जणू प्रत्येक जनसमूह आपल्या नंतर येणाऱ्या जनसमूहाला हे मृत्युपत्र करत गेला की जेव्हा तुमच्या जवळ एखादा पैगंबर येईल तेव्हा त्याला जादूगार किंवा वेडा खुळा ठरवा. आणि वस्तुस्थिती अशी की हे सर्व अल्लाहशी बंड करणारे जनसमूह होते व या पैगंबरांचे विरोधक ही बंडखोरच आहेत आणि त्यांचा हा विद्रोहच होय जो पैगंबराला पैगंबर म्हणून मान्य करण्यास त्यांना प्रवृत करीत नाही. आणि वास्तवतेच्या विपरीत गोष्टी बोलण्यास त्यांना उद्युक्त करतो.

**यास्तव तुम्ही यांची पर्वा करू नका, तुमच्यावर काहीच आक्षेप नाही. आणि उपदेश करीत राहा, कारण उपदेश ईमान बाळगणाऱ्यांना लाभ पोहचवितो. मी जिन्न आणि मानवांना केवळ अशासाठी निर्माण केले आहे की त्यांनी माझी उपासना (इबादत) करावी. *(अल-क़ुर्आन)***

५४. यास्तव तुम्ही यांची पर्वा करू नका, तुमच्यावर काहीच आक्षेप नाही.[५६]

فَتَوَلَّ عَنۡهُمۡ فَمَآ أَنتَ بِمَلُومٖ ﴿٥٤﴾

५५. आणि उपदेश करीत राहा, कारण उपदेश ईमान बाळगणाऱ्यांना लाभ पोहचवितो.[५७]

وَذَكِّرۡ فَإِنَّ ٱلذِّكۡرَىٰ تَنفَعُ ٱلۡمُؤۡمِنِينَ ﴿٥٥﴾

५६. मी जिन्न आणि मानवांना केवळ अशासाठी निर्माण केले आहे की त्यांनी माझी उपासना (इबादत) करावी.[५८]

وَمَا خَلَقۡتُ ٱلۡجِنَّ وَٱلۡإِنسَ إِلَّا لِيَعۡبُدُونِ ﴿٥٦﴾

५७. मी ना यांच्या कडून उपजिविका इच्छितो आणि ना हे इच्छितो की त्यांनी मला खाऊ घालावे.[५९]

مَآ أُرِيدُ مِنۡهُم مِّن رِّزۡقٖ وَمَآ أُرِيدُ أَن يُطۡعِمُونِ ﴿٥٧﴾

५८. निः संशय अल्लाहच उपजिविका देणारा, सामर्थ्यवान शक्तिशाली आहे.[६०]

إِنَّ ٱللَّهَ هُوَ ٱلرَّزَّاقُ ذُو ٱلۡقُوَّةِ ٱلۡمَتِينُ ﴿٥٨﴾

५९. तेव्हा या अत्याचारी करीता तसेच माप आहे जसे त्यांच्या सोबत्यां करीता होते.[६१] महणून यांनी घाई करू नये.

فَإِنَّ لِلَّذِينَ ظَلَمُواْ ذَنُوبٗا مِّثۡلَ ذَنُوبِ أَصۡحَٰبِهِمۡ
فَلَا يَسۡتَعۡجِلُونِ ﴿٥٩﴾

६०. या काफिरां करीता त्या दिवशी सर्वनाश आहे, ज्याचा यांच्याशी वायदा केला जात आहे.[६२]

فَوَيۡلٞ لِّلَّذِينَ كَفَرُواْ مِن يَوۡمِهِمُ ٱلَّذِي يُوعَدُونَ ﴿٦٠﴾

५६. म्हणजे हे पैगंबर! तुम्ही यांच्यावर प्रमाण प्रस्थापित केले आता जर हे लोक आपल्या विद्रोहा पासून परावृत्त होऊ इच्छित नाही तेव्हा त्यांना त्यांच्या दशेवर सोडा. तुम्ही आपले कर्तव्य बजावले आता तुमच्यावर कसलाही आक्षेप नाही.

५७. बंडखोर लोकांकडून त्यांच्यावर प्रमाण प्रस्थापित झाल्यानंतर ही, तोंड फिरविण्याचा अर्थ हा नव्हे की बोध देण्याचे काम थांबवले जावे. नव्हे किंबहुना उपदेश देत राहण्याचे काम जारी ठेवले पाहीजे की हे ईमान बाळगणाऱ्यांच्या हक्कात लाभदायक ठरते. आणि ते बोध ग्रहण करतात. अर्थात हे की आता या बंडखोरांना समजाविण्याचा प्रयत्न करणे निरर्थक आहे, मात्र सर्व सामान्य पणे बोध व उपदेश करण्याचे कार्य जारीच ठेवले पाहीजे आणि यापासून स्वत:ला अलिप्त ठेवता कामा नये. मग परिस्थिति किती ही प्रतिकूल असो. कारण असे ही लोक असू शकतात जे याचे चांगले परिणाम स्विकारणारे असावेत.

आवाहन व उपदेशाचे कार्य करणाऱ्यां करीता हे मार्गदर्शन मोठे मोलाचे आहे.

५८. इबादत (उपासने) चे स्पष्टीकरण सूरह कहफ टीप क्र. १२५ मध्ये केले गेले आहे. या प्रसंगी ही टीप तसेच सूरह हूद टीप क्र. ५ ही विचाराधीन असावी.

कुरआनाने इबादतचा शब्द भक्ति या अर्थाने एवढया मोठया प्रमाणात वापरला आहे की त्याचा प्रकट आशय 'भक्ति' हाच ठरतो. यास्तव जेव्हा 'मूर्तिपूजे' करीता कुरआनात इबादत (उपासना) हाच शब्द वापरला गेला आहे, जो स्पष्टत: भक्ति, पूजा या अर्थानेच आहे, आणि जेथपावेतो शब्द कोषाचा संबंध आहे अरबी भाषेच्या प्रसिद्ध व प्रमाणित शब्दकोषात याचा अर्थ अशा प्रकारे निवेदिला गेला आहे :-

واصل العُبودية الخضوعُ وَالتَّذ لُّل وَ عَبَدَ اللهَ يَعۡبُدُهٗ عِبادَةً‌‌‌________تَأَلَّهَ لَهٗ۔

'इबादत (उपासने) चे मूळ विनम्रता व शालीनता आहे.'

'त्याने अल्लाहची इबादत (उपासना) केली म्हणजे त्याला इलाह (उपास्य) बनविले.'

وَ التَّعَبُّدُ التَّنَسُّكُ۔ قَالَ (الفراءُ) وَمَعۡنَى الۡعِبَادَةِ فِي اللُّغَةِ الطَّاعَةُ مَعَ الۡخُضُوۡعِ۔ (لسان العرب ج ۳ ص ۲۷۲۔۲۷۳)

'तअब्बुद म्हणजे उपासन विधींची अदायगी'

'फरा म्हणतात शब्दकोषात उपासनेचा अर्थ विनम्रता पूर्वक आज्ञा पालन करणे होय'

(लिसानुल अरब खंड ३ पृष्ठे २७२-२७३)

यावरून ही गोष्ट स्पष्ट होते की शब्दकोष कारांनी इबादत (उपासना) या शब्दाचा अर्थ आज्ञापालन हा सांगितला असला तरी त्याच्या सोबत विनम्रतेची अट ही घातली आहे. अर्थात असे आज्ञापालन ज्यात मनाची विनम्रता, शालीनता व दास्यत्व भावना प्रकट व्हावी तेव्हा उघड आहे की हे अज्ञा पालन अल्लाह करीताच खास ठरू शकते. आणि हे भक्ति आराधनाच्या निर्धारीत आशयात सामील आहे परंतु 'भक्ति' उपासनेचा सर्वप्रथम आश्य आहे आणि अल्लाहशी नाते जोडण्यासाठी हे पहीले पाऊल आहे आणि पहिलेच पाऊल जर चुकीचे पडले तर मग सारेच काही चुकत जाते यास्तव धर्मात भक्ति उपासनेला सर्वात प्रथम महत्व दिले गेले आहे आणि समस्त पैगंबरांच्या आवाहनाचा केंद्र विंदू हाच राहीला की :-

اُعۡبُدُوا اللّٰهَ مَا لَكُمۡ مِّنۡ اِلٰهٍ غَيۡرُهٗ۔ (ہود۔۵۰)

'' अल्लाहची उपासना करा. त्याच्या खेरीज तुमचे कोणतेही उपास्य नाही. (हूद-५०)

भाष्यांतर्गत आयतीत जिन्न व मानवांच्या निर्मितीचे उद्दिष्ट हे सांगितले गेले आहे की त्यांनी अल्लाहची इबादत (उपासना) करावी यावरून खालील गोष्टींवर उजेड पडतो:-

एक अशी की ज्याअर्थी जिन्न व मानवांची निर्मिती केवळ अल्लाहची इबादत (उपासना) करण्या करीता झाली आहे तेव्हा ना जिन्नांना उपास्य ठरविणे योग्य आहे आणि ना मानवांना. ते उपासनीय मुळीच नाहीत. म्हणून त्यांची उपासना खोटी आहे. व्यर्थ आहे.

दुसरी ही की जर कोणी अल्लाहची उपासना करीत नाही किंवा त्याच्या सोबत इतर उपास्यांना उपासनेत सहभागी करतो मग त्या मूर्त्या असोत किंवा फरिश्ते, काल्पनिक ईश्वर (देवी देवता) असोत किंवा थोर विभूति, तो आपल्या निर्मितीच्या उद्दिष्टाकडे पाठ फिरवितो म्हणून त्याचे अस्तित्व नगण्य ठरते आणि जेव्हा लाकूड कुचकामी ठरते तेव्हा ते जाळण्याच्याच उपयोगी पडते. अशा प्रकारे जे लोक आपल्या निर्मितीच्या उद्दिष्टास दृष्टीआड करून आपल्या अस्तित्वास निरर्थक बनवतात ते स्वत:ला जहन्नमच्या आगीत निरंतर जळण्यास पात्र बनवतात.

तिसरी अशी की अल्लाहची उपासना करणे दासांवर अल्लाहने लागू केलेले कर्तव्य आहे. म्हणून त्यास अनिवार्य कर्तव्य (Duty) समजून केले पाहीजे. जर एखादा मनुष्य असे म्हणतो की माझ्याजवळ अल्लाहच्या उपासने करीता सवड नाही किंवा नमाज पढण्याकरीता फुरसत नाही तर तो फार मोठया अज्ञानाचा पुरावा देतो. त्याला ना आपल्या कर्तव्य पूर्तिची जाणीव आहे आणि ना उपासनेची गोडी. तो असे

समजतो की मी केवळ खाण्या-कमविण्या करीताच जन्माला आलो आहे. म्हणून तो मनुष्य नव्हे तर आर्थिक जनावर बनून जगतो आणि जेव्हा मनुष्यांचे या स्तराप्रत पतन होते तेव्हा यश समृद्धीचे द्वार त्याच्या करीता बंद केले जाते.

चौथी गोष्टी अशी की अल्लाहची उपासना ज्या अर्थी मनुष्य-निर्मितीचा उद्देश आहे तर त्याच्याशी अंत:करणापासून ओढ असणे अगत्याचे आहे. नमाज, अल्लाहचे नाम:स्मरण तस्बीह (अल्लाहची स्तुति प्रशंसा व गुणगान) पवित्र कुरआनाचे पठण, त्यापासून शोध-बोध आणि इतर उपासनेच्या अंगांचा इतमाम आणि त्यांच्याद्वारे निर्मितीच्या उद्दिष्टास पूर्ण करणे.

पाचवी अशी की अल्लाहचा उपासक त्याच्या आज्ञा पालनाचा इन्कार करणारा असूच शकत नाही कारण अल्लाहच्या उपासनेचा इन्कार म्हणजे त्याच्याशी विद्रोह. एकीकडे अल्लाहपुढे नत मस्तक होणे व दुसरी कडे नतमस्तक होण्यास इन्कार या दोन परस्परविरोधी गोष्टी होत; ज्या उपासनेला निरर्थक ठरवितात. वरील आयतींमध्ये बंडखोरांचा उल्लेख ज्या रीतीने झाला आहे त्यावर एक दृष्टीक्षेप टाका आणि ही गोष्ट देखील विचाराधिन असावी की इब्लीस (सैताना) ने अल्लाहची उपासना करण्यास इन्कार केला नव्हता; किंबहुना अल्लाहचा आदेश मानण्यास इन्कार केला होता. ज्यामुळे तो धि:क्कारीत ठरला.

५९. अल्लाह नि:स्पृह आहे. त्याला कोणत्याही गोष्टीची गरज नाही आणि ना तो आपल्या दासांकडून उपजिविकेची अभिलाषा बाळगतो तो केवळ एवढेच इच्छितो की दासांनी त्याची उपासना करावी तो त्याचा हक्क ही आहे व न्यायाची निकड ही. आणि या उपासनेचा लाभ ही अल्लाहला मिळणार नाही, किंबहुना उपासकालाच तो लाभेल.

६०. या ठिकाणी अल्लाहचे तीन गुणविशेष सांगितले गेले आहेत एक हा की तो उपजिविका देणारा आहे म्हणजे तो खायला प्यायला मागत नाही, उलट खाऊ पिऊ घालतो. आणि उपजिविका प्रदान करणारा ही असा की अगणित मनुष्य व इतर प्राण्यांना प्रदीर्घ काळापासून सतत उपजिविका देत आला आहे आणि अशाने त्याला सोडून मनुष्य अन्य एखाद्यास उपजिविका प्रदान करणारा किंवा अन्नदाता कसे समजू लागतो?

दुसरा गुणविशेष असा की तो सामर्थ्यवान आहे. म्हणून त्याला कसल्याही पाठबळाची गरज नाही. तो इतर कोणाच्या ही सहभागाविना केवळ आपल्या सामर्थ्याने समस्त सृष्टीची व्यवस्था चालवित आहे.

तिसरा गुणविशेष म्हणजे तो प्रबळ आहे म्हणून असा कोणी नाही जो त्याच्यावर वर्चस्व प्रस्थापित करू शकेल. ज्यांना अनेकेश्वर वाद्यांनी आपले उपास्य बनवून ठेवले आहे ते अल्लाहवर कदापि आपले वर्चस्व स्थापित करू शकत नाही. त्याच्यापुढे सर्वच अगतिक व लाचार आहेत.

अल्लाहच्या या परिचयास या गोष्टीची निकड जाणवते की त्याला उपास्य मानून त्याची प्रामाणिक पणे व मनोभावे उपासना केली जावी.

६१. या ठिकाणी अत्याचारीशी अभिप्रेत ते लोक होत, ज्यांनी आपल्या निर्मितीच्या उद्देश्यास विस्मृतीच्या अडगळीत टाकले आणि स्वरचित उपास्यांची भक्ति आराधना करू लागले अवढेच नव्हे तर पैगंबरांच्या चेतावणीचा ही त्यांनी काहीच परिणाम स्वत:वर करून घेतला नाही. अशा अत्याचारी लोकांची तीच दुर्दशा व्हायची आहे जी यांच्यापूर्वी होऊन गेलेल्या अत्याचारी जनसमूहांची झाली

६२. अभिप्रेत कियामतीचा दिवस जेव्हा कुफ्र करणारे दुरावस्थेस पोहचतील.